

# सार्थ वाग्भट

**वाग्भटकृत अष्टांगहृदय व त्याचे मूळासह संपूर्ण मराठी भाषांतर**

(आर्यवैद्यकाचा इतिहास इत्यादी विषयक उपोद्घात, रोग, औषधी इत्यादिकांचें वर्णानुक्रम सूचीपत्र, कठीण शब्दांचा कोश इत्यादी सहित)

**डॉ. गणेश कृष्ण गर्दे**

**चौखम्बा सुरभारती प्रकाशन • वाराणसी**

# सार्थ वाग्भट

## वाग्भटकृत अष्टांगहृदय व त्यांचें मराठी भाषांतर

(आर्यवैद्यकाचा इतिहास इत्यादी विषयक उपोद्घात, रोग, औषधी इत्यादिकांचें वर्णानुक्रम सूचीपत्र, कठीण शब्दांचा कोश इत्यादी सहित)

**कै. डॉ. गणेश कृष्ण गर्दे**

एल्. एम्. अँड एस्.

**चौखम्बा सुरभारती प्रकाशन**

वाराणसी

© सर्वाधिकार सुरक्षित। इस प्रकाशन के किसी भी अंश का किसी भी रूप में पुनर्मुद्रण या किसी भी विधि (जैसे-इलेक्ट्रोनिक, यांत्रिक, फोटो-प्रतिलिपि, रिकॉर्डिंग या कोई अन्य विधि) से प्रयोग या किसी ऐसे यंत्र में भंडारण, जिससे इसे पुनः प्राप्त किया जा सकता हो, प्रकाशक की पूर्वलिखित अनुमति के बिना नहीं किया जा सकता है।

सार्थ वाग्भट—डॉ. गणेश कृष्ण गर्दे

**ISBN : 978-93-83721-83-2**

प्रकाशक :

**चौखम्बा सुरभारती प्रकाशन**

(भारतीय संस्कृति एवं साहित्य के प्रकाशक तथा वितरक)
के 37/117 गोपाल मन्दिर लेन, पोस्ट बॉक्स न. 1129
वाराणसी 221001
दूरभाष : +91 542 2335263, 2335264
e-mail : csp_naveen@yahoo.co.in
website : www.chaukhamba.co.in
: @chaukhambabooks
: @chaukhamba

© सर्वाधिकार प्रकाशकाधीन

संस्करण : 2023
₹ 550.00

वितरक :

**चौखम्बा पब्लिशिंग हाउस**

4697/2 ग्राउण्ड फ्लोर, गली न. 21-ए
अंसारी रोड़, दरियागंज
नई दिल्ली 110002
दूरभाष : +91 11 23286537, 41530947 (मो.) +91 9811104365
e-mail : chaukhambapublishinghouse@gmail.com

*

अन्य प्राप्तिस्थान :

**चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान**

4360/4, अंसारी रोड दरियागंज
नई दिल्ली 110002

*

**चौखम्बा विद्याभवन**

चौक (बैंक ऑफ बड़ोदा भवन के पीछे)
पोस्ट बॉक्स न. 1069
वाराणसी 221001

**मुद्रक :** ए.के. लिथोग्राफर, दिल्ली,

# कै. डॉ. गणेश कृष्ण गर्दे

## ( अल्प परिचय )

ऐन पेशवाईंत जीं कर्तबगार घराणीं स्वाभ्युदयार्थ कोंकणांतून घाटमाथ्यावर आलीं, त्यांत गर्दे व किर्लोस्कर हीं घराणीं प्रमुख होत. रत्नागिरी जिल्ह्यांतील मांवळजें हें गर्दे यांचें मूळ गांव. तेथून पुढें बेळगांव जिल्ह्यांतील गुर्लहोसूर येथें गर्दे घराण्याच्या तीन चार पिढ्या नांदल्या. गणेश कृष्णांचे पितामह शिवाजीपंत गर्दे हे मोठे मानी व शूर पुरुष असून पेशवाईंत नांवाजलेले होते. पेशव्यांच्या राज्याची दक्षिणेकडील सरहद्द म्हणजे सध्यांचा बेळगांव जिल्हा होय. या सीमेवर राहून हैदरअल्ली वगैरेंचे जे हल्ले होत त्यापासून पेशवाईचा बचाव करण्याचें काम ज्या शूर व कर्त्या घराण्यांकडे होतें, त्यांत गर्दे, गोखले, किर्लोस्कर ह्यांची गणना होते. सुप्रसिद्ध आद्य संगीत नाटककार कै. आण्णासाहेब किर्लोस्कर हे डॉ. गर्दे ह्यांचे मामेबंधु. डॉ. गर्दे ह्यांचे वडील कृष्णाजीपंत हे स्वतः वैद्यकी करीत, शिवाय अध्यात्म विषयांतहि ते पारंगत होते. वृत्तीनें अनासक्त असल्यानें त्यांनीं आयुष्याच्या उत्तरार्धांत संन्यास घेतला व कर्नाटकांत कलदगी ह्या गांवीं ते यथाकाल समाधिस्थ झाले. अशा पुण्यशील धर्मात्म्याच्या पोटीं तीन सुपुत्र जन्मले व त्यांनीं आपापल्या क्षेत्रांत मोठा नांवलौकिक कमाविला. कै. डॉ. गर्दे ह्यांचे ज्येष्ठ बंधु प्रसिद्ध वेदान्ती गीतापंचदशीकर्ते कै. बाबा गर्दे हे होत व कनिष्ठ बंधु कै. तात्यासाहेब गर्दे हे वऱ्हाडांत ( बुलढाण्यास ) सुप्रसिद्ध वकील होऊन गेले. पुण्यपुरुषाच्या वास्तुला पुरासारख्या विनाशक आपत्तीहि आदरानेंच नमून रहतात याचें प्रत्यंतर १९१४ सालीं गुर्लहोसूरच्या नदीला पूर आला तेव्हां मिळालें. पुरानें गर्दे व किर्लोस्कर यांचे भले मोठे चौसोपी वाडे जरी उध्वस्त झाले तरी डॉक्टरांची व कै. आण्णासाहेब किर्लोस्करांची जन्म झालेली खोली ऐन पुरांत तशीच उभी राहिली. असो.

डॉ. गणपतरावजी गर्दे यांचा जन्म गुर्लहोसूर येथें १८५५ ( शके १७७७ ) सालीं भाद्रपद वद्य चतुर्दशीस झाला. विद्यार्थीदशेपासूनच डॉक्टरसाहेबांची तैलबुद्धि व गंभीरवृत्ति दिसूं लागली होती. त्यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण बेळगांवास झालें. पुढें मुंबईस मेडिकल कॉलेजमध्यें ते गेले व तेथें एक हुशार विद्यार्थी म्हणूनच त्यांची ख्याति झाली होती. पाश्चिमात्य वैद्यक (ॲलोपॅथी ) शिकत असतांनाहि डॉक्टरसाहेबांचा ओढा आयुर्वेदादि प्राचीन भारतीय शास्त्रांकडे होता. इतकेंच नव्हे तर वाघिणीचें दूध पिणाऱ्या म्हणजे इंग्रजी शिकणाऱ्या लोकांत क्वचितच आढळणारी संस्कृताची व भारतीय शास्त्र-कलांची अभिरुचि व अभिमान त्यांच्या अंगीं आनुवंशिक संस्कारामुळें पूर्णपणें मुरला होता; व त्याचेंच परिणत फळ म्हणजे त्यांनीं लिहिलेले "**सार्थ वाग्भट**" व "**सार्थ माधव-निदान**" हे दोन उत्कृष्ट वैद्यकीय ग्रंथ होत. तो काळ ऐन इंग्रजीशाहीचा असल्यानें पाश्चात्य विज्ञानाची चहा व आपल्याकडील शास्त्रकलांची आवाळ-उपेक्षा होणें साहजिकच होतें. अशा पार्श्वभूमीवर डॉ. गर्दे यांची आयुर्वेद-विषयक श्रद्धा व विचार जास्तच उठून दिसतात. होमीओपॅथी, हायड्रोपॅथी, क्रोमोपॅथी, क्षाराचिकित्सा इ० वैद्यकीय शास्त्रांच्या शाखोपशाखांचा दृढ व्यासंग केल्यानें डॉ. गर्दे यांच्या चिकित्सेंत व औषधयोजनेंत एक प्रकारचें वैशिष्ट्य आढळून येई. एखादी नवी कल्पना—मग ती वैद्यक शास्त्राची असो अगर इतर शास्त्रांची असो—सम्यक् ग्रहण करून प्रसंगविशेषीं स्वतःची कल्पना लढविणें हे गुण डॉक्टरसाहेबांच्या अंगीं परिणत झालेले होते. याची साक्ष '**सार्थ वाग्भट**' या ग्रंथाच्या विद्वत्ताप्रचुर व प्रदीर्घ प्रस्तावनेंत आढळते.

डॉक्टरीची पदवी परीक्षा १८७८ मध्यें प्रथम श्रेणींत उत्तीर्ण होऊन डॉ. गर्दे हे महाराष्ट्राची विशेष आवड असल्यानें मुंबई सोडून पुण्यनगरीसच स्थायिक झाले. सुरुवातीला डॉ. तळवलकर यांचेबरोबर पुण्यास डॉक्टरी व्यवसाय सामायिक व सहकारी पद्धतीनें सुरू करून त्यांनीं बुधवार पेठेंतील आपल्या दवाखान्यास "मेडिकल युनियन" असें सार्थ नामाभिधान दिलें. पुढें विद्वानांचे चहाते श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं उभयता डॉक्टरद्वयांना संस्थानी नोकरीचें आमंत्रण दिलें, पण लोकमान्य टिळकांच्या सल्लयावरून डॉ. गर्दे पुण्यासच खाजगी व्यवसायांत राहिले. डॉक्टरीच्या धंद्याला लागणारा बहुभाषीपणा त्यांच्यांत नव्हता, पण त्यांच्या बुद्धिमत्तेनें त्यांनीं आपल्या वैद्यकीय व्यवसायांत चांगलें यश संपादन केलें. शिवाय इंग्रजी ज्ञानाबरोबर देशी वैद्यकाचें

ज्ञानहि त्यांस त्यांच्या वडिलांकडून मिळालेलें असल्यानें त्यांच्या चिकित्सेंत व योजनेंत एक प्रकारचें वैशिष्ट्य असे. डॉ. गर्दे यांची वैद्यक व इतर विषयांवर विद्वत्ताप्रचुर व्याख्यानें वारंवार होत असत. वसंत व्याख्यानमाला, गणेशोत्सव म्हणजे त्या काळचीं जणूं ज्ञानसत्रेंच असत, व त्यांत डॉ. गर्दे ह्यांचें व्याख्यान वक्ता म्हणून किंवा अध्यक्ष म्हणून अनेक वेळां होई. लो. टिळक व डॉ. गर्दे यांचा परस्पर लोभ अत्यंत होता, त्यामुळें केसरीच्या प्रथमच्या संपादकीय मंडळांत डॉ. गर्दे यांचा उल्लेख दृष्टीस पडतो. कै. डॉ. गर्दे यांनीं 'ईशगुणादर्श' नांवाचें विष्णुसहस्रनामावर काव्य रचलें, पण त्यांच्या हयातींत तें प्रसिद्ध होऊं शकलें नाहीं. त्यांच्या पश्चात प्रसिद्ध आलेल्या या 'ईशगुणादर्श' पुस्तकास लोकमान्य टिळकांची प्रस्तावना आहे, ही एकच गोष्ट टिळक व गर्दे यांच्या स्नेहभावाची निदर्शक आहे. या प्रस्तावनेंत लोकमान्य टिळकांनीं कै. डॉ. गर्दे यांच्या सखोल ज्ञानाबद्दल अतिशय गौरवपर उद्गार काढले आहेत. नाटककार कै. आण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशीं त्यांचा आप्तसंबंध होताच; त्यामुळें नाट्यसंगीताबद्दल त्यांना आपुलकी होती; त्यामुळें एका नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानहि डॉ. गर्दे यांना मिळाला होता. लोकमान्य टिळकांचे कौटुंबिक वैद्यकीय सल्लागार म्हणून डॉ. गर्दे यांना मानाचें स्थान होतें, याबद्दलचा आदरपूर्वक उल्लेख लोकमान्यांच्या मंडालेहून आलेल्या पत्रांत आढळतो. इतकेंच नव्हे तर लोकमान्यांनीं आपल्या सुप्रसिद्ध गीतारहस्यांतहि डॉ. गणपतरावजींचा उल्लेख केलेला आढळतो.

१८९९ सालीं डॉ. गर्दे यांच्या पत्नी निवर्तल्यानंतर ते प्रपंचांत राहूनहि अनासक्त वृत्तीनेंच 'संन्याशाचा संसार' करीत राहिले. चार मोठीं मुलें व एक लग्न झालेली कन्या त्यांना असल्यामुळें ते परत विवाहाच्या भानगडींत न पडतां आपल्या व्यवसायांत व विद्याभ्यासांगांतच रंगमाण झाले. आपल्या व्यवसायांत उत्तम यश व धनार्जन करून डॉ. गर्दे यांनीं आपल्या बंधुभगिनींच्या मुलाबाळांच्या विद्याभ्यासास मदत करून सर्वांना नीट मार्गी लाविलें. गीतेंत वर्णिलेल्या 'अध्यात्मनित्या विनिवृत्तकामा' अशा विरक्त वृत्तीनेंच आपलें उर्वरित आयुष्य घालवून डॉ. गर्दे हे ता. २ जुलै १९१६ रोजीं शांतवृत्तीनें स्वर्गवासी झाले.

शेवटीं या अल्प परिचयाचा उपसंहार करण्यापूर्वी माझे महाविद्यालयीन सहाध्यायी, आर्यभूषण छापखान्याचे व्यवस्थापक, श्री. पटवर्धन यांनीं मला हा परिचय लिहिण्याची संधि दिली याबद्दल त्यांचे हार्दिक आभार मानणें उचितच होईल. शिवाय आयुर्वेदाच्या ग्रहणकालांत आर्यभूषण मुद्रणालयानें स्वार्थत्यागपूर्वक 'सार्थ वाग्भट' या ग्रंथाच्या आवृत्त्या काढून आर्थिक झीज सोशिली, याबद्दलहि त्या मुद्रणसंस्थेचे जाहीर आभार मानणें आमचें कर्तव्यच आहे. आजच्या आयुर्वेदाच्या उर्जितावस्थाकालांत अशा ग्रंथराजाची गरज वाढतीच आहे हें उघड आहे. वैद्यकव्यवसायी व इतर आयुर्वेदाभिमानी या ग्रंथाचें स्वागत करतील अशी खात्री आहे. "सार्थ माधवनिदान" हा ग्रंथ छापण्याचा माझा विचार आहे एवढेंच या प्रसंगीं नमूद करणें प्रस्तुत ठरेल.

डॉ. गर्दे वाडा,
६३ शुक्रवार पुणें २.
ता. ११-११-५६

डॉ. र. कृ. गर्दे
(I. M. S. Retired)

# प्रस्तावना

संस्कृत वैद्यकाच्या कांहीं ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें पूर्वींच आलेलीं आहेत, परंतु ते सर्व ग्रंथ अलीकडच्या काळांतील व एकदेशीय आहेत. उदाहरणार्थ, माधवनिदान, शार्ङ्गधर, वैद्यजीवन, वैद्यामृत, चिकित्सासार इत्यादि. अनेक ग्रंथांतील थोडे थोडे भाग घेऊन भाषांतरासहित छापलेले कांहीं संग्रहात्मक ग्रंथहि मराठींत आले आहेत; परंतु त्यांत प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांना सारखाच मान देऊन त्यांतून हवे तसे उतारे घेतले आहेत. आर्ष (ऋषिप्रणीत) वैद्यकांतील समग्र विषयांचा त्यांत अंतर्भाव केला नाहीं, व कोणत्यांतून कोणते विषय घेतले आहेत याचा आधारहि दाखविला नाहीं. वास्तव आर्ष ग्रंथांतील समग्र अर्थाचें व्यवस्थित रीतीनें प्रतिपादन करणाऱ्या एक किंवा दोन संस्कृत ग्रंथांचें मराठींत भाषांतर केल्यावांचून पुरातन वैद्यकाची पूर्णपणें कल्पना होण्याला संस्कृत न जाणणाऱ्या लोकांना साधन नाहीं असें लक्षांत घेऊन तशा एखाद्या ग्रंथाचें मराठींत भाषांतर करण्याचें माझे मनांत घोळत होतें; इतक्यांत गायकवाडसरकारांतून वाग्भटाचें भाषांतर करण्याबद्दल कांहीं बक्षीस देण्याची जाहिरात सुमारें दहा वर्षांमागें पाहण्यांत आली. त्या जाहिरातीप्रमाणें नमुन्याकरितां नेमून दिलेल्या भागांचें भाषांतर एक महिन्यांत तयार करून पाठविलें त्याचें परीक्षण होऊन तें पसंत पडल्यावर सर्व ग्रंथाचें भाषांतर करण्याचें काम सदर सरकारांनीं मजकडे सोंपविलें. पुढें सुमारें तीन वर्षांनीं हें भाषांतर तयार होऊन हा वेळपर्यंत तें फुरसत नसल्यामुळें तसेंच पडून राहिलें होतें. चरक सुश्रुतादि इतर पुरातन ग्रंथ असतांना भाषांतराकरितां बडोद्यांतलि दक्षिणाकमिटीनें हाच ग्रंथ निवडून काढिला व मलाहि तोच पसंत पडला होता. याचें कारण असें कीं, एकंदर उपलब्ध ग्रंथांमध्यें सर्व विषय व्यापक व व्यवस्थित रीतीनें लिहिलेला असा संस्कृतांत वैद्यकावर हाच ग्रंथ आहे. आर्ष ग्रंथांपैकीं उत्तम काय ते दोन, चरक व सुश्रुत; परंतु तेहि सर्वांगव्यापक नाहींत. चरकांत कायचिकित्सा उत्तम प्रकारें सांगितली आहे, पण नेत्रादिकांच्या रोगांचीं नुसतीं नांवें देखील सांगितलीं नाहींत. सुश्रुतांत हे रोग व शल्य चिकित्सा उत्तम प्रकारें वर्णिली आहे, पण कायचिकित्सा संक्षेपानें सांगितली आहे. शिवाय चरकाची ग्रंथरचनेची शैली फारच जुनाट व अव्यवस्थेची (भलत्याच ठिकाणीं पाल्हाळ किंवा संक्षेप यानें युक्त) आहे. आर्ष ग्रंथांपैकीं ह्या दोन उत्तम ग्रंथांची जर अशी स्थिति आहे तर भेडहारितादिकांविषयीं सांगावयासच नको. वाग्भटांत विशेष हेंच आहे कीं, त्यानें कायचिकित्सा प्रायः चरकांतून व इतर अंगें सुश्रुतादि ग्रंथांतून घेऊन त्यांची जुळणी फार उत्तम प्रकारें केली आहे; म्हणून तोच एक ग्रंथ वाचला म्हणजे सर्व विषयांची माहिती पूर्णपणें व चांगल्या प्रकारें होऊन, अनेक ग्रंथ वाचल्याचें फळ अल्पायासानें मिळतें. तेव्हां यावरून लक्षांत येईलच कीं, वाग्भट हा स्वतंत्र ग्रंथ नव्हे; तर तो प्राचीन ऋषींच्या ग्रंथांपैकीं ज्या ज्यामध्यें जीं जीं अंगें उत्तम दिसलीं त्यांचें व्यवस्थित रीतीनें एकत्र संग्रहण करून केलेला ग्रंथ आहे. त्यांत प्रायः त्यांचेच शब्द व वाक्यें जशींचीं तशींच घेतलीं असून तीं जुळण्याचा क्रम मात्र भिन्न आहे. क्वचित् स्थलीं तदर्थसूचक श्लोक स्वतः रचिले आहेत.[२] आतां कोणी असें म्हणतील कीं, आर्ष ग्रंथांच्या सारसमुच्चयार्थ वाग्भटानें अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदय असे दोन ग्रंथ केले असून त्यांपैकीं ह्याच ग्रंथाची निवडणूक कां केली? त्यांस असें सांगणें आहे कीं, वाग्भटानें प्रथम अष्टांगसंग्रह हा ग्रंथ लिहिला, परंतु पुढें त्यास असें दिसून आलें कीं, हाहि ग्रंथ पाल्हाळाच्या संबंधानें कांहीं अंशीं आर्ष ग्रंथासारखा झाला; सबब त्यांतील फारसा उपयुक्त नसणारा असा फाजील भाग छाटून टाकून दुसरा एक दुमदार ग्रंथ करावा असें त्याच्या मनांत येऊन त्यानें आपला अष्टांगसंग्रह ग्रंथ पुनः आपल्या विचाराच्या चाळणीमध्यें घालून चाळला, व त्यांतलि कोंडा टाकून देऊन उपयुक्त भाग निराळा केला व त्यास अष्टांगहृदय असें नांव दिलें.

---

१ तेषामेकैकमप्यापि समस्तव्याधिसाधने ॥ प्रतितन्त्राभियोगे तु पुरुषायुषसंक्षयः ॥ भवत्यध्ययनेनैव यस्मात्प्रोक्तः पुनः पुनः ॥ तन्त्रकारैः स एवार्थः क्वचित्कश्चिद्विशेषतः ॥ तेऽर्थप्रयायनपरा वचने यच्चनादृतः ॥ (वृ. वा.)

२ सर्वतन्त्राण्यतः प्रायः संहृत्यष्टाङ्गसंग्रहः ॥ अस्थानविस्तराक्षेपपुनरुक्तादिवर्जितः ॥ हेतुलिङ्गौषधस्कन्धत्रयमात्रनिबन्धनः ॥ विनिगूढार्थतत्त्वानां प्रदेशानां प्रकाशकः ॥ स्वान्यतंत्राविरोधानां भूयिष्ठं विनिवर्तकः ॥ युगानुरूपसंदर्भो विभागेन करिष्यते ॥ नित्योपयोगे दुर्बोधसर्वाङ्गव्यापि भावतः ॥ संग्रहीतं विशेषेण यत्र कायचिकित्सितं ॥ न मात्रामात्रमप्यत्र किंचिदागमवर्जितं ॥ तेऽर्थाः स ग्रन्थ बन्धश्च संक्षेपाय क्रमोऽन्यथा ॥ (वृद्धवाग्भटः)

(उपोद्घात व वा. उ. अ. ४० श्लोक ८३ पासून ८८ पाहा.) तेव्हां समग्र ऋषिप्रणीत आर्यवैद्यकाचें यथार्थ ज्ञान मराठी वाचकांस अल्पासायासानें होण्याकरितां वाग्भटकृत अष्टांगहृदयाचें भाषांतरच योग्य साधन आहे.[1]

ह्या भाषांतराचा हा जरी मुख्य उद्देश आहे तरी साधारण संस्कृत जाणणाऱ्या लोकांनाहि अल्पायासानें मुळांतील अर्थ समजावा या हेतूनें पुढील ग्रंथांत मूळ व भाषांतर हीं दोन्हीं दिलीं आहेत. अशा पद्धतीनें भाषांतर छापण्यामध्यें आमचे आणखीहि दोन उद्देश होते; ते हे कीं, संस्कृतज्ञ लोकांना मूळ ग्रंथ शुद्ध छापलेला मिळावा, व भाषांतरांत कांहीं संशय आल्यास अर्थ मुळाशीं ताडून पाहतां यावा. मूळ ग्रंथ जरी दोन तीन ठिकाणीं छापिला आहे, तरी तो प्रथमच छापला गेल्यामुळें त्यांत बऱ्याच चुका राहिल्या आहेत. आम्हांस त्या छापील ग्रंथाची (विशेषेंकरून डॉ. कुंटे यांनीं छापिलेल्या पुस्तकाची) व कांहीं शुद्ध पोथ्यांची मदत मिळाल्यामुळें मूळ ग्रंथाची होईल तितकी निर्दोष प्रत काढण्याचा विशेष प्रयत्न करतां आला. वाग्भटाच्या मूळ ग्रंथाची अगदीं पहिली आवृत्ति प्रथम म्हैसुरास तेथील महाराजांच्या आश्रयानें निघाली, ह्याची एक प्रत सुमारें बारा वर्षांमागें आमच्या पाहण्यांत आली होती; परंतु ती कितपत शुद्ध आहे याविषयीं आम्ही आतां सांगूं शकत नाहीं; कारण त्याची प्रत हल्लीं आमच्याजवळ नाहीं. ह्या म्हैसुरास निघालेल्या आवृत्तीविषयीं लिहितांना आम्हांला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. ती ही कीं, वाग्भटाची प्रसिद्धि फार प्राचीन काळापासून म्हैसूर व मलबार या प्रांतांत झाली आहे, व तेथें तो वाहट या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या गोष्टीचा वाग्भटाच्या इतिहासाशीं किंचित् संबंध असल्यामुळें उपोद्घातामध्यें पुनः एकवार त्यासंबंधानें कांहीं सांगावें लागेल. त्यानंतर आमचे मित्र डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे यांनीं मुंबईत अरुणदत्ताच्या 'सर्वांगसुंदर' टीकेसहित वाग्भट छापून काढिला. आतां जरी या ग्रंथांत बऱ्याच चुका राहिल्या आहेत तरी या टीकेच्या ज्या लेखी प्रती पाहण्यांत येतात, त्यांतील दोष व ग्रंथाचा मोठेपणा लक्षांत आणल्यास डॉक्टर कुंटे यांनीं एवढा मोठा ग्रंथ छापून काढण्यामध्यें आपल्या अमोल्य वेळाचा व पैशाचा जो खर्च केला, त्याजबद्दल सर्वांनीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत. या पुस्तकांत मुद्रणदोषाखेरीज असा एक प्रकार ठिकठिकाणीं आढळण्यांत येतो कीं, टीकाकारानें ज्या पाठाला अनुलक्षून टीका लिहिली आहे, त्याहून भिन्न पाठ मुळांत छापले गेले आहेत. उदाहरणार्थ: सू० अ० ५ श्लो० ५६ यांत 'सर्वदोषजित्' याबद्दल 'सर्वरोगजित्' असा पाठ अनेक पोथ्यांमधून आढळतो, व तोच अरुणदत्तानें घेतला आहे असें त्याच्या टीकेवरून उघड होतें. तसेंच नि० अ० १६, श्लोक ५७; चि० अ० १५, श्लोक ११७; चि० अ० १९, श्लोक ५८; इ० स्थळींहि हाच प्रकार आढळतो. ह्या सटीक पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतर लवकरच कलकत्त्यासहि वाग्भटाचें नुसतें मूळ छापण्यांत आलें. हें पुस्तक पाहतांना असें दिसून येतें कीं, डॉ० कुंटे यांनीं छापलेल्या पुस्तकाची ती हुबेहूब नक्कलच आहे; म्हणून त्यांतहि तेच दोष राहिले आहेत. ह्या कारणामुळें आम्हीं छापलेल्या ग्रंथांतील मूळ वरील दोन्ही ग्रंथांपासून कांहीं ठिकाणीं निराळे आहे. पाठाच्या शुद्धाशुद्धतेच्या निर्णयाच्या संबंधानें कै० वे० रा० रा० बाळशास्त्री माटे यांच्या येथील एक शुद्ध केलेली पोथी (नुसतें मूळ), आणि वे० शा० सं० रा० गणेशशास्त्री तंटे यांनीं छापिलेला वृद्धवाग्भट, व तसेंच हेमाद्रि व अरुणदत्त यांच्या टीका, आणि चरक-सुश्रुत या ग्रंथांची आम्हांस बरीच मदत झाली व त्यांच्याच आधारानें आम्हीं शुद्ध पाठ कोणते या गोष्टीचा निर्णय केला आहे. भाषांतर याच ग्रंथांच्या आधारानें केलें आहे. वाग्भटावर अनेक टीकाकार होऊन गेले. त्यांपैकीं अरुणदत्त व हेमाद्रि यांच्या टीका हल्लीं उपलब्ध आहेत. हेमाद्रीची टीका फक्त दोन स्थानांवरच आहे (सूत्र व कल्प). या दोनहि टीकाकारांनीं दिलेल्या अर्थामध्यें बऱ्याच स्थळीं भेद आढळतो, व जेथें अर्थभेद दिसून येतो तेथें प्रायः हेमाद्रीनेंच दिलेला अर्थ अधिक समंजस व सयुक्तिक दिसतो. अरुणदत्त हेमाद्रीच्या पूर्वींचा आहे व न्याय, व्याकरण व अलंकार यांमध्यें त्याची प्रवीणता दिसते. तथापि हेमाद्रीची टीका अरुणदत्ताच्या टीकेपेक्षां फार चांगली आहे. केवळ शब्दव्युत्पत्ति, वृत्तें, अलंकार इत्यादि गोष्टींकडे लक्ष न देतां श्लोकार्थाचें चांगल्या रीतीनें स्पष्टीकरण करण्याकडे हेमाद्रीनें अधिक लक्ष पुरविलें आहे. तथापि ती अगदीं निर्दोष आहे असें मात्र समजूं नये. अरुणदत्ताप्रमाणें त्याचे टीकेंतहि कांहीं दोष आढळतात, व तसे दोष आढळणें साहजिकच आहे; कारण हे दोघेहि केवळ पंडित असून वैद्यशास्त्राची सानुभव माहिती दोघांसहि नव्हती, व दोघांच्याहि वेळीं पूर्वींची आर्य वैद्यकाची परंपरा बरीच बुडत चालली होती. हेमाद्रि देवगड येथील जाधवकुळांतील रामराजाचा प्रधान होता; म्हणून तो तेराव्या शतकाच्या अंतिम भागीं होता असें समजतें. हेमाद्रीनें अरुणदत्ताचा उल्लेख केल्यावरून अरुणदत्त हा पूर्वींचा

---

१ तेभ्योऽतिविप्रकीर्णेभ्यः प्रायः सारतरोच्चयः ॥ ४ ॥ क्रियतेऽष्टाङ्गहृदयं नातिसंक्षेपविस्तरम् ॥ वा० सू० अ० १.

आहे हें उघड आहे. आम्हीं जें भाषांतर केलें आहे तें मुख्यत्वेंकरून या दोन टीकांच्या आधारानें केलें आहे. जेथें त्यांची अपूर्णता किंवा सदोषता दिसली, तेथें चरक, सुश्रुत व वृद्धवाग्भट, मदनपालनिघंटु, धन्वंतरिनिघंटु इत्यादि ग्रंथांच्या आधारानें अर्थ दिला आहे. याप्रमाणें आमच्या भाषांतरांतील अर्थ बहुतेक ठिकाणीं अरुणदत्ताप्रमाणें, व कांहीं ठिकाणीं हेमाद्रीप्रमाणें व कांहीं ठिकाणीं या दोघांहूनहि भिन्न प्रकारानें केला आहे. जेथें दोघांहूनहि निराळ्या तऱ्हेनें अर्थ केला आहे तेथें तो चरकादिकांच्या आधारानेंच केला आहे. (जरी त्या आधाराचा प्रत्येक ठिकाणीं अनुवाद केला नाहीं.) भाषांतर दोन प्रकारचें असतें : शब्दशः व अर्थशः. पुढील भाषांतरांत हे दोन्ही प्रकार अनुसरले आहेत. संस्कृत जाणणाऱ्या लोकांना टीकेसारखा भाषांतराचा उपयोग करतां यावा म्हणून तें होईल तितकें शब्दशः करण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि तसें करून दुर्बोधता किंवा मराठी भाषापद्धतीस विरोध येण्याच्या संभव दिसला, तेथें केवळ अर्थाकडे लक्ष देऊन भाषांतर केलें आहे. सर्वत्र प्रायः दोन्ही प्रकारचें मिश्रण आढळून येईल. वैद्यकांतील सर्व शब्दांस मराठींत चांगले शब्द मिळण्याचा संभव नसल्यामुळें बरेच संस्कृत शब्द भाषांतरांत कायम ठेवावे लागले; जसें, शुक्र, आर्तव, स्नेहन, निरूह, मूर्धविरेचन, अनुलोमन, वातरक्त, जीवक, ऋषभक, उत्तरबस्ति, शिरोबस्ति इत्यादि. यांपैकीं कांहीं शब्द रोगांचीं नांवें, कांहीं वनस्पतींचीं नांवें, कांहीं शरीरांतील पदार्थांचीं व कांहीं क्रियेचीं नांवें आहेत. अशा कठिण शब्दांचा त्या त्या ठिकाणीं एकवार अर्थ दिला असून शिवाय कोणत्याहि स्थळीं पुनः पुनः आलेल्या त्या शब्दांचा अर्थ समजण्याकरितां एक कठिण शब्दांचा कोश ग्रंथाच्या अखेरीस वर्णानुक्रमें दिला आहे. कांहीं स्थळीं भाषांतरांतील अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ किंवा पुष्टीकरणार्थ किंवा विशेष माहितीकरितां टीपा दिल्या आहेत. ग्रंथाच्या अखेरीस कोणताहि विषय तत्काल काढितां येण्याकरितां एक वर्णानुक्रम सूचीपत्रहि जोडिलें आहे. हें सूचीपत्र केवळ रोगाच्या चिकित्सेसंबंधानेंच देण्याचा आमचा पूर्वी विचार होता, परंतु मागाहून सर्वच विषयांची अशी विल्हेवारीनें अनुक्रमणिका देणें जास्त उपयोगाचें दिसलें. ह्या भाषांतरांत नजरचुकीनें कांहीं लहानसान उणीवा राहिल्या असल्यास त्या कदाचित् पुढें दुरुस्त होण्याचा संभव आहे; परंतु एक उणीव मात्र कधींहि सर्वांशीं नाहींशी होणार नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं; ती ही कीं, संस्कृत वैद्यकांतील कांहीं वनस्पतींची हल्लीं अगदीं अनुपलब्धि झाली आहे; त्यांस मराठींत काय म्हणावें किंवा त्यांच्या खुणा काय हें जाणण्याला प्राचीन ऋषींनीं कांहींएक साधन न ठेविल्यामुळें व परंपरेचा लोप झाल्यामुळें आज त्यांचें ज्ञान होणें असंभवनीयच आहे. अशा वनस्पति सुमारें पाऊणशें निघतील; त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या आहेत, कांहीं साधारण उपयोगाच्या व कांहीं केवळ भाज्या किंवा फळें आहेत. इंग्रजींत जशीं वनस्पतिशास्त्रांचे आधारें औषधीय वनस्पतींचीं वर्णनें केलेलीं आढळतात, तशीं प्राचीन ऋषींनीं केलेलीं नाहींत. हें वनस्पति ओळखण्याचें जें त्यांनीं साधन सांगितलें आहे त्यावरून उघड होतें[1]. तेव्हां शास्त्रीय रीतीनें केलेल्या वर्णनाच्या व परंपरेच्या अभावीं सुमारें ३००० वर्षांपूर्वी प्रचारांत असलेल्या व सुमारें हजार वर्षांपूर्वींच लुप्त झालेल्या वनस्पतींचीं त्या वेळचीं संस्कृत नांवें आज आपल्यास मराठींत आणितां यावीं तरी कशीं ? म्हणूनच अलीकडील कांहीं संस्कृत ग्रंथांत वनस्पतींचे प्रतिनिधि सांगण्याकरितां एक निराळाच अध्याय आढळण्यांत येतो. अशांपैकीं ज्या वनस्पतींच्या थोड्या तरी खुणा सांगितल्या आहेत त्यांचा ( उ० तुवरक इ०.) त्या खुणांवरून व दुसऱ्या कांहीं साधनांनीं आम्हीं शोध लाविला आहे. तसेंच आजपर्यंत झालेल्या इतर वैद्यकीय ग्रंथांच्या भाषांतरांत कांहीं रोगांच्या व द्रव्यांच्या नांवांचा भलताच तर्जुमा केला असून त्यांवरूनच हल्लीं ह्या प्रांतीं क्रियाहि चालू आहे. ह्या फार दिवसपर्यंत प्रचारांत आलेल्या चुकीचीहि आम्हीं दुरुस्ती केली आहे ( निदान स्थानांतील कुष्ठ, वातरक्त व प्रमेह शब्दांवरील टीप पाहा. ) शारीर स्थानांत सांगितलेल्या १०७ मर्मांचीं स्थानें लक्षांत येण्याकरितां परिशिष्टांत दोन चित्रें दिलीं आहेत. तसेंच यंत्रशस्त्राध्यायांतील यंत्रें व शस्त्रें लक्षांत येण्याकरितां त्यांचींहि चित्रें दिलीं आहेत.

याप्रमाणें एकंदर ग्रंथाची पद्धति व तऱ्हा कशी आहे हें सामान्यतः दर्शविलें आहे. ग्रंथ छापण्याच्या संबंधानें मुद्रणदोष होतील तितके कमी करण्याविषयीं बराच प्रयत्न केला, परंतु अखेरीस ते आंत घुसलेच; त्यामुळें व कांहीं नजरचुकीनें राहिलेल्या दोषांमुळें शेवटीं एक शुद्धिपत्र व पुरवणीपत्रहि जोडावें लागलें. शुद्धिपत्र, अनुक्रमणिका व चित्रें यासंबंधानें ज्या ज्या लोकांनीं मदत केली त्यांचे आम्ही आभार मानितों. ह्या भाषांतरांत मुद्रणदोषानें,

१ वनस्पतींची माहिती गुराखी, धनगर, वनचर, वगैरेपासून मिळवावी असें चरकादिकांनीं सांगितलें आहे.

प्रमादानें किंवा गैरसमजुतीनें ज्या कांहीं उणीवा राहिल्या असतील त्यांबद्दल विद्वज्जनांनीं क्षमा करावी. ह्या उणीवा विद्वज्जनांच्या सूचनेवरून किंवा स्वतःच्या अवलोकनावरून जसजशा लक्षांत येतील तसतशा दूर करून पुढील आवृत्तीला अधिक पूर्तता आणण्याचा आम्ही प्रयत्न करूं. इतर शास्त्राप्रमाणें वैद्यक ग्रंथावरहि वारंवार संस्कार करण्याची चाल पूर्वीपासून आहेच. अग्निवेशसंहिता हा वैद्यकावरील आद्य ग्रंथ होय. पुढें त्याजवर चरकानें संस्कार करून त्याला नवीन रूप दिलें. त्यांतहि कांहीं उणीवा होत्या. त्या दृढबलनामक ऋषीनें पूर्ण केल्या, असा हल्लींच्या चरकसंहितेंत इतिहास आढळतो; व असें असणें हें साहजिकच आहे; कारण वैद्यशास्त्र हें उत्तरोत्तर वाढत जाणारें आहे. तद्वतच पुरातन विद्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा जो प्रयत्न हाहि उत्तरोत्तर जास्त सफळ होणारा आहे. एकानें त्यास सुरुवात केल्यावर सर्व विद्वज्जनांनीं त्या कृत्यांत सारखाच अभिनिवेश दाखवून होईल तितकी मदत करावी. शेवटीं सर्व प्रकारच्या वाचकांना व चिकित्सकांना ह्याचा चांगला उपयोग होवो; व ज्यांचा उदार आश्रय कारणीभूत झाला, व ज्यांची देशहिताविषयीं उत्कंठा सर्वत्र प्रसिद्ध आहे, त्या श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांस ईश्वर चिरायु करो, अशी प्रार्थना करून आम्ही ही प्रस्तावना पुरी करितों.

# उपोद्घात

ह्या अष्टांगहृदयाचें भाषांतर सुरू करण्यापूर्वी आर्यवैद्यकाचा अगदीं पुरातन कालापासून तों आजपर्यंतचा इतिहास, ग्रंथकर्त्याचा इतिहास, ह्या ग्रंथाचें पृथक्करण (म्हणजे त्याचा अंगप्रत्यंगविचार) व आपल्या वैद्यकांतील मूलतत्त्वें ह्या चार गोष्टींविषयीं थोडासा उपन्यास करणें अवश्य आहे. आर्यलोकांच्या एकंदर पुरातन गोष्टींविषयीं विचार करण्याच्या दोन पद्धति आहेत; एक जुनी किंवा पौराणिक, आणि दुसरी नवी किंवा ऐतिहासिक. पहिल्या पद्धतीप्रमाणें आदिकालीं प्रत्येक गोष्टीचा अत्यंत उत्कर्ष होता व पुढें तिचा हळू हळू अपकर्ष होऊं लागला; आणि दुसऱ्या पद्धतीप्रमाणें सुधारणेचा क्रम याच्या विपरीत धरावा लागतो. पहिल्या मतें सर्व विद्या अनादि व त्या वेदाबरोबरच त्याच्या अंगोपांगरूपानें ब्रह्मदेवानें निर्माण केल्या; इतकेंच नव्हे तर त्या स्वतःसिद्ध तयार होत्या, व ब्रह्मदेवानें त्या नुसत्या ध्यानांत आणून प्रजापति, इंद्र इत्यादिकांच्या द्वारां मनुष्यांना प्राप्त करविल्या. व्याकरण, ज्योतिष, वैद्यक, गायन किंवा दुसरें कोणतेंहि शास्त्र घ्या, त्याचा उत्पत्तिक्रम हाच. आतां जगाच्या इतिहासावरून पाहतां असें स्पष्ट दिसून येतें कीं, प्रत्येक देशांत मनुष्याच्या शास्त्रीय ज्ञानामध्यें आदिकालापासून जो फेरफार होत चालला आहे तो उलट प्रकारचा आहे, म्हणजे प्रत्येक शास्त्र गुरुवातीस अगदीं साधें, अल्प व संकुचित असून पुढें तें अनेक शाखात्मक, मोठें व व्यापक होत जातें. असें नसतें व ब्रह्मदेवानें आयतेंच सर्व तयार करून ठेविलें असतें तर पाणिनीची सुधारणा करण्याला कात्यायनाची[1], किंवा त्याजवर संस्कार करण्याला पतंजलीची, व या तिघांनीं लिहिलेल्या विषयाला अर्वाचीन पद्धतींत आणण्याला भट्टोजी दीक्षिताची मुळींच गरज पडली नसती. तसेंच प्रत्यक्ष इंद्रापासून वैद्यशास्त्र शिकलेल्या आत्रेय ऋषींच्या सांगण्यावरून जें अग्निवेशानें आयतंत्र लिहिलें व जें पाहून आत्रेयादिकांनीं माना डोलविल्या; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं दिलेली शाबासकी ऐकून स्वर्गांत देवादिकांनाहि आनंद होऊन त्यांच्या अभिनंदनवाणीनें सर्व त्रैलोक्य दणाणून गेलें, व सर्वत्र पुष्पवृष्टि झाली, त्या अग्निवेशतंत्रावर चरकाला किंवा त्याच्या उणीवा पूर्ण करण्याला दृढबलाला संस्कार करावा लागला नसता. उत्तरोत्तर मनुष्याच्या ज्ञानामध्यें अधिकाधिक सुधारणा होत जाते हा नियम जरी एकंदरींत खरा आहे, तरी कोणत्याहि देशाच्या ज्ञानोन्नतीचा इतिहास पाहिल्यास असें दिसून येईल कीं, तिचा ओघ एकसारखा चाललेला नसतो. कांहीं काल उत्कर्ष, कांहीं काल साम्यावस्था, कांहीं काल ऱ्हास व पुनः उत्कर्ष असा प्रकार बहुधा प्रत्येक देशांत आढळतो परंतु एकंदर जगाचेसंबंधानें पाहिल्यास वरील नियम अगदीं अव्यभिचारी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आर्यवैद्यकाचा इतिहास अवलोकन करतांना हा नियम लक्षांत बाळगिला पाहिजे. पौराणिक दृष्टीकडे लक्ष देऊन उपयोग नाहीं; किंवा दोन्ही मतांकडे दुर्लक्ष करून केवळ चरकादि ग्रंथांचें बारकाईनें अवलोकन केलें तरी क्रमवृद्धीचाच नियम खरा आहे, अशी खात्री झाल्यावांचून राहावयाचीच नाहीं. आपल्या लोकांची पुरातन कालापासून इतर प्रमाणांपेक्षां आप्तवचनावरच विशेष श्रद्धा असल्यामुळें सर्व शास्त्राच्या प्रवर्तकांनीं आप्तप्रमाणांपैकीं श्रेष्ठ जो वेद त्याचा किंवा ब्रह्मादि देवांचा आधार आपापल्या शास्त्रांना दाखविण्याचा प्रघात पाडला. या व्यवस्थेनें पूर्वकालीं कांहींसा फायदा झाला असेल; परंतु एकंदरीनें विशेषेंकरून अलीकडील काळामध्यें त्या समजुतीमुळें ज्ञानाभिवृद्धीची गति खुंटली. लोकांना नवीन शोध करण्याची प्रवृत्ति होईनाशी झाली; व दुसरीकडून नवीन माहिती आयतीच मिळत असली तरी ती ते तुच्छ करूं लागले. हा प्रकार हल्लीं आपल्या डोळ्यांसमोर दिसत आहे. कांहीं कांहीं जुन्या वैद्यांना अजून असें वाटत आहे कीं, आपलें पुरातन ऋषिप्रणीत वैद्यक सर्व गोष्टींमध्यें परिपूर्ण असल्यामुळें आपल्याला इंग्रजी वैद्यकाची मुळींच जरूरी नाहीं, व व्याधींचें तत्त्वपरिज्ञान जसें आपल्या वैद्यकानें होतें तसें इंग्रजी वैद्यकापासून व्हावयाचें नाहीं. आतां जो पुढें इतिहास द्यावयाचा आहे, तो इतर प्रकारेंहि उपयोगाचा असून अशा लोकांवर त्याजपासून बराच हितकर संस्कार होण्याचा संभव आहे.

---

१ कात्यायनानें पाणिनीवर वार्त्तिकें केलीं आहेतः—'वार्त्तिक' शब्दाची व्याख्या नागोजी भट्टानें दिली आहे, ती अशीः—
"सूत्रेऽनुक्तदुरुक्तचिन्ताकरत्वं वार्तिकत्वम्,"

ऐतिहासिक दृष्टीनें आर्यवैद्यकाचे दोन विभाग होतात. एक रसाक्रियेच्या पूर्वीचें किंवा शुद्ध आर्ष किंवा ऋषिप्रणीत वैद्यक, व दुसरा रसाक्रियेच्या नंतरचें किंवा मिश्रवैद्यक. पहिल्याचेहि पुनः कालाच्यासंबंधानें दोन भाग करितां येतील : ( १ ) ऐतिहासिक आर्षवैद्यक, व ( २ ) इतिहासपूर्वकालीन आर्षवैद्यक. याप्रमाणें आर्यवैद्यकाच्या तीन अवस्था होतात, त्यांपैकीं प्रत्येकाचें थोडें थोडें विवेचन करूं.

पहिल्यानें इतिहासपूर्वकालीन आर्षवैद्यक घेऊं. चरकांत आयुर्वेदाच्या उत्पत्तीचा इतिहास सांगतांना असें म्हटलें आहे :—

**तस्मै प्रोवाच भगवानायुर्वेदं शतक्रतुः । पदैरल्पैर्मतिं बुद्ध्वा विपुलां परमर्षये ॥**
**हेतुलिङ्गौषधज्ञानं स्वस्थातुरपरायणम् । त्रिसूत्रं शाश्वतं पुण्यं बुबुधे यं पितामहः ॥**
**सोऽनन्तपारं त्रिस्कन्धमायुर्वेदं महामतिः । यथाविदाचरात्सर्वं बुबुधे तन्मना मुनिः ॥**
**तेनायुरमितं लेभे भरद्वाजः सुखान्वितः । ऋषिभ्योऽनधिकन्तञ्च शशंसाऽनवशेषयन् ॥**

अर्थः—‘ निदान, लक्षणें व चिकित्सा अशा या तीन विभागांनीं युक्त आणि निरोगी व रोगी या दोन्ही अवस्थांचा विचार करणारा, शाश्वत व पवित्र असा जो आयुर्वेद इंद्रास येत होता, तो त्यानें भरद्वाजास तो फार बुद्धिमान् आहे असें पाहून थोडक्या शब्दांनीं सांगितला. त्यानें आपल्या बुद्धिप्रभावानें व एकाग्र चित्तानें त्या अनन्तपार स्कंधत्रयात्मक आयुर्वेदाचें यथार्थज्ञान लवकरच प्राप्त करून घेतलें. त्याचेयोगानें तो चिरायु व निरोगी झाला व मग त्यानें तो आयुर्वेद इतर ऋषींना कांहीं न्यूनाधिक न करतां शिकविला ’ व पुढें आणखी म्हटलें आहे:-

**अथ मैत्रीपरः पुण्यमायुर्वेदं पुनर्वसुः । शिष्येभ्यो दत्तवान् षड्भ्यः सर्वभूतानुकम्पया ॥**
**अग्निवेशश्च भेडश्च जातूकर्णः पराशरः । हारीतः क्षारपाणिश्च जगृहुस्तन्मुनेर्वचः ॥**
**बुद्धेर्विशेषस्तत्रासीन्नोपदेशान्तरं मुनेः । तन्त्रप्रणेता प्रथममग्निवेशो यतोऽभवत् ॥**
**अतो भेडादयश्चक्रुः स्वं स्वं तन्त्रं कृतानि च । श्रावयामासुरात्रेयं सर्षिसङ्घं सुमेधसः ॥**
**तानि चानुमतान्येषां तन्त्राणि परमर्षिभिः । भावाय भूतसङ्घानां प्रतिष्ठां भुवि लेभिरे ॥**

अर्थ :—“ व मग अत्रिपुत्र जो पुनर्वसु त्यानें लोकहितार्थ सहा शिष्यांना फार प्रेमानें आयुर्वेद शिकविला. त्यांचीं नांवें—अग्निवेश, भेड, जातुकर्ण, पराशर, हारीत व क्षारपाणि. ऋषीनें सर्वांस उपदेश सारखाच केला. तथापि त्यांपैकीं अग्निवेश फार बुद्धिवान् असल्यामुळें त्यानेंच प्रथम वैद्यशास्त्रावर ग्रंथ लिहिला ( हा अगदीं आद्यग्रंथ होय ), नंतर भेडादिकांनींहि आपापले ग्रंथ तयार केले, व ते ऋषींच्या सभेंत आत्रेयास वाचून दाखविले. आत्रेयादि महर्षींनीं त्या सहांचेहि ग्रंथ पसंत केले. तेच ग्रंथ पुढें जगांत ‘ षड्भिषक्संहिता ’ या नांवानें लोकोपयोगार्थ नांवाजून राहिले. ” या हकीकतीवरून असें स्पष्ट दिसतें कीं, चरकाचे वेळीं या सहा संहिता पुष्कळ प्रसिद्धीस आल्या होत्या व प्रचारांतहि होत्या. त्या सहांपैकीं अग्निवेशाचें तंत्र उत्तम होतें व तेंच आद्य असल्याच्या त्यावेळीं आख्यायिका ऐकण्यांत येत होत्या. त्याच आख्यायिकांवरून अग्निवेशादिकांचा गुरु आत्रेय ऋषि असेंहि पण ठरलें होतें. चरकानें चालना दिलेल्या अग्निवेशतंत्रामध्यें प्रत्येक अध्यायांत ‘ आत्रेयानें अग्निवेशास सांगितलें ’ असा मजकूर येतो. तेव्हां आद्य जें अग्निवेशतंत्र तें आत्रेयतंत्रच समजावयाचें. चरकांतील चिकित्सास्थानाच्या १८ व्या अध्यायांत आत्रेयाला ‘ आयुर्वेदविदां श्रेष्ठं भिषग्विद्याप्रवर्तकम् ’ असें म्हटलें आहे. याचा व भरद्वाजानें प्रथम इंद्रापासून आयुर्वेद आणिला, या गोष्टींचा विचार केल्यास प्रथम दर्शनीं कांहींसा विरोध दिसतो; परंतु विचाराअंतीं त्याचा परिहार होण्यासारखा आहे. तो विचार असा :—आत्रेय किंवा अग्निवेश वैद्यशास्त्राचा प्रवर्तक या चरकाच्या म्हणण्याचा अर्थ इतकाच कीं, त्याहून पुरातन ग्रंथ त्याचेवेळीं उपलब्ध नव्हते. अग्निवेशतंत्र फार उत्तम निघाल्यामुळें त्यापूर्वींच्या ग्रंथाला त्यानें मागें हटविलें, व त्यामुळें कांहीं दिवसांनीं त्यांचा अगदीं लोप झाला. इतिहासाची मजल काय ती आत्रेयापर्यंत जाई. तेव्हां तो किंवा त्याचा शिष्य अग्निवेश हाच आद्यग्रंथकर्ता असें म्हणण्याचा पाठ पडला होता; परंतु आत्रेयाहून जुनीं अशीं कांहीं ऋग्वेदांत वर्णिलेल्या भरद्वाजादि ऋषींचीं नांवें वैद्यकासंबंधानें दंतकथेंतून ऐकण्यांत येत असत. तेव्हां जरी त्यांचीं तंत्रें उपलब्ध नव्हतीं तरी आयुर्वेदासंबंधीं विचार करणारांपैकीं ते होते, अशा दंतकथेवरून आयुर्वेद प्रथम भरद्वाजानें इंद्राकडून आणिला असें चरकानें म्हटलें आहे. अशा प्रकारच्या विचारांवांचून वरील

विरोध नाहींसा होत नाहीं; व हा विचार सयुक्तिकहि आहे. कारण, वैद्यकासारख्या क्रमानें वाढत आलेल्या शास्त्रांत अमुकच पहिला ग्रंथ असें म्हणणें फार कठिण आहे; प्रत्येक ग्रंथाला कांहीं थोडाबहुत मागील पाया असतोच. कालांतरानें पूर्वीपूर्वींच्या ग्रंथांचा लय होऊन अधिकाधिक सुधारलेल्या ग्रंथांची प्रतिष्ठा होऊं लागते. पाणिनि हा व्याकरणाचा पिता अशी साधारण समजूत आहे. परंतु त्याच्यापूर्वीं शौनक, शाकल्य, शाकटायन इ० अनेक व्याकरणकार होऊन गेले असें त्याच्याच सूत्रावरून सिद्ध होतें. तसेंच अग्निवेशाच्या संबंधानें समजलें पाहिजे. अग्निवेशतंत्राच्या तेजापुढें तत्पूर्वकालीन तंत्रांचा यत्किंचिताहि प्रकाश पडेनासा झाल्यामुळें पाणिनीनंतर जसे शौनकादिक दिसेनासे झाले, किंवा पतञ्जलीच्या महाभाष्यानें व्याडिकृत संग्रहावर दडपण घातल्यामुळें जसा तो लुप्त झाला किंवा कालिदासापुढें भाससौमिल्लादि कवींना टिकाव धरतां आला नाहीं तद्वतच त्यांचीहि दशा झाली. सारांश काय कीं, आद्य मानलेल्या अग्निवेशतंत्रापूर्वींहि अनेक तंत्रें होऊन गेलीं, व त्यांचा हल्लीं मागमूस देखील राहिला नाहीं. त्यांचें तत्कालीन अस्तित्व मात्र वरील युक्तीनें व चरकांतील भरद्वाजासंबंधानें आलेल्या मजकुरावरून सिद्ध होतें. हें जें अग्निवेशाचें पूर्वींचें वैद्यक त्यालाच आम्हीं इतिहासपूर्वकालीन वैद्यक असें म्हटलें आहे. त्याचा इतिहास नसल्यामुळें तें होतें याहून जास्त कांहीं आज त्याजविषयीं आम्हांस विधान करतां येत नाहीं; परंतु इतकें खरें कीं, त्या वेळच्या व्याकरणादि शास्त्रांची पद्धति व वर दिलेल्या श्लोकांतील ‘पदैरल्पैर्मतिं बुद्ध्वा’ या चरणांतील ध्वनितार्थ लक्षांत आणल्यास असें दिसून येतें कीं, ते ग्रंथ सूत्राप्रमाणें लहान व संक्षेपानें लिहिले असावेत. अग्निवेशापूर्वींहि वैद्यकावर कांहीं ग्रंथ असावेत याजबद्दल आणखी एक प्रमाण असें आहे कीं, अथर्ववेदांत औषधींचें गुणवर्णन करणारीं कांहीं सूक्तें आढळतात, व ह्या वेदाचेंच वैद्यशास्त्र हें उपांग आहे असें चरकादिकांनीं सांगितलें आहे. तसेंच ऋग्वेदांतहि राजयक्ष्मा, हृद्रोग वगैरे रोगांचीं व यकृत्, प्लीहा वगैरे शारीरिक भागांचीं नांवें आढळतात.

आतां ऐतिहासिक आर्षवैद्यकाकडे वळूं. ह्या भागाची सुरुवात अग्निवेशाच्या वेळेपासून होऊन परिसमाप्ति वाग्भटाच्या पूर्वी कांहीं शतकांच्या सुमारास होऊं लागली. ह्या काळांत अनेक ऋषींनीं वैद्यकावर ग्रंथ लिहिले. त्यांतील अग्निवेशादि सहा व सुश्रुत हे तर प्रसिद्धच आहेत, परंतु आणखी बरेच ग्रंथ असावेत असें चरकाच्या विमानस्थानांतील ८ व्या अध्यायावरून स्पष्ट होतें; कारण तेथें म्हटलें आहे कीं, “भिषग्बुभूषुः शास्त्रमेवादितः परीक्षेत। विविधानिहि शास्त्राणि भिषजां प्रचरन्ति लोके” ‘वैद्यक शिकूं इच्छिणारानें कोणता ग्रंथ चांगला आहे याचीच प्रथम परीक्षा करावी, कारण लोकांत नानाप्रकारचीं भिषक्शास्त्रें प्रचारांत आहेत.’ पुढें चांगल्या ग्रंथाचीं जीं लक्षणें दिलीं आहेत त्यांत “सुप्रणीतसूत्रभाष्यसंग्रहक्रमम्” असें एक लक्षण सांगितलें आहे. त्यावरून ते मूळग्रंथ सूत्ररूपी म्हणजे संक्षेपाचे असून त्यांजवर भाष्येंहि होतीं असें दिसतें. त्या वेळचे सर्वच शास्त्रावरील ग्रंथ सूत्ररूपानें लिहिण्याचा प्रघात होता असें वाटतें (याचीं कल्पसूत्रें, गृह्यसूत्रें, व्याकरणसूत्रें, भिक्षुसूत्रें, नटसूत्रें इत्यादि उदाहरणें होत.) या प्रघातामुळें ‘सूत्र’ शब्द चरकांत शास्त्र शब्दाच्या पर्यायामध्यें दिला आहे, व आद्य ग्रंथकारांना सूत्रकार असें म्हटलें आहे. (वि० अ० ८) ग्रंथ लिहिण्याला सूत्रण असें म्हटलें आहे. सूत्रण शब्दाचा अर्थ संक्षिप्त वाक्यरचना. तें वाक्य व्याकरणसूत्राप्रमाणें किंवा ब्रह्मसूत्राप्रमाणें दोनचार शब्दांचेंच स्वल्पाक्षर व विरामरहित असेंच असलें पाहिजे असें नाहीं, तंत्र शब्दहि शास्त्र शब्दाचाच पर्याय आहे (च० सू० अ० ३०.) भिषक्तंत्राच्या अगदीं पुरातन कालींच दोन शाखा झाल्या होत्या. एक औषधोपचारानें रोग बरा करण्याची, व दुसरी औषधोपचार व शस्त्रादि क्रिया यांनीं रोग बरा करण्याची. पहिलीला कायाचिकित्सा व दुसरीला शल्यतंत्र अशा संज्ञा आहेत. वर आत्रेयऋषि वैद्यशास्त्राचा प्रवर्तक असें जें म्हटलें आहे, तें ह्यांपैकीं पहिल्या शाखेच्याचसंबंधानें आहे. दुसऱ्या शाखेचे ग्रंथ स्वतंत्र असून तत्प्रवर्तकाचें नांवहि निराळें आहे. धन्वंतरि देवतेचा अवतार कोणी एक दिवोदास या नांवाचा काशीचा राजा होता, तो शल्यतंत्राचा प्रवर्तक मानिलेला आहे. आत्रेयभरद्वाजादिकांप्रमाणें त्यालाहि हें शास्त्र इंद्रापासून प्राप्त झालें. जेथें इतिहासाची मर्यादा संपते, तेथें इंद्रादिकांचीच पीठिका ब्रह्मदेवापर्यंत शास्त्रप्रवृत्तीच्यासंबंधानें सांगण्याची सर्वांचीच वहिवाट आहे असें वर सुचविलेंच आहे. जशा कायचिकित्सेच्यासंबंधानें अग्निवेशादिकांच्या सहा संहिता प्रसिद्ध आहेत, तशा शल्यतंत्राच्या चार संहिता सांगितल्या आहेत. औपधेनव, औरभ्र, पौष्कलावत व सौश्रुत यांपैकीं

१ स्वल्पाक्षरमसन्दिग्धं सारवद्विश्वतोमुखं। अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः। अशी सूत्र शब्दाची व्याख्या ग्रंथांतून आढळते.

शेवटची सर्वांत श्रेष्ठ असून तीच आज उपलब्ध आहे. जसें चरक किंवा अग्निवेशतंत्र आत्रेयानें सांगितल्याप्रमाणें अग्निवेशानें रचिलें आहे, तसें सुश्रुततंत्र दिवोदासाच्या सांगण्याप्रमाणें सुश्रुतानें लिहिलें आहे. म्हणून त्यांत प्रत्येक अध्यायाचे आरंभीं धन्वंतरीनें ( काशीचा राजा जो दिवोदास त्यानें ) सुश्रुतास सांगितलें अशा अर्थाचे शब्द येतात. शल्यचिकित्सेचाच एक भाग शालाक्य या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यांत मानेच्या वर असणाऱ्या भागांतील रोगांची ( नेत्ररोग वगैरे ) चिकित्सा सांगितली आहे. हा भाग जरी सुश्रुतांत सविस्तर दिला आहे, तरी त्याचा प्रवर्तक दिवोदास नसून विदेह देशाचा जो 'निमि' राजा तो त्याचा आद्यगुरु मानिला आहे; परंतु त्यानें केलेलें तंत्र हल्लीं उपलब्ध नाहीं. वाग्भटाचे व कदाचित् त्याचा टीकाकार जो अरुणदत्त त्याचे वेळींहि तें उपलब्ध असावें असें वाटतें; कारण त्यानें जनकप्रणीत तंत्राविषयीं एके ठिकाणीं कांहीं उल्लेख केलेला आढळतो ( वा. सू. अ. १ स. सं. ) तेव्हां एकंदरीत असें दिसून येतें कीं, अग्निवेशापासून सुश्रुतापर्यंत जो हा ऐतिहासिक काल त्यांत जरी अनेक ऋषींनीं अनेक प्रकारचे वैद्यकावर ग्रंथ लिहिले, तथापि आज उपलब्ध असे दोनच ग्रंथ आहेत, व त्या दोहोंतच ऋषिप्रणीत सर्व आर्यवैद्यकाचा अंतर्भाव होतो, व ह्या ऐतिहासिक कालाची जी आपल्यास माहिती मिळते तीहि या दोन ग्रंथांवरूनच असल्यामुळें त्या दोहोंविषयीं येथें जास्त विवेचन करणें अवश्य आहे. हें विवेचन केवळ ऐतिहासिक दृष्टीनेंच अवश्य आहे असें नव्हे तर, ज्या अर्थी वाग्भटानें बहुतेक अंशीं या दोन ग्रंथांतूनच आपल्या ग्रंथाकरितां माहिती गोळा केली आहे, त्या अर्थी वाग्भट चांगला समजण्याला ह्या दोन ग्रंथांविषयीं सामान्य माहिती असणें जरूर आहे. ह्या दोहोंपैकीं चरक अधिक प्राचीन असावा असें त्याच्या भाषेवरून व ग्रंथपद्धतीवरून स्पष्ट दिसतें. चरक हा कायचिकित्सेचाच ग्रंथ आहे व ती त्यांत फार चांगल्या प्रकारें वर्णिली आहे. हा ग्रंथ स्वतंत्र नसून अग्निवेश-तंत्रावरच कांहीं संस्कार करून तयार केलेला आहे. 'संस्कार' शब्दाचा अर्थ याच ग्रंथाच्या अखेरीस एका श्लोकांत दिला आहे. तो श्लोक हा:--'**विस्तारयति लेशोक्तं संक्षिपत्यतिविस्तरं। संस्कर्ता कुरुते तन्त्रं पुराणं च पुनर्नवम्॥**' ह्या एका श्लोकांत पुष्कळ माहिती मिळते. एक तर यावरून असें सिद्ध होतें कीं, ऋषींच्या वेळीं प्राचीन शास्त्रांना वारंवार चालना देऊन नवीन माहिती व पद्धति हीं दोन्हीं त्यांत सामील करून त्यांना त्या त्या काळाला शोभेल असें स्वरूप देण्याची वहिवाट असे. पुरातन तंत्र पुनः नवें करणें असें जें वरील श्लोकांत म्हटलें आहे, त्याचा हाच अर्थ आहे. चरकाचे वेळीं इतके नवीन शोध झाले होते व ग्रंथ लिहिण्याची पद्धति इतकी बदलली होती कीं, अग्निवेशानें केलेलें तंत्र अशा तऱ्हेच्या संस्कारावांचून तेव्हां मान्य झालेंच नसतें, व म्हणूनच चरकानें त्याजवर संस्कार केला. पुढें कांहीं काल लोटल्यावर वैद्यकीय ज्ञानामध्यें आणखीहि कांहीं भर पडल्यामुळें चरकानें पुनर्नव केलेलेंहि अग्निवेशतंत्र अपुरें दिसूं लागलें, व मग त्याजवर पुनः दृढबलनामक ऋषीनें कांहीं सुधारणा केली. ह्यास प्रमाण च. चि. अ. ३० यांत पुढील श्लोक आढळतात:--

**अस्मिन् सप्तदशाध्यायाः कल्पाः सिद्धय एव च। नासाद्यन्तेऽग्निवेशस्य तन्त्रे चरकसंस्कृते॥**
**तानेतान् कापिलबलिः शेषान्दृढबलोऽकरोत्। तन्त्रस्यास्य महार्थस्य पूरणार्थं यथातथम्॥**

"हल्लींचें जें चरकसंस्कृत अग्निवेशतंत्र त्यांत कल्प व सिद्धिस्थान व चि. स्थानांतील १७ अध्याय पूर्वी उपलब्ध नव्हते. हे भाग कपिलबलाचा पुत्र दृढबल यानें त्या अत्युपयुक्त ग्रंथाची न्यूनता पूर्ण करण्याकरितां रचिले आहेत." हे श्लोक क्षेपक नसून त्यांत सांगितल्याप्रमाणें खरोखरच घडून आल्याचें अवांतर प्रमाणावरूनहि सिद्ध होतें. तें येणेंप्रमाणें:--

सिद्धिस्थानामध्यें चिकित्सास्थानांत न सांगितलेल्या कांहीं रोगांची चिकित्सा एका निराळ्याच अध्यायांत आढळते. हे रोग अग्निवेशाचे वेळीं समजले गेले नव्हते, एवढेंच नव्हे, तर चरकाचे वेळींहि त्यांची माहिती झाली नव्हती. ते त्यास माहीत असते तर अष्टोदरीय अध्यायांत दिलेल्या रोगांच्या यादींत व निदान चिकित्सास्थानांत तरी त्यांचा चरकानें उल्लेख केलाच असता. ज्याअर्थी ते भलत्याच ठिकाणीं ठिगळाप्रमाणें जोडून दिले आहेत, त्याअर्थी चरकावर दृढबलनामक ऋषीनें परिशिष्टरूपानें खरोखरच कांहीं भर घातली आहे असें सिद्ध होतें. हा जो वर सिद्धिस्थानांतील परिशिष्टासारिखा अध्याय सांगितला आहे त्यांत दिलेल्या रोगांपैकीं अपतंत्रक या नांवाचा जो रोग आहे त्याविषयीं आम्हांस पुढें कांहीं उपन्यास करावा लागेल. वरील विवेचनावरून ही गोष्ट लक्षांत येऊन चुकलीच असेल कीं, जो हल्लीं चरक नांवानें ग्रंथ उपलब्ध आहे, तो कांहीं एकाच व्यक्तीचा किंवा एकाच काळीं

झालेला ग्रंथ नव्हे. बारकाईनें त्याचें अवलोकन केल्यास त्यांत शास्त्रीयसंबंधानें, भाषेच्यासंबंधानें व ग्रंथसरणीच्या-संबंधानें विविधत्व दिसल्यावांचून राहावयाचें नाहीं. त्यांतील कांहीं अध्याय अगदीं साधे व नुसत्या रोगांच्या किंवा औषधांच्या यादींनीं भरलेले, कांहीं फार पाल्हाळानें सांगितलेल्या रोगांच्या उपपत्तीनें भरलेले, कांहीं अध्याय तंत्रदोषांनीं युक्त व कांहीं फार व्यवस्थित किंवा सांख्याच्या, वेदान्ताच्या किंवा न्यायाच्या तत्त्वांनीं भरलेले आहेत; व कांहींत तर परिशिष्टरूपानें उत्तरकालीन ऋषींनीं नवीन माहिती दिली असल्यामुळें त्यांचें मूळ ग्रंथापासून भिन्नत्व उघडपणेंच दिसून येतें. चरकाचें ( अग्निवेशतंत्राचें ) प्राचीनत्व त्याच्या अध्यायाच्या नांव देण्याच्या तऱ्हेवरून, प्रतिपादन करण्याच्या पद्धतीवरून, भलत्याच अध्यायांत भलतेच विषय सांगण्याच्या प्रघातावरून व भाषेच्या सरणीवरून सिद्ध होतें. अध्यायांचीं नांवें पुष्कळ ठिकाणीं आरंभाच्या शब्दावरून दिलीं आहेत ( उ०, आरग्वधीय अपमार्ग तंडुलीय अ०, कियन्तःशिरसीय० अ० इत्यादि ). प्रतिपादन करण्याची पद्धति कांहींशी उपनिषदांतील व कांहींशी पौराणिक पद्धतीसारखी आहे. अध्यायींत विषयांतर करण्याचा सपाटा तर फारच आढळतो; उ० 'नवेगान्धारणीय' या अध्यायांत मुख्य विषय संपल्यावर दहीं कोणत्या विधीनें खावें याचें असांप्रत विवेचन केलें आहे; 'त्रिशोफीय' अध्यायांत अखेरीस वातपित्तकफाचीं कर्में वगैरे सांगितलीं आहेत. मद, मूर्च्छाय, संन्यास इत्यादिकांचीं लक्षणें, वगैरे 'विविशोणितीय' अध्यायांतच सांगितलेलीं आहेत. विमानस्थानांतील 'व्याधिरूपीय' अध्यायांतच कृमींचीं कारणें, लक्षणें व चिकित्सा वगैरे सर्व विषय पूर्वापार संबंध न दाखवितां एकदम सांगितले आहेत. आतां जरी यांपैकीं कांहींचा किंचित् दूरचा संबंध आढळतो तरी अशा रीतीनें विषयांचें अस्थान विवेचन केल्यामुळें चरकांत कोणता विषय कोठें सांपडेल हें त्या ग्रंथाच्या बऱ्याच आवृत्ति झाल्यावांचून लक्षांत यावयाचें कठीण पडतें. भाषा फार सरळ असून अगदीं पुरातन दिसते. कांहीं शब्दांचा उपयोग हल्लीं प्रचारांत नसलेल्या अर्थानें केलेला आढळतो, उ० 'उपनिषद्' शब्दाचा उपयोग केवळ 'स्थान' अशा अर्थानें केला आहे ( विस्तरेण कल्पोपनिषदि व्याख्यास्यामः, च० सू० अ० ४ ). ह्या सर्व कारणांवरून या ग्रंथाचें प्राचीनत्व सिद्ध होतेंच; परंतु आत्रेयादि ऋषींचा स्थूलमानानेंहि कालनिर्णय करण्याला कांहींच साधन नाहीं. चरकांत सांख्य शास्त्रांचा, व बार्हस्पत्य व औशनस दर्शनांचा उल्लेख आढळतो. यावरून अग्निवेश किंवा निदान चरक तरी ह्या दर्शनांच्या नंतरचा असावा असें वाटतें; तसेंच वैशेषिक व बौद्ध मतांचाहि थोडासा उल्लेख आढळतो, परंतु वैशेषिक दर्शन किंवा गौतमबुद्ध यांचें पूर्वकालीनत्व मात्र त्यावरून सिद्ध होत नाहीं. कारण वैशेषिकांनीं सांगितलेल्या पदार्थांचा विचार जरी त्यांत आढळतो, तथापि 'अभाव' पदार्थाचा उल्लेख नसल्यामुळें व प्रमाणामध्यें उपमानाचा अंतर्भाव न केल्यामुळें चरक कणादाच्या पूर्वीचा असावा असें दिसतें. तसेंच जरी 'परानिर्वाण,' 'पुद्गल' व 'चैत्य' हे शब्द बौद्धांच्या अर्थानें योजिलेले आढळतात तरी त्यावरून चरकाचे वेळीं बुद्धाचा अवतार होऊन गेला असावाच असें सिद्ध होत नाहीं. बौद्धमतासारिखे विचार गौतमबुद्धाच्या पूर्वींपासूनच चालू होते; व बौद्धाचे मतें देखील गौतमापूर्वीं अनेक बुद्ध होऊन गेले होते. शिवाय यांपैकीं शेवटचे दोन शब्द तर क्षेपक असण्याचा संभव आहे. पाणिनीच्या "दृग्नरकाल्लुक्" या सूत्रांत ( पा० अ० ४, पाठ ३, सू० १०७ ) चरकाचा उल्लेख आढळतो, परंतु हा चरक एका याजुष शाखेचा प्रवर्तक असून त्याचें वैद्यकीय चरकाशीं ऐक्य ठरविण्याला अवांतर प्रमाणें आवश्यक आहेत. इतकें खरें कीं, ह्या सूत्रावर जी जयादित्यानें काशिकावृत्तींत टीका केली आहे तींत "चरकाचे वैदिक ग्रंथ व श्लोकग्रंथ" असे शब्द येतात व पाणिनीय सूत्रावरील अ० ४ पाद २ सू० ६६ व अ० ४ पाद ३ सू० १०२ या ठिकाणच्या टीकेटरूनहि वैदिक ग्रंथाचा कर्ता व श्लोकग्रंथाचा कर्ता कोणी एक चरक होता असें दिसून येतें; व ज्या अर्थीं ह्या वैदिक शाखाप्रवर्तक चरकाचा दुसरा कोणताहि श्लोकमय ग्रंथ उपलब्ध नाहीं. त्या अर्थीं ही जी वैद्यकाची संहिता तीच सदरहू चरकाचा श्लोकग्रंथ असावा असें वाटतें, व असें झाल्यास चरक पाणिनीच्या पूर्वीं निदान दोनशें वर्षांमागें हयातींत असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. पाणिनीचा काल खिस्ती शकापूर्वीं आठशें वर्षांच्या सुमारास असावा असें प्रोफेसर भांडारकरप्रभृति आधुनिक विद्वानांचें मत आहे. चरक पाणिनीचे पूर्वीं होऊन गेला असावा हें अनुमान करण्यापूर्वीं निदान पाणिनीच्या पूर्वीं वैद्यकावर कांहीं ग्रंथ उपलब्ध होते किंवा नाहीं हें तरी समजणें जरूर आहे. ह्यासंबंधानें विचार केल्यास असें दिसून येईल कीं, पाणिनीच्या एका सूत्रांत 'शिशुक्रंद' शब्दापासून 'शिशुक्रंदीयं' असें 'ग्रंथवाचक' रूप होतें असें दाखविलें आहे ( अ० ४, पा० ३,

सू० ८८ ); व ह्या शब्दाचा " मुलांच्या रडण्याविषयींचा एक ग्रंथ " असा अर्थ होतो, असें काशिकावृत्तिकार म्हणतो. हा ग्रंथ बहुतकरून वैद्यकासंबंधीं असावा व त्यांत मुलांच्या रडण्याचीं कारणें व त्यांजवरून त्यांच्या वेदना ओळखणें वगैरेविषयीं माहिती असावी असें दिसतें. दुसरें असें कीं पाणिनीच्या वेळीं बऱ्याच निरनिराळ्या विषयांवर शास्त्रीय ग्रंथ सूत्ररूपानें लिहिलेले होते असें कांहीं सूत्रांवरून स्पष्ट होतें ( उ० अ० ४, पाद ३, सू० ११० ह्यांत भिक्षुसूत्रें व नटसूत्रें व त्यांचे निरनिराळे कर्ते यांचा उल्लेख आढळतो ). जेव्हां नाट्यशास्त्रावर देखील सूत्रमय ग्रंथ होते तेव्हां वैद्यकावर असतील याविषयीं संशयच नाहीं. चरक पाणिनीच्या पूर्वीचा असावा असें म्हणण्यास दुसरें असें एक प्रमाण आहे कीं, त्या ग्रंथाची प्रतिपादन करण्याची पद्धति पाहिली असतां असें दिसतें कीं, पाणिनीच्या वेळची जी व्यवस्थेशीर पद्धति ( जिचें निदर्शन पाणिनीच्या सूत्रांतच झालें आहे, ) तिची ज्या काळीं सुरुवात झाली नव्हती अशा अतिपुरातन काळचाच तो ग्रंथ असावा. भाषेप्रमाणें ग्रंथपद्धतिहि कालानुरूप बदलत असते, व जसा भाषेवरून ग्रंथाच्या कालनिर्णयाचा जवळ जवळ अंदाज करतां येतो, त्याचप्रमाणें ग्रंथपद्धतीवरूनहि तसा अंदाज करतां येतो, मग ते ग्रंथ कोणत्याहि शास्त्रांतील असोत. चरक, सुश्रुत व वाग्भट या तीन ग्रंथांत जो व्यवस्थेसंबंधानें फरक आढळतो तो त्यांच्या निरनिराळ्या काळाचा सूचक आहे. ह्या तिन्हींतील व्यवस्था उत्तरोत्तर एकाहून एक सुधारलेली दिसून येते. चरकसंस्कृत अग्निवेशतंत्रामध्यें चरकप्रणीत भाग कोणता व अग्निवेशाचा मूळ भाग कोणता हें जाणण्यास कांहींच साधन नसल्यामुळें ग्रंथांतर्गत प्रमाणांचा ह्या इतिहासासंबंधानें व्हावा तसा उपयोग होत नाहीं. व्याकरणशास्त्रांत जसे पाणिनी, कात्यायन व पतञ्जलि यांचे भाग ( अनुक्रमें सूत्रें, वार्त्तिक व भाष्य ) स्वतंत्र व पृथक् आहेत, तसें जर अग्निवेशतंत्रांत अग्निवेश, चरक व दृढबल यांचे भाग पृथक् ठेविले असते, तर आर्यवैद्यकाच्या इतिहासास अधिक मदत झाली असती.

आतां येथें एक शंका निघण्याचा संभव आहे; ती अशी, कीं आपल्या लोकांची प्राचीन ग्रंथांविषयीं व त्यांच्या कर्त्यांविषयीं इतकी पूज्य बुद्धि आहे, कीं ते ग्रंथ जशाचे तसे ठेवून त्यांना वेदांप्रमाणें पूज्य व प्रमाणभूत मानण्याची व भाष्याच्यायोगानें त्यांचे हवे तसे कालानुरूप अर्थ करण्याची त्यांची सर्वत्र प्रवृत्ति दिसते. जरी कात्यायनानें आपल्या वार्त्तिकामध्यें पाणिनीचे शेंकडों दोष काढिले आहेत, तरी पाणिनीचा मूळ ग्रंथ आजपर्यंत जशाचा तसा कायम राहिला; एवढेंच नव्हे, तर त्याजविषयींची पूज्यबुद्धि अद्याप इतकी जागरूक आहे कीं, त्याचें सूत्र वैदिकांच्या दशग्रंथांपैकीं एक अंगच बनून राहिलें आहे; असें जर आहे तर वैद्यकाचे संबंधानें हाच प्रकार कां घडून आला नाहीं ? ह्या शंकेला एक उत्तर आहे, व ते आम्हीं पूर्वी सांगितलेल्या क्रमवृद्धीच्या नियमाचें पुष्टीकरणच आहे. तें हें कीं, वैद्यशास्त्र हें क्रमानें वाढत जाणारें व नेहमीं व्यवहारांत उपयुक्त व प्रत्यक्ष फलाचें असल्यामुळें केवळ जुनें तेवढेंच चांगलें असें म्हणून कधींहि चालावयाचें नाहीं. ह्या गोष्टीची चरकादिकांस पूर्णपणें खात्री होती म्हणून केवळ शब्दपांडित्यानें अग्निवेशाच्या लहानशा ग्रंथावर भाष्य करून सर्व उत्तरकालीन शोध व माहिती त्यांतच अंतर्भूत आहे असें दाखविण्याचा वृथा प्रयत्न करण्याची खटपट न करतां त्यानें मूळ ग्रंथांतच सर्व नवीन माहिती बेमालूम मिसळून टाकिली आहे. नवीन माहिती थोडीथोडकी असती तर मूळ ग्रंथ कायम ठेवून त्यानें पूर्वीच्या रिवाजाप्रमाणें त्याजवर भाष्यच केलें असतें. निदानस्थानावरून व अष्टोदरीयादि अध्यायावरून मूळ ग्रंथ फार साधा व लहान असावा असें अनुमान करतां येतें. 'अष्टोदरिय' अध्यायांत एकंदर अठ्ठेचाळीस रोगांची गणना आढळते. ह्यांत जर चरकानें घातलेला कांहीं भाग नसेल तर फार झाल्यास इतकेच रोग अग्निवेशाच्या वेळीं विशेषेंकरून वर्णिलेले होते असें मानण्यास हरकत नाहीं; तसेंच निदानस्थानांत साऱ्या आठच रोगांचा समावेश केला आहे. इतर रोगांपैकीं कांहींचीं निदानें चिकित्सादि स्थानांत दिलीं आहेत खरीं, परंतु यावरूनच तीं चरकाचीं आहेत असें दिसतें; कारण जर त्यासंबंधानें अग्निवेशाचे वेळीं इतकी माहिती असती तर ती निदानस्थानांतच त्यानें दिली असती ( जसें सुश्रुतादिकांनीं केलें आहे त्याप्रमाणें ). " संस्कर्ता कुरुते तन्त्रं पुराणं च पुनर्नवम् ॥ " ह्या वाक्याचा रोख असाच दिसतो कीं, चरकाचे वेळेस जें अग्निवेशतंत्र होतें तें त्याला अगदींच जुनाट तऱ्हेचें दिसल्यामुळें त्यानें त्याला नवीन रूप देऊन त्या कालास योग्य केलें. निदान असें तरी म्हणण्यास हरकत नाहीं कीं, हें जें आठ रोगांचें निदानस्थान चरकांत आढळतें तें आपल्या वैद्यकाच्या अगदीं बाल्यावस्थेंतील

१ याच अर्थाला उद्देशून वाग्भटानें अष्टांगसंग्रहाच्या आरंभीं 'युगानुरूपसंदर्भो विभागेन करिष्यते' इत्यादि म्हटलें आहे.

(अग्निवेशाच्याहि पूर्वीचें) असावें व तें जशाच्या तशींच चरकाच्या वेळेपर्यंत कायम राहिलें होतें. हें निदानस्थान ज्या वेळेस झालें त्या वेळीं इतर रोगांच्या निदानांची माहिती स्वतंत्र अध्यायांत वर्णन करण्याजोगी नव्हती, सबब ती चिकित्सेच्याच प्रकरणीं सांगण्याचा प्रघात पडला असावा. आतां कोणी म्हणतील कीं, आपला पुरातन आयुर्वेद लक्षग्रंथात्मक होता असें सुश्रुतादिकांनीं सांगितलें आहे, तर आयतंत्र अगदीं साधें व लहान असून त्यांत थोडक्याच रोगांचीं वर्णनें आहेत असें म्हणण्याला वर दिल्यासेरीज आणखी कांहीं प्रमाणें आहेत कीं काय? तर त्यांस आमचें असें म्हणणें आहे कीं, आयशास्त्र फार मोठें व पूर्णतेस पावलेलें असें नुसतें सांगून उपयोग नाहीं, तर त्या सांगण्यास आयशास्त्रावरून रचिलेल्या व हल्लीं उपलब्ध असलेल्या अग्निवेशादि तंत्रांतील गोष्टींचें प्रत्यंतर मिळालें पाहिजे. तसें प्रत्यंतर न मिळाल्यास लक्षग्रंथात्मक इत्यादि विशेषणें केवळ प्रशंसापर व "स गच्छेत्प्रमदाशतमित्यादिवत्" अतिशयोक्तीचें समजलें पाहिजे. रोगांची माहिती उत्तरोत्तर अधिकाधिक होत जाते या नियमास अनुसरून सुश्रुताचे वेळीं जितका शोध लागला होता तितका चरकाचे वेळीं नव्हता; व त्याचे वेळीं जितका शोध लागला होता तितका अग्निवेशाचे वेळीं नव्हता हें जें आमचें म्हणणें आहे त्याच्या पुष्टीकरणार्थ एक दोन रोगांचीं उदाहरणें देऊं म्हणजे वरील उपन्यासाच्या सत्यतेबद्दल सर्वांची खात्री होईल. आमवायु हा रोग हल्लीं सर्वांस प्रसिद्ध आहे. हा सर्व प्रकारच्या हवेंत व विशेषेंकरून थंड प्रदेशांत फार आढळतो. हा फार त्रासदायक असून याजपासून हृदयाला एक प्रकारचा विकार जडून पुढें फार अपाय होत असतो; व केव्हां केव्हां आरंभींच हृदयाच्या उपद्रवानें युक्त असल्यास, तो मारक होतो; म्हणून तो बऱ्याच महत्त्वाचा हल्लीं मानिला जातो. इंग्रजींत त्याला "ऱ्हूमॅटिक फीवर" किंवा "अक्यूट ऱ्हूमॅटिझम्" असें नांव आहे; व इंग्रजी ग्रंथांतून इतर महत्त्वाच्या रोगांप्रमाणेंच त्याचें फार विस्तारानें वर्णन केलेलें आढळतें, इतकेंच नव्हे तर त्याजवर स्वतंत्र ग्रंथहि झाले आहेत. ह्या रोगाचें आमवायु हें नांव माधवनिदानादि अलीकडील ग्रंथांत आढळतें, व त्याचीं लक्षणें ऱ्हूमॅटिझमशीं जुळतात. अलीकडील ग्रंथांत त्याची स्वतंत्र चिकित्साहि आढळते; परंतु सगळ्या चरकांत, सुश्रुतांत किंवा वृद्ध वाग्भटांतहि ह्या रोगाचें नांव देखील आढळत नाहीं.[1] प्राचीन काळीं हा रोग होता याजबद्दल युरोपांतील ग्रंथांत पुरावा आहे व चरकाचे वेळीं आर्य लोक ज्या प्रदेशांत राहात असत त्या ठिकाणीं तर तो विशेषेंकरून असला पाहिजे. असें असून त्याचें नांव व वर्णन अलीकडील माधवादि ग्रंथांप्रमाणें प्राचीन ग्रंथांत कां आढळूं नये? ज्याच्याविषयीं इंग्रजींत मोठे मोठे ग्रंथ लिहिले आहेत व ज्याचें निदान व चिकित्सा अलीकडील संस्कृत ग्रंथांत आढळते त्याविषयीं एक अध्याय, एक श्लोक, निदान चार अक्षरांचा एक शब्द तरी चरकादिकांत येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय? बरें, असें होण्याचें कारण तरी काय असावें? चरकांतील वातरक्त[2] रोगाचें निदान बारकाईनें वाचिलें म्हणजे या प्रश्नाचा निकाल लागतो; व आपाततः परस्परसदृश दिसणाऱ्या रोगाचें बारकाईनें अवलोकन केल्यानें कसा परिच्छेद करतां येतो व तसा परिच्छेद होण्यापूर्वीं दोन्ही एकाच नांवाखालीं कसे मोडतात हें कळून येईल. चरकांतील वातरक्ताचीं लक्षणें (पूर्वरूपोक्त) बारकाईनें वाचून पाहिल्यास असें दिसून येईल कीं, त्यांत आमवाताचीं लक्षणें मिश्र झालीं आहेत.

"स्वेदोऽत्यर्थं न वा कार्ष्यं स्पर्शाज्ञत्वं क्षतेतिरुक्। सन्धिशैथिल्यमालस्यं सदनं पिडकोद्गमः॥
जानुजङ्घोरुकट्यंसहस्तपादाङ्गसन्धिषु। निस्तोदः स्फुरणं भेदो गुरुत्वं सुप्तिरेव च॥"

(च० चि० अ० २७)

ह्या दोन्हीं रोगांमध्यें मुख्य भेद इतकाच कीं, वातरक्त (गाउट) हा विकार बहुधा पायांच्या व क्वचित् हातांच्या अंगुलींना सूज व ठणका या रूपानें होत असतो. मोठाले सांधे त्यांत क्वचितच दुखत असतात; व त्यांचे वेग राहून राहून पुनः पुनः कांहीं दिवसांच्या अंतरानें उत्पन्न होतात; व आमवात मोठ्या सांध्यांत विशेषेंकरून होत असून त्यांत ज्वर व स्वेदाधिक्य हीं लक्षणें विशेषेंकरून असतात. याहून अवांतर भेदहि थोडेसे आहेत; परंतु ते येथें सांगण्याची जरूरी नाहीं. सुश्रुतांतील वातरक्ताचें वर्णन वाचिल्यास असें दिसून येईल कीं,

१. डॉ. कुंटे यांच्या अष्टांगहृदयांत मात्र एके ठिकाणीं हा शब्द आढळतो; व आम्हींहि त्यांस अनुसरून तोच पाठ घेतला आहे (वा० चि० अ० २१ श्लो० ४७). परंतु पुष्कळ पोथ्यांतून त्याबद्दल त्या ठिकाणीं 'आढ्यवाते' असा पाठ आहे; वृद्धवाग्भटावरूनहि तोच खरा दिसतो.

२. याला इंग्रजींत "गाउट" म्हणतात. याजवरील परिशिष्टांत टीप पाहा.

त्यानें तो पादरोगच मानिला आहे असें म्हटलें तरी चालेल. वातरक्तानें पाय अमुक अमुक प्रकारचे होतात असें त्यानें निदानप्रकरणीं सर्वत्र म्हटलें आहे. तसेंच सूत्रस्थानांतील २१ वे अध्यायांत कुपित झालेले दोष अमुक अमुक ठिकाणीं गेले असतां अमुक रोग होतो याविषयीं सांगतेवेळीं "पादगताः श्लीपदवातशोणितवातकण्टकप्रभृतीन् जनयन्ति" असें वातरक्ताचें स्थान संधिमात्र असें न सांगतां पादः असें स्पष्ट सांगितलें आहे. चरकानें[1] वातरक्ताचीं स्थानें हात, पाय, बोटें, लहानमोठे सांधे असें सामान्य रीतीनें सांगितल्यामुळें त्यानें आमवाताचाहि वातरक्तांत अंतर्भाव केला असावा असें वाटतें. ह्या दोन्ही रोगांत बरेंच सादृश्य असल्यामुळें हल्लींच्या इंग्रजी ग्रंथांतून त्यांचा एकमेकांपासून परिच्छेद कसा करावा याबद्दल निराळेंच प्रकरण सांगितलें असतें. असें जर आहे तर चरकाचे वेळीं दोहोंचा एकांतच अंतर्भाव झाला ह्यांत फारसें आश्चर्य नाहीं; असें होण्यास आणखी एक कारण असें दिसतें कीं, मांस खाणाऱ्या लोकांमध्यें आमवातापेक्षां वातरक्ताचें जास्त प्राबल्य आढळतें व पुरातन काळीं जेव्हां आर्य लोक मांसभक्षण करीत असत, त्या वेळीं वातरक्ताचे रोगी आमवातापेक्षां अधिक पाहण्यांत येत; व त्याच्या वेदनाहि आमवातापेक्षां जास्त असह्य असल्यामुळें त्याच रोगांकडे पुरातन आर्यांचें लक्ष अगोदर गेलें असून त्याचेंच प्रथम नामाभिधान झालें असावें; व आमवात या रोगाचा अंतर्भाव पुढें कांहीं दिवसपर्यंत त्याच रोगांत झाला असावा. जर यकृताचा अंतर्भाव प्लीहोदरांतच चरकानें केलेला आढळतो तर आमवाताचा वातरक्तांत अंतर्भाव होणें त्याहून अधिक संभवनीय आहे. याचे-(यकृताचे) संबंधानेंहि याच विषयाला अनुसरून एक उदाहरण देतां येईल. चरकादि ग्रंथांत उदरें आठ प्रकारचींच सांगितलीं आहेत. ह्या आठ प्रकारांत यकृताचें मुळींच नांव नाहीं; प्लीहा मात्र आढळते. यकृत् व प्लीहा या दोहोंपैकीं पूर्वींचें जास्त महत्त्वाचें आहे; एवढेंच नव्हे, तर जलोदर यकृतापासून जितक्या प्रसंगीं होतें, तितक्या प्रसंगीं प्लीहेपासून होत नाहीं. ( प्लीहेपासून क्वचितच होतें, व जरी झालें तरी यकृतांत विकार झाल्यावांचून होत नाहीं. ) चिकित्सेच्या संबंधानें पाहिलें तरी बरें करण्यास यकृतच जास्त कठिण जातें. असें असून उदरगणनेमध्यें प्लीहा सांगून यकृत् सांगितलें नाहीं. बरें, चिकित्सा-प्रकरणीं तरी त्याजविषयीं निराळा प्रकार सांगितला आहे? तेथेंहि प्लीहेवरच हवाला देऊन एका चरणांतच यकृताची किटकिट काढून टाकिली आहे; या भानगडीचाहि निकाल वरच्याच प्रकारच्या विचारानें केला जातो. पूर्वाचार्यांनीं आठच उदरें सांगितलीं होतीं; व पुढें यकृताविषयीं थोडी थोडी माहिती मिळूं लागल्यावर चरकानें प्लीहेमध्येंच त्याचा अंतर्भाव करावा असें सांगून टाकिलें आहे, कारण त्यासंबंधानें अजून विशेष शोध झाले नव्हते ( व अद्यापपावेतोंहि आपल्या वैद्यकांत झालेच नाहींत. ) फक्त एक उजव्या बाजूस पांथरी-सारखें कांहींसें लागतें एवढें ओळखतां येऊं लागलें होतें. यास्तव पुरातन कालापासून आलेल्या अष्टसंख्येला बाध देऊन ९ उदरें-मानणें चरकास आवश्यक वाटलें नाहीं; व म्हणून त्यानें प्लीहेमध्येंच त्याचा अंतर्भाव केला आहे.[2] यासंबंधानें आणखीहि कांहीं उदाहरणें देतां येतील, परंतु विस्तारभयास्तव दिलीं नाहींत.

चरकसंहितेचे एकंदर आठ भाग ( स्थानें ) व १२० अध्याय आहेत. पहिल्या स्थानांत एकंदर शास्त्रार्थ संक्षेपानें वर्णिलेला असल्यामुळें त्याला सूत्रस्थान असें म्हटलें आहे; परंतु याच्या सूत्रस्थानांत व सुश्रुत आणि वाग्भट यांच्या सूत्रस्थानांत बराच भेद आहे. शास्त्राचीं सर्व मूलतत्त्वें जशीं सुश्रुताच्या व विशेषेंकरून वाग्भटाच्या सूत्रस्थानांत व्यापकतेनें व व्यवस्थित रीतीनें आलीं आहेत तशीं चरकांत आलीं नसून जे विषय चिकित्सादि इतर स्थानांत सांगावयाचे तेहि ठिकठिकाणीं चरकानें ( किंवा अग्निवेशानें ) सूत्रस्थानांतच सांगून त्यांत वास्तविक रीतीनें घालण्याला योग्य असे कांहीं विषय विमान व इंद्रिय या स्थानांत घातले आहेत. "सूत्रस्थाने तु वाग्भटः" या वचनाप्रमाणें जी वाग्भटाची सूत्रस्थानासंबंधानें श्रेष्ठत्वख्याति, तिचें कारण हेंच कीं, चरकाच्या सूत्रस्थानाप्रमाणें त्याचें सूत्रस्थान कांहीं ठिकाणीं अव्यापक व कांहीं ठिकाणीं अतिव्यापक [ त्यांत घालण्याला अयोग्य अशा विषयांचें प्रतिपादक ] नसून फार व्यवस्थित रीतीनें रचिलें आहे. सूत्रस्थानाला चरकांत श्लोकस्थान असें एक दुसरें नांव वारंवार आढळतें. यावरून असें दिसतें कीं, आद्य वैद्यक केवळ त्रिस्कंध [ हेतुलिंगौषधात्मक ] असून तें गद्यात्मक संक्षिप्त वाक्यांच्या रूपानें होतें व पुढें जसजशी वैद्यकविषयांतील माहिती वाढत चालली तसतसें त्याचीं मूलतत्त्वें ह्या तिन्ही स्कंधांतून पृथक्

१. तस्य स्थानं करौ पादावङ्गुल्यः पर्वसंधयः ॥ च० चि० अ० १७

२. च० चि० अ० १८. एवमेव यकृदपि दक्षिणपार्श्वस्थं कुर्यात्तुल्यहेतुलिङ्गौषधत्वात्तस्य प्लीहज एवावरोध इत्येतत्प्लीहोदरं विद्यात्।

काढून त्यांचे पृथक् श्लोक रचिले गेले. ह्या स्थितींत वैद्यकाचे बाकीचे भाग अजून कांहीं दिवसपर्यंत गद्यांतच होते व म्हणून ज्या भागांत हीं मूलतत्त्वें एकत्र काढिलीं होतीं त्या भागांस, इतर स्थानांपासून व्यावृत्ति दाखविण्याकरितां श्लोकस्थान असें म्हणूं लागले. पुढें कालांतरानें इतर स्थानेंहि श्लोकात्मक बनल्यामुळें श्लोकस्थान या नांवानें इतर स्थानांची व्यावृत्ति होत नाहीं असें पाहून त्या स्थानास, सर्व विषय येथें सूक्ष्मरूपानें सूचित केले आहेत म्हणून सूत्रस्थान असें नांव दिलें असावें. सूत्रस्थानानंतर इंद्रियें व विमान अशीं दोन स्थानें आहेत. हीं दोन स्थानें सुश्रुत किंवा वाग्भट यांत दिलीं नाहींत; कारण त्यांनीं तदंतर्गत विषय सूत्र, शारीर व कल्प या स्थानांतच वर्णिले आहेत. पुढें निदानस्थान येतें. हें स्थान सुश्रुताच्या व वाग्भटाच्या निदानस्थानाहून पुष्कळ लहान ( विषयाच्या संबंधानें ) आहे. यांत एकंदर आठच रोगांचें निदान सांगितलें आहे, व तेंहि सर्व हल्लींच्या दृष्टीनें महत्त्वाचेच निवडले आहेत असें नाहीं. अवशिष्ट रोगांचीं निदानें सूत्र, चिकित्सा व सिद्धि या स्थानांतून पसरलेलीं आहेत. पुढें चिकित्सास्थान येतें. यांत निदानस्थानाच्याच अनुक्रमानें रोगांची चिकित्सा न सांगतां प्रथमच रसायनप्रयोगाचे कांहीं अध्याय सांगितले आहेत व नंतर ज्वरादिकांची चिकित्सा सुरू केली आहे. पुढें कल्पस्थानांत इतर ग्रंथांप्रमाणेंच वमनादिकांचे कल्प वर्णिले आहेत; व शेवटीं सिद्धिस्थानांत, कल्पस्थानांत व चिकित्सास्थानांत सांगावयाचे राहिलेले कांहीं विषय आले आहेत. याप्रमाणें ह्या अतिपुरातन ग्रंथाची बांधणी संक्षेपानें वाचकांपुढें मांडली आहे.

ह्याप्रमाणें चरक हा ग्रंथ कोणत्या प्रकारचा आहे, त्याच्या निरनिराळ्या काळाच्या विविध कर्त्यांनुरूप त्यांतील भाषेचें, ग्रंथसरणीचें व प्रतिपादनपद्धतीचें विविधत्व, त्याची एकंदरीनें आर्ष तऱ्हा, त्याचा काल व वैद्यकीय ज्ञानाच्या उत्तरोत्तर झालेल्या अभिवृद्धीचीं त्यांत आढळणारीं प्रमाणें इत्यादि थोडक्यांत सांगितलें.

आतां सुश्रुताविषयीं चार शब्द सांगून आर्षवैद्यकाचा इतिहास पुरा करूं. सुश्रुत हा ग्रंथ चरकाहून पुष्कळ अलीकडचा आहे असें त्याच्या भाषेवरून, व्यवस्थेवरून व इतर अंतर्गत प्रमाणांवरून दिसून येतें. कात्यायन जो वार्त्तिककार त्यानें सुश्रुताचा उल्लेख केल्यावरून हा त्याच्या पूर्वीचा असला पाहिजे. त्यांत शल्य व शालाक्य हीं तंत्रें विशेषेंकरून सांगितलीं असून इतर अंगेंहि संक्षेपानें वर्णिलीं आहेत. त्यांतील विषयविवेचनाची पद्धति चरकाहून अधिक व्यवस्थेची असून विषयांतरादि दोष तितके नाहींत. त्यांत सांख्यशास्त्राच्या प्रक्रियेचा स्पष्टपणें उल्लेख केला आहे. विदेहपतीचें शालाक्यतंत्र व अग्निवेशादि सहा कायचिकित्सा यांचाहि त्यांत उल्लेख आढळतो. चरकापेक्षां यांतील शारीरस्थान जास्त माहिती देणारें आहे. हा ग्रंथहि मूळच्या एका आधारग्रंथावरून रचिलेला आहे असें दिसतें. कारण ठिकठिकाणीं पूर्वी प्रसिद्ध असलेल्या श्लोकांचा त्यांत उतारा घेतलेला आढळतो. तसेंच याचेंहि पूर्वीचें स्वरूप निराळें असून पुढें त्याजवर कालानुरूप संस्कार घडला असावा असें कांहीं कारणांवरून अनुमान होतें; सुश्रुताचा एक टीकाकार डल्हन यानें असें म्हटलें आहे कीं, हल्लींचा सुश्रुत ग्रंथ हा नागार्जुनानें मूळ ग्रंथावर संस्कार करून तयार केलेला आहे. नागार्जुन हा बौद्ध असून तो इसवी सनाच्या पहिल्या शतकांत झाला. सुश्रुताखेरीज इतर जीं शल्यतंत्रें ( औपधेनवादि ) त्यांचीं फक्त सुश्रुतांतच नांवें आढळतात, परंतु सुश्रुतानंतर तीं प्रचारांत राहिल्याचा पुरावा नाहीं. चरकाखेरीज ज्या इतर कायचिकित्सा ( भेडादितंत्रें ) त्यांचा मात्र प्रचार चरकानंतर कांहीं कालपर्यंत थोडा थोडा होता असें दिसतें. परंतु वाग्भटाच्या वेळीं त्यांजकडे लोकांचें बरेंच दुर्लक्ष होऊं लागलें होतें असें वाग्भटांतील एका श्लोकावरून उघड होतें. इतक्या प्राचीन काळापासून लोकांची त्यांजवरील भक्ति नाहींशी झाल्यामुळें हल्लीं त्यांच्या पोथ्याहि उपलब्ध नाहींत. तंजावर येथील राजाच्या पुस्तकालयांत मात्र भेडसंहितेची एक हस्तलिखित प्रत असल्याचा अलीकडे शोध लागला आहे. कलकत्त्यास अलीकडे एक ‘ हारीतसंहिता ’ म्हणून ग्रंथ छापिला आहे; परंतु ती खरी ‘ हारीतसंहिता ’ नसावी, कारण या प्रांतीं त्याचीच एक नक्कल ‘ आत्रेयसंहिता ’ या नांवानें आढळते; परंतु ह्या द्विनामधारी ग्रंथाची रचना पाहतांना व त्यांत वाग्भटाचें नांव आढळतें ही गोष्ट लक्षांत आणितां त्याचा खोटेपणा पूर्णपणें नजरेस येतो. कोणीं तरी कांहीं श्लोकसंग्रह करून त्यास ‘ आत्रेयसंहिता, ’ ‘ हारीतसंहिता ’ अशीं नांवें दिलीं आहेत. मुळीं आत्रेयानें जर ग्रंथच केला नव्हता तर आत्रेयसंहिता येईल कोठून ? कारण चरकांत सांगितलें आहे कीं, अग्निवेश हाच आद्यतंत्रकर्ता, व आत्रेयाचीं व्याख्यानें ऐकून जें त्यानें

१. रसायन शब्दाच्या अर्थाबद्दल ह्या ग्रंथाच्या १९ पानावरील टीप पाहा.

२. ऋषिप्रणीते प्रीतिश्चेन्मुक्त्वाचरकसुश्रुतौ । भेडाद्याः किं न पठ्यन्ते तस्माद्ग्राह्यं सुभाषितम् ॥

( वा० उ० अ० ४० श्लोक ८७ )

तंत्र लिहिलें तेंच चरकाचा गाभा. सुश्रुतानंतर किंवा चरकाचा पुरवणीकार जो दृढबल त्यानंतर वैद्यकांत ऋषिप्रणीत ग्रंथ झाल्याची निश्चयात्मक माहिती मिळत नाहीं. व्याकरण महाभाष्यकार जो पतञ्जलि त्यानें एक वैद्यकावर ग्रंथ लिहिला असें एका व्याकरणशास्त्राच्या ग्रंथांतील खालीं लिहिलेल्या श्लोकांवरून दिसून येतें. हा श्लोक कोणत्या ग्रंथांतील व कोणत्या वेळचा आहे याचा मात्र बरोबर शोध लागत नाहीं; परंतु महाभाष्याच्या कांहीं प्रतींत हा आरंभीं आढळतो. तसेंच 'परमलघुमंजूषा' या ग्रंथांत "आप्तो.नामानुभवेन वस्तुतत्त्वस्य कात्स्न्यैन निश्चयवान् रागादिवशादपि नान्यथावादी यः स इति चरके पतञ्जलिः" असें एक वाक्य आढळतें. त्यावरून पतञ्जलीनें चरकावर एखादें भाष्य लिहिलें असावें असें दिसतें. परंतु तें हल्लीं उपलब्ध नसल्यामुळें त्यासंबंधानें तूर्त कांहींच सांगतां येत नाहीं. चरकाचा एक टीकाकार चक्रदत्त यानें आरंभींच असें म्हटलें आहे कीं, पतञ्जलीनें चरकाचा प्रतिसंस्कार केला आहे.

## रसक्रियेनंतरचें किंवा मिश्रवैद्यक

येथवर आर्षवैद्यकाविषयीं झालें. आतां आर्षवैद्यकाच्या तिसऱ्या अवस्थेविषयीं किंवा ज्याला आपण मिश्रवैद्यक असें म्हटलें आहे त्याविषयीं विचार करूं. ह्या अवस्थेंत कांहीं नवीन खनिज व विषारी औषधांचा शोध लागून आर्षवैद्यकाच्या चिकित्सास्थानांत एक मोठी भर पडली; किंवा एक चिकित्सेचा नवीन पंथ पूर्वींच्या पंथाशीं मिश्र झाला; म्हणून यास आम्हीं मिश्रवैद्यक असें म्हटलें आहे. हल्लीं हरताळभस्म, सोमलभस्म, पारदभस्म, सोमनाथीताम्र, समीरपन्नग, हेमगर्भ, राजवंगेश्वर, सूतशेखर वगैरे बऱ्याच धातु, उपधातु व स्थावरजंगम विषें यांजपासून होणाऱ्या औषधांचीं (मात्रा व भस्में) नांवें सर्व विद्वान् व अविद्वान् लोकांमध्यें विश्रुत झालीं आहेत. आर्षवैद्यकांत ह्या औषधांचीं नांवें देखील मिळावयाचीं नाहींत. पुरातन काळापासून नांवाजलेल्या अग्निवेशादितंत्रांत जर या औषधांविषयीं कांहींच सांगितलें नाहीं, तर हीं आलीं तरी कोठून? आर्षवैद्यकाच्या तिसऱ्या अवस्थेचा इतिहास सांगणें हेंच या प्रश्नाचें उत्तर होय. ह्या हल्लीं सर्वतोमुखीं झालेल्या औषधांचा आधार पाहूं गेल्यास तो चरकादिकांत नसून रसतंत्र, रसशास्त्र, रसक्रिया, रसवैद्यक इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या कांहीं निराळ्याच व आर्षवैद्यकाच्या मानानें पुष्कळ अर्वाचीन ग्रंथांतून सांपडतो. हे ग्रंथ व चरकादिक ग्रंथ यांची तुलना केली असतां त्यांजमध्यें फारच वैलक्षण्य दिसून येतें. चरकादिकांचें अवलोकन करून हे ग्रंथ पाहूं लागल्यास आपण एका निराळ्याच प्रदेशांत गेल्याचा भास होतो; व ह्या दोहोंचा संबंध स्पष्टपणें दिसून येत नसल्यामुळें त्यांच्या दरम्यान एक मोठी खिंड पडल्यासारखी दिसते. म्हणजे काय कीं, ज्या मतांचा व ज्या क्रियांचा रसतंत्रांत विस्तार झाला आहे तीं मतें किंवा त्या क्रिया बीजरूपानें देखील आर्षवैद्यकांत आढळत नाहींत. रस म्हणजे पारा व ज्या शास्त्रांत प्राधान्येंकरून त्याचें वर्णन केलें असतें त्यास रसशास्त्र म्हणतात. रसशास्त्राचा प्रधानविषय जो पारा व ज्याचा त्या शास्त्राप्रमाणें प्रत्येक रोगावर अनुपानपरत्वें उपयोग होतो त्याचें चरकादिकांनीं नामग्रहणहि केलें नाहीं तर रसशास्त्र हें आर्षवैद्यकापासून अगदीं विजातीय मानण्यास हरकत कोणती? शिवाय खुद्द रसशास्त्रकर्त्यांच्याच मतें तें विजातीय ठरतें. कारण त्यांनीं चिकित्सा तीन प्रकारची असें सांगून रसचिकित्सेला उत्तम व दैवी चिकित्सा, कषायादिकांनीं रोग बरें करणें (चरकादिकांप्रमाणें) ही मानुषी मध्यम व शस्त्रक्षारादिकांनीं बरें करणें ही आसुरी अधम असें स्पष्ट सांगितलें आहे. यावरून उघड आहे कीं, रसतंत्रें हीं आर्षवैद्यकापासून अगदींच भिन्न आहेत; एवढेंच नव्हे, तर आर्षवैद्यकाशीं आपला कांहीं संबंध नाहीं व त्यांतील चिकित्सेविषयीं आपली फारशी पूज्य बुद्धि नाहीं असें त्यांनीं स्वकपोलकल्पित वरील विभागावरून स्पष्ट सुचविलें आहे. तेव्हां पूर्वापर संबंधावांचून ही रसक्रिया आपल्या देशांत कशी निर्माण झाली, तिचे कर्ते कोण व त्यांनीं ती कोणत्या आधारावर रचिली वगैरेसंबंधानें सहजच जिज्ञासा उत्पन्न होते. रसक्रियेचा उगम आपल्या

---

१. योगेन चित्तस्य पदेन वाचां मलं शरीरस्य तु वैद्यकेन। योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतञ्जलिं प्राञ्जलिरानतोऽस्मि॥

२. हें वाक्य मीं मागेंच ऐकलें होतें परंतु तें कोणत्या ग्रंथांतील आहे हें स्मरत नव्हतें; तें वे० शा० सं० शिवरामशास्त्री नाटके यांनीं वरील ग्रंथांत असल्याचें कळविलें म्हणून आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

३. सा दैवी प्रथमा सुसंस्कृतरसैर्या निर्मिता सद्रसैः चूर्णस्नेहकषायलेहरचिता स्यान्मानवी मध्यमा।
शस्त्रच्छेदनलास्यलक्ष्मणकृताचाराधमा साऽऽसुरीत्यायुर्वेदरहस्यमेतदखिलं त्रिस्त्रश्चिकित्सा मताः॥

—रसपद्धतिः

देशांत जर आपल्याला कोठें आर्ष ग्रंथांतून आढळत नाहीं तर दुसऱ्या कोणत्या तरी देशांत ती आपल्यास शोधून काढितां येईल कीं काय याचा आपण विचार करूं.

रसक्रियेवरील उपलब्ध ग्रंथ तपासून पाहतां ते सर्व ऋषिकालाच्या नंतरचे, इतकेंच नव्हे, तर ख्रिस्ती शकाच्या पूर्वी एक दोन शतकांच्या सुमारचे आहेत असें दिसून येतें. त्याहून पूर्वी रसक्रियेचा किंवा धातुवादाचा (किमयेचा) उल्लेख कोणत्याहि संस्कृत ग्रंथांत आढळत नाहीं. पाश्चिमात्य देशांचा जुना इतिहास पाहूं गेल्यास असें दिसून येतें कीं, ग्रीस व रोमक देशांमध्यें किमया[1] निदान ख्रिस्ती शकाच्या आरंभापासून तरी प्रचारांत होती, व मिसर देशांत तर त्याहून पूर्वी होती व तोच देश तिचें उत्पत्तिस्थान होय. केमी किंवा केमिया हें मिसर देशाचें प्राचीन नांव आहे व त्यावरूनच केमिस्ट्री व केमिया (आल्केमी) हे शब्द निघाले आहेत. मिसर देशांतून ती ग्रीस व रोमक देशांत ख्रिस्ती शतकाच्या आरंभीं आली व तेथील लोकांस तिचा इतका नाद लागला कीं, इ० स० ३०० च्या सुमारास रोमक पत्तनच्या एका डायोक्लेशियन (Diocletian) नांवाच्या बादशहानें असा हुकूम फर्माविला होता कीं, किमयाचे ग्रंथ जेथें जेथें मिळतील तेथून शोधून आणून ते सर्व जाळून टाकावे. पाश्चिमात्य देशांत रसक्रियेचें पुरातन कालापासून अस्तित्व, आपल्या देशांत तिचें त्या मानानें अर्वाचीनत्व व आपल्या आर्ष ग्रंथांत तिचा बीजरूपानेंहि अभाव, ह्या तीन गोष्टींचा युगपत् विचार केल्यास असें वाटूं लागतें कीं, रसक्रिया (औषधीय भागासंबंधानें जरी नव्हे तरी धातुवादापुरतीच) पाश्चिमात्य देशांतून आपल्या इकडे आली असेल. हा तर्क संभवनीय होण्यास आपल्या देशाच्या ऋषिकालानंतरच्या इतिहासाकडे लक्ष दिलें पाहिजे. अग्निवेश, चरक, सुश्रुत, यास्क, शौनक, आश्वलायन, पाणिनि, इत्यादि निरनिराळ्या ग्रंथकर्त्या ऋषींची एकामागून एक कारकीर्द होऊन गेल्यानंतर एक दोन शतकांनीं आपल्या देशांत एक धामधूम उडाली. ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें ५०० वर्षांमागें बुद्धावतार होऊन एक मोठी धर्मक्रांति सुरू झाली. पुढें सुमारें १५० वर्षांनीं चंद्रगुप्त राजा राज्य करीत असतां आपल्या लोकांचें ग्रीक लोकांशीं दळणवळण सुरू झालें. शिकंदर बादशहानें हिंदुस्थानावर स्वारी करून पंजाबचा कांहीं भाग हस्तगत करून घेतला व त्यावर एक प्रतिनिधि नेमिला. चंद्रगुप्तास त्यानें मदत केली व त्याचे दरबारांत ग्रीक वकील असत. ह्या सर्व गोष्टी इतिहासप्रसिद्ध आहेत. ह्या दळणवळणामध्यें ग्रीक व हिंदु या उभयतांनीं विद्या व कलाकौशल्य यासंबंधानें परस्परांपासून फायदा करून घेतला आहे. ग्रीक लोकांनीं आपल्या इकडच्या वैद्यकादि शास्त्राची माहिती मिळविली. आपल्या लोकांनीं ग्रीक लोकांपासून ज्योतिषशास्त्राच्या कांहीं भागांसंबंधीं व कदाचित् रसक्रियेसंबंधीं माहिती मिळविली. ज्योतिषांतील पंचसिद्धान्तांपैकीं पौलिश व रोमक या दोन सिद्धान्तांत ग्रीक लोकांपासून प्राप्त झालेल्या बऱ्याच गोष्टी आढळतात; व पहिल्याचा कर्ता पॉलस् अल्-युनानि (Paulus al Yunani) हा आहे असें म्हणतात. बृहज्जातकाच्या टीकेंत वारंवार यवनाचार्यांच्या मताचा अनुवाद केलेला आढळतो. यवनांविषयींची तत्कालीन आर्य लोकांची ज्योतिषाच्यासंबंधानें पूज्यबुद्धिहि गर्गसंहिता वगैरे ग्रंथांवरून स्पष्ट दिसते[3]. आपल्या ज्योतिषशास्त्रांतील "आपोक्लीम", "द्रेकाण", "जामित्र" वगैरे पुष्कळ शब्द ग्रीक भाषेंतून घेतले आहेत. खगोलाचा बारा राशींमध्यें जो विभाग तो वेदांग ज्योतिषामध्यें नसून अलीकडील सिद्धान्तांत आढळतो. तोहि ग्रीक लोकांपासूनच घेतला आहे. ग्रीक भाषेंतील

---

१. रसक्रिया व धातुवाद किंवा किमया यांचा इतका निकट संबंध आहे कीं, तीं दोन्हीं एकच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. (याविषयीं पुढें पाहा.)

२. बौद्ध धर्मामध्यें एक 'ललित विस्तार' नांवाचा बुद्धाच्या चरित्राचा ग्रंथ आहे, तो ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकाच्या सुमारास झाला असावा असें म्हणतात. त्यांत 'बोधिसत्त्व' होऊं इच्छिणारांनीं प्रथम सर्व विद्या व कला यांत प्रवीण व्हावें असें सांगितलें आहे; व त्या विद्या व कला यांची एक लांब मालिका दिली आहे. त्या मालिकेंत पोहणें, कुस्ती, घोड्यावर बसणें, गायन, नृत्य, मंत्र, तंत्र, पुराण, इतिहास, हेतुविद्या (तर्कशास्त्र), मणिराग (रत्नांना रंग देण्याची विद्या), वस्त्रराग इत्यादि अनेक लहान मोठ्या शारीरिक व मानसिक विद्या व कला सांगितल्या आहेत; परंतु त्यांत धातुवाद किंवा रसविद्या यांचें नांव नाहीं. यावरून ख्रिस्ती शकाचे दुसऱ्या शतकांत आपल्या देशांत अद्यापि धातुवाद किंवा किमया फारशी किंवा मुळींच प्रसिद्ध झालेली नव्हती, असें अनुमान करतां येतें. ती तेव्हां माहीत असती तर मणिरागाचे पुढेंच तिचेंहि नांव आलें असतें; मणिरागापेक्षां तिचा उपयोग अधिक असल्यामुळें ती तर अवश्य व प्रथमच सांगितली असती.

३. म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम्। ऋषिवत् तेपि पूज्यन्ते किं पुनर्दैवविद्द्विजाः ॥

सर्व राशींचीं नांवें बृहज्जातकांत आलीं आहेत. उदाहरणार्थः—आकोकेर = मकर, जितुम = मिथुन, कौर्प्य, (स्कॉर्पिओ) = वृश्चिक, लेयः (लिओ) = सिंह, पार्थोन = कन्या, तावुरि (टॉरस) = वृषभ इत्यादि जशी ज्योतिषांतील कांहीं भागांची त्याप्रमाणें रसक्रियेचीहि माहिती आरंभीं पश्चिमेकडून आली असावी असें अनुमान करतां येतें. आतां कोणी म्हणतील कीं, ऋषिकालानंतर आपल्या लोकांनींच रसशास्त्राचा शोध लाविला असावा; परंतु रसशास्त्राचे स्तंभभूत जे मुख्य दोन पदार्थ पारद व दरद (हिंगूळ) ते दोन्ही आपल्या देशांतले नसून परदेशांतून आपल्या देशांत कांहीं वर्षांपूर्वी येऊं लागले असें रसग्रंथावरून व त्या नांवावरूनहि सिद्ध होतें. हीं नांवें त्या पदार्थांस देशावरूनच पडलीं आहेत. महाभारतांत पारद व दरद या देशांचीं नांवें आढळतात व ते म्लेच्छ देश असून हिमालयाचे उत्तरेस आहेत असें तेथें सांगितलें आहे. हल्लीं गिलजिद दरी (Gilgit Valley) मध्यें दरद या नांवाचे लोक आढळतात. येथेंच पूर्वींचा दरद देश होता; व पारद देशहि त्यालाच लागून हिंदकुश पर्वतालगत होता (कदाचित् प्राचीन काळच्या 'पार्थिया' देशासहि हें नांव असण्याचा संभव आहे). पारद (पारा) व दरद (हिंगूळ) हे पदार्थ त्या नांवाच्या हिंदुकुशाजवळील देशांत उत्पन्न होत असतील असें वाटत नाहीं, कारण तेथें यांच्या खाणी आढळत नाहींत. स्पेन व चीन देशांत पुष्कळ दिवसांपासून ह्या दोन पदार्थांच्या खाणी आहेत; व पारद व दरद देशचे लोकांच्या द्वारां तिकडून (स्पेन व चीनाकडून) ते पदार्थ हिंदुस्थानांत येत असतील, म्हणून त्यांस तीं नांवें पडलीं आहेत; जसें वंग हें कथिलाचें नांव वंग देशावरून पडलें आहे, परंतु वंग देशांत (पूर्व बंगाल्यांत) कथिलाच्या खाणी मुळींच नाहींत; मलाया, पेगू व चीन या देशांतील कथील वंग देशांतून इकडे येत असल्यामुळें त्यावरूनच त्याला त्याचें संस्कृत नांव (वंग) मिळालें आहे. ज्या देशांत जे पदार्थ उत्पन्न होतात, तेथें त्यांच्या गुणधर्मांची माहिती प्रथम मिळणें हें साहजिकच आहे. काजूच्या बोंडाचे व फळाचे काय उपयोग आहेत हें गोमंतकांतील लोकांस जितकें माहीत आहे, तितकें गुजराथेंतील लोकांस माहीत असण्याचा संभव नाहीं. रसक्रियेंत दोन भाग आहेतः—देहसिद्धि व लोहसिद्धि. देहसिद्धि म्हणजे पारद्याला कांहीं एक प्रकारच्या संस्कारांनीं सिद्ध करून शरीर निरोगी व अजरामर करणें. लोहसिद्धि म्हणजे किमया यालाच धातुवाद अशीहि संज्ञा आहे. लोकांचें जें प्रथम रसक्रियेकडे लक्ष लागलें, तें किमयेच्याचसंबंधानें. ताम्रादिकांचे इतर कांहीं धातूंशीं मिश्रणापासून सुवर्णासारखे धातु उत्पन्न होतात; जस्त वगैरे धातु अग्निसंस्कारानें भस्मरूप होतात; व पुन्हां कांहीं क्रियेनें धातुरूप होतात; पाऱ्यामध्यें इतर धातु मिसळले असतां तो चांदीसारखा घट्ट होतो; त्याच्याशीं गंधक खलिला असतां काजळासारखी एक पूड तयार होते; व अग्निसंस्कारानें तीच लाल होऊन तिचा हिंगूळ बनतो; मोरचुताचें पाणी करून तें लोखंडाच्या भांड्यांत ठेविलें असतां त्यांतील तांबें निराळें होऊन तें लोखंडावर चढतें, इत्यादि चमत्कारिक गोष्टी जेव्हां लोकांच्या पाहण्यांत आल्या, तेव्हां ताम्रादि हीन धातूंपासून सुवर्णादि श्रेष्ठ धातू कृत्रिम रीतीनें तयार करतां येतील अशी त्यांस सहजच कल्पना उत्पन्न झाली; व कार्यसिद्धि झाल्यास मोठाच फायदा होईल या आशेवर त्यांनीं पुष्कळ तऱ्हेचे प्रयोग सुरू केले. यामुळें सोनें होवो अगर न होवो, परंतु वर लिहिलेसारख्या आणखीहि पुष्कळ रसायनशास्त्रांतील गोष्टींची माहिती मिळाली. ह्या धातुवादास स्तंभभूत जे पदार्थ, ते पाश्चिमात्य देशांतील असल्यामुळें त्याची सुरुवात तिकडेसच झाली असावी. कारण तिकडे ती खिस्ती शकाच्या आरंभापासून तरी निदान प्रचारांत असल्याचा इतिहास आहे; व किंमया हा शब्दहि तिकडूनच आला आहे असें वर सांगितलेंच आहे. ह्या किमयेमध्येंच आपल्या औषधीय रसक्रियेची व युरोपियन रसायनशास्त्राची उत्पत्ति झाली. ही विद्या आरंभीं मिसर देशांत उत्पन्न होऊन पुढें ग्रीक व आरबी लोकांनीं घेतली असा इतिहास आहे. किमयेच्या नादानें मिसर, ग्रीक, यहुदी व आरबी लोकांनीं जे भगीरथ प्रयत्न सुरू केले होते, त्यांचेयोगानें जे अनेक शोध निघाले, त्यांचीं याप्रमाणें रसायनशास्त्र (केमिस्ट्री) व औषधें हीं दोन उपयुक्त फळें जगांत कायम राहिलीं. रसक्रियेंतील हीं दोन अंगें प्रत्येक रसक्रियेच्या ग्रंथांतून प्रतिपादिलेलीं आढळतात. रसार्णव ग्रंथ फार प्राचीन आहे व त्यांत तर स्पष्ट असें लिहिलेंच आहे कीं, सिद्ध केलेल्या पाऱ्याची प्रथम धातूवर परीक्षा करावी व मग शरीरास त्याचा उपयोग करावा (यथा लोहे तथा देहे कर्तव्यः सूतकः सता। समानं कुरुते देवि प्रत्ययं देहलोहयोः। पूर्वं लोहे परीक्षेत पश्चाद्देहे प्रयोजयेत्।).

१. ह्यासंबंधानें रसरत्नसमुच्चयांत म्हटलें आहेः—
सिद्धे रसे करिष्यामि निर्दारिद्र्यमिदं जगत्। रसध्यानमिदं प्रोक्तं ब्रह्महत्यादिपापनुत्॥ एकोऽसौ रसराजः शरीरमजरामरं कुरुते। दशाष्टसंस्कृतैः शुद्धो देहं लोहं करोति सः। देहलोहमयीं सिद्धिं दत्ते सूतस्ततःस्मृतः (र० स० अ० १).

यावरून उघड आहे कीं, रसक्रियेंत धातुवादाचें बरेंच प्राधान्य आहे; एवढेंच नव्हे, तर तोच प्रथम निघालेला भाग असून त्यांत त्यांच्या मतें सिद्धि मिळाल्यावर मग देहसिद्धीकडे तिची योजना झाली. रसक्रियेवरील सर्व प्राचीन ग्रंथ तांत्रिक व वाममार्गी आहेत व शाक्तांच्या तंत्रांतून रसक्रिया सर्वत्र आढळते व तींत कापालिकांचे मंत्र आढळतात. यावरून शाक्त व कापालिक मतें हिंदुस्थानांत प्रचारांत आल्यानंतर रसक्रिया सुरू झाली असावी. रसार्णव, रसरत्नसमुच्चय वगैरे सर्व ग्रंथांतून रसक्रियेंत प्रवेश करणारांनीं दीक्षा घेतली असावी, ते देवीभक्त असावेत वगैरे मजकूर आढळतो; व शाक्त संप्रदायाप्रमाणें कांहीं बीभत्स प्रकारहि रसरत्नसमुच्चयांत आहे ( र० स० अ० ६ ). या मतांतील लोकांचा संप्रदाय वैदिक संप्रदायापासून अगदीं भिन्न असे; मंत्रतंत्रादि चमत्कारांकडे त्यांचें विशेष लक्ष असे, व ते जातिभेद मानीत नसत. या शेवटच्या कारणामुळें त्यांचें ग्रीक, आरब वगैरे लोकांशीं विशेष दळणवळण असण्याचा संभव आहे, व त्यांच्या मनाचा कल सिद्धीकडे विशेष असल्यामुळें त्यांनीं धातुवादाची माहिती त्यांजपासून संपादन करून ती स्वतांच्या शोधांनीं वाढविली असावी. ही माहिती जशी जशी बरीच वाढत चालली, तशी तशी त्यांनीं आपल्या तंत्रांतून सामील केली. रसक्रियेच्या मूळप्रवर्तकांना सिद्ध ( ऋषि नव्हे ) अशी संज्ञा आहे. रसरत्नसमुच्चयांत जीं सत्तावीस सिद्धांचीं नांवें दिलीं आहेत, त्यांपैकीं एकदोनच ऋषींच्या नांवासारखीं दिसतात; बाकीचीं बहुतेक बौद्धांचीं व कापालिकादि माहेश्वर पंथांतील किंवा शाक्तपंथांतील सिद्धांचीं नांवें आहेत. रसक्रिया सहाव्या शतकाच्या पूर्वी हिंदुस्थानांत फारशी प्रचारांत असण्याबद्दल पुरावा नाहीं; एवढेंच नव्हे तर तिचा फारसा प्रचार नसावा असें म्हणण्यास मात्र कारणें आहेत. तीं अशीं:– रसक्रियेचा रसेश्वरदर्शन म्हणून जें एक मत विद्यारण्यकृत सर्वदर्शनसंग्रहांत दिलें आहे त्याच्याशीं फार निकट संबंध आहे, किंबहुना तीं दोन्हीं एकच आहेत; कारण या मताच्या प्रतिपादनार्थ जे विद्यारण्यांनीं ग्रंथ घेतले आहेत ते सर्व रसक्रियेचेच आहेत ( रसार्णव, रसहृदय, रसेश्वरसिद्धान्त इत्यादि ); व म्हणून हें रसेश्वरदर्शन रसक्रियेच्या प्रचारानंतर लवकरच निर्माण झालें असावें; असें असून आनंदगिरीकृत शांकर-दिग्विजयामध्यें जी एक त्यावेळच्या शेंकडों मतांची मालिका दिली आहे तींत रसेश्वरदर्शनांचें नांव नाहीं. त्या मालिकेंत लहानमोठीं सर्व मतें कांहीं एका प्रसंगानें वर्णिलीं आहेत, व जर रसेश्वरदर्शन त्या वेळीं प्रचारांत असतें तर आनंदगिरींनीं त्याची कांहीं हकीकत ( आचार्यांनीं इतर मतांप्रमाणें त्या मताचा पराजय केला इत्यादि प्रकारची ) अवश्य दिली असती; कारण इतर सामान्य सिद्धान्तापेक्षां रसेश्वरसिद्धान्ताची उडी मोठी आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं, पारा हें शिवाचें बीज व अभ्रक हें शक्तीचें बीज! ह्या दोहोंचें मेलन मृत्यु व दारिद्र्य यांचा नाश करितें! हींच दोन सृष्टीचीं आदितत्त्वें व यांतूनच सर्व जग निर्माण झालें!! पारा हेंच मुक्तीचें कारण, ( संसारस्य परं पारं दत्तेऽसौ पारदः स्मृतः ॥ ) पिंडस्थैर्य हेंच जीवन्मुक्तीचें उत्तम साधन व तें तर पाऱ्यावांचून होतच नाहीं. ह्या साधनास रसयोग असें त्यांनीं नांव दिलें आहे. त्याच्या योगानें अविनाशी असा रसमय देह प्राप्त होतो ( षड्दर्शनेपि मुक्तिस्तु दर्शिता पिण्डपातने । करामलकवत्सापि प्रत्यक्षा नोपलभ्यते । तस्मात्तं रक्षयेत्पिण्डं रसैश्चैव रसायनैः ॥ –रसार्णवः ). तेव्हां प्रत्यक्ष वेदान्तावरच हल्ला करणारें जें मत तें शंकराचार्यांच्या वेळीं असतें तर त्याचें खंडन केल्याची हकीकत आनंदगिरीनें दिल्याशिवाय सोडिली नसती. ती तेथें उपलब्ध नसल्यामुळें असें अनुमान करतां येतें कीं, आचार्यांच्या किंवा आनंदगिरीच्या वेळीं म्हणजे आठव्या शतकाच्या सुमारास हें मत प्रसिद्ध झालें नव्हतें, व म्हणून रसक्रियेचा त्यावेळीं नुकताच प्रचार झाला असावा किंवा निदान तें स्वतंत्र मत मानण्याइतकी त्याची महती वाढली नव्हती असें दिसतें. मुळींच प्रचार झाला नव्हता असें आम्हीं म्हटलें असतें, परंतु आचार्यांच्या एका ग्रंथांत किमयेचा व शतश्लोकीमध्यें स्पर्शमण्याचा ( परिसाचा ) दृष्टान्त दिलेला आढळतो. परिस म्हणून एक किमयागारांनीं कल्पिलेला दगड आहे. त्याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें असें ते मानितात. त्यास संस्कृतांत "स्पर्श" हें नांव शंकराचार्यांच्या शतश्लोकींत आढळतें; परंतु हें नांव त्यांच्या वेळीं नुकतेंच सिद्ध झालें असावें असें दिसतें; कारण त्या नांवाचा मणि जर प्रसिद्ध असता तर त्याचें नांव अमरकोशकारानें दिलें असतें; परंतु त्या अर्थानें अमरांत स्पर्श हा शब्द आढळत नाहीं व तत्कालीन कालिदासादि कवींच्या ग्रंथांतूनहि "स्पर्श" मण्याचे दृष्टान्त आढळून येत नाहींत. तसेंच, वराहमिहिरास स्पर्शमणि माहीत असता तर त्यानें आपल्या बृहत्संहितेंत मणिवर्गामध्यें स्फटिकचंद्रकांतादि मण्यांबरोबर त्याचेंहि कथन केलें असतें. तसेंच, जर त्याच्या वेळीं रसक्रिया माहीत

असती तर त्यानें इतर चमत्कारिक प्रयोगांप्रमाणें क्रियेचे कांहीं प्रयोग किंवा निदान कांदर्पिक ( वाजीकरणाच्या ) अध्यायांत रसक्रियेंतील कांहीं मोठाले योग सांगितलेच असते; कारण रसक्रिया प्रसिद्ध झाल्यानंतर वाजीकरणामध्यें वनस्पतींच्या योगांची आपल्या लोकांच्या मतें फारशी प्रतिष्ठा राहिली नव्हती. त्याच्या कांदर्पिक अध्यायांत एक पाऱ्याचा योग आढळतो; परंतु तो रसक्रियेच्या बाल्यावस्थेंतील आहे. वाग्भटाच्या अष्टांगहृदयांतहि तोच योग आढळतो. ह्या योगांमध्येंच काय तो वाग्भटानें पोटांत घेण्यासंबंधानें पाऱ्याचा उपयोग सांगितला असून त्यांत संस्कृत व भस्मीकृत पारा घ्यावयास सांगितला नाहीं. हा कज्जलीसारखा एक पाऱ्याचा साधा योग असून प्रथम जेव्हां पाऱ्याचा उपयोग करूं लागले तेव्हां अशा अगदीं साध्या तऱ्हेनें तो उपयोगांत आणीत असें दिसतें. वराहमिहिराचे वेळीं रसवैद्यक[1] ( रसार्णवादिग्रंथोक्त ) प्रचारांत असतें तर ह्या साध्या पारदयोगाशिवाय त्यानें वाजीकरणाच्या संबंधानें कामेश्वर मोदक, पुष्पधन्वारस, कुसुमायुध वगैरे मोठाले योग सांगितले असते. वराहमिहिराचे वेळीं रसक्रिया फारशी प्रचारांत आली नव्हती याबद्दल आणखी एक पुरावा आहे तो असा कीं, त्यानें एका अध्यायांत राजे वगैरे लोकांकरितां सुगंध तयार करण्यास सांगितले आहेत; ते हल्लींच्या अत्तरांच्या वगैरेसंबंधानें पाहिलें असतां इतके साधे आहेत कीं, त्यावरून त्या वेळीं अत्तरें तयार करण्याची रीति अजून निघाली नव्हती असें दिसतें. ही रीति रसक्रियेसंबंधीं जीं अनेक यंत्रें, त्यांच्या शोधानंतर लवकरच प्रचारांत आलीं असावीं. आतां वराहमिहीर व अमरसिंह हे सहाव्या शतकांतले आहेत, व म्हणून वरील सर्व विवेचनाचें पर्यवसान हेंच कीं, रसक्रियेचा विशेष प्रचार आपल्या देशांत ६ व्या शतकानंतर सुरू झाला असावा; व ज्या अर्थीं पाश्चिमात्य देशांत ती निदान ख्रिस्ती शकाच्या आरंभास व मिसरदेशांत तर त्याहून पूर्वीं प्रचारांत होती, व ज्या अर्थीं पारद व हिंगूळ हे दोन्ही पदार्थ तिकडूनच ( स्पेन व चीन या देशांतून ) इकडे येत असत, त्या अर्थीं असें मानतां येईल कीं, ह्या शास्त्राची मूळ माहिती पाश्चिमात्य देशांतून आपल्या लोकांनीं मिळवून त्या माहितींत पुष्कळ नवीनानुभवद्वारां अधिक भर घालून रसक्रिया प्रवृत्तींत आणिली, व ही माहिती मिळण्यास चंद्रगुप्तानंतर जें ग्रीक लोकांशीं आपलें दळणवळण सुरू झालें तें कारणीभूत झालें. विशेष प्रचार असें म्हणण्याचें कारण हें कीं, तिचा थोडाबहुत प्रचार सहाव्या शतकाच्या पूर्वींहि वर सुचविल्याप्रमाणें सुरू असला पाहिजे; कारण कोणतीहि महत्त्वाची नवीन गोष्ट एकदम प्रचारांत आणितां येत नाहीं. वर जो वराहमिहीर व वाग्भट यांनीं दिलेला एकच व साधा पारदयोग सांगितला आहे तोहि सहाव्या शतकापूर्वीं जो रसक्रियेचा अल्पारंभ झाला होता त्याचा सूचक आहे. रसक्रियेच्या प्रवृत्तीला बौद्ध व जैन धर्माच्या प्रसाराची एका प्रकारें मदत झाली. ती अशी कीं, ह्या धर्मांचे अभिमानी जे पूर्वकालीं राजे झाले त्यांनीं स्वधर्माचे मूलतत्त्वास अनुसरून मनुष्यांकरितां व जनावरांकरितां ठिकठिकाणीं दवाखाने घालणें सुरू केलें. यापूर्वीं हिंदुस्थानांत असे दवाखाने नसत. त्या राजाश्रयापासून वैद्यशास्त्रास बरेंच उत्तेजन मिळालें, व बौद्ध व जैन लोकांनीं आर्षग्रंथांच्या आधारावर नवीन ग्रंथहि तयार केले. (ह्यांपैकींच वाग्भटकृत दोन्ही संहिता होत). जरी बौद्ध व जैन लोकांना परोपकारार्थ आर्षवैद्यकास उत्तेजन देणें भाग पडलें. तरी त्यांतील शस्त्रक्रिया व हिंसा हीं त्यांच्या (विशेषें-करून जैनांच्या) मतांच्या विरुद्ध असल्यामुळे रसक्रियेसारख्या एखाद्या नवीन वैद्यकीय पंथाकडे त्यांचें विशेष लक्ष लागलें असावें. क्षयामध्यें चरकसुश्रुतप्रमाणें कावळे, साप, बेडूक, गिधाड, मांजरें, घुवडें वगैरे रोग्यास खाण्यास देऊन वर मद्य देण्याच्या पद्धतिपेक्षां त्यांना रसवैद्यकांतील राजमृगांक, लोकनाथ, पंचामृतपर्पटी, वगैरे नाजूक व सात्त्विक उपाय जास्त प्रिय होणें साहजिकच आहे. शिवाय अल्प प्रमाणानें गुण करणें, पुष्कळ दिवस टिकणें व स्वस्तपणा इत्यादि सोयींमुळें रसक्रियेंतील औषधें दवाखान्यासारख्या कारखान्यामध्यें अधिक उपयोगी पडण्यासारखीं दिसल्यामुळेंहि बौद्धादिकांचें रसक्रियेकडे विशेष लक्ष लागलें असावें असें दिसतें. असें मानण्यास आणखी एक कारण असें कीं, रसरत्नसमुच्चयांतील सत्तावीस सिद्धांपैकीं निदान तीन चार तरी बौद्ध धर्मानुयायी आहेत. त्यांत जो नागार्जुन म्हणून रससिद्ध सांगितला आहे तो बौद्ध धर्माच्या माध्यामिक शाखेचा प्रवर्तक जो प्रसिद्ध आचार्य पहिल्या शतकांत होऊन गेला तोच असावा असें वाटतें; कारण या बौद्ध नागार्जुनाचा बौद्धांनीं दिलेला इतिहास पाहतां असें दिसून येतें कीं, त्याची

१. रसवैद्यक व पाऱ्याचा पोटांत उपयोग, ह्या दोन गोष्टी भिन्न आहेत. रसवैद्यक म्हणजे सर्व रोगांवर निरनिराळ्या योगांमध्यें पाऱ्याचा उपयोग करणें. हा सार्वरोगिक उपयोग सुरू होण्यापूर्वी पाऱ्याचा रोगविशेषीं तुरळक उपयोग बरींच वर्षे चालू असला पाहिजे, व तसा तुरळक उपयोग वाग्भटाच्यापूर्वी कांहीं कालापासून चालू झाला असावा.

मंत्रतंत्रांमध्यें फार प्रसिद्धि होती; तो दक्षिणेंतील श्रीशैलपर्वतावर पुष्कळ दिवस जाऊन राहिला होता व तो ६०० वर्षें वांचला. ही हकीकत रसक्रियेसंबंधानें प्रसिद्ध असलेल्या नागार्जुनाशीं जुळते. ह्या बौद्ध नागार्जुनाचा नागबोधि[1] या नांवाचा एक शिष्य होता असेंहि बौद्धांच्या ऐतिहासिक ग्रंथांत लिहिलेलें आहे, व वरील २७ सिद्धांमध्यें नागबोधि या नांवाचाहि एक सांगितला आहे, व नागबोधीचा सूर या नांवाचा एक शिष्य सांगितला आहे, व २७ सिद्धांपैकीं जो सूरसेन तोच हा असावा असें दिसतें. रसरत्नसमुच्चयामध्यें नंदी या नांवाचा जो ग्रंथकार सांगितला आहे तो जैन असावा असें दिसतें. देवनंदी या नांवाच्या एका जैन आचार्याचा वैद्यकावर एक ग्रंथ कर्नाटकांत प्रसिद्ध आहे. तो सुमारें सहाव्या शतकांतला आहे. रसरत्नसमुच्चयांत जे ग्रंथकार सांगितले आहेत त्यांपैकीं वासुदेव, सोमदेव वगैरे बौद्धधर्मानुयायी राजे असावेत असा अजमास आहे; कारण ह्या नांवाचे बौद्ध राजे त्या वेळच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत; व रसेश्वर सिद्धान्तांमध्यें सोमेश्वरादि अनेक राजे रसक्रियेमध्यें प्रवीण होऊन गेले असें सांगितलें आहे[2]. याप्रमाणें बौद्ध व जैन धर्मांच्या प्रवृत्तीपासून जरी वैद्यशास्त्राच्या व विशेषेंकरून रसवैद्यकाच्या उत्कर्षास उत्तेजन मिळालें तरी ते धर्म शस्त्रक्रियेच्या नाशास परंपरेनें कारणीभूत झाले. त्या धर्मांचा जो वैदिक धर्मावर जबरदस्त संस्कार घडला, त्याच्या योगानें सर्व हिंदुलोकांच्या मनावर त्या धर्माचें 'अहिंसा परमो धर्मः' हें तत्त्व पूर्णपणें ठसल्यामुळें भक्षणार्थ व यज्ञार्थ जी पशुहिंसा घडत असे ती बंद पडली. लोकांना रक्ताचा व मांसाचा कंटाळा येऊं लागला, व यामुळें शस्त्रक्रियेचा हळूहळू ऱ्हास होऊं लागला. विद्वान् लोक शस्त्रवैद्यकाचा व शारीरज्ञानाचा तिरस्कार करूं लागले. रक्तमोक्षाची आवश्यकता तर रसवैद्यकानें नाहींशीच करून टाकिली होती, व अगदीं जरूरीच्या ज्या शस्त्रक्रिया त्या अडाणी लोकांच्या हातीं गेल्या व अशारीतीनें सुश्रुताच्या वेळीं कालमानाच्या संबंधानें बऱ्याच परिपक्व दशेस आलेलें शल्यतंत्र हळूहळू लयास जाऊं लागलें. शस्त्रवैद्यकाचा ऱ्हास व रसवैद्यकाची अभिवृद्धि ह्या दोन्ही गोष्टी जवळ जवळ एकाच काळीं सुरू झाल्या असाव्या व हा काळ वाग्भटाच्या नंतरचा होय.

सहाव्या शतकापूर्वीं रसक्रिया हळूहळू प्रचारांत येत चालली होती असें आम्हीं वर सांगितलेंच आहे. तद्विषयक ज्ञान प्रथम फार गुप्त होतें. मांडव्यादि ऋषींना कांहीं कांहीं जटिली योग, भस्मक्रिया, इ० कर्णोपकर्णी माहीत होत्या. त्यापुढें तंत्रग्रंथांतून ती हळूहळू येऊं लागली, व तींत पुष्कळ शोध व सुधारणा झाल्यावर तत्प्रतिपादक स्वतंत्र ग्रंथ झाले. ह्या ग्रंथांपैकीं रसार्णव, रससिंधु, रसहृदय वगैरे कांहींसे जुने असून रसरत्नसमुच्चय, रसेंद्रचिंतामणि, रसपद्धति, रसरत्नाकर, रसमंजरी वगैरे त्यानंतरचे आहेत. ह्या सर्व ग्रंथांत रसरत्नसमुच्चय हा फार व्यापक व व्यवस्थित असून तो वाग्भटानेंच केला आहे असें पुष्कळांचें मत आहे. कित्येकांचे मतें (व आमचें तसेंच आहे) तो वाग्भटाचा नाहीं. याजविषयीं पुढें आम्हांला आणखी बराच विस्तार करावयाचा आहे. तूर्त इतकेंच सांगणें पुरें आहे कीं, जरी तो वाग्भटकृत नव्हे तथापि रसक्रियेच्या उपलब्ध ग्रंथांपैकीं तो एक उत्तम ग्रंथ आहे.

येथवर आर्षवैद्यकांत रसक्रियेचें बीज नसून तिची प्रवृत्ति हिंदुस्थानांत एकाएकीं कशी व कोणत्या काळीं झाली याविषयीं जी कल्पना आम्हांस सुचली ती थोडक्यांत वाचकांपुढें ठेविली आहे. हें अनुमान ह्यासंबंधाचा शेवटचा सिद्धान्त असें आम्ही समजत नाहीं; तथापि याहून बलवत्तर प्रमाणांची व ऐतिहासिक आधारावर रचिलेली अशी उपपत्ति निघेपर्यंत ही कल्पनाहि विचार करण्याजोगी आहे, व या दिशेनें विचार करणारासहि तशीं बलवत्तर प्रमाणें व ऐतिहासिक आधार मिळण्याचा संभव आहे असें आम्हांस वाटतें.

वरील विवेचनावरून असें मात्र कोणीं समजूं नये कीं, पारदादिकांचा पोटांत घेण्याचा जो प्रघात तो, त्याकरितां तयार करण्याचे निरनिराळे प्रकार; ज्वरादि निरनिराळ्या रोगांवर ज्वरांकुशादि रस हे सर्व प्रकार आम्हीं ग्रीस किंवा मिसरदेशांतून घेतले. उलटें असें आहे कीं, जरी मिसरदेश, ग्रीस व रोम येथील किमयागार पाऱ्यापासून आयुष्य-वर्धक असें एक अमृत (अक्सीर[3]) तयार करण्याचा प्रयत्न करीत असत, तरी रोगांमध्यें त्याचा प्रथम उपयोग

1. See Dr. Max Muller's India: What Can It Teach Us, P. 305.

२ विद्यारण्यकृत सर्वदर्शनसंग्रहांत रसेश्वरदर्शन पाहा.

३ हा शब्द जो हल्लीं आपल्या देशांत किमयागारामध्यें प्रसिद्ध आहे, तो आरबी भाषेंतील एलिक्सिर शब्दाचा अपभ्रंश आहे.

आपल्या इकडच्या लोकांनीं सुरू केला व तो पुढें इतका वाढविला कीं, तो प्रत्येक रोगावर चालतो असा त्यांनीं सिद्धान्त करून रसवैद्यक म्हणून एक पंथच स्थापित केला. इतर धातु तर चरकादिकांच्या वेळेपासून दोन चार निरनिराळ्या रोगांवर सूक्ष्म चूर्णांच्या रूपानें देण्याचा थोडाबहुत प्रचार होता. इतकेंच कीं, रसक्रियेच्या सुरुवातीनंतर धातु शुद्ध करण्याच्या व त्यांचीं भस्में करण्याच्या अनेक निरनिराळ्या रीति निघाल्या व चिकित्सेमध्यें त्यांची व्याप्तिहि वाढली. तेव्हां वर जें आम्हीं रसक्रियेचें बीज पाश्चिमात्य देशांतील किमयेमध्यें असण्याचा संभव आहे, असें म्हटलें आहे, तें रसवैद्यकासंबंधानें नव्हे, रसक्रिया व रसवैद्यक यांमध्यें अंतर आहे. रसक्रियेमध्यें धातुवादाचाहि अंतर्भाव होतो. रसवैद्यकाची उत्पत्ति धातुवादामध्यें व धातुवादाची जी आपल्यास प्रथम माहिती मिळाली ती ( मग ती कितीहि अल्प असो ) ग्रीक वगैरे लोकांपासून.

वर सुचविलेले विचार ह्या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या वेळचे होत, त्यानंतर गेल्या पांच सहा वर्षांत रसक्रियेवरील कांहीं जुने ग्रंथ उपलब्ध झाल्यामुळें ह्या शास्त्राच्या इतिहासांत बरीच भर पडली आहे. रसार्णव नांवाचा ग्रंथ नुकताच छापून प्रसिद्ध झाला आहे. हा ग्रंथ ख्रिस्ती शकाच्यापूर्वी निदान दोनशें वर्षांच्या पूर्वीचा असावा. रसरत्नसमुच्चयांतील उल्लेखावरूनहि हा बराच प्राचीन असावा असें दिसून येतें. नागार्जुनाचा रसरत्नाकर ग्रंथहि हल्लीं उपलब्ध झाला आहे. नागार्जुन हा बौद्ध असून त्याचा काल ख्रिस्ती शकाच्या आरंभाचा असावा, त्यानेंहि रसार्णवाचा उल्लेख केला आहे. वर जो वाग्भटाच्या रसायन अध्यायांतील एका पारदाच्या योगाचा उल्लेख केला आहे तो योग उत्तरस्थानाच्या ३९ व्या अध्ययांतील १६२ व्या श्लोकांत आहे. हा योग रसार्णवांत आढळतो व त्यांतूनच तो वाग्भटानें घेतला असावा असें दिसतें. ख्रिस्ती शकाच्यापूर्वी ४ थ्या शतकांत झालेल्या चाणक्याच्या अर्थशास्त्रांतहि रसक्रियेचा उल्लेख आढळतो. भारतांतील सनत्सुजातीयांमध्येंहि पारदापासून केलेल्या चिंतामणीचा उल्लेख आहे (३।१७). रामायणांत वाऱ्यापासूनच सर्व धातु उत्पन्न होतात वगैरे रसशास्त्रांतील विचार उपलब्ध आहेत. यावरून रसविद्या फार प्राचीन काळापासून इकडे प्रचालित होती असें दिसून येतें. रसरत्नसमुच्चयाचे आरंभींच जीं अनेक रससिद्धांचीं नांवें आलीं आहेत त्यांपैकीं मांडव्य हा रामायण काळचा असावा व व्याडि हा इ. स. च्या पूर्वी ८ व्या किंवा १० व्या शतकांतील असावा असें दिसून येतें.

रसक्रिया कोणत्याहि तऱ्हेनें प्रवृत्तींत आली असो, तिचा औषधामध्यें उपयोग आपल्या लोकांनीं इतर लोकांपेक्षां अधिक केला, व त्याजविषयीं इतके शोध केले कीं, पुढें आरब वगैरे लोकांनाहि पारदादिकांच्या औषधीय उपयोगाच्या संबंधानें आपल्या इकडून माहिती मिळवावी लागली. एखाद्या नवीन पदार्थाचा शोध लागून पहिल्या तडाक्यास त्याजपासून कांहीं अद्भुत गुण दृष्टोत्पत्तीस आले म्हणजे लोकांची त्याजवर इतकी भक्ति वसते कीं, इतर तज्जातीय सर्व पदार्थ त्यांना तुच्छ वाटूं लागून त्यांचा जो नूतन भक्तिविषय तन्मय सर्व जग भासूं लागतें. ही गोष्ट पाऱ्यामध्यें अगदीं पूर्णपणें अनुभवास आली आहे. पाऱ्याच्या कांहीं तीव्र गुणांनीं चकित होऊन प्राचीन लोकांनीं त्याचें माहात्म्य इतकें वाढविलें कीं, वनस्पतिवर्गांतील सर्व औषधें व इतर खनिज औषधें एकीकडे व एकटा पारा एकीकडे; पाऱ्यानें बरा होत नाहीं असा रोगच नाहीं, त्यानें अजरामरत्व प्राप्त होतें; तो ईश्वराचें वीर्य व सर्व जगाचें आदिकारण; केवळ ईश्वरस्वरूप; सर्व सिद्धींचें निदान व मोक्षाचें परमसाधन; असे त्यांनीं सिद्धान्त ठरवून टाकिले. त्याचे खालोखाल इतर धातूंचें व विषांचेंहि महत्त्व त्यांनीं वाढविलें. आर्षवैद्यकांतील औषधें त्यांना निर्वीर्य वाटूं लागलीं; म्हणून त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, देहस्थैर्याविषयीं वनस्पतींचा किंवा पाऱ्यावांचून इतर कांहींचा कांहीं उपयोग नाहीं; सर्व काष्ठौषधींमध्यें जे गुण आहेत, ते धातूंपैकीं अगदीं कनिष्ट जें शिसें त्यांत आहेत; व त्याहून कथील तांबें, रुपें, सुवर्ण व पारा हे अनुक्रमें अधिकाधिक बलवत्तर आहेत (र० स०अ० १, श्लोक ४०-४१ ). पारदपूजेचें माहात्म्य व पारदनिंदेचें परमपातकत्व हीं रसवैद्यकांत वर्णिलीं आहेत. अशा या विलक्षण भक्तीमुळें व वर सांगितलेल्या सोईमुळें रसवैद्यकाचें घोडें पुढें सरून आर्षवैद्यक मागें हटत चाललें. पुष्कळ दिवस दोघांची टक्कर चालू राहून अखेरीस दोहोंचें संमीलन (ह्या संघट्टनाचा जो स्वाभाविक परिणाम) झालें. रसवैद्यक हल्लींच्या होमिओप्याथीप्रमाणें कांहीं दिवस एक निराळा पंथ होता असें त्याच्या प्रवर्तकांनीं केलेल्या वैद्यक्रियेच्या विभागांवरून ( मानुषी, आसुरी व दैवी ) रसवैद्य, रसाचार्य, रसतंत्र, रसशाला इत्यादि शब्दांवरून व त्या शास्त्रांतील

सिद्धान्तांवरून स्पष्ट दिसतें. रसवैद्यकांत हल्लींच्या होमिओप्याथिक पंथाचीं बीजें दृष्टीस पडतात. त्यांतील सर्व औषधें प्रायः व्याधीशीं समान गुणाचीं आहेत, व्याधिविपरीत नाहींत. सूतशेखर पित्तावर, भ्रमावर व मूर्च्छेवर उत्तम औषध मानिलें आहे (व तसें तें योग्य रीतीनें दिल्यास आहेहि); परंतु त्यांतील मुख्य औषधांचे गुण पाहिल्यास असें दिसून येईल कीं, त्यापासून वरील विकार उत्पन्न होतात. धोत्र्याच्या बिया, ताम्र, पारा, गंधक व बचनाग हे पदार्थ पित्त, भ्रम व मूर्च्छा करणार नाहींत असें कोण म्हणेल? परंतु तेच अल्प[1] प्रमाणानें दिल्यास (सूतशेखरादि रूपानें) होमिओप्याथीच्या सिद्धांताप्रमाणें सदरहू विकार हटकून बरे होतात. होमिओप्याथीच्या प्रवर्तकानें असा शोध लाविला आहे कीं, ज्या औषधापासून जे विकार उत्पन्न होतात त्यानेंच अल्प प्रमाणानें दिल्यास ते हटकून बरे होतात. रसक्रियेंतील बहुतेक औषधें जरी याच नियमाच्या अनुरोधानें होतीं तरी त्यांतील तत्त्व शोधून काढण्याचें श्रेय हान्मन् नांवाच्या एका जर्मन पंडितानें घेतलें. रसवैद्यकाच्या प्रवर्तकांना ह्या तत्त्वाची कांहींशी कल्पना होती असें दिसतें; कारण पारदादिकांचे गुणदोष सांगतांच त्यांनीं असें म्हटलें आहे कीं, शुद्ध व संस्कृत पारदादिकांपासून जे रोग बरे होतात तेच अशुद्ध व असंस्कृतापासून उत्पन्न होतात. चरकांमध्येंहि ह्या तत्त्वाचा उल्लेख आढळतो; परंतु त्याची व्यापकता सिद्ध करून त्याजवर होमिओप्याथीची जी मोठी इमारत बांधिली गेली, ती वरील जर्मनाच्याच शोधाचें व मेहनतीचें फळ आहे. असो; सारांश इतकाच कीं, रसवैद्यकाशीं लवकरच संमीलन झाल्यामुळें दोहोंपासून एक मिश्र वैद्यक उत्पन्न झालें. हल्लीं जी वैद्यक्रिया आपल्या देशांत चालू आहे व जिचें प्रतिपादन भावप्रकाशादि अर्वाचीन ग्रंथांत केलें आहे, ती कांहीं शुद्ध आर्षवैद्यकांतील नसून ह्या मिश्रवैद्यकांतील होय. वाग्भटानंतर जे वैद्यकावर ग्रंथ झाले आहेत ते प्रायः ह्या मिश्रवैद्यकाचे होत. वृंदमाधव, वैद्यरहस्य, चिकित्सासार, भैषज्यरत्नावलि, शार्ङ्गधर, भावप्रकाश, तोडरानंद वगैरे ह्या जातीच्या ग्रंथांचीं उदाहरणें होत. ह्या मिश्रवैद्यकाच्याच कालामध्यें धन्वंतरि वगैरेंनीं केलेलें निघंट, माधवनिदान, वातव्याधिचिकित्सा वगैरे वैद्यकाच्या निरनिराळ्या भागांवरील ग्रंथांचा समावेश होतो. यांपैकीं खरोखर उपयुक्त म्हटले म्हणजे वैद्यकावरील निघंट होत. निघंट म्हणजे औषधीय व भक्षणीय द्रव्यांचा कोश. ह्या निघंटांपैकीं हल्लीं उपलब्ध असे बारा आहेत; ते असेः— १ धन्वंतरिकृत गुडूच्यादिनिघंट, २ मदनपालकृत मदनविनोद, ३ नरहरपंडितकृत चूडामणि, ४ बोपदेवकृत हृदयदीप, ५ चंद्रचंदनकृत गणनिघंट, ६ केशवभट्टकृत सिद्धमंत्र, ७ कैयदेवकृत रत्नाकर, ८ भावप्रकाशांतील निघंट, ९ वैद्यभूषणोक्ति निघंट, १० पथ्यापथ्य निघंट, ११ मुद्गलपंडितकृत द्रव्यरत्नाकर व १२ चक्रदत्तकृत द्रव्यगुण; ह्यांपैकीं धन्वंतरिकृत निघंट सर्वांत जुना असून तो सहाव्या शतकांतला आहे. तो विक्रमादित्याच्या पदरीं जीं नवरत्नें (धन्वंतरि, क्षपणक, अमरसिंह, वराहमिहीर, कालिदास इत्यादि नऊ विद्वान् पुरुष) होतीं त्यांपैकीं जो धन्वंतरि पंडित त्यानें केला आहे. ह्या निघंटाची पद्धति अशी आहे कीं, पहिल्यानें द्रव्याचे सर्व पर्याय शब्द सांगून नंतर त्याचा गुणपाठ सांगावयाचा. निघंटांखेरीज जे वर सांगितलेले व त्या जातीचे दुसरे ग्रंथ आहेत, ते फारसे महत्त्वाचे नाहींत. वाग्भट व रसरत्नसमुच्चय हे दोन ग्रंथ पाहिले म्हणजे त्यांत सर्व आर्यवैद्यकाचा (आर्ष-

---

१. मात्रया भक्षितं देवि विषमप्यमृतायते । मात्राधिकं वरारोहे ह्यमृतं वा विषं भवेत् ॥

—रस० स० अ० २९.

२. तथान्तः सन्धिमार्गाणां दोषाणां गूढचारिणाम् । भवेत्कदाचित्कार्यापि विरुद्धाभिमता क्रिया ॥
अन्तर्गतं पित्तधातुं स्वेदसेकोपनाहनैः । नयन्तो बहिरुष्णैर्हि तथोष्णं शमयन्ति तत् ॥
बाह्यैश्च शीतैः सेकाद्यैरुष्मान्तर्याति पीडितः । सोऽन्तर्गूढं कफं हन्ति शीतैः शीतं तथा जयेत् ॥
श्लक्ष्णाविष्टघनो लेपश्चन्दनस्यापि दाहकृत् । त्वग्गतस्योष्मणोरोधात् शीतकृच्चान्यथागुरुः ॥
छर्दिघ्नी मक्षिकाविष्टा मक्षिकैव तु वामयेत् ।

—च० चि० अ० ३०

याचा अर्थः— "तसेंच आंतील भागांमध्यें व सांध्यांमध्यें फार खोल संचार करणाऱ्या दोषांवर (नेहमींच्या पद्धतीस) विरुद्ध क्रियाहि केव्हां केव्हां पसंत करितात. आंत एखादा पित्तविकार झाला असल्यास शेकणें, सिंचन करणें व पोटिस बांधणें अशा उष्ण उपायांनीं तें पित्त बाहेर निघून विकार बरा होतो म्हणजे काय कीं, उष्णानें उष्ण बरें होतें. तसेंच एखाद्या खोल ठिकाणीं झालेला कफविकार बाहेरून थंड घड्या वगैरे टेविल्यानें बरा होतो. ह्या क्रियेंत उष्मा थंडीच्या दाबानें आंत शिरून तो कफास मारितो; याप्रमाणें शीतानें शीत नाहींसें होतें. चंदन बारीक उगाळून त्याचा दाट लेप केल्यास त्यानेंहि त्वचेंतील उष्मा कोंडला जाऊन दाह होतो. तसाच अगर उगाळून लाविल्यानें तो उष्ण असूनहि शैत्य करितो. माशीची विष्टा उलटी बंद करिते व माशी तर वातकच आहे."

वैद्यक व रसवैद्यक ) अंतर्भाव होतो. इतर ग्रंथांत अधिक मुळींच नाहीं असें नाहीं, परंतु कांहीं कांहीं नवीन अनुभविलेल्या योगांखेरीज व दोनचार रोगांच्या नवीन शोधांखेरीज त्यांतून जी अधिक माहिती म्हणून दिली आहे, ती वैद्यकशास्त्राच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची नाहीं. उदाहरणार्थ, 'वीरसिंहावलोक' म्हणून एक ग्रंथ सुमारें ५०० वर्षांमागें वीरसिंह नामक एका तोमरवंशांतील ग्वाल्हेरच्या राजानें केला आहे, त्यांत नेहमींची निदानसह चिकित्सा सांगून ज्योतिषशास्त्रप्रमाणें ग्रहांची अमुक स्थिति असली म्हणजे अमुक रोग होतात व कर्मविपाकाप्रमाणें पूर्वजन्मीं अमुक अमुक कर्में केलीं असतां अमुक रोग होतो व त्यावर त्या त्या शास्त्रांतील प्रतिकार इ० प्रकार सांगितले आहेत. हा राजा इ. स. १३७५ च्या सुमारास गादीवर बसला. प्राचीन ग्रंथांत नसलेली अशी जी दोनचार रोगांसंबंधानें विशेष माहिती अलिकडच्या ग्रंथांत मिळते, ती आमवायु, अम्ल-पित्त, परिणामशूल व सन्निपात ज्वराचे पोटभेद यांविषयीं होय. ह्याजविषयीं आर्षवैद्यकांत माहिती होती असें दिसत नाहीं. कांहीं ग्रंथांत मूत्रपरीक्षेचें एक लहानसें प्रकरण सांगितलें आहे. ती परीक्षा शास्त्रीय नसून कांहीं अंशीं शकुनाच्या जातीची म्हणजे मूत्रावर तैलबिंदु टाकून तो अमुक दिशेनें पसरल्यास अमुक फळ वगैरे सांगितलें आहे. कांहींत नाडीपरीक्षेसंबंधानें कांहीं माहिती दिली आहे. ही जी हल्लीं नांवाजलेली नाडीपरीक्षा ती आर्षग्रंथांत मुळींच नाहीं. अलिकडील कांहीं ग्रंथांत त्यासंबंधानें जें थोडेंबहुत सांगितलें आहे त्याला हारीतसंहितेचा कांहीं ठिकाणीं आधार दाखविलेला आहे, परंतु ज्याअर्थी चरकसुश्रुत किंवा वाग्भट यांच्या ग्रंथांत तिचा मुळींच उल्लेख नाहीं, त्याअर्थी तें प्रकरण हारीतसंहितेंतील नसून अलिकडेच मुसलमान लोकांकडून घेतलेलें असावें. जर तें हारीतसंहितेंत असतें तर वाग्भटानें तें अवश्य दिलें असतें; कारण षड्भिषक्संहितांपैकीं ज्या ज्या संहितेमध्यें जें जें विशेष आहे त्या सर्वांचा त्यानें संग्रह केला आहे. अलीकडच्या ग्रंथांत ज्या कांहीं नवीन गोष्टी आढळतात त्यांना प्राचीन ऋषींचा मिथ्या आधार देण्याची कांहीं ग्रंथकारांची प्रवृत्ति आहे. सुमारें दोनशें वर्षांमागें चौलच्या रघुनाथ पंडितांनीं वैद्यविलास नांवाचा एक ग्रंथ केलेला आहे. त्यांत नाडीची परीक्षा चरकानें अमुक अमुक प्रकारें करविण्याविषयीं सांगितलें आहे असें म्हटलें आहे. परंतु चरकांत नाडीपरीक्षेचा उल्लेख नसल्याचें ज्यांनीं तो ग्रंथ पाहिला आहे त्यांस विदित आहेच. ज्यांनीं हारीताचा हवाला दिला आहे तोहि याच प्रकारचा असावा. ग्रीक लोकांमध्यें नाडीपरीक्षा खिस्ती शकाच्या आरंभापासून माहीत आहे. त्यांच्यांत गेलन या नांवाचा एक मोठा वैद्य होऊन गेला; त्यानें तिचें प्रथम वर्णन केलें आहे, असा इतिहास आढळतो. तो पहिल्या शतकांतला आहे. मुसलमान लोकांनीं ग्रीक लोकांपासूनच नाडीपरीक्षेची माहिती मिळविलेली आहे. चीन देशांतहि प्राचीन कालापासून नाडीपरीक्षेचें महत्त्व फार आहे. तेथें हल्लीं देखील वैद्य लोक एकेक तासपर्यंत नाडीपरीक्षा करीत बसतात व नाडीपरीक्षेवर त्यांच्या भाषेंत मोठमोठाले ग्रंथ आहेत. आपल्या लोकांनीं ग्रीक किंवा चीन लोकांपासूनच नाडीपरीक्षेची माहिती मिळविली असेल असें मानण्यास मात्र पुरावा नाहीं. आमचा असाहि एक तर्क आहे कीं, ( जर ती मुसलमान लोकांपासून घेतली नसेल तर ) हटयोगाच्या प्रवर्तकांनीं प्रथम नाडीविषयीं स्वतंत्रपणें शोध लाविला असावा, व नंतर वैद्य लोकांचें लक्ष तिकडे गेलें असावें. ह्या प्रसंगानें चिनी लोकांचा आपल्याशीं कितपत संबंध होता याविषयीं चार शब्द लिहिणें जरूर आहे. कारण नाडीपरीक्षेच्यासंबंधानें त्यांजपासून आम्हांस कांहीं उपयोग झाला असेल असें जरी आमचें मत नाहीं, तथापि चिनी लोकांच्या ऐतिहासिक आधाराचा आम्हीं पुढें एकदोन ठिकाणीं उपयोग केला असल्यामुळें त्यांच्याविषयींची कांहींतरी माहिती असणें जरूर आहे. जसें राजकीयसंबंधानें आपलें ग्रीक लोकांशीं दळणवळण सुरू झालें होतें तसें चिनी लोकांशीं बौद्धधर्माच्यासंबंधानें प्राचीन काळीं विशेष दळणवळण सुरू झालें होतें. खिस्ती शकाच्या आरंभीं चीन लोकांनीं बौद्धधर्मींचीं शेंकडों संस्कृत व पालिभाषेंतील पुस्तकें आपल्या देशांत नेलीं व त्यांचीं आपल्या देशभाषेंत भाषांतरें केलीं. सुमारें चवथ्या शतकापासून चीन देशांतील कांहीं यति यात्रे-करितां हिंदुस्थानांत येऊं लागले. त्यांपैकीं फाह्यान ( Fa Hian ), संगयून ( Sung Yun ) व ह्युनसांग ( Hiuen Tsang ) ह्या तिघांनीं व विशेषतः शेवटच्यानें आपल्या हिंदुस्थानांतील प्रवासाची सर्व हकीकत फार बारकाईनें लिहून ठेविली आहे व त्यांचीं हल्लीं इंग्रजींतहि भाषांतरें छापलीं आहेत. ह्या यात्रेकऱ्यांना शाक्यपुत्र अशी संज्ञा असे; व त्यांनीं बुद्धगया, व इतर प्रसिद्ध व पवित्र स्थळें पाहून ह्या देशांतील त्या वेळची सर्व हकीकत राजकीय संबंधानें, विद्येच्यासंबंधानें, धर्म, रीत, रिवाज, वैद्यक, ज्योतिष वगैरेंच्यासंबंधानें स्पष्टपणें लिहून ठेविली आहे.

ह्यांच्या ह्या प्रवासवर्णनाचा हिंदुस्थानच्या त्या वेळच्या स्थितीची माहिती मिळण्यास बराच उपयोग होतो. आपल्या देशांत इतिहास लिहून ठेवण्याची फारशी चाल नसल्यापुळें अशा परकीय साधनांचा उपयोग करणें भाग पडतें. चिनी लोकांनीं केवळ धर्मसंबंधींच ग्रंथांचीं भाषांतरें केलीं असें नाहीं तर अमरकोश वगैरे इतर ग्रंथांचींहि भाषांतरें सहाव्या शतकाच्या सुमारास चिनी भाषेंत झालीं आहेत. ते लोक येथें येऊन संस्कृत शिकत, व इकडील उपयुक्त माहिती ( विशेषेंकरून धर्मसंबंधीं ) तिकडे नेत. ह्या चिनी प्रवाशांपैकीं ह्यूनसांगनें दिलेली हकीकत फार मोठी आहे व ती सातव्या शतकांतील आहे. त्यावरून पाहतांना त्यावेळीं नाडीपरीक्षा किंवा रसक्रियेंतील औषधें यांचा प्रचार होता असें दिसत नाहीं. ( जरी रसक्रियेची सुरुवात ह्या वेळेच्या पूर्वींच होऊन गेली होती असें वर सुचविलेल्या इतर आधारांवरून कळतें, तरी ती इतकी फैलावली नव्हती ).

याप्रमाणें आर्यवैद्यकाचा अति पुरातन कालापासून सतराव्या शतकापर्यंतचा इतिहास, कालाच्यासंबंधानें त्याचे दोन मुख्य भाग, त्या त्या भागांतील ग्रंथसमूह, मुख्य मुख्य ग्रंथांचा कालविचार, वैद्यकसंबंधीं ज्ञानाची उत्तरोत्तर अभिवृद्धि, शस्त्रवैद्यकाचा ऱ्हास, रसवैद्यकाचा प्रादुर्भाव, मिश्रवैद्यकाची उत्पत्ति इत्यादींविषयीं दिग्दर्शन केलें आहे. हा इतिहास पुरा करण्यापूर्वीं आणखी दोन गोष्टी येथें सांगणें जरूर आहे. त्यांपैकीं पहिली अशी कीं, आर्यवैद्यकाचे जे आम्हीं दोन भाग निर्दिष्ट केले आहेत (म्हणजे रसक्रियेच्या पूर्वींचें वैद्यक व तिच्या नंतरचें वैद्यक ), ते प्रोफेसर मॅक्समुल्लरसाहेबांनीं एकंदर संस्कृत ग्रंथसमूहाचे जे दोन भाग केले आहेत त्यांच्याशीं अगदीं बारकाईनें जुळतात. प्रोफेसर मजकूर यांनीं हिंदुस्थानविषयक व्याख्यानामध्यें ( 'India What Can It Teach Us' हें पुस्तक पाहा ) ऋग्वेदापासून तों दयानंदजीच्या भाष्यापर्यंत सर्व संस्कृत विद्येचे दोन भाग केले आहेत. पहिला भाग 'शक' लोकांच्या ( Scythians, Indoscythians or Turushkas ) स्वारीपूर्वीचा व दुसरा भाग त्यानंतरचा. ही शकलोकांची स्वारी खिस्ती शकापूर्वीं २५ वर्षांचे सुमारास झाली व त्या वेळेपासून खिस्ती शकानंतर तीनशें वर्षेपर्यंत बहुतेक उत्तर हिंदुस्थान शक लोकांनीं पादाक्रांत करून सोडिलें होतें. हिंदुस्थानाच्या वायव्येकडील कोंपऱ्यांतून वरचेवर शकांच्या टोळ्या ह्या देशांत शिरत. ह्या वेळ चा इतिहास चिनी लोकांपासून मिळतो; व आपल्या गर्गसंहिता वगैरे ग्रंथांतूनहि ह्या सुमारास या देशांत शकांचा अंमल फार जोरानें चालू असल्याबद्दल आधार मिळतो. त्या वेळचीं नाणीं व शिलालेख यांवरूनहि ही शकराजाची कारकीर्द सिद्ध होते. ह्या चारशें वर्षांमध्यें एकीकडून परराज्याच्या व एकीकडून बौद्धांच्या त्रासामुळें ग्रंथरचनेच्या नांवानें एक मोठें शून्य आढळून येतें. ह्या राज्यक्रांतीच्या कालांत आर्यविद्येचा ओघ मध्यें खुंटल्यासारखा दिसतो. आर्यविद्येच्यासंबंधानें जितके म्हणून ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांपैकीं कांहीं ह्या कालाच्या पूर्वींचे व कांहीं त्यानंतरचे आहेत असा हल्लींच्या शोधकांनीं निर्णय केला आहे[1]. आम्हीं दिलेले वैद्यकीय ग्रंथांचे कालविभाग ह्या दोन कालांशीं अगदीं तंतोतंत जुळतात. चरक, सुश्रुत वगैरे आर्यवैद्यकाचे ग्रंथ ह्या धामधुमीच्या पूर्वींचे व वाग्भटाचे दोन ग्रंथ व रसक्रियेवरील बहुतेक ग्रंथ आणि मिश्रवैद्यकावरील ग्रंथ तिच्या नंतरचे आहेत असें वरील हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. ह्या जुळणीमुळें वैद्यकीय ग्रंथांतील आधारावरून आम्हीं दिलेली व्यवस्था आणि प्रोफेसर मॅक्समुल्लर-साहेबांनीं इतर साधनांनीं दिलेली व्यवस्था ह्या परस्परांस आधारभूत होतात. दुसरें असें कीं, त्या राज्यक्रांतींतून आपला देश मुक्त झाल्यावर जें आर्यविद्येचें पुनरुज्जीवन सुरू झालें व ज्याला मॅक्समुल्लर-साहेबांनीं रेनीसन्स ( Renaissance period ) असें नांव दिलें आहे, त्या पुनरुज्जीवनावर ग्रीक लोकांच्या ज्ञानाचा बराच संस्कार झाला आहे, आणि बौद्ध व जैन पंडितांचें त्यांत बरेंच अंग असून विक्रमादित्यासारख्या राजेलोकांकडूनहि बराच आश्रय मिळाला. हा ग्रीकसंस्कार आपल्या ज्योतिषशास्त्रामध्यें तर स्पष्टपणें नजरेस येतच आहे. बौद्ध पंडितांनीं त्यावेळीं प्रत्येक शास्त्रावर महत्वाचे ग्रंथ लिहिले. उदाहरणार्थ, व्याकरणावर जी काशिकावृत्ति आहे ती जयादित्य व वामन या दोघां बौद्धांची ( ७ वें शतक ); शब्दशास्त्रासंबंधानें अमरसिंहाचा कोश तर प्रसिद्धच आहे ( ६ वें शतक ); ज्योतिषावर 'सिद्धसेन सूरि' व सत्याचार्य यांचे ग्रंथ

---

1 See Max-Muller's India, page 85.

२ विक्रमादित्याचा खरा काल खिस्ती शकापूर्वीं ५६ वर्षें नसून, त्या मानलेल्या कालानंतर ६०० वर्षांनीं म्हणजे ५४४ या वर्षीं त्याच्या शकास आरंभ झाला असें आधुनिक विद्वानांचें मत आहे

( ६ वें शतक ); व वैद्यकामध्यें प्रसिद्ध वाग्भटाचे दोन ग्रंथ ( ४ थें शतक ) व देवनंदीनामक जैनपंडितानें केलेला ग्रंथ ( ५ वें शतक ). आतां पूर्वीं निर्दिष्ट केलेल्या क्रमाप्रमाणें वाग्भटाचा कांहीं इतिहास व प्रस्तुत ग्रंथाची बांधणी इ० संबंधानें चार शब्द सांगितले पाहिजेत.

## वाग्भटाचा इतिहास

प्रस्तुत ग्रंथाचा कर्ता वाग्भट हा सिंधु देशाचा[1] ( म्हणजे पंजाबाच्या वायव्येकडील प्रांतांतील ) राहणारा असून त्याच्या बापाचें नांव सिंहगुप्त, त्याचा आजा त्याच नांवाचा असून तो प्रसिद्ध वैद्य होता असें अष्टांगसंग्रहांत सांगितलें आहे. ह्याच्या कालाचा जरी बरोबर पत्ता लागत नाहीं तथापि तो खिस्ती शकाच्या ३ ऱ्या शतकाच्या पूर्वीचा किंवा ६ व्या शतकानंतरचा नसावाच असें खात्रीनें सांगतां येतें. त्यानें वर सांगितलेल्या ग्रंथांत चाणक्याचा उल्लेख केला आहे[2]; त्यावरून तो चाणक्याच्या नंतरचा असावा हें तर उघडच आहे. तसेंच त्याच ग्रंथांतील उत्तरस्थानाच्या ४९ व्या अध्यायांत कांद्याचें गुणवर्णन करितेवेळीं ग्रंथकर्त्यानें सांगितलें आहे कीं, शकराजाचें कांद्यावर इतकें प्रेम आहे कीं, त्याचें साक्षात् जीवित कांद्यावरच अवलंबून आहे[3]. वाग्भटाचा कालनिर्णय करण्यास ह्या वाक्याचा आपल्यास फार उपयोग होतो. आम्हीं वर सांगितलेंच आहे कीं, शकलोकांच्या स्वाऱ्या खिस्ती शकाचे पूर्वी २५ वर्षांच्या सुमारास सुरू झाल्या. पुढें इ. स. ७८ च्या सुमारास कनिष्क या नांवाच्या शकराजानें बहुतेक उत्तर हिंदुस्थानभर आपला पूर्णपणें अम्मल बसविला. त्यानंतर तीन चार शकराजे त्याच्याचप्रमाणें प्रबल निघाले. आतां येथें अशी एक शंका निघण्याचा संभव आहे कीं, शकलोकांचें वर्णन महाभारतासारख्या जुन्या ग्रंथांतून देखील येतें; तेव्हां वाग्भटानें जो शकराजाचा उल्लेख केला आहे तो ही राजक्रांति करणाऱ्या शकांच्यासंबंधानेंच कशावरून ? या शंकेचा परिहार असा कीं, वाग्भटानें सांगितलेल्या शकलोकांचें वर्णन[4] ह्या काळीं स्वारी करणाऱ्या शकलोकांच्या चिनी लोकांनीं दिलेल्या वर्णनाशीं जुळतें. ह्या दोन्ही वर्णनांवरून ह्या शकलोकांचा वर्ण गौर होता असें दिसतें व महाभारतोक्त शकलोकांचा वर्ण काळा होता असें 'काकवर्णाः' इत्यादि विशेषणांवरून स्पष्ट होतें. ( महाभारतांतील द्रोणपर्व पाहा ). वाग्भटानें वर सांगितलेल्या ठिकाणीं शकाधिपतीचा ज्या तऱ्हेनें उल्लेख केला आहे, त्या तऱ्हेवरून असें दिसतें कीं, तो ह्या कारकीर्दींतीलच असावा किंवा त्याचे वेळीं ही शकराजांची कारकीर्द नुकतीच संपली असावी; ज्याअर्थीं ही कारकीर्द सर्व आधुनिक पंडितांनीं अगदीं निर्ग्रंथ मानिली आहे, त्याअर्थीं हें दुसरेंच अनुमान खरें दिसतें, म्हणजे वाग्भट शकराजांच्या समाप्तीनंतर लवकरच ( ४ थ्या शतकांत ) झाला असावा. तो ह्याहून पूर्वींचा नसावा असें म्हणण्यास आणखी प्रमाण असें आहे कीं, त्याच्या ग्रंथांत ज्या 'अवलोकितेश्वर,' 'तारा' इत्यादि बौद्ध देवतांचा उल्लेख आढळतो, त्यांचें माहात्म्य ह्याच सुमारास सुरू झालेलें होतें. बौद्ध धर्माच्या पूर्वावस्थेंत त्या मुळींच प्रचारांत आल्या नव्हत्या. अशोकाच्या कारकीर्दींत झालेलीं धर्मपुस्तकें, ललितविस्तार व नेपाळ व तिबेट येथील प्राचीन बौद्धधर्माचीं पुस्तकें यांत त्यांचा उल्लेख आढळत नाहीं. ह्या देवतांचें माहात्म्य खिस्ती शकाच्या तिसऱ्या शतकानंतर सुरू झालें असें बौद्धधर्माच्या इतिहासावरून दिसतें. यावरून वाग्भट तिसऱ्या शतकानंतरचा असावा हें तर उघडच आहे. त्याच्या ग्रंथांतील भाषा, तऱ्हेतऱ्हेचीं लहानमोठीं वृत्तें व अलंकार, मंगलाचरणपूर्वक ग्रंथारंभ, पाऱ्याच्या उपयोगाचा थोडाबहुत उल्लेख, बचनागाचा सर्व रोगांवर अनुपानपरत्वें उपयोग ( अ० स० उ० अ० ४८ पाहा. ) इत्यादि गोष्टींवरूनहि तो याहून पुरातन काळचा नसावा

---

१ प्राचीन काळीं सिंधु देश हें नांव हल्लींच्या सिंध प्रांताचें नसून सिंधुनदीच्या उत्तरभागाच्या प्रांताला लावीत असत, असें अनेक आधारांवरून सिद्ध होतें ( आनंदराम बरुवा याच्या इं० स० कोशाची प्रस्तावना पाहा ). तक्षशिला म्हणून जें एक शहर होतें तें या प्राचीन सिंध देशांतीलच.

२ रुक्मगर्भो मणिर्धार्यश्चाण्वक्येष्टो विषापहः । ( अ० सं० उ० अ० ४० )
हरिद्राचैत्यं श्रेष्ठः कौटिल्यदयितोऽगदः । ( अ० सं० उ० अ० ४० )

३. लशुनानन्तरं वायोः पलाण्डुः परमौषधम् । साक्षादिव स्थितं यत्र शकाधिपतिजीवितम् ॥
( अ० सं० उ० अ० ४९. )

४. यस्योपयोगेन शकाङ्गनानां लावण्यसारादिव निर्मितानाम् ।
कपोलकान्त्या विजितः शशाङ्को रसातलं गच्छति निर्विदेव ॥
[ अ० सं० उ० अ० ४९. ]

असें दिसतें. तो दहाव्या शतकानंतरचा नव्हेच असें जें वर म्हटलें आहे, याचें कारण असें कीं, अमरकोशावर जी क्षीरस्वामींनीं अकराव्या शतकांत टीका केली आहे त्या टीकेंत त्यांनीं वाग्भटाचा एक टीकाकार चंद्रनंदन याचा उल्लेख केला असल्यामुळें तो त्यांचेपूर्वीं निदान शेंदोनशें तरी वर्षांच्या अंतरावर असला पाहिजे; कारण त्याचा आधार देण्याजोगी योग्यता येण्यास त्यास कांहीं तरी जुनेपणा आला पाहिजे, व वाग्भटहि त्याच न्यायानें ह्या टीकाकारापूर्वीं एक दोन शतकें अगोदरचा असला पाहिजे. आतां यावरून तो फार झाल्यास ८ व्या किंवा ७ व्या शतकांतला मानतां येईल; परंतु ऋषिप्रणीत ग्रंथानंतर हाच पहिला ग्रंथ असून त्याची प्रसिद्धि सर्व हिंदुस्थानभर व बाहेरहि झाली आहे. यावरून व त्यांत जुन्या सांप्रदायाची शुद्ध स्थिति, शस्त्रक्रियेची ऊर्जित दशा, मद्यमांसाचा यथेच्छ उपयोग इत्यादि ज्या गोष्टी आढळतात त्यांवरून व वर दाखविलेल्या शक लोकांशीं त्यांच्या निकट संबंधावरून तो ४ थ्या शतकाहून फारसा अलीकडचा नसावा असें अनुमान करतां येतें. ह्या सुमारासच संस्कृत-विद्येच्या पुनरुज्जीवनाची सुरुवात झाली. आर्यभटाचा ज्योतिषावरील ग्रंथहि ह्या कालानंतर लवकरच झाला, व पुढें अमरसिंह, वराहमिहीर, धन्वंतरि, कालिदास, भारवी इत्यादिकांची मालिका सुरू झाली.

वाग्भट धर्मानें बौद्ध होता हें वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल. कित्येक जुन्या मंडळींना याजविषयीं कांहींसा संशय आहे असें दिसतें व त्यांपैकीं कित्येक तर तो ब्राह्मणच होता असें सिद्ध करण्याविषयीं व्यर्थ प्रयत्न करितात. तो बौद्धच होता याबद्दल जीं प्रमाणें आहेत, तीं येणेंप्रमाणें: —

( १ ) त्याच्या अष्टांगसंग्रहाच्या मंगलाचरणांत त्यानें म्हटलें आहे कीं, ' ज्यानें चित्तरूपी दारुण सर्पाचा प्रज्ञामंत्रबलानें प्रशम केला, अशा त्या बुद्धाला नमस्कार.' या वाक्याचा सरळ अर्थ केल्यास वाग्भटाच्या बौद्ध-धर्मत्वाबद्दल मुळींच संशय राहात नाहीं. पण कित्येक असें प्रतिपादन करितात कीं, ' बुद्ध ' शब्दें करून येथें ज्ञानवान् असा अर्थ घेऊन तो ईश्वरवाचक मानावा. याजवर उत्तर असें कीं, ' बुद्ध ' शब्देंकरून ईश्वर असा अर्थ घेतल्यास ' चित्तोरगं दारुणं प्रज्ञामन्त्रबलेन यः शमितवान् बुद्धाय तस्मै नमः ' ॥ ह्या वाक्याची योजना बरोबर होत नाहीं, कारण जर मुळीं ईश्वराला चित्तच नाहीं[१], तर कामक्रोधादिकांनीं युक्त अशा चित्ताची ईश्वराचे ठिकाणीं कल्पना संभवेल तरी कशी ? आतां कोणी म्हणतील कीं, ह्या श्लोकांत चित्तरूपी सर्पाचा प्रशम केला असें जें म्हटलें आहे तें ईश्वराचे स्वकीय चित्ताकडे न लावितां लोकांच्या चित्ताकडे लावून ' ज्या ईश्वरानें लोकांना चित्तो-रोगाचें प्रशमन करण्याचा उपाय दाखविला ' असा अर्थ करावा. पण याच्याच पुढील श्लोकांत " रागादिरोगाः सहजाः समूला येनाशु सर्वे जगतोऽप्यपास्ताः " या वाक्यामध्यें तो आशय निराळा सांगितलाच आहे. वास्तव पहिल्या श्लोकांतील ' चित्त ' शब्देंकरून ' स्वकीय चित्तच ' घेतलें पाहिजे, व तसा अर्थ घेतला म्हणजे बुद्धपरच अर्थ करणें भाग पडतें. स्वतःच्या उत्तम आचरणानें चित्तशुद्धि करून जो कर्मबंधापासून मुक्त होतो त्यालाच बुद्ध किंवा जिन म्हणावें असें बौद्धांचें मत आहे; म्हणून सदर श्लोकांतील बुद्धपद ईश्वरवाचक नसून जिनवाचकच आहे.
( २ ) वाग्भटाच्या दोन्ही ग्रंथांत एखादें महत्त्वाचें औषध तयार करतेवेळीं किंवा घेतेवेळीं जे मंत्र म्हणण्यास सांगितले आहेत ते वैदिक नसून बौद्धमंत्र आहेत असें त्यांतील ' तथागत ', ' अर्हत् ', ' सम्यक्संबुद्ध ', ' जिन ' वगैरे शब्दांवरून स्पष्ट दिसतें. हे बौद्धदेवतात्मक मंत्र अष्टांगसंग्रहांतलि सूत्रस्थानाच्या ८ व्या अध्यायांत दोन ठिकाणीं, २७ व्या अध्यायांत, चिकित्सास्थानाच्या २ ऱ्या अध्यायांत, व आणखी एकदोन स्थळीं आले आहेत. ह्यांपैकीं पहिल्या स्थळीं ' अवलोकितेश्वर ' व ' तारा ' ह्या दोन देवता पहिल्यानें सांगून पुढें कांहीं वैदिक देवतांचीं नांवें दिलीं आहेत. या दोन देवता बौद्धांच्याच आहेत याविषयीं मुळींच संशय नाहीं. कुष्ठचिकित्सेंत कुष्ठपरिहारार्थ ' जिन ', ' जिनसुत, ' ' तारा ' इत्यादि देवतांची आराधना करण्यास सांगितलें आहे [ अ० सं० पाहा ]. ' जिनसुत ' म्हणजे अवलोकितेश्वर किंवा एक बोधिसत्त्व. ' तारा ' ही देवता तर बौद्धावांचून दुसऱ्या कोणत्याहि पंथांत नाहीं, ही गोष्ट एक जैन लोकांमध्यें पद्मावतीपूजास्तोत्रांतील श्लोक आहे त्यावरून अगदीं उघड रीतीनें सिद्ध होते. तो श्लोक पुढीलप्रमाणें :—

---

१ ईश्वर निर्मनस्क आहे अशाबद्दल अनेक श्रुत्या असून पातंजल योगसूत्रामध्यें जी ईश्वर शब्दाची निरुक्ति केली आहे तीहि तशीच आहे:—क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ।

तारा त्वं सुगतागमे भगवती गौरीति शैवागमे। वज्रा कौलिकशासने जिनमते पद्मावती विश्रुता।
गायत्री श्रुतिशालिनां प्रकृतिरित्युक्तासि सांख्यागमे। मातर्भारति किं प्रभूतभणितैर्व्याप्तं समस्तं त्वया॥
—पद्मावतीपूजास्तोत्रम्.

याचा अर्थः--"हे भारति जगदंबे, तुला बौद्धधर्मागमांत 'तारा', शैवमतागमांत 'भगवती गौरी,' शाक्तिमतामध्यें 'वज्रा', जैनधर्मामध्यें 'पद्मावती,' वैदिक धर्मामध्यें 'गायत्री', सांख्यशास्त्रांत 'प्रकृति' अशीं (ते ते मतानुयायी) निरनिराळीं नांवें देतात. फार काय सांगूं? तुझी सर्वत्र व्याप्ति आहे." या ठिकाणीं 'तारा' ही बौद्धांचीच एक देवी आहे हें उघड होतें. तसेंच कथासरित्सागरामध्यें तक्षशिला नगरीचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे कीं, त्या नगरींतील सर्व लोक बौद्ध असून ते तारादेवीच्या अनुग्रहानें मोठे धनाढ्य होते. या वर्णनावरून असेंहि पण दिसून येईल कीं, वाग्भटाची जन्मभूमि जो प्राचीन सिंधु देश तेथें पूर्वी बौद्धधर्म फार पसरला होता. (तक्षशिला सिंधु देशांतीलच असें आम्हीं पूर्वी टीपेंत लिहिलेंच आहे). ह्या बौद्धदेवीची जैन लोकांनीं देखील स्वधर्माच्या अभिमानानें कांहीं प्रसंगीं निंदा केलेली आढळते, तेव्हां ब्राह्मण तिची उपासना करण्यास कसें सांगतील? अष्टांगसंग्रहांत ज्वराचिकित्सेंत सांगितलेल्या 'शबरी' व 'अपराजिता' म्हणून ज्या देवता आहेत, त्याहि बौद्धांच्याच आहेत. ह्या देवतांशिवाय 'तथागतोष्णीष' (बुद्धकवच), 'मायुरी विद्या' वगैरे जे जप सांगितले आहेत तेहि बौद्धांचेच आहेत. आतां कोणी म्हणतील कीं, वाग्भट जर बौद्ध होता तर त्यानें आपल्या धर्माविरुद्ध मांसभक्षणाची प्रशंसा कशी केली आहे व 'अथर्वविहिता शांतिः', 'अर्चयेद्देवगोविप्रवृद्ध-वैद्यनृपातिथीन्' इत्यादि जीं त्यानें विधानें सांगितलीं आहेत त्यांची वाट काय? यास दोन उत्तरें आहेत. एक तर असें कीं, त्यानें आरंभींच सांगितलें आहे कीं, आयुर्वेदासंबंधानें आत्रेयादिकॠषींनीं जें जें सांगितलें आहे तें तें मी सांगतों. असें जर आहे तर ॠषिमताचा त्यानें अनुवाद करणें योग्यच आहे. त्याच्या प्रतिज्ञेप्रमाणें सर्व भाग ॠषिप्रोक्त आहे यांत संशय नाहींच; तथापि मंगलाचरण, निरनिराळ्या प्रसंगांचे मंत्र किंवा देवतांची उपासना ह्यासंबंधानें त्यानें आपल्या भक्तीस व त्या वेळच्या सांप्रदायास अनुसरणें हें साहजिकच आहे. त्याचे योगानें मूळ प्रतिज्ञेचा भंग न होतां ग्रंथकर्ता कोणत्या धर्माचा होता हें जगास सहजरीत्या सुचविलें जातें. मांसप्रशंसेच्या-संबंधानेंहि हेंच उत्तर असून शिवाय आणखी असें सांगितलें पाहिजे कीं, जैनांप्रमाणें बौद्ध लोकांत मांसभक्षणाचा फारसा निषेध नव्हता असें एका प्राचीन जैनानें बौद्धांच्या अहिंसेची एका ग्रंथांत थट्टा केली आहे, त्यावरून व इतर आधारांवरून स्पष्ट दिसतें. हल्लींच्या बौद्धांचा तर इतर लोकांपेक्षांहि मांसावर अधिक तडाका आहे (विशेषेंकरून चीन व ब्रह्मदेशांत). दुसरें असें कीं, प्राचीन बौद्ध लोकांची ब्राह्मणांविषयीं किंवा यज्ञावांचून इतर वेदोक्त धर्माविषयीं मुळींच अपूज्यबुद्धि नव्हती. इंद्रादि वेदोक्त देवतांच्यासंबंधानेंहि त्यांची आस्तिक बुद्धि होती. निःश्रेयसप्राप्तीचा खरा मार्ग कोणता याविषयींच काय तो त्यांचा कर्मठ ब्राह्मणांशीं वाद होता. अशोकाच्या वेळच्या शिलालेखांत ब्राह्मण व श्रमण हे सारखेच पूज्य मानावेत अशी त्या प्रसिद्ध बौद्धराजाची आज्ञा आढळते. विक्रमा-दित्याच्या पदरीं ब्राह्मण, बौद्ध व जैन पंडितांना सारखाच मान असे. वाग्भटालाहि ही मध्यस्थ वृत्तिच आवडत असे असें त्याच्या दिनचर्याध्यायांतील "अनुयायात्प्रतिपदं सर्वधर्मेषु मध्यमां" ह्या वाक्यावरून सिद्ध होतें. (ह्या वाक्यांत त्या वेळच्या स्थितीचेंहि थोडेंसें दिग्दर्शन होतें.) बौद्धांच्या ग्रंथांत इंद्रादिकांचीं नांवें (पूज्यबुद्धीनें घेतलेलीं) आढळतात. ब्राह्मणांची गोष्ट मात्र निराळी आहे. ते अवलोकितेश्वर किंवा अर्हत् यांचें पूज्य बुद्धीनें कथन करणार नाहींत. वाग्भट हें नांव बौद्ध व जैन लोकांत आहे, त्या नांवाच्या एका जैन कवीनें नेमिनिर्वाणकाव्य नांवाचा एक ग्रंथ केला आहे, त्यांत नेमिनाथ म्हणून जे जैनांचे एक तीर्थंकर झाले त्यांचें चरित्र वर्णिलें आहे. ब्राह्मणांत मात्र हें नांव कोठें आढळत नाहीं. तेव्हां असें सिद्ध होतें कीं, वाग्भट बौद्ध होता याबद्दलचा पुरावा त्यांच्या ग्रंथांत ओतप्रोत भरला असून त्यासंबंधानें ज्या एकदोन क्षुद्र शंका त्यांचाहि चांगल्या रीतीनें परिहार होतो.

ह्याचे वैद्यकावरील दोन ग्रंथ उपलब्ध आहेत. अष्टांगसंग्रह किंवा वृद्धवाग्भट व अष्टांगहृदय. सिद्धसार या नांवाचा आणखी एक अगदीं संक्षिप्त ग्रंथ त्यानें केला असावा असें अरुणदत्ताच्या टीकेंतील एका वाक्यावरून कित्येक अनुमान करतात, परंतु सिद्धसार हा ग्रंथ हल्लीं उपलब्ध नसल्यामुळें त्याविषयीं कांहींच निर्णय करतां येत नाहीं. त्याच्या या दोन ग्रंथांपैकीं अष्टांगहृदय हाच विशेष प्रसिद्धीस आला आहे. तो सर्व हिंदुस्थानभर पसरला आहे इतकेंच नव्हे, मलायामध्यें देखील त्याचें भाषांतर बौद्ध धर्माबरोबर गेलें आहे असें म्हणतात. दक्षिणेंत तर

तो जैनांनीं किंवा बौद्धांनीं फार दिवसांमागें नेला आहे; तो ह्या लोकांच्या द्वारां गेला आहे असें म्हणण्याचें कारण असें कीं, तिकडे ज्या नांवानें तो प्रसिद्ध आहे तें नांव प्राकृतांतील आहे. तिकडे त्यास 'बाहट' असें म्हणतात. हा जैनांनीं केलेला वाग्भट शब्दाचा प्राकृत अपभ्रंश आहे. तो बौद्ध ग्रंथ असल्यामुळें बौद्ध व जैन लोकांच्या हस्तें त्याचा त्या दोन्ही धर्मांबरोबर प्रसार झाला. रसरत्नसमुच्चय म्हणून जो रसक्रियेवरील ग्रंथ आहे तोहि वाग्भटाचाच असावा असें कित्येकांचें म्हणणें आहे, असें वर सुचविलेंच आहे, परंतु तो त्याचा नाहीं असें म्हणण्यास सबळ प्रमाणें आहेत. एक तर असें कीं त्या ग्रंथांत किंवा त्याच्या दोनाहि प्रसिद्ध ग्रंथांत त्यानें हा ग्रंथ केल्याचा प्रत्यक्ष उल्लेख नाहीं. रसरत्नसमुच्चयांत सिंहगुप्तसूनूनें हा ग्रंथ केला आहे एवढेंच लिहिलेलें आहे, व कांहीं पोथ्यांतून तर 'सूनुना संघगुप्तस्य' असाहि पाठ आढळतो; व जरी पहिलाच पाठ खरा धरून चाललें तरी दुसऱ्या प्रत्यंतरावाचून हा सिंहगुप्तसूनु वाग्भटच असें म्हणतां येत नाहीं. रसरत्नसमुच्चय वाग्भटानेंच केला असता तर त्याच्यासारख्या चतुर मनुष्यानें ती गोष्ट प्रसिद्ध होण्याकरितां तिचा उल्लेख आपल्या दोन ग्रंथांपैकीं एकांत तरी केला असता, व तसा उल्लेख करण्याला प्रसंगहि अनेक होते. दुसरें असें कीं, भाषेच्या शैलीवरून पाहतां हा ग्रंथ प्रसिद्ध वाग्भटाचा नसावा असें दिसून येतें. दोन्ही वाग्भटांतील ग्रंथसरणी, शब्दयोजना, भाषेची जुळणी, शुद्धता वगैरे गोष्टी रसरत्नसमुच्चयाशीं ताडून पाहिल्या असतां दोहोंतील भेद तात्काळ लक्षांत येतो. वाग्भटाच्या ग्रंथसरणीमध्यें पुनरुक्ति नसणें, निरर्थक शब्द न घालणें, थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थाचा समावेश करणें, भाषेची प्रौढी व शब्दलालित्य इत्यादि प्रकार आढळतात. रसरत्नसमुच्चयांत हे प्रकार नसून त्यांत तांत्रिक किंवा पौराणिक ग्रंथांची लकेर मारिते. अलीकडच्या संस्कृत ग्रंथांप्रमाणें संख्येचा निर्देश करणें झाल्यास 'मुनिसंख्या', 'वेदसंख्या' इ० शब्दांचा उपयोग सात किंवा चार इ० बद्दल अनेक वेळां केलेला आढळतो. हा प्रकार दोन्ही वाग्भटांत (जरी ते ग्रंथ रत्नसमुच्चयाहून बऱ्याच पटीनें मोठे आहेत) कोठेंहि आढळत नाहीं. रसरत्नसमुच्चयांत ठिकठिकाणीं वाग्भटासारख्या पंडिताला न शोभणाऱ्या अपशब्दांचाहि प्रयोग आढळतो. जसें १३ व्या अध्यायांतलि पहिल्या श्लोकांत 'निर्यल्यसृक्स्थल-यकृत्प्लिहतोऽतिमात्रम्' ह्या चरणांत जो 'प्लिह' शब्द 'प्लीह' बद्दल घातला आहे, तो अगदीं अशुद्ध आहे; २० व्या अध्यायांतील श्लोक २२२ यांत 'कुष्टाष्टादशनाशनं' असा जो सामासिक शब्द आहे, तो व्याकरणरीत्या अशुद्ध आहे. तसेंच अ० ११, श्लो० २१ यांतील 'अष्टाविंशत्पलान्येव दशपञ्चैकमेव वा' ह्या श्लोकार्धांत 'अष्टाविंशत्' असें जें पद घातलें आहे तें अष्टाविंशति असें पाहिजे होतें, परंतु छंदाला जुळण्याकरितां ग्रंथकर्त्यानें व्याकरणाचें उल्लंघन केलें आहे. अशीं आणखीहि कांहीं उदाहरणें दाखवितां येतील. तिसरें असें कीं, दोन्ही वाग्भट व रसरत्नसमुच्चय यांजमध्यें भाषासरणीच्या भेदाहून आणखी एक जास्त महत्त्वाचा भेद दिसून येतो; तो हा कीं, पहिल्या दोन ग्रंथांत जीं रोगांचीं नांवें आढळतात, त्यांहून कांहीं जास्त नांवें रसरत्नसमुच्चयांत आढळतात, व त्यावरून हा वाग्भटाच्या नंतरचा असावा असें स्पष्ट दिसून येतें. वाग्भटांत जे रोग दिले आहेत, ते प्रायः चरक व सुश्रुत यांनीं सांगितलेलेच आहेत, व जसा या दोन ग्रंथांत 'आमवात', 'अम्लपित्त' वगैरे कांहीं रोगांचा रोगगणनेमध्यें उल्लेख आढळत नाहीं, तसाच वाग्भटांतहि पण त्यांचा उल्लेख नाहीं. अष्टांगसंग्रह किंवा अष्टांगहृदय यांतील निदानादि स्थानांत जी रोगगणना केली आहे, तींत ह्या व दुसऱ्याहि कांहीं रोगांचीं नांवें देखील येत नाहींत; मग त्यांचें सविस्तर निदान किंवा चिकित्सा यांविषयीं बोलावयासच नको. हे रोग प्राचीन ग्रंथांत कां सांगितले नाहींत व अर्वाचीन माधवनिदानादि ग्रंथांत त्यांचें किती महत्त्वपूर्वक वर्णन केलें आहे याविषयीं अन्यत्र माहिती दिली आहे. वाग्भटाच्या वेळीं जर या दोन महत्त्वाच्या रोगांचें स्वतंत्र रीतीनें वर्णन करण्याची सुरुवात झाली असती, तर त्यानें आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत त्यांचा उल्लेख केला असता; परंतु ज्याअर्थीं तेथें असा उल्लेख आढळत नाहीं त्याअर्थीं त्याचे वेळीं अजून त्या रोगांचा तितका शोध लागला नव्हता व रसरत्नसमुच्चयामध्यें त्यांचा व दुसऱ्याहि संग्रहांत किंवा हृदयांत न सांगितलेल्या रोगांचा उल्लेख आढळतो; म्हणून हा ग्रंथ वाग्भटाच्या नंतरचा असावा. ते दुसरे रोग कोणते म्हणाल तर 'रक्तवात'[१] (वातरक्त नव्हे), 'शीतवात', 'सोमरोग' व जलकूर्मरोग.' रसरत्नसमुच्चय हा नुसता चिकित्साग्रंथ आहे, व तो वाग्भटानें केला असता तर हें साहजिक आहे कीं, रोगमालिका त्यानें आपल्या पूर्वीच्या ग्रंथावरूनच घेतली असती व औषधें मात्र रसतंत्रांतील सांगितलीं असतीं, व ज्याअर्थीं रोगमालिकेंत अशी विप्रतिपत्ति दिसते, त्याअर्थीं हा त्याचा ग्रंथ

१. र० स० अ० २१, श्लोक ४१ पाहा.

नसावा असें अनुमान होतें. ४ थें कारण हें आहे कीं, केवळ रोगमालिकेमध्यें भेद आढळतो; इतकेंच नव्हे, तर कांहीं रोगांचीं नांवें भिन्नार्थानें योजिलीं आहेत किंवा त्यांचे विभाग निराळ्या प्रकारचे केले आहेत, कांहीं महत्त्वाच्या रोगांची स्वतंत्रपणें चिकित्सा सांगितली नाहीं, व कांहीं औषधीय पदार्थ असे आढळतात कीं, जर त्यांची वाग्भटास माहिती असती तर त्यानें त्यांचा उल्लेख आपल्या प्रसिद्ध ग्रंथांत अवश्यमेव केला असता. पहिल्या मुद्याचें उदाहरण अ० १६ श्लो० १९ यांत 'बिंबिशी' व 'प्रवाहिका' असे दोन शब्द वेगळाल्या रोगांचे वाचक दाखविले आहेत; परंतु वृद्ध वाग्भटांत 'प्रवाहिकेची' व्याख्या देतेवेळीं तिचाच पर्याय 'बिंबिशी' असा दिला आहे (अ. स. चि. अ. ११). रसरत्नसमुच्चयांत अलीकडील ग्रंथांप्रमाणें पांढऱ्या कोडाला 'श्वेतकुष्ठ' असें नांव अनेक ठिकाणीं दिलेलें आढळतें. वाग्भटाच्या दोन्ही ग्रंथांत त्या विकारास हें नांव दिलेलें नाहीं; एवढेंच नव्हे तर उलटें असें सांगितलें आहे कीं, कुष्ठापासून हा विकार अगदीं भिन्न आहे; व त्याला 'श्वित्र' व 'किलास' हीं दोन नांवें दिलीं आहेत. तसेंच २९ व्या अध्यायांत (रसरत्नसमुच्चय) जीं आठ प्रकारचीं कुष्ठें सांगितलीं आहेत, तीं एखाद्या तांत्रिक ग्रंथांतील असून संख्येच्या किंवा नांवाच्यासंबंधानें वाग्भटोक्त कुष्ठांशीं जुळत नाहींत. वाग्भटानें चरकादिकांस अनुसरून सात महाकुष्ठें व अकरा क्षुद्र अशीं एकंदर अठरा कुष्ठें सांगितलीं आहेत. त्यानें रत्नसमुच्चयांतील शवगंधि वगैरे अष्टकुष्ठांचा मुळींच उल्लेख केला नाहीं. दुसऱ्या मुद्द्याचें उदाहरण, 'अपतानक' रोग वातव्याधीमध्यें फार महत्त्वाचा असूनहि त्याच्या चिकित्सेचें रसरत्नसमुच्चयांत स्वतंत्र रीतीनें कथन केलेलें नाहीं. इतर कांहीं रोगांवर सांगितलेल्या औषधांच्या गुणपाठामध्यें मात्र तत्सूचक 'धनुर्वात' शब्द आढळतो, परंतु हा शब्दहि वाग्भटानें आपल्या प्रसिद्ध ग्रंथद्वयामध्यें योजिलेला आढळत नाहीं. प्राचीन ग्रंथांत 'धनुष्कंभ' किंवा 'अपतानक' हा शब्द धनुर्वात शब्दाऐवजीं योजिलेला आढळतो, व धनुर्वात शब्द अलीकडील ग्रंथांत मात्र आढळतो. तिसऱ्या मुद्द्याचें उदाहरण, रसरत्नसमुच्चयाच्या कर्त्यानें गौरीपाषाण (सोमल) व अहिफेन (अफू) या दोन पदार्थांचा उल्लेख केला आहे. हे औषध व विष या दोन्ही नात्यांनीं इतके महत्त्वाचे आहेत कीं, त्यांची जर वाग्भटाचे वेळीं चांगली माहिती असती; तर त्यानें निदान विषप्रकरणांत तरी त्यांचा उल्लेख केला असता. हे दोन्ही पदार्थ परदेशांतील असल्यामुळें अलीकडील ग्रंथांत मात्र त्यांचीं नांवें आढळतात. हे दोन्ही पदार्थ महत्त्वाचे असूनहि अमरसिंहानें आपल्या कोशांत सांगितले नाहींत (तत्सदृश परंतु कमी महत्त्वाचे असे धोतरा, भांग इ० सांगितले असूनहि) व धन्वंतरि निघंटांतहि (६ व्या शतकांत झालेल्या) त्यांचा उल्लेख नाहीं. तेव्हां त्यांची विशेष माहिती सहाव्या शतकानंतर झाली असावी. भावप्रकाश, चूडामणि वगैरे अलीकडील ग्रंथांत मात्र 'अहिफेन', 'अफेन', 'खसखससार', 'खसफलक्षीर' वगैरे अफूचे वाचक शब्द येतात. अफेन (अहिफेन) हें नांव ओपिऑन (opion) या ग्रीक किंवा 'अफ्युन' या आरबी शब्दापासून संस्कृतीकरणानें झालें आहे. अफूचें मूळ उत्पत्तिस्थान ग्रीस देश किंवा कोणाच्या मतें एशिया खंडांतील तुर्कस्थान असल्यामुळें पृथ्वीवरील सर्व भाषांत त्य ग्रीक किंवा आरबी शब्दांच्याच अपभ्रंशापासून झालेले शब्द अफूला लावितात. महंमदी धर्माचे लोक जेव्हां चहूंकडे पसरले, तेव्हां त्यांनीं अफूचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर केला असें इतिहासज्ञांचें मत आहे. ह्यून स्यांग नामक चिनी प्रवासी हिंदुस्थानांत ७ व्या शतकांत आला होता व त्यानें पुष्कळ शहरें व क्षेत्रें व येथील लोकांच्या रीतीभाती वगैरे पाहून त्यांची सविस्तर हकीकत लिहून ठेविली आहे असें वर सांगितलेंच. त्यांत त्यानें कांहीं लोक दारू व कांहीं लोक दुसऱ्या कांहीं प्रकारचे पदार्थ पितात वगैरे हकीकत दिली आहे, परंतु तींत अफूचा उल्लेख नाहीं. त्याचे वेळीं जर अफू या देशांत पिकत असती किंवा तिचा उपयोग प्रचारांत आला असता तर त्यानें त्याविषयीं दोन शब्द तरी लिहिले असते, असें त्याच्या इतर तज्जातीय गोष्टींच्या वर्णनावरून म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां अहिफेन शब्दाचा प्रयोग रसरत्नसमुच्चयांत केलेला आढळणें ही या इतिहासदृष्टीनें फार महत्त्वाची गोष्ट आहे, व ग्रंथाचा कर्ता वाग्भट आहे असें मानण्यास ती बऱ्याच अंशीं प्रतिबंधक आहे. आतां कोणी असें म्हणतील कीं, या ग्रंथांत ज्या गुटिकेमध्यें अफूचा उल्लेख आढळतो, तद्विषयक श्लोक कदाचित् क्षेपक असतील; व ह्या उपपत्तीस ते असेंहि एक कारण दाखवितील कीं, या ग्रंथांत जो विषोपविषांचा वर्ग सांगितला आहे, त्यांत अफूचें मुळींच नांव आढळत नाहीं. याजवर आमचें असें म्हणणें आहे कीं, ज्याअर्थीं अनेक लेखी प्रतींतून ह्या पाठ आढळतो त्याअर्थीं तो क्षेपक म्हणतां येत नाहीं; व या ग्रंथांतील विषवर्गांत अफू सांगितली नसून सदरहु गुटिकेमध्यें जें तिचें नांव आढळतें, याचें कारण असें असूं शकेल कीं, र० स० हा ग्रंथ अनेक तंत्रांवरून

केलेला असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग जुन्या व कांहीं नव्या ग्रंथांतून घेतलेले असावेत, व ह्याच ग्रंथांतील विषवर्गामध्यें अफूचें नांव नसणें हें आम्हीं जें वर या पदार्थाच्या उत्पत्तीविषयीं सांगितलें आहे, त्याचेंच दृढीकरण आहे. ५ वें कारण ( व ऐतिहासिक दृष्टीनें हें फार महत्त्वाचें आहे ) असें कीं, र० स० मध्यें पहिल्याच अध्यायांत आरंभीं व शेवटीं बरेच अनुष्टुप् छंदाचे श्लोक येऊन मध्येंच सुमारें २७ आर्या आढळतात. ( 'मूर्च्छित्वा हरति रुजं' इ० पासून 'हरगौरीसृष्टिसंयोगात्' पर्यंत ). ह्या आर्या 'गोविंदपूज्यपादकृत रसहृदय' या ग्रंथांतून घेतलेल्या आहेत अशी तो ग्रंथ पाहिल्यानें कोणाचीहि खात्री होईल. हे गोविंदपूज्यपाद शंकराचार्यांचे गुरु असावेत असें कित्येक म्हणतात. तसें असल्यास त्यांचा काल ८ व्या शतकाचे सुमारास येतो; कारण शंकराचार्य इ० स० ७८८ त जन्मले असा इतिहास आहे व जरी कदाचित् रसहृदयकर्ते गोविंदपूज्यपाद आचार्यांच्या गुरूहून भिन्न मानिले तरी दुसऱ्या आधारानें त्यांचा काल तोच ठरतो. रसहृदयकर्त्यानें आपल्या ग्रंथाचे अखेरीस 'हैयहय' कुलांतील मदन राजाच्या सूचनेवरून तो ग्रंथ रचिला आहे असें म्हटलें आहे. ह्या हैयहय कुलांतील राजांची वंशावळ कनिंगहॅम साहेबांच्या आर्किआलॉजिकल रिपोर्टांत दिली आहे ( See Archaeological Survey Reports–Vol. XVII, P. 78 ). त्यावरून असें दिसून येतें कीं, त्या वंशावळींत कामदेव या नांवाचा राजा ८ व्या शतकांत गादीवर होता, व ह्याच रसहृदयोक्त मदन होय; कारण, अशा तऱ्हेनें नांवाचा पर्याय देण्याचा प्रघात आढळतो व मदन या नांवाचा राजा एकंदर वंशावळींत दुसरा कोणी आढळत नाहीं. यावरून असें सिद्ध होतें कीं, र० स० हा ग्रंथ रसहृदयानंतर निदान १०० वर्षांच्या तरी अंतरानें झालेला असावा. आतां कोणी असें म्हणतील कीं, ह्या ज्या २७ आर्या त्या र० स० तूनच रसहृदयकारांनीं किंवा त्या दोघांनींहि तिसऱ्याच एखाद्या पूर्वकालीन ग्रंथांतून घेतल्या नसतील कशावरून ? त्याजवर उत्तर हें कीं, ह्या आर्या रसहृदयांतील इतर भागांशीं ताडून पाहिल्यास त्या मूळच्या त्या ग्रंथांतीलच आहेत अशी खातरी होते. रसहृदय हा सर्व ग्रंथ आर्यात्मक असून ह्या २७ आर्यांची भाषा व वर्णन वगैरेसंबंधानें त्यांतील अवशिष्ट भागांशीं अत्यंत साम्य आहे; येवढेंच नव्हे तर त्या ग्रंथांत त्यांचा मागील व पुढील भागांशीं विच्छेद न दिसतां अगदीं एकजीव बनून गेल्यासारखा दिसतो. शिवाय विद्यारण्यासारख्या पंडितांनीं सर्वदर्शनसंग्रहांत ह्या २७ आर्यांपैकींच कांहींचा अनुवाद करतेवेळीं 'गोविंदभगवत्-पूज्यपाद म्हणतात' असें स्पष्ट म्हटलें आहे. तेव्हां त्या रसहृदयांतूनच र० स० कारानें घेतल्या आहेत हें उघड आहे; व रसरत्नसमुच्चयांत आरंभींच जीं रससिद्धांचीं नांवें आलीं आहेत त्यांत गोविंद असेंहि जें एक नांव आहे, तें या रसहृदयकर्त्याचेंच असावें. यास्तव वर लिहिल्याप्रमाणें रसरत्नसमुच्चयाचा काल ९ व्या किंवा दहाव्या शतकांत धरावा लागतो, व असें जर आहे, तर तो वाग्भटाचा मानणें असमंजस नव्हे काय ? ६ वें कारण असें कीं, जरी रसरत्नसमुच्चयाच्या कर्त्यानें वाग्भट ग्रंथ पाहिला आहे [ कारण त्यानें कांहीं ठिकाणीं संग्रहांतील व हृदयांतील श्लोक जसेच्या तसेच घेतले आहेत व एका अध्यायांत ( विषकल्पांत ) तर बहुतेक अंशीं अध्यायच्या अध्याय उतरून घेतला आहे, ] व त्याच्या भाषेचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला आहे व त्याजवरून पाहतां तो ग्रंथ त्याचा असावा असें वाटण्याचा संभव आहे; तरी वर लिहिलेल्या महत्त्वाच्या मुद्याचा विचार केल्यास हा भ्रम नाहींसा होतो. वरील गोष्टींमध्यें आणखी एक गोष्ट सांगावयाची राहिली; ती ही कीं, वाग्भटानें आपल्या दोन्ही प्रसिद्ध ग्रंथांत कोणतेहि तंत्रदोष ( अप्रसिद्ध शब्दादि ) न येण्याबद्दल खबरदारी ठेविली आहे. ( ह्या ग्रंथांत उ० अ० ४०, श्लोक ७८ पाहा. ) रसरत्नसमुच्चयांत कांहीं श्लोक अप्रसिद्ध शब्दादि तंत्रदोषांचे दर्शक आहेत; उदाहरणार्थ, अ० १३, श्लोक ९० विश्वादित्रिकनिर्गतव्रवानिशाकीरप्रियोत्थं दलं इ० आणि अ० १२ श्लोक ९८ ससारा वैष्णवी सेना अचला कादिकं कणा इ० पाहा. वाग्भटाच्या प्रसिद्ध ग्रंथांत ( त्याच्या प्रतिज्ञेप्रमाणें ) हे दोष बिलकूल नाहींत.

या सहा कलमांत दर्शविलेल्या मुद्द्यांवरून रसरत्नसमुच्चय हा ग्रंथ वाग्भटाचा नसावा असें मानणें जास्त सयुक्तिक दिसतें. आतां हा ग्रंथ जर वाग्भटाचा नव्हे, तर त्याचा कर्ता कोण व कधींचा हा प्रश्न उपस्थित होतो. त्यासंबंधानें तूर्त इतकेंच सांगतां येतें, कीं त्याचा कर्ता इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या सुमारास झाला असावा. कारण रसरत्नसमुच्चयांत चर्पटी, सोमेश्वर, नित्यनाथ, सिंवण व मंथानभैरव ह्या रसशास्त्रवेत्त्यांचीं नांवें आलीं आहेत व हे सर्व ग्रंथकार बारावे किंवा तेरावे शतकांतले आहेत.

वाग्भटालंकार या नांवाचा एक ग्रंथ आहे, तोहि प्रसिद्ध वैद्य वाग्भटाचाच असा कित्येकांचा गैरसमज झालेला दिसतो. ह्या ग्रंथाचा कर्ता एक दुसराच वाग्भट आहे. तो जैनधर्माचा असून गुजराथपैकीं अनहीलपूर येथील जयसिंह राजाचे कारकीर्दीतील होता असें त्याच्या ग्रंथांतील त्या राजाच्या वर्णनावरून सिद्ध होतें. हा १२ शतकांतील आहे. वर सुचविलेला नेमिनिर्वाणकाव्य या नांवाचा एक जैन लोकांचा प्रसिद्ध ग्रंथ माझे पाहण्यांत आला आहे. त्याचाहि कर्ता वाग्भट या नांवाचाच एक जैन कवि आहे. त्याच्या बापाचें नांव छाहद व जन्मभूमि बुंदेलखंडांतील अहिच्छत्रपुर. नेमिनिर्वाणकाव्यामध्येंहि जयसिंह राजाचा उल्लेख आढळल्यावरून वाग्भटालंकार कर्ता व हा एकच असावा असें कोणी म्हणतात. हल्लीं तो ग्रंथ मजपाशीं नसल्यामुळें त्यांत जयसिंहाचा उल्लेख आहे किंवा नाहीं हें मी खात्रीनें सांगूं शकत नाहीं, व त्याचा प्रस्तुत विषयाशीं फारसा संबंधहि नाहीं. इतकेंच ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, वाग्भटालंकाराप्रमाणें हा ग्रंथहि वैद्य वाग्भटाचा नव्हे.

वाग्भट पिढीजाद वैद्य असून त्यास संस्कृतभाषेचें उत्तम प्रकारचें ज्ञान होतें, असें त्याच्या दोन्ही ग्रंथांवरून दिसून येतें. वैद्यकीय ग्रंथांची जी अस्ताव्यस्त व आर्षस्थिति ती त्यानेंच प्रथम सुधारली. त्याचा ग्रंथ करण्यामध्येंहि हाच उद्देश होता असें त्याच्या दोन्ही ग्रंथांतील आरंभाच्या श्लोकांवरून दिसून येतें. चरकादि ग्रंथ अतिविप्रकीर्ण[1], समस्तव्याधिचिकित्सेसंबंधानें अध्यापक, केवळ अर्थाकडे लक्ष देणारे ( अर्थप्रत्यायनपराः ) व वाक्यरचना व प्रकरणरचना यांच्याकडे दुर्लक्ष करणारे ( वचने यत्न नादृताः ) असें त्यानें स्पष्ट सुचविलें आहे. तसेंच ज्याची जुळणी युगानुरूप व ज्यांत भलत्याच ठिकाणीं विस्तार किंवा संक्षेप व पुनरुक्त्यादि दोष नाहींत असा ग्रंथ मी करितों, असें सांगण्यामध्यें त्यानें सुचविलें आहे कीं, चरकादिकांपासून आपल्या वेळेपर्यंत पुष्कळ काळ लोटला असूनहि त्या काळाला योग्य असा ग्रंथ अजून कोणीं केला नव्हता. त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्याचे दोन्हीहि ग्रंथ ( व विशेषेंकरून अ० हृ० ) फार व्यवस्थित व तंत्रदोषांनीं रहित असे झाले आहेत. त्याची भाषा प्रौढ, शुद्ध व सरळ असून तींत स्वाभाविक अशा जुन्या संस्कृत भाषेची तऱ्हा बरीच कायम राहिली आहे. त्याचा तऱ्हेतऱ्हेचीं वृत्तें व अलंकार उपयोगांत आणण्याचा फार कल आहे. ऋतुचर्याध्याय, मदात्ययचिकित्सेमध्यें मद्यप्रशंसा व वाजीकरणाध्याय, इत्यादि ठिकाणीं प्रसंगविशेषीं त्यानें आपली कवित्वशक्ति प्रकट केली आहे, परंतु त्याच्या प्रसिद्धीचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे उत्तम भाषा किंवा कवित्वशक्ति नव्हे, किंवा त्यानें कांहीं नवीन शोध करून आर्यवैद्यकाची अभिवृद्धि केली असेंहि नव्हे; त्याच्या ग्रंथाची खुबी काय ती हीच आहे कीं, त्यांत त्यानें अनेक आर्षग्रंथांतून इकडे तिकडे अस्ताव्यस्त पसरलेला मजकूर चांगल्या विल्हेवारीनें रचून एकहि फाजील शब्दाचा उपयोग न करतां थोडक्या शब्दांत पुष्कळ अर्थाचा समावेश करून सर्व पुरातन वैद्यकीय ज्ञान अल्पायासानें व पद्धतवार सर्वांस ऋषींचे ग्रंथ न वाचतां प्राप्त होण्याला उत्तम सोय केली आहे. अ० सं० व अ० हृ० ह्या दोन ग्रंथांची परस्पर तुलना केल्यास असें दिसून येईल कीं, त्या दोहोंपैकीं ही सोय दुसऱ्यांत अधिक असल्यामुळें त्याचीच अधिक प्रसिद्धि झाली आहे. सर्व हिंदुस्थानभर प्रतिष्ठित वैद्य त्यावरूनच ( निदान अंशतः ) वैद्यक शिकतात. त्याच्याच प्रती सर्व देशभर फार पसरून गेल्यामुळें म्हैसूर, मुंबई, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं तोच प्रथम छापला गेला. त्यालाच चंद्रनंदन, अरुणदत्त व हेमाद्रि या पंडितत्रयीनें टीकेनें अलंकृत करण्याचा मान दिला. अ० सं० हा ग्रंथ अ० हृदयापेक्षां जितक्या पटीनें ( ग्रंथसंख्येच्या मानानें ) मोठा आहे, तितक्याच पटीनें कांहीं त्यांत अर्थाधिक्य नाहीं. याचें कारण असें कीं, त्यांत बऱ्याच ठिकाणीं गद्यात्मक वाक्यरचना असल्यामुळें ग्रंथसंख्या सहजच वाढली; इतकेंच नव्हे, तर थोडक्यांत पुष्कळ अर्थ आणण्याचा प्रयत्न जितका अ० हृ० मध्यें सिद्धीस गेला आहे तितका अ० सं० मध्यें नाहीं. उदाहरणार्थ, पाण्याचा अन्नाशीं अमुक प्रकारचा संबंध असल्यास अमुक परिणाम होतो यासंबंधानें दिलेल्या ह्या दोन्ही ग्रंथांतील श्लोकांची तुलना केल्यास असें दिसून येईल कीं, जितका अर्थ अ० हृ० तील 'समस्थूलकृशा भक्तमध्यांतप्रथमांबुपाः' ह्या श्लोकार्धांत येतो, तितकाच अर्थ प्रकट करण्याकरितां वृद्ध वाग्भटास तिप्पट ग्रंथ वाढवावा लागला आहे, म्हणजे दीड श्लोक द्यावा लागला. तो असा, 'भक्तस्यादौ जलं पीतमग्निसादं कृशाङ्गता। अन्ते करोति स्थूलत्वमूर्ध्वं आमाशयात्कफम् ॥ मध्ये मध्यांगतां साम्यं धातूनां जरणं सुखम्।' इतकें खरें कीं, यांत विवेचन थोडेंसें जास्त झालें आहे. तथापि

१. हा त्याचाच शब्द आहे; व हेमाद्रीनें त्याचा अर्थ 'जेथें प्रकरणार्थ व वाक्यार्थ विच्छिन्न होऊन इकडे तिकडे पसरला आहे' असा केला आहे. 'यत्र प्रकरणार्थो विच्छिद्य सर्वत्र कीर्यंते तानि विप्रकीर्णानि यत्र वाक्यार्थश्च तान्यतिविप्रकीर्णानि' इति हेमाद्रिः।

मुख्यार्थ दोहोंत सारखाच आहे, व वृद्ध वाग्भटांतील ह्या दीड श्लोकांतील अवांतर अर्थ अ०हृ०तील श्लोकार्धांत ध्वनित होतोच. हें श्लोकार्ध वाग्भटाच्या ग्रंथसरणीचें एक उत्तम उदाहरण आहे. तसेंच 'वयोऽहोरात्रिभुक्तानां तेऽन्तमध्यादिगाः क्रमात्' (ह्या ग्रंथाचें पान २ पाहा); 'कालार्थकर्मणां योगा हीनमिथ्यातिमात्रकाः' (पान ४ पाहा); इत्यादि त्याच जातींचीं उदाहरणें आहेत. त्याच्या सर्व ग्रंथांत विशेषेंकरून अ० हृ० त हाच नमुना थोडाबहुत पसरलेला दिसतो. वृद्ध वाग्भटाची ग्रंथसंख्या फक्त या दोन कारणांनींच वाढली आहे असें नव्हे तर त्यांत खरोखर उपयुक्त अशी जास्त माहितीहि दिली आहे ( जसें सू० अ० १२–१३ व १५ ). इतकेंच मात्र कीं, कांहीं ठिकाणीं तादृश महत्त्वाच्या नव्हेत अशाहि गोष्टी सांगितल्या आहेत. जसें, सू० तील १२ व्या अध्यायांत अनेक द्रव्यांचे गुण सांगून 'तमः कषायकटुकं ज्योत्स्नामधुरशीतला' असें जें सांगितलें आहे, तें नुसतें अप्रयोजक आहे एवढेंच नव्हे तर तंत्रदोषालाहि पात्र आहे; कारण 'तम' म्हणजे काळोख हा तुरट व तिखट आहे असें सांगण्यांत कांहींच अर्थ नसून त्यांत एक पूर्वापार विरोधहि दिसून येतो. तो हा कीं, रस हा द्रव्याश्रित आहे असें याच ग्रंथकारानें पुढें १७ व्या अध्यायांत सांगितलें आहे, व काळोख तर द्रव्य नव्हे, तेव्हां त्याचा रस अमुक असें सांगणें हें वंध्यापुत्राचें वर्णन करणें होय. शिवाय त्या वर्णनाचाहि आणखी एका गोष्टीशीं विरोध येतो. तो हा कीं, पुढें १८ व्या अध्यायांत तिखट रस वायु व तेज यांपासून बनतो ( वायुतेजसोः कटुकः ) असें सांगितलें आहे; असें जर आहे तर मग काळोखांत तिखट रस कसा संभवतो? अशा तऱ्हेचीं आणखी कांहीं वाक्यें वृद्ध वाग्भटांत आढळतात. अ० हृ० रचितेवेळीं वाग्भटानें प्रस्तावनेंत सुचविल्याप्रमाणें आपल्या संग्रह ग्रंथाची चांगली चालना करून त्यांतील अप्रयोजक किंवा कमी महत्त्वाचे भाग छाटून टाकून व विस्तृत वाक्यांतील मजकूर संक्षिप्त वाक्यांत आणून त्याहून जास्त सोयीचा असा हा ग्रंथ रचिला. ह्याची ग्रंथसंख्या सुमारें आठ हजार आहे. वृद्धवाग्भटाची ग्रंथसंख्या सुमारें १३००० आहे. आतां वाचकांना प्रस्तुत ग्रंथाच्या रचनेचा प्रकार कसा आहे, त्यांत कोणत्या भागांत कोणत्या विषयाचें वर्णन केलें आहे इ० विषयीं थोडक्यांत माहिती होण्याकरितां पूर्वीं सांगितल्याप्रमाणें

## ह्या ग्रंथाचा अंगप्रत्यंगविचार

ह्या सदराखालीं चार शब्द सांगणें अवश्य आहे. अ० हृ० ग्रंथाचीं एकंदर सहा स्थानें ( भाग ) आहेत: सूत्र–शारीर–निदान–चिकित्सा–कल्प व उत्तरस्थान. अष्टांगहृदय ह्या शब्दाचा अर्थ आयुर्वेदसार. अष्टांग म्ह० आयुर्वेद किंवा वैद्यशास्त्र; कारण त्याचीं आठ अंगें आहेत. तीं अशीं:—कायाचिकित्सा, बालरोगचि०, भूतचि०, शालाक्य०, शल्यतंत्र, विषचि०, रसायनतंत्र व वाजीकरणें. ह्या आठ अंगांचा वरील ६ स्थानांत समावेश होतो. पहिलें जें सूत्रस्थान त्यांत सर्व शास्त्रार्थांचीं मूलतत्त्वें आरोग्यशास्त्र ( Hygiene ), औषधिविद्या ( Materia Medica and Therapeutics ), यंत्रशस्त्रादिकांची माहिती इ० गोष्टी व्यवस्थित रीतीनें व संक्षेपानें वर्णिल्या आहेत. त्याचे एकंदर ३० अध्याय आहेत. त्यांपैकीं पहिल्या अध्यायांत आयुर्वेदाचा इतिहास, प्रमुख ग्रंथकार व एकंदर ग्रंथाची अनुक्रमणिका हीं सांगून वैद्यशास्त्रांतील मोठाल्या सिद्धान्तांचा थोडक्यांत उल्लेख केला आहे. पुढील सात अध्यायांत ज्याला हल्लीं आरोग्यशास्त्र म्हणतात, त्याजविषयीं विचार केला आहे. पुढील दोन अध्यायांत औषधीय द्रव्यांचे रस, वीर्य इत्यादि गुण व त्यांची शरीरावर क्रिया यांजविषयींची माहिती दिली आहे. पुढें चार अध्यायांत वातपित्तकफांचीं निरोगी व रोगी मनुष्यांमध्यें निरनिराळीं कर्में, स्थानें, गुण, अवस्था, ते प्रकुपित झाले असतां त्यांची चिकित्सा व रोगचिकित्सेचे सामान्य नियम यांजविषयींचा विचार केला आहे. नंतर एका अध्यायांत औषधांचे कांहीं वर्ग बांधून ते कोणकोणत्या विकारावर उपयोगी पडतात हें सांगितलें आहे. पुढें नऊ अध्यायांमध्यें स्नेहन, स्वेदन, वमन, विरेचन, बस्ति, नस्य, धूम्रपान इत्यादिकांचें विधान सविस्तर वर्णिलें आहे व शेवटच्या सहा अध्यायांत शल्यतंत्राचीं ( Surgery ) मूलतत्त्वें बऱ्याच विस्तारानें वर्णिलीं आहे.

दुसरें जें शारीरस्थान त्यांत गर्भोत्पत्ति, गर्भपात, गर्भाच्या निरनिराळ्या विकृति, प्रसूतीसंबंधीं संकटें व त्यांचे प्रतिकार, शरीररचना व त्यांतील निरनिराळीं मर्में, वातादिक प्रकृति, आयुष्य, मरणाचीं चिन्हें ( सामान्यतः

१. कारण चरकानें 'खादीन्यात्मा मनः कालोदिशश्च द्रव्यसंग्रहः' असें सांगितलें आहे, त्यांत काळोख येत नाहीं; शिवाय खुद्द वाग्भटानें तर द्रव्य शब्दाची व्याख्या 'पंचभूतात्मकं तत्तु' अशी दिली आहे. ( अ० हृ० सू० अ० ९ )

२. ह्या शब्दांच्या अर्थाकरितां ह्या ग्रंथाच्या २ पानावरील टीप पाहा.

व निरनिराळ्या रोगांमध्यें ) व वैयास बोलाविण्याकरितां आलेल्या मनुष्याच्या लक्षणावरून, इतर शकुनांवरून व रोग्यास पडलेल्या स्वमावरून रोगी जगेल किंवा मरेल हें जाणणें इत्यादि विषयांचें वर्णन केलें आहे. यांत एकंदर आठ अध्याय आहेत.

तिसरें जें निदानस्थान त्याचे एकंदर सोळा अध्याय आहेत. पहिल्या अध्यायांत सर्व रोगांचें सामान्य निदान ( कारण ) सांगून पुढील १५ अध्यायांत सुमारें ४० प्रमुख ( ज्वर, अतिसार, कास, श्वास, क्षय, मेह इत्यादि ) रोगांचीं निदानें सांगितलीं आहेत. अवशिष्ट रोगांचीं निदानें उत्तरस्थानांत दिलीं आहेत.

चौथें जें चिकित्सास्थान त्यांत निदानस्थानांतील एकंदर रोगांची चिकित्सा सविस्तर वर्णिली आहे. त्याचे एकंदर २२ अध्याय आहेत.

पांचवें जें कल्पस्थान त्यांत वमन, विरेचन, व बस्ति यांच्या औषधांचे निरनिराळे कल्प कसे तयार करावे व ते कसे द्यावे यांजविषयीं व वमनादिक प्रयोगांमध्यें चुकी झाल्यानें होणारे विकार व त्यांचे प्रतिकार, औषधांचीं वजनें व मापें व त्यांचे कषायादि कल्प तयार करण्याची रीति इत्यादि गोष्टींविषयीं माहिती दिली आहे. त्याचे एकंदर सहा अध्याय आहेत.

सहावें व शेवटचें जें उत्तरस्थान त्यांत ४० अध्याय आहेत त्यांपैकीं पहिल्या तीन अध्यायांत बालरोग-चिकित्सा निदानसह सांगितली आहे. पुढील चार अध्यायांत भूतबाधा, उन्माद व अपस्मार यांची निदानसह चिकित्सा दिली आहे. पुढील १७ अध्यायांत शालाक्यतंत्राचा अंतर्भाव होतो. यांत डोळे, कान, नाक, तोंड व डोकें यांतील रोगांचा विचार केला आहे. पुढील १० अध्यायांत सर्व शल्यतंत्रसंबंधीं रोगांचा ( Surgical diseases ) विचार केला आहे. नंतर ४ अध्यायांत स्थावर ( बचनाग वगैरे ) व जंगम ( सर्पादि ) विषांची चिकित्सा सांगितली आहे; व शेवटच्या दोन अध्यायांत रसायनतंत्र व वाजिकरण या दोन अंगांचा अंतर्भाव होतो. याप्रमाणें या सहा स्थानांत सर्व आयुर्वेदाचा समावेश केला आहे, त्याचें जें कायचिकित्सा नामक अंग तें निदान व चिकित्सास्थानांत आलें असून बाकीचीं सात अंगें उत्तरस्थानांत आलीं आहेत. वर सांगितल्याप्रमाणें ग्रंथकर्त्यानें सर्व शास्त्रांचीं मूलतत्त्वें सूत्रस्थानांत सांगितलींच आहेत, तथापि ज्या उपपत्तीवर तीं मूलतत्त्वें अवलंबून आहेत, तिचें वाचकांस यथार्थ ज्ञान अल्पायासानें होण्याकरितां पूर्वसंकेताप्रमाणें

## आर्यवैद्यकाचीं मूलतत्त्वें

या सदराखालीं आम्हांस चार शब्द लिहावयाचे आहेत. ह्या उपपत्तीलाच त्रिदोषवाद अशी आम्हीं अन्यत्र पूर्वी एका प्रसंगीं संज्ञा दिली आहे. मनुष्याच्या शरीरांतील रोगी व निरोगी अवस्थेंतील सर्व व्यापार व घडामोडी वात, पित्त व कफ या नांवाच्या तीन पदार्थांपासून सिद्धीस जातात, असें जें आर्यवैद्यकांतील मत किंवा कल्पना त्याचेंच नांव त्रिदोषवाद. ही कल्पना खरी किंवा खोटी याविषयीं येथें आम्हांस कांहीं सांगावयाचें नाहीं; कारण आर्यवैद्यकाचें परीक्षण हा आमचा प्रस्तुत विषय नाहीं. तत्प्रवर्तकांचीं मतें काय होतीं हें सांगणें एवढेंच आमचें तूर्त कर्तव्य आहे, सबब ती कल्पना कशीहि असो तिचें यथार्थ ज्ञान होणें हें आर्यवैद्यक पाहूं इच्छिणारांस अत्यंत आवश्यक आहे. आर्यवैद्यकासंबंधीं कोणतेंहि पुस्तक घ्या; त्यांत वात, पित्त, कफ. हे शब्द येत नाहींत असें एक पान देखील सांपडावयाचें नाहीं. कोणत्याहि रोगाची उत्पत्ति पाहिली तरी ती ह्या तीन पदार्थांच्या विकृतीवर अवलंबून असावयाची. कोणत्याहि औषधाच्या गुणदोषांविषयीं सांगणें झालें तरी त्यांत वात, पित्त, कफ यांस अनुलक्षून कांहीं तरी सांगितलेलें असावयाचेंच. ह्या तीन शब्दांचा अंशतः अर्थ सर्वांस कळतोच; परंतु ऋषींनीं ज्या अर्थानें हे तीन शब्द वैद्यकांत योजिले आहेत त्यांची पूर्ण कल्पना चरकादि ग्रंथांचें चांगलें अवलोकन झाल्या-वांचून यावयाची नाहीं. चरकांतील वातकलाकलीय अध्यायांत व सुश्रुतांतील व्रणप्रश्नाध्यायांत ह्या तीन पदार्थांचें जें वर्णन आढळतें त्यावरून असें दिसतें कीं, बाह्य सृष्टींतील घडामोडींचीं जीं कारणें तींच शरीरांत कांहीं एका रूपांतरानें आढळतात, अशी ऋषींची कल्पना होती. बाह्य सृष्टींत वारा, पाऊस, वीज, मेघगर्जना, वादळ, वणवा, भूकंप, चंद्रसूर्यादिकांची गति, नद्या वाहणें, औषधींची उत्पत्ति, समुद्राची ओहटीभरती, ऋतूंचें परिवर्तन इ० जे अनेक व्यापार घडून येतात त्यांच्या कारणांचा विचार करतां वायु, सूर्य व चंद्र ह्या त्रिपुटीकडे प्राचीन आर्यांचें लक्ष

विशेष गेलें व सर्व घडामोडी त्यांच्याच योगें होतात असें त्यांस दिसून आलें. वेदामध्येंहि ह्या तीन देवतांचें माहात्म्य फार आहे. शरीरांतहि ह्या तिहींपैकीं एक ( वायु ), साक्षात् व दुसरे दोघे ( त्यांच्या कल्पनेप्रमाणें ) रूपांतरानें वास्तव्य करितात असें त्यांस आढळून आलें. वातावरणांत जो वायु आढळतो त्याचाच अंशभूत शरीरांतहि प्राणादि रूपानें तो प्रत्यक्ष उपलब्धच आहे. सृष्टींतील सूर्य किंवा अग्नि शरीरांत पित्ताच्या रूपानें व वरुण किंवा सोम¹ कफाच्या रूपानें शरीरांत राहतात अशी त्यांनीं कल्पना केली. वातपित्तकफांचे हे जे व्यापक अर्थ ते बऱ्याच कालच्या विचारानंतर प्रवृत्तींत आले असावे. प्रथम ते एकदेशीयच असले पाहिजेत, म्हणजे एखाद्या सामान्य मनुष्याच्या समजुतीप्रमाणें वात म्हटला म्हणजे पोट फुगणें, कळा लागणें इ० गोष्टींचें कारण, पित्त म्ह० उलटींतून हिरवें किंवा पिवळें पडतें तें व कफ म्ह० घशांतून पडणारा खाकरा एवढाच त्यांचा अर्थ असला पाहिजे. समाजाच्या बाल्यावस्थेंतील रोग म्हटले म्हणजे ताप, खोकला, जुलाब, वांति, कळा, कावीळ, सूज ( विशेषेंकरून आगंतु म्हणजे अभिघातजन्य ) हे होत; व हे विकार त्यांच्या लक्षणांवरून किंवा कारणांवरून वातादि तीन कारणांपासून होतात असें सांगितलें म्हणजे त्यांचें निदान सांगितल्यासारखें झालें. वाऱ्यांत हिंडण्यानें डोकें दुखूं लागलें; कारण काय ? वायु वाढला. उन्हांत फिरण्यानें डोकें दुखूं लागून वांति झाली; कारण काय ? अर्थात् उन्हानें पित्त खवळलें. ओलींत किंवा पाण्यांत खेळल्यानें पडसें आलें किंवा त्याजपासून पुढें खोकला झाला; कारण काय ? कफ वाढला. वरील कांहीं विकारांत पित्त किंवा कफ प्रत्यक्ष पडलेला दिसतोच. तेव्हां पित्तकफाची वृद्धि हेंच त्या त्या रोगांचें निदान म्हटलें म्हणजे झालें; त्याच्या पलीकडे जा कशास ? नेहमींच्या कांहीं विकारांमध्यें ठळकपणानें भासणारे हे तीन पदार्थ पाहून इतर सर्व रोगांतहि तेच कारणीभूत आहेत असें ते मानूं लागले. पोटफुगीप्रमाणें गुडघ्यांतील किंवा गळ्यांतील ठणक्यास कारण वायुच, पडशाखोकल्याप्रमाणें हिंवतापांतील थंडीस किंवा पंडूंतील सूज किंवा फिकटपणा यांस कारण कफच व कावीळ किंवा इतर पित्तसंचयजन्य विकाराप्रमाणेंच नेत्ररोग, विसर्प इत्यादि विकारांतील लाली, आग वगैरे लक्षणांस कारण पित्तच, अशा प्रकारचा त्यांनीं व्यापक नियम ठरविला. शरीरांत घडणारीं एकंदर रोगलक्षणें एकत्र करून त्यांचें त्यांनीं वर्गीकरण केलें व ज्यांच्यामध्यें थोडेंबहुत सादृश्य दिसलें तीं वेगळालीं काढून त्यांच्या तीन राशि केल्या. आचके, कंप, शूल, ताठणें इ० विकार वातजन्य मानून तसे एकंदर ८० विकार एका राशींत घातले; आग, चुरचुर, लाली, पिंवळटपणा, तृष्णा, स्वेदाधिक्य, इ० ४० विकार पित्तजन्य मानून ते एका राशींत मांडले; व थंडी वाजणें, अंगजाड्य, मुखमाधुर्य, लालास्राव, अग्निमांद्य इ० २० विकार कफजन्य मानून तेहि एका राशींत घातले ( च. सू. अ. २० पाहा ). कित्येक विकारांत रक्तहि वाढल्याचा किंवा नासल्याचा अनुभव आल्यावरून तेंहि एक वातादिकांप्रमाणेंच रोगोत्पादक तत्त्व ( दोष ) आहे असें कित्येकांचें मत असे; परंतु पुढें रक्त हें चवथा दोष मानण्यापेक्षां तें वातादि दोषांनींच दूषित होतें अशी कल्पना करून शरीरांत तीनच दोष आहेत असा सिद्धान्त ठरविला. असें करण्यामध्यें एक तर लाघव आहेच; पण दुसरेंहि एक कारण असें दिसतें, कीं त्या वेळच्या धर्मसंबंधीं किंवा तत्त्वज्ञानसंबंधीं विचारांमध्यें तीन ह्या संख्येस एक प्रकारचें महत्त्व आलें होतें. तीन लोक ( वेदोक्त भूर्भुवस्वः किंवा पुराणोक्त स्वर्गभूपाताल ), तीन अग्नि, तीन वेद, तीन गुण ( सत्त्व, रज व तम ), तीन देव ( ब्रह्मा, विष्णु व महेश ) तीन देह इत्यादि अनेक त्रिपुट्या वेदादिकांत प्रसिद्ध होऊन तीन ही संख्या फार पवित्र व मोहक झाली असल्यामुळें आत्रेयादिकांच्या शरीरांतील शुभाशुभ गोष्टींचें उत्पादक पदार्थ तीनच आहेत, असें ठरविण्याकडे विशेष कल झाला असावा. श्रेष्ठांचें अनुकरण हा एक मनुष्याचा स्वाभाविक धर्मच आहे. वर सांगितलेले वेदत्रय, लोकत्रय, देवतात्रय इत्यादिकांत सूचक जें ॐ हें अक्षर त्याचें वेदादिकांत किती माहात्म्य सांगितलें आहे व प्रणव या संज्ञेनें त्याची किती प्रसिद्धि झाली आहे हें बहुतेकांस माहीत आहेच. हें अक्षर अ, उ व म या तीन अक्षरांपासून झालें आहे व तें अनेक त्रितयांचें सूचक आहे असें एका उपनिषदांत वर्णन आढळतें. छांदोग्योपनिषदाचा आरंभच ॐकाराच्या वर्णनानें व प्रशंसेनें भरला आहे. वेदादिकांप्रमाणें वैद्यकांतहि एक त्रिपुटी असावी असें आत्रेयादिकांस वाटणें त्या वेळच्या समजुतीप्रमाणें साहजिकच आहे.

---

१. अग्निरेव शरीरे पित्तान्तर्गतः कुपिताकुपितः शुभाशुभानि करोति ।

च० सू० अ० १२.

२. सोम एव श्लेष्मान्तर्गतः कुपिताकुपितः शुभाशुभानि करोति ।

च० सू० अ० १२.

प्राचीनांचा अशा प्रकारचा कल असावा असें चरकाच्या सूत्रस्थानांतील तिस्रैषणीय अध्यायावरून अनुमान करतां येतें. ह्या अध्यायांत प्रत्येक मनुष्यानें तीन गोष्टी साधाव्या असें सांगून प्राणैषणा, धनैषणा व परलोकैषणा ह्या विवक्षित तीन गोष्टींचें वर्णन केलें आहे, व हा जो त्या अध्यायाचा मुख्य विषय तो संपल्यावर आणखी ७–८ त्रिपुट्या एकत्र सांगून त्यांचें वर्णन केलें आहे. त्यांत ह्या त्रिपुटीच्या मालिकेंत ढकलून देण्याकरितां रोगहि तीन प्रकारचे मानले आहेत; परंतु सुश्रुताप्रमाणें ते चार व त्यांचा संक्षेप केल्यास ( वाग्भटांत सांगितल्याप्रमाणें ) ते दोनच प्रकारचे ( निज व आगंतु ) होतात. तरी केवळ ह्या त्रिपुटीच्या मालिकेंत घालण्याकरितां चरकानें प्रस्तुत अध्यायांत रोगांचे तीन मुख्य विभाग केले आहेत. ( ह्या विभागांत इंग्रजींत ज्याला cross division म्हणतात तो दोष आढळतो ). अशा प्रकारच्या व्यवस्थेमध्यें एक फायदा आहे; तो हा कीं, त्याचे योगानें विषय विद्यार्थ्यांच्या ध्यानांत चांगला राहतो. सारांश काय, कीं ही जी वैद्यकांतील त्रिपुटीची कल्पना ती अशा प्रकारच्या अनेक कारणांवरून ऋषींना पसंत पडून तीच आपल्या वैद्यकांत कायम झाली. आतां ह्या त्रिपुटीवर सर्व शारीरिक व्यापार त्यांच्या मतें कसे अवलंबून राहतात तें पाहूं. जड पदार्थांहून भिन्न अशा जिवंत शरीरांत मुख्य तीन गोष्टी आढळून येतात; हालचाल, उष्णता व सद्रवता. कोणत्याहि स्थितींतील व कोणत्याहि प्राण्याचें शरीर घ्या, जोंपर्यंत त्यांत जीव आहे तोंपर्यंत ह्या तीन गोष्टी तेथें असावयाच्याच. गाढ निद्रेनें किंवा मूर्च्छेनें निश्चल झालेल्या मनुष्याचे जरी हातपाय स्थिर झाले असले, तरी बारकाईनें पाहिलें म्हणजे त्याच्या छातीचा संकोचविकास व हृदयाचें उडणें नियमित वेगानें सतत चालूं असतें असें दिसून येईल. तसेंच बाहेरील हवेंत पाणी थिजण्याजोगा गारठा असो किंवा तूप वितळण्याजोगी उष्णता असो, मनुष्याच्या अंगांत एका नियमित प्रमाणाची उष्णता नेहमीं कायम राहावयाचीच; त्याचप्रमाणें बाहेरील हवा अत्यंत रुक्ष व उष्ण झाल्यामुळें जेव्हां सर्व जलाशय सुकून कोरडे पडतात तेव्हां देखील मनुष्याच्या तोंडांत व इतर स्रोतसांत आर्द्रता असते व स्वेदमूत्रादिकांच्या प्रवृत्तीवरून आंतील भागांची सद्रवता सिद्ध होते. ह्या गोष्टींच्या अवलोकनानंतर ऋषींना जे प्रश्न व त्यांचीं उत्तरें सुचलीं तीं येणेंप्रमाणें:–( ऋषी म्हणतात ) “ जिवंत शरीराचीं हीं जीं तीन मुख्य लक्षणें त्यांपैकीं पहिलें म्हणजे हालचाल ही कोणत्या तत्त्वापासून असेल बरें ? बाह्य सृष्टींत झाडांच्या हालचालीचें जें कारण तेंच आंतील हालचालीचें, अर्थात् वायु. शरीराच्या उष्णतेची उत्पत्ति कशापासून ? बाह्यसृष्टींतील उष्णतेची उत्पत्ति ज्या सूर्यापासून किंवा अग्नीपासून त्याच्याच-सारख्या पिंवळ्या रंगाचें व म्हणूनच तद्रूप जें पित्त त्यापासून. शरीरांतील जो जलांश तो कशापासून ? बाह्यसृष्टींतील जलांशास चंद्र किंवा वरुण कारण आहे असें वेदांत सांगितलें आहे, तर वर्णानें तत्सदृश व म्हणूनच तदंशभूत जो कफ तोच त्या जलांशाचें कारण. शरीरांत ( मग तें रोगी असो अथवा निरोगी असो ) जे जे म्हणून व्यापार चालले आहेत ते सर्व हालचाल आदिकरून ह्या तीन कोटींमध्यें अंतर्भूत होतात व म्हणून सर्वच व्यापार वात, पित्त व कफ ह्या तीन पदार्थांवर अवलंबून आहेत असा सिद्धान्त ठरतो. पापण्याचे निमेषोन्मेष, हस्तपादादिकांचें आकुंचनप्रसारण, नाड्यांचें स्फुरण, श्वासोच्छ्वास, मलमूत्रोत्सर्ग, रुधिराभिसरण, स्पर्शज्ञान, मुंग्या येणें, आंचके, शूळ, ठणका, वगैरे सर्व प्रकारांचा हालचाल ह्या शब्दामध्यें अंतर्भाव होतो. म्हणून त्या सर्वांचें उत्पादक कारण वायु; इतकेंच नव्हे तर ज्याअर्थी बाह्य वायूच्या अंगीं हालचालीखेरीज शोषण करणें, रुक्षता व लघुत्व हेहि गुण आहेत त्याअर्थीं ज्या ज्या विकृतीमध्यें हे गुण दिसून येतील तिचेंहि कारण वायुच असलें पाहिजे. मळाचा खडा होणें, मूत्रांत रेती किंवा खडा जमणें, पोट फुगणें, क्षयरोगानें शरीर सुकणें हीं सर्व वायूपासूनच. हातापायांची आग, डोळ्यांचें चुरचुरणें, घशाशीं जळजळणें, ज्वराची उष्णता, घाम येणें, अन्नाचा पाक, रसाचा रक्तमांसादि रूपानें परिपाक, इत्यादि गोष्टींचा उष्णता किंवा तत्कार्यें ह्या सदराखालीं अंतर्भाव झाल्यामुळें त्या सर्वांचें आदिकारण पित्त; इतकेंच नव्हे, तर ज्या अर्थीं बाह्याग्नीमध्यें उष्णतेखेरीज प्रकाश पाडणें व वायूची, वाफेची किंवा कोणत्याहि परमाणूंची प्रतिसारकशक्ति वाढविणें हेहि गुण आहेत त्याअर्थीं पित्तसंज्ञक जो शरीरगत अग्नि तोच नेत्रांना दर्शनशक्ति, त्वचेला सतेजता, रक्ताला लाली व मनाला ऐच्छिक गतीची शक्ति देतो. तसेंच खाल्लेल्या भाकरीचा पोटांत रस करणें, जिभेला ओलावा व रसज्ञता आणणें, डोक्यांतील मेंदू व त्याचे द्वारां इंद्रियें आर्द्र राखणें, सांध्यांना वंगण देणें (म्ह० त्यांत एक बुळबुळीत पदार्थ उत्पन्न करणें), सूज उत्पन्न करणें, अग्नि मंद करणें, स्रोतसांचे स्राव वाढविणें, मल, मूत्र, नेत्र, अंग किंवा एखादा अवयव पांढरा फटफटीत करणें, तोंडास चिकटा, अरुचि, लालास्राव, थंडी, व तत्सदृश दुसऱ्या अनेक शुभाशुभ गोष्टींचा जलांशाशीं फार निकट संबंध असल्यामुळें त्या सर्वांचें कारण कफ. ”

अशा प्रकारचे विचार करून पुरातन ऋषींनीं आपल्या वैद्यकांतील त्रिदोषवाद स्थापित करण्याचा प्रयत्न केला. वर दर्शविल्याप्रमाणें शरीरांतील एकंदर शुभाशुभ गोष्टींचे प्रकार अनेक असल्यामुळें वातादि तीन पदार्थांपैकीं प्रत्येकाचे त्यांनीं ५–५ पोटभेद करून त्यांपैकीं प्रत्येकाकडे एकेक गोष्ट सोंपवून दिली आहे. उदाहरणार्थ, वायूच्या प्राणादि पांच कल्पित भेदांपैकीं प्राणवायु, थुंकणें, शिंकणें, ढेकर, श्वास घेणें व अन्नाचा कोठ्यांत प्रवेश इत्यादिकांस कारणीभूत मानिला आहे; पित्ताच्या पाचकादि पांच कल्पित भेदांपैकीं रंजक, आलोचक व साधक ह्यांजकडे रस रंगविणें, नेत्रांना दर्शनशक्ति देणें व बुद्धीनें इच्छित क्रिया करणें ह्या गोष्टी अनुक्रमें सोंपविल्या आहेत; व कफाच्या कल्पित पांच प्रकारांपैकीं श्लेषक, बोधक व तर्पण ह्यांजकडे सांधे जुळविणें, जिव्हेस रसज्ञता देणें व इंद्रियें पोसणें ह्या क्रिया सोंपविल्या आहेत.

याप्रमाणें शारीर व इंद्रियविज्ञानशास्त्र यांसंबंधीं जे रुधिराभिसरणादि अर्वाचीन शोध त्यांच्या अभावीं शारीरिक गोष्टींविषयींची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां ह्या व्यापक अशा (व म्हणूनच काल्पनिक) वातपित्तकफांची पुरातन ऋषींनीं उभारणी केली आहे. पाश्चिमात्य वैद्यकांची किंवा हल्लींच्या, रसायन, पदार्थविज्ञान किंवा इंद्रिय-विज्ञानशास्त्राची ज्यांस चांगली माहिती आहे त्यांस ही पुरातन ऋषींची कल्पना अगदीं मिथ्या व तुच्छ वाटून आपल्या वैद्यकाविषयींची त्यांची पूज्यबुद्धि नाहींशी होण्याचा संभव आहे; परंतु विचाराअंतीं असें दिसून येईल कीं, रोगाच्या उपपत्तीकरितां आपल्या वैद्यकांत जरी ह्या काल्पनिक त्रिदोषवादाची उभारणी केली आहे तरी त्यांची चिकित्सा इतर वैद्यकांप्रमाणें अनुभवानेंच ठरविली आहे. व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक शास्त्रामध्यें अनुभवाचें प्राधान्य असतें; इतकेंच नव्हे, तर तीं प्रथम अनुभवावरच रचिलीं असतात. प्रथम अनुभव व मागाहून उपपत्ति हाच नियम सर्वत्र लागू आहे. चंद्रसूर्यांच्या ग्रहणाची खरी उपपत्ति कळली नसली तरी अनुभवानें शोधून काढलेल्या नियमानुसारें पुढें येणारीं ग्रहणें वर्तवितां येतात. गांवढळ कुणब्यास कॅर्बॉनिक ॲसिड् किंवा ऑक्सिजन् वायूची माहिती नसून देखील नुकतेंच उघडलेल्या पेवांत उतरण्यापूर्वी तो त्यांत दिवा सोडून पाहतो व आंतील हवेंत तो विझेनासा झाला म्हणजे तो त्यांत उतरतो. यंत्रशास्त्राचे नियम माहीत नसणारा पाथरवटहि धोंडा उचलण्यास तरफ व टेंकू यांची योजना करतो. पाणी गार करणें झाल्यास लोक भांड्याला ओलें फडकें गुंडाळतात, परंतु त्यांस पदार्थविज्ञानांतील उष्णतेचे धर्म माहीत नसतात. ह्या व दुसऱ्या शेंकडों उदाहरणांवरून असें दाखवितां येईल कीं, यथायोग्य क्रिया होण्याला उपपत्तीची जरूरी आहेच असें नाहीं. चिकित्साशास्त्राच्यासंबंधानें हा नियम विशेषेंकरून लागू पडतो. रोगाच्या उपपत्तीचें लेशमात्रहि ज्ञान नसून रानटी लोकांस कांहीं कांहीं रोगांवरचे, व जखमेवरचे आणि विषारांवरचे फार चांगले उपाय माहीत असतात. फार तर काय जनावरांस देखील कांहीं कांहीं विकारांचे उपाय स्वभावतःच समजतात; व कित्येकांचें तर असें म्हणणें आहे कीं, वैद्यकांतल्या कांहीं कांहीं गोष्टींची माहिती मनुष्यानें जनावरांपासून मिळविली आहे. प्लिनीनामक ग्रंथकर्त्यानें असें म्हटलें आहे कीं, शिरावेधाची माहिती मिसरदेशांतील लोकांनीं हिपोपोटेमस [ पाणगेंडा ] या जनावरापासून मिळविली. हें जनावर खूप लठ्ठ झालें म्हणजे रक्तवृद्धीपासून विकार न व्हावेत म्हणून तें नदीच्या कांठीं जाऊन, तेथें जे कापून नेलेल्या बरूंचे खुंट राहिले असतात त्यांपैकीं तीक्ष्ण अग्राचा एखादा पाहून त्याजवर आपली लठ्ठ- तंगडी जोरानें दाबतें, त्याचे योगानें पायाच्या शिरेस जखम होऊन रक्तस्राव सुरू होतो. रक्त बंद करणें झालें म्हणजे तें त्या जखमेस चिकणमाती लावून तिचें तोंड बंद करतें. मांजराचें पोट दुखूं लागलें म्हणजे वमन होण्याकरितां तें गवत खातें ही गोष्ट तर सर्वांस विश्रुतच आहे. रानटी लोकांपासून तर अनेक औषधें सुधारलेल्या लोकांना प्राप्त झालीं आहेत व अजून होत आहेत. असें जर आहे तर तीन चार हजार वर्षांचा अनुभव जो आपल्या वैद्यकांत आत्रेयादिकांनीं नोंदून ठेविला आहे त्याचा अनादर करणें असमंजस नव्हे काय? अनुभवसिद्ध गोष्टी कोणत्या व केवळ तर्कावलंबी गोष्टी कोणत्या हें प्राचीन ऋषींना पूर्णपणें अवगत होतें; म्हणूनच त्यांनीं चिकित्सेचा नियम असा घालून दिला आहे कीं, ती लक्षणांवरून करावी. (लिंगैर्व्याधिमुपाचरेत्) व औषधांच्या गुणदोषांचें जें परीक्षण करणें तें शास्त्रांत षड्रसाचे गुणदोष सांगितले आहेत त्यांजवरून न करतां अनुभवानेंच करावें. निदानशास्त्रांत जसा हा त्रिदोषवाद तद्वतच चिकित्साशास्त्रांत औषधाच्या क्रियेची उपपत्ति सांगण्याकरितां आर्य-वैद्यकांत द्रव्य, रस, वीर्य, विपाक व प्रभाव अशीं औषधामध्यें त्यांनीं पांच तत्त्वें कल्पून त्यांचे भेद व परस्पर-

संयोग इत्यादींविषयीं पुष्कळ ऊहापोह केला आहे. परंतु ह्या सर्व उपपत्तींचा क्रियेमध्यें उपयोग करून फसूं नये म्हणून सुश्रुतानें एतद्विषयक अध्यायाचे अखेरीस तात्पर्यरूपानें दोन फार महत्त्वाचे श्लोक दिले आहेत. त्यांत त्यानें सदरहु अध्यायांत सांगितलेल्या रसादिविषयक हेतुवादाचा क्रियेमध्यें उपयोग करूं नये असें स्पष्ट सांगितलें आहे.[1] तसेंच त्रिदोषवादाची उभारणी करण्याकरितां जे वातादिकाचे पांच पांच प्रकार कल्पिले आहेत ते काल्पनिकच होत अशी चरकाची तरी निदान खात्री असली पाहिजे; कारण हा इतका स्पष्टवक्ता आहे कीं, त्यानें शारीरस्थानांतील ७ व्या अध्यायांत शरीरांतील मुख्य मुख्य भाग कथन करून शेवटीं असें म्हटलें आहे कीं, ह्याशिवाय नऊशें स्नायु, सातशें शिरा, दोनशें धमन्या, १०७ मर्में इ० जे भाग सांगितलेले असतात ते केवळ तर्क्य आहेत व पूर्वीं सांगितलेले मात्र दृश्य आहेत. आतां ज्यानें स्नायु, शिरा, वगैरे स्थूल भागाची जी वैद्यकोक्त संख्या ती केवळ तर्क्य असें स्पष्ट सांगितलें आहे. त्याच्या मतें त्यांहून सूक्ष्मतर [व एक तर अमूर्तच] असे जे वातादिदोषांचे पांच प्रकार तेहि त्यानें काल्पनिकच मानिले असतील हें उघड आहे. निदान इतकें खचित आहे कीं, हेतुवाद चिकित्सेमध्यें अगदीं उपयोगी नाहीं अशी सर्व पुरातन ग्रंथकर्त्यांची खात्री होती असें त्या त्या रोगाची चिकित्सा वाचतेवेळीं क्षणोक्षणीं नजरेस येतें. यास्तव सर्व आधुनिक विद्वानांस विशेषेंकरून पाश्चिमात्य वैद्यक जाणणारांस आम्ही असें सुचवितों कीं, त्यांनीं आपल्या वैद्यकांतील त्रिदोषवादाच्या किंवा तत्सदृश इतर औपपत्तिक भागाच्या मिथ्यात्वावरून त्याच्या उपयुक्ततेविषयीं साशंक होऊं नये. तसेंच पुरातन वैद्यकाच्या परीक्षणार्थ जी कसोटी लावावयाची ती त्या कालानुरूप पाहिजे; आधुनिक पाश्चिमात्य शास्त्रानें शोधून काढलेली उपयोगी नाहीं. त्या मन्वंतरांतील लोकस्थितीकडे लक्ष दिलें असतां वैद्यकप्रवर्तक ऋषींचे दीर्घपरिश्रम, विचारशक्ति, कुशाग्रबुद्धि, हस्तकौशल्य इत्यादि गुण खरोखरच फार आश्चर्यकारक दिसतात. जरी त्या काळच्या अल्पसाधनामुळें शरीरांतील इंद्रियांचे व्यापार त्यांस यथार्थतः समजले नव्हते तरी रोगाचें नामाभिधान, वर्गीकरण, लक्षणनिरूपण, हेतुनिर्देश, साध्यासाध्यविचार व प्रतिकार यासंबंधानें जें त्यांनीं शोध केले ते फार महत्त्वाचे आहेत. हल्लींच्या देशी वैद्यक्रियेंत लुप्त झालेली जी शस्त्रक्रिया तीहि प्राचीन वैद्यकाचें एक महत्त्वाचें अंग होतें; मुतखडा काढणें, मोतींबिंदु खालीं दडपणें, ग्रंथि कापून टाकणें, जलोदर वेधणें, गर्भविमोचन, नासिका-करण ( Rhinoplasty ) वगैरे अनेक शस्त्रक्रिया ते फार चलाखीनें व कुशलतेनें करीत. ही शेवटची शस्त्रक्रिया तर युरोपांत देखील इकडूनच गेली असें इतिहासज्ञ लोकांचें मत आहे[2]. प्राचीन काळीं आपल्या वैद्यकाची कीर्ति इतकी दूरवर पसरली होती कीं, आरब लोकांनीं ८ व्या शतकाच्या सुमारास बगदादच्या खलीपाच्या हुकुमावरून चरक व सुश्रुत यांचीं भाषांतरें आपल्या भाषेंत केलीं; व हीं भाषांतरेंच आरबी वैद्यकाचा मूळ पाया आहे. युरोपियन वैद्यक १७ व्या शतकापर्यंत अंशतः आरबी वैद्यकाच्या आधारावरच रचिलें होतें. यावरून असें दिसून येईल कीं, जरी गेल्या दोन तीन शतकांत झालेल्या शोधामुळें युरोपियन वैद्यकाचें एक फारच मोठें स्थित्यंतर झालें आहे, तरी त्याचें मूळचें भांडवल अंशतः तरी आपल्या इकडचेंच आहे. अलिकडच्या युरोपियन वैद्यकांनींहि आपल्या वैद्यकांतील औषधांचा थोडाबहुत स्वीकार केला आहे व करीत आहेत, परंतु आजपर्यंत ऋषींच्या अनुभवाचा फारच थोडा अंश त्यांच्या हातीं आला आहे. त्याचा पूर्ण उपयोग करून घेणें हें हल्लीं इंग्रजी वैद्यकांत निष्णात झालेल्या आपल्या देशबांधवांचें कर्तव्य आहे. व जर ते वाग्भटाचें चांगलें अवलोकन करतील तर हें कर्तव्य बजावण्याचें काम त्यांच्या हातून चांगलें सिद्धीस जाईल अशी आम्हांस फार उमेद आहे. शारीर व शल्यतंत्र ह्या दोन भागां-

१. प्रत्यक्षलक्षणफलाः प्रसिद्धाश्च स्वभावतः । नौषधीर्हेतुभिर्विद्वान् परीक्षेत कथञ्चन ॥
सहस्रेणापि हेतूनां नाम्बष्ठादिर्विरेचयेत् । तस्मात्तिष्ठेत्तु मतिमानागमे न तु हेतुषु ॥

सु० सू० अ० ४०.

२. हंटरसाहेबांनीं केलेला हिंदुस्थानचा इतिहास पाहा.
( The Indian Empire by W. W. Hunter P. 161. )

खेरीज इतर सर्व भागांमध्यें नवीन व उपयुक्त असें त्यांस बरेंच सांपडेल अशी आमची खात्री आहे. आर्यवैद्यकाच्या पुनरुज्जीवनाचा भार सर्वथैव त्यांच्यावर असल्यामुळें ते त्यांतील औषधांचें मनःपूर्वक अन्वेषण करतील अशी आम्हांस आशा आहे. असें करण्यास ईश्वर त्यांस बुद्धि देवो अशी आमची त्याजपाशीं प्रार्थना आहे; व शेवटीं हा लेख लिहितांना रा. रा. काशिनाथ बापू पाठक, बी. ए. यांनीं जैनधर्मासंबंधीं कांहीं माहिती दिल्याबद्दल व प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या कांहीं सूचनांबद्दल उभयतांचे आम्ही आभारी आहोंत असें सांगून हा बराच लांबत आलेला उपोद्घात पुरा करितों.

—ग्रंथकर्ता.

# विशेष सूचना

ह्या भाषांतरांत औषधांचीं नांवें फार व वारंवार येतात; यास्तव सर्वत्र पदार्थांचीं नांवें विस्तारानें देतां आलीं नाहींत. जसें, 'कडुलिंब,' 'अडूळसा,' 'रुई' इत्यादि पदार्थ विस्तारानें लिहिणें म्हणजे प्रत्येक ठिकाणीं 'कडूलिंबाची साल,' 'अडुळशाचीं पानें,' 'रुईचें मूळ इत्यादि' प्रकारें ग्रंथ वाढवावा लागतो. सबब बऱ्याच ठिकाणीं मूळ श्लोकांप्रमाणें भाषांतरांतहि संक्षेपानेंच नांवें दिलीं आहेत. विशेष स्पष्टीकरण सामान्य परिभाषेवरून व सांप्रदायावरूनच झालें पाहिजे. या परिभाषेपैकीं कांहीं गोष्टी येथें नमूद केल्या असतां वाचकांस बरीच मदत होईल; त्या अशा :—जेथें नुसतें दूध, तूप व दहिं, ताक, इ० सांगितलें असेल तेथें गाईचेंच घ्यावें. नुसतें तेल म्हटलें असेल तर तिळाचें समजावें. जेथें भागनिर्देश नाहीं तेथें सर्व द्रव्यें समभाग घ्यावीं. जेथें नुसतीं औषधें सांगितलीं असून त्यांचा काढा, चूर्ण किंवा काय करावें हें सांगितलीं नाहीं तेथें त्यांचा कल्क घ्यावा. गूळ, तूप, मध, पिंपळी, वावडिंग व तांदूळ वगैरे धान्य इतके पदार्थ नेहमीं जुने ( वर्षातीत ) घ्यावे. गोखरू, रिंगणी वगैरेंसारखी लहान झाडें असतील तीं सबंध ( मुळापानासुद्धां ) घ्यावीं. निंब, सातवीण वगैरेंच्या साली, रुई, चित्रक, शेरणी वगैरेंच्या मुळ्या, जाई, अडुळसा, तुळस वगैरेंचा पाला इत्यादि प्रकारें सत्त्वांशानुरूप तो तो भाग घ्यावा. जीं मुळें फार जाड असतात त्यांची त्वचाच तेवढी काढून घ्यावी. तसेंच आमच्या भाषांतरांत नुसती साखर म्हणजे खडीसाखर व निवडुंग म्हणजे त्रिधारी समजावा.

भाषांतरांत जे कठीण शब्द आढळतील त्यांचा अर्थ ग्रंथाचे अखेरीस जो कोश दिला आहे त्यांत पाहावा. एखादा पारिभाषिक शब्द या कोशांत आला नसल्यास एकंदर ग्रंथाचें जें वर्णानुक्रम सूचिपत्र दिलें आहे त्यावरून त्या शब्दाचें लक्षण ग्रंथांत जेथें दिलें असेल तेथें पाहावें. सूत्रस्थानाच्या २५–२६ अध्यायांत जीं नानाविध यंत्रें व शस्त्रें वर्णिलीं आहेत त्यांपैकीं बहुतेकांचीं चित्रें अखेरीस दिलीं आहेत, त्यांजवरून वर्णनाचा अर्थ व यंत्रादिकांचा आकार चांगला कळून येईल. यांच्याच पुढें निरनिराळ्या प्रदेशांवर कांहीं खुणा व आंकडे टाकून ज्या शरीराच्या व त्याच्या भागांच्या आकृति दिल्या आहेत त्यांत शारीरस्थानाच्या ४ थ्या अध्यायांत सांगितलेल्यांपैकीं बहुतेक मर्में दाखविलीं आहेत. हीं दोनहि प्रकारचीं चित्रें त्या त्या अध्यायासंबंधीं टिपा जेथें आल्या आहेत तेथेंच पाहिजे होतीं, परंतु बांधण्याच्या वगैरे सोईकरितां तीं अखेरीस दिलीं आहेत.

---

## संक्षिप्त संज्ञांचें विवरण

अ०—अध्याय.
अ० सं०—अष्टांगसंग्रह.
अ० हृ०—अष्टांगहृदय.
उ०—उत्तरस्थान.
क०—कल्पस्थान
च०—चरक.
चि०—चिकित्सा किंवा चिकित्सास्थान.
पा०—पाद किंवा पाणिनी.
नि०—निदान किंवा निदानस्थान.
र० स०—रसरत्नसमुच्चय.
वा०—वाग्भट [ अ० हृ० ].
शा०—शारीरस्थान.
स० सु०—सर्वांगसुंदर.
सु०—सुश्रुत.
सू०—सूत्र किंवा सूत्रस्थान.

# अनुक्रमणिका


| अध्यायांचीं नांवें. | पान. |
|---|---|
| **सूत्रस्थान** | |
| १ आयुष्कामीयः ... ... | १ |
| २ दिनचर्या ... ... | ७ |
| ३ ऋतुचर्या ... ... | ११ |
| ४ रोगानुत्पादीयः ( रोग न होऊं देण्याविषयीं ) | १५ |
| ५ द्रवद्रव्यविज्ञानीयः ( द्रवपदार्थविज्ञान ) ... | १७ |
| ६ अन्नस्वरूपविज्ञानीयः ( भक्ष्यपदार्थांच्या गुणदोषांविषयीं ) | २३ |
| ७ अन्नरक्षा ... ... | ३६ |
| ८ मात्राशितीयः ... ... | ४१ |
| ९ द्रव्यादिविज्ञानीयः ... .... | ४५ |
| १० रसभेदीयः ... ... | ४८ |
| ११ दोषादिविज्ञानीयः ... ... | ५१ |
| १२ दोषभेदीयः ... ... | ५४ |
| १३ दोषोपक्रमणीयः ( दोषांच्या चिकित्सेविषयीं ) | ६० |
| १४ द्विविधोपक्रमणीयः ( दोन प्रकारच्या चिकित्सेविषयीं ) | ६३ |
| १५ शोधनादिगणसङ्ग्रह ... ... | ६६ |
| १६ स्नेहविधिः ... ... | ६९ |
| १७ स्वेदविधिः ... ... | ७३ |
| १८ वमनविरेचनविधिः ... ... | ७५ |
| १९ बस्तिविधिः ... ... | ७९ |
| २० नस्यविधिः ... ... | ८५ |
| २१ धूम्रपानविधिः ... ... | ८८ |
| २२ गण्डूपादिविधिः ( गुळण्या वगैरे करण्याविषयीं ) | ८९ |
| २३ आश्चोतनाञ्जनविधिः ( डोळ्यांत थेंब सोडणें, अंजन करणें. ) | ९२ |
| २४ तर्पणपुटपाकविधिः ... ... | ९४ |
| २५ यन्त्रविधिः .... ... | ९५ |
| २६ शस्त्रविधिः ... ... | ९९ |
| २७ सिराव्यधविधिः ... ... | १०४ |
| २८ शल्याहरणविधिः ( शरीरांतील शल्यें बाहेर काढण्याविषयीं ) | १०७ |
| २९ शस्त्रकर्मविधिः ... ... | १११ |
| ३० क्षाराग्निकर्मविधिः ( क्षारकर्म व अग्निकर्म यांविषयीं ) | ११७ |
| **शारीरस्थान** | |
| १ गर्भावक्रान्तिः ( गर्भाच्या उत्पत्तीविषयीं ) ... | १२१ |
| २ गर्भव्यापदः ... ... | १२८ |
| ३ अङ्गविभागः ( शरीराच्या विभागांविषयीं ) ... | १३२ |
| ४ मर्मविभागः ... ... | १४३ |
| ५ विकृतिविज्ञानीयः ( मृत्युचिन्हें समजण्याविषयीं ) | १५० |
| ६ दूतादिविज्ञानीयः ( दूतादिकांचे शुभाशुभ प्रकार ) | १५९ |
| **निदानस्थान** | |
| १ सर्वरोगनिदानम् ... ... | १६४ |
| २ ज्वरनिदानम् ... ... | १६६ |
| ३ रक्तपित्तकासनिदानम् ... ... | १७१ |
| ४ श्वासहिध्मानिदानम् ( दमा व उचकी यांचें निदान ) | १७४ |
| ५ राजयक्ष्मादिनिदानम् ... ... | १७६ |
| ६ मदात्ययनिदानम् ... ... | १८० |
| ७ अर्शसां निदानम् ( मूळव्याधीचें निदान ) ... | १८२ |
| ८ अतिसारग्रहणीरोगयोर्निदानम् ... ... | १८६ |
| ९ मूत्राघातनिदानम् ( मूत्राघाताचें निदान ) ... | १८८ |
| १० प्रमेहनिदानम् ... ... | १९० |
| ११ विद्रधिवृद्धिगुल्मनिदानम् ... ... | १९३ |
| १२ उदरनिदानम् ... ... | १९७ |
| १३ पाण्डुरोगशोफविसर्पनिदानम् ... ... | २०० |
| १४ कुष्ठश्वित्रकृमिनिदानम् ... ... | २०४ |
| १५ वातव्याधिनिदानम् ... ... | २०८ |
| १६ वातशोणितनिदानम् ... ... | २१२ |
| **चिकित्सास्थान** | |
| १ ज्वरचिकित्सा ... ... | २१७ |
| २ रक्तपित्तचिकित्सा ... ... | २२८ |
| ३ कासचिकित्सा ( खोकल्याची चिकित्सा ) ... | २३१ |
| ४ श्वासहिध्माचिकित्सा ( दमा व उचकी यांची चिकित्सा ) | २४१ |
| ५ राजयक्ष्मादिचिकित्सा ... ... | २४४ |
| ६ छर्दिहृद्रोगतृष्णाचिकित्सा ( ओकारी, हृद्रोग व शोष यांची चिकित्सा ) ... ... | २४९ |
| ७ मदात्ययचिकित्सा ... ... | २५४ |
| ८ अर्शसां चिकित्सा ( मूळव्याधीची चिकित्सा ) | २६० |
| ९ अतिसारचिकित्सा ... ... | २७० |
| १० ग्रहणीरोगचिकित्सा ... ... | २७७ |
| ११ मूत्राघातचिकित्सा ... ... | २८३ |
| १२ प्रमेहचिकित्सा ... ... | २८६ |
| १३ विद्रधिवृद्धिचिकित्सा ... ... | २८९ |

| अध्यायांचीं नांवें. | पान. |
|---|---|
| १४ गुल्मचिकित्सा ... ... | २९२ |
| १५ उदरचिकित्सा ... ... | ३०० |
| १६ पाण्डुरोगचिकित्सा ... ... | ३०७ |
| १७ श्वयथुचिकित्सा ( सुजेची चिकित्सा ) ... | ३१० |
| १८ विसर्पचिकित्सा ... ... | ३१३ |
| १९ कुष्ठचिकित्सा ... ... | ३१५ |
| २० श्वित्रकृमिचिकित्सा ( कोड व जंत यांची चिकित्सा ) | ३२२ |
| २१ वातव्याधिचिकित्सा ... ... | ३२४ |
| २२ वातशोणितचिकित्सा ( वातरक्तचिकित्सा ) | ३२९ |

**कल्पस्थान**

| | |
|---|---|
| १ वमनकल्पः ( वमनाचे योग ) ... | ३३५ |
| २ विरेचनकल्पः ( रेचकाचे योग ) ... | ३३८ |
| ३ वमनविरेचनव्यापत्सिद्धिः ( वमनविरेचनापासून होणाऱ्या विकारांची चिकित्सा ) ... ... | ३४१ |
| ४ बस्तिकल्पः ( बस्तीचे योग ) ... | ३४४ |
| ५ बस्तिव्यापत्सिद्धिः ( बस्तीपासून होणाऱ्या विकारांची चिकित्सा ) ... ... | ३४८ |
| ६ भेषजकल्पः ( औषधें तयार करणें वगैरेविषयीं ) | ३५१ |

**उत्तरस्थान**

| | |
|---|---|
| १ बालोपचरणीयः ( मुलांच्या उपचाराविषयीं ) | ३५४ |
| २ बालामयप्रतिषेधः ( बालरोगांची चिकित्सा ) | ३५७ |
| ३ बालग्रहप्रतिषेधः ( मुलांच्या झटक्याची निदानासह चिकित्सा ) ... ... | ३६१ |
| ४ भूतविज्ञानम् ( भूतबाधेविषयीं ) ... | ३६४ |
| ५ भूतप्रतिषेधः ( भूतबाधेची चिकित्सा ) ... | ३६७ |
| ६ उन्मादप्रतिषेधः ( उन्मादाची चिकित्सा ) ... | ३७० |
| ७ अपस्मारप्रतिषेधः ( फेपऱ्याची चिकित्सा ) ... | ३७४ |
| ८ वर्त्मरोगविज्ञानीयः ( पापणीचे रोगांविषयीं ) | ३७६ |
| ९ वर्त्मरोगप्रतिषेधः ( त्याची चिकित्सा ) ... | ३७८ |
| १० सन्धिसितासितरोगविज्ञानम् ( नेत्रसंधि, पांढरा व काळा बुबूळ यांचे रोग ) ... ... | ३८० |
| ११ संधिसितासितरोगप्रतिषेधः ( त्यांची चिकित्सा ) | ३८२ |
| १२ दृष्टिरोगविज्ञानीयः ( बाहुलीचे रोगांविषयीं ) | ३८६ |
| १३ तिमिरप्रतिषेधः ( तिमिररोगाची चिकित्सा ) | ३८८ |
| १४ लिङ्गनाशप्रतिषेधः ( मोतिबिंदूची चिकित्सा ) | ३९५ |
| १५ सर्वाक्षिरोगविज्ञानम् ( नेत्रगतरोगांचें निदान ) | ३९७ |
| १६ सर्वाक्षिरोगप्रतिषेधः ( त्यांची चिकित्सा ) | ३९८ |
| १७ कर्णरोगविज्ञानीयः ( कर्णरोगांविषयीं ) ... | ४०३ |
| १८ कर्णरोगप्रतिषेधः ( कर्णरोगचिकित्सा ) .... | ४०४ |
| १९ नासारोगविज्ञानीयः (नाकाचे रोगांविषयीं) ... | ४०८ |
| २० नासारोगप्रतिषेधः ( नासारोगचिकित्सा ) ... | ४१० |
| २१ मुखरोगविज्ञानीयः ( मुखरोगांविषयीं ) ... | ४११ |
| २२ मुखरोगप्रतिषेधः ( मुखरोगचिकित्सा ) ... | ४१५ |
| २३ शिरोरोगविज्ञानीयः ( डोक्याचे रोगांविषयीं ) | ४२२ |
| २४ शिरोरोगप्रतिषेधः ( शिरोरोगचिकित्सा ) ... | ४२४ |
| २५ व्रणविज्ञानप्रतिषेधः ( व्रणांचें निदान व चिकित्सा ) | ४२८ |
| २६ सद्योव्रणप्रतिषेधः ( जखमेची चिकित्सा ) ... | ४३२ |
| २७ अस्थिभङ्गप्रतिषेधः ( हाडें मोडलीं असतां त्यांची चिकित्सा ) | ४३५ |
| २८ भगन्दरप्रतिषेधः ( भगंदराची चिकित्सा ) | ४३८ |
| २९ ग्रन्थ्यर्बुदश्लीपदापचीनाडीविज्ञानीयः ( ग्रंथि, अर्बुद, श्लीपद, अपची, व नाडीव्रण यांविषयीं ) ... | ४४१ |
| ३० ग्रन्थ्यर्बुदश्लीपदापचीनाडीप्रतिषेधः ( त्यांची चिकित्सा ) | ४४३ |
| ३१ क्षुद्ररोगविज्ञानीयः ( क्षुद्ररोगांविषयीं ) ... | ४४६ |
| ३२ क्षुद्ररोगप्रतिषेधः ( क्षुद्ररोगचिकित्सा ). ... | ४४८ |
| ३३ गुह्यरोगविज्ञानीयः ( गुह्येंद्रियांचे रोगांविषयीं ) | ४५१ |
| ३४ गुह्यरोगप्रतिषेधः ( गुह्यरोगांची चिकित्सा ) ... | ४५४ |
| ३५ विषप्रतिषेधः ( विषांची चिकित्सा ) ... | ४५८ |
| ३६ सर्पविषप्रतिषेधः ( सापांच्या विषाची चिकित्सा ) | ४६२ |
| ३७ कीटलूतादि विषप्रतिषेधः ( कीटलूतादि विषाची चिकित्सा ) | ४६७ |
| ३८ मूषिकालर्कविषप्रतिषेधः ( उंदीर व पिसाळलेला कुत्रा यांचे विषाची चिकित्सा ) ... | ४७३ |
| ३९ रसायनाध्यायः ... ... | ४७५ |
| ४० वाजीकरणाध्यायः ... ... | ४८७ |
| ४१ भाषांतरांतील कठिण शब्दांचा कोश. ... | ४९३ |
| ४२ सर्व ग्रंथांचें वर्णानुक्रम सूचिपत्र. ... | ५०१ |
| ४३ यंत्रें व शस्त्रें यांचीं चित्रें. ... ... | ५२१ |
| ४४ मर्मे दाखविण्याकरितां आकृति. ... | ५२८ |

# सार्थ वाग्भट

( वाग्भटकृत अष्टांगहृदय व त्याचें मराठी भाषांतर )

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# सूत्रस्थानम्

## प्रथमोऽध्यायः

अध्याय १ ला

**रागादिरोगान् सततानुषक्तानशेषकायप्रसृतानशेषान्।**
**औत्सुक्यमोहारतिदाञ्जघान योऽपूर्ववैद्याय नमोऽस्तु तस्मै ॥ १ ॥**

सर्व मनुष्यमात्रांच्या शरीराला ज्यांनीं सतत गांजलें आहे व जे मनुष्याच्या मनांत तळमळ, प्रमाद व अस्वस्थता उत्पन्न करितात अशा रागजन्य कामक्रोधादि रोगांचा ज्यानें समूळ नाश केला त्या जगाच्या आदिवैद्याप्रत (ईश्वराला किंवा बुद्धाला*) मी नमस्कार करितों.

**॥ अथात आयुष्कामीयमध्यायं व्याख्यास्यामः ॥**

व मग आयुष्कामीय अध्यायाचें निरूपण करितों.

*मंगलाचरणामध्यें आशीर्वाद, नमस्कार किंवा वस्तुनिर्देश असावा असा जो नियम आहे त्यास अनुसरून ह्या श्लोकामध्यें ग्रंथकर्त्यानें इष्टदेवतेस नमस्कार करून विषयनिर्देशहि थोडासा केला आहे. इष्टदेवता बुद्ध आहे हें ह्या श्लोकांतील पदांनीं ध्वनित होतें, एवढेंच नव्हे तर वृद्ध वाग्भटांतील मंगलाचरणश्लोक लक्षांत आणिल्यास असें दिसून येईल कीं, ह्या दोन्ही श्लोकांतील विशेषणें एकाच अर्थाचीं असून वृद्ध वाग्भटांतील श्लोकांत 'बुद्धाय तस्मै नमः' असें ज्या अर्थी स्पष्ट म्हटलेंच आहे त्या अर्थी रागादि रोगांचा ध्वंस करणारा प्रस्तुत श्लोकांतील जो विवक्षित अपूर्व वैद्य तो बुद्धच असावा असें सिद्ध होतें.

ज्या शास्त्रावर ग्रंथ लिहावयाचा असतो तत्प्रवर्तकांनाहि नमस्कार करण्याची पद्धति असून वृद्ध वाग्भटांत प्रस्तुत ग्रंथकर्त्यानें दुसऱ्या श्लोकांत ती अमलांत आणिली आहे. प्रस्तावनेंत सुचविल्याप्रमाणें जो आशय वृद्ध वाग्भटांत अनेक श्लोकांत येतो तितका सर्व एकाच श्लोकांत आणण्याचा ह्या ग्रंथांत प्रयत्न केलेला आहे; याचें दिग्दर्शन ह्या पहिल्याच श्लोकांत होतें; कारण शास्त्रप्रवर्तकांचे नमनार्थ वृद्ध वाग्भटाप्रमाणें येथें निराळा श्लोक न घालतां श्लेषविशिष्ट पदांची योजना करून रागादिरोगानित्यादि श्लोकांमध्यें तें नमनहि साधून घेतलें आहे. ह्या श्लिष्टार्थाप्रमाणें 'अपूर्व वैद्य' ही संज्ञा ब्रह्मदेवापासून तों अत्रिआदि ऋषींपर्यंत कोणालाहि लाविली तरी चालेल. त्यांचें अपूर्वत्व हेंच कीं, ते कुष्ठादि (रागादि) असाध्य रोगांचा नाश करिते झाले. सततानुषक्त, अशेषकायप्रसृत व औत्सुक्यमोहारतिकृत् हीं विशेषणें असाध्य रोगांस ह्याच ग्रंथकर्त्यानें पुढें वारंवार लाविलेलीं आढळतात, (उदाहरण, सू० अ० १ श्लो० ३३-३४). ह्या श्लिष्टार्थामध्यें राग शब्देंकरून (आदिलोपाख्य तंत्रयुक्तीनें राग म्हणजे त्वग्राग म्ह. कुष्ठ किंवा श्वित्र) कुष्ठश्वित्रादिक सुचविले जातात; सततानुषक्त म्ह० कधींहि शरीरांतून निःशेष न होणारे; अशेषकायप्रसृत म्ह० पुढें सांगितलेले तिन्ही रोगमार्ग (सू० अ० १ पा० ११ पहा). व्यापून राहणारे; व औत्सुक्यमोहारतिकृत् म्हणजे फार काळजी, बुद्धिभ्रंश व अस्वस्थता उत्पन्न करणारे.

**इति ह स्माहुरात्रेयादयो महर्षयः ॥**

आत्रेयादि महर्षींनीं जें जें सांगितलें आहे तें येणेंप्रमाणें.

**आयुः कामयमानेन धर्मार्थसुखसाधनम्।**
**आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ २ ॥**

धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चतुर्विध पुरुषार्थांस साधनीभूत असें दीर्घ आयुष्य ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं वैद्यशास्त्रप्रतिपादित गोष्टी जाणण्याविषयीं व त्याप्रमाणें वागण्याविषयीं फार तत्पर असावें.

**ब्रह्मा स्मृत्वायुषो वेदं प्रजापतिमजिग्रहत्।**
**सोऽश्विनौ तौ सहस्राक्षं सोऽत्रिपुत्रादिकान्मुनीन् ॥३॥**
**तेऽग्निवेशादिकांस्ते तु पृथक् तन्त्राणि तेनिरे।**

ब्रह्मदेवानें आयुर्वेद ध्यानांत* आणून दक्षप्रजापतीला शिकविला, त्यानें तो अश्विनीकुमारांस शिकविला. त्यांजपासून तो इंद्रास प्राप्त झाला. इंद्रानें तो आत्रेय, धन्वंतरि, इत्यादि महर्षींना शिकविला. आत्रेयादिकांनीं तो अग्निवेश, भेड इ० ऋषींना शिकविला व अग्निवेशादिकांनीं आयुर्वेदावर निरनिराळे ग्रंथ † लिहिले.

**तेभ्योऽतिविप्रकीर्णेभ्यः प्रायः सारतरोच्चयः ॥ ४ ॥**
**क्रियतेऽष्टाङ्गहृदयं नातिसंक्षेपविस्तरम्।**

त्यांच्या त्या अफाट व संकीर्ण ग्रंथांचा सारांश काढून फार संक्षिप्त नव्हे व फार विस्तृत नव्हे असा अष्टांगहृदय नांवाचा ग्रंथ रचितों.

**कायबालग्रहोर्ध्वाङ्गशल्यदंष्ट्राजरावृषान् ॥ ५ ॥**
**अष्टावङ्गानि तस्याहुश्चिकित्सा येषु संश्रिता।**

ह्या अष्टांगहृदयग्रंथाचीं जीं आठ अंगें तीं येणेंप्रमाणें :—

*ध्यानांत आणून असें म्हणण्याचें कारण असें कीं, जुन्या लोकांच्या समजुतीप्रमाणें वेद नित्य अनादि व अकर्तृक आहेत; तेव्हां तो ब्रह्मदेवानें केला किंवा रचिला असें म्हणतां येत नाहीं. म्हणून ब्रह्मदेवानें तो प्रथमतः ध्यानांत आणिला असें 'स्मृत्वा' ह्या पदानें दर्शविलें आहे.

† त्या ग्रंथकर्त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें :—अग्निवेश, भेड, जतुकर्ण, पराशर, हारीत, क्षारपाणि, सुश्रुत, औपधेनव, औरभ्र व पौष्कलावत. ह्यांपैकीं पहिले ६ ऋषि औषधिचिकित्सेचा आदिगुरु जो आत्रेय ऋषि त्याचे शिष्य होते (च० सू० अ० १.) शेवटले ४ ऋषि धन्वंतरीचे शिष्य असून त्यांचे ग्रंथ शस्त्रवैद्यकावर आहेत (सु० सू० अ० ४.)

वायुः पित्त कफश्चोक्तः शारीरो दोष संग्रहः। - च.सू. 1156
वातपित्तश्लेष्माण एव देह सम्भव हेतवः। - सु.सू. 2112



१ कायचिकित्सा,* २ बालचिकित्सा, ३ ग्रहचिकित्सा, ४ ऊर्ध्वांगचिकित्सा, ५ शल्यचिकित्सा, ६ दंष्ट्राचिकित्सा, ७ जराचिकित्सा व ८ वृषचिकित्सा.

**वायुः पित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः ॥ ६ ॥**

शरीरामध्यें वायु, पित्त व कफ असे संक्षेपेंकरून † तीन दोष आहेत. ( यांचे वृद्धिक्षयादि प्रकार व संयोग अनेक आहेत, परंतु मुख्य दोष तीनच. रक्त हा एक चवथा दोष आहे असें कित्येक प्रतिपादन करितात, परंतु तें बरोबर नाहीं; कारण रक्त दूष्य आहे. वातादिकांवांचून स्वतंत्रपणें तें दूषित होऊं शकत नाहीं किंवा शरिरांत दोष उत्पन्न करूं शकत नाहीं. वातादिक स्वतःच दोष उत्पन्न करूं शकतात. म्हणून दोष ही अन्वर्थक संज्ञा त्यांनाच लागू होतेः—दूषयन्तीति दोषाः )

**विकृताविकृता देहं घ्नन्ति ते वर्तयन्ति च ।**

ते विकृत झाले म्हणजे जीवित हरण करितात व यथास्थित असले म्हणजे जीवनव्यापार चालवितात.

**ते व्यापिनोऽपि हृन्नाभ्योरधोमध्योर्ध्वसंश्रयाः ॥ ७ ॥**

ते जरी सर्व शरीरव्यापि आहेत तरी त्यांचीं मुख्य स्थानें तीन आहेत. नाभीच्या खालचा भाग वायूचें मुख्य स्थान; नाभि व हृदय यांच्यामधील प्रदेश पित्ताचें मुख्य स्थान; व हृदयाच्या वरील भाग कफाचें मुख्य स्थान जाणावें.

**वयोऽहोरात्रिभुक्तानां तेऽन्तमध्यादिगाः क्रमात् ।**

ते वात, पित्त व कफ, वय, अहोरात्र व अन्नाचा परिपाककाल यांच्या अंत्य, मध्य व आदि भागांमध्यें अनुक्रमेंकरून प्रबल असतात; म्हणजे उत्तरवयांत व दिवस, रात्र व परिपाककाल यांचे शेवटच्या भागांमध्यें वायूचा जोर असतो; मध्यवयांत व दिवस, रात्र व परिपाककाल यांच्या मध्यभागामध्यें पित्ताचा जोर असतो; पूर्ववयांत व दिवस, रात्र व परिपाककाल यांच्या पूर्वभागामध्यें कफाचा जोर असतो.

**तैर्भवेद्विषमस्तीक्ष्णो मन्दश्चाग्निः समैः समः ॥ ८ ॥**

वातपित्तकफांच्या योगानें अनुक्रमेंकरून विषमाग्नि, तीक्ष्णाग्नि व मंदाग्नि यांची उत्पत्ति होते; व ते तिन्ही दोष समान असले म्हणजे अग्निहि समच राहतो.

**कोष्ठः क्रूरो मृदुर्मध्यो मध्यः स्यात्तैः समैरपि ।***

त्यांच्या योगानें कोठाहि अनुक्रमेंकरून क्रूर म्हणजे जड, मृदु (हलका) व मध्यम असतो; व ते तिन्ही समान असले म्हणजेहि तो मध्यमच म्हणजे फार जड नव्हे, किंवा फार हलका नव्हे, असा असतो.

**शुक्रार्तवस्थैर्जन्मादौ विषेणेव विषक्रिमेः † ॥ ९ ॥**

**तैश्च तिस्रः प्रकृतयो हीनमध्योत्तमाः पृथक् ।**

**समधातुः समस्तासु श्रेष्ठा निन्द्या द्विदोषजाः ॥ १० ॥**

गर्भ उत्पन्न व्हावयाच्या वेळीं हे शुक्रार्तवस्थ वातपित्तकफ अनुक्रमेंकरून हीन, मध्यम व उत्तम अशा तीन प्रकृति निर्माण करितात. विष मारक असून देखील जशी त्यामध्यें जीवांची उत्पत्ति होते, तशीच विकृत झालेल्या वातपित्तकफांपासून ह्या तीन प्रकृतींची उत्पत्ति होते. सर्व प्रकृतींमध्यें समधातु ‡ प्रकृति श्रेष्ठ जाणावी, व दोन दोन दोषांपासून झालेली प्रकृति सर्वांत निंद्य होय.

**तत्र रूक्षो लघुः शीतः खरः सूक्ष्मश्चलोऽनिलः ।**

---

* १ ज्वर, अतिसार, क्षय इ० सार्वदेहिक रोगांची चिकित्सा. २ बालरोगांची चिकित्सा. ३ देवगंधर्वादिकांच्या संचारापासून होणाऱ्या पीडेची चिकित्सा. ४ छातीच्यावर जे जे भाग आहेत त्या सर्व भागांच्या रोगांची चिकित्सा (मुख, कंठ, नेत्र, नासिका, कर्ण इ०); ऊर्ध्वांगचिकित्सेलाच शालाक्य अशी संज्ञा आहे. ५ यंत्र, शस्त्र, क्षार व अग्नि इत्यादिकांच्या योगानें तत्तत्साध्य व्याधींचा प्रतिकार करणें (उ० तृण, काष्ठ, व्रणांतील पू, जलोदरांतील पाणी, मूतखडा, मूढगर्भ इ० शल्य काढून टाकणें व जखमा, क्षतें इ० बरीं करणें); ह्यालाच शल्यतंत्र म्हणतात. ६ सर्पकीटवृश्चिकादिकांच्या दंशाची व बचनाग वगैरे विषांची चिकित्सा; ह्याला अगदतंत्र अशी दुसरी संज्ञा आहे. ७ वार्धक्य नाहींसें करून पुनः तारुण्य आणण्याचा उपाय; ह्याला रसायनतंत्र म्हणतात. ८ उत्तम वीर्य उत्पन्न करण्याचा उपाय; ह्याला वाजीकरण म्हणतात.

† संक्षेपेंकरून म्हणण्याचें कारण असें कीं, ह्याचाच विस्तार पुढें १२ व्या अध्यायाचे अखेरीस दोषभेद त्रेसष्ट आहेत इ० सांगितला आहे. (सू० अ० १२, श्लो० ७४–७८.)

* ह्या श्लोकार्धांत कफाधिक्य व दोषत्रयाचें साम्य हीं दोन्ही मध्यम कोठ्याचीं कारणें सांगितलीं आहेत. आतां एखाद्याचा कोठा मध्यम असल्यास तो ह्या दोहों कारणांपैकीं कोणत्या कारणानें आहे हें ओळखावें कसें, असा सहजच प्रश्न निघतो; हें जाणण्याचें साधन इतकेंच कीं, कफाधिक्यामुळें जरी कोठा मध्यम असतो तरी समधातुजन्य मध्यम कोठ्याप्रमाणें त्याजवर विरेचनाचा सम्यग्योग होत नाहीं (श्लेष्माधिकश्छर्द्यते हि दुःखं विरिच्यते मन्दकफस्तुसम्यक्।)

† 'विषेणेव विषक्रिमेः' हा दृष्टान्त देण्याचें कारण असें कीं, जर शुक्रार्तवामध्यें वातादि दोषांचें वैषम्य असेल तर 'रोगस्तु दोषवैषम्यं' या न्यायानें तें गर्भोत्पादक होऊं शकणार नाहीं. (कारण गर्भ उत्पन्न होण्याला शुक्रार्तवें शुद्ध असलीं पाहिजेत असें शा० अ० १ श्लोक १ यांत सांगितलें आहे.) इतकेंच नव्हे तर विकृतांपासून प्रकृतीची उत्पत्ति होण्याचाहि, कार्यकारणांच्या असादृश्यामुळें असंभवच आहे. ह्या शंकेचा परिहार करण्याकरितां विषक्रिमि न्यायाचा दृष्टान्त दिला आहे. ह्या श्लोकाचा अर्थ हेमाद्रीनें अरुणदत्ताहून भिन्न रीतीनें केला आहे. 'जन्मादौ' हें सामासिक पद घेऊन त्याचा 'गर्भारंभीं' असा अर्थ न घेतां तीं वेगळालीं पदें (आदौ जीवसंक्रमणसमये जन्म भवति) घेऊन वातादि दोष पहिल्यानें देहाचा जन्म किंवा उत्पत्ति व मग तीन प्रकृति उत्पन्न करितात असें सांगितलें आहे. अरुणदत्ताचा अर्थ अधिक सयुक्तिक वाटल्यावरून आम्हीं तोच अनुसरला आहे. देहजन्माला शुद्ध शुक्रार्तवें हींच वास्तविक हेतु होत. येथें विष शब्देंकरून बचनागच घ्यावा; कारण त्याला फार लवकर कीड लागते हें प्रसिद्धच आहे.

‡ वातपित्तकफ हे यथास्थित असले म्हणजे शरिराला धारण करितात, म्हणून त्यांस धातु अशी संज्ञा आहे. समधातु म्हणजे वातपित्तकफांची समान स्थिति ज्यांत आहे ती (प्रकृति). वातपित्तकफ हे विकृत झाले म्हणजे मात्र त्यांस दोष ही संज्ञा मिळते.

त्या वातपित्तकफांपैकीं वायु हा रुक्ष, लघु (हलका), शीत, कर्कश (खर), सूक्ष्म (अदृश्य) व प्रवाही (चंचल) आहे.

**पित्तं सस्नेहतीक्ष्णोष्णं लघु विस्रं सरं द्रवम् ॥ ११ ॥**

पित्त हें किंचित् स्निग्ध, तीक्ष्ण (आशुकारी), उष्ण, लघु, दुर्गंधि, प्रसरणशील व द्रव आहे.

**स्निग्धः शीतो गुरुर्मन्दः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः।**

कफ हा स्निग्ध, शीत, जड, मंद (विकारी किंवा उशीरानें क्रिया करणारा), मृदु, चिकट व घन आहे.

**संसर्गः सन्निपातश्च तद्द्वित्रिक्षयकोपतः ॥ १२ ॥**

वातपित्तकफांपैकीं कोणत्याहि दोहोंचा क्षय किंवा कोप* झाला असतां त्यास संसर्ग म्हणतात व सर्वांचा क्षय किंवा कोप झाला असतां त्यास सन्निपात म्हणतात.

**रसासृङ्मांसमेदोऽस्थिमज्जाशुक्राणि धातवः ।**
**सप्त दूष्या मला मूत्रशकृत्स्वेदादयोऽपि च ॥ १३ ॥**

रस, रक्त, मांस, मेद (चरबी), अस्थि, मज्जा व शुक्र हे सात धातु होत; व यांनाच दूष्य अशी संज्ञा आहे. मूत्र, पुरीष व स्वेद (घाम) इत्यादिकांना मल अशी संज्ञा आहे, व तेहि दूष्यच होत.

**वृद्धिः समानैः सर्वेषां विपरीतैर्विपर्ययः।**

वातादि दोष, रसादि धातु व मूत्रादि मल या सर्वांची वृद्धि समान गुणांच्या पदार्थांपासून होते; व त्यांचा क्षय विपरीत गुणांच्या पदार्थांपासून होतो. [हे समान किंवा विपरीत पदार्थ तीन प्रकारचे असूं शकतील:-द्रव्य, गुण किंवा कर्म. द्रव्यासंबंधीं उदाहरणें:-- रक्तानें रक्त वाढतें, मांसानें मांस वाढतें, दूध जलात्मक असल्यामुळें जलात्मक जो कफ त्याला वाढवितें. हरणदोडी, काकोली इ० वनस्पति सोमात्मक असल्यामुळें स्नेह, बल, वीर्य व तेज यांना वाढवितात. मिरें, पंचकोल, बिबवा इ० बुद्धि, मेधा व अग्नि यांना वाढवितात. गुणासंबंधीं उदाहरणें:-खारीक वगैरे पदार्थ स्निग्ध, जड, शीत इ० गुणांच्या योगानें कफ वाढवितात (जरी त्यांच्यामध्यें पाण्यापेक्षां पृथ्वीचा अंश विशेष आहे.) कर्मासंबंधीं उदाहरणें:-धांवणें, उड्या मारणें, पोहणें, इ० क्रिया वायु वाढवितात; कारण त्यांजमध्यें व वायूमध्यें चंचलत्व हा गुण सामान्य आहे. त्याचप्रमाणें मनोव्यापार (चिंता, काम, शोक, इ०) मनाचा क्षोभ करून वातवृद्धि करितात. ह्याचप्रमाणें विपरीत गुणाच्या द्रव्यगुणकर्मांपासून दोष, धातु व मल यांचा क्षय होतो.]

**रसाः स्वाद्वम्ललवणतिक्तोषणकषायकाः ॥ १४ ॥**
**षड्द्रव्यमाश्रितास्ते तु यथापूर्वं बलावहाः।**

गोड, आंबट, खारट, कडू, तिखट व तुरट असे द्रव्यामध्यें सहा रस आहेत. ते अनुक्रमेंकरून एकाहून एक बलावह आहेत; म्हणजे गोड रस सर्वांत अधिक बलावह, आंबट त्याहून कमी, खारट आंबटाहून कमी, याप्रमाणें जाणावें.

* कोप म्हणजे वृद्ध झालेल्या दोषांचें उन्मार्गगमन.

**तत्राद्या मारुतं घ्नन्ति त्रयस्तिक्तादयः कफम् ॥ १५ ॥**
**कषायतिक्तमधुराः पित्तमन्ये तु कुर्वते।**

त्यांपैकीं पहिले तीन रस (गोड, आंबट व खारट) वायूचा नाश करितात, व बाकीचे तीन त्याचा प्रकोप करितात. शेवटचे तीन (कडू, तिखट व तुरट) कफाचा नाश करितात; व बाकीचे तीन त्याचा प्रकोप करितात. तुरट, कडू व गोड हे रस पित्त शमवितात; व बाकीचे तीन पित्त वाढवितात.

**शमनं कोपनं स्वस्थहितं द्रव्यमिति त्रिधा ॥ १६ ॥**

द्रव्य तीन प्रकारचें आहे. कांहीं द्रव्य पित्तादिकांचें शमन करितें (शमन), कांहीं त्यांचा प्रकोप करितें (कोपन) व कांहीं आरोग्याचें रक्षण करितें (स्वस्थहित). [शमन द्रव्यांचीं उदाहरणें:-तेल, तूप व मध. तेल वातनाशक आहे, तूप पित्तनाशक आहे व मध कफहारक आहे. कोपन द्रव्यांचीं उदाहरणें:-उडीद, माठ, मुळा, मोहरी, दहीं इ० स्वस्थहित द्रव्यांचीं उदाहरणें:-साठेतांदूळ, जव, गहूं, ससा, हरण इत्यादिकांचें मांस, हरणदोडी, पावसाचें पाणी, दूध इत्यादि.]

**उष्णशीतगुणोत्कर्षात्तत्र वीर्यं द्विधा स्मृतम् ।**

द्रव्यामध्यें वीर्य दोन प्रकारचें असतें, उष्ण व शीत.* ज्यामध्यें उष्ण गुण फार असतो त्यास उष्णवीर्य म्हणतात; ज्यांत शीतगुणांचें प्राबल्य असतें त्यास शीतवीर्य म्हणतात.

**त्रिधा विपाको द्रव्यस्य स्वाद्वम्लकटुकात्मकः ॥ १७ ॥**

द्रव्याचे विपाक तीन प्रकारचे होतात; गोड, आंबट व तिखट. [जरी रस सहा प्रकारचे आहेत तरी त्यांचा विपाक तीनच प्रकारचा होतो. सहा प्रकारचा होत नाहीं. जठराग्नीच्या योगानें द्रव्यांचें पचन झाल्यावर त्यांजमध्यें जें रसांतर उत्पन्न होतें, त्यास विपाक म्हणतात. ह्या रसांतराचें अनुमान तज्जन्य कार्यावरून होतें. गोड व खारट रसांचा विपाक गोड असतो. आंबटाचा आंबटच असतो. कडू, तिखट व तुरट रसांचा विपाक तिखट होतो.] (विपाक कार्यानुमेय आहे असें म्हटलें आहे, त्याचें उदाहरण असें कीं सुंठ तिखट असून पित्तशामक आहे, म्हणून तिचा विपाक मधुर होतो असें अनुमान करितात.)

**गुरुमन्दहिमस्निग्धश्लक्ष्णसान्द्रमृदुस्थिराः ।**
**गुणाः† ससूक्ष्मविशदा विंशतिः सविपर्ययाः ॥ १८ ॥**

*उष्ण व शीत या शब्दांच्या व्याख्येकरितां सूत्र० अ० ९ श्लोक-१८-१९ पहा.

† ह्या वीस गुणांचीं लक्षणें हेमाद्रीनें अशीं सांगितलीं आहेत—गुरु = बृंहणशक्ति (द्रव्याची पुष्ट करण्याची शक्ति.) लघु = लाघव आणण्याची शक्ति. मंद = शमनशक्ति. तीक्ष्ण = शोधनशक्ति. हिम = स्तंभनशक्ति. उष्ण = स्वेदनशक्ति. स्निग्ध = क्लेदनशक्ति. रुक्ष = शोषणशक्ति. श्लक्ष्ण = रोपणशक्ति; खर = लेखनशक्ति. सांद्र = प्रसादनशक्ति. द्रव = विलोडनशक्ति. मृदु = श्लथनशक्ति (सैल करणारे.) कठिण = दृढीकरणशक्ति. स्थिर = धारणशक्ति. चल = प्रेरणशक्ति. सूक्ष्म = विवरणशक्ति. (धमन्यादिकांचे मार्ग खुले करणारे.) स्थूल = संवरणशक्ति. विशद = क्षालनशक्ति. पिच्छिल = लेपनशक्ति.

जड, मंद, थंड, स्निग्ध, गुळगुळीत, दाट, मऊ, घन, सूक्ष्म व विशद ( स्वच्छ ) हे दहा व यांच्या उलट दहा याप्रमाणें द्रव्यामध्यें वीस गुण आहेत. [ वरील दहा गुणांच्या उलट गुण येणेंप्रमाणें:—हलका, तीक्ष्ण ( तीव्र ), उष्ण, रूक्ष, खरखरीत, पातळ, कठिण, द्रव, स्थूल व चिकट ( पिच्छिळ. ) ]

**कालार्थकर्मणां योगा हीनमिथ्याऽतिमात्रकाः।**
**सम्यग्योगश्च विज्ञेयो रोगारोग्यैककारणम्॥ १९॥**

शीतोष्णादि काल, शब्दस्पर्शादि विषय व कायिक, वाचिक व मानसिक कर्में यांचा वाजवीपेक्षां कमी किंवा जास्त किंवा वाईट उपयोग करणें हेंच रोगमात्रांचें मुख्य कारण होय; व त्यांचा यथार्थ उपयोग हेंच आरोग्याचें मुख्य बीज आहे. ( शीतादि कालांचा वाजवीपेक्षां कमी उपयोग म्हणजे पावसाळ्यांत जितका पाऊस असावा तितका नसणें, हिंवाळ्यांत जितकी थंडी असावी तितकी नसणें, व उन्हाळ्यांत उष्णता कमी असणें. याच्या उलट स्थिति झाली म्हणजे शीतादि कालांचा अधिक उपयोग किंवा अतियोग घडला असें म्हणतात. मिथ्या योग किंवा वाईट उपयोग म्हणजे कालाचें केवळ वैपरीत्यच होय; विषय व कर्में यांच्या न्यूनाधिक व मिथ्या योगांचीं उदाहरणें येणेंप्रमाणें:—मुळींच उजेडांत न जाण्यानें डोळ्यांचा कमी उपयोग केल्यासारखा होतो. सर्वदा उन्हांत फिरल्यानें दृष्टीचा अतियोग घडतो. बीभत्स पदार्थ पाहणें हा दृष्टीचा मिथ्यायोग करणें होय. बिलकूल व्यायाम न करणें म्हणजे कर्मेंद्रियांचा कमी उपयोग करणें होय. अतिव्यायाम केल्यानें त्यांचा अधिक उपयोग किंवा अतियोग केल्यासारखा होतो. वेड्यावांकड्या उड्या मारणें किंवा दांतांनीं एखादें ओझें उचलणें हाच त्यांचा मिथ्यायोग होय. )

**रोगस्तु दोषवैषम्यं दोषसाम्यमरोगता।**

वातादि दोषांची जी विषम स्थिति त्याचेंच नांव रोग; व त्यांची जी समान स्थिति तेंच आरोग्य.

**निजागन्तुविभागेन तत्र रोगा द्विधा स्मृताः॥ २०॥**

रोग दोन प्रकारचे, निज व आगंतुक. ( वातादि दोषांपासून जे रोग उत्पन्न होतात त्यांस निज व बाह्य कारणांपासून होतात त्यांना आगंतुक म्हणतात. ह्या दोहोंमध्यें भेद इतकाच कीं, निजरोगांमध्यें पहिल्यानें वातादि दोष कुपित होतात, व मग ते रोग उत्पन्न करितात, व आगंतुक रोग पहिल्यानेंच बाह्य कारणांपासून उत्पन्न होऊन मग वातादि दोषांचा प्रकोप करितात )

**तेषां कायमनोभेदादधिष्ठानमपि द्विधा।**

रोगांचें अधिष्ठानहि दोन प्रकारचें आहे, शरीर व मन ( ज्वर, रक्तपित्त, अतिसार वगैरे शारीरिक रोगांचीं उदाहरणें होत. उन्माद, अपस्मार, मूर्च्छा, भूतबाधा, वगैरे मानसिक रोगांचीं उदाहरणें होत. )

**रजस्तमश्च मनसो द्वौ च दोषावुदाहृतौ॥ २१॥**

रज व तम हे दोन मनाचे दोष आहेत.

**दर्शनस्पर्शनप्रश्नैः परीक्षेताथ रोगिणम्।**

दर्शन, स्पर्शन व प्रश्न यांचे योगानें रोग्याची परीक्षा करावी. ( खोकला, मेह इ० रोगांमध्यें मल, मूत्र, कफ, वांति इत्यादिकांचा वर्ण, आकार, प्रमाण, वगैरेंचें ज्ञान दर्शनानें होतें. ज्वर, गुल्म, विद्रधि. इ० रोगांमध्यें उष्णता, काठिण्य, घनत्व, द्रवत्व, इत्यादिकांचें ज्ञान स्पर्शेंकरून होतें. क्षुधा, तृषा, मळमळणें, वेदना, कोठ्याचा जडपणा किंवा हलकेपणा, जन्मापासून जे जे रोग झाले ते इत्यादि गोष्टींची माहिती रोग्यास प्रश्न करूनच मिळविली पाहिजे. )

**रोगं निदानप्राग्रूपलक्षणोपशयाप्तिभिः॥ २२॥**

निदान, पूर्वरूप, लक्षणें, उपशय व संप्राप्ति या पांच साधनांनीं रोगाची परीक्षा करावी. [ निदान म्हणजे रोगाचीं कारणें. तीं कारणें दोन प्रकारचीं; सन्निकृष्ट ( जवळचीं ) व विप्रकृष्ट ( दूरचीं ). थंड पाण्याचीं स्नानें करणें, थंड हवेंत निजणें इ० ज्वरांचीं विप्रकृष्ट कारणें होत; व ह्या कारणांपासून वातादि दोष कुपित होणें, व कोष्ठगत अग्नीचा ऱ्हास होणें हीं ज्वरांचीं सन्निकृष्ट कारणें होत. पूर्वरूप म्हणजे रोगांचें स्वरूप प्रकट होण्यापूर्वी जे विकार भासूं लागतात ते. जसें, ज्वर यावयाचा असला म्हणजे पूर्वी अभिमांद्य होतें, अंग जड होतें, डोळ्यांची आग होते व जांभया येतात. खुद्द रोगाचींच लक्षणें व्यक्त झालीं म्हणजे त्यास रूप असें म्हणतात. उपशय म्हणजे निरनिराळ्या औषधान्नविहारांपासून रोगाचा जोर कमी होणें. जसें, एखाद्या मनुष्यास पोटशूळ आहे व जर त्यानें आपणांस असें सांगितलें कीं, दूध प्याल्यानें तो किंचित् कमी होतो, तर आपली अशी खात्री होते कीं त्याचा विकार पित्तापासून असावा. संप्राप्ति म्हणजे त्या त्या कारणांनीं कुपित झालेले दोष, त्या त्या मार्गांनीं संचार करीत एखाद्या स्थानीं प्राप्त होऊन जी रोगाची उत्पत्ति करितात ती.)]

**भूमिदेहप्रभेदेन देशमाहुरिह द्विधा।**

देश ही संज्ञा भूमि व देह ह्या दोहोंच्याहि संबंधानें लावितात: भूमिदेश व देहदेश.

**जाङ्गलं वातभूयिष्ठमनूपं तु कफोल्बणम्॥ २३॥**
**साधारणं सममलं त्रिधा भूदेशमादिशेत्।**

भूमिदेश तीन प्रकारचे आहेत. जांगल, अनूप व साधारण. जांगल देशामध्यें पाणी व झाडें कमी असतात, व तेथें वाताधिक्य असतें. अनूप देशांत पाणी व वनस्पति अधिक असून कफ प्रबल असतो. साधारण देशामध्यें पाणी व वनस्पति मध्यम प्रमाणानें असून तिन्ही दोष ( धातु ) समान असतात.

**क्षणादिर्व्याध्यवस्था च कालो भेषजयोगकृत्॥ २४॥**

काल दोन प्रकारचा, सामान्यकाल ( ज्याचे क्षण, पळ, घटिका, दिवस, महिने, इ० भाग कल्पितात ) व रोगांची निरनिराळी अवस्था ( जसें आमज्वर, पक्वज्वर इ० ). औषध लागू पडण्यास हे दोन्ही प्रकारचे काल लक्षांत आणिले पाहिजेत. ( कांहीं औषधें

सकाळींच द्यावीं लागतात, कांहीं जेवणानंतरच दिलीं पाहिजेत. कांहीं ज्वर असतांना द्यावीं लागतात व कांहीं अंग निवालें असतांच दिलीं पाहिजेत. )

**शोधनं शमनं चेति समासादौषधं द्विधा ।**

औषधें मुख्यत्वेंकरून दोन प्रकारचीं आहेत, शोधन व शमन. (शोधन म्हणजे जें शरिरांतील दोषांस बाहेर काढून टाकतें तें; शमन म्ह० जें कुपित झालेल्या दोषांचा जागच्या जागींच उपशम करितें तें. गेळफळ, तेड, इ० शोधन औषधांचीं उदाहरणें होत; व गुळवेल, धमासा, वगैरे शमन औषधांचीं उदाहरणें होत. )

**शरीरजानां दोषाणां क्रमेण परमौषधम् ॥ १५ ॥**
**बस्तिर्विरेको वमनं तथा तैलं घृतं मधु ।**

वातपित्तकफांपासून उत्पन्न झालेल्या सर्व शारीरविकारांस अनुक्रमें-करून बस्ति, विरेचन व वमन हीं तीन शोधनात्मक औषधें श्रेष्ठ होत व तेल, तूप, मध हीं तीन औषधें शमनवर्गामध्यें अनुक्रमें श्रेष्ठ होत.

**धीधैर्यात्मादिविज्ञानं मनोदोषौषधं परम् ॥ १६ ॥**

सर्व मनोविकारांवर सुविचार किंवा निश्चय, धैर्य व आत्मज्ञान वगैरे उत्तम उपाय जाणावा.

**भिषग्द्रव्याण्युपस्थाता रोगी पादचतुष्टयम् ।**
**चिकित्सितस्य निर्दिष्टं प्रत्येकं तच्चतुर्गुणम् ॥ १७ ॥**

वैद्य, औषधिद्रव्यें, चाकर व रोगी यांना वैद्यक्रियेचें पादचतुष्टय (म्ह० चार पाय ) म्हणतात. ह्या प्रत्येकामध्यें चार चार गुण अवश्य असले पाहिजेत.

**दक्षस्तीर्थात्तशास्त्रार्थो दृष्टकर्मा शुचिर्भिषक् ।**

वैद्य दक्ष, गुरूजवळ शास्त्र पढलेला, शुचिर्भूत व क्रिया पाहिलेला असा असावा.

**बहुकल्पं बहुगुणं संपन्नं योग्यमौषधम् ॥ १८ ॥**

औषध बहुकल्प (म्ह० चूर्णक्वाथगुटिकादि अनेक रूपांतरांनीं देण्याजोगें ), बहुगुण (म्ह० अनेक विकारहारक ), संपन्न (म्ह० ताजें, शुद्ध व यथायोग्य परिपाक झालेलें ) व रोगाच्या त्या त्या स्थितीला योग्य ह्या चार गुणांनीं युक्त असलें पाहिजे.

**अनुरक्तः शुचिर्दक्षो बुद्धिमान् परिचारकः ।**

चाकर इमानी, शुचिर्भूत, दक्ष व बुद्धिमान् असावा.

**आढ्यो रोगी भिषग्वश्यो ज्ञापकः सत्त्ववानपि ॥ १९ ॥**

रोगी श्रीमान्, वैद्याचें ऐकणारा, आपली खरी हकीकत सांगणारा व धैर्यवान् असावा.

**साध्योऽसाध्य इति व्याधिर्द्विधा तौ तु पुनर्द्विधा ।**
**सुसाध्यः कृच्छ्रसाध्यश्च याप्यो यश्चानुपक्रमः ॥ ३० ॥**

व्याधि दोन प्रकारचे : साध्य व असाध्य. या प्रत्येकाचे पुनः सुख-साध्य व कृच्छ्रसाध्य आणि याप्य व अनुपक्रम असे अनुक्रमें दोन दोन पोटभेद आहेत.

**सर्वौषधक्षमे देहे यूनः पुंसो जितात्मनः ।**
**अमर्मगोऽल्पहेत्वग्ररूपरूपोऽनुपद्रवः ॥ ३१ ॥**
**अतुल्यदूष्यदेशर्तुप्रकृतिः पादसंपदि ।**
**ग्रहेष्वनुगुणेष्वेकदोषमार्गो नवः सुखः ॥ ३२ ॥**

जो व्याधि सर्व औषधें सहन करणाऱ्या जितात्म्या तरुण पुरुषा-मध्यें मर्मस्थान सोडून उत्पन्न होतो, व ज्याचीं कारणें, पूर्वरूपें, लक्षणें व उपद्रव* अल्प असतात; व जो दूष्य जे रसादि धातु, देश, काल व प्रकृति यांच्याशीं असमान† असतो; व जो वर सांगितलेल्या पादत्रयानें युक्त असतो व जो ग्रहांच्या अनुकूल स्थितीमध्यें उत्पन्न होतो; असा जो एकदोषी, एकमार्गी‡ नवा व्याधि तो सुखसाध्य जाणावा.

**शस्त्रादिसाधनः कृच्छ्रः संकरे च ततो गदः ।**

ज्या रोगामध्यें शस्त्रकर्मादि क्रिया करावी लागते किंवा ज्यामध्यें वरील सुखसाध्य लक्षणांपैकीं कांहीं प्रतिकूल असतात तो रोग कृच्छ्र (कष्ट ) साध्य जाणावा. (वरील लक्षणांपैकीं कांहीं प्रतिकूल असतात त्यांचें उदाहरणः–रोगी तरुण आहे परंतु जितात्मा नाहीं किंवा जो जितात्मा आहे, परंतु रोग मर्मस्थानीं झाला आहे. सर्व औषधें सहन करण्याची शक्ति आहे, परंतु म्हातारा आहे. इ० )

**§शेषत्वादायुषो याप्यः पथ्याभ्यासाद्विपर्यये ॥ ३३ ॥**

वर सांगितलेलीं सुखसाध्य लक्षणें बहुतेक विपरीत असून जो पथ्यानें वर वर बरा होतो तो याप्य होय. कारण जोंपर्यंत आयुष्य आहे तोंपर्यंत त्याचें मूळ शिल्लक राहतें. (जोंपर्यंत पथ्य चाललें आहे तोंपर्यंत याप्य रोगाचा जोर कमी असतो, परंतु किंचित् कारण मिळ-तांच तो उलटतो. )

---

* उपद्रव म्हणजे एक मुख्य रोग असतांना त्यांत जो दुसऱ्या एखाद्या रोगाचा संकर होतो तो.

† उदाहरणार्थ, जर एखादा पित्तविकार, मेद किंवा मज्जा दूषित करील व अनूपदेशांत, शीतकालीं व वातप्रकृतीमध्यें उत्पन्न होईल तर तो पित्त-विकार दूष्य, देश, काल व प्रकृति यांच्याशीं असमान असल्यामुळें सुख-साध्य असतो.

‡ चरकानें रोगांचे तीन मार्ग सांगितले आहेत. शाखा, मर्म व संधि आणि कोष्ठ (कोठा ). शाखा, रक्तादि धातु व त्वचा ह्यांना बाह्यरोगमार्ग म्हणतात; हृदयादिमर्में व संधि ह्यांना मध्यरोगमार्ग म्हणतात; व कोठ्याला आभ्यंतर रोगमार्ग म्हणतात. (च० सू० ११ ) एकमार्गी रोग म्हणजे ह्या तीन रोगमार्गांपैकीं एकामध्येंच जो उत्पन्न होतो तो.

§ ह्या श्लोकार्धाचा अर्थ आम्हीं हेमाद्रीस अनुसरून केला आहे. त्यानें 'आयुषः' पदाचा अर्थ "यावदायुरस्ति तावत्" असा केला आहे. अरुण-दत्तानें 'आयुषः' ही षष्ठी करून 'शेषत्वात्' याचा संबंध रोगाकडे न लावतां आयुष्याकडे लाविला आहे. व ह्या पदद्वयाचा "आयुष्य शिल्लक असल्यामुळें" असा अर्थ केला आहे. हेमाद्रीनें "आयुर्मर्यादेपर्यंत (रोग) शिल्लक असल्यामुळें" असा अर्थ केला आहे, व हाच अर्थ सयुक्तिक दिसतो.

*अनुपक्रम एव स्यात्स्थितोऽत्यन्तविपर्यये।
औत्सुक्यमोहारतिकृद् दृष्टरिष्टोऽक्षनाशनः ॥ ३४ ॥

ज्या रोगामध्यें वरील सर्वच लक्षणें उलट असतात आणि जो अतिशय काळजी, बुद्धिभ्रंश व अस्वस्थता उत्पन्न करतो, व ज्यामध्यें मरणचिन्हें प्रकट होतात व इंद्रियांचो हानि होते तो रोग अप्रतिकार्य जाणावा.

त्यजेदार्तं भिषग्भूपैर्द्विष्टं तेषां द्विषं द्विषम्।
हीनोपकरणं व्यग्रमविधेयं गतायुषम् ॥ ३५ ॥
चण्डं शोकातुरं भीरुं कृतघ्नं वैद्यमानिनम्।

जो राजाचा द्वेष करितो किंवा ज्याचा राजा द्वेष करितो, जो आपला शत्रु आहे, ज्याचीं साधनें कमी असतात, जो कार्यांतरासक्त आहे (ज्याला कामें फार), जो सांगितलेलें ऐकत नाहीं, ज्याचें आयुष्य संपलें आहे, जो साहसी, शोकग्रस्त, भितरा व कृतघ्न आहे, व जो व्यर्थ वैद्यपणाची घमेंडी बाळगितो अशा रोग्याला वैद्यानें सोडावें.

तन्त्रस्यास्य परं चातो वक्ष्यतेऽध्यायसंग्रहः ॥ ३६ ॥

आतां ह्या ग्रंथांतील अध्यायांची अनुक्रमणिका सांगतों.

आयुष्कामदिनर्त्वीहा रोगानुत्पादनद्रवाः।
अन्नज्ञानान्नसंरक्षामात्राद्रव्यरसाश्रयाः ॥ ३७ ॥
दोषादिज्ञानतद्भेदतच्चिकित्साद्युपक्रमः ॥
शुद्ध्यादिस्नेहनस्वेदरेकास्थापननावनम् ॥ ३८ ॥
धूमगण्डूषदृक्सेकतृप्तिर्यन्त्रकशस्त्रकम्।
शिराविधिः शल्यविधिः शस्त्रक्षाराग्निकर्मकौ ॥ ३९ ॥
सूत्रस्थानमिमेऽध्यायास्त्रिंशत्-

सूत्रस्थानांत पुढील तीस अध्याय आहेत.—१ आयुष्कामीय, २ दिनचर्या, ३ ऋतुचर्या, ४ रोगानुत्पादनीय (रोग न होण्याविषयीं), ५ द्रवद्रव्यविज्ञानीय, ६ अन्नस्वरूपविज्ञानीय, ७ अन्नरक्षा, ८ मात्राशितीय (मिताहाराविषयीं), ९ द्रव्यादिविज्ञानीय, १० रसभेदीय, ११ दोषादिविज्ञानीय, १२ दोषभेदीय, १३ दोषोपक्रमणीय (दोषांच्या प्रतिकाराविषयीं), १४ द्विविधोपक्रमणीय (दोन प्रकारच्या चिकित्सेविषयीं), १५ शोधनादिगणसंग्रह, १६ स्नेहविधि, १७ स्वेदविधि, १८ वमनविरेचनविधि, १९ बस्तिविधि, २० नस्यविधि, २१ धूमविधि, २२ गंडूषविधि (गुळण्या करण्याविषयीं), २३ आश्चोतनांजनविधि, (डोळ्यांत बिंदु सोडणें व अंजन करणें यांविषयीं), २४ तर्पण पुटपाकविधि (डोळ्यांवर पडीनें पातळ औषध धारण करणें, व पुटपाक यांविषयीं), २५ यंत्रविधि, २६ शस्त्रविधि, २७ शिराव्यधविधि (शिरा काढण्याविषयीं), २८ शल्याहरणविधि (शल्य बाहेर काढण्याविषयीं), २९ शस्त्रकर्मविधि, ३० क्षाराग्निकर्मविधि.

शारीरमुच्यते।
गर्भावक्रान्तितद्व्यापदङ्गमर्मविभागिकम् ॥ ४० ॥
विकृतिर्दूतजं षष्ठम्-

आतां शारीरस्थानांतील अध्याय सांगतों.

१ गर्भावक्रांति (गर्भाच्या उत्पत्तीविषयीं), २ गर्भव्यापत् (गर्भाच्या विकाराविषयीं), ३ अंगविभाग, ४ मर्मविभाग, ५ विकृतिविज्ञानीय. ६ दूतविज्ञानीय.

निदानं सार्वरोगिकम्।
ज्वरासृक्कासश्वासयक्ष्मादिमदाद्यर्शोऽतिसारिणाम् ॥४१॥
मूत्राघातप्रमेहाणां विद्रध्याद्युदरस्य च।
पाण्डुकुष्ठानिलार्तानां वातास्रस्य च षोडश ॥ ४२ ॥

निदानस्थानांतील सोळा अध्याय येणेंप्रमाणें:—१ सर्वरोगनिदान, २ ज्वरनि०, ३ रक्तपित्तकासनि०, ४ श्वासहिक्कानि०, ५ राजयक्ष्मादिनि०, ६ मदात्ययादिनि०, ७ अर्शोनि०, ८ अतिसारग्रहणीदोषनि०, ९ मूत्राघातनि०, १० प्रमेहनि०, ११ विद्रधिवृद्धिगुल्मनि०, १२ उदरनि०, १३ पांडुशोफविसर्पनि०, १४ कुष्ठश्वित्रकृमिनि०, १५ वातव्याधिनि० व १६ वातशोणितनि०.

चिकित्सितं ज्वरे रक्ते कासे श्वासे च यक्ष्मणि।
वमौ मदात्ययेऽर्शःसु विशि द्वौ द्वौ च मूत्रिते ॥ ४३ ॥
विद्रधौ गुल्मजठरपाण्डुशोफविसर्पिषु।
कुष्ठश्वित्रानिलव्याधिवातास्रेषु चिकित्सितम् ॥ ४४ ॥
द्वाविंशतिरिमेऽध्यायाः-

चिकित्सास्थानांतील बावीस अध्यायः—१ ज्वरचिकित्सा, २ रक्तपित्तचिकित्सा, ३ कासचिकित्सा, ४ श्वासहिक्काचिकित्सा, ५ राजयक्ष्माचिकित्सा, ६ छर्दिहृद्रोगतृष्णाचिकित्सा, ७ मदात्ययचिकित्सा, ८ अर्शश्चिकित्सा, ९ अतिसारचिकित्सा, १० ग्रहणीचिकित्सा, ११ मूत्रघातचिकित्सा, १२ प्रमेहचिकित्सा, १३ विद्रधिवृद्धिचिकित्सा, १४ गुल्मचिकित्सा, १५ उदरचिकित्सा, १६ पांडुरोगचिकित्सा, १७ श्वयथुचिकित्सा, १८ विसर्पचिकित्सा, १९ कुष्ठचिकित्सा, २० श्वित्रकृमिचिकित्सा, २१ वातव्याधिचिकित्सा, २२ वातरक्तचिकित्सा.

कल्पसिद्धिरतःपरम्।
कल्पो वमेर्विरेकस्य तत्सिद्धिर्बस्तिकल्पना ॥ ४५ ॥
सिद्धिर्बस्त्यापदां षष्ठो द्रव्यकल्पोऽत उत्तरम्।

कल्पस्थानांतील अध्याय येणेंप्रमाणें:—१ वमनकल्प, २ विरेचनकल्प, ३ व्यापत्सिद्धि (वमन व विरेचनापासून होणाऱ्या

---

*ह्या श्लोकांतील औत्सुक्य शब्दाचा अर्थ हेमाद्रीनें मुळींच केला नाहीं व अरुणदत्तानें केलेला जुळत नाहीं. त्याचा वास्तविक अर्थ 'काळजी' किंवा 'तळमळ' असा आहे व या अर्थानें कालिदासानें या शब्दाचा तत्पर्याय उत्कंठा शब्दाचा वारंवार उपयोग केला आहे. आम्हीं दिलेला अर्थ "कालासहत्वमौत्सुक्यं मनस्तापज्वरादिकृत्" ह्या अलंकारोक्त लक्षणाला अनुसरूनच आहे. (रघु० ५, ६७ टीका पहा) प्रस्तुत ठिकाणीं "माझा रोग कधीं बरा होईल, तो होईल किंवा नाहीं?" अशी जी सतत काळजी त्याचेंच नांव औत्सुक्य.

विकारांचा उतार ), ४ बस्तिकल्प, ५ बस्तिव्यापत्सिद्धि ( बस्तिजन्य कष्टांचा प्रतिकार ) व ६ भेषजकल्प.

उत्तरस्थानांतील अध्याय येणेंप्रमाणें:—

**बालोपचारे तद्व्याधौ तद्ग्रहे द्वौ च भूतगौ ॥ ४६ ॥**
**उन्मादेऽथ स्मृतिभ्रंशे द्वौ द्वौ वर्त्मसु संधिषु।**
**दृक्तमोलिङ्गनाशेषु त्रयो द्वौ द्वौ च सर्वगौ ॥ ४७ ॥**
**कर्णनासामुखशिरोव्रणे भङ्गे भगन्दरे।**
**ग्रन्थ्यादौ क्षुद्ररोगेषु गुह्यरोगे पृथग्द्वयम् ॥ ४८ ॥**
**विषे भुजङ्गे कीटेषु मूषकेषु रसायने ॥**
**चत्वारिंशोऽनपत्यानामध्यायो बीजपोषणः ॥ ४९ ॥**

१ बालोपचरणीय, २ बालामयप्रतिषेध, ३ बालग्रहप्रतिषेध, ४ भूतविज्ञानीय, ५ भूतप्रतिषेध, ६ उन्मादप्रतिषेध, ७ अपस्मारप्रतिषेध, ८ वर्त्मरोगविज्ञानीय ( वर्त्म = पापण्या ), ९ वर्त्मरोगप्रतिषेध, १० संधिसितरोगविज्ञानीय ( डोळ्यांचे संधि व पांढरे बुबुळांच्या रोगांविषयी ), ११ संधिसितासितप्रतिषेध ( नेत्रसंधि, पांढरें व काळें बुबुळ यांच्या रोगांविषयीं ), १२ दृष्टिरोगविज्ञानीय, १३ तिमिरप्रतिषेध, १४ लिंगनाशप्रतिषेध, १५ सर्वाक्षिरोगविज्ञानीय, १६ सर्वाक्षिरोगप्रतिषेध, १७ कर्णरोगविज्ञानीय, १८ कर्णरोगप्रति०, १९ नासारोगविज्ञा०, २० नासारोगप्रति० २१ मुखरोगवि०, २२ मुखरोगप्र०, २३ शिरोरोगवि०, २४ शिरोरोगप्रति०, २५ व्रणवि०, २६ सद्योव्रणप्रति० ( जखमेची चिकित्सा ), २७ भंगप्र०, २८ भगंदरप्र०, २९ ग्रंथ्यर्बुदश्लीपदादिवि०, ३० ग्रंथ्यादिप्र०, ३१ क्षुद्ररोगवि०, ३२ क्षुद्ररोगप्र०, ३३ गुह्यरोगवि०, ३४ गुह्यरोगप्र०, ३५ विषप्र०, ३६ सर्पविषप्र०, ३७ कीटलूतादिप्र०, ३८ मूषिकालर्कविषप्र०,* ३९ रसायनाध्याय, ४० वाजीकरणाध्याय.

**इत्यध्यायशतं विंशं षड्भिः स्थानैरुदीरितम्।**
याप्रमाणें साही स्थानें मिळून १२० अध्याय सांगितले आहेत.

---

# द्वितीयोऽध्यायः

## अध्याय २ रा

## अथातो दिनचर्याध्यायं व्याख्यास्यामः ॥

आतां दिनचर्याध्याय सांगतो.

**ब्राह्मे मुहूर्त उत्तिष्ठेत्स्वस्थो रक्षार्थमायुषः**

निरोगी मनुष्यानें रोज पहांटेच्या चार घटका रात्रीस उठावें. तेणेंकरून आयुष्याचें रक्षण होतें.

**शरीरचिन्तां* निर्वर्त्य कृतशौचविधिस्ततः ॥ १ ॥**
**अर्कन्यग्रोधखदिरकरञ्जककुभादिकम्।**
**प्रातर्भुक्त्वा च मृद्वग्रं कषायकटुतिक्तकम् ॥ २ ॥**
**भक्षयेद्दन्तपवनं दन्तमांसान्यबाधयन्।**

मग शौचमुखमार्जन करून रुई, वड, खैर, करंज, अर्जुनसादडा इ. झाडांच्या तुरट, तिखट, कडु व मृदु टोकांच्या काड्या हिरड्यांना इजा न करतां चावाव्या. याप्रमाणें सकाळीं व जेवणानंतरहि करावें.

**नाद्यादजीर्णवमथुश्वासकासज्वरार्दिती ॥ ३ ॥**
**तृष्णास्यपाकहृन्नेत्रशिरःकर्णामयी च तत्।**

अजीर्ण, वांति, श्वास, कास, ज्वर, अर्दितवायु ( ज्यांत तोंड वांकडें होतें ), तृषा, अस्यापाक ( तोंड येणें ), हृद्रोग, नेत्ररोग, शिरोरोग व कर्णरोग हे रोग ज्याला झाले आहेत त्यानें ह्या दंतधावन काष्ठाचा उपयोग करूं नये.

**सौवीरमञ्जनं नित्यं हितमक्ष्णोस्ततो भजेत् ॥ ४ ॥**

तदनंतर डोळ्यांत नित्य सुरमा घालावा. तो डोळ्यांस हितकारक आहे.

**चक्षुस्तेजोमयं तस्य विशेषाच्छ्लेष्मणो भयम्।**
**योजयेत्सप्तरात्रेऽस्मात्स्रावणार्थं रसाञ्जनम् ॥ ५ ॥**

नेत्र तेजोमय असल्यामुळें त्यांना विशेषेंकरून कफापासून भीति आहे, म्हणून आठवड्यांतून एकदां पाणी गाळण्याकरितां डोळ्यांत रसांजन ( रक्तवंती किंवा दारूहळदीचा रांधा ) घालावें.

**ततो नावनगण्डूषधूमताम्बूलभाग्भवेत्।**

तदनंतर नस्य, गुळण्या, धूम्रपान व तांबूल यांचें सेवन करावें.

**ताम्बूलं क्षतपित्तास्रूक्षोत्कुपितचक्षुषाम् ॥ ६ ॥**
**विषमूर्च्छामदार्तानामपथ्यं शोषिणामपि।**

उरःक्षतपीडित, रक्तपित्तपीडित, विष, मूर्च्छा व मद यांनीं पीडित, क्षयी, घसास कोरड पडलेल्या, रूक्ष ( ज्यांचे अंगीं स्नेहांश कमी आहे ) व डोळे आलेल्या लोकांनीं तांबूल सेवन करूं नये.

**अभ्यङ्गमाचरेन्नित्यं स जराश्रमवातहा ॥ ७ ॥**
**दृष्टिप्रसादपुष्ट्यायुःस्वप्नसुत्वक्त्वदार्ढ्यकृत्।**

रोज अंगास तेलाचा अभ्यंग करावा. तो वार्धक्य, श्रम व वात

---

* अलर्क म्हणजे पिसाळलेलें कुत्रें.

* 'शरीरचिन्तां निर्वर्त्य' याचा अर्थ आमचे मतें "मलमूत्राचा उत्सर्ग करून" असा आहे. निर्वर्तन शब्दाचा अर्थ एखादी गोष्ट उरकून घेणें असा होतो व शरीरचिंता म्हणजे प्रसंगेंकरून मलमूत्रोत्सर्गात्मक समजावी.

हेमाद्रीच्या मतें "माझें शरीर कसें आहे, त्याप्रीत्यर्थ मीं काय काय केलें व काय काय केलें पाहिजे इत्यादि गोष्टींचा विचार करून" असा अर्थ निघतो. अरुणदत्ताच्या मतें 'अन्न जिरलें किंवा नाहीं याचा विचार करून' असा अर्थ निष्पन्न होतो.

ह्या ठिकाणीं शरीरचिंता याचा आत्मविचार असाहि एक अर्थ होण्याचा संभव आहे. कारण 'शरीर' शब्द आत्मवाचकहि आहे. धर्मशास्त्रांतील प्रातःकालीन विधींची वरील श्लोकाशीं एकवाक्यता केल्यास व 'ब्राह्म मुहूर्त' हा शब्द अन्वर्थक घेतल्यास हाच अर्थ सयुक्तिक दिसतो.

यांचा नाश करितो, दृष्टि स्वच्छ करितो, पुष्टि देतो, आयुष्य वाढवितो, निद्रा देतो, त्वचा सुकुमार करितो, व शरीर दृढ करितो.

**शिरःश्रवणपादेषु तं विशेषेण शीलयेत् ॥ ८ ॥**

तो मुख्यत्वेंकरून डोकें, पाय व कान यांचे ठायीं नेहमीं करावा.

**वर्ज्योऽभ्यङ्गः कफग्रस्तकृतसंशुद्ध्यजीर्णिभिः ।**

ज्यांना कफविकार झाले आहेत, ज्यांनीं वमन किंवा विरेचन घेतलें आहे, व ज्यांना अजीर्ण झालें आहे त्यांनीं अभ्यंग करूं नये.

**लाघवं कर्मसामर्थ्यं दीप्तोऽग्निर्मेदसः क्षयः ॥ ९ ॥**
**विभक्तघनगात्रत्वं व्यायामादुपजायते ।**

व्यायामापासून अंग हलकें होतें, काम करण्याचें सामर्थ्य येतें, भूक वाढते, वात झडतो, व शरीर रेखीव, पिळदार व घट्ट (कणखर) होतें.

**वातपित्तामयी बालो वृद्धोऽजीर्णी च तं त्यजेत् ॥१०॥**

ज्याला अजीर्ण किंवा वातपित्तात्मक विकार झाले आहेत त्यानें, म्हाताऱ्यांनीं व मुलांनीं [ सोळा वर्षांच्या आंतील ] व्यायाम करूं नये.

**अर्धशक्त्या निषेव्यस्तु बलिभिः स्निग्धभोजिभिः ।**
**शीतकाले वसन्ते च मन्दमेव ततोऽन्यदा ॥ ११ ॥**

स्निग्ध आहार करणाऱ्या व बळकट पुरुषांनीं शीतकालीं व वसंतऋतूमध्यें* आपल्या शक्तीच्या निम्मे व्यायाम करावा. इतर ऋतूंमध्यें अगदीं अल्प व्यायाम करावा.

**तं कृत्वाऽनुसुखं देहं मर्दयेच्च समन्ततः ।**

व्यायाम झाल्यावर सर्वांग सुखकर वाटेल अशा रीतीनें रगडून घ्यावें.

**तृष्णा क्षय प्रतमको रक्तपित्तं श्रमः क्लमः ॥ १२ ॥**
**अतिव्यायामतः कासो ज्वरश्छर्दिश्च जायते ।**

अतिव्यायामापासून तृषा, क्षय, श्वास, रक्तपित्त, श्रम, ग्लानि, खोकला, ताप व वांति हे विकार उत्पन्न होतात.

**व्यायामजागराध्वस्त्रीहास्यभाष्यादि साहसम् ॥ १३ ॥**
**गजं सिंह इवाकर्षन् भजन्नति विनश्यति ।**

व्यायाम, जागरण, मार्गक्रमण, स्त्रीसेवन, हास्य व भाषण करणें इ० साहसांचें अतिसेवन करणारा मनुष्य हत्तींवर हल्ला करणाऱ्या सिंहाप्रमाणें नाश पावतो. †

---

* आपल्या शक्तीच्या निम्मे व्यायाम करावा असें जें म्हटलें आहे त्यासंबंधानें सुश्रुतांत असें स्पष्ट सांगितलें आहे :—

'हृदिस्थानस्थितो वायुर्यदा वक्त्रं प्रपद्यते । व्यायामं कुर्वतो जन्तोस्तद्बलार्धस्य लक्षणम् ॥' म्हणजे अर्थात् श्वासोच्छ्वास तोंडावाटे चालू होण्याइतका थकवा आला म्हणजे शक्तीच्या निम्मे व्यायाम झाला असें समजावें.

† गजसिंहांच्या दृष्टान्तावरून असें सुचविलें कीं, व्यायामादिक गोष्टी आपल्या शक्तीच्या परमावधीपर्यंत कधींहि करूं नये. जरी सिंह गजाचा पाडाव करूं शकता तरी ती त्याच्या शक्तीची परमावधि होय व त्या कृत्याच्या योगानें त्याला बराच थकवा येऊन त्याचें थोडें तरी नुकसान होतें.

---

**उद्वर्तनं कफहरं मेदसः प्रविलायनम् ॥ १४ ॥**
**स्थिरीकरणमङ्गानां त्वक्प्रसादकरं परम् ।**

अंगास उटणें लावल्यानें कफ व मेद झडतात, शरीर दृढ होतें, व त्वचा फार स्वच्छ होते.

**दीपनं वृष्यमायुष्यं स्नानमूर्जाबलप्रदम् ॥ १५ ॥**
**कण्डूमलश्रमस्वेदतन्द्रातृड्दाहपाप्मजित् ।**

स्नानापासून मल, कंडू, श्रम, स्वेद, तंद्रा, तृषा, दाह व पाप यांचा नाश होऊन अग्नि दीप्त होतो व आयुष्य, बल, तेज व पुरुषत्व यांची वृद्धि होते.

**† उष्णाम्बुनाधःकायस्य परिषेको बलावहः ॥ १६ ॥**
**तेनैव चोत्तमाङ्गस्य बलहृत्केशचक्षुषाम् ।**

ऊन पाण्यानें स्नान गळ्याखालून केल्यानें शक्ति वाढते, परंतु तेंच डोक्यावरून केलें असतां केंसांस व दृष्टीस धक्का बसतो (म्हणजे अर्थात् स्नान करतेवेळीं थंड पाण्यानें डोकें भिजवावें व अंगावर ऊन पाणी घ्यावें.)

**स्नानमर्दितनेत्रास्यकर्णरोगातिसारिषु ॥ १७ ॥**
**आध्मानपीनसाजीर्णभुक्तवत्सु च गर्हितम् ।**

अर्दित वायु, नेत्ररोग, मुखरोग, कर्णरोग, अतिसार, आध्मान (पोटफुगी), पीनस, अजीर्ण हे विकार झाले असतां व भोजनानंतर स्नान करूं नये.

**जीर्णे हितं मितं चाद्यान्न वेगानीरयेद्बलात् ॥ १८ ॥**
**न वेगितोऽन्यकार्यः स्यान्नाजित्वा साध्यमामयम् ।**

पूर्वीचा आहार जिरला म्हणजे पथ्यकारक व नियमित प्रमाणानें जेवण करावें. बलात्कारानें वातमूत्रादिकांची प्रवृत्ति करूं नये. मलमूत्रादिकांचा वेग आला असतां अन्य कार्यांत गुंतूं नये. तसाच एखादा रोग उत्पन्न झाला असतां तो साध्य असल्यास बरा केल्याशिवाय दुसरें कोणतेंहि काम करूं नये.

**सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः ॥ १९ ॥**
**सुखं च न विना धर्मात्तस्माद्धर्मपरो भवेत् ।**

सर्व प्राण्यांचे एकंदर उद्योग सुखाकरितां चालले आहेत व सुख तर धर्मावांचून नाहीं. म्हणून निरंतर धर्मपर असावें.

---

† हेमाद्रीचें म्हणणें असें कीं केंसांची व नेत्रांची बळकटी ज्यांना पाहिजे असेल त्यांनीं थंड पाण्यानें व इतरांनीं ऊन पाण्यानें स्नान करावें. एकाच वेळीं दोहोंचा प्रयोग कधींहि करूं नये. कारण क्रियासंकरामुळें दोष उत्पन्न होतो. अरुणदत्तानें त्यासंबंधानें कांहींच लिहिलें नाहीं (मौनं सर्वार्थसाधकम्). आम्हीं दिल्याप्रमाणेंच वाग्भटाचा अभिप्राय असावा असें ह्या व सुश्रुतांतील श्लोकांच्या पदांच्या जुळणीवरून स्पष्ट दिसतें. "उष्णेन शिरसः स्नानमहितं चक्षुषः सदा ॥ शीतेन शिरसः स्नानं चक्षुष्यमिति निर्दिशेत्" ॥ (सुश्रुत. चि० अ० २४). शिवाय एकाच वेळीं डोक्यावर थंड व अंगावर ऊन पाणी घेतल्यानें क्रियासंकर दोष होत नाहीं, असा आमचा व आमच्या स्नेह्यांचा अनुभव आहे. यास्तव ह्या ठिकाणीं हेमाद्रीची चूक आहे असें आम्हास वाटतें.

**भक्त्या कल्याणमित्राणि सेवेतेतरदूरगः ॥ २० ॥**

सज्जन मित्रांशीं मोठ्या प्रीतीनें स्नेह करावा व दुर्जनांपासून दूर रहावें.

**हिंसास्तेयान्यथाकामं पैशून्यं परुषानृते।**
**संभिन्नालापव्यापादमभिध्यादृग्विपर्ययम् ॥ २१ ॥**
**पापं कर्मेति दशधा कायवाङ्मानसैस्त्यजेत्।**

हिंसा, चोरी, व्यभिचार, चाहाडी, अप्रिय, असत्य व असंबद्ध भाषण, दुसऱ्याचा नाश करण्याची बुद्धि, मात्सर्य व शास्त्रविरुद्ध विचार ( वेदादिकांवर अविश्वास ), हीं दहा प्रकारचीं पापकर्में यांचा काया, वाचा व मनेंकरून त्याग करावा.

**अवृत्तिव्याधिशोकार्ताननुवर्तेत शक्तितः ॥ २२ ॥**

गरीब, व्याधित व दुःखित यांना यथाशक्ति साहाय्य करावें.

**आत्मवत्सततं पश्येदपि कीटपिपीलिकम्।**

किड्यामुंगीला देखील आपल्याप्रमाणेंच कृपादृष्टीनें पहावें.

**अर्चयेद्देवगोविप्रवृद्धवैद्यनृपातिथीन् ॥ २३ ॥**

देव, गोब्राह्मण, वृद्ध, वैद्य, राजा व अतिथि यांची यथायोग्य पूजा करावी.

**विमुखान्नार्थिनः कुर्यान्नावमन्येत नाक्षिपेत्।**

याचकाला कांहीं न देतां घालवूं नये. त्यांचा अवमान करूं नये व त्यांना कठोर शब्दांनीं बोलूं नये.

**उपकारप्रधानः स्यादपकारपरेऽप्यरौ ॥ २४ ॥**

आपलें नुकसान करणाऱ्या शत्रूवरहि प्रायः उपकारच करावा.

**संपद्विपत्स्वेकमना हेतावीर्ष्येत्फले न तु।**

संपत्ति व विपत्तीमध्यें एकच चित्तवृत्ति ठेवावी. एखाद्याच्या चांगल्या गुणाविषयीं ईर्षा करावी, तत्साध्य जें द्रव्यादिक त्याविषयीं करूं नयें.

**काले हितं मितं ब्रूयादविसंवादि पेशलम् ॥ २५ ॥**

हितकारक, थोडें, गोड, सत्य व प्रसंगोचित भाषण करावें.

**पूर्वाभिभाषी सुमुखः सुशीलः करुणामृदुः।**
**नैकः सुखी न सर्वत्र विश्रब्धो न च शङ्कितः ॥ २६ ॥**

ओळखीचा मनुष्य भेटला असतां प्रसन्न मुद्रेनें, सौजन्यानें व दयार्द्र हृदयानें, कुशलादिक प्रश्न आपणच सुरू करावे. जो कोणावरच कधीं विश्वास ठेवीत नाहीं किंवा सर्वांवरच विश्वास ठेवतो किंवा एकटाच राहतो तो कधींहि सुख पावत नाहीं.

**न कंचिदात्मनः शत्रुं नात्मानं कस्यचिद्रिपुम्।**
**प्रकाशयेन्नापमानं न च निःस्नेहतां प्रभोः ॥ २७ ॥**

आपण कोणाला शत्रु आहों किंवा आपला एखादा शत्रु आहे असें कोणाजवळहि प्रगट करूं नये. आपला अपमान झाला असतां किंवा आपल्यावर वरिष्ठाची गैरमर्जी झाली असतां तेंहि प्रगट करूं नये.

**जनस्याशयमालक्ष्य यो यथा परितुष्यति।**
**तं तथैवानुवर्तेत पराराधनपण्डितः ॥ २८ ॥**



दुसऱ्याचें मन संतुष्ट ठेवण्याविषयीं दक्ष असून, दुसऱ्याचा आशय लक्षांत आणून त्याला जसें आवडेल तसें त्याच्याशीं वर्तन ठेवावें.

**न पीडयेदिन्द्रियाणि न चैतान्यतिलालयेत्।**

इंद्रियांच्या अत्यंत स्वाधीनहि होऊं नये व त्यांना अति क्लेशहि देऊं नये.

**त्रिवर्गशून्यं नारम्भं भजेत्तं चाविरोधयन् ॥ २९ ॥**
**अनुयायात्प्रतिपदं सर्वधर्मेषु मध्यमाम्।**

ज्यांत धर्मार्थकामांपैकीं कोणताच इतराविरोधी पुरुषार्थ नाहीं, असा उद्योग करूं नये. व सर्व प्रकारच्या धर्माचरणांत मध्यम मार्गाचें अनुवर्तन करावें.* ( धर्मसंबंधीं गोष्टींपैकीं कोणत्याच गोष्टींत अत्यासक्ति किंवा अनासक्ति दाखवूं नये. )

**नीचरोमनखश्मश्रुर्निर्मलाङ्घ्रिमलायनः ॥ ३० ॥**
**स्नानशीलः सुसुरभिः सुवेषोऽनुल्बणोज्ज्वलः।**
**धारयेत्सततं रत्नसिद्धमन्त्रमहौषधीः ॥ ३१ ॥**

नखें, केश व दाढी, मिशा, फार वाढूं देऊं नयेत. पाय व कर्ण-नासिकादि मलद्वारें स्वच्छ ठेवावींत. दररोज स्नान करावें, चंदनादि सुगंधांचें धारण करावें, स्वच्छ, चांगला व नम्र वेष धारण करावा व रत्नें, महौषधी व सिद्धमंत्र यांनाहि सर्वदा धारण करावें.

**सातपत्रपदत्राणो विचरेद्युगमात्रदृक्।**
**निशि चात्ययिके कार्ये दण्डी मौली सहायवान् ॥ ३२ ॥**

चालतांना चारच हात पुढें नजर असावी. पायांत जोडा असावा. छत्री धरावी. रात्रीं किंवा कठीण प्रसंगीं बाहेर जाणें असल्यास हातांत काठी, डोकीस आच्छादन व बरोबर एखादा सोबती घेतल्यावांचून जाऊं नये.

**चैत्यपूज्यध्वजाशस्तच्छायाभस्मतुषाशुचीन्।**
**नाक्रामेच्छर्करालोष्ठबलिस्नानभुवोऽपि च ॥ ३३ ॥**

चैत्य† ( पूज्य पिंपळ ) ब्राह्मण वगैरे पूज्य, ध्वज व चांडलादि नीच लोक यांची छाया व राख, कोंडा व घाण ओलांडूं नये, व खड्यांच्या किंवा ढेकळांच्या जागेंतून व पूजेच्या किंवा स्नान करण्याच्या जागेंतून जाऊं नये.

**नदीं तरेन्न बाहुभ्यां नाग्निस्कन्धमभिव्रजेत्।**
**संदिग्धनावं वृक्षं च नारोहेद्दुष्टयानवत् ॥ ३४ ॥**

---

* 'मध्यम मार्गाचें' ( मध्यमा प्रतिपद् ) ह्या शब्दाचा ध्वनितार्थ बौद्ध धर्मोक्त मार्ग असा होतो, असें अलीकडील आमच्या वाचनावरून लक्षांत आलें आहे. बौद्ध धर्माच्या ग्रंथांत त्या धर्माला मध्यमा प्रतिपद् असेंच नांव खुद्द शाक्यसिंहानें दिलेलें आढळतें. शाक्यबुद्धाचा मार्ग, हिंसाप्रचुर असा प्राचीन वैदिक मार्ग व अहिंसेची पराकाष्ठा असा जो जैन धर्म ह्या दोहोंच्या मधली स्थिति आहे. म्हणून त्याला मध्यम मार्ग ( मध्यमा प्रतिपद् ) म्हणतात.

† चैत्य=जातकर्मादिक मौंज्यंत संस्कार केलेला व ज्याची पूजा सर्व लोक करितात तो पिंपळ. चैत्य=बौद्धालय असेंहि कित्येकांचें मत आहे.

नदी पोहून पार जाऊं नये. अग्नीच्या ज्वाळेजवळ जाऊं नये. जी नाव बुडेल अशी शंका आहे तीमध्यें बसूं नये. झाडावर चढूं नये व खोडकर जनावरावर बसूं नये.

नासंवृतमुखः कुर्यात्क्षुतिहास्यविजृम्भणम् ।

तोंड झांकल्यावांचून हसूं नये व शिंका किंवा जांभई देऊं नये.

नासिकां न विकुष्णीयान्नाकस्माद्विलिखेद्भुवम् ॥३५॥
*नाङ्गैश्चेष्टेत विगुणं नासीतोत्कटकस्थितः ।

नाक कोरीत बसूं नये. जमिनीवर उगीच रेघा काढूं नये. अंगें वेडींवांकडीं करूं नयेत व फार वेळ उकीडवें बसूं नये.

देहवाक्चेतसां चेष्टाः प्राक्श्रमाद्विनिवर्तयेत् ॥ ३६ ॥
नोर्ध्वजानुश्चिरं तिष्ठेन्नक्तं सेवेत न द्रुमम् ।

कायिक, वाचिक व मानसिक क्रिया श्रम होण्यापूर्वीच बंद कराव्यात. फार वेळ गुडघे उभे करून बसूं नये. व रात्रीं झाडाखालीं राहूं नये.

तथा चत्वरचैत्यान्तश्चतुष्पथसुरालयान् ॥ ३७ ॥
सूनाटवीशून्यगृहश्मशानानि दिवापि न ।

तसेंच अंगणांत, पिंपळाजवळ, चव्हाठ्यावर व देवळांत रात्रीं निजूं नये व बसूं नये, वधस्थान, अरण्य, ओसाड गृह व स्मशान, इतक्या ठिकाणीं दिवसां देखील जाऊं नये.

सर्वथेक्षेत नादित्यं न भारं शिरसा वहेत् ॥ ३८ ॥
नेक्षेत प्रततं सूक्ष्मदीप्तामेध्याप्रियाणि च ।

सूर्याकडे कधींहि पाहूं नये, डोक्यानें ओझें वाहूं नये. बारीक, अतिशय देदीप्यमान, अपवित्र व अप्रिय पदार्थांकडे एकसारखें पाहूं नये.

मद्यविक्रयसंधानदानादानानि नाचरेत् ॥ ३९ ॥

मद्य विकणें, तयार करणें, देणें व घेणें ह्या क्रिया करूं नयेत.

पुरोवातातपरजस्तुषारपरुषानिलान् ।
अनृजुः क्षवथूद्गारकासस्वप्नान्नमैथुनम् ॥ ४० ॥
कूलच्छायानृपद्विष्टव्यालदंष्ट्रिविषाणिनः ।
हीनानार्यातिनिपुणसेवां विग्रहमुत्तमैः ॥ ४१ ॥
संध्यास्वभ्यवहारस्त्रीस्वप्नाध्ययनचिन्तनम् ।
†शत्रुसत्रगणाकीर्णगणिकापणिकाशनम् ॥ ४२ ॥
गात्रवक्त्रनखैर्वाद्यं हस्तकेशावधूननम् ।
तोयाग्निपूज्यमध्येन यानं धूमं शवाश्रयम् ॥ ४३ ॥
मद्यातिसक्तिं विश्रम्भस्वातन्त्र्ये स्त्रीषु च त्यजेत् ।

पूर्वेकडचा वारा, सकाळचें ऊन, धूळ, पाऊस व तीव्र वायु यांचें सेवन करूं नये. शरीर अस्ताव्यस्त असतांना शिंक, ढेकर देणें, खोकणें, झोप घेणें, खाणें, मैथुन करणें, ह्या क्रिया करूं नयेत. नदीच्या दरडीजवळ बसूं नये. राजशत्रु, हत्ती, सर्प व शृंगयुक्त पशु इत्यादिकांचे जवळ जाऊं नये. नीच व अति शहाणे अशा लोकांची सेवा व बलिष्ठांशीं कज्जा करूं नये. संध्याकाळीं जेवण, स्त्रीसेवन, निद्रा, अध्ययन व चिंतन हीं वर्ज करावीं. शत्रु, यज्ञसत्र, वेश्या व वाणी इतक्या ठिकाणचें अन्न व गणान्न यांचें सेवन करूं नये. तोंडानें, नखानें व शरीराच्या कोणत्याहि भागानें वाद्य करूं नये. हस्त व केस उगीच हलवूं नयेत. पाणी, अग्नि व ब्राह्मणादि पूज्य यांचेमधून जाऊं नये. अति मद्यपान करूं नये, स्त्रियांवर विश्वास ठेवूं नये व त्यांना स्वातंत्र्य देऊं नये.

आचार्यः सर्वचेष्टासु लोक एव हि धीमतः ॥ ४४ ॥
अनुकुर्यात्तमेवातो लौकिकेऽर्थे परीक्षकः ।

ज्याअर्थीं सर्व क्रियांमध्यें लोकच उपदेशक आहेत, त्याअर्थीं शहाण्यानें लोक वागतील त्याप्रमाणें लौकिक गोष्टींमध्यें विचारपूर्वक वागावें.

आर्द्रसंतानता त्यागः कायवाक्चेतसां दमः ॥ ४५ ॥
स्वार्थबुद्धिः परार्थेषु पर्याप्तमिति सद्व्रतम् ।

सर्व भूतांवर दया, दान, कायिक, वाचिक, मानसिक क्रियांवर दाब, लोकांच्या कामामध्यें स्वतःप्रमाणें कळकळ इतक्या गोष्टी पाळणें हेंच श्रेष्ठ व्रत होय.

नक्तंदिनानि मे यान्ति कथंभूतस्य संप्रति ॥ ४६ ॥
दुःखभाङ् न भवत्येवं नित्यं सन्निहितस्मृतिः ।

मी कांय करितों आहें, कोठें आहें, माझें वय काय, माझें मन कशांत गुंतलें आहे, हें क्षणोक्षणीं ध्यानांत आणावें (म्हणजे देश, काल, वय व क्रिया ह्यासंबंधानें माझी स्थिति कशी आहे ह्याचें वरचेवर स्मरण करावें,) म्हणजे दुःख होत नाहीं.

इत्याचारः समासेन यं प्राप्नोति समाचरन् ॥ ४७ ॥
आयुरारोग्यमैश्वर्यं यशो लोकांश्च शाश्वतान् ।

हा थोडक्यांत सदाचार सांगितला. ह्याप्रमाणें जो आपली वर्तणूक ठेवितो, तो दीर्घायुष्य, आरोग्य, ऐश्वर्य, यश व मोक्ष यांप्रत पावतो.

---

* 'नाङ्गैश्चेष्टेत विगुणम्' याचा अर्थ 'अंगें वेडींवांकडीं करूं नयेत' असा होतो, किंवा 'वेड्यावांकड्या अंगांनीं क्रिया करूं नयेत' असाहि केला तरी त्याहून चांगलें.

† ह्या श्लोकांत कांहीं प्रकारच्या अन्नांचा निषेध केला आहे. त्यांपैकीं गणाकीर्ण ह्या विशेषणानें जें अन्न सुचविलें जातें, त्यासंबंधानें दोन्ही टीकाकारांचीं मतें भिन्न आहेत. अरुणदत्ताच्या मतें गणाकीर्ण म्हणजे कथेकरी, नाटकवाले वगैरे मंडळींनीं (कथकचरणादिभिः) व्याप्त असें भोजन वर्ज्य आहे. हेमाद्रि ह्या विशेषणाचे दोन भाग करितो. गणाशन व आकीर्णाशन. ह्यांपैकीं एक भाग 'गणान्न' आम्हीं भाषांतरांत दिलाच आहे. त्याचा अर्थ असा कीं, अनेक लोकांनीं पट्टी जमवून केलेलें भोजन. आकीर्ण शब्दाचा अर्थ हेमाद्रीनें 'योग्यायोग्यमविचार्यान्नदाता' असा केला आहे.

# तृतीयोऽध्यायः

## अध्याय ३ रा

**अथात ऋतुचर्याऽध्यायं व्याख्यास्यामः ॥**

आतां ऋतुचर्येचा अध्याय सांगतों.

**मासैर्द्विसङ्ख्यैर्माघाद्यैः क्रमात् षडृतवः स्मृताः।**
**शिशिरोऽथ वसन्तश्च ग्रीष्मवर्षाशरद्धिमाः ॥ १ ॥**
**शिशिराद्यास्त्रिभिस्तैस्तु विद्यादयनमुत्तरम्।**
**आदानं च तदादत्ते नृणां प्रतिदिनं बलम् ॥ २ ॥**

माघापासून पौषापर्यंत दोन दोन महिन्यांचे सहा ऋतु आहेत, ते अनुक्रमें करून शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरत् व हेमंत. शिशिरादि तीन ऋतूंनीं उत्तरायण होतें व त्याला आदान अशी संज्ञा आहे. कारण हा काल मनुष्याचें बळ प्रतिदिवशीं आकर्षण करून घेतो.

**तस्मिन् ह्यत्यर्थतीक्ष्णोष्णरूक्षा मार्गस्वभावतः।**
**आदित्यपवनाः सौम्यान् क्षपयन्ति गुणान् भुवः ॥ ३ ॥**
**तिक्तः कषायः कटुको बलिनोऽत्र रसाः क्रमात्।**

ह्या कालीं सूर्य व वायु मार्गस्वभावेंकरून अत्यंत तीक्ष्ण, उष्ण व रूक्ष असल्यामुळें ते पृथ्वीच्या सौम्य गुणांचा ऱ्हास करितात व त्याच कारणामुळें कडू, तुरट व तिखट ह्या रसांना शिशिर, वसंत व ग्रीष्म ह्या ऋतूंमध्यें अनुक्रमेंकरून जोर येतो.

**तस्मादादानमाग्नेयम्**

ह्यास्तव आदानामध्यें अग्निशक्तीचें प्राधान्य असतें.

**ऋतवो दक्षिणायनम् ॥ ४ ॥**
**वर्षादयो विसर्गश्च यद्बलं विसृजत्ययम्।**

वर्षादि तीन ऋतूंनीं दक्षिणायन होतें. ह्याला विसर्ग अशी संज्ञा आहे; कारण हा काल प्राणिमात्रास बल देतो.

**सौम्यत्वादत्र सोमो हि बलवान् हीयते रविः ॥ ५ ॥**
**मेघवृष्ट्यनिलैः शीतैः शान्ततापे महीतले।**
**स्निग्धाश्चेहाम्ललवणमधुरा बलिनो रसाः ॥ ६ ॥**

कारण ह्या कालामध्यें चंद्राचें आधिपत्य असून चंद्र बलवान् असतो, व सूर्याची शक्ति कमी होते; व गार वारा व पाऊस ह्यांचे योगानें पृथ्वींतील उष्णता कमी होऊन स्निग्ध असे जे अम्ल, लवण व मधुर रस ते पुष्ट होतात.

**शीतेऽग्र्यं वृष्टिघर्मेऽल्पं बलं मध्यं तु शेषयोः।**

शीतकालीं ( हेमंत व शिशिर ऋतूंत ) मनुष्याचें बळ अधिक असतें. ग्रीष्म व वर्षाकालीं कमी असतें व अवशिष्ट ऋतूंमध्यें ( शरद् व वसंत ) मध्यम असतें.

**बलिनः शीतसंरोधाद्धेमन्ते प्रबलोऽनलः ॥ ७ ॥**
**भवत्यल्पेन्धनो धातून्स पचेद्वायुनेरितः।**

हेमंत ऋतूमध्यें थंडीच्या योगानें शरिराचीं सर्व सूक्ष्म छिद्रें आकुंचित होऊन बंद पडल्यामुळें बलवान् पुरुषाचा उष्मा आंतल्या आंत कोंडला जाऊन जठराग्नि फार प्रदीप्त होतो. म्हणून त्यास नेहमींइतकें अन्न पुरत नाहीं व तें पुरतें न मिळाल्यास तो वायूच्या योगानें सर्व शरिरांत शिरून रसादिक धातूंचें पचन करितो.

**अतो हिमेऽस्मिन्सेवेत स्वाद्वम्ललवणान् रसान् ॥८॥**

म्हणून अशा ह्या हिंवाळ्यांत मधुर, अम्ल व लवण ह्या रसांचें यथेच्छ सेवन करावें.

**दैर्घ्यान्निशानामेतर्हि प्रातरेव बुभुक्षितः।**
**अवश्यकार्यं संभाव्य यथोक्तं शीलयेदनु ॥ ९ ॥**
**वातघ्नतैलैरभ्यङ्गं मूर्ध्नि तैलविमर्दनम्।**
**नियुद्धं कुशलैः सार्धं पादाघातं च युक्तितः ॥ १० ॥**

ह्या ऋतूमध्यें रात्र फार मोठी असल्यामुळें सकाळीं उठतांच भूक लागते. म्हणून शौचमुखमार्जनानंतर पहिल्यानें क्षुधेची तृप्ति करून पूर्वोक्त विधीनें वातघ्न तेलांचा अभ्यंग करून टाळूस तेल जिरवावें व कुशल पुरुषांबरोबर कुस्ती खेळून पायानें अंग रगडून घ्यावें.

**कषायापहृतस्नेहस्ततः स्नातो यथाविधि।**
**कुङ्कुमेन सदर्पेण प्रदिग्धोऽगुरुधूपितः ॥ ११ ॥**
**रसान् स्निग्धान् पलं पुष्टं गौडमच्छसुरां सुराम्।**
**गोधूमपिष्टमापेक्षुक्षीरोत्थविकृतीः शुभाः ॥ १२ ॥**
**नवमन्नं वसां तैलं शौचकार्ये सुखोदकम्।**
**प्रावाराजिनकौशेयप्रवेणीकुथकास्तृतम् ॥ १३ ॥**
**उष्णस्वभावैर्लघुभिः प्रावृतः शयनं भजेत्।**
**युक्त्यार्ककिरणान् स्वेदं पादत्राणं च सर्वदा ॥ १४ ॥**

मग अंगास शिकेकाई वगैरे पदार्थांचें पाणी लावून ओशटपणा धुवून काढावा व यथाविधि स्नान करून अंगास केशर-कस्तूरीचें उटणें लावून व अगरूची धुरी घेऊन स्निग्ध मांसरस, पुष्कळ चरबी असलेलें मांस, गुळाची दारू, धान्यादिकांची दारू, सुरामंड, कणीक किंवा रवा, उडीद, ऊंस, दूध इत्यादिकांपासून बनविलेलीं अनेक तऱ्हेचीं उत्तम पक्वान्नें, ताजें अन्न, वसा व तैल इत्यादिकांचें सेवन करावें. हातपाय वगैरे धुण्यास ऊन पाणी घेत जावें. हंतरावयास पलंगपोस, व्याघ्रादिकांचीं कातडीं, गजनीच्या गाद्या, गालिचा व कांबळे व पांघरावयास हलकीं व ऊबदार वस्त्रें घेऊन शयन करावें. ऊन व शेगडी यांचाहि योग्य उपयोग करावा, व नेहमीं पायमोजे व जोडे घालावे.

**पीवरोरुस्तनश्रोण्यः समदाः प्रमदाः प्रियाः।**
**हरन्ति शीतमुष्णाङ्ग्यो धूपकुङ्कुमयौवनैः ॥ १५ ॥**

ज्यांच्या मांड्या, स्तन व नितंब पुष्ट आहेत, अशा मदयुक्त व प्रिय स्त्रिया, अगरु वगैरेंच्या धुऱ्या, केशराची उटी व यौवन यांच्या योगानें आलेली जो उष्णता तिच्या योगानें थंडीचें निवारण करितात.

अङ्गारतापसंतप्तगर्भभूवेश्मचारिणः।
शीतपारुष्यजनितो न दोषो जातु जायते ॥ १६ ॥

ज्याच्यामध्यें शेगड्या पेटवून ऊब आणली आहे अशा तळघरांत जाऊन बसत असावें, म्हणजे कडक थंडीपासून बाधा होत नाहीं.

अयमेव विधिः कार्यः शिशिरेऽपि विशेषतः।
तदा हि शीतमधिकं रौक्ष्यं चादानकालजम् ॥ १७ ॥

शिशिर ऋतूमध्यें देखील याचप्रमाणें वर्तन ठेवावें. या ऋतूंत हेमंतापेक्षां थंडी अधिक असून आदानकाल सुरू झाल्यामुळें हवेंत रूक्षताहि बरीच उत्पन्न होते. व म्हणूनच वरील विधि या ऋतूंत विशेषेंकरून लागू आहे.

कफश्चितो हि शिशिरे वसन्तेऽर्कांशुतापितः।
हत्वाऽग्निं कुरुते रोगानतस्तं त्वरया जयेत् ॥ १८ ॥

शिशिर ऋतूमध्यें संचित झालेला कफ वसंत ऋतूंतील प्रखर सूर्यकिरणांनीं प्रकुपित झाला म्हणजे जठराग्नि क्षीण करून अनेक रोग उत्पन्न करितो, म्हणून वसंत ऋतूंत पहिल्यानें कफाचा नाश करावा.

तीक्ष्णैर्वमननस्याद्यैर्लघुरूक्षैश्च भोजनैः।
व्यायामोद्वर्तनाघातैर्जित्वा श्लेष्माणमुल्बणम् ॥ १९ ॥
स्नातोऽनुलिप्तः कर्पूरचन्दनागुरुकुङ्कुमैः।
पुराणयवगोधूमक्षौद्रजाङ्गलशूल्यभुक् ॥ २० ॥
सहकाररसोन्मिश्रानास्वाद्य प्रिययार्पितान्।
प्रियास्यसङ्गसुरभीन् प्रियानेत्रोत्पलाङ्कितान् ॥ २१ ॥
सौमनस्यकृतो हृद्यान्वयस्यैः सहितः पिबेत्।
निर्गदानासवारिष्टसीधुमार्द्वीकमाधवान् ॥ २२ ॥

कफप्रकोप झाला असतां तीव्र वमनें, नस्यें इ० औषधें, हलकीं व रूक्ष अन्नें, व व्यायाम, उटणें व मर्दन इत्यादिकांच्या योगानें त्याचा नाश करावा व स्नान केल्यावर कर्पूर, चंदन, केशर व अगरु इत्यादिकांचें उटणें लावून जुने जव, गहूं, मध, हरिण, ससा वगैरे जांगलांचें मांस व लोखंडाच्या सळईनें भाजलेलें मांस इत्यादिकांचें भक्षण करून निर्दोष अशीं आसवें (धान्यादिकांच्या काढयापासून तयार केलेलें मद्य), औषधियुक्त मद्यें (अरिष्ट), उसाची दारू (सीधु), द्राक्षासव (मार्द्वीक) व मधाची दारू (ज्यांचा सुवास वाढविण्याकरितां त्यांत आंब्याचा रस घातला आहे व जीं अगोदर प्रिय स्त्रियांना देऊन त्यांच्या मुखसंपर्केंकरून अधिक सुवासित झालीं आहेत व ज्यांच्यामध्यें त्यांच्या नेत्रांची कांति जशी काय प्रतिबिंबितच झाली आहे) अशीं नानाप्रकारचीं उत्तेजक व रुचिकर मद्यें आप्तमित्रांसह सेवन करावीं.

शृङ्गवेराम्बु साराम्बु मध्वम्बु जलदाम्बु वा।

सुंठीचें पाणी, खदिरादिकांच्या गाभ्याचें पाणी, मधुमिश्रित पाणी, किंवा नागरमोथ्याचें पाणी, यांचेंहि सेवन करावें.

दक्षिणानिलशीतेषु परितो जलवाहिषु ॥ २३ ॥
*अदृष्टनष्टसूर्येषु मणिकुट्टिमकान्तिषु।
परपुष्टविघुष्टेषु कामकर्मान्तभूमिषु ॥ २४ ॥
विचित्रपुष्पवृक्षेषु काननेषु सुगन्धिषु।
गोष्ठीकथाभिश्चित्राभिर्मध्याह्नं गमयेत्सुखी ॥ २५ ॥

जेथें दक्षिणेकडील थंड वारा झुळझुळ वहात आहे, ज्यांच्या सभोंवतीं पाण्याचे पाट वहात आहेत, जेथें (वृक्षांची गर्द छाया असल्यामुळें) सूर्यकिरणांचा आंत क्वचित (थोडासा) प्रवेश होतो, ज्यांत अनेक आरसेमहाल चकाकत आहेत, कोकिलांचे मधुर स्वर कानीं पडत आहेत, रतिक्रीडेकरितां स्थानें तयार आहेत, चित्रविचित्र पुष्पवृक्ष दाट पसरले आहेत व त्यांचा घमघमाट सर्वत्र सुटला आहे, अशा उपवनामध्यें नानाप्रकारच्या गोष्टी व क्रीडा करण्यामध्यें वसंतऋतूंतील मध्याह्न समय घालवावा.

गुरुशीतदिवास्वप्नस्निग्धाम्लमधुरांस्त्यजेत्।

जड, थंड, स्निग्ध, आंबट व मधुर यांचें सेवन करूं नये व दिवसास निजूं नये.

तीक्ष्णांशुरतितीक्ष्णांशुर्ग्रीष्मे संक्षिपतीव यत् ॥ २६ ॥
प्रत्यहं क्षीयते श्लेष्मा तेन वायुश्च वर्धते।

ग्रीष्म ऋतूमध्यें सूर्य आपल्या अतितीव्र किरणांनीं पृथ्वीचे रस आकर्षण करून घेतो म्हणून कफ दिवसानुदिवस क्षीण होऊन वायु वृद्धि पावतो.

अतोऽस्मिन्पटुकट्वम्लव्यायामार्ककरांस्त्यजेत् ॥ २७ ॥

यास्तव या ऋतूंत तिखट, मीठ, आंबट, व्यायाम व ऊन यांचें सेवन करूं नये.

भजेन्मधुरमेवान्नं लघु स्निग्धं हिमं द्रवम्।

फक्त मधुर, लघु, स्निग्ध, शीत व द्रव अशा आहारांचें सेवन करावें.

सुशीततोयसिक्ताङ्गो लिह्यात्सक्तून्सशर्करान् ॥ २८ ॥

थंड पाण्याचें स्नान करावें व भाजलेल्या सातूचें पीठ साखर घालून खावें.

मद्यं न पेयं पेयं वा स्वल्पं सुबहुवारि वा।

मद्य मुळींच पिऊं नये, किंवा पिणेंच झाल्यास थोडें किंवा जलमिश्रित प्यावें.

अन्यथा शोफशैथिल्यदाहमोहान्करोति तत् ॥ २९ ॥

नाहीं तर तें सूज, शैथिल्य, दाह व मोह इत्यादि विकार उत्पन्न करितें.

कुन्देन्दुधवलं शालिमश्नीयाज्जाङ्गलैः पलैः।

---

*हेमाद्रीनें 'अदृष्टानष्टसूर्येषु' असा पाठ घेऊन अदृष्टसूर्येषु = घनच्छायेषु व अनष्टसूर्येषु = प्रकाशवत्सु असा अर्थ केला आहे. अरुणदत्तानें अदृष्ट = ईषद्दृष्ट व नष्ट = मुळींच न दिसणारा असा अर्थ केला आहे. आमचें भाषांतर अरुणदत्तास अनुसरून आहे.

कुंदपुष्पासारखा किंवा चंद्रासारखा शुभ्र भात जांगलमांसाबरोबर खावा.

**पिबेद्रसं नातिघनं रसालां रागखाण्डवौ ॥ ३० ॥**
***पानकं पञ्चसारं वा नवमृद्भाजनस्थितम् ।**
**†मोचचोचदलैर्युक्तं साम्लं मृन्मयशुक्तिभिः ॥ ३१ ॥**

फार दाट नव्हे असा मांसरस, श्रीखंड, निरनिराळ्या तऱ्हेचीं रायतीं, मोरंबे, कोऱ्या मडक्यांत ठेवून गार केलेलीं, खोबरें व केळाच्या फोडी घातलेलीं व किंचित् आंबट अशीं सरबतें व मनुका, खजूर, मोहाचीं फुलें, शिवणीचीं फळें व फालसा यांनीं तयार केलेलीं पंचसार नांवाचीं पानकें मृन्मयपात्रानें प्यावीं.

**‡पाटलावासितं चाम्भः सकर्पूरं सुशीतलम् ।**

गुलाबाचा व कापराचा वास लावलेलें थंडगार पाणीहि प्यावें.

**शशाङ्ककिरणान् भक्ष्यान् रजन्यां भक्षयन् पिबेत् ३२**
**ससितं माहिषं क्षीरं चन्द्रनक्षत्रशीतलम् ।**

रात्रीं कर्पूरनाडिका ( शेवया ) खाऊन वर नक्षत्रांच्या किंवा चंद्राच्या चांदण्यांत ठेवून शीतल झालेलें म्हशीचें दूध साखर घालून प्यावें.

**अभ्रंङ्कषमहाशालतालरुद्धोष्णरश्मिषु ॥ ३३ ॥**
**वनेषु माधवीश्लिष्टद्राक्षास्तबकशालिषु ।**
**सुगन्धिहिमपानीयसिच्यमानपटालिके ॥ ३४ ॥**
**कायमाने चिते चूतप्रवालफललुम्बिभिः ।**
**कदलीदलकह्लारमृणालकमलोत्पलैः ॥ ३५ ॥**
**कल्पिते कोमलैस्तल्पे हसत्कुसुमपल्लवे ।**
**मध्यन्दिनेऽर्कतापार्तः स्वप्याद्धारागृहेऽथवा ॥ ३६ ॥**
**पुस्तस्त्रीस्तनहस्तास्यप्रवृत्तोशीरवारिणि ।**

दुपारीं उन्हाचा फार संताप होऊं लागला म्हणजे जेथें मोठमोठाले गगनचुंबित शालतालादि वृक्ष सूर्यकिरणांचा अटकाव करितात, व मोतियाच्या वेलींनीं आलिंगित द्राक्षांचे घोस लोंबत आहेत अशा उपवनांत जाऊन तेथील आम्रपल्लवांनीं व आंब्याच्या घोसांनीं व्याप्त व सुगंध, शीतल जल शिंपडलेल्या पडद्यांनीं युक्त अशा मंडपामध्यें कोमल केळीचें दल, कमलांचे देंठ, कह्लारोत्पलादि कमलें यांनीं तयार केलेल्या व अनेक तऱ्हेच्या कुसुमपल्लवांनीं युक्त अशा पुष्पशय्येवर किंवा जेथें संगमरवरी पुतळीच्या स्तनहस्तमुखांतून वाळ्याच्या पाण्याचीं कारंजीं उडत आहेत अशा धारागृहामध्यें शयन करावें.

**निशाकरकराकीर्णे सौधपृष्ठे निशासु च ॥ ३७ ॥**
**आसना**

व रात्रीं जेथें चांदणें पडलें आहे अशा गच्चीवर जाऊन बसावें.

**स्वस्थचित्तस्य चन्दनार्द्रस्य मालिनः ।**
**निवृत्तकामतन्त्रस्य सुसूक्ष्मतनुवाससः ॥ ३८ ॥**
**जलार्द्रास्तालवृन्तानि विस्तृताः पद्मिनीपुटाः ।**
**उत्क्षेपाश्च मृदूत्क्षेपा जलवर्षिहिमानिलाः ॥ ३९ ॥**
**कर्पूरमल्लिकामाला हाराः सहरिचन्दनाः ।**
**मनोहरकलालापाः शिशवः सारिकाः शुकाः ॥ ४० ॥**
**मृणालवलयाः कान्ताः प्रोत्फुल्लकमलोज्ज्वलाः ।**
**जङ्गमा इव पद्मिन्यो हरन्ति दयिताः क्लमम् ॥ ४१ ॥**

*व मग मदनशांतीमुळें चित्त स्वस्थ झालें असतां अंगास चंदन लावून, पुष्पमाला धारण करून, स्वच्छ व बारीक वस्त्रें नेसून, पाणी शिंपडलेले पंखे, विस्तृत पद्मिनीपत्रें, तुषारयुक्त शीतल वायु घालणारे व हळूं हळूं हलणारे मोठाले विंझणे, कर्पूराच्या व मोगरीच्या माला, मोत्यांचे हार, हरिचंदन, मंजुळ व मनोहर भाषण करणारीं मुलें, साळुंक्या व पोपट व मृणालांचीं वलयें घातलेल्या व प्रफुल्ल कमलांप्रमाणें शोभणाऱ्या स्त्रिया ( कीं ज्यांना पाहिलें असतां कमलिनीलाच गति प्राप्त झाली आहे कीं काय असा भास होतो ) यांचा उपभोग केला म्हणजे श्रमपरिहार होतो.

**आदानग्लानवपुषामग्निः सन्नोऽपि सीदति ।**
**वर्षासु दोषैः**

शिशिरादि तीन ऋतूंमध्यें उष्णतेच्या योगानें मनुष्यांचीं शरीरें निःसत्त्व होऊन त्यांचा अग्नि मंद झालेला असतो. तशांत वर्षाऋतूमध्यें दोषांचा ( वातपित्तादिकांचा ) प्रकोप झाल्यामुळें तो अधिकच मंद होतो.

**दुष्यन्ति तेऽम्बुलम्बाम्बुदेऽम्बरे ॥ ४२ ॥**
**सतुषारेण मरुता सहसा शीतलेन च ।**
**भूबाष्पेणाम्लपाकेन मलिनेन च वारिणा ॥ ४३ ॥**
**वह्निनैव च मन्देन**

आकाश ढगांनीं व्याप्त झाल्यामुळें एकदम थंडगार तुषारांनीं आर्द्र असे वायु सुरू झाल्यामुळें, ओल्या जमिनींतून वाफा येऊं

---

* ह्या श्लोकांत पंचसाराख्य जें 'पानक' सांगितलें आहे त्याचीं लक्षणें दोन तीन प्रकारचीं सांगितलीं आहेत. सबब आम्ही सरबतें व पानकें असें म्हटलें आहे. कोणी मनुका, मोहाचीं फुलें, शिवणीचीं फळें, खजूर व फालसा यांच्या सरबताला 'पंचसारपानक' म्हणतात. कोणी मध, साखर, मनुका, खजूर व फालसा यांच्या पाण्याला पंचसारपानक म्हणतात. व कोणाच्या मतें पिंपळी, कापूर, साखर, मध व तूप यांनीं युक्त जें दूध तेंच पंचसारपानक.

† 'चोंच' याचा अर्थ हेमाद्रीनें 'नारळ' व अरुणदत्तानें 'फणस' असा केला आहे.

‡ 'पाटला' शब्द गुलाबासहि लावतात, व पाडळीच्या फुलासहि लावितात.

* हा अर्थ आम्हीं निवृत्तकामतन्त्रस्य ( अतएव स्वस्थचित्तस्य ) ह्या हेतुगर्भविशेषणावरून काढिला आहे. ग्रीष्मऋतूमध्यें कामाचा जोर कमी होतो हें प्रसिद्धच आहे. कालिदासानेंहि ही गोष्ट एके ठिकाणीं व्यक्त केली आहे.
**प्रचण्डसूर्यः स्पृहणीयचन्द्रमाः सदावगाहक्षतवारिसंचयः ।**
**दिनान्तरम्योऽभ्युपशान्तमन्मथो निदाघकालोऽयमुपागतः प्रिये ॥१॥**
ऋतुसंहार.

लागल्यामुळें, अम्लविपाकी व गढूळ पाण्यामुळें व अग्निमांद्यामुळें हा दोषांचा प्रकोप होतो.

तेष्वित्यन्योन्यदूषिषु ।
भजेत्साधारणं सर्वमूष्मणस्तेजनं च यत् ॥ ४४ ॥

ह्याप्रमाणें वातादिक दोष व अग्नि परस्परांला दूषित करूं लागले असतां समधात आहारादिकांचें व दीपनपाचनांचें सेवन करावें.

आस्थापनं शुद्धतनुर्जीर्णं धान्यं रसान्कृतान् ।
जाङ्गलं पिशितं यूषान् मध्वरिष्टं चिरन्तनम् ॥ ४५ ॥
मस्तु सौवर्चलाढ्यं वा पञ्चकोलावचूर्णितम् ।
दिव्यं कौपं शृतं चाम्भो भोजनं त्वतिदुर्दिनम् ॥ ४६ ॥
व्यक्ताम्ललवणस्नेहं संशुष्कं क्षौद्रवल्लघु ।

वमन, विरेचन व पिचकारी घेऊन कोठा साफ झाल्यावर, जुनें धान्य, मसाला व फोडणी यांनीं तयार केलेले सुरवे, मूग वगैरेंचें सार, जांगल मांस, जुनीं मद्यें व अरिष्टें ( औषधीयुक्त मद्यें ). पंचकोलयुक्त* व पादेलोण घातलेली दह्याची निवळ, पावसाचें व विहिरीचें तापविलेलें पाणी यांचें सेवन करावें. व ज्या दिवशीं अगदींच वांबळ पडली असेल त्या दिवशीं पुष्कळ आंबट, खारट व स्निग्ध पदार्थ व मध यांनीं युक्त व फार पातळ पदार्थ नसलेलें असें हलकें भोजन करावें.

अपादचारी सुरभिः सततं धूपिताम्बरः ॥ ४७ ॥
हर्म्यपृष्ठे वसेद्बाष्पशीतशीकरवर्जिते ।

पायीं चालूं नये व सर्वदा धुरी दिलेलीं वस्त्रें पांघरावीं; नित्य स्नान व सुगंध धारण करावे व थंडी, तुषार व वांबळ जेथें नाहीं अशा माडीवर जाऊन बसावें.

नदीजलोदमन्थाहःस्वप्नायासातपांस्त्यजेत् ॥ ४८ ॥

नदीचें पाणी, सातूच्या पिठाची पाण्यांत केलेली लापशी, दिवानिद्रा, आयास व ऊन यांचें सेवन करूं नये.

वर्षाशीतोचिताङ्गानां सहसैवार्करश्मिभिः ।
तप्तानां संचितं वृष्टौ पित्तं शरदि कुप्यति ॥ ४९ ॥
तज्जयाय घृतं तिक्तं विरेको रक्तमोक्षणम् ।

वर्षाऋतूमध्यें पित्ताचा संचय झालेला असतो. ( परंतु तेव्हां बाहेरील गारठ्यामुळें तें पित्त कांहीं विकार करीत नाहीं. किंबहुना त्याच्या योगानेंच तो गारठा सहन होतो ) व पुढें शरदृतूमध्यें उन्हें पडूं लागलीं म्हणजे मनुष्यांचीं गारठ्याच्या संवयीचीं शरीरें एकदम संतप्त होऊन पित्तप्रकोप होतो. त्याचा उपशम करण्याकरितां कडू औषधांनीं सिद्ध केलेलें घृत, जुलाब व रक्त काढणें यांची योजना करावी.

तिक्तं स्वादु कषायं च क्षुधितोऽन्नं भजेल्लघु ॥ ५० ॥
शालिमुद्गसिताधात्रीपटोलमधुजाङ्गलम् ।

*पंचकोल = पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक व सुंठ ह्या पांचांचा समुदाय.

क्षुधा लागली म्हणजे तांदूळ, मूग, पडवळ, आवळकाठी, मध, साखर व जांगल मांस इत्यादि मधुर, तुरट, कडू व लघु पदार्थांचा आहार करावा.

तप्तं तप्तांशुकिरणैः शीतं शीतांशुरश्मिभिः ॥ ५१ ॥
समन्तादप्यहोरात्रमगस्त्योदयनिर्विषम् ।
शुचि हंसोदकं नाम निर्मलं मलजिज्जलम् ॥ ५२ ॥
नाभिष्यन्दि न वा रूक्षं पानादिष्वमृतोपमम् ।

ह्या ऋतूंत दिवसास चोहोंकडून सूर्यकिरणांनीं संतप्त झाल्यामुळें व रात्रीस चंद्रकिरणांनीं शीत झाल्यामुळें व अगस्तिनक्षत्राच्या* उदयानें विषरहित झाल्यामुळें पाणी निर्मल व शुद्ध असतें म्हणून त्याला हंसोदक अशी संज्ञा आहे. तें कफपित्तांचें शमन करितें. तें रूक्ष किंवा अभिष्यन्दिहि ( नाक, घसा इ. द्वारां कफाचा स्राव करणारें ) नसतें. हें पाणी पिण्याच्या वगैरे कामाकरितां अमृततुल्य होय.

चन्दनोशीरकर्पूरमुक्तास्रग्वसनोज्ज्वलः ॥ ५३ ॥
सौधेषु सौधधवलां चन्द्रिकां रजनीमुखे ।

चंदन, वाळा, कापूर, मौक्तिक, पुष्पमाला व वस्त्रें इत्यादिक धारण करून संध्याकाळीं गच्चीवर चुन्यासारख्या शुभ्र चांदण्यांत बसावें.

तुषारक्षारसौहित्यदधितैलवसातपान् ॥ ५४ ॥
तीक्ष्णमद्यदिवास्वप्नपुरोवातान्परित्यजेत् ।

दंव, ऊन, पूर्वेकडील वारा, दिवानिद्रा, तीक्ष्ण मद्य, क्षार, दहीं, तेल, वसा ( मांदें ) व आकंठ भोजन यांचा त्याग करावा.

शीते वर्षासु चाद्यांस्त्रीन्वसन्तेऽन्त्यान्रसान्भजेत् ॥ ५५ ॥
स्वादुं निदाघे शरदि स्वादुतिक्तकषायकान् ।

पावसाळ्यांत व हिंवाळ्यांत मधुराम्ललवण ह्या तीन रसांचें ( गोड, आंबट व खारट पदार्थांचें ) सेवन करावें. वसंत ऋतूंत कडू, तिखट व तुरट यांचें सेवन करावें; ग्रीष्म ऋतूंत मधुर आहार असावा व शरदृतूंत मधुर, तुरट व कडू पदार्थ खावे.

शरद्वसन्तयो रूक्षं शीतं घर्मघनान्तयोः ॥ ५६ ॥
अन्नपानं समासेन विपरीतमतोऽन्यदा ।

शरद् व वसंत ह्या ऋतूंत रूक्ष व इतर ऋतूंत स्निग्ध अन्नपानाचा उपयोग करावा. तसेंच ग्रीष्म व शरद् ह्या ऋतूंत थंड व इतर ऋतूंत उष्ण अन्नपानाचा उपयोग करावा.

*अगस्ति नक्षत्राच्या उदयानें पाण्यांतील विष नाहींसें होतें असें प्राचीन आर्यांचें मत असे. ह्यासंबंधानें वराहसंहितेंत असें सांगितलें आहे.

सलिलममरपाज्ञयोज्झितं यद्घनपरिवेष्टितमूर्तिभिर्भुजङ्गैः ।
फणजनितविषाग्निसंप्रदुष्टं भवति शिवं तदगस्त्यदर्शनेन ॥१२॥
बृ० सं० अ० १२

मेघांच्या वेढ्यांत सांपडलेल्या सर्पांनीं आपल्या फणींतून सोडलेल्या विषाग्निपासून दूषित झालेलें असें इंद्राच्या आज्ञेवरून टाकलेलें मेघोदक अगस्ति नक्षत्राच्या दर्शनानें शुद्ध होतें.

**नित्यं सर्वरसाभ्यासः स्वस्वाधिक्यमृतावृतौ ॥ ५७ ॥**

खाण्यामध्यें नित्य सर्व प्रकारचे रस यावेत. इतकेंच कीं, त्या त्या ऋतूला उचित जे रस असतील त्यांचें अधिक सेवन करावें.

**ऋत्वोरन्त्यादिसप्ताहावृतुसंधिरिति स्मृतः ।**
**तत्र पूर्वो विधिस्त्याज्यः सेवनीयोऽपरः क्रमात् ॥५८॥**
**असात्म्यजा हि रोगाः स्युः सहसा त्यागशीलनात् ।**

एका ऋतूचा शेवटला आठवडा व पुढें येणाऱ्या ऋतूचा पहिला आठवडा ह्याला ऋतुसंधि म्हणतात. ह्या समयास पूर्व विधीचा त्याग करून दुसऱ्या विधीचा जो प्रारंभ करणें तो क्रमानें करावा. तो तो विधि एकदम बंद किंवा सुरू केल्यानें त्याची संवय नसल्यामुळें रोग उत्पन्न होतात. त्यांस असात्म्यजन्य रोग म्हणतात.

---

# चतुर्थोऽध्यायः

## अध्याय ४ था.

**अथातो रोगानुत्पादीयाध्यायं व्याख्यास्यामः ।**

आतां रोग न होऊं देण्याविषयींचा अध्याय सांगतों.

**वेगान्न धारयेद्वातविण्मूत्रक्षवतृट्क्षुधाम् ।**
**निद्राकासश्रमश्वासजृम्भाश्रुच्छर्दिरेतसाम् ॥ १ ॥**

वायु ( अपान वायु व ढेंकर ), मल, मूत्र, शिंक, तृषा, क्षुधा, खोकला, जांभई, वांति, अश्रु, रेत, निद्रा व श्रमजन्य दम यांचा वेग उत्पन्न झाला असतां त्यांचा अवरोध करूं नये.

**अधोवातस्य रोधेन गुल्मोदावर्तरुक्क्लमाः ।**
**वातमूत्रशकृत्सङ्गदृष्ट्यग्निवधहृद्गदाः ॥ २ ॥**

अधोवायूचा रोध केल्यानें गुल्म, उदावर्त, शूल, ग्लानि, दृष्टिमांद्य, अग्निमांद्य, हृद्रोग व धडा ( वातमलमूत्रांचें कोंडणें ) हे रोग उत्पन्न होतात.

**स्नेहस्वेदविधिस्तत्र वर्तयो भोजनानि च ।**
**पानानि बस्तयश्चैव शस्तं वातानुलोमनम् ॥ ३ ॥**

हे विकार झाले असतां तेल लावून पोट शेकावें, गुदद्वारांत औषधयुक्त वात ( फलवर्ति ) घालावी. वातहर अन्नपान व बस्ति ( पिचकाऱ्या ) यांचें सेवन करावें, व वातानुलोमन ( वाताची स्वमार्गानें प्रवृत्ति करणारें ) औषध घ्यावें. ( येथें शस्तं हा शब्द औषधवाचक आहे. चि० अ० २२ श्लो० ७४. )

**शकृतः पिण्डिकोद्वेष्टप्रतिश्यायशिरोरुजः ।**
**ऊर्ध्ववायुः परीकर्तो हृदयस्योपरोधनम् ॥ ४ ॥**
**मुखेन विट्प्रवृत्तिश्च पूर्वोक्ताश्चामयाः स्मृताः ।**

मलाचा रोध केल्यानें पोटऱ्यांस गोळे येतात. पडसें, कपाळशूळ, ढेंकर, गुदद्वारीं शूळ, छातींत बांध बसणें, तोंडावाटें मलाची प्रवृत्ति व पूर्वोक्त विकार हीं लक्षणें उत्पन्न होतात.

**अङ्गभङ्गाश्मरीबस्तिमेढ्रवंक्षणवेदनाः ॥ ५ ॥**
**मूत्रस्य रोधात्पूर्वे च प्रायो रोगास्तदौषधम् ।**
**वर्त्यभ्यङ्गावगाहाश्च स्वेदनं बस्तिकर्म च ॥ ६ ॥**

मूत्राचा रोध केल्यानें बहुधा पूर्वोक्त सर्व विकार होऊन अंग मोडून येतें. बस्ति, शिश्न व अंडसांधे यांच्या ठिकाणीं वेदना लागतात व मुतखडा होतो. त्याजवर फलवर्ति, अभ्यंग, शेकणें, वातहर द्रव पदार्थांमध्यें अवगाहन करणें, व पिचकारी यांची योजना करावी.

**अन्नपानं च विड्भेदी विड्रोधोत्थेषु यक्ष्मसु ।**

मलरोधजन्य विकारांवर वरील उपायांशिवाय सारक अन्नपानांची योजना करावी.

**मूत्रजेषु च पाने च प्राग्भक्तं शस्यते घृतम् ॥ ७ ॥**
**जीर्णान्तिकं चोत्तमया मात्रया योजनाद्वयम् ।**
**अवपीडकमेतच्च संज्ञितम्**

व मूत्ररोधापासून झालेल्या रोगांवर जेवणापूर्वी व भोजन जिरल्यावर पचेल तितकें तूप प्यावें. ह्या दोन्ही प्रकारच्या घृतपानाला अवपीडक अशी संज्ञा आहे.

**धारणात्पुनः ॥ ८ ॥**
**उद्गारस्यारुचिः कम्पो विबन्धो हृदयोरसोः ।**
**आध्मानकासहिध्माश्च हिध्मावत्तत्र भेषजम् ॥ ९ ॥**

ढेंकर बंद केल्यानें अरुचि, कंप, हृदयांत व छातींत बांध बसणें, पोट फुगणें, खोकला व उचकी हे विकार होतात. ह्यांजवर जे इलाज करावयाचे ते उचकीच्या चिकित्सेप्रमाणें करावे.

**शिरोर्तीन्द्रियदौर्बल्यमन्यास्तम्भार्दितं क्षुतेः ।**
**तीक्ष्णधूमाञ्जनाघ्राणनावनार्कविलोकनैः ॥ १० ॥**
**प्रवर्तयेत्क्षुतिं सक्तां स्नेहस्वेदौ च शीलयेत् ।**

शिंकेचा रोध केल्यानें कपाळशूळ, इंद्रियदौर्बल्य, मन्यास्तंभ ( मान जखडणें ), व अर्दित वायु हे विकार उत्पन्न होतात. त्यांजवर शिंका आणण्याकरितां तीक्ष्ण धूम्रपान, अंजन, नस्य, तीक्ष्ण औषध हुंगणें, सूर्याकडे एकसारखें टक लावून पहाणें इ० क्रियांची योजना करावी व स्नेहनस्वेदन क्रियांचाहि मारा सुरू करावा.

**शोषाङ्गसादबाधिर्यसंमोहभ्रमहृद्गदाः ॥ ११ ॥**
**तृष्णाया निग्रहात्तत्र शीतः सर्वो विधिर्हितः ।**

तृष्णेचा निग्रह केल्यानें शोष, अंग ठणकणें, बहिरेपणा, मूर्च्छा, भोंड, हृद्रोग हे विकार होतात. त्यांजवर सर्व प्रकारच्या शीतोपचाराची योजना करावी.

**अङ्गभङ्गारुचिग्लानिकार्श्यशूलभ्रमाः क्षुधः ॥ १२ ॥**
**तत्र योज्यं लघु स्निग्धमुष्णमल्पं च भोजनम् ।**

क्षुधेच्या निग्रहापासून अंग मोडून येतें, व अरुचि, ग्लानि, कृशता, शूळ व भ्रम हे विकार उत्पन्न होतात. असें झालें असतां लघु, स्निग्ध, उष्ण व अल्प आहाराचें सेवन करावें.

**निद्राया मोहमूर्द्धाक्षिगौरवालस्यजृम्भिकाः ॥ १३ ॥**
**अङ्गमर्दश्च तत्रेष्टः स्वप्नः संवाहनानि च ।**

झोंप मोडल्यानें मोह ( गुंगी ), डोकें व डोळे जड होणें, आळस, जांभया व अंग मोडून येणें इ० विकार होतात. असें झालें असतां झोंप घ्यावी व अंग रगडून घ्यावें.

**कासस्य रोधात्तद्वृद्धिः श्वासारुचिहृदामयाः ॥१४॥**
**शोषो हिध्मा च कार्योऽत्र कासहा सुतरां विधिः ।**

खोकल्याचा रोध केल्यानें खोकला वाढतो; व श्वास, अरुचि, हृद्रोग, उचकी व क्षय हे रोग उत्पन्न होतात. त्यांजवर बहुधा खोकल्याचीच चिकित्सा करावी.

**गुल्महृद्रोगसंमोहाः श्रमश्वासाद्विधारितात् ॥ १५ ॥**
**हितं विश्रमणं तत्र वातघ्नश्च क्रियाक्रमः ।**

श्रमापासून दम लागला असतां त्याचा अवरोध केल्यानें गुल्म, हृद्रोग व मूर्च्छा हे विकार उत्पन्न होतात. त्यांजवर विश्रांति व वातघ्न चिकित्सा यांची योजना करावी.

**जृम्भायाः क्षववद्रोगाः सर्वश्चानिलजिद्विधिः ॥ १६ ॥**

जांभईचा रोध केल्यानें शिंकेच्या रोधाप्रमाणेंच परिणाम होतात. त्यांजवर सर्व वातघ्न उपचार करावे.

**पीनसाक्षिशिरोहृद्रुङ्मन्यास्तम्भारुचिभ्रमाः ।**
**सगुल्मा बाष्पतस्तत्र स्वप्नो मद्यं प्रियाः कथाः ॥ १७॥**

अश्रूंचा अवरोध केल्यानें पीनस, शिरोरोग, नेत्ररोग, हृद्रोग, मान जखडणें, अरुचि, गुल्म व भ्रम हे विकार उत्पन्न होतात. त्यांजवर निद्रा, मद्य व प्रिय कथांचें श्रवण इतक्या गोष्टी हितावह होत.

**विसर्पकोठकुष्ठाक्षिकण्डूपाण्ड्वामयज्वराः ।**
**सकासश्वासहृल्लासव्यङ्गश्वयथवो वमेः ॥ १८ ॥**

वांतीचा निरोध केल्यानें विसर्प, अंगावर गांधी उठणें, कुष्ठ, नेत्ररोग, कंडु, पांडुरोग, ज्वर, खोकला, श्वास, उह्मासे, वांग व सूज हे विकार उत्पन्न होतात.

**गण्डूपधूमानाहारा रूक्षं भुक्त्वा तदुद्वमः ।**
**व्यायामः स्रुतिरस्रस्य शस्तं चात्र विरेचनम् ॥ १९ ॥**
**सक्षारलवणं तैलमभ्यङ्गार्थं च शस्यते ।**

त्यांजवर गुळण्या, धूम्रपान, उपवास, व्यायाम, रक्तस्राव, विरेचन व क्षारलवणयुक्त तैलाचा अभ्यंग इ० उपचार करावे व रूक्ष पदार्थ खाऊन उलटी करावी.

**शुक्रात्तत्स्रवणं गुह्यवेदना श्वयथुर्ज्वरः ॥ २० ॥**
**हृद्व्यथा मूत्रसङ्गाङ्गभङ्गवृद्ध्यश्मषण्ढताः ।**

वीर्यरोध केल्यानें वीर्यस्राव व वृषणांत वेदना व सूज, ज्वर, हृत्पीडा, लघवी कोंडणें, अंग मोडणें, वृषणरोग, अश्मरी व षंढता इ० रोग उत्पन्न होतात.

**ताम्रचूडसुराशालिबस्त्यभ्यङ्गावगाहनम् ॥ २१ ॥**
**बस्तिशुद्धिकरैः सिद्धं भजेत्क्षीरं प्रियाः स्त्रियः ।**

त्यांजवर कोंबडा, दारू, भात, पिचकारी, अभ्यंग, पाण्यांत बसणें व मूत्ररेचन औषधांनीं सिद्ध केलेलें दूध व प्रिय स्त्रिया यांचें सेवन करावें.

**तृट्शूलार्तं त्यजेत्क्षीणं विड्वमं वेगरोधिनम् ॥ २२ ॥**

वेगरोधजन्य विकारानें पीडित मनुष्य जर फार क्षीण झाला असेल व त्याला अति तृषा, शूल व मलाची वांति होत असेल तर त्याला औषध देऊं नये ( म्हणजे तो असाध्य जाणावा ).

**रोगाः सर्वेऽपि जायन्ते वेगोदीरणधारणैः ।**

बळेंच वेगप्रवृत्ति केल्यानें किंवा वेगनिरोध केल्यानें सर्वच रोग उत्पन्न होतात.

**निर्दिष्टं साधनं तत्र भूयिष्ठं ये तु तान्प्रति ॥ २३ ॥**
**ततश्चानेकधा प्रायः पवनो यत्प्रकुप्यति ।**
**अन्नपानौषधं तत्र युञ्जीतातोऽनुलोमनम् ॥ २४ ॥**

परंतु जे नेहमीं उपलब्ध आहेत, त्यांची मात्र वर चिकित्सा सांगितली. आतां ज्याअर्थी ह्या दोन कारणांपासून उत्पन्न होणाऱ्या व्याधींमध्यें प्रायः निरनिराळ्या वायूंचा प्रकोप असतो, त्याअर्थी त्या सर्व विकारांमध्यें वायूचें* अनुलोमन करणाऱ्या औषधाची व अन्नपानाची योजना करावी.

**धारयेत्तु सदा वेगान् हितैषी प्रेत्य चेह च ।**
**लोभेर्ष्याद्वेषमात्सर्यरागादीनां जितेन्द्रियः ॥ २५ ॥**

इहपरलोकीं सुख इच्छिणाऱ्या मनुष्यानें इंद्रियदमन करून लोभ, ईर्ष्या, द्वेष, मात्सर्य, काम इत्यादिकांच्या वेगांचा निरोध करावा.

**यतेत च यथाकालं मलानां शोधनं प्रति ।**
**अत्यर्थसंचितास्ते हि क्रुद्धाः स्युर्जीवितच्छिदः ॥ २६ ॥**

व त्या त्या कालीं मलमूत्रादिकांची प्रवृत्ति होण्याविषयीं यत्न करावा; कारण त्यांचा जर शरिरांत फार संचय झाला, तर ते कुपित होऊन कदाचित् जीवित हरण देखील करतील.

**दोषाः कदाचित्कुप्यन्ति जिता लङ्घनपाचनैः ।**
**ये तु संशोधनैः शुद्धा न तेषां पुनरुद्भवः ॥ २७ ॥**

लंघनपचनानें जर दोषांचा उपशम केला, तर ते पुनः उलटण्याचा संभव असतो. परंतु वमनविरेचनादिकांनीं दोष शरिरांतून मुळींच काढून टाकिले तर ते पुनः उत्पन्न होत नाहींत.

**यथाक्रमं यथायोगमत ऊर्ध्वं प्रयोजयेत् ।**
**रसायनानि सिद्धानि वृष्ययोगांश्च कालवित् ॥ २८ ॥**

वमनादिकांनीं शरीरशुद्धि केल्यावर देशकाल जाणणाऱ्या वैद्यानें त्या त्या क्रमानें व त्या त्या संयोगानें अनुभवसिद्ध रसायनांची व वाजीकरण औषधांची योजना करावी.

**भेषजक्षपिते पथ्यमाहारैर्बृंहणं क्रमात् ।**
**शालिषष्टिकगोधूममुद्गमांसघृतादिभिः ॥ २९ ॥**

*आपआपल्या मार्गानुरूप जी वायूंची गति तीस किंवा ती ज्याच्या योगानें होते त्या औषधास अनुलोमन असें म्हणतात.

हृद्यदीपनभैषज्यसंयोगाद्रुचिपक्तिदैः ।
साभ्यङ्गोद्वर्तनस्नाननिरूहस्नेहबास्तिभिः ॥ ३० ॥

औषधानें शरीर निर्दोष केल्यावर तांदूळ, साठेतांदूळ, गहूं, मूग, मांस, तूप इत्यादिकांपासून तयार केलेले व रुचिकर, दीपक व पाचक मसाल्यानें युक्त असे आवडते पदार्थ, अभ्यंग, उटणें, स्नान, काढ्यांच्या व तेलांच्या पिचकाऱ्या वगैरे पौष्टिक चिकित्सा हितकारक होत.

तथा स लभते शर्म सर्वपावकपाटवम् ।
धीवर्णेन्द्रियवैमल्यं वृषतां दैर्घ्यमायुषः ॥ ३१ ॥

त्यांच्या योगानें आरोग्य प्राप्त होतें व शरीरांतील सर्व* अग्नींची शक्ति तीव्र होते; बुद्धि, तेज, इंद्रियशक्ति, प्रजोत्पादनशक्ति व आयुष्य यांची वृद्धि होते.

ये भूतविषवाय्वग्निक्षतभङ्गादिसंभवाः ।
कामक्रोधभयाद्याश्च ते स्युरागन्तवो गदाः ॥ ३२ ॥

जे रोग भूतबाधा, विष, वायु† ( वारा ), अग्नि, क्षत, अस्थिभंग इ० कारणांपासून उत्पन्न होतात, ते व काम, क्रोध, भय इत्यादि मनोविकार हे आगंतुक रोग होत.

त्यागः प्रज्ञापराधानामिन्द्रियोपशमः स्मृतिः ।
देशकालात्मविज्ञानं सद्वृत्तस्यानुवर्तनम् ॥ ३३ ॥
अथर्वविहिता शान्तिः प्रतिकूलग्रहार्चनम् ।
भूताद्यस्पर्शनोपायो निर्दिष्टश्च पृथक् पृथक् ॥ ३४ ॥
अनुत्पत्त्यै समासेन विधिरेष प्रदर्शितः ।
निजागन्तुविकाराणामुत्पन्नानां च शान्तये ॥ ३५ ॥

असत्क्रियेचा त्याग, इंद्रियोपशम, झालेल्या गोष्टींचें स्मरण टेवणें, देशकालाचें ज्ञान, आत्मज्ञान व सज्जनांच्या मार्गानें जाणें, इतक्या गोष्टींचें पालन केलें असतांच व अथर्ववेदोक्त शांति, प्रतिकूल ग्रहांची आराधना व भूतादिकांची बाधा न होण्याकरितां सांगितलेले निरनिराळे उपाय अमलांत आणिले असतां निज व आगंतुक विकार कधींहि होणार नाहींत व झालेले बरे होतात.

शीतोद्भवं दोषचयं वसन्ते विशोधयन् ग्रीष्मजमभ्रकाले ।
घनात्यये वार्षिकमाशु सम्यक् प्राप्नोति रोगानृतुजान्न जातु ॥ ३६ ॥

हिंवाळ्यांत सांचलेले दोष वसंत सुरू होतांच वमनादिकांच्या योगानें काढून टाकावे. ग्रीष्म ऋतूंत सांचलेले दोष वर्षाऋतूंत शरीरांतून काढून टाकावे, व पावसाळ्यांतील दोष शरदारंभीं शांत करावे. असें केल्यानें ऋतुजन्य रोग कधींहि होत नाहींत.

नित्यं हिताहारविहारसेवी समीक्ष्यकारी विषयेष्वसक्तः ।
दाता समः सत्यपरः क्षमावानाप्तोपसेवी च भवत्यरोगः ३७

जो मनुष्य नित्य हितकारक आहारविहारांचें सेवन करितो, विचार करून एखाद्या कार्यास प्रवृत्त होतो, विषयलंपट होत नाहीं व जो दानशील, समदृष्टि, सत्यवक्ता, क्षमावान् व सद्वाक्याचें अनुवर्तन करणारा तो सदा निरोगी राहतो.

---

# पञ्चमोऽध्यायः

## अध्याय ५ वा

अथातो द्रवद्रव्यविज्ञानीयमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां द्रवपदार्थविज्ञानाचा अध्याय सांगतों.

जीवनं तर्पणं हृद्यं ह्लादि बुद्धिप्रबोधनम् ।
तन्वव्यक्तरसं मृष्टं शीतं लघ्वमृतोपमम् ॥ १ ॥
गाङ्गाम्बु नभसो भ्रष्टं स्पृष्टं त्वर्केन्दुमारुतैः ।
हिताहितत्वे तद्भूयो देशकालावपेक्षते ॥ २ ॥

गांग संज्ञक पावसाचें पाणी जमिनीवर पडण्यापूर्वीच पात्रांत धरिलें असतां शुद्ध, स्वच्छ, थंड, लघु, अव्यक्तरस ( ज्याच्यांत गोडपणा, खारटपणा किंवा दुसरा कोणताहि रस कळून येत नाहीं ), आल्हादकारक, तृप्तिदायक, मनास हुषारी आणणारें, जीवनव्यापाराचें उत्तेजक, पिण्याला प्रिय व अमृततुल्य असतें. ( जमिनीवर पडून ) ऊन, चांदणें व वायु यांचा संपर्क झाला असतां त्याचा बरेवाईटपणा देशकालावर अवलंबून आहे.

येनाभिवृष्टममलं शाल्यन्नं राजतस्थितम् ।
अक्लिन्नमविवर्णं च तत्पेयं गाङ्गमन्यथा ॥ ३ ॥
सामुद्रं तन्न पातव्यं मासादाश्वयुजाद्विना ।

पर्जन्य पडत असतांना रुप्याच्या भांड्यांत थोडा भात घालून तो पावसांत ठेवावा; तो जर जशाचा तसा स्वच्छ राहून त्याचा वर्ण व शितें कायम राहिलीं तर तें पाणी गांग व पिण्यालायक

---

*शरीरांत जीं पांच प्रकारचीं पित्तें सांगितलीं आहेत, तेच पांच प्रकारचे अग्नि. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें :—१ पाचक ( अन्नाचें पचन करणारा ); २ भ्राजक ( शरीरास कांति देणारा ); ३ रंजक ( रसाला रक्तता देणारा ); ४ आलोचक (रूपाचें ज्ञान किंवा दर्शनशक्ति देणारा) व ५ साधक ( ऐच्छिक क्रियेची शक्ति देणारा ). अरुणदत्त व हेमाद्रि यांचें मत ह्यासंबंधानें किंचित् भिन्न आहे. 'सर्वपावक' शब्देंकरून ते पंचभूतांतील पांच, सप्तधातूंतील सात व जठराग्नि असे तेरा अग्नि घेतात. आम्हीं दिलेला अर्थ सुश्रुतास अनुसरून आहे. पंचभूतांतील पांच अग्नींचा, सप्तधातूंतील अग्नींचा व जठराग्नीचा पाचकाग्नींमध्येंच अंतर्भाव होतो. हेमाद्रि व अरुणदत्त यांचा अर्थ घेतल्यास भ्राजक, आलोचक इत्यादि अग्नींच्या संबंधानें अव्याप्ति होते. म्हणून आम्हीं दिलेला अर्थ सयुक्तिक व सप्रमाण आहे. ( सुश्रुत सू० अ० २१ पहा. )

†वातादि दोष कुपित होऊन जे विकार होतात त्यांस निजविकार म्हणतात, असें पहिल्या अध्यायांत सांगितलें आहे. त्यांच्या प्रकोपाला व म्हणूनच तज्जन्य निजविकारालाहि वारा कारण असूं शकतो; भेद इतकाच कीं वायुजन्य आगंतुक विकार साक्षात् वायूच्या संपर्कापासून उत्पन्न होतात. जसें गार वारा लागल्यानें ओष्ठादिकांची त्वचा फुटणें किंवा रूक्ष होणें इ० व तज्जन्य निजविकार दोषप्रकोपापासून परंपरेनें उत्पन्न होतात.

जाणावें. असें न झाल्यास तें सामुद्र आहे असें समजावें व आश्विन-मासाखेरीज तें पिऊं नये.

ऐन्द्रमम्बु सुपात्रस्थमविपन्नं सदा पिबेत् ॥ ४ ॥
तदभावे च भूमिष्ठमान्तरिक्षानुकारि यत् ।
शुचिपृथ्वसितश्वेते देशेऽर्कपवनाहतम् ॥ ५ ॥

पावसाचें पाणी चांगल्या भांड्यांत धरलेलें व स्वच्छ असेल तर सर्वदा सेवन करावें. त्याच्या अभावीं काळ्या किंवा पांढऱ्या स्वच्छ जमिनीवरचें व पुष्कळ जागा व्यापून राहणारें, जेथें उन्हाचा व वाऱ्याचा प्रवेश आहे अशा ठिकाणचें व म्हणूनच पुष्कळ अंशीं ज्यांत अंतरिक्ष जलाचे गुण आहेत अशा प्रकारचें पाणी प्यावें.

न पिबेत्पङ्कशैवालतृणपर्णाविलास्तृतम् ।
सूर्येन्दुपवनादृष्टमभिवृष्टं घनं गुरु ॥ ६ ॥
फेनिलं जन्तुमत्तप्तं दन्तग्राह्यतिशैत्यतः ।

चिखल, शेवाळ, गवत व पानें यांनीं व्याप्त व गढूळ झालेलें, ऊन, चांदणें व वायु यांचा जेथें कधींहि प्रवेश नाहीं अशा ठिकाणचें, पावसाचें पाणी नुक्तेंच मिळाल्यामुळें दाड झालेलें, जड, फेस आलेलें, कृमियुक्त, तापलेलें व दांतांस कळा उत्पन्न करण्याइतकें गार अशा प्रकारचें पाणी कधींहि पिऊं नये.

अनार्तवं च यद्दिव्यमार्तवं प्रथमं च यत् ॥ ७ ॥
लूतादितन्तुविण्मूत्रविषसंश्लेषदूषितम् ।

तसेंच अवेळीं पडणाऱ्या पावसाचें पाणी व पहिल्या पावसाचें पाणीहि पिऊं नये. कारण त्यामध्यें कोष्टी वगैरे प्राण्यांचे तंतु, विष्टा, मूत्र, विष, इत्यादि दोष मिश्र झालेले असतात.

पश्चिमोदधिगाः शीघ्रवहा याश्चामलोदकाः ॥ ८ ॥
पथ्याः समासात्ता नद्यो विपरीतास्त्वतोऽन्यथा ।

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या नद्या पश्चिम समुद्रास जाऊन मिळतात, ज्यांचा प्रवाह फार जोराचा असतो व ज्यांचें पाणी निर्मल असतें अशा नद्यांचें पाणी पथ्यकारक असतें; व ह्याच्या विपरीत ज्या नद्या, त्यांचें पाणी अपथ्यकारक असतें.

उपलास्फालनाक्षेपविच्छेदैः खेदितोदकाः ॥ ९ ॥
हिमवन्मलयोद्भूताः पथ्यास्ता एव च स्थिराः ।
कृमिश्लीपदहृत्कण्ठशिरोरोगान् प्रकुर्वते ॥ १० ॥

ज्यांचें पाणी खडकावर हालविलें जाऊन आपटल्यामुळें क्षुब्ध व विच्छिन्न झालें असतें अशा हिमालयापासून किंवा मलयाचलापासून निघणाऱ्या नद्यांचें पाणी पथ्यकारक असतें. त्यांचा प्रवाह जर मंद असेल तर मात्र त्या कृमि, श्लीपद, हृद्रोग, कंठरोग, शिरोरोग इत्यादि विकार उत्पन्न करितात.

प्राच्याऽऽवन्त्यापरान्तोत्था दुर्नामानि महेन्द्रजाः
उदरश्लीपदातङ्कान् सह्यविन्ध्योद्भवाः पुनः ॥ ११ ॥
कुष्ठपाण्डुशिरोरोगान् दोषघ्न्यः पारियात्रजाः ।
बलपौरुषकारिण्यः सागराम्भस्त्रिदोषकृत् ॥ १२ ॥

बंगाल, माळवा व उत्तर कोंकण ह्या देशांतील नद्यांच्या पाण्यापासून मूळव्याध उत्पन्न होते. महेंद्र पर्वतापासून निघणाऱ्या नद्यांच्या पाण्यानें उदर व श्लीपद व सह्यविंध्योद्भव नद्यांच्या पाण्यापासून कुष्ठ, पांडु व शिरोरोग उत्पन्न होतात. व *पारियात्रजन्य नद्यांचें पाणी त्रिदोषनाशक आहे, व त्याच्या योगानें बल व वीर्य वाढतें. समुद्राचें पाणी त्रिदोषकारक असतें.

विभ्रात्कूपतडागादीन् जाङ्गलानूपशैलतः ।

कुवे, तलाव, झरे, इत्यादिकांचें पाणी त्या त्या देशांचे स्थितीवर अवलंबून आहे. (म्हणजे) जांगल देशांतील कुवे वगैरेंचें पाणी हलकें असतें. तेंच अनूप देशांत जड असतें. व पर्वतावर किंवा डोंगराळ देशांत फारच हलकें असतें.

नाम्बु पेयमशक्त्या वा स्वल्पमल्पाग्निगुल्मिभिः ॥ १३ ॥
पाण्डूदरातिसारार्शोग्रहणीदोषशोथिभिः ।
ऋते शरन्निदाघाभ्यां पिबेत्स्वस्थोऽपि चाल्पशः ॥ १४ ॥

मंदाग्नि, गुल्म, पांडु, उदर, अतिसार, मूळव्याध, संग्रहणी व सूज हे विकार ज्यांना झाले आहेत त्यांनीं पाणी पिऊं नये. तृषा सहन नच झाल्यास थोडें प्यावें. निरोगी मनुष्यानें देखील शरदृतु व ग्रीष्मऋतूखेरीज करून इतर ऋतूंमध्यें थोडें थोडेंच पाणी प्यावें.

समस्थूलकृशा भक्तमध्यान्तप्रथमाम्बुपाः ।

जेवणाच्या आरंभीं पाणी प्याल्यानें मनुष्य कृश होतो. जेवणाच्या मध्यें पाणी प्याल्यानें मनुष्य सडपातळ होतो व जेवणाच्या शेवटीं पाणी प्याल्यानें स्थूल होतो.

शीतं मदात्ययग्लानिमूर्च्छाछर्दिश्रमभ्रमान् ॥ १५ ॥
तृष्णोष्णदाहपित्तास्रविषाण्यम्बु नियच्छति ।

थंड पाण्याच्या योगानें मदात्यय, ग्लानि, मूर्च्छा, वांति, श्रम, भ्रम, तृष्णा, गरमी, दाह, रक्तपित व विषविकार इ० रोग कमी होतात.

दीपनं पाचनं कण्ठ्यं लघूष्णं वस्तिशोधनम् ॥ १६ ॥
हिध्माध्मानानिलश्लेष्मसद्यःशुद्धे नवज्वरे ।
कासामपीनसश्वासपार्श्वरुक्षु च शस्यते ॥ १७ ॥

ऊन पाणी दीपक, पाचक, लंघु व मूत्रशोधक असून कंठरोग, उचकी, पोटफुगी, वात, कफ, नवज्वर†, कासश्वास, पीनस, अजीर्ण, पार्श्ववेदना ( उसण ), इत्यादि विकारांना व रेचनादिकांचें सेवन केलेल्या मनुष्याला हितकारक आहे.

अनभिष्यन्दि लघु च तोयं क्वथितशीतलम् ।

तापवून निववलेलें पाणी लघु असून कफ उत्पन्न करीत नाहीं.

*विंध्याद्रीचा वायव्येकडील प्रांत, चंबळा व बटवा या नद्या पारियात्र देशांत ( झांसी प्रांतांत ) आहेत. यांना संस्कृतांत चर्मण्वती, वेत्रवती अशीं अनुक्रमें नांवें आढळतात.

† नवज्वर शब्दाचा अर्थ लोकांत नऊ दिवसांचा ज्वर असा जो करितात तो चुकीचा आहे. नवज्वर म्हणजे ज्यांत दोषांना पाक झाला नाहीं तो. यालाच सामज्वर म्हणतात.

पित्तयुक्ते हितं दोषे व्युषितं तत्त्रिदोषकृत् ॥ १८ ॥
पित्ताधिक्य असलेल्या विकारामध्यें तें हितकारक आहे व तेंच जर शिळें असेल तर त्रिदोष उत्पन्न करितें.

नारिकेरोदकं स्निग्धं स्वादु वृष्यं हिमं लघु ।
तृष्णापित्तानिलहरं दीपनं बस्तिशोधनम् ॥ १९ ॥
नारळाचें पाणी स्निग्ध, गोड, शुक्रवर्धक, थंड, लघु, तृष्णा, पित्त व वायु यांचें शमन करणारें, दीपक व मूत्रशोधक असें आहे.

वर्षासु दिव्यनादेये परं तोये वरावरे ।
वर्षाऋतूमध्यें पावसाचें पाणी फार उत्तम व नदीचें पाणी अति अपथ्यकारक जाणावें.

गव्यं माहिषमाजं च कारभं स्त्रैणमाविकम् ॥ २० ॥
ऐभमैकशफं चेति क्षीरमष्टविधं मतम् ।
गाईचें, म्हशीचें, शेळीचें, उंटिणीचें, स्त्रीचें, मेंढीचें, हत्तिणीचें व एकखुराच्या प्राण्याचें अशीं आठ प्रकारचीं दुधें आहेत.

स्वादुपाकरसं स्निग्धमोजस्यं धातुवर्धनम् ॥ २१ ॥
वातपित्तहरं वृष्यं श्लेष्मलं गुरु शीतलम् ।
प्रायः पयः
दूध प्रायः रसकालीं व पाककालीं मधुर, स्निग्ध, तेजोवर्धक, धातुवर्धक, शुक्रकर, वातपित्तहारक, कफकारक, जड व शीतल आहे.

अत्र गव्यं तु जीवनीयं रसायनम् ॥ २२ ॥
क्षतक्षीणहितं मेध्यं बल्यं स्तन्यकरं सरम् ।
श्रमभ्रममदालक्ष्मीश्वासकासातितृट्क्षुधः ॥ २३ ॥
जीर्णज्वरं मूत्रकृच्छ्रं रक्तपित्तं च नाशयेत् ।
ह्यापैकीं गाईचें दूध जीवनीय, *रसायन, मेध्य ( बुद्धिवर्धक ), बल्य, स्तन्यवर्धक व सारक असून जखमी, उरःक्षती व क्षयी मनुष्यांना हितकारक आहे व श्रम, भ्रम, मद, निस्तेजता, श्वास, कास, अतितृषा, अतिक्षुधा, जीर्णज्वर, मूत्रकृच्छ्र व रक्तपित्त यांचा नाश करितें.

हितमत्यग्न्यनिद्रेभ्यो गरीयो माहिषं हिमम् ॥ २४ ॥
म्हशीचें दूध गाईच्या दुधापेक्षां अधिक जड व थंड असून ज्यांना क्षुधा फार लागते व निद्रा येत नाहीं अशा लोकांना हितकारक आहे.

अल्पाम्बुपानव्यायामकटुतिक्ताशनैर्लघु ।
आजं शोषज्वरश्वासरक्तपित्तातिसारजित् ॥ २५ ॥
शेळ्या पाणी थोडें पितात, व्यायाम फार करितात व तिखट व कडू रसांचें सेवन करितात; म्हणून त्यांचें दूध हलकें असतें व तें क्षय, ज्वर, श्वास, रक्तपित्त व अतिसार यांचा नाश करितें.

* रसायन म्हणजे ज्याच्यापासून शरीरांतील सर्व रसादि धातु उत्तम प्रकारचे तयार होतात तें ( लाभोपायो हि शस्तानां रसादीनां रसायनम् ).

ईषद्रूक्षोष्णलवणमौष्ट्रकं दीपनं लघु ।
शस्तं वातकफानाहकृमिशोफोदरार्शसाम् ॥ २६ ॥
उंटिणीचें दूध किंचित् उष्ण, रूक्ष, खारट, लघु व दीपक असून वात, कफ, पोटफुगी, कृमि, सूज, उदर व मूळव्याध ह्या विकारांना हितकारक आहे.

मानुषं वातपित्तासृगभिघाताक्षिरोगजित् ।
तर्पणाश्चोतनैर्नस्यैः
अंगावरचें ( स्त्रीचें ) दूध वात, पित्त, रक्तदोष किंवा अभिघात यांपासून होणाऱ्या नेत्ररोगांवर *तर्पण, आश्चोतन ( डोळ्यांत औषधाचे थेंब टाकणें ) व नस्य करण्याच्या उपयोगी पडतें.

अहृद्यं तूष्णमाविकम् ॥ २७ ॥
वातव्याधिहरं हिध्माश्वासपित्तकफप्रदम् ।
मेंढीचें दूध रुचीनें वाईट, उष्ण व वातव्याधिनाशक असून उचकी, श्वास, कफ व पित्त यांना उत्पन्न करितें.

हस्तिन्याः स्थैर्यकृद्
हत्तिणीचें दूध शरीर दृढ करितें.

बाढमुष्णं त्वैकशफं लघु ॥ २८ ॥
शाखावातहरं साम्ललवणं जडताकरम् ।
एकखुरी प्राण्याचें ( घोडी, गाढवी ) वगैरेंचें दूध फारच उष्ण, लघु व किंचित् आंबट व खारट असून शाखागत वायूचा नाश व बुद्धि मंद करितें.

पयोऽभिष्यन्दि गुर्वामं युक्त्या शृतमतोऽन्यथा ॥ २९ ॥
निरसें दूध जड व अभिष्यंदि ( कफाचा स्राव उत्पन्न करणारें ) असून विधियुक्त तापविलें असतां तें हलकें व अनभिष्यंदि असें होतें.

भवेद्गरीयोऽतिशृतं धारोष्णममृतोपमम् ।
फार तापविलें असतां तें जड होतें. धारोष्ण दूध केवळ अमृतच आहे.

अम्लपाकरसं ग्राहि गुरूष्णं दधि वातजित् ॥ ३० ॥
मेदःशुक्रबलश्लेष्मपित्तरक्ताग्निशोफकृत् ।
रोचिष्णु शस्तमरुचौ शीतके विषमज्वरे ॥ ३१ ॥
पीनसे मूत्रकृच्छ्रे च रूक्षं तु ग्रहणीगदे ।
नैवाद्यान्निशि नैवोष्णं वसन्तोष्णशरत्सु न ॥ ३२ ॥
नामुद्गसूपं नाक्षौद्रं तन्नाघृतसितोपलम् ।
न चानामलकं नापि नित्यं नो मन्दमन्यथा ॥ ३३ ॥
ज्वरासृक्पित्तवीसर्पकुष्ठपाण्डुभ्रमप्रदम् ।
दहीं रसानें व पाकानें आंबट, जड, उष्ण, स्तंभक, वातनाशक व रुचिकर असून मेद, शुक्र, बल, श्लेष्मा, पित्त, रक्त, अग्नि व सूज यांना उत्पन्न करितें. तें अरुचि, हिंवताप, पीनस व मूत्रकृच्छ्र ह्या विकारांस पथ्यकारक आहे. व लोणी काढलें असतां संग्रहणीवरहि चालतें.

* तर्पण म्ह० डोळ्याच्या सभोंवतीं पिठाची पाळ करून तूप, दूध इत्यादि धारण करितात तें.

रात्रीस दहीं कधींहि खाऊं नये. वसंत, ग्रीष्म व शरदृतूमध्यें दिवसाहि खाऊं नये. तापविलेलें दहीं वर्ज्य आहे. दहीं खाल्लें असतां त्याजबरोबर मुगाचें वरण, मध, तूप, खडीसाखर व आंवळकाठी यांपैकीं कोणता तरी एखादा पदार्थ असलाच पाहिजे. दहीं सतत कधींहि खाऊं नये. तसेंच अर्धवट विरजलेलें दहींहि खाऊं नये. वरील नियम न पाळतां दहीं खाल्लें असतां तें ज्वर, रक्तपित्त, विसर्प, कुष्ठ, पांडु व भ्रम यांना उत्पन्न करितें.

तक्रं लघु कषायाम्लं दीपनं कफवातजित् ॥ ३४ ॥
शोफोदरार्शोग्रहणीदोषमूत्रग्रहारुचीः।
प्लीहगुल्मघृतव्यापद्गरपाण्ड्वामयाञ्जयेत् ॥ ३५ ॥

ताक हलकें, आंबट व किंचित् तुरट, वातनाशक, कफघ्न व दीपक असून सूज, उदर, मूळव्याध, संग्रहणी, मूत्ररोग, ग्रह ( बालग्रह इत्यादि ), अरुचि, पांथरी, गुल्म, पांडु व विषजन्य व घृतजन्य विकार यांचा नाश करितें.

तद्वन्मस्तु सरं स्रोतःशोधि विष्टम्भजिल्लघु।

दह्याच्या निवळीमध्यें ताकाचेच गुण असून ती सारक रसादिकांचे मार्ग खुले करणारी, लघु व वातानुलोमन आहे.

नवनीतं नवं वृष्यं शीतं वर्णबलाग्निकृत् ॥ ३६ ॥
संग्राहि वातपित्तासृक्क्षयार्शोऽर्दितकासजित्।

ताजें लोणी कामोत्तेजक, थंड, वर्ण, बल व अग्नि यांचें वर्धक व अवष्टंभक असून वात, पित्त, रक्तपित्त, क्षय, मूळव्याध, अर्दित व खोकला यांचा नाश करितें.

क्षीरोद्भवं तु संग्राहि रक्तपित्ताक्षिरोगजित्।

दूध घुसळून काढलेलें लोणी तर अवष्टंभक असून रक्तपित्त व नेत्ररोग यांचा नाश करितें.

शस्तं धीस्मृतिमेधाग्निबलायुःशुक्रचक्षुषाम् ॥ ३७ ॥
बालवृद्धप्रजाकान्तिसौकुमार्यस्वरार्थिनाम्।
क्षतक्षीणपरीसर्पशस्त्राग्निग्लपितात्मनाम् ॥ ३८ ॥
वातपित्तविषोन्मादशोषालक्ष्मीज्वरापहम्।
स्नेहानामुत्तमं शीतं वयसः स्थापनं परम् ॥ ३९ ॥
सहस्रवीर्यं विधिभिर्घृतं कर्मसहस्रकृत्।

तूप सर्व स्नेहांमध्यें उत्तम, थंड, वयःस्थापक ( आयुष्य वाढविणारें ) व बुद्धि, स्मृति, विचारशक्ति, जठराग्नि, बल, आयुष्य, शुक्र व दृष्टि यांचें वर्धक असून, बाल व वृद्ध यांना व प्रजा, कांति, सौकुमार्य व स्वर यांची इच्छा बाळगणाऱ्या लोकांना हितावह आहे. उरःक्षत, क्षय, विसर्प व शस्त्रजन्य किंवा अग्निदग्ध व्रण इत्यादिकांनीं थकलेल्या मनुष्यालाहि तें फार प्रशस्त आहे. तें वात, पित्त, विषदोष, उन्माद, शोष, निस्तेजता व जीर्णज्वर यांचा नाश करितें व शास्त्रोक्त विधीनें तयार केलें असतां त्याच्यांत शेंकडों गुण उत्पन्न होऊन तें शेंकडों विकारांवर उपयोगी पडतें.

मदापस्मारमूर्च्छायशिरःकर्णाक्षियोनिजान् ॥ ४० ॥
पुराणं जयति व्याधीन् व्रणशोधनरोपणम्।

जुनें तूप उन्माद, अपस्मार, मूर्च्छा, शिरोरोग, कर्णरोग, नेत्ररोग व योनिरोग यांचा नाश करितें; व जखमा किंवा व्रण शुद्ध करून भरून आणितें.

बल्याः किलाटपीयूषकूर्चिकामोरणादयः ॥ ४१ ॥
शुक्रनिद्राकफकरा विष्टम्भिगुरवोऽबलाः।

पीयूष म्ह. खरवस, *कूर्चिका, †किलाट व ‡मोरण इत्यादिक क्षीरविकार किंवा तक्रविकार बलप्रद, जड, अवष्टंभक, दोषप्रकोपक, कफकारक, निद्राजनक व शुक्रवर्धक आहेत.

गव्ये क्षीरघृते श्रेष्ठे निन्दिते चाविसंभवे ॥ ४२ ॥

गाईचें दूध व तूप सर्वांत श्रेष्ठ व मेंढीचें निंद्य जाणावें.

इक्षो रसो गुरुः स्निग्धो बृंहणः कफमूत्रकृत्।
वृष्यः शीतोऽस्रपित्तघ्नः स्वादुपाकरसः सरः ॥ ४३ ॥

उसाचा रस जड, स्निग्ध, पौष्टिक, कफकारक, मूत्रल, वृष्य, थंड, रक्तपित्तघ्न, सारक व रसानें व पाकानें गोड आहे.

सोऽग्रे सलवणो दन्तपीडितः शर्करासमः।

शेंड्याकडच्या भागाचा ( वाढ्याचा ) रस किंचित् खारट असतो. चावून खाल्लेला ऊंस गुणानें खडीसाखरेप्रमाणें आहे.

मूलाग्रजन्तुजग्धादिपीडनान्मलसंकरात् ॥ ४४ ॥
किञ्चित्कालं विधृत्या च विकृतिं याति यान्त्रिकः।
विदाही गुरुविष्टम्भि तेनासौ

चरकानें काढलेला उसाचा रस मूळ, वाढें व कीड लागलेला भाग यांसकट पिळला गेल्यामुळें, मळ मिसळल्यामुळें व कांहीं वेळ ठेवंत राहिल्यामुळें विकृत होतो; म्हणून तो §विदाही, जड व अवष्टंभक असतो.

तत्र पौण्ड्रकः ॥ ४५ ॥
शैत्यप्रसादमाधुर्यैर्वरस्तमनु वांशिकः।

पांढरा ऊंस शीत, स्वच्छ व मधुर असल्यामुळें सर्व उसांत श्रेष्ठ आहे व त्याच्या खालोखाल तांबडा ऊंस आहे.

शातपर्वककान्तारनैपालाद्यास्ततः क्रमात् ॥ ४६ ॥
सक्षाराः सकषायाश्च सोष्णाः किंचिद्विदाहिनः।

शातपर्वक ( पुष्कळ पेरांचा ), कांतार व नेपाळ ह्या जाति अनुक्रमेंकरून तांबड्याच्या खालोखाल आहेत. ते थोडेबहुत खारट, तुरट, उष्ण व विदाही असतात.

फाणितं गुर्वभिष्यन्दि चयकृन्मूत्रशोधनम् ॥ ४७ ॥

काकवी फार जड, अभिष्यंदि, त्रिदोषकर व मूत्रल आहे.

---

*दह्याबरोबर किंवा ताकाबरोबर शिजविलेलें दूध.

†ह्याप्रमाणें शिजविलेल्या दुधाचा जो घनांश काढितात तो.

‡त्याचाच द्रवभाग ( हेमाद्रि. )

§जो पदार्थ पोटांत पुष्कळ वेळ राहून योग्य रीतीनें पचन न झाल्यामुळें आंबट ढेंकर उत्पन्न करितो, त्यास विदाही म्हणतात.

**नातिश्लेष्मकरो धौतः सृष्टमूत्रशकृद्गुडः।**
**प्रभूतक्रिमिमज्जासृङ्मेदोमांसकफोऽपरः ॥ ४८॥**

स्वच्छ गूळ किंचित् कफकारक व मलमूत्रांची शुद्धि करणारा आहे, व मलिन गूळ रक्त, मांस, मेद, कफ व कृमि यांना विशेषेंकरून उत्पन्न करितो.

**हृद्यः पुराणः पथ्यश्च नवः श्लेष्माग्निसादकृत्।**

*जुना गूळ रुचिकर व पथ्यकारक आहे व नवा गूळ कफ व अग्निमांद्य उत्पन्न करितो.

**वृष्याः क्षतक्षीणहिता रक्तपित्तानिलापहाः ॥ ४९ ॥**
**मत्स्यण्डिकाखण्डसिताः क्रमेण गुणवत्तमाः।**

राब, पिठीसाखर व खडीसाखर ह्या क्रमेंकरून एकाहून एक उत्तम असून वृष्य, रक्तपित्तनाशक, वातहारक व क्षत आणि क्षय झालेल्या मनुष्यास हितकारक आहेत.

**तद्गुणा तिक्तमधुरा कषाया यासशर्करा ॥ ५० ॥**

†धमाशाच्या साखरेचे गुण सदरहूप्रमाणेंच असून ती किंचित् कडवट व तुरट असते ( व मधुर तर असतेच ).

**दाहतृट्छर्दिमूर्च्छासृक्पित्तघ्न्यः सर्वशर्कराः।**

सर्व प्रकारच्या शर्करा दाह, तृषा, वांति, मूर्च्छा व रक्तपित्त यांचा नाश करितात.

**शर्करेक्षुविकाराणां फाणितं च वरावरे ॥ ५१॥**

उसापासून होणाऱ्या सर्व पदार्थांमध्यें खडीसाखर गुणानें उत्तम व काकवी कमी जाणावी.

**चक्षुष्यं छेदि तृट्श्लेष्मविषहिध्मास्रपित्तनुत्।**
**मेहकुष्ठक्रिमिच्छर्दिश्वासकासातिसारनुत् ॥ ५२ ॥**
**व्रणशोधनसंधानरोपणं वातलं मधु।**
**रूक्षं कषायमधुरं तत्तुल्या मधुशर्करा ॥ ५३ ॥**

मध वातकारक, रूक्ष, मधुर, किंचित् तुरट, लेखन‡ व नेत्रांस हितावह असून तृषा, उचकी, रक्तपित्त, कफ, विषदोष, मेह, कुष्ठ, कृमि, वांति, श्वास, कास, अतिसार, यांचा नाश करितो, व व्रण शुद्ध करून जुळवून भरून आणितो. मधुजन्य शर्करेचे गुणहि तेच आहेत.

**उष्णमुष्णार्तमुष्णे च युक्तं चोष्णैर्निहन्ति तत्।**

मधाचा उष्ण विकारामध्यें उष्ण ऋतूंत, उष्ण पदार्थांबरोबर किंवा ऊन करून उपयोग केला असतां तो अपाय करितो.

**प्रच्छर्दने निरूहे च मधूष्णं न निवार्यते ॥ ५४ ॥**
**अलब्धपाकमाश्वेव तयोर्यस्मान्निवर्तते।**

वमन किंवा बस्तिकर्मामध्यें मध ऊन असला तरी चालतो; कारण त्याचा पाक होण्यापूर्वींच तो वांतींतून किंवा मलाबरोबर लागलाच परत येतो.

**तैलं स्वयोनिवत्तत्र मुख्यं तीक्ष्णं व्यवायि च ॥ ५५ ॥**
**त्वग्दोषकृदचक्षुष्यं सूक्ष्मोष्णं कफकृन्न च।**

तेलाचे गुण, ज्यापासून तें निघतें त्या त्या पदार्थांप्रमाणें असतात. तिळांचें तेल तीक्ष्ण व्यवायि*, त्वचेचे विकार करणारें†, नेत्रांना वाईट, उष्ण, व सूक्ष्म म्हणजे त्वचेंत लौकर जिरणारें असें असून कफ उत्पन्न करीत नाहीं.

**कृशानां बृंहणायालं स्थूलानां कर्शनाय च ॥ ५६ ॥**
**बद्धविट्कं क्रिमिघ्नं च संस्कारात्सर्वदोषजित्‡।**

तें कृशांना पुष्ट§ करितें व स्थूलांना कृश करितें. तें मलावरोधक असून कृमिघ्न आहे व निरनिराळ्या औषधींनीं सिद्ध केलें असतां सर्व विकारांवर उपयोगी पडतें.

**सतिक्तोषणमैरण्डं तैलं स्वादु सरं गुरु ॥ ५७ ॥**
**वर्ध्मगुल्मानिलकफानुदरं विषमज्वरं।**
**रुक्शोफौ च कटीगुह्यकोष्ठपृष्ठाश्रयौ जयेत् ॥ ५८ ॥**

एरंडेल किंचित् कडवट, तिखट, मधुर, सारक, जड व वात-

---

* तीन वर्षांच्या आंतील व एक वर्षाच्या मागील जो गूळ त्यालाच जुना अशी संज्ञा आहे.

† याला फार्सीमध्यें तुरंजबीन व इंग्रजींत म्याना म्हणतात. अफगाणिस्थानांत एक धमाशाची जात आहे. त्याचे झाडावरहि साखर डिंकाप्रमाणें आपोआप उत्पन्न होते. धमाशाच्या रसापासून इक्षुशर्करेप्रमाणें साखर तयार करितात असें जें हेमाद्रीनें लिहिलें आहे तें चुकीचें आहे.

‡ ज्याच्या योगानें ग्रंथि वगैरे वितळून जातात किंवा जे धातूंना व दोषांना शोषण करून पातळ करितात त्यांस 'लेखन' म्हणतात.

* जें औषध थोडक्याच कालांत सर्व शरीर व्यापून टाकितें, त्यास 'व्यवायि' म्हणतात.

† तैल त्वचेचे विकार करणारें असें जें म्हटलें आहे, तें फक्त खाण्याच्याच संबंधानें म्हटलें आहे, असें समजावें; कारण बाह्योपचारांत अभ्यंगादि रूपानें उपयोग केल्यानें तें त्वचा चांगली करितें असें अन्यत्र सांगितलें आहे.

‡ तेलाचे पौष्टिक व कृशकारक असे जे विरुद्ध गुण सांगितले, ते कसे संभवतील असा सहजच प्रश्न निघतो. त्यास उत्तर असें कीं, कृश शरीरांतील सूक्ष्म स्रोतसें (केशवाहिन्या) आकुंचित झाल्यामुळें त्यांत अन्नरसाचा प्रवेश होत नाहीं. तेलाच्या तीक्ष्णादि गुणांच्या योगानें त्यांच्यामधील प्रतिबंध नाहींसा होऊन तीं विकसित होतात, व मग अन्नरसाचें यथायोग्य शोषण होऊन शरीर पुष्ट होतें. तसेंच स्थूलांच्याहि सूक्ष्म स्रोतसांमध्यें तेल शिरलें म्हणजे त्याच्या तीक्ष्णोष्णादि गुणांच्या योगानें मेदाचा क्षय होतो; म्हणून त्याच्या अंगीं स्थूलांना कृश करण्याचे गुण आहेत.

§ ह्या श्लोकाच्या पूर्वार्धांत 'सर्वदोषजित्' असें जें पद आहे, त्याबद्दल बहुतेक पोथ्यांत 'सर्वरोगजित्' असा पाठ आढळतो व अरुणदत्तानेंहि तोच पाठ घेतला असावा असें त्याच्या टीकेवरून स्पष्ट होतें. कारण तेथें त्यानें 'अशेषरोगजित्' असा अर्थ केला आहे. हेमाद्रीनेंहि सर्वरोगजित् असाच पाठ घेतला आहे. आम्हीं सर्वदोषजित् असा पाठ घेऊन त्याचा अर्थ मात्र उभय टीकाकारांप्रमाणें 'सर्व विकारांवर उपयोगी पडतें,' असा केला आहे; कार्यकारणधर्म नांवाच्या तंत्रयुक्तीनें दोषशब्देंकरून रोग किंवा विकार असा अर्थ करतां येतो. उ० अ० ४० स. सु. टीका पहा. (कुंट्यांच्या बुकांतील ८२० पा. ह्रा. २)

कफघ्न असून विषमज्वर, गुल्म, उदर, वर्ध्मरोग व कटी, गुह्य, कोष्ठ व पाठ ह्या ठिकाणच्या वळा व सूज यांचा नाश करितें.

तीक्ष्णोष्णं पिच्छिलं विस्रं रक्तैरण्डोद्भवं त्वति ।

तांबड्या एरंडाचें तेल फारच तीक्ष्ण, उष्ण, चिकट व घाणेरडें असतें.

कटूष्णं सार्षपं तीक्ष्णं कफशुक्रानिलापहम् ॥ ५९ ॥
लघु पित्तास्रकृत् कोठकुष्ठार्शोव्रणजन्तुजित् ।

शिरसेल तिखट, उष्ण, लघु व तीक्ष्ण असून वात, कफ, शुक्र, कुष्ठ, अर्श, व्रण, कृमि व गांधी यांचा नाश करितें व रक्तपित्त उत्पन्न करितें.

आक्षं स्वादु हिमं केश्यं गुरु पित्तानिलापहम् ॥ ६० ॥

बेहड्याचें तेल गोड, थंड व जड असून वातपित्तघ्न व केशवर्धक आहे.

नात्युष्णं निम्बजं तिक्तं कृमिकुष्ठकफप्रणुत् ।

कडूनिंबाच्या बियांचें तेल कडू व किंचित् उष्ण असून कृमि, कुष्ठ, कफ यांचा नाश करितें.

उमाकुसुम्भजं चोष्णं त्वग्दोषकफपित्तकृत् ॥ ६१ ॥

जवसाचें व करडईचें तेल उष्ण असून त्वचेचे विकार, कफ व पित्त यांना उत्पन्न करितें.

वसा मज्जा च वातघ्नौ बलपित्तकफप्रदौ ।
मांसानुगस्वरूपौ च विद्यान्मेदोपि ताविव ॥ ६२ ॥

वसा ( मांसस्नेह ) व मज्जा वातघ्न, बल्य व कफपित्तकारक असून त्यांचे रंग, रूप त्या त्या प्राण्यांच्या मांसाप्रमाणें असतात. मेदाचे ( चरबीचे ) गुणहि वसा व मज्जा यांच्याप्रमाणेंच आहेत.

दीपनं रोचनं मद्यं तीक्ष्णोष्णं तुष्टिपुष्टिदम् ।
सस्वादुतिक्तकटुकमम्लपाकरसं सरम् ॥ ६३ ॥
सकषायं स्वरारोग्यप्रतिभावर्णकृल्लघु ।
नष्टनिद्रातिनिद्रेभ्यो हितं पितास्रदूषणम् ॥ ६४ ॥
कृशस्थूलहितं रूक्षं सूक्ष्मं स्रोतोविशोधनम् ।
वातश्लेष्महरं युक्त्या पीतं विषवदन्यथा ॥ ६५ ॥

मद्य किंचित् मधुर, कडू, तिखट, तुरट व आंबट असून आम्ल-विपाकी, सारक, रोचक, दीपक, तीक्ष्ण, उष्ण, लघु, आल्हादजनक, पौष्टिक, स्वर, आरोग्य, स्मृति व वर्ण यांना हितावह; तसेंच निद्रानाश, अतिनिद्रा, कृशत्व व स्थूलत्व यांजवरहि हितावह, रक्तपित्तदूषक, रुक्ष, सूक्ष्म* व स्रोतोविशोधक ( रसादिकांचे मार्ग खुले करणारें ) व कफवातहारक आहे; परंतु त्याचें सेवन विधियुक्त न झाल्यास तें विषतुल्य होतें.

गुरु त्रिदोषजननं नवं जीर्णमतोऽन्यथा ।

नवें मद्य जड असून दोषत्रयांचा प्रकोप करितें. जुनें हलकें व त्रिदोषहारक आहे.

पेयं नोष्णोपचारेण न विरिक्तक्षुधातुरैः ॥ ६६ ॥
नात्यर्थतीक्ष्णमृद्वल्पसंभारं कलुषं न च ।

ज्याला नेहमीं उष्ण उपचारांची संवय असते, ज्यानें विरेचन घेतलें आहे किंवा ज्याला क्षुधा लागली आहे, त्यानें मद्य पिऊं नये. जें अतिशय तीक्ष्ण किंवा अतिशय हलकें, ज्यामध्यें पडावी तशी सामग्री पडली नाहीं किंवा जें गढूळ असतें तें मद्य कधींहि पिऊं नये.

गुल्मोदरार्शोग्रहणीशोषहृत् स्नेहनी गुरुः ॥ ६७ ॥
सुराऽनिलघ्नी मेदोऽसृक्स्तन्यमूत्रकफावहा ।

तांदुळाच्या पिठापासून तयार केलेली दारू ( सुरा ) स्निग्धता आणणारी, जड व वातनाशक असून मेद, रक्त, स्तन्य, मूत्र व कफ यांची वृद्धि व गुल्म, अर्श, उदर, ग्रहणी व क्षय यांचा नाश करितें.

तद्गुणा वारुणी* हृद्या लघुतीक्ष्णा निहन्ति च ॥६८॥
शूलकासवमिश्वासविबन्धाध्मानपीनसान् ।

ताडी, माडी किंवा शिंदी हिचे गुणहि सदरहूप्रमाणेंच असून ती रुचिकर, हलकी व तीक्ष्ण असते; व शूल, कास, वांति, श्वास, मलरोध, आध्मान [ पोटफुगी ] व पीनस यांचा नाश करिते.

नातितीव्रमदा लघ्वी पथ्या वैभीतकी सुरा ॥ ६९ ॥
व्रणे पाण्ड्वामये कुष्ठे न चात्यर्थं विरुध्यते ।

बेहड्याची साल व तांदुळाचें पीठ यांजपासून तयार केलेली दारू हलकी व पथ्यकारक असून फार अंमल आणीत नाहीं व व्रण, पांडुरोग व कुष्ठ यांना फारशी बाधक होत नाहीं [ जशीं इतर मद्यें होतात तशीं ].

यथाद्रव्यगुणोऽरिष्टः सर्वमद्यगुणाधिकः ॥ ७० ॥
ग्रहणी पाण्डुकुष्ठार्शःशोफशोषोदरज्वरान् ।
हन्ति गुल्मकृमिप्लीहान् कषायकटुवातलः ॥ ७१ ॥

अरिष्टाचे गुण जशीं जशीं त्यांत औषधें पडतात, त्याप्रमाणें असून तो सर्व प्रकारच्या मद्यांत श्रेष्ठ असतो व त्याच्या योगानें ग्रहणी, पांडु, कुष्ठ, अर्श, सूज, क्षय, उदर, ज्वर, गुल्म, कृमि, प्लीहा यांचा नाश होतो. तो किंचित् तुरट, तिखट व वातुळ असतो.

मार्द्वीकं लेखनं हृद्यं नात्युष्णं मधुरं सरम् ।
अल्पपित्तानिलं पाण्डुमेहार्शःकृमिनाशनम् ॥ ७२ ॥

द्राक्षासव मधुर, रुचिकर, सारक, लेखन, किंचित् पित्तकारक, वातुल व फार उष्ण नव्हे असा असून पांडु, अर्श, मेह व कृमि यांचा नाश करितो.

अस्मादल्पान्तरगुणं खार्जूरं वातलं गुरु ।

खर्जूरासव ( खजुराची दारू ) वातुळ व जड असून त्याच्या व द्राक्षासवाच्या गुणामध्यें थोडकेंच अंतर आहे.

---

*जो पदार्थ अंतर्बाह्य त्वचेंत लवकर शिरतो ( परमाणु सूक्ष्म असल्या-मुळें ) त्यास ' सूक्ष्म ' अशी संज्ञा आहे.

*' वारुणी ' शब्दाचा अर्थ हेमाद्रीच्या मतें ' श्वेतसुरा ' असा आहे. अरुणदत्ताच्या मतें ' प्रसन्ना ' ( दारूचा फेंस ) असा आहे व शार्ङ्गधराच्या मतें ताडी किंवा शिंदी असा अर्थ होतो.

**शार्करः सुरभिः स्वादुर्हृद्यो नातिमदो लघुः ॥ ७३ ॥**

साखरेची दारू गोड, सुगंधि, रुचिकर व हलकी असून फार अम्मल आणीत नाहीं.

**सृष्टमूत्रशकृद्वातो गौडस्तर्पणदीपनः ।**

गुळाची दारू दीपक व तृप्तिकारक असून मल, मूत्र व वात यांचा उत्सर्ग करिते.

**वातपित्तकरः सीधुः स्नेहश्लेष्मविकारहा ॥ ७४ ॥**

उसाच्या रसाची दारू वातपित्तकारक असून घृतादिस्नेहजन्य विकार व कफविकार यांचा नाश करिते.

**मेदःशोफोदरार्शोघ्नस्तत्र पक्वरसो वरः ।**

तीच शिजविलेल्या रसापासून केल्यास अधिक हितावह होते व मेद, सूज, उदर व अर्श यांचा नाश करिते.

**छेदी मध्वासवस्तीक्ष्णो मेहपीनसकासजित् ॥ ७५ ॥**

मधाची दारू कफादिकांचा उच्छेद करणारी, तीक्ष्ण व मेह, पीनस व कास यांची नाशक आहे.

**रक्तपित्तकफोत्क्लेदी शुक्तं वातानुलोमनम् ।**
**भृशोष्णतीक्ष्णरूक्षाम्लहृद्यं रुचिकरं सरम् ॥ ७६ ॥**
**दीपनं शिशिरस्पर्शं पाण्डुदृक्क्रुमिनाशनम् ।**

* शिर्का ( शुक्त ) वायूला स्वमार्गाप्रत प्रवृत्त करितो. रक्त, पित्त व कफ यांना अगदीं पातळ करितो व फार उष्ण, तीक्ष्ण, रूक्ष, आंबट, खाण्याला प्रिय, रुचिकर, सारक, दीपक व स्पर्शानें शीतल असून पांडुरोग, कृमि व दृष्टि यांचा नाश करितो.

**गुडेक्षुमद्यमार्द्वीकशुक्तं लघु यथोत्तरम् ॥ ७७ ॥**

गूळ, उसाचा रस, मद्य व द्राक्षासव यांचे शिर्के क्रमानें एकाहून एक हलके आहेत.

**कन्दमूलफलाद्यं च तद्वद्विद्यात्तदासुतम् ।**

ह्या निरनिराळ्या शिर्क्यांमध्यें कंदमूलादिक भिजत घालून जे पदार्थ तयार करितात त्यांना † आसुतें म्हणतात. ह्यांचे गुणहि त्या त्या शिर्क्यांप्रमाणेंच असतात.

**शाण्डाकी चासुतं चान्यत्कालाम्लं रोचनं लघु ॥ ७८**

शांडाकी नांवाचें आसुत ( कंद, मूळ, मूग व मुळे इत्यादिकांचे संयोगापासून झालेलें ) व कालाम्ल नांवाचें आसुत ( पेंड वगैरेपासून केलेलें ) हीं दोन्हीं रुचिप्रद व हलकीं आहेत.

**धान्याम्लं भेदि तीक्ष्णोष्णं पित्तकृत्स्पर्शशीतलम् ।**
**श्रमक्लमहरं रुच्यं दीपनं बस्तिशूलनुत् ॥ ७९ ॥**
**शस्तमास्थापने हृद्यं लघु वातकफापहम् ।**

* धान्याम्ल तीक्ष्ण, उष्ण, पित्तकारक वातकफनाशक, रुचिकर, दीपक, हृद्य ( खाण्याला प्रिय ), लघु, सारक, शीतस्पर्श व श्रम, ग्लानि व बस्तिशूल यांचें नाशक असून निरूह बस्ति करण्याचे उपयोगी पडतें.

**मूत्रं गोऽजाविमहिषीगजाश्वोष्ट्रखरोद्भवम् ॥ ८० ॥**
**पित्तलं रूक्षतीक्ष्णोष्णं लवणानुरसं कटु ।**
**कृमिशोफोदरानाहशूलपाण्डुकफानिलान् ॥ ८१ ॥**
**गुल्मारुचिविषश्वित्रकुष्ठार्शांसि जयेल्लघु ।**

गाय, शेळी, मेंढी, म्हैस, हत्ती, घोडा, उंट व गाढव यांचें मूत्र तिखट व किंचित् खारट, रूक्ष, तीक्ष्ण, लघु व पित्तल असून तें कृमि, सूज, उदर, आनाह ( पोटफुगी ), शूल, पांडु, कफ, वायु, गुल्म, अरुचि, विषविकार, पांढरें कोड, कुष्ठ व मूळव्याध यांचा नाश करितें.

**तोयक्षीरेक्षुतैलानां वर्गैर्मद्यस्य च क्रमात् ॥ ८२ ॥**
**इति द्रवैकदेशोऽयं यथास्थूलमुदाहृतः ।**

याप्रमाणें पाणी, दूध, ऊंस, तेल व मद्य ह्या पांच वर्गांमध्यें द्रव पदार्थांचें अंशतः व स्थूल दृष्टीनें वर्णन केलें आहे. ( अंशतः म्हणण्याचें कारण असें कीं, अद्यापि ज्यांचें वर्णन केलें नाहीं असे आणखी पुष्कळ द्रव पदार्थ आहेत. )

---

# षष्ठोऽध्यायः

## अध्याय ६ वा

**अथातोऽन्नस्वरूपविज्ञानीयमध्यायं व्याख्यास्यामः ॥**

आतां भक्ष्य पदार्थांच्या गुणदोषांविषयीं अध्याय सांगतों.

**रक्तो महान्सकलमस्तूर्णकः शकुनाहृतः ।**
**सारामुखो दीर्घशूको रोध्रशूकः सुगन्धकः ॥ १ ॥**
**पतङ्गास्तपनीयाश्च ये चान्ये शालयः† शुभाः ।**

---

*कंद, मूळ, फळ ह्यांचें किंवा मूळ, मध, धान्याम्ल, दह्याची निवळ व उसाचा रस यांचें मिश्रण तीन दिवस धान्यांत पुरून ठेविलें म्हणजे जें सिद्ध होतें त्यास 'शुक्त' म्हणतात. हें एक प्रकारचें 'व्हिनिगर' होय. याला मुसलमानींत 'शिर्का' म्हणतात.

†आसुत हा शब्द लॅटिन् भाषेंतील Acetum आसेटम् शब्दाशीं अगदीं जुळतो. आसेटम् शब्द शिर्क्याला ( व्हिनिगरला ) लावतात.

*तंडुलादि धान्याची पेज करून आंबवितात ती. त्यालाच कांजी किंवा कांजिक म्हणतात.

† संस्कृतांत भाताच्या दोन जाति शालि व व्रीहि नांवाच्या आढळतात. त्यांचीं लक्षणें किंवा प्रकृत नांवें कोठें दिलेलीं आढळत नाहींत. आमच्या मतें हल्लीं गरवीं व हळवीं अशीं जीं दोन प्रकारचीं भातें आहेत, त्यांसच अनुक्रमेंकरून या संज्ञा असाव्यात. जीं भातें पेरल्यापासून फार लवकर तयार होतात म्हणजे ज्यांस सुमारें तीनपासून साडेचार महिने लागतात, त्यांस हळवीं ( व्रीहि ) असें म्हणतात. ज्यांस पांचसहा महिने लागतात, त्यांस गरवीं अथवा महान् भातें ( शालि ) म्हणतात. निघंटप्रकाश नामक मराठी पुस्तकांत व्रीहि म्ह० देवभात असा अर्थ केला आहे; परंतु ही चूक आहे.

शालि व व्रीहि यांचे मराठी अर्थ निघंटप्रकाशादि मराठी ग्रंथांत योग्य रीतीनें केले नाहींत; एवढेंच नव्हे तर संस्कृत ग्रंथांत देखील त्यांच्या अर्थासंबंधीं एकवाक्यता नाहीं. भावप्रकाशांत 'कंडनेन विना शुक्ला हैमन्ताः शालयः स्मृताः' ॥ व 'वार्षिकाः कंडिताः शुक्ला व्रीहयश्चिरपाकिनः' अशीं

[ पुढील पानावर पहा ]

**स्वादुपाकरसाः स्निग्धाः वृष्या बद्धाल्पवर्चसः ॥ १ ॥**
**कषायानुरसाः पथ्या लघवो मूत्रला हिमाः।**
**शूकजेषु**

तांबसाळी, पटणी ( मोठें भात ), कलमसाळी, तूर्णक, शकुनाहृतसाळ, सारामुख, दीर्घशूक, रोध्रशूक, सुगंधक ( कमोद, आंबेमोहोर इ० ), पतंग, तपनीय ( सोनवेल, ), ह्या व दुसऱ्या जातींच्या साळी शूकधान्यामध्यें येतात. त्या स्निग्ध, लघु, थंड, मूत्रल, वृष्य, पाकानें व रसानें मधुर व किंचित् तुरट, पथ्यकारक व निर्दोष आहेत. व त्यांच्यायोगानें मलाचा खडा होतो व मलहि थोडान उत्पन्न होतो.

**वरस्तत्र रक्तस्तृष्णात्रिदोषहा ॥ २ ॥**

ह्या सर्व साळींमध्यें तांबसाळी तृषाहारक व त्रिदोषनाशक असून श्रेष्ठ आहेत.

**महांस्तस्यानुकलमस्तं चाप्यनु ततः परे।**

त्याच्या खालोखाल मोठें भात व त्याहूनहि खालीं कलमसाळ व त्याच्या खालोखाल इतर सर्व जाति येतात.

**यवका हायनाः पांसुबाष्पनैषधकादयः ॥ ४ ॥**
**स्वादूष्णा गुरवः स्निग्धाः पाकेऽम्लाः श्लेष्मपित्तलाः।**
**सृष्टमूत्रपुरीषाश्च पूर्वं पूर्वं च निन्दिताः ॥ ५ ॥**

यवक, हायन, पांसु, बाष्प, नैषध इ० ज्या साळी त्या गोड, उष्ण, जड, स्निग्ध, पाककालीं आंबट, कफकर, पित्तल, सारक व मूत्रल असून अंत्याकडून त्या एकाहून एक अधिक दोषयुक्त आहेत. ( म्हणजे यवक सर्वांत वाईट समजावा ).

**स्निग्धो ग्राही गुरुः स्वादुस्त्रिदोषघ्नः स्थिरो हिमः।**

---

[ मागील पानावरून पुढें ]
त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत; व अरुणदत्तानें ' क्षुण्णः सितः स्मृतः शाली रक्तो व्रीहिरुदाहृतः ' असें वचन दिलें आहे. ह्या दोहोंत बराच भेद आहे, एवढेंच नव्हे, तर विरोधहि आहे. आम्हीं जो त्या दोन शब्दांचा ' हळवें ' व ' गरवें ' भात असा अर्थ अनुक्रमें केला आहे, तो भावप्रकाशांतील वचनाच्या अंशतः आधारें असून हल्लींच्या अनुभवास तो अर्थ जुळतो; कारण षष्टिक ही जी व्रीहींची जात आहे, ती ६० दिवसांनीं पिकणारी असल्यामुळें त्याचा अंतर्भाव हळव्या भातांतच होतो; कारण जीं भातें दोनपासून तीन किंवा चार महिन्यांत तयार होतात त्यांस हळवीं असें म्हणतात; व यावरून आम्हीं व्रीहि व हळवें भात यांची एकवाक्यता केली आहे व भावप्रकाशांतील वचनानें व्रीहीची उत्पत्ति वर्षाऋतूंतच होते असें सिद्धच आहे. (' चिरपाकिनः ' हें मात्र जुळत नाहीं); व त्याच वचनावरून शालि हेमंतऋतूंतील धान्य आहे हें उघड दिसतें, व म्हणून आम्हीं त्यास ' गरवें ' भात म्हटलें आहे. कारण गरवीं भातें उशीरानें होतात. शिवाय गुणाचा विचार केला म्हणजे देखील ही वरील एकवाक्यता खरी ठरते. संस्कृतांत जसे शालीचे गुण व्रीहींपेक्षां सरासरीनें जास्त मानिले आहेत, तसेंच हल्लींहि गरवें भात हळव्याहून चांगलें मानितात. हळव्यांपैकीं फक्त षष्टिक ( साठी साळ ) मात्र पथ्यकारक आहे. गरव्या व हळव्या भाताच्या ज्या अनेक जाती ह्या अध्यायांत आल्या आहेत, त्या सर्वांचीं मराठी नांवें सांपडलीं नाहींत. जेवढ्यांचा शोध लागला तेवढीं दिलीं आहेत.

**षष्टिको व्रीहिषु श्रेष्ठो गौरश्चासितगौरतः ॥ ६ ॥**

सर्व हळव्या भातांमध्यें साठेसाळी श्रेष्ठ होत. त्या स्निग्ध, ग्राहक, जड, स्वादु, थंड, बल्य व त्रिदोषघ्न आहेत. पांढऱ्या साठेसाळी काळसर पांढऱ्यापेक्षां श्रेष्ठ आहेत.

**ततः क्रमान्महाव्रीहिकृष्णव्रीहिजतूमुखाः।**
**कुक्कुटाण्डकपालाख्याः पारावतकशूकराः ॥ ७ ॥**
**वरकोद्दालकोज्ज्वालचीनशारददर्दुराः।**
**गन्धनाः कुरुविन्दाश्च गुणैरल्पान्तराः स्मृताः ॥ ८ ॥**

त्यांच्या खालोखाल महाव्रीहि, कृष्णव्रीहि, जतूमुख, कुक्कुटांड, कपाल, पारावतक, शूकर ( डुकरसाळ ), वरक, उद्दालक, उज्ज्वाल, चीन, शारद, दर्दुर, गंधन व कुरुविंद या जाति अनुक्रमानें आहेत. व त्यांच्या गुणामध्यें अंतरहि थोडेंच आहे.

**स्वादुरम्लविपाकोऽन्यो व्रीहिः पित्तकरो गुरुः।**
**बहुमूत्रपुरीषोष्मा त्रिदोषस्त्वेव पाटलः ॥ ९ ॥**

पाटलसंज्ञक व्रीहि ( गुलाबी रंगाची साळ ) गोड, अम्लविपाकी, पित्तल, जड, उष्ण, मलमूत्रवर्धक व त्रिदोषकर आहेत.

**कङ्गुकोद्रवनीवारश्यामाकादि हिमं लघु।**
**तृणधान्यं पवनकृल्लेखनं कफपित्तहृत् ॥ १० ॥**

राळे, हरीक, नीवार ( रानसाळी, देवभात ) सांवे इत्यादि तृणधान्यें थंड, हलकीं, वातुळ, कफपित्तहारक व लेखन आहेत.

**भग्नसंधानकृत्तत्र प्रियङ्गुर्बृंहणी गुरुः।**

त्यांपैकीं राळे मोडलेल्या हाडास सांधणारे, पौष्टिक व जड आहेत.

**कोरदूषः परं ग्राही स्पर्शशीतो विषापहः ॥ ११ ॥**

हरीक फार स्तंभक, स्पर्शानें शीत व विषनाशक आहेत.

**रूक्षः शीतो गुरुः स्वादुः सरो विड्वातकृद्यवः।**
**वृष्यः स्थैर्यकरो मूत्रमेदःपित्तकफाञ्जयेत् ॥ १२ ॥**
**पीनसश्वासकासोरुस्तम्भकण्ठत्वगामयान्।**

जव मधुर, जड, शीत, रूक्ष, सारक, मळवर्धक, वातुळ, वृष्य व बल्य असून कफ, पित्त, मेद व मूत्र यांचा ऱ्हास करितात व पीनस, श्वास, कास, ऊरुस्तंभ, कंठरोग व त्वग्रोग यांचा नाश करितात.

**न्यूनो यवादनुयवो रूक्षोष्णो वंशजो यवः ॥ १३ ॥**

निःशूक जव जवांपेक्षां गुणानें कमी आहेत. वेळूचें बीज ( ज्याला वंशयव म्हणतात ) रूक्ष व उष्ण आहे.

**वृष्यः शीतो गुरुः स्निग्धो जीवनो वातपित्तहा।**
**संधानकारी मधुरो गोधूमः स्थैर्यकृत्सरः ॥ १४ ॥**

गहूं थंड, जड, स्निग्ध, मधुर, वृष्य, जीवनीय, वातपित्तहारक, सारक, बल्य व अस्थिसंधानकर आहे.

**पथ्या नन्दीमुखी शीता कषायमधुरा लघुः।**

बारीक व लांबट अशा जातीचे गहूं ( नंदीमुखी ) पथ्यकारक, थंड, हलके, किंचित् तुरट व मधुर असतात.

मुद्गाढकीमसूरादि* शिम्बीधान्यं विबन्धकृत्॥ १५॥
कषायं स्वादु संग्राहि कटुपाकं हिमं लघु।
मेदःश्लेष्मास्रपित्तेषु हितं लेपोपसेकयोः†॥ १६॥

मूग, तुरी, मसुरा इ० द्विदल धान्यें (शिंबीधान्यें) तुरट व गोड, पाककालीं तिखट, थंड, लघु, वायूचा अवरोध करणारीं व मलावष्टंभक (संग्राहि) असून रक्तपित्त, कफ व मेदोविकार यांचा नाश करितात. व लेप करण्याचे व सांबारें किंवा वरण करण्याचे उपयोगी पडतात.

वरोऽत्र मुद्गोऽल्पचलः कलायस्त्वतिवातलः।
राजमाषोऽनिलकरो रूक्षो बहुशकृद्गुरुः॥ १७॥

सर्व द्विदल धान्यांमध्यें मूग श्रेष्ठ असून किंचित् वातुळ आहेत. वाटाणा फारच वातुळ आहे. चवळ्या वातुळ, रूक्ष व जड असून त्या खाल्ल्या असतां मळ फार होतो.

उष्णाः कुलत्थाः पाकेऽम्लाः शुक्राश्मश्वासपीनसान्।
कासार्शःकफवातांश्च घ्नन्ति पित्तास्रदाः परम्॥ १८॥

कुळीथ उष्ण, पाककालीं आंबट व अत्यंत रक्तपित्तप्रकोपक असून शुक्र, अश्मरी, श्वास, कास, पीनस, अर्श, कफ व वात यांचा नाश करितो.

निष्पावो वातपित्तास्रस्तन्यमूत्रकरो गुरुः।
सरो विदाही दृक्शुक्रकफशोफविषापहः॥ १९॥

पावटा जड, सारक, विदाही, वातुळ, पित्तकर, रक्त, स्तन्य व मूत्र यांची वृद्धि करणारा व दृष्टि, शुक्र, सूज, कफविकार व विषविकार यांचा नाश करणारा आहे.

माषः स्निग्धो बलश्लेष्ममलपित्तकरः सरः।
गुरूष्णोऽनिलहा स्वादुः शुक्रवृद्धिविरेककृत्॥ २०॥

उडीद स्निग्ध, सारक, जड, उष्ण, स्वादु, वातनाशक, बल्य, कफपित्तकारक व मलवर्धक असून शुक्रधातूची वृद्धि व उत्सर्ग करितो.

फलानि माषवद्विद्यात्काकाण्डोलात्मगुप्तयोः।

गोड कुहिरी व खाजकुहिरी यांच्या बियांचे गुणहि उडदाप्रमाणेंच आहेत.

उष्णस्त्वच्यो हिमः स्पर्शे केश्यो बल्यस्तिलो गुरुः २१
अल्पमूत्रः कटुः पाके मेधाग्निकफपित्तकृत्।

तीळ उष्ण, जड, पाककालीं तिखट, स्पर्शानें थंड, कफपित्तकारक, बुद्धिप्रद, अग्निप्रदीपक, बल्य, त्वक्प्रसादक व केशवर्धक असून लघ्वीचें मान कमी करणारा आहे.

स्निग्धोमा स्वादुतिक्तोष्णा कफपित्तकरी गुरुः॥२२॥
दृक्शुक्रहृत्कटुः पाके तद्वद्बीजं कुसुम्भजम्।

अळशी किंवा जवस स्निग्ध, मधुर, कडू, पाककालीं तिखट, उष्ण, जड, कफपित्तकारक व दृष्टि आणि शुक्र यांचा नाश करणारा आहे. करडईचे गुणहि त्याप्रमाणेंच आहेत.

माषोऽत्र सर्वेष्ववरो यवकः शूकजेषु च॥ २३॥

सर्व द्विदल धान्यांमध्यें उडीद गुणानें निकृष्ट जाणावा व सर्व शूकधान्यांमध्यें यवक (एक प्रकारचा तांदूळ) फार वाईट आहे.

नवं धान्यमभिष्यन्दि लघु संवत्सरोषितम्।
शीघ्रजन्म तथा सूप्यं निस्तुषं युक्तिभर्जितम्॥ २४॥

नवें धान्य अभिष्यंदि आहे. एक वर्षाचें जुनें धान्य हलकें असतें. फार थोडक्या वेळांत तयार झालेलें किंवा कोंडा काढून युक्तीनें भाजलेलें द्विदल धान्य हलकें असतें.

*मण्डपेयाविलेपीनामोदनस्य च लाघवम्।
यथापूर्वं शिवस्तत्र मण्डो वातानुलोमनः॥ २५॥
तृड्ग्लानिदोषशेषघ्नः पाचनो धातुसाम्यकृत्।
स्रोतोमार्दवकृत्स्वेदी संधुक्षयति चानलम्॥ २६॥

पेज (मंड), लापशी (पेया), आंटवल (विलेपी) व भात हे अंत्यापासून आरंभापर्यंत अनुक्रमेंकरून एकाहून एक हलके आहेत. त्यांपैकीं पेज वातानुलोमन, पथ्यकारक, तृषा, ग्लानि व वमनादिकांनंतर शेष राहिलेले दोष यांचा नाश करणारी, पाचक, अग्निप्रदीपक, आरोग्यस्थापक, निरनिराळ्या वाहिन्यांना मार्दव आणणारी व स्वेदप्रवर्तक आहे.

क्षुत्तृष्णाग्लानिदौर्बल्यकुक्षिरोगज्वरापहा।
मलानुलोमनी पथ्या पेया दीपनपाचनी॥ २७॥

लापशी किंवा कण्हेरी (पेया) दीपक, पाचक, पथ्यकारक व वातादि दोषांना स्वस्वमार्गांप्रत नेणारी असून क्षुधा, तृषा, ग्लानि, अशक्तता, अतिसार व ज्वर यांचा नाश करिते.

विलेपी ग्राहिणी हृद्या तृष्णाघ्नी दीपनी हिता।
व्रणाक्षिरोगसंशुद्धदुर्बलस्नेहपायिनाम्॥ २८॥

आंटवल (विलेपी) दीपक, स्तंभक, तृष्णाशामक व खाण्याला प्रिय असून व्रण व नेत्ररोग यांना व विरिक्तकोष्ठ, दुर्बल व स्नेहपान करणाऱ्या मनुष्यांना हितावह आहे.

सुधौतः प्रस्रुतः स्विन्नोऽत्यक्तोष्मा चोदनो लघुः।
यश्चाग्नेयौषधक्वाथसाधितो भृष्टतण्डुलः॥ २९॥
विपरीतो गुरुः क्षीरमांसाद्यैर्यश्च साधितः।

धुतलेल्या तांदळांचा, पेज काढलेला व चांगला शिजलेला ऊन

---

* शिंबी=शेंग—मूग वगैरे द्विदल धान्यें शेंगांतच उत्पन्न होतात म्हणून त्यांस संस्कृतांत शिंबीधान्य म्हणतात.

† 'उपसेक' याचा अर्थ अरुणदत्तानें 'परिषेक' असा केला आहे, परंतु आम्हीं हेमाद्रि व चरक यांच्या आधारानें 'वरण' असा केला आहे.

* मंड, पेया व विलेपी यांच्यामध्यें जो भेद आहे तो त्यांतील घन पदार्थाच्या न्यूनाधिक्याप्रमाणें आहे. मंड किंवा पेज ह्यांत शितें मुळींच नसतात. पेया किंवा लापशी ह्यांत थोडींच शितें असतात व विलेपीमध्यें शितांचा भाग पेयेपेक्षां अधिक असतो.

भात हलका असतो. चित्रकादि उष्ण औषधांच्या काढयांत शिजलेला भात व भाजलेल्या तांदळांचा भात (सोजी) हि हलकाच असतो. दूध, मांसरस इत्यादिकांत शिजविलेला भात व वर सांगितल्याप्रमाणें जो केला नाहीं तो भात जड असतो.

इति द्रव्यक्रियायोगमानाद्यैः सर्वमादिशेत् ॥ ३० ॥

याचप्रमाणें कोणत्याहि अन्नाच्या गुणदोषांचा विचार करणें झाल्यास त्यांतील द्रव्य, त्याची क्रिया, त्यांत मिश्र केलेले पदार्थ व त्यांचें प्रमाण इ० गोष्टी लक्षांत आणिल्या पाहिजेत.

बृंहणः प्रीणनो वृष्यश्चक्षुष्यो व्रणहा रसः।

मांसाचें सार (सुर्वा) पौष्टिक, तृप्तिकारक, वृष्य, नेत्राची शक्ति वाढविणारें व व्रणास हितावह आहे.

मौद्गस्तु पथ्यः संशुद्धव्रणकण्ठाक्षिरोगिणाम् ॥ ३१ ॥

मुगाचें सार व्रण, कंठरोग व नेत्ररोग ह्या रोगांना व ज्यानें विरेचन घेतलें आहे त्याला पथ्यकारक आहे.

वातानुलोमी कौलत्थो गुल्मतूनिप्रतूनिजित्।

कुळथांचें सार वायूचें अनुलोमन करितें व गुल्म, *तूणि व प्रतूणि यांचा नाश करितें.

तिलपिण्याकविकृतिः शुष्कशाकं विरूढकम् ॥ ३२ ॥

शाण्डाकीवटकं दृग्घ्नं दोषलं ग्लपनं गुरु।

तिळाचे व पेंडीचे पदार्थ, वाळविलेली भाजी, मोड आलेलें धान्य व शांडाकी नामक आसुत (शिर्का) तयार करण्याकरितां केलेले सांडगे दृष्टिनाशक, त्रिदोषकर, ग्लानिजनक व जड असतात.

रसाला बृंहणी वृष्या स्निग्धा बल्या रुचिप्रदा ॥ ३३ ॥

श्रीखंड पौष्टिक, रुचिकर, स्निग्ध, बल्य व वृष्य आहे.

श्रमक्षुत्तृट्क्लमहरं पानकं प्रीणनं गुरु।

विष्टम्भि मूत्रलं हृद्यं यथाद्रव्यगुणं च तत् ॥ ३४ ॥

पन्ह्याचे गुण ज्या ज्या द्रव्यापासून तें केलें असतें त्याप्रमाणें असतात. सामान्यतः तें श्रम, क्षुधा, तृष व ग्लानि यांचें नाशक, तृप्तिजनक, जड व अवष्टंभक, मूत्रल व मनाला प्रिय आहे.

लाजास्तृट्छर्द्यतीसारमेहमेदःकफच्छिदः।

कासपित्तोपशमना दीपना लघवो हिमाः ॥ ३५ ॥

साळीच्या लाह्या लघु, शीत, दीपक व कफपित्तहारक असून तृषा, अतिसार, मेह, मेद, वांति व खोकला यांचा नाश करितात.

पृथुका गुरवो बल्याः कफविष्टम्भकारिणः।

पोहे जड, बल्य, अवष्टंभक व कफकारक आहेत.

धाना विष्टम्भिनी रूक्षा तर्पणी लेखनी गुरुः ॥ ३६ ॥

भाजलेले धान्य (डाळचुरमुरे इ०) अवष्टंभक, रूक्ष, लेखन, तृप्तिकर व जड असतें.

सक्तवो लघवः क्षुत्तृट्श्रमनेत्रामयव्रणान्।

घ्नन्ति संतर्पणाः पानात् सद्य एव बलप्रदाः ॥ ३७ ॥

नोदकान्तरितान्न द्विर्न निशायां न केवलान्।

न भुक्त्वा न द्विजैश्छित्त्वा सक्तूनद्यान्न वा बहून् ॥ ३८ ॥

भाजलेल्या सातूचें पीठ हलकें असून क्षुधा, तृषा, श्रम, नेत्ररोग व व्रण यांना हितावह आहे. तें किंचित् कोमट पाण्यांत कालवून प्यालें असतां तत्काल तृप्ति व शक्ति देतें. तें खातांना मध्यें पाणी पिऊं नये. तें दिवसांतून दोन वेळां, भोजनोत्तर, रात्रीं, दातांनीं चावून, नुसतेंच किंवा पुष्कळ कधींहि खाऊं नये.

पिण्याको ग्लपनो रूक्षो विष्टम्भी दृष्टिदूषणः।

पेंड रूक्ष, विष्टंभकर, ग्लानिजनक व दृष्टिनाशक आहे.

वेसवारो गुरुः स्निग्धो बलोपचयवर्धनः ॥ ३९ ॥

खेमा (मांसाची उसळ) गुरु, स्निग्ध, बल्य व पौष्टिक असतो.

मुद्गादिजास्तु गुरवो यथाद्रव्यगुणानुगाः।

मूग वगैरे धान्यांची उसळ जड असून तिचे इतर गुण त्या त्या धान्याप्रमाणें असतात.

कुकूलखर्परभ्राष्ट्रकन्द्वङ्गारविपाचितान् ॥ ४० ॥

एकयोनींल्लघून्विद्यादपूपानुत्तरोत्तरम्।

*रानशेणीची थाळ, खापर, डेरा, तवा व निखारे यांजवर केलेल्या रोटया एकाच धान्याच्या असल्यास क्रमेंकरून एकाहून एक हलक्या असतात. (म्ह० निखाऱ्यावर केलेली रोटी सर्वांत हलकी व थाळींत केलेली, ज्यास गाखर असें म्हणतात, सर्वांत जड जाणावी.)

हरिणैणकुरङ्गर्क्षगोकर्णमृगमातृकाः ॥ ४१ ॥

शशशम्बरचारुष्कशरभाद्या मृगाः† स्मृताः।

हरिण, काळविट, कुरंग, ऋक्ष, गोकर्ण, मृगमातृक, ससा, सांबर, चारुष्क, शरभ वगैरे पशूंना मृग अशी संज्ञा आहे.

लाववर्तीकवार्तीररक्तवर्त्मककुक्कुभाः ॥ ४२ ॥

कपिञ्जलोपचक्राख्यचकोरकुरुबाहवः।

वर्तको वर्तिका चैव तित्तिरिः क्रकरः शिखी ॥ ४३ ॥

ताम्रचूडाख्यबकरगोनर्दगिरिवर्तिकाः।

तथा शारपदेन्द्राभवारटाश्चेति विष्किराः ॥ ४४ ॥

लावा, रानचिमणी (वर्तीक), वर्तीरपक्षी (गाजीणपक्षी), रानकोंबडा (रक्तवर्त्मक), पाणकोंबडा (कुक्कुभ), पिंगळा, उपचक्र, चकोर, कुरुबाहु (कुरकुरपक्षी), वर्तक, वर्तिका, तित्तिर, क्रकर

---

* तूणी व प्रतूणी हे दोन वातरोगोक्त शूलविशेष आहेत.

* 'एकाच धान्याच्या (सजातीय) असल्यास' असें लिहिण्याचें कारण असें कीं, ह्या श्लोकांत जी लघुत्वाची परंपरा सांगितली आहे ती द्रव्यभेदाला उद्देशून नव्हे, तर पाकक्रियेच्या साधनाला उद्देशून आहे. येथें एक हा शब्द अभेदवाचक न धरितां संख्यावाचक धरल्यास अर्थाचा घोटाळा होण्याचा संभव दिसल्यामुळें ही टीप दिली आहे.

† ह्या निरनिराळ्या जातींच्या मृगांचें स्वरूप हेमाद्रीनें येणेंप्रमाणें सांगितलें आहे.—हरिण तांबड्या रंगाचा, एण काळ्या रंगाचा, कुरंग चालीनें चपळ व सुंदर, ऋक्ष निळ्या अंगाचा, गोकर्ण गर्दभाकृति व गाईसारख्या कानाचा, मृगमातृका लहान मोठ्या पोटाची व सशासारखी, चारुष्क रूपानें देखणा व शरभ आठ पायांचा.

( करढोंकपक्षी ), मोर, कोंबडा, बकर, गोनरपक्षी, सारपद, इंद्राभ व वरट या पक्ष्यांना विष्किर अशी संज्ञा आहे ( कारण ते जमीन पायानें उकरून धान्यादि भक्षण करितात. )*

**जीवञ्जीवकदात्यूहभृङ्गाह्वशुकसारिकाः ।**
**लट्वाकोकिलहारीतकपोतचटकादयः ॥ ४५ ॥**

**प्रतुदाः**

जीवंजीवक, दात्यूह ( पाणकावळा ), काळवटपक्षी, पोपट, साळुंखी, लट्वा ( कवडा ), कोकिळा, तिलगिरपक्षी, कबुतर, चिमणी वगैरे पक्ष्यांना प्रतुद अशी संज्ञा आहे ( कारण ते चोंचीनें पदार्थ टोंचून भक्षण करितात. )†

**भेकगोधाहिश्वाविदाद्या ‡बिलेशयाः ।**

बेडूक, घोरपड, सर्प, साळई इत्यादिकांना बिलेशय म्हणतात. कारण ते बिळांत राहतात.

**गोखराश्वतरोष्ट्राश्वद्वीपिसिंहर्क्षवानराः ॥ ४६ ॥**
**मार्जारमूषिकव्याघ्रवृकबभ्रुतरक्षवः ।**
**लोपाकजम्बुकश्येनचाषशान्तादवायसाः ॥ ४७ ॥**
**शशघ्नीभासकुररगृध्रोलूककुलिङ्गकाः ।**
**धूमिका मधुहा चेति प्रसहा मृगपक्षिणः ॥ ४८ ॥**

गाय, गाढव, खेचर, उंट, घोडा, चित्ता, सिंह, अस्वल, वानर, मांजर, उंदीर, वाघ, लांडगा, थोर मुंगूस, तरस, खोकड, कोल्हा, ससाणा, चाषपक्षी, कुत्रा, कावळा, बहिरीससाणा, भास, कुररी, गिधाड, घुबड, काळी चिमणी, धूमिका, मधुहा§ इत्यादि मृगपक्ष्यांना प्रसह अशी संज्ञा आहे [ कारण ते पदार्थ बलात्कारानें हरण करून भक्षण करितात. ]

**वराहमहिषन्यङ्कुरुरुरोहितवारणाः ।**
**सृमरश्चमरः खड्गो गवयश्च महामृगाः ॥ ४९ ॥**

रानडुकर, रेडा, नागुण, रोहित मृग, हत्ती, सृमर [ रानचोडे ], रानगाय, गेंडा, गवा इत्यादिकांना महामृग अशी संज्ञा आहे.

**हंससारसकादम्बबककारण्डवप्लवाः ।**
**बलाकोत्क्रोशचक्राह्वमद्गुक्रौञ्चादयोऽप्चराः ॥ ५० ॥**

हंस, सारस, बदक, बगळा, करडुवा, पानकोंबडा [ पुडेरी ], बलाका [ बालढोक ], कुररी, चक्रवाक, मद्गु [ पाणकावळा ], करकुंचा इ० पक्ष्यांना जलचर अशी संज्ञा आहे.

**मत्स्या रोहितपाठीनकूर्मकुम्भीरकर्कटाः ।**
**शुक्तिशङ्खोद्रशम्बूकशफरीवर्मिचन्द्रिकाः ॥ ५१ ॥**
**चुलूकीनक्रमकरशिशुमारतिमिंगिलाः ।**
**राजीचिलिचिमाद्याश्च**

रोही, पाठीन,* कांसव, कुंभीर†, खेकडा, काळव, शंख, उद्र‡, [ हुद ], शंबूक, शफरी§ [ सहरी ], वांब○, चंद्रिका□, चुलुकी, सुसर, मगर, शिसु [ शिशुमार ], तिमिंगिळ, राजी× [ राया ], वेगसा◆ इत्यादिकांना मत्स्य अशी संज्ञा आहे.

**मांसमित्याहुरष्टधा ॥ ५२ ॥**

ह्याप्रमाणें आठ प्रकारचें मांस सांगितलें आहे. [ ह्या अष्टविध प्राण्यांपासून आठ प्रकारचें मांस उत्पन्न होतें. ]

**योनिष्वजावी व्यामिश्रगोचरत्वादनिश्चिते ।**

बकरा व मेंढा यांच्या अंगीं मिश्र लक्षणें असल्यामुळें त्यांचा अंतर्भाव ह्या आठ वर्गांपैकीं कोणत्या वर्गांत होतो याचा निर्णय होत नाहीं.

**आद्यान्त्या जाङ्गलानूपा मध्यौ साधारणौ स्मृतौ ॥ ५३ ॥**

पहिल्या तीन वर्गांतील प्राण्यांना [ मृग, विष्किर व प्रतुद ] जांगल अशी संज्ञा आहे. शेवटल्या तीन वर्गांना [ महामृग, जलचर व मत्स्य ] अनूप अशी संज्ञा आहे व मधील दोन वर्गांतील प्राण्यांना [ बिलेशय व प्रसह ] साधारण अशी संज्ञा आहे.

**तत्र बद्धमलाः शीता लघवो जाङ्गला हिताः ।**
**पित्तोत्तरे वातमध्ये सन्निपाते कफानुगे ॥ ५४ ॥**

जांगल मांस मलावष्टंभक, थंड व लघु असून ज्यामध्यें कफदोष विशेष नाहीं, वातविकार मध्यम व पित्तोद्रेक फार अशा सन्निपातज्वरास हितावह आहे.

---

* या पक्ष्यांचें स्वरूप हेमाद्रीनें असें सांगितलें आहे.—वर्तीक ( रानचिमणी ) यांचे लहान लहान कळप उडतांना दृष्टीस पडतात. वर्तीर लहान पिंगळ्यासारखे; उपचक्र चोंच बारीक असते, कुक्कुभ रंग निळसर, गळा, आकार चिमणीसारखा ( तो दोन प्रकारच्या स्थलज "रक्तवर्त्म" व जलज); कुरुवाहु गळा, नीलवर्ण, पंख पांढरे व तुरा तांबडा; वर्तक वर्तीरापेक्षां लहान व वर्तिकाहि तशीच; तित्तिर पंख चित्रविचित्र; क्रकर शब्द करकर, गळा पिंवळट व काळा, चोंच व पाय काळे, पाठ तांबडी; बकर बकसदृश; गोनर्द गति चमत्कारिक; सारपद कंकपक्ष्यासारखा व गति सुंदर; इंद्राभ कंकसदृश व विविधवर्ण; वरट हंससदृश.

† यांचीं हेमाद्रीनें दिलेलीं लक्षणें—जीवंजीवक याला दोन डोकीं असतात. लट्वा याचे पिसाऱ्याचें खालचें अंग तांबडें असतें. काळवट पक्षी ( भृंगाह्व ) काळ्या रंगाचा व चिमणीसारखा असतो. तिलगिर पक्षी ( हारीत ) हिरवट पिंवळ्या रंगाचा असतो.

‡ साळईला श्वावित् नांव पडण्याचें कारण असें कीं, ती आपल्या पिसाऱ्यांतील कांट्यांनीं शिकारी कुत्र्यांना टोंचून मागें हटविते.

§ मधुहा हा पक्षी मधाच्या पोळ्यांवर हल्ला करितो म्हणून त्यास मधुहा म्हणतात.

* ह्याचें पोट पांढरें, चकाकीत, वर्ण काळा व दांत पुष्कळ असतात.

† हा एक सुसरीसारखा मोठा प्राणी आहे.

‡ पाणमांजर ( उद्र असाहि पाठ आहे. )

§ बारीक मासे.

○ ह्याचा आकार सर्पासारखा असतो.

□ हा वाटोळा असून त्यास कांट्यांचा परिघ असतो.

● ह्याचा आकार हत्तीसारखा असतो.

× हा वज्रासारखा असतो.

◆ ह्याला चिलचीम अशी संज्ञा असून ह्याचे नेत्र तांबडे व अंगावर चोहोंकडे तांबड्या रेषा असतात.

दीपनः कटुकः पाके ग्राही रूक्षो हिमः शशः ।

सशाचें मांस दीपक, अवष्टंभक, रुक्ष, थंड व पाककालीं तिखट आहे.

ईषदुष्णा गुरुस्निग्धा बृंहणा वर्तकादयः ॥ ५५ ॥
तित्तिरिस्तेष्वपि वरो मेधाग्निबलशुक्रकृत् ।
ग्राही वर्ण्योऽनिलोद्रिक्तसंनिपातहरः परम् ॥ ५६ ॥

मागें वर्तकापासून तों चिमणीपर्यंत जे पक्षी सांगितले आहेत, त्यांचें मांस किंचित् उष्ण, स्निग्ध व जड असून पौष्टिक आहे. त्या सर्वांत तित्तिर पक्ष्याचें मांस श्रेष्ठ असून बुद्धि, अग्नि, बल व शुक्र यांचें वर्धक, स्तंभक, कांतिप्रद व वाताधिक सन्निपातावर फारच हितावह आहे.

नातिपथ्यः शिखी पथ्यः श्रोत्रस्वरवयोदृशाम् ।

मोराचें मांस शरीरास जरी फारसें हितावह नाहीं तरी कर्ण, नेत्र, स्वर व आयुष्य यांना हितावह आहे.

तद्वच्च कुक्कुटो वृष्यः

कोंबड्याचे गुण तसेच असून तो कामोद्दीपक आहे.

ग्राम्यस्तु श्लेष्मलो गुरुः ॥ ५७ ॥

गांवांतील कोंबडा कफकारक व जड असतो.

मेधानलकरा हृद्याः क्रकराः सोपचक्रकाः ।

करडोंक पक्षी व उपचक्र पक्षी खावयास चांगले, बुद्धिवर्धक व अग्निवर्धक आहेत.

गुरुः सलवणः काणकपोतः सर्वदोषकृत् ॥ ५८ ॥

*कवडा किंचित् खारट, जड व त्रिदोषकर आहे.

चटकाः श्लेष्मलाः स्निग्धा वातघ्नाः शुक्रलाः परम् ।

चिमण्या कफकारक, स्निग्ध, वातनाशक व फारच शुक्रल आहेत.

गुरूष्णास्निग्धमधुरा वर्गाश्चातो यथोत्तरम् ॥ ५९ ॥
मूत्रशुक्रकृतो बल्या वातघ्नाः कफपित्तलाः ।

जांगलानंतर जे बिलेशयादिक प्राणी येतात ते एकाहून एक जड, उष्ण, स्निग्ध, मधुर, मूत्रल, शुक्रल, बल्य, वातनाशक व कफपित्तकारक आहेत.

शीता महामृगास्तेषु क्रव्यादाः प्रसहाः पुनः ॥ ६० ॥
लवणानुरसाः पाके कटुका मांसवर्धनाः ।
जीर्णार्शोग्रहणीदोषशोषार्तानां परं हिताः ॥ ६१ ॥

त्यांपैकीं वराहादि महामृगांचें मांस थंड असतें, व मांसाहारी जे प्रसह त्यांचें मांस किंचित् खारट, पाकसमयीं तिखट व मांसवर्धक असून फार दिवसांची मूळव्याध, संग्रहणी व राजयक्ष्मा ह्या रोगांना हितकारक आहे.

* वर 'प्रतुद' वर्गांत जो 'लट्वा' म्हणून पक्षी सांगितला आहे तोच 'काणकपोत' (कवडा) असावा असें वाटतें. कारण प्रथम दिलेल्या मुख्य यादींत काणकपोत हें नांव नाहीं.

नातिशीतं गुरु स्निग्धं मांसमाजमदोषलम् ।
शरीरधातुसामान्यादनभिष्यन्दि बृंहणम् ॥ ६२ ॥

बकऱ्याचें मांस किंचित् जड, स्निग्ध व शीत, निर्दोष (किंवा त्रिदोषहर), मनुष्याच्या मांसाशीं समानगुण असल्यामुळें पौष्टिक असून अनभिष्यंदि आहे (म्हणजे नाक, घसा इ० ठिकाणीं कफस्राव उत्पन्न करीत नाहीं.)

विपरीतमतो ज्ञेयमाविकं बृंहणं तु तत् ।

मेंढ्याचें मांस बकऱ्याच्या मांसाच्या विरुद्ध गुणांचें असून पौष्टिक मात्र आहे.

शुष्ककासश्रमात्यग्निविषमज्वरपीनसान् ॥ ६३ ॥
कार्श्यं केवलवातांश्च गोमांसं संनियच्छति ।

गायीचें मांस कोरडा खोकला, श्रम, अतिक्षुधा, विषमज्वर, पीनस, कृशता व केवल वातविकार यांचा नाश करितें.

उष्णो गरीयान्महिषः स्वप्नदार्ढ्यबृहत्वकृत् ॥ ६४ ॥

रेड्याचें मांस गोमांसापेक्षां जड असून उष्ण, निद्राजनक व देह दृढ व स्थूल करणारें आहे.

तद्वद्वराहः श्रमहा रुचिशुक्रबलप्रदः ।

रानडुकराचें मांसहि तसेंच असून श्रमहारक, रुचिकर, शुक्रल व बल्य आहे.

मत्स्याः परं कफकराः

मासे फार कफकारक असतात.

चिलिचीमस्त्रिदोषकृत् ॥ ६५ ॥

वेगसा (चिलिचिममत्स्य) त्रिदोषकरच आहे.

लावरोहितगोधैणाः स्वे स्वे वर्गे वराः परम् ।

लावा पक्षांमध्यें, रोही माशांमध्यें, घोरपड बिलेशयांमध्यें व काळविट मृगांमध्यें अति उत्तम समजावा.

मांसं सद्योहतं शुद्धं वयःस्थं च भजेत्

ताजें, आंतडीं वगैरे काढून टाकलेलें व तरुण प्राण्याचें असें मांस भक्षण करण्यास योग्य जाणावें.

त्यजेत् ॥ ६६ ॥
मृतं कृशं भृशं मेद्यं व्याधिवारिविषैर्हतम् ।

व्याधीनें, विषानें, बुडून किंवा आपोआप मेलेल्या प्राण्यांचें मांस व कृश किंवा फार चरबी असलेलें मांस भक्षण करूं नये.

पुंस्त्रियोः पूर्वपश्चार्धे गुरुणी गर्भिणी गुरुः ॥ ६७ ॥
लघुर्योषिच्चतुष्पात्सु विहङ्गेषु पुनः पुमान् ।
शिरःस्कन्धोरुपृष्ठस्य कट्याः सक्थ्नोश्च गौरवम् ६८
तथामपक्वाशययोर्यथापूर्वं विनिर्दिशेत् ।
शोणितप्रभृतीनां च धातूनामुत्तरोत्तरम् ॥ ६९ ॥
मांसाद्गरीयो वृषणमेढ्रवृक्कयकृद्गुदम् ।

नराच्या पुढच्या भागांतील व मादीच्या मागल्या भागांतील

मांस जड असतें. मादी जर गर्भिणी असेल तर तिचें मांस जड असतें. चतुष्पादांमध्यें मादीचें व पक्ष्यांमध्यें नराचें मांस हलकें असतें. पोटऱ्या, कंबर, पाठ, मांडया, खांदे व मुंडकें यांचें मांस अनुक्रमेंकरून एकाहून एक जड असतें. पक्वाशयापेक्षां आमाशय जड असतो. रक्तादिक धातु (रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र) उत्तरोत्तर जड होत जातात. मांसापेक्षां वृषण, शिश्न, मूत्रपिंड, यकृत् व गुद हीं उत्तरोत्तर जड आहेत.

**शाकं पाठाशठीसूषासुनिषण्णासतीनजम् ॥ ७० ॥**
**त्रिदोषघ्नं लघु ग्राहि सराजक्षववास्तुकम् ।**

वासनवेल, कचोरा (कापुरकाचरी), सूषा (कासविंद्याचा भेद), कुरडू, विष्णुक्रांता, दुधी व चाकवत ह्या भाज्या लघु, स्तंभक व त्रिदोषहारक आहेत.

**सुनिषण्णोऽग्निकृद्वृष्यस्तेषु**

ह्यांपैकीं कुरडूची भाजी अग्निवर्धक व वृष्य आहे.

**राजक्षवः परम् ॥ ७१ ॥**
**ग्रहण्यर्शोविकारघ्नः**

दुधी ग्रहणी व अर्श या विकारांवर फारच प्रशस्त आहे.

**वर्चोभेदि तु वास्तुकम् ।**

चाकवतानें शौचास साफ होतें.

**हन्ति दोषत्रयं कुष्ठं वृष्या सोष्णा रसायनम् ॥ ७२ ॥**
**काकमाची सरा स्वर्या**

काकमाची (कांगोणी) सारक, उष्ण, वृष्य, रसायनी, स्वर चांगला करणारी, कुष्ठनाशक व त्रिदोषहारक आहे.

**चाङ्गेर्यम्लाग्निदीपनी ।**
**ग्रहण्यर्शोऽनिलश्लेष्महितोष्णा ग्राहिणी लघुः ॥ ७३ ॥**

चुका आंबट, अग्निदीपक, उष्ण, लघु व स्तंभक असून ग्रहणी, अर्श, कफविकार व वातविकार यांना हितावह आहे.

**पटोलं सप्तलारिष्टशार्ङ्गेष्टावल्गुजाऽमृता ।**
**वेत्राग्रं बृहती वासा कुन्तली तिलपर्णिका ॥ ७४ ॥**
**मण्डूकपर्णी कर्कोटकारवेल्लकपर्पटाः ।**
**नाडीकलायं गोजिव्हा वार्ताकं वनतिक्तकम् ॥ ७५ ॥**
**करीरं कुलकं नन्दी कुचेला शकुलादनी ।**
**कटिल्लं केम्बुकं शीतं सकोशातककर्कशम् ॥ ७६ ॥**
**तिक्तं पाके कटु ग्राहि वातलं कफपित्तजित् ।**

पडवळ, शिकेकाई, निंब, सागरगोटा, * बावंची, गुळवेल, वेताचे कोंब, रिंगणी, डोरली, अडुळसा, चिरपोटी (रानतीळ), तिळवण, ब्राह्मी, करलोटी, कारलें, पित्तपापडा, बांब, पाथरी, वांगें, चिराईत (* वनतिक्तक), नेपती, काकटेंबुर्णी, मेढशिंगी, काळी वासनवेल, कुटकी, †तांबडी वस्तू, (?) कोधी, (?) दोडका व कपिला ह्या भाज्या, थंड, कडू, पाककाळीं तिखट, स्तंभक, वातूळ व पित्तहारक आहेत.

**हृद्यं पटोलं कृमिनुत्स्वादुपाकं रुचिप्रदम् ॥ ७७ ॥**
**पित्तलं दीपनं भेदि वातघ्नं बृहतीद्वयम् ।**

पडवळ रुचिप्रद, चवदार, पचनकाळीं स्वादु व कृमिघ्न आहे. रिंगणी व डोरली पित्तळ, मलादिकांना पातळ करणाऱ्या (भेदक), दीपन व वातघ्न आहेत.

**वृषं तु वमिकासघ्नं रक्तपित्तहरं परम् ॥ ७८ ॥**

आडुळसा वांति, कास व रक्तपित्त यांचा नाश करितो.

**कारवेल्लं सकटुकं दीपनं कफजित् परम् ।**

कारलें किंचित् तिखट असून, (तें कडू असतें हें तर प्रसिद्धच आहे) अग्निदीपक व कफावर फार प्रशस्त आहे.

**वार्ताकं कटुतिक्तोष्णं मधुरं कफवातजित् ॥ ७९ ॥**
**सक्षारमग्निजननं हृद्यं रुच्यमपित्तलम् ।**

वांगें तिखट, कडू, मधुर, उष्ण, कफवातहारक, क्षारयुक्त, अग्निवर्धक, चवदार, रुचिप्रद व पित्त न करणारें आहे.

**करीरमाध्मानकरं कषायस्वादुतिक्तकम् ॥ ८० ॥**

नेपती तुरट, मधुर व कडू असून पोटांत वायु उत्पन्न करितें.

**कोशातकावल्गुजकौ भेदनावग्निदीपनौ ।**

दोडका व बावंच्या अग्निप्रदीपक असून मलादिकांना पातळ करितात.

**तन्दुलीयो हिमो रूक्षः स्वादुपाकरसो लघुः ॥ ८१ ॥**
**मदपित्तविषास्रघ्नः**

तांदुळजा थंड, रूक्ष, रसकाळीं व पचनकाळीं स्वादु व लघु असून मद, पित्त, रक्तपित्त व विषदोष यांचा नाश करितो.

**मुञ्जातं वातपित्तजित् ।**
**स्निग्धं शीतं गुरु स्वादु बृंहणं शुक्रकृत्परम् ॥ ८२ ॥**

---

* यांतील शार्ङ्गेष्टा शब्दाचा आम्हीं सागरगोटी असा अर्थ केला आहे. यास आधार हा, कीं अरुणदत्तानें तिचा पर्याय अंगारवल्ली असा दिला आहे. व मदनपाल निघंटांत अंगारवल्ली हा एक करंजभेद सांगितला आहे व हा करंजभेद बहुधा सागरगोटी असावी. सागरगोटा हा मराठी शब्द शार्ङ्गेष्टा ह्या संस्कृत शब्दापासूनच अपभ्रंशानें झाला असावा (?) केंबुक शब्दाचा अर्थ

[ पुढील कॉलमवर पहा ]

[ मागील कॉलमवरून चालू ]

कोणी कोबी असा करितात; परंतु युरोपियन लोकांच्या आगमनापूर्वीं आपल्या देशांत कोबी होती किंवा नाहीं याचा संशय आहे. ह्या भाषांतरांत जरी केंबुक शब्दाचा अर्थ पुढें एक दोन स्थळीं कोबी असा केला आहे, तरी तो संशयात्मक समजावा. व्रतराज वगैरे धर्मशास्त्रसंबंधीं ग्रंथांत केंबुक हें एक मूळ किंवा कंद असून पूर्व देशीं त्याला केमुत्रा म्हणतात असें लिहिलें आहे.

* 'वनतिक्तक' ह्याचा अर्थ अरुणदत्तानें कुडा (वत्सक) असा केला आहे. हेमाद्रि व सुश्रुत यांना अनुसरून आम्हीं 'चिराईत' असा अर्थ केला आहे.

† हेमाद्रि व अरुणदत्त हे दोघेहि 'कटिल्लम्' याचा अर्थ तांबडी वस्तू असा करितात. परंतु ज्या अर्थीं दोन्ही वस्तूंचे गुण पुढें एकाच श्लोकांत सांगितले आहेत, त्या अर्थीं याचा तसा अर्थ नसावा असें वाटतें.

कणगर स्वादु, जड, शीत, स्निग्ध, पौष्टिक, वातपित्तनाशक व फारच शुक्रल आहे.

**गर्वी सरा तु पालङ्क्या**

पालख जड व सारक आहे.

**मदघ्नी चाप्युपोदका।**

थोर मयाळ मदनाशक आहे.

**पालङ्क्यावत्स्मृतश्चञ्चुः स तु संग्रहणात्मकः ॥ ८३ ॥**

चंचुनामक भाजीचे गुण पालखाप्रमाणेंच, परंतु ती अवष्टंभक आहे.

**बिदारी वातपित्तघ्नी मूत्रला स्वादुशीतला।**
**जीवनी बृंहणी कण्ठ्या गुर्वी वृष्या रसायनम् ॥ ८४ ॥**

भुईकोहोळा स्वादु, शीतल, जड, वृष्य, पौष्टिक, जीवनीय, रसायन, वातपित्तनाशक, मूत्रल व कंठास हितावह आहे.

**चक्षुष्या सर्वदोषघ्नी जीवन्ती मधुरा हिमा।**

हरिणदोडी (हरणवेली) मधुर, शीत, डोळ्यांना हितावह व त्रिदोषनाशक आहे.

**कूष्माण्डतुम्बकालिङ्गकर्कार्वेर्वारुतिण्डिशम् ॥ ८५ ॥**
**तथा त्रपुसचीनाकाचिर्भटं कफवातकृत्।**
**भेदि विष्टम्भ्यभिष्यन्दि स्वादुपाकरसं गुरु ॥ ८६ ॥**

कोहोळा, दुधभोंपळा, कलिंगड, खरबूज, काकडी, घेंडशी, वाळूक, टरकांकडी व तांबडा भोपळा, ह्या भाज्या रसकालीं व पचनकालीं मधुर, जड, अभिष्यंदि, अवष्टंभक, भेदक व कफवातकारक आहेत.

**वल्लीफलानां प्रवरं कूष्माण्डं वातपित्तजित् ॥**
**बस्तिशुद्धिकरं वृष्यं**

वेलींवर होणाऱ्या फळांमध्यें कोहोळा सर्वांत श्रेष्ठ असून तो वात-पित्तहारक, वृष्य व मूत्रल आहे.

**त्रपुसं त्वतिमूत्रलम् ॥ ८७ ॥**

वाळूक तर फारच मूत्रल आहे.

**तुम्बं रूक्षतरं ग्राहि कालिङ्गैर्वारुचिर्भटम्।**
**बालं पित्तहरं शीतं विद्यात्पक्वमतोऽन्यथा ॥ ८८ ॥**

दुधभोंपळा बाकीच्या वल्लीफलांहून अधिक रूक्ष आहे.

कलिंगड, कांकडी व भोंपळा, हीं अवष्टंभक आहेत. वर सांगितलेलीं कोहळा वगैरे फळें कोंवळीं असतांना पित्तशामक व थंड असतात व तींच जून झालीं म्हणजे उष्ण व पित्तळ होतात.

***शीर्णवृन्तं तु सक्षारं पित्तलं कफवातजित्।**
**रोचनं दीपनं हृद्यमष्ठीलानाहनुल्लघु ॥ ८९ ॥**

चिभूड दीपक, रुचिप्रद, चवदार, लघु, पित्तळ, क्षारयुक्त, कफवातहारक, व अष्ठीलिका व आनाह यांना हितकारक आहे.

* 'शीर्णवृन्त' याचा अर्थ हेमाद्रीनें 'तीच देंठ तुटून पडण्याजोगीं पिकलीं म्हणजे' याप्रमाणें केला आहे. परंतु ती त्याची चूक आहे असें सुश्रुतावरून स्पष्ट दिसतें.

**मृणालबिसशालूककुमुदोत्पलकन्दकम्।**
**नन्दीमाषककेलूटशृङ्गाटककशेरुकम् ॥ ९० ॥**
**क्रौञ्चादनं कलोड्यं च रूक्षं ग्राहि हिमं गुरु।**

लहान व थोर कमळांच्या बिशी [ नाल ], तांबडें, पांढरें व निळें कमल यांचे कंद, जलवेतस, जलोदुंबर, शिंगाडे, कचरा, कमलाक्ष व पद्मबीज हे पदार्थ रूक्ष, स्तंभक, थंड व जड आहेत.

**कलम्बनालिकामार्षकुटिञ्जरकुतुम्बकम् ॥ ९१ ॥**
**चिल्लीलट्वाकलोणीकाकुरूटकगवेधुकाः।**
**जीवन्तझुञ्झ्वेडगजयवशाकसुवर्चलम् ॥ ९२ ॥**
**आलुकानि च सर्वाणि तथा सूप्यानि लक्ष्मणम्।**
**स्वादु रूक्षं सलवणं वातश्लेष्मकरं गुरु ॥ ९३ ॥**
**शीतलं सृष्टविण्मूत्रं प्रायो विष्टभ्य जीर्यति।**
**स्विन्नं निष्पीडितरसं स्नेहाढ्यं नातिदोषलम् ॥ ९४ ॥**

कलंबु ( जलशाक ), नाळ, माठ, पोकळा, शेतवड, चील, लहान कर्डई (?), घोळ, कर्डई (?), कसई, जीवशाक (तांबड्या देंठाचा माठ), झुंझुरकी, टाकळा, यवशाक ( चिलाचा भेद ), सूर्यफूलवल्ली, अळू व त्याचे निरनिराळे भेद व मूग, चवळी इ० द्विदल धान्यांच्या शेंगा व पाला व ज्येष्ठीमध ह्या भाज्या गोड, किंचित् खारट, रूक्ष, जड, शीत, वातुळ, कफकर, सारक व मूत्रल असून बहुधा फार वेळानें पचन होणाऱ्या आहेत. त्या चांगल्या शिजवून, रस पिळून टाकून, चांगली फोडणी देऊन तयार केल्या म्हणजे फारशा विकारकारक होत नाहींत.

**लघुपत्रा तु या चिल्ली सा वास्तुकसमा मता।**

लहान पानाच्या चिलीचे गुण चुक्याप्रमाणेंच आहेत.

**तर्कारीवरुणं स्वादु सतिक्तं कफवातजित् ॥ ९५ ॥**

ऐरण व वायवर्णा ह्या भाजा कडवट, व गोड व कफवातहारक आहेत.

**वर्षाभ्वौ कालशाकं च सक्षारं कटुतिक्तकम्।**
**दीपनं भेदनं हन्ति गरशोफकफानिलान् ॥ ९६ ॥**

तांबडी व पांढरी वसू व उन्हाळी ( शरपुंखा ) ह्या भाज्या क्षारयुक्त, तिखट व कडू असून दीपक, सारक, विषघ्न, शोफघ्न ( सूज नाहींशी करणाऱ्या ) व कफवातहारक आहेत.

**दीपनाः कफवातघ्नाश्चिरबिल्वाङ्कुराः सराः।**

करंजाचे अंकुर दीपक, सारक व वातनाशक आहेत.

**शतवर्यङ्कुरास्तिक्ता वृष्या दोषत्रयापहाः ॥ ९७ ॥**

शतावरीचे अंकुर कडू, वृष्य व त्रिदोषहारक आहेत.

**रूक्षो वंशकरीरस्तु विदाही वातपित्तलः।**

वेळूचे कोंब रूक्ष, विदाही व वातपित्तकारक आहेत.

**पत्तूरो दीपनस्तिक्तः प्लीहार्शः कफवातजित् ॥ ९८ ॥**

मत्स्याक्षी* कडू, दीपक व कफवातहारक असून पांथरी व मूळव्याध यांचा नाश करिते.

* हिला कानडींत 'हुनगुंदा' म्हणतात.

**क्रमिकासकफोत्क्लेदान् कासमर्दो जयेत्सरः।**

कासविंदा सारक असून कृमि, खोकला व कफाचा चिकटा यांचा नाश करितो.

**रूक्षोष्णमम्लं कौसुम्भं गुरु पित्तकरं सरम् ॥ ९९ ॥**

करडईची भाजी आंबट, रूक्ष, उष्ण, जड, पित्तल व सारक आहे.

**गुरूष्णं सार्षपं बद्धविण्मूत्रं सर्वदोषकृत्।**

शिरसाच्या पाल्याची भाजी जड, उष्ण, मलमूत्रावष्टंभक व त्रिदोषकारक आहे.

**यद्बालमव्यक्तरसं किंचित्क्षारं सतिक्तकम् ॥ १०० ॥**
**तन्मूलकं दोषहरं लघु सोष्णं नियच्छति।**
**गुल्मकासक्षयश्वासव्रणनेत्रगलामयान् ॥ १०१ ॥**
**स्वराग्निसादोदावर्तपीनसांश्च**

किंचित् खारट, कडवट किंवा अव्यक्तरस असा जो कोंवळा मुळा तो त्रिदोषहारक, लघु व उष्ण असून गुल्म, कास, श्वास, क्षय, व्रण, नेत्ररोग, कंठरोग, स्वरभेद, अग्निमांद्य, उदावर्त व पीनस ह्या रोगांचा नाश करितो.

**महत्पुनः।**
**रसे पाके च कटुकमुष्णवीर्यं त्रिदोषकृत् ॥ १०२ ॥**
**गुर्वभिष्यन्दि च**

जून मुळा रसानें व पाकानें तिखट, उष्ण, जड, अभिष्यंदि व त्रिदोषकारक आहे.

**स्निग्धस्विन्नं तदपि वातजित्।**

तरी फोडणी देऊन शिजविला म्हणजे तोहि वातनाशक आहे.

**वातश्लेष्महरं शुष्कं सर्वम्**

वाळविलेला मुळा, मग तो कोंवळा असो किंवा जून असो, वातकफहारक आहे.

**आमं तु दोषलम् ॥ १०३ ॥**

हिरवा मुळा (कोंवळा किंवा जून, ओला किंवा वाळलेला) त्रिदोषकारक आहे.

**कटूष्णो वातकफहा पिण्डालुः पित्तवर्धनः।**

डुकरकंद तिखट, उष्ण, वातकफनाशक व पित्तल आहे.

**कुठेरशिग्रुसुरससुमुखाऽऽसुरिभूस्तृणम् ॥ १०४ ॥**
**फणिज्जार्जकजम्बीरप्रभृति ग्राहि शालनम्।**
**विदाहि कटु रूक्षोष्णं हृद्यं दीपनरोचनम् ॥ १०५ ॥**
**दृक्शुक्रकृमिहृत्तीक्ष्णं दोषोत्क्लेशकरं लघु।**

काळा आजवला, तुळस, श्वेत आजवला, मोहरी, भूतृण (रोहिस गवत), मरवा, सब्जा, गवती चहा इ० मसाल्यासारखे पदार्थ तिखट, रूक्ष, उष्ण, तीक्ष्ण, लघु, हृद्य (खाण्याला प्रिय), रुचिकर, दीपक, विदाही, स्तंभक व वातादि दोषांचा प्रकोप करणारे आहेत. (ओले असतांना मात्र दोषल आहेत असें हेमाद्रि म्हणतो.)

**हिध्माकासश्रमश्वासपार्श्वरुक्पूतिगन्धहा ॥ १०६ ॥**
**सुरसः**

तुळस उचकी, कास, श्वास, श्रम, पार्श्वपीडा (उसण) व दौर्गंध्य यांचा नाश करिते.

**सुमुखो नातिविदाही गरशोफहा।**

पांढरा आजवला फारसा विदाही नसून विषघ्न व शोफघ्न (सूज नाहींशी करणारा) आहे.

**आर्द्रिका तिक्तमधुरा मूत्रला न च पित्तकृत् ॥ १०७ ॥**

कोथिंबीर कडवट, गोड व मूत्रल असून पित्तल नाहीं.

**लशुनो भृशतीक्ष्णोष्णः कटुपाकरसः सरः।**
**हृद्यः केश्यो गुरुर्वृष्यः स्निग्धो रोचनदीपनः ॥ १०८ ॥**
**किलासकुष्ठगुल्मार्शोमेहकृमिकफानिलान्।**
**सहिध्मपीनसश्वासकासान् हन्त्यस्रपित्तकृत् ॥१०९॥**

लसूण फारच तीक्ष्ण व उष्ण, पाकानें व रसानें तिखट, सारक, जड, स्निग्ध, रोचक, दीपक, हृद्य, वृष्य, केशांना हितावह व रक्तपित्तकारक असून पांढरें कोड, कुष्ठ, गुल्म, अर्श, मेह, कृमि, वात, कफ, उचकी, कास, श्वास व पीनस यांचा नाश करितें.

**पलाण्डुस्तद्गुणन्यूनः श्लेष्मलो नातिपित्तलः।**
**कफवातार्शसां पथ्यः स्वेदेऽभ्यवहृतौ तथा ॥ ११० ॥**

कांद्याचे गुण लसणीहून किंचित् कमी असून तो कफकर व किंचितच पित्तल आहे व कफवातात्मक मूळव्याधीवर खावयास व "पोटीस" बांधण्याचे कामीं फार हितावह आहे.

**तीक्ष्णो गृञ्जनको ग्राही पित्तिनां हितकृन्न सः।**

*गृंजन कंद तीक्ष्ण व स्तंभक असून पित्तप्रकृतीच्या लोकांना तो वाईट आहे.

**दीपनः सूरणो रुच्यः कफघ्नो विशदो† लघुः ॥१११॥**
**विशेषादर्शसां पथ्यः**

सुरण दीपक, रोचक, लघु, कफघ्न व त्वरा व कफादिकांचे मार्ग स्वच्छ करणारा असून मूळव्याधीवर फारच पथ्यकारक आहे.

**भूकन्दस्त्वतिदोषलः।**

भुईफोड (कळंबी) फारच दोषल असतात.

**पत्रे पुष्पे फले नाले कन्दे च गुरुता क्रमात् ॥ ११२ ॥**

पाला, फुलें, फळें व कंद हे एकाहून एक जड आहेत. (मुळा मात्र कंदांमध्यें इतर भागांहून लघु आहे).

---

* गृंजनक म्हणजे गाजर असें प्रथमदर्शनीं कित्येकांस दिसेल, परंतु तो पलांडुभेद आहे, असें त्याच्या गुणपाठावरून व चिकित्सास्थानांतील उपयोगावरून सिद्ध होतें व हेमाद्रीनेंहि 'गृञ्जनकः पलाण्डुभेदः। उक्तं च बाष्पचन्द्रेण गन्धाकाररसैस्तुल्यो गृञ्जनस्तु पलाण्डुना। सूक्ष्मनालाग्रपत्रत्वाद्भिद्यतेसौ पलाण्डुतः।' असें लिहिलें आहे. निर्णयसिंधूंतहि एके ठिकाणीं हा संशय घालविण्याकरितां "गृञ्जनं न तु गाजरं" असें म्हटलें आहे. ह्याला इंग्रजींत लीक (leek) म्हणतात.

† 'विशद' म्हणजे कफादिकांनीं चोपडलेल्या मार्गांचें क्षालन करणारा.

**वरा शाकेषु जीवंती सर्षपास्त्ववराः परम् ।**

भाज्यांमध्यें जीवंती ( हरणवेल ) श्रेष्ठ व शिरस अतिदुष्ट जाणावा.

**द्राक्षा फलोत्तमा वृष्या चक्षुष्या सृष्टमूत्रविद् ॥ ११३ ॥**
**स्वादुपाकरसा स्निग्धा सकषाया हिमा गुरुः ।**
**निहन्त्यनिलपित्तास्रतिक्तास्यत्वमदात्ययान् ॥ ११४ ॥**
**तृष्णाकासश्रमश्वासस्वरभेदक्षतक्षयान् ।**

द्राक्षें सर्व फळांमध्यें श्रेष्ठ, रसानें व पाकानें मधुर, किंचित् तुरट, थंड, स्निग्ध, वृष्य, जड, सारक, मूत्रल व नेत्रांना हितावह असून वातपित्त, रक्तपित्त, तोंडाचा कडवटपणा, मदात्यय, तृषा, कास, श्वास, उरःक्षत, क्षय, स्वरभेद व श्रम यांचा उपशम करितात.

**उद्रिक्तपित्ताञ्जयति त्रीन् दोषान् स्वादु दाडि-**
**मम् ॥ ११५ ॥**
**पित्ताविरोधि नात्युष्णमम्लं वातकफापहम् ।**
**सर्वं हृद्यं लघु स्निग्धं ग्राहि रोचनदीपनम् ॥ ११६ ॥**

गोड डाळिंब पित्ताधिक दोषत्रयाचा नाश करितें. तेंच आंबट असल्यास कफवातहारक व किंचित् उष्ण असून पित्तास विरुद्ध नसतें. सर्व प्रकारचीं डाळिंबें हृद्य, लघु, स्तंभक, रुचिप्रद व दीपक असतात.

**मोचखर्जूरपनसनालिकेरपरूषकम् ।**
**आम्राततालकाश्मर्यराजादनमधूकजम् ॥ ११७ ॥**
***सौवीरबदराङ्कोल्लफल्गुश्लेष्मातकोद्भवम् ।**
**वातामाभिषुकाक्षोडमुकूलकनिकोचकम् ॥ ११८ ॥**
**उरुमाणं प्रियालं च बृंहणं गुरु शीतलम् ॥**
**दाहक्षतक्षयहरं रक्तपित्तप्रसादनम् ॥ ११९ ॥**
**स्वादुपाकरसं स्निग्धं विष्टम्भि कफशुक्रकृत् ॥**

केळें, खारीक, फणस, नारळ, फालसा, अंबाडा, ताड, शिवण, खिरणी व मोहा यांचीं फळें, रानबोर, बोर, अंकोलीचें फळ, अंजीर, बदाम, जर्दाळू, अक्रोड, पिस्ते, *जलगोजा, अलुबुखार† व चारोळी हीं फळें पौष्टिक, जड, थंड, पाकानें व रसानें मधुर, स्निग्ध, शुक्रल, कफकारक व अवष्टंभक असून दाह, क्षत व क्षय यांचा नाश करितात. पित्त व रक्त यांची शुद्धि करितात.

**फलं तु पित्तलं तालं सरं काश्मर्यजं हिमम् ॥ १२० ॥**
**शकृन्मूत्रविबन्धघ्नं केश्यं मेध्यं रसायनम् ।**
**वातामाद्युष्णवीर्यं तु कफपित्तकरं सरम् ॥ १२१ ॥**
**परं वातहरं स्निग्धमनुष्णं तु प्रियालजम् ।**
**प्रियालमज्जा मधुरो वृष्यः पित्तानिलापहः ॥ १२२ ॥**
**कोलमज्जा गुणैस्तद्वत्तृट्छर्दिःकासजिच्च सः ।**

ताडाचें फळ पित्तल आहे. शिवणीचें फळ थंड, सारक, मल-मूत्रांचा अवरोध मोडणारें, केंस व बुद्धि यांना वाढविणारें व रसायन आहे. बदाम वगैरे फळें उष्णवीर्य, कफपित्तकारक, सारक, स्निग्ध व वातावर फारच प्रशस्त आहेत. चारोळ्या मात्र उष्ण नाहींत. चारोळ्यांच्या बियांतील मगज मधुर, वृष्य व वातपित्तकारक आहे. बोरांच्या बियांतील मगजहि तद्वतच असून तृषा, वांति व खोकला यांचा नाश करितो.

**पक्वं सुदुर्जरं बिल्वं दोषलं पूतिमारुतम् ॥ १२३ ॥**
**दीपनं कफवातघ्नं बालं ग्राह्युभयं हि तत् ।**

पिकलेलें बेलफळ पचन होण्यास कठिण, दोषल व अपान वायूला दुर्गंधी आणणारें आहे. बाळबेल दीपक व कफवातहारक आहे व दोन्ही ग्राहक ( मलमूत्रावष्टंभक ) आहेत.

---

* या श्लोकांत फल्गु या नांवाचें जें फळ सांगितलें आहे, त्याचा अर्थ काळें उंबर असा हल्लीं उपलब्ध असलेल्या निघंटांत व कोशांत आढळतो. यालाच बोखाडा किंवा खर्वत म्हणतात, असें अमरकोशाच्या मराठी टीकेंत म्हटलें आहे. या शब्दासंबंधानें आमची अशी कल्पना आहे कीं, प्राचीनकाळीं हें नांव अंजिराचें होतें. ज्या देशांत प्राचीन आर्य लोक राहात असत तेथें किंवा तेथून थोडक्याच अंतरावर अंजीर उत्पन्न होत असत, असें असून त्याचें नांव संस्कृतांत कां सांपडत नाहीं याचें अंमळ आश्चर्य वाटण्याजोगें आहे. फल्गु शब्दाचा, तो फलवाचक असल्यास, अंजीर असा अर्थ केल्यास ही भानगड नाहींशी होते. या ग्रंथांत ज्या फळांमध्यें त्याची गणना केली आहे व सुश्रुतामध्यें जे त्याचे गुण सांगितले आहेत त्यावरून विचार करतां तोच अर्थ सयुक्तिक दिसतो. केळें, खारीक, फालसा, बदाम, पिस्ते वगैरे फळांबरोबर अंजीर न सांगतां काळ्या उंबराचीं फळें शास्त्रकार सांगतील हें संभवत नाहीं. कदाचित् त्या वेळीं अंजीर माहीत नव्हता अशी कल्पना केली तरी उंबर तर कोठें गेला नव्हता? तर मग उंबराचीं फळें सोडून देऊन त्याहून कमी महत्त्वाचीं काळ्या ( रान ) उंबराचीं फळें कशाकरितां सांगितलीं ? ही असंबद्धता टाळण्याकरितां फल्गु शब्दाचा अंजीर असाच अर्थ करणें बरें. उ. अ. ४० श्लो. १७ यांत एका पौष्टिक घृतांत मनुका, खारीक, वगैरे फळांबरोबर फल्गु ह्या फळाची योजना केली आहे. तेथें तर अंजीर हाच अर्थ सयुक्तिक दिसतो. वास्तविक प्रकार हा दिसतो कीं, उंबर, काळा उंबर, अंजीर हीं तिन्हीं झाडें एकाच वर्गांतील असल्यामुळें उदुंबर किंवा फल्गु हें नांव एका कालीं तिहींसहि लावीत असतील; ऐतरेय ब्राह्मणाच्या ७ व्या पंचिकेंत उद्योग करणारास फायदा होतो हें दाख-विण्याच्या संबंधानें "चरन्वै मधु विन्दति चरन्स्वादुमुदुम्बरम्" असें एक

[ पुढील कॉलमवर पहा ]

[ मागील कॉलमवरून चालू ]

वाक्य आढळतें. त्यांत स्वादुमुदुम्बर हा शब्द अंजीरवाचकच दिसतो. परंतु हा अर्थ पुढें प्रचारांत राहिला नाहीं व फल्गु शब्दानें त्याची जागा घेतली. लॅटीन वगैरे प्राचीन व फ्रेंच वगैरे सर्व अर्वाचीन युरोपियन भाषांत जीं अंजिराचीं नांवें ( Ficus, Figue ,Fig इ० ) आहेत, तीं फल्गु शब्दाला अगदीं जवळ आहेत. इतकेंच नव्हे तर इंग्रजींतील फिग् या शब्दाचा व संस्कृतांतील फल्गु ह्याचा जो तुच्छवाचक अवांतर अर्थ तोहि या दोन्ही शब्दांचें एकमूलत्व सुचवितो, हीहि एक गोष्ट आमच्या अनुमानास प्रत्यंतरादाखल समजली पाहिजे. मदनपाल निघंटांत तर अंजीर हा शब्द काकोदुंबरी व फल्गु यांच्या पर्यायांतच दिलेला आहे.

* हीं लसणीच्या पाकळ्यांच्या आकाराचीं स्निग्ध व मधुर फळें हिमालयांत होतात. ह्याचीं झाडें देवदारूच्या वर्गांतील आहेत.

† अलुबुखाराला संस्कृतांत जें उरुमाण असें नांव आहे तें आर्मिनिया ( आरबीमध्यें उर्मिणीया ) देशावरून पडलें आहे. कारण हीं फळें त्या देशांतच विशेषेंकरून उत्पन्न होतात.

कपित्थमामं कण्ठघ्नं दोषलं दोषघाति तु ॥ १२४ ॥
पक्कं हिध्मावमथुजित्सर्वं ग्राहि विषापहम् ।

हिरवें कवठ घसा बसविणारें व त्रिदोषकारक आहे. पिकलेलें कवठ त्रिदोषहारक असून उचकी व ओकारी यांचा नाश करितें व दोन्ही अवष्टंभक व विषघ्न आहे.

जाम्बवं गुरु विष्टम्भि शीतलं भृशवातलम् ॥ १२५ ॥
संग्राहि मूत्रशकृतोरकण्ठ्यं कफपित्तनुत् ।

जांभळें जड, थंड, फार वातुळ, मल, मूत्र व वात यांचा अवष्टंभ करणारीं, घशाला वाईट व कफपित्तहारक आहेत.

वातपित्तास्रकृद्बालं बद्धास्थि कफपित्तकृत् ॥ १२६ ॥
गुर्वाम्रं वातजित्पक्कं स्वाद्वम्लं कफशुक्रकृत् ।

कोंवळा आंबा वातुळ, पित्तल व रक्तपित्त उत्पन्न करणारा आहे. बाठलेला आंबा कफपित्तकारक आहे व पिकलेला आंबा किंचित् आंबट, मधुर, जड, कफकर, शुक्रल व वातघ्न आहे.

वृक्षाम्लं ग्राहि रूक्षोष्णं वातश्लेष्महरं लघु ॥ १२७ ॥

आमसोल स्तंभक, उष्ण रूक्ष, लघु व कफवातहारक आहे.

शम्या गुरूष्णं केशघ्नं रूक्षं पीलु तु पित्तलम् ॥
कफवातहरं भेदि प्लीहार्शःक्रिमिगुल्मनुत् ॥ १२८ ॥
सतिक्तं स्वादु यत्पीलु नात्युष्णं तत्त्रिदोषजित् ।

शमीचें फळ जड, उष्ण, रूक्ष व केंसांचा नाश करणारें आहे. पीलुवृक्षाचें फळ तिखट असल्यास पित्तकारक, कफवातहारक, सारक व प्लीहा, मूळव्याध, गुल्म व कृमि यांचा नाश करणारें आहे, व तेंच किंचित् कडवट गोड असल्यास किंचित् उष्ण व त्रिदोषघ्न असतें.

त्वक्तिक्तकटुका स्निग्धा मातुलुङ्गस्य वातजित् ॥ १२९ ॥
बृंहणं मधुरं मांसं वातपित्तहरं गुरु ।
लघु तत्केसरं कासश्वासहिध्मामदात्ययान् ॥ १३० ॥
आस्यशोषानिलश्लेष्मविबन्धच्छर्द्यरोचकान् ।
गुल्मोदरार्शःशूलानि मन्दाग्नित्वं च नाशयेत् ॥ १३१ ॥

महाळुंगाची साल कडवट, तिखट, स्निग्ध व वातघ्न आहे. सालीच्या खालचा गीर मधुर, जड, पौष्टिक व वातपित्तहारक आहे. त्याचें केशर लघु असून कास, श्वास, उचकी, मदात्यय, मुखशोष, वात, कफ, अवष्टंभ, वांति, अरोचक, गुल्म, उदर, मूळव्याध, शूल व अग्निमांद्य यांचा नाश करितें.

भल्लातकस्य त्वङ्मांसं बृंहणं स्वादु शीतलम् ।
तदस्थ्यग्निसमं मेध्यं कफवातहरं परम् ॥ १३२ ॥

बिबव्याचीं बोंडें ( बिबटें ) पौष्टिक, थंड व मधुर असतात. बिबवे अग्नीसारखे तीक्ष्ण, कफवातावर फार प्रशस्त व बुद्धिवर्धक आहेत.

स्वाद्वम्लं शीतमुष्णं च द्विधा पालेवतं गुरु ।
रुच्यमत्यग्निशमनं रुच्यं मधुरमारुकम् ॥ १३३ ॥

सफरचंद ( पालेवत ) दोन प्रकारचें, आंबट ( शेंव ) व गोड. पहिलें उष्ण व दुसरें थंड असून दोन्ही जड, रुचिप्रद व अतिक्षुधेचें शमन करणारीं आहेत.

पक्कमाशु जरां याति नात्युष्णं गुरु दोषलम् ।

पिकलेलें सप्ताळु मधुर, रुचिप्रद, किंचित् उष्ण, गुरु व दोषल असून लवकर पचन होतें.

द्राक्षापरूपकं चार्द्रमम्लं पित्तकफप्रदम् ॥ १३४ ॥
गुरूष्णवीर्यं वातघ्नं सरं च करमर्दकम् ।

द्राक्षें व फालसा हीं फळें ओलीं व आंबट असलीं म्हणजे कफपितांना वाढवितात व करवंदें ( ओलीं व आंबट ) कफपित्तकारक असून जड, उष्ण, सारक व वातघ्न आहेत.

तथाम्लं कोलकर्कन्धूलकुचाम्रातमारुकम् ॥ १३५ ॥
ऐरावतं दन्तशठं सतूदं मृगलिण्डिकम् ।
नातिपित्तकरं पक्कं शुष्कं च करमर्दकम् ॥ १३६ ॥

आंबट ( हिरवीं किंवा कोंवळीं ) बोरें, रानबोरें, ओंटीचें फळ, अंबाडा, सप्ताळू, नारिंगें, निंबू, तुतें व कांकडें यांचे गुणहि ओल्या हिरव्या करवंदाप्रमाणेंच आहेत. तींच पक्व असून आंबट असल्यास फारशीं पित्तकारक नसतात. तसेंच वाळलेलें करवंदहि फारसें पित्तल नसतें.

दीपनं भेदनं शुष्कमम्लीकाकोलयोः फलम् ।
तृष्णाश्रमक्लमच्छेदि लघ्विष्टं कफवातयोः ॥ १३७ ॥

शुष्क चिंच व बोरें दीपक, सारक व लघु असून तृष्णा, श्रम, ग्लानि, कफ व वात ह्यांचा नाश करितात.

फलानामवरं तत्र लकुचं सर्वदोषकृत् ।

सर्व फळांमध्यें ओंटीचें फळ अगदीं वाईट असून तिन्ही दोष वाढवितें.

हिमानलोष्णदुर्वातव्याललालादिदूषितम् ॥ १३८ ॥
जन्तुजुष्टं जले मग्नमभूमिजमनार्तवम् ।
अन्यधान्ययुतं हीनवीर्यं जीर्णतयापि च ॥ १३९ ॥
धान्यं त्यजेत्तथा शाकं रूक्षसिद्धमकोमलम् ।
असंजातरसं तद्वच्छुष्कं चान्यत्र मूलकात् ॥ १४० ॥
प्रायेण फलमप्येवं तथामं बिल्ववर्जितम् ।

दंव, अग्नि, ऊन, दुष्ट वारा, सापाचें गरल, इ० कारणांनीं दूषित झालेलें, कीड लांगलेलें, पाण्यांत बुडालेलें, अयोग्य ठिकाणीं व भलत्याच काळीं झालेलें, त्याच शेतांत दुसरें धान्य पेरल्यामुळें किंवा फार दिवस ठेवल्यामुळें, हीनवीर्य झालेलें—असें जें धान्य त्याचा उपयोग करूं नये. वरील दोषांनीं युक्त, फोडणीवांचून तयार केलेल्या, जून, रसांचा परिपाक न झालेल्या व वाळलेल्या अशा ज्या भाज्या त्यांचाहि उपयोग करूं नये. मुळा मात्र वाळलेला

चालतो. फळांना देखील प्रायः ह्याच गोष्टी लागू आहेत. विशेष इतकेंच कीं, बेलावांचून कोणत्याहि कोंवळ्या फळांचा उपयोग करूं नये.

**विष्यन्दि लवणं सर्वं सूक्ष्मं सृष्टमलं विदुः ॥ १४१ ॥**
**वातघ्नं पाकि तीक्ष्णोष्णं रोचनं कफपित्तकृत् ।**

सर्व प्रकारचीं लवणें कफादिकांना पातळ करणारीं, सूक्ष्म, सारक, वातघ्न, पाचक, तीक्ष्ण, उष्ण, रुचिप्रद व कफपित्तकारक आहेत.

**सैन्धवं तत्र सस्वादु वृष्यं हृद्यं त्रिदोषनुत् ॥ १४१ ॥**
**लघ्वनुष्णं दृशः पथ्यमविदाह्यग्निदीपनम् ।**

त्यांपैकीं सैंधव किंचित् माधुर्ययुक्त, वृष्य, हृद्य,* त्रिदोषहारक, लघु व किंचित् उष्ण, दृष्टीला हितावह व किंचित् विदाही व अग्निप्रदीपक आहे.

**लघु सौवर्चलं हृद्यं सुगन्ध्युद्गारशोधनम् ॥ १४३ ॥**
**कटुपाकं विबन्धघ्नं दीपनीयं रुचिप्रदम् ।**

पादेलोण ( संचल ), लघु, हृद्य, सुगंधी, दुष्ट ढेंकराचें शोधक, पाककालीं तिखट, अवष्टंभनाशक, दीपक व रुचिप्रद आहे.

**ऊर्ध्वाधः कफवातानुलोमनं दीपनं बिडम् ॥ १४४ ॥**
**विबन्धानाहविष्टम्भशूलगौरवनाशनम् ।**

बिडलोण खालच्या व वरच्या दोहों मार्गांनीं कफवातांची प्रवृत्ति करितें, व दीपक असून मलावष्टंभ, वातावरोध, पोटफुगी, शूल व जाड्य यांचा नाश करितें.

**विपाके स्वादु सामुद्रं गुरु श्लेष्मविवर्धनम् ॥ १४५ ॥**

समुद्राचें मीठ पाककालीं स्वादु, जड व कफवर्धक आहे.

**सतिक्तकटुकक्षारं तीक्ष्णमुत्क्लेदि चौद्भिदम् ।**

औद्भिद लवण किंचित् कडवट, तिखट, खारट व तीक्ष्ण असून त्याला पाणी फार सुटतें ( उत्क्लेदि ).

**कृष्णे सौवर्चलगुणा लवणे गन्धवर्जिताः ॥ १४६ ॥**

कृष्णलवण [ काळें मीठ ] वासाखेरीज इतर गुणांमध्यें संचलाप्रमाणेंच असतें.

**रोमकं लघु पांसूत्थं सक्षारं श्लेष्मलं गुरु ।**

संभारमीठ लघु व मृत्तिकालवण [ खारीमीठ ] क्षारयुक्त, जड व कफकारक आहे.

**लवणानां प्रयोगे तु सैन्धवादीन्प्रयोजयेत् ॥ १४७ ॥**

जेथें लवणांचा प्रयोग सांगितला असेल, त्या ठिकाणीं तीं सैंधवापासून अनुक्रमानें घ्यावीं. ( उ० जेथें नुसतेंच लवण म्हटलें असेल, त्या ठिकाणीं सैंधवच घ्यावें. जेथें लवणद्वय किंवा त्रय इत्यादि म्हटलें असेल, त्या ठिकाणीं सैंधवापासून वरील क्रमानें मोजून घ्यावीं. )

---

* संस्कृतांत औषधांचे गुण वर्णन करतांना 'हृद्य' शब्द वारंवार येतो. त्याचे दोन अर्थ आहेत. पहिला अर्थ 'मनाला प्रिय' व दुसरा अर्थ "हृद्रोगाला हितावह." आमच्या भाषांतरांत आम्हीं 'हृद्य' हाच शब्द जेथें कायम ठेवला असेल तेथें प्रायः दुसरा अर्थ घ्यावा.

---

**गुल्महृद्ग्रहणीपाण्डुप्लीहानाहगलामयान् ।**
**श्वासार्शःकफकासांश्च शमयेद्यवशूकजः ॥ १४८ ॥**

जवखार गुल्म, हृद्रोग, ग्रहणी, पांडु, पांथरी, पोटफुगी, गलरोग, श्वास, कास, कफ व अर्श ह्या रोगांचा नाश करितो.

**क्षारः सर्वश्च परमं तीक्ष्णोष्णः कृमिजिल्लघुः ।**
**पित्तासृग्दूषणः पाकी छेद्यहृद्यो विदारणः ॥ १४९ ॥**
**अपथ्यः कटुलावण्याच्छुक्रौजःकेशचक्षुषाम् ।**

सर्व प्रकारचे क्षार फार तीक्ष्ण, उष्ण, लघु, कृमिघ्न, रक्तपित्तदूषक, पाचक, ग्रंथिच्छेदक, *मळमळीत ( बेचव ) व व्रणविदारक असून तिखट व खारट असल्यामुळें शुक्र, ओज, केंस व नेत्र यांना अहितकारक आहेत.

**हिङ्गु वातकफानाहशूलघ्नं पित्तकोपनम् ॥ १५० ॥**
**कटुपाकरसं रुच्यं दीपनं पाचनं लघु ।**

हिंग रसानें व पाकानें तिखट, लघु, दीपक, पाचक, रुचिप्रद व पित्तकर असून वात, कफ, पोट फुगणें व शूल यांचा नाश करितो.

**कषाया मधुरा पाके रूक्षा विलवणा लघुः ॥ १५१ ॥**
**दीपनी पाचनी मेध्या वयसः स्थापनी परा ।**
**उष्णवीर्या सरायुष्या बुद्धीन्द्रियबलप्रदा ॥ १५२ ॥**
**कुष्ठवैवर्ण्यवैस्वर्यपुराणविषमज्वरान् ।**
**शिरोऽक्षिपाण्डुहृद्रोगकामलाग्रहणीगदान् ॥ १५३ ॥**
**सशोषशोफातीसारमेदमोहवमिकृमीन् ।**
**श्वासकासप्रसेकार्शःप्लीहानाहगरोदरम् ॥ १५४ ॥**
**विबन्धं स्रोतसां गुल्ममूरुस्तम्भमरोचकम् ।**
**हरीतकी जयेद्व्याधींस्तांस्तांश्च कफवातजान् ॥ १५५ ॥**

हिरडा तुरट, पाककालीं मधुर, लवणेतर पंचरसांनीं युक्त, रूक्ष, लघु, दीपक, पाचक, मेध्य ( बुद्धीला चांगला ), मोठा वयःस्थापक ( तारुण्यरक्षक ), उष्णवीर्य, सारक, आयुर्वर्धक, ज्ञानेंद्रियांची शक्ति वाढविणारा व अनेक रोगांचा नाशक आहे. ते रोग येणेंप्रमाणेंः– कुष्ठ, विवर्णता, स्वरभेद, जीर्णज्वर, विषमज्वर, शिरोरोग, नेत्ररोग, पांडु, हृद्रोग, कावीळ, ग्रहणीदोष, क्षय, शोफ ( सूज ), अतिसार, मेदोरोग, मूर्च्छा, वांति, कृमि, श्वास, कास, प्रसेक [ तोंडाला पाणी सुटणें ], अर्श, पांथरी, पोटफुगी, विषबाधा, उदर, सूक्ष्म वाहिन्यांतील अवरोध, गुल्म, ऊरुस्तंभ, अरोचक व दुसरे नाना प्रकारचे कफवातात्मक विकार.

---

* 'अहृद्य' शब्दाचा अर्थ येथें अरुणदत्तानें "हृदयाय न हितः" असा केला आहे; परंतु ही निःसंशय मोठी चूक आहे. कारण हृद्रोगचिकित्सेंत क्षारांचा उपयोग पुष्कळ सांगितला आहे. ( वा० चि० अ० ६ श्लोक ५३ ). शिवाय वरच्याच श्लोकांत ( १४८ व्या ) यवक्षार गुल्म, हृद्रोग इत्यादि विकारांवर चालतो असें सांगितलें आहे, याचें तरी अरुणदत्तास स्मरण असावयाचें होतें. आम्हीं दिलेला अर्थ अनुभवादिसिद्ध आहे. कारण सर्व क्षार फार बेचव लागतात व त्यांचा वासाहि उग्र असतो म्हणून अहृद्य— याचा अर्थ 'हृदयाला अप्रिय' ( अहित नव्हे ) असाच केला पाहिजे.

तद्वदामलकं शीतमम्लं पित्तकफापहम्।

आवळ्याचे गुणहि हिरड्यासारखेच असून तो आंबट, शीतवीर्य व विशेषेंकरून कफपित्तहारक आहे.

कटु पाके हिमं केश्यमक्षमीषच्च तद्गुणम् ॥ १५६ ॥

बेहडा पाककालीं तिखट, थंड व केसांना हितावह असून त्याचे इतर गुण कांहींसे आवळ्यासारखेच आहेत.

इयं रसायनवरा त्रिफलाऽक्ष्यामयापहा।
रोपणी त्वग्गदक्लेदमेदोमेहकफास्रजित् ॥ १५७ ॥

ह्या तिहींच्या संयोगास त्रिफळा म्हणतात. ती सर्व रसायनांमध्यें श्रेष्ठ, नेत्ररोगनाशक, व्रणरोपण (जखम किंवा व्रण भरविणारी) त्वग्रोग, व्रणस्राव, मेदोरोग, मेह, कफ व रक्तपित्त यांची नाशक आहे.

सकेसरं चतुर्जातं त्वक्पत्रैलं त्रिजातकम्।

दालचिनी, तमालपत्र व वेलदोडे यांच्या मिश्रणाला त्रिजात व त्यांतच नागकेसर घातलें म्हणजे त्याला चतुर्जात असें म्हणतात.

पित्तप्रकोपि तीक्ष्णोष्णं रूक्षं दीपनरोचनम् ॥ १५८ ॥
रसे पाके च कटुकं कफघ्नं मरिचं लघु।

हीं दोन्हीं मिश्रणें पित्तप्रकोपी, तीक्ष्ण, उष्ण, रूक्ष, दीपक व रोचक आहेत. मिर्‍यें तशींच असून पाकानें व रसानें तिखट, कफघ्न व लघु आहेत.

श्लेष्मला स्वादुशीतार्द्रा गुर्वी स्निग्धा च पिप्पली १५९
सा शुष्का विपरीतातः स्निग्धा वृष्या रसे कटुः।
स्वादुपाकाऽनिलश्लेष्मश्वासकासापहा सरा ॥ १६० ॥
न तामत्युपयुञ्जीत रसायनविधिं विना।

ओली पिंपळी मधुर, शीत, कफकारक, जड व स्निग्ध असते. वाळलेली पिंपळी त्याच्या उलट असून स्निग्ध, वृष्य, तिखट, पाककालीं गोड, सारक, कफवातहारक व कासश्वासनाशक आहे. रसायनप्रयोगावांचून तिचें घेण्याचें मान मोठें नसावें.

नागरं दीपनं वृष्यं ग्राहि हृद्यं विबन्धनुत् ॥ १६१ ॥
रुच्यं लघु स्वादुपाकं स्निग्धोष्णं कफवातजित्।

सुंठ दीपक, वृष्य, ग्राहक, हृद्य (हृदयाला प्रिय व हितकारक), वायुरोधनाशक, रुचिप्रद, लघु, पाककालीं मधुर, स्निग्ध, उष्ण व कफवातहारक आहे.

तद्वदार्द्रकमेतच्च त्रयं त्रिकटुकं जयेत् ॥ १६२ ॥
स्थौल्याग्निसदनश्वासकासश्लीपदपीनसान्।

आलेंहि तसेंच आहे. हें कटुत्रय किंवा त्रिकटु (सुंठ, मिर्‍यें व पिंपळी) स्थूलता (मेदोजन्य), अग्निमांद्य, श्वास, [खोक]ला, [ह]ातीपाय व पीनस यांचा नाश करितें.

चविकापिप्पलीमूलं मरिचाल्पान्तरं गुणैः ॥ १६३ ॥

चवक (गजपिंपळीचें मूळ) व पिंपळमूळ ह्यांचे गुण कांहींसे मिर्‍यासारखेच आहेत.

चित्रकोऽग्निसमः पाके शोफार्शःक्रिमिकुष्ठहा।

चित्रक अग्नीसारखा पाचक व सूज, मूळव्याध, क्रिमि व कुष्ठ यांचा नाशक आहे.

पञ्चकोलकमेतच्च मरिचेन विना स्मृतम् ॥ १६४ ॥
गुल्मप्लीहोदरानाहशूलघ्नं दीपनं परम्।

पिंपळी, सुंठ, पिंपळमूळ, चवक व चित्रक ह्या पांचांच्या समुदायाला पंचकोल म्हणतात. तें फार दीपक असून गुल्म, पांथरी, उदर, पोटफुगी व शूल यांचा नाश करितें.

बिल्वकाश्मर्यतर्कारीपाटलाटुण्टुकैर्महत् ॥ १६५ ॥
जयेत्कषायतिक्तोष्णं पञ्चमूलं कफानिलौ।

बेल, शिवण, ऐरण, पाडळ व टेंटू यांच्या मुळ्यांना मोठें पंचमूळ म्हणतात. तें तुरट, कडू व उष्ण असून कफवातांचा नाश करितें.

ह्रस्वं बृहत्यंशुमतीद्वयगोक्षुरकैः स्मृतम् ॥ १६६ ॥
स्वादुपाकरसं नातिशीतोष्णं सर्वदोषजित्।

रिंगणी, डोरली, सालवण, पिठवण व गोखरू ह्यांना लघु पंचमूल म्हणतात. तें रसानें व पाकानें मधुर, त्रिदोषहारक व वीर्यानें उष्णहि नव्हे व शीतहि नव्हे असें आहे.

बलापुनर्नवैरण्डशूर्पपर्णीद्वयेन तु ॥ १६७ ॥
मध्यमं कफवातघ्नं नातिपित्तकरं सरम्।

चिकणामूळ, पांढरी वसू, एरंडमूळ, रानमूग व रानउडीद यांना मध्यम पंचमूळ म्हणतात. तें सारक, कफवातहारक व किंचित् पित्तल आहे.

अभीरुवीराजीवन्तीजीवकर्षभकैः स्मृतम् ॥ १६८ ॥
जीवनाख्यं च चक्षुष्यं वृष्यं पित्तानिलापहम्।

शतावरी, काकोली, जीवंती (हरणखोरी), जीवक व ऋषभक यांना जीवन पंचमूल म्हणतात. तें नेत्रास हितावह, वृष्य व वातपित्तहारक आहे.

तृणाख्यं पित्तजिद्दर्भकासेक्षुशरशालिभिः ॥ १६९ ॥

दर्भ, कसई, ऊंस, रामबाण व भात यांच्या मुळांना तृणपंचमूल म्हणतात; तें पित्तशामक आहे.

शुकशिम्बीजपक्वान्नमांसशाकफलौषधैः।
वर्गितैरन्नलेशोऽयमुक्तो नित्योपयोगिकः ॥ १७० ॥

ह्याप्रमाणें भक्ष्य पदार्थांचा जो नित्य उपयोगी पडणारा भाग त्याचे शूकधान्य, शिंबीधान्य, कृतान्न, मांस, शाका, फळें व औषधें असे [विभाग]करून [त्यां]चें वर्ग करून वर्णन केलें

# सप्तमोऽध्यायः

## अध्याय ७ वा

## अथातोऽन्नरक्षाध्यायं व्याख्यास्यामः।

आतां अन्नरक्षणाविषयीं अध्याय सांगतों.

**राजा राजगृहासन्ने प्राणाचार्यं निवेशयेत्।**
**सर्वदा स भवत्येवं सर्वत्र प्रतिजागृतिः ॥ १ ॥**

राजानें नेहमीं आपल्या घराजवळ वैद्यास राहाण्यास जागा द्यावी म्हणजे तो सर्व गोष्टींविषयीं सर्वदा सावध राहतो.

**अन्नपानं विषाद्रक्षेद्विशेषेण महीपतेः।**
**योगक्षेमौ तदायत्तौ धर्माद्यास्तन्निबन्धनाः ॥ २ ॥**

ज्याअर्थी धर्मादि पुरुषार्थ, *योगक्षेमावर व योगक्षेम राजावर अवलंबून आहेत, त्याअर्थी राजाच्या अन्नपानाचें विषापासून संरक्षण करण्याविषयीं विशेषेंकरून झटावें.

**ओदनो विषवान्सान्द्रो यात्यविस्राव्यतामिव।**
**चिरेण पच्यते पक्वो भवेत्पर्युषितोपमः ॥ ३ ॥**
**मयूरकण्ठतुल्योष्मा मोहमूर्च्छाप्रसेककृत्।**
**हीयते वर्णगन्धाद्यैः क्लिद्यते चन्द्रकाश्चितः ॥ ४ ॥**

विषयुक्त भाताचीं लक्षणें येणेंप्रमाणें—शिजत असतांना त्यांत द्रवांश असूनहि दाट झालेल्या भाताप्रमाणें त्यांतून पेज निघत नाहीं. तो उशीरानें शिजतो. शिजून तयार होतांच शिळ्या भातासारखा दिसूं लागतो. त्यांतून नीळसर रंगाची वाफ निघते. तो खाल्ला असतां बेशुद्धि, मूर्च्छा व तोंडास पाणी सुटणें हे विकार उत्पन्न होतात. त्याचे रंग, रूप, वास, वगैरे नाहींसे होतात. त्याला मिठाप्रमाणें पाणी सुटतें. पाण्यावर टाकलेल्या तेलाप्रमाणें त्याजवर चित्रविचित्र रंगांची झांक उमटते.

**व्यञ्जनान्याशु शुष्यन्ति ध्यामक्वाथानि तत्र च।**
**हीनातिरिक्ता विकृता च्छाया दृश्येत नैव वा ॥ ५ ॥**
**फेनोर्ध्वराजीसीमन्ततन्तुबुद्बुदसम्भवः।**
**विच्छिन्नविरसा रागाः खाण्डवाः शाकमामिषम् ॥ ६ ॥**

तोंडी लावण्याचे पदार्थ लवकर वाळतात व पातळ असणारे मलिन होतात; व त्यांत दिसणारें प्रतिबिंब बिघडून मोठें, लहान किंवा निराळ्याच तऱ्हेचें असतें, किंवा तें मुळींच पडत नाहीं. त्यांजवर फेंस, रेषा, तंतु व बुडबुडे उत्पन्न होतात व भेगा पडतात. रायतीं, मोरांबे, भाज्या व मांसें यांचे द्रवांश व घनांश पृथक् होतात व त्यांची चव बिघडते.

**नीला राजी रसे ताम्रा क्षीरे दधनि दृश्यते।**
**श्यावा पीताऽसिता तक्रे घृते पानीयसन्निभा ॥ ७ ॥**
**काली मद्याम्भसोः क्षौद्रे हरित्तैलेऽरुणोपमा।**

* योग म्हणजे अन्नवस्त्रादिकांची प्राप्ति व क्षेम म्हणजे त्यांचें रक्षण.

**पाकः फलानामामानां पक्वानां परिकोथनम् ॥ ८ ॥**
**द्रव्याणामार्द्रशुष्काणां स्यातां म्लानिविवर्णते।**
**मृदूनां कठिनानां च भवेत्स्पर्शविपर्ययः ॥ ९ ॥**
**माल्यस्य स्फुटिताग्रत्वं म्लानिर्गन्धान्तरोद्भवः।**
**ध्याममण्डलता वस्त्रे सदनं तन्तुपक्ष्मणाम् ॥ १० ॥**
**धातुमौक्तिककाष्ठाश्मरत्नादिषु मलाक्तता।**
**स्नेहस्पर्शप्रभाहानिः सप्रभत्वं तु मृन्मये ॥ ११ ॥**

सुरव्यावर नीलवर्ण रेषा उमटते. दुधावर तांबडी, दह्यावर श्यामवर्ण, ताकावर काळसर पिंवळी, तुपावर पाण्यासारखी, मद्यावर व पाण्यावर काळी, मधावर हिरवी व तेलावर अरुण रेषा उत्पन्न होते. फळें हिरवीं असल्यास पिकतात व पिकलीं असल्यास कुजतात. ओलीं द्रव्यें कोमेजून जातात व वाळलेल्यांचा वर्ण पालटतो. मृदु द्रव्यें कठिण व कठिण मृदु होतात. फुलांच्या पाकळ्या गळतात, तीं कोमेजतात व त्यांचा वास पालटतो. वस्त्रावर मळकट डाग पडतात व त्याच्या सुताचे तंतु गळूं लागतात. धातु, मोत्यें, रत्नें, काष्ठें, दगड इत्यादिकांनादि मळकट डाग पडतात व त्यांची स्निग्धता, स्पर्शविशेष व कांति नाहींशी होते व मृन्मय पात्रामध्यें चकाकी उत्पन्न होते.

**विषदः श्यावशुष्कास्यो विलक्षो वीक्षते दिशः।**
**स्वेदवेपथुमांस्त्रस्तो भीतः स्खलति जृम्भते ॥ १२ ॥**

विष घालणाऱ्या मनुष्याचें तोंड काळेंठिक्कर व कोरडें पडतें. त्याची दृष्टि चंचल होऊन तो इकडे तिकडे पाहतो. त्याला घाम व कंप सुटतो, तो घाबरून कावराबावरा होतो; चालतांना व बोलतांना अडखळतो व वरचेवर जांभया देतो.

**प्राप्याग्निं सविषं त्वन्नमेकावर्तः स्फुटत्यति।**
**शिखिकण्ठाभधूमार्चिरनर्चिर्वोग्रगन्धवान् ॥ १३ ॥**

सविष अन्न अग्नीवर टाकलें असतां तो फार फडफडतो व ज्वालेंत एकच वळसा असतो. धूर व ज्वाला मोराच्या कंठाप्रमाणें नीलवर्ण असते, किंवा ज्वाला मुळींच नसते व घाण सुटते.

**म्रियन्ते मक्षिकाः प्राश्य काकः क्षामस्वरो भवत्।**
**उत्क्रोशन्ति च दृष्ट्वैतच्छुकदात्यूहसारिकाः ॥ १४ ॥**
**हंसः प्रस्खलति ग्लानिर्जीवञ्जीवस्य जायते।**
**चकोरस्याक्षिवैराग्यं क्रौञ्चस्य स्यान्मदोदयः ॥ १५ ॥**
**कपोतपरभृद्दक्षचक्रवाका जहत्यसून्।**
**उद्वेगं याति मार्जारः शकृन्मुञ्चति वानरः ॥ १६ ॥**
**हृष्येन्मयूरस्तद्दृष्ट्या मन्दतेजो भवेद्विषम्।**
**इत्यन्नं विषवज्ज्ञात्वा त्यजेदेवं प्रयत्नतः ॥ १७ ॥**
**यथा तेन विपद्येरन्नपि न क्षुद्रजन्तवः।**

तें अन्न माशांनीं खाल्लें असतां त्या मरतात, कावळ्यांचा शब्द बारीक होतो, तें पाहतांच राघू, पाणकावळा व साळुंकी मोठ्यानें ओरडतात, हंस अडखळतो, जीवंजीवास ग्लानि येते, चकोराच्या

नेत्राची आरक्तता नाहींशी होते, क्रौंच पक्ष्याला मद येतो, खबुतरें, कोकिळा, कोंबडी व चक्रवाक प्राण सोडतात, मांजर उद्विग्न होतें, वानर हगतो, मोर हर्ष पावतो व त्याच्या दृष्टीनें विषाचा जोर कमी होतो. ह्याप्रकारें विषयुक्त अन्नाची परीक्षा करून तें अशा ठिकाणीं टाकून द्यावें कीं, त्याचे योगानें क्षुद्र जीव देखील मरणार नाहींत.

**स्पृष्टे तु कण्डुदाहोषाज्वरार्तिस्फोटसुप्तयः ॥ १८ ॥**
**नखरोमच्युतिः शोफः सेकाद्या विषनाशनाः ।**
**शस्तास्तत्रप्रलेपाश्च सेव्यचन्दनपद्मकैः ॥ १९ ॥**
**ससोमवल्कतालीसपत्रकुष्ठामृतानतैः ।**

विषयुक्त अन्नाचा स्पर्श केला असतां कंड किंवा सर्वांगाचा किंवा एकदेशीय दाह, ज्वर, शूल, फोड, मेहरी ( स्पर्शशून्यता ), नख व केंस यांचें गळणें व सूज हे विकार होतात, त्याजवर विषघ्न औषधांचा परिषेक, अभ्यंग इत्यादिकांची योजना करावी व वाळा, चंदन, पद्मकाष्ठ, कायफळ, तालीसपत्र, कोष्ठ, गुळवेल व तगर ह्यांचा लेप करावा.

**लालाजिह्वौष्ठयोर्जाड्यमूषाचिमिचिमायनम् ॥ २० ॥**
**दन्तहर्षो रसाज्ञत्वं हनुस्तम्भश्च वक्त्रगे ।**
**सेव्याद्यैस्तत्र गण्डूषाः सर्वं च विषजिद्धितम् ॥ २१ ॥**

तें तोंडांत गेलें असतां लालास्राव, जिह्वा व ओंठ यांचें जडत्व, आग व चुणचुण, दांतांचें स्पर्शासहनत्व, रसज्ञानाचा नाश व दांतखिळी बसणें हे विकार होतात. त्यांजवर वर सांगितलेल्या वाळा वगैरे औषधांच्या गुळण्या व सर्व विषघ्न उपचार करावे.

**आमाशयगते स्वेदमूर्च्छाध्मानमदभ्रमाः ।**
**रोमहर्षो वमिर्दाहश्चक्षुर्हृदयरोधनम् ॥ २२ ॥**
**बिन्दुभिश्चाचयोऽङ्गानां पक्वाशयगते पुनः ।**
**अनेकवर्णं वमति मूत्रयत्यतिसार्यते ॥ २३ ॥**
**तन्द्रा कृशत्वं पाण्डुत्वमुदरं बलसंक्षयः ।**
**तयोर्वान्तविरिक्तस्य हरिद्रे कटभीं गुडम् ॥ २४ ॥**
**सिन्दुवारितनिष्पाववाष्पिकाशतपर्विकाः**
**तण्डुलीयकमूलानि कुक्कुटाण्डमवल्गुजम् ॥ २५ ॥**
**नावनाञ्जनपानेषु योजयेद्विषशान्तये ।**

तें पोटांत ( आमाशयांत ) गेलें असतां स्वेद, मूर्च्छा, पोट फुगणें, अंमल येणें, भ्रम, रोमांच, वांति, दाह, डोळे ताठणें, उरांत बांध बसणें व अंगावर गांधी येणें हे विकार होतात व पक्वाशयांत गेलें असतां अनेक रंगांची वांति, मूत्रोत्सर्ग, रेच, तंद्रा, उदर, पांडुवर्ण, कृशत्व, बलहानि हे विकार होतात. त्यांजवर अनुक्रमें वमन व विरेचन देऊन हळद, दारुहळद, हमेल, गूळ, निर्गुडी, पावटे, बाफळी, वेखंड, तांदुळज्याच्या मुळ्या, कोंबड्याचें अंडें व बावच्या ह्यांची नस्य, अंजन, पान इत्यादि क्रियेमध्यें योजना करावी, म्हणजे विषाचें शमन होतें.

**विषभुक्ताय दद्याच्च शुद्धायोर्ध्वमधस्तथा ॥ २६ ॥**
**सूक्ष्मं ताम्ररजः काले सक्षौद्रं हृद्विशोधनम् ।**
**शुद्धे हृदि ततः शाणं हेमचूर्णस्य दापयेत् ॥ २७ ॥**

विष भक्षण केलेल्या मनुष्यास उर्ध्वाधः शोधनानंतर हृदयाचें ( अर्थात् आमाशयाचें ) शोधन करण्याकरितां लागलेंच सूक्ष्म ताम्रचूर्ण मधाबरोबर द्यावें. वांति होऊन कोठा शुद्ध झाल्यावर सोन्याचे वर्खाची पूड तीन मासे द्यावी.

**न सज्जते हेमपाङ्गे पद्मपत्रेऽम्बुवद्विषम् ।**
**जायते विपुलं चायुर्गरेऽप्येष विधिः स्मृतः ॥ २८ ॥**

पद्मपत्रावर जसें पाणी चिकटून राहात नाहीं तसें सुवर्णभक्षकाच्या अंगाला विष चिकटून राहात नाहीं. त्याचे ( सुवर्णाचे ) योगानें आयुष्याची वृद्धि होते. कृत्रिम विषावर देखील हीच चिकित्सा करावी.

**विरुद्धमपि चाहारं विद्याद्विषगरोपमम् ।**

विरुद्ध आहाराचे परिणामहि विषासारखेच होतात.

**आनूपमामिषं माषक्षौद्रक्षीरविरूढकैः ॥ २९ ॥**
**विरुध्यते सह बिसैर्मूलकेन गुडेन वा ।**
**विशेषात्पयसा मत्स्या मत्स्येष्वपि चिलीचिमः ॥३०॥**

अनूपमांस हें उडीद, मध, दूध, मोड आलेलें धान्य, भिशीं, मुळा व गूळ ह्यांपैकीं प्रत्येकाशीं विरुद्ध आहे. त्यांतहि मांशाचा दुधाशीं फार विरोध आहे व चिलचिमाचा ( वेगशाचा ) तर अतिशयच आहे.

**विरुद्धमम्लं पयसा सह सर्वं फलं तथा ।**

दुधाचा आंबटाशीं व सर्व फळांशीं विरोध आहे.

**तद्वत्कुलत्थवरककङ्कुवल्लमकुष्ठकाः ॥ ३१ ॥**

तसेंच कुळीथ, वऱ्यांचे तांदूळ, राळे, वाल व मटक्या ह्यांच्याशींहि तें विरुद्ध आहे.

**भक्षयित्वा हरितकं मूलकादिपयस्त्यजेत् ।**

शाकवर्गांतील मुळा व तदनंतर सांगितलेल्या सर्व भाज्या ( आजवला, कोथिंबीर, लसूण इ. ) ह्यांना हरितक म्हणतात. ह्यांपैकीं कोणताहि पदार्थ खाल्ला असतां वर दूध पिऊं नये.

**वाराहं श्वाविधा नाद्याद्दध्ना पृषतकुक्कुटौ ॥ ३२ ॥**
**आममांसानि पित्तेन माषसूपेन मूलकम् ।**
**अविं कुसुम्भशाकेन बिसैः सह विरूढकम् ॥ ३३ ॥**
**माषसूपगुडक्षीरदध्याज्यैर्लाकुचं फलम् ।**
**फलं कदल्यास्तक्रेण दध्ना तालफलेन वा ॥ ३४ ॥**
**कणोषणाभ्यां मधुना काकमाचीं गुडेन वा ।**
**सिद्धां वा मत्स्यपचने पचने नागरस्य वा ॥ ३५ ॥**
**सिद्धामन्यत्र वा पात्रे कामात्तामुषितां निशाम् ।**

साळई व रानडुक्कर ह्यांच्या मांसाचा संयोग विरुद्ध आहे, म्हणून तीं एका काळीं खाऊं नयेत. दह्याबरोबर कोंबडा व हरिण खाऊं नये.

कच्चें मांस पित्ताशीं खाऊं नये; उडदाचे वरणाबरोबर मुळा, कर्डईच्या भाजीबरोबर मेंढा, भिश्यांबरोबर मोड आलेलें धान्य, उडदाचें वरण, गूळ, दूध, दहीं व तूप यांजबरोबर ओंटीचें फळ व ताक, दहीं व ताडगोळा ह्यांजबरोबर केळें व पिंपळीं, मिऱ्यें व मध किंवा गूळ ह्यांजबरोबर काकमाची, तसेंच मासे शिजविण्याच्या किंवा सुंठ शिजविण्याच्या भांड्यांत सिद्ध केलेली पण शिळी झालेली काकमाची खाऊं नये.

**मत्स्यानिस्तलमस्नेहसाधिताः पिप्पलीस्त्यजेत् ॥३६॥**
**कांस्ये दशाहमुषितं सर्पिरुष्णं त्वरुष्करे ।**

मासे तळून राहिलेल्या तेलांत सिद्ध केलेली पिंपळी, कांशाच्या भांड्यांत दहा दिवसपर्यंत ठेवलेलें तूप व बिब्ब्याबरोबर कोणताहि उष्ण ( वीर्यानें किंवा स्पर्शानें ) पदार्थ खाऊं नये.

**भासो विरुध्यते शूल्यः कम्पिल्लस्तक्रसाधितः ॥ ३७ ॥**

लोखंडाच्या सळईवर पक्व केलेला भास पक्षी व ताकांत सिद्ध केलेली कपिलेच्या पाल्याची भाजी खाऊं नये.

**ऐकध्यं पायससुराकृशराः परिवर्जयेत् ।**

खीर, खिचडी व सुरा हीं एका वेळीं खाऊं नयेत.

**मधुसर्पिर्वसातैलपानीयानि द्विशस्त्रिशः ॥ ३८ ॥**
**एकत्र वा समांशानि विरुध्यन्ते परस्परम् ।**

मध, तूप, वसा, तेल व पाणी ह्यांपैकीं कोणत्याहि दोहोंचा, तिहींचा, चोहोंचा, किंवा पांचांचा समभागानें मिलाफ परस्परविरुद्ध आहे.

**भिन्नांशे अपि मध्वाज्ये दिव्यवार्यनुपानतः ॥ ३९ ॥**
**मधुपुष्करबीजं च मधुमैरेयशार्करम् ।**
**मन्थानुपानः क्षैरेयो हरिद्रः कटुतैलवान् ॥ ४० ॥**

पावसाचे पाण्याबरोबर मध व तूप यांचें मिश्रण विषम प्रमाणानें देखील खाऊं नये. कमळकाकडी मधाशीं खाऊं नये. द्राक्षासव, खर्जूरासव व शर्करासव हीं एकत्र मिसळून पिऊं नयेत. खीर खाऊन वर मंथ* पिऊं नये. हारिद्रकंद शिरशेलाची फोडणी देऊन खाऊं नये.

**उपोदकातिसाराय तिलकल्केन साधिता ।**

थोर मयाळ तिळकुटानें सिद्ध केली असतां अतिसार उत्पन्न करिते.

**बलाका वारुणीयुक्ता कुल्माषैश्च विरुध्यते ॥ ४१ ॥**
**भृष्टा वराहवसया सैव सद्यो निहन्त्यसून् ।**

बगळा श्वेत सुरेबरोबर व घुगऱ्यांबरोबर खाऊं नये. डुकराच्या चरबीत तळला असल्यास तो प्राणच घेतो.

**तद्वत्तित्तिरिपत्राढ्यगोधालावकपिञ्जलाः ॥ ४२ ॥**
**ऐरण्डेनाग्निना सिद्धास्तत्तैलेन विमूर्च्छिताः ।**

ह्याचप्रमाणें तित्तिर, मयूर, घोरपड, लावा व पिंगळा यांचें मांस एरंडाच्या जळणानें एरंडेलाचीच फोडणी देऊन तयार केलेलें असल्यास तत्काळ जीवित हरण करितें.

**हारीतमांसं हारिद्रशूलकप्रोतपाचितम् ॥ ४३ ॥**
**हारिद्रवह्निना सद्यो व्यापादयति जीवितम् ।**

तिलगिद पक्ष्याचें मांस दारुहळदीच्या लांकडाच्या सळईनें त्याच्याच अग्नीवर तयार केलें असतां तत्काळ प्राण घेतें.

**भस्मपांशुपरिध्वस्तं तदेव च समाक्षिकम् ॥ ४४ ॥**

तसेंच त्याला राख किंवा धूळ लागली असून जर तें मधाशीं खाल्लें तर देखील तें घातकच होतें.

**यत्किञ्चिद्दोषमुत्क्लेश्य न हरेत्तत्समासतः ।**
**विरुद्धं शुद्धिरत्रेष्टा शमो वा तद्विरोधिभिः ॥ ४५ ॥**

सारांश हाच कीं, जे जे पदार्थ कफपित्तांना त्यांच्या स्थानांपासून सोडवितात, परंतु बाहेर काढून टाकीत नाहींत ते सर्व विरुद्ध होत. त्यांच्या क्रियेवर सामान्य प्रतिकार म्हटला म्हणजे शोधन किंवा तद्विरुद्ध पदार्थांच्या योगानें शमन.

**द्रव्यैस्तैरेव वा पूर्वं शरीरस्याभिसंस्कृतिः ।**

किंवा तींच शमन द्रव्यें पूर्वी सेवन करून शरीर तयार केलें म्हणजे विरुद्ध आहाराचे विकार प्रगट होत नाहींत.

**व्यायामस्निग्धदीप्ताग्निवयःस्थबलशालिनाम् ॥ ४६ ॥**
**विरोध्यपि न पीडायै सात्म्यमल्पं च भोजनम् ।**

व्यायाम करणारे, स्निग्धाहारी, दीप्ताग्नि, तरुण व बलवान् असे जे लोक त्यांनीं विरुद्ध पदार्थांचें सेवन केलें असतांहि विकार उत्पन्न होत नाहीं. तसेंच संवयीनें व अल्पसेवनानें विरुद्ध आहार फारसे बाधक होत नाहींत.

**पादेनापथ्यमभ्यस्तं पादपादेन वा त्यजेत् ॥ ४७ ॥**

ज्या अपथ्य आहारादिकांची संवय झाली असेल त्यांचा चतुर्थांशानें किंवा षोडशांशानें त्याग करावा, एकदम करूं नये.

**निषेधेत हितं तद्वदेकद्वित्र्यन्तरीकृतम् ।**

व त्यांजबद्दल संवय नसलेल्या पथ्यकारक आहारादिकांचें सेवन करणें झाल्यास, तेंहि त्याचप्रमाणें करावें. व मध्यें एक, दोन व तीन दिवस अंतर द्यावें. ( उदा० ) असें समजा कीं, एका मनुष्यास रोज जेवतांना चार मिऱ्या खाण्याची संवय आहे. पण अम्लपित्ताचीं पूर्वरूपें दिसूं लागल्यामुळें त्याला आतां ती संवय मोडून मिऱ्यांबद्दल आलें खाणें आहे, तर त्यानें आपलें खाण्याचें मान पुढील कोष्टकाप्रमाणें क्रमानें बदलावें.

| | | |
|---|---|---|
| एकांतर | पहिल्या दिवशीं | एक मिर्ची कमी करून तितकेंच आलें घ्यावें. |
| | दुसऱ्या दि० | पहिल्या संवयीप्रमाणें पुनः चार मिर्च्या खाव्या. |
| | तिसऱ्या दि० | पहिल्या दिवसाप्रमाणें पुनः एक मिर्ची कमी करावी. |

* मंथ म्हणजे सातूचें पीठ, तूप व पाणी यांचें मिश्रण.

| | | |
|---|---|---|
| द्व्यंतर | चवथ्या दि० | दोन मिर्च्या कमी करून तितकेंच आलें घ्यावें. |
| | पांचव्या दि० | पुनः तिसऱ्या दिवसाप्रमाणें. |
| | सहाव्या दि० | सदर. |
| | सातव्या दि० | पुनः चवथ्या दिवसाप्रमाणें दोन मिर्च्या कमी कराव्या. |
| त्र्यंतर | आठव्या दि० | तीन मिर्च्या कमी करून तितकेंच आलें खावें. |
| | नवव्या दि० | पुनः ७ व्या दिवसाप्रमाणें. |
| | दहाव्या दि० | सदर. |
| | अकराव्या दि० | सदर. |
| | बाराव्या दि० | आठव्या दिवसाप्रमाणें पुनः तीन मिर्च्या कमी कराव्या. |
| एकांतर | तेराव्या दि० | चारी मिर्च्या कमी करून नुस्तें आलेंच खावें. |
| | चौदाव्या दि० | पुनः बाराव्या दिवसाप्रमाणें. |
| | पंधराव्या दि० | पुनः चारी मिर्च्यांबद्दल नुस्तें आलेंच खाऊन तोच क्रम नित्य सुरू ठेवावा. (षोडशांशानें कमी करणें झाल्यास ह्याच प्रकारची चढउतार करीत जावें.) |

अपथ्यमपि हि त्यक्तं शीलितं पथ्यमेव वा ॥ ४८ ॥
सात्म्यासात्म्यविकाराय जायते सहसान्यथा।

ह्या प्रकारच्या क्रमाचें अवलंबन न करतां जर अपथ्याचा त्याग किंवा पथ्याचें सेवन एकदम सुरू केलें तर त्यापासून सात्म्यासात्म्यासंबंधीं विकार उत्पन्न होतात.

क्रमेणापचिता दोषाः क्रमेणोपचिता गुणाः ॥ ४९ ॥
नाप्नुवन्ति पुनर्भावमप्रकम्प्या भवन्ति च।

अपथ्यजन्य दोषांचें निःसरण किंवा पथ्यजन्य गुणांचें संपादन क्रमानें केलें असतां घालविलेले दोष पुनः उत्पन्न होत नाहींत, व संपादित गुण चिरकाल राहतात.

अत्यन्तसन्निधानानां दोषाणां दूषणात्मनाम् ॥ ५० ॥
अहितैर्दूषणं भूयो न विद्वान् कर्तुमर्हति।

वातपित्तकफांचा धातूंशीं फार निकट संबंध असून त्यांना दूषित करण्याविषयीं ते स्वभावतःच प्रवृत्त असतात; यास्तव अपथ्यसेवनेंकरून त्यांना अधिकच दूषित करणें हें विद्वानास फार अनुचित आहे.

आहारशयनाब्रह्मचर्यैर्युक्त्या प्रयोजितैः ॥ ५१ ॥
शरीरं धार्यते नित्यमागारमिव धारणैः।

आहार, निद्रा व मैथुन यांचा योग्य उपयोग केल्यास ते घरास जसे खांब असतात तसे शरीरास आधारभूत होतात.

आहारो वर्णितस्तत्र तत्र तत्र च वक्ष्यते ॥ ५२ ॥

ह्यांपैकीं पहिला आधार जो आहार त्याचें वर्णन मागें केलें आहे व पुढेंहि त्या त्या प्रसंगीं केलें जाईल.

निद्रायत्तं सुखं दुःखं पुष्टिः कार्श्यं बलाबलम्।
वृषता क्लीबता ज्ञानमज्ञानं जीवितं न च ॥ ५३ ॥

सुख, दुःख, पुष्टता, कृशता, शक्ति, अशक्तता, पुरुषत्व, षंढता, ज्ञान, अज्ञान, जीवित व मरण ह्या सर्व गोष्टी निद्रेवर अवलंबून आहेत.

अकालेऽतिप्रसङ्गाच्च न च निद्रा निषेविता।
सुखायुषी पराकुर्यात्कालरात्रिरिवापरा ॥ ५४ ॥

अकालीं निद्रा, अतिनिद्रा व अत्यल्पनिद्रा ह्या सुख (अर्थात् आरोग्य) व आयुष्य यांची हानि करण्याविषयीं जशा काय दुसऱ्या कालरात्रीच आहेत.

रात्रौ जागरणं रूक्षं स्निग्धं प्रस्वपनं दिवा।
अरूक्षमनभिष्यन्दि त्वासीनप्रचलायितम् ॥ ५५ ॥

रात्रीं जागल्यानें देहस्थ धातु रूक्ष होतात, व दिवसां निजल्यानें ते स्निग्ध होतात (म्हणजे अर्थात् रात्रीं जागल्यानें वायु वाढतो व दिवसां निजल्यानें श्लेष्मा वाढतो) दिवसास झोंप घेणें झाल्यास ती बसूनच पेंगत घ्यावी; म्हणजे श्लेष्मा न वाढतां धातूंना स्निग्धता* प्राप्त होते.

ग्रीष्मे वायुचयादानरौक्ष्यरात्र्यल्पभावतः।
दिवास्वप्नो हितोऽन्यस्मिन् कफपित्तकरो हि सः ॥ ५६ ॥
मुक्त्वा तु भाष्ययानाध्वमद्यस्त्रीभारकर्मभिः।
क्रोधशोकभयैः क्लान्तान् श्वासहिध्मातिसारिणः ॥ ५७ ॥
वृद्धबालाबलक्षीणक्षततृट्शूलपीडितान्।
अजीर्ण्यभिहतोन्मत्तान् दिवास्वप्नोचितानपि ॥ ५८ ॥
धातुसाम्यं तथा ह्येषां श्लेष्मा चाङ्गानि पुष्यति।

ग्रीष्मऋतूंत वायूचा संचय झाल्यामुळें, आदानानें हवा रूक्ष झाल्यामुळें व रात्री लहान असल्यामुळें दिवसां निजणें हितकारक होय. इतर ऋतूंत मात्र दिवसां निजल्यानें कफपित्तांची वृद्धि होते. परंतु भाषण करणें, अश्वादिकांवर बसणें, मार्गक्रमण, ओझें वाहणें, इत्यादि व्यापारांनीं किंवा क्रोधशोकभयादिकांनीं जे श्रांत झाले असतील, ज्यांना श्वास, उचकी, अतिसार, क्षय, उरःक्षत, शूल, तृषा, अजीर्ण व अभिघात (जखमा) हे विकार झाले असतील, जे वृद्ध, बाल, उन्मत्त, किंवा अशक्त असतील किंवा ज्यांना त्याची

* येथें नञ् विरुद्धार्थी घेऊन ‘अरूक्ष’ शब्दाचा अर्थ ‘स्निग्ध’ असा केला पाहिजे. कारण ह्राच अर्थ खारणादानें पुढील श्लोकांत ‘बृंहण’ शब्दानें दाखविला आहे. “आसीनप्रचलस्वप्नो निरभिष्यन्दिबृंहणः ॥” इत्यादि बृंहण व स्निग्ध यांचे अर्थ प्रायः सारखेच आहेत. (“यच्च सन्तर्पणं तदवश्यं स्निग्धं” असें अरुणदत्तानें ह्याच श्लोकाच्या टीकेंत म्हटलें आहे). ‘आसीनप्रचलायितं’ हें क्रियाविशेषण करावें (प्रस्वपनक्रियेचें), म्हणजे अर्थ स्पष्ट होतो (बसून पेंगत झोंप घेणें). दोघांहि टीकाकारांनीं ही गोष्ट सुचविली नाहीं.

संचय असेल, त्यांना दिवसां निजणें हितकारक होय. कारण तसें केल्यानें त्यांचे धातु समान स्थितींत राहून श्लेष्मा त्यांचे देह पुष्ट करितो.

**बहुमेदःकफाः स्वप्युः स्नेहमित्याश्च नाहनि ॥ ५९ ॥**
**विषार्तः कण्ठरोगी च नैव जातु निशास्वपि ।**

ज्यांच्या शरीरांत मेदाचा संचय फार आहे व जे कफप्रकृति आहेत व जे नित्य स्निग्धाहार करितात, त्यांनीं ग्रीष्मांत देखील दिवसां निजूं नये. ज्यांना विषबाधा किंवा कंठरोग झाला असेल त्यांनीं तर रात्रीं देखील कदापि निजूं नये.

**अकालशयनान्मोहज्वरस्तैमित्यपीनसाः ॥ ६० ॥**
**शिरोरुक्शोफहृल्लासस्रोतोरोधाग्निमन्दताः ।**

अकालीं शयन केल्यानें मूर्च्छा, ज्वर, ओलसरपणा व थंडी भासणें (स्तैमित्य), पीनस, शिरःपीडा, सूज, मळमळणें, केशवाहिन्यांचा अवरोध व अग्निमांद्य हे विकार उत्पन्न होतात.

**तत्रोपवासवमनस्वेदनावनमौषधम् ॥ ६१ ॥**
**योजयेदतिनिद्रायां तीक्ष्णं प्रच्छर्दनाञ्जनम् ।**
**नावनं लङ्घनं चिन्तां व्यवायं शोकभीक्रुधः ॥ ६२ ॥**
**एभिरेव च निद्राया नाशः श्लेष्मातिसंक्षयात् ।**

त्यांजवर लंघन, वमन, स्वेदन व नस्य यांची योजना करावी. अतिनिद्रेवर तीक्ष्ण वमन व अंजन, नस्य, लंघन, चिंता, मैथुन, शोक, भय व क्रोध यांची योजना करावी. ह्याच सर्व गोष्टी कफाचा अत्यंत ऱ्हास करून निद्रानाशास कारणीभूत होतात.

**निद्रानाशादङ्गमर्दशिरोगौरवजृम्भिकाः ॥ ६३ ॥**
**जाड्यं ग्लानिभ्रमापक्तितन्द्रा रोगाश्च वातजाः ।**

निद्रानाशानें अंगमर्द (अंग ठेंचल्यासारखें होणें), जांभया देणें, डोकें जड होणें, आळस, ग्लानि, भ्रम, अपचन, तंद्रा व वातरोग हे विकार उत्पन्न होतात.

**यथाकालमतो निद्रां रात्रौ सेवेत सात्म्यतः ॥ ६४ ॥**
**असात्म्याज्जागरादर्धं प्रातः स्वप्यादभुक्तवान् ।**

यास्तव ज्याची जितकी संवय असेल तितकी रात्रीं यथाकालीं झोंप घ्यावी. संवयीहून फाजील जितका वेळ रात्रीं जागरण होईल, त्याच्या निंमे सकाळीं जेवण्यापूर्वी झोंप घ्यावी.

**शीलयेन्मन्दनिद्रस्तु क्षीरमद्यरसान् दधि ॥ ६५ ॥**
**अभ्यङ्गोद्वर्तनस्नानमूर्धकर्णाक्षितर्पणम् ।**
**कान्ताबाहुलताश्लेषो निर्वृतिः कृतकृत्यता ॥ ६६ ॥**
**मनोऽनुकूला विषया कामं निद्रासुखप्रदाः ।**
**ब्रह्मचर्यरतेर्ग्राम्यसुखनिःस्पृहचेतसः ॥ ६७ ॥**
**निद्रा सन्तोषतृप्तस्य स्वं कालं नातिवर्तते ।**

ज्यांना झोंप चांगली येत नसेल त्यांनीं दूध, मद्य, मांसरस, दहीं, अभ्यंग, उटणें, स्नान, डोक्यास तेल जिरविणें, कानांत तेल सोडणें, डोळ्यांवर घड्या ठेवणें, इत्यादिकांचें सेवन करावें. कांतेच्या बाहुलतेचें आलिंगन, सुख, समाधान व आवडते विषय प्रायः निद्रासुख देतात. ब्रह्मचर्यांत सुख मानणारा, स्त्रीसंगाविषयीं निस्पृह व सर्वदा संतोषवृत्ति अशा मनुष्याला नियमित काळीं झोंप येते.

**ग्राम्यधर्मे त्यजेन्नारीमनुत्तानां रजस्वलाम् ॥ ६८ ॥**
**अप्रियामप्रियाचारां दुष्टसङ्कीर्णमेहनाम् ।**
**अतिस्थूलकृशां सूतां गर्भिणीमन्ययोषितम् ॥ ६९ ॥**
**वर्णिनीमन्ययोनिं च गुरुदेवनृपालयम् ।**
**चैत्यश्मशानायतनचत्वराम्बुचतुष्पथम् ॥ ७० ॥**
**पर्वाण्यनङ्गं दिवसं शिरोहृदयताडनम् ।**
**अत्याशितोऽधृतिः क्षुद्वान् दुःस्थिताङ्गः पिपासितः ॥७१॥**
**बालो वृद्धोऽन्यवेगार्तस्त्यजेद्रोगी च मैथुनम् ।**

स्त्रीसंगासंबंधानें पुढील गोष्टी वर्ज्य आहेतः—उताण्या आसनाहून अन्य आसन (स्त्रीचें), रजस्वला, अप्रिय, दुराचारी, दुष्टयोनि, संकुचित योनि, अतिस्थूल, अतिकृश, प्रसूत, गर्भिणी, परकीय व ब्रह्मचारिणी स्त्री, अमानुषयोनि, गुरुगृह, देवालय, राजगृह, पूज्य अश्वत्थस्थान, स्मशान, वधस्थान, पाणवठा, अंगण, चव्हाटा, पर्वकाळ, योनीवांचून इतर अंग (गुद, मुख इ०), दिवस व डोकें व ऊर यांचें ताडन, आकंठ भुक्त, भितरा, क्षुधित, तृषित, विषमासनी, बाल (१६ वर्षांच्या खालचा), वृद्ध, मूत्रादिकांचे वेगानें युक्त व रोगी अशा मनुष्यानें स्त्रीसंग करूं नये.

**सेवेत कामतः कामं तृप्तो वाजीकृतो हिमे ॥ ७२ ॥**
**त्र्यहाद्वसन्तशरदोः पक्षाद्वर्षानिदाघयोः ।**

हिंवाळ्यांत (शिशिर–हेमंतांत) वाजीकरण औषधांनीं पुष्ट होऊन यथेच्छ मैथुन करावें. वसंत व शरद् ऋतूंमध्यें तीन दिवसांच्या अंतरानें करावें व वर्षा व ग्रीष्मऋतूंमध्यें पंधरा दिवसांनीं एकदां करावें.

**भ्रमक्लमोरुदौर्बल्यबलधात्विन्द्रियक्षयः ॥ ७३ ॥**
**अपर्वमरणं च स्यादन्यथा गच्छतः स्त्रियम् ।**

हा नियम सोडून जे स्त्रीसेवन करितील त्यांना भ्रम, ग्लानि, मांड्या गळणें, बल, धातु व इंद्रिय यांची क्षीणता व अकालीं मरण हीं प्राप्त होतात.

**स्मृतिमेधायुरारोग्यपुष्टीन्द्रिययशोबलैः ॥ ७४ ॥**
**अधिका मन्दजरसो भवन्ति स्त्रीषु संयताः ।**

वर सांगितलेल्या नियमानें स्त्रीसेवन केल्यास स्मृति, बुद्धि, आयुष्य, आरोग्य, पुष्टि, शुक्र,* यश व बल यांची वृद्धि होते व जरा लवकर येत नाहीं.

**स्नानानुलेपनहिमानिलखण्डखाद्यशीताम्बुदुग्धरस-**
**यूषसुराप्रसन्नाः ।**

* येथें इंद्रिय शब्द शुक्रवाची आहे.

सेवेत चानुशयनं विरतौ रतस्य तस्यैवमाशु वपुषः पुनरेति धाम ॥ ७५ ॥

मैथुनानंतर स्नान, उटणें, थंड वारा, शर्करायुक्त खाद्य, थंड पाणी, दूध, मांसरस ( सुरवा ), सार, सुरा व श्वेतसुरा यांचें सेवन करावें आणि मग निद्रा घ्यावी, असें केलें असतां शारीरिक तेज लवकर परत येतें.

श्रुतचरितसमृद्धे कर्मदक्षे दयालौ भिषजि निरनुबन्धे देहरक्षां निवेश्य।

भवति विपुलतेजःस्वास्थ्यकीर्तिप्रभावः स्वकुशलफलभोगी भूमिपालश्चिरायुः ॥ ७६ ॥

विद्येनें परिपूर्ण, आचारानें चांगला, क्रियेनें दक्ष व दयालु अशा वैद्यावर आपल्या देहरक्षणाचें काम सर्वस्वीं सोंपवून दिल्यानें राजाला उत्तम तेज, आरोग्य, कीर्ति व पराक्रम, आपल्या पुण्यफलांचा भोग व चिरकाल आयुष्य यांचा लाभ होतो.

---

# अष्टमोऽध्यायः

## अध्याय ८ वा

अथातो मात्राशितीयमध्यायं व्याख्यास्यामः।

आतां मिताहाराविषयीं अध्याय सांगतों.

मात्राशी सर्वकालं स्यान्मात्रा ह्यग्नेः प्रवर्तिका।
मात्रां द्रव्याण्यपेक्षन्ते गुरूण्यपि लघून्यपि ॥ १ ॥

सर्वदा मिताहारी असावें. मिताहार अग्नि प्रदीप्त करितो, अन्न जड असो किंवा हलकें असो, तें मित प्रमाणानेंच घेतलें पाहिजे.

गुरूणामर्धसौहित्यं लघूनां नातितृप्तता।
मात्राप्रमाणं निर्दिष्टं सुखं यावद्विजीर्यति ॥ २ ॥

जड अन्न अर्धें पोट भरेपर्यंत खावें, हलकें अन्न किंचित् जागा राखून पोटभर खावें. जितकें सुखानें जिरेल तितकेंच आहारमानाचें प्रमाण समजावें.

भोजनं हीनमात्रं तु न बलोपचयौजसे।
सर्वेषां वातरोगाणां हेतुतां च प्रपद्यते ॥ ३ ॥

उचित प्रमाणाहून कमी अन्न खाल्लें असतां बल, पुष्टि व तेज उत्पन्न होत नाहींत. व तें सर्व वातव्याधींस कारणीभूत होतें.

अतिमात्रं पुनः सर्वानाशु दोषान्प्रकोपयेत्।

अतिमात्र आहारानें तर सर्वच दोषांचा त्वरित प्रकोप होतो.

पीड्यमाना हि वाताद्या युगपत्तेन कोपिताः ॥ ४ ॥
आमेनान्नेन दुष्टेन तदेवाविश्य कुर्वते।
विष्टम्भयन्तोऽलसकं च्यावयन्तो विषूचिकाम् ॥ ५ ॥
अधरोत्तरमार्गाभ्यां सहसैवाजितात्मनः।

त्या दुष्ट अपक्व अन्नाच्या योगानें वातादि दोष दाबले जाऊन सर्व एककालीं प्रकुपित होतात, व त्याच अपक्व अन्नामध्यें प्रवेश करून त्याला आंतल्या आंत कोंडून धडा ( अलसक ) उत्पन्न करितात; किंवा त्याचा दोन्ही द्वारांनीं एकदम निचरा सुरू करून त्या खादाड मनुष्यावर पटकीची स्वारी आणितात.

प्रयाति नोर्ध्वं नाधस्तादाहारो न च पच्यते ॥ ६ ॥
आमाशयेऽलसीभूतस्तेन सोऽलसकः स्मृतः।

आहार जिरतहि नाहीं; खालींहि जात नाहीं व ऊर्ध्वहि होत नाहीं ( वांतीवाटें ); आमाशयामध्येंच स्तब्ध होऊन राहतो; अशा स्थितीला अलसक म्हणजे धडा अशी संज्ञा आहे.

विविधैर्वेदनोद्भेदैर्वाय्वादिभृशकोपतः ॥ ७ ॥
सूचीभिरिव गात्राणि विध्यतीति विषूचिका।

वातादिकांच्या तीव्र प्रकोपामुळें विविध वेदना उत्पन्न होऊन सर्वांगास सुया टोंचल्याप्रमाणें पीडा होतात, म्हणून त्या विकाराला विषूचिका ( पटकी ) म्हणतात.

तत्र शूलभ्रमानाहकम्पस्तम्भादयोऽनिलात् ॥ ८ ॥
पित्ताज्ज्वरातिसारान्तर्दाहतृट्प्रलयादयः।

विषूचिकेमध्यें शूल, भ्रम, पोटफुगी, कंप, स्तंभ ( गात्रांचा ताठरपणा ) इत्यादि विकार वातापासून होतात. ज्वर, अतिसार, अंतर्दाह, तृषा, मूर्च्छा हे विकार पित्तापासून होतात.

कफाच्छर्द्यङ्गगुरुतावाक्सङ्गष्ठीवनादयः ॥ ९ ॥

व वांति, अंगजाड्य, वाचा बंद होणें, थुंका, इत्यादि विकार कफापासून होतात.

विशेषाद्दुर्बलस्याल्पवह्नेर्वेगविधारिणः।
पीडितं मारुतेनान्नं श्लेष्मणा रुद्धमन्तरा ॥ १० ॥
अलसं क्षोभितं दोषैः शल्यत्वेनैव संस्थितम्।
शूलादीन्कुरुते तीव्रांश्छर्द्यतीसारवर्जितान् ॥ ११ ॥
सोऽलसः

अलस ( धडा ) हा रोग विशेषेंकरून दुर्बळ, मंदाग्नि व वेगधारण करण्याची संवय असलेल्या मनुष्याला होतो. तो असा कीं, प्रकुपित वायूनें ( आमाशयस्थ मांसतंतूंच्या अतिरिक्त आकुंचनानें ) अन्न दाबलें जाऊन व कफाच्या योगानें ( त्याचा खडा बनून ) तें आंतल्या आंत कोंडलें जाऊन निश्चल होतें, व दोषांनीं क्षुब्ध होऊन एखाद्या शल्याप्रमाणें तीव्र शूलादि विकार उत्पन्न करितें, परंतु त्यांत अतिसार किंवा वांति नसते.

अत्यर्थदुष्टास्तु दोषा दुष्टामबद्धखाः।
यान्तस्तिर्यक्तनुं सर्वां दण्डवत्स्तम्भयन्ति चेत् ॥ १२ ॥
दण्डकालसकं नाम तं त्यजेदाशुकारिणम्।

दोष अत्यंत कुपित झाले म्हणजे ते सूक्ष्मवाहिन्या आमानें बंद करून इकडे तिकडे संचार करून सर्व देह दंडाप्रमाणें ताठवितात. ह्या विकाराला दंडालसक म्हणतात. तो त्वरित प्राण घेणारा असल्यामुळें त्याजवर कांहीं उपाय करूं नये.

विरुद्धाध्यशनाजीर्णशीलिनो विषलक्षणम् ॥ १३ ॥
आमदोषं महाघोरं वर्जयेद्विषसंज्ञकम् ।
विषरूपाशुकारित्वाद्विरुद्धोपक्रमत्वतः ॥ १४ ॥

ज्याला विरुद्धाहाराची व जेवणावर जेवण करण्याची व अजीर्णाची संवय आहे त्याला आमविष नांवाचा महाघोर आमदोष उत्पन्न होतो. त्याचीं लक्षणें विषासारखीं असतात. तो विषरूपी व तत्कालमारक असल्यामुळें व त्याजवर विरुद्ध चिकित्सा करावी लागल्यामुळें वैद्यानें हातीं धरूं नये. विरुद्ध चिकित्सा अशी कीं, रोगाचा हेतु आम असल्यामुळें त्यावर उष्णोपचार केले पाहिजेत व रोगाचें स्वरूप विषासारखें असल्यामुळें त्याजवर शीतोपचार करणें भाग आहे व हे तर दोन्ही परस्परविरुद्ध आहेत.

अथाममलसीभूतं साध्यं त्वरितमुल्लिखेत् ।
पीत्वा सोग्रापटुफलं वार्युष्णं योजयेत्ततः ॥ १५ ॥
स्वेदनं फलवर्तिं च मलवातानुलोमनीम् ।
नाम्यमानानि चाङ्गानि भृशं स्विन्नानि वेष्टयेत् ॥ १६ ॥

आम निश्चल झाल्याचीं लक्षणें दिसतांच तो साध्य असल्यास त्याला वांतीवाटे पाडण्याकरितां वेखंडाची पूड, सैंधव व मदनफळ हीं औषधें घेऊन ऊन पाण्याबरोबर प्यावीं व मग पोट शेकून मलवातांचें अनुलोमन करणाऱ्या फलवर्तीची (वातीची) योजना करावी. हातापायांस आचके येऊं लागल्यास त्यांना खूप शेकून वर फडकीं गुंडाळावीं.

विषूच्यामतिवृद्धायां पार्ष्ण्योर्दाहः प्रशस्यते ।
तदहश्चोपवास्यैनं विरिक्तवदुपाचरेत् ॥ १७ ॥

पटकीचा फार जोर दिसल्यास दोहों खोटांना डाग द्यावे व त्या दिवशीं लंघन करवून मग जुलाब घेतलेल्या दिवसाप्रमाणें खाण्यापिण्याची व्यवस्था करावी.

तीव्रार्तिरपि नाजीर्णी पिबेच्छूलघ्नमौषधम् ।
आमसन्नोऽनलो नालं पक्तुं दोषौषधाशनम् ॥ १८ ॥
निहन्यादपि चैतेषां विभ्रमः सहसातुरम् ।

आमदोष झाला असतां शूलघ्न (शमन) औषध कधींहि घेऊं नये. कारण आमानें मंद झालेला अग्नि दोष, औषध व अन्न यांचें पाचन करण्यास असमर्थ असतो व पचन न झाल्यामुळें त्यांजपासून जो शरीरांत क्षोभ होतो तो तत्काळ प्राण घेतो.

जीर्णाशने तु भैषज्यं युञ्ज्यात् स्तब्धगुरूदरे ॥ १९ ॥
दोषशेषस्य पाकार्थमग्नेः संधुक्षणाय च ।

अन्नाचा पाक झाल्यावर पोटांत नुसता ताठरपणा व जडत्व राहिलें असतां अवशिष्ट दोषाचें पचन करण्यास व अग्नि प्रदीप्त करण्यास औषधांची योजना करावी.

शान्तिरामविकाराणां भवति त्वपतर्पणात् ॥ २० ॥
त्रिविधं त्रिविधे दोषे तत्समीक्ष्य प्रयोजयेत् ।

आमजन्य विकारांची शांति जर म्हणाल तर ती अपतर्पणा (लंघना) नेंच होते. तें लंघन दोषाच्या तारतम्याप्रमाणें तीन प्रकारचें. त्याची योजना दोषतारतम्य पाहून करावी.

तत्राल्पे लङ्घनं पथ्यं मध्ये लङ्घनपाचनम् ॥ २१ ॥
प्रभूते शोधनं तद्धि मूलादुन्मूलयेन्मलान् ।

(ती अशी:) विकार अल्प असला म्हणजे फक्त उपवासरूपी लंघनच हितावह होय. तो मध्यम असल्यास लंघन व पाचन हीं दोन्हीं चालू ठेवावीं. त्याचा फारच जोर असल्यास शोधन आवश्यक आहे, कारण तें दोषांना समूळ बाहेर काढून टाकितें.

एवमन्यानपि व्याधीन् स्वनिदानविपर्ययात् ॥ २२ ॥
चिकित्सेदनुबन्धे तु सति हेतुविपर्ययम् ।
त्यक्त्वा यथायथं वैद्यो युञ्ज्याद्व्याधिविपर्ययम् ॥ २३ ॥

याचप्रमाणें इतर रोगांची चिकित्सा देखील त्यांच्या हेतुविरुद्ध करावी. तरी करूनहि रोग न हटल्यास हेतुविपरीत चिकित्सा बंद करून त्या त्या रोगावर सांगितलेली व्याधिविपरीत चिकित्सा सुरू करावी.*

† तदर्थकारि वा पक्वे दोषे त्विद्धे च पावके ।
हितमभ्यञ्जनस्नेहपानबस्त्यादि युक्तितः ॥ २४ ॥

तीं औषधें हेतुव्याधिविपरीतच असलीं पाहिजेत असें नाहीं, तर त्यांची क्रिया परिणामीं हेतुव्याधिविपरीतासारखी असली म्हणजे बस्स आहे. दोष पक्व होऊन अग्नि प्रदीप्त झाला म्हणजे अभ्यंग, स्नेहपान, बस्ति इत्यादिक युक्तीनें योजलीं असतां हितावह होतात.

अजीर्णं च कफादामं तत्र शोफोऽक्षिगण्डयोः ।
सद्योभुक्त इवोद्गारः प्रसेकोत्क्लेशगौरवम् ॥ २५ ॥

अजीर्ण तीन प्रकारचें—कफापासून जें होतें त्यास आमाजीर्ण म्हणतात. त्यांत डोळ्यांना व गालांना सूज, नुकेंच जेवल्याप्रमाणें ढेंकर, तोंडास पाणी सुटणें, मळमळणें व अंगजाड्य हे विकार उत्पन्न होतात.

विष्टब्धमनिलाच्छूलविबन्धाध्मानसादकृत् ।

वायूपासून विष्टब्धाजीर्ण होतें. त्यानें शूळ, मलावरोध, पोटफुगी व काम करण्याविषयीं अशक्तता हीं उत्पन्न होतात.

पित्ताद्विदग्धं तृण्मोहभ्रमाम्लोद्गारदाहवत् ॥ २६ ॥

पित्तापासून विदग्धाजीर्ण होतें. त्यानें तृषा, मूर्च्छा, भ्रम, आंबट ढेंकर व दाह हे विकार उत्पन्न होतात.

---

* हेतुविपरीत चिकित्सेचें उदाहरण असें कीं, शैत्यापासून झालेल्या ज्वरास सुंठ इत्यादि उष्ण पदार्थ देणें; व्याधिविपरीताचें उदाहरण असें कीं, शीतज्वरास नुसता चिराइताचा काढा देणें (कारण तो थंड असूनहि परिणामीं ज्वरघ्न होत आहे.)

† हेतुविपरीत नसून तदर्थकारी पदार्थांचें उदाहरण असें कीं, पित्तप्रधान व्रणशोथावर पित्तकर उष्णपिंडी बांधणें; व्याधिविपरीत नसून तदर्थकारी पदार्थांचें उदाहरण—वांतीवर वामक पदार्थ (मदनादिक) देणें. भाजलेल्यावर राखेचा व क्षारादिकांचा लेप करणें इत्यादि. अशा प्रकारच्या चिकित्सेला होमियोप्याथी म्हणतात.

लङ्घनं कार्यमामे तु विष्टब्धे स्वेदनं भृशम्।
विदग्धे वमनं यद्वा यथावस्थं हितं भवेत् ॥ १७ ॥

आमाजीर्णावर लंघन मुख्य. विष्टब्धावर तीव्र स्वेदन मुख्य व विदग्धाजीर्णास वमन मुख्य. तथापि ह्या तिन्ही प्रकारांवर ह्या तिन्हींपैकीं कोणताहि उपाय दोषतारतम्याप्रमाणें प्रसंगविशेषीं हितकर होतो.

गरीयसो भवेल्लीनादामादेव विलम्बिका।
कफवातानुबद्धामलिङ्गा तत्समसाधना ॥ १८ ॥

आम बलवत्तर असून सूक्ष्ममार्गामध्यें लीन झाल्यास विलंबिका-नामक रोग उत्पन्न होतो. तो कफवातात्मक असून त्याचीं लक्षणें व चिकित्सा आमाजीर्णाप्रमाणें समजावीं.

अश्रद्धा हृद्व्यथा शुद्धेऽप्युद्गारे रसशेषतः।
शयीत किञ्चिदेवात्र सर्वश्चानशितो दिवा ॥ १९ ॥
स्वप्यादजीर्णी सञ्जातबुभुक्षोऽद्यान्मितं लघु।

रसशेषाजीर्णामध्यें जरी ढेंकर शुद्ध येतो तरी अन्नावर वासना नसते व उरांत दुखतें. ह्या अजीर्णामध्यें दिवसां निद्रा किंचित घ्यावी. इतर सर्व अजीर्णांमध्यें दिवसां उपाशीं निजावें. क्षुद्बोध झाल्यावर मात्र लघु असा मिताहार करावा.

विबन्धोऽतिप्रवृत्तिर्वा ग्लानिर्मारुतमूढता ॥ २० ॥
अजीर्णलिङ्गं सामान्यं विष्टम्भो गौरवं भ्रमः।

अजीर्णाचीं सामान्य लक्षणें हींच कीं, मलांचा अवरोध किंवा अतिप्रवृत्ति होते, वायूनें पोट फुगतें व तो स्वमार्ग सोडून भलतीकडे फिरूं लागतो; ग्लानि, भोंवळ व अंगास जडत्व येतें.

न चातिमात्रमेवान्नमामदोषाय केवलम् ॥ २१ ॥
द्विष्टं विष्टम्भि दग्धामगुरुरूक्षहिमाशुचि।
विदाहि शुष्कमत्यम्बुप्लुतं वान्नं न जीर्यति ॥ २२ ॥

केवळ अतिमात्र अन्न खाल्ल्यानेंच आमदोष होतो असें नाहीं. तर अप्रिय, वातुळ, करपलेलें, हिरवें, जड, रूक्ष, थंड, घाणेरडें, विदाही, शुष्क (नीरस असें अन्न) व फार पाण्यानें युक्त असा आहार देखील जिरत नाहीं.

उपतप्तेन भुक्तं च शोकक्रोधक्षुधादिभिः।

शोक, क्रोध, क्षुधा, इत्यादिकांनीं संतप्त झालेल्या मनुष्याचें अन्नहि जिरत नाहीं.

मिश्रं पथ्यमपथ्यं च भुक्तं समशनं मतम् ॥ २३ ॥
विद्यादध्यशनं भूयो भुक्तस्योपरि भोजनम्।
अकाले बहु चाल्पं वा भुक्तं तु विषमाशनम् ॥ २४ ॥
त्रीण्यप्येतानि मृत्युं वा घोरान् व्याधीन् सृजन्ति वा।

पथ्यकारक व अपथ्यकारक पदार्थ एकाकालीं खाणें याला समशन म्हणतात. पूर्वीं खाल्लेलें जिरलें नाहीं तोंच पुनः दुसऱ्यानें खाणें याचेंच नांव अध्यशन. अकालीं, थोडें किंवा फार खाणें याला विषमाशन म्हणतात. हीं तिन्हीं मृत्यु किंवा घोर व्याधी उत्पन्न करितात.

काले सात्म्यं शुचि हितं स्निग्धोष्णं लघु तन्मनाः ३५
षड्रसं मधुरप्रायं नातिद्रुतविलम्बितम्।
स्नातः क्षुद्वान् विविक्तस्थो धौतपादकराननः ॥ ३६ ॥
तर्पयित्वा पितॄन् देवानतिथीन्बालकान्गुरून्।
प्रत्यवेक्ष्य तिरश्चोऽपि प्रतिपन्नपरिग्रहान् ॥ ३७ ॥
समीक्ष्य सम्यगात्मानमनिन्दन्नब्रुवन्द्रवम्।
इष्टमिष्टैः सहाश्नीयाच्छुचिभक्तजनाहृतम् ॥ ३८ ॥

भोजन करणें तें या विधीनें करावें:—स्नान करून, हात, पाय व तोंड धुऊन, पितर, देव, अतिथि, बालक व गुरु यांची तृप्ति करून, गुरांना व इतर जनावरांना चारा वगैरे घालून आपल्या प्रकृतीचा विचार करून चांगली क्षुधा लागल्यावर शास्त्रोक्तकालीं इष्टमित्रांसह एकान्त स्थानीं जाऊन तेथें आपणावर प्रीति करण्याऱ्या व शुचिर्भूत मनुष्यांनीं वाढलेलें अन्न अनन्यविषय चित्तानें न बोलतां व दोष काढल्यावांचून फार जलद नव्हे व फार सावकाश नव्हे, अशा रीतीनें भक्षण करावें. तें अन्न मधुरप्रचुर षड्रसांनीं युक्त, सात्म्य (संवयीचें), स्वच्छ, द्रवबहुल, पथ्यकारक, स्निग्ध, ऊन, व हलकें असावें.

भोजनं तृणकेशादिदुष्टमुष्णीकृतं पुनः।
शाकावरान्नभूयिष्ठमत्युष्णलवणं त्यजेत् ॥ ३९ ॥

केरकचरा, केंस इत्यादिकांनीं युक्त, पुनः ऊन केलेलें, फार ऊन, फार खारट व फार भाज्या व कडधान्य, यांनीं युक्त असें अन्न खाऊं नये.

किलाटदधिकूर्चीकाक्षारशुक्तामभूलकम्।
कृशशुष्कवराहाविगोमत्स्यमहिषामिषम् ॥ ४० ॥
माषनिष्पावशालूकबिसपिष्टविरूढकम्।
शुष्कशाकानि यवकान् फाणितं च न शीलयेत् ॥४१॥

किलाट, कूर्चिका वगैरे तक्रविकार, दहीं, क्षार, शिर्का, हिरवा मुळा, कृश व शुष्क मांस; तसेंच डुकर, मेंढा, गाय व म्हैस यांचें मांस; मासे, उडीद, पावटे, कमलकंद, भिशीं, पिष्टान्न, मोड आलेलें धान्य, वाळलेल्या भाज्या, यवकसंज्ञक साळ व काकवी यांचें नित्य सेवन करूं नये.

शीलयेच्छालिगोधूमयवषाष्टिकजाङ्गलम्।
सुनिषण्णकजीवन्तीबालमूलकवास्तुकम् ॥ ४२ ॥
पथ्यामलकमृद्वीकापटोलीमुद्गशर्कराः।
घृतदिव्योदकक्षीरक्षौद्रदाडिमसैन्धवम् ॥ ४३ ॥
त्रिफलां मधुसर्पिर्भ्यां निशि नेत्रबलाय च।

गरव्या भाताचे तांदूळ, गहूं, जव, साठेतांदूळ, जांगल प्राण्याचें मांस, कुरडू, हरणदोडी, कोंवळा मुळा, चाकवत, हिरडा, आवळा, मनुका, पडवळ (किंवा परवर), मूग, साखर, घृत, पावसाचें पाणी,

दूध, मध, डाळिंब, व सैंधव यांचें नित्य सेवन करावें; व त्रिफळा मधातुपाशीं नित्य रात्रीं खावी म्हणजे दृष्टि बळकट होते.

स्वास्थ्यानुवृत्तिकृद्यच्च* रोगोच्छेदकरं च यत् ॥ ४४ ॥

तसेंच ज्या ज्या पदार्थानें आरोग्याचें रक्षण व रोगाच्या बीजाचें उन्मूलन होतें, त्या त्या पदार्थाचेंहि नित्य सेवन करावें.

विसेक्षुमोचचोचाम्रमोदकोत्कारिकादिकम् ।
अद्याद्द्रव्यं गुरु स्निग्धं स्वादु मन्दं स्थिरं पुरः ॥ ४५ ॥
विपरीतमतश्चान्ते मध्येऽम्ललवणोत्कटम् ।

भिशीं, ऊंस, केळीं, फणस, आंबे, लाडू, पोळ्या वगैरे जे जड, स्निग्ध, मधुर, मंद ( उशीरानें परिपाक पावणारे ) व घन पदार्थ ते पहिल्यानें खावे. यांच्या विपरीत गुणांचे पदार्थ ( हलके, रूक्ष, तिखट, तीक्ष्ण व पातळ ) शेवटीं खावे; व आंबट व मीठ घातलेले पदार्थ जवणाच्या मध्यभागीं खावे.

अन्नेन कुक्षेर्द्वावंशौ पानेनैकं प्रपूरयेत् ॥ ४६ ॥
आश्रयं पवनादीनां चतुर्थमवशेषयेत् ।

आमाशयाचे दोन भाग अन्नानें भरावे, एक भाग पाण्यानें भरावा व चवथा भाग वातादिकांकरितां रिकामा ठेवावा.

अनुपानं हिमं वारि यवगोधूमयोर्हितम् ॥ ४७ ॥
दधि मद्ये विषे क्षौद्रे कोष्णं पिष्टमयेषु तु ।
शाकमुद्गादिविकृतौ मस्तुतक्राम्लकाञ्जिकम् ॥ ४८ ॥
सुरा कृशानां पुष्ट्यर्थं स्थूलानां तु मधूदकम् ।
शोषे मांसरसो मद्यं मांसे स्वल्पे च पावके ॥ ४९ ॥
व्याध्यौषधाध्वभाष्यस्त्रीलङ्घनातपकर्मभिः ।
क्षीणे वृद्धे च बाले च पयः पथ्यं यथामृतम् ॥ ५० ॥

यवाचे व गव्हांचे पदार्थ खाल्ल्यावर त्यांवर थंड पाणी पिणें हितावह आहे. तसेंच दहीं, मद्य, मध किंवा विष खाल्ल्यावरहि थंड पाणी प्यावें. पिष्टान्नावर कोंबट पाणी प्यावें. भाज्या व मुगाच्या वगैरे डाळींचे पदार्थ खाल्यावर दह्याची निवळ, ताक व आंबट कांजिक ( धान्याम्ल ) प्यावें. कृश असतील त्यांनीं पुष्ट होण्याकरितां सुरा प्यावी व स्थूल असणारांनीं मध व पाणी मिसळून प्यावें. ज्यांना क्षयाचा विकार असेल त्यांनीं मांसरस ( सुरवा ) प्यावा. मांस खाणारांनीं व मंदाग्नि असणारांनीं मद्य प्यावें. व्याधि, औषधसेवन, मार्गक्रमण, भाषण, संभोग, उपवास, ऊन व काम करणें इत्यादि कारणांनीं क्षीण झालेले, वृद्ध व बालक यांना दूध अमृतासारखें हितावह आहे.

विपरीतं यदन्नस्य गुणैः स्यादविरोधि च ।
अनुपानं समासेन सर्वदा तत्प्रशस्यते ॥ ५१ ॥

सारांश, जो जो पातळ पदार्थ अन्नाच्या विपरीत गुणाचा असून संयोगानें विरुद्ध नाहीं, तो तो अनुपानाला उत्तम जाणावा.

अनुपानं करोत्यूर्जां तृप्तिं व्याप्तिं दृढाङ्गताम् ।
अन्नसङ्घातशैथिल्यविक्लित्तिजरणानि च ॥ ५२ ॥

अनुपानाचे योगानें मनास आल्हाद, तृप्ति, अन्नाची सर्व शरीरभर व्याप्ति, शरीरास दृढता, कठिण अन्नाचें शिथिलीकरण, शुष्कान्नाचें द्रवीकरण व पाचन ह्या गोष्टी उत्पन्न होतात.

नोर्ध्वजत्रुगदश्वासकासोरःक्षतपीनसे ।
गीतभाष्यप्रसङ्गे च स्वरभेदे च तद्धितम् ॥ ५३ ॥

ऊर्ध्वांगसंबंधीं रोग, श्वास, कास, उरःक्षत, पीनस व स्वरभेद हे विकार झाले असतां व पुष्कळ बोलण्याचा किंवा गाण्याचा प्रसंग आला असल्यास अनुपानाचें ( कालवणाचें ) सेवन करूं नये.

प्रक्लिन्नदेहमेहाक्षिगलरोगव्रणातुराः ।
पानं त्यजेयुः

ज्यांच्या शरीरांत क्लेद फार आहे व ज्यांना मेह, गलरोग, नेत्ररोग व व्रण झाला आहे त्यांनीं पाणी देखील पिऊं नये.

सर्वश्च भाष्याध्वशयनं त्यजेत् ॥ ५४ ॥
पीत्वा भुक्त्वाऽऽतपं वह्निं यानं प्लवनवाहनम् ।

खाणेंपिणें झाल्यावर सर्वांनाच भाषण, मार्गक्रमण, निद्रा, ऊन, अग्नि ( शेक ), चालणें, अश्वादि वाहन व पोहणें ह्या गोष्टी वर्ज्य आहेत.

प्रसृष्टे विण्मूत्रे हृदि सुविमले दोषे स्वपथगे
विशुद्धे चोद्गारे क्षुदुपगमने वातेऽनुसरति ।
तथाग्नावुद्रिक्ते विशदकरणे देहे च सुलघौ
प्रयुञ्जीताहारं विधिनियमतः कालः स हि मतः ॥ ५५ ॥

मलमूत्रांचा उत्सर्ग, मनाची प्रसन्नता, दोषांची आपापल्या मार्गाकडे प्रवृत्ति, ढेंकरांची शुद्धता, क्षुधेची स्फूर्ति, वायूचें अनुलोमन, अग्नीची प्रदीप्तता, देहलाघव व इंद्रियांचें वैमल्य इतक्या गोष्टी जेव्हां होतील तेव्हां भोजन करावें. हाच काल ( आत्रेयादिकांनीं ) शास्त्रोक्त मानला आहे.

---

* ह्या ठिकाणीं ( रोगोच्छेदकरं ) ह्याचा अर्थ 'रोग न होऊं देणारे' असा केला पाहिजे; कारण 'रोग बरा करणारे' असा केल्यास अनेक पदार्थांवर अतिव्याप्ति होऊन चिकित्सास्थानांत सांगितलेलीं मुस्तापर्पटादि सर्वच औषधि द्रव्यें नित्य सेवनाला योग्य आहेत असें म्हणण्याचा प्रसंग येईल, कारण कोणतीहि औषधि असो ती कोणत्या तरी एखाद्या रोगाचा नाश करितेच. उदाहरण—धोतरा श्वासाचा नाश करितो म्हणून कांहीं त्याचें नित्य सेवन करावें असें कधींहि व्हावयाचें नाहीं. यास्तव ह्या अतिव्याप्ति-वारणार्थ "रोगोच्छेदकरं" याचा अर्थ "रोग बीजरूपी असतांनाच त्याचा उच्छेद करणारे किंवा रोग मुळींच होऊं न देणारे" असा केला पाहिजे. चरक तर स्पष्ट सांगतो, तच्च नित्यं प्रयुञ्जीत स्वास्थ्यं येनानुवर्तते : अजातानां विकाराणामनुत्पत्तिकरं च यत् ॥ ह्यासंबंधानें अरुणदत्तानें विशेष लिहिलें नाहीं. आमचा अर्थ हेमाद्रीला अनुसरून आहे. अरुणदत्ताचा अर्थ चुकला आहे.

# नवमोऽध्यायः

## अध्याय ९ वा.

**अथातो द्रव्यादिविज्ञानीयमध्यायं व्याख्यास्यामः ।**

आतां द्रव्यादिविज्ञानाचा अध्याय सांगतों.

*** द्रव्यमेव रसादीनां श्रेष्ठं ते हि तदाश्रयाः ।**
**पञ्चभूतात्मकं तत्तु क्ष्मामधिष्ठाय जायते ॥ १ ॥**

रसवीर्यविपाकांहून द्रव्य श्रेष्ठ आहे, कारण तें त्यांचें अधिष्ठान आहे. रसादिकांचें† आश्रयभूत जें द्रव्य तें पंचभूतात्मक असून पृथ्वी हा त्याचा मूळ पायाच आहे.

**अम्बुयोन्यग्निपवननभसां समवायतः ।**
**तन्निर्वृत्तिर्विशेषश्च व्यपदेशस्तु भूयसा ॥ २ ॥**

पाण्याच्या योगानें त्याला एखादा विशेष आकार प्राप्त होतो, व अग्नि, वायु व आकाश यांच्या योगानें त्यांच्या रचनेला पूर्णता येते व निरनिराळ्या द्रव्यांमध्यें जो भेद आहे तोहि त्यांच्यामुळेंच. ( उ० मडक्याचा मूळ पाया माती होय; त्या मातीला घटाकार देण्याकरितां पाण्याची आवश्यकता म्हणून " अंबुयोनि " म्हटलें आहे. अग्नि, वायु व आकाश यांच्या योगानें त्याला काठिण्य, पोकळी व कांहीं क्रियाविशेष प्राप्त होतात. तसेंच त्याच्या न्यूनाधिक भावानें द्रव्यांमध्यें घटपटादि भेद उत्पन्न होतात. ) पंचभूतांपैकीं ज्या द्रव्यांत जो भाग अधिक असेल त्या द्रव्यास तदात्मक असें नांव पडतें; ( उ० पार्थिव द्रव्य म्हटलें म्हणजे नुसत्या पृथ्वीपासूनच झालेलें असें नव्हे, तर पंचभूतात्मकच खरें, परंतु त्यांत पृथ्वीचा अंश अधिक असतो म्हणून त्यास ही संज्ञा मिळाली. )

**तस्मान्नैकरसं द्रव्यं भूतसङ्घातसम्भवात् ।**

ज्या अर्थीं द्रव्याची उत्पत्ति भूतसंघातापासूनच आहे, त्या अर्थीं तें अनेक रसांनीं युक्त असतें. एकरसात्मक कधींहि नसतें.

**नैकदोषस्ततो रोगास्तत्र व्यक्तो रसः स्मृतः ॥ ३ ॥**
***अव्यक्तोऽनुरसः किञ्चिदन्ते व्यक्तोऽपि चेष्यते ।**

व त्यामुळें रोगहि एकदोषात्मक कधींहि नसतात. द्रव्य तोंडांत टाकतांच जो धर्म व्यक्त होतो, त्याला रस म्हणतात. तोच रस अव्यक्त असेल, किंचित् व्यक्त असेल किंवा द्रव्य तोंडांत घातल्यावर बऱ्याच वेळानें ( मुख्य रसाच्या मागून ) व्यक्त होईल तर त्याला अनुरस म्हणतात.

**गुर्वादयो गुणा द्रव्ये पृथिव्यादौ रसाश्रये ॥ ४ ॥**
**रसेषु व्यपदिश्यन्ते साहचर्योपचारतः ।**

गुरु, लघु इ० गुण रसांना आश्रयभूत जीं पार्थिव ( ज्यांत पृथ्वीचा अंश फार अशीं ) द्रव्यें, त्यांचे असून त्यांचा रसावर आरोप करितात; कारण ते गुण व रस हे दोन्ही द्रव्याश्रितच असल्यामुळें त्यांचें साहचर्य आहे.

**तत्र द्रव्यं गुरुस्थूलस्थिरगन्धगुणोल्बणम् ॥ ५ ॥**
**पार्थिवं गौरवस्थैर्यसङ्घातोपचयावहम् ।**

ह्या पंचविध द्रव्यांपैकीं ज्यांत जडत्व, स्थूलत्व, घनत्व व गंधवत्व हे गुण मुख्यत्वेंकरून असतात त्याला पार्थिव द्रव्य म्हणतात. त्यांच्या योगानें पदार्थाला जडत्व, घनत्व, काठिण्य व स्थूलता हीं प्राप्त होतात.

**द्रवशीतगुरुस्निग्धमन्दसान्द्ररसोल्बणम् ॥ ६ ॥**
**आप्यं स्नेहनविष्यन्दक्लेदप्रल्हादबन्धकृत् ।**

द्रवत्व, शैत्य, गुरुत्व, स्निग्धत्व, मंदत्व, सांद्रत्व व रसवत्त्व, हे गुण ज्यांत प्रमुख असतात तें आप्यद्रव्य जाणावें; त्याचे योगानें ओशटपणा, स्राव, ओलसरपणा, तृप्ति व संधान ह्या गोष्टी उत्पन्न होतात. ( संधान म्हणजे दोन भाग एकत्र चिकटविणें. )

**रूक्षतीक्ष्णोष्णविशदसूक्ष्मरूपगुणोल्बणम् ॥ ७ ॥**
**आग्नेयं दाहभावर्णप्रकाशपचनात्मकम् ।**

आग्नेय द्रव्यामध्यें रूक्षता, तीक्ष्णता, उष्णता, स्वच्छता, सूक्ष्मता व सरूपता हे गुण मुख्य असून ते दाह, कांति, वर्ण, प्रकाश ( किंवा रूपज्ञान ) व पचन ह्यांना कारणीभूत आहेत.

**वायव्यं रूक्षविशदं लघु स्पर्शगुणोल्बणम् ॥ ८ ॥**
**रौक्ष्यलाघववैशद्यविचारग्लानिकारकम् ।**

वायुमय द्रव्यामध्यें रूक्षता, स्वच्छता, लघुत्व व स्पर्शज्ञेयता हे गुण प्रमुख असून तें सेवन करणारांमध्येंहि त्यांना उत्पन्न करितें व चंचलता व ग्लानि यांना कारणीभूत आहे.

---

* वैद्यशास्त्रांतील द्रव्य शब्दाची व्याख्या वैशेषिकांच्या लक्षणांहून निराळी असल्यामुळें ग्रंथकर्त्यानें प्रथमच त्याची व्याख्या दिली आहे. चरकानें जी द्रव्य शब्दाची व्याख्या दिली आहे, ती वैशेषिकांनाच अनुसरून आहे. त्या व्याख्येप्रमाणें ( खादीन्यात्मा मनः कालो दिशश्च द्रव्यसंग्रहः ) वेगळालीं पंचभूतें व आत्मा, मन, काल व दिशा या सर्वांनाच द्रव्यत्व येतें. परंतु त्या अर्थानें द्रव्य शब्दाचा उपयोग वैद्यकांत केलेला नाहीं, कारण येथें हरीतक्यादि जे पंचभूतात्मक ( संयुक्त ) पदार्थ त्यांनाच द्रव्य ही संज्ञा लावितात. संग्रहांत म्हटलेंच आहे " इह हि द्रव्यं पंचभूतात्मकम् । "

† या श्लोकाचा शब्दशः तर्जुमा केल्यास 'रसादिकांमध्यें द्रव्यच श्रेष्ठ' असा अर्थ होतो. हे रसादिक कोणते याचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, पहिल्या अध्यायांत प्रथम रसाचा निर्देश करून मग द्रव्य, वीर्य व विपाक यांची अनुक्रमें मांडणी केली आहे. तेच हे रसादिक होत; किंवा याच ( ९ व्या ) अध्यायांत जे रसवीर्य विपाकप्रभाव सांगितले आहेत, त्यांना उद्देशूनहि रसादिक असें म्हटलें असेल व तसें असल्यास 'रसवीर्यविपाकाहून' द्रव्यच श्रेष्ठ असें जें आम्हीं म्हटलें आहे त्यांत प्रभावाची गणना केली पाहिजे.

*ह्या श्लोकाच्या उत्तरार्धाचा अर्थ व अन्वय आम्हीं हेमाद्रीप्रमाणें लाविला आहे. ह्या रीतीनें अनुरस तीन प्रकारचा असूं शकतो. अरुणदत्ताच्या अर्थाप्रमाणें तो दोनच प्रकारचा ( अव्यक्त किंवा अन्ते किंचिद्व्यक्त ); परंतु अनुभवानें त्याचे तीन प्रकार सिद्ध होतात. ( अव्यक्त, किंचित् व्यक्त किंवा अन्ते व्यक्त—जसें आवळ्याचें माधुर्य )

**नाभसं सूक्ष्मविशदलघुशब्दगुणोल्बणम् ॥ ९ ॥**
**सौषिर्यलाघवकरं**

आकाशमय द्रव्यामध्यें सूक्ष्मता, स्वच्छता, लघुत्व व शब्दोत्पादकता-हे गुण प्रमुख असून ते पोकळी व लघुत्व यांना कारणीभूत आहेत.

**जगत्येवमनौषधम् ।**
**न किञ्चिद्विद्यते द्रव्यं वशान्नानार्थयोगयोः ॥१०॥**

याप्रमाणें द्रव्यामध्यें सर्व पंचमहाभूतांचे गुण असल्यामुळें व त्याच्या नानाप्रकारच्या योजना व कल्पना असल्यामुळें ह्या जगांत औषध नाहीं असें कोणतेंहि द्रव्य नाहीं.

**द्रव्यमूर्ध्वगमं तत्र प्रायोऽग्निपवनोत्कटम् ।**
**अधोगामि च भूयिष्ठं भूमितोयगुणाधिकम् ॥ ११ ॥**

ऊर्ध्वगामि ( वांतिकारक ) द्रव्य प्रायः अग्निपवनात्मक असतें व अधोगामि ( विरेचक ) विशेषेंकरून भूमिजलात्मक असतें.

**इति द्रव्यं रसो भेदैरुत्तरत्रोपदेक्ष्यते ।**

येथपर्यंत द्रव्याविषयीं झालें. रसाचे भेद पुढें सांगितले जातील.

**वीर्यं पुनर्वदत्येके गुरु स्निग्धं हिमं मृदु ॥ १२ ॥**
**लघु रूक्षोष्णतीक्ष्णं च तदेवं मतमष्टधा ।**

वीर्याविषयीं जर म्हणाल तर कित्येक ऋषि त्याचे गुरु, लघु, स्निग्ध, रूक्ष, हिम ( शीत ), उष्ण, मृदु व तीक्ष्ण असे आठ भेद करितात.

**चरकस्त्वाह वीर्यं तद्येन या क्रियते क्रिया ॥ १३ ॥**
**नाऽवीर्यं कुरुते किञ्चित्सर्वा वीर्यकृता हि सा ।**

चरक तर असें म्हणतो कीं, ज्याच्या योगानें जी जी क्रिया होते तें तें ( त्या क्रियेचें साधन ) वीर्य होय. कारण वीर्यावांचून कोणतीहि क्रिया व्हावयाची नाहीं. सर्व क्रिया वीर्यानेंच होतात. ( सारांश, जितक्या क्रिया तितकीं वीर्यें समजावीं.)

**गुर्वादिष्वेव वीर्याख्या तेनान्वर्थेति वर्ण्यते ॥ १४ ॥**
**समग्रगुणसारेषु शक्त्युत्कर्षविवर्तिषु ।**
**व्यवहाराय मुख्यत्वाद्बह्वग्रग्रहणादपि ॥ १५ ॥**

ज्या अर्थी वीर्य क्रियेला साधनीभूत आहे, त्याअर्थी ( वर सांगितलेल्या ) गुर्वादि गुणांनाच ती संज्ञा अन्वर्थक होते, कारण सकलगुणसमूहामध्यें त्यांच्याच अंगीं चिरस्थायित्व व शक्त्युत्कर्ष आढळतो व व्यवहारामध्येंहि त्यांचाच विशेष उपयोग होत असून बहुगुणगणनेमध्यें त्यांचेंच नांव पहिल्यानें येतें.

**अतश्च विपरीतत्वात्सम्भवन्त्यपि नैव सा ।**
**विवक्ष्यते रसाद्येषु वीर्यं गुर्वादयो ह्यतः ॥ १६ ॥**

ह्या गोष्टी रसादिकांमध्यें नसल्यामुळें त्यांना वीर्य ही संज्ञा वरील लक्षणाप्रमाणें संभवत असूनहि मिळत नाहीं. म्हणून गुर्वादिकांनाच वीर्य म्हणावें.

**उष्णं शीतं द्विधैवान्ये वीर्यमाचक्षतेऽपि च ।**

दुसरे कित्येक ऋषि उष्ण व शीत अशीं दोनच वीर्यें मानतात. कां जर म्हणाल तर

**नानात्मकमपि द्रव्यमग्नीषोमौ महाबलौ ॥ १७ ॥**
***व्यक्ताव्यक्तं जगदिव नातिक्रामति जातुचित् ।**

जरी द्रव्यें नानाप्रकारचीं आहेत तरी महाशक्तिमान् जे अग्नि व सोम यांना सोडून कोणतेंहि द्रव्य नाहीं. जसें सर्व चराचर विश्व प्रकृतिविकृत्यात्मक आहे, तसेंच द्रव्यमात्र अग्नीषोमात्मकच ( उष्ण किंवा शीत ) आहे.

**तत्रोष्णं भ्रमतृड्ग्लानिस्वेददाहाशुपाकिताः ॥ १८ ॥**
**शमं च वातकफयोः करोति शिशिरं पुनः ।**
**ह्लादनं जीवनं स्तम्भं प्रसादं रक्तपित्तयोः ॥ १९ ॥**

त्यांपैकीं जें उष्ण वीर्य तें भ्रम, तृषा, ग्लानि, स्वेद, दाह ( तप्तता ), अन्नाचा त्वरित परिपाक व वातकफांचा उपशम इतक्या गोष्टींना कारणीभूत आहे. व शीत वीर्य आल्हाद व जीवन-क्रियेला उत्तेजन देतें व आकुंचन† ( किंवा थंड करणें ) व रक्त आणि पित्त यांची शुद्धि करितें.

**जाठरेणाग्निना योगाद्यदुदेति रसान्तरम् ।**
**रसानां परिणामान्ते स विपाक इति स्मृतः ॥ २० ॥**

---

* ह्या श्लोकांतील 'व्यक्ताव्यक्त' पदाचा अर्थ आम्हीं प्रकृति व विकृति ह्या शब्दांनीं दाखविला आहे. हे शब्द सांख्यांचे आहेत. सर्व जगत् ( पुरुषेतर ) २४ तत्त्वांनीं झालें आहे, असें त्यांचें मत असून त्यांपैकीं जें आद्य तत्त्व तेंच सर्वांचें कारण असून स्वतःसिद्ध आहे व त्यासच ते प्रकृति, प्रधान किंवा अव्यक्त अशी संज्ञा देतात. ह्या अव्यक्तापासून जीं इतर २३ तत्त्वें निर्माण होतात त्यांस 'व्यक्त' किंवा 'विकार' अशी संज्ञा आहे. म्हणून सर्व जग प्रकृतिविकृत्यात्मक आहे. आतां 'जगत्' या शब्दामध्यें सर्व आत्मानात्म पदार्थांचा अंतर्भाव केल्यास अव्यक्त शब्दाचा अर्थ केवळ प्रकृतिपर न करतां प्रकृति व पुरुष असा ( अरुण-दत्तानें सुचविल्याप्रमाणें ) करावा व तसा अर्थ करण्यास चरकाचाहि आधार आहे ( च. शा. १ ); परंतु तसें केल्यानें दृष्टान्त जुळत नाहीं. कारण दृष्टान्त तत्त्वद्वयनिरूपणार्थच आहे.

† 'स्तंभ' शब्द 'स्वेद' शब्दाच्या उलट आहे. म्हणून त्याचा अर्थ दोन शब्दांनीं दाखविला आहे: 'आकुंचन किंवा थंड करणें.' हेमाद्रीनें त्याचा अर्थ 'स्वेदापनयनं' ह्या शब्दांनीं केला आहे. स्वेदानें जसा शिरादिकांचा विकास होतो, तसाच तत्प्रतियोगी जें स्तंभन त्यानें आकुंचन होतें. तसेंच 'स्वेदन' म्हणजे जसें उष्णता वाढविणें, तसेंच स्तंभन म्हणजे ती कमी करणें अर्थात् थंड करणें ( स्वेदापनयनम् ). स्तंभन शब्दांचा अर्थ इतका व्यापक आहे कीं, ह्या दोन शब्दांची योजना करून देखील त्याचा सर्व अर्थ मराठींत येत नाहीं. स्तंभकाचीं जीं अनेक कार्यें आहेत, त्यांपैकीं हीं दोन ( आकुंचन व थंड करणें ) प्रमुख असल्यामुळें त्यांचा अर्थ दाखविण्याकरितां आम्हीं त्यांची योजना केली आहे. ( त्याच्या इतर कार्यांच्या संबंधानें सूत्रस्थान अ. १७, श्लोक १९ पूर्वार्ध पहा. )

रसांचा जठराग्नीशीं योग होऊन त्यांचा परिपाक झाला म्हणजे जें रसांतर उत्पन्न होतें त्याला विपाक म्हणतात.

**स्वादुः पटुश्च मधुरमम्लोऽम्लं पच्यते रसः ।**
**तिक्तोषणकषायाणां विपाकः प्रायशः कटुः ॥ २१ ॥**

गोड व खारट पदार्थांचा विपाक प्रायः मधुर होतो. अम्लाचा प्रायः अम्ल व कडू, तिखट व तुरट यांचा प्रायः तिखट होतो.

**रसैरसौ तुल्यफलस्तत्र द्रव्यं शुभाशुभम् ।**
**किञ्चिद्रसेन कुरुते कर्म पाकेन चापरम् ॥ २२ ॥**
**गुणान्तरेण वीर्येण प्रभावेणैव किञ्चन ।**

विपाकाची क्रिया रसाप्रमाणेंच असते. एखादें द्रव्य रसाचे योगानें हिताहितकर्म करितें. (उ० मध कषायरसाच्या योगानें पित्त शमवितो.) एखादें विपाकाच्या योगानें करितें. (उ० तोच मध कटुविपाकी असल्यामुळें कफाचा नाश करितो.) दुसरें एखादें गुर्वादिगुणांतरद्वारां करितें. (उ० कांजिक आंबट असूनहि रुक्षत्वामुळें कफघ्न आहे.) तिसरें एखादें वीर्यानें कर्म करितें (उ० मोठें पंचमूल कडू व तुरट असूनहि पित्तघ्न नसून वातघ्न आहे, कारण तें उष्णवीर्य आहे.) व आणखी एखादें द्रव्य प्रभावानें काम करितें. (उ० दारू अम्ल व उष्ण असूनहि तिच्या अंगीं दुग्धोत्पादन करण्याचा प्रभाव आहे.)

**यद्द्रव्ये रसादीनां बलवत्त्वेन वर्तते ॥ २३ ॥**
**अभिभूयेतरांस्तत्तत्कारणत्वं प्रपद्यते ।**

द्रव्यामध्यें रस, वीर्य, विपाक व प्रभाव ह्यांपैकीं ज्याचा जोर अधिक असेल, तो तो गुण इतरांचा पराभव करून आपलेंच काम बजावितो.

**विरुद्धगुणसंयोगे भूयसाऽल्पं हि जीयते ॥ २४ ॥**

एकाच द्रव्यांत विरुद्ध गुणांचा समागम झाल्यास ज्या गुणाचा अंश ज्यास्त असेल तो हीन गुणाचा पराभव करितो. (जसें दूध जरी शीतवीर्य आहे तरी त्याचें जें स्नेहगौरवप्राचुर्य त्याचे योगानें ते वातघ्न कार्य करितें, शैत्यामुळें वाताचा प्रकोप करीत नाहीं.)

**रसं विपाकस्तौ वीर्यं प्रभावस्तान्यपोहति ।**
**बलसाम्ये रसादीनामिति नैसर्गिकं बलम् ॥ २५ ॥**

विपाक समशक्तिक रसाचा पराभव करितो. वीर्य समशक्तिक रसविपाकांचें कांहीं चालूं देत नाहीं व या तिहींचीहि शक्ति जरी प्रभावाच्या बरोबर असली, तरी तो त्यांचा पराभव करितो. हें ह्यांचें स्वाभाविक बल होय.

**रसादिसाम्ये यत्कर्म विशिष्टं तत्प्रभावजम् ।**

दोन किंवा अधिक पदार्थांचे रसवीर्यविपाक एकसारखे असूनहि जो त्यांच्या क्रियेमध्यें भेद आढळतो तो प्रभावामुळें.

**दन्ती रसाद्यैस्तुल्याऽपि चित्रकस्य विरेचनी ॥ २६ ॥**
**मधुकस्य च मृद्वीका घृतं क्षीरस्य दीपनम् ।**

उदाहरणार्थ दंती व मनुका हीं अनुक्रमें चित्रक व ज्येष्ठीमध यांच्याशीं रसवीर्यविपाकांनीं समान असतांहि रेचक आहेत. तसेंच तूप दुधाशीं रसवीर्यविपाकांनीं समान असूनहि दीपक आहे. (हे जे विशेष गुण ते प्रभावजन्य होत.)

**इति सामान्यतः कर्म द्रव्यादीनां पुनश्च तत् ॥ २७ ॥**
**विचित्रप्रत्ययारब्धद्रव्यभेदेन भिद्यते ।**

हीं जीं द्रव्यादिकांचीं कर्में सांगितलीं तीं जरी सामान्यतः खरीं आहेत तरी कित्येक द्रव्यांचे घटकावयव कांहीं विचित्र* रीतीनें संयुक्त झाल्यामुळें त्यांचीं कर्में केव्हां केव्हां ह्या सामान्य नियमाहून भिन्न असतात.

---

* ह्या श्लोकांचा अर्थ हेमाद्रि व अरुणदत्त यांच्या मतानें कांहीं निराळ्या तऱ्हेचा होतो. समानप्रत्ययारब्ध व विचित्रप्रत्ययारब्ध असे द्रव्याचे दोन भेद कल्पितात. ज्या द्रव्यामध्यें द्रव्यजनक महाभूतें एका प्रकारचीं व रसादिकांना उत्पन्न करणारीं महाभूतें एका प्रकारचीं, तें विचित्रप्रत्ययारब्ध द्रव्य (यस्मिन्द्रव्ये रसादीनामन्यानि महाभूतान्यारम्भकाणि द्रव्यस्य चारम्भकाण्यपराणि च तद्द्रव्यं विचित्रप्रत्ययारब्धम्), व ज्या द्रव्यामध्यें द्रव्यजनक व रसादिजनक भूतें समजातीयच असतात, तें समानप्रत्ययारब्ध द्रव्य. वर जे द्रव्यादिकांचे सामान्य गुण सांगितले ते ह्या समानप्रत्ययारब्ध द्रव्यांना मात्र लागू आहेत. व अशींच द्रव्यें फार आहेत. परंतु कांहीं द्रव्यें अशींहि आढळतात कीं, तेथें हा सामान्य नियम लागू पडत नाहीं, व याचें कारण त्यांचें विचित्रप्रत्ययारब्धत्व. मधुर, कषाय व तिक्त रस जरी प्रायः शीतवीर्य असतात तरी महत्पञ्चमूल, आनूप मांस, रुई अगर गुळवेल ह्यांत त्या नियमाचा अपवाद आढळतो, कारण हीं उष्णवीर्यें आहेत. कांहीं अम्ल पदार्थ ग्राही आहेत (जसें [कवीठ] कवठ) व कांहीं भेदक आहेत (जसा आवळा). तिखट पदार्थ प्रायः शुक्रनाशक खरे तथापि सुंठ व पिंपळी वृष्य आहेत. तुरट पदार्थ प्रायः स्तंभक व शीत खरे, परंतु हिरड्यामध्यें त्यांना अपवाद आढळतो. याच कारणास्तव हीं सर्व उदाहरणें देऊन चरकानें म्हटलें आहे 'तस्माद्रसोपदेशेन न सर्वं द्रव्यमादिशेत्'। असा पुष्कळ विचार करून अरुणदत्तानें (वर सांगितलेल्या अर्थाचें) विचित्रप्रत्ययारब्धत्वच ह्या अपवादास कारण आहे असें सांगितलें आहे; परंतु आमच्या मतें विचित्रप्रत्ययारब्धत्व याचा अर्थ इतका ओढून ताणून करण्याची आवश्यकता दिसत नाहीं. आम्हीं केलेला अर्थ अगदीं सरळ असून अपवादाची उपपत्ति ह्या अर्थाप्रमाणें चांगली जुळते व हा अर्थ हल्लींच्या रसायनशास्त्रांतील कल्पनेशीं जुळतो; सबब ग्रंथकर्त्याची विवक्षाहि अशीच असावी असें वाटतें. आम्ही जें म्हणतों तें जास्त स्पष्टीकरण केल्याशिवाय चांगलें लक्षांत यावयाचें नाहीं, म्हणून येथें थोडासा विस्तार करणें जरूर आहे. ह्या अध्यायांत जे द्रव्यादिकांचे सामान्य गुण सांगितले आहेत, त्यांना जेव्हां अपवाद आढळूं लागले तेव्हां त्या अपवादांना कांहीं तरी हेतु दाखविणें आचार्यांना आवश्यक पडलें. गहूं व जव हे दोन्ही मधुर व गुरु असे असून एक वातहारक कां व दुसरा वातकारक कां हा प्रश्न सहजच त्यांस उत्पन्न झाला, व त्याजवरचें उत्तरहि थोडक्यांत सुचलें. तें हेंच कीं, 'गहूं' व 'जव' हीं दोन्हीं जरी पार्थिव द्रव्यें आहेत व म्हणून त्यांचे घटकावयव एकच (सजातीय) आहेत, तरी त्या घटकावयवांच्या रचनेमध्यें थोडाबहुत जरी फरक पडला तरी त्यांचे गुण बदलतील व ह्या रचनाविशेषावरून किंवा भिन्न प्रमाणावरून त्या द्रव्यांना विचित्रप्रत्ययारब्ध असें त्यांनीं म्हटलें आहे. हल्लींच्या रसायनशास्त्राच्या दृष्टीनें गहूं व सातू, उडीद

[ पृष्ठ ४८ पहा ]

**स्वादुर्गुरुश्च गोधूमो वातजिद्वातकृद्यवः ॥ १८ ॥**
**उष्णा मत्स्याः पयः शीतं कटुः सिंहो न शूकरः ।**

[ ४७ पृष्ठावरून पुढें चालू ]

व हरभरा, तीळ व करडई, मनशील व हरताळ इत्यादि पदार्थांमध्यें जो फरक आहे, तो ह्याच कारणामुळें (म्हणजे प्रमाणभिन्नत्वामुळें आलेल्या विचित्रप्रत्ययारब्धत्वामुळें ) ह्या निरनिराळ्या द्वंद्वांतील तत्त्वें तींच असून त्यांचें प्रमाण मात्र भिन्न आहे. (उदा० हरताळ व मनशील या दोहोंतहि आर्सेनिक व गंधक हींच दोन तत्त्वें, परंतु त्यांचीं प्रमाणें भिन्न आहेत.) तसेंच त्या शास्त्रांत सांगितलेले कांहीं पदार्थ तर असे आहेत कीं, ते सर्व सारख्याच तत्त्वांपासून झाले असतात इतकेंच नव्हे, तर त्यांचीं घटकतत्त्वें प्रमाणानें देखील सारखींच असतात. ह्या ठिकाणीं गुण बदलण्याला कारण काय तें रचनाविशेष ( संनिवेशविशेष ), म्हणजे त्या घटकतत्त्वाचे परमाणु एका द्रव्यांत ज्या तऱ्हेनें एकमेकांस येऊन चिकटलेले असतात, त्याहून भिन्न तऱ्हेनें दुसऱ्या द्रव्यांत ते एकमेकांस चिकटतात. टर्पेंटाईन तेल ज्या घटकतत्त्वापासून झालें आहे, त्याच घटकतत्त्वांपासून लवंगा, धणें, जिरें, वगैरेंपासून काढलेलीं तेलेंहि झालेलीं असून त्या टर्पेंटाईन वगैरे पदार्थांचें जें वैचित्र्य आहे तें ह्याच कारणामुळें; म्हणजे ह्या द्रव्यांचें विचित्रप्रत्ययारब्धत्व केवळ ह्या रचनाविशेषावरच अवलंबून आहे. त्या सर्वांत कार्बनचे १० भाग व हैड्रोजनचे १६ भाग असतात. हिरा हा कोळशाचाच एक परिणामविशेष आहे. ह्या दोहोंचें तत्त्व एकच आहे, परंतु दोहोंच्या गुणांत वैलक्षण्य फारच आहे. ह्या वैलक्षण्याचें कारण केवळ परमाणूंचा सन्निवेशविशेष. जरी अर्वाचीन रसायनशास्त्रांतील महाभूतांचा पूर्वाचार्यांच्या महाभूतांशीं कांहीं मेळ नाहीं, तथापि द्रव्याच्या गुणवैचित्र्याला प्रमाणविशेष व रचनाविशेष कारण होऊं शकतील, ही कल्पना पूर्वाचार्यांच्या मनांत आली नसेल असें म्हणतां येत नाहीं. ही कल्पना हल्लींच्या सुधारलेल्या विचारसरणीस जुळत असल्यामुळें व विचित्रप्रत्ययारब्ध ह्या पदसमुच्चयाचा अर्थ ह्या कल्पनेच्या अनुरोधानें केल्यास जास्त सरळ होत असल्यामुळें आम्हीं प्रस्तुत श्लोकांचें भाषांतर दोन्ही टीकांहून भिन्न प्रकारें केलें आहे. टीकाकारांच्या अर्थाप्रमाणें अर्थ केल्यास उक्त पदाचा अर्थ करण्यामध्यें ओढाताण करावी लागते. एवढेंच नव्हे, तर असा अर्थ करण्यानें उपपत्तीहि चांगली जुळत नाहीं. हें कसें म्हणाल तर पहा. प्रश्न असा आहे कीं, कटु रस प्रायः शुक्रनाशक असून पिंपळी व सुंठ ह्यांमध्यें तो शुक्रवर्धक कसा होतो? आमच्या अर्थाप्रमाणें उत्तर हेंच कीं, शुक्रवर्धक व शुक्रनाशक अशा द्विविध कटुरसांचीं जीं घटक (आरंभक) तत्त्वें तीं परस्परांपासून रचनेमध्यें किंवा प्रमाणामध्यें भिन्न (विचित्रप्रत्ययारब्ध) आहेत. टीकाकारांच्या अर्थाप्रमाणें वरील प्रश्नाचें उत्तर हें कीं, शुक्रनाशक कटुपदार्थांतील द्रव्यजनक व रसादिजनक महाभूतें हीं समान असतात व शुक्रवर्धक जे (अपवादक) पिंपळी वगैरे कटु पदार्थ त्यांत तीं समान नसतात. (उक्तं च हेमाद्रिणा। क्वचिद्द्रव्ये यादृगेव भूतसङ्घातो द्रव्यस्यारम्भकस्तादृगेव रसादीनां तत्समानप्रत्ययारब्धं तत्सामान्यगुणान्नातिक्रामति। क्वचिदन्यादृग्भूतसङ्घातो द्रव्यस्यारम्भकोऽन्यादृग्रसादिष्वप्यन्यादृग्गुणस्येत्यादि तद्विचित्रप्रत्ययारब्धं। तत्सामान्यगुणानातिक्रामति ). ह्या दोन्ही उत्तरांपैकीं समअसता व सरळपणा कोणत्यांत जास्त आहे, याचा वाचकांनींच विचार करावा. कोणत्याहि दोन कार्यांतील वैषम्याचा हेतु दाखविणें झाल्यास त्यांच्या कारणामध्यें परस्पर वैषम्य दाखविलें पाहिजे (जसें वरील उदाहरणांत दोन कटु रसांमध्यें आम्हीं दाखविलें ). त्या दोन कारणांचें पदार्थांतरांशीं वैषम्य ( किंवा साम्य ) दाखवून उपयोग नाहीं ( जसें टीकाकारांनीं प्रस्तुत प्रसंगीं केलें आहे. )

गहूं व जव हे दोन्ही मधुर व जड असून एक वातघ्न व दुसरा वातकारक आहे. दूध व मासे तद्वतच असून एक शीतवीर्य व दुसरे उष्णवीर्य आहेत. तसेंच सिंह व डुकर हे दोन्ही पदार्थ मधुर व जड असून एक कटुविपाकी व दुसरा मधुरविपाकी आहे.

---

# दशमोऽध्यायः

## अध्याय १० वा.

## अथातो रसभेदीयमध्यायं व्याख्यास्यामः

आतां रसभेदाविषयीं अध्याय सांगतों.

**क्ष्माम्भोऽग्निक्ष्माम्बुतेजःखवाय्वग्न्यनिलगोऽनिलैः ।**
**द्वयोल्बणैः क्रमाद्भूतैर्मधुरादिरसोद्भवः ॥ १ ॥**

मधुर, अम्ल, लवण, कटु, तिखट व तुरट हे षड्रस पंचभूतात्मकच असून प्रत्येकांत कोणत्या तरी दोन महाभूतांचा अंश अधिक असतो. तीं भूतद्वयें अनुक्रमानें येणेंप्रमाणें आहेत.—पृथ्वी व जल, पृथ्वी व अग्नि, अग्नि व जल, आकाश व वायु, अग्नि व वायु आणि पृथ्वी व वायु.

**तेषां विद्याद्रसं स्वादुं यो वक्त्रमनुलिम्पति ।**
**आस्वाद्यमानो देहस्य ह्लादनोऽक्षप्रसादनः ॥ २ ॥**
**प्रियः पिपीलिकादीनाम्**

जो भक्षण करितांना तोंडास चिकटा, देहास उत्तेजन, व इंद्रियांस प्रसन्नता येते व जो मुंग्या, माशा वगैरेंना प्रिय आहे तो मधुर रस जाणावा.

**अम्लः क्षालयते मुखम् ।**
**हर्षणो रोमदन्तानामक्षिभ्रुवनिकोचनः ॥ ३ ॥**

अम्लरसानें तोंडास पाणी सुटतें, दांत आंबतात, रोमांच येतात व नेत्र आणि भिवया यांचें आकुंचन होतें.

**लवणः स्यन्दयत्यास्यं कपोलगलदाहकृत् ।**

लवणरसानें तोंडास पाणी सुटतें आणि गाल व गळा यांचा दाह होतो.

**तिक्तो विशदयत्यास्यं रसनं प्रतिहन्ति च ॥ ४ ॥**

कडू रसानें तोंडाचा चिकटा नाहींसा होतो व कांहीं वेळपर्यंत जिव्हेचें रसज्ञान नष्ट होतें.

**उद्वेजयति जिव्हाग्रं कुर्वंश्चिमिचिमां कटुः ।**
**स्रावयत्यक्षिनासास्यं कपोलौ दहतीव च ॥ ५ ॥**

तिखट रसानें जिव्हाग्राची आग होते व तोंड चुणचुणतें, गालांचा दाह होतो व तोंड, नाक व डोळे यांचा स्राव सुरू होतो.

कषायो जडयेज्जिह्वां *कण्ठस्रोतोविबन्धकृत्।

तुरट रस जिव्हा जड करितो, व कंठाचा व वाहिन्यांचा अवरोध करितो.

रसानामिति रूपाणि कर्माणि

हीं रसांचीं लक्षणें झालीं. आतां त्यांचीं कर्में सांगतों.

मधुरो रसः॥ ६॥

आजन्मसात्म्यात्कुरुते धातूनां प्रबलं बलम्।
बालवृद्धक्षतक्षीणवर्णकेशेन्द्रियौजसाम्॥ ७॥
प्रशस्तो बृंहणः कण्ठ्यः स्तन्यसन्धानकृद्गुरुः।
आयुष्यो जीवनः स्निग्धः पित्तानिलविषापहः॥ ८॥
कुरुतेऽत्युपयोगेन स मेदःकफजान् गदान्।
स्थौल्याग्निसादसंन्यासमेहगण्डार्बुदादिकान्॥ ९॥

मधुर रसाचें जन्मापासून सात्म्य (संवय) असल्यामुळें तो धातूंचें बळ अत्यंत वाढवितो. बाल, वृद्ध, उरःक्षती व क्षयी यांना व वर्ण, केश, इंद्रियें, कंठ व ओज यांना हितावह व पौष्टिक, स्तन्यवर्धक, संधानकर (हाडें सांधणारा), जड, आयुर्वर्धक, जीवनीय, स्निग्ध, वातपित्तहारक व विषघ्न, आहे. त्याचें अतिसेवन केलें असतां तो स्थौल्य, अग्निमांद्य, संन्यास (एक प्रकारची मूर्च्छा), मेह, गळवें, अर्बुदें इत्यादि कफमेदोजन्य रोग उत्पन्न करितो.

अम्लोऽग्निदीप्तिकृत्स्निग्धो हृद्यः पाचनरोचनः।
उष्णवीर्यो हिमस्पर्शः प्रीणनः क्लेदनो लघुः॥ १०॥
करोति कफपित्तास्रं मूढवातानुलोमनम्।
सोऽत्यभ्यस्तस्तनोः कुर्याच्छैथिल्यं तिमिरं भ्रमम् ११
कण्डुपाण्डुत्ववीसर्पशोफविस्फोटतृड्ज्वरान्।

अम्लरस अग्निप्रदीपक, स्निग्ध, हृद्य (मनाला प्रिय) रुचिप्रद, पाचक, उष्णवीर्य, शीतस्पर्श, तृप्तिकर, क्लेदजनक, लघु व विमार्गगामी वाताचें अनुलोमन करणारा असून कफपित्तकारक व रक्तपित्तकारक आहे. त्याचें अतिसेवन केलें असतां तो देहशैथिल्य, तिमिर (नेत्ररोगविशेष), भ्रम, कंडू, पांडुरोग, विसर्प, सूज, फोड, तृषा व ज्वर उत्पन्न करितो.

लवणः स्तम्भसङ्घातबन्धविध्मापनोऽग्निकृत्॥ १२॥
स्नेहनः स्वेदनस्तीक्ष्णो रोचनश्छेदभेदकृत्।
सोऽतियुक्तोऽस्रपवनं खलतिं पलितं वलिम्॥ १३॥
तृट्कुष्ठविषवीसर्पान् जनयेत्क्षपयेद्बलम्।

लवण रस स्तंभ (शिरादिक ताठणें), काठिण्य व स्रोतोरोध यांचा नाश करितो; व अग्निप्रदीपक, रुचिप्रद, तीक्ष्ण, स्वेदजनक व मार्दवकारक असून व्रण वाढवितो (म्हणजे तो लवकर भरूं देत नाहीं). त्याच्या अतिसेवनानें वातरक्त, खालित्य (टक्कल), पलितरोग (केंस पिकणें), वली (वळ्या पडणें), कुष्ठ, तृषा, विषारी परिणाम, विसर्प इ० रोग उत्पन्न होऊन बलक्षय होतो.

तिक्तः स्वयमरोचिष्णुररुचिं कृमितृड्विषम्॥ १४॥
कुष्ठमूर्च्छाज्वरोत्क्लेशदाहपित्तकफाञ् जयेत्।
क्लेदमेदोवसामज्जाशकृन्मूत्रोपशोषणः॥ १५॥
लघुर्मेध्यो हिमो रूक्षः स्तन्यकण्ठविशोधनः।
धातुक्षयानिलव्याधीनतियोगात्करोति सः॥ १६॥

कडू रस स्वतः चवीनें वाईट असून रुचि देतो व कृमि, तृषा, विषविकार, कुष्ठ, मूर्च्छा, ज्वर, उम्हासे, दाह, पित्त व कफ यांचा नाश करितो व शरीरांतील द्रव पदार्थ मेद, वसा, मज्जा, मल व मूत्र यांचें शोषण करणारा व लघु, मेध्य, शीत, रूक्ष व स्तन्य (दूध) आणि कंठ यांची शुद्धि करणारा आहे. अतिसेवन केल्यास तो धातुक्षय व वातव्याधि उत्पन्न करितो.

कटुर्गलामयोदर्दकुष्ठालसकशोफजित्।
व्रणावसादनः स्नेहमेदः क्लेदोपशोषणः॥ १७॥
दीपनः पाचनो रुच्यः शोधनोऽन्नस्य शोषणः।
छिनत्ति बन्धान् स्रोतांसि विवृणोति कफापहः॥१८॥
कुरुते सोऽतियोगेन तृष्णां शुक्रबलक्षयम्।
मूर्च्छामाकुञ्चनं कम्पं कटिपृष्ठादिषु व्यथाम्॥ १९॥

तिखट रस गलरोग, शीतपित्तजन्य गांधी, कुष्ठ, अलसक व सूज यांचा नाश करितो. व्रण कोरडे करितो. स्नेह, मेद व क्लेद यांचें शोषण करितो; व दीपक, पाचक, रुचिप्रद व शोधन असून अन्नाचें शोषण करितो; संधिबंधाचा विच्छेद करितो, मार्ग खुले करितो, व कफाचा नाश करितो. त्याचा अतियोग घडल्यास तृषा, शुक्र व बल यांची हानि, मूर्च्छा, शिरांचें आकुंचन, कंप व कटिपृष्ठादिकांच्या वेदना उत्पन्न होतात.

कषायः पित्तकफहा गुरुरस्रविशोधनः।
पीडनो रोपणः शीतः क्लेदमेदोविशोषणः॥ २०॥
आमसंस्तम्भनो ग्राही रूक्षोऽतित्वक्प्रसादनः।
करोति शीलितः सोऽति विष्टम्भाध्मानहृद्रुजः॥ २१॥
तृट्कार्श्यपौरुषभ्रंशस्रोतोरोधमलग्रहान्।

तुरट रस कफपित्तहारक, गुरु, रक्तशुद्धिकर, ओढा घालण्याला व व्रण भरण्याला उपयोगी, शीत, क्लेद व मेद शोषण करणारा, आमपचनाला प्रतिबंधक, स्तंभक, रूक्ष व त्वचा फारच निर्मळ करणारा आहे. त्याचें अतिसेवन केलें असतां वातावष्टंभ, पोटफुगी, हृद्रोग, तृषा, कृशता, शुक्रनाश (षंढत्व), स्रोतोरोध (वाहिन्यांचें आकुंचन) व मलमूत्रादिकांचा अवष्टंभ हे विकार उत्पन्न होतात.

घृतहेमगुडाक्षोडमोचचोचपरूषकम्॥ २२॥
अभीरुवीरापनसराजादनबलात्रयम्।
मेदे चतस्रः पर्णिन्यो जीवन्ती जीवकर्षभौ॥ २३॥

* 'कण्ठस्रोतस्' याचा अर्थ दोन्ही टीकाकारांनीं 'कण्ठसंबंधी स्रोतस्' असा केला आहे; परंतु कण्ठ व स्रोतें [वाहिन्या] असा अर्थ केल्यास जास्त व्यापक अर्थ होतो व असा अर्थ चरकाला अनुसरून आहे. [वाचं निगृह्णाति स्रोतांस्यवबध्नाति। च. सू. २६ अ. ३]

मधूकं मधुकं बिम्बी विदारी श्रावणीयुगम्।
क्षीरशुक्ला तुगाक्षीरी क्षीरिण्यौ काश्मरी सहे ॥ २४ ॥
क्षीरेक्षुगोक्षुरक्षौद्रद्राक्षादिर्मधुरो गणः।

तूप, सोनें, गूळ, अक्रोड, केळें, नारळ, फालसा, शतावरी, काकोली, फणस, खिरणी, बला, अतिबला, नागबला, मेदा, महामेदा, शालिपर्णी, पृश्निपर्णी, मुद्गपर्णी, माषपर्णी, जीवंती, जीवक, ऋषभक, मोहाचीं फुलें, ज्येष्ठीमध, गोड तोंडली, भुयकोहोळा, श्रावणी, महाश्रावणी, क्षीरविदारी, वंशलोचन, क्षीरकाकोली, दुधी, शिवणीचीं फळें, रानशेवंती (दोन जातींच्या), दूध, ऊंस, गोखरू, मध, द्राक्षें, इत्यादि पदार्थ मधुर वर्गांत येतात.

अम्लो धात्रीफलाम्लीकामातुलुङ्गाम्लवेतसम् ॥ २५ ॥
दाडिमं रजतं तक्रं चुक्रं पालेवतं दधि।
आम्रमाम्रातकं भव्यं कपित्थं करमर्दकम् ॥ २६ ॥

आवळा, चिंच, महाळुंग, अम्लवेतस, डाळिंब, रुपें, ताक, चुका, शेंव, दहीं, आंबा, अंबाडा, नीव, कवठ, करवंदें हे पदार्थ अम्लवर्गांत येतात.

वरं सौवर्चलं कृष्णं बिडं सामुद्रमौद्भिदम्।
रोमकं पांसुजं शीसं क्षारश्च लवणो गणः ॥ २७ ॥

सैंधव, पादेलोण, कृष्णलवण, बिडलोण, समुद्राचें मीठ, औद्भिदलवण, सांबरमीठ, खारीमीठ, शिसें व क्षार हे लवणवर्गांत येतात.

तिक्तः पटोली त्रायन्ती वालकोशीरचन्दनम्।
भूनिम्बनिम्बकटुकातगरागुरुवत्सम् ॥ २८ ॥
नक्तमालद्विरजनीमुस्तमूर्वाटरूषकम्।
पाठापामार्गकांस्यायोगुडूचीधन्वयासकम् ॥ २९ ॥
पञ्चमूलं महद्व्याघ्र्यौ विशालाऽतिविषा वचा।

पडवळ (किंवा परवर), त्रायमाण, वाळा, काळा वाळा, चंदन, चिराईत, निंब, कुटकी, तगर, अगरु, कुडा, सागरगोटा,* हळद, दारुहळद, नागरमोथा, मोरवेल, अडुळसा, पहाडमूळ, आघाडा, कांसें, लोखंड, गुळवेल, धमासा, मोठें पंचमूळ, रिंगणी, डोरली, इंद्रावण, अतिविष व वेखंड हे पदार्थ तिक्त वर्गांत येतात.

कटुको हिङ्गुमरिचकृमिजित्पञ्चकोलकम् ॥ ३० ॥
कुठेराद्या हरितकाः पित्तं मूत्रमरुष्करम्।

हिंग, मिरें, वावडिंग, पंचकोल (चित्रक, सुंठ, चवक, पिंपळी, पिंपळमूळ) कुठेरादि वर्गांतील भाज्या (शेवगा, लसूण इ० ज्यांना हरितक म्हणतात), पित्त, मूत्र व बिब्बा हे पदार्थ कटुवर्गामध्यें येतात.

वर्गः कषायः पथ्याक्षं शिरीषः खदिरो मधु ॥ ३१ ॥
कदम्बोदुम्बरं मुक्ता प्रवालाञ्जनगैरिकम्।
बालं कपित्थं खर्जूरं बिसपद्मोत्पलादि च ॥ ३२ ॥

हिरडा, बेहडा, शिरीष, खैर, मध, कदंब, उंबर, मोतीं, पोंवळीं, सुरमा, गेरू, कोवळें कवठ, खारीक, भिशी, पद्म, उत्पल इत्यादि पदार्थ कषायवर्गांत येतात.

मधुरं श्लेष्मलं प्रायो जीर्णाच्छालियवादृते।
मुद्गाद्गोधूमतः क्षौद्रात्सितायाः जाङ्गलामिषात् ॥ ३३ ॥

मधुर पदार्थ (पुढील द्रव्यें खेरीजकरून) प्रायः कफकारक असतात. जुने तांदूळ व जव, मूग, गहूं, मध, साखर व जांगल मांस हे मात्र कफकारक नाहींत.

प्रायोऽम्लं पित्तजननं दाडिमामलकादृते।
अपथ्यं लवणं प्रायश्चक्षुषोऽन्यत्र सैन्धवात् ॥ ३४ ॥

डाळिंब व आंवळा खेरीजकरून प्रायः सर्व आंबट पदार्थ पित्तकारक आहेत. सैंधव खेरीजकरून सर्व लवणवर्ग नेत्रांस अपथ्य आहे.

तिक्तं कटु च भूयिष्ठमवृष्यं वातकोपनम्।
ऋतेऽमृतापटोलीभ्यां शुण्ठीकृष्णारसोनतः ॥ ३५ ॥

गुळवेल, पडवळ, सुंठ, पिंपळी व लसूण ह्यांखेरीज सर्व कडू व तिखट पदार्थ प्रायः शुक्रविरोधी व वातकारक आहेत.

कषायं प्रायशः शीतं स्तम्भनं चाभयामृते।

हिरडयावांचून सर्व तुरट पदार्थ प्रायः थंड व स्तंभक आहेत.

रसाः कट्वम्ललवणा वीर्येणोष्णा यथोत्तरम् ॥ ३६ ॥
तिक्तः कषायो मधुरस्तद्वदेव च शीतलः।

तिखट, अम्ल व लवण हे रस एकाहून एक उष्णवीर्य आहेत. कडू, तुरट व मधुर हे एकाहून एक शीतवीर्य आहेत.

तिक्तः कटुः कषायश्च रूक्षा बद्धमलास्तथा ॥ ३७ ॥

कडू, तिखट व तुरट हे रस रूक्ष व मलमूत्रावष्टंभक आहेत.

पट्वम्लमधुराः स्निग्धाः सृष्टविण्मूत्रमारुताः।

लवण, अम्ल व मधुर हे रस स्निग्ध असून मलमूत्रवाताचें अनुलोमन करितात.

पटोः कषायस्तस्माच्च मधुरः परमं गुरुः ॥ ३८ ॥

लवण, कषाय व मधुर हे एकाहून एक गुरु आहेत.

लघुरम्लः कटुस्तमात्तस्मादपि च तिक्तकः।

अम्ल, तिखट, कडू हे एकाहून एक लघु आहेत.

संयोगाः सप्तपञ्चाशत्कल्पना तु त्रिषष्टिधा ॥ ३९ ॥
रसानां यौगिकत्वेन यथास्थूलं विभज्यते।

औषधयोजनेचे संबंधानें व स्थूलदृष्टीनें रसांचे एकंदर त्रेसष्ट

* यांत नक्तमाल शब्दाचा अर्थ करंज असा असून आम्हीं सागरगोटा असा अर्थ केला आहे, कारण सागरगोट्याला संस्कृतांत पूतीकरंज असें नांव आहे व नक्तमाल असा जरी पूती या विशेषणावांचून शब्द असला तरी तंत्रयुक्तीनें त्याचा पूतीकरंज (सागरगोटा) असा अर्थ केल्यास अधिक जुळतो. कारण कडू पदार्थांचीं उदाहरणें देणें झाल्यास त्यांत करंजापेक्षां सागरगोट्याचें नांव यावें हें जास्त संभवतें.

प्रकार आहेत; त्यांपैकीं वेगळाले असे सहा प्रकार व त्यांचे संयोग सत्तावन होतात.

**एकैकहीनांस्तान्पञ्च पञ्च यान्ति रसा द्विके ॥ ४० ॥**
**त्रिके स्वादुर्दशाम्लः षट् त्रीन्पटुस्तिक्तं एककम् ।**
**चतुष्केषु दश स्वादुश्चतुरोम्लः पटुः सकृत् ॥ ४१ ॥**
**पञ्चकेष्वेकमेवाम्लो मधुरः पञ्च सेवते ।**
**द्रव्यमेकं षडास्वादमसंयुक्ताश्च षड्रसाः ॥ ४२ ॥**

दोन दोन रसांचे जे संयोग ते मधुर, अम्ल, लवण, तिक्त व कटु ह्यांचे अनुक्रमानें ५, ४, ३, २ व १ वेळ योग झाल्यानें होतात. ते असे कीं, मधुररस अवशिष्ट पंचरसांपैकीं प्रत्येकाशीं संयोग पावतो. अम्लरस पहिले दोन रस खेरीजकरून इतरांशीं संयुक्त होतो. लवण तीन खेरीजकरून, तिक्त चार खेरीजकरून व कटु पांच खेरीजकरून राहिलेल्यांशीं संयोग पावतो. ( ह्याप्रमाणें दोन दोन रसांचे संयोग एकंदर १५ होतात. ) तीन तीन रसांच्या संयोगामध्यें मधुर रस १० संयोग पावतो, अम्ल ६, लवण ३ व तिक्तरस एकच संयोग पावतो. चतुष्क संयोगामध्यें मधुर १०, अम्ल ४ व लवण एकच संयोग पावतो. पंचक संयोगामध्यें मधुर ५ व अम्ल एकच संयोग पावतो. साही रसांचा संयोग एक व वेगळाले रस सहा ( याप्रमाणें एकंदर ६३ प्रकार. )*

**षट्पञ्चकाः षट्च पृथग्रसाश्च चतुर्द्विकौ पञ्चदशप्रकारौ ।**
**भेदास्त्रिका विंशतिरेकमेव द्रव्यं षडास्वादमिति त्रिषष्टिः ॥ ४३ ॥**

पंचात्मक संयोग ६, वेगळाले रस ६, द्विक व चतुष्क संयोग प्रत्येक १५, त्र्यात्मक संयोग २० व षड्रसात्मक संयोग १ एकूण ६३ प्रकारचे रस.

**ते रसानुरसतो रसभेदास्तारतम्यपरिकल्पनया च ।**
**सम्भवन्ति गणनां समतीता दोषभेषजवशादुपयोज्याः ॥ ४४ ॥**

रसानुरसाचा विचार केला असतां व त्या त्या रसाचें तारतम्य ( कमीजास्त प्राबल्य ) लक्षांत आणिलें असतां रसाचे भेद असंख्य होतात. त्यांची जी योजना करणें ती दोषाला व भेदजद्रव्याला अनुसरून करावी.

---

# एकादशोऽध्यायः

## अध्याय ११ वा

**अथातो दोषादिविज्ञानीयमध्यायं व्याख्यास्यामः ॥**

आतां दोषादिविज्ञानाचा अध्याय सांगतों.

**दोषधातुमला मूलं सदा देहस्य तं चलः ।**
**उत्साहोच्छ्वासनिश्वासचेष्टावेगप्रवर्तनैः ॥ १ ॥**
**सम्यग्गत्या च धातूनामक्षाणां पाटवेन च ।**
**अनुगृह्णात्यविकृतः पित्तं पक्त्यूष्मदर्शनैः ॥ २ ॥**
**क्षुत्तृड्रुचिप्रभामेधाधीशौर्यतनुमार्दवैः ।**
**श्लेष्मा स्थिरत्वस्निग्धत्वसन्धिबन्धक्षमादिभिः ॥ ३ ॥**

वातादि दोष, रसादि धातु व मूत्रादि मल हे शरीराचे नेहमींचे ( सार्वकालिक ) मूलभूत घटकावयव आहेत. वायु अविकृत असतांना उत्साह, श्वासोच्छ्वास, चेष्टा, मलमूत्रादिकांचा उत्सर्ग, धातूंचें स्वमार्गानें गमन,* इंद्रियांची विषयग्रहणशक्ति इत्यादि गोष्टींच्या योगानें शरीराचें संरक्षण करितो. पित्तपचन, उष्णता, दर्शनशक्ति, क्षुधा, तृषा, रुचि, कांति, मेधा, प्रज्ञा, शौर्य, देहमार्दव इत्यादिकांना कारणीभूत आहे. कफ शरीराची दृढता, स्निग्धता, सांध्यांचें जुळणें, सहनशीलता इत्यादि गोष्टींना कारणीभूत आहे. ( 'अविकृत असतांना' हें सर्वत्र घेणें. )

---

* हे ६३ प्रकारचे रसभेद पुढील यादीवरून सहज लक्षांत येतीलः— १ मधुराम्ल, २ मधुरलवण, ३ मधुरतिक्त, ४ मधुरकटुक, ५ मधुरकषाय, ६ अम्ललवण, ७ अम्लतिक्त, ८ अम्लकटुक, ९ अम्लकषाय, १० लवणतिक्त, ११ लवणकटुक, १२ लवणकषाय, १३ तिक्तकटुक, १४ तिक्तकषाय, १५ कटुकषाय, १६ मधुराम्ललवण, १७ मधुराम्लतिक्त, १८ मधुराम्लकटुक, १९ मधुराम्लकषाय, २० मधुरलवणतिक्त, २१ मधुरलवणकटुक, २२ मधुरलवणकषाय, १३ मधुरतिक्तकटुक, २४ मधुरतिक्तकषाय, २५ मधुरकटुकषाय, २६ अम्ललवणतिक्त, २७ अम्ललवणकटुक, २८ अम्लवणकषाय, २९ अम्लतिक्तकटुक, ३० अम्लतिक्तकषाय, ३१ अम्लकटुकषाय, ३२ लवणतिक्तकटुक, ३३ लवणतिक्तकषाय, ३४ लवणकटुकषाय, ३५ तिक्तकटुकषाय, ३६ मधुराम्ललवणतिक्त, ३७ मधुराम्ललवणकटुक, ३८ मधुराम्ललवणकषाय, ३९ मधुरलवणतिक्तकटुक, ४० मधुरलवणतिक्तकषाय, ४१ मधुरलवणकटुकषाय, ४२ मधुरतिक्तकटुकषाय, ४३ मधुराम्लतिक्तकटुक, ४४ मधुराम्लतिक्तकषाय, ४५ मधुराम्लकटुकषाय, ४६ अम्ललवणतिक्तकटुक, ४७ अम्ललवणतिक्तकषाय, ४८ अम्लतिक्तकटुकषाय, ४९ अम्ललवणकटुकषाय, ५० लवणतिक्तकटुकषाय, ५१ अम्ललवणतिक्तोषणकषाय, ५२ मधुराम्ललवणतिक्तकटुक, ५३ मधुराम्ललवणतिक्तकटुकषाय, ५४ मधुरलवणतिक्तकटुकषाय, ५५ मधुराम्लतिक्तकटुकषाय, ५६ मधुराम्ललवणकषाय, ५७ मधुराम्ललवणतिक्तकटुकषाय, मधुर, अम्ल, लवण, तिक्त, कटुक व कषाय हे वेगळाले सहा रस, एकूण ६३.

* धातूंचें स्वमार्गानें गमन याचा अर्थ असा कीं, शरीरांत जे रसादि धातु ज्या ज्या मार्गानें व ज्या ज्या तऱ्हेनें किंवा वेगानें जावयाचे, त्या त्या मार्गानें, तऱ्हेनें व वेगानें जें त्यांचें गमन होतें तें वायूच्याच योगानें. धातु शब्दांत जर रसरक्तासारखे प्रवाही व अस्थिसारखे स्थिर या सर्वच पदार्थांचा अंतर्भाव होतो, तर मग धातूंचें गमन ( गति ) असें मोघम सांगण्यामध्यें अतिव्याप्तीचा दोष येतो अशी कोणी शंका काढल्यास तिचा परिहार असा कीं, गति दोन प्रकारची. स्थूल व सूक्ष्म. त्यांपैकीं रसादि, प्रवाही पदार्थांत या दोन्ही गति उपलब्ध आहेत व मांसादि घन पदार्थांत सूक्ष्म ( परमाणुगत ) गति मात्र उपलब्ध आहे. या सूक्ष्म गतीच्या योगानेंच त्यांची वृद्धि व ऱ्हास ( झीज ) उत्पन्न होतात.

प्रीणनं जीवनं लेपः स्नेहो धारणपूरणे।
गर्भोत्पादश्च धातूनां श्रेष्ठं कर्म क्रमात्स्मृतम् ॥ ४ ॥

तृप्त करणें, जीवनव्यापार चालविणें, वेष्टण करणें ( लिंपणें ), स्निग्ध करणें, धारण करणें, अस्थींचें पूरण करणें व गर्भोत्पादन हीं रसादि सप्त धातूंचीं अनुक्रमेंकरून कर्में आहेत.

अवष्टम्भः पुरीषस्य मूत्रस्य क्लेदवाहनम्।
स्वेदस्य क्लेदविधृतिः

शरीराचें धारण करणें, द्रव पदार्थांचा उत्सर्ग व केंसांचें संरक्षण हीं मल, मूत्र व स्वेद यांचीं अनुक्रमें मुख्य कर्में होत.

वृद्धस्तु कुरुतेऽनिलः ॥ ५ ॥
कार्श्यकार्ष्ण्योष्णकामित्वकम्पानाहशकृद्ग्रहान्।
बलनिद्रेन्द्रियभ्रंशप्रलापभ्रमदीनताः ॥ ६ ॥

वायु वाढला असतां तो कृशता, काळसरपणा, उष्ण पदार्थांवर वासना, कंप, पोटफुगी, मलबद्धता, बलहानि, निद्रानाश, इंद्रियवैकल्य, प्रलाप, भ्रम व म्लानता उत्पन्न करितो.

पीतविण्मूत्रनेत्रत्वक्क्षुत्तृड्दाहाल्पनिद्रताः।
पित्तं

पित्त वाढलें असतां मल, मूत्र, नेत्र व त्वचा यांना पिंवळटपणा आणितें व क्षुधा, तृषा, दाह व निद्राभंग उत्पन्न करितें.

श्लेष्माग्निसदनप्रसेकालस्यगौरवम् ॥ ७ ॥
श्वैत्यशैत्यश्लथाङ्गत्वं श्वासकासातिनिद्रताः।

कफ वाढला असतां तो अग्निमांद्य, लालास्राव, आलस्य, जाड्य, पांडुरता, शैत्य, गात्रांची शिथिलता, श्वास, कास व अतिनिद्रा उत्पन्न करितो.

रसोऽपि श्लेष्मवद्रक्तं विसर्पप्लीहविद्रधीन् ॥ ८ ॥
कुष्ठवातास्रपित्तास्रगुल्मोपकुशकामलाः।
व्यङ्गाग्निनाशसम्मोहरक्तत्वङ्नेत्रमूत्रताः ॥ ९ ॥

रसवृद्धीचे परिणामहि कफवृद्धीप्रमाणेंच होतात. रक्ताधिक्यानें विसर्प, प्लीहा, विद्रधि, कुष्ठ, वातरक्त, रक्तपित, गुल्म, उपकुश ( हिरड्यांचा एक रोग ), कावीळ, वांग, अग्निमांद्य, मूर्च्छा व त्वचा, नेत्र व मूत्र यांची आरक्तता हे विकार उत्पन्न होतात.

मांसं गण्डार्बुदग्रन्थिगण्डोरूदरवृद्धिताः।
कण्ठादिष्वधिमांसं च

मांसवृद्धीनें गंडमाळा, अर्बुद, ग्रंथि, गलगंड, मांड्या व पोट यांची वृद्धि व कंठादि स्थानांमध्यें अधिमांस रोग हे विकार उत्पन्न होतात.

तद्वन्मेदस्तथा श्रमम् ॥ १० ॥
अल्पेऽपि चेष्टिते श्वासं स्फिक्स्तनोदरलम्बनम्।

मेदोवृद्धीनेंहि हेच विकार उत्पन्न होतात; शिवाय अल्पायासानें श्रम होऊन दम लागतो व ढुंगण, स्तन व पोट लोंबूं लागतात.

अस्थ्यध्यस्थ्यधिदन्तांश्च

अस्थिवृद्धीपासून अध्यस्थि व अधिदंत हे विकार होतात.

मज्जा नेत्राङ्गगौरवम् ॥ ११ ॥
पर्वसु स्थूलमूलानि कुर्यात् कृच्छ्राण्यरूंषि च।

मज्जा वाढली असतां आंग व डोळे जड होतात व सांध्यांवर कृच्छ्रसाध्य व दीर्घमूल शतारुसंज्ञक फोड उत्पन्न होते. ( निदानस्थान अ० १४ श्लो० २५ पहा. )

अतिस्त्रीकामतां वृद्धं शुक्रं शुक्राश्मरीमपि ॥ १२ ॥

शुक्र वाढलें असतां शुक्राश्मरी होतो व संभोगेच्छा अतिशय वाढते.

कुक्षावाध्मानमाटोपं गौरवं वेदनां शकृत्।

मळ वाढला असतां नळ फुगतात व पोटांत गुरगुर शब्द, जाड्य व वेदना उत्पन्न होतात.

मूत्रं तु बस्तिनिस्तोदं कृतेऽप्यकृतसंज्ञताम् ॥ १३ ॥

मूत्र वाढलें असतां बस्तिशूल होतो व लघवी केली तरी न केल्यासारखी वाटते ( म्हणजे पुनः पुनः लघवी होईलशी वाटते. )

स्वेदोऽतिस्वेददौर्गन्ध्यकण्डूः

स्वेदवृद्धीनें घाम फार येतो व अंगास दुर्गंधि व कंडू सुटते.

एवं च लक्षयेत्।
दूषिकादीनपि मलान् बाहुल्यगुरुतादिभिः ॥ १४ ॥

याचप्रमाणें नेत्रादिकांच्या मलांची वृद्धि त्या त्या स्थानामध्यें जाड्य व मलसंचय इत्यादिकांवरून ओळखावी.

लिङ्गं क्षीणेऽनिलेऽङ्गस्य सादोऽल्पं भाषितेहितम्।
संज्ञामोहस्तथा श्लेष्मवृद्ध्युक्तामयसम्भवः॥ १५ ॥

वायु स्वप्रमाणाहून कमी झाला असतां हातपाय गळाल्यासारखे होतात. कायिक व वाचिक क्रिया कमी होतात. ज्ञानेंद्रियांची व बुद्धीची शक्ति क्षीण होते व पूर्वोक्त कफवृद्धिजन्य रोग उत्पन्न होतात.

पित्ते मन्दोऽनलः शीतं प्रभाहानिः

पित्त क्षीण झालें असतां अग्निमांद्य, शैत्य व निस्तेजता उत्पन्न होतात.

कफे भ्रमः।
श्लेष्माशयानां शून्यत्वं हृद्द्रवश्लथसन्धिताः ॥ १६ ॥

कफ क्षीण झाला असतां भ्रम होतो; छाती वगैरे कफाशय रिक्त होतात; हृदय गळतें ( मन मवाळ होतें ) व सांधे शिथिल होतात.

रसे रौक्ष्यं श्रमः शोषो ग्लानिः शब्दासहिष्णुता।

रसक्षयानें रूक्षता, शोष, ग्लानि व श्रम होतात व शब्द सहन होत नाहीं.

रक्तेऽम्लशिशिरप्रीतिशिराशैथिल्यरूक्षताः ॥ १७ ॥

रक्तक्षयानें आंबट व थंड पदार्थांवर वासना होते, शिरा शिथिल होतात व अंग रूक्ष होतें.

**मांसेऽक्षग्लानिगण्डस्फिक्शुष्कतासन्धिवेदनाः।**

मांसक्षयानें इंद्रियदौर्बल्य होतें, गाल व कुल्ले वाळतात व सांधे दुखतात.

**मेदसि स्वपनं कट्याः प्लीह्नो वृद्धिः कृशाङ्गता॥ १८॥**

मेदक्षय झाला असतां कटिप्रदेश बधिर होतो, अंग रोडतें व पांथरी वाढते.

**अस्थ्न्यस्थितोदः सदनं दन्तकेशनखादिषु।**

अस्थिक्षयानें अस्थिपीडा व दंतकेशनखादिकांचा पात हे विकार उत्पन्न होतात.

**अस्थ्नां मज्जनि सौषिर्यं भ्रमस्तिमिरदर्शनम्॥ १९॥**

मज्जा क्षीण झाली असतां हाडें पोकळ होतात; भोंड व अंधेरी येते.

**शुक्रे चिरात्प्रसिच्येत शुक्रं शोणितमेव वा।**
**तोदोऽत्यर्थं वृषणयोर्मेढ्रं धूमायतीव च॥ २०॥**

शुक्रक्षय झाला असतां शुक्रपतन होण्यास उशीर लागतो किंवा त्याच्याऐवजीं रक्त पडतें, वृषणामध्यें अतिशय वेदना होतात व शिश्नांतून वाफा निघतात.

**पुरीषे वायुरन्त्राणि सशब्दो वेष्टयन्निव।**
**कुक्षौ भ्रमति यात्यूर्ध्वं हृत्पार्श्वे पीडयन् भृशम्॥२१॥**

मलक्षयानें वायु आंतड्यांना गुरगुर शब्द करून वेढून टाकतो व पोटांत चहूंकडे फिरतो किंवा ऊर्ध्व होऊन उरांत व बरगड्यांत फार पीडा करितो.

**मूत्रेऽल्पं मूत्रयेत्कृच्छ्राद्विवर्णं सास्रमेव या।**

मूत्रक्षय झाला असतां लघवीला साफ होत नाहीं, तिचा वर्ण पालटतो किंवा ती रक्तमिश्रित येते:-

**स्वेदे रोमच्युतिः स्तब्धरोमता स्फुटनं त्वचः॥ २२॥**

स्वेदक्षय झाला असतां केंस गळतात किंवा ताठतात, व त्वचा फुटते.

**मलानामतिसूक्ष्माणां दुर्लक्ष्यं लक्षयेत्क्षयम्।**
**स्वमलायनसंशोषतोदशून्यत्वलाघवैः॥ २३॥**

नेत्रादि द्वारांतील अतिसूक्ष्म मलांचा क्षय झाला असतां तो जाणणें कठिण आहे; तथापि त्या त्या मार्गांची शुष्कता, ठणका, रिक्तता व लघुत्व हीं त्यांचीं लक्षणें होत.

**दोषादीनां यथास्वं च विद्याद्वृद्धिक्षयौ भिषक्।**
**क्षयेण विपरीतानां गुणानां वर्धनेन च॥ २४॥**
**वृद्धिं मलानां सङ्गाच्च क्षयं चातिविसर्गतः।**

दोषादिकांची वृद्धि व क्षय वैद्यांना समजण्यास त्यांच्या विपरीत गुणांचा अपकर्ष व उत्कर्ष हे अनुक्रमेंकरून साधनीभूत आहेत. मलांचा जर व्हावा तसा उत्सर्ग झाला नाहीं तर त्यांची वृद्धि होते व तोच उत्सर्ग फाजील झाल्यास त्यांचा क्षय होतो.

**मलोचितत्वाद्देहस्य क्षयो वृद्धेस्तु पीडनः॥ २५॥**

दोषादिकांची वृद्धि ही तर पीडाकारक आहेच, पण त्यांचा क्षय त्याहून पीडाकारक आहे, कारण ते देहाचे जन्माचे सोबती आहेत.

**तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः।**
**श्लेष्मा शेषेषु तेनैषामाश्रयाश्रयिणां मिथः॥ २६॥**
**यदेकस्य तदन्यस्य वर्धनक्षपणौषधम्।**
**अस्थिमारुतयोर्नैवं प्रायो वृद्धिर्हि तर्पणात्॥ २७॥**
**श्लेष्मणाऽनुगता तस्मात् संक्षयस्तद्विपर्ययात्।**
**वायुनानुगतः**

अस्थि हें वायूचें स्थान होय, स्वेद व रक्त हीं पित्ताचीं स्थानें होत व मलमूत्रासहित इतर धातु हीं कफाचीं स्थानें होत. धातूंचा व दोषांचा असा आधाराधेयभावसंबंध असल्यामुळें जें एकाची वृद्धि किंवा क्षय करितें तेंच तदाश्रित दोषांचीहि वृद्धि किंवा क्षय करितें. ह्या नियमास अस्थि व वायु ह्यांचा मात्र अपवाद आहे; कारण दोष व धातु यांची वृद्धि प्रायः तर्पणापासून होते व तें तर कफवर्धक असून वातनाशक आहे व लंघनानें प्रायः त्यांचा क्षय होतो व वायूचा जोर तत्काळ वाढतो.

**अस्माच्च वृद्धिक्षयसमुद्भवान्॥ २८॥**
**विकारान्साधयेच्छीघ्रं क्रमाल्लङ्घनबृंहणैः।**

यास्तव वृद्धिक्षयजन्य विकारावर अनुक्रमेंकरून लंघनबृंहणात्मक चिकित्सेची सत्वर योजना करावी.

**वायोरन्यत्र तज्जास्तु तैरवोत्क्रमयोजितैः॥ २९॥**

वातविकारावर मात्र ह्याच्या उलट क्रम ठेवावा (म्हणजे वातवृद्धीवर बृंहण व वातक्षयावर लंघन).

**विशेषाद्रक्तवृद्ध्युत्थान् रक्तस्रुतिविरेचनैः।**
**मांसवृद्धिभवान् रोगान् शस्त्रक्षाराग्निकर्मभिः॥ ३०॥**
**स्थौल्यकार्श्योपचारेण मेदोजानस्थिसंक्षयात्।**
**जातान्क्षीरघृतैस्तिक्तसंयुतैर्बस्तिभिस्तथा॥ ३१॥**
**विड्वृद्धिजानतीसारक्रियया विट्क्षयोद्भवान्।**
**मेषाजमध्यकुल्माषयवमाषद्वयादिभिः॥ ३२॥**
**मूत्रवृद्धिक्षयोत्थांश्च मेहकृच्छ्रचिकित्सया।**
**व्यायामाभ्यञ्जनस्वेदमद्यैः स्वेदक्षयोद्भवान्॥ ३३॥**

विशेषेंकरून रक्तवृद्धिजन्य विकारांवर रक्तमोक्ष व विरेचन यांची योजना करावी. मांसवृद्धिजन्य विकारांवर शस्त्र, क्षार व अग्निकर्म यांची योजना करावी. मेदाच्या वृद्धिक्षयापासून झालेल्या विकारांवर अनुक्रमेंकरून स्थौल्य व कार्श्य यांची चिकित्सा करावी. अस्थिक्षयजन्य विकारांवर क्षीरें, घृतें व तिक्तरसयुक्त बस्ति यांची योजना करावी. मलवृद्धिजन्य विकारांवर अतिसारचिकित्सा करावी. मलक्षयजन्य विकारांवर मेंढा व बकरें यांचा कोथळा, घुगऱ्या, उडीद, जव, चवळ्या इत्यादि पदार्थ खावे. मूत्रवृद्धीवर मेहचिकित्सा, मूत्रक्षयावर

मूत्रकृच्छ्रचिकित्सा व स्वेदक्षयजन्य विकारांवर व्यायाम, अभ्यंग, वाफारा वगैरे शेक व मद्य यांची योजना करावी.

**स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः।**
**तेषां सादातिदीप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः॥ ३४॥**

आमाशय व पक्वाशय यांच्या मध्यभागीं जो जठराग्नि आहे, त्याचे अंश रसादि धातूंमध्यें राहतात. त्यांची मंदता किंवा तीव्रता ही धातूंच्या वृद्धिक्षयांला अनुक्रमें करून कारणीभूत आहे.

**पूर्वो धातुः परं कुर्याद्वृद्धः क्षीणश्च तद्विधम्।**

एका *धातूची वृद्धि किंवा क्षय झाला असतां त्याच्या योगानें त्याच्या पुढच्याचीहि वृद्धि किंवा क्षय होतो.

**दोषा दुष्टा रसैर्धातून् दूषयन्त्युभये मलान्॥ ३५॥**
**अधो द्वे सप्त शिरसि स्वानि स्वेदवहानि च।**
**मला मलायनानि स्युर्यथास्वं तेष्वतो गदाः॥ ३६॥**

मधुरादि रसांच्या अयोग्य सेवनानें दुष्ट झालेले दोष धातूंना दूषित करितात व ते उभयतां मलांना दूषित करितात आणि मलमार्गांना दूषित करतात. ते मार्ग येणेंप्रमाणेः—गुद, मूत्रद्वार, कर्ण, नासिका, नेत्र, मुख व स्वेदरंध्रें. हे मलमार्ग दूषित झाले म्हणजे ते ते रोग उत्पन्न होतात.

**ओजस्तु तेजो धातूनां शुक्रान्तानां परं स्मृतम्।**
**हृदयस्थमपि व्यापि देहस्थितिनिबन्धनम्॥ ३७॥**
**स्निग्धं सोमात्मकं शुद्धमीषल्लोहितपीतकम्।**
**यन्नाशे नियतं नाशो यस्मिंस्तिष्ठति तिष्ठति॥ ३८॥**
**निष्पद्यन्ते यतो भावा विविधा देहसंश्रयाः।**

शुक्रांत सप्तधातूंचें जें उत्तम सत्त्व किंवा तेज त्याला ओज म्हणतात. त्याचें मुख्य स्थान जरी हृदय आहे तरी तें सर्व शरीर व्यापितें. तें जीविताला आधारभूत आहे. देहस्थिति त्याजवरच अवलंबून आहे. तें स्निग्ध, निर्मल, सोमात्मक व किंचित् तांबूस पिंवळें आहे. त्याचा नाश झाला असतां जीवाचा अवश्य नाश होतो. तें जोंपर्यंत आहे तोंपर्यंतच जीव आहे. शरीरांत घडणाऱ्या निरनिराळ्या व्यापारांना तें कारणीभूत आहे.

**ओजः क्षीयेत कोपक्षुद्ध्यानशोकश्रमादिभिः॥ ३९॥**
**बिभेति दुर्बलोऽभीक्ष्णं ध्यायति व्यथितेन्द्रियः।**
**विच्छायो दुर्मना रूक्षो भवेत् क्षामश्च तत्क्षये॥ ४०॥**
**जीवनीयौषधक्षीररसाद्यास्तत्र भेषजम्।**

क्रोध, क्षुधा, चिंता, शोक, श्रम इत्यादि कारणांनीं ओजाचा क्षय होतो. त्याचा क्षय झाला असतां मनुष्य फार भित्रा व दुर्बल होतो व वरचेवर चिंतेंत निमग्न होतो. इंद्रियांना व्यथा होते; अंगाला विवर्णता येते; उत्साह नाहींसा होतो व शरीर रूक्ष व कृश होतें. त्याजवर जीवनीय औषधें, दूध, मांसरस इत्यादिकांची योजना करावी.

**ओजोविवृद्धौ देहस्य तुष्टिपुष्टिबलोदयः॥ ४१॥**

ओजाची वृद्धि झाली असतां देह उत्साहयुक्त, पुष्ट व बलवान् होतो.

**यदन्नं द्वेष्टि यदपि प्रार्थयेताविरोधि तु।**
**तत्तत्त्यजन्समश्नंश्च तौ तौ वृद्धिक्षयौ जयेत्॥ ४२॥**

त्या त्या दोषांच्या वृद्धिक्षयांवर चिकित्सा करणें झाल्यास ज्या अन्नाचा द्वेष असेल तें वर्ज्य करावें व जें प्रिय वाटेल तें विरोधी नसल्यास सेवन करावें.

**कुर्वते हि रुचिं दोषा विपरीतसमानयोः।**
**वृद्धाः क्षीणाश्च भूयिष्ठं लक्षयन्त्यबुधास्तु न॥ ४३॥**

दोष वृद्ध झाले असतां प्रायः तद्विपरीत पदार्थांवर वांच्छा उत्पन्न होते; व ते क्षीण झाले असतां प्रायः तत्समान गुणांच्या पदार्थांवर वासना जाते; ही गोष्ट अज्ञानांच्या लक्षांत येत नाहीं.

**यथाबलं यथास्वं च दोषा वृद्धा वितन्वते।**
**रूपाणि जहति क्षीणाः समाः स्वं कर्म कुर्वते॥ ४४॥**

दोष वृद्ध झाले असतां आपापल्या गुणकर्मांचा यथाशक्ति विस्तार करितात; क्षीण झाले असतां त्यांचा त्या त्या मानानें त्याग करितात व समस्थितीमध्यें असले म्हणजे आपापली क्रिया यथास्थित चालवितात.

**य एव देहस्य समा विवृद्ध्यै त एव दोषा विषमा वधाय।**
**यस्मादतस्ते हितचर्ययैव क्षयाद्विवृद्धेरिव रक्षणीयाः॥४५॥**

जे दोष समतोल असले म्हणजे देहाची वृद्धि करितात, तेच विषम झाले म्हणजे त्याच्या नाशास कारणीभूत होतात. यास्तव हिताचरणाच्या योगानेंच त्यांचा वृद्धिक्षयांपासून बचाव करावा.

---

# द्वादशोऽध्यायः

## अध्याय १२ वा

**अथातो दोषभेदीयाध्यायं व्याख्यास्यामः।**

आतां दोषभेदीय अध्याय सांगतों.

**पक्वाशयकटीसक्थिश्रोत्रास्थिस्पर्शनेन्द्रियम्।**
**स्थानं वातस्य तत्रापि पक्वाधानं विशेषतः॥ १॥**

पक्वाशय (आंतडीं), कमर, मांड्या, कर्ण, अस्थि व स्पर्शनेंद्रिय (त्वचा) हीं वाताचीं स्थानें होत; त्यांपैकीं पक्वाशय मुख्य होय.

**नाभिरामाशयः स्वेदो लसीका रुधिरं रसः।**
**दृक् स्पर्शनं च पित्तस्य नाभिरत्र विशेषतः॥ २॥**

नाभि, आमाशय, स्वेद, लस, रक्त, रस, दृष्टि व स्पर्शनेंद्रिय हीं पित्ताचीं स्थानें असून त्यांपैकीं नाभि हें मुख्य स्थान होय.

---

* अरुणदत्तानें 'पूर्वो धातुः' याचा अर्थ रस व 'परं' (धातु) याचा अर्थ रक्त असा केला आहे; परंतु वास्तविक अर्थ आम्हीं दिल्याप्रमाणें आहे असें सुश्रुतावरून स्पष्ट होतें. सुश्रु. अ. १५ सू.॥ पूर्वः पूर्वोऽतिवृद्धत्वाद्वर्धयेद्धि परं परम्॥

उरः कण्ठशिरः क्लोमपर्वाण्यामाशयो रसः।
मेदो घ्राणं च जिह्वा च कफस्य सुतरामुरः॥ ३॥

ऊर, कंठ, डोकें, फुप्फुस, संधि, आमाशय, रस, मेद, नाक व जीभ हीं कफाचीं स्थानें असून ऊर मुख्य स्थान होय.

प्राणादिभेदात्पञ्चात्मा वायुः प्राणोऽत्र मूर्धगः।
उरःकण्ठचरो बुद्धिहृदयेन्द्रियचित्तधृक्॥ ४॥
ष्ठीवनक्षवथूद्गारनिश्वासान्नप्रवेशकृत्।

वायूचे प्राण, उदान, व्यान, समान व अपान असे पांच भेद आहेत. त्यांपैकीं प्राणवायु डोक्यांत वास करुन ऊर व कंठ या स्थानांत संचार करितो. तो बुद्धि, हृदय, इंद्रियें व चित्त यांना धारण करितो व थुंकणें, शिंकणें, ढेंकर देणें, श्वास घेणें व अन्न गिळणें इत्यादि क्रिया चालवितो.

उरः स्थानमुदानस्य नासानाभिगलांश्चरेत्॥ ५॥
वाक्प्रवृत्तिप्रयत्नोर्जाबलवर्णस्मृतिक्रियः।

उदानवायूचें स्थान ऊर असून तो नाभि, गळा व नाक या स्थानांतून संचार करितो व वाचा, ऐच्छिक क्रिया, उत्साह, बल, वर्ण, स्मृति इत्यादि गोष्टी उत्पन्न करितो.

व्यानो हृदि स्थितः कृत्स्नदेहचारी महाजवः॥ ६॥
गत्यपक्षेपणोत्क्षेपनिमेषोन्मेषणादिकाः।
प्रायः सर्वाः क्रियास्तस्मिन्प्रतिबद्धाः शरीरिणाम्॥७॥

व्यानवायु हृदयांत राहून सर्व शरीरांत संचार करितो. त्याचा वेग फार तीव्र असून चालणें, हस्तादिकांचें आकुंचन व प्रसरण, पापण्या मिटणें व उघडणें इत्यादि सर्व शारीर क्रिया प्रायः त्याजवर अवलंबून आहेत.

समानोऽग्निसमीपस्थः कोष्ठे चरति सर्वतः।
अन्नं गृह्णाति पचति विवेचयति मुञ्चति॥ ८॥

समानवायु पाचकाग्नीजवळ राहून सर्व कोठ्यांत संचार करितो. अन्नाचें ग्रहण व पचन करितो व त्याचा सत्त्वांश मलापासून पृथक् करुन मलाचें विसर्जन करितो.

अपानोऽपानगः श्रोणिबस्तिमेढ्रोरुगोचरः।
शुक्रार्तवशकृन्मूत्रगर्भनिष्क्रमणक्रियः॥ ९॥

अपानवायु गुदस्थानीं राहत असून कुल्ले, बस्ति, शिश्न व मांड्या ह्या स्थानांत संचार करितो; व शुक्र, आर्तव, मल, मूत्र व गर्भ यांना बाहेर काढितो.

पित्तं पञ्चात्मकं तत्र पक्वामाशयमध्यगम्।
पञ्चभूतात्मकत्वेऽपि यत्तैजसगुणोदयात्॥ १०॥
त्यक्तद्रवत्वं पाकादिकर्मणानलशब्दितम्।
पचत्यन्नं विभजते सारकिट्टौ पृथक् तथा॥ ११॥
तत्रस्थमेव पित्तानां शेषाणामप्यनुग्रहम्।
करोति बलदानेन पाचकं नाम तत्स्मृतम्॥ १२॥

पित्तहि पांच प्रकारचें आहे. त्यांपैकीं जें पक्वाशय व आमाशय यांच्या मध्यभागीं राहत असून व पंचभूतात्मक असूनहि अग्नीचा अंश अधिक असल्यामुळें द्रवत्व त्याग करुन पचनादि क्रियेच्या योगानें अग्निसंज्ञा मिळवितें, अन्न पचवितें, त्यांतील सत्त्वांशानें मलापासून पृथक्करण करितें, व स्वस्थानींच राहून इतर पित्तांना बलदायक होतें, त्याला पाचक अशी संज्ञा आहे.

आमाशयाश्रयं पित्तं रञ्जकं रसरञ्जनात्।

जें पित्त आमाशयांत राहून रसाला रंगवितें, त्याला रंजक म्हणतात.

बुद्धिमेधाभिमानाद्यैरभिप्रेतार्थसाधनात्॥ १३॥
साधकं हृद्गतं पित्तं

जें पित्त हृदयांत राहून बुद्धि, धारणा, अहंकार इत्यादिकांचे योगानें इष्टार्थाचें साधन करितें, त्याला साधक पित्त म्हणतात.

रूपालोचनतः स्मृतम्।
दृक्स्थमालोचकं

नेत्रस्थ पित्त रूपग्रहण करितें म्हणून त्याला आलोचक अशी संज्ञा आहे.

त्वक्स्थं भ्राजकं भ्राजनात्त्वचः॥१४॥

त्वचेंतील पित्त त्वचेंतील तेजास कारणीभूत आहे म्हणून त्यास भ्राजक अशी संज्ञा आहे.

श्लेष्मा तु पंचधा

श्लेष्माहि पांच प्रकारचा आहे.

उरःस्थः स त्रिकस्य स्ववीर्यतः।
हृदयस्यान्नवीर्याच्च तत्स्थ एवाम्बुकर्मणा॥ १५॥
कफधाम्नां च शेषाणां यत्करोत्यवलम्बनम्।
अतोऽवलम्बकः श्लेष्मा

जो कफ उरांत राहून स्ववीर्यानें व हृदयस्थ अन्नाच्या वीर्यानें माकडहाडाचें व इतर कफस्थानाचें क्लेदनादि जलक्रियेनें पोषण करितो त्याला अवलंबक म्हणतात.

यस्त्वामाशयसंस्थितः॥ १६॥
क्लेदकः सोऽन्नसङ्घातक्लेदनात्

जो कफ आमाशयांत राहून अन्नसंघाताला पातळ करितो त्याला क्लेदक म्हणतात

रसबोधनात्।
बोधको रसनास्थायी

जो कफ जिव्हेंत राहून रसज्ञान उत्पन्न करितो त्याला बोधक म्हणतात.

शिरःसंस्थोऽक्षतर्पणात्॥ १७॥
तर्पकः

डोक्यांतील कफ इंद्रियांचें पोषण करितो म्हणून त्याला तर्पक म्हणतात.

सन्धिसंश्लेषाच्छ्लेषकः सन्धिषु स्थितः।

सांध्यांतील कफ सांधे सांधितो म्हणून त्याला संश्लेषक म्हणतात.

इति प्रायेण दोषाणां स्थानान्यविकृतात्मनाम् ॥ १८॥
व्यापिनामपि जानीयात्कर्माणि च पृथक् पृथक्।

ह्याप्रमाणें जरी वातादि दोष सर्वशरीरव्यापक आहेत तरी त्यांचीं जीं कांहीं मुख्य स्थानें आहेत, त्यांचें पृथक् पृथक् सव्यापार निरूपण केलें. हीं स्थानें अविकृत दोषांचीं समजावीं. ( कारण विकृत झालें असतां त्यांना स्थाननियम लागू नाहीं. )

उष्णेन युक्ता रूक्षाद्या वायोः कुर्वन्ति सञ्चयम् ॥१९॥
शीतेन कोपमुष्णेन शमं स्निग्धादयो गुणाः।

वायूचे रूक्षादि गुण उष्णयुक्त झाले असतां त्याचा संचय व शीतयुक्त झाले असतां त्याचा प्रकोप करितात. स्निग्धादि गुण उष्णयुक्त झाले असतां वायूचें प्रशमन करितात.

शीतेन युक्तास्तीक्ष्णाद्याश्चयं पित्तस्य कुर्वते ॥ २० ॥
उष्णेन कोपं मन्दाद्याः शमं शीतोपसंहिताः।

तीक्ष्णादि पित्तगुण शीतयुक्त झाले असतां त्याचा संचय व उष्णयुक्त झाले असतां प्रकोप करितात. मंदादिगुण शीतयुक्त असतां पित्ताचा उपशम करितात.

शीतेन युक्ताः स्निग्धाद्याः कुर्वते श्लेष्मणश्चयम् ॥२१॥
उष्णेन कोपं तेनैव गुणा रूक्षादयः शमम्।

स्निग्धादि कफगुण शीतयुक्त झाले असतां त्याचा संचय व उष्णयुक्त झाले असतां त्याचा प्रकोप करितात. रूक्षादि गुण उष्णयुक्त झाले असतां कफाचा उपशम करितात.

चयो वृद्धिः स्वधाम्न्येव प्रद्वेषो वृद्धिहेतुषु ॥ २२ ॥
विपरीतगुणेच्छा च

जागच्या जागीं दोषवृद्धि होते त्याला चय म्हणतात. दोषाचा चय झाला म्हणजे त्याच्या वृद्धीला कारणीभूत जीं द्रव्यें असतात, त्याचा द्वेष व विरुद्धगुणात्मक द्रव्याविषयीं अभिलाष उत्पन्न होतो.

कोपस्तून्मार्गगामिता।
लिङ्गानां दर्शनं स्वेषामस्वास्थ्यं रोगसम्भवः॥ २३ ॥

वृद्ध झालेले दोष स्वस्थान सोडून भटकूं लागले म्हणजे त्या स्थितीला प्रकोप म्हणतात. दोष प्रकुपित झाले म्हणजे मागील अध्यायांत सांगितलेलीं तीं तीं लक्षणें उत्पन्न होऊन अस्वस्थता येते व रोगाचा प्रादुर्भाव होतो.

स्वस्थानस्थस्य समता विकारासम्भवः शमः।

दोष स्वस्थानींच समस्थितींत येऊन विकार नाहींसे झाले म्हणजे दोषाचा शम झाला असें म्हणतात.

चयप्रकोपप्रशमा वायोर्ग्रीष्मादिषु त्रिषु ॥ २४ ॥
वर्षादिषु तु पित्तस्य श्लेष्मणः शिशिरादिषु।

वायूचे चय, प्रकोप व प्रशम अनुक्रमेंकरून ग्रीष्म, वर्षा व शरद या ऋतूंत होतात. पित्ताचे वर्षा, शरद व हेमंत ऋतूंत व कफाचे शिशिर, वसंत व ग्रीष्म ऋतूंत होतात.

चीयते लघुरूक्षाभिरोषधीभिः समीरणः ॥ २५ ॥
तद्विधस्तद्विधे देहे कालस्यौष्ण्यान्न कुप्यति।
अद्भिरम्लविपाकाभिरोषधीभिश्च तादृशम् ॥ २६ ॥
पित्तं याति चयं कोपं न तु कालस्य शैत्यतः।
चीयते स्निग्धशीताभिरुदकौषधिभिः कफः ॥ २७ ॥
तुल्येऽपि काले देहे च स्कन्नत्वान्न प्रकुप्यति।

ग्रीष्मऋतूंतील आहार लघु व रूक्ष असल्यामुळें देहहि तसाच बनतो, म्हणून तत्समान ( लघु व रूक्ष ) जो वायु त्याचा चय (संचय) होतो; तत्कालीन उष्णता त्याचा प्रकोप मात्र होऊं देत नाहीं. वर्षाऋतूंतील आहार व पाणी अम्लविपाकी असल्यामुळें तत्समानगुण जें पित्त त्याचा चय होतो; तत्कालीन शैत्य त्याचा प्रकोप होऊं देत नाहीं. शिशिरऋतूंत आहार व पाणी स्निग्ध व शीत असल्यामुळें देहहि तसाच होतो; व म्हणून तत्समानगुण जो कफ तो संचित होतो; परंतु थंडीनें त्याला घनत्व आल्यामुळें प्रकुपित होत नाहीं.

इति कालस्वभावोऽयमाहारादिवशात्पुनः ॥ २८॥
चयादीन् यान्ति सद्योऽपि दोषाः कालेऽपि वा तु न।

हा कालस्वभाव सांगितला. परंतु आहारादिकांचे योगानें दोषांना चयप्रकोपादि स्थिति तत्काल देखील प्राप्त होतात किंवा त्या त्या कालीं होतातच असेंहि नाहीं. ( उदाहरणार्थ हेमंतऋतूंत जरी कालस्वभावेंकरूनच पित्तोपशम होतो, तरी पित्तकर पदार्थ खाण्यांत आले असतां पित्ताचा क्षोभहि तत्काळ होतो. तसेंच शिशिरऋतूंत जरी स्वभावतःच कफसंचय होतो, तरी रूक्षोष्ण आहाराच्या सेवनानें व व्यायामानें तो बंद करतां येतो ).

व्याप्नोति सहसा देहमापादतलमस्तकम् ॥ २९ ॥
निवर्तते तु कुपितो मलोऽल्पाल्पं जलौघवत्।

दोष कुपित झाला म्हणजे नदीच्या पुराप्रमाणें तो एकदम सर्व देहाला आपादमस्तक व्यापून टाकितो. त्याचा उतार मात्र तद्वतच हळूहळू होतो.

नानारूपैरसंख्येयैर्विकारैः कुपिता मलाः ॥ ३० ॥
तापयन्ति तनुं तस्मात्तद्धेत्वाकृतिसाधनम्।
शक्यं नैकैकशो वक्तुमतः सामान्यमुच्यते ॥ ३१ ॥

कुपित झालेले दोष नानाप्रकारचे असंख्य विकार उत्पन्न करून शरीराला पीडा देतात व म्हणून त्या विकारांचीं कारणें, लक्षणें व चिकित्सा यांचें वेगळालें निरूपण करणें अशक्य आहे, यास्तव सामान्यतः सांगतों.

दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणम्।
यथा पक्षी परिपतन् सर्वतः सर्वमप्यहः ॥ ३२ ॥
छायामत्येति नात्मीयां यथा वा कृत्स्नमप्यदः।

विकारजातं विविधं त्रीन् गुणान्नातिवर्तते ॥ ३३ ॥
तथा स्वधातुवैषम्यनिमित्तमपि सर्वदा।
विकारजातं त्रीन्दोषान्

वातादि दोष हेच सर्व रोगांचें एक (साधारण) कारण होय. जसा एखादा पक्षी सर्व दिवसभर कितीहि जरी फिरला तरी तो आपल्या छायेला कधींहि सोडूं शकत नाहीं, किंवा जशी ही नानाविध सृष्टि गुणत्रयावांचून* आढळत नाहीं तसा कोणत्याहि प्रकारचा विकार असो, तो या दोषत्रयावांचून कधींहि व्हावयाचा नाहीं.

तेषां कोपे तु कारणम् ॥ ३४ ॥
अर्थैरसात्म्यैः संयोगः कालः कर्म च दुष्कृतम् ॥
हीनातिमिथ्यायोगेन भिद्यते तत्पुनस्त्रिधा ॥ ३५ ॥

दोषप्रकोपाचीं कारणें मुख्य तीन आहेत. ज्यांची संवय नाहीं अशा शब्दस्पर्शादि अर्थांचा इंद्रियांशीं योग, दुष्ट ऋतु व दुष्ट क्रिया. ह्या प्रत्येकाचे पुनः हीन योग, अति योग व मिथ्या योग असे तीन प्रकार आहेत.

हीनोऽर्थेनेन्द्रियस्याल्पः संयोगः स्वेन नैव वा ।
अतियोगोऽतिसंसर्गः सूक्ष्मभासुरभैरवम् ॥ ३६ ॥
अत्यासन्नातिदूरस्थं विप्रियं विकृतादि च ।
यदक्ष्णा वीक्ष्यते रूपं मिथ्यायोगः स दारुणः ॥ ३७ ॥
एवमत्युच्चपूत्यादीनिन्द्रियार्थान् यथायथम् ।
विद्यात्

शब्दादि विषयांचा त्यांच्या त्यांच्या इंद्रियाशीं जो अल्प संयोग होतो किंवा मुळींच होत नाहीं त्याला हीन योग म्हणतात; त्याचा जो अतिसंसर्ग त्याला अतियोग म्हणतात. अतिसूक्ष्म, देदीप्यमान, भयंकर, अतिसंनिध, अतिदूरस्थ, अप्रिय, विकृत इत्यादि प्रकारचें रूप पाहणें हा नेत्रांचा दारुण मिथ्या योग होय; ह्याचप्रमाणें अतिशय मोठा ध्वनि, अतिशय दुर्गंधि इत्यादि त्या त्या इंद्रियांचे मिथ्या योग जाणावे.

कालस्तु शीतोष्णवर्षभेदात्त्रिधा मतः ॥ ३८ ॥
स हीनो हीनशीतादिरतियोगोऽतिलक्षणः ।
मिथ्यायोगस्तु निर्दिष्टो विपरीतस्वलक्षणः ॥ ३९ ॥

आतां कालाविषयीं जर म्हणाल तर त्याचे हिंवाळा, उन्हाळा व पावसाळा असे जे भेद आहेत, त्या तीन कालांमध्यें थंडी, उष्मा व पाऊस यांची जी न्यूनता त्याला हीनयोग व त्यांचें जें आधिक्य त्याला अतियोग म्हणतात; थंडी, उष्मा व पाऊस यांचा जो विपरीतकालीं प्रादुर्भाव त्याला मिथ्यायोग म्हणतात.

कायवाक्चित्तभेदेन कर्मापि विभजेत्त्रिधा ।
कायादिकर्मणो हीना प्रवृत्तिर्हीनसंज्ञिका ॥ ४० ॥
अतियोगोऽतिवृत्तिस्तु वेगोदीरणधारणम् ।
विषमाङ्गक्रियारम्भः पतनस्खलनादिकम् ॥ ४१ ॥
भाषणं साभिभुक्तस्य रागद्वेषभयादि च ।
कर्म प्राणातिपातादि दशधा यच्च निन्दितम् ॥ ४२ ॥
मिथ्यायोगः समस्तोऽसाविह चामुत्र वा कृतम् ।

कायिक, वाचिक व मानसिक अशीं कर्मेंहि तीन प्रकारचीं आहेत. ह्या तीन कर्मांची जी अत्यल्प प्रवृत्ति तो त्यांचा हीनयोग. त्यांची जी अतिप्रवृत्ति तोच त्यांचा अतियोग. बलात्कारानें मलादिकांचें विसर्जन करणें किंवा त्यांची प्रवृत्ति बंद करणें, शरीराचें आसन वेडेंवांकडें असतांना एखादी क्रिया करणें, अडखळणें, पडणें, तोंडांत घांस असतांना बोलणें, राग, द्वेष, भय इत्यादिकांनीं युक्त होणें, हिंसादि जीं दश निंदित कर्में दिनचर्येंत सांगितलीं तीं करणें, मग तीं ह्या लोकीं असोत किंवा परलोकीं असोत, ह्या सर्वांना कायिक, वाचिक किंवा मानसिक कर्मांचा मिथ्यायोग अशी संज्ञा आहे.

निदानमेतद्दोषाणां कुपितास्तेन नैकधा ॥ ४३ ॥
कुर्वन्ति विविधान् व्याधीन् शाखाकोष्ठास्थिसन्धिषु ।

हें दोषप्रकोपांचें निदान (आदिकारण) झालें. त्यानें कुपित झालेले दोष, शाखा, कोष्ठ, अस्थि व संधि ह्या ठिकाणीं अनेक प्रकारें विविध व्याधि उत्पन्न करितात.

शाखा रक्तादयस्त्वक् च बाह्यरोगायनं हि तत् ॥ ४४ ॥
तदाश्रया मषव्यङ्गगण्डालज्यर्बुदादयः ।
बहिर्भागाश्च दुर्नामगुल्मशोफादयो गदाः ॥ ४५ ॥

शाखा, रक्तादि धातु व त्वचा ह्यांना बाह्य रोगमार्ग म्हणतात व ह्या ठिकाणीं मस, वांग, करट, अलजी (पिटिकाविशेष), अर्बुद व बाहेरील मूळव्याध, गुल्म व शोफ (सूज) इत्यादि रोग उत्पन्न होतात.

अन्तः कोष्ठो महास्रोत आमपक्काशयाश्रयः ।
तत्स्थानाश्छर्द्यतीसारकासश्वासोदरज्वराः ॥ ४६ ॥
अन्तर्भागं च शोफार्शोगुल्मवीसर्पविद्रधि ।

ज्याच्यामध्यें आमाशय व पक्काशय आहेत व ज्याला महास्रोत किंवा कोष्ठ अशी संज्ञा आहे, त्याला अभ्यंतर रोगमार्ग म्हणतात. ह्या ठिकाणीं छर्दि (वांति), अतिसार, कास, श्वास, उदर, ज्वर व आंतील मूळव्याध, शोफ, गुल्म, विसर्प व विद्रधि, हे रोग उत्पन्न होतात.

* 'ही नानाविध सृष्टि गुणत्रयावांचून आढळत नाहीं' याचा अर्थ सांख्यशास्त्राची माहिती ज्यांस नाहीं त्यांचे लक्षांत येण्याकरितां असें सांगितलें पाहिजे कीं, सांख्यमताप्रमाणें सर्व सृष्टीचें आदिकारण जी मूळप्रकृति ती तीन गुणांची बनलेली आहे. त्यांचीं नांवें सत्त्व, रज व तम. सर्व चराचर सृष्टीचें पृथक्करण केल्यास शेवटीं द्रव्य, गति व ज्ञान हीं तीन तत्त्वें राहतात. तम, रज व सत्त्व हे तीन गुण अनुक्रमें ह्या तीन तत्त्वांचेच द्योतक आहेत म्हटलें तरी चालेल, व म्हणून त्यांत सर्व सृष्टीचा अंतर्भाव होतो, किंवा सर्व सृष्टि त्रिगुणात्मक आहे असें म्हणतात.

शिरोहृदयवस्त्यादिमर्माण्यस्थ्नां च सन्धयः ॥ ४७ ॥
तन्निबद्धाः शिरास्नायुकण्डराद्याश्च मध्यमः ।
रोगमार्गः स्थितास्तत्र यक्ष्मपक्षवधार्दिताः ॥ ४८ ॥
मूर्धादिरोगाः सन्ध्यस्थित्रिकशूलग्रहादयः ।

शिर, हृदय, बस्ति इत्यादि मर्में, अस्थिसंधि व तदाश्रित शिरा, स्नायु, कंडरादिक ह्यांना मध्यम रोगमार्ग म्हणतात. ह्या ठिकाणीं राजयक्ष्मा, पक्षाघात, अर्दित, मस्तकादि रोग, संधि, अस्थि व त्रिक ( माकडहाड ) यांचा शूल, जखडणें इत्यादि उत्पन्न होतात.

स्रंसव्यासव्यधस्वापसादरुक्तोदभेदनम् ॥ ४९ ॥
सङ्गाङ्गभङ्गसङ्कोचवर्तहर्षणतर्षणम् ।
कम्पपारुष्यसौषिर्यशोषस्पन्दनवेष्टनम् ॥ ५० ॥
स्तम्भः कषायरसता वर्णः श्यावोऽरुणोऽपि वा ।
कर्माणि वायोः

कुपित वायूचीं कर्में येणेंप्रमाणें :—अवयवाच्या स्वस्थानापासून भ्रंश, आंचके, टोंचल्यासारखी पीडा, मेहरी ( स्पर्श न समजणें ), गात्रादिवैकल्य, शूल, तोडल्याप्रमाणें वेदना ( तोद ), भेद ( फाडल्यासारखी पीडा ), मूत्रादिकांचा प्रतिबंध, अंगभंग, आकुंचन, मलादिकांचा खडा होणें, रोमांच उठणें, तृषा, कंप, रूक्षता, अस्थि वगैरे पोकळ होणें, शुष्क होणें, स्फुरण, वांकणें, ताठणें ( किंवा निष्क्रियत्व ), तोंड तुरट होणें, वर्ण आरक्त किंवा पिंगट होणें.

पित्तस्य दाहरागोष्मपाकिताः ॥ ५१ ॥
स्वेदः क्लेदः स्रुतिः कोथः सदनं मूर्च्छनं मदः ।
कट्वम्लौ रसौ वर्णः पाण्डुरारुणवर्जितः ॥ ५२ ॥

कुपित पित्ताचीं कर्में-संताप ( दाह ), लाली, उष्णता, पाक, स्वेद, आर्द्रता, स्राव, कुजणें, गात्रसाद, मूर्च्छा, मद, तोंड आंबट व कडू होणें व श्वेतारुणरहित कोणताहि वर्ण उत्पन्न होणें.

श्लेष्मणः स्नेहकाठिन्यकण्डूशीतत्वगौरवम् ।
बन्धोपलेपस्तैमित्यशोफापक्त्यतिनिद्रताः ॥ ५३ ॥
वर्णः श्वेतो रसौ स्वादुलवणौ चिरकारिता ।
इत्यशेषामयव्यापि यदुक्तं दोषलक्षणम् ॥ ५४ ॥
दर्शनाद्यैरवहितस्तत्सम्यगुपलक्षयेत् ।
व्याध्यवस्थाविभागज्ञः पश्यन्नार्तान् प्रतिक्षणम् ॥५५॥

कुपित कफाचीं कर्में—स्निग्धता, काठिन्य, कंडू, शैत्य, जाड्य, स्रोतोरोध, चिकटा, आलस्य, सूज, अपचन, अतिनिद्रा, पांडुरवर्ण, तोंड खारट किंवा गोड होणें व रोगाची गति मंद असणें. हीं जीं दोषलक्षणें सांगितलीं त्यांत सर्व रोगांचा अंतर्भाव होतो. हीं लक्षणें वैद्यानें व्याधीची अवस्था लक्षांत ठेवून व रोग्याला वारंवार पाहून दर्शनस्पर्शनादिकांनीं लक्षपूर्वक अवलोकन करावीं.

अभ्यासात्प्राप्यते दृष्टिः कर्मसिद्धिप्रकाशिनी ।
रत्नादिसदसज्ज्ञानं न शास्त्रादेव जायते ॥ ५६ ॥

क्रियेंत सिद्धि देणारें असें ज्ञान अभ्यासानें प्राप्त होतें. रत्नादि-परीक्षेप्रमाणें रोगपरीक्षा केवळ शास्त्रापासून कधींहि होत नाहीं.

दुष्टापचारजः कश्चित्कश्चित्पूर्वापराधजः ।
तत्सङ्कराद्भवत्यन्यो व्याधिरेवं त्रिधा स्मृतः ॥ ५७ ॥

कांहीं व्याधी ऐहिक अपराधापासून होतात. कांहीं पूर्वजन्माच्या अपराधापासून होतात. कांहीं दोहोंच्या मिश्रणापासून होतात. ह्याप्रमाणें व्याधीचे तीन प्रकार आहेत.

यथानिदानं दोषोत्थः कर्मजो हेतुभिर्विना ।
महारम्भोऽल्पके हेतावातङ्को दोषकर्मजः ॥ ५८ ॥

दोषज व्याधि त्या त्या दोषप्रकोपकारणापासून होतात, कर्मज व्याधि कारणावांचून होतात. ज्या व्याधीचें कारण अल्प असून स्वरूप भयंकर असतें तो दोषकर्मज जाणावा.

विपक्षशीलनात् पूर्वः कर्मजः कर्मसंक्षयात् ।
गच्छत्युभयजन्मा तु दोषकर्मक्षयात्क्षयम् ॥ ५९ ॥

दोषज व्याधि हेतुविपरीत गोष्टीचें सेवनानें नाहींसा होतो. कर्मज व्याधि कर्मक्षयानेंच नाहींसा होतो ( व तो कर्मक्षय भोगानें किंवा प्रायश्चित्तानें प्राप्त होतो. ) व उभयजन्य व्याधि दोषकर्मक्षयानें नाहींसा होतो.

द्विधा स्वपरतन्त्रत्वाद्व्याधयोऽन्त्याः पुनर्द्विधा ।
पूर्वजाः पूर्वरूपाख्या जाताः पश्चादुपद्रवाः ॥ ६० ॥

स्वतंत्र व परतंत्र असेहि व्याधींचे दोन भेद आहेत. त्यांत परतंत्र व्याधींचे पुनः दोन पोटभेद आहेत. ते असे–मुख्य व्याधीच्या पूर्वी झाले असतां त्यांना पूर्वरूप व मागाहून झाले असतां उपद्रव म्हणतात.

यथास्वजन्मोपशयाः स्वतन्त्राः स्पष्टलक्षणाः ।
विपरीतास्ततोऽन्ये तु विद्यादेवं मलानपि ॥ ६१ ॥
तांल्लक्षयेदवहितो विकुर्वाणान्प्रतिज्वरम् ।

जो रोग स्वकीय कारणांनीं ( शास्त्रोक्त ) उत्पन्न होतो व त्याजवरील औषध दिलें असतां प्रशम पावतो व ज्याचीं लक्षणें स्पष्ट असतात त्याला स्वतंत्र म्हणावें. ह्याहून जे विपरीत ते परतंत्र होत. ह्याचप्रमाणें दोष देखील स्वतंत्र व परतंत्र असतात. त्यांच्या प्रकोपाचें प्रत्येक रोगामध्यें लक्षपूर्वक अवलोकन करावें म्हणजे कोणता दोष स्वतंत्र आहे व कोणता परतंत्र आहे हें समजेल.

तेषां प्रधानप्रशमे प्रशमोऽशाम्यतस्तथा ॥ ६२ ॥
पश्चाच्चिकित्सेत्तूर्णं वा बलवन्तमुपद्रवम् ।

स्वतंत्र व्याधीचा उपशम झाला म्हणजे परतंत्राचाहि होतोच. असें न झाल्यास त्याची मागाहून चिकित्सा करावी; किंवा उपद्रवाचा जोर फारच दिसल्यास त्याचा तत्काल विचार करावा.

व्याधिक्लिष्टशरीरस्य पीडाकरतरो हि सः ॥ ६३ ॥

कारण व्याधिग्रस्त शरीराला तो मुख्य व्याधीहूनहि अधिक पीडाकारक होतो.

विकारनामाकुशलो न जिह्रियात्कदा च न ।
न हि सर्वविकाराणां नामतोऽस्ति ध्रुवा स्थितिः ॥६४॥

रोगाला अमुकच नांव जरी देतां आलें नाहीं, तरी वैद्यानें लज्जित होऊं नये ( म्हणजे नांव समजत नाहीं म्हणून त्याजवर चिकित्सा केल्यावांचून राहूं नये ); कारण सर्वच विकारांस ठरीव नांवें आहेत असें नाहीं.

स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः ।
स्थानान्तराणि च प्राप्य विकारान्कुरुते बहून् ॥६५॥

एकच दोष निरनिराळ्या हेतूंनीं प्रकुपित झाला असतां व स्थानांतराप्रत प्राप्त झाला असतां अनेक विकार उत्पन्न करितो.

तस्माद्विकारप्रकृतीरधिष्ठानान्तराणि च ।
बुद्ध्वा हेतुविशेषांश्च शीघ्रं कुर्यादुपक्रमम् ॥ ६६ ॥

यास्तव रोगाचें उपादानकारण जे वातादि दोष, ते व त्यांचीं अनेक अधिष्ठानें व निरनिराळीं कारणें लक्षांत आणून त्वरित चिकित्सा करावी.

दूष्यं देशं बलं कालमनलं प्रकृतिं वयः ।
सत्त्वं सात्म्यं तथाहारमवस्थाश्च पृथग्विधाः ॥६७॥
सूक्ष्मसूक्ष्माः समीक्ष्यैषां दोषौषधनिरूपणे ।
यो वर्तते चिकित्सायां न स स्खलति जातुचित् ॥६८॥

दूष्य, देश, काल, प्रकृति, बल, अग्नि, वय, मनाची स्थिति व नेहमींच्या संवयी व आहार यांचे व त्यांचे जे बारीक निरनिराळे भेद यांचें चांगलें अवलोकन करून जो दोष व औषध यांचें निरूपण करितो, तो चिकित्सेंत कधींहि चुकत नाहीं.

गुर्वल्पव्याधिसंस्थानं सत्त्वदेहबलाबलात् ।
दृश्यतेऽप्यन्यथाकारं तस्मिन्नवहितो भवेत् ॥ ६९ ॥

शरीराच्या व मनाच्या बलाबलाप्रमाणें व्याधीच्या मोठ्या किंवा लहान स्वरूपाचा अन्यथा भास होतो, म्हणून व्याधीचें खरें स्वरूप जाणण्याविषयीं फार लक्ष पुरवावें. ( शरीरानें व मनानें बळकट अशा मनुष्याला जरी एखादा मोठा रोग झाला तरी त्याचें स्वरूप लहान दिसतें व अशक्त मनुष्याला जरी एखादा क्षुल्लक रोग झाला असला तरी त्या रोगाचें स्वरूप भयंकर असतें. )

गुरुं लघुमिति व्याधिं कल्पयंस्तु भिषग्ब्रुवः ।
अल्पदोषाकलनया पथ्ये विप्रतिपद्यते ॥ ७० ॥

मोठ्या व्याधीला लहान व्याधि असें समजून व अल्पच दोष असेल असा अंदाज करून अज्ञ वैद्य चिकित्सेंत फसतो.

ततोऽल्पमल्पवीर्यं वा गुरुव्याधौ प्रयोजितम् ।
उदीरयेत्तरां रोगान् संशोधनमयोगतः ॥ ७१ ॥

व मग अल्पवीर्य किंवा अल्पप्रमाणाचें संशोधन औषध मोठ्या व्याधीवर देऊन रोग अधिकच वाढवितो; तें संशोधन अपूर्ते ( हीनयोग ) होतें.

शोधनं त्वतियोगेन विपरीतं विपर्यये ।
क्षिणुयान्न मलानेव केवलं वपुरस्यति ॥ ७२ ॥

आतां याच्या उलट; अल्प व्याधि असून अन्यथाभासानें जर त्याजवर एखादें दांडगें संशोधन औषध योजिलें तर तें केवळ मलांचाच क्षय करतें असें नाहीं, तर शरीराचाहि नाश करितें.

अतोऽभियुक्तः सततं सर्वमालोच्य सर्वथा ।
तथा युञ्जीत भेषज्यमारोग्याय यथा ध्रुवम् ॥ ७३ ॥

यास्तव शास्त्राचा सतत अभ्यास करून, सर्व गोष्टींचा सर्व प्रकारें विचार करून अशा रीतीनें औषधाची योजना करावी कीं तें हटकून गुणावह होईल.

वक्ष्यन्तेऽतःपरं दोषा वृद्धिक्षयविभेदतः ।

आतां वृद्धिक्षयभेदेंकरून दोषांची गणना सांगतों.

पृथक् त्रीन् विद्धि संसर्गस्त्रिधा तत्र तु तान्नव ॥७४॥

दोषांच्या पृथक् वृद्धि तीन—वातवृद्धि, पित्तवृद्धि व कफवृद्धि; संसर्ग तीन प्रकारचा व त्याचे पुनः नऊ भेद आहेत.

त्रीनेव समया वृद्ध्या षडेकस्यातिशायने ।

समानवृद्धीनें तीन प्रकारचे संसर्ग होतात. ते असे—वातपित्त वातकफ व पित्तकफ; व एका दोषाच्या आधिक्यानें सहा प्रकारचे संसर्ग होतात. जसें– १ वातवृद्ध व पित्तवृद्धतर, २ पित्तवृद्ध व वातवृद्धतर, ३ कफवृद्ध व पित्तवृद्धतर, ४ पित्तवृद्ध व कफवृद्धतर, ५ कफवृद्ध व वातवृद्धतर, ६ वातवृद्ध व कफवृद्धतर.

त्रयोदश समस्तेषु षड्द्व्येकातिशयेन तु ॥ ७५ ॥
एकं तुल्याधिकैः षट् च तारतम्यविकल्पनात् ।

सन्निपाताचे तेरा भेद आहेत. ते असेः—दोहोंच्या आधिक्यानें तीन भेद व एकाच्या आधिक्यानें तीन भेद. एकूण सहा. जसेः— १ कफवृद्ध व वातपित्ताधिकवृद्ध, २ पित्तवृद्ध व वातकफाधिकवृद्ध, ३ वातवृद्ध व पित्तकफाधिकवृद्ध, ४ पित्तकफवृद्ध व वाताधिकवृद्ध, ५ वातकफवृद्ध व पित्ताधिकवृद्ध, ६ वातपित्तवृद्ध व कफाधिकवृद्ध. तिन्ही दोषांच्या समानवृद्धीनें एक भेद उत्पन्न होतो व तीन दोष एकाहून एक जास्त वृद्ध झाल्यानें सहा भेद उत्पन्न होतात. जसेः— १ वातवृद्ध, पित्तवृद्धतर व कफवृद्धतम; २ वातवृद्ध, कफवृद्धतर व पित्तवृद्धतमः ३ पित्तवृद्ध, कफवृद्धतर व वातवृद्धतम; ४ पित्तवृद्ध, वातवृद्धतर व कफवृद्धतम; ५ कफवृद्ध, वातवृद्धतर व पित्तवृद्धतम, ६ कफवृद्ध, पित्तवृद्धतर व वातवृद्धतम. ( याप्रमाणें सन्निपाताचे एकंदर तेरा भेद आहेत. )

पञ्चविंशतिमित्येवं वृद्धैः क्षीणैश्च तावतः ॥ ७६ ॥

ह्याप्रमाणें वृद्ध झालेल्या दोषांचे एकंदर पंचवीस भेद आहेत. क्षीण दोषांचेहि भेद तितकेच समजावे ( वर ज्या ज्या ठिकाणीं वृद्ध शब्द आला आहे त्या त्या ठिकाणीं क्षीण शब्द घातला म्हणजे हेहि पंचवीस भेद लक्ष्यांत येतील. )

एकैकवृद्धिसमताक्षयैः षट् ते पुनश्च षट्।
एकक्षयद्वन्द्ववृद्ध्या सविपर्ययाऽपि ते ॥ ७७ ॥
भेदा द्विषष्टिर्निर्दिष्टास्त्रिषष्टः स्वास्थ्यकारणम्।

सन्निपातामध्यें एकेक दोषाची वृद्धि, समता व क्षीणता झाल्यानें सहा भेद उत्पन्न होतात. जसें—१ वातवृद्ध, पित्तसम, कफक्षीण; २ पित्तवृद्ध, वातसम, कफक्षीण; ३ कफवृद्ध, पित्तसम, वातक्षीण; ४ कफवृद्ध, वातसम, पित्तक्षीण, ५ वातवृद्ध, कफसम, पित्तक्षीण; ६ पित्तवृद्ध, कफसम, वातक्षीण, एकाचा क्षय व दोहोंची वृद्धि व दोहोंचा क्षय व एकाची वृद्धि ह्यांच्या योगानेंहि पुनः सहा भेद होतात. जसें—१ वातक्षीण व पित्तकफवृद्ध, २ पित्तक्षीण व वातकफवृद्ध, ३ कफक्षीण व वातपित्तवृद्ध, ४ वातपित्तक्षीण व कफवृद्ध, ५ वातकफक्षीण व पित्तवृद्ध व ६ पित्तकफक्षीण व वातवृद्ध. याप्रमाणे एकंदर बासष्ट भेद होतात. तिन्ही दोषांची समान स्थिति हा त्रेसष्टावा भेद होय. हा आरोग्यास कारणीभूत आहे.

संसर्गाद्रसरुधिरादिभिस्तथैषां
दोषांस्तु क्षयसमताविवृद्धिभेदैः।
आनन्त्यं तरतमयोगतश्च यातान्
जानीयादवहितमानसो यथास्वम् ॥ ७८ ॥

रसरक्तादिकांशीं संयोग पावल्यानें, वृद्धिक्षयसाम्यभेदानें व तारतम्यभावेंकरून दोषांचे अनंत भेद होतात, त्यांचा लक्षपूर्वक विचार करावा.

---

# त्रयोदशोऽध्यायः

## अध्याय १३ वा.

### अथातो दोषोपक्रमणीयमध्यायं व्याख्यास्यामः

आतां दोषांच्या चिकित्सेविषयीं अध्याय सांगतों.

वातस्योपक्रमः स्नेहः स्वेदः संशोधनं मृदु।
स्वाद्वम्ललवणोष्णानि भोज्यान्यभ्यङ्गमर्दनम् ॥ १ ॥
वेष्टनं त्रासनं सेको मद्यं पैष्टिकगौडिकम्।
स्निग्धोष्णा बस्तयो बस्तिनियमः सुखशीलता ॥ २ ॥
दीपनैः पाचनैः सिद्धाः स्नेहाश्चानेकयोनयः।
विशेषान्मेद्यपिशितरसतैलानुवासनम् ॥ ३ ॥

वाताची चिकित्सा येणेंप्रमाणें :–स्नेहपान, स्वेदन, हलकें रेचक, स्वादु, अम्ल, लवण व उष्ण असे आहार, अभ्यंग, मर्दन, ऊबदार वस्त्रांनीं आच्छादन, एकदम भिवविणें, कषायादिकांचें सिंचन, पिष्टजन्य व गुडजन्य मद्य, स्निग्धोष्ण बस्ति, मात्राबस्ति,* सुखोपभोग व दीपनपाचन औषधांनीं सिद्ध केलेली निरनिराळ्या प्रकारचीं तैलें व विशेषेंकरून मेदस्वी मांसाचा सुरवा, तैल व अनुवासन (बस्तिविशेष).

पित्तस्य सर्पिषः पानं स्वादुशीतैर्विरेचनम्।
स्वादुतिक्तकषायाणि भोजनान्यौषधानि च ॥ ४ ॥
सुगन्धशीतहृद्यानां गन्धानामुपसेवनम्।
कण्ठे गुणानां हाराणां मणीनामुरसा धृतिः ॥ ५ ॥
कर्पूरचन्दनोशीरैरनुलेपः क्षणे क्षणे।
प्रदोषश्चन्द्रमाः सौधं हारि गीतं हिमोऽनिलः ॥ ६ ॥
अयन्त्रणसुखं मित्रं पुत्रः सन्दिग्धमुग्धवाक्।
छन्दानुवर्तिनो दाराः प्रियाः शीलविभूषिताः ॥ ७ ॥
शीताम्बुधारागर्भाणि गृहाण्युद्यानदीर्घिकाः।
सुतीर्थविपुलस्वच्छसलिलाशयसैकते ॥ ८ ॥
साम्भोजजलतीरान्ते कायमानं द्रुमाकुले।
सौम्या भावाः पयः सर्पिर्विरेकश्च विशेषतः ॥ ९ ॥

पित्ताची चिकित्सा—घृतपान, मधुर व शीत औषधांचा गुलाब, मधुर, कडू व तुरट असे आहार व औषधें, सुगंध, शीत व प्रिय अशा गंधांचें सेवन, कंठी, मोत्यांचे हार व रत्नें यांचें धारण, कर्पूर, चंदन व वाळा यांचे वारंवार लेप, प्रदोषसमय, चांदणें, गच्चीवर बसणें, मनोरंजक गायन, थंड वारा, सलगीचें भाषण करणारे मित्र, बोबडे मधुर बोलणारे पुत्र, आपल्या इच्छेप्रमाणें वागणाऱ्या, सुशील व प्रियकर अशा बायका, ज्यांत अनेक कारंजीं उडत आहेत अशीं घरें, बागांतील हौद, ज्यांत उतरण्याकरितां उत्तम पायऱ्या केल्या आहेत अशा मोठ्या स्वच्छ जलाशयाच्या वाळवंटांत बांधलेल्या, कमलयुक्त जलानें वेष्टित व अनेक प्रकारच्या वृक्षांनीं व्याप्त अशा पर्णकुटींत राहणें इत्यादि गोष्टींच्या सेवनानें पित्ताचा उपशम होतो. सर्व सौम्य पदार्थ, दूध, तूप व विरेचन हे विशेषेंकरून पित्ताचे उपचार होत.

श्लेष्मणो विधिना युक्तं तीक्ष्णं वमनरेचनम्।
अन्नं रूक्षाल्पतीक्ष्णोष्णं कटुतिक्तकषायकम् ॥ १० ॥
दीर्घकालस्थितं मद्यं रतिप्रीतिः प्रजागरः।
अनेकरूपो व्यायामश्चिन्तारूक्षं विमर्दनम् ॥ ११ ॥
विशेषाद्वमनं यूषः क्षौद्रं मेदोघ्नमौषधम्।
धूमोपवासगण्डूषा निःसुखत्वं सुखाय च ॥ १२ ॥

कफचिकित्सा—विधियुक्त तीक्ष्ण वमन व विरेचन, तिखट, कडू व तुरट रसांनीं युक्त, रूक्ष, अल्प, तीक्ष्ण व उष्ण आहार, जुनें मद्य, रतिसुखाची इच्छा, जागरण, अनेक प्रकारचा व्यायाम, चिंता, रूक्ष औषधांचें मर्दन व विशेषेंकरून वमन, कटाचें सार, मध, मेदोघ्न औषधें, धूम्रपान, उपवास, गुळण्या व सुखाचा अभाव या गोष्टी कफावर हितावह आहेत.

---

* सू. अ. १९ श्लो. ६८ पहा.

उपक्रमः पृथग्दोषान् योऽयमुद्दिश्य कीर्तितः ।
संसर्गसन्निपातेषु तं यथास्वं विकल्पयेत् ॥ १३ ॥

ही जी दोषांची वेगळी चिकित्सा सांगितली, तीच संसर्गसन्निपातांमध्यें देखील त्या त्या दोषाच्या मानानें अंशांशानें ग्रहण करावी.

ग्रैष्मः प्रायो मरुत्पित्ते वासन्तः कफमारुते ।
मरुतो योगवाहित्वात्कफपित्ते तु शारदः ॥ १४ ॥

वातपित्तात्मक संसर्गावर ग्रीष्मचर्येतील व वातकफात्मक संसर्गावर वासंतिक उपचार करावे; कारण वायु योगवाही असल्यामुळें तो ज्या दोषाशीं संयोग पावतो तद्नुरूप त्याची क्रिया घडते, म्हणून पित्तासहवर्तमान वायूवर पित्तचिकित्सा व कफसंसृष्टवायूवर कफचिकित्सा योग्य आहे. कफपित्तात्मक संसर्गावर शरदृतूसंबंधीं उपचार करावे.

चय एव जयेद्दोषं कुपितं त्वविरोधयन् ।
सर्वकोपे बलीयांसं शेषदोषाविरोधतः ॥ १५ ॥

दोषांचा संचय होतांच त्यांचा प्रतिकार करावा; प्रकोप होईपर्यंत वाट पाहूं नये. प्रकुपित दोषाचा जो प्रतिकार करणें तो इतर दोषांना बाधक नसावा. तिन्ही दोष प्रकुपित झाले असतां त्यांत जो बलवत्तर असेल त्याचाच प्रतिकार करावा. परंतु तो इतर दोषांस बाधक नसावा.

प्रयोगः शमयेद्व्याधिं योऽन्यमन्यमुदीरयेत् ।
नासौ विशुद्धः शुद्धस्तु शमयेद्यो न कोपयेत् ॥ १६ ॥

ज्या चिकित्सेनें एक रोग बरा होतो परंतु दुसरा उत्पन्न होतो, ती कांहीं खरी शुद्ध चिकित्सा नव्हे; जी दुसरा विकार उत्पन्न न करतां विकार घालविते, तीच खरी ( सशास्त्र ) चिकित्सा.

व्यायामादूष्मणस्तैक्ष्ण्यादहिताचरणादपि ।
कोष्ठाच्छाखास्थिमर्माणि द्रुतत्वान्मारुतस्य च ॥१७॥
दोषा यान्ति

कोष्ठगत दोष, व्यायाम, उष्णतेची तीक्ष्णता, अहित सेवन व वायूचा तीव्र वेग ह्या चार कारणांनीं शाखा, अस्थि व मर्में यांजमध्यें प्रवेश करितात.

तथा तेभ्यः स्रोतोमुखविशोधनात् ।
वृद्ध्याभिष्यन्दनात्पाकात्कोष्ठं वायोश्च निग्रहात् ॥१८॥

तसेंच, शाखादि स्थानांतील दोष स्रोतोमुखाची शुद्धि, स्वतःची वृद्धि, द्रवीभाव, पाक व वायूची प्रेरणशक्ति ह्या पांच कारणांनीं कोष्ठगत होतात.

तत्रस्थाश्च विलम्बेरन्भूयो हेतुप्रतीक्षिणः ।

तेथें गेल्यावर ते लागलेच रोग उत्पन्न न करतां हेत्वंतराची प्रतीक्षा करीत बसतात.

ते कालादिबलं लब्ध्वा कुप्यन्त्यन्याश्रयेष्वपि ॥ १९ ॥

त्यांना कालादिकांचें साहाय्य मिळालें म्हणजे ते स्थानांतरांत असतांहि पुनः प्रकुपित होतात.

तत्रान्यस्थानसंस्थेषु तदीयामबलेषु च ।
कुर्याच्चिकित्सां स्वामेव बलेनान्याभिभाविषु ॥ २० ॥

अन्य स्थानीं प्रकुपित झालेल्या दोषांची चिकित्सा करणें ती त्यांचा जोर कमी असल्यास ज्या दोषाचें तें स्थान असेल त्याप्रमाणें करावी. परंतु त्यांचा जोर अधिक असेल, तर खुद्द त्यांचाच प्रतिकार करावा.

आगन्तुं शमयेद्दोषं स्थानिनं प्रतिकृत्य वा ।

किंवा स्थानिक दोषाचा अगोदर प्रतिकार करून मागाहून आगंतु दोषाचा उपशम करावा.

प्रायस्तिर्यग्गता दोषाः क्लेशयन्त्यातुरांश्चिरम् ॥ २१ ॥
कुर्यान्न तेषु त्वरया देहाग्निबलवित्क्रियाम् ।

आमाशयादि शोधनीय मार्ग सोडून स्थानांतरांत गेलेले दोष बहुधा रोग्यांना फार दिवस क्लेश देतात, म्हणून वैद्यानें देहबल व अग्निबल लक्षांत आणून त्यांचा प्रतिकार सावकाश करावा, घाईनें करूं नये.

शमयेत्तान् प्रयोगेण सुखं वा कोष्ठमानयेत् ॥ २२ ॥

हा जो प्रतिकार करणें तो शमनात्मक असावा. किंवा ( स्वेदनादि उपायानें ) त्यांना कोष्ठांत न्यावें व असें करण्यामध्यें शरीरास क्लेश होऊं देऊं नये.

ज्ञात्वा कोष्ठप्रपन्नांश्च यथासन्नं विनिर्हरेत् ।

ते कोष्ठगत झाल्याचें लक्षांत आल्यावर जिकडून जवळ पडेल तिकडून त्यांचें उत्सर्जन करावें ( वमनादिकांनीं ).

स्रोतोरोधबलभ्रंशगौरवानिलमूढताः ॥ २३ ॥
आलस्यापक्तिनिष्ठीवमलसङ्गारुचिक्लमाः ।
लिङ्गं मलानां सामानां निरामाणां विपर्ययः ॥ २४ ॥

मलमूत्रादि मार्गांचा अवरोध, बलहानि, जाड्य, वायूचा विपरीत संचार, आलस्य, अपचन, तोंडास पाणी सुटणें, मलबद्धता, अरुचि व ग्लानि हीं सामदोषांचीं चिन्हें होत. निराम दोषांचीं चिन्हें याच्या उलट असतात.

उष्मणोऽल्पबलत्वेन धातुमाद्यमपाचितम् ।
दुष्टमामाशयगतं रसमामं प्रचक्षते ॥ २५ ॥

अग्नीच्या कमजोरपणामुळें आद्य धातु जो रस, तो आमाशयांत अपक्व राहून वातादिकांनीं दुष्ट झाला म्हणजे त्याला आमसंज्ञा प्राप्त होते.

अन्ये दोषेभ्य एवातिदुष्टेभ्योऽन्योन्यमूर्च्छनात् ।
कोद्रवेभ्यो विषस्येव वदन्त्यामस्य सम्भवम् ॥ २६ ॥

कित्येक आचार्य असें म्हणतात कीं, जसें कोद्रूमध्यें विष उत्पन्न होतें तसेंच अतिदुष्ट झालेल्या दोषांच्याच परस्परसंमीलनापासून आमाची उत्पत्ति होते.

**आमेन तेन सम्पृक्ता दोषा दूष्याश्च दूषिताः ।**
**सामा इत्युपदिश्यन्ते ये च रोगास्तदुद्भवाः ॥ २७ ॥**

ह्या आमाच्या संसर्गानें दूषित झालेले जे वातादि दोष, रसादि दूष्य व तज्जन्य रोग ह्यांना साम संज्ञा आहे.

**सर्वदेहप्रविसृतान् सामान् दोषान्न निर्हरेत् ।**
**लीनान्धातुष्वनुत्क्लिष्टान् फलादामाद्रसानिव ॥ २८ ॥**
**आश्रयस्य हि नाशाय ते स्युर्दुर्निर्हरत्वतः ।**

सर्व देहांत पसरलेले, धातूंत मिश्रित झालेले व स्वस्थानापासून न सुटलेले असे जे साम दोष त्यांचें निःसारण करूं नये. अपक्व फलांतून रस काढला म्हणजे जशी त्याची नासाडी होते; तशीच अपक्व दोष काढून टाकल्यानें शरीराची नासाडी होते, कारण त्यांना काढून टाकण्याला प्रयास लागतात.

**पाचनैर्दीपनैः स्नेहैस्तान्स्वेदैश्च परिष्कृतान् ॥ २९ ॥**
**शोधयेच्छोधनैः काले यथासत्त्वं यथाबलम् ।**

दीपन, पाचन, स्नेहन व स्वेदन हे संस्कार त्या सामदोषांवर घडवून मग यथाकालीं व यथाशक्ति व जिकडून जवळ असेल त्या द्वारां शोधन औषधांनीं त्यांचें उत्सर्जन करावें.

**हन्त्याशु युक्तं वक्त्रेण द्रव्यमामाशयान्मलान् ॥३०॥**
**घ्राणेन चोर्ध्वजत्रूत्थान् पक्वाधानाद्गुदेन च ।**

तोंडावाटे दिलेलें औषध आमाशयांतील दोष लवकर काढून टाकतें. नाकावाटे दिलेलें औषध ऊर्ध्वजत्रुगत दोषांना त्वरित काढून टाकतें व गुदद्वारां दिलेलें औषध आंतड्यांतील दोष जलद नाहींसें करितें.

**उत्क्लिष्टानध ऊर्ध्वं वा न चामान्वहतः स्वयम् ॥ ३१ ॥**
**धारयेदौषधैर्दोषान् विधृतास्ते हि रोगदाः ।**

स्वस्थानापासून प्रचलित होऊन ऊर्ध्व किंवा अधोद्वारानें आपोआप प्रवृत्त होणाऱ्या आमदोषांचा झाडा औषधांनीं बंद करूं नये; कारण तसें केल्यानें ते रोगप्रद होतात.

**प्रवृत्तान्प्रागतो दोषानुपेक्षेत हिताशिनः ॥ ३२ ॥**
**विबद्धान्पाचनैस्तैस्तैः पाचयेन्निर्हरेत वा ।**

यास्तव आपोआप प्रवृत्त झालेल्या दोषांची पहिल्यानें उपेक्षा करावी; औषध वगैरे न देतां फक्त पथ्यानें राहावयास सांगावें; त्यांचा अवष्टंभ झाला असल्यास त्या त्या पाचक औषधांनीं त्यांना पक्व करावें किंवा शोधन देऊन बाहेर काढावें.

**श्रावणे कार्तिके चैत्रे मासि साधारणे क्रमात् ॥ ३३ ॥**
**ग्रीष्मवर्षाहिमाचितान् वाय्वादीनाशु निर्हरेत् ।**

ग्रीष्मऋतु (उन्हाळा), पावसाळा व हिंवाळा ह्यांत संचित झालेल्या वातादि दोषांचें शोधन अनुक्रमेंकरून श्रावण, कार्तिक व चैत्र ह्या महिन्यांत करावें; कारण हे महिने शीतोष्णवृष्टींच्या संबंधानें साधारण आहेत.*

---

* श्रावण, कार्तिक व चैत्र हे महिने शीतोष्णवृष्टीच्या संबंधानें साधारण आहेत. याचा अर्थ (पुढील श्लोकांत दर्शविल्याप्रमाणें) असा कीं, ह्या तीन महिन्यांत पाऊस, थंडी व उष्मा मध्यम असतो; इतर महिन्यांत त्यांचें आधिक्य असतें. श्रावण महिना पावसाळ्याचा आरंभ, कार्तिक हिंवाळ्याचा आरंभ व चैत्र उन्हाळ्याचा आरंभ असल्यामुळें ह्या तीन महिन्यांना ऋतुसंधि असें पुढील श्लोकांत म्हटलें आहे. अशा ऋतुसंधीमध्यें पाऊस, थंडी किंवा उष्मा फारसा नसल्यामुळें रेचक वगैरे सहन होतें. ह्यासंबंधानें इतकेंच सुचवावयाचें कीं, श्रावण, कार्तिक व चैत्र ह्या महिन्यांना ऋतुसंधि असें सांप्रतकालीं म्हणतां येत नाहीं; कारण देशकालपरत्वें ऋतूंचा प्रारंभ मागें पुढें होत असल्यामुळें जरी श्रावण व चैत्र एका कालीं पावसाळा व उन्हाळा यांचे सुरुवातीचे काल होते, तरी प्रस्तुतकालीं ते त्यांच्या परमावधीचे काल झाले आहेत. हिंवाळ्याच्या संबंधानें कार्तिक महिन्यालाहि हेंच म्हणणें कांहींसें लागू आहे. दक्षिण हिंदुस्थानांत प्रस्तुतकालीं ज्येष्ठ, आश्विन व फाल्गुन ह्या महिन्यांना मात्र ऋतुसंधि व साधारण काल म्हणतां येईल; कारण त्यांत पाऊस, थंडी व उष्मा यांची किंचित् सुरुवात झालेली असते. ज्योतिषशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अयनगति नेहमीं थोडीशी बदलत चालली आहे. हा बदल पीछेहाटीकडे आहे. म्हणजे हल्लीं जी उत्तरायणाची सुरुवात (मकरसंक्रांत) पौष मासांत होते, ती भारतकालीं माघमासांत होत असे व त्याच्यापूर्वीहि म्हणजे तैत्तिरीय संहितेच्या वेळीं फाल्गुनमासीं व ऋग्वेदकालीं चैत्रमासीं होत असे, असें रा० रा० बाळ गंगाधर टिळक यांनीं आपल्या 'ओरायन्' नामक ग्रंथांत सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे. ज्या मानानें मकरसंक्रांतीची (म्हणजे उत्तरायणाच्या प्रारंभाची) पीछेहाट होत आहे, त्याच मानानें वर्षादि ऋतूंचीहि होत आहे. कारण ऋतु दिनमानावर व दिनमान सूर्याच्या राशिचक्रांतून होणाऱ्या संक्रमणावर अवलंबून आहे. दिनमान जसजसें वाढत जातें तसतसा उन्हाळा वाढत जातो व तें जसजसें कमी होत जातें तसतसा हिंवाळा वाढतो. पावसाळा उन्हाळ्यावरच अवलंबून असल्यामुळें व उन्हाळ्याची सुरुवात उत्तरायणाच्या पीछेहाटीमुळें हल्लीं लवकर होत असल्यामुळें पावसाळाहि पूर्वीपेक्षां हल्लीं लवकर सुरू होत आहे. वाग्भटानें जें ऋतूंचें मान सांगितलें आहे, तें चरकाच्या वेळचें आहे. त्या वेळीं श्रावण महिन्यांत ज्या तऱ्हेची हवा असे, (म्हणजे पावसाळ्याची नुकतीच सुरुवात) ती हल्लीं पंजाबकडे आषाढांत व ह्या देशांत ज्येष्ठांतच असते. चरकाचे वेळेपासून आजामित्तीस सर्व ऋतूंची सुमारें एक महिन्यानें पीछेहाट झाली आहे. पावसाळ्याला सूर्याच्या गतीशिवाय दुसरीहि कांहीं भूगोलासंबंधीं कारणें असल्यामुळें त्याची सुरुवात देशपरत्वें लवकर किंवा उशीरां होत असते. पुण्यास पावसाळा सुरू होण्यापूर्वीं सुमारें २० दिवस अगोदर लंकेंत सुरू होत असतो, हें प्रसिद्धच आहे. तो दक्षिणेकडून उत्तरेकडे हळूहळू जातो. चरक हा ग्रंथ प्राचीन आहे, इतकेंच नव्हे तर तो उत्तरदेशांतील असल्यामुळें त्यांत दिलेला तत्कालीन वर्षाऋतूचा आरंभ व आपल्या देशांतील हल्लींचा वर्षाऋतूचा आरंभ यांत सुमारें दोन महिन्यांचें अंतर आहे. इतर ऋतूंच्या संबंधानें हें अंतर वर सांगितल्याप्रमाणें एक महिन्याचेंच आहे. म्हणून प्रस्तुत श्लोकांत विरेचनाला योग्य असे जे श्रावण, चैत्र व कार्तिक हे ऋतुसंधि सांगितले आहेत, त्यांच्या ऐवजीं प्रस्तुतकाळीं व ह्या देशांत ज्येष्ठ, फाल्गुन व आश्विन हे महिने घेणें योग्य आहे. ही जी ऋतूंची पीछेहाट ती सुश्रुताला कळली होती, असें त्याच्या सूत्रस्थानांतील ६ व्या अध्यायांत

[ पान ६३ पहा ]

अत्युष्णवर्षशीता हि ग्रीष्मवर्षाहिमागमाः ॥ ३४ ॥
सन्धौ साधारणे तेषां दुष्टान्दोषान्विशोधयेत्।

ग्रीष्मकाळ, वर्षाकाळ व हिंवाळा यांत अनुक्रमेंकरून उष्णा, वृष्टि व शैत्य ह्यांचें आधिक्य असतें. त्यांचे जे संधि ( वर सांगितलेले महिने ) त्यांमध्यें उष्णादिकांची समान स्थिति असल्यामुळें तेच काल दोषांच्या शोधनास योग्य होत.

स्वस्थवृत्तमभिप्रेत्य व्याधौ व्याधिवशेन तु ॥ ३५ ॥

हा जो शोधनकाल सांगितला तो निरोगी मनुष्यालाच लागू आहे. व्याधि असल्यास त्या त्या व्याधीप्रमाणें शोधनाची व्यवस्था ठेवावी. वरील कालनियम त्यास लागू नाहीं.

कृत्वा शीतोष्णवृष्टीनां प्रतिकारं यथायथम्।
प्रयोजयेत्क्रियां प्राप्तां क्रियाकालं न हापयेत्॥ ३६ ॥

शीतोष्णवर्षाकालामध्येंच व्याधिताला शोधन देणें झाल्यास त्यास शीतादिकांचा योग्य प्रतिकार करून जी क्रिया प्राप्त असेल ती अमलांत आणावी, तिची उपेक्षा करूं नये.

युञ्ज्यादनन्नमन्नादौ मध्येऽन्ते कवलान्तरे।
ग्रासे ग्रासे मुहुः सान्नं सामुद्गं निशि चौषधम् ॥३७॥

औषध घेण्याचे दहा काल आहेत. ते येणेंप्रमाणें:— १ जेवणापूर्वीं औषध जिरेल इतक्या अंतरानें, २ जेवण्यापूर्वींच अंतर न टाकतां, ३ जेवणाच्या मध्यभागीं, ४ भोजनोत्तर, ५ दोन दोन घांसांच्या मध्यें ( म्हणजे एक घांस आहाराचा व एक घांस औषधाचा ), ६ प्रत्येक घांसाशीं मिश्र करून, ७ वरचेवर, ८ भोजनाबरोबर, ९ भोजन सुरू करण्यापूर्वीं व पुनः भोजन होतांच ( ह्या रीतीला सामुद्ग म्हणतात ) व १० रात्रीं निजतेवेळीं.

कफोद्रेके गदेऽनन्नं बलिनो रोगरोगिणोः।
अन्नादौ विगुणेऽपाने समाने मध्य इष्यते ॥ ३८ ॥
व्यानेऽन्ते प्रातराशस्य सायमाशस्य तूत्तरे।
ग्रासग्रासान्तयोः प्राणे प्रदुष्टे मातरिश्वनि ॥ ३९ ॥
मुहुर्मुहुर्विषच्छर्दिहिध्मातृट्श्वासकासिषु।
योज्यं सभोज्यं भैषज्यं भोज्यैश्चित्रैररोचके ॥ ४० ॥

रोग व रोगी बलवान् असून कफाधिक्य असल्यास अनशपोटीं औषध द्यावें; अपान वायूचा प्रकोप झाला असल्यास भोजनापूर्वींच अंतर न टाकतां औषध द्यावें; समानाचा प्रकोप असल्यास भोजनाच्या मध्यभागीं द्यावें; व्यानवायूचा प्रकोप असल्यास सकाळच्या जेवणानंतर द्यावें; उदानाचा प्रकोप असल्यास रात्रीच्या जेवणानंतर द्यावें; प्राणवायूचा प्रकोप असल्यास घांसाबरोबर किंवा दोन घांसांच्या मध्यंतरीं द्यावें; विषबाधा, वांति, उचकी, तृषा, श्वास व कास ह्या विकारांमध्यें वरचेवर द्यावें; अरोचकामध्यें नाना प्रकारच्या भक्ष्य पदार्थांशीं मिश्रित करून द्यावें.

कम्पाक्षेपकहिध्मासु सामुद्गं लघुभोजिनाम्।

कंप, आक्षेप ( आचक्यांचा विकार ) व उचकी ह्या विकारांमध्यें भोजनाच्या पूर्वीं व पुनः मागाहून द्यावें व आहार हलका असावा.

ऊर्ध्वजत्रुविकारेषु स्वप्नकाले प्रशस्यते ॥ ४१ ॥

व ऊर्ध्वजत्रु ( शिरोरोगादि ) विकारामध्यें निजते वेळीं औषध द्यावें.

---

[ पान ६२ वरून चालू ]

दिलेल्या दोन तऱ्हेच्या ( प्राचीन व त्याच्या वेळचे ) ऋतूंच्या कोष्टकावरून स्पष्ट दिसतें. वर जी अयनाची पीछेहाट ( अयनचलन किंवा संपातचलन– Precession of the equinoxes ) सांगितली तिचें मान दर वर्षास पन्नास विकलांप्रमाणें असल्यामुळें कोणतेहि ऋतु एक महिना मागें हटण्यास २१५० वर्षें लागतात.

# चतुर्दशोऽध्यायः

## अध्याय १४ वा

अथातो द्विविधोपक्रमणीयमध्यायं व्याख्यास्यामः।

आतां द्विविधोपक्रमणीय ( दोन प्रकारच्या चिकित्सेविषयीं ) अध्याय सांगतों.

उपक्रम्यस्य हि द्वित्वाद्द्विधैवोपक्रमो मतः।

रोग दोन प्रकारचे ( साम व निराम ) असल्यामुळें चिकित्साहि दोन प्रकारचीच मानतात.

एकः सन्तर्पणस्तत्र द्वितीयश्चापतर्पणः ॥ १ ॥
बृंहणो लङ्घनश्चेति तत्पर्यायावुदाहृतौ।
बृंहणं यद्बृहत्वाय लङ्घनं लाघवाय यत् ॥ २ ॥
देहस्य

एक बृंहणात्मक व दुसरी कर्षणात्मक. बृंहणालाच संतर्पण अशी दुसरी संज्ञा आहे व कर्षणाला लंघन किंवा अपतर्पण असेंहि म्हणतात. जें शरीराला बृहत्व किंवा पुष्टता आणितें, त्याला बृंहण व जें लघुत्व आणितें त्याला लंघन म्हणतात.

भवतः प्रायो भौमापमितरच्च ते।

संतर्पण ( बृंहण ) द्रव्यें बहुधा पृथ्वीजलभूयिष्ठ असतात व अपतर्पण द्रव्यें प्रायः अग्नि, वायु व आकाश यांच्या अधिकांशानें बनलीं असतात.

स्नेहनं रूक्षणं कर्म स्वेदनं स्तम्भनं च यत् ॥ ३ ॥
भूतानां तदपि द्वैध्याद्द्वितयं नातिवर्तते।

स्नेहन, रूक्षण, स्वेदन व स्तंभन ह्या चतुर्विध कर्मांचा देखील द्विविध उपक्रमांमध्येंच अंतर्भाव होतो; कारण पंचभूतेंच मुळीं बृंहणलंघनात्मक आहेत व स्नेहनादि कर्में ज्या द्रव्यांपासून होतात, तीं पंचभूतांला सोडून कधींहि नाहींत.

शोधनं शमनं चेति द्विधा तत्रापि लङ्घनम् ॥ ४ ॥

आतां लंघनाचेहि शोधन व शमन असे दोन प्रकार आहेत.

यदीरयेद्बहिर्दोषान्पञ्चधा शोधनं च तत्।

जें दोषांना बाहेर काढून टाकितें, त्याला शोधन म्हणतात. तें पांच प्रकारचें.

निरूहो वमनं कायशिरोरेकोऽस्रविस्रुतिः ॥ ५ ॥

बस्ति, वमन, विरेचन, मूर्धविरेचन व रक्तमोक्ष.

न शोधयति यद्दोषान् समान्नोदीरयत्यपि।
समीकरोति विषमान् शमनं तच्च सप्तधा ॥ ६ ॥
पाचनं दीपनं क्षुत्तृड्व्यायामातपमारुताः।

जें औषध दोषांना बाहेर न काढून टाकितां व समदोषांना विकृत न करतां विषम दोषांना समस्थितींत आणितें त्याला शमन म्हणतात. व तें सात प्रकारचें:–पाचन, दीपन, निराहार, पाणी न पिणें, व्यायाम करणें, आतपसेवन ( ऊन घेणें ) व वाऱ्यांत बसणें.

बृंहणं शमनं त्वेव वायोः पित्तानिलस्य च ॥ ७ ॥

वायूला व पित्ताश्रित वायूला बृंहण हेंच शमन होय. ( वायूचा व पित्ताश्रित वायूचा लंघनानें प्रकोप व बृंहणानें उपशम होतो म्हणून वरील व्यवस्था त्यास लागू नाहीं. )

बृंहयेद्व्याधिभैषज्यमद्यस्त्रीशोककर्शितान्।
भाराध्वोरःक्षतक्षीणरूक्षदुर्बलवातलान् ॥ ८ ॥
गर्भिणीसूतिकाबालवृद्धान् ग्रीष्मेऽपरानपि।

बृंहण चिकित्सेस जे योग्य आहेत ते येणेंप्रमाणें:—व्याधि, औषधें, मद्य, स्त्रीसेवन व शोक यांच्या योगानें कृश झालेले, ओझें वाहणें, मार्गक्रमण व उरःक्षत यांनीं थकलेले व रूक्ष, अशक्त, वातप्रकृति, गर्भिणी, बाळंतीण, बाल व वृद्ध; आणि ग्रीष्म ऋतूमध्यें तर सर्वांना बृंहण योग्य आहे.

मांसक्षीरसितासर्पिर्मधुरस्निग्धबस्तिभिः ॥ ९ ॥
स्वप्नशय्यासुखाभ्यङ्गस्नाननिर्वृतिहर्षणैः।

बृंहण करणें तें पुढील साधनांनीं करावें:–मांस, दूध, साखर, तूप मधुर व स्निग्ध औषधांच्या पिचकाऱ्या, निद्रा घेणें, बिछान्यावर यथेच्छ पडून राहणें, अभ्यंगस्नान, चित्ताचें समाधान व रंजन.

मेहामदोषातिस्निग्धज्वरोरुस्तम्भकुष्ठिनः ॥ १० ॥
विसर्पविद्रधिप्लीहशिरःकण्ठाक्षिरोगिणः।
स्थूलांश्च लङ्घयेन्नित्यं शिशिरे त्वपरानपि ॥ ११ ॥

लंघनास जे योग्य ते येणेंप्रमाणें:—मेह, आमदोष, स्नेहाधिक्य, ज्वर, ऊरुस्तंभ, कुष्ठ, विसर्प ( धावरें ), विद्रधि, प्लीहा, शिरोरोग, कंठरोग व नेत्ररोग ह्या विकारांनीं युक्त व ज्यांचीं शरीरें स्थूल आहेत ते. शिशिर ऋतूमध्यें तर सर्वांनाच लंघन योग्य आहे.

तत्र संशोधनैः स्थौल्यबलपित्तकफाधिकान्।
आमदोषज्वरच्छर्दिरतीसारहृदामयैः ॥ १२ ॥
विबन्धगौरवोद्गारहृल्लासादिभिरातुरान्।
मध्यस्थौल्यादिकान्प्रायः पूर्वं पाचनदीपनैः ॥ १३ ॥
एभिरेवामयैरार्तान् हीनस्थौल्यबलादिकान्।
क्षुत्तृष्णानिग्रहैर्दोषैस्त्वार्तान्मध्यबलैर्दृढान् ॥ १४ ॥
समीरणातपायासैः किमुतात्पबलैर्नरान्।

आतां ज्यांच्यामध्यें स्थौल्य, बल, कफ व पित्त यांचें आधिक्य असून अजीर्ण, ज्वर, वांति, अतिसार, हृद्रोग, मलबद्धता, जाड्य, ढेंकरा, मळमळणें इत्यादि विकार आहेत त्यांना शोधन औषधें देऊन अपतर्पण करावें. स्थौल्यादिक मध्यम असून हेच विकार झाले असल्यास पूर्वीं दीपन व पाचन औषधें देऊन मग शोधन द्यावें. हेच विकार झाले असून स्थौल्यादिक अगदींच कमी असल्यास क्षुधा व तृषा यांचा निग्रह केला म्हणजे बस्स आहे. रोगी बळकट असून दोषाचें बळ मध्यम असल्यास त्याचें वारा, ऊन व व्यायाम यांच्या सेवनानें अपतर्पण करावें. दोषाचा जोर कमी असेल तर मग अर्थात् ही क्रिया अधिकच योग्य आहे.

न बृंहयेल्लङ्घनीयान् बृंह्यांस्तु मृदु लङ्घयेत् ॥ १५ ॥
युक्त्या वा देशकालादिबलतस्तानुपाचरेत्।

लंघनार्ह जे लोक आहेत त्यांना जरी एखादा बृंहणसाध्य रोग असला तरी कधींहि बृंहण देऊं नये. बृंहणार्ह जे असतील त्यांना रोगनिवृत्त्यर्थ कर्षणाची आवश्यकता असल्यास तें थोडेंच करावें; किंवा देशकालानुरोधानें जी योग्य दिसेल तीच योजना करावी.

बृंहिते स्याद्बलं पुष्टिस्तत्साध्यामयसंक्षयः ॥ १६ ॥

बृंहणानें बल, पुष्टि व तत्साध्य रोगाचा नाश इतक्या गोष्टी उत्पन्न होतात.

विमलेन्द्रियता सर्गो मलानां लाघवं रुचिः।
क्षुत्तृट्सहोदयः शुद्धहृदयोद्गारकण्ठता ॥ १७ ॥
व्याधिमार्दवमुत्साहस्तन्द्रानाशश्च लङ्घिते।

लंघनानें इंद्रियांची प्रसन्नता, मलांचा उत्सर्ग, देहलाघव, रुचि, क्षुधा व तृषा यांचा एककालीं प्रादुर्भाव, हृदय, कंठ व ढेंकर यांची शुद्धि, रोगाचा जोर कमी होणें, उत्साह व तंद्रेचा नाश इतक्या गोष्टी उत्पन्न होतात.

अनपेक्षितमात्रादिसेविते कुरुतस्तु ते ॥ १८ ॥
अतिस्थौल्यातिकार्श्यादीन् वक्ष्यन्ते ते च सौषधाः।

प्रमाण वगैरे लक्षांत न आणितां बृंहण व लंघन यांचें सेवन केल्यास अनुक्रमें अतिस्थौल्यादि व अतिकार्श्यादि (पुढें सांगितलेले) विकार उत्पन्न होतात. ते व त्यांची चिकित्सा येथेंच सांगतों.

रूपं तैरेव च ज्ञेयमतिबृंहितलङ्घिते ॥ १९ ॥

बृंहण व लंघन यांच्या अतिरेकाचीं लक्षणेंहि अतिस्थौल्य व अतिकार्श्य इत्यादिकच होत.

अतिस्थौल्यापचीमेहज्वरोदरभगन्दरान्।
काससंन्यासकृच्छ्रामकुष्ठादीनतिदारुणान् ॥ २० ॥

बृंहणोपचार मर्यादेबाहेर गेले असतां अतिस्थौल्य, अपची

( गंडमाला ), मेह, ज्वर, उदर, भगंदर, कास, संन्यास, मूत्रकृच्छ्र आमदोष, कुष्ठ इत्यादि अतिदारुण विकार उत्पन्न होतात.

**तत्र मेदोऽनिलश्लेष्मनाशनं सर्वमिष्यते ।**

त्यांजवर सर्व वातकफनाशक व मेदोघ्न उपचार करावे.

**कुलत्थजूर्णश्यामाकयवमुद्गमधूदकम् ॥ २१ ॥**
**मस्तुदण्डाहतारिष्टचिन्ताशोधनजागरम् ।**
**मधुना त्रिफलां लिह्याद्गुडूचीमभयां घनम् ॥ २२ ॥**
**रसाञ्जनस्य महतः पञ्चमूलस्य गुग्गुलोः ।**
**शिलाजतुप्रयोगश्च साग्निमन्थरसो हितः ॥ २३ ॥**
**विडङ्गं नागरं क्षारः काललोहरजो मधु ।**
**यवामलकचूर्णं च योगोऽतिस्थौल्यदोषजित् ॥ २४ ॥**

कुळीथ, जोंधळे, सांवे, सातू, मूग, मधुमिश्रित पाणी, दह्याची निवळ, ताक, अरिष्ट ( औषधियुक्त मद्य ), विरेचन, चिंता व जागरण यांचें सेवन करावें. त्रिफळा, गुळवेल, हरीतकी किंवा नागरमोथा मधाशीं भक्षण करावा. रसांजन ( रसवंती ), मोठें पंचमूळ, गुग्गुळ किंवा शिलाजित ऐरणीच्या रसाशीं भक्षण करावा. वावडिंग, सुंठ, यवक्षार, मंडूर, सातू व आवळकाठी यांचें चूर्ण मधाशीं भक्षण केलें असतांहि अतिस्थौल्य नाहींसें होतें.

**व्योषकट्वीवराशिग्रुविडङ्गातिविषास्थिराः ।**
**हिङ्गुसौवर्चलाजाजीयवानीधान्यचित्रकाः ॥ २५ ॥**
**निशे बृहत्यौ हपुषा पाठा मूलं च केम्बुकात् ।**
**एषां चूर्णं मधु घृतं तैलं च सदृशांशकम् ॥ २६ ॥**
**सक्तुभिः षोडशगुणैर्युक्तं पीतं निहन्ति तत् ।**
**अतिस्थौल्यादिकान्सर्वान् रोगानन्यांश्च तद्विधान् २७**
**हृद्रोगकामलाश्वित्रश्वासकासगलग्रहान् ।**
**बुद्धिमेधास्मृतिकरं सन्नस्याग्नेश्च दीपनं ॥ २८ ॥**

त्रिकटु, कुटकी, त्रिफळा, शेवग्याच्या मुळाची साल, वावडिंग, अतिविष, सालवण, हिंग, पादेलोण, जिरें, ओवा, धणे, चित्रक, हळद, दारुहळद, रिंगणी, डोरली, शिरदोडी, पहाडमूळ व कोबीचें मूळ ( केंबुक ) या सर्वांचें चूर्ण व तत्समान मध, तूप व तेल ( तिळाचें ) षोडश गुण सातूच्या पिठाबरोबर भक्षण केल्यास वर सांगितलेले अतिस्थौल्यादिक सर्व रोग व हृद्रोग, कावीळ, पांढरें कोड, श्वास, कास, गलग्रह इत्यादि तत्सदृश इतर रोगहि नाहींसे होतात. व शिवाय हें चूर्ण बुद्धि, धारणा आणि स्मृति यांना वाढवितें व मंदाग्नीला प्रदीप्त करितें.

**अतिकार्श्ये भ्रमः श्वासस्तृष्णाधिक्यमरोचकः ।**
**स्नेहाग्निनिद्रादृक्श्रोत्रशुक्रौजःक्षुत्स्वरक्षयः ॥ २९ ॥**
**बस्तिहृन्मूर्धजङ्घोरुत्रिकपार्श्वरुजा ज्वरः ।**
**प्रलापोऽर्धानिलग्लानिच्छर्दिः पर्वास्थिभेदनम् ॥ ३० ॥**
**वर्चोमूत्रग्रहाद्याश्च जायन्तेऽतिविलङ्घनात् ।**



अतिलंघनानें पुढील विकार उत्पन्न होतातः–अतिकार्श्य, भ्रम, खोकला, तृष्णाधिक्य, अरोचक, स्निग्धता, अग्नि, निद्रा, दृष्टि, श्रवणशक्ति, शुक्र, ओज, क्षुधा व स्वर यांचा क्षय; बस्ति, हृदय, शिर, तंगडी, मांडी, माकडहाड, बरगड्या यांचा शूल; ज्वर, प्रलाप, अर्धांगवायु, ग्लानि, छर्दि, संधि व अस्थि यांचा ठणका व मलमूत्रादिकांचा अवरोध इत्यादि.

**कार्श्यमेव वरं स्थौल्यान्न हि स्थौल्यस्य भेषजम् ॥ ३१ ॥**
**बृंहणं लङ्घनं नालमतिमेदोऽग्निवातजित् ।**

अतिस्थौल्याहून अतिकार्श्यच बरें, कारण अतिस्थौल्यावर बृंहण औषध द्यावें तरी कठिण व लंघन द्यावें तरी कठिण. बृंहणानें अग्नि व वायु यांचा उपशम होतो, पण मेद वाढतो व लंघनानें मेद झडतो, पण अग्नि व वायु यांचा जोर वाढतो ( व त्यामुळें पुनः मेद वाढतो ). व म्हणून त्यांजवर औषधच नाहीं म्हटलें तरी चालेल.

**मधुरस्निग्धसौहित्यैर्यत्सौख्येन विनश्यति ॥ ३२ ॥**
**कृशिमा स्थविमात्यन्तविपरीतनिषेवणैः ।**

तसेंच, मधुर व स्निग्ध पदार्थांचें यथेच्छ सेवन केलें म्हणजे व सौख्य झालें म्हणजे अतिकार्श्य नाहींसें होतें; परंतु अतिस्थौल्यावर याच्या अगदीं उलट उपचार करावे लागतात.

**योजयेद्बृंहणं तत्र सर्वं पानान्नभेषजम् ॥ ३३ ॥**

अतिकार्श्यावर सर्व पौष्टिक अन्नपान व औषधें यांची योजना करावी.

**अचिन्तया हर्षणेन ध्रुवं सन्तर्पणेन च ।**
**स्वप्नप्रसङ्गाच्च कृशो वराह इव पुष्यति ॥ ३४ ॥**

निष्काळजी व आनंदी असणें, पौष्टिक पदार्थ भक्षण करणें व खूप झोंप घेणें यांचे योगानें कृश मनुष्य रानडुकरासारखा पुष्ट होतो.

**न हि मांससमं किञ्चिदन्यद्देहबृहत्वकृत् ।**
**मांसादमांसं मांसेन सम्भृतत्वाद्विशेषतः ॥ ३५ ॥**

मांसाप्रमाणें शरीर पुष्ट करणारें दुसरें कांहींच नाहीं. त्यांतहि मांसाहारी प्राण्यांचें मांस मांसानेंच पोषित झाल्यामुळें अधिकच पुष्टि देतें.

**गुरु चातर्पणं स्थूले विपरीतं हितं कृशे ।**

स्थूलाला जे जे जड व कृशकारक पदार्थ आहेत ते सारे हितावह होत, व जे हलके व पौष्टिक पदार्थ ते सर्व कृशाला हितावह होत.

**यवगोधूममुभयोस्तद्योग्याहितकल्पनम् ॥ ३६ ॥**

सातू व गहूं यांचे पदार्थ यथायोग्य तयार केले असतां स्थूल व कृश मनुष्यास अनुक्रमें हितावह होतात. ( तैलतक्रादिकांनीं सिद्ध केलेले सातूचे पदार्थ स्थूलाला व घृतक्षीरादिसिद्ध गव्हांचे पदार्थ कृशाला हितावह होत. )

**दोषगत्यातिरिच्यन्ते ग्राहिभेद्यादिभेदतः ।**
**उपक्रमा न ते द्वित्वाद्भिन्ना अपि गदा इव ॥ ३७ ॥**

दोषांचे जे अनंत प्रकार तदनुरूप प्राही, भेदी इत्यादि भेदेंकरून चिकित्साहि अनेक प्रकारची असते; तथापि रोगाप्रमाणेंच तीहि एा भेदद्वयाला सोडून राहत नाहीं. (रोगांत जसे साम व निराम असे व्यापक भेद आहेत, तसेच चिकित्सेंतहि लंघन व बृंहण असे दोन मुख्य भेद आहेत.)

---

# पञ्चदशोऽध्यायः

## अध्याय १५ वा.

**अथातः शोधनादिगणसंग्रहमध्यायं व्याख्यास्यामः।**

आतां शोधनादि गणांच्या संग्रहाचा अध्याय सांगतों.

**मदनमधुकलम्बानिम्बबिम्बीविशाला-**
**त्रपुसकुटजमूर्वादेवदालीकृमिघ्नम्।**
**विदुलदहनचित्राः कोशवत्यौ करञ्जः**
**कणलवणवचैलासर्षपाश्छर्दनानि ॥ १ ॥**

गेळफळ, ज्येष्ठीमध, कडू दूधभोपळा, निंब, कडू तोंडलें, घोडेइंद्रावण, कडू काकडी, कुडा, मोरवेल, देवडांगरी, वावडिंग, जलवेतस, चित्रक, दंती, कडू दोडका व घोसाळें, करंज, पिंपळी, सैंधव, वेखंड, एलचीदाणे व शिरस हीं औषधें वामक आहेत.

**निकुम्भकुम्भत्रिफलागवाक्षीस्नुक्शङ्खिनीनीलिनितिल्वकानि।**
**शम्याककम्पिल्लकहेमदुग्धा दुग्धं च मूत्रं च विरेचनानि ॥ २ ॥**

दंती, तेड, त्रिफळा, लहान इंद्रावण, त्रिधारी निवडुंग, शंखिनी (सांखवेल), नीली, लोध्र, वाहवा, कपिला, हेमक्षीरी* (पिंवळा धोतरा किंवा पिसोळा), दूध व मूत्र हीं रेचक औषधें होत.

**मदनकुटजकुष्ठदेवदालीमधुकवचादशमूलदारुरास्नाः।**
**यवमिसिकृतवेधनं कुलत्थो मधु लवणं त्रिवृता निरूहणानि ॥ ३ ॥**

गेळफळ, कुडा, कुष्ठ, देवडांगरी, ज्येष्ठीमध, वेखंड, दशमुळें, देवदार, रास्ना, सातू, बडीशेप, कडू दोडका, कुळीथ, मध, सैंधव व तेड हीं औषधें निरूह बस्तीचे उपयोगी पडतात.

**वेल्लापामार्गव्योषदार्वीसुराला बीजं शैरीषं बार्हतं शैग्रवं च।**
**सारो माधूकः सैन्धवं तार्क्ष्यशैलं त्रुट्यौ पृथ्वीका शोधयन्त्युत्तमाङ्गम् ॥ ४ ॥**

वावडिंग, आघाड्याचें बीं, त्रिकटु, दारुहळद, राळ, शिरीष, रिंगणी, डोरली व शेवगा यांचें बीं, मोहाच्या झाडाचा सार, सैंधव, रसांजन, लहान व मोठी एलची व वाफळी हीं औषधें शिरोविरेचनाचे (नाक वाहविण्याचे) उपयोगी पडतात.

**भद्रदारु नतं कुष्ठं दशमूलं बलाद्वयम्।**
**वायुं वीरतरादिश्च विदार्यादिश्च नाशयेत् ॥ ५ ॥**

देवदार, तगर, कुष्ठ, दशमुळें, बला, अतिबला, वीरतरादिगण व विदार्यादिगण हीं वातघ्न औषधें होत.

**दूर्वानन्तानिम्बवासात्मगुप्ता गुन्द्राऽभीरुः शीतपाकी प्रियङ्गुः।**
**न्यग्रोधादिः पद्मकादिः स्थिरे द्वे पद्मं वन्यं सारिवादिश्च पित्तम् ॥ ६ ॥**

दूर्वा, धमासा, निंब, अडुळसा, कुहिली, गुंद्रातृण, शतावरी, पांढरी गुंज, गव्हला, न्यग्रोधादि गण, पद्मकादि गण, सारिवादि गण, सालवण, पिठवण, कमल व भद्रमोथा हीं पित्तशामक औषधें होत.

**आरग्वधादिरर्कादिर्मुष्ककाद्योऽसनादिकः।**
**सुरसादिः समुस्तादिर्वत्सकादिर्बलासजित् ॥ ७ ॥**

आरग्वधादि, अर्कादि, मुष्ककादि, असनादि, सुरसादि, मुस्तादि व वत्सकादि ह्या गणांतील औषधें कफाचा नाश करितात.

**जीवन्ती काकोल्यौ मेदे द्वे मुद्गमाषपर्ण्यौ च।**
**ऋषभकजीवकमधुकं चेति गणो जीवनीयाख्यः ॥८॥**

हरणवेल, काकोली, क्षीरकाकोली, मेदा, महामेदा, मुद्गपर्णी, माषपर्णी, जीवक, ऋषभक व ज्येष्ठीमध ह्या औषधांना जीवनीय गण म्हणतात.

**विदारिपञ्चाङ्गुलवृश्चिकालीवृश्चीवदेवाह्वयशूर्पपर्ण्यः।**
**कण्डूकरी जीवनह्रस्वसंज्ञे द्वे पञ्चके गोपसुता त्रिपादी ९**
**विदार्यादिरयं हृद्यो बृंहणो वातपित्तहा।**
**शोषगुल्माङ्गमर्दोर्ध्वश्वासकासहरो गणः ॥ १० ॥**

भुयीकोहाळा, एरंडमूळ, लहान मेढशिंगी, पुनर्नवा, सहदेवी, विश्वदेवी मुद्गपर्णी, माषपर्णी, खाजकुयली, जीवनपंचमूळ, लघुपंचमूळ, उपलसरी व रक्तलाजाळू हीं सर्व औषधें मिळून विदार्यादि गण होतो. हीं हृदयप्रिय, पौष्टिक व वातपित्तहारक असून शोष, गुल्म, अंगमर्द, ऊर्ध्वश्वास व खोकला यांचा नाश करितात.

---

* यांत हेमदुग्धा (हेमक्षीरी) ह्या शब्दाचें भाषांतर पिंवळा धोतरा किंवा पिसोळा ह्या दोन शब्दांनीं जें कंसांत सुचविलें आहे, तें हल्लींच्या सांप्रदायानुरूप व निघंटप्रकाशादि कोशाच्या आधारावर आहे; परंतु हेमक्षीरी हें रेवाचिनीचें (ज्याला इंग्रजींत Rhubarb म्हणतात) नांव असावें असें आमचें अनुमान आहे. आमचे मित्र डॉ. पांडुरंग गोपाळ यांचेंहि असेंच मत आहे. लकडी रेवाचिनी चीन देशांतून आपल्या इकडे फार दिवसांपासून येत आहे व तिच्या कांहीं जाती कदाचित् हिमालयांतहि उपलब्ध असतील. पिंवळ्या धोतऱ्याचे अंगींहि रेवाचिनीसारखे सारक गुण असतील. परंतु हें झाड आपल्या देशांतील नसून पोर्तुगीज लोकांनीं मेक्सिको येथून आणलें आहे, असें आधुनिक वनस्पतिशास्त्रज्ञांचें मत आहे.

सारिवोशीरकाश्मर्यमधूकशिशिरद्वयम्।
यष्टी परूषकं हन्ति दाहपित्तास्रतृड्ज्वरान् ॥ ११ ॥

सारिवा ( उपलसरी ), वाळा, शिवणमूळ, मोहाचीं फुलें, श्वेत व रक्त चंदन, ज्येष्ठीमध व फालसा हा सारिवादि गण दाह, रक्तपित्त, तृषा व ज्वर यांचा नाश करितो.

पद्मकपुण्ड्रौ वृद्धितुगर्द्ध्यः शृङ्ग्यमृता दश जीवनसंज्ञाः।
स्तन्यकरा घ्नन्तीरणपित्तं प्रीणनजीवनबृंहणवृष्याः १२

पद्मकाष्ठ, पुंडरीकवृक्ष, वृद्धि, वंशलोचन, ऋद्धि, काकडशिंगी व गुळवेल हीं व जीवनीय गणांतील दहा औषधें मिळून पद्मकादि गण होतो. हा स्तन्यवर्धक, वातपित्तहारक, तुष्टिप्रद, जीवनीय, पौष्टिक व कामोत्तेजक आहे.

परूषकं वरा द्राक्षा कट्फलं कतकात्फलम्।
राजाह्वं दाडिमं शाकं तृण्मूत्रामयवातजित् ॥ १३ ॥

फालसा, त्रिफळा, मनुका, कायफळ, निवळीचें बीं, रांजण्या ( खिरण्या ), डाळिंब व सागाचें बीं, हा परूषकादि गण तृषा, मूत्रकृच्छ्र, प्रमेह व वायु यांचा नाश करितो.

अञ्जनं फलिनी मांसी पद्मोत्पलरसाञ्जनम्।
सैलाकमधुनागाह्वं विषान्तर्दाहपित्तनुत् ॥ १४ ॥

सुर्मा, गव्हला, जटामांसी, कमल, उत्पल ( चंद्रविकासी कमल ), रसांजन, एलची, ज्येष्ठीमध व नागकेशर हा अंजनादि गण विष, अंतर्दाह व पित्त यांचा नाश करितो.

पटोलकटुरोहिणीचन्दनं मधुस्रवागुडूचिपाठान्वितम्।
निहन्ति कफपित्तकुष्ठज्वरान् विषं वमिमरोचकं कामलाम् ॥ १५ ॥

पटोल *( परवर किंवा पडवळ ), कुटकी, चंदन ( पांढरा ), मोरवेल, गुळवेल व पाहाडमूळ हा पटोलादि गण कफ, पित्त, कुष्ठ, ज्वर, विष, वांति, अरोचक व कावीळ यांचा नाश करितो.

गुडूचीपद्मकारिष्टधानका रक्तचन्दनम्।
पित्तश्लेष्मज्वरच्छर्दिदाहतृष्णाघ्नमाग्निकृत् ॥ १६ ॥

गुळवेल, पद्मकाष्ठ, निंब, धणे व रक्तचंदन हा गुडूच्यादि गण पित्त, कफ, ज्वर, वांति, दाह, तृष्णा व अग्निमांद्य यांचा नाश करितो.

आरग्वधेन्द्रयवपाटलिकाकतिक्तानिम्बामृतामधुरसास्रुववृक्षपाठाः।
भूनिम्बसैर्यकपटोलकरञ्जयुग्मं सप्तच्छदाग्निसुषवीफलबाणघोण्टाः ॥ १७ ॥

आरग्वधादिर्जयति च्छर्दिकुष्ठविषज्वरान्।
कफं कण्डूं प्रमेहं च दुष्टव्रणविशोधनः ॥ १८ ॥

बाहवा, इंद्रजव, पाडळमूळ, सागरगोटी, निंब, गुळवेल, मोरवेल, बेहेफळ, पाहाडमूळ, चिराईत, कोरांटी, परवर, करंज, घाणेरा करंज, घात्वीण, चित्रक, कारली, गेळफळ, निळा कोरांटा व चोंटीचार हा आरग्वधादि गण वांति, कुष्ठ, विष, ज्वर, कफ, कंडू व प्रमेह यांचा नाश करितो व दुष्ट व्रणाचें शोधन करितो.

असनतिनिशभूर्जश्वेतवाहप्रकीर्या-
खदिरकदरभण्डीशिंशपामेषशृङ्ग्यः।
त्रिहिमतलपलाशो जोङ्गकः शाकशालौ
क्रमुकधवकलिङ्गच्छागकर्णाश्वकर्णाः ॥ १९ ॥
असनादिर्विजयते श्वित्रकुष्ठकफक्रिमीन्।
पाण्डुरोगं प्रमेहं च मेदोदोषनिबर्हणः ॥ २० ॥

असाणा, तिवस, भूर्जवृक्ष, अर्जुनसादडा, घाणेरा करंज, खैर, पांढरा खैर, शिरीष, शिसवा, मेढशिंगी, श्वेत व रक्त चंदन, दारु हळ्द, ताड, पळस, अगरु, साग, शाल ( राळेचा वृक्ष ), सुपारी, धावडा, इंद्रजव, अजकर्ण व अश्वकर्ण हा असनादि गण पांढरें कोड, कुष्ठ, कफ, कृमि, पांडुरोग, प्रमेह व मेदोरोग यांचा नाश करितो.

वरणसैर्यकयुग्मशतावरीदहनमोरटबिल्वविषाणिकाः।
द्विबृहतीद्विकरञ्जजयाद्वयं बहलपल्लवदर्भरुजाकराः ॥ २१ ॥

वरणादिः कफं मेदो मन्दाग्नित्वं नियच्छति।
अधोवातं शिरःशूलं गुल्मं चान्तः सविद्रधिम् ॥ २२ ॥

वायवर्णा, तांबडी व पिंवळी कोरांटी, शतावरी, चित्रक, मोरवेल, बेल, मेढशिंगी, रिंगणी, डोरली, करंज, घाणेरा करंज, अघाडा दोन जातींचा, शेवगा, दर्भ व रुई, हा वरणादि गण कफ, मेद, अग्निमांद्य, ऊरुस्तंभ, शिरःशूल, गुल्म व अंतर्विद्रधि यांचा नाश करितो.

ऊषकस्तुत्थकं हिङ्गु कासीसद्वयसैन्धवम्।
सशिलाजतु कृच्छ्राश्मगुल्ममेदःकफापहम् ॥ २३ ॥

खारी माती, मोरचूत, हिंग, हिराकस, पांढरा हिराकस, सैंधव व शिलाजित हा ऊषकादि गण मूत्रकृच्छ्र, मुतखडा, गुल्म, कफ व मेदोरोग यांचा नाश करितो.

---

* पटोल शब्देंकरून उत्तर हिंदुस्थानांत परवर घेण्याचा पाठ आहे असें अमृतसागर वगैरे हिंदी ग्रंथांवरून दिसून येतें, व हाच प्रचात खरा असावा असें वाटतें; कारण परवर हें गुणानें फार उत्तम आहे अशी त्याची प्रसिद्धि आहे व संस्कृतांत पटोल त्रिदोषहारक मानलें आहे. परवर घेणें हा उत्तम पक्ष व त्याचे अभावीं पडवळ घ्यावें. परंतु कडू पडवळ घेण्याचा जो ह्या प्रांतांत संप्रदाय आहे तो मात्र चुकीचा आहे. ज्या अलीकडील ग्रंथांत कडू पडवळाची योजना आढळते, तेथें 'तिक्ता पटोली' असें स्पष्ट सांगितलें असतें. चरकादि प्राचीन ग्रंथांत कडू पडवळ कोठेंच सांगितलेलें नाहीं. तेथें गोड पडवळाचाच ( किंवा परवराचा ) उपयोग असून त्याचीं पानें, वेल, मूळ व फळ यांची योजना योगानुरूप केली पाहिजे, सर्वत्रच फळ घेऊन उपयोग नाहीं. पटोलपत्रं पित्तघ्नं वल्ली चास्य कफापहा। फलं त्रिदोषशमनं मूलं तस्य विरेचनम्॥ ह्या श्लोकांतील गुणपाठ त्याच्या योजनेस आधारभूत आहे व तो गोड पडवळालाच उद्देशून लिहिला आहे हेंहि उघड आहे ( कारण कडू पडवळ रेचक आहे व त्याची भाजी होऊं शकत नाहीं. )

वेल्लन्तरारणिकबूकवृषाश्मभेद-
गोकण्टकोत्कटसहाचरबाणकाशाः ।
वृक्षादनीनलकुशद्वयगुण्ठगुन्द्रा-
भल्लुकमोरटकुरण्टकरम्भपार्थाः ॥ १४ ॥
वर्गो वीरतराद्योऽयं हन्ति वातकृतान्गदान् ।
अश्मरीशर्करामूत्रकृच्छ्राघातरुजाहरः ॥ १५ ॥

काळा वाळा, ऐरण, थोर बकुळ, अडुळसा, लव्हडी पाषाणभेद, गोखरू, तिरकांडे, श्वेत कोरांटी, निळी कोरांटी, लहान कराई, बांडगूळ, देवनळ, लहान व मोठा दर्भ, गुंठ व गुंद्रा तृण, टेंटू, मोरवेल, पिंवळी कोरांटी, उतरणी व सूर्यफूलवेल हा वीरतरादि गण वातजन्य रोग, अश्मरी, मूत्रशर्करा ( लघवींतून रेतीसारखे खडे पडणें ), मूत्रकृच्छ्र व मूत्राघात यांचा नाश करितो.

रोध्रशावरकरोध्रपलाशा जिङ्गिणीसरलकट्फलयुक्ताः ।
कुत्सिताम्बकदलीगतशोकाः सैलवालुपरिपेलवमोचाः ।
एष रोध्रादिको नाम मेदःकफहरो गणः ।
योनिदोषहरः स्तम्भी वर्ण्यो विषविनाशनः ॥ १७ ॥

लोध्र, श्वेतलोध्र, आंबेहळद, काळी सावरी, देवदार, कायफळ, रास्ना, कदंब, केळ, अशोक, एलवालु, क्षुद्रमुस्ता व साळयीचा वृक्ष हा रोध्रादि गण मेद, कफ, योनिदोष व विष यांचा नाशक असून स्तंभक व वर्ण चांगला करणारा आहे.

अर्कालर्कौ नागदन्ती विशल्या-
भार्ङ्गी रास्ना वृश्चिकाली प्रकीर्या ।
प्रत्यक्पुष्पी पीततैलोदकीर्या ।
श्वेतायुग्मं तापसानां च वृक्षः ॥ १८ ॥
अयमर्कादिको वर्गः कफमेदोविषापहः ।
कृमिकुष्ठप्रशमनो विशेषाद्व्रणशोधनः ॥ १९ ॥

रुई, मंदार, नागाळी, कळलावी, भारंगी, रास्ना, लघु मेढशिंगी, घाणेरा करंज, आघाडा, थोर मालकांगोणी, करंज, किन्हई, कटभी व हिंगणबेट हा अर्कादि गण कफ, मेद, विष, कृमि व कुष्ठ यांचा नाशक व विशेषेंकरून व्रणशोधक आहे.

सुरसयुगफणिज्जं कालमालाविडङ्गं
खरबुसवृषकर्णीकट्फलं कासमर्दः ।
क्षवकसरसिभार्ङ्गी कार्मुका काकमाची-
कुलहलविषमुष्टी भूस्तृणो भूतकेशी ॥ ३० ॥
सुरसादिगणः श्लेष्ममेदःकृमिनिषूदनः ।
प्रतिश्यायारुचिश्वासकासघ्नो व्रणशोधनः ॥ ३१ ॥

काळी व पांढरी तुळसी, अजवला, काळा अजवला, वावडिंग, मरवा, उंदिरकानी, कायफळ, कासविंदा, काळे शिरस, झरसी, भारंगी, कामुका ( प्राचीबल ), कामोणी, मुंडी, बकाणनिंब, रोहिसगवत व निर्गुडी हा सुरसादि गण कफ, मेद, कृमि, पडसें, अरुचि, श्वास व कास यांचा नाशक व व्रणशोधक आहे.

मुष्ककस्नुग्वराद्वीपिपलाशधवशिंशपाः ।
गुल्ममेहाश्मरीपाण्डुमेदोऽर्शःकफशुक्रजित् ॥ ३२ ॥

मोरवा, त्रिधारी निवडुंग, त्रिफळा, चित्रक, पळस, धावडा व शिसवा हा मुष्ककादि गण गुल्म, मेह, अश्मरी, पांडु, मेदोरोग, मूळव्याध, कफ व शुक्र यांचा नाश करितो.

वत्सकमूर्वाभार्ङ्गीकटुकामरिचं घुणप्रिया च गण्डीरम् ।
एलापाठाजाजीकट्वङ्गफलाजमोदसिद्धार्थवचाः ॥ ३३ ॥
जीरकहिङ्गुविडङ्गं पशुगन्धा पञ्चकोलकं हन्ति ।
चलकफमेदःपीनसगुल्मज्वरशूलदुर्नाम्नः ॥ ३४ ॥

कुडा, मोरवेल, भारंगमूळ, कटुकी, मिरें, अतिविष, तिधारी निवडुंग, एलची, पहाडमूळ, जिरें, टेंटू, गेळफळ, अजमोदा, शिरस, वेखंड, शहाजिरें, हिंग, वावडिंग, रानतुळस व पंचकोल हा वत्सकादि गण वायु, कफ, मेद, पीनस, गुल्म, ज्वर, शूल व मूळव्याध यांचा नाश करितो.

वचाजलददेवाह्वनागरातिविषाभयाः ।
हरिद्राद्वययष्ट्याह्वकलशीकुटजोद्भवाः ॥ ३५ ॥
वचाहरिद्रादिगणावामातीसारनाशनौ ।
मेदःकफाढ्यपवनस्तन्यदोषनिबर्हणौ ॥ ३६ ॥

वेखंड, नागरमोथा, देवदार, सुंठ, अतिविष व हिरडा आणि हळद, दारुहळद, ज्येष्ठीमध, पिठवण व इंद्रजव, हे वचादि व हरिद्रादि गण आमातिसार, मेद, कफ, ऊरुस्तंभ व स्तन्यदोष यांचा नाश करितात.

प्रियङ्गुपुष्पाञ्जनयुग्मपद्मा पद्माद्रजो योजनवल्ल्यनन्ता ।
मानद्रुमो मोचरसः समङ्गा पुन्नागशीतं मदनीयहेतुः ॥ ३७ ॥
अम्बष्ठा मधुकं नमस्कारि नन्दीवृक्षपलाशकच्छुराः ।
रोध्रं धातकिबिल्वपेशिके कट्वङ्गः कमलोद्भवं रजः ॥ ३८ ॥
गणौ प्रियङ्ग्वम्बष्ठादी पक्वातीसारनाशनौ ।
सन्धानीयौ हितौ पित्ते व्रणानामपि रोपणौ ॥ ३९ ॥

गव्हला, जस्ताचें फूल, सुरमा, रसांजन, भार्गी, पद्मकेसर, मंजिष्ठा, धमासा, सावरी, मोचरस, लाजाळू, उंडीण, चंदन व धायटी आणि अंबष्ठा ( पहाडमूळ ), ज्येष्ठीमध, लाजाळू, नांदरुखी, पळस, तांबडा धमासा, लोध्र, धायटीचीं फुलें, बाळवेल, टेंटू व पद्मकेसर हे प्रियंग्वादि व अंबष्ठादि गण पक्वातिसारनाशक, पित्तशामक, भग्नसंधानकर ( मोडलेलें हाड सांधणारे ) व व्रणरोपक आहेत.

मुस्तावचाग्निद्विनिशाद्वितिक्ताभल्लातपाठात्रिफला-
विषाख्याः ।
कुष्ठं त्रुटी हैमवती च योनिस्तन्यामयघ्ना मलपाच-
नाश्च ॥ ४० ॥

नागरमोथा, वेखंड, चित्रक, हळद, दारुहळद, कुटकी, सागरगोटी, बिबवा, पहाडमूळ, त्रिफळा, अतिविष, कुष्ठ, एलची व पांढरें वेखंड

हा मुस्तादि गण योनिदोष व स्तन्यदोष यांचा नाशक व मलपाचक आहे.

न्यग्रोधपिप्पलसदाफलरोध्रयुग्मं जम्बूद्वयार्जुनकपी-
तनसोमवल्काः।
प्लक्षाम्रवञ्जुलपियालपलाशनन्दिकोलीकदम्बविरला-
मधुकं मधूकम् ॥ ४१ ॥
न्यग्रोधादिर्गणो व्रण्यः संग्राही भग्नसाधनः।
मेदः पित्तास्रतृड्दाहयोनिरोगनिबर्हणः ॥ ४२ ॥

वड, पिंपळ, औदुंबर, रोध्रद्वय, जांभूळ, रानजांभूळ, अर्जुनसादडा, पारोसापिंपळ, कायफळ, पिंपरी, आंबा, वेतस, खिरणीचा वृक्ष, पळस, नांदरुखी, चोर, कदंब, टेंभुरणी, ज्येष्ठीमध व मोहा हा न्यग्रोधादि गण व्रणाला हितावह, स्तंभक, भग्नसंधानकर, मेदोघ्न व रक्तपित्त, तृषा, दाह व योनिरोग यांचा नाशक आहे.

एलायुग्मतुरुष्ककुष्ठफलिनीमांसीजलध्यामकम्
स्पृक्काचोरकचोचपत्रतगरस्थौणेयजातीरसाः।
शुक्तिर्व्याघ्रनखोऽमराह्वमगुरुः श्रीवासकं कुङ्कुमम्।
चण्डागुग्गुलुदेवधूपखपुराः पुन्नागनागाह्वयम् ॥ ४३ ॥
एलादिको वातकफौ विषं च विनियच्छति।
वर्णप्रसादनः कण्डूपिटिकाकोठनाशनः ॥ ४४ ॥

लहान व मोठी एलची, शिलारस, कुष्ठ, गहुला, जटामांसी, नागरमोथा, रोहिसगवत, त्रायमाण, गठोना, दालचिनी, तमालपत्र, तगर, स्थौणेय (ग्रंथिपर्णाचा भेद), रक्त्याबोळ, नखला, लहान नखला, देवदार, अगुरु, गंधाबिरोजा, केशर, किर्माणी ओवा, गुग्गुळ, राळ, कुंदरु, सुरंगीचीं फुलें व नागकेशर हा एलादि गण वात, कफ, विष, कंडू, पिटिका व गांधी यांचा नाशक व वर्णप्रसादक आहे.

श्याम्या दन्ती द्रवन्तीक्रमुककुटरणी शङ्खिनी चर्मसाह्वा
स्वर्णक्षीरी गवाक्षी शिखरिरजनकच्छिन्नरोहाकरञ्जाः।
बस्तान्त्री व्याधिघातो बहलबहुरसस्तीक्ष्णवृक्षात्फलानि
श्यामाद्यो हन्ति गुल्मं विषमरुचिकफौ हृद्रुजं मूत्रकृच्छ्रम्

काळें निशोतर, लहान व मोठी दंती, लोध्र, सुपारी, पांढरें तेड, सांखवेल, शिकेकाई, पिंवळा धोतरा, इंद्रावंण, आघाडा, कपिला, गुळवेल, करंज, वोकडी, बाहवा, शेवगा, ऊंस व पीलूचीं फळें हा श्यामादि गण गुल्म, अरुचि, विष, कफ, हृद्रोग व मूत्रकृच्छ्र यांचा नाश करितो.

त्रयस्त्रिंशदिति प्रोक्ता वर्गास्तेषु त्वलाभतः।
युञ्ज्यात्तद्विधमन्यच्च द्रव्यं जह्यादयौगिकम् ॥ ४६ ॥

याप्रमाणें औषधांचे तेहतीस गण सांगितले. त्यांपैकीं जीं औषधें मिळण्याजोगीं नसतील, त्यांजबद्दल त्याच गुणाच्या दुसऱ्या औषधांचा उपयोग करावा. एखादें औषध देश, काल, प्रकृति इत्यादिकांच्या संबंधानें अयोग्य असल्यास तें गाळावें.

एते वर्गा दोषदूष्याद्यपेक्ष्य कल्कक्वाथस्नेहलेहादियुक्ताः।
पाने नस्येऽन्वासनेऽन्तर्बहिर्वा लेपाभ्यङ्गैर्घ्नन्ति रोगान्सु-
कृच्छ्रान् ॥ ४७ ॥

दोष, दूष्य, वय, बल, इत्यादि लक्षांत आणून वरील गणांचे कल्क, कषाय, तैल, लेह, इ० कल्प पान, नस्य, बस्ति, लेप, अभ्यंग इ० प्रकारांनीं पोटांत किंवा बाहेरून सेवन केल्यास ते अनेक कष्टसाध्य व्याधींचा नाश करितात.

---

# षोडशोऽध्यायः

## अध्याय १६ वा

अथातः स्नेहविधिमध्यायं व्याख्यास्यामः।

आतां स्नेहविधीचा अध्याय सांगतों.

गुरुशीतसरस्निग्धमन्दसूक्ष्ममृदुद्रवम्।
औषधं स्नेहनं प्रायो विपरीतं विरूक्षणम् ॥ १ ॥

जें औषध जड, शीत, सारक, स्निग्ध, मंद, सूक्ष्म, मृदु व द्रव असतें, तें प्रायः स्नेहन व तद्विपरीत प्रायः रूक्षण जाणावें.

सर्पिर्मज्जा वसा तैलं स्नेहेषु प्रवरं मतम्।
तत्रापि चोत्तमं सर्पिः संस्कारस्यानुवर्तनात् ॥ २ ॥

सर्व स्नेहांमध्यें तूप, मज्जा, वसा व तेल (तिळाचें तेल) हे श्रेष्ठ होत, व त्यांतहि तूप श्रेष्ठ जाणावें. कारण जरी त्याजवर अनेक संस्कार घडले, तरी त्याच्या शैत्यादि गुणांचा नाश होत नाहीं.

पित्तघ्नास्ते यथापूर्वमितरघ्ना यथोत्तरम्।

ते अंत्याकडून एकाहून एक पित्तघ्न आहेत; व आरंभाकडून एकाहून एक कफवातहारक आहेत (म्हणजे पित्तावर तूप श्रेष्ठ व वातकफांवर तैल श्रेष्ठ जाणावें.)

घृतात्तैलं गुरु वसा तैलान्मज्जा ततोऽपि च ॥ ३ ॥

घृताहून तैल, तेलाहून वसा व वसेपेक्षां मज्जा जड जाणावी.

द्वाभ्यां त्रिभिश्चतुर्भिस्तैर्यमकस्त्रिवृतो महान्।

घृतादिकांपैकीं कोणत्याहि दोहोंच्या संयोगाला यमक, तिहींच्या संयोगाला त्रिवृत व चोहोंना मिळून महास्नेह अशी संज्ञा आहे.

स्वेद्यसंशोध्यमद्यस्त्रीव्यायामासक्तचिन्तकाः ॥ ४ ॥
वृद्धबालाबलकृशा रूक्षाः क्षीणास्ररेतसः।
वातार्तस्यन्दतिमिरदारुणप्रतिबोधिनः ॥ ५ ॥
स्नेह्याः

ज्यांना शेक देणें आहे, ज्यांना शोधन देणें आहे, जे मद्य, स्त्री व व्यायाम यांजवर आसक्त झाले आहेत, जे चिंता, अशक्तता, कृशता, वार्धक्य व बाल्य यांनीं युक्त आहेत, जे रूक्ष, रक्तक्षयी व शुक्रक्षयी

आहेत, ज्यांना वातरोग, अभिष्यंद, तिमिर ( दृष्टिरोग ) व *कृच्छ्रोन्मीलन हे विकार झाले आहेत ते सर्व स्नेहनाला योग्य होत.

न त्वतिमन्दाग्नितीक्ष्णाग्निस्थूलदुर्बलाः ।
ऊरुस्तम्भातिसारामगलरोगगरोदरैः ॥ ६ ॥
मूर्च्छाच्छर्द्यरुचिश्लेष्मतृष्णामद्यैश्च पीडिताः ।
अपप्रसूता युक्ते च नस्ये बस्तौ विरेचने ॥ ७ ॥

ज्यांचा अग्नि अतिशयच मंद किंवा तीक्ष्ण आहे, जे अतिशयच स्थूल किंवा अशक्त, जे ऊरुस्तंभ, अतिसार, आमदोष, गलरोग, विष, उदर, मूर्च्छा, वांति, अरुचि, कफ, तृष्णा व मद्यविकार, यांनीं पीडित आहेत, जिला गर्भस्राव झाला आहे, व ज्यांना नस्य, बस्ति व विरेचनें दिलीं आहेत, ते सर्व स्नेहनाला अयोग्य होत.

तत्र धीस्मृतिमेधाग्निकाङ्क्षिणां शस्यते घृतम् ।

ज्यांना बुद्धि, स्मृति, धारणा व अग्नि (पचनशक्ति) यांची इच्छा असेल, त्यांना या चार स्नेहांपैकीं तूप उत्तम आहे.

ग्रन्थिनाडीकृमिश्लेष्ममेदोमारुतरोगिषु ॥ ८ ॥
तैलं लाघवदार्ढ्यार्थिक्रूरकोष्ठेषु देहिषु ।

ज्यांना ग्रंथि, नाडीव्रण, कृमि, कफ, मेदोविकार व वातरोग झाले आहेत, ज्यांना लाघव व दृढत्व पाहिजे आहे व ज्यांचा कोठा क्रूर (जड) आहे, त्यांना तेल हितावह आहे.

वातातपाध्वभारस्त्रीव्यायामक्षीणधातुषु ॥ ९ ॥
रूक्षक्लेशक्षमात्यग्निवातावृतपथेषु च ।
शेषौ

वारा, ऊन, प्रवास, ओझें वाहणें, स्त्रीसेवन व व्यायाम यांचे योगानें ज्यांचे धातु क्षीण झाले आहेत; जे रूक्ष, क्लेशसह व तीक्ष्णाग्नि आहेत व ज्यांचीं मलमूत्रादिकांचीं द्वारें वाताच्छादित ( आकुंचित ) झालीं आहेत, त्यांना वसा व मज्जा हितावह होते.

वसा तु सन्ध्यस्थिमर्मकोष्ठरुजासु च ॥ १० ॥
तथा दग्धाहतभ्रष्टयोनिकर्णशिरोरुजि ।

शिवाय वसा पुढील विकारांवरहि उपयोगी पडते. ते येणेंप्रमाणें:- संधि, अस्थि, मर्म, कोष्ठ, कर्ण व शिर यांचा शूल व भाजणें, दुखापत होणें व योनिभ्रंश यांजपासून होणारी वेदना.

तैलं प्रावृषि वर्षान्ते सर्पिरन्यौ तु माधवे ॥ ११ ॥

पावसाळ्यांत तेल, शरदृतूंत तूप व वसंतांत वसा व मज्जा हितावह होत.

ऋतौ साधारणे स्नेहः शस्तोऽह्नि विमले रवौ ।

स्नेहपान करणें तें साधारणकालीं ( ज्येष्ठ, फाल्गुन व आश्विन ह्या तीन ऋतुसंधींत ), आकाश निरभ्र असतांना व दिवसास करावें.

* एक नेत्रविकार, ज्यामध्यें निजून उठल्यावर पापण्या लवकर उघडतां येत नाहींत.

तैलं त्वरायां शीतेऽपि

घाईच्या प्रसंगीं हिंवाळ्यांत देखील तेलाचा उपयोग करण्यास हरकत नाहीं.

घर्मेऽपि च घृतं निशि ॥ १२ ॥
निश्येव पित्ते पवने संसर्गे पित्तवत्यपि ।

ग्रीष्मऋतूंतहि रात्रीं घृतपान करण्यास हरकत नाहीं; तसेंच पित्त, वात व पित्ताधिक संसर्ग यांजवर घृतपान करणें झाल्यास तेंहि रात्रींच करावें.

निश्यन्यथा वातकफाद्रोगाः स्युः पित्ततो दिवा ॥ १३ ॥

वरील प्रकारांखेरीज जर रात्रीं घृतपान केलें तर वातकफात्मक विकार व दिवसास केलें तर पित्तविकार होतात.

युक्त्याऽवचारयेत्स्नेहं भक्ष्याद्यन्नेन बस्तिभिः ।
नस्याभ्यञ्जनगण्डूषमूर्धकर्णाक्षितर्पणैः ॥ १४ ॥

स्नेहाचा जो उपयोग करणें तो अन्नपानांसह किंवा बस्ति, नस्य, अभ्यंग, गुळण्या, शिरोबस्ति, कर्णपूरण व नेत्रतर्पण ( डोळ्यांवर पडद्या ठेवणें ) ह्यांच्या द्वारें यथाशास्त्र करावा.

रसभेदैककत्वाभ्यां चतुःषष्टिर्विचारणाः ॥
स्नेहस्यान्याभिभूतत्वादल्पत्वाच्च क्रमात्स्मृताः ॥ १५ ॥

ह्या रीतीनें सेवन केलेल्या स्नेहास "विचारणा" अशी संज्ञा आहे. ह्या विचारणा चवसष्ट प्रकारच्या. ते असेः-अन्नपानाच्या रसभेदानुरूप त्रेसष्ट व चवसष्टावा बस्त्यादिद्वारां द्यावयाचा प्रकार. अन्नपानासह दिलेल्या स्नेहाचें वीर्य तत्संसर्गानें कमी होतें व बस्त्यादिद्वारां जे स्नेह द्यावयाचे, त्यांचें रक्तास मिळणारें प्रमाण अल्प असतें; यास्तव, ह्या दोन्ही प्रकारच्या स्नेहांना विचारणा ही संज्ञा लागू आहे.

यथोक्तहेत्वभावाच्च नाच्छपेयो विचारणा ।

वरील प्रकार शुद्ध स्नेहपानांत नसल्यामुळें त्यास विचारणा हि संज्ञा लागू नाहीं ( त्यास अच्छपेय म्हणतात ).

स्नेहस्य कल्पः स श्रेष्ठः स्नेहकर्माशुसाधनात् ॥ १६ ॥

शुद्ध स्नेहपान हा सर्वांत श्रेष्ठ कल्प होय, कारण त्याच्या योगानें स्नेहाचें जें कार्य तें लवकर सिद्ध होतें.

द्वाभ्यां चतुर्भिरष्टाभिर्यामैर्जीर्यन्ति याः क्रमात् ।
ह्रस्वमध्योत्तमा मात्रास्तास्ताभ्यश्च ह्रसीयसीम् ॥ १७ ॥
कल्पयेद्वीक्ष्य दोषादीन् प्रागेव तु ह्रसीयसीम् ।

जीं दोन, चार व आठ प्रहरांनीं जिरतात, तीं स्नेहाची अनुक्रमेंकरून अल्प, मध्यम व उत्तम प्रमाणें जाणावीं. दोषादिक लक्षांत आणून ह्याहूनहि लहान मात्रा देण्यास हरकत नाहीं; व आरंभीं तर नेहमींच अल्प मात्रा द्यावी.

ह्यस्तने जीर्ण एवान्ने स्नेहोऽच्छः शुद्धये बहुः ॥ १८ ॥

शोधनार्थ स्नेह देणें झाल्यास तो आदल्या दिवसाचा आहार पचतांच नुसताच उत्तम प्रमाणानें द्यावा.

**शमनः क्षुद्वतोऽनन्नो मध्यमात्रश्च शस्यते।**

शमनार्थ देणें झाल्यास तो क्षुद्बोध झालावर अन्नावांचून व मध्यम प्रमाणानें द्यावा ( व तो जिरेतोंपर्यंत अन्न खाऊं नये. )

**बृंहणो रसमद्याद्यैः सभक्तोऽल्पः**

बृंहणार्थ देणें झाल्यास तो भाताबरोबर किंवा मांसरस, मद्य इत्यादिकांशीं अल्प प्रमाणानें द्यावा.

**हितः स च ॥ १९ ॥**

**बालवृद्धपिपासार्तस्नेहद्विण्मद्यशीलिषु।**
**स्त्रीस्नेहनित्यमन्दाग्निसुखितक्लेशभीरुषु ॥ २० ॥**
**मृदुकोष्ठाल्पदोषेषु काले चोष्णे कृशेषु च।**

बृंहण स्नेह पुढील लोकांना हितकारक आहे:—बाल, वृद्ध, तृषापीडित, स्नेहद्वेषी, मद्यसेवी, स्त्री व स्नेह यांचें नित्य सेवन करणारा; मंदाग्नि, सुखी, श्रम सहन न करणारा, मृदुकोष्ठी, अल्पदोषी व कृश; उन्हाळ्यांत तर तो सर्वांनाच हितावह आहे.

**प्राङ्मध्योत्तरभक्तोऽसावधोमध्योर्ध्वदेहजान् ॥ २१ ॥**
**व्याधीञ्जयेद्बलं कुर्यादङ्गानां च यथाक्रमम्।**

भोजनापूर्वी, भोजनामध्यें व भोजनोत्तर सेवन केलेले स्नेह अनुक्रमेंकरून अधःकाय, मध्य व शिर यांच्या रोगांचा नाश करितात व त्या त्या भागाला बल देतात.

**वार्युष्णमच्छेऽनुपिबेत् स्नेहे तत्सुखपक्तये ॥ २२ ॥**
**आस्योपलेपशुद्ध्यै च तौवरारुष्करे न तु।**
**जीर्णाजीर्णविशङ्कायां पुनरुष्णोदकं पिबेत् ॥ २३ ॥**
**तेनोद्गारविशुद्धिः स्यात्ततश्च लघुता रुचिः।**

शुद्ध स्नेहपानानंतर तो पचन होण्याकरितां व तोंडाचा विकटा घालविण्याकरितां ऊन पाणी प्यावें. तुवरकाच्या* ( तिवराच्या ) व बिबव्याच्या तेलावर मात्र ऊन पाणी पिऊं नये. स्नेह जिरला किंवा नाहीं याची शंका असल्यास पुनः ऊन पाणी प्यावें. याचे योगानें उद्गारशुद्धि ( ढेकरा स्वच्छ येणें ), देहलाघव व अन्नावर रुचि उत्पन्न होते.

**भोज्योऽन्नं मात्रया पास्यन् श्वः पिबन्पीतवानपि ।२४।**
**द्रवोष्णमनभिष्यन्दि नातिस्निग्धमसङ्करम्।**
**उष्णोदकोपचारी स्याद्ब्रह्मचारी क्षपाशयः ॥ २५ ॥**
**न वेगरोधी व्यायामक्रोधशोकहिमातपान्।**
**प्रवातयानयानाध्वभाष्याभ्यासनसंस्थितीः ॥ २६ ॥**
**नीचात्युच्चोपधानाहःस्वप्नधूमरजांसि च।**
**यान्यहानि पिबेत्तानि तावन्त्यन्यान्यपि त्यजेत् ॥२७॥**
**सर्वकर्मस्वयं प्रायो व्याधिक्षीणेषु च क्रमः।**

ज्या दिवशीं स्नेहपान करणें असेल त्या दिवशीं, त्याचे आदले दिवशीं व तितकेच दिवस पुढें पातळ, उष्ण, कफ न करणारा, अल्पस्नेहानें युक्त व साधा असा अल्प आहार करावा. स्नानपानादिकाला उष्णोदकच घ्यावें, ब्रह्मचर्य पाळावें, रात्रीं जागूं नये, वेगावरोध करूं नये, व्यायाम, क्रोध, शोक, थंडी, ऊन, वारा, अश्वादिकांवर बसणें, प्रवास, फार बोलणें व उभें राहणें, फार सखल किंवा फार उंच उशी, दिवा निद्रा, धूर व धुरळा इतक्या गोष्टी वर्ज्य कराव्यात. जोंपर्यंत स्नेहपान चालू आहे तोंपर्यंतच नव्हे, तर पुढेंहि तितकेच दिवस हा क्रम चालू ठेवावा. वमनविरेचनादि सर्व कर्मांना व व्याधीनें क्षीण झालेल्यांनाहि प्रायः हाच क्रम लागू आहे.

**उपचारस्तु शमने कार्यः स्नेहे विरिक्तवत् ॥ २८ ॥**

दोषशमनार्थ स्नेहपान केलें असतां त्याजवर विरेचनाप्रमाणेंच उपचार करावा.

**त्र्यहमच्छं मृदौ कोष्ठे क्रूरे सप्तदिनं पिबेत्।**
**सम्यक्स्निग्धोऽथवा यावदतः सात्मीभवेत्परम् ॥ २९ ॥**

शुद्ध स्नेह कोठा हलका असल्यास तीन दिवस व जड असल्यास

---

* तुवरकाच्या झाडाचें वर्णन सुश्रुतांत व याच ग्रंथाच्या उत्तरस्थानांतील ३९ व्या अध्यायांत आलें आहे. त्यावरून हीं झाडें पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर आढळतात, अशा ठिकाणच्या झाडांपैकीं ज्यांच्या फळांतुन तैल निघेल अशा कांहीं झाडांचा आम्हीं शोध केला. तेव्हां प्रथम तिवरीचीं फळें आणवून पाहिलीं व ओलेपणीं मात्र त्यांतुन अरड काढून कांहीं तेल काढतां आलें; पण सुकल्यावर ग्रंथोक्त रीतीनें त्यांतून तेल निघालें नाहीं व ह्या फळांचा हंगामाहि ग्रंथोक्त कालापेक्षां सुमारें दोन महिन्यांनीं मागाहून असतो असें दिसून आल्यावरून, तुवरक म्हणजे तिवर नसावा असें आम्हांस वाटूं लागलें. प्रथम नांवाच्या सादृश्यावरून तें तिवराचेंच संस्कृत नांव असेल असें आम्हांस वाटलें होतें व आम्हीं काढलेल्या तेलाचा कुष्ठावर कांहींसा उपयोगाहि झाला होता; परंतु वरील दोन लक्षणें न जमल्यामुळें हल्लीं आमची अशी समजुत झाली आहे कीं, किंकणेलाच्याच झाडाला संस्कृतांत तुवरक म्हटलें आहे. किंकणेलाचीं झाडें पश्चिम समुद्राच्या किनाऱ्यावर पुष्कळ ठिकाणीं आहेत. त्यांस किंवा त्याच्या फळांस कोंकणांत शाहऱ्या म्हणतात. हीं फळें वाटाण्याएवढीं असून त्यांत एक पिंवळा स्नेहमय मगज भरलेला असतो. सुश्रुतादि ग्रंथांत सांगितलेल्या वेळींच म्हणजे पावसाळ्याचे आरंभीं हीं फळें पक्व होतात. मग तीं वाळवून कातकरी लोक त्यांचें तेल ग्रंथोक्त रीतीनेंच काढितात. हें तेल कोंकण व त्याच्या लगतच्या बऱ्याच महाराष्ट्रादि प्रदेशांत पुष्कळ दिवसांपासून प्रसिद्ध आहे व लोकांत त्याचा 'वापुरर' उपयोग करितात. सुश्रुताच्या वेळेपासून हें तेल माहीत असावें असें वाटतें ( चरकानें त्याचा उल्लेख केला नाहीं ); व तुवरक हें संस्कृत नांव त्या वेळीं ह्याच्याच झाडास लावीत असतील; परंतु कालांतरानें तें तिवर अशा अपभ्रंशरूपानें तिवराच्या झाडांसहि लावूं लागले. भावनगरास तर तिवराच्या झाडांना तुंवरु असेंच नांव आहे व वर सांगितल्याप्रमाणें ह्या नामसादृश्यानें आम्ही तुवरक म्हणजे प्रथम तिवर असेंच समजलों होतों. तुवरक तेलाचा किंकणेल असा अर्थ केल्यानें सर्व लक्षणें जुळतात. एवढेंच नव्हे, तर इतक्या प्रसिद्ध पदार्थास संस्कृत नांव असणें स्वाभाविक असून तें जें मिळत नव्हतें तें मिळाल्यासारखें होतें. किंकणेलाचे गुणदोष ( विशेषेंकरून वमनविरेचनात्मक ) तुवरकाच्या गुणदोषांस मिळतात असाहि आम्हीं अनुभव घेतला आहे. त्याचा कुष्ठघ्न गुण मात्र ग्रंथांत लिहिलेल्या मानानें अनुभवास येत नाहीं, परंतु खराचे संबंधानेंहि असेंच म्हणतां येईल. शिवाय इतकें खचित कीं, किंकणेलाचा कुष्ठावर कांहींसा उपयोग होतो.

सात दिवस किंवा स्नेहाचें कार्य चांगलें होईपर्यंत प्यावा. त्यानंतर स्नेहाचें सात्म्य होतें. (म्हणजे तो पचनीं पडूं लागतो व मग दोषांना उत्सर्ग होत नाहीं.)

वातानुलोम्यं दीप्तोऽग्निर्वर्चः स्निग्धमसंहतम्* ।
मृदुस्निग्धाङ्गता ग्लानिः स्नेहोद्वेगोऽङ्गलाघवम् ॥ ३० ॥
विमलेन्द्रियता सम्यक्स्निग्धे रूक्षे विपर्ययः ।
अतिस्निग्धे तु पाण्डुत्वं घ्राणवक्त्रगुदस्रवाः ॥ ३१ ॥

वातांचें अनुलोमन, अग्नीची तीव्रता, मलाची स्निग्धता व मृदुता, स्नेहद्वेष, अंगाची स्निग्धता, मार्दव व लघुत्व, ग्लानि व इंद्रियांची प्रसन्नता हीं सम्यक् स्निग्धाचीं लक्षणें होत. ह्याच्या उलट लक्षणें असलीं म्हणजे रूक्षता जाणावी. स्नेहनकार्याचा अतिरेक झाला असतां अंगावर पांडुरता येते व मुख, नासिका व गुद ह्या द्वारांनीं स्राव सुरू होतो (श्लेष्मा, आंव वगैरे).

असात्र्याऽहिताऽकाले मिथ्याहारविहारतः ।
स्नेहः करोति शोफार्शस्तन्द्रास्तम्भविसंज्ञताः ॥ ३२ ॥
कण्डूकुष्ठज्वरोत्क्लेशशूलानाहभ्रमादिकान् ।

अयोग्य प्रमाणानें, अकालीं किंवा ज्यांनीं करूं नये त्यांनीं स्नेहपान केलें असतां, किंवा तें केल्यावर अपथ्य आहारविहार घडले असतां सूज, मूळव्याध, तंद्रा, स्तब्धता इत्यादि ताठणें, मूर्च्छा, कंडू, कुष्ठ, ज्वर, मळमळणें, शूल, पोट फुगणें, भ्रम इत्यादि विकार उत्पन्न होतात.

क्षुत्तृष्णोल्लेखनस्वेदरूक्षपानान्नभेषजम् ॥ ३३ ॥
तक्रारिष्टखलोद्दालयवश्यामाककोद्रवाः ।
पिप्पलीत्रिफलाक्षौद्रपथ्यागोमूत्रगुग्गुलुः ॥ ३४ ॥
यथास्वं प्रतिरोगं च स्नेहव्यापदि साधनम् ।

स्नेहाधिक्यापासून होणाऱ्या विकारांवर निरशन व निर्जल राहणें, वमन, स्वेदन, रूक्ष अन्नपानें व औषधें, ताक, अरीष्टें, फलमूलादिकांचें सांबारें, रानहरीक, जव, सांवे, कोद्रू, पिंपळी, त्रिफळा, मध, हिरडा, गोमूत्र, गुग्गुळ, इत्यादिकांची योजना करावी व शिवाय त्या त्या रोगावर तत्तच्चिकित्साहि करावी.

विरूक्षणे लङ्घनवत्कृतातिकृतलक्षणम् ॥ ३५ ॥

रूक्षण क्रिया सम्यक् किंवा अतिरिक्त झाल्याचीं लक्षणें लंघनप्रकरणीं सांगितल्याप्रमाणें जाणावीं.

स्निग्धद्रवोष्णधन्वोत्थरसभुक् स्वेदमाचरेत् ।
स्निग्धस्त्र्यहं स्थितः कुर्याद्विरेकं वमनं पुनः ॥ ३६ ॥
एकाहं दिनमन्यच्च कफमुत्क्लेश्य तत्करैः ।

स्नेहनक्रिया झाल्यावर स्निग्ध, द्रव व उष्ण अन्न व जांगलमांसरस भक्षण करून घाम आणावा व मग तीन दिवसांनंतर विरेचन द्यावें. वमन देणें झाल्यास स्नेहस्वेदविधि झाल्यावर दुसरे दिवशीं (मासक्षीरादिक) कफकर पदार्थांच्या योगानें कफाला चाळवून तिसरे दिवशीं द्यावें.

मांसला मेदुरा भूरिश्लेष्माणो विषमाग्नयः ॥ ३७ ॥
स्नेहोचिताश्च ये स्नेह्यास्तान् पूर्वं रूक्षयेत्ततः ।
संस्नेह्य शोधयेदेवं स्नेहव्यापन्न जायते ॥ ३८ ॥

ज्यांच्या शरीरांत मांस, मेद व कफ फार आहे, ज्यांचा अग्नि विषम आहे, किंवा जे स्नेहाभ्यासी आहेत, त्यांना स्नेहन करणें झाल्यास त्यांजवर पहिल्यानें रूक्षणप्रयोग करावा (म्हणजे रूक्षता आणावी) व मग स्नेहन करून शोधन द्यावें. असें केल्यानें स्नेहनापासून विकार उत्पन्न होत नाहींत.

अलं मलानीरयितुं स्नेहश्चासात्म्यतां गतः ।

जोंपर्यंत स्नेह सात्म्यतेप्रत गेला नाहीं (पचनीं पडला नाहीं) तोंपर्यंत तो मलांचा उत्सर्ग करूं शकतो.

बालवृद्धादिषु स्नेहपरिहारासहिष्णुषु ॥ ३९ ॥
योगानिमाननुद्वेगान् सद्यःस्नेहान्प्रयोजयेत् ।

स्नेहनक्रियेचें पथ्य ज्यांना सहन होत नाहीं असे जे बाल, वृद्ध इत्यादि, त्यांच्याकरितां पुढील योगांचा उपयोग करावा. ह्यांच्या योगानें कांहीं त्रास न देतां तात्काळ स्नेहन होतें.

प्राज्यमांसरसास्तेषु पेया वा स्नेहभर्जिता ॥ ४० ॥
तिलचूर्णश्च सस्नेहफाणितः कृशरा तथा ।
क्षीरपेया घृताढ्योष्णा दध्नो वा सगुडः सरः ॥ ४१ ॥
पेया च पञ्चप्रसृता स्नेहैस्तण्डुलपञ्चमैः ।
सप्तैते स्नेहनाः सद्यः स्नेहाश्च लवणोल्बणाः ॥ ४२ ॥

पुष्कळ मांस घालून केलेला सुरवा, त्यांत तयार केलेली व तेलाची किंवा तुपाची फोडणी दिलेली कण्हेरी, स्नेह व काकवी यांनीं युक्त असें तिळकूट, तिलयुक्त खिचडी, घृतयुक्त व उष्ण आटीव खीर, गूळ घातलेली दह्याची निवळ किंवा तूप, तेल, वसा व मज्जा हे पदार्थ प्रत्येक आठ आठ तोळे घेऊन त्यांत आठ तोळे तांदूळ घालून केलेली लापशी असे सात योग सद्यःस्नेहन करणारे आहेत. सर्व लवणयुक्त स्नेहहि तसेच आहेत.

तद्धि विष्यन्द्यरूक्षं च सूक्ष्ममुष्णं व्यवायि च ।

लवण विष्यंदि (वाहिन्यांत लीन झालेल्या दोषांना चाळविणारें), स्निग्ध, सूक्ष्म, उष्ण व व्यवायि (पाक होण्यापूर्वींच सर्व शरीरभर पसरणारें) असल्यामुळें तें घृतादि स्नेहांत घातलें असतां स्नेहनक्रियेला मदत करितें.

* डॉ० कुंटे यांनीं छापलेल्या पुस्तकांत ह्या दोन श्लोकांचा पाठभेद आढळतो. आम्हीं दिलेला पाठ बाळशास्त्री मांटे यांच्या येथील एका शुद्ध पोथीप्रमाणें आहे व तो वृद्ध वाग्भटाला जुळतो.

गुडानूपामिषक्षीरतिलमाषसुरादधि ॥ ४३ ॥*
कुष्ठशोफप्रमेहेषु स्नेहार्थं न प्रकल्पयेत् ।

ज्यांना कुष्ठ, शोफ ( सूज ) व प्रमेह हे विकार झाले असतील, त्यांना स्नेह देणें झाल्यास मत्स्यादि आनूप मांस, गूळ, दूध, तीळ, उडीद, सुरा व दहीं ह्यांखेरीज द्यावें.

त्रिफलापिप्पलीपथ्यागुग्गुल्वादिविपाचितान् ॥४४॥
स्नेहान्यथास्वमेतेषां योजयेदविकारिणः ।

त्यांजकरितां त्रिफळा, पिंपळी, हिरडा, गुग्गुळ इत्यादि तत्तद्रोगाच्या चिकित्सेंत सांगितलेल्या औषधांनीं सिद्ध केलेल्या स्नेहांची योजना करावी, म्हणजे त्यांजपासून विकार होत नाहीं.

क्षीणानां त्वामयैरग्निदेहसन्धुक्षणक्षमान् ॥ ४५ ॥

व्याधीनें क्षीण झालेल्यांना स्नेह देणें झाल्यास तें अग्निवर्धक व पौष्टिक असावें.

दीप्तान्तराग्निः परिशुद्धकोष्ठः प्रत्यग्रधातुर्बलवर्णयुक्तः ।
दृढेन्द्रियो मन्दजरः शतायुः स्नेहोपसेवी पुरुषः प्रदिष्टः ४६

जो स्नेहाचें सेवन करितो, त्या मनुष्याचा अग्नि प्रदीप्त होतो, कोठा शुद्ध होतो, नवे धातु उत्पन्न होतात, बल, तेज व इंद्रियांना दृढत्व येतें, वार्धक्य लवकर येत नाहीं व तो शंभर वर्षें वांचतो.

---

# सप्तदशोऽध्यायः

## अध्याय १७ वा.

### अथातः स्वेदविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां स्वेदविधीचा अध्याय सांगतों.

स्वेदस्तापोपनाहोष्मद्रवभेदाच्चतुर्विधः ।

स्वेद ( शेक किंवा उष्णता देणें ) चार प्रकारचा-तापस्वेद, उपनाहस्वेद, उष्मस्वेद, व द्रवस्वेद.

तापोऽग्नितप्तवसनफालहस्ततलादिभिः ॥ १ ॥

तापस्वेद म्हणजे अग्नीनें तापविलेल्या वस्त्रानें, लोखंडाच्या पत्र्यानें किंवा हस्तादिकांनीं शेकणें.

उपनाहो वचाकिण्वशताह्वादेवदारुभिः ।
धान्यैः समस्तैर्गन्धैश्च रास्नैरण्डजटामिषैः ॥ २ ॥
उद्रिक्तलवणैः स्नेहचुक्रतक्रपयःप्लुतैः ।
केवले पवने श्लेष्मसंसृष्टे सुरसादिभिः ॥ ३ ॥
पित्तेन पद्मकाद्यैस्तु साल्वणाख्यैः पुनः पुनः ।

उपनाहस्वेद ( पोटीस ) देणें तो केवळ वातावर घृतादि स्नेह, कांजिक, ताक व दूध हीं लवणयुक्त करून त्यांत वेखंड, खमीर ( किण्व किंवा गुराबीज ), बडीशेप, देवदार, कोष्ठ वगैरे गंधद्रव्यें, जवस वगैरे धान्यें, रास्ना, एरंडमूळ व विविध मांसें हे पदार्थ कालवून त्या त्या ठिकाणीं बांधावे. कफाश्रित वात असल्यास सुरसादि गणांतील द्रव्यें व पित्ताश्रित वात असल्यास पद्मकादि गणांतील द्रव्यें त्याच घृतादि मिश्रणांत कालवून बांधावीं. हे उपनाह वारंवार बदलून नवे बांधावे. पद्मकादि द्रव्यांच्या उपनाहाला साल्वण स्वेद अशी दुसरी संज्ञा आहे.

स्निग्धोष्णवीर्यैर्मृदुभिश्चर्मपट्टैरपूतिभिः ॥ ४ ॥
अलाभे वातजित्पत्रकौशेयाविकशाटकैः ।
रात्रौ बद्धं दिवा मुञ्चेन्मुञ्चेद्रात्रौ दिवाकृतम् ॥ ५ ॥

प्रोटीस बांधणें तें स्निग्ध, ऊबदार, मऊ व घाण न येणाऱ्या चामड्यावर बांधावें; तें न मिळाल्यास वातनाशक पानें ( एरंडादिकांचीं ), रेशमी, लोंकरीचीं किंवा सुती वस्त्रें इत्यादिकांवर बांधावें. रात्रीं बांधलेलें पोटीस दिवसां सोडावें व दिवसां बांधलेलें रात्रीं सोडावें.

ऊष्मा तूत्कारिकालोष्ठकपालोपलपांसुभिः ।
पत्रभङ्गेन धान्येन करीषसिकतातुषैः ॥ ६ ॥
अनेकोपायसन्तप्तैः प्रयोज्यो देशकालतः ।

उष्मस्वेद ( वाफारा ) देणें तो गाखर ( कणकीचे वगैरे), मातीचें ढेंकूळ, खापर, शिला, धूळ, पानें, धान्य, गोंवऱ्या, वाळू, कोंडा, इत्यादि पदार्थ अनेक प्रकारांनीं तापवून देशकालादिकांच्या अनुरोधानें द्यावा. ( खापर, शिला, वीट वगैरे तापवून लाल करून पाण्यांत किंवा अम्ल द्रव्यांत विझविलीं म्हणजे जी वाफ निघते, ती अंगप्रदेश आच्छादित करून घेणें; मांसरस, दूध, दहीं, वातहर धान्याचा किंवा पानाचा काढा, इत्यादि पदार्थ मडक्यांत शिजत असतांना पांघरुणानें अंग व मडकें झांकून त्यांतून निघणारी वाफ घेणें, किंवा नलिकायंत्रानें वाफ देणें, इत्यादि अनेक प्रकारांनीं उष्मस्वेद किंवा वाफारा द्यावा. )

शिग्रुवारणकैरण्डकरञ्जसुरसार्जकात् ॥ ७ ॥
शिरीषवासावंशार्कमालतीदीर्घवृन्ततः ।
पत्रभङ्गैर्वचाद्यैश्च मांसैश्चानूपवारिजैः ॥ ८ ॥
दशमूलेन च पृथक् सहितैर्वा यथामलम् ।
स्नेहवद्भिः सुराशुक्तवारिक्षीरादिसाधितैः ॥ ९ ॥
कुम्भीर्गलन्तीर्नाडीर्वा पूरयित्वा रुजार्दितम् ।
वाससाच्छादितं गात्रं स्निग्धं सिञ्चेद्यथासुखम् ॥१०॥

---

*श्लोक ४३ याच्या पूर्वार्धांत अरुणदत्तानें 'तद्धि विष्यन्दि' असा पाठ न घेतां 'तद्धचभिष्यन्दि' असा पाठ दिला आहे. आम्हीं दिलेला पाठ हेमाद्रीस अनुसरून आहे व तोच सयुक्तिक दिसतो; कारण लवणयुक्त स्नेहांचा नुसत्या स्नेहांपेक्षां अधिक उपयोग कां होतो, हें दाखविण्याकरितां ह्या श्लोकार्धाची योजना आहे, व लवण विष्यंदि (कफादिकांना पातळ करणारें किंवा स्रोतसांत लीन झालेल्या दोषांना सोडविणारें ) आहे असें त्याच्या गुणपाठांत पूर्वी सांगितलेंच आहे ( पा. ३६ पहा ). परंतु तें अभिष्यंदि असल्याचें कोठेंच सांगितलें नाहीं. ग्रंथकर्त्याचा आशय हाच दिसतो कीं, लवणयुक्त स्नेह दिला असतां त्या लवणाच्या योगानें स्रोतसें खुलीं झाल्यानें स्नेहाचा त्यांत लवकर प्रवेश होतो.

द्रवस्वेद करणें तो येणेंप्रमाणें:—शेवगा, कांटेकरंज, एरंड, करंज, तुळसी, अजवला, शिरीष, अडुळसा, वेळू, रुई, जाई व ऐंद्र यांचीं पानें, वर सांगितलेलीं वेलंड वगैरे द्रव्यें, अनूप व जलचर प्राण्यांचें मांस व दशमुळें हीं औषधें वेगळालीं किंवा सर्व एकदम (जसे दोष असतील त्याप्रमाणें) घेऊन, स्नेहयुक्त करून, दारू, शिर्का, पाणी किंवा दूध इत्यादिकांमध्यें सिद्ध करून, तें पाणी एका सच्छिद्र मडक्यांत किंवा नळींत भरून वस्त्राच्छादित व तैलादि स्नेह लावलेल्या व्याधित अंगप्रदेशावर त्याची सुखोष्ण धार पडूं द्यावी (परिषेक करावा.)

तैरेव वा द्रवैः पूर्णं कुण्डं सर्वाङ्गगेऽनिले।
अवगाह्यातुरस्तिष्ठेदर्शःकृच्छ्रादिरुक्षु च ॥ ११ ॥

किंवा वायूचा विकार सर्वशरीरव्यापी असल्यास व मूळव्याध, मूत्रकृच्छ्र इत्यादि विकार असल्यास तेंच पाणी एखाद्या पिंपांत किंवा डोणींत भरून त्यांत रोग्याला बसवावें.

निवातेऽन्तर्बहिःस्निग्धो जीर्णान्नः स्वेदमाचरेत्।
व्याधिव्याधितदेशर्तुवशान्मध्यवरावरम् ॥ १२ ॥

स्वेद (शेक) देणें तो ज्याच्या आहाराचा पाक झाला आहे व ज्याला आंतून व बाहेरून स्निग्ध केलें आहे अशा (स्वेद्दार्ह) मनुष्याला निवांत स्थानीं द्यावा; व त्याचें प्रमाण रोगी, रोग, देश, काल, इत्यादिकांना अनुसरून उत्तम, मध्यम, किंवा कनिष्ठ असावें.

कफार्तो रूक्षणं रूक्षो रूक्षस्निग्धं कफानिले।

कफविकार असल्यास स्नेहनावांचून रूक्ष स्वेद द्यावा. कफवातविकार असल्यास रूक्ष व स्निग्ध असा मिश्रित स्वेद द्यावा.

आमाशयगते वायौ कफे पक्वाशयाश्रिते ॥ १३ ॥
रूक्षपूर्वं तथा स्नेहपूर्वं स्थानानुरोधतः।

आमाशयगत वातविकार असल्यास पहिल्यानें रूक्ष व मागाहून स्निग्ध स्वेद द्यावा व पक्वाशयगत कफविकार असल्यास पहिल्यानें स्निग्ध व मागून रूक्ष स्वेद द्यावा; कारण आमाशय हें कफस्थान असून वायु हा तेथें आगंतुक होय, व पक्वाशय वातस्थान असल्यामुळें कफ हा तेथें आगंतुक आहे. यास्तव पहिल्यानें स्थानिक दोषाची चिकित्सा करून मग आगंतूची करावी, हें योग्य होय. (तेराव्या अध्यायांतील एकविसावा श्लोक पहावा).

अल्पं वङ्क्षणयोः स्वल्पं दृङ्मुष्कहृदये न वा ॥ १४ ॥

आडसांध्याच्या ठिकाणीं अल्प स्वेद द्यावा; डोळे, अंड व हृदय या ठिकाणीं तर अगदींच अल्प किंवा मुळींच देऊं नये.

शीतशूलक्षये स्विन्नो जातेऽङ्गानां च मार्दवे।
स्याच्छनैर्मृदितः स्नातस्ततः स्नेहविधिं भजेत् ॥ १५ ॥

थंडी व शूळ शमन होऊन अंग मृदु झालें म्हणजे सम्यक् (योग्य प्रमाणाचा) स्वेद (शेक) झाला असें समजावें. नंतर हळू हळू अंग रगडून घेऊन स्नान करावें व मग स्नेहाध्यायांत सांगितल्याप्रमाणें पथ्यादिकांचा क्रम ठेवावा.

पित्तास्रकोपतृण्मूर्च्छास्वराङ्गसदनभ्रमः।
सन्धिपीडाज्वरश्यावरक्तमण्डलदर्शनम् ॥ १६ ॥
स्वेदातियोगाच्छर्दिश्च तत्र स्तम्भनमौषधम्।
विषक्षाराग्न्यतीसारच्छर्दिमोहातुरेषु च ॥ १७ ॥

स्वेदातिरेक झाला असतां रक्तपित्ताचा प्रकोप, तृषा, मूर्च्छा, स्वरभंग, गात्रसाद, भ्रम, सांधे दुखणें, ज्वर, निळसर व लाल गांधी उठणें व वांति हे विकार उत्पन्न होतात. त्यांजवर स्तंभक औषधांची योजना करावी. विषविकार, क्षारानें किंवा अग्नीनें भाजणें, अतिसार, वांति व मूर्च्छा या विकारांवर देखील स्तंभक औषधांचीच योजना करावी.

स्वेदनं गुरु तीक्ष्णोष्णं प्रायः स्तम्भनमन्यथा*।

स्वेदन औषधें प्रायः जड, तीक्ष्ण व उष्ण; व स्तंभन औषधें यांच्या उलट असतात.

प्रायस्तिक्तं कषायं च मधुरं च समासतः ॥ १८ ॥

व थोडक्यांत असें समजावें कीं, जे कडू, तुरट व गोड ते प्रायः स्तंभक असतात.

स्तम्भितः स्याद्बले लब्धे यथोक्तामयसंक्षयात्।

वरील विकार कमी होऊन पुनः शक्ति आली म्हणजे स्तंभनकार्य झालें असें समजावें.

स्तम्भत्वक्स्नायुसङ्कोचकम्पहृद्वाग्घनुग्रहैः ॥ १९ ॥
पादोष्ठत्वक्करैः श्यावैरतिस्तम्भितमादिशेत्।

स्तंभनकार्याचा अतिरेक झाला असतां अंग किंवा त्याचा एखादा भाग ताठणें, त्वचा व स्नायु यांचें आकुंचन, कंप, हनुस्तंभ, वाचा बंद होणें, उरांत बांध बसणें, पाय, हात व ओंठाची त्वचा निळसर होणें इत्यादि विकार होतात.

न स्वेदयेदतिस्थूलरूक्षदुर्बलमूर्च्छितान् ॥ २० ॥
स्तम्भनीयक्षतक्षीणक्षाममद्यविकारिणः।
तिमिरोदरवीसर्पकुष्ठशोषाढ्यरोगिणः ॥ २१ ॥
पीतदुग्धदधिस्नेहमधून्कृतविरेचनान्।
भ्रष्टदग्धगुदग्लानिक्रोधशोकभयान्वितान् ॥ २२ ॥
क्षुत्तृष्णाकामलापाण्डुमेहिनः पित्तपीडितान्।
गर्भिणीं पुष्पितां सूतां मृदु चात्ययिके गदे ॥ २३ ॥

पुढील लोकांना स्वेदन योग्य नाहीं:—अतिस्थूल, रूक्ष, दुर्बल, मूर्च्छित, जे स्तंभनाला योग्य आहेत ते, क्षतानें क्षीण झालेले, कृश, मद्यविकारग्रस्त, तिमिर, उदर, विसर्प, कुष्ठ, क्षय, वातरक्त, गुदभ्रंश, गुदपाक, कामला, पांडु, प्रमेह, पित्तविकार, क्षुधा, तृषा, ग्लानि,

---

* ह्या श्लोकार्धाच्यापुढें डॉ० कुंटे यांनीं छापविलेल्या पुस्तकांत पुढील श्लोक आहे. तो क्षेपक असल्यामुळें आम्हीं घेतला नाहीं. हेमाद्रीनेंहि त्याचें ग्रहण केलें नाहीं:—

द्रवस्थिरसरस्निग्धरूक्षसूक्ष्मं च भेषजम्।
स्वेदनं स्तम्भनं श्लक्ष्णं रूक्षसूक्ष्मसरद्रवम् ॥

क्रोध, शोक व भय यांनीं युक्त; ज्यांनीं दूध, दहीं, घृतादि स्नेह व मद्य यांचें सेवन केलें आहे किंवा विरेचन घेतलें आहे ते; गर्भिणी, रजस्वला व सूतिका ( बाळंतीण ) ह्यांना एखादी भयंकर व्याधि ( स्वेदसाध्य ) उत्पन्न झाल्यास मात्र मृदु असा स्वेद द्यावा.

**श्वासकासप्रतिश्यायाहिध्माध्मानाविबन्धिषु ।**
**स्वरभेदानिलव्याधिश्लेष्मामस्तम्भगौरवे ॥ १४ ॥**
**अङ्गमर्दकटीपार्श्वपृष्ठकुक्षिहनुग्रहे ।**
**महत्त्वे मुष्कयोः खल्ल्यामायामे वातकण्टके ॥ १५ ॥**
**मूत्रकृच्छ्रार्बुदग्रन्थिशुक्राघाताढ्यमारुते ।**
**स्वेदं यथायथं कुर्यात्तदौषधविभागतः ॥ १६ ॥**

श्वास, कास, पडसें, उचकी, पोट फुगणें, मलावरोध, स्वरभेद, वातव्याधि, कफविकार, आमदोष, स्तंभ ( ताठणें ), जाड्य, अंगमर्द ( ठेंचल्यासारखी पीडा ), कंबर, पार्श्व, पाठ, कूस व हनुवटी यांचें जखडणें, अंडवृद्धि, खल्ली ( वातरोगाचा प्रकार ), धनुर्वात, वातकंटक ( पादरोग ), मूत्रकृच्छ्र, अर्बुद, ग्रंथि, शुक्रदोष व ऊरुस्तंभ इतक्या विकारांवर स्वेदन योग्य आहे, व तें वरील चार प्रकारांपैकीं जो योग्य दिसेल त्या प्रकारानें व त्या त्या रोगावरील औषधांनीं करावें.

**स्वेदो हितस्त्वनाग्नेयो वाते मेदःकफावृते ।**

मेदःकफाश्रित वायूवर अग्निजन्य नव्हे असा स्वेद हितावह होय.

**निवातं गृहमायासो गुरु प्रावरणं भयम् ॥ २७ ॥**
**उपनाहाहवक्रोधभूरिपानं क्षुधातपः ।**

तो असाः—निवांत घरांत राहणें, व्यायाम, ऊबदार पांघरूण, भयभीत होणें, क्रोध येणें, युद्ध करणें ( कुस्ती खेळणें वगैरे ), उपनाहस्वेद, ऊन घेणें, क्षुधानिग्रह व बहु मद्यपान ( ह्या सर्व गोष्टी घाम आणण्याविषयीं प्रसिद्ध आहेत ).

**स्नेहक्लिनाः कोष्ठगा धातुगा वा**
**स्रोतोलीना ये च शाखास्थिसंस्थाः ।**
**दोषाः स्वेदैस्ते द्रवीकृत्य कोष्ठं**
**नीताः सम्यक्शुद्धिभिर्निर्ह्रियन्ते ॥ २९ ॥**

कोष्ठगत, धातुगत, स्रोतसांत लीन ( विबद्ध ) झालेले, शाखा व अस्थि यांत वास करणारे असे जे दोष, ते स्नेहाचे योगानें आर्द्र होऊन स्वेदानें पातळ झाले म्हणजे कोष्ठ्यांत येतात व मग शोधनद्वारां त्यांचा चांगला उत्सर्ग होतो.

---

# अष्टादशोऽध्यायः

## अध्याय १८ वा.

**अथातो वमनविरेचनविधिमध्यायं व्याख्यास्यामः ॥**

आतां वमनविरेचन विधीचा अध्याय सांगतों.

**कफे विदध्याद्वमनं संयोगे वा कफोल्बणे ।**
**तद्वद्विरेचनं पित्ते**

कफविकारावर व कफादिक संसर्गसंनिपातांवर वमन द्यावें. तसेंच पित्तावर व पित्ताधिक संसर्गसंनिपातांवर विरेचन द्यावें.

**विशेषेण तु वामयेत् ॥ १ ॥**
**नवज्वरातिसाराधःपित्तासृग्राजयक्ष्मिणः ।**
**कुष्ठमेहापचीग्रन्थिश्लीपदोन्मादकासिनः ॥ २ ॥**
**श्वासहृल्लासवीसर्पस्तन्यदोषोर्ध्वरोगिणः ।**

ज्यावर वमन विशेषेंकरून योग्य आहे ते रोग येणेंप्रमाणेंः— नवज्वर ( तरुण किंवा सामज्वर ), अतिसार, अधोगामी रक्तपित्त, राजयक्ष्मा, कुष्ठ, मेह, अपची ( गंडमाळा ), ग्रंथि, श्लीपद, उन्माद, कास, श्वास, मळमळणें, विसर्प, स्तन्यदोष व ऊर्ध्वभागांतील रोग ( डोळे, नाक, कान, तोंड इत्यादिकांचे रोग. ).

**अवम्या गर्भिणी रूक्षः क्षुधितो नित्यदुःखितः ॥ ३ ॥**
**बालवृद्धकृशस्थूलहृद्रोगिक्षतदुर्बलाः ।**
**प्रसक्तवमथुप्लीहतिमिरक्रिमिकोष्ठिनः ॥ ४ ॥**
**ऊर्ध्वप्रवृत्तवाय्वस्रदत्तबस्तिहतस्वराः ।**
**मूत्राघात्युदरी गुल्मी दुर्वमोऽत्यग्निरर्शसः ॥ ५ ॥**
**उदावर्तभ्रमाष्ठीलापार्श्वरुग्वातरोगिणः ।**

पुढील लोकांना वमन देऊं नयेः—गर्भिणी, रूक्ष, क्षुधित, सदा दुःखी, बाल, वृद्ध, कृश, स्थूल, हृद्रोगी, जखमी, दुर्बल, ज्यांना फार उलटी होत आहे ते, ज्यांना पानथरी, तिमिर, कृमि, ऊर्ध्ववात ( उचकी वगैरे ), ऊर्ध्वगामी रक्तपित्त, स्वरभेद, मूत्राघात, उदर, गुल्म, मूळव्याध, उदावर्त, भ्रम, अष्ठीला ( एक वायुरोग ), पार्श्वपीडा व वातव्याधि हे विकार झाले आहेत ते, ज्यांना पिचकारी दिली आहे ते, ज्यांना वमन लवकर लागू होत नाहीं व ज्यांचा अग्नि फार तीव्र आहे ते.

**ऋते विषगराजीर्णविरुद्धाभ्यवहारतः ॥ ६ ॥**

परंतु ह्यांनीं जर विष, कृत्रिम विष व अपाच्य किंवा विरुद्ध आहार ह्यांपैकीं एखाद्याचें सेवन केलें असेल, तर मात्र त्यांना वमन देण्यास हरकत नाहीं.

**प्रसक्तवमथोः पूर्वं प्रायेणामज्वरेऽपि च ।**
**धूमान्तैः कर्मभिर्वर्ज्याः सर्वैरेव त्वजीर्णिनः ॥ ७ ॥**

वरील श्लोकांत सांगितलेला 'गर्भिणी' पासून तों 'दुर्बला' पर्यंत जे अकरा अवम्य ( वमनाला अयोग्य ) ते व प्रायः आमज्वरपीडितहि स्नेहापासून तों धूमांत कर्मांना* अयोग्य आहेत, व ज्यांना अजीर्णाचा विकार झाला असेल त्यांना तर सर्वच कर्में वर्ज्य आहेत.

**विरेकसाध्या गुल्मार्शोविस्फोटव्यङ्गकामलाः ।**
**जीर्णज्वरोदरगरच्छर्दिप्लीहहलीमकाः ॥ ८ ॥**

---

* स्नेह, स्वेद, वमन, विरेचन, बस्तिकर्म, नस्य व धूम्रपान इत्यादिकांना कर्में अशी संज्ञा आहे.

विद्रधिस्तिमिरं काचः स्यन्दः पक्वाशयव्यथा।
योनिशुक्राश्रया रोगाः कोष्ठगाः कृमयो व्रणाः ॥ ९ ॥
वातास्रमूर्ध्वगं रक्तं मूत्राघातः शकृद्ग्रहः।
वम्याश्च कुष्ठमेहाद्याः

विरेचनसाध्य रोग येणेंप्रमाणें:-गुल्म, मूळव्याध, विस्फोट, वांग, कावीळ, जीर्णज्वर, उदर, विष, वांति, पानथरी, हलीमक (एक प्रकारचा पांडुरोग), विद्रधि, तिमिर, मोतिंबिंदु, अभिष्यंद (डोळे येणें), पोटशूळ, योनिदोष, शुक्रदोष, कोष्ठगत कृमि, व्रण, वातरक्त, ऊर्ध्वगामी रक्तपित्त, मूत्राघात, मलावरोध व वर सांगितलेले वमनयोग्य कुष्ठमेहादि रोग.

न तु रेच्यो नवज्वरी ॥ १० ॥
अल्पाग्न्यधोगपित्तास्रक्षतपाय्वतिसारिणः।
सशल्यास्थापितक्रूरकोष्ठातिस्निग्धशोषिणः ॥ ११ ॥

तरुणज्वरावर रेचक कधींहि देऊं नये. तसेंच मंदाग्नि, अधोगामी रक्तपित्त, गुदपाक, अतिसार व क्षय ह्या विकारांमध्यें व ज्याच्या शरीरांत तृणकाष्ठादि शल्य शिरलें आहे, ज्यांना पिचकारी दिली आहे, ज्याचा कोठा फार जड आहे व ज्याला स्नेहनक्रियेचा अतिरेक झाला आहे त्यांनाहि विरेचन योग्य नाहीं.

अथ साधारणे काले स्निग्धस्विन्नं यथाविधि।
श्वोवम्यमुत्क्लिष्टकफं मत्स्यमाषतिलादिभिः ॥ १२ ॥
निशां सुप्तं सुजीर्णान्नं पूर्वाह्णे कृतमङ्गलम्।
निरन्नमीषत्स्निग्धं वा पेयया पीतसर्पिषम् ॥ १३ ॥
वृद्धबालाबलक्लीबभीरून् रोगानुरोधतः।
आकण्ठं पायितान्मद्यं क्षीरमिक्षुरसं रसम् ॥ १४ ॥
यथाविकारविहितां मधुसैन्धवसंयुताम्।
कोष्ठं विभज्य भैषज्यमात्रां मन्त्राभिमन्त्रिताम् ॥ १५ ॥
"ब्रह्मदक्षाश्विरुद्रेन्द्रभूचन्द्रार्कानिलानलाः।
ऋषयः सौषधिग्रामा भूतसङ्घाश्च पान्तु वः ॥ १६ ॥
रसायनमिवर्षीणाममराणाममिवामृतम्।
सुधेवोत्तमनागानां भैषज्यमिदमस्तु ते ॥ १७ ॥
ॐ नमो भगवते भैषज्यगुरवे वैडूर्यप्रभराजाय-
तथागतायार्हते सम्यक्सम्बुद्धाय। तद्यथा।
ॐ भैषज्ये भैषज्ये महाभैषज्ये समुद्गते स्वाहा।"
प्राङ्मुखं पाययेत्

याप्रमाणें वमनविरेचनाच्या योग्यायोग्यतेचा विचार करून ज्येष्ठ आदिकरून साधारणकालीं यथाशास्त्र स्नेहस्वेदविधि करून वमन देण्याच्या आदल्या दिवशीं मासे, उडीद, तीळ, वगैरे कफकारक पदार्थ खावयास देऊन रात्रीं जागरण न होऊं देतां दुसरे दिवशीं सकाळीं अन्न चांगलें जिरल्यावर मंगलस्वस्तिवाचनादि क्रिया करून अनशपोटीं किंवा स्नेहन चांगलें झालें नसल्यास, किंचित् घृतयुक्त पेज पाजून, (वृद्ध, बाल, अशक्त, षंढ व भित्रे यांना त्या त्या रोगाप्रमाणें मद्य, उंसाचा रस, दूध किंवा मांसरस आकंठ पाजून) त्या त्या विकाराला योग्य असें वामक औषध कोष्ठाच्या तारतम्या-नुरूप प्रमाणानें मध व सैंधव यांत मिश्रित करून व वरील 'ब्रह्मदक्षाश्विरुद्रेंद्र' इ० मंत्रानें अभिमंत्रित करून पूर्वाभिमुख पाजावें.

पीतं मुहूर्तमनुपालयेत्।
तन्मनाः

औषध प्याल्यावर वमनाकडेच चित्त लावून एक दोन घटका वाट पहात बसावें.

जातहृल्लासप्रसेकश्छर्दयेत्ततः ॥ १८ ॥
अङ्गुलिभ्यामनायस्तो नालेन मृदुनाऽथवा।
गलताल्वरुजन्वेगानप्रवृत्तान् प्रवर्तयन् ॥ १९ ॥
प्रवर्तयन् प्रवृत्तांश्च जानुतुल्यासने स्थितः।

मग मळमळून तोंडास पाणी सुटूं लागलें म्हणजे घशांत बोटें किंवा कमलादिकांचे मऊ देंठ घालून आयास व गळा व टाळू यांना इजा न करितां वमनवेग सुरू नसल्यास सुरू करावा व सुरू असल्यास तसाच चालू ठेवावा. वांति करणें ती गुडघ्याइतक्या उंच आसनावर बसून करावी.

उभे पार्श्वे ललाटं च वमतश्चास्य धारयेत् ॥ २० ॥
प्रपीडयेत्तथा नाभिं पृष्ठं च प्रतिलोमतः।

वांति होतांना रोग्याच्या कपाळावर व दोहों बाजूंच्या बरगडयांवर आधार द्यावा व बेंबीवर व पाठीवर हात ठेवून वरच्या दिशेनें दाबावें.

कफे तीक्ष्णोष्णकटुकैः पित्ते स्वादुहिमैरिति ॥ २१ ॥
वमेत् स्निग्धाम्ललवणैः संसृष्टे मरुता कफे।
पित्तस्य दर्शनं यावच्छेदो वा श्लेष्मणो भवेत् ॥ २२ ॥

कफावर तीक्ष्ण, उष्ण व तिखट, पित्तावर मधुर व शीत व वाताश्रित कफावर स्निग्ध, आंबट व खारट असें वमन द्यावें. पित्त पडेपर्यंत किंवा कफ तुटून जाईपर्यंत वमन करावें.

हीनवेगः कणाधात्रीसिद्धार्थलवणोदकैः।
वमेत्पुनः पुनः

वांतीचा वेग अगदींच कमी असल्यास पिंपळी, आंवळकटी, शिरस व सैंधव यांचा कल्क पाण्याबरोबर पिऊन वारंवार ओकावें.

तत्र वेगानामप्रवर्तनम् ॥ २३ ॥
प्रवृत्तिः सविबन्धा वा केवलस्यौषधस्य वा।
अयोगस्तेन निष्ठीवकण्डूकोठज्वरादयः ॥ २४ ॥

वांति मुळींच न होणें, अडथळ्यानें होणें, किंवा वमनद्वारां नुसतें औषधच पडणें याला वांतीचा अयोग म्हणतात. त्याच्या योगानें लालास्राव, कंडू, गांधी उठणें, ज्वर इत्यादि विकार उत्पन्न होतात.

निर्विबन्धं प्रवर्तन्ते कफपित्तानिलाः क्रमात्।
सम्यग्योगे

कफ, पित्त व वायु यांची अनुक्रमानें साफ प्रवृत्ति झाली म्हणजे वमनाचा सम्यग्योग झाला असें म्हणतात.

अतियोगे तु फेनचन्द्रकरक्तवत् ॥ १५ ॥
वमितं क्षामता दाहः कण्ठशोषस्तमो भ्रमः।
घोरा वाय्वामया मृत्युर्जीवशोणितनिर्गमात् ॥ १६ ॥

अतियोग झाला असतां वांतीमध्यें फेंस, रक्त व निरनिराळ्या रंगाचे तारे दृष्टीस पडतात व कृशता, दाह, कंठशोष, अंधेरी, घेरी, दारुण वातरोग व जीवरक्ताचा स्राव झाल्यामुळें मृत्यु असे भयंकर परिणाम होतात.

सम्यग्योगेन वमितं क्षणमाश्वास्य पाययेत्।
धूमत्रयस्यान्यतमं स्नेहाचारमथादिशेत् ॥ १७ ॥

सम्यग्योगानें (योग्य प्रमाणानें) वमन झाल्यावर क्षणभर रोग्याला हुशारी देऊन त्रिविध (स्निग्ध, मध्य व तीक्ष्ण) धूम्रपानापैकीं एखादें सेवन करण्यास सांगून स्नेहविधींत सांगितल्याप्रमाणें उपचार करावा.

ततः सायं प्रभाते वा क्षुद्वान् स्नातः सुखाम्बुना।
भुञ्जानो रक्तशाल्यन्नं भजेत्पेयादिकं क्रमम् ॥ १८ ॥

मग संध्याकाळीं किंवा दुसरे दिवशीं सकाळीं सुखोष्ण जलानें स्नान करून भूक लागली म्हणजे तांबसाळीच्या तांदुळाचा भात खाऊन पुढील पेयादि क्रम चालू ठेवावा.

पेयां विलेपीमकृतं कृतं च यूषं रसं त्रीनुभयं तथैकम्।
क्रमेण सेवेत नरोऽन्नकालान् प्रधानमध्यावरशुद्धिशुद्धः

उत्तम, मध्यम व कनिष्ठ प्रतीचें वमन घेतल्यावर रोग्यानें लापशी, आटवल, फोडणी दिलेला किंवा फोडणीवांचून तयार केलेला यूष (कटाचें सार) व मांसरस यांचें अनुक्रमेंकरून तीनतीन, दोनदोन व एकेक वेळ सेवन करावें. (ह्या वेळा सकाळच्या व संध्याकाळच्या जेवणाच्या वेळा होत. उत्तम प्रतीचें वमन घेणारानें पेयादि प्रत्येक पदार्थ तीनतीन अन्नकाल, मध्यम प्रतीचें वमन घेणारानें दोनदोन व कनिष्ठ प्रतीचें वमन घेणारानें एकेक अन्नकाल सेवन करावा).

यथाणुरग्निस्तृणगोमयाद्यैः सन्धुक्ष्यमाणो भवति क्रमेण।
महान् स्थिरः सर्वपचस्तथैव शुद्धस्य पेयादिभिरन्तराग्निः

जशी एखादी विस्तवाची लहानशी ठिणगी तृण, गोवरी इत्यादिकांनीं क्रमानें पेटविली असतां तीच मोठी, स्थिर व सर्व पदार्थांचें पचन करण्यास योग्य होते, तद्वतच वमनादिकांनीं ज्यांचा कोठा शुद्ध केलेला आहे, त्यांचा जठराग्नि पेयादिकांचा क्रमानें उपयोग केल्यानें चांगला प्रदीप्त व चिरस्थायी होऊन तो सर्व प्रकारच्या अन्नांचें पचन करितो.

जघन्यमध्यप्रवरे तु वेगाश्चत्वार इष्टा वमने षडष्टौ।
दशैव ते द्वित्रिगुणा विरेके प्रस्थस्तथा स्याद्द्विचतुर्गुणश्च

उत्तम प्रतीची (म्हणजे फार कडक औषधानें झालेली) वांति आठ वेळां, मध्यम प्रतीची सहा वेळां व कनिष्ठ प्रतीची चार वेळां होते; व उत्तम, मध्यम व कनिष्ठ प्रतीचे रेच अनुक्रमेंकरून तीस, वीस व दहा वेळां होतात व त्यांचें उत्तम, मध्यम व कनिष्ठ मान चार, दोन व एक प्रस्थ असतें (ह्या ठिकाणीं ५४ तोळ्यांचा एक प्रस्थ जाणावा).

पित्तावसानं वमनं विरेकादर्धं कफान्तं च विरेकमाहुः।

वांतीचें उत्तम, मध्यम व कनिष्ठ मान रेचाच्या निम्मे म्हणजे अनुक्रमानें दोन, एक व अर्धा प्रस्थ जाणावें. वांति पित्त पडेतोंपर्यंत व रेच कफ पडेतोंपर्यंत व्हावे.

द्वित्रान् सविट्कानपनीय वेगान् मेयं विरेके वमने
तु पीतम् ॥ ३२ ॥

रेचाचें माप घेणें झाल्यास पहिले दोनतीन मलमिश्रित वेग वजा करून घ्यावे व वांतीचें माप घेणें तें प्यालेलें औषध वजा करून घ्यावें.

अथैनं वमितं भूयः स्नेहस्वेदोपपादितम्।
श्लेष्मकाले गते ज्ञात्वा कोष्ठं सम्यग्विरेचयेत् ॥ ३३ ॥

याप्रमाणें वांति झाल्यानंतर पुनः स्नेहस्वेदविधि करून कफकाल निघून गेल्यावर कोठ्याच्या दक्षादक्षतेचा चांगला विचार करून रेचक द्यावें.

बहुपित्तो मृदुः कोष्ठः क्षीरेणापि विरिच्यते।

ज्यांत पित्त पुष्कळ असतें तो कोठा मृदु असून त्याला दुधानेंही रेच होतात.

प्रभूतमारुतः क्रूरः कृच्छ्राच्छ्यामादिकैरपि ॥ ३३ ॥

ज्यांत वायूचा अंश अधिक तो क्रूर असून त्याला काळ्या निशोतरासारख्या पदार्थानें देखील रेच होणें कठिण.

कषायमधुरैः पित्ते विरेकः कटुकैः कफे।
स्निग्धोष्णलवणैर्वायौ

पित्तावर तुरट व मधुर औषधांनीं युक्त रेचक द्यावें. कफावर तिखट औषधांनीं युक्त द्यावें व वायूवर स्निग्ध, उष्ण व खारट औषधांनीं युक्त द्यावें.

अप्रवृत्तौ तु पाययेत् ॥ ३५ ॥
उष्णाम्बु स्वेदयेदस्य पाणितापेन चोदरम्।

रेचक लागू न झाल्यास ऊन पाणी पाजावें व तापविलेल्या हातांनीं पोट शेकावें.

उत्थानेऽल्पे दिने तस्मिन् भुक्त्वान्येद्युः पुनः पिबेत् ॥ ३६ ॥

अल्प रेच झाल्यास त्या दिवशीं जेवण करून दुसरे दिवशीं पुनः रेचक घ्यावें.

अदृढस्नेहकोष्ठस्तु पिबेदूर्ध्वं दशाहतः।
भूयोऽप्युपस्कृततनुः स्नेहस्वेदैर्विरेचनम् ॥ ३७ ॥
यौगिकं सम्यगालोच्य स्मरन्पूर्वमतिक्रमम्।

परंतु कोठा स्नेहरहित शाला असल्यास दहा दिवसांनीं पुनः

देहाला स्नेहस्वेदविधीचा संस्कार करून व पहिल्या खेपेची चूक किंवा उणीव चांगली लक्षांत आणून योग्य असेल तें रेचक द्यावें.

हृत्कुक्ष्यशुद्धिररुचिरुत्क्लेशः श्लेष्मपित्तयोः ॥ ३८ ॥
कण्डूर्विदाहः पिटिका पीनसो वातविड् ग्रहः ।
अयोगलक्षणम्

उरांत व पोटांत साफ नसणें, अरुचि, कफपित्तांचा स्वस्थानापासून निर्गम, कंडू, दाह, पिटिका, पडसें व वाताचा व मलाचा अवरोध हीं रेचक लागू न झाल्याचीं लक्षणें होत.

योगो वैपरीत्ये यथोदितात् ॥ ३९ ॥

ह्याच्या उलट स्थितीवरून रेचक चांगलें लागू झालें असें समजावें.

विट्पित्तकफवातेषु निःसृतेषु क्रमात्स्रवेत् ।
निःश्लेष्मपित्तमुदकं श्वेतं कृष्णं सलोहितम् ॥ ४० ॥
मांसधावनतुल्यं वा मेदःखण्डाभमेव वा ।
गुदनिःसरणं तृष्णा भ्रमो नेत्रप्रवेशनम् ॥ ४१ ॥
भवन्त्यतिविरिक्तस्य तथातिवमनामयाः ।

अतियोगाचीं लक्षणें पुढें लिहिल्याप्रमाणें:—मल, पित्त, कफ व वात यांचा एकामागून एक उत्सर्ग झाल्यावर मग श्लेष्मपित्तरहित, पांढरें, काळें मांस धुतलेल्या पाण्यासारखें किंवा चरबीच्या तुकड्यासारखें असें रक्तयुक्त पाणी पडूं लागतें, व गुदभ्रंश, तृषा, भ्रम, डोळे खोल जाणें हे व अतिवमनापासून होणारे विकार (वर सांगितलेले) उत्पन्न होतात.

सम्यग्विरिक्तमेनं च वमनोक्तेन योजयेत् ॥ ४२ ॥
धूमवर्ज्येन विधिना

यथायोग्य रेच झाल्यावर रोग्याला धूम्रपान खेरीजकरून सर्व वमनोक्त उपचार करावे.

ततो वमितवानिव ।
क्रमेणान्नानि भुञ्जानो भजेत्प्रकृतिभोजनम् ॥ ४३ ॥

मग वमन दिलेल्या मनुष्याप्रमाणेंच पेयादि क्रम (लापशी वगैरे) चालवून सात दिवसांनीं नेहमींप्रमाणें जेवण करावें.

मन्दवह्निमसंशुद्धमक्षामं दोषदुर्बलम् ।
अदृष्टजीर्णलिङ्गं च लङ्घयेत्पीतभेषजम् ॥ ४४ ॥

अग्निमांद्य व दोषजन्य अशक्तता हे विकार असून कृश नसणाऱ्या मनुष्यानें रेचक घेतलें असून तें लागू न झाल्यास त्यानें तें जिरल्याचीं लक्षणें न दिसल्यास लंघन करावें.

स्नेहस्वेदौषधोत्क्लेशसङ्गैरिति न बाध्यते ।

म्हणजे तेणेंकरून स्नेह, स्वेद व संशोधन औषध यांच्या योगानें दोष स्वस्थानापासून निघून आंतल्याआंत कोंडून राहिल्यामुळें जे विकार व्हावयाचे ते होत नाहींत.

संशोधनास्रविस्रावस्नेहयोजनलङ्घनैः ॥ ४५ ॥
यात्यग्निर्मन्दतां तस्मात् क्रमं पेयादिमाचरेत् ।

संशोधन, रक्तमोक्ष, स्नेहन व लंघन यांचे योगानें अग्नि मंदावतो, यास्तव पेयादिक्रमाचें अवलंबन करावें.

स्रुताल्पपित्तश्लेष्माणं मद्यपं वातपैत्तिकम् ॥ ४६ ॥
पेयां न पाययेत्तेषां तर्पणादिक्रमो हितः ।

ज्याला अल्पच कफ व पित्त पडलें आहे, ज्याला वातपित्ताचा विकार आहे व जो मद्यपान करितो, त्यांना पेया (लापशी) योग्य नसून तर्पणादि क्रमच हितावह आहे. (ह्या क्रमांत पेयेबद्दल तर्पणाची म्ह० मंथाची योजना करावी.)

अपक्वं वमनं दोषान् पच्यमानं विरेचनम् ॥ ४७ ॥
निर्हरेद्वमनस्यातः पाकं न प्रतिपालयेत् ।

वमन पक्व होण्यापूर्वींच दोष काढून टाकितें व विरेचन पच्यमान अवस्थेमध्यें दोष काढून टाकितें. यास्तव वमनाच्या परिपाकाची वाट पाहूं नये.

दुर्बलो बहुदोषश्च दोषपाकेन यः स्वयम् ॥ ४८ ॥
विरिच्यते भेदनीयैर्भोज्यैस्तमुपपादयेत् ।

ज्याला अशक्ततेमुळें व दोषबाहुल्यामुळें दोषाचा परिपाक होऊन आपाप रेच सुरू होतात, त्याला (रेचकाबद्दल) सारक असे खावयाचे पदार्थ दिले म्हणजे झालें.

दुर्बलः शोधितः पूर्वमल्पदोषः कृशो नरः ॥ ४९ ॥
अपरिज्ञातकोष्ठश्च पिबेन्मृद्वल्पमौषधम् ।
वरं तदसकृत्पीतमन्यथा संशयावहम् ॥ ५० ॥

ज्याला अशक्तता, कृशता किंवा अल्पच विकार आहे, ज्याचा कोठा पर्वी एकवार (नुक्ताच) शुद्ध केला आहे, किंवा ज्याच्या कोठ्याची बरोबर परीक्षा झाली नाहीं, त्याला सौम्य व अल्पच औषध द्यावें. तेंच एकाहून अधिक वेळां घेतलेलें बरें, परंतु एकदम पुष्कळ व तीव्र (औषध) देणें धोक्याचें आहे.

हरेद्बहूंश्चलान्दोषानल्पानल्पान्पुनः पुनः ।
दुर्बलस्य मृदुद्रव्यैरल्पान् संशमयेत्तु तान्* ॥ ५१ ॥
क्लेशयन्ति चिरं ते हि हन्युर्वैनमनिर्हृताः ।

दुर्बळ मनुष्याचे दोष प्रचलित असून अल्प असल्यास त्यांचें शमनच करावें व फार असल्यास सौम्य रेचकें वारंवार देऊन त्यांचें हळूहळू शोधनच केलें पाहिजे; नाहीं तर ते चिरकाळ त्रास देतात किंवा प्राण घेतात.

मन्दाग्निं क्रूरकोष्ठं च सक्षारलवणैर्घृतैः ॥ ५२ ॥
सन्धुक्षिताग्निं विजितकफवातं च शोधयेत् ।

ज्याचा अग्नि मंद व कोठा जड आहे, त्याला पहिल्यानें अग्नि प्रदीप्त करण्याकरितां व कफवातांचा नाश करण्याकरितां क्षारलवणयुक्त घृतें देऊन मग शोधन द्यावें.

---

* श्लोक ५१–५२ ह्या दीड श्लोकाच्या अर्थामध्येंहि आम्हीं हेमाद्रीप्रमाणेंच अर्थ दिला आहे. अरुणदत्ताप्रमाणें अन्वय लावून अर्थ दिल्यास तो सयुक्तिक दिसत नाहीं.

रूक्षवह्वनिलक्रूरकोष्ठव्यायामशीलिनाम् ॥ ५३ ॥
दीप्ताग्नीनां च भैषज्यमविरेच्यैव जीर्यति ।
तेभ्यो बस्तिं पुरा दद्यात्तत स्निग्धं विरेचनम् ॥ ५४ ॥
शकृन्निर्हृत्य वा किञ्चित्तीक्ष्णाभिः फलवर्तिभिः ।

ज्यांचें शरीर रूक्ष व वातबहुल, कोठा जड व अग्नि प्रदीप्त व ज्यांना व्यायामाची संवय आहे, त्यांना विरेचन दिलें असतां तें लागू न होतां तसेंच जिरतें; म्हणून त्यांना पहिल्यानें बस्ति किंवा तीक्ष्ण फलवर्ति ( विरेचन औषधांनीं युक्त अशी गुदद्वारीं धारण करण्याची वात ) देऊन थोडीशी मलशुद्धि करावी व मग स्निग्ध रेचक द्यावें.

प्रवृत्तं हि मलं स्निग्धो विरेको निर्हरेत्सुखम् ॥ ५५ ॥

याप्रमाणें मलप्रवृत्ति सुरू झाली म्हणजे स्निग्ध रेचकाचे योगानें मलाचा अनायासानें उत्सर्ग होतो.

विषाभिघातपिटिकाकुष्ठशोफविसर्पिणः ।
कामलापाण्डुमेहार्तान्नातिस्निग्धान्विरेचयेत् ॥ ५६ ॥

विष, अभिघात, पिटिका, कुष्ठ, सूज, विसर्प, कावीळ, पांडु व मेह हे विकार ज्यांना झाले असतील, त्यांना विरेचन देण्यापूर्वी अल्पच स्नेहन द्यावें.

सर्वान् स्नेहविरेकैश्च रूक्षैस्तुस्नेहभावितान् ।

व या सर्वांना स्नेहमय विरेचन ( एरंडेल इ० ) द्यावें व ज्यांना स्नेहविधीचा चांगला संस्कार झाला आहे, त्या सर्वांना रूक्ष रेचक द्यावें.

कर्मणां वमनादीनां पुनरप्यन्तरेऽन्तरे ॥ ५७ ॥
स्नेहस्वेदौ प्रयुञ्जीत स्नेहमन्ते बलाय च ।

वमनादि कर्मांच्या मध्यंतरीं प्रत्येक खेपेस स्नेहस्वेदांची योजना करावी व सर्व कर्में संपल्यानंतर शक्ति आणण्याकरितां स्नेहाची योजना करावी.

मलो हि देहादुत्क्लेश्य ह्रियते वाससो यथा ॥ ५८ ॥
स्नेहस्वेदैस्तथोत्क्लेश्य ह्रियते शोधनैर्मलः ।

साबण व ऊन पाणी यांचे योगानें जसा वस्त्रापासून मळ निर्मुक्त होऊन निघून जातो तसाच स्नेहस्वेदांच्या योगानें शरीरापासून मळ निर्मुक्त होऊन शोधनांनीं तो बाहेर काढला जातो.

स्नेहस्वेदावनभ्यस्य कुर्यात्संशोधनं तु यः ॥ ५९ ॥
दारु शुष्कमिवानामे शरीरं तस्य दीर्यते ।

वाळलेलें लाकूड लवविलें असतां जसें मोडतें, तसेंच स्नेहस्वेदांवांचून शोधन दिलें असतां शरीरहि नाशाप्रत जातें.

बुद्धिप्रसादं बलमिन्द्रियाणां धातुस्थिरत्वं ज्वलनस्य दीप्तिम् ।
चिराच्च पाकं वयसः करोति संशोधनं सम्यगुपास्यमानम् ॥ ६० ॥

संशोधनाचा ( वमनविरेचनाचा ) योग्य उपयोग केला असतां त्याचे योगानें बुद्धि निष्कलंक, इंद्रियें बळकट, धातु स्थिर, अग्नि प्रदीप्त व आयुष्य दीर्घ होतें.

---

# एकोनविंशोऽध्यायः

## अध्याय १९ वा

### अथातो बस्तिविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां बस्तिविधीचा अध्याय सांगतों.

वातोल्बणेषु दोषेषु वाते वा बस्तिरिष्यते ।
उपक्रमाणां सर्वेषां सोऽग्रणीस्त्रिविधश्च सः ॥ १ ॥
निरूहोन्वासनो बस्तिरुत्तरः

वातादिक दोषांवर किंवा केवळ वातावर बस्ति हितकारक आहे. तो सर्व प्रकारच्या चिकित्सेमध्यें श्रेष्ठ असून त्याचे निरूह, अनुवासन व उत्तर बस्ति असे तीन प्रकार आहेत.

तेन साधयेत् ।
गुल्मानाहखुडप्लीहशुद्धातीसारशूलिनः ॥ २ ॥
जीर्णज्वरप्रतिश्यायशुक्रानिलमलग्रहान् ।
वर्ध्माश्मरीरजोनाशान् दारुणांश्चानिलामयान् ॥ ३ ॥

निरूह बस्ति पुढील रोगांवर द्यावाः—गुल्म, पोटफुगी, वातरक्त, प्लीहा, निराम अतिसार, शूल, जीर्णज्वर, पडसें, शुक्र, वात व मल यांचा अवरोध, अंतर्गळ, अश्मरी, रजोनाश ( स्त्रियांचा विटाळ बंद होणें ) व दारुण वातरोग.

अनास्थाप्यास्त्वतिस्निग्धः क्षतोरस्को भृशं कृशः ।
आमातिसारी वमिमान् संशुद्धो दत्तनावनः ॥ ४ ॥
कासश्वासप्रमेहार्शोहिध्माध्मानाल्पवर्चसः ।
शूनपायुः कृताहारो बद्धच्छिद्रोदकोदरी ॥ ५ ॥
कुष्ठी च मधुमेही च मासान् सप्त च गर्भिणी ॥

निरूह बस्तीला जे अयोग्य ते येणेंप्रमाणें:—अतिस्निग्ध, उरःक्षती, फार कृश, आमातिसारी, वांतिपीडित, ज्यांनीं वमन, विरेचन व नस्य घेतलें आहे ते, कास, श्वास, प्रमेह, अर्श, उचकी, आध्मान ( वायूनें पोट फुगणें ) बद्धोदर, क्षतोदर, जलोदर, कुष्ठ, मधुमेह व गुदद्वाराची सूज हे विकार ज्यांना झाले आहेत ते, ज्यांनीं नुकेंच भोजन केलें आहे व ज्यांच्या कोठ्यांत अल्प मल असतो ते व सात महिन्यांचे आंतील गरोदर स्त्री.

आस्थाप्या एव चान्वास्या विशेषादतिवह्नयः ॥ ६ ॥
रूक्षाः केवलवातार्ताः

जे निरूह बस्तीला योग्य आहेत त्यांनाच अनुवासन बस्तीहि द्यावा. ज्यांचा अग्नि अति तीक्ष्ण आहे व जे रूक्ष किंवा केवळ वातरोगानें पीडित आहेत, त्यांना तर तो विशेषेंकरून हितावह आहे.

नानुवास्यास्त एव च ।
येनास्थाप्यास्तथा पाण्डुकामलामेहपीनसाः ॥ ७ ॥
निरन्नप्लीहविड्भेदिगुरुकोष्ठकफोदराः ।
अभिष्यन्दिकृशस्थूलकृमिकोष्ठाढ्यमारुताः ॥ ८ ॥
पीते विषे गरेऽपच्यां श्लीपदी गलगण्डवान् ।

ज्यांना निरूह बस्ति योग्य नाहीं त्यांनाच अनुवासन बस्तीहि योग्य नाहीं. तसेंच पांडु, कावीळ, मेह, पीनस, प्लीहा, अतिसार, गुरुकोष्ठ ( आहारावांचूनहि पोट जड वाटणें ), कफोदर, अभिष्यंद, कृशता, स्थूलता, कृमि, ऊरुस्तंभ, विष, कृत्रिमविष, गंडमाळा, श्लीपद व गळगंड ह्या विकारांना व अनशपोटीं देण्यासहि तो योग्य नाहीं.

तयोस्तु नेत्रं हेमादिधातुदार्वस्थिवेणुजम् ॥ ९ ॥
गोपुच्छाकारमच्छिद्रं श्लक्ष्णर्जु गुलिकामुखम् ।

हें बस्तिद्वय देण्याची नलिका सुवर्णादि धातु, लांकूड, अस्थि किंवा वेळू यांची केलेली, गोपुच्छाकार, छिद्ररहित, गुळगुळीत, सरळ व गोल तोंडाची असावी.

ऊनेऽब्दे पञ्च पूर्णेऽस्मिन्नासप्तभ्योऽङ्गुलानि षट् ॥ १० ॥
सप्तमे सप्त तान्यष्टौ द्वादशे षोडशे नव ।
द्वादशैव परं विंशात्

त्या नलिकेचें प्रमाण एक वर्षाचे आंतील रोग्यास पांच अंगुलें, एका वर्षानंतर व सात वर्षांचे आंत सहा अंगुलें, सात वर्षांचे रोग्यास सात अंगुलें, बारा वर्षांचे रोग्यास आठ, सोळा वर्षांचे रोग्यास नऊ व वीस वर्षांपासून पुढें बारा अंगुलें असावें.

वीक्ष्य वर्षान्तरेषु च ॥ ११ ॥
वयोबलशरीराणि प्रमाणमभिवर्धयेत् ।

वरील वर्षांच्या मध्यंतरीं ( सातपासून बारा, बारापासून सोळा इ. ) वय, बल व शरीर लक्ष्यांत आणून नलिकेचें प्रमाण वाढवावें.

स्वाङ्गुष्ठेन समं मूले स्थौल्येनाग्रे कनिष्ठया ॥ १२ ॥

त्या नलिकेचें मूळ स्वांगुष्ठप्रमाण व टोंक कनिष्ठिकेइतकें जाड असावें.

पूर्णेऽब्देऽङ्गुलमादाय तदर्धार्धप्रवर्धितम् ।
त्र्यङ्गुलं परमं छिद्रं मूलेऽग्रे वहते तु यत् ॥ १३ ॥
मुद्गं माषं कलायं च क्लिन्नं कर्कन्धुकं क्रमात् ।

त्या नलिकेच्या छिद्राचा परिघ मूलस्थानीं एक वर्षाच्या वयास एक अंगुल प्रमाण असून पुढें ७ व्या, १२ व्या व १६ व्या वर्षी व त्याच्या पुढें २१ वर्षांपर्यंत दर वर्षास पाव पाव अंगुल वाढवीत जावें, म्हणजे एकविसाव्या वर्षी त्याची पूर्ण मर्यादा ( तीन अंगुलें ) होते. अग्रभागीं त्या छिद्राचा परिघ पहिल्या वर्षी मुगाएवढा, सातव्या वर्षी उडदाएवढा, बाराव्या वर्षी वाटाण्याएवढा, सोळाव्या वर्षी भिजलेल्या वाटाण्याएवढा व एकविसाव्या वर्षी रानबोराएवढा असावा.

मूलच्छिद्रप्रमाणेन प्रान्ते घटितकर्णिकम् ॥ १४ ॥
वर्त्याग्रे पिहितं मूले यथास्वं द्व्यङ्गुलान्तरम् ।
कर्णिकाद्वितयं नेत्रे कुर्यात्-

त्या नलिकेच्या टोंकाजवळ मूलछिद्राएवढी एक चाती केलेली असावी व तोंडांत वातीचा दट्ट्या बसविलेला असावा. नलिकेच्या मूळ भागीं रोग्याच्या दोन अंगुळांच्या अंतरानें दोन चात्या बसवाव्या.

तत्र च योजयेत् ॥ १५ ॥
अजाविमहिषादीनां बस्तिं सुमृदितं दृढम् ।
कषायरक्तं निश्छिद्रग्रन्थिगन्धशिरं तनुम् ॥ १६ ॥
ग्रथितं साधुसूत्रेण सुखसंस्थाप्यभेषजम् ।

त्या दोन चात्यांच्या योगानें त्या नलिकेला बकरा, मेंढा, रेडा इ० पशूंचा एक बस्ति ( मूत्राशय किंवा फुगा ) जोडावा. तो बस्ति तेल लावून चांगला कमावलेला, हरीतक्यादि कषायानें रंगविलेला, छिद्र, ग्रंथि, दुर्गंधि किंवा शिरा यांनीं रहित, पातळ व बळकट असून चांगल्या दोऱ्यानें शिवलेला व ज्यांत औषध चांगल्या रीतीनें घालतां येईल असा असावा.

बस्त्यभावेऽङ्कपादं वा न्यसेद्वासोऽथवा घनम् ॥ १७ ॥

बस्ति न मिळाल्यास त्याजबद्दल अजादि पशूंच्या पायाच्या किंवा मांडीच्या चामड्याचा किंवा दाट ( मेणकापड वगैरे ) कापडाचा उपयोग करावा.

निरूहमात्रा प्रथमे प्रकुञ्चो वत्सरात्परम् ।
प्रकुञ्चवृद्धिः प्रत्यब्दं यावत्षट्प्रसृतास्ततः ॥ १८ ॥
प्रसृतं वर्धयेदूर्ध्वं द्वादशाष्टादशस्य च ।
आसप्ततेरिदं मानं दशैव प्रसृताः परम् ॥ १९ ॥

निरूह बस्तीच्या औषधाचें प्रमाण पहिल्या वर्षी चार तोळे असून पुढें १२ वर्षांपर्यंत दर वर्षास चार तोळेप्रमाणें व पुढें १८ वर्षांपर्यंत दर वर्षास आठ तोळेप्रमाणें वाढवावें, म्हणजे १८ व्या वर्षी ९६ तोळ्यांचें ( सुमारें १। शेरांचें ) मान होतें व हें मान सत्तर वर्षांपर्यंत कायम राखून तदनंतर ८० तोळ्यांचेंच मान ठेवावें.

यथायथं निरूहस्य पादो मात्रानुवासने ।

अनुवासनाचें प्रमाण त्या त्या वयाला निरूह बस्तीच्या चतुर्थांश असावें.

आस्थाप्यं स्नेहितं स्विन्नं शुद्धं लब्धबलं पुनः ॥ २० ॥
अन्वासनार्हं विज्ञाय पूर्वमेवानुवासयेत् ।
शीते वसन्ते च दिवा रात्रौ केचित्ततोऽन्यदा ॥ २१ ॥
अभ्यक्तस्नातमुचितात्पादहीनं हितं लघु ।
अस्निग्धरूक्षमशितं सानुपानं द्रवादि च ॥ २२ ॥
कृतचङ्क्रमणं मुक्तविण्मूत्रं शयने सुखे ।

नात्युच्छ्रिते न चोच्छीर्षे संविष्टं वामपार्श्वतः ॥ २३ ॥
सङ्कोच्य दक्षिणं सक्थि प्रसार्य च ततोऽपरम् ।

ज्याला निरूह बस्ति द्यावयाचा असेल, त्याला पहिल्यानें स्नेहस्वेदविधिपूर्वक कोठा शुद्ध करून पुनः शक्ति आल्यावर प्रथमतः अनुवासनच द्यावें ( त्याला तें योग्य असल्यास ); तें अनुवासनच हिंवाळ्यांत व वसंतऋतूंत दिवसास द्यावें व इतर ऋतूंत ( कित्येक आचार्यांच्या मतें ) रात्रीस द्यावें. ( तें रात्रीं कधींहि देऊं नये असें धन्वंतरिमतानुयायी म्हणतात ). तें देण्यापूर्वी रोग्याला साभ्यंग स्नान घालून नित्यापेक्षां एक चतुर्थांश कमी, हितकर, लघु, अस्निग्ध व अरूक्ष असा आहार कालवणाशीं व इतर द्रव पदार्थांसह खावयास देऊन शतपावली व मलमूत्रोत्सर्ग करावयास सांगून फार उंच नव्हे अशा मऊ बिछान्यावर उशीवांचून डाव्या कुशीवर निजवावें. रोग्याची डावी मांडी पसरलेली व उजवी आकुंचित केलेली असावी.

अथास्य नेत्रं प्रणयेत्स्निग्धे स्निग्धमुखं गुदे ॥ २४ ॥
उच्छ्वास्य वस्तेर्वदने बद्धे हस्तमकम्पयन् ।
पृष्ठवंशं प्रति ततो नातिद्रुतविलम्बितम् ॥ २५ ॥
नातिवेगं न वा मन्दं सकृदेव प्रपीडयेत् ।

मग गुदद्वाराला व नळीच्या तोंडाला तेल लावून ती आंत घालावी. बस्तींतील हवा काढून टाकून त्याचें तोंड बंद केल्यावर ती नळी हात न कापूं देतां पाठीच्या कण्याच्या दिशेनें सारावी व मग मध्यम त्वरेनें व मध्यम जोरानें बस्ति एकदम पिळावा.

सावशेषं च कुर्वीत वायुः शेषे हि तिष्ठति ॥ २६ ॥

बस्तींत किंचित् औषध ( स्नेह ) शिल्लक राहूं द्यावें, कारण त्यांत ( अवशिष्ट भागांत ) वायूचा अंश असतो.

दत्ते तूत्तानदेहस्य पाणिना ताडयेत्स्फिजौ ।
तत्पार्ष्णिभ्यां तथा शय्यां पादतश्च त्रिरुत्क्षिपेत् ॥२७॥

रोग्याला उताणा निजवून बस्ति दिल्यास त्याच्या कुल्यावर हातांनीं व त्याच्या खोटांनीं तीनदां ताडण करावें. व पायांकडून हंतरूण तीन वेळ वर उचलावें.

ततः प्रसारिताङ्गस्य सोपधानस्य पार्ष्णिके ।
आहन्यान्मुष्टिनाऽङ्गं च स्नेहेनाभ्यज्य मर्दयेत् ॥ २८॥
वेदनार्तमिति स्नेहो न हि शीघ्रं निवर्तते ।
योज्यः शीघ्रं निवृत्तेऽन्यः स्नेहोऽतिष्ठन्नकार्यकृत् ॥२९॥

मग रोग्यास पाय पसरावयास सांगून उशी द्यावी व त्याच्या खोटांवर मुठींनीं ताडण करून तेल लावून तिडलेलें अंग रगडावें, तेणेंकरून स्नेह लवकर परत येत नाहीं. जर कदाचित् तो परत आलाच, तर पुनः दुसरा स्नेहबस्ति द्यावा; कारण स्नेह तेथें कांहीं वेळ न राहिल्यास त्याचें कार्य होत नाहीं.

दीप्ताग्निं त्वागतस्नेहं सायाह्ने भोजयेल्लघु ।



स्नेह परत आल्यावर रोग्याला क्षुद्बोध झाल्यास संध्याकाळीं हलकासा आहार द्यावा.

निवृत्तिकालः परमस्त्रयो यामास्ततःपरम् ॥ ३० ॥
अहोरात्रमुपेक्षेत परतः फलवर्तिभिः ।
तीक्ष्णैर्वा बस्तिभिः कुर्याद्यत्नं स्नेहनिवृत्तये ॥३१॥

स्नेह परत येण्याची अगदीं शेवटची मुदत तीन प्रहरांची. इतक्यांत न आल्यास एक अहोरात्र वाट पाहून मग तो परत आणण्याकरितां फळवर्ति, ( गेळफळ वगैरेंना लेप केलेली वात ) किंवा तीक्ष्ण औषधांची पिचकारी देऊन पहावी.

अतिरौक्ष्यादनागच्छन् न चेज्जाड्यादिदोषकृत् ।
उपेक्षेतैव हि ततोऽध्युषितश्च निशां पिबेत् ॥ ३२ ॥
प्रातर्नागरधान्याम्भः कोष्णं केवलमेव वा ।

इतकें करूनहि कोठ्याच्या अतिरूक्षतेमुळें तो परत नच आल्यास व त्यापासून जाडयादि विकार उद्भवले नसल्यास तो तसाच राहूं द्यावा व ती रात्र निघून गेल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं सुंठ व धणे यांचें पाणी किंवा नुसतें कोमट पाणी प्यावें.

अन्वासयेत्तृतीयेऽह्नि पञ्चमे वा पुनश्च तम् ॥ ३३ ॥
यथा वा स्नेहपक्तिः स्यादतोऽत्युल्बणमारुतान् ।
व्यायामनित्यान् दीप्ताग्नीन् रूक्षांश्च प्रतिवासरम् ३४

तदनंतर त्यास तिसरे किंवा पांचवे दिवशीं किंवा स्नेहपाक झाल्यावर पुनः अनुवासन द्यावें. ज्यांना वाताधिक्य व नित्य व्यायाम करण्याची संवय व ज्यांचा अग्नि प्रदीप्त व शरीर रूक्ष आहे त्यांना स्नेह लवकर पचतो. यास्तव त्यांना रोजच्या रोज सतत अनुवासन द्यावें.

इति स्नेहैस्त्रिचतुरैः स्निग्धे स्रोतोविशुद्धये ।
निरूहं शोधनं युञ्ज्यादस्निग्धं स्नेहनं तनोः ॥ ३५ ॥

याप्रमाणें तीन चार स्नेहबस्तींनीं कोठा स्निग्ध झाल्यावर तो शुद्ध करण्याकरितां शोधन औषधांचा निरूह बस्ति द्यावा. अनुवासन योग्य नसल्यामुळें स्नेहबस्तिद्वारां कोठा स्निग्ध केला नसल्यास शरीराला स्नेहन करावें ( स्नेहपानादिकांनीं ).

पञ्चमेऽथ तृतीये वा दिवसे साधके शुभे ।
मध्याह्ने किञ्चिदावृत्ते प्रयुक्ते बलिमङ्गले ॥ ३६ ॥
अभ्यक्तस्वेदितोत्सृष्टमलं नातिबुभुक्षितम् ।
अवेक्ष्य पुरुषं दोषभेषजादीनि चादरात् ॥ ३७ ॥
बस्तिं प्रकल्पयेद्वैद्यस्तद्विद्यैर्बहुभिः सह ।

मग पांचवे किंवा तिसरे दिवशीं ( तो दिवस शुभ व सिद्धिप्रद असावा ) दोन प्रहर उलटल्यावर कांहीं वेळानें मंगलबलिहरणादि क्रिया उरकून घेऊन व रोग्याला अभ्यंगपूर्वक स्वेदविधि करून, त्याला मलोत्सर्ग करावयास सांगावें व तो किंचित् बुभुक्षित झालासा पाहून व त्याची प्रकृति, दोष व औषधें इ० गोष्टी बारकाईनें लक्षांत

आणून वैद्यानें अनेक वैद्यशास्त्रज्ञ लोक मदतीस घेऊन बस्तीचा प्रयोग करावा.

क्राथयेद्विंशतिपलं द्रव्यस्याष्टौ फलानि च ॥ ३८ ॥

कल्पस्थानांत सांगितलेली निरूह बस्तीसंबंधी औषधें एक शेर व आठ गेळफळें घेऊन त्यांचा काढा करावा.

ततः क्राथाच्चतुर्थांशं स्नेहं वाते प्रकल्पयेत् ।
पित्ते स्वस्थे च षष्ठांशमष्टमांशं कफाधिके ॥ ३९ ॥

त्या काढ्यांत वातविकार असल्यास, त्याचा चवथा हिस्सा, पित्तविकार किंवा स्वस्थ प्रकृति असल्यास सहावा हिस्सा व कफाधिक्य असल्यास अष्टमांश स्नेह मिळवावा.

सर्वत्र चाष्टमं भागं कल्काद्भवति वा यथा ।
नात्यच्छसान्द्रता बस्तेः

औषधांचा कल्क सर्वत्र अष्टमांश घ्यावा किंवा बस्ति फार दाट किंवा फार स्वच्छ (पातळ) न होईल अशा बेतानें घ्यावा.

पलमात्रं गुडस्य च ॥ ४० ॥
मधुपट्वादिशेषं च युक्त्या

गूळ ४ तोळे व मध व सैंधव योग्य प्रमाणानें (मध १६ तोळे व सैंधव एक तोळा) घ्यावें; यवक्षार, मांसरस इ० द्रव्येंहि थोडीं थोडीं घ्यावीं.

सर्वं तदेकतः ।
उष्णाम्बुकुम्भीवाष्पेण ततं खजसमाहतम् ॥ ४१ ॥
प्रक्षिप्य वस्तौ प्रणयेत्पायौ नात्युष्णशीतलम् ।
नातिस्निग्धं न वा रूक्षं नातितीक्ष्णं न वा मृदु ॥ ४२ ॥
नात्यच्छसान्द्रं नो नातिमात्रं नापटु नाति च ।
लवणं तद्वदम्लं च

हे सर्व पदार्थ एकत्र मिसळून मडक्यांत तापविलेल्या पाण्याच्या वाफेनें किंचित् ऊन करून रवीनें घुसळून व बस्तींत भरून त्याची गुदद्वारांत पिचकारी द्यावी. त्या औषधाची उष्णता, स्निग्धता, रूक्षता, तीक्ष्णता, मृदुता, स्वच्छता (पातळपणा), सांद्रता (दाटपणा), इयत्ता, अम्लता व खारटपणा हे गुण मध्यम प्रमाणांत असावेत.

पठन्त्यन्ये तु तद्विदः ॥ ४३ ॥
मात्रां त्रिपलिकां कुर्यात्स्नेहमाक्षिकयोः पृथक् ।
कर्पार्धं माणिमन्थस्य स्वस्थे कल्कपलद्वयम् ॥ ४४ ॥
सर्वद्रवाणां शेषाणां पलानि दश कल्पयेत् ।
माक्षिकं लवणं स्नेहं कल्कं क्राथमिति क्रमात् ॥ ४५ ॥
आवपेत निरूहाणामेष संयोजने विधिः ।
उत्तानो दत्तमात्रे तु निरूहे तन्मना भवेत् ॥ ४६ ॥
कृतोपधानः सञ्जातवेगश्चोत्कटकः सृजेत् ।

कित्येक आचार्यांच्या मतें स्नेह व मध प्रत्येक १२ तोळे, सैंधव अर्धा तोळा, कल्क ८ तोळे (निरोगी मनुष्याला) व इतर सर्व द्रव पदार्थ ४० तोळे घ्यावे. ही निरूह बस्तीचीं औषधें एकत्र मिश्र करण्याचा क्रम असा कीं, पहिल्यानें एका भांड्यांत मध घालावा व मग सैंधव, स्नेह, कल्क व काढा यांचें अनुक्रमानें मिश्रण करावें. पिचकारी दिल्यावर वस्त्र नेसून व तिकडेच चित्त लावून उताणें निजावें व वेग आल्यावर उकिडवें बसून उत्सर्ग करावा.

आगतौ परमः कालो मुहूर्तो मृत्यवे परम् ॥ ४७ ॥
तत्रानुलोमिकं स्नेहक्षारमूत्राम्लकल्पितम् ।
त्वरितं स्निग्धतीक्ष्णोष्णं बस्तिमन्यं प्रपीडयेत् ॥ ४८ ॥
विदध्यात्फलवर्तिं वा स्वेदनोत्त्रासनादि च ।

पिचकारीचें औषध परत येण्याची परमावधि (शेवटची मुदत) म्हटली म्हणजे दोन घटका होय. याहून उशीर लागल्यास मरणच येतें. अशा स्थितींत आंतड्यांची क्रिया सुरू करण्याकरितां स्नेह, क्षार, गोमूत्र व अम्लद्रव्यें यांची स्निग्ध, तीक्ष्ण व उष्ण अशी दुसरी एक पिचकारी ताबडतोब द्यावी. तशीच एक फलवर्तिदि द्यावी, पोट शेकावें व एकदम भिवविणें वगैरे गोष्टींचा उपाय करावा.

स्वयमेव निवृत्ते तु द्वितीयो बस्तिरिष्यते ॥ ४९ ॥
तृतीयोऽपि चतुर्थोऽपि यावद्वा सुनिरूढता ।

पिचकारीचें औषध आपोआप परत आलें म्हणजे पुनः दुसरी, तिसरी, चवथी किंवा कोठा निर्दोष होण्याला जितक्या अवश्य असतील तितक्या पिचकाऱ्या द्याव्या.

विरिक्तवच्च योगादीन् विद्यात्

निरूहणक्रियेचा साम्ययोग, अतियोग व हीनयोग झाल्याचीं लक्षणें विरेचनाप्रमाणें जाणावीं.

योगे तु भोजयेत् ॥ ५० ॥
कोष्णेन वारिणा स्नातं तनुधन्वरसौदनम् ।

सम्यग्योग झाला म्हणजे रोग्याला कोमट पाण्यानें स्नान घालून जांगल पशूंच्या पातळ मांसरसामध्यें कालविलेला भात खावयास द्यावा.

विकारा ये निरूहस्य भवन्ति प्रचलैर्मलैः ॥ ५१ ॥
ते सुखोष्णाम्बुसिक्तस्य यान्ति भुक्तवतः शमम् ।

निरूह बस्तीच्या योगानें स्वस्थानांतून निघालेल्या दोषापासून जे विकार उत्पन्न होतात, ते सुखोष्ण पाण्याच्या स्नानानें व भोजनानें प्रशम पावतात,

अथ वातार्दितं भूयः सद्य एवानुवासयेत् ॥ ५२ ॥

मग वातविकार असल्यास पुनः त्याच दिवशीं अनुवासन द्यावें.

सम्यग्घीनातियोगाश्च तस्य स्युः स्नेहपीतवत् ।

अनुवासनाचा सम्यग्योग, अतियोग व हीनयोग झाल्याचीं लक्षणें स्नेहपानाच्या लक्षणांप्रमाणें समजावीं.

**किञ्चित्कालं स्थितो यश्च सपुरीषो निवर्तते ॥ ५३ ॥**
**सानुलोमानिलः स्नेहस्तत्सिद्धमनुवासनम् ।**

तसेंच जो अनुवासन बस्ति किंचित्कालपर्यंत राहून मल व अनुलोम वायु यांसह परत येतो, तो चांगला लागू पडला असें समजावें.

**एकं त्रीन् वा बलासे तु स्नेहबस्तीन्प्रकल्पयेत् ॥५४॥**
**पञ्च वा सप्त वा पित्ते नवैकादश वाऽनिले ।**
**पुनस्ततोऽप्ययुग्मांस्तु पुनरास्थापनं ततः ॥ ५५ ॥**

कफविकारावर एक किंवा तीन, पित्तावर पांच किंवा सात, वातावर नऊ किंवा अकरा स्नेहबस्तीचा उपयोग करावा व मध्यें एक वेळ निरूह बस्ति देऊन वरील विषम संख्येची पुनः आवृत्ति करावी.

**कफपित्तानिलेष्वन्नं यूषक्षीररसैः क्रमात् ।**

आस्थापन ( निरूहण ) विधीनंतर कफपित्तवातांवर अनुक्रमेंकरून कटाचें सार, दूध व मांसरस यांच्याशीं भात खाल्ला असतां तो पथ्यकारक होतो.

**वातघ्नौषधनिःक्वाथत्रिवृतासैन्धवैर्युतः ॥ ५६ ॥**
**बस्तिरेकोऽनिले स्निग्धः स्वाद्वम्लोष्णो रसान्वितः ।**

वातावर जो निरूह बस्ति देणें तो वातघ्न औषधांचा ऊन काढा, सैंधव, तेड, स्नेह व मधुर व अम्ल रस व मांसरस यांनीं युक्त करून द्यावा व असा बस्ति एकच द्यावा.

**न्यग्रोधादिगणक्वाथौ पत्रकादिसितायुतौ ॥ ५७ ॥**
**पित्ते स्वादुहिमौ साज्यक्षीरेक्षुरसमाक्षिकौ ।**

पित्तावर देणें ते न्यग्रोधादि गणाचा काढा, पत्रकादि गणांतील औषधें, तूप, दूध, उंसाचा रस, साखर व मध यांच्याशीं मिश्रण करून मधुर व शीत असे दोन बस्ति द्यावे.

**आरग्वधादिनिःक्वाथवत्सकादियुतास्त्रयः ॥ ५८ ॥**
**रूक्षाः सक्षौद्रगोमूत्रास्तीक्ष्णोष्णकटुकाः कफे ।**

कफावर आरग्वधादि गणांचा काढा, वत्सकादि गणांतील औषधें; मध व गोमूत्र यांच्याशीं मिश्र करून तीक्ष्ण, उष्ण, तिखट व रूक्ष असे तीन बस्ति द्यावे.

**त्रयश्च सन्निपातेऽपि दोषान् घ्नन्ति यतः क्रमात् ॥ ५९ ॥**

सन्निपातावर देखील वर सांगितलेलेच तीनहि बस्ति द्यावे; कारण ते वातपित्तकफांचा अनुक्रमेंकरून नाश करितात.

**त्रिभ्यः परं बस्तिमतो नेच्छन्त्यन्ये चिकित्सकाः ।**
**न हि दोषश्चतुर्थोऽस्ति पुनर्दीयेत यं प्रति ॥ ६० ॥**

यास्तव कांहीं वैद्य ह्या तीन प्रकारच्या बस्तीखेरीज चवथ्या बस्तीची जरूर नाहीं असें म्हणतात; कारण चवथा दोषच जर मुळीं नाहीं, तर चवथा बस्ति तरी पाहिजे कशाला ?

**उत्क्लेशनं शुद्धिकरं दोषाणां शमनं क्रमात् ।**
**त्रिधैवं कल्पयेद्बस्तिमित्यन्येऽपि प्रचक्षते ॥ ६१ ॥**

कित्येक असेंहि म्हणतात कीं, दोषांना स्वस्थानापासून सोडविणें ( उत्क्लेशन ), त्यांना बाहेर काढून टाकणें ( शोधन ) व त्यांचें शमन करणें ह्या तीन कार्यांकरितां प्रत्येक प्रसंगीं तीन बस्ति द्यावे.

**दोषौषधादिबलतः सर्वमेतत्प्रमाणयेत् ।**

सारांश हाच कीं, दोषांचें बळ व औषधांची शक्ति लक्षांत आणून जसें योग्य दिसेल तसें करावें.

**सम्यङ्निरूढलिङ्गं तु नासम्भाव्य निवर्तयेत् ॥ ६२ ॥**

व कांहीं असो, जोंपर्यंत निरूहण क्रियेचा सम्यग्योग झाला नाहीं, तोंपर्यंत बस्ति देणें बंद करूं नये.

**प्राक्स्नेह एकः पञ्चान्ते द्वादशास्थापनानि च ।**
**सान्वासनानि कर्मैवं बस्तयस्त्रिंशदीरिताः ॥ ६३ ॥**

पहिल्यानें एक स्नेहबस्ति, मध्यें पाळीपाळीनें १२ निरूह व अनुवासनें व शेवटीं पुनः पांच स्नेहबस्ति दिले म्हणजे बस्तिकर्म सिद्ध होतें, म्हणून अशा ह्या ३० बस्तींना कर्मबस्ति अशी संज्ञा आहे.

**कालः पञ्चदशैकोऽत्र प्राक् स्नेहोऽन्ते त्रयस्तथा ।**
**षट् पञ्चबस्त्यन्तरिताः**

पहिल्यानें एक स्नेहबस्ति, पुढें पांच निरूहांनीं अंतरित असे सहा स्नेहबस्ति* व शेवटीं पुनः ३ स्नेहबस्ति अशा ह्या १५ बस्तींना कालबस्ति अशी संज्ञा आहे.

**योगोऽष्टौ बस्तयोऽत्र तु ॥ ६४ ॥**
**त्रयो निरूहाः स्नेहाश्च स्नेहावाद्यन्तयोरुभौ ।**

पहिल्यानें एक स्नेहबस्ति, पुढें पाळीपाळीनें तीन निरूह व तीन स्नेहबस्ति व शेवटीं पुनः एक स्नेहबस्ति अशा ह्या आठ बस्तींना योगबस्ति अशी संज्ञा आहे.

**स्नेहबस्तिं निरूहं वा नैकमेवातिशीलयेत् ॥ ६५ ॥**
**उत्क्लेशाग्निवधौ स्नेहान्निरूहान्मरुतो भयम् ।**

केवल स्नेहबस्तींचा किंवा केवल निरूह बस्तींचा अतिशय उपयोग कधींहि करूं नये. स्नेहबस्तीच्या अतिसेवनापासून मळमळणें व अग्निमांद्य हे विकार होतात व निरूहबस्तींच्या अतिसेवनापासून वातप्रकोपाची भीति असते.

**तस्मान्निरूढः स्नेह्यः स्यान्निरूह्यश्चानुवासितः ॥ ६६ ॥**

म्हणून निरूहबस्ति दिलेल्या मनुष्याला स्नेहबस्ति द्यावा व अनुवासिताला निरूहण द्यावें.

**स्नेहशोधनयुक्त्यैवं बस्तिकर्म त्रिदोषजित् ।**

याप्रमाणें स्नेहनशोधनांची एकामागून एक योजना केल्यानें बस्तिकर्म त्रिदोषहारक होतें.

**ह्रस्वया स्नेहपानस्य मात्रया योजितः समः ॥ ६७ ॥**
**मात्राबस्तिः स्मृतः स्नेहः**

---

* म्हणजे पहिल्यानें एक स्नेहबस्ति, मध्यें एक निरूह, पुनः स्नेहबस्ति, पुनः निरूह याप्रमाणें दोन्ही मिळून ११ बस्ति ( स्नेह ६ व निरूह ५ ).

स्नेहपानाचें जें कनिष्ठ प्रमाण तितक्या मानानें जी स्नेहाची पिचकारी देणें, त्याला मात्राबस्ति अशी संज्ञा आहे.

शीलनीयः सदा च सः ।
बालवृद्धाध्वभारस्त्रीव्यायामासक्तचिन्तकैः ॥ ६८ ॥
वातभग्नाबलाल्पाग्निनृपेश्वरसुखात्मभिः ।
दोषघ्नो निष्परीहारो बल्यः सृष्टमलः सुखः ॥ ६९ ॥

तो दोषघ्न, बलप्रद, मलशुद्धिकर, अनायासानें सेवन करण्याजोगा व बिनपथ्याचा; असल्यामुळें बाल, वृद्ध, ओझें वाहणारे, प्रवासी, स्त्रीरत, व्यायामशील, चिंताग्रस्त, वातरोग व अस्थिभंग, यांच्या योगानें अशक्त झालेले, मंदाग्नि, सुखी, राजे व श्रीमान् लोक यांनीं त्याचा नेहमीं उपयोग करावा.

वस्तौ रोगेषु नारीणां योनिगर्भाशयेषु च ।
द्वित्रास्थापनशुद्धेभ्यो विदध्याद्बस्तिमुत्तरम् ॥ ७० ॥

पुरुषांच्या मूत्राशयाच्या रोगामध्यें व स्त्रियांच्या मूत्राशयासंबंधीं व योनिगर्भाशयासंबंधीं रोगांमध्यें उत्तरबस्तीचा उपयोग करावा व तो देण्यापूर्वी दोन तीन निरूहबस्ति देऊन कोठा शुद्ध करावा.

आतुराङ्गुलमानेन तन्नेत्रं द्वादशाङ्गुलम् ।
वृत्तं गोपुच्छवन्मूलमध्ययोः कृतकर्णिकम् ॥ ७१ ॥
सिद्धार्थकप्रवेशाग्रं श्लक्ष्णं हेमादिसम्भवम् ।
कुन्दाश्वमारसुमनःपुष्पवृन्तोपमं दृढम् ॥ ७२ ॥

उत्तरबस्तीची नळी रोग्याच्या बोटाच्या मानानें १२ अंगुलें लांब, गोपुच्छाकार व गोल तोंडाची असावी व तिच्या मूळभागीं व मध्यभागीं एकेक चर्की बसविलेली असावी. ती गुळगुळीत, सुवर्णादि धातूंची केलेली, कुंद, कणेर किंवा जाई यांच्या फुलांच्या देंठाएवढी व मजबूत असून तिचें तोंड एक शिरसाचा दाणा मावण्याजोगें असावें.

तस्य बस्तिर्मृदुर्लघुर्मात्रा शुक्तिर्विकल्प्य वा ।

त्या नळीला जो बस्ति जोडावयाचा तो लहानसा व नाजूक असून औषधाचें मान दोन तोळे किंवा वयादिकांच्या अनुरोधानें किंचित् कमी किंवा जास्त असावें.

अथ स्नाताशितस्यास्य स्नेहबस्तिविधानतः ॥ ७३ ॥
ऋजोः सुखोपविष्टस्य पीठे जानुसमे मृदौ ।
हृष्टे मेढ्रे स्थिते चर्जौ शनैः स्रोतोविशुद्धये ॥ ७४ ॥
सूक्ष्मां शलाकां प्रणयेत्तया शुद्धेऽनुसेवनीम् ।
आमेहनान्तं नेत्रं च निष्कम्पं गुदवत्ततः ॥ ७५ ॥
पीडितेऽन्तर्गते स्नेहे स्नेहबस्तिक्रमो हितः ।

त्याचा विधि येणेंप्रमाणें:-रोग्याला स्नान व स्नेहबस्तिविधींत सांगितल्याप्रमाणें भोजन घालून एका गुडघ्याइतक्या उंच व मृदु कोचावर सरळ व सुखानें बसवावें; मग शिश्न उठलें म्हणजे तें सरळ धरून त्यांत पहिल्यानें मार्ग शुद्धयर्थ एक बारीक सळई हळूच घालावी. शलाकेनें मार्ग साफ झाल्यावर, बस्तीची नळी सेवनीला अनुलक्षून शिश्नमूलापर्यंत गुदबस्तीप्रमाणेंच निष्कंप घालावी. मग पिचकारी दाबून आंत स्नेह घातल्यावर स्नेहबस्तींत सांगितल्याप्रमाणें क्रम सुरू ठेवावा.

बस्तीननेन विधिना दद्यात्त्रींश्चतुरोऽपि वा ॥ ७६ ॥
अनुवासनवच्छेषं सर्वमेवास्य चिन्तयेत् ।

ह्या विधीनें तीन किंवा चार बस्ति देऊन इतर व्यवस्था अनुवासनाप्रमाणें ठेवावी.

स्त्रीणामार्तवकाले तु योनिर्गृह्णात्यपावृतः ॥ ७७ ॥
विदधीत तदा तस्मादनृतावपि चात्यये ।
योनिविभ्रंशशूलेषु योनिव्यापदसृग्दरे ॥ ७८ ॥

स्त्रियांच्या गर्भाशयाचें द्वार आर्तवकालीं मात्र (विटाळाच्या चवथ्या दिवसापासून सोळाव्या दिवसापर्यंत उघडें व म्हणूनच स्नेह ग्रहण करण्यास योग्य असतें, म्हणून ह्याच कालामध्यें त्यांना उत्तरबस्ति द्यावा; परंतु योनिभ्रंश, योनिशूल, शास्त्रोक्त योनिरोग, प्रदर वगैरे दारुण प्रसंगीं ऋतुसमय नसतांनाहि तो देण्यास हरकत नाहीं.

नेत्रं दशाङ्गुलं मुद्गप्रवेशं चतुरङ्गुलम् ।
अपत्यमार्गे योज्यं स्याद्द्व्यङ्गुलं मूत्रवर्त्मनि ॥ ७९ ॥
मूत्रकृच्छ्रविकारेषु बालानां त्वेकमङ्गुलम् ।

स्त्रियांच्या उत्तरबस्तीची नळी दहा अंगुलें लांब असून तिचें तोंड एक मुगाचा दाणा मावण्याजोगें असावें व ती प्रौढ स्त्रियांच्या योनिद्वारांत चार बोटें व मूत्रकृच्छ्रादि विकारामध्यें मूत्रद्वारांत दोन बोटें घालावी. मुलीच्या मूत्रद्वारांत घालणें झाल्यास ती एकच बोट घालावी. (मुलीच्या योनिद्वारांत उत्तरबस्तीचा उपयोग करण्याचें मुळींच कारण नाहीं.)

प्रकुञ्चो मध्यमा मात्रा बालानां शुक्तिरेव तु ॥ ८० ॥

प्रौढ स्त्रियांना उत्तरबस्ति देण्याचें मध्यम मान चार तोळे व मुलींना दोन तोळे जाणावें.

उत्तानायाः शयानायाः सम्यक् सङ्कोच्य सक्थिनी ।
ऊर्ध्वजान्वास्त्रिचतुरानहोरात्रेण योजयेत् ॥ ८१ ॥
बस्तींस्त्रिरात्रमेवं च स्नेहमात्रां विवर्धयेत् ।

ज्या स्त्रीस तो द्यावयाचा असेल, तिला गुडघे वर करून व मांड्या आकुंचित करून उताणी निजवावी व मग पिचकारी द्यावी. एका अहोरात्रींत तीनचार पिचकाऱ्या द्याव्या. याप्रमाणें तीन दिवस करावें. रोजच्या रोज स्नेहाचें प्रमाण वाढवावें.

त्र्यहमेवं च विश्रम्य प्रणिदध्यात्पुनस्त्र्यहम् ॥ ८२ ॥

व तीन दिवस सोडून पुनः तीन दिवस करावें.

पक्षाद्विरेको वमिते ततः पक्षान्निरूहणम् ।
सद्यो निरूढश्चान्वास्यः सप्तरात्राद्विरेचितः ॥ ८३ ॥

वमन दिल्यापासून पंधरा दिवसांनीं विरेचन व विरेचनापासून

पंधरा दिवसांनीं निरूहण द्यावें. निरूहण होतांच अनुवासन लागलेंच द्यावें व विरेचनानंतर सात दिवसांनीं द्यावें.

**यथा कुसुम्भादियुतात्तोयाद्रागं हरेत्पटः।**
**तथा द्रवीकृताद्देहाद्वस्तिर्निर्हरते मलान् ॥ ८४ ॥**

कुसुंबा वगैरेंच्या पाण्यापासून जसें वस्त्र रंजक द्रव्य मात्र आकर्षण करून घेतें, तसा बस्ति स्नेहस्वेदादिकांनीं द्रवीकृत जो देह, त्याजपासून फक्त दोषांना आकर्षण करून घेतो ( धातूंना इजा करीत नाहीं ).

**शाखागताः कोष्ठगताश्च रोगामर्मोर्ध्वसर्वावयवाङ्गजाश्च ये सन्ति तेषां न तु कश्चिदन्यो वायोः परं जन्मनि हेतुरस्ति**

शाखागत, कोष्ठगत, मर्मगत, ऊर्ध्वजत्रुगत व सर्वांगव्यापक असे जे रोग त्यांच्या उत्पत्तीला वायु जितका कारणीभूत आहे तितकें दुसरें कांहींच नाहीं.

**विट्श्लेष्मपित्तादिमलाचयानां विक्षेपसंहारकरः स यस्मात्।**
**तस्यातिवृद्धस्य शमाय नान्यद्बस्तेर्विना भेषजमस्ति किञ्चित् ॥ ८६ ॥**

कारण मल, मूत्र, कफ, पित्त इत्यादि दोषांचे जे संचय त्यांचें जें चलनवलन किंवा एकाच ठिकाणीं कोंडून राहणें, ह्या क्रिया त्याजवरच अवलंबून आहेत. असा जो वायु तो अतिशय वृद्धिंगत झाला असतां, त्याला शमविण्याकरितां बस्तीवांचून दुसरें कोणतेंच औषध नाहीं.

**तस्माच्चिकित्सार्ध इति प्रदिष्टः कृत्स्ना चिकित्सापि च बस्तिरेकैः।**
**तथा निजागन्तुविकारकारिरक्तौषधत्वेन शिराव्यधोऽपि ॥ ८७ ॥**

यास्तव बस्तीला कोणी कोणी अर्धी वैद्यक्रिया असें म्हणतात व कित्येकांच्या मतें तर सर्वच चिकित्सा बस्तीमध्यें येते. हाच सिद्धान्त निजागंतु विकाराला कारणीभूत जें रक्त त्याचें शोधन करणारा जो शिराव्यध त्यालाहि लागू आहे.

---

# विंशोऽध्यायः

## अध्याय २० वा.

## अथातो नस्यविधिमध्यायं व्याख्यास्यामः

आतां नस्यविधीचा अध्याय सांगतों.

**ऊर्ध्वजत्रुविकारेषु विशेषान्नस्यमिष्यते।**
**नासा हि शिरसो द्वारं तेन तद्व्याप्य हन्ति तान् ॥ १ ॥**

ऊर्ध्वजत्रुगतविकारांमध्यें नस्याचा विशेषेंकरून उपयोग होतो. नाक हें शिरोद्वार होय. तद्द्वारां दिलेलें औषध शिरःसंबंधीं सर्व भागांत पसरून तेथील रोगांना नाश करितें.

**विरेचनं बृंहणं च शमनं च त्रिधाऽपि तत्।**

विरेचन, बृंहण व शमन या भेदेंकरून नस्य तीन प्रकारचें.

**विरेचनं शिरःशूलजाड्यस्यन्दगलामये ॥ २ ॥**
**शोफगण्डकृमिग्रन्थिकुष्ठापस्मारपीनसे।**

विरेचननस्य शिरःशूल, डोकें जड होणें, अभिष्यंद, गलरोग, सूज, गलगंड, कृमि ( नाकांतील किंवा डोक्यांतील ), ग्रंथि, कुष्ठ, अपस्मार व पडसें ह्या विकारांवर चालतें.

**बृंहणं वातजे शूले सूर्यावर्ते स्वरक्षये ॥ ३ ॥**
**नासास्यशोषे वाक्सङ्गे कृच्छ्रबोधेऽवबाहुके।**

बृंहणनस्य वातजन्य शूल, सूर्यावर्त, स्वरक्षय, नाकाची व तोंडाची कोरड, वाचा बंद होणें, कृच्छ्रोन्मीलन व अवबाहुक ह्या विकारांवर चालतें.

**शमनं नीलिकाव्यङ्गकेशदोषाक्षिराजिषु ॥ ४ ॥**

शमननस्य तीळ, वांग, केशविकार ( केंस गळणें इ० ) व डोळ्याच्या शिरा मोठ्या होणें ह्या विकारांवर चालतें.

**यथास्वं यौगिकैः स्नेहैर्यथास्वं च प्रसाधितैः।**
**कल्कक्काथादिभिश्चाद्यं मधुपट्वासवैरपि ॥ ५ ॥**

त्या त्या दोषाला अनुरूप व यथायोग्य औषधांनीं सिद्ध केलेले स्नेह, विविध कल्क, क्वाथ, चूर्णें, मध, सैंधव व आसवें विरेचननस्याचे उपयोगी पडतात.

**बृंहणं धन्वमांसोत्थरसासृक्खपुरैरपि।**
**शमनं योजयेत्पूर्वैः क्षीरेण च जलेन च ॥ ६ ॥**

जांगल मांसाचा रस ( सुरवा ), जांगल पशूचें रक्त व साळ्यी वृक्षाचा निर्यास हे पदार्थ बृंहणनस्याच्या उपयोगीं पडतात. शमननस्य देणें तें वरील सर्वांचा दुधाबरोबर व पाण्याबरोबर योग करून द्यावें.

**मर्शश्च प्रतिमर्शश्च द्विधा स्नेहोऽत्र मात्रया।**

मर्श व प्रतिमर्श असे स्नेहनस्यामध्यें दोन भेद आहेत. ते मात्रेच्या ( प्रमाणाच्या ) न्यूनाधिक्यावर अवलंबून आहेत.

**कल्काद्यैरवपीडस्तु तीक्ष्णैर्मूर्धविरेचनः ॥ ७ ॥**

तीक्ष्ण कल्कादिकांनीं जें नस्य द्यावयाचें त्याला अवपीड किंवा मूर्धविरेचन अशी संज्ञा आहे.

**ध्मानं विरेचनश्चूर्णो**

तें मूर्धविरेचन चूर्णाचे रूपानें असल्यास त्याला ध्मान किंवा प्रध्मान अशी संज्ञा आहे.

**युञ्ज्यात्तं मुखवायुना।**
**षडङ्गुलद्विमुखया नाड्या भेषजगर्भया ॥ ८ ॥**
**स हि भूरितरं दोषं चूर्णत्वादपकर्षति।**

तें देणें झाल्यास एक सहा बोटें लांबीची आरपार नळी घेऊन

तींत औषध भरून तें नाकांत फुंकावें. हें नस्य चूर्णरूपी असल्यामुळें तें दोषांना सपाटून काढून टाकितें.

प्रदेशिन्यङ्गुलीपर्वद्वयान्मग्नसमुद्धतात् ॥ ९ ॥
यावत्पतत्यसौ बिन्दुर्दशाष्टौ षट् क्रमेण ते ।
मर्शस्योत्कृष्टमध्योना मात्रास्ता एव च क्रमात् ॥ १० ॥
बिन्दुद्वयोनाः कल्कादेः

तर्जनीचीं दोन पेरें बुचकळून (स्नेहादिकांत) काढल्यावर जें परिमाण खालीं पडतें, त्याला बिंदु अशी संज्ञा आहे. असे १०, ८ व ६ बिंदु मर्शाख्य नस्याचें अनुक्रमेंकरून उत्तम, मध्यम व कनिष्ठ प्रमाण होय. त्यांतच दोन वजा केले असतां कल्कादिकाचें प्रमाण होतें.

योजयेन्न तु नावनम् ।
तोयमद्यगरस्नेहपीतानां पातुमिच्छताम् ॥ ११ ॥
भुक्तभक्ताशिरःस्नातस्नातुकामस्रुतासृजाम् ।
नवपीनसवेगार्तसूतिकाश्वासकासिनाम् ॥ १२ ॥
शुद्धानां दत्तबस्तीनां तथानार्तवदुर्दिने ।
अन्यत्रात्ययिकाद्व्याधेः

ज्यांनीं पाणी, मद्य, विष व स्नेह यांचें पान केलें आहे किंवा करावयाचें योजिलें आहे, ज्यांनीं भात खाल्ला आहे, डोक्यावरून स्नान केलें आहे, किंवा ज्यांना तें करावयाचें आहे, ज्यांचें रक्त काढिलें आहे, ज्यांना शोधन किंवा बस्ति दिला आहे, किंवा मलादिकांचा वेग प्राप्त झाला आहे, ज्यांना नवीन पडसें, श्वास व खोकला हे विकार झाले आहेत, त्यांना व प्रसूत झालेल्या स्त्रियांना नस्य देऊं नये. तसेंच अकालीं अभ्र आलें असतां त्या दिवशींहि तें देऊं नये. दारुण व्याधीच्या प्रसंगीं मात्र हा नियम लागू नाहीं.

अथ नस्यं प्रयोजयेत् ॥ १३ ॥
प्रातः श्लेष्माणि मध्याह्ने पित्ते सायंनिशोश्चले ।

नस्य देणें तें कफविकारावर प्रातःकालीं, पित्तावर दुपारीं व वातावर संध्याकाळीं व रात्रीं द्यावें.

स्वस्थवृत्ते तु पूर्वाह्णे शरत्कालवसन्तयोः ॥ १४ ॥
शीते मध्यन्दिने ग्रीष्मे सायं वर्षासु सातपे ।

निरोगी मनुष्यास तें देणें झाल्यास शरदृतूंत व वसंतऋतूंत सकाळीं, हिंवाळ्यांत दुपारीं, ग्रीष्मऋतूंत संध्याकाळीं व वर्षाऋतूंत ज्या दिवशीं ऊन पडलें असेल त्या दिवशीं द्यावें.

वाताभिभूते शिरसि हिध्मायामपतानके ॥ १५ ॥
मन्यास्तम्भे स्वरभ्रंशे सायम्प्रातर्दिनेदिने ।
एकाहान्तरमन्यत्र सप्ताहं च तदाचरेत् ॥ १६ ॥

वातजन्य शिरोरोग, उचकी, अपतानक (एक वातरोग), मन्यास्तंभ व स्वरभ्रंश ह्या विकारांवर प्रतिदिवशीं सकाळीं व संध्याकाळीं नस्य द्यावें व इतर विकारांवर एका दिवसाचे अंतरानें द्यावें. नस्य देण्याची मर्यादा सात दिवसपर्यंत जाणावी.

स्निग्धस्विन्नोत्तमाङ्गस्य प्राक्कृतावश्यकस्य च ।
निवातशयनस्थस्य जत्रूर्ध्वं स्वेदयेत्पुनः ॥ १७ ॥

तें द्यावयाचे पूर्वी रोग्याला मलोत्सर्गादि अवश्य क्रिया करावयास सांगून व शिरोभागाला स्नेहस्वेदविधि करून, त्याला निवांतस्थलीं एका अंथरुणावर निजवावें. नस्य दिल्यावर कंठावर पुनः शेकावें.

अथोत्तानर्जुदेहस्य पाणिपादे प्रसारिते ।
किञ्चिदुन्नतपादस्य किञ्चिन्मूर्धनि नामिते ॥ १८ ॥
नासापुटं पिधायैकं पर्यायेण निषेचयेत् ।
उष्णाम्बुतप्तं भेषज्यं प्रनाड्या पिचुनाऽथवा ॥ १९ ॥

तें देण्याची रीति अशी कीं, रोग्याला उताणा सरळ निजवून, हातपाय पसरून, पायाचा झोंक किंचित् वर व डोक्याचा किंचित् खालीं करवून, पाळीपाळीनें एक नाकपुडी बंद करून दुसरींत ऊन पाण्यानें तापविलेलें औषध नळीनें किंवा बोळ्यानें सोडावें.

दत्ते पादतलस्कन्धहस्तकर्णादि मर्दयेत् ।

नस्य दिल्यावर तळपाय, हात, खांदे, कर्ण इत्यादि भागांना मर्दन करावें.

शनैरुच्छिद्य निष्ठीवेत्पार्श्वयोरुभयोस्ततः ॥ २० ॥

नंतर हळू हळू दोन्ही नाकपुड्यांनीं श्वास वर ओढून घशांत आलेला रस थुंकून टाकावा.

आभेषजक्षयादेवं द्विस्त्रिर्वा नस्यमाचरेत् ।

याप्रमाणें सर्व औषध संपेतोंपर्यंत दोन तीन वेळां नस्य द्यावें.

मूर्च्छायां शीततोयेन सिञ्चेत् परिहरञ् शिरः ॥ २१ ॥

मूर्च्छा आल्यास अंगावर थंड पाणी शिंपडावें (डोक्यावर शिंपडूं नये.)

स्नेहं विरेचनस्यान्ते दद्याद्दोषाद्यपेक्षया ।

नाक वहाणें बंद झाल्यावर त्या त्या दोषाप्रमाणें एखाद्या स्नेहाचें नस्य द्यावें.

नस्यान्ते वाक्शतं तिष्ठेदुत्तानः

नस्य दिल्यावर सुमारें दीड मिनिट उताणें निजावें (रोग्यानें).

धारयेत्ततः ॥ २२ ॥
धूमं पीत्वा कवोष्णाम्बुकवलान् कण्ठशुद्धये ।

नंतर धूम्रपान करून कंठशुद्ध्यर्थ कोमट पाण्याच्या गुळण्या कराव्या.

सम्यक्स्निग्धे सुखोच्छ्वासस्वप्नबोधाक्षपाटवम् । २३ ।

शिरोभाग (स्नेहनस्यानें) चांगल्या रीतीनें स्निग्ध झाला म्हणजे श्वासोच्छ्वास साफ चालतो, पापण्यांची उघडझांक चांगल्या रीतीनें करतां येते व इंद्रियें बळकट होतात.

रूक्षेऽक्षिस्तब्धता शोषो नासास्ये मूर्धशून्यता ।

स्नेहकार्य व्हावें त्याहून कमी झाल्यास पापण्या जड होतात, नाकाला व तोंडाला कोरड पडते व डोकें हलकें होतें.

स्निग्धेऽतिकण्डूगुरुताप्रसेकारुचिपीनसाः ॥ १४ ॥

स्नेहनस्याचा अतिरेक झाल्यास कंडू, जाड्य, लालास्राव, अरुचि व पीनस हे विकार उत्पन्न होतात.

सुविरिक्तेऽक्षिलघुतास्वरवक्त्रविशुद्धयः ।

मूर्धविरेचन व्हावें तसें झालें म्हणजे डोळ्यांचें जडत्व नाहींसें होतें व स्वराला व तोंडाला शुद्धता येते.

दुर्विरिक्ते गदोद्रेकः क्षामताऽतिविरेचिते ॥ १५ ॥

तें अर्धवट लागू झाल्यास रोग वाढतो व त्याचा अतिरेक झाल्यास कृशत्व येतें.

प्रतिमर्शः क्षतक्षामबालवृद्धसुखात्मसु ।

प्रयोज्योऽकालवर्षेऽपि

क्षतपीडित, कृश, बाल, वृद्ध व सुखी लोक यांना प्रतिमर्श नांवाचें नस्य द्यावें. अकाल वृष्टीच्या दिवशींहि तें देण्यास हरकत नाहीं, (अल्प प्रमाणाचें जें स्नेहनस्य त्याला प्रतिमर्श म्हणतात.)

न त्विष्टो दुष्टपीनसे ॥ १६ ॥

मद्यपीते बलश्रोत्रे कृमिदूषितमूर्धनि ।

उत्क्लिष्टोत्क्लिष्टदोषे च हीनमात्रतया हि सः ॥ १७ ॥

परंतु दुष्टपीनस, श्रवणदौर्बल्य व कृमिजन्य शिरोरोग, हे विकार ज्यांस आहेत व ज्यांनीं मद्यपान केलें आहे व ज्यांचे दोष वृद्धिंगत झाले आहेत किंवा स्वस्थानापासून निघाले आहेत, त्यांना तें देऊं नये; कारण त्याचें प्रमाण लहान (दोन बिंदूंचें) असल्यामुळें दोषांचें शमन न होतां ते वाढण्याचा मात्र संभव आहे.

निशाहर्भुक्तवान्ताहःस्वप्नाध्वश्रमरेतसाम् ।

शिरोभ्यञ्जनगण्डूषप्रस्रावाञ्जनवर्चसाम् ॥ १८ ॥

दन्तकाष्ठस्य हास्यस्य योज्योऽन्तेऽसौ द्विबिन्दुकः ।

सकाळीं, संध्याकाळीं, जेवण व वांति झाल्यानंतर, दिवसां निजून उठल्यावर व प्रवास, श्रम, मैथुन, शिरोऽभ्यंग, गुळण्या, मूत्रोत्सर्ग, अंजन, मलोत्सर्ग, दंतधावन व हास्य ह्या क्रियांनंतर हें द्विबिंदुक स्नेहनस्य सेवन करावें.

पञ्चसु स्रोतसां शुद्धिः क्लमनाशस्त्रिषु क्रमात् ॥ १९ ॥

दृग्बलं पञ्चसु ततो दन्तदार्ढ्यं मरुच्छमः ।

वरील पंधरांपैकीं पहिल्या पांच प्रसंगीं त्याच्या योगानें स्रोतसांची शुद्धि होते. त्याच्या पुढील तीन प्रसंगीं श्रमपरिहार होतो. शिरोऽभ्यंगादि पांच प्रसंगीं दृष्टि बळकट होते. दंतधावनावर त्याचा उपयोग केल्यानें दांत बळकट होतात व हास्यानंतर तें सेवन केलें असतां वातोपशम होतो.

न नस्यमूनसप्ताब्दे नातीताशीतिवत्सरे ॥ २० ॥

न चोनाष्टादशे धूमः कवलो नोनपञ्चमे ।

न शुद्धिरूनदशमे न चातिक्रान्तसप्ततौ ॥ २१ ॥

सात वर्षांच्या पूर्वीं व ऐंशी वर्षांनंतर नस्य देऊं नये. अठरा वर्षांचे पूर्वीं धूम्रपान करूं नये. पांच वर्षांच्या पूर्वीं गुळण्यांचा उपयोग करूं नये. दहा वर्षांच्या आंत व सत्तर वर्षांनंतर वमनविरेचन देऊं नये.

आजन्ममरणं शस्तः प्रतिमर्शस्तु बस्तिवत् ।

मर्शवच्च गुणान् कुर्यात्स हि नित्योपसेवनात् । ३२ ।

न चात्र यन्त्रणा नापि व्यापद्भ्यो मर्शवद्भयम् ।

प्रतिमर्शनस्य बस्तीप्रमाणेंच आजन्ममरण हितकारक होय. त्याचा नित्य उपयोग केल्यानें त्याचे गुण मर्शनस्याप्रमाणेंच होतात व मर्शनस्याप्रमाणेंच त्याला पथ्यहि नाहीं व त्याच्या उपयोगापासून तसा अपायहि होत नाही.

तैलमेव च नस्यार्थे नित्याभ्यासेन शस्यते ॥ ३३ ॥

शिरसः श्लेष्मधामत्वात्स्नेहाः स्वस्थस्य नेतरे ।

निरोगी मनुष्यानें नेहमींच्या नस्यांत तेलाचा उपयोग करावा, इतर स्नेहांचा करूं नये. कारण शिर हें कफस्थान असल्यामुळें त्याचे योगानें कदाचित् कफवृद्धि होईल.

आशुकृच्चिरकारित्वं गुणोत्कर्षापकृष्टता ॥ ३४ ॥

मर्शे च प्रतिमर्शे च विशेषो न भवेद्यदि ।

को मर्शं सपरीहारं सापदं च भजेत्ततः ॥ ३५ ॥

अच्छपानविचाराख्यौ कुटीवातातपस्थिती ।

अन्वासमात्राबस्ती च तद्वदेव च निर्दिशेत् ॥ ३६ ॥

मर्श व प्रतिमर्श नस्यांमध्यें भेद इतकाच कीं, एक तत्काल लागू होऊन पुष्कळ गुण देतो व दुसरा उशीरानें लागू होऊन अल्प गुण देतो. असें नसतें तर पथ्य संभाळून व अपाय होण्याची भीति बाळगून प्रतिमर्शाबद्दल मर्शाचा उपयोग कोण करील? शुद्धस्नेहपान व विचारणाख्य स्नेहपान, कुटीप्रावेशिक रसायन व वातातपिक रसायन व अन्वासनबस्ति व मात्राबस्ति ह्या दोहों दोहोंमध्येंहि तोच भेद आहे.

जीवन्तीजलदेवदारुजलदत्वक्सेव्यगोपीहिमम्

दार्वीत्वङ्मधुकप्लवागुरुवरापुण्ड्राह्वबिल्वोत्पलम् ।

धावन्यौ सुरभिं स्थिरे कृमिहरं पत्रं त्रुटिं रेणुकम्

किञ्जल्कं कमलाह्वयं शतगुणे दिव्येऽम्भसि क्वाथयेत्

तैलाद्रसं दशगुणं परिशेष्य तेन

तैलं पचेच्च सलिलेन दशैव वारान् ।

पाके क्षिपेच्च दशमे सममाजदुग्धं

नस्यं महागुणमुशन्त्यणुतैलमेतत् ॥ ३८ ॥

जीवंती, वाळा, देवदार, नागरमोथा, दालचिनी, काळावाळा, उपलसरी, चंदन, दारुहळद, तालीसपत्र, ज्येष्ठीमध, क्षुद्रमुस्ता, अगुरु, त्रिफळा, कमल, बालबिल्व, निळें कमळ, रिंगणी, डोरली, रास्ना, सालवण, पिठवण, वावडिंग, तमालपत्र, एलची, रेणुकबीज, नागकेसर व पद्मकेसर हीं औषधें समभाग व सर्वांच्या शंभरपट पावसाचें पाणी घेऊन त्याचा अष्टमांश काढा करावा. त्यांत दशांश तेल घालून पाणी आटेतोंपर्यंत कढवावें. याप्रमाणें तेंच तेल निरनिराळ्या

काढ्यांत दहा वेळां सिद्ध करून पुनः तितक्याच-( तेलाइतक्याच ) शेळीच्या दुधाबरोबर कढवून सिद्ध करावें, याप्रमाणें तयार केलेल्या ह्या तेलाला अणुतैल अशी संज्ञा आहे. हें नस्यकर्मामध्यें फार गुणकारक आहे.

घनोन्नतप्रसन्नत्वक्स्कन्धग्रीवास्यवक्षसः ।
दृढेन्द्रियास्त्वपलिता भवेयुर्नस्यशीलिनः ॥ ३९ ॥

जो नित्य नस्याचें सेवन करितो, त्याची त्वचा, खांदे, मान, तोंड व ऊर टणक ( बळकट ), जाड व रमणीय होतात, इंद्रियें सदृढ होतात व केंस पिकत नाहींत.

---

# एकविंशतितमोऽध्यायः

## अध्याय २१ वा

## अथातो धूम्रपानविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां धूम्रपानाविषयीं अध्याय सांगतों.

जत्रूर्ध्वं कफवातोत्थविकाराणामजन्मने ।
उच्छेदाय च जातानां पिबेद्धूमं सदात्मवान् ॥ १ ॥

ऊर्ध्वजत्रुगत कफवातसंबंधी विकार न होऊं देण्याकरितां व झालेल्यांचा प्रतिकार करण्याकरितां हिताहारविहार करणाऱ्या मनुष्यानें नित्य धूम्रपान करावें.

स्निग्धो मध्यः स तीक्ष्णश्च वाते वातकफे कफे ।
योज्यः

स्निग्ध, मध्यम व तीक्ष्ण असे धूम्रपानामध्यें तीन भेद असून ते अनुक्रमेंकरून वातजन्य, वातकफजन्य व कफजन्य विकारांवर योजावे.

न रक्तपित्तातिविरिक्तोदरमेहिषु ॥ २ ॥
तिमिरोर्ध्वानिलाध्मानरोहिणीदत्तबस्तिषु ।
मत्स्यमद्यदधिक्षीरक्षौद्रस्नेहविषाशिषु ॥ ३ ॥
शिरस्यभिहते पाण्डुरोगे जागरिते निशि ।

ज्यांना रक्तविकार, पित्तविकार, उदर, मेह, तिमिर, ऊर्ध्ववात, आध्मान, रोहिणी ( एक कंठरोग ), डोक्याचा अभिघात व पांडुरोग हे विकार झाले आहेत, ज्यांना विरेचन किंवा बस्ति दिला आहे व ज्यांनीं मत्स्य, मद्य, दहीं, दूध, मध, स्नेह किंवा विषारी पदार्थ यांचें सेवन किंवा रात्रीं जागरण केलें आहे, त्यांनीं धूम्रपान करूं नये.

रक्तपित्तान्ध्यबाधिर्यतृण्मूर्च्छामदमोहकृत् ॥ ४ ॥
धूमोऽकालेऽतिपीतो वा

अकालीं किंवा अतिमात्र धूम्रपान केलें असतां रक्तपित्त, अंधत्व, बाधिर्य, तृषा, मूर्च्छा, मद व चित्तनाश हे विकार उद्भवतात.

तत्र शीतो विधिर्हितः ।

त्यांजवर शीतोपचार हितावह होत.

क्षुतजृम्भितविण्मूत्रस्त्रीसेवाशस्त्रकर्मणाम् ॥ ५ ॥
हासस्य दन्तकाष्ठस्य धूममन्ते पिबेन्मृदुम् ।
कालेष्वेषु निशाहारनावनान्ते च मध्यमम् ॥ ६ ॥
निद्रानस्याञ्जनस्नानच्छर्दितान्ते विरेचनम् ।

शिंक, जांभई, मलमूत्रोत्सर्ग, मैथुन, शस्त्रकर्म, हंसणें व दंतधावन ह्या क्रियानंतर मृदु ( स्निग्ध ) धूम्रपान करावें. वरील प्रसंगीं व सकाळीं, भोजनोत्तर व नस्य घेतल्यावर मध्यम धूम्रपान करावें. निद्रा, नस्य, अंजन, स्नान व वमन ह्या क्रियांनंतर विरेचन धूम्रपान करावें.

वस्तिनेत्रसमद्रव्यं त्रिकोशं कारयेदृजु ॥ ७ ॥
मूलाग्रेऽङ्गुष्ठकोलास्थिप्रवेशं धूम्रनेत्रकम् ।

धूम्रपानाची नळी बस्तिनलिकेप्रमाणेंच धातवादिकांची केली असून तींत तीन कप्पे असावे व ती सरळ असून तिचें छिद्र मूलस्थानीं अंगुष्ठप्रमाण व अग्रभागीं बोराची बी मावण्याजोगें असावें.

तीक्ष्णस्नेहनमध्येषु त्रीणि चत्वारि पञ्च च ॥ ८ ॥
अङ्गुलानां क्रमात्पातुः प्रमाणेनाष्टकानि तत् ।

तिची लांबी तीक्ष्ण, मृदु व मध्यम धूम्रपानास अनुक्रमेंकरून २४, ३२ व ४० अंगुलें असावी ( धूम्रपान करणाराच्या अंगुलीनें ).

ऋजूपविष्टस्तच्चेता विवृतास्यस्त्रिपर्ययम् ॥ ९ ॥
पिधाय च्छिद्रमेकैकं धूमं नासिकया पिबेत् ।

धूम्रपान करणें तें असें कीं, सरळ बसून तिकडेच चित्त लावून तोंड उघडें ठेवून पाळीपाळीनें एकेक नाकपुडी झांकून दुसरीनें धूर ओढावा. याप्रमाणें प्रत्येक नाकपुडीच्या तीन पाळ्या कराव्या.

प्राक् पिबेन्नासयोत्क्लिष्टे दोषे घ्राणशिरोगते ॥ १० ॥
उत्क्लेशनार्थं वक्त्रेण विपरीतं तु कण्ठगे ।

नाकांतील व डोक्यांतील दोष स्वस्थानापासून चलित झाले असल्यास पहिल्यानें नाकानें धूर ओढावा, तसें नसल्यास त्यांना चाळविण्याकरितां तोंडानें धूर ओढावा. कंठगत दोषांना चाळविण्याकरितां नाकानें धूर ओढावा व ते पूर्वींच चलित झाले असल्यास तोंडानें ओढावा.

मुखेनैव वमेद्धूमं नासया दृग्विघातकृत् ॥ ११ ॥
आक्षेपमोक्षैः पातव्यो धूमस्तु त्रिस्त्रिभिस्त्रिभिः ।

धूर सोडणें तो नेहमीं तोंडानेंच सोडावा. नाकानें सोडल्यास डोळ्यांना इजा होते. तीनदां धूर घेऊन तीनदां सोडला म्हणजे एक धूम्रपान केल्यासारखें होतें. अशीं दर वेळेला तीन पानें करावीं.

अह्नः पिबेत्सकृत् स्निग्धं द्विर्मध्यं शोधनं परम् ॥१२॥
त्रिश्चतुर्वा

स्निग्ध किंवा मृदु धूम्रपान दिवसांतून एकदांच करावें. मध्यम

धूम्रपान दोन वेळां करावें व तीक्ष्ण धूम्रपान तीनदां किंवा चारदां करावें.

मृदौ तत्र द्रव्याण्यगुरुगुग्गुलुः ।
मुस्तस्थौणेयशैलेयनलदोशीरवालकम् ॥ १३ ॥
वराङ्गकौन्तीमधुकबिल्वमज्जैलवालुकम् ।
श्रीवेष्टकं सर्जरसो ध्यामकं मदनं प्लवम् ॥ १४ ॥
शल्लकी कुङ्कुमं माषा यवाः कुन्दुरुकं तिलाः ।
स्नेहः फलानां साराणां मेदो मज्जा वसा घृतम् ॥१५॥

मृदु धूम्रपानाचीं औषधें येणेंप्रमाणें:–अगुरु, गुग्गुळ, नागरमोथा, धुणेरा, दगडफूल, जटामांसी, काळा वाळा, वाळा, दालचिनी, रेणुकबीज, ज्येष्ठीमध, बिल्वमज्जा, एलवालुक, गंधाबिरोजा, राळ, रोहिसगवत, मेण, क्षुद्रमुस्ता, साळई वृक्षाची गुळी, केशर, उडीद, जव, तीळ, कुंदरू ( साळई वृक्षाचा निर्यास ), फळांचे ( नारळ, बदाम वगैरे ) व झाडांच्या गाभांचे ( देवदार वगैरे ) स्नेह, चर्बी, वसा, मज्जा व घृत.

शमने शल्लकी लाक्षा पृथ्वीका कमलोत्पलम् ।
न्यग्रोधोदुम्बराश्वत्थप्लक्षलोध्रत्वचः सिता ॥ १६ ॥
यष्टीमधु सुवर्णत्वक् पद्मकं रक्तयष्टिका ।
गन्धाश्चाकुष्ठतगराः

मध्यम ( शमन ) धूम्रपानाचीं औषधें येणेंप्रमाणें:–साळई वृक्षाचा निर्यास, लाख, वाफळी, कमल, नीलोत्पल, वड, उंबर, पिंपळ, पिंपरी व लोध्र यांची साल, साखर, ज्येष्ठीमध, बाहवा, पद्मकाष्ठ, मंजिष्ठा व कुष्ठ आणि तगर खेरीजकरून सर्व गंधद्रव्यें.

तीक्ष्णे ज्योतिष्मती निशा ॥ १७ ॥
दशमूलमनोह्वालं लाक्षाश्वेताफलत्रयम् ।
गन्धद्रव्याणि तीक्ष्णानि गणो मूर्धविरेचनः ॥ १८ ॥

तीक्ष्ण धूम्रपानाचीं द्रव्यें येणेंप्रमाणें:—करडकांगोणी, हळद, दशमुळें, मनशीळ, हरताळ, लाख, किन्ही वृक्षाचें मूळ, त्रिफळा, तीक्ष्ण गंधद्रव्यें [ कोष्ठ, तगर वगैरे ] व वावडिंग वगैरे मूर्धविरेचन गण.

जले स्थितामहोरात्रमिषीकां द्वादशाङ्गुलाम् ।
पिष्टैर्धूमौषधैरेवं पञ्चकृत्वः प्रलेपयेत् ॥ १९ ॥
वर्तिरङ्गुष्ठवत्स्थूला यवमध्या यथा भवेत् ।
छायाशुष्कां विगर्भां तां स्नेहाभ्यक्तां यथायथम् ॥२०॥
धूमनेत्रार्पितां पातुमग्निप्लुष्टां प्रयोजयेत् ।

धूम्रपानाची वात तयार करण्याची रीति येणेंप्रमाणें:–एक बारा बोटें लांब गवताची काडी घेऊन एक अहोरात्र पाण्यांत भिजत घालावी; मग वर सांगितलेलीं औषधें बारीक वाटून त्यांचा तिजवर पांच वेळां लेप द्यावा. तो असा कीं, ती आंगठ्याइतकी जाड व यवाच्या आकाराची होईल. नंतर ती सावलींत वाळवून आंतली काडी काढून टाकावी. तिचा उपयोग करते वेळीं तिला घृतादि स्नेह लावून चिलमीत घालून पेटवावी.

शरावसम्पुटच्छिद्रे नाडीं न्यस्य दशाङ्गुलाम् ॥ २१ ॥
अष्टाङ्गुलां वा वक्त्रेण कासवान्धूममापिबेत् ।

खोकल्याकरितां धूम्रपान करणें तें एक सच्छिद्र शरावसंपुट ( तोंडाशीं तोंड लावून एकावर एक ठेवलेले दोन परळ ) घेऊन त्याच्या छिद्राला एक आठ किंवा दहा बोटें लांब नळी लावून तींतून धूर ओढावा म्हणजे झालें. ( खैराचे किंवा बोरीच्या लांकडाचे निखारे त्या शरावसंपुटांत घालून त्यांवर धूम्रद्रव्याचें स्नेहयुक्त चूर्ण किंवा त्याची गोळी ठेवून तेथून निघणारा धूर शरावसंपुटाच्या नळींतून ओढावा. )

कासः श्वासः पीनसो विस्वरत्वं पूतिर्गन्धः पाण्डुता केशदोषः ।
कर्णास्याक्षिस्रावकण्डूर्तिजाड्यं तन्द्रा हिध्मा धूमपं न स्पृशन्ति ॥ २२ ॥

धूम्रपान करणाराला कास, श्वास, पीनस, स्वरभेद, नाकाची व तोंडाची दुर्गंधि, तोंडाचा फिकटपणा, केंसांचे विकार, तोंड, कान व डोळे यांचा स्राव, कंडू, ठणका, जाड्य व तंद्रा आणि उचकी हे विकार होत नाहींत.

---

# द्वाविंशतितमोऽध्यायः

## अध्याय २२ वा

अथातो गण्डूषादिविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां गुळण्या वगैरे करण्याविषयीं अध्याय सांगतों.

चतुष्प्रकारो गण्डूषः स्निग्धः शमनशोधनौ ।
रोपणश्च

गुळण्या चार प्रकारच्या; स्निग्ध, शमन, शोधन व रोपण.

त्रयस्तत्र त्रिषु योज्याश्चलादिषु ॥ १ ॥
अन्त्यो व्रणघ्नः

त्यांपैकीं पहिल्या तीन प्रकारच्या गुळण्यांचा उपयोग वातादि-दोषत्रयावर ( अनुक्रमानें ) करावा. शेवटचा प्रकार व्रणघ्न आहे.

स्निग्धोऽत्र स्वाद्वम्ललपटुसाधितैः ।
स्नेहैः

स्निग्ध गुळण्या मधुर, अम्ल, व लवण औषधांनीं सिद्ध केलेल्या स्नेहांनीं कराव्या.

संशमनस्तिक्तकषायमधुरौषधैः ॥ २ ॥

शमन गुळण्या कडू, तुरट व मधुर औषधांनीं कराव्या.

शोधनस्तिक्तकट्वम्लपटूष्णैः

शोधन गुळण्या कडू, तिखट, अंबट, खारट व उष्ण औषधांनीं कराव्या.

रोपणः पुनः।

कषायतिक्तकैः

रोपण ( व्रणघ्न ) गुळण्या तुरट व कडू औषधांनीं कराव्या.

तत्र स्नेहः क्षीरं मधूदकम् ॥ ३ ॥

शुक्तं मद्यं रसो मूत्रं धान्याम्लं च यथायथम्।
कल्कैर्युक्तं विपक्वं वा यथास्पर्शं प्रयोजयेत् ॥ ४ ॥

गुळण्या करणें त्या घृतादि स्नेह, दूध, मध, पाणी, शिर्का, मद्य, मांसरस, मूत्र व कांजिक ह्यांपैकीं एक किंवा अनेक पदार्थ वर सांगितलेल्या त्या त्या औषधांच्या कल्काशीं मिश्र किंवा पक्व करून त्यांनीं कराव्या. गुळण्यांचा द्रव विकाराच्या अनुरोधानें ऊन किंवा थंड असावा.

दन्तहर्षे दन्तचाले मुखरोगे च वातिके।
सुखोष्णमथवा शीतं तिलकल्कोदकं हितम् ॥ ५ ॥

दंतहर्ष ( दांतांना स्पर्श सहन न होणें ), दंतचाल ( दांत हलणें ) व वातजन्य मुखरोग ह्या विकारांवर थंड किंवा सुखोष्ण तिलकल्काच्या पाण्यानें गुळण्या कराव्या.

गण्डूषधारणे नित्यं तैलं मांसरसोऽथवा।

नित्य ( कांहीं विकार नसतांना ) गुळण्या करणें झाल्यास तेलाच्या* किंवा मांसरसाच्या कराव्या.

ऊषादाहान्विते पाके क्षते वागन्तुसम्भवे ॥ ६ ॥
विषक्षाराग्निदग्धे च सर्पिर्धार्यं पयोऽथवा।

तोंडांत आस्यपाक होऊन आग किंवा दाह होत असल्यास, आगंतुव्रण ( जखम ) झाला असल्यास किंवा विष, क्षार व अग्नि यांच्या योगानें तोंड पोळलें असल्यास तुपाच्या किंवा दुधाच्या गुळण्या कराव्या.

वैशद्यं जनयत्यास्ये सन्दधाति मुखव्रणान् ॥ ७ ॥
दाहतृष्णाप्रशमनं मधुगण्डूषधारणम्।

मधाच्या गुळण्यांनीं तोंड स्वच्छ होतें, तोंडांतील व्रण भरून येतात व दाह आणि तृषा यांची शांति होते.

धान्याम्लमास्यवैरस्यमलदौर्गन्ध्यनाशनम् ॥ ८ ॥

( लवणयुक्त व सुखोष्ण ) धान्याम्लाच्या ( कांजिकाच्या ) गुळण्या केल्या असतां तोंडाचा बेचवपणा, मल व दुर्गंधि नाहींशी होते.

तदेवालवणं शीतं मुखशोषहरं परम्।

त्याच्याच मीठ न घालतां थंड गुळण्या केल्यास तोंडाची कोरड तात्काळ नाहींशी होते.

* ह्या ग्रंथांत जातिनिर्देशावांचून जेथें 'तेल' शब्द येईल तेथें तिळाचें घ्यावें.

आशु क्षाराम्बुगण्डूषो भिनत्ति श्लेष्मणश्चयम् ॥ ९ ॥

क्षारयुक्त पाण्याच्या गुळण्या कफसंचय तत्काळ नाहींसा करितात.

सुखोष्णोदकगण्डूषैर्जायते वक्त्रलाघवम्।

सुखोष्ण पाण्याच्या गुळण्यांनीं तोंडाचें जाड्य नाहींसें होतें.

निवाते सातपे स्विन्नमृदितस्कन्धकन्धरः ॥ १० ॥
गण्डूषमपिबन् किञ्चिदुन्नतास्यो विधारयेत्।

गुळण्या करण्यापूर्वी खांदे व मान यांना शेक देऊन मर्दन करावें व त्या ऊन पडलेल्या निवांत स्थानीं कराव्या. गुळण्यांचें पाणी तोंडांत घेतल्यावर तोंड किंचित् वर करून धरावें व तें गिळूं नये.

कफपूर्णास्यता यावत्स्रवद्घ्राणाक्षताथवा ॥ ११ ॥
असञ्चार्यो मुखे पूर्णे गण्डूषः कवलोऽन्यथा।

तोंडांत श्लेष्मा जमेतोंपर्यंत किंवा नाकाला व नेत्रांना धार लागेतोंपर्यंत तोंडांत गुळणी धरावी. ज्या गुळणीनें तोंड गच्च भरल्यामुळें पाणी खुळखुळतां येत नाहीं तिला गंडूष म्हणतात. पाणी खुळखुळतां आलें म्हणजे त्या गुळणीला कवल म्हणतात.

मन्याशिरःकर्णमुखाक्षिरोगाः प्रसेककण्ठामयवक्त्रशोषाः ॥ १२ ॥
हृल्लासतन्द्रारुचिपीनसाश्च साध्या विशेषात्कवलग्रहेण।

मान, डोकें, कान, तोंड व डोळे यांचे रोग, तोंडाला पाणी सुटणें किंवा कोरड पडणें, कंठरोग, मळमळणें, तंद्रा, अरुचि व पडसें हे रोग विशेषेंकरून गुळण्यांच्या योगानें साध्य होतात.

कल्को रसक्रिया चूर्णस्त्रिविधं प्रतिसारणम् ॥ १३ ॥

प्रतिसारण ( बोटांनीं चोळण्याचें औषध ) तीन प्रकारचें:— कल्क, अवलेह ( रसक्रिया ) व चूर्ण.

युञ्ज्यात्तत्कफरोगेषु गण्डूषविहितौषधैः।

तें गुळण्यांच्या औषधांनींच तयार करावें व त्याचा कफविकारावर उपयोग करावा.

मुखालेपस्त्रिधा दोषविषहा वर्णकृच्च सः ॥ १४ ॥

मुखलेप तीन प्रकारचाः-दोषघ्न, विषघ्न व वर्णकर ( कांतिकर ).

उष्णो वातकफे शस्तः शेषेष्वत्यर्थशीतलः।

वातकफात्मक विकारांवर उष्ण मुखलेप करावा; इतर विकारांवर अत्यंत शीतल लेप करावा.

त्रिप्रमाणश्चतुर्भागत्रिभागार्धाङ्गुलोन्नतिः ॥ १५ ॥

त्याच्या जाडीचें मानहि तीन प्रकारचें:- एकचतुर्थांश, एकतृतीयांश किंवा एकद्वितीयांश अंगुल.

अशुष्कस्य स्थितिस्तस्य शुष्को दूषयति च्छविम्।
तमार्द्रयित्वाऽपनयेत्तदन्तेऽभ्यङ्गमाचरेत् ॥ १६ ॥

तो ओला असेतोंपर्यंतच राहूं द्यावा; कारण वाळल्यावर तो मुखाची कांति बिघडवितो; वाळत आला म्हणजे तो ओला करून पुसून टाकावा व मग अभ्यंग करावा.

**विवर्जयेद्दिवास्वप्नभाष्याग्न्यातपशुक्क्रुधः ।**

मुखलेप करणारांनीं दिवा निद्रा, फार बोलणें, अग्नि, ऊन, शोक व क्रोध ह्या गोष्टी वर्ज कराव्या.

**न योज्यः पीनसेऽजीर्णे दत्तनस्ये हनुग्रहे ॥ १७ ॥**
**अरोचके जागरिते**

पडसें, अजीर्ण, हनुग्रह व अरोचक हे विकार असतांना व नस्य दिलेल्या व जागरण केलेल्या मनुष्यानें मुखलेपाचा उपयोग करूं नये.

**स च हन्ति सुयोजितः ।**
**अकालपलितव्यङ्गवलीतिमिरनीलिकाः ॥ १८ ॥**

मुखलेपाचा यथाशास्त्र उपयोग केला असतां अकालीं केंस पिकणें, वांग, वली (त्वचेला सुरकुत्या पडणें), तिमिर व तीळ हे विकार नाहींसे होतात.

**कोलमज्जा वृषान्मूलं शाबरं गौरसर्षपाः ।**
**सिंहीमूलं तिलाः कृष्णा दार्वीत्वङ्गनिस्तुषा यवाः ॥१९॥**
**दर्भमूलहिमोशीरशिरीषमिशितण्डुलाः ।**
**कुमुदोत्पलकह्लारदूर्वामधुकचन्दनम् ॥ २० ॥**
**कालीयकतिलोशीरमांसीतगरपद्मकम् ।**
**तालीसगुन्द्रापुण्ड्राह्वयष्टीकाशनतागुरुः ॥ २१ ॥**
**इत्यर्धार्धोदिता लेपा हेमन्तादिषु षट् स्मृताः ।**

चोराच्या बीचा मगज, अडुळशाचें मूळ, लोध्र व पांढरे शिरस; २ डोरलीचें मूळ, काळे तीळ, दारुहळद, दालचिनी व सडलेले सातू; ३ दर्भमूळ, कापूर, वाळा, शिरसाची साल, बडीशेप, व तांदूळ; ४ कुमुद, उत्पल, कल्हार, दूर्वा, ज्येष्ठीमध व चंदन; ५ पिंवळा चंदन, तीळ, वाळा, जटामांसी, तगर व पद्मकाष्ठ; ६ तालीसपत्र, गव्हला, कमळ, ज्येष्ठीमध, कपईगवत, तगर व अगुरु, ह्या सहा लेपांचा अनुक्रमेंकरून हेमंतादि सहा ऋतूंमध्यें उपयोग करावा.

**मुखालेपनशीलानां दृढं भवति दर्शनम् ॥ २२ ॥**
**वदनं चापरिम्लानं श्लक्ष्णं तामरसोपमम् ।**

नित्य मुखलेप करणारांची दृष्टि बळकट व तोंड प्रसन्न, गुळगुळीत व कमलासारिखें होतें.

**अभ्यङ्गसेकपिचवो बस्तिश्चेति चतुर्विधम् ॥ २३ ॥**
**मूर्धतैलं बहुगुणं तद्विद्यादुत्तरोत्तरम् ।**

डोक्यास तेल जिरविण्याचे चार प्रकार आहेतः—अभ्यंग, परिषेक, बोळा किंवा घडी ठेवणें व बस्ति (शिरोबस्ति). हें अनुक्रमेंकरून एकाहून एक गुणावह आहेत.

**तत्राभ्यङ्गः प्रयोक्तव्यो रौक्ष्यकण्डूमलादिषु ॥ २४ ॥**

त्यांपैकीं अभ्यंगाचा उपयोग रुक्षता, कंडू व मल वगैरे घालविण्याकरितां करावा.

**अरुंषिकाशिरस्तोददाहपाकव्रणेषु तु ।**
**परिषेकः**

सवडे व मस्तकाचा शूल, दाह, पाक व व्रण ह्या विकारांवर जो तेलाचा उपयोग करणें तो परिषेकानें करावा.

**पिचुः केशशातस्फुटनधूपने ॥ २५ ॥**
**नेत्रस्तम्भे च**

केंस गळणें, फुटणें व त्यांतून वाफा निघणें व डोळे ताठणें ह्या विकारांवर तेलाची घडी धारण करावी ( मस्तकावर ).

**बस्तिस्तु प्रसुप्त्यर्दितजागरे ।**
**नासास्यशोषे तिमिरे शिरोरोगे च दारुणे ॥ २६ ॥**

डोक्याच्या त्वचेची बधिरता, अर्दितवायु, निद्रानाश, नाकाची व तोंडाची कोरड, तिमिर व दारुण शिरोरोग ह्या विकारांवर जो तेलाचा योग करणें तो शिरोबस्तीनें करावा.

**विधिस्तस्य निषण्णस्य पीठे जानुसमे मृदौ ।**
**शुद्धाक्तस्विन्नदेहस्य दिनान्ते गव्यमाहिषम् ॥ २७ ॥**
**द्वादशाङ्गुलविस्तीर्णं चर्मपट्टं शिरःसमम् ।**
**आकर्णबन्धनस्थानं ललाटे वस्त्रवेष्टिते ॥ २८ ॥**
**चैलवेणिकया बध्वा माषकल्केन लेपयेत् ।**

त्याचा विधि येणेंप्रमाणें:—रोग्याला शोधन, स्नेहन व स्वेदनविधि करून संध्याकाळच्या सुमारास गुडघ्याइतक्या एका उंच मऊ कोचावर बसवून त्याच्या डोक्याला तितक्याच (डोक्याइतक्या) घेराचें बारा बोटें रुंद असें गाईचें किंवा म्हशीचें चामडें कानांच्या समान रेषेनें नाडीनें बांधावें व बंधनस्थानीं उडदाच्या पिठाचा लेप करावा व चामड्याच्या खालीं कपाळाला एक वस्त्र गुंडाळलेलें असावें.

**ततो यथाव्याधि शृतं स्नेहं कोष्णं निषेचयेत् ॥ २९ ॥**
**ऊर्ध्वं केशभुवो यावदङ्गुलं**

नंतर त्या शिरोबस्तींत व्याधीच्या अनुरोधानें पक्व केलेलें कोमट तेल केंसाच्या सपाटीवर दोन बोटें येईपर्यंत भरावें.

**धारयेच्च तम् ।**
**आवक्त्रनासिकोत्क्लेदात्**

तोंड व नाक वाहूं लागेतोंपर्यंत तें तेल धारण करावें.

**दशाष्टौ षट् चलादिषु ॥ ३० ॥**
**मात्रासहस्राणि**

त्यांचा स्राव सुरू न झाल्यास वातपित्तकफांवर अनुक्रमेंकरून अडीच, दोन व दीड तासपर्यंत धारण करावें.

**अरुजे त्वेकं**

निरोगी मनुष्यानें तें सुमारें पंधरा मिनिटें धारण करावें.

**स्कन्धादि मर्दयेत् ।**
**मुक्तस्नेहस्य**

शिरोबस्ति काढून टाकल्यावर खांदे वगैरेंचें मर्दन करावें.

**परमं सप्ताहं तस्य सेवनम् ॥ ३१ ॥**

शिरोबस्तीचें फार झाल्यास सात दिवसपर्यंत सेवन करावें.

( हा त्याचा परमावधि झाला. मध्यम व कनिष्ठ काल पांच व तीन दिवस जाणावा. )

**धारयेत्पूरणं कर्णे कर्णमूलं विमर्दयन् ।**
**रुजः स्यान्मार्दवं यावन्मात्राशतमवेदने ॥ ३१ ॥**

कानांत औषध (स्नेहादिक) घालणें तें कानावर मर्दन करून घालावें व ठणका कमी होईतोंपर्यंत किंवा विकार नसल्यास शंभर मात्रा म्हणजे सुमारें दीड मिनिट धारण करावें.

**यावत्पर्येति हस्ताग्रं दक्षिणं जानुमण्डलम् ।**
**निमेषोन्मेषकालेन समं मात्रा तु सा स्मृता ॥ ३२ ॥**

उजव्या हातानें उजव्या गुडघ्यासभोंवतीं वर्तुळ काढण्याला किंवा पापण्यांची उघडझांक करण्याला जो काल लागतो त्याला मात्रा अशी संज्ञा आहे.

**कचसदनसितत्वपिञ्जरत्वं परिफुटनं शिरसः समीर-रोगान् ।**
**जयति जनयतीन्द्रियप्रसादं स्वरहनुमूर्धबलं च मूर्ध-तैलम् ॥ ३४ ॥**

मूर्धतैलाच्या सेवनानें केंस गळणें, पिकणें, ठणकणें व त्यांच्या जटा होणें हे विकार व वातजन्य शिरोरोग नाश पावतात, इंद्रियें प्रसन्न होतात व स्वर, हनवटी व टाळू यांचा जोर वाढतो.

---

# त्रयोविंशोऽध्यायः

## अध्याय २३ वा

**अथात आश्चोतनाञ्जनविधिमध्यायं व्याख्यास्यामः ॥**

आतां डोळ्यांत थेंब सोडणें, अंजन करणें इत्यादिकांचा विधि सांगतों.

**सर्वेषामक्षिरोगाणामादावाश्चोतनं हितम् ।**
**रुक्तोदकण्डूघर्षाश्रुदाहरागनिबर्हणम् ॥ १ ॥**

सर्व नेत्ररोगांवर पहिल्यानें पातळ औषधाचे थेंब टाकणें हितावह होय. त्याचे योगानें वेदना, ठणका, कंडू, खुपणें, पाणी गळणें, लाली व आग हे विकार नाहींसे होतात.

**उष्णं वाते कफे कोष्णं तच्छीतं रक्तपित्तयोः ।**

थेंब सोडणें ते वातावर ऊन, कफावर कोमट व रक्तपित्तावर थंड सोडावे.

**निवातस्थस्य वामेन पाणिनोन्मील्य लोचनम् ॥ २ ॥**
**शुक्त्या प्रलम्बयान्येन पिचुवर्त्या कनीनिके ।**
**दश द्वादश वा बिन्दून् द्व्यङ्गुलादवसेचयेत् ॥ ३ ॥**
**ततः प्रमृज्य मृदुना चैलेन कफवातयोः ।**
**अन्येन कोष्णपानीयप्लुतेन स्वेदयेन्मृदु ॥ ४ ॥**

त्याचा विधि येणेंप्रमाणें:—रोग्याला निवांत स्थानीं निजवून, डाव्या हातानें त्याचा डोळा उघडून, उजव्या हातानें शिंपींत घातलेल्या वातीच्या योगानें डोळ्याच्या नाकाजवळील कोंपऱ्यांत दोन बोटांच्या अंतरानें दहा बारा थेंब सोडावे. मग एका मऊ कापडानें डोळा हलूच पुसून कफवातात्मक विकार असल्यास दुसऱ्या एका ऊन पाण्यांत बुचकळलेल्या कापडानें तो हलूच शेकावा.

**अत्युष्णतीक्ष्णं रुग्रागदृङ्नाशायाक्षिसेचनम् ।**
**अतिशीतं तु कुरुते निस्तोदस्तम्भवेदनाः ॥ ५ ॥**
**कषायवर्त्मतां घर्षं कृच्छ्रादुन्मेषणं बहु ।**
**विकारवृद्धिमत्यल्पं संरम्भमपरिस्रुतम् ॥ ६ ॥**

ते थेंब अतिशय उष्ण किंवा तीक्ष्ण असल्यास ठणका, लाली व दृष्टिनाश हे विकार उत्पन्न होतात. अतिशय थंड असल्यास टोंचणी, ओढ व वेदना लागते. ते फार पाडल्यास पापण्या रूक्ष होऊन खुपूं लागतात व त्यांची उघडझांक करणें कठिण पडतें. ते फारच थोडे सोडल्यास विकार वाढतो. थेंब सोडण्यासारखें औषध गाळलें नसल्यास नेत्रांचा क्षोभ होतो.

**गत्वा सन्धिशिरोघ्राणमुखस्रोतांसि भेषजम् ।**
**ऊर्ध्वगान्नयने न्यस्तमपवर्तयते मलान् ॥ ७ ॥**

डोळ्यांत घातलेलें औषध नेत्रसंधि, डोकें, नाक व तोंड यांतील वाहिन्यांतून जाऊन ऊर्ध्वगामी दोषांना खालीं परतवितें.

**अथाञ्जनं शुद्धतनोर्नेत्रमात्राश्रये मले ।**
**पक्वलिङ्गेल्पशोफार्तिकण्डूपैच्छिल्यलक्षिते ॥ ८ ॥**
**मन्दघर्षाश्रुरागेऽक्ष्णि प्रयोज्यं घनदूषिके ।**
**अर्ते पित्तकफासृग्भिर्मारुतेन विशेषतः ॥ ९ ॥**

आतां अंजनाविषयीं म्हणाल तर तें शोधन दिल्यावर फक्त नेत्रगत पक्वदोषावर मात्र योजावें. ते दोष पक्व झाल्याचीं लक्षणें अशीं कीं, सूज कमी होणें, कंडू व चिकटा वाढणें, खूप, गळ व लाली कमी होणें व पू दाटणें. वात, पित्त, कफ व रक्त या सर्वांपासून होणाऱ्या नेत्ररोगांवर अंजनाचा उपयोग होतोच; परंतु वातजन्य विकारांवर त्याची विशेषें करून योजना करावी.

**लेखनं रोपणं दृष्टिप्रसादनमिति त्रिधा ।**
**अञ्जनम्**

अंजनाचे लेखन, रोपण व दृष्टिप्रसादन असे तीन भेद आहेत.

**लेखनं तत्र कषायाम्लपटूषणैः ॥ १० ॥**

त्यांपैकीं जें लेखन अंजन तें अम्ल, लवण, तिखट व तुरट औषधांनीं तयार करावें.

**रोपणं तिक्तकैर्द्रव्यैः**

रोपण अंजन कडू द्रव्यांनीं तयार करावें.

**स्वादुशीतैः प्रसादनम् ।**

प्रसादन ( दृष्टि स्वच्छ करणारें ) अंजन मधुर व थंड औषधांचें असावें.

**दशाङ्गुला तनुर्मध्ये शलाका मुकुलानना ॥ ११ ॥**
**प्रशस्ता लेखने ताम्री रोपणे काललोहजा ।**
**अङ्गुली च सुवर्णोत्था रूप्यजा च प्रसादने ॥ १२ ॥**

अंजन करण्याची शलाका दहा बोटें लांब व मध्यें बारीक असून तिचीं दोन्हीं तोंडें मुकुलाकार (फुलाच्या कळीसारखीं) असावीं. लेखन अंजन करणें तें तांब्याच्या शलाकेनें, रोपण अंजन पोलादाच्या शलाकेनें किंवा बोटानें व प्रसादन अंजन रुप्याच्या किंवा सोन्याच्या शलाकेनें करावें.

**पिण्डो रसक्रिया चूर्णस्त्रिधैवाञ्जनकल्पना ।**
**गुरौ मध्ये लघौ दोषे ताः क्रमेण प्रयोजयेत् ॥ १३ ॥**

पिंड (मलमासारखें औषध), रसक्रिया (अवलेहासारखें औषध) व चूर्ण असे अंजनाचे कल्पहि तीनच आहेत. गुरु, मध्यम व लघु दोषांवर त्यांचा अनुक्रमेंकरून उपयोग करावा.

**हरेणुमात्रं पिण्डस्य वेल्लमात्रा रसक्रिया ।**
**तीक्ष्णस्य द्विगुणं तस्य मृदुनः**

मलम व लेहरूपी औषध तीक्ष्ण असल्यास अनुक्रमेंकरून रेणुकबीजाएवढें व वावडिंगाएवढें घालावें व मृदु असल्यास त्याच्या दुप्पट घालावें.

**चूर्णितस्य च ॥ १४ ॥**
**द्वे शलाके तु तीक्ष्णस्य तिस्रः स्युरितरस्य च ।**

चूर्ण घालणें तें तीक्ष्ण असल्यास त्याच्या दोन सळया व मृदु असल्यास तीन सळया फिरवाव्या.

**निशि स्वप्नेन मध्याह्ने पानान्नोष्णगभस्तिभिः ॥ १५ ॥**
**अक्षिरोगाय दोषाः स्युर्वर्धितोत्पीडितद्रुताः ।**
**प्रातःसायं च तच्छान्त्यै व्यभ्रेऽर्केऽतोऽञ्जयेत्सदा ॥ १६ ॥**

रात्रीं झोंपेच्या योगानें वृद्धिंगत झाल्यामुळें व दुपारीं अन्नपानाच्या व उन्हाच्या योगानें संक्षोभित व विद्रुत झाल्यामुळें नेत्रगत दोष केव्हां केव्हां रोग उत्पन्न करितात. यास्तव त्यांची शांति करण्याकरितां नित्य सकाळीं व संध्याकाळीं आकाश निरभ्र असतांना अंजन करावें.

**वदन्त्यन्ये तु न दिवा प्रयोज्यं तीक्ष्णमञ्जनम् ।**
**विरेकदुर्बलं चक्षुरादित्यं प्राप्य सीदति ॥ १७ ॥**

कित्येक असें म्हणतात कीं, दिवसां तीक्ष्ण अंजनाचा उपयोग करूं नये; कारण पाणी गेल्यामुळें अशक्त झालेल्या डोळ्यांना सूर्याचा प्रकाश सहन होत नाहीं.

**स्वप्नेन रात्रौ कालस्य सौम्यत्वेन च तर्पिता ।**
**शीतसात्म्या दृगाग्नेयी स्थिरतां लभते पुनः ॥ १८ ॥**

तेंच रात्रीं करण्यास हरकत नाहीं; कारण दृष्टि अग्निभूयिष्ठ व शीतसात्म्य* असल्यामुळें झोंपेच्या योगानें व कालाच्या सौम्यत्वानें पुष्ट होऊन ती पुनः बळकट होते.

**अत्युद्रिक्ते बलासे तु लेखनीयेऽथवा गदे ।**
**काममह्न्यपि नात्युष्णे तीक्ष्णमक्ष्णि प्रयोजयेत् १९**

तथापि कफाचा अत्यंत प्रकोप झाल्यास किंवा एखादा लेखनसाध्य विकार असल्यास, दिवसां देखील फारसा उष्मा नसल्यास, तीक्ष्ण अंजनाचा उपयोग करावा.

**अश्मनो जन्म लोहस्य तत एव च तीक्ष्णता ।**
**उपघातोऽपि तेनैव तथा नेत्रस्य तेजसः ॥ २० ॥**

शस्त्राची उत्पत्ति दगडापासूनच; त्याला जी धार देतात तीहि दगडाचे योगानेंच; व तिचा नाशहि दगडानेंच होतो. तद्वतच नेत्राची उत्पत्ति, तीक्ष्णता व हानि ह्या तिन्ही गोष्टींनाहि तेजच कारणीभूत आहे. (शस्त्र लोखंडाचें असतें व लोखंड दगडांतून काढितात म्हणून शस्त्राची उत्पत्ति दगडापासून असें म्हटलें आहे).

**न रात्रावपि शीतेऽति नेत्रे तीक्ष्णाञ्जनं हितम् ।**
**दोषस्रावयत्स्तम्भकण्डूजाड्यादिकारि तत् ॥ २१ ॥**

नेत्रांत अतिशैत्य झालें असल्यास रात्रीं देखील तीक्ष्ण अंजन करूं नये. कारण कालाच्या शैत्यामुळें दोषांचे स्राव न होतां ओढ, कंडू व जाड्य इत्यादि विकार मात्र उत्पन्न होतात.

**नाञ्जयेद्भीतवमितविरिक्ताशितवेगिते ।**
**क्रुद्धज्वरिततान्ताक्षिशिरोरुक्शोकजागरे ॥ २२ ॥**
**अदृष्टेऽर्के शिरःस्नाते पीतयोर्धूममद्ययोः ।**
**अजीर्णेऽग्न्यर्कसन्तप्ते दिवा सुप्ते पिपासिते ॥ २३ ॥**

पुढील लोकांना अंजन करूं नयेः-ज्यांना भय, क्रोध किंवा शोक झाला आहे, वमन किंवा विरेचन दिलें आहे, ज्वर आला आहे, शिरोरोग, जागरण किंवा अजीर्ण झालें आहे, मलमूत्रादिकांचा वेग, अग्नीचा किंवा सूर्याचा ताप किंवा तृषा लागली आहे ते; व ज्यांनीं डोक्यावरून स्नान, धूम्रपान किंवा मद्यपान केलें आहे, किंवा दिवसास निद्रा घेतली आहे ते; ज्यांचें नुकतेंच भोजन झालें आहे ते व ज्यांच्या नेत्राला श्रम झाले आहेत ते; तसेंच ज्या दिवशीं अभ्र आलें असेल त्या दिवशीं कोणालाच अंजन करूं नये.

**अतितीक्ष्णमृदुस्तोकबहुच्छघनकर्कशम् ।**
**अत्यर्थशीतलं तप्तमञ्जनं नावचारयेत् ॥ २४ ॥**

अतितीक्ष्ण, अतिमृदु, अत्यल्प, अतिशय, अतिपातळ, अतिदाट, अतिशीत, अत्युष्ण किंवा खरखरीत अंजन कधींहि करूं नये.

**अथानुन्मीलयन् दृष्टिमन्तः सञ्चारयेच्छनैः ।**
**अञ्जिते वर्त्मनी किंचिच्चालयेच्चैवमञ्जनम् ॥ २५ ॥**

* जे आहारविहार रोगांच्या विरुद्ध गुणाचे असतात, त्यांचा प्रायः रोगांना सुखावह उपयोग होतो व तसा उपयोग झाल्यास यांना सात्म्य अशी संज्ञा आहे. दृष्टि तेजोमय असल्यामुळें शीत हें तिला सात्म्य आहे. (नि० अ. १, श्लो. ७ पहा.)

तीक्ष्णं व्याप्नोति सहसा न चोन्मेषनिमेषणम् ।
निष्पीडनं च वर्त्मभ्यां क्षालनं वा समाचरेत् ॥ २६ ॥

याप्रमाणें अंजन केल्यावर डोळे झांकून आंतल्या आंत हळूच हलवावे, व पापण्यांची किंचित् उघडझांक करावी, म्हणजे तीक्ष्ण अंजन सर्वत्र पसरतें. पापण्यांची उघडझांक एकदम सुरू करूं नये किंवा त्या चोळूं नये व डोळे लागलेच धुवून टाकूं नये.

अपेतौषधसंरम्भं निर्वृतं नयनं यदा ।
व्याधिदोषर्तुयोग्याभिरद्भिः प्रक्षालयेत्तदा ॥ २७ ॥

औषधाची चुरचुर नाहींशी होऊन नेत्र स्वस्थ झाले म्हणजे ते व्याधि, दोष व ऋतु यांना योग्य अशा पाण्यानें धुवून टाकावे.

दक्षिणाङ्गुष्ठकेनाक्षि ततो वामं सवाससा ।
ऊर्ध्ववर्त्मनि सङ्गृह्य शोध्यं वामेन चेतरत् ॥ २८ ॥

नंतर त्याजवर एखादें फडकें घालून उजवा अंगठा डाव्या व डावा उजव्या डोळ्याच्या वरच्या पापणीवर धरून तो साफ करावा.

वर्त्मप्राप्ताञ्जनाद्दोषो रोगान्कुर्यादतोन्यथा ।

नाहीं तर पापणीस लागलेल्या अंजनानें दोष कुपित होऊन रोग उत्पन्न होतात.

कण्डूजाड्येऽञ्जनं तीक्ष्णं धूमं वा योजयेत्पुनः ॥२९॥

खाज सुटल्यास किंवा डोळे जड झाल्यास पुनः तीक्ष्ण अंजन किंवा धूम्रपान करावें.

तीक्ष्णाञ्जनाभितप्ते तु चूर्णं प्रत्यञ्जनं हितम् ।

तीक्ष्ण अंजन केल्यानें डोळ्यांचा क्षोभ झाल्यास त्यांजवर चूर्णांजनाचा उतारा ( प्रत्यंजन ) करावा.

---

# चतुर्विंशतितमोऽध्यायः

## अध्याय २४ वा

### अथातस्तर्पणपुटपाकविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां तर्पण पुटपाक यांच्या विधीविषयीं अध्याय सांगतों.

नयने ताम्यति स्तब्धे शुष्के रूक्षेऽभिघातिते ।
वातपित्तातुरे जिह्मे शीर्णपक्ष्माविलेक्षणे ॥ १ ॥
कृच्छ्रोन्मीलशिराहर्षशिरोत्पाततमोऽर्जुनैः ।
स्यन्दमन्थान्यतोवातवातपर्यायशुक्रकैः ॥ २ ॥
आतुरे शान्तरागाश्रुशूलसंरम्भदूषिके ।
निवाते तर्पणं योज्यं शुद्धयोर्मूर्धकाययोः ॥ ३ ॥
काले साधारणे प्रातः सायं चोत्तानशायिनः ।

तर्पण ( डोळ्यांवर पातळ औषध धारण करणें ) पुढील विकारांवर योजावें:—नेत्रांना अशक्तता, ओढ, शोष, रूक्षता किंवा वकता आली असतां; अभिघात झाला असतां; वातपित्तविकार, पदकेस, अस्पष्टदर्शन, कृच्छ्रोन्मीलन ( डोळे उघडण्यास प्रयास पडणें ), शिराहर्ष, शिरोत्पात, तिमिर, अहिरा, स्पंद ( डोळ्यांतून पाणी गळणें ), अधिमंथ, अन्यतोवात, वातपर्याय व फूल हे विकार झाले असून लाली, गळ, शूल, चुरचूर व पू यांचा उपशम झाला असतां, तर्पण करणें तें साधारणकालीं निवांत स्थानीं कोठ्याची व मस्तकाची शुद्धि करून रोग्याला उताणें निजवून सांजसकाळ करावें.

यवमाषमयीं पालीं नेत्रकोशाद्बहिः समाम् ॥ ४ ॥
द्व्यङ्गुलोच्चां दृढां कृत्वा यथास्वं सिद्धमावपेत् ।
सर्पिर्निमीलिते नेत्रे तप्ताम्बुप्रविलापितम् ॥ ५ ॥

डोळ्यांच्या बाहेरून दोन बोटें उंचीची व सातूच्या किंवा उडदाच्या पिठाची एक घट्ट व सारखी पाळ करून तींत त्या त्या दोषाप्रमाणें सिद्ध केलेलें तूप ऊन पाण्याच्या उष्णतेनें पातळ करून डोळे झांकले असतांना घालावें.

नक्तान्ध्यवाततिमिरकृच्छ्रबोधादिके वसाम् ।
आपक्ष्माग्रात्

रातांधळे, वातजन्य नेत्ररोग, तिमिर, कृच्छ्रबोध ( डोळे उघडण्याविषयीं प्रयास पडणें ) इत्यादि विकारांवर वसेचा उपयोग करावा. तूप असो किंवा वसा असो, तीं पापण्यांचीं अग्रें बुडेपर्यंत घालावीं.

अथोन्मेषं शनकैस्तस्य कुर्वतः ॥ ६ ॥
मात्रां विगणयेत्तत्र वर्त्मसन्धिसितासिते ।
दृष्टौ च क्रमशो व्याधौ शतं त्रीणि च पञ्च च ॥७॥
शतानि सप्त चाष्टौ च दश मन्थे दशानिले ।
पित्ते षट् स्वस्थवृत्ते च बलासे पञ्च धारयेत् ॥ ८ ॥

नंतर हळूहळू डोळे उघडीत तो स्नेह वर्त्म ( पापण्या ), संधि, पांढरें व काळें बुबुळ व दृष्टि यांच्या विकारांमध्यें अनुक्रमेंकरून शंभर, तीनशें, पांचशें, सातशें व आठशें मात्रा ( सेकंद ) पावेतों धारण करावा. अधिमंथ रोग व वातविकार यांजवर हजार मात्रांपावेतों ( सुमारें १५ मिनिटें ), पित्तविकारांवर व निरोगी मनुष्यानें सहाशें मात्रांपावेतों व कफविकारावर पांचशें मात्रांपावेतों धारण करावा.

कृत्वापाङ्गे ततो द्वारं स्नेहं पात्रे तु गालयेत् ।
पिबेच्च धूमं नेक्षेत व्योम रूपं च भास्वरम् ॥ ९ ॥

नंतर डोळ्याच्या कोंपऱ्यांजवळ पाळीला भोंक पाडून तो स्नेह एका भांड्यांत गळूं द्यावा; मग धूम्रपान करावें व प्रकाशाकडे व चकचकित पदार्थांकडे पाहूं नये.

इत्थं प्रतिदिनं वायौ पित्ते त्वेकान्तरं कफे ।
स्वस्थे च द्व्यन्तरं दद्यादातृप्तेरिति योजयेत् ॥ १० ॥

याप्रमाणें वातविकार असल्यास प्रतिदिवशीं, पित्तविकार असल्यास एका दिवसाआड व कफविकार असल्यास व निरोगी स्थिति असतांना दोन दिवसांआड तर्पण द्यावें. याप्रमाणें तर्पणक्रिया लागू होईतोंपर्यंत करावें.

प्रकाशक्षमता स्वास्थ्यं विशदं लघु लोचनम्।
तृप्ते विपर्ययोऽतृप्तेऽतितृप्ते श्लेष्मजा रुजः ॥ ११ ॥

तर्पणक्रिया लागू झाल्याचीं लक्षणें अशीं कीं, प्रकाश सहन होतो व डोळ्यांना स्वस्थता, स्वच्छता व लघुता येते. याच्या उलट स्थिति असली म्हणजे तर्पणक्रिया लागू झाली नाहीं असें समजावें. ती अतिरिक्त झाली असतां कफजन्य विकार उत्पन्न होतात.

स्नेहपीता तनुरिव क्लान्ता दृष्टिर्हि सीदति।
तर्पणानन्तरं तस्माद्दृग्बलाधानकारिणम् ॥ १२ ॥
पुटपाकं प्रयुञ्जीत पूर्वोक्तेष्वेव यक्ष्मसु।

स्नेहपानानंतर शरीराला जशी ग्लानि व थकवा येतो; तद्वतच तर्पणानंतर दृष्टीलाहि ग्लानि व थकवा येतो; यास्तव दृष्टीला बल देण्याकरितां पुटपाकाची योजना करावी; म्हणून अर्थात् पुटपाकाचा उपयोगहि पूर्वोक्तव्याधींवरच होतो.

स वाते स्नेहनः श्लेष्मसहिते लेखनो हितः ॥ १३ ॥
दृग्दौर्बल्येऽनिले पित्ते रक्ते स्वस्थे प्रसादनः।

वातावर स्नेहन पुटपाक, कफाश्रित वातावर लेखन पुटपाक व दृष्टिदौर्बल्य व वात, पित्त व रक्त यांजपासून होणारे नेत्रविकार यांजवर व आरोग्यस्थितींत प्रसादन पुटपाक हितावह आहे.

भूशयप्रसहानूपमेदोमज्जावसामिषैः ॥ १४ ॥
स्नेहनं पयसा पिष्टैर्जीवनीयैश्च कल्पयेत्।

स्नेहनपुटपाक करणें तो बिलेशय, प्रसह व आनूप प्राण्यांचे मेद, मज्जा, वसा व मांस किंवा जीवनीय औषधें यांचा दुधाशीं कल्क करून करावा.

मृगपक्षियकृन्मांसमुक्तायस्ताम्रसैन्धवैः ॥ १५ ॥
स्रोतोजशङ्खफेनालैर्लेखनं मस्तुकल्कितैः।

जांगल मृगपक्ष्यांचें यकृत् व मांस व ताम्र, लोह, सुरमा, मोतीं, शंख, समुद्रफेंस, सैंधव व हरताळ हे पदार्थ दह्याच्या निवळीबरोबर वांटून लेखन पुटपाक करावा.

मृगपक्षियकृन्मज्जावसान्त्रहृदयामिषैः ॥ १६ ॥
मधुरैः सघृतैः स्तन्यक्षीरपिष्टैः प्रसादनम्।

प्रसादन पुटपाक करणें तो मृगपक्ष्यांचें यकृत्, मज्जा, वसा, आंतडें, हृदय व मांस आणि मधुर वर्गांतील औषधें अंगावरच्या दुधांत वांटून व त्यांत थोडेंसें तूप मिळवून करावा.

बिल्वमात्रं पृथक्पिण्डं मांसभेषजकल्कयोः ॥ १७ ॥
उरुबूकवटाम्भोजपत्रैः स्नेहादिषु क्रमात्।
वेष्टयित्वा मृदा लिप्तं धवधन्वनगोमयैः ॥ १८ ॥
पचेत्प्रदीप्तैरग्न्याभं पक्वं निष्पीड्य तद्रसम्।
नेत्रे तर्पणवद्युञ्ज्यात्

मांस व औषधकल्क यांचे वेगळाले गोळे चार तोळे घेऊन स्नेहनादि तीन पुटपाकांमध्यें अनुक्रमेंकरून एरंड, वड व कमलिनी यांच्या पानांत गुंडाळून वर माती लिंपून धावडा व धामणी यांचें लांकूड किंवा गोवऱ्या यांचा अग्नि देऊन तो गोळा लाल होईपर्यंत पाक करावा; मग त्याचा रस काढून घेऊन ( माती वगैरे काढून टाकल्यावर ) त्याचा नेत्रांवर तर्पणाप्रमाणें उपयोग करावा.

शतं द्वे त्रीणि धारयेत् ॥ १९ ॥
लेखनस्नेहनान्त्येषु

लेखन, स्नेहन व प्रसादन पुटपाक अनुक्रमेंकरून शंभर, दोनशें व तीनशें मात्रांपावेतों धारण करावा.

पूर्वो कोष्णौ हिमोऽपरः।

लेखन व स्नेहन पुटपाक कोमट असतांनाच धारण करावे. व प्रसादन पुटपाक थंड झाल्यावर धारण करावा.

धूमपोऽन्ते तयोरेव

स्नेहन व लेखन पुटपाकानंतर मात्र धूम्रपान करावें, प्रसादनानंतर करूं नये.

योगास्तत्र च तृप्तिवत् ॥ २० ॥

तर्पणाप्रमाणेंच पुटपाकाचेहि न्यूनाधिक व सम्यग्योग झाल्याचीं लक्षणें जाणावीं.

तर्पणं पुटपाकं च नस्यानर्हे न योजयेद्।

जे नस्य देण्याला योग्य नाहींत, त्यांजवर तर्पण व पुटपाक यांचीहि योजना करूं नये.

यावन्त्यहानि युञ्जीत द्विस्ततो हितभाग्भवेत् ॥ २१ ॥

जितके दिवस तर्पण व पुटपाक यांचा उपयोग करावयाचा त्याच्या दुप्पट दिवस पथ्यानें राहावें.

मालतीमल्लिकापुष्पैर्बद्धाक्षो निवसेन्निशि।

त्यांचा उपयोग चालू असतांना रात्रीं निजते वेळीं मालतीचीं किंवा मोगरीचीं फुलें डोळ्यांवर बांधावीं.

सर्वात्मना नेत्रबलाय यत्नं कुर्वीत नस्याञ्जनतर्पणाद्यैः।
दृष्टिश्च नष्टा विविधं जगच्च तमोमयं जायत एकरूपम् २२

नेत्रांचें बल राखण्याकरितां नस्य, अंजन व तर्पण इत्यादिकांचे योगानें सर्वस्वीं झटावें; कारण दृष्टीचा जर नाश झाला तर एका क्षणांत विविधरूपात्मक सर्व जगत् तमोमय व एकरूप होऊन जातें.

---

# पञ्चविंशतितमोऽध्यायः

## अध्याय २५ वा

### अथातो यन्त्रविधिमध्यायं व्याख्यास्यामः।

आतां यंत्रविधीसंबंधीं अध्याय सांगतों.

नानाविधानां शल्यानां नानादेशप्रबाधिनाम्।
आहर्तुमभ्युपायो यस्तद्यन्त्रं यच्च दर्शने ॥ १ ॥

अर्शोभगन्दरादीनां* शस्त्रक्षाराग्नियोजने।
शेषाङ्गपरिरक्षायां तथा वस्त्यादिकर्मणि ॥ १ ॥
घटिकालाबुशृङ्गं च जाम्बवोष्ठादिकानि च।

शरीरांतील निरनिराळ्या भागांना पीडा करणारीं जीं नानाप्रकारचीं शल्यें तीं काढून टाकणें; मूळव्याध, भगंदर इत्यादि आंतील रोग पाहणें; शस्त्र, क्षार व अग्नि यांची योजना करतांना निरोगी भागाचें रक्षण करणें; तसेंच बस्ति, नस्य, इत्यादिकांचा उपयोग करणें, ह्या क्रियांना साधनीभूत जे पदार्थ ते व वाटी, तुंबडी, शिंग व जांबवोष्ठादिक पदार्थ ह्या सर्वांना यंत्र अशी संज्ञा आहे.

अनेकरूपकार्याणि यन्त्राणि विविधान्यतः ॥ ३ ॥
विकल्प्य कल्पयेद्बुद्ध्या

ज्यांचे आकार व कार्यें अनेक आहेत, अशीं जीं नानाप्रकारचीं यंत्रें, तीं तें तें कार्य लक्षांत आणून तयार करावीं.

यथास्थूलं तु वक्ष्यते।

येथें त्याचें स्थूल दृष्टीनें मात्र वर्णन केलें आहे.

तुल्यानि कङ्कसिंहर्क्षकाकादिमृगपक्षिणाम् ॥ ४ ॥
मुखैर्मुखानि यन्त्राणां कुर्यात्तत्संज्ञकानि च।
अष्टादशाङ्गुलायामान्यायसानि च भूरिशः ॥ ५ ॥
मसूराकारपर्यन्तैः कण्ठे बद्धानि कीलकैः।
विद्यात्स्वस्तिकयन्त्राणि मूलेऽङ्कुशनतानि च ॥ ६ ॥
तैर्दृढैरस्थिसंलग्नशल्याहरणमिष्यते।

यंत्रांचीं तोंडें कंकपक्षी, सिंह, अस्वल, कावळा इत्यादि मृगपक्ष्यांच्या तोंडांप्रमाणें करवून त्यांच्या संज्ञाहि त्या त्या प्राण्यांवरूनच याव्या. स्वस्तिक यंत्रें प्रायः लोहमय असून त्यांची लांबी अठरा बोटें असते. व त्यांच्या सांध्यांत मसुरेच्या डाळीइतक्या व्यासाचे खिळे बसविले असून त्यांच्या मूलभागीं अंकुशाप्रमाणें बांक असतो. तीं मजबूत असल्यामुळें अस्थिगत शल्य काढण्याच्या उपयोगी पडतात.

कीलबद्धविमुक्ताग्रौ सन्दंशौ षोडशाङ्गुलौ ॥ ७ ॥
त्वङ्शिरास्नायुपिशितलग्नशल्यापकर्षणौ।

सांडस [ संदेश यंत्रें ] दोन प्रकारचेः—खिळ्यानें सांधलेले व खुले. ते सोळा बोटें लांब असून त्वचा, शिरा, स्नायु व मांस यांतील शल्य काढण्याचे उपयोगी पडतात.

षडङ्गुलोऽन्यो हरणे सूक्ष्मशल्योपपक्ष्मणाम् ॥ ८ ॥

दुसरा एक सहा बोटें लांब सांडस असतो. तो सूक्ष्म शल्यें [ नेत्र नासिकादि भागांतील ] व पडकेंस काढण्याचे उपयोगी पडतो.

मुचुण्डी सूक्ष्मदन्तर्जुर्मूले रुचकभूषणा।
गम्भीरव्रणमांसानामर्मणः शेषितस्य च ॥ ९ ॥

मुचुंडीनामक सांडस बारीक दांतांचा व सरळ असून त्याच्या मूळभागीं दोन वळीं केलेलीं असतात. व तो गंभीरव्रणांतील मांस व अर्श रोग ( मुखुलावर वाढणारें मांस ) कापल्यावर शिल्लक राहिलेलें मांस काढण्याच्या उपयोगी पडतो.

द्वे द्वादशाङ्गुले मत्स्यतालवदेकतालके।
तालयन्त्रे स्मृते कर्णनाडीशल्यापहारिणी ॥ १० ॥

तालयंत्रें दोन प्रकारचीः—एकतालक व द्वितालक. त्यांचा आकार माशांच्या खवल्याप्रमाणें व लांबी बारा बोटें असून तीं कानांतील शल्य काढण्याच्या उपयोगी पडतात.

नाडीयन्त्राणि सुषिराण्येकानेकमुखानि च।
स्रोतोगतानां शल्यानामामयानां च दर्शने ॥ ११ ॥
क्रियाणां सुकरत्वाय कुर्यादाचूषणाय च।
तद्विस्तारपरीणाहदैर्घ्यं स्रोतोऽनुरोधतः ॥ १२ ॥

नाडीयंत्रें पोकळ व एक किंवा अनेक तोंडांचीं असून तीं कर्णादि स्रोतसांतील शल्यें व रोग पाहण्याकरितां, शस्त्रक्षारादि क्रियेच्या सोईकरितां व त्वचेंत शिरलेलें विष वगैरे चोखून काढण्याकरितां केलीं असतात. त्यांची लांबी, रुंदी व परिघ त्या त्या स्रोतास अनुलक्षून असावीं.

दशाङ्गुलार्धनाहातःकण्ठशल्यावलोकने।
नाडी

कण्ठगत शल्य पाहण्याकरितां जें नाडीयंत्र करावयाचें त्याची लांबी दहा बोटें व परिघ पांच बोटें असावा.

पञ्चमुखच्छिद्रा चतुष्कर्णस्य संग्रहे ॥ १३ ॥
वारङ्गस्य द्विकर्णस्य त्रिच्छिद्रा तत्प्रमाणतः।

चतुष्कर्ण वारंग ( बाण वगैरेचा दांडा ) धरण्याकरितां जें नाडीयंत्र करावयाचें त्यास पांच तोंडें ( छिद्रें असावीं ) व द्विकर्ण वारंग धरण्याकरितां जे करावयाचे त्यांस तीन छिद्रें असावीं.

वारङ्गकर्णसंस्थानानाहदैर्घ्यानुरोधतः ॥ १४ ॥
नाडीरेवंविधाश्चान्या द्रष्टुं शल्यानि कारयेत्।

ह्याच जातीच्या दुसऱ्या नाड्या ज्या शल्यदर्शनार्थ करावयाच्या त्यांचा आकार, लांबी व परिघ वारंगकर्णानुरूप असावा.

पद्मकर्णिकया मूर्ध्नि सदृशी द्वादशाङ्गुला ॥ १५ ॥
चतुर्थसुषिरा नाडी शल्यनिर्घातिनी मता।

शल्यनिर्घातिनी नामक ( शल्य हलविणारी ) नाडी ( नाडीयंत्र ) बारा अंगुळें लांब असून तिच्या छिद्रांचा परिघ तीन बोटें असतो व तिचें एक टोंक कमळाच्या वाटीसारखें असतें.

अर्शसां गोस्तनाकारं यन्त्रकं चतुरङ्गुलम् ॥ १६ ॥
नाहे पञ्चाङ्गुलं पुंसां प्रमदानां षडङ्गुलम्।

---

* यांत 'अर्शोभगन्दरादीनां' असें षष्ठ्यंत पद आहे त्याचा संबंध आम्हीं 'दर्शने' याजकडे लाविला आहे व अरुणदत्तानें त्या सामासिक पदाचा संबंध 'शस्त्रक्षाराग्नियोजने' याजकडे लाविला आहे. दोन्ही तऱ्हेचा अर्थ संभवनीय असून फारसा फरक नाहीं.

द्विच्छिद्रं दर्शने व्याधेरेकच्छिद्रं तु कर्मणि ॥ १७ ॥
मध्येऽस्य त्र्यङ्गुलं छिद्रमङ्गुष्ठोदरविस्तृतम् ।
अर्धाङ्गुलोच्छ्रितोद्वृत्तकर्णिकं तु तदूर्ध्वतः ॥ १८ ॥

अर्शोयंत्र गोस्तनाकार व चार बोटें लांब असतें. पुरुषांकरितां असल्यास त्याचा परिघ पांच बोटें व स्त्रियांकरितां असल्यास सहा बोटें असतो. व्याधिदर्शनार्थ जें अर्शोयंत्र असतें तें आरपार असून, जें शस्त्रक्षारादिक्रियेकरितां केलें असतें त्यास एका बाजूनेंच छिद्र असतें. अर्शोयंत्राच्या मध्यभागीं एक तीन बोटें लांब अंगठ्याइतक्या रुंदीचें छिद्र असतें. अर्शोयंत्राच्या वरच्या टोंकास एक अर्धांगुल रुंदीचा ओंठ ( कांठ ) असतो.

शम्याख्यं तादृगच्छिद्रं यन्त्रमर्शः प्रपीडनम् ।

मूळव्याधीचे मोड दाबण्याकरितां जें नाडीयंत्र असतें, तें वर सांगितल्याप्रमाणेंच असून त्यास मधलें छिद्र मात्र नसतें व त्यास शमी अशी संज्ञा आहे.

सर्वथापनयेदोष्ठं छिद्रादूर्ध्वं भगन्दरे ॥ १९ ॥

अर्शोयंत्राच्या छिद्राचा वरचा कांठ काढून टाकला म्हणजे भगंदरयंत्र होतें.

घ्राणार्बुदार्शसामेकच्छिद्रा नाड्यङ्गुलद्वया ।
प्रदेशिनीपरीणाहा स्याद्भगन्दरयन्त्रवत् ॥ २० ॥

नाकांतील अर्बुद व मोड भाजण्याकरितां जें नाडीयंत्र करणें तें भगंदरयंत्राप्रमाणेंच असून दोन बोटें लांब व तर्जनीइतकें जाड असावें व तिला एकच भोंक असावें.

अङ्गुलित्राणकं दान्तं वार्क्षं वा चतुरङ्गुलम् ।
द्विच्छिद्रं गोस्तनाकारं तद्वक्त्रविवृतौ सुखम् ॥ २१ ॥

अंगुलित्राणकयंत्र लाकडाचें किंवा हस्तिदंताचें व गोस्तनाकार असून त्याची लांबी चार बोटें व छिद्रें दोन असावीं. त्याचे योगानें दांतखिळी बसली असतां तोंड सहज उघडतां येतें ( व तें त्या वेळीं दांतांची बोटास इजा होऊं देत नाहीं म्हणून त्यास वरील संज्ञा आहे. )

योनिव्रणेक्षणं मध्ये सुषिरं षोडशाङ्गुलम् ।
मुद्रावद्धं चतुर्भित्तमम्भोजमुकुलाननम् ॥ २२ ॥
चतुःशलाकमाक्रान्तं मूले तद्विकसेन्मुखे ।

योनिव्रणेक्षणयंत्र सोळा बोटें लांब, मध्यें पोकळ, कमळाच्या कळीच्या आकाराचें, चार पाकळ्यांचें व चार शलाकांनीं युक्त असून त्याजवर एक वरून खालीं हलणारें कडें बसविलेलें असतें व मुळाकडे दावलें असतां त्याचें तोंड उघडतें.

यन्त्रे नाडीव्रणाभ्यङ्गक्षालनाय षडङ्गुले ॥ २३ ॥
वस्तियन्त्राकृती मूले मुखेऽङ्गुष्ठकलायखे ।
अग्रतोऽकर्णिके मूले निवद्धमृदुचर्मणी ॥ २४ ॥

नाडीव्रण धुण्याकरितां व त्यांत तेल सोडण्याकरितां जीं यंत्रें ( पिचकाऱ्या ) करणें तीं बस्तियंत्राकार सहा बोटें लांब व ज्यांचें मूलछिद्र अंगुष्ठप्रमाण व तोंड वाटाण्याएवढें अग्रभागीं कर्णिकारहित व मूलभागीं मऊ चामड्याचा फुगा जोडलेलीं अशीं असावीं.

द्विद्वारा नलिका पिच्छनलिका वोदकोदरे ।

जलोदरांतील पाणी काढण्याकरितां जी नळी करणें ती दुतोंडी असावी किंवा ती मोराच्या पिसाची असली तरी चालेल.

धूमवस्त्यादियन्त्राणि निर्दिष्टानि यथायथम् ॥ २५ ॥

धूमयंत्र व बस्तियंत्र इत्यादि यंत्रें त्या त्या प्रकरणीं वर्णिलीं आहेत.

त्र्यङ्गुलास्यं भवेच्छृङ्गं चूषणेऽष्टादशाङ्गुलम् ।
अग्रे सिद्धार्थकच्छिद्रं सुवन्द्धं चूचुकाकृति ॥ २६ ॥

दूषित रक्तादि चोखून ( ओढून ) काढण्याकरितां जें शिंग करावयाचें त्याची लांबी अठरा बोटें असून त्याचें अग्रछिद्र एक शिरसाचा दाणा मावण्याजोगें चूचुकाकृति ( स्त्रीकुचाग्राप्रमाणें ) व चांगलें गुळगुळीत टोपण बसविलेलें असावें.

स्याद्द्वादशाङ्गुलोऽलाबुर्नाहे त्वष्टादशाङ्गुलः ।
चतुस्त्र्यङ्गुलवृत्तास्यो दीप्तोऽन्तः श्लेष्मरक्तहृत् ॥ २७ ॥

अलाबूची ( तुंबडीची ) लांबी बारा बोटें, परिघ अठरा बोटें व तोंड वाटोळें व तीन चार बोटें परिघाचें असावें. तिच्या आंत कापूस वगैरे पदार्थ पेटविला असतां ती कफदूषित रक्त काढून टाकण्याच्या उपयोगी पडते.

तद्वद् घटी हिता गुल्मविलयोन्नमने च सा ।

घटीयंत्राचा आकार, क्रिया वगैरे तुंबडीसारखाच असून तें गुल्म वितळविण्याच्या व तो वर उचलण्याच्या उपयोगी पडतें.

शलाकाख्यानि यन्त्राणि नानाकर्माकृतीनि च ॥ २८ ॥
यथायोगप्रमाणानि

शलाकानामक यंत्राचे आकार व कर्मे नानाविध असून त्यांचें प्रमाण कार्यानुरूप असतें.

तेषामेषणकर्मणि ।

उभे गण्डूपदमुखे

त्यांपैकीं दोहोंचें तोंड गांडुळाप्रमाणें असून त्या रोगस्थान तपासण्याचे उपयोगी पडतात.

स्रोतोभ्यः शल्यहारिणी ॥ २९ ॥

मसूरदलवक्रे द्वे स्याताम्ष्टनवाङ्गुले ।

स्रोतसांतील शल्य काढण्याकरितां ज्या दोन शलाका असतात त्यांचीं तोंडें मसुराच्या डाळीप्रमाणें व लांबी आठ नऊ बोटें असते.

शङ्कवः षट्

शंकु सहा असावे.

उभौ तेषां षोडशद्वादशाङ्गुलौ ॥ ३० ॥

व्यूहनेऽहिफणावक्रौ

त्यांपैकीं दोन सोळा व बारा बोटें लांब असून त्यांचीं तोंडें

सापाच्या फडेसारखीं असतात व ते शल्यादिक इच्छितदिशेकडे वळविण्याच्या उपयोगी पडतात.

द्वौ दशद्वादशाङ्गुलौ ।

चालने शरपुङ्खास्यौ

दोन शंकु दहा व बारा बोटें लांब असून त्यांचीं तोंडें बाणाच्या पिसाऱ्या ( मागल्या भागा ) प्रमाणें असतात व ते शल्यादिक चाळविण्याच्या कामीं उपयोगी पडतात.

आहार्ये बडिशाकृती ॥ ३१ ॥

आंकड्यांच्या [ गळाच्या ] आकाराचे दोन शंकु असतात, त्यांचा उपयोग शल्यादिक ओढण्याचे कामीं होतो.

नतोऽग्रे शङ्कुना तुल्यो गर्भशङ्कुरिति स्मृतः ।

अष्टाङ्गुलायतस्तेन मूढगर्भं हरेत् स्त्रियः ॥ ३२ ॥

अग्रभागीं वांकलेलें व शंकूच्या आकाराचें आठ बोटें लांब एक यंत्र असतें, त्यास गर्भशंकु म्हणतात. त्यानें स्त्रियेचा मूढगर्भ काढावा.

अश्मर्याहरणे सर्पफणावद्वक्रमग्रतः ।

मुतखडा काढण्याकरितां जें यंत्र असतें तें अग्रभागीं सापाच्या फडेसारखें वक्र असतें ( त्याचें नांवहि सर्पफणाच आहे ).

*शरपुङ्खमुखं दन्तपातनं चतुरङ्गुलम् ॥ ३३ ॥

शरपुंखमुखनामक यंत्र चार बोटें लांब असून दांत उपटून काढण्याच्या उपयोगी पडतें ( त्याच्या तोंडाचा आकार बाणाच्या पुडासारखा असतो. )

कार्पासविहितोष्णीषाः शलाकाः षट् प्रमार्जने ।

क्षारक्लेदादिक पुसून काढण्याकरितां सहा शलाका असतात, त्यांच्या टोंकांस कापूस गुंडाळलेला असतो.

पायावासन्नदूरार्थे द्वे दशद्वादशाङ्गुले ॥ ३४ ॥

त्यांपैकीं गुदसंबंधीं जवळच्या किंवा लांबच्या क्रियेकरितां ज्या दोन शलाका असतात त्यांची लांबी अनुक्रमें १० किंवा १२ बोटें असते.

द्वे षट्सप्ताङ्गुले घ्राणे

नासिकासंबंधीं क्रियेकरितां ज्या दोन शलाका असतात, त्यांची लांबी सहा किंवा सात बोटें असते.

द्वे कर्णेऽष्टनवाङ्गुले ।

व कर्णसंबंधाच्या दोहींची लांबी आठ नऊ बोटें असते.

कर्णशोधनमश्वत्थपत्रप्रान्तं स्रुवाननम् ॥ ३५ ॥

कर्णशोधनयंत्राचें तोंड यज्ञांतील चमचासारखें असून त्याचा आकार पिंपळाच्या पानासारखा असतो.

* ह्या अध्यायांत जीं यंत्रें सांगितलीं आहेत त्यांतील बहुतेकांचीं चित्रें शेवटीं दिलीं आहेत. भाषांतरांतील वर्णन वाचून तीं तीं चित्रें पाहिलीं म्हणजे त्याचें स्वरूप चांगलें लक्षांत येईल. शरपुंखमुख हें यंत्र दांत उपटण्याचे उपयोगी पडतें म्हणून जें लिहिलें आहे त्याचा अर्थ इतकाच कीं, दांत उपटण्यापूर्वी तो हलवून मुळापासून सोडविण्याकरितां त्याचा उपयोग होतो.

शलाकाजाम्बवोष्ठानां क्षारेऽग्नौ च पृथक् त्रयम् ।

युञ्ज्यात् स्थूलाणुदीर्घाणां

लठ्ठ, बारीक व लांब अशा क्षार लावण्यासाठीं तीन सळया व डाग देण्याकरितां असेच तीन* जांब ओष्ठ असावे. त्यांचा स्थानपरत्वें उपयोग करावा.

शलाकामन्त्रवर्त्मनि ॥ ३६ ॥

मध्योर्ध्ववृत्तदण्डां च मूले चार्धेन्दुसन्निभाम्† ।

अंतर्गळांत उपयोगी पडण्यासाठीं जी शलाका करतात तिचा दांडा मध्यभागीं उभा व वाटोळा असून ती मूळभागीं अर्धचंद्राकार असते.

कोलास्थिदलतुल्यास्या नासार्शोऽर्बुददाहकृत् । ३७ ।

नाकांतील अर्बुद व मोड भाजण्यासाठीं बोराच्या बीच्या डाळिंबीसारख्या तोंडाची शलाका असावी.

अष्टाङ्गुला निम्नमुखा तिस्रः क्षारौषधक्रमे ।

कनीनीमध्यमानामिनखमानसमैर्मुखैः ॥ ३८ ॥

क्षार वगैरे लावण्यासाठीं आठ बोटें लांबीच्या खोलगट तोंडाच्या तीन शलाका असतात. त्यांचीं तोंडें करंगळी, मधलें बोट व अनामिका ( करंगळीजवळचें बोट ) यांच्या नखांच्या प्रमाणाचीं असावीं.

स्वंस्वमुक्तानि यन्त्राणि मेढ्रशुद्ध्यञ्जनादिषु ।

उत्तरबस्ति व अंजन वगैरेचीं यंत्रें त्या त्या प्रकरणीं सांगितलीं आहेत.

अनुयन्त्राण्ययस्कान्तरज्जुवस्त्राश्वमुद्गराः ॥ ३९ ॥

वर्ध्रान्त्रजिह्वाबालाश्च शाखानखमुखद्विजाः ।

कालः पाकः करः पादौ भयं हर्षश्च तत्क्रियाः ॥ ४० ॥

उपायवित्प्रविभजेदालोच्य निपुणं धिया ।

लोहचुंबक, दोरी, वस्त्र, दगड, मोगर ( मुद्गर ), वादी, आंतडें, जीभ, केंस, झाडाची फांदी, नखें, तोंड, दांत, काल, पाक ( पिकणें ), हात, पाय, भीति व आनंद हीं उपयंत्रें होत. त्यांचीं निरनिराळीं कामें तजविजीनें पाहून त्याप्रमाणें मोठ्या शहाणपणानें त्यांचा उपयोग करावा.

निर्घातनोन्मथनपूरणमार्गशुद्धि-‡

* डाग देण्याकरितां जांबळाच्या आकाराचा एक खिळा.

† अंतर्गळांत डाग देण्याकरितां जी शलाका करितात तिचा दांडा मध्यभागीं असतो ( भाषांतरांतील मध्यभागीं याचा संबंध 'उभा व वाटोळा' याचेकडे नाहीं ).

‡ यांतील 'मार्गशुद्धि' शब्दाचा अर्थ रस्ता साफ करणें असा केला आहे, परंतु तेवढ्यानें वास्तविक अर्थ लक्षांत येणार नाहीं; म्हणून येथें इतकेंच सांगणें जरूर आहे कीं, शरीरांतील रस्ते म्हणजे मलमूत्रादिकांचे मार्ग किंवा तद्वाहक नळ्या, 'उन्मथन' शब्दाचा अर्थ घुसळणें किंवा घुसळण्यासारखी क्रिया करणें, म्हणजे शरीरांत गूढ झालेल्या शल्याला सळई वगैरेनें हलविणें ( प्रनष्टस्य शल्यस्य मार्गे शलाकादिभिरालोडनमिति डल्लनः ). संव्यूहन शब्दाचा अर्थ इच्छित जागीं ठेवणें ( म्हणजे नेणें ) असा केला आहे. डल्लनाच्या मतें त्याचा अर्थ ऊर्ध्वीकरण असा होतो.

संव्यूहनाहरणबन्धनपीडनानि ।
आचूषणोजमननामनचालभङ्ग-
व्यावर्तनर्जुकरणानि च यन्त्रकर्म ॥ ४१ ॥

हलविणें, घुसळणें, भरणें, रस्ता साफ करणें, इच्छित जागीं ठेवणें, काढून टाकणें, बांधणें, दाबणें, चोखणें, वर उचलणें, खालीं बसविणें, चाळविणें, मोडणें, फिरविणें व सरळ करणें हीं यंत्रांचीं कामें होत.

निवर्तते साध्ववगाहते च
ग्राह्यं गृहीत्वोद्धरते च यस्मात् ।
यन्त्रेष्वतः कङ्कमुखं प्रधानम्
स्थानेषु सर्वेष्वधिकारि यच्च ॥ ४२ ॥

ज्या अर्थीं कंकमुखयंत्र सहज आंत जातें, सहज बाहेर येतें व ज्याला पकडावयाचें त्यास पकडून सहज बाहेर काढून टाकतें, त्या अर्थीं आणि सर्व ठिकाणीं त्याचा उपयोग करतां येतो म्हणून तें सर्व यंत्रांत श्रेष्ठ होय.

---

# षड्विंशोऽध्यायः

## अध्याय २६ वा

### अथातः शस्त्रविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां शस्त्रविधीविषयीं अध्याय सांगतों,

षड्विंशतिः सुकर्मारैर्घटितानि यथाविधि ।
शस्त्राणि रोमवाहीनि बाहुल्येनाङ्गुलानि षट् ॥ १ ॥
सुरूपाणि सुधाराणि सुग्रहाणि च कारयेत् ।
अकरालानि सुध्मातसुतीक्ष्णावर्तितेऽयसि ॥ २ ॥
समाहितमुखाग्राणि नीलाम्भोजच्छवीनि च ।
नामानुगतरूपाणि सदा सन्निहितानि च ॥ ३ ॥
* स्वोन्मानार्धचतुर्थांशफलान्येकैकशोऽपि च ।
प्रायो द्वित्राणि युञ्जीत तानि स्थानविशेषतः ॥ ४ ॥

पोलादाचीं, चांगल्या लोहारानें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें केलेलीं, केसांवर चालण्यासारखीं, बहुशः ६ अंगुलें लांबीचीं २६ शस्त्रें असावीं. तीं सुरेख असून चांगल्या धारेचीं व हातानें धरण्यास सुलभ पडतील अशीं करावीं. तीं वांकडीं नसावीं. त्यांचीं पानें मुठींत घट्ट बसविलेलीं असावीं; त्यांना रंग ( पाणी ) निळ्या कमळाच्या कांतीसारखा असून त्यांचे आकार त्या त्या नांवाप्रमाणें

---

* यांतील ‘स्वोन्मानार्धचतुर्थांशफलानि’ ह्या पदाचा अर्थ आम्हीं दोन्ही टीकाकारांहून फार भिन्न रीतीनें केला आहे. हें शस्त्राचें विशेषण आहे. ह्या सामासिक पदांतील अर्धचतुर्थांश ह्या शब्दाचा अर्थ करण्यामध्यें अरुणदत्त तर पुरतेपणीं चुकला आहे व हेमाद्रीनें जो अर्थ केला आहे तो जरी मानाच्या संबंधानें चुकीचा नाहीं तरी फारसा सयुक्तिक नाहीं. ‘अर्धचतुर्थांश’ या शब्दाचे एकंदर तीन प्रकारचे अर्थ संभवतात. पहिला अर्थ ‘साडे तिसरा अंश’ दुसरा अर्थ ‘अष्टमांश’ ( अर्ध जें त्याचा चतुर्थांश ) व तिसरा अर्थ ‘अर्धा किंवा चवथा अंश’ ( अर्ध वा चतुर्थं वा असा संख्येभयपद बहुव्रीहि समास करून ). याप्रमाणें जे तीन अर्थ संभवनीय आहेत, त्यांपैकीं अरुणदत्तानें दुसऱ्या प्रकारचा अर्थ केला आहे, परंतु त्यानें जो फलितार्थ दिला आहे तो अगदीं चुकीचा आहे. कारण तो म्हणतो कीं, अंगुलाचा अष्टमांश म्हणजे. १० २/७ यव. हें कोणत्या गणितानें अरुणदत्तानें काढलें आहे हें त्याचें त्यास ठाऊक. कोणत्याहि संस्कृत ग्रंथांत पाहिलें तरी ८ यवांचें एक अंगुल धरलेलें आढळतें. त्या मानानें ६ अंगुलांचा अष्टमांश म्हणजे ६ यव होतात. कदाचित् आठांच्या ठिकाणीं सहा यवांचें अंगुल धरलें असलें ( कारण कित्येकांच्या मतें सतुष यव धरल्यास ते १ अंगुलांत ६ मावतात व निस्तुष धरल्यास आठ मावतात ) तरी त्या मानानें देखील ६ अंगुलांचा अष्टमांश म्हणजे साडेचार यव होतात; १० २/७ यव होण्याला १३ ५/७ यवांचें १ अंगुल धरावें लागतें. परंतु असें विषम प्रमाण ह्याच नव्हे पण दुसऱ्या कोणत्याहि कोटकांत आढळत नाहीं. तेव्हां अरुणदत्ताचा अर्थ अगदीं चुकला आहे हें उघड आहे. आतां याच, रीतीनें हेमाद्रीहि चुकला आहे असें म्हटलें असतें. परंतु त्याला सुटण्यास कांहीं तरी अवकाश आहे. तो असा कीं, त्यानें जरी १० २/७ यव असाच फलितार्थ दिला आहे तरी ज्याअर्थीं अर्धचतुर्थांश याचा अर्थ अष्टमांश असा स्पष्ट लिहिला नाहीं, त्याअर्थीं त्या पदाचा ‘साडेतिसरा अंश’ असाच अर्थ त्यानें केला असेल व ६ यवांचें १ अंगुल धरलें असेल अशी कल्पना केल्यास त्यानें दिलेल्या फलितार्थास बाध येत नाहीं; कारण ह्या दोन्ही गोष्टी घेऊन चालल्यास ६ अंगुलें म्हणजे ३६ यव व त्यांचा साडेतिसरा हिस्सा म्हणजे १० २/७ यव होतात हें उघडच आहे. वस्तुतः अर्धचतुर्थ याचा अर्थ सांडेतिसरा असें हेमाद्रीनें सांगितलें नाहींच. परंतु ह्या दोन्हीं टीकाकारांनीं १० २/७ ही संख्या आणली तरी कोठून याचा विचार करीत असतां वरील दोन प्रकार घेऊन चालल्यास ती निष्पन्न होते असें आम्हांस आढळून आलें; व त्यावरून आमचें असें अनुमान आहे कीं, ह्या दोघांहून पूर्वींच्या टीकाकारानें अर्धचतुर्थ याचा अर्थ संस्कृत पद्धतीस ( Idiom ) अनुसरून साडेतिसरा असा करून व ६ यवांचें एक अंगुल धरून १० २/७ यव अशी संख्या काढली असावी व ह्या दोघांहि टीकाकारांनीं ती अजाणतेपणानें आयतीच उचलली असावी. ती कशी निघाली याचा दोघांसहि ( निदान अरुणदत्तास तरी ) पत्ता नसल्यामुळें एक तर अर्धचतुर्थांश याचें अष्टमांश असें शब्दांतर करून पुरतेपणींच घसरला व दुसऱ्यानें त्याचा कांहींच पर्याय न देतां फक्त फलितार्थ मात्र देण्यामध्यें आपली जास्त सावधगिरी दाखविली. येथवर टीकाकारांच्या अर्थांविषयीं व त्यांतील घोटाळ्यांविषयीं झालें. आतां अर्धचतुर्थ याच्या तीन वेगळाल्या अर्थांपैकीं प्रस्तुत प्रसंगीं कोणता अर्थ जास्त जुळतो याचा थोडासा विचार करूं. पहिल्यानें साडेतिसरा अंश असा अर्थ घेतल्यास शस्त्राच्या पानाची लांबी सरासरीनें सुमारें १॥ अंगुलें येते; व अष्टमांश असा अर्थ घेतल्यास तर पाऊण अंगुलच येते; परंतु निरनिराळ्या शस्त्रांच्या पानांचीं जीं पुढें मानें दिलीं आहेत, त्यावरून पाहतां सरासरीचें मान ह्या दोहोंपैकीं एकाशींहि मिळत नाहीं. शिवाय अशा तऱ्हेचें सरासरीचें मान सांगण्यामध्यें कांहीं फायदाहि नाहीं. यास्तव आम्हीं प्रस्तुत पदांचा अर्थ वर सांगितल्यापैकीं शेवटच्या प्रकारें केला आहे. त्या अर्थाप्रमाणें कांहीं शस्त्रांचीं पानें प्रायः त्याच्या एकंदर लांबीच्या ( ६ अंगुलांच्या ) निमे व कांहींचीं चतुर्थांश सरासरीनें असतात. वृद्धिपत्रादि शस्त्रांचा पहिल्या प्रकारांत अंतर्भाव होतो व व्रीहिमुखादि शस्त्रांचा दुसऱ्या प्रकारांत अंतर्भाव होतो. इंग्रजी शस्त्रांपैकीं वृद्धिपत्रें पाहूं गेल्यास देखील वरील मानच जवळ जवळ आढळण्यांत येईल.

असावे. तयार झाल्यावर त्यांस सहाणेवर लावावें. पानांची लांबी शस्त्राच्या एकंदर लांबीच्या निम्में किंवा चौथाई असावी. तीं वैद्यानें नेहमीं जवळ बाळगून स्थानपरत्वें बहुधा एकाचा, दोहोंचा किंवा तिहींचा उपयोग करावा.

मण्डलाग्रं फले तेषां तर्जन्यन्तर्नखाकृति ।
लेखने छेदने योज्यं पोथकीशुण्डिकादिषु ॥ ५ ॥

त्यांत मंडलाग्र या नांवाचें शस्त्र खुपऱ्या ( पोथकी ), पडजीभ ( शुंडिका ) इत्यादिकांचें लेखन व छेदन करण्याच्या उपयोगी पडतें. त्याच्या पानाची आकृति अंगठ्याजवळील बोटा ( तर्जनी ) च्या नखाच्या मुळाजवळच्या पांढऱ्या भागा ( अंतर्नख ) सारखी असावी.

वृद्धिपत्रं क्षुराकारं छेदभेदनपाटने ।
ऋज्वग्रमुन्नते शोफे गम्भीरे च तदन्यथा ॥ ६ ॥
नताग्रं पृष्ठतो दीर्घह्रस्ववक्त्रं यथाशयम् ।

कापणें ( छेद ), फोडणें ( भेदन ) व फाडणें ( पाटन ) याकरितां चाकूसारखें वृद्धिपत्र नांवाचें शस्त्र असतें. त्याचे दोन प्रकार आहेत. त्वचेवरच्या सुजेवर चालविण्याकरितां सरळ अग्राचें एक व दुसरें, जी सूज त्वचेपासून खोल असते तिच्याकरितां असून पू वगैरेच्या आशयाप्रमाणें लांब किंवा आंखुड तोंडाचें व त्याचें अग्र पाठीकडून वळलेलें असें असावें.

उत्पलाध्यर्धधाराख्ये च्छेदने भेदने

कापण्याकरितां व फोडण्याकरितां उत्पलपत्र व अध्यर्धधार अशीं दोन शस्त्रें असावीं.

तथा ॥ ७ ॥

सर्पास्यं घ्राणकर्णार्शश्छेदनेऽर्धाङ्गुलं फले ।

त्याचप्रमाणें कानांतील अर्श कापण्याकरितां सर्पमुखनांवाचें शस्त्र असावें व त्याचें पान अर्धे अंगुळ असावें.

गतेरन्वेषणे श्लक्ष्णा गण्डूपदमुखैषिणी ॥ ८ ॥

नाडीव्रण तपासण्याकरितां गुळगुळीत असून गांडुळाच्या तोंडासारख्या तोंडाची केपणी नांवाची सळई असावी.

भेदनार्थेऽपरा सूचीमुखा मूलनिविष्टखा ।

फोडण्याकरितां दुसरी एक सळई असावी; तिचें अग्र सुईसारखें असून मागें एक भोंक असावें.

वेतसं व्यधने

वेध करण्याकरितां वेतसपत्र नांवाचें शस्त्र असावें.

स्राव्ये शरार्यास्यत्रिकूर्चके ॥ ९ ॥

शरारीमुख व त्रिकूर्चक हीं दोन शस्त्रें फासण्या टाकून रक्तस्राव करण्याकरितां उपयोगी पडतात.

*कुशाटीवदने स्राव्ये द्व्यङ्गुलं स्यात्तयोः फलम् ।

कुशमुख व आटीमुख हीं दोन शस्त्रांचीं पानें दोन अंगुलें लांबीचीं असून तींहि रक्तस्राव करण्याच्या उपयोगी पडतात.

तद्वदन्तर्मुखं तस्य फलमध्यर्धमङ्गुलम् ॥ १० ॥
अर्धचन्द्राननं चैतत्

तसेंच अंतर्मुखनामक अर्धचंद्रमुख एक शस्त्र आहे, त्याचें पान दीड अंगुल लांब असावें.

तथाऽध्यर्धाङ्गुलं फले ।
व्रीहिवक्त्रं प्रयोज्यं च तच्छिरोदरयोर्व्यधे ॥ ११ ॥

व्रीहिमुख नांवाच्या शस्त्राचें पान भाताच्या आकृतीसारखें असून दीड अंगुल लांब असतें व तें शिरावेध व उदरवेध करण्याच्या उपयोगी पडतें.

पृथुः कुठारी गोदन्तसदृशार्धाङ्गुलानना ।
तयोर्ध्वदण्डया विध्येदुपर्यस्थ्नां स्थितां शिराम् ॥ १२ ॥

कुठारी नामक शस्त्र जाड असून त्याचें पान गाईच्या दांतासारखें व अर्ध बोट रुंदीचें असतें. ( त्या कुठारीस दांडा असावा. ) तिचा दांडा वर करून हाडावर असणाऱ्या शिरेचा वेध करावा.

ताम्री शलाका द्विमुखी मुखे कुरुवकाकृतिः ।
लिङ्गनाशं तया विध्येत्

तांब्याची एक सळई असावी. तिचीं दोन्हीं टोकें तांबड्या कोरांटीच्या आकाराचीं असावीं. तिनें मोतीबिंदु दाबून खालीं सरकवावा.

कुर्यादङ्गुलिशस्त्रकम् ॥ १३ ॥
मुद्रिकानिर्गतमुखं फले स्वर्धाङ्गुलायतम् ।
योगतो वृद्धिपत्रेण मण्डलाग्रेण वा समम् ॥ १४ ॥
तत्प्रदेशिन्यग्रपर्वप्रमाणार्पणमुद्रिकम् ।
सूत्रबद्धं गलस्रोतोरोगच्छेदनभेदने ॥ १५ ॥

घशांतील रोग कापण्याकरितां व फोडण्याकरितां अंगुलिशस्त्र-नामक शस्त्र करावें. त्याचें पान त्या त्या रोगानुरूप व स्थानानुरूप वृद्धिपत्र किंवा मंडलाग्र यांच्या आकाराचें असून अर्धबोट लांबीचें असावें. तर्जनीच्या पुढल्या पेरांत बरोबर बसेल अशी एक अंगठी त्याच्या मुखाजवळ बसवावी व ती अंगठी तर्जनींत घातल्यावर तें हलूं नये म्हणून सुतानें बांधावें.

---

* 'कुशाटीवदने' हा एकच सामासिक शब्द कुशवदन ( कुशपत्र ) व आटीवदन ह्या दोन शस्त्रांचा वाचक असून अरुणदत्तानें भलत्याच रीतीनें अन्वय लावून कुशाटीनाम शस्त्रं वदने स्राव्ये योज्यम्। असा भलताच अर्थ दिला आहे. आमचा अर्थ सुश्रुत, वृद्ध वाग्भट व हेमाद्रीची टीका यांना अनुसरून आहे. हा जो अरुणदत्ताचा अन्वय व अर्थ तो डॉ० कुंटे यांनीं छापलेल्या पुस्तकांत आहे. इतर प्रतींतूनहि तो तसाच आहे किंवा कसें हें समजल्याशिवाय ही चूक टीकाकाराची किंवा तत्प्रकाशकाची हें सांगता येत नाहीं.

ग्रहणे शुण्डिकार्मादेर्बडिशं सुनताननम् ।

पडजीभ ( शुंडिका ) व डोळ्यांतील अर्मरोग ही धरण्याकरितां एक गळ ( बडिश ) असावा. त्याचें टोंक वांकलेलें असावें.

छेदेऽस्थ्नां करपत्रं तु खरधारं दशाङ्गुलम् ॥ १६ ॥
विस्तारे द्व्यङ्गुलं सूक्ष्मदन्तं सुत्सरुबन्धनम् ।

हाडें कापण्याकरितां तीक्ष्ण धारेनी, १० बोटें लांब व २ बोटें रुंद अशी एक करवती ( करपत्र ) असावी; तिला बारीक दांते असून चांगली बळकट मूठ असावी.

स्नायुसूत्रकचच्छेदे कर्तरी कर्तरीनिभा ॥ १७ ॥

स्नायु, सुतें व केंस कापण्याकरितां साधारण कातरीसारखीच एक कातर असावी.

वक्रर्जुधारं द्विमुखं नखशस्त्रं नवाङ्गुलम् ।
सूक्ष्मशल्योद्धृतिच्छेदभेदप्रच्छानलेखने ॥ १८ ॥

नखशस्त्र म्हणून एक शस्त्र असतें; तें नऊ बोटें लांब असून त्यास दोन तोंडें असतात. एकाची धार सरळ असते व एकाची वांकडी असते. बारीक शल्यें काढणें, नखें कापणें, फोडणें व तुंबडी वगैरे लावून रक्त काढण्यासाठीं फासण्या मारणें ( प्रच्छान ) व खरवडणें ( लेखन करणें ) या कामीं ह्याचा उपयोग होतो.

एकधारं चतुष्कोणं प्रवद्धाकृति चैकतः ।
दन्तलेखनकं तेन शोधयेद्दन्तशर्कराम् ॥ १९ ॥

दंतलेखनक नांवाचें एक चौकोनी शस्त्र असावें. त्याच्या एका बाजूस धार असावी व एक बाजू मुठीसारखी ( बोथट व जाड ) असावी. त्यानें दंतशर्करे ( दांतावर जमणाऱ्या कठिण खपल्या ) चें शोधन करितात.

वृत्ता गूढदृढाः पाशे तिस्रः सूच्योऽत्र सीवने ।
मांसलानां प्रदेशानां त्र्यस्रा त्र्यङ्गुलमायता ॥ २० ॥
अल्पमांसास्थिसन्धिस्थव्रणानां द्व्यङ्गुलायता ।
व्रीहिवक्त्रा धनुर्वक्रा पक्वामाशयमर्मसु ॥ २१ ॥
सा सार्धद्व्यङ्गुला

शिवण्याकरितां बळकट व लांब नेढ्याच्या वाटोळ्या तीन सुया असाव्या. त्यांत एक मांसल भागावरील व्रण शिवण्याकरितां त्रिधारी असून तीन बोटें लांब असावी; दुसरी अल्पमांसाच्या भागावरील, हाडांवरील, व सांध्यावरील व्रण शिवण्याकरितां दोन बोटें लांबीची असावी आणि तिसरी पक्वाशय, आमाशय व मर्मस्थानें यांवरील व्रणाकरितां धनुष्यासारखी वांकलेली असून अडीच बोटें लांब असावी. तिचें मुख भाताच्या आकाराचें असावें.

सर्ववृत्तास्ताश्चतुरङ्गुलाः ।
कूर्चो वृत्तैकपीठस्थाः सप्ताष्टौ वा सुबन्धनाः ॥ २२ ॥
संयोज्यो नीलिकाव्यङ्गकेशशातनकुट्टने ।

चार बोटें लांबीच्या वाटोळ्या ७ किंवा ८ सुया घेऊन त्या एका वाटोळ्या बुडाच्या मुठींत बळकट बसवाव्या; त्यांस कूर्च असें म्हणतात व त्यांचा उपयोग नीलिका ( त्वचेचा काळा डाग ), वांग व चाई ( केशशात ) या विकारांवर गोंदण्याविषयीं करितात.

अर्धाङ्गुलमुखैर्वृत्तैरष्टाभिः कण्टकैः खजः ॥ २३ ॥
पाणिभ्यां मथ्यमानेन घ्राणात्तेन हरेदसृक् ।

एक रवी ( खज ) असावी; तिला वाटोळे ८ कांटे असावे; त्यांची तोंडें अर्धबोट लांब असावीं. ती रवी नाकांत घालून दोन्हीं हातांनीं घुसळून रक्त काढण्याच्या उपयोगी पडते.

*व्यधनं कर्णपालीनां यूथिकामुकुलाननम् ॥ २४ ॥

कानाच्या पाळी टोंचण्याकरितां जुईच्या कळीसारख्या मुखानें कर्णव्यधननामक एक शस्त्र असतें.

आराधाङ्गुलवृत्तास्या तत्प्रवेशा तथोर्ध्वतः ।
चतुरस्रा तया विध्येच्छोफं पक्वामसंशये ॥ २५ ॥
कर्णपालीं च बहलां

सूज पक्व किंवा अपक्व आहे हें पाहण्याकरितां आरा नांवाचें शस्त्र असावें. त्याचा पुढला अर्धबोट भाग वाटोळा असून बाकीचा चौधारी ( चतुष्कोण ) असावा. फक्त वाटोळा भाग मात्र सोथांत शिरवावयाचा. तसेंच कानाच्या जाड पाळीचा वेधहि त्यानेंच करितात.

बहलायाश्च शस्यते ।
सूची त्रिभागसुषिरा त्र्यङ्गुला कर्णवेधनी ॥ २६ ॥

त्याचप्रमाणें जाड्या पाळीचा वेध करण्यासाठीं तीन अंगुळें लांबीची कर्णवेधनी म्हणून एक सुई असते; ती मागें सवादोन अंगुळें पोकळ असावी.

जलौकःक्षारदहनकाचोपलनखादयः ।
अलौहान्यनुशस्त्राणि तान्येवं च विकल्पयेत् ॥ २७ ॥
अपराण्यपि यन्त्रादीन्युपयोगं च यौगिकम् ।

जळवा, क्षार, अग्नि, कांच, दगड, नखें इत्यादि लोखंडावांचून होणारीं उपशस्त्रें होत; तीं व दुसरीं यंत्रादिक आपणांस जसजशीं पाहिजे असतील तसतशीं करावीं आणि त्यांचा उपयोगहि युक्तीनें हवा तसा करावा.

उत्पाट्यपाट्यसीव्यैषलेख्यप्रच्छानकुट्टनम् ॥ २८ ॥
छेद्यं भेद्यं व्यधो मन्थो ग्रहो दाहश्च तत्क्रियाः ।

उपटणें, फाडणें, शिवणें, तपासणें ( नाडीव्रणांची गति ), बारीक

---

* व्यधनं कर्णपालीनां यूथिकामुकुलाननम् । असा खरा पाठ असून अरुणदत्तानें 'व्यधने' व 'मुकुलानना' असा पाठ घेऊन यूथिकानामक एक शस्त्र स्वकपोलकल्पितच दिलें आहे. परंतु या नांवाचें शस्त्र कोणत्याहि उपलब्ध ग्रंथांत आढळत नाहीं. कर्णव्यधन नांवाचें शस्त्र मात्र सर्वत्र उपलब्ध आहे. वृद्धवाग्भटांत जां शस्त्रांची याद दिली आहे, तींत त्याची स्पष्ट गणना केली आहे व हेमाद्रीनेंहि ही गोष्ट लक्षांत आणून आम्हीं दिल्याप्रमाणेंच अन्वय व अर्थ दिला आहे ( किंवा आम्हींच त्यास अनुसरलों आहों असें म्हटलें तरी चालेल ).

रेघा करणें ( खरवडणें ), फासण्या मारून तुंबडगा लावणें, गोंदणें कापणें, फोडणें, टोंचणें ( वेध ), घुसळणें, धरणें आणि जाळणें हीं शस्त्रांचीं कर्में होत.

कुण्ठखण्डतनुस्थूलह्रस्वदीर्घत्ववक्रताः ॥ २९ ॥
शस्त्राणां खरधारत्वमष्टौ दोषाः प्रकीर्तिताः ।

बोथटपणा, भग्नत्व ( खंडत्व ), तनुत्व ( पातळपणा ), स्थूलत्व ( जाडपणा ), ऱ्हस्वत्व, दीर्घत्व, वक्रत्व व धार खोड पडलेलें ( खरधारत्व ) हे शस्त्रांचे आठ दोष आहेत.

छेदभेदनलेख्यार्थं शस्त्रं वृन्तफलान्तरे ॥ ३० ॥
तर्जनीमध्यमाङ्गुष्ठैर्गृह्णीयात्सुसमाहिताः ।

कापणें, फोडणें व रेघा करणें ( खरवडणें ) या कामांकरितां वैद्यानें मोठ्या सावधगिरीनें तर्जनी, मधलें बोट व अंगठा ह्या तीन बोटांनीं पान व मूठ यांच्यामध्यें शस्त्र धरावें.

विस्रावणानि वृन्ताग्रे तर्जन्यङ्गुष्ठकेन च ॥ ३१ ॥

रक्तादिकांचे स्राव करण्यासाठीं शस्त्रें तर्जनी व अंगठा या दोन बोटांनीं मुठीच्या अग्राजवळ धरावीं.

तलप्रच्छन्नवृन्ताग्रं ग्राह्यं व्रीहिमुखं मुखे ।

व्रीहिमुखशस्त्राच्या मुठीचें अग्र तळहाताखालीं झांकून घेऊन तें तोंडाजवळ धरावें.

मूलेष्वाहरणार्थे तु क्रियासौकर्यतोऽपरम् ॥ ३२ ॥

शल्यादिक बाहेर काढण्याकरितां जें शस्त्र धरावयाचें तें मुळाजवळ धरावें. तात्पर्य इतकेंच कीं, शस्त्रक्रिया करण्यास जसें सुलभ पडेल तसें शस्त्र धरून काम करावें.

स्यान्नवाङ्गुलविस्तारः सुघनो द्वादशाङ्गुलः ।
क्षौमपत्रोर्णकौशेयदुकूलमृदुचर्मजः ॥ ३३ ॥
विन्यस्तपाशः सुस्यूतः सान्तरोर्णास्थशस्त्रकः ।
शलाकापिहितास्यश्च शस्त्रकोशः सुसश्रयः ॥ ३४ ॥

शस्त्रें ठेवण्याच्या पिशवीला, शस्त्रकोश असें म्हणतात. तो बारा बोटें लांब व नऊ बोटें रुंद असून घट्ट असावा, व किंतान ( क्षौम ), धुवट रेशमी वस्त्र ( पत्रोर्ण ), दुसरीं उत्तम रेशमी वस्त्रें ( कौशेय व दुकूल ) व मऊ चामडें यांपैकीं कशाचा तरी केलेला असावा. अडकविण्यासाठीं त्यास एक दोरी लाविलेली असावी. तो चांगला शिवलेला असून आंत शस्त्रें ठेवण्यासाठीं लोंकर घालून प्रत्येक शस्त्राच्या आकारानुरूप खळगा राखलेल्या असाव्या. आंत बरींच शस्त्रें मावतील असा असून त्याचें तोंड एका काडीनें बंद केलेलें असावें.

जलौकसस्तु सुखिनां रक्तस्रावाय योजयेत् ।

ज्यास दुःख सोसण्याची संवय नाहीं त्याचें रक्त काढण्याकरितां जळवा लावाव्या.

दुष्टाम्बुमत्स्यभेकाहिशवकोथमलोद्भवाः ॥ ३५ ॥
रक्ताः श्वेता भृशं कृष्णाश्चपलाः स्थूलपिच्छिलाः ।
इन्द्रायुधविचित्रोर्ध्वराजयो रोमशाश्च ताः ॥ ३६ ॥
सविषा वर्जयेत्

नासलेल्या ( दुष्ट ) पाण्यांत व बेडूक, मासे, सर्प यांचीं कुजलेलीं प्रेतें आणि मळ यांनीं दुष्ट झालेल्या पाण्यांत तांबड्या, पांढऱ्या, अतिशय काळ्या, भावऱ्या, लठ्ठ, बुळबुळीत व केंसाळ असून ज्यांच्या अंगावर इंद्रधनुष्याप्रमाणें चित्रविचित्र उभ्या रेषा असतात, त्या जळवा विषयुक्त होत; म्हणून त्या घेऊं नयेत.

ताभिः कण्डूपाकज्वरभ्रमाः ।
विषपित्तास्रनुत्कार्यं तत्र

त्या ( विषयुक्त जळवा ) लाविल्या असतां कंडू, पाक ( व्रण पिकणें ), ताप व भ्रम हे विकार होतात. त्या विकारांवर विषनाशक व रक्तपित्तनाशक चिकित्सा करावी.

शुद्धाम्बुजाः पुनः ॥ ३७ ॥
निर्विषाः शैवलश्यावा वृत्ता नीलोर्ध्वराजयः ।
कषायपृष्ठास्तन्वङ्ग्यः किञ्चित्पीतोदराश्च याः ॥ ३८ ॥

स्वच्छ पाण्यांत झालेल्या असून ज्या शेवाळाप्रमाणें सांवळ्या रंगाच्या व वाटोळ्या असतात, ज्यांच्या अंगावर निळ्या उभ्या रेषा असून पाठी भगव्या रंगाच्या व पोटें किंचित् पिंवळीं असतात, आणि ज्या बारीक म्हणजे सडपातळ असतात, त्या निर्विष असें समजावें. त्या उत्तम होत.

ता अप्यसम्यग्वमनात् प्रततं च निपातनात् ।
सीदन्तीः सलिलं प्राप्य रक्तमत्ता इति त्यजेत् ॥ ३९ ॥

त्याहि ( निर्विष ) चांगल्या रीतीनें न पिळल्यानें व पुष्कळ वेळां लाविल्यानें रक्तमत्त ( रक्तानें मत्त ) झाल्या असतील तर लावूं नयेत. त्या पाण्यांत टाकिल्या असतां निश्चेष्ट होतात.

अथेतरा निशाकल्कयुक्तेऽम्भसि परिप्लुताः ।
अवन्तिसोमे तक्रे वा पुनश्चाश्वासिता जले ॥ ४० ॥
लागयेद् घृतमृत्स्तन्यशस्त्ररक्तनिपातनैः ।
पिबन्तीरुन्नतस्कन्धाश्छादयेन्मृदुवाससा ॥ ४१ ॥

वर सांगितल्याप्रमाणें परीक्षा करून ज्या चांगल्या असतील त्या घेऊन हळदीचा कल्क घातलेल्या पाण्यांत, कांजींत किंवा ताकांत घालाव्या; पुन्हां पाण्यांत घालून सावध झाल्यावर त्या ज्या जागीं लावावयाच्या असतील तेथें तूप अथवा माती किंवा स्तन्य ( स्त्रीदुग्ध ) लावून किंवा शस्त्रानें रक्त काढून नंतर लावाव्या. रक्त पिऊं लागून त्यांचा पुढला भाग उंच दिसूं लागला म्हणजे वर बारीक वस्त्र घालावें.

सम्पृक्ताद्दुष्टशुद्धास्राज्जलौका दुष्टशोणितम् ।
आदत्ते प्रथमं हंसः क्षीरं क्षीरोदकादिव ॥ ४२ ॥

मिसळलेल्या, शुद्ध व दुष्ट रक्तांतून जळू पहिल्यानें दुष्ट रक्त पितें; जसें पाणी घातलेल्या दुधांतून हंसपक्षी दूधच पितो.

दंशस्य तोदे कण्डां वा मोक्षयेद्वमयेच्च ताम् ।
पटुतैलाक्तवदनां श्लक्ष्णकण्डनरूक्षिताम् ॥ ४३ ॥

जळू लाविलेल्या जागीं शूल अथवा कंडू उत्पन्न झाल्यास ती सोडवावी व तिच्या तोंडास सैंधव व तेल लाविल्यावर तांदुळाच्या बारीक कोंड्यानें रूक्ष करून पिळावी ( त्यांचें अंग बुळबुळीत असतें त्यामुळें रूक्ष न केल्या तर हात सरेल ).

रक्षन् रक्तमदाद्भूयः सप्ताहं ता न पातयेत् ।

त्या रक्तमत्त न व्हाव्या यास्तव पुन्हां सात दिवसपर्यंत लावूं नयेत.

पूर्ववत् पटुता दार्ढ्यं सम्यग्वान्ते जलौकसाम् ॥४४॥

जळवा योग्य रीतीनें पिळल्या गेल्या म्हणजे पूर्वीप्रमाणें हुषार व दृढ होतात.

क्लमोऽतियोगान्मृत्युर्वा

अतिशय पिळल्या असतां मरगळल्यासारख्या होतात अथवा मरतात.

दुर्वान्ते स्तब्धता मदः ।

अयोग्यरीतीनें पिळल्या गेल्या तर त्या ताठतात व उन्मत्त होतात.

अन्यत्रान्यत्र ताः स्थाप्या घटे मृत्स्नाम्बुगर्भिणि ।४५।
लालादि कोथनाशार्थं सविषाः स्युस्तदन्वयात् ।

लाळ, मळ, मूत्र इत्यादिकांचें कुजणें बंद करण्यासाठीं माती व पाणी घातलेल्या निरनिराळ्या मडक्यांत त्यांस ठेवावें; एकत्र ठेविल्यानें लालादिकांच्या संपर्कामुळें त्या विषयुक्त होतात.

अशुद्धौ स्रावयेद्दंशान् हरिद्रागुडमाक्षिकैः ॥ ४६ ॥

दुष्टरक्ताचा स्राव बरोबर न झाला तर व्रणावर हळद, गूळ व मध एकत्र करून लावावीं म्हणजे अवशिष्ट दुष्ट रक्ताचा स्राव होऊं लागतो.

शतधौताज्यपिचवस्ततो लेपश्च शीतलाः ।

नंतर शतधौत तुपाचे बोळे दंशावर ठेवावे आणि दंशावर थंड लेप द्यावे.

दुष्टरक्तापगमनात्सद्यो रोगरुजां शमः ॥ ४७ ॥

दुष्टरक्त निघून गेल्यावर लागलाच रोग व ठणका कमी होतो.

अशुद्धं चलितं स्थानात् स्थितं रक्तं व्रणाशये ।
अम्लीभवेत्पर्युषितं तस्मात्तत्स्रावयेत्पुनः ॥ ४८ ॥

स्थानापासून निघालेलें अशुद्ध रक्त व्रणाशयांत राहून दुसऱ्या दिवशीं शिळें झाल्यामुळें पाकोन्मुख ( पिकूं लागल्याचीं स्थिति त्यास येते ) होतें म्हणून पुनः जळवा लावून तें काढून टाकावें.

युञ्ज्यान्नालाबुघटिका रक्ते पित्तेन दूषिते ।
तासामनलसंयोगात्

पित्तानें दुष्ट झालेलें रक्त काढण्यासाठीं अलाबु व घटिका यांचा उपयोग करूं नये, कारण त्यांस अग्नीचा संयोग लागतो.

युञ्ज्याच्च कफवायुना ॥ ४९ ॥

कफ व वायु यांनीं दुष्ट झालेलें रक्त अलाबु व घटिका यांनीं काढावें.

कफेन दुष्टरुधिरं न शृङ्गेण विनिर्हरेत् ।
रक्तघनत्वात्

कफानें दुष्ट झालेलें रक्त दाट असतें, म्हणून तें काढण्यासाठीं तुंबडी ( शृंग ) लावूं नये.

वातपित्ताभ्यां दुष्टं शृङ्गेण निर्हरेत् ॥ ५० ॥

वायु व पित्त यांनीं दुष्ट झालेलें रक्त तुंबडीनें काढावें.

गात्रं बद्ध्वोपरि दृढं रज्ज्वा पट्टेन वा समम् ।
स्नायुसन्ध्यस्थिमर्माणि त्यजन्प्रच्छानमाचरेत् ॥५१॥
अधोदेशप्रविसृतैः पदैरुपरिगामिभिः ।
न गाढघनतिर्यग्भिर्न पदे पदमाचरेत् ॥ ५२ ॥

ज्या ठिकाणचें रक्त काढावयाचें असेल त्याच्या वरचा भाग दोरीनें अथवा नवारीनें सर्व ठिकाणीं सारखा दाब पडेल अशा रीतीनें बांधावा; नंतर स्नायु, संधि, हाडें व मर्में सोडून खालून वर शिखराकार फासण्या मारीत जावें. ( खालच्या ओळींत जितक्या फासण्या असतील त्यांहून वरल्या ओळींत कमी कमी करीत जावें. ) त्या फार खोल, दाटीनें व वांकड्या नसाव्या. फासणीवर फासणी मारूं नये. अशा रीतीनें फासण्या मारून नंतर प्रच्छान ( तुंबडी किंवा घटी अथवा अलाबु लावून रक्त ओढणें ) करावें.

प्रच्छानेनैकदेशस्थं ग्रन्थितं जलजन्मभिः ।
हरेच्छृङ्गादिभिः सुप्तमसृग्व्यापि शिराव्यधैः ॥ ५३ ॥

एका जागीं जमलेलें रक्त प्रच्छानानें काढावें. गोठलेलें जळवा लावून, सांचून स्थिर झालेलें शृंगादिकांनीं व सर्व शरीरांतील रक्त बिघडलें असतां शिरावेध करून तें काढावें.

प्रच्छानं पिण्डिते वा स्यादवगाढे जलौकसः ।
त्वक्स्थेऽलाबुघटीशृङ्गं शिरैव व्यापकेऽसृजि ॥५४॥

अथवा घट्ट झालेलें रक्त प्रच्छानानें काढावें. त्वचेपासून खोल असलेलें रक्त काढण्यास जळवा लावाव्या. त्वचेंतील रक्त अलाबु, घटी व शृंग यांनीं काढावें व सर्वशरीरव्यापि दूषित रक्त काढण्यास शिरावेधच केला पाहिजे.

वातादिधाम वा शृङ्गजलौकोऽलाबुभिः क्रमात् ।

वायु, पित्त व कफ यांच्या स्थानांतील रक्त क्रमानें तुंबडी, जळवा व अलाबु यांनीं काढावें.

स्रुतासृजः प्रदेहाद्यैः शीतैः स्याद्वायुकोपतः ॥ ५५ ॥
सतोदकण्डूशोफस्तं सर्पिषोष्णेन सेचयेत् ।

रक्त काढल्यावर थंड लेप केल्यामुळें वायूचा प्रकोप होऊन पीडा ( तोद ), कंडु व सूज उत्पन्न होते. त्यावर तूप ऊन करून त्याची धार ठेवावी.

# सप्तविंशतितमोऽध्यायः

## अध्याय २७ वा

**अथातः सिराव्यधविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।**

आतां शिरावेध करण्याविषयीं अध्याय सांगतों.

**मधुरं लवणं किञ्चिदशीतोष्णमसंहतम् ।**
**पद्मेन्द्रगोपहेमाविशशलोहितलोहितम् ॥ १ ॥**
**लोहितं प्रवदेच्छुद्धं तनोस्तेनैव च स्थितिः ।**

गोड, किंचित् खारट, शीत नव्हे व उष्ण नव्हे असें व फार दाट नसणारें असें असून तांबडें कमळ, इंद्रगोप ( कीटविशेष ), मंजिष्ठेचा काढा, मेंढ्याचें व सशाचें रक्त यांसारखें लाल जें रक्त असतें तें शुद्ध समजावें. शरीराची स्थिति त्यावरच अवलंबून असते.

**तत्पित्तश्लेष्मलैः प्रायो दूष्यते**

तें रक्त बहुधा पित्तकर व कफकर पदार्थांच्या सेवनानें बिघडतें.

**कुरुते ततः ॥ २ ॥**
**विसर्पविद्रधिप्लीहगुल्माग्निसदनज्वरान् ।**
**मुखनेत्रशिरोरोगमदतृड्लवणास्यताः ॥ ३ ॥**
**कुष्ठवातास्रपितास्रकट्वाम्लोद्गीरणभ्रमान् ।**

दुष्ट झालेलें रक्त धांवरें ( विसर्प ), विद्रधि, प्लीहा, गुल्म, अग्निमांद्य, ज्वर, मुखरोग, नेत्ररोग, शिरोरोग, मद, तृष्णा, तोंडास खारटपणा, कुष्ठ, वातरक्त, रक्तपित्त, तिखट व आंबट ढेंकरा आणि भ्रम हे विकार उत्पन्न करितें.

**शीतोष्णस्निग्धरूक्षाद्यैरुपक्रान्ताश्च ये गदाः ॥ ४ ॥**
**सम्यक् साध्या न सिध्यन्ति ते च रक्तप्रकोपजाः ।**

जे रोग सुसाध्य असून शीत, उष्ण, स्निग्ध, रूक्ष, इत्यादि प्रकारच्या औषधांनीं त्यांची चिकित्सा केली असतांहि साध्य होत नाहींत, ते रक्तप्रकोपापासून झाले आहेत असें समजावें.

**तेषु स्रावयितुं रक्तमुद्रिक्तं व्यधयेच्छिराम् ॥ ५ ॥**

त्या रोगावर अतिशय कुपित झालेल्या रक्ताचा स्राव करण्यासाठीं शीर तोडावी.

**न तूनषोडशातीतसप्तत्यब्दस्नुतासृजाम् ।**
**अस्निग्धास्वेदितात्यर्थस्वेदितानिलरोगिणाम् ॥ ६ ॥**
**गर्भिणीसूतिकाजीर्णपित्तास्रश्वासकासिनाम् ।**
**अतीसारोदरच्छर्दिपाण्डुसर्वाङ्गशोफिनाम् ॥ ७ ॥**
**स्नेहपीते प्रयुक्तेषु तथा पञ्चसु कर्मसु ।**
**नायन्त्रितां सिरां विध्येन्नतिर्यङ् नाप्यनुत्थिताम् ॥ ८ ॥**
**नातिशीतोष्णवाताभ्रेष्वन्यत्रात्ययिकाद्गदात् ।**

सोळा वर्षांपेक्षां कमी, सत्तरापेक्षां जास्त वयाचा मनुष्य, ज्याचें एकदां रक्त काढिलें आहे तो, स्नेहपान न केलेला, घाम न काढलेला, अतिशय घाम काढलेला, वातरोगी, गर्भिणी व बाळंतीण, आणि अजीर्ण, रक्तपित्त, श्वास, कास, अतिसार, उदर, वांति, पांडुरोग व सर्वांगाची सूज हे रोग झालेला, यांची व स्नेह प्यालेल्यांची, तसेंच वमनादि पंचकर्में केल्यावर शीर तोडूं नये. बांधल्यावांचून शिरावेध करूं नये. शिरेचा वेध वांकडा करूं नये. न फुगलेली शीर तोडूं नये. तसेंच, जिवावरच्या रोगाशिवाय अतिशय थंडीत, अतिशय ऊन असतां, झपाट्याचा वारा सुटलेला असतां व ढग आलेले असतां शीर तोडूं नये.

**शिरोनेत्रविकारेषु ललाटच्यां मोक्षयेत्सिराम् ॥ ९ ॥**
**अपाङ्ग्यामुपनास्यां वा**

शिरोरोग, नेत्ररोग यांवर कपाळाची अथवा डोळ्याच्या बाहेरील कोंपऱ्याजवळची किंवा नाकाजवळची शीर तोडावी.

**कर्णरोगेषु कर्णजाम् ।**

कर्णरोगावर कानापासून निघणारी शीर तोडावी.

**नासारोगेषु नासाग्रे स्थिताम्**

नासारोगावर नाकाच्या बोंडीची शीर तोडावी.

**नासाललाटयोः ॥ १० ॥**
**पीनसे**

पीनस रोगावर नाकाची किंवा कपाळाची शीर तोडावी.

**मुखरोगेषु जिह्वौष्ठहनुतालुगाः ।**

मुखरोगावर रोगानुरूप जिभेची, ओठाची, हनुवटीची किंवा टाळूची शीर तोडावी.

**जत्रूर्ध्वग्रन्थिषु ग्रीवाकण्ठशङ्खशिरःश्रिताः ॥ ११ ॥**

जत्रूच्या वरल्या भागीं ग्रंथी झाले असतां स्थानपरत्वें मान, गळा, कानशील ( शंख ) व डोकें यांच्या शिरा तोडाव्या.

**उरोऽपाङ्गललाटस्था उन्मादे**

उन्माद झाला असतां ऊर, डोळ्याचा बाहेरचा कोंपरा व कपाळ यांच्या शिरा तोडाव्या.

**अपस्मृतौ पुनः ।**
**हनुसन्धौ समस्ते वा सिरां भ्रूमध्यगामिनीम् ॥ १२ ॥**

अपस्मारावर हनुवटीच्या सांध्यावर किंवा हनुवटीची किंवा दोन भिंवयांच्या मधून जाणारी शीर तोडावी.

**विद्रधौ पार्श्वशूले च पार्श्वकक्षास्तनान्तरे ।**

विद्रधि व कुशींतील उसण यांवर कुशींतील व खाक व स्तन यांच्यामधील शीर तोडावी.

**तृतीयकेंऽसयोर्मध्ये**

तिजाऱ्या हिंवावर खांद्याजवळची शीर तोडावी.

**स्कन्धस्याधश्चतुर्थके ॥ १३ ॥**

चातुर्थिक ज्वरावर खांद्याच्या खालील शीर तोडावी.

**प्रवाहिकायां शूलिन्यां श्रोणितो द्व्यङ्गुले स्थिताम् ।**

शूलयुक्त प्रवाहिकेवर कमरेपासून ( वर ) दोन बोटांवरची शीर तोडावी.

**शुक्रमेढ्रामये मेढ्रे**

*शुक्ररोग व शिश्नरोग यांवर शिश्नाची शीर तोडावी.

**ऊरुगां गलगण्डयोः ॥ १४ ॥**

गंडमाला व गलगंड यांवर मांडीची शीर तोडावी.

**गृध्रस्यां जानुनोऽधस्तादूर्ध्वं वा चतुरङ्गुले ।**

गृध्रसी ( एक वातरोग ) वर ढोंपराच्या खालीं किंवा वर चार बोटांवर शीर तोडावी.

**इन्द्रबस्तेरधोऽपच्यां द्व्यङ्गुले**

अपचि [ वातरोगवि० ] रोगावर इंद्रबस्तीच्या [ पोटरीचा गोळा, खोटेपासून १२ अंगुलांपुढील भाग ] खालीं दोन बोटांवर शीर तोडावी.

**चतुरङ्गुले ॥ १५ ॥**

**ऊर्ध्वं गुल्फस्य सक्थ्यर्तौ**

मांडीच्या शूलांत घोट्यापासून वर चार बोटांवर शिरावेध करावा.

**तथा क्रोष्टुकशीर्षके ।**

गुडघीमध्येंहि त्याचप्रमाणें शीर तोडावी.

**पाददाहे खुडे हर्षे विपाद्यां वातकण्टके ॥ १६ ॥**

**चिप्पे च द्व्यङ्गुले विध्येदुपरि क्षिप्रमर्मणः ।**

पाददाह, वातरक्त, पादहर्ष, विपादी, वातकंटक आणि नखुरडें या रोगांवर पायाच्या अंगठ्याच्या बेचक्यापासून वर २ बोटांवर शीर तोडावी.

**गृध्रस्यामिव विश्वाच्यां**

विश्वाची [ वातरोग ] वर गृध्रसीप्रमाणें शिरावेध करावा.

**यथोक्तानामदर्शने ॥ १७ ॥**

**मर्महीने यथासन्ने देशेऽन्यां व्यधयेत्सिराम् ।**

वर सांगितलेल्या शिरा न दिसतील तर मर्मे सोडून त्याच्या त्याच्या जवळच्या जागेंतील दुसरी शीर तोडावी.

**अथ स्निग्धतनुः सज्जः सर्वोपकरणो बली ॥ १८ ॥**

**कृतस्वस्त्ययनः स्निग्धरसान्नप्रतिभोजितः ।**

**अग्नितापातपस्विन्नो जानूच्चासनसंस्थितः ॥ १९ ॥**

**मृदुपट्टात्तकेशान्तो जानुस्थापितकूर्परः ।**

**मुष्टिभ्यां वस्त्रगर्भाभ्यां मन्ये गाढं निपीडयेत् ॥ २० ॥**

**दन्तप्रपीडनोत्कासगण्डाध्मानानि चाचरेत् ।**

ज्या मनुष्याची शीर तोडावयाची असेल तो बलवान् असावा. स्नेहपानानें शरीर स्निग्ध झाल्यावर ज्या दिवशीं शीर काढावयाची असेल, त्या दिवशीं स्वस्तिवाचन करून स्नेहयुक्त मांसरस व अन्न [ स्नेहयुक्त ] भक्षण करून अग्नीच्या तापानें अथवा सूर्याच्या उन्हानें स्विन्न झाल्यावर सर्व सामग्री तयार करून ढोंपरभर उंचीच्या जागीं त्यानें बसावें, ढोंपरांवती केंसांच्या खालीं मऊ वस्त्र गुंडाळावें. गुडघ्यावर हातांचीं कोंपरें टेंकून, दोन्ही हातांत वस्त्राच्या घड्या घेऊन त्यांनीं मानेचे दोन्ही भाग खूप चेपावे, आणि त्यानें [मनुष्यानें] दांत खावे, बळानें खोकावें व गाल फुगवावे.

**पृष्ठतो यन्त्रयेच्चैनं वस्त्रमावेष्टयन्नरः ॥ २१ ॥**

**कन्धरायां परिक्षिप्य नस्यान्तर्वामतर्जनीम् ।**

**एषोऽन्तर्मुखवर्जानां सिराणां यन्त्रणे विधिः ॥ २२ ॥**

दुसऱ्या मनुष्यानें त्याच्या पाठीमागें उभें राहून मानेभोंवतीं वस्त्र गुंडाळून त्यास बांधावें. बांधतेवेळीं डाव्या हाताची तर्जनी [ शेवट खोंचण्याकरितां ] आंत ठेवावी. हा बांधण्याचा प्रकार तोंडांत जाणाऱ्या खेरीजकरून डोक्यांतील बाकीच्या शिरा तोडण्याविषयीं होय.

**ततो मध्यमयाङ्गुल्या वैद्योऽङ्गुष्ठविमुक्तया ।**

**ताडयेत्**

नंतर वैद्यानें ज्या जागीं शिरावेध करावयाचा असेल तेथें मधल्या बोटाचें अग्र अंगठ्याच्या अग्राजवळ ठेवून तें [ मधलें बोट ] जोरानें कांहीं वेळां झाडावें.

**उत्थितां ज्ञात्वा स्पर्शाङ्गुष्ठप्रपीडनैः ॥ २३ ॥**

**कुठार्या लक्षयेन्मध्ये वामहस्तगृहीतया ।**

**फलोद्देशे सुनिष्कम्पं सिरां तद्वच्च मोक्षयेत् ॥ २४ ॥**

**ताडयन् पीडयेच्चैनां**

स्पर्शानें किंवा अंगठ्यानें दाबून ती उठली आहे असें पाहून शिरेच्या बरोबर मध्यावर डाव्या हातानें कुठारी धरावी आणि हात न कांपतां कुठारीच्या पानावर वरच्याप्रमाणें मधलें बोट अंगठ्यावरून झाडून शीर काढावी आणि नंतर ती अंगठ्यानें दाबून पिळावें.

**विध्येद्व्रीहिमुखेन तु ।**

**अङ्गुष्ठेनोन्नमय्याग्रे नासिकामुपनासिकाम् ॥ २५ ॥**

हा प्रकार हातांवरील शिर तोडण्याचा झाला, आतां नाका-जवळील शीर तोडावयाची असल्यास नाकाची बोंडी अंगठ्यानें वर दाबून व्रीहिमुखानें तोडावी.

**अभ्युन्नतविदष्टाग्रजिह्वस्याधस्तदाश्रयाम् ।**

जिभेच्या खालची शीर काढणें झाल्यास जीभ उलटी वर दुमडून तिचें अग्र वरच्या दांतांनीं धरल्यावर दाबून तोडावी.

**यन्त्रयेत्स्तनयोरूर्ध्वं ग्रीवाश्रितसिराव्यधे ॥ २६ ॥**

मानेच्या संबंधाची शीर तोडण्यासाठीं स्तनांच्या वर बांधावें.

**पाषाणगर्भहस्तस्य जानुस्थे प्रसृते भुजे ।**

**कुक्षेरारभ्य मृदिते विध्येद्बद्धोर्ध्वपट्टके ॥ २७ ॥**

दंडाची ( भुजाची ) शीर तोडावयाची असतां, जेथें तोडावयाची असेल, त्या स्थानाच्या वरच्या अंगास पट्टा बांधण्याच्या पूर्वी कुशीपासून मर्दन करावें व मुठींत दगड धरण्याविषयीं त्यास सांगावें; तसेंच हात गुडघ्यावर ठेवून लांब करवावे.

* शरीरस्थानांतील १ ल्या अध्यायांत सांगितलेलें नऊ प्रकारचें शुक्र.

विध्येद्धस्तसिरां बाहावनाकुञ्चितकूर्परे ।
बद्ध्वा सुखोपविष्टस्य मुष्टिमङ्गुष्ठगर्भिणीम् ॥ २८ ॥
ऊर्ध्वं वेध्यप्रदेशाच्च पट्टिकां चतुरङ्गुले ।

हाताची शीर तोडावयाची असतां सुखासनावर बसलेल्या रोग्यास हात लांब व सरळ करण्यास सांगून, वेध्यस्थानापासून वर चार अंगुळांवर पट्टा बांधावा व त्या मनुष्यानें मुठींत अंगठा घालून ती घट्ट आंवळावी.

विध्येदालम्बमानस्य बाहुभ्यां पार्श्वयोः सिराम् ॥२९॥

दोन्ही भुजांनीं खांबादिकांस वेळखा मारण्यास सांगून याप्रमाणें केल्यावर कुशी [ पार्श्व ] ची शीर तोडावी.

प्रहृष्टे मेहने

शिश्न ताठ उभें राहिलें असतां त्याची शीर तोडावी.

जङ्घासिरां जानुन्यकुञ्चिते ।

गुडघा ताठ करून पाय लांब केल्यावर पोटरीची शीर तोडावी.

पादे तु सुस्थितेऽधस्ताज्जानुसन्धेर्निपीडिते ॥ ३० ॥
गाढं कराभ्यामागुल्फं चरणे तस्य चोपरि ।
द्वितीये कुञ्चिते किञ्चिदारूढे हस्तवत्ततः ॥ ३१ ॥
बद्ध्वा विध्येत्सिरां

पायाची शीर तोडण्यासाठीं जमिनीवर पाय साफ ठेवून गुडघ्यापासून घोट्यापर्यंत दोन्ही हातांनीं खूप दाबल्यावर त्या पायावर दुसरा पाय किंचित् आकुंचित करून ठेवावा आणि हाताप्रमाणेंच वेध्यस्थानापासून चार बोटांवर पट्टा बांधून शिरावेध करावा.

इत्थमनुक्तेष्वपि कल्पयेत् ।
तेषु तेषु प्रदेशेषु तत्तद्यन्त्रमुपायवित् ॥ ३२ ॥

ज्या स्थानाबद्दल सांगितलें नाहीं, त्या स्थानीं याचप्रमाणें तज्ज्ञानें पट्टा बांधावा.

मांसले निक्षिपेद्देशे व्रीह्यास्यं व्रीहिमात्रकम् ।
यवार्धमस्थ्नामुपरि सिरां विध्यन् कुठारिकाम् ॥ ३३ ॥

मांसल भागावर शिरावेध करण्यासाठीं व्रीहिमुख शस्त्र भाताच्या [ साळी ] इतकेंच आंत भोसकावें. हाडावरील शीर तोडण्यास कुठारी अर्धा यव भोंसकावी.

सम्यग्विद्धे स्रवेद्धारां यन्त्रे मुक्ते तु न स्रवेत् ।

बरोबर वेध झाला असतां शिरेंतून रक्ताची धार वाहते. परंतु पट्टा [ यंत्र ] सुटला असतां धार वाहत नाहीं.

अल्पकालं वहत्यल्पं दुर्विद्धा तैलचूर्णनैः ॥ ३४ ॥

बरोबर वेध झाल्यास ( पुढें सांगितलेलें ) चूर्ण व तेल यांचा लेप केला असतांहि थोडा वेळपर्यंत थोडेंच रक्त वाहतें.

सशब्दमतिविद्धा तु स्रवेद्दुःखेन धार्यते ।

अधिक वेध झाला असतां धार वहातेवेळीं शब्द होतो. आणि मोठ्या प्रयासानें रक्तस्राव बंद होतो.

भीमूर्च्छायन्त्रशैथिल्यकुण्ठशस्त्रातितृप्तयः ॥ ३५ ॥
क्षामत्ववेगितास्वेदा रक्तस्यास्रुतिहेतवः ।

भीति, घेरी येणें, पट्टा सैल होणें, शस्त्र बोथट असणें, अतिभोजन, कृशपणा, मलमूत्रादिकांचा वेग येणें व पूर्वी स्वेदन न करणें ही रक्तस्राव न होण्याचीं कारणें आहेत.

असम्यगस्रे स्रवति वेल्लव्योषनिशानतैः ॥ ३६ ॥
सागारधूमलवणतैलैर्दिह्याच्छिरामुखम् ।

बरोबर रक्तस्राव न झाल्यास वावडिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, हळद, तगर, गृहधूम [ घेरोसा ], सैंधव व तेल यांचा शिरेच्या तोंडावर लेप करावा.

सम्यक्प्रवृत्ते तैलेन कोष्णेन लवणेन च ॥ ३७ ॥

योग्य रीतीनें रक्तस्राव झाला असतां तेल व सैंधव किंचित् ऊन करून शिरेच्या तोंडावर लावावीं.

अग्रे स्रवति दुष्टास्रं कुसुम्भादिव पीतिका ।

कुसुंब्यांतून जसा प्रथम पिंवळा रंग बाहेर पडतो; त्याप्रमाणें शिरेंतून प्रथम दुष्ट रक्त बाहेर पडतें.

सम्यक् स्रुत्वा स्वयं तिष्ठेच्छुद्धं तदिति नाहरेत् ॥ ३८ ॥

बरोबर स्राव होऊन आपोआप बंद झाला असतां फक्त शुद्ध रक्तच शिल्लक राहतें. म्हणून पुनः काढूं नये.

यन्त्रं विमुच्य मूर्च्छायां वीजिते व्यजनैः पुनः ।
स्रावयेन्मूर्च्छति पुनस्त्वपरेद्युरत्र्यहेऽपि वा ॥ ३९ ॥

रोग्यास मूर्च्छा आली असतां पट्टा सोडून पंख्यानें वारा घालून सावध झाल्यावर पुनः रक्तस्राव करावा. पुनः घेरी आली तर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं रक्तस्राव करावा.

वाताच्छ्यावारुणं रूक्षं वेगस्रावयच्छफेनिलम् ।

वायूनें दुष्ट झालेलें रक्त काळें, तांबूस, रूक्ष, वेगानें स्रवणारें, पातळ व फेंसाळ असतें.

पित्तात्पीतासितं विस्रमस्कन्द्यौष्ण्यात्सचन्द्रिकम् ४०

पित्तापासून दुष्ट झालेलें रक्त पिंवळें, काळें व दुर्गंधि असतें व पित्ताच्या उष्णतेमुळें पातळ असून त्यावर चित्रविचित्र रंगाची झांक ( तवंग ) असते.

कफात्स्निग्धमसृक्पाण्डु तन्तुमतिपिच्छिलं घनम् ।

कफानें दुष्ट झालेलें रक्त स्निग्ध, भुरकट, बुळबुळीत व दाट असून त्यास तार येते.

संसृष्टलिङ्गं संसर्गात्

दोन दोषांपासून दुष्ट झालेल्या रक्तांत दोहोंचीं लक्षणें असतात.

त्रिदोषं मलिनाविलम् ॥ ४१ ॥

त्रिदोषानें दुष्ट झालेलें रक्त तिहींच्या लक्षणांनीं युक्त असून मळकट व गढूळ असतें.

अशुद्धं बलिनोऽप्यस्रं न *प्रस्थात्स्रावयेत्परम् ।
बलवान् पुरुषानेंहि दुष्ट रक्त ५४ तोळ्यांपेक्षां जास्त काढूं नये.
अतिस्रुतौ हि मृत्युः स्याद्दारुणा वा चलामयाः ॥४१॥
कारण फार स्राव झाला असतां मृत्यु येतो अथवा भयंकर वातरोग ( धनुर्वातादि ) होतात.

तत्राभ्यङ्गरसक्षीररक्तपानानि भेषजम् ।
त्यावर अभ्यंग, मांसरस, दूध व रक्त यांचें पान हें औषध होय.

स्रुते रक्ते शनैर्यन्त्रमपनीय हिमाम्बुना ॥ ४२ ॥
प्रक्षाल्य तैलप्लोताक्तं बन्धनीयं सिरामुखम् ।
रक्तस्राव झाल्यावर हळूहळू पट्टा सोडून थंड पाण्यानें ती जागा धुवावी; व शिरेच्या तोंडावर तेलाचा बोळा देऊन वर पट्टी बांधावी.

अशुद्धं स्रावयेद्भूयः सायमह्न्यपरेऽपि वा ॥ ४४ ॥
अशुद्ध रक्त पुन्हां संध्याकाळीं किंवा दुसऱ्या दिवशीं काढावें.

स्नेहोपस्कृतदेहस्य पक्षाद्वा भृशदूषितम् ।
ज्याचें रक्त अत्यंत दुष्ट असेल त्यास स्नेहपानानें चांगला स्निग्ध करून १५ दिवसांनीं पुन्हां रक्तमोक्ष करावा.

किञ्चिद्धि शेषे दुष्टास्रे नैव दोषोऽतिवर्तते ॥ ४५ ॥
सशेषमप्यतो धार्यं न चातिस्रुतिमाचरेत् ।
दुष्ट झालेलें रक्त किंचित् शिल्लक राहिलें तरी रोग बळावत नाहीं, म्हणून थोडें शिल्लक ठेविलें तरी चालेल; परंतु अतिस्राव मात्र करूं नये.

हरेच्छृङ्गादिभिः शेषं
तें शिल्लक राहिलेलें दुष्ट रक्त तुंबडी, अलाबु, जळवा इत्यादिकांनीं काढावें.

प्रसादमथवा नयेत् ॥ ४६ ॥
शीतोपचारपित्तास्रक्रियाशुद्धिविशोषणैः ।
दुष्टं रक्तमनुद्रिक्तमेवमेव प्रसादयेत् ॥ ४७ ॥
किंवा थंड उपचार, रक्तपित्ताची चिकित्सा, वमनविरेचनादि शोधन व लंघन [ उपवासादि ] यांनीं तें रक्त शुद्ध करावें. तसेंच दुष्ट असून फारसें प्रवृद्ध न झालेलें रक्त अशाच रीतीनें शुद्ध करावें.

रक्ते त्वतिष्ठति क्षिप्रं स्तम्भनीमाचरेत्क्रियाम् ।
रक्तस्राव बंद न होईल तर तावडतोब स्तंभनक्रिया [ पुढें सांगितलेली ] करावी.

रोध्रप्रियङ्गुपत्तङ्गमाषयष्ट्याह्वगैरिकैः ॥ ४८ ॥
मृत्कपालाञ्जनक्षौममषीक्षीरित्वगङ्कुरैः ।
विचूर्णयेद्व्रणमुखं पद्मकादिहिमं पिबेत् ॥ ४९ ॥
लोध्र, गव्हला, पतंगाचें लांकूड, उडीद, ज्येष्ठीमध, गेरू, माती, खापर, सुरमा, तागाची राख, वड, पिंपळ इत्यादि क्षीरी वृक्षांची साल व मोड [ पारंब्याचे अंकुर ] यांचें चूर्ण व्रणावर दडपावें. तसेंच पद्मकादि गणांतील औषधांचा हिम* घ्यावा [ म्हणजे रक्तस्राव बंद होतो. ].

तामेव वा सिरां विध्येद्व्यधात्तस्मादनन्तरम् ।
सिरामुखं च त्वरितं दहेत्तप्तशलाकया ॥ ५० ॥
अथवा तीच शीर पूर्वीच्या वेधाच्या जवळच खालच्या अंगास पुन्हां तोडून लागलेंच शिरेचें तोंड तापलेल्या सळईनें डागावें.

उन्मार्गगा यन्त्रनिपीडनेन
स्वस्थानमायान्ति पुनर्न यावत् ।
दोषाः प्रदुष्टा रुधिरं प्रपन्ना-
स्तावद्धिताहारविहारभाक् स्यात् ॥ ५१ ॥
दुष्ट होऊन रक्तांत आलेले वातादि दोष पट्ट्याच्या दाबानें चंचल ( रस्ता सोडून भलतीकडे जाणारे ) होतात. ते पुन्हां आपापल्या स्थानीं परत येईपर्यंत रक्त काढलेल्या मनुष्यानें पथ्यानें असावें. ( हितकारक आहार व विहार सेवन करावे. )

नात्युष्णशीतं लघु दीपनीयं रक्तेऽपनीते हितमन्नपानम् ।
तदा शरीरं ह्यनवस्थितास्रमग्निर्विशेषादिति रक्षणीयः ॥५२॥
रक्तमोक्ष केल्यावर शरीरांत रक्ताचें अनवस्थितत्व ( कांहींसें रक्ताचें चंचलत्व ) असल्यामुळें विशेषतः अग्नीचें रक्षण करणें जरूर असतें. याकरितां फार उष्ण नव्हे व फार शीत नव्हे असें हलकें, अग्नि प्रदीप्त करणारें अन्न व पान मनुष्यास पथ्य होय.

प्रसन्नवर्णेन्द्रियमिन्द्रियार्थानिच्छन्तमव्याहतपक्तृवेगम् ।
सुखान्वितं पुष्टिबलोपपन्नं विशुद्धरक्तं पुरुषं वदन्ति ॥५३॥
ज्या पुरुषाचें रक्त शुद्ध आहे त्याच्या अंगाचा वर्ण व इंद्रियें टवटवीत असतात. ज्ञानेंद्रियांचे व कर्मेंद्रियांचे विषय सेवन करण्याची त्यास इच्छा होते. त्यास नियमानें चांगली भूक लागते आणि तो पुरुष निरोगी, पुष्ट ( लठ्ठ ) व शक्तिमान् असतो.

---

# अष्टविंशोऽध्यायः

## अध्याय २८ वा

अथातः शल्याहरणविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।
आतां शरीरांतील शल्यें बाहेर काढण्याविषयीं अध्याय सांगतों.

वक्रर्जुतिर्यगूर्ध्वाधः शल्यानां पञ्चधा गतिः ।
वांकडी, सरळ, तिर्कस, वर व खालीं अशी पांच प्रकारची शल्याची गति असते.

श्यामं शोफं रुजावन्तं स्रवन्तं शोणितं मुहुः ॥ १ ॥
अभ्युद्गतं बुद्बुदवत्पिटिकोपाचितं व्रणम् ।

---

* येथें प्रस्थ शब्दानें ५४ तोळे घ्यावयाचे; कारण "वमने च विरेके च तथा रक्तावमोक्षणे । सार्द्धत्रयोदशपलं प्रस्थमाहुर्मनीषिणः"

* औषध रात्रभर थंड पाण्यांत भिजत ठेवून दुसरे दिवशीं गाळून घेतलें म्हणजे त्यास 'हिम' किंवा 'शीत कषाय' म्हणतात.

मृदुमांसं विजानीयादन्तःशल्यं समासतः ॥ २ ॥

ज्या व्रणांत शल्य असतें तो काळसर, सुजलेला, वारंवार रक्त स्रवणारा, बुडबुड्यासारखा वर उचललेला, बारीक पुळ्यांनीं युक्त असून त्याचें मांस मऊ असतें व आंत ठणका असतो. हें सशल्य व्रणाचें संक्षेपानें लक्षण सांगितलें.

विशेषात्त्वग्गते शल्ये विवर्णः कठिनायतः ।
शोफो भवति

आतां स्थानपरत्वें विशेष लक्षणें—शल्य त्वचेंत गेलें असल्यास त्वचेहून भिन्न वर्णाची, कठिण व विस्तीर्ण अशी सूज येते.

मांसस्थे चोषः शोफो विवर्धते ॥ ३ ॥
पीडनाक्षमता पाकः शल्यमार्गो न रोहति ।

शल्य मांसांत असल्यास दाह होतो, सूज वाढते, त्या जागीं दाब सोसत नाहीं, जागा पुवळणास येते आणि शल्याचा मार्ग भरून येत नाहीं.

पेश्यन्तरगते मांसप्राप्तवच्छ्वयथुं विना ॥ ४ ॥

दोन पेशींच्या मध्यें शल्य गेलें असतां मांसांतल्याप्रमाणेंच लक्षणें असतात, परंतु सूज नसते.

आक्षेपः स्नायुजालस्य संरम्भस्तम्भवेदनाः ।
स्नायुगं दुर्हरं चैतत्

शल्य स्नायूंत गेलें तर स्नायुजालाला आचके येऊन तें ताठतें व तेथें खुपल्यासारखी व दुसऱ्या तऱ्हेची वेदना होते. हें शल्य काढणें फार कठिण.

सिराध्मानं सिराश्रिते ॥ ५ ॥

शिरेंत शल्य गेलें म्हणजे ती फुगते.

स्वकर्मगुणहानिः स्यात्स्रोतसां स्रोतसि स्थिते ।

(कंठादि) स्रोतांत शल्य गेलें असतां त्यांच्या क्रिया व गुण यांत कमतरता पडते.

धमनिस्थेऽनिलो रक्तं फेनयुक्तमुदीरयेत् ॥ ६ ॥
निर्याति शब्दवान् स्याच्च हृल्लासः साङ्गवेदनः ।

धमनींत शल्य गेलें तर वायु फेंसाळ रक्त बाहेर टाकितो व शब्द करीत बाहेर येतो, घशाशीं जळजळतें व सर्व अंग ठणकतें.

सङ्घर्षो बलवानस्थिसन्धिप्राप्तेऽस्थिपूर्णता ॥ ७ ॥

अस्थींच्या संधीत* (पोटरी, हात, बरगड्या वगैरे ठिकाणचे हाडांचे जोड) शल्य गेलें असतां फारच सलतें व दोहोंमधील अवकाश नाहींसा होऊन भरल्यासारखें वाटतें.

नैकरूपा रुजाऽस्थिस्थे शोफः

हाडांत शल्य गेलें असतां अनेक प्रकारच्या वेदना होतात व सूज असते.

* संस्कृत वैद्यकांत संधि (सांधे) दोन प्रकारचे धरितात: अस्थिसंधि व शरीरसंधि. त्यांपैकीं दुसरे प्रसिद्धच आहेत [ गुडघे, कोंपर, खुबा वगैरे ह्या प्रसिद्ध भागांखेरीज जे अस्थींचे परस्पर संयोग (कीं ज्यांना निरनिराळीं नांवें दिलेलीं नाहींत) ते अस्थिसंधि होत. ]

तद्वच्च सन्धिगे ।
चेष्टानिवृत्तिश्च भवेत्

शरीरसंधींत (गुडघा, कोंपर, वंक्षण, गुल्फ इत्यादि) शल्य गेलें असतां वरनींच लक्षणें असून सांधीचें चलनवलन बंद होतें.

आटोपः कोष्ठसंश्रिते ॥ ८ ॥
आनाहोऽन्नशकृन्मूत्रदर्शनं च व्रणानने ।
विद्यान्मर्मगतं शल्यं मर्मविद्धोपलक्षणैः ॥ ९ ॥

कोठ्यांत शल्य गेलें असतां आंत गुरगुर शब्द होतो, पोट फुगतें, व्रणाच्या तोंडीं अन्न, मल व मूत्र हीं दिसूं लागतात. मर्मांचा वेध केला असतां जीं लक्षणें होतात तींच लक्षणें मर्मांत शल्य गेलें असतां होतात.

यथास्वं च परिस्रावैस्त्वगादिषु विभावयेत् ।

त्वचादिकांत गेलेलीं शल्यें त्यांच्या त्यांच्या स्रावावरून ओळखावीं (जसें: अस्थींत शल्य गेलें असतां मज्जा स्रवते, त्वचेंत लस, शिरांत रक्त, इ०.)

रुह्यते शुद्धदेहानामनुलोमस्थितं तु तत् ॥ १० ॥

वमनविरेचनांनीं ज्यांचें शरीर शुद्ध झालें आहे, त्यांचें शल्य अनुकूल स्थितींत राहिलें असल्यास व्रण आपोआप भरून येतो.

दोषकोपाभिघातादिक्षोभाद्भूयोऽपि बाधते ।

तेंच दोषांच्या कोपानें किंवा आघातानें त्या स्थळीं क्षोभ झाला असतां पुनः सलूं लागतें.

त्वङ्नष्टे यत्र तत्र स्युरभ्यङ्गस्वेदमर्दनैः ॥ ११ ॥
रागरुग्दाहसंरम्भा यत्र चाज्यं विलीयते ।
आशु शुष्यति लेपो वा तत्स्थानं शल्यवद्वदेत् ॥१२॥

त्वचेंतील शल्य नष्ट (सांपडेनासें) झालें असल्यास तें कोणत्या जागीं आहे हें पाहण्याकरितां पुढील उपाय होत. अभ्यंग, स्वेद व मर्दन केलें असतां ज्या ठिकाणीं तांबडेपणा, वेदना, दाह व सलणें हीं होतात व जेथें तूप ठेविलें असतां इतर भागांपेक्षां पूर्वी वितळतें व जेथें लाविलेला लेप लवकर सुकतो तेथें शल्य आहे असें समजावें.

मांसप्रनष्टं संशुद्ध्या कर्शनाच्छ्लथतां गतम् ।
क्षोभाद्रागादिभिः शल्यं लक्षयेत्

मांसांतील शल्य नष्ट झालें असेल तर वमनविरेचनानें कृशत्व आणावें म्हणजे शिथिल झाल्यामुळें तें सलूं लागून लाली, वेदना, दाह इत्यादि उत्पन्न होतात, त्यांवरून त्या ठिकाणीं शल्य आहे असें समजावें.

तद्वदेव च ॥ १३ ॥
पेश्यास्थिसन्धिकोष्ठेषु नष्टं

त्याचप्रमाणें पेशी, अस्थींचे सांधे व कोठा यांत नष्ट झालेलें शल्य कोठें आहे तें पाहावें.

अस्थिषु लक्षयेत्।

अस्थ्नामभ्यञ्जनस्वेदबन्धपीडनमर्दनैः ॥ १४ ॥

अस्थींत नष्ट झालें असेल तर अभ्यंजन (तेल लावणें), स्वेद, बांधणें, दाबणें व मर्दन यांनीं अस्थींचा क्षोभ करून जेथें लाली वगैरे लक्षणें होतील तेथें शल्य आहे असें समजावें.

प्रसारणाकुञ्चनतः सन्धिनष्टं तथास्थिवत्।

संधींत नष्ट झालेलें शल्य संधीच्या प्रसरणानें व आकुंचनानें आणि अस्थीविषयीं सांगितलेल्या उपायानें जाणावें.

नष्टे स्नायुशिरास्त्रोतोधमनीष्वसमे पथि ॥ १५ ॥

अश्वयुक्तं रथं खण्डचक्रमारोप्य रोगिणम्।

शीघ्रं नयेत्ततस्तस्य संरम्भाच्छल्यमादिशेत् ॥ १६ ॥

स्नायु, शिरा, स्रोतें व धमन्या यांत शल्य नष्ट झालें असेल तर त्या रोग्यास तुटक्या चाकांच्या घोड्यांच्या गाडींत घालून ती गाडी उंचसखल रस्त्यानें खूप वेगानें चालवावी. म्हणजे सर्व अंगाचा क्षोभ होऊन तें सलूं लागतें. त्यावरून त्या ठिकाणीं शल्य आहे असें जाणावें.

मर्मनष्टं पृथङ्नोक्तं तेषां मांसादिसंश्रयात्।

मर्में हीं मांसादिकांच्या आश्रयानें आहेत. यास्तव त्यांत नष्ट झालेलीं शल्यें ओळखण्याचे उपाय निराळे सांगितले नाहींत, तीं त्या त्या उपायांनीं जाणावीं.

सामान्येन सशल्यं तु क्षोभिण्या क्रियया सरुक् १७

नष्ट शल्य ओळखण्याची सामान्य रीति हीच कीं, क्षोभ करणाऱ्या क्रियेनें ज्या ठिकाणीं वेदना उत्पन्न होतील त्याच ठिकाणीं शल्य आहे असें समजावें.

वृत्तं पृथु चतुष्कोणं त्रिपुटं च समासतः।

अदृश्यशल्यसंस्थानं व्रणाकृत्या विभावयेत् ॥ १८ ॥

शल्य दिसत नसेल तर त्याची आकृति वाटोळी, पसरट, चौधारी किंवा त्रिधारी आहे हें त्या व्रणाच्या आकृतीवरून समजावें.

तेषामाहरणोपायौ प्रतिलोमानुलोमिकौ।

तीं काढून टाकण्याचे उपाय दोन प्रकारचे, प्रतिलोम व अनुलोम. *

अर्वाचीनपराचीने निर्हरेत्तद्विपर्ययात् ॥ १९ ॥

सुखाहार्यं यतश्छित्त्वा ततस्तिर्यग्गतं हरेत्।

खालीं गेलेलें वर व वर गेलेलें खालीं ओढून काढावें. शल्य तिरपें गेलें असेल तर जिकडून काढण्यास सुलभ पडेल तेथें व्रण करून तें काढावें.

शल्यं न निर्घात्यमुरःकक्षावङ्क्षणपार्श्वगम् ॥ २० ॥

प्रतिलोममनुत्तुण्डं छेद्यं पृथुमुखं च यत्।

उर, खांक (बगल), अडसांधि व कुशी (बरगड्या) यांत शिरलेलें, प्रतिलोम गेलेलें, अनुत्तुंड (ज्यानें तोंड वर आलेलें नाहीं तें), छेद्य (कापण्यासारखें) व ज्याचें तोंड जाड आहे तें हीं शल्यें उपटण्यासाठीं हलवूं नये.

नैवाहरेद्विशल्यघ्नं नष्टं वा निरुपद्रवम् ॥ २१ ॥

शल्य काढलें असतां मनुष्य मरेल असें वाटत असेल तर आणि नष्ट शल्यापासून कांहीं इजा नसेल तर शल्य मुळींच काढूं नये.

अथाहरेत्करप्राप्यं करेणैव

हातांत धरून उपटतां येण्यासारखें शल्य हातानेंच काढावें.

इतरत्पुनः।

दृश्यं सिंहाहिमकरवर्मिकर्कटकाननैः ॥ २२ ॥

जें हातानें निवडण्यासारखें नसून दिसत असेल तें सिंहमुख, सर्पमुख, मकरमुख, वर्मिमुख व कर्कटमुख या शस्त्रांनीं काढावें.

अदृश्यं व्रणसंस्थानाद्ग्रहीतुं शक्यते यतः।

कङ्कभृङ्गाह्वकुररशरारीवायसाननैः ॥ २३ ॥

तसेंच अदृश्य असून व्रणांत शस्त्र घालून त्यानें धरतां येण्यासारखें असेल तर तें कंकमुख, भृंगमुख, कुररमुख,: शरारीमुख आणि काकमुख या स्वस्तिकयंत्रांनीं काढावें.

सन्दंशाभ्यां त्वगादिस्थं

त्वचादिकांतील शल्य चिमटयांनीं (जे दोन चिमटे यंत्राध्यायांत सांगितले आहेत) काढावें.

तालाभ्यां सुषिरं हरेत्।

पोकळ शल्य असल्यास दोन तालयंत्रांनीं काढावें.

सुषिरस्थं तु नलकैः

पोकळ स्थानांतील शल्य नाडीयंत्रांनीं काढावें.

शेषं शेषैर्यथायथम् ॥ २४ ॥

बाकीचीं शल्यें बाकीच्या यंत्रांनीं युक्तीनें काढावीं.

शस्त्रेण वा विशस्यादौ ततो निर्लोहितं व्रणम्।

कृत्वा घृतेन संस्वेद्य बद्ध्वाऽऽचारिकमादिशेत् ॥ २५ ॥

अथवा पूर्वी शस्त्रानें मांसादिक कापून नंतर शल्य काढावें व मग व्रणांतील रक्त बंद झालें म्हणजे तुपानें शेकून व्रण बांधावा व स्नेहविधि सांगितल्याप्रमाणें आहारविहार करण्यास रोग्यास सांगावें.

शिरास्नायुविलग्नं तु चालयित्वा शलाकया।

शिरा व स्नायु यांस चिकटलेलें शल्य सळईनें प्रथम चाळवून नंतर काढावें.

हृदये संस्थितं शल्यं त्रासितस्य हिमाम्बुना ॥ २६ ॥

ततःस्थानान्तरं प्राप्तमाहरेत्तद्यथायथम्।

हृदयांत शल्य राहिलें असतां थंड पाण्यानें त्यास त्रस्त करून (थंड पाण्यानें आकुंचन झाल्यामुळें शल्य दुसरीकडे सरकतें.) शल्य दुसऱ्या स्थानीं गेलें असतां त्या स्थानाप्रमाणें योग्य उपायांनीं तें बाहेर काढावें.

---

* प्रतिलोम रीतीनें शल्य काढणें म्हणजे तें ज्या दिशेनें शरीरांत शिरलें असेल त्याच्या उलट दिशेनें काढणें व अनुलोम म्हणजे तें ज्या दिशेनें गेलें असेल त्याच दिशेनें बाहेर काढणें.

**यथामार्गं दुराकर्षमन्यतोऽप्येवमाहरेत् ॥ २७ ॥**

शल्य ज्या मार्गानें गेलें त्या मार्गानें काढणें कठिण असल्यास दुसरीकडून काढावें.

**अस्थिदष्टे नरं पद्भ्यां पीडयित्वा विनिर्हरेत् ।**

हाडांतील शल्य दिसत असेल तर त्या मनुष्यास पायांनीं दाबून धरून नंतर शल्य काढावें.

**इत्यशक्ये सुबलिभिः सुगृहीतस्य किङ्करैः ॥ २८ ॥**

या उपायांनीं न निघाल्यास रोग्यास खूप बळकट चाकरांकडून घट्ट धरवून शल्य उपटावें.

**तथाप्यशक्ये वारङ्गं वक्रीकृत्य धनुर्ज्यया ।**
**सुबद्धं वक्त्रकटके बध्नीयात्सुसमाहितः ॥ २९ ॥**
**सुसंयतस्य पश्चाङ्घ्र्या वाजिनः कशयाथ तम् ।**
**ताडयेदिति मूर्धानं वेगेनोन्नमयन् यथा ॥ ३० ॥**
**उद्धरेच्छल्यम्**

इतकेंहि करून शल्य न निघेल तर त्याचें मागील टोंक ( दांडा ) वांकवून धनुष्याच्या दोरीनें घट्ट बांधून ती दोरी चार पाय व मान बांधून जखडलेल्या घोड्याच्या ओठाळीस जपून लवकर बांधावी; नंतर घोड्यास चाबकाचा असा फटका मारावा कीं त्यासरसा त्यानें डोक्यास हिसका घेऊन तें उचलल्याबरोबर त्या जोरानें शल्य उपटेल.

**एवं वा शाखायां कल्पयेत्तरोः ।**

किंवा वरच्याप्रमाणें वांकविलेल्या झाडाच्या खांदीस बांधून ती सोडावी म्हणजे त्या जोरानें शल्य उपटून वर येईल.

**बद्ध्वा दुर्बलवारङ्गं कुशाभिः शल्यमाहरेत् ॥ ३१ ॥**

वारंग दुबळ असेल तर दर्भादिकांच्या दोरीनें बांधून उपटावें.

**श्वयथुग्रस्तवारङ्गं शोफमुत्पीड्य युक्तितः ।**

वारंगावर सूज आलेली असेल तर दोहों बाजूंनीं सूज दर दाबून शल्य उपटावें.

**मुद्गराहतया नाड्या निर्घात्योत्तुण्डितं हरेत् ॥ ३२ ॥**

उत्तुंडित शल्यावर नाडीयंत्र ठेवून मोगऱ्यानें ठोकून हलवावें आणि नंतर उपटावें.

**तैरेव चानयेन्मार्गमार्गोत्तुण्डितं तु यत् ।**

मार्ग सोडून जें उत्तुंडित झालें असेल त्यास मुद्गरादिकांनीं मार्गावर आणून नंतर काढावें.

**सृदित्वा कर्णिनां कर्णं नाड्यास्येन निगृह्य वा ॥३३॥**

शल्यास कांटे असतील तर तें मोडून किंवा नाडीमुखयंत्रानें धरून उपटावें.

**अयस्कान्तेन निष्कर्णं विवृतास्यमृजुस्थितम् ।**

ज्यास कांटे नाहींत तें व ज्याचें तोंड उघडें आहे तें व सरळपणानें राहिलेलें असें शल्य लोहचुंबकानें काढावें.

**पक्वाशयगतं शल्यं विरेकेण विनिर्हरेत् ॥ ३४ ॥**

पक्वाशयांत गेलेलें शल्य विरेचनानें काढून टाकावें.

**दुष्टवातविषस्तन्यरक्ततोयादि चूषणैः ।**

दुष्टवायु, विष, स्तन्य ( स्त्रीदुग्ध ), रक्त व पाणी हीं चूषणानें ( तोंडानें अथवा यंत्रानें चोखणें ) काढावीं.

**कण्ठस्रोतोगते शल्ये सूत्रं कण्ठे प्रवेशयेत् ॥ ३५ ॥**
**बिसेनाक्ते ततः शल्ये बिसं सूत्रं समं हरेत् ।**

घशांत शल्य अडकलें असेल तर कमळाच्या देठीस दोरा बांधून दोरा व देठी घशांत घालावी व त्यास शल्य अडकलें म्हणजे दोन्ही सारखीं ओढावीं.

**नाड्याग्नितापितां कृत्वा शलाकामप्स्थिरीकृताम् ३६**
**आनयेज्जातुषं कण्ठात्**

लाखेचें शल्य घशांत अडकलें असेल तर प्रथम एक नळी घशांत घालावी. नंतर त्या नळींतून लोखंडाची तापलेली शलाका घशांत घालावी, व त्यास ती लाख चिकटली कीं, त्या सळईवर पाणी सोडून ती निववावी म्हणजे ती लाख घट्ट होऊन त्या सळईबरोबर बाहेर येते.

**जतुदिग्धामजातुषम् ।**

शल्य लाखेचें नसेल तर त्याच सळईस लाख लावावी म्हणजे त्या लाखेस शल्य चिकटून बाहेर येतें. [ बाकी प्रकार पूर्वीप्रमाणें. ]

**केशोन्दुकेन पीतेन द्रवैः कण्टकमाक्षिपेत् ॥ ३७ ॥**
**सहसा सूत्रबद्धेन वमतः**

माशांचा वगैरे कांटा घशांत अडकला असल्यास केंसांच्या झुबक्यास दोरा बांधून पातळ पदार्थाबरोबर तो प्यावा म्हणजे एकदम वांती होऊन तो कांटा केंसांत गुंतून बाहेर येतो.

**तेन चेतरत् ।**

गुंतवळ घशांत अडकले असतील तर कांट्यास दोरा बांधून तो पातळ पदार्थाबरोबर प्यावा म्हणजे त्याचप्रमाणें निघतील.

**अशक्यं मुखनासाभ्यामाहर्तुं परतो नुदेत् ॥ ३८ ॥**

तोंडांतून व नाकांतून काढणें अशक्य असेल तर मागें ढकलून कोठ्यांत न्यावें.

**अप्पानस्कन्धघाताभ्यां ग्रासशल्यं प्रवेशयेत् ।**

घांस अडकला असेल तर पाणी प्यावें अथवा खांद्यावर बुक्क्या माराव्या म्हणजे तो आंत जातो.

**सूक्ष्माक्षिव्रणशल्यानि क्षौमवालजलैर्हरेत् ॥ ३९ ॥**

डोळ्यांतील व व्रणांतील बारीक शल्यें रेशीम, केंस व पाणी यांनीं काढावीं.

**अपां पूर्णं विधुनुयादवाक्शिरसमायतम् ।**
**वामयेद्वामुखं भस्मराशौ वा निखनेन्नरम् ॥ ४० ॥**

पाण्यांत बुडाल्यामुळें ज्याच्या पोटांत व छातींत पाणी भरलें असेल त्यास उलटा टांगून झोंके द्यावे, किंवा वमन देऊन ओकवावें अथवा गळ्यापर्यंत राखाडीच्या राशींत पुरावें.

कर्णेस्तुपूर्णे हस्तेन मथित्वा तैलवारिणी ।
क्षिपेदधोमुखं कर्णं हन्याद्वा चूषयेत वा ॥ ४१ ॥

कान पाण्यानें भरला असेल, तर तेल व पाणी एकत्र करून हातानें ढवळून कानांत घालावें, किंवा कान उपडा करून वर मारावें अथवा नळीनें पाणी ओढून घ्यावें.

कीटे स्रोतोगते कर्णं पूरयेल्लवणाम्बुना ।
शुक्तेन वा सुखोष्णेन मृते क्लेदहरो विधिः ॥ ४२ ॥

कानांत किडा शिरला असेल तर पाण्यांत मीठ घालून तें कानांत घालावें किंवा शुक्त सुखोष्ण करून घालावें. अशा रीतीनें किडा गेला म्हणजे कर्णस्रावावरील क्रिया करावी. ( उ. अ० १८ पहा. )

जातुषं हेमरूप्यादिधातुजं च चिरस्थितम् ।
ऊष्मणा प्रायशः शल्यं देहजेन विलीयते ॥ ४३ ॥

लाख व सुवर्ण, रुपें इत्यादि धातु यांचें शल्य शरीरांत फार दिवस राहिलें तर तें शरीरांतील उष्णतेनें बहुतकरून वितळतें.

*मृद्वेणुदारुशृङ्गास्थिदन्तवालोपलानि न ।
विषाणवेण्वयस्तालदारुशल्यं चिरादपि ॥ ४४ ॥
प्रायो निर्भुज्यते तद्धि पचत्याशु पलासृजी ।

माती, वेळू, लांकूड, शिंग, हाड, दांत, केंस ( डुकरादिकांचे ), दगड हीं शल्यें वितळत नाहींत; शिंग, वेळू, पोलाद, नारळ वगैरेंची करटी व लांकूड यांचें शल्य पुष्कळ दिवसांनींहि वितळत नाहीं. तें बहुतकरून शरीरांतील उष्णतेनें वांकडें होतें, व वांकडें झाल्यामुळें क्षोभ उत्पन्न करून मांस व रक्त यांचा पाक करितें ( आणि पाक झाल्यावर पुवाबरोवर बाहेर येतें. ).

शल्ये मांसावगाढे च स देशो न विदह्यते ॥ ४५ ॥
ततस्तं मर्दनस्वेदशुद्धिकर्षणबृंहणैः ।
तीक्ष्णोपनाहपानान्नघनशस्त्रपदाङ्कनैः ॥ ४६ ॥
पाचयित्वा हरेच्छल्यं पाटनैषणभेदनैः ।

मांसांत शल्य खोल गेलें तर तेथें दाह होत नाहीं, यासाठीं मर्दन, स्वेद, विरेचन, लंघन, बृंहण, तीक्ष्ण उपनाह ( पोटीस ), तीक्ष्ण अन्नपान व जवळ जवळ फासण्या मारणें या उपायांनीं ती जागा पिकवून, फाडून, तपासून व फोडून शल्य बाहेर काढून टाकावें.

शल्यप्रदेशयन्त्राणामवेक्ष्य बहुरूपताम् ॥ ४७ ॥
तैस्तैरुपायैर्मतिमान् शल्यं विद्यात्तथा हरेत् ।

शल्यें, प्रदेश ( त्वचामांसादि ) व यंत्रें ( स्वस्तिकादि ) यांच्या नानाप्रकारांविषयीं विचार करून त्या त्या उपायांनीं शल्याची परीक्षा करावी व तसेंच तें हस्तानें काढावें.

---

# एकोनत्रिंशोऽध्यायः

## अध्याय २९ वा

अथातः शस्त्रकर्मविधिमध्यायं व्याख्यास्यामः ।

आतां शस्त्रक्रिया करण्याविषयीं अध्याय सांगतों.

व्रणः सञ्जायते प्रायः पाकाच्छ्वयथुपूर्वकात् ।
तमेवोपचरेत्तस्माद्रक्षन्पाकं प्रयत्नतः ॥ १ ॥
सुशीतलेपसेकास्रमोक्षसंशोधनादिभिः ।

बहुतकरून प्रथम सूज येऊन नंतर तिचा पाक झाल्यावर व्रण होतो, यासाठीं मोठ्या प्रयत्नानें पाक होऊं न देण्याकरितां थंड लेप, थंड परिषेक, रक्त काढणें, विरेचन इत्यादिकांनीं सुजेवरच प्रथम उपचार करावे. ( म्हणजे व्रण होणार नाहीं. )

शोफोऽल्पोऽल्पोष्णरुक् चामः सवर्णः कठिनः स्थिरः ॥ २

जी सूज थोडी असते, आणि जींत उष्णता व वेदना कमी असून जी त्वचेसारख्या वर्णाची, कठिण व स्थिर ( दाबली असतां आंतील पुवाचें चलन हातास लागत नाहीं ) ती आम ( कच्ची ) आहे असें समजावें.

पच्यमानो विवर्णस्तु रागी बस्तिरिवाततः ।
स्फुटतीव सनिस्तोदः साङ्गमर्दविजृम्भिकः ॥ ३ ॥
संरम्भारुचिदाहोषातृड्ज्वरानिद्रितान्वितः ।
स्त्यानं विष्यन्दयत्याज्यं व्रणवत्स्पर्शनासहः ॥ ४ ॥

जी सूज त्वचेहून भिन्न वर्णाची, लाल, पाण्यानें भरलेल्या पखाली-प्रमाणें ताणलेली, जींत फुटल्यासारखी वेदना व अंग मोडणें, जांभया, तडफडाट, अरुचि, दाह, जळजळ, तृष्णा, ताप, झोंप न येणें हीं लक्षणें असून जीवर घट्ट तूप ठेविलें असतां वितळतें व व्रणाप्रमाणेंच जिलाहि स्पर्श सहन होत नाहीं, ती सूज पच्यमान अवस्थेंत [ पिकत असलेली ] आहे असें समजावें.

पक्वेऽल्पवेगता ग्लानिः पाण्डुता वलिसंभवः ।
नामोऽन्तेपून्नतिर्मध्ये कण्डूशोफादिमार्दवम् ॥ ५ ॥
स्पृष्टे पूयस्य सञ्चारो भवेद्बस्ताविवाम्भसः ।

सूज पक्व झाली असतां वेदना कमी होतात, सूज म्लान, पांढुर वर्णाची ( लाली कमी होते ) होते. तीवर सुरकुत्या पडतात, कडा बसतात व मध्यभाग उंच होतो; कंड, सूज, इत्यादि विकार कमी

---

* यांतील मृद्वेणु इत्यादि श्लोकार्धापुढें कुंटे यांनीं छापलेल्या पुस्तकांत एक श्लोकार्ध फाजील पडल्यामुळें अर्थ बरोबर लागत नाहीं; कारण त्यांत मृत् शब्द दोनदां येतो. हें फाजील श्लोकार्ध ( शल्यानि न विशीर्यन्ते शरीरे मृन्मयानि वा ) वृद्ध वाग्भटांतून घेतलेलें क्षेपक आहे. वृद्ध वाग्भटांत मात्र तें फाजील नाहीं; कारण तेथील ग्रंथरचना भिन्न असून त्यांत मृन्मयशल्याची पुनरुक्ति होत नाहीं. अरुणदत्तानें ( किंवा हेमाद्रीनें ) हें श्लोकार्ध घेतल्याचें त्याच्या टीकेवरून दिसत नाहीं; सबब ही तत्प्रकाशकाची नजरचूक दिसते. तसेंच, कुंटे यांच्या पुस्तकांतील मृद्वेणु इत्यादि श्लोकार्धांत शेवटीं 'च' बद्दल 'न' पाहिजे; म्हणजे त्याचा संबंध वरील श्लोकार्धांतलि 'विलीयते' या क्रियापदाकडे लाविता येतो.

होतात; आणि स्पर्श केला असतां बस्तींत जसा पाण्याचा संचार (चलन) होतो त्याप्रमाणें पुवाचा संचार होतो.

**शूलं नर्तेऽनिलाद्दाहः पित्ताच्छोफः कफोदयात् ॥ ६ ॥**
**रागो रक्ताच्च पाकः स्यादतो दोषैः सशोणितैः ।**

वायूवांचून शूल नाहीं, पित्ताशिवाय दाह नाहीं, कफाखेरीज सूज नाहीं; व रक्ताशिवाय लाली नाहीं; म्हणून तीन दोष व रक्त हीं असल्याशिवाय पाक (पाकांत वर सांगितलेलीं चारी लक्षणें असतातच) होत नाहीं.

**पाकेऽतिवृत्ते सुषिरस्तनुत्वग्दोषभक्षितः ॥ ७ ॥**
**वलीभिराचितः श्यावः शीर्यमाणतनूरुहः ।**

शोथाचा पाक होऊन कांहीं दिवस झाले म्हणजे सर्व भाग पुवळल्यामुळें शोथ पोकळ व काळा होतो, वरची त्वचा पातळ होते, त्यावर सुरकुत्या पडतात व वरचे केंस गळूं लागतात.

**कफजेषु तु शोफेषु गम्भीरं पाकमेत्यसृक् ॥ ८ ॥**
**पक्वलिङ्गं ततोऽस्पष्टं यत्र स्याच्छीतशोफता ।**
**त्वक्सावर्ण्यं रुजोऽल्पत्वं घनस्पर्शत्वमश्मवत् ॥ ९ ॥**
**रक्तपाकमिति ब्रूयात्तं प्राज्ञो मुक्तसंशयः ।**

कफजन्य शोफांत (सुजेंत) त्वचेपासून दूर (खोल) फक्त रक्ताचाच पाक होतो, त्यामुळें पूर्वी सांगितलेलीं पक्व शोफाचीं लक्षणें अस्पष्ट असतात. सूज त्वचेपासून निराळ्या रंगाची नसून ठुसठुस कमी असते व तो भाग दगडासारखा कठिण लागतो, अशा शोफास वैद्यानें निःसंशय रक्तपाक आहे असें समजावें.

**अल्पसत्त्वेऽबले बाले पाके चात्यर्थमुद्धते ॥ १० ॥**
**दारणं मर्मसन्ध्यादिस्थिते चान्यत्र पाटनम् ।**

भित्रा, अशक्त व बाल, अशा मनुष्याच्या शोफाचें व अतिशय पक्व झालेल्या शोफाचें क्षारादिकांनीं विदारण करावें, शस्त्रानें करूं नये; तसेंच मर्म, सांधे इत्यादि ठिकाणच्या शोफाचें दारणच करावें; बाकी ठिकाणीं शस्त्रानें फाडावें.

**आमच्छेदे शिरास्नायुव्यापदोऽसृगतिस्रुतिः ॥ ११ ॥**
**रुजोऽतिवृद्धिर्दरणं विसर्पो वा क्षतोद्भवः ।**

अपक्व सुजेचें पाटन केलें तर शिरा व स्नायु यांस फार इजा होते, रक्तस्राव फार होतो, वेदना वाढते, व्रणाचें मुख विस्तृत होतें किंवा क्षतजन्य विसर्प (धांवरें) होतो.

**तिष्ठन्नन्तः पुनः पूयः शिरास्नाय्वसृगामिषम् ॥ १२ ॥**
**विवृद्धो दहति क्षिप्रं तृणोलपमिवानलः ।**

तसेंच जर पू आंत तसाच राहिला (पाटन करून काढला नाहीं), तर तो वाढून शिरा, स्नायु, रक्त व मांस यांस जाळतो, जसा अग्नि गवताची रांग (प्रतान) जाळतो तसा.

**यश्छिनत्त्याममज्ञानाद्यश्च पक्वमुपेक्षते ॥ १३ ॥**
**श्वपचाविव विज्ञेयौ तावनिश्चितकारिणौ ।**

अज्ञानानें जो आमशोफाचा छेद करितो व जो पक्वाची उपेक्षा करितो, ते दोघेहि अविचारी चांडाळ आहेत, असें समजावें.

**प्राक्शस्त्रकर्मणश्चेष्टं भोजयेदन्नमातुरम् ॥ १४ ॥**
**पानपं पाययेन्मद्यं तीक्ष्णं यो वेदनाक्षमः ।**

शस्त्रक्रिया करण्यापूर्वी रोग्यास हितकारक अन्न खावयास घालावें; जो मद्यपी असून दुःख सोसत नसेल त्यास तीक्ष्ण मद्य पाजावें.

**न मूर्च्छत्यन्नसंयोगान्मत्तः शस्त्रं न बुध्यते ॥ १५ ॥**

भोजन केल्यामुळें त्यास घेरी येत नाहीं व मद्यानें अंमल आला म्हणजे शस्त्र लागण्यानें ज्या वेदना होतात त्या त्यास समजत नाहींत.

**अन्यत्र मूढगर्भाश्ममुखरोगोदरातुरान् ।**

मूढगर्भ, मुखरोग, मुतखडा व उदर यांनीं पीडित झालेल्यांना मात्र भोजन व मद्यपान वर्ज्य.

**अथाहृतोपकरणं वैद्यः प्राङ्मुखमातुरम् ॥ १६ ॥**
**संमुखो यन्त्रयित्वाशु न्यसेन्मर्मादि वर्जयन् ।**
**अनुलोमं सुनिशितं शस्त्रमापूयदर्शनात् ॥ १७ ॥**
**सकृदेवाहरेत्तच्च**

वैद्यानें यंत्रशस्त्रादि सर्व साहित्य तयार करून पूर्वेस तोंड केलेल्या व हातपाय बांधलेल्या रोग्याच्या समोर. बसावें; नंतर मर्मादिक वर्ज्य करून खूप पाजवून तीक्ष्ण केलेलें शस्त्र लवकर एकदांच पू दिसेपर्यंत भोंसकावें व तसेंच एकदम बाहेर काढावें.

**पाके तु सुमहत्यपि ।**
**पाटयेद्द्व्यङ्गुलं सम्यग्द्व्यङ्गुलत्र्यङ्गुलान्तरम् ॥ १८ ॥**
**एषित्वा सम्यगेषिण्या परितः सुनिरूपितम् ।**
**अङ्गुलीनालवालैर्वा यथादेशं यथाशयम् ॥ १९ ॥**

फार मोठा जरी पाक असला तरी २ बोटें चांगलें फाडावें व दुसऱ्या जागीं फाडणें झाल्यास पहिल्या व्रणापासून २ किंवा ३ बोटांवर फाडावें. दुसरा व्रण करण्यापूर्वी जागा व पुवाचा आशय यांच्या मानानें एषणी, बोट, कमळाची देठी व केंस यांपैकीं कोणत्या तरी पदार्थानें पुवाचा सर्व बाजूंनीं चांगला शोध करून जागा व पुवाचा आशय पाहून त्या बेतानें दुसरा व्रण करावा.

**यतो गतां गतिं विद्यादुत्सङ्गो यत्र यत्र च ।**
**तत्र तत्र व्रणं कुर्यात्सुविभक्तं निराशयम् ॥ २० ॥**
**आयतं च विशालं च यथा दोषो न तिष्ठति ।**

शोथांत जिकडे जिकडे पोकळी (नाडीव्रण) दिसेल व जेथें जेथें उंचवटा दिसेल तेथें तेथें व्रण करावा. त्याच्या कडा वांकड्यातिकड्या (कुरतुडल्यासारख्या) नसाव्या. आंत पुवाचा शेष राहूं देऊं नये. तसेंच तो लांब व रुंद व जेणेंकरून आंत पू न राहील असा असावा.

शौर्यमाशुक्रिया तीक्ष्णं शस्त्रमस्वेदवेपथुः ॥ २१ ॥
असंमोहश्च वैद्यस्य शस्त्रकर्मणि शस्यते।

धैर्य, हातचलाखी, शस्त्राचें तीक्ष्णत्व, घाम न येणें, हात न कापणें व न घाबरतां बुद्धि स्थिर राहणें, हे गुण शस्त्रक्रिया करतांना वैद्याच्या अंगीं असावे लागतात.

*तिर्यक् छिन्द्याल्ललाटभ्रूदन्तवेष्टकजत्रुणि ॥ २२ ॥
कुक्षिकक्षाक्षिकूटौष्ठकपोलगलवङ्क्षणे।

कपाळ, भिंवया, हिरड्या, सरी ( छातीचें मधलें हाड ), कूस, खांक, डोळ्याच्या खळग्याच्या कडा, ओंठ, गाल, गळा व अडसांधि इतक्या ठिकाणीं तिरकस कापावें.

अन्यत्र च्छेदनात्तिर्यक् शिरास्नायुविपाटनम् ॥ २३ ॥

वरच्याशिवाय दुसऱ्या ठिकाणीं तिरकस कापल्यानें शिरा व स्नायु तुटतात.

शस्त्रेऽवचारिते वाग्भिः शीताम्भोभिश्च रोगिणम्।
आश्वास्य परितोऽङ्गुल्या परिपीड्य व्रणं ततः ॥२४॥
क्षालयित्वा कषायेण प्लोतेनाम्भोऽपनीय च।
गुग्गुल्वगुरुसिद्धार्थहिङ्गुसर्जरसान्वितैः ॥ २५ ॥
धूपयेत्पटुषड्ग्रन्थानिम्बपत्रैर्घृतप्लुतैः।

शस्त्रक्रिया केल्यावर रोग्यास गोड बोलून व त्याच्या अंगावर थंड पाणी शिंपडून सावध केल्यावर व्रणासभोंवतीं बोटानें दाबावें. नंतर स्तंभक पदार्थांच्या कषायानें व्रण धुवून फडक्याच्या बोळ्यानें कोरडा केल्यावर गुग्गुळ, अगरु, शिरस, हिंग, राळ, सैंधव, वेखंड व कडुलिंबाचीं पानें हे पदार्थ तुपाशीं मिसळून त्याची व्रणास धुरी द्यावी.

तिलकल्काज्यमधुभिर्यथास्वं भेषजेन च ॥ २६ ॥
दिग्धां वर्ति ततो दद्यात्तैरेवाच्छादयेच्च तम्।

ज्या ज्या व्रणांवर जीं जीं औषधें सांगितलीं असतील तीं व तिळांचा कल्क, मध आणि तूप यांचा वातीस लेप करून ती वात व्रणांत घालावी, नंतर त्याच औषधांनीं व्रण झांकावा ( त्याच औषधांची लुगदी करून व्रणावर बसवावी ).

घृताक्तैः सक्तुभिश्चोर्ध्वं

त्यानंतर सातूच्या पिठांत तूप घालून त्याची गोळी वर बसवावी.

घनां कवलिकां ततः ॥ २७ ॥
निधाय युक्त्या बध्नीयात्पट्टेन सुसमाहितम्।
पार्श्वे सव्येऽपसव्ये वा नाधस्तान्नैव चोपरि ॥ २८ ॥

नंतर वर फडक्याची जाड घडी ठेवून जपून युक्तीनें वरून फडकें लपेटून त्याची गांठ डाव्या किंवा उजव्या बाजूस द्यावी; खालीं किंवा वर देऊं नये.

शुचिसूक्ष्मदृढाः पट्टाः कवल्यः सविकेशिकाः।
धूपिता मृदवः श्लक्ष्णा निर्वलीका व्रणे हिताः॥ २९ ॥

व्रणासंबंधीं सर्व फडकीं स्वच्छ, तलम सुताचीं व बळकट असावीं; आणि घड्या व वाती मऊ, गुळगुळीत व धुरी दिलेल्या असून त्यांस सुरकुत्या नसाव्या, म्हणजे त्या चांगल्या.

कुर्वीतानन्तरं तस्य रक्षां रक्षोनिषिद्धये।
बलिं चोपहरेत्तेभ्यः

नंतर रोग्यास पिशाचादिकांचा उपद्रव न व्हावा म्हणून त्याची रक्षा ( मक्षिका, कृमि, हवेंतील दोष इत्यादिकांपासून रक्षण ) करावी व पिशाचादिकांस बळी द्यावा.

सदा मूर्ध्नावधारयेत् ॥ ३० ॥
लक्ष्मीं गुहामतिगुहां जटिलां ब्रह्मचारिणीम्।
वचां छत्रामतिच्छत्रां दूर्वां सिद्धार्थकानपि ॥ ३१ ॥

तुळस ( लक्ष्मी ), शालिपर्णी, पृश्निपर्णी, जटामांसी, ब्राह्मी ( ब्रह्मचारिणी ), वेखंड, बाळंतशोप, बडीशोप ( अतिच्छत्रा, ) दूर्वा व शिरस हे पदार्थ त्यानें नेहमीं डोक्यावर धारण करावे.

ततः स्नेहदिनेहोक्तं तस्याचारं समादिशेत्।

नंतर स्नेहपानाच्या दिवशीं करावयास सांगितलेले ( उष्णोदकोपचारीस्यादित्यादि ) उपचार त्यास करावयास सांगावे. ( सू. अ. १६ श्लो. २५–२७ पहा. )

दिवास्वप्नो व्रणे कण्डूरागरुक्शोफपूयकृत् ॥ ३२ ॥

दिवसां निजल्यामुळें व्रणांत कंड, लाली, वेदना, सूज व पू हीं होतात.

स्त्रीणां तु स्मृतिसंस्पर्शदर्शनैश्चलितस्रुते।
शुक्रे व्यवायजान् दोषानसंसर्गेऽप्यवाप्नुयात् ॥३३॥

स्त्रियांच्या स्मरणानें, स्पर्शानें व त्यांस पाहिल्यानें शुक्र स्वस्थानापासून चलित होऊन स्रवलें असतां त्यांच्या प्रत्यक्ष संसर्गावांचूनहि मैथुनापासून होणारे विकार रोग्यास होतात ( याकरितां त्यांचें स्मरण, स्पर्श व दर्शन करूं नये ).

---

* येथें जत्रु शब्दाचा अर्थ गळ्याखालचीं दोन हाडें असा जो अर्थ आम्हीं पूर्वीच्या आवृत्तींत दिला होता, तो हल्लींच्या कोशांवरून. मोनियर वुइल्यमप्रभृति आधुनिक विद्वानांनीं केलेल्या कोशांत या शब्दाचा अर्थ गळ्याचीं हाडें ( collar bones or clavicles ) असा दिल्यामुळें आजपर्यंत आमचीहि तशीच समजूत होती; परंतु या शब्दाचा वास्तविक अर्थ 'छातीचें मधलें हाड' ( इंग्रजींत Sternum ) असा होतो अशी आतां आमची खात्री झाली आहे; याचें कारण असें कीं, सर्व वैद्यक ग्रंथांत जत्रु हा शब्द नेहमीं एकवचनी येतो ( जसें वा. शा. ४, २ ऊर्ध्वन्तु जत्रोः नि. १५, २२ जत्रुराग्यंतें व नि. १५, ३६ जत्रोरुर्ध्वं इ. ) गळ्याच्या दोन हाडांस उद्देशून जर तो लाविला असता तर द्विवचनी पाहिजे होता. चरकांत व वृद्ध वाग्भटांत तर जत्रु हें हाड एकच आहे असें अस्थिगणनेमध्यें स्पष्टच सांगितलें आहे. ( वृ. वा. शा. अ. ५ ) शिवाय त्यांत व सुश्रुतांत अक्षक या नांवाचीं जीं दोन हाडें सांगितलीं आहेत तीं त्यांच्या स्थानावरून व आकृतीवरून गळ्यापासून खांद्यापर्यंत असणारीं जीं clavicle नांवाचीं दोन हाडें तींच होत, असें उघड दिसतें. अक्षक हें नांव clavicles या हाडांस शोभतेंहि ( अक्ष म्हणजे फांसा ). कांहीं काव्यांमध्यें गूढजत्रु हें विशेषण पुरुषांना लाविलेलें आढळतें व तेथें टीकाकार जत्रु याचा अर्थ 'ग्रीवामूलं' असा करितात; हेंहि वरील अर्थास जुळतें.

भोजनं तु यथासात्म्यं यवगोधूमषष्टिकाः।
मसूरमुद्गतुवरीजीवन्तीसुनिषण्णकाः ॥ ३४ ॥
बालमूलकवार्ताकतण्डुलीयकवास्तुकम्।
कारवेल्लककर्कोटपटोलकटुकाफलम् ॥ ३५ ॥
सैन्धवं दाडिमं धात्री घृतं तप्तहिमं जलम्।
जीर्णशाल्योदनं स्निग्धमल्पमुष्णं द्रवोत्तरम् ॥ ३६ ॥
भुञ्जानो जाङ्गलैर्मांसैः शीघ्रं व्रणमपोहति।

यव ( सातू ), गहूं, साठीतांदूळ, मसुरा, मूग, तुरी, हरणदोडी, कुरडूची भाजी, कोंवळा मुळा, वांगें, तांदुळजा, चाकवत, कारलें, करटोली, परवर, खुटकीचें फळ, सैंधव, डाळिंब, आवळकांठी, तूप, तापवून निवालेलें पाणी, जुन्या साळीचा भात यांपैकीं ज्यास जे सात्म्य असतील ते पदार्थ स्निग्ध, अल्प [ बेतानें मित ], उष्ण ( ऊन ) व द्रवरूप करून जांगलमांसाबरोबर जो सेवन करितो तो लवकरच व्रणापासून मुक्त होतो.

अशितं मात्रया काले पथ्यं याति जरां सुखम् ॥ ३७ ॥
अजीर्णे त्वनिलादीनां विभ्रमो बलवान् भवेत्।
ततः शोफरुजापाकदाहानाहानवाप्नुयात् ॥ ३८ ॥

योग्य वेळीं, बेतानें, हितकारक पदार्थ भक्षण केले म्हणजे त्यांचें सहज पचन होतें. अजीर्ण झालें तर वातादि दोष फारच प्रकुपित होतात व सूज, वेदना, पाक, दाह, पोट फुगणें, हे विकार उत्पन्न होतात.

नवं धान्यं तिलान्माषान् मद्यं मांसं त्वजाङ्गलम्।
क्षीरेक्षुविकृतीरम्लं लवणं कटुकं त्यजेत् ॥ ३९ ॥
यच्चान्यदपि विष्टम्भि विदाहि गुरु शीतलम्।
वर्गोऽयं नवधान्यादिर्व्रणिनः सर्वदोषकृत् ॥ ४० ॥

नवें धान्य, तीळ, उडीद, मद्य, जांगल नव्हे असें मांस, दूध व ऊंस यांचे पदार्थ आंबट, खारट व तिखट हीं व्रणी मनुष्यानें वर्ज्य करावीं; व तसेंच यांशिवाय जे पदार्थ मलावरोध करणारे, विदाही, जड व थंड असतील तेहि वर्ज्य करावे. हा नवधान्यादि वर्ग व्रणी मनुष्याला सर्व दोष ( वात, पित्त, कफ ) करणारा आहे.

मद्यं तीक्ष्णोष्णरूक्षाम्लमाशु व्यापादयेद्व्रणम्।

मद्य हें तीक्ष्ण, उष्ण, रूक्ष व आंबट आहे, त्यामुळें तें फार लवकर व्रणास दूषित करितें.

वालोशीरैश्च वीज्येत न चैनं परिघट्टयेत् ॥ ४१ ॥
न तुदेन्न च कण्डूयेच्चेष्टमानश्च पालयेत्।
स्निग्धवृद्धद्विजातीनां कथाः शृण्वन्मनःप्रियाः ॥४२॥
आशावान् व्याधिमोक्षाय क्षिप्रं व्रणमपोहति।

चवरी व वाळ्याचा पंखा यांनीं त्यास वारा घालावा; तो घासटूं नये. व्रणास कोणत्याहि तऱ्हेनें दुखवूं नये, खाजवूं नये व त्यास इजा न होईल तितकाच व्यापार करावा. प्रीति करणारे, म्हातारे व ब्राह्मण यांजपासून मनास आवडत्या गोष्टी ऐकून व्याधीपासून मुक्त होण्याची उमेद धरून राहिल्यास लवकरच त्याचा व्रण भरून येतो.

तृतीयेऽह्नि पुनः कुर्याद्व्रणकर्म च पूर्ववत् ॥ ४३ ॥
प्रक्षालनादि दिवसे द्वितीये नाचरेत्

तिसऱ्या दिवशीं पुनः पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रक्षालनादिक व्रणाचें कर्म करावें; दुसऱ्या दिवशीं करूं नये.

तथा।

तीव्रव्यथो *विग्रथितश्चिरात्संरोहति व्रणः ॥ ४४ ॥

कारण तसें केल्यानें व्रण अतिशय दुखूं लागून व कडा वगैरे विसकटून तो भरून येण्यास फार दिवस लागतात.

स्निग्धां रूक्षां श्लथां गाढां दुर्न्यस्तां च विकेशिकाम्।
व्रणे न दद्यात्कल्कं च

वात फार स्निग्ध, रूक्ष, शिथिल व घट्ट अशी नसावी, व ती व्रणांत वांकडीतिकडी घालूं नये. तसेंच कल्कहि अतिस्निग्ध, अतिरूक्ष, पातळ व दाट नसून त्यावर वस्त्रविगैरे तोहि चांगल्या रीतीनें बसवावा.

स्नेहात्क्लेदो विवर्धते ॥ ४५ ॥

अतिस्नेहापासून क्लेद वाढतो.

मांसच्छेदोऽतिरुग्रौक्ष्याद्दरणं शोणितागमः।
श्लथातिगाढदुर्न्यासैर्व्रणवर्त्मावघर्षणम् ॥ ४६ ॥

अतिरूक्ष असेल तर मांस तुटतें, वेदना अतिशय वाढते, व्रण फाटतो ( विस्तृत होतो ) व त्यांतून रक्त येऊं लागतें; सैल किंवा घट्ट घातल्यानें किंवा बरोबर न घातल्यानें व्रणाच्या बाजू घांसल्या जातात.

सपूतिमांसं सोत्सङ्गं सगतिं पूयगर्भिणम्।
व्रणं विशोधयेच्छीघ्रं स्थिता ह्यन्तर्विकेशिका ॥ ४७ ॥

ज्यांतील मांस दुर्गंधियुक्त झालें आहे व ज्यांत उंचवटा आहे, ज्यांत गति ( नाडीव्रण ) आणि पू आहे अशा व्रणाचे आंत घातलेली वात लवकर शोधन करिते.

व्यम्लं तु पाटितं शोफं पाचनैः समुपाचरेत्।
भोजनैरुपनाहैश्च नातिव्रणविरोधिभिः ॥ ४८ ॥

अपक्व शोथाचें पाटन केलें तर शोथास पिकविणारे पदार्थ खावे, व तसेंच पिकविणारे उपनाह वगैरे करावे ( पोटिसें वगैरे बांधावीं. ) ते फारसे वावडे नसावे. ( शोथाचें पाचन करणारे असून केलेल्या व्रणास ते फारसे विरुद्ध नसावे ).

सद्यः सद्योव्रणान् सीव्येद्विवृतानभिघातजान्।
मेदोजान् लिखितान् ग्रन्थीन् ह्रस्वाः पालीश्च कर्णयोः

* विग्रथित याचा अर्थ अरुणदत्तानें "बहुभिर्ग्रन्थिभिर्युतः" असा केला आहे. आमच्या मतें 'व्रणाच्या कडा एकमेकांपासून सुटणें' असा अर्थ करावा ( ग्रथन म्ह० जुळणें व विग्र म्ह० विसकटणें ). विग्रथितो विषमसंस्थान इति हेमाद्रिः।

**शिरोऽक्षिकूटनासौष्ठगण्डकर्णोरुबाहुषु ।**
**ग्रीवाललाटमुष्कस्फिङ्मेढ्रपायूदरादिषु ॥ ५० ॥**
**गम्भीरेषु प्रदेशेषु मांसलेष्वचलेषु च ।**

आघातापासून झालेल्या जखमा, त्यांची तोंडें विस्तीर्ण असल्यास, लागल्याच शिवाव्या. भेदापासून झालेल्या ग्रंथीचे लेखन करून जखम शिवावी; कानांच्या पाळी लहान असल्या तरी त्यांचें लेखन करून त्या शिवाव्या; मस्तक, डोळ्यांच्या कोनाच्याच्या कडा, नाक, ओंठ, गाल, कान, मांड्या, दंड, मान, कपाळ, वृषण, कुले, शिश्न, गुद व उदर इत्यादि ठिकाणचे, खोल जागचे, मांसल जागेवरचे व स्थिर जागेवरचे व्रण लागलेच शिवावे.

**न तु वङ्क्षणकक्षादावल्पमांसे चले व्रणान् ॥ ५१ ॥**
**वायुनिर्वाहिणः शल्यगर्भान्क्षारविषाग्निजान् ।**

अडसंधि, बगल इत्यादि अल्पमांसयुक्त व हलणाऱ्या जागचे व्रण, तसेंच ज्यांतून वायु वाहतो तें, ज्यांत शल्य आहे ते आणि क्षार, विष व अग्नि यांपासून झालेले इतके व्रण शिवूं नये.

**सीव्येच्चलास्थिशुष्कास्रतृणरोमापनीय तु ॥ ५२ ॥**
**प्रलम्बि मांसं विच्छिन्नं निवेश्य स्वनिवेशने ।**
**सन्ध्यस्थ्यवस्थिते रक्ते स्नाय्वा सूत्रेण वल्कलैः ॥ ५३ ॥**
**सीव्येन्न दूरे नासन्ने गृह्णन्नाल्पं न वा बहु ।**

जखम शिवण्यापूर्वी तींतील हलणारें हाड, वाळलेलें रक्त, गवत, केंस इ० काढावे, शस्त्रानें तुटल्यामुळें लोंबणारें मांस, सांधे व हाडें हीं जागच्या जागीं बसवून रक्त बंद झाल्यावर स्नायूनें, सुतानें किंवा सालीच्या दोरानें शिवावें, टांके फार जवळ जवळ नसावे व फार दूर दूर नसावे. तसेंच शिवतांना व्रणांची कड अगदीं थोडी किंवा फारहि घेऊं नये.

**सान्त्वयित्वा ततश्चार्तं व्रणे मधुघृतद्रुतैः ॥ ५४ ॥**
**अञ्जनक्षौमजमषीफलिनीशल्लकीफलैः ।**
**सलोध्रमधुकैर्दिग्धे युञ्ज्याद्बन्धादि पूर्ववत् ॥ ५५ ॥**

नंतर रोग्याचें शांतवन करून सुरमा, रेशमाची राख, गव्हला, साळई वृक्षाचें फळ, लोध्र व ज्येष्ठीमध हीं औषधें मध व तुपांत कालवून व्रणावर लावावीं; नंतर पूर्वीप्रमाणें बंधादि क्रिया करावी.

**व्रणो निःशोणितौष्ठो यः किञ्चिदेवावलिख्य तम् ।**
**सञ्जातरुधिरं सीव्येत्सन्धानं ह्यस्य शोणितम् ॥ ५६ ॥**

व्रणाच्या कडा रक्ताळलेल्या नसतील तर शस्त्रानें किंचित् लेखन करून त्या रक्ताळल्यावर व्रण शिवावा; कारण रक्त हेंच कडांचें मेलन करणारें आहे.

**बन्धनानि तु देशादीन् वीक्ष्य युञ्जीत तेषु च ।**

त्या त्या व्रणावर देशदूष्यादिकांचा विचार करून बंधनें बांधावीं.

**आविकाजिनकौशेयमुष्णं क्षौमं तु शीतलम् ॥ ५७ ॥**
**शीतोष्णं तूलसन्तानकार्पासस्नायुवल्कजम् ।**

लोंकरीचें वस्त्र, हरणाचें कांतडें व रेशमी वस्त्र हीं उष्ण आहेत, तागाचें कापड थंड व सावरीच्या कापसानें वस्त्र, कापसाचें वस्त्र, स्नायूचें व सालीचें बंधन हीं मध्यम आहेत.

**ताम्रायस्त्रपुसीसानि व्रणे मेदःकफाधिके ॥ ५८ ॥**
**भङ्गे च युञ्ज्यात् फलकं चर्मवल्ककुशादि च ।**

ज्यांत मेद व कफ अधिक आहेत अशा व्रणावर तांबें, लोखंड, कथील व शिसें यांच्या पट्ट्या बांधाव्या, आणि अस्थिभंगावर बांधण्यासाठीं लांकडाची फळी, चर्म, झाडाची साल व बांबूची कांब यांचा उपयोग करावा.

**स्वनामानुगताकारा बन्धास्तु दश पञ्च च ॥ ५९ ॥**
**कोशस्वस्तिकमुत्तोलीचीनदामानुवेल्लितम् ।**
**खट्वाविबन्धस्थगिकावितानोत्सङ्गगोफणाः ॥ ६० ॥**
**यमकं मण्डलाख्यं च पञ्चाङ्गी चेति योजयेत् ।**
**यो यत्र सुनिविष्टः स्यात्तं तेषां तत्र बुद्धिमान् ॥ ६१ ॥**

कोशबंध (बोटांच्या पेरांत), स्वस्तिकबंध (सांधे, कूर्चा, भिवया, स्तनांमधील अवकाश, खांक, डोकें, गाल, कान इत्यादि ठिकाणीं), मुत्तोलीबंध (मान व शिश्नावर), चीनबंध (डोळ्याच्या बाहेरल्या कोंपऱ्यांवर), दाम (सांधे व अडसंधीवर), अनुवेल्लितबंध (हात व पाय यांत), खट्वाबंध (हनुवटी, सांधे व गाल यांवर), विबंधबंध (पोट, मांडी व पाठ यांवर), स्थगिकाबंध (अंगठा, शिश्न, अंत्र-वृद्धि, मूत्रवृद्धि यांवर), वितानबंध (डोक्यासारख्या लट्ठ भागीं), उत्संगबंध (दंडास), गोफणबंध (नाक, ओंठ, हनुवटी, मांडी यांवर), यमकबंध (जवळ जवळ असणाऱ्या दोन व्रणांवर), मंडलबंध (वाटोळ्या अंगीं) व पंचांगीबंध (जत्रूवरच्या भागीं) असे व्रणाचे १५ बंध आहेत. त्यांचे आकार* त्या त्या नांवाप्रमाणें असावे. बुद्धिवान् मनुष्यानें यांपैकीं ज्या ठिकाणीं जो चांगला बसेल तेथें तो बंध बांधावा.

**बध्नीयाद्गाढमूरुस्फिक्कक्षावङ्क्षणमूर्धसु ।**

मांडी, कुले, खांक, अडसंधि व डोकें या ठिकाणीं घट्ट बांधावें.

**शाखावदनकर्णोरःपृष्ठपार्श्वगलोदरे ॥ ६२ ॥**
**समं मेहनमुष्के च**

हात, पाय, तोंड, कान, उर, पाठ, कुशी, गळा, पोट, शिश्न व वृषण यांवर नेमस्त (मध्यम जोरानें) बांधावें.

---

* यांत जखम बांधण्याचे १५ निरनिराळे प्रकार सांगितले आहेत व त्यांस निरनिराळ्या संज्ञा दिल्या आहेत व त्या संज्ञाच त्या बंधनाचा आकार सुचवितात असें म्हटलें आहे. ह्यांपैकीं चीन, विबंध, स्थगिका व उत्संग ह्या शब्दांनीं आकार कसा सुचविला जातो हें समजत नाहीं. बाकीच्या कोश, वितान, गोफण इ० शब्दांपासून मात्र आकृतीचा बोध होतो. तथापि वृद्ध वाग्भट व सुश्रुत यांच्या व टीकाकारांच्या आधारानें हे बंध कोणकोणत्या ठिकाणीं असावे याचें आम्हीं कंसांत दिग्दर्शन केलें आहे. त्यावरून व हल्लींच्या इंग्रजी शस्त्रक्रियेंतील प्रत्यक्ष माहितीवरून ह्या बंधांचें स्वरूप समजून येईल. विस्तारभयास्तव प्रत्येकाचें विशेष वर्णन आम्ही येथें करूं शकत नाहीं.

नेत्रसन्धिषु च श्लथम् ।

डोळा व सांधे यांवर सैल बांधावें.

बध्नीयाच्छिथिलस्थाने वातश्लेष्मोद्भवे समम् ॥ ६३ ॥
गाढमेव समस्थाने भृशं गाढं तदाश्रये ।

वात व कफ यांपासून झालेले व्रण असतील तर ज्या स्थानीं सैल बांधावें म्हणून सांगितलें आहे तेथें मध्यम बांधावें, व मध्यम बांधावयास सांगितलेल्या जागीं घट्ट बांधावें व जेथें घट्ट बांधावें म्हणून सांगितलें आहे तेथें तर खूपच घट्ट बांधावें.

शीते वसन्ते च तथा मोक्षणीयौ त्र्यहात् त्र्यहात् ॥६४॥

वातापासून व कफापासून झालेल्या व्रणाचे बंध हेमंत, शिशिर व वसंत या ऋतूंत तीन तीन दिवसांनीं सोडावे.

पित्तरक्तोत्थयोर्बन्धो गाढस्थाने समो मतः ।
समस्थाने श्लथो नैव शिथिलस्याशये तथा ॥ ६५ ॥

पित्तापासून व रक्तापासून झालेल्या व्रणास गाढाच्या जागीं मध्यम, मध्यमाच्या जागीं ( स्थानीं ) सैल बंध बांधावा, व जेथें सैल सांगितला आहे तेथें मुळींच बंध बांधूं नये.

सायंप्रातस्तयोर्मोक्षो ग्रीष्मे शरदि चेष्यते ।

ग्रीष्म व शरदृतूंत ते सकाळीं व संध्याकाळीं सोडावे.

अबद्धो दंशमशकशीतवातादिपीडितः ॥ ६६ ॥
दुष्टीभवेच्चिरं चात्र न तिष्ठेत्स्नेहभेषजम् ।
कृच्छ्रेण शुद्धिं रूढिं वा याति रूढो विवर्णताम् ॥६७॥

व्रण न बांधला तर गांधिलमाशा ( किंवा डांस ), माशा, थंड वायु इत्यादिकांच्या योगानें तो दुष्ट होतो. आंत घातलेला स्नेह किंवा औषध फार वेळ ठरत नाहीं. त्याचें शोधन व रोपण फार प्रयासानें होतें, व तो भरून आला तरी त्यावरील त्वचेला पूर्वीसारखा वर्ण येत नाहीं.

बद्धस्तु चूर्णितो भग्नो विश्लिष्टः पाटितोऽपि वा ।
छिन्नस्नायुशिरोऽप्याशु सुखं संरोहति व्रणः ॥ ६८ ॥
उत्थानशयनाद्यासु सर्वेहासु न पीडयेत् ।

चुरलेला ( हाडें ज्यांत चुरलीं आहेत असा ), ज्यांत हाड मोडलें आहे तो, ज्यांत सांधा निखळला आहे तो व जो फाडलेला आहे तो, आणि ज्यांत शिरा व स्नायु तुटले आहेत तो, हे सर्व प्रकारचे व्रण बांधले असतां सहज भरून येतात; व बसणें, उठणें, निजणें इत्यादि सर्व क्रिया करतेवेळीं दुखत नाहींत.

उद्वृत्तौष्ठः समुत्सन्नो विषमः कठिनोऽतिरुक् ॥ ६९ ॥
समो मृदुररुक् शीघ्रं व्रणः शुध्यति रोहति ।

ज्याचे कांठ वर वळले आहेत, जो वर आल्यासारखा दिसतो व जो कठिण, विसकटलेला व फार वेदनायुक्त आहे, तो व्रण बांधल्यानें सारखा मऊ व वेदनारहित असा होऊन त्याचें शोधन व रोपण लवकर होतें.

स्थिराणामल्पमांसानां रौक्ष्यादनुपरोहताम् ॥ ७० ॥
प्रच्छाद्यमौषधं पत्रैर्यथादोषं यथर्तु च ।
अजीर्णतरुणाच्छिद्रैः समन्तात्सुनिवेशितैः ॥ ७१ ॥
धौतैरकर्कशैः क्षीरिभूर्जार्जुनकदम्बजैः ।

व्रण पुष्कळ दिवसांचे असून आंतील मांसांकुर अल्प असतील तर ते रूक्षपणामुळें रुजून येत नाहींत; यासाठीं त्यांत औषध घातल्यावर त्या औषधांवर वटादि क्षीरी वृक्ष, भूर्जवृक्ष, अर्जुनसादडा व कळंब यांपैकीं दोष व ऋतु यांच्या मानानें कोणत्या तरी झाडाचीं पानें घालून त्यांनीं तें औषध आच्छादित करून नंतर वर बंधन करावें. तीं पानें मऊ असून धुवून स्वच्छ केलेलीं, छिद्ररहित, फार कोंवळी नव्हेत व फार जूनहि नव्हेत अशीं असावीं, आणि तीं सभोंवतीं चांगलीं बसवावीं.

कुष्ठिनामग्निदग्धानां पिटिका मधुमेहिनाम् ॥ ७२ ॥
कर्णिकाश्चोन्दुरुविषे क्षारदग्धा विषान्विताः ।
न मांसपाके च बध्नीयाद्गुदपाके च दारुणे ॥ ७३ ॥
शीर्णमाणाः सरुग्दाहाः शोफावस्था विसर्पिणः ।

कुष्ठाचे, भाजल्याचे व मधुमेहाच्या पुळ्यांचे व्रण, तसेंच, उंदराच्या विषाचीं, क्षारानें भाजल्याचीं व दुसऱ्या विषानें युक्त अशीं चकंदळें हीं बांधूं नये; तसेच, मांसाचा पाक झाला असेल तर व भयंकर गुदपाक असेल तर बांधूं नये, आणि ज्या व्रणांतील मांस कुजून गळूं लागतें व ज्यांत वेदना व दाह असतो ते व सुजलेले व पसरणारे असे व्रण बांधूं नयेत.

अरक्षया व्रणे यस्मिन् मक्षिका निक्षिपेत् कृमीन् ॥७४॥
ते भक्षयन्तः कुर्वन्ति रुजाशोफास्रसंस्रवान् ।

व्रणाचें रक्षण न केल्यानें वर माशा बसून ज्या व्रणांत कृमि [ किडे ] टाकितात त्या व्रणास ते किडे खाऊन वेदना, सूज व रक्तस्राव उत्पन्न करितात.

सुरसादि प्रयुञ्जीत तत्र धावनपूरणे ॥ ७५ ॥
सप्तपर्णकरञ्जार्कनिम्बराजादनत्वचः ।
गोमूत्रकल्कितो लेपः सेकः क्षाराम्बुना हितः ॥ ७६ ॥
प्रच्छाद्य मांसपेश्या वा व्रणं तानाशु निर्हरेत् ।

त्यांवर सुरसादिगणांतील औषधांच्या काढ्यानें धावन (धुणें) करावें व त्यांच्याच कल्कानें व्रणाचें पूरण ( कल्क व्रणांत घालणें किंवा वातीला लावून ती वात व्रणांत घालणें ) करावें. तसेंच सात्वीण, करंज, रुई, कडूलिंब व चारोळ्याचें झाड, यांच्या सालीचा गोमूत्रांत वांटून लेप करावा. क्षारयुक्त पाण्याच्या घड्या व्रणांवर ठेवाव्या, किंवा व्रणांवर मांसाचा तुकडा ठेवून त्यांस ते चिकटले म्हणजे तो बाहेर काढून ते काढून टाकावे. कोणत्या तरी उपायानें कृमि व्रणांतून लवकर बाहेर काढावे.

न चैनं त्वरमाणोऽन्तःसदोषमुपरोहयेत् ॥ ७७ ॥
सोऽल्पनाप्यपचारेण भूयो विकुरुते यतः ।

धाई करून आंत पू शिल्लक असतां व्रण रुजूं देऊं नये (शोधन झाल्यावांचून रोपण करूं नये); कारण तशा तऱ्हेनें रुजलेला व्रण थोड्याशा अपथ्यानेंहि पुनः विकृत होतो.

रूढेऽप्यजीर्णव्यायामव्यवायादीन् विवर्जयेत् ॥ ७८ ॥
हर्षं क्रोधं भयं वापि यावदास्थैर्यसम्भवात् ।
आदरेणानुवर्त्योऽयं मासान् षट् सप्त वा विधिः ।७९।

चांगल्या रीतीनें व्रण भरून आला असतांहि चांगली स्थिरता (रक्त व मांस यांस) येईपर्यंत अजीर्ण, व्यायाम, मैथुन, हर्ष, राग व भीति हीं वर्जावीं. हा क्रम मोठ्या काळजीनें सहा किंवा सात महिने चालवावा.

उत्पद्यमानासु च तासु तासु
वार्तासु दोषादिबलानुसारी ।
तैस्तैरुपायैः प्रयतश्चिकित्से-
दालोचयन् विस्तरमुत्तरोक्तम् ॥ ८० ॥

व्रणाची चिकित्सा करतेवेळीं ज्या ज्या गोष्टी (विकार) उत्पन्न होतील त्यांवर दोषादिकांचें बल व उत्तरस्थानांत सांगितलेला विस्तार लक्षांत आणून त्याप्रमाणें मोठ्या प्रयत्नानें ते ते उपाय करून व्रणाचा प्रतिकार करावा.

---

# त्रिंशोऽध्यायः

## अध्याय ३० वा

## अथातः क्षाराग्निकर्मविधिमध्यायं व्याख्यास्यामः ॥

आतां क्षारकर्म व अग्निकर्म (डाग देणें) यासंबंधीं अध्याय सांगतों.

सर्वशस्त्रानुशस्त्राणां क्षारः श्रेष्ठः

सर्व शस्त्रें व उपशस्त्रें यांमध्यें क्षार श्रेष्ठ आहे.

बहूनि यत् ।
छेद्यभेद्यादिकर्माणि कुरुते विषमेष्वपि ॥ १ ॥
दुःखावचार्यशस्त्रेषु तेन सिद्धिमयात्सु च ।
अतिकृच्छ्रेषु रोगेषु यच्च पानेऽपि युज्यते ॥ २ ॥

कारण ज्या ठिकाणीं शस्त्र चालवितां येत नाहीं, अशा विषमस्थानींहि तो छेदन, भेदन, पाटन इत्यादि कामें करितो. तसेंच शस्त्रानें साध्य न होणाऱ्या अशा अतिशय कष्टसाध्य रोगांवर [लेपार्थ] आणि [अर्शादिकांवर] पोटांत देण्याच्याहि उपयोगीं पडतो.

स पेयोऽर्शोऽग्निसादाश्मगुल्मोदरगरादिषु ।

मुळव्याध, अग्निमांद्य, मुतखडा, गुल्म, उदर व विष इत्यादि रोगांवर तो पोटांत देतात.

योज्यः साक्षान्मषश्वित्रबाह्यार्शःकुष्ठसुतिषु ॥ ३ ॥
भगन्दरार्बुदग्रन्थिदुष्टनाडीव्रणादिषु ।

मस, कोड, बाहेरचे मोड, कुष्ठ, त्वचेची बधिरता, भगंदर, अर्बुद, ग्रंथि व दुष्ट नाडीव्रण इत्यादि रोगांवर क्षाराचा लेप करावा.

न तूभयोऽपि योक्तव्यः पित्ते रक्ते चलेऽचले ॥ ४ ॥
ज्वरेऽतिसारे हृन्मूर्धरोगे पाण्ड्वामयेऽरुचौ ।
तिमिरे कृतसंशुद्धौ श्वयथौ सर्वगात्रगे ॥ ५ ॥
भीरुगर्भिण्यृतुमतीप्रोद्वृत्तफलयोनिषु ।
अजीर्णेऽन्ने शिशौ वृद्धे धमनीसन्धिमर्मसु ॥ ६ ॥
तरुणास्थिशिरास्नायुसेवनीगलनाभिषु ।
देशेऽल्पमांसे वृषणमेढ्रस्रोतोनखान्तरे ॥ ७ ॥
वर्त्मरोगादृतेऽक्ष्णोश्च शीतवर्षोष्णदुर्दिने ।

पित्तविकार, रक्तविकार, वातविकार, ज्वर, अतिसार, हृद्रोग, शिरोरोग, पांडुरोग, अरुचि, तिमिररोग, सर्वांगशोथ [नाळगुद] व प्रोद्वृत्तफलयोनि [विटाळशूळ] या रोगांवर; तसेंच अशक्त, भित्रा, वमनविरेचनानें शुद्ध झालेला, बाल, वृद्ध, गर्भिणी व रजस्वला यांना, तसेंच अन्न जिरण्यापूर्वीं, त्याचप्रमाणें धमनी, सांधे, मर्म, तरुणास्थि,* शिरा, स्नायु, शिवण,† बेंबी, गळा, वृषण, शिश्न, स्रोतसें [नासादि], नखाच्या मागला भाग, अल्प मांसाचे भाग या ठिकाणीं, पापण्यांच्या रोगावांचून डोळ्यांत, तसेंच शिशिर, हेमंत, ग्रीष्म व वर्षा या ऋतूंत व ज्या दिवशीं अभ्र असेल त्या दिवशीं दोन्ही प्रकारांनीं क्षाराचा उपयोग करूं नये.

कालमुष्ककशम्याककदलीपारिभद्रकान् ॥ ८ ॥
अश्वकर्णमहावृक्षपलाशास्फोतवृक्षकान् ।
इन्द्रवृक्षार्कपूतीकनक्तमालाश्वमारकान् ॥ ९ ॥
काकजङ्घामपामार्गमाग्निमन्थाग्नितिल्वकान् ।
सार्द्रान्समूलशाखादीन्खण्डशः परिकल्पितान् ॥१०॥
कोशातकीश्चतस्रश्च शूकनालं यवस्य च ।
निवाते निचयीकृत्य पृथक् तानि शिलातले ॥ ११ ॥
प्रक्षिप्य मुष्ककचये सुधाश्मानि च दीपयेत् ।
ततस्तिलानां कुन्तालैर्दग्ध्वाऽग्नौ विगते पृथक् ॥ १२ ॥
कृत्वा सुधाश्मनां भस्म द्रोणं त्वितरभस्मनः ।
मुष्ककोत्तरमादाय प्रत्येकं जलमूत्रयोः ॥ १३ ॥
गालयेदर्धभारेण महता वाससा च तत् ।
यावत्पिच्छिलरक्ताच्छस्तीक्ष्णो जातस्तदा च तम् १४
गृहीत्वा क्षारनिस्यन्दं पचेल्लोह्यां विघट्टयन् ।
पच्यमाने ततस्तस्मिंस्ताः सुधाभस्मशर्कराः ॥ १५ ॥
शुक्तिक्षीरपाकशङ्खनाभीश्चायसभाजने ।
कृत्वाऽग्निवर्णान् बहुशः क्षारोत्थे कुडवोन्मिते ॥१६॥

* कान, नाक वगैरे भागांतील कोमल अस्थि (इंग्रजींत कार्टिलेज).
† वृषणापासून गुदद्वारापर्यंत जाणारी शिवणीसारखी रेषा.

निर्वाप्य पिष्ट्वा तेनैव प्रतीवापं विनिक्षिपेत् ।
श्लक्ष्णं शकृद्दक्षाशिखिगृध्रकङ्ककपोतजम् ॥ १७ ॥
चतुष्पात्पक्षिपित्तालमनोह्वालवणानि च ।
परितः सुतरां चातो दर्व्या तमवघट्टयेत् ॥ १८ ॥
सबाष्पैश्च यदोत्तिष्ठेद्बुद्बुदैर्लेहवद्घनः ।
अवतार्य ततः शीतो यवराशावयोमये ॥ १९ ॥
स्थाप्योऽयं मध्यमः क्षारो

काळा मोखा, बाहवा, केळ, देवदार, लघुराळेचा वृक्ष, निधारी निवडुंग, पळस, मांदार, कुडा, अर्जुनसादडा, रुई, पाणेरा करंज, करंज, कण्हेर, काकजंघा, आघाडा, ऐरण, चित्रक, लोध्र हीं झाडें खांद्या व मुळें, पानें इ. सकट ओलीं आणून त्यांचे बारीक बारीक तुकडे करावे. तसेंच चार कोशातकी (कडू दोडकी व घोसाळी, देवडांगरी व कडूतुंबी), सातूचा कडबा व तूस, या सर्व पदार्थांच्या निवांतस्थानीं दगडावर निरनिराळ्या राशी करून ठेवाव्या. मोख्याच्या राशींत चुनखडे घालावे, नंतर तिळाचे दांडे पेटवून त्यांनीं त्या राशी पेटवाव्या, नंतर चुना निराळा काढून त्या सर्व पदार्थांची राख एकंदर १,०२४ तोळे घेऊन ती ४,००० तोळे पाणी व ४,००० तोळे गोमूत्र यांत घालून एका मोठ्या वस्त्रानें बुळबुळीत, लाल, पातळ व तीक्ष्ण होईपर्यंत अनेक वेळां गाळावी. नंतर तें क्षाराचें पाणी एका लोखंडाच्या भांड्यांत घालून चुलीवर ठेवून आंच द्यावी, व पळीनें ढवळावें, तें आटूं लागलें म्हणजे त्यांतून ३२ तोळे पाणी दुसऱ्या एका लोखंडाच्या भांड्यांत घेऊन त्यांत ते निराळे काढून ठेवलेले चुनखडे, शिंपा, खडू व शंख वारंवार तापवून लाल करून विझवावे, आणि मग त्याच पाण्यांत बारीक वाटून त्या सर्व क्षारोदकांत घालावे, तसेंच कोंबडे, मोर, गिधाड, कंक व पारवा यांची विष्ठा बारीक करून त्यांत घालावी. तसेंच पशु व पक्षि यांचें पित्त, हरताळ, मनशीळ व सैंधव हीं त्यांत घालून चोहोंकडून पळीनें ढवळावें. त्यांतून वाफेबरोबर बुडबुडे येऊं लागले म्हणजे खालीं उतरावें. थंड झाल्यावर लोखंडाच्या भांड्यांत घालून सातूंच्या राशींत (सात दिवस) ठेवावें. हा मध्यम क्षार होय.

न तु पिष्ट्वा क्षिपेन्मृदौ ।
निर्वाप्यापनयेत्

मृदु क्षार करावयाचा असला म्हणजे शिंपादिक पदार्थ अनेक वेळ तापवून फक्त त्या पाण्यांत विझवावे, ते वाटून आंत घालूं नये.

तीक्ष्णे पूर्ववत्प्रतिवापनम् ॥ २० ॥
तथा लाङ्गलिकादन्तीचित्रकातिविषावचाः ।
स्वर्जिकाकनकक्षीरीहिङ्गुपूतीकपल्लवाः ॥ २१ ॥
तालपत्री बिडं चेति

तीक्ष्ण करावयाचा असेल तर मध्यमाप्रमाणें करून त्यांत आणखी कळलावी, दांतीणमूळ, चित्रक, अतिविष, वेखंड, सज्जीखार, पिसोळा, हिंग, पाणेऱ्या करंजाची पानें, मुसळी व बिडलोण हीं औषधें बारीक करून घालावीं.

सप्तरात्रात्परं तु सः ।
योज्यः

सातूंच्या राशींत सात दिवस पुरून ठेविल्यावर नंतर (मध्यम, मृदु व तीक्ष्ण अशा तिन्ही) क्षारांचा उपयोग करावा.

तीक्ष्णोऽनिलश्लेष्ममेदोजेष्वर्बुदादिषु ॥ २२ ॥

वात, कफ व मेद यांपासून झालेल्या अतिवृद्ध अर्बुदादिकांवर तीक्ष्ण क्षारांचा उपयोग करावा.

मध्येष्वेव च मध्यः

तेच विकार मध्यम असले म्हणजे त्यांवर मध्यमाचा उपयोग करावा.

अन्यः पित्तास्रगुदजन्मसु ।

पित्तजन्य व रक्तजन्य अर्शांवर मृदूचा उपयोग करावा.

बलार्थं क्षीणपानीये क्षाराम्बु पुनरावपेत् ॥ २३ ॥

तो क्षार सुकला असतां त्याची क्षीणता वाढण्यासाठीं त्यांत पुनः क्षारांबु (राखेचें पाणी) घालावें.

नातितीक्ष्णो मृदुः श्लक्ष्णः पिच्छिलः शीघ्रगः सितः ।
शिखरी सुखनिर्वाप्यो न विष्यन्दी न चातिरुक् ॥ २४ ॥
क्षारो दशगुणः शस्त्रतेजसोरपि कर्मकृत् ।

किंचित् तीक्ष्ण, मृदु, गुळगुळीत, बुळबुळीत, लवकर पसरणारा, पांढरा, भांड्यांत ठेविल्यानें ज्यांत कांहीं दिवसांनीं तळीं शिखराकार सांखा जमतो असा, सहज शांत होणारा, स्राव न करणारा, अतिशय वेदना न करणारा, असा दशगुणात्मक क्षार शस्त्र व अग्नि या दोहोंचेंहि काम करितो.

आचूषन्निव संरम्भाद्गात्रमापीडयन्निव ॥ २५ ॥
सर्वतोऽनुसरन्दोषानुन्मूलयति मूलतः ।
कर्म कृत्वा गतरुजः स्वयमेवोपशाम्यति ॥ २६ ॥

क्षार शरीरास लाविला असतां त्या भागास जोरानें ओढून घेतल्यासारखी व दाबल्यासारखी वेदना करून जिकडे तिकडे पसरून दोषांस मुळापासून उपटून टाकितो. याचें कार्य झाल्यावर वेदना नाहींशी होऊन तो आपोआप थंड होतो.

क्षारसाध्ये गदे छिन्ने लिखिते स्राविलेऽथवा ।
क्षारं शलाकया दत्त्वा प्लोतप्रावृतदेहया ॥ २७ ॥
मात्राशतमुपेक्षेत

क्षारसाध्य रोगास क्षार लाविण्यासाठीं तो प्रथम कापावा किंवा खरवडावा, किंवा त्यांतून स्राव करावा. नंतर सळईस कापूस गुंडाळून त्या सळईनें वर क्षार लावून शंभर मात्रा होईपर्यंत तसाच ठेवावा.

तत्रार्शःस्वावृताननम् ।

**हस्तेन यन्त्रं कुर्वीत**

मूळव्याधीवर क्षार लाविल्यानंतर यंत्रावर हात ठेवून त्याचें तोंड झांकावें.

**वर्त्मरोगेषु वर्त्मनी ॥ १८ ॥**

**निर्भुज्य पिचुनाच्छाद्य कृष्णभागं विनिक्षिपेत् ।**
**पद्मपत्रतनुः क्षारलेपो**

पापण्यांच्या रोगांवर क्षार लावणें झाल्यास डोळ्याच्या पापण्या वर दुमडून आंतील लाल भाग बाहेर आला म्हणजे काळ्या भागावर बोळा ठेवून लाल भागावर कमळाच्या पानाप्रमाणें पातळ लेप करावा.

**घ्राणार्बुदेषु तु ॥ १९ ॥**

**प्रत्यादित्यं निषण्णस्य समुन्नम्याग्रनासिकाम् ।**
**मात्रा विधार्यः पञ्चाशत्**

नाकांतील अर्बुदांवर क्षार लावावयाचा असतां रोग्यास सूर्याकडे तोंड करून बसवावें व नाकाची बोंडी वर दाबून कमळाच्या पानाइतका पातळ लेप करून ५० मात्रांपर्यंत तसाच ठेवावा.

**तद्वदर्शांसि कर्णगे ॥ ३० ॥**

कानांतील अर्शावर वरच्याचप्रमाणें क्षार लावावा.

**क्षारं प्रमार्जनेनाशु परिमृज्यावगम्य च ।**
**सुदग्धं घृतमध्वक्तं तत्पयोमस्तुकाञ्जिकैः ॥ ३१ ॥**
**निर्वापयेत्ततः साज्यैः स्वादुशीतैः प्रदेहयेत् ।**

नंतर लागलीच कापूस गुंडाळलेल्या सळईनें क्षार पुसून टाकून चांगलें दग्ध झालें असें पाहून तूप व मध लावून दूध, दह्याची निवळ किंवा कांजी यांनीं धुवून त्याच पदार्थांत तूप घालून मधुर व शीत करून त्याचा लेप करावा.

**अभिष्यन्दीनि भोज्यानि भोज्यानि क्लेदनाय च ॥ ३२ ॥**

स्राव होण्यासाठीं अभिष्यंदि पदार्थांचें सेवन करावें.

**यदि च स्थिरमूलत्वात्क्षारदग्धं न शीर्यते ।**
**धान्याम्लबीजयष्ट्याह्वतिलैरालेपयेत्ततः ॥ ३३ ॥**

रोगाचें मूळ बळकट असल्यामुळें क्षार लावून जाळलें असतांहि जर रोग गळून न पडेल, तर त्यावर कांजीचा खमीर ( धान्याम्लाच्या तळीं जो घनभाग जमतो तो ), ज्येष्ठीमध व तीळ यांचा लेप करावा.

**तिलकल्कः समधुको घृताक्तो व्रणरोपणः ।**

तिळाचा कल्क, ज्येष्ठीमध व तूप यांच्या लेपानें व्रण भरून येतो.

**पक्कजम्ब्वसितं सन्नं सम्यग्दग्धम्**

सम्यग्दाह झाला असतां पिकलेल्या जांभळासारखा रंग येतो व तेथें खळी पडते.

**विपर्यये ॥ ३४ ॥**

**ताम्रतातोदकण्ड्वाद्यैर्दुर्दग्धम्**

वरील प्रकार न होतां लाली, शूल, कंडू इत्यादि झालीं असतां दुर्दग्ध झालें असें समजावें.

**तं पुनर्दहेत् ।**

तेथें पुनः क्षार लावावा.

**अतिदग्धे स्रवेद्रक्तं मूर्च्छादाहज्वरादयः ॥ ३५ ॥**

दाह अतिरिक्त झाला म्हणजे रक्त वाहूं लागतें व मूर्च्छा, दाह, ताप इत्यादि विकार उत्पन्न होतात.

**गुदे विशेषाद्विण्मूत्रसंरोधोऽतिप्रवर्तनम् ।**
**पुंस्त्वोपघातो मृत्युर्वा गुदस्य शातनाद् ध्रुवम् ॥ ३६ ॥**

तोच गुदस्थानीं झाला असतां विशेषेंकरून मल व मूत्र यांचा अवरोध किंवा अतिप्रवृत्ति होते, पुरुषत्व नाहींसें होतें किंवा गुद गळून पडल्यामुळें रोगी मरतो.

**नासायां नासिकावंशदरणाकुञ्चनोद्भवः ।**
**भवेच्च विषयाज्ञानं**

नाकांत अतिदाह झाला तर मधील पडदा फाटतो, किंवा आकुंचित होतो, व वास मुळींच येत नाहींसा होतो.

**तद्वच्छ्रोत्रादिकेष्वपि ॥ ३७ ॥**

कर्णादिकांतहि अतिदाह झाला असतां अशींच लक्षणें होतात.

**विशेषादत्र सेकोऽम्लैर्लेपो मधु घृतं तिलाः ।**
**वातपित्तहरा चेष्टा सर्वैव शिशिरा क्रिया ॥ ३८ ॥**

अशा ठिकाणीं विशेषेंकरून आंबट पदार्थांनीं परिषेक ( त्या पदार्थांत भिजवून वर घड्या ठेवणें ) करावा. तसेंच मध, तूप व तीळ यांचा लेप करावा. याचप्रमाणें वातघ्न व पित्तघ्न असून थंड असणारी सर्व क्रिया हितकारक आहे.

**अम्लो हि शीतः स्पर्शेन क्षारस्तेनोपसंहितः ।**
**यात्याशु स्वादुतां तस्मादम्लैर्निर्वापयेत्तराम् ॥ ३९ ॥**

कारण अम्लरस स्पर्शानें शीत आहे, आणि त्याच्याशीं क्षाराचा संयोग झाला असतां क्षार मधुर होतो, यासाठीं विशेषेंकरून आंबट पदार्थांनींच दाहाची शांति करावी.

**अग्निः क्षारादपि श्रेष्ठस्तद्दग्धानामसम्भवात् ।**
**भेषजक्षारशस्त्रैश्च न सिद्धानां प्रसाधनात् ॥ ४० ॥**

क्षारापेक्षांहि अग्नि ( डाग देणें ) श्रेष्ठ आहे. कारण डाग देऊन बरे झालेले रोग पुनः उत्पन्न होत नाहींत व औषध, क्षार व शस्त्र यांनीं बरे न झालेले रोग डागानें बरे होतात.

**त्वचि मांसे शिरास्नायुसन्ध्यस्थिषु स युज्यते ।**

त्वचा, मांस, शिरा, स्नायु, सांधे व हाडें यांवर त्याचा उपयोग करितात.

**मषाङ्गग्लानिमूर्धार्तिमन्थकीलतिलादिषु ॥ ४१ ॥**
**त्वग्दाहो वर्तिगोदन्तसूर्यकान्तशरादिभिः ।**

मस, अंगाची शिथिलता, मस्तकशूल, आधिमंथ, चामखीळ, तीळ इत्यादि रोगांवर वात, गाईचा दांत, सूर्यकांतमणि, बाण इत्यादिकांनीं त्वचेचा दाह करावा.

**अर्शोभगन्दरग्रन्थिनाडीदुष्टव्रणादिषु ॥ ४२ ॥**
**मांसदाहो मधुस्नेहजाम्बवौष्ठगुडादिभिः ।**

मुळव्याध, भगंदर, ग्रंथि, नाडी, दुष्टव्रण इत्यादि रोगांवर मध, तैलादिक स्नेह, जांबवोष्ठ, गूळ इत्यादिकांनीं मांसाचा दाह करावा.

**श्लिष्टवर्त्मन्यसृक्स्रावनील्यसम्यग्व्यधादिषु ॥ ४३ ॥**
**शिरादिदाहस्तैरेव**

डोळ्याच्या पापण्या आकुंचित ( कांहीं मिटलेल्या ) असणें, रक्तस्राव, मोतिबिंदु, वाईट रीतीनें झालेला शिरावेध इत्यादिकांवर वर लिहिलेल्याच पदार्थांनीं शिरादिकांचा दाह करावा.

**न दहेत्क्षारवारितान् ।**
**अन्तःशल्यासृजो भिन्नकोष्ठान् भूरिव्रणातुरान् ॥४४॥**

ज्यांस क्षार लावूं नये म्हणून सांगितलें आहे ते व ज्यांच्या शरीरांत शल्य व रक्तसंचय झालेला आहे ते व ज्यांचा कोठा भिन्न झाला आहे [ खड्गादिकांनीं फुटला आहे ते ] व व्रणानें फार पीडिलेले अशांस डाग देऊं नये.

**सुदग्धं घृतमध्वक्तं स्निग्धशीतैः प्रदेहयेत् ।**

चांगले दग्ध झाले म्हणजे तूप व मध लावून थंड व स्निग्ध लेप करावे.

**तस्य लिङ्गं स्थिते रक्ते शब्दवल्लसिकान्वितम् ॥४५॥**
**पक्वतालकपोताभं सुरोहं नातिवेदनम् ।**

सम्यक् दाह झाला असतां रक्त बंद झाल्यावर त्या ठिकाणीं शब्दयुक्त लस येऊं लागते. व तें स्थान पिकलेल्या ताडाच्या फळासारखें किंवा पारव्यासारखें अस्मानी रंगाचें असून व्रण लवकरच भरून येतो व वेदनाहि कमी होतात.

**प्रमाददग्धवत्सर्वं दुर्दग्धात्यर्थदग्धयोः ॥ ४६ ॥**

हीनदग्ध व अतिदग्ध यांचीं लक्षणें चुकीनें भाजल्याच्या लक्षणासारखीं होतात.

**चतुर्धा तत्तु तुच्छेन* सह**

तुच्छदग्धा ( क्षुद्रदाह किंवा पोळणें ) सह त्याचे चार प्रकार होतात. ( सुदग्ध, हीनदग्ध, अतिदग्ध व तुच्छदग्ध ).

**तुच्छस्य लक्षणम् ।**
**त्वग्विवर्णोष्यतेऽत्यर्थं न च स्फोटसमुद्भवः ॥ ४७ ॥**

( मृदु उष्णतेनें ) पोळलेली त्वचा निराळ्या रंगाची असून तेथें अतिशय आग होते, परंतु फोड येत नाहींत.

**सस्फोटदाहतीव्रोषं दुर्दग्धं**

हीनदग्ध झालें असतां त्या जागीं फोड येतात, दाह होतो व जळजळ असते.

* ज्याला वाग्भटानें 'तुच्छ' (दग्ध) म्हटलें आहे त्याला सुश्रुतानें 'प्लुटम्' असें नांव दिलें आहे. डॉ० कुंटे यांनीं 'तुत्थेन सह' असा जो पाठ दिला आहे तो मात्र चुकीचा आहे. तुच्छ दाह म्हणजे अल्प उष्णतेनें पोळणें.

**अतिदग्धतः ।**
**मांसलम्बनसङ्कोचदाहधूपनवेदनाः ॥ ४८ ॥**
**शिरादिनाशस्तृण्मूर्च्छाव्रणगाम्भीर्यमृत्यवः ।**

अतिदाह झाला असतां मांस लोंबूं लागतें. संकोच व दाह होतो. त्या जाग्यांतून वाफा निघाल्यासारखें वाटतें व वेदना फार होतात. शिरादिकांचा नाश होतो, तहान लागते व मूर्च्छा येते; व्रण फार खोल जातो व मृत्यूहि येतो.

**तुच्छस्याग्निप्रतपनं कार्यमुष्णं च भेषजम् ॥ ४९ ॥**

अल्पउष्णतेनें पोळल्यास अग्नीनें शेकावें व उष्ण औषधें वर लावावीं व उष्ण उपचार करावे.

**स्त्यानेऽस्त्रे वेदनाऽत्यर्थं विलीने मन्दता रुजः ।**

कारण ( थंड उपचारानें ) रक्त दाट झाल्यामुळें वेदना फार होतात व तेंच उष्ण उपचारांनीं पातळ झालें म्हणजे वेदना कमी होतात.

**दुर्दग्धे शीतमुष्णं च युञ्ज्यादादौ ततो हिमम् ॥५०॥**

हीनदग्ध झालें असतां प्रथम थंड व उष्ण आणि नंतर शीत उपचार करावे.

**सम्यग्दग्धे तुगाक्षीरिप्लक्षचन्दनगैरिकैः ।**
**लिम्पेत्साज्यामृतैरूर्ध्वं पित्तविद्रधिवक्रिया ॥ ५१ ॥**

सम्यक्दाह झाला असतां वंशलोचन, पायरीची साल, रक्तचंदन, गेरू, गुळवेल व तूप यांचा लेप करावा; नंतर पित्तविद्रधीवर सांगितलेली क्रिया करावी.

**अतिदग्धे द्रुतं कुर्यात्सर्वं पित्तविसर्पवत् ।**

अतिदाह झाला असतां पित्तविसर्पावर सांगितलेले उपचार लवकर करावे.

**स्नेहदग्धे भृशतरं रूक्षं तत्र तु योजयेत् ॥ ५२ ॥**

तैलादि स्नेहानें भाजलें असेल तर अत्यंत रूक्ष उपचार करावे.

**समाप्यते स्थानमिदं हृदयस्य रहस्यवत् ।**

अष्टांगहृदयाच्या रहस्यासारखें हें स्थान ( सूत्रस्थान ) येथें समाप्त होतें.

**अत्रार्थाः सूत्रिताः सूक्ष्माः प्रतन्यन्ते हि सर्वतः ॥ ५३ ॥**

( या स्थानास सूत्रस्थान म्हणण्याचें कारण इतकेंच कीं ) येथें ( या स्थानांत ) सूक्ष्म अर्थ सुचविले आहेत. व त्यांचा बाकीच्या स्थानांत विस्तार केला आहे.

**इति वैद्यपतिसिंहगुप्तसूनुवाग्भटविरचितायाम्-**
**अष्टाङ्गहृदयसंहितायां प्रथमं सूत्रस्थानं सम्पूर्णम् ॥**

या प्रकारें वैद्यपति सिंहगुप्ताचा पुत्र वाग्भट यानें रचिलेल्या अष्टांगहृदयसंहितेंतील पहिलें जें सूत्रस्थान तें समाप्त झालें.

॥ श्री ॥

# शारीरस्थान

## प्रथमोऽध्यायः

अध्याय १ ला.

**अथातो गर्भावक्रान्तिशारीरं व्याख्यास्यामः ।**

आतां गर्भाच्या उत्पत्तीविषयीं शारीर सांगतों.

**इति ह स्माहुरात्रेयादयो महर्षयः ॥**

आत्रेयादि महर्षींनीं असें सांगितलें आहे.

**शुद्धे शुक्रार्तवे सत्त्वः स्वकर्मक्लेशचोदितः ।**
**गर्भः सम्पद्यते युक्तिवशादग्निरिवारणौ ॥ १ ॥**

जीव स्वतःचें कर्म (पूर्वजन्मार्जित) व अविद्यादि क्लेश यांनीं प्रेरित होत्साता शुद्ध अशा शुक्रार्तवांत संयोगशक्तीनें गर्भत्व पावतो; जसा अग्नि अरणींत उत्पन्न होतो तद्वत्.*

**बीजात्मकैर्महाभूतैः सूक्ष्मैः सत्त्वानुगैश्च सः ।**
**मातुश्चाहाररसजैः क्रमात्कुक्षौ विवर्धते ॥ २ ॥**

बीजात्मक (शुक्रार्तवसंबंधीं) महाभूतें, जीवाबरोबर येणारीं सूक्ष्म महाभूतें व आईच्या आहाररसापासून उत्पन्न होणारीं महाभूतें यांनीं पोटांत हळू हळू गर्भ वाढतो.

**तेजो यथार्करश्मीनां स्फटिकेन तिरस्कृतम् ।**
**नेन्धनं दृश्यते गच्छत्सत्त्वो गर्भाशयं तथा ॥ ३ ॥**

स्फटिकांतून घेतलेला सूर्यकिरणांचा कवडसा गोंवरीवर जात असतां जसा दिसत नाहीं त्याप्रमाणें जीव गर्भाशयांत जात असतां दिसत नाहीं.

**कारणानुविधायित्वात्कार्याणां तत्स्वभावता ।**
**नानायोन्याकृतीः सत्त्वो धत्तेऽतो द्रुतलोहवत् ॥४॥**

कार्याचें वर्तन कारणाच्या अनुरोधानें असल्यामुळें (कार्य हें कारणास अनुसरून राहात असल्यामुळें) कार्याचें कारणाशीं सादृश्य असतें (म्हणजे कार्य व कारण यांची सरूपता असते.) म्हणून तापवून पातळ केलेलें लोखंड जसें निरनिराळ्या सांच्यांत ओतिलें असतां निरनिराळ्या आकृति धारण करितें, त्याप्रमाणें जीव नानाप्रकारच्या योनींत जाऊन त्या त्याप्रमाणें निरनिराळ्या (मनुष्य, बैल, वाघ इत्यादि) आकृति धारण करितो.

**अत एव च शुक्रस्य बाहुल्याज्जायते पुमान् ।**
**रक्तस्य स्त्री तयोः साम्ये क्लीबः**

आणि म्हणूनच रक्ता (आर्तवा) पेक्षां शुक्र जास्त असल्यास पुरुष, कमी असल्यास स्त्री व शुक्र आणि रक्त बरोबर असल्यास षंढ गर्भ होतो.

**शुक्रार्तवे पुनः ॥ ५ ॥**
**वायुना बहुशो भिन्ने यथास्वं बह्वपत्यता ।**

तसेंच रक्त व शुक्र वायूनें अनेकशः विभागलें असतां अनेक गर्भ होतात. (यथास्वं या शब्दानें शुक्र अधिक असून विभागलें गेल्यास अनेक पुत्रगर्भ होतात; रक्त अधिक असून विभागलें गेल्यास अनेक स्त्रीगर्भ होतात; एका भागांत रक्त अधिक व दुसऱ्यांत शुक्र असें असल्यास स्त्री व पुरुष असे होतात)

**वियोनिविकृताकारा जायन्ते विकृतैर्मलैः ॥ ६ ॥**

वातादि दोष विकृतावस्थेंत असल्यास गर्भ विजातीय (मनुष्यास सर्प, पशु इत्यादि प्रकारचे) आणि विकृताकार-[दोन तोंडें, तीन पाय,: विक्राळ स्वरूप, उपजतांक्षणीं दांत अथवा सुळे असणें] असे होतात.

**मासि मासि रजः स्त्रीणां रसजं स्रवति त्र्यहम् ।**
**वत्सराद्द्वादशादूर्ध्वं याति पञ्चाशतः क्षयम् ॥ ७ ॥**

स्त्रियांस बारा वर्षांपासून पन्नास वर्षांपर्यंत महिन्याच्या महिन्यास तीन दिवसपर्यंत रक्ताचा स्राव होत असतो.

**पूर्णषोडशवर्षा स्त्री पूर्णविंशेन सङ्गता ।**
**शुद्धे गर्भाशये मार्गे रक्ते शुक्रेऽनिले हृदि ॥ ८ ॥**
**वीर्यवन्तं सुतं सूते**

पूर्ण वीस वर्षांच्या पुरुषाशीं रममाण होणाऱ्या पूर्ण सोळा वर्षांच्या स्त्रीस गर्भाशय, अपत्यमार्ग (योनि), रक्त [अस्र], शुक्र, वायु आणि अंतःकरण हीं शुद्ध असल्यास वीर्यवान् [पराक्रमी] मुलगा होतो.

* ह्या श्लोकांत जो गर्भोत्पत्तीचा आरंभ सांगितला आहे तो वेदान्त-शास्त्राच्या अनुरोधानें आहे. येथें जीव शब्दाचा अर्थ लिंगदेहानें युक्त जीवात्मा. क्लेश हा शब्द पातञ्जल शास्त्रांतील आहे. अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश हे पांच क्लेश योगशास्त्रांत सांगितले आहेत. (त्यांच्या व्याख्येकरितां पातञ्जल योगसूत्र पहा.)

ततो न्यूनाब्दयोः पुनः ।
रोग्यल्पायुरधन्यो वा गर्भो भवति नैव वा ॥ ९ ॥

तींच स्त्रीपुरुषें जर यापेक्षां कमी वयाचीं असलीं तर संतति रोगी, अल्पायुषी, अधन्य [ वाईट ] अशी होते अथवा मुळींच होत नाहीं.

वातादिकुणपग्रन्थिपूयक्षीणमलाह्वयम् ।
बीजासमर्थं रेतोऽस्रं

वातशुक्र, पित्तशुक्र, कफशुक्र, कुणपशुक्र, ग्रंथिशुक्र, पूयशुक्र, क्षीणशुक्र, मूत्रशुक्र, पुरीषशुक्र, तसेंच वातास्र, पित्तास्र, कफास्र, कुणपास्र, ग्रंथ्यस्र, पूयास्र, क्षीणास्र, मूत्रास्र व पुरीषास्र हीं नऊ प्रकारचीं शुक्रार्तवें गर्भोत्पत्तीस असमर्थ होत.

स्वलिङ्गैर्दोषजं वदेत् ॥ १० ॥
रक्तेन कुणपं श्लेष्मवाताभ्यां ग्रन्थिसन्निभम् ।
पूयाभं रक्तपित्ताभ्यां क्षीणं मारुतपित्ततः ॥ ११ ॥

शुक्र व अस्र हीं वायूच्या लक्षणांनीं* युक्त असल्यास वातशुक्र-अस्र, पित्ताच्या लक्षणांनीं* युक्त असल्यास पित्तशुक्र-अस्र, कफाच्या लक्षणांनीं* युक्त असल्यास कफशुक्र-अस्र, रक्तानें दुष्ट होऊन प्रेतवत् गंध येतो त्यास कुणपशुक्र-अस्र, कफ व वात यांनीं दुष्ट होऊन गांठींसारखीं होतात त्यांस ग्रंथिशुक्र-अस्र, रक्त व पित्त यांनीं दुष्ट होऊन पुवासारखीं होतात त्यांस पूयशुक्र-अस्र आणि वात व पित्त यांनीं दुष्ट झालीं म्हणजे त्यांस क्षीणशुक्र-अस्र असें म्हणतात.

कृच्छ्राण्येतान्यसाध्यं तु त्रिदोषं मूत्रविट्प्रभम् ।

हे सर्व प्रकार कष्टसाध्य आहेत. त्रिदोषांनीं प्रकुपित झालेलीं आणि मूत्रशुक्र-अस्र व पुरीषशुक्र-अस्र हीं असाध्य आहेत.

कुर्याद्वातादिभिर्दुष्टे स्वौषधं

वातपित्तकफांनीं दुष्ट झालेल्या शुक्रास्रावर तत्तच्छामक चिकित्सा करावी.

कुणपे पुनः ॥ १२ ॥
धातकीपुष्पखदिरदाडिमार्जुनसाधितम् ।
पाययेत्सर्पिरथवा विपक्वमसनादिभिः ॥ १३ ॥

कुणपशुक्रावरः धायटीचीं फुलें, खैराची साल ( किंवा नार ), डाळिंबाची साल व अर्जुनसादडाची साल यांनीं अथवा असनादि गणांतील औषधांनीं सिद्ध केलेलें तूप पाजावें.

पलाशभस्माश्मभिदा ग्रन्थ्याभे

ग्रंथिशुक्रावर पळसाची राख व लांकडी पाषाणभेद यांनीं सिद्ध केलेलें तूप पाजावें.

पूयरेतसि ।

परूपकवटादिभ्यां

पूयशुक्रावर फालसा व न्यग्रोधादिगण यांनीं सिद्ध केलेलें तूप पाजावें.

---

* ह्या लक्षणांकरितां सू. अ. १ श्लोक ११-१२ पहा.

क्षीणे शुक्रकरी क्रिया ॥ १४ ॥

क्षीणशुक्रावर शुक्रवर्धक [ वृष्य ] चिकित्सा करावी.

स्निग्धं वान्तं विरिक्तं च निरूढमनुवासितम् ।
योजयेच्छुक्रदोषार्तं सम्यगुत्तरबस्तिभिः ॥ १५ ॥

शुक्रदोषांनीं पीडित झालेल्या रोग्यांस स्निग्ध ( स्नेहपानानें ), वांत ( वमन देऊन ), विरिक्त ( विरेचनानें ), निरूढ ( निरूहणानें ) व अनुवासित ( अनुवासनानें ) करून योग्य रीतीनें उत्तरबस्ति द्यावें.

संशुद्धो विट्प्रभे सर्पिर्हिङ्गुसेव्याग्निसाधितम् ।
पिबेत्

पुरीषशुक्र झालेल्या पुरुषांस वमनविरेचनांनीं शुद्ध करून हिंग, वाळा व चित्रक यांनीं सिद्ध केलेलें तूप द्यावें.

ग्रन्थ्यार्तवे पाठाव्योषवृक्षकजं जलम् ॥ १६ ॥

ग्रंथिरक्तावर पहाडमूळ, सुंठ, मिरी, पिंपळी व कुडा यांचा हिम अथवा कषाय द्यावा.

पेयं कुणपपूयास्रे चन्दनं वक्ष्यते तु यत् ।
गुह्यरोगे च तत्सर्वं कार्यं सोत्तरबस्तिकम् ॥ १७ ॥

कुणपास्र व पूयास्र यांवर चंदनाचे हिम, फांट* व कषायादि द्यावे आणि पुढें गुह्यरोगांवर सांगितलेले सर्व उपचार करावे व उत्तरबस्ति द्यावे.

शुक्रं शुक्लं गुरु स्निग्धं मधुरं बहलं बहु ।
घृतमाक्षिकतैलाभं सद्गर्भाय

पांढरें, जड, चिकट ( स्निग्ध ), गोड, दाट व पुष्कळ असून तूप, मध व तेल यांसारखें जें शुक्र असतें तें चांगला गर्भ होण्यास योग्य असतें.

आर्तवं पुनः ॥ १८ ॥
लाक्षारसशशास्राभं धौतं यच्च विरज्यते ।

तसेंच अळिता व ससाचें रक्त यांसारखें लाल असून ज्याचा वस्त्रास पडलेला डाग धुतला असतां साफ जातो तें आर्तव चांगला गर्भ होण्यास योग्य असतें.

शुद्धशुक्रार्तवं स्वस्थं संरक्तं मिथुनं मिथः ॥ १९ ॥
स्नेहैः पुंसवनैः स्निग्धं शुद्धं शीलितबस्तिकम् ।

परस्परांवर प्रीति करणारें, निरोगी व ज्यांचें शुक्रार्तव शुद्ध आहे अशा मिथुनास ( स्त्रीपुरुषास ) स्नेहपान, वमन, विरेचन, निरूह व अनुवासन देऊन पुंसवन स्नेह द्यावें.†

---

* औषध तेव्हांच्या तेव्हांच पाण्यांत कुसकरून गाळून घेतलें असतां त्यास फांट म्हणतात.

† या श्लोकांतील "स्नेहैः पुंसवनैः" याचा संबंध अरुणदत्तानें 'स्निग्धं' या पदाकडे लावला आहे. परंतु तो पुढील श्लोकांतील समुपाचरेत् या क्रियापदाकडे लाविला असतां वाक्याची जुळणी व अर्थ चांगला होतो. अरुणदत्ताच्या अर्थाप्रमाणें पुंसवन स्नेहांनीं शुद्ध केलेल्या व शोधन व बस्ति दिलेल्या मिथुनास उपचार करावा असा अर्थ होतो. शोधन व बस्ति

[ पुढील पान १२३ पहा ]

नरं विशेषात्क्षीराज्यैर्मधुरौषधसंस्कृतैः ॥ २० ॥

पुरुषास विशेषेंकरून गोड औषधांनीं सिद्ध केलेलें दूध व तूप विण्यास द्यावें.

नारीं तैलेन माषैश्च पित्तलैः समुपाचरेत् ।

स्त्रीस तेल, उडीद व पित्तकर पदार्थ द्यावे.

क्षामप्रसन्नवदनां स्फुरच्छ्रोणिपयोधराम् ॥ २१ ॥
स्रस्ताक्षिकुक्षिं पुंस्कामां विद्यादृतुमतीं स्त्रियम् ।

तोंड कृश असून प्रसन्न ( टवटवीत ) होणें, कमर व स्तन फुरफुरणें, डोळे व कुशी गळणें, आणि पुरुषाची ( संभोगाची ) इच्छा होणें, हीं ऋतुमती स्त्रीचीं लक्षणें होत.

पद्मं सङ्कोचमायाति दिनेऽतीते यथा तथा ॥ २२ ॥
ऋतावतीते योनिः सा शुक्रं नातः प्रतीच्छति ।

सूर्यास्त झाला असतां कमळ ( सूर्यविकासी ) जसें संकुचित होतें त्याप्रमाणें ऋतुकाळ संपला असतां योनि संकुचित होते आणि त्यामुळेंच ती शुक्र ग्रहण करीत नाहीं.

मासेनोपचितं रक्तं धमनीभ्यामृतौ पुनः ॥ २३ ॥
ईषत्कृष्णं विगन्धं च वायुर्योनिमुखान्नुदेत् ।

पुन्हां ऋतुकाळीं महिन्यांत संचित झालेलें किंचित् काळें, दुर्गंधिरहित असें रक्त दोन धमन्यांनीं वायु योनिमुखांतून बाहेर टाकितो.

ततः पुष्पेक्षणादेव कल्याणध्यायिनी त्र्यहम् ॥२४॥
मृजालङ्काररहिता दर्भसंस्तरशायिनी ।
क्षैरेयं यावकं स्तोकं कोष्ठशोधनकर्षणम् ॥ २५ ॥
पर्णे शरावे हस्ते वा भुञ्जीत ब्रह्मचारिणी ।

रजोदर्शन झाल्यावर स्त्रीनें तीन दिवस ब्रह्मचारिणी राहून चांगल्या गोष्टींविषयीं चिंतन करावें, स्नान करूं नये, दागिने घालूं नये, दर्भाच्या शय्येवर ( चटईवर ) निजावें, कोठ्याचें शोधन करणारे व शरीराचें कर्षण करणारे, दुधाचे व सातूचे पदार्थ पानांत, परळांत किंवा हातांत घेऊन भक्षण करावे.

चतुर्थेऽह्नि ततः स्नात्वा शुक्लमाल्याम्बरा शुचिः ॥२६॥
इच्छन्ती भर्तृसदृशं पुत्रं पश्येत्पुरः पतिम् ।

नंतर चवथ्या दिवशीं स्नान करून पवित्र ( बाहेरून स्नानानें व अंतःपंचगव्यप्राशनानें ) होऊन, शुभ्र वस्त्र परिधान करून, शुभ्र फुलें धारण करून, पतीसारख्या पुत्राची इच्छा धरून पहिल्यानें पतीस अवलोकन करावें.

ऋतुस्तु द्वादश निशाः पूर्वास्तिस्रश्च निन्दिताः ॥ २७ ॥
एकादशी च युग्मासु स्यात्पुत्रोऽन्यासु कन्यका ।

ऋतुकाळाची मर्यादा १२ रात्री, त्यांत पहिल्या ३ व अकरावी वर्ज्य ( संभोगाविषयीं ). सम रात्रीं ( ४।६।८।१०।१२ ) संभोग केला असतां पुत्र होतो व विषम रात्रीं ( ५।७।९ ) संभोग केल्यानें कन्या होते.

उपाध्यायोऽथ पुत्रीयं कुर्वीत विधिवद्विधिम् ॥ २८ ॥
नमस्कारपरायास्तु शूद्राया मन्त्रवर्जितम् ।

नंतर उपाध्यायानें पुत्रसंबंधीं विधि यथाशास्त्र करावा. ( ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांजबद्दल हा विचार होय ). शूद्र स्त्रीकडून नमस्कारपूर्वक मंत्र शिवायकरून बाकीचा विधि करावा.

अवन्ध्य एवं संयोगः स्यादपत्यं च कामतः ॥ २९ ॥

याप्रमाणें केलें असतां स्त्रीपुरुषांचा संयोग व्यर्थ जाणार नाहीं. इतकेंच नव्हे तर पाहिजे त्या प्रकारचें ( पुत्र किंवा कन्या ) अपत्य होईल.

सन्तोऽप्याहुरपत्यार्थं दम्पत्योः सङ्गतं रहः ।

कारण साधूंचें म्हणणें असें आहे कीं, स्त्रीपुरुषांचा एकान्तीं संयोग केवळ अपत्योत्पत्तीकरितांच असावा. *

दुरपत्यं कुलाङ्गारो गोत्रे जातं महत्यपि ॥ ३० ॥

तसेंच मोठ्याहि कुलांत उत्पन्न झालेलें दुष्ट कार्टें कुलोच्छेदक ( अग्नि जसा सर्व पदार्थांचा नाश करितो त्याप्रमाणें जें कुळास बट्टा लाविल्यानें त्याचा नाश करितें ) होतें.

इच्छेतां यादृशं पुत्रं तद्रूपचरितांश्च तौ ।
चिन्तयेतां जनपदांस्तदाचारपरिच्छदौ ॥ ३१ ॥

जशा प्रकाराच्या मुलाची इच्छा असेल त्याच्यासारख्या स्वरूपाच्या व आचरणाच्या लोकांविषयीं नेहमीं त्यांनीं (स्त्रीपुरुषांनीं) चिंतन करीत असावें. तसेंच त्यांनीं आपलें आचरण व सरंजाम ( चाकर, गाई, बैल, धन, धान्य, अलंकार, वस्त्र, गाडी, रत्नें, शस्त्रें, घर, बाग, वगैरे ) त्यांच्याचसारिखा ठेवावा.

कर्मान्ते च पुमान्सर्पिःक्षीरशाल्योदनाशितः ।
प्राग्दक्षिणेन पादेन शय्यां मौहूर्तिकाज्ञया ॥ ३२ ॥
आरोहेत्स्त्री तु वामेन तस्य दक्षिणपार्श्वतः ।
तैलमाषोत्तराहारा तत्र मन्त्रं प्रयोजयेत् ॥ ३३ ॥

पुत्रीयविधि झाल्यावर दूधभात व तूपभात खाऊन जोशाच्या परवानगीनें उजवा पाय पुढें करून प्रथमतः पुरुषानें शय्येवर

---

[ मागील पान १२२ वरून चालू ]

देण्यापूर्वी पुंसवन स्नेह देण्यापासून काय फायदा ? व कदाचित् तसें केलें तर मग पुढें 'समुपाचरेत्' याची काय वाट ? मग उपचार करावयाचा तो कोणता ? ही असंबद्धता टाळण्याकरितां आम्हीं वर दाखविल्याप्रमाणें अन्वय लावून अर्थ केला आहे व तो वृद्ध वाग्भटांतील वाक्यरचनेस जुळतो. पुंसवन स्नेह जे द्यावयाचे ते पुरुषांस दूध व तूप ( मधुरौषधसंस्कृत असे ) व स्त्रियांस तेल असें पुढें सांगितलें आहे. प्रथम सामान्य विधान करून मग विशेष प्रकार दर्शविला आहे.

---

* याविषयीं महाकवि कालिदासानें रघुवंशांत सूर्यवंशीय राजांचें वर्णन करतेवेळीं म्हटलें आहे कीं त्यांचा "त्यागाय संभृतार्थानां प्रजायै गृहमेधिनाम् ॥" ज्यांनीं दान करण्यासाठीं द्रव्यसंचय केला व जे पुत्रोत्पत्तीकरितांच केवळ स्त्रीशीं समागम करीत.

( पलंगावर ) चढावें, त्याचप्रमाणें स्त्रीनेंहि तैलविशिष्ट व माषविशिष्ट पदार्थ भक्षण करून पतीच्या उजव्या बाजूकडून डावा पाय पुढें करून शय्येवर चढावें आणि तेथें–

" आहिरसि आयुरसि सर्वतः प्रतिष्ठासि धाता त्वां
दधातु विधाता त्वां दधातु ब्रह्मवर्चसा भवेति ।
ब्रह्मा बृहस्पतिर्विष्णुः सोमः सूर्यस्तथाश्विनौ ।
भगोऽथ मित्रावरुणौ वीरं ददतु मे सुतम् " ॥

हा मंत्र म्हणावा.

सान्त्वयित्वा ततोऽन्योन्यं संविशेतां मुदान्वितौ ।
उत्ताना तन्मना योषित्तिष्ठेदङ्गैः सुसंस्थितैः ॥ ३४ ॥

नंतर स्त्रीपुरुषांनीं आनंदयुक्त होऊन परस्परांचें समाधान करून संभोग करावा. स्त्रीनें एकाग्र मन करून हात, पाय, डोकें वगैरे अंगें जागच्या जागीं स्वस्थ ठेवून उताणें निजावें.

तथा हि बीजं गृह्णाति दोषैः स्वस्थानमास्थितैः ।

असें केल्यानें वातादि दोष स्वस्थानीं स्थित होऊन ती बीज ग्रहण करिते.

लिङ्गं तु सद्योगर्भाया योन्यां बीजस्य सङ्ग्रहः ॥३५॥
तृप्तिर्गुरुत्वं स्फुरणं शुक्रास्रानुनुबन्धनम् ।
हृदयस्पन्दनं तन्द्रा तृड्ग्लानिर्लोमहर्षणम् ॥ ३६ ॥

गर्भ धारण झाला असतां स्त्रीचीं लागलींच जीं लक्षणें होतात तीं अशीं–योनीनें बीजाचें ग्रहण करणें, तृप्ति ( मैथुनसुखाविषयीं ), ओटींत जडपणा व स्फुरण, शुक्र व अस्र बाहेर न येणें, हृदय कापणें ( छाती धडधडणें ), झांपड, तृषा, ग्लानि व रोमांच उभे राहणें.

अव्यक्तः प्रथमे मासि सप्ताहात्कललीभवेत् ।
गर्भः पुंसवनान्यत्र पूर्वं व्यक्तेः प्रयोजयेत् ॥ ३७ ॥

सात दिवसांनीं गर्भाचा गोळा बनून तो एक महिना अव्यक्त ( स्त्रीपुरुषादिविशेषाकृतिरहित ) असतो म्हणून तो व्यक्त होण्यापूर्वी ( एक महिन्याच्या आंत ) पुंसवन औषधाची योजना करावी.

बली पुरुषकारो हि दैवमप्यतिवर्तते ।

कारण पुरुषाची कर्तृत्वशक्ति प्रबल झाल्यास ती दैवासहि मागें टाकिते ( दैवी पुत्र व्हावयाचा नसला तरी पुरुष आपल्या कर्तृत्वशक्तीनें पुत्रप्राप्ति करून घेतो ).

पुष्ये पुरुषकं हैमं राजतं वाथ वायसम् ॥ ३८ ॥
कृत्वाऽग्निवर्णं निर्वाप्य क्षीरे तस्याञ्जलिं पिबेत् ।

सोन्याचा, रुप्याचा अथवा लोखंडाचा पुष्य नक्षत्रीं पुरुषाकृति पुतळा करून तापवून लाल करून दुधांत विझवून तें दूध ३२ तोळे प्राशन करावें.

गौरदण्डमपामार्गं जीवकर्षभसैर्यकान् ॥ ३९ ॥
पिबेत्पुष्ये जले पिष्टानेकद्वित्रिसमस्तशः ।

पांढरा आघाडा, जीवक, ऋषभक व कोरांटी यांपैकीं एक, दोन, तीन किंवा सर्व औषधी पाण्यांत उगाळून ( किंवा वांटून ) तो कल्क पुष्यनक्षत्रीं प्राशन करावा.

क्षीरेण श्वेतबृहतीमूलं नासापुटे स्वयम् ॥ ४० ॥
पुत्रार्थं दक्षिणे सिञ्चेद्वामे दुहितृवाञ्छया ।

पांढऱ्या रिंगणीचें मूळ दुधांत उगाळून तें स्वतः स्त्रीनें पुत्राची इच्छा असल्यास उजव्या व कन्येची इच्छा असेल तर डाव्या नाकपुडींत घालावें.

पयसा लक्ष्मणामूलं पुत्रोत्पादस्थितिप्रदम् ॥ ४१ ॥
नासयाऽऽस्येन वा पीतं वटशुङ्गाष्टकं तथा ।
औषधीर्जीवनीयाश्च बाह्यान्तरुपयोजयेत् ॥ ४२ ॥

पांढऱ्या रिंगणीचें मूळ व वडाचे कोंवळे ८ मोख दुधांत उगाळून नाकानें अथवा तोंडानें प्राशन केलें असतां ते पुत्रोत्पत्तिप्रद व पुत्रस्थितिप्रद ( त्यांचे योगानें मुलें होत नसल्यास होतात व होऊन मरत असल्यास वांचतात ) होतात. तसेंच जीवनीय ( जीवंती-काकोल्यौ इ० ) औषधींचा अंतर्बाह्य उपयोग करावा.

उपचारः प्रियहितैर्भर्त्रा भृत्यैश्च गर्भधृक् ।

नवऱ्यानें व चाकरांनीं आवडत्या व हितकारक पदार्थांनीं उपचार केले असतां ती गर्भ धारण करिते.

नवनीतघृतक्षीरैः सदा चैनामुपाचरेत् ॥ ४३ ॥

आणि तिला लोणी, तूप व दूध हे पदार्थ नेहमीं द्यावे.

अतिव्यवायमायासं भारं प्रावरणं गुरु ।
अकालजागरस्वप्नकठिनोत्कटकासनम् ॥ ४४ ॥
क्रोधशोकभयोद्वेगवेगश्रद्धाविधारणम् ।
उपवासाध्वतीक्ष्णोष्णगुरुविष्टम्भिभोजनम् ॥ ४५ ॥
रक्तं निवसनं श्वभ्रकूपेक्षां मद्यमामिषम् ।
उत्तानशयनं यच्च स्त्रियो नेच्छन्ति तत्त्यजेत् ॥ ४६ ॥
तथा रक्तस्रुतिं शुद्धिं बस्तिमामासतोऽष्टमात् ।
एभिर्गर्भः स्रवेदामः कुक्षौ शुष्येन्म्रियेत वा ॥ ४७ ॥

अतिमैथुन, अतिश्रम, ओझें वाहणें, जड वस्त्रें पांघरणें, भलत्याच वेळीं जागणें व निजणें, कठिण जागीं बसणें, उकिडवें बसणें, शोक, क्रोध, भय, त्रास, मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें, डोहाळे मोडणें, उपास करणें, मार्गक्रमण करणें, तीक्ष्ण, उष्ण, जड व मलावरोधक पदार्थ खाणें, लाल वस्त्र नेसणें, खोल विहिरींत पहाणें, मद्य पिणें, मांस खाणें व उताणें निजणें, इतक्या गोष्टी गर्भिणी स्त्रियांनीं वर्ज्य कराव्या. तसेंच दुसऱ्या ज्या गोष्टी बायका परंपरेनें वर्ज्य करीत आल्या आहेत त्या, वमन, विरेचन, रक्त काढणें व आठ महिन्यांपर्यंत बस्ति हींहि वर्ज्य करावीं. यांनीं गर्भपात, सल अथवा गर्भ मृत होतो.

वातलैश्च भवेद्गर्भः कुब्जान्धजडवामनः ।
पित्तलैः खलतिः पिङ्गः श्वित्री पाण्डुः कफात्मभिः ४८

गर्भिणीनें वातुळ पदार्थ फार खाले तर गर्भ वांकडा ( पेंग्या )

अंधळा, मूर्ख व खुजा होतो, पित्तकारक पदार्थ खाल्ले असतां टकल्या (खल्वाट) किंवा पिंगा होतो आणि कफकारक पदार्थ फार खाल्ले तर कोडी (ज्याच्या अंगावर पांढरें कोड आहे) अथवा पांडु (भुरा, ज्याचे केस व त्वचा पांढरी) असा होतो.

**व्याधींश्चास्या मृदुसुखैरतीक्ष्णैरौषधैर्जयेत् ।**

गर्भिणीस होणाऱ्या रोगांवर सौम्य, सुखकारक (आवडतील अशीं) व मंद (तीक्ष्ण नव्हेत) अशीं औषधें द्यावीं.

**द्वितीये मासि कललाद्घनः पेश्यथवार्बुदम् ॥ ४९ ॥**
**पुंस्त्रीक्लीबाः क्रमात्तेभ्यः**

दुसऱ्या महिन्यांत कललापासून गोल (घन), लांबट गोल (पेशी) अथवा अर्धवर्तुलाकृति (अर्बुद) गर्भ होतो व त्यापासून अनुक्रमें पुरुष, स्त्री व षंढ यांची उत्पत्ति होते.

**तत्र व्यक्तस्य लक्षणम् ।**
**क्षामता गरिमा कुक्षौ मूर्च्छा छर्दिररोचकः ॥ ५० ॥**
**जृम्भा प्रसेकः सदनं रोमराज्याः प्रकाशनम् ।**
**अम्लेष्टता स्तनौ पीनौ सस्तन्यौ कृष्णचूचुकौ ॥५१॥**
**पादशोफो विदाहोऽन्ये श्रद्धाश्च विविधात्मिकाः ।**

गर्भ व्यक्त झाला असतां जीं लक्षणें होतात तीं अशीं: शरीर कृश होणें, कूस जड होणें, मूर्च्छा, वांति, अरुचि, जांभई, लालास्राव, ग्लानि, रोमपंक्ति स्पष्ट होणें, आंबट पदार्थांवर वासना जाणें, स्तन पुष्ट व दुग्धयुक्त होणें, त्यांचीं अग्रें (चूचुक) काळीं होणें, पाय सुजणें, अनेक प्रकारचे डोहाळे होणें व कित्येकांच्या मतें हस्तपादादिकांचा दाह.

**मातृजं ह्यस्य हृदयं मातुश्च हृदयेन तत् ॥ ५२ ॥**
**सम्बद्धं तेन गर्भिण्या नेष्टं श्रद्धाविधारणम् ।**

गर्भाचें हृदय हें मातेच्या अंशापासून होतें व त्याचा मातेच्या हृदयाशीं संबंध असतो. यास्तव गर्भिणीचे डोहाळे न पुरविणें हें इष्ट नव्हे.

**देयमप्यहितं तस्यै हितोपाहितमल्पकम् ॥ ५३ ॥**

तिला अहित पदार्थहि हितकर पदार्थांबरोबर थोड्या प्रमाणानें द्यावे.

**श्रद्धाविघाताद्गर्भस्य विकृतिश्च्युतिरेव वा ।**

डोहाळे न पुरविले तर गर्भास विकार होतो अथवा गर्भपात होतो.

**व्यक्तीभवति मासेऽस्य तृतीये गात्रपञ्चकम् ॥ ५४ ॥**
**मूर्धा द्वे सक्थिनी बाहू सर्वसूक्ष्माङ्गजन्म च ।**
**सममेव च मूर्धाद्यैर्ज्ञानं च सुखदुःखयोः ॥ ५५ ॥**

तिसऱ्या महिन्यांत दोन हात, दोन पाय व डोकें असे ५ गर्भाचे अवयव व्यक्त होतात व सर्व सूक्ष्म अंगांचीहि उत्पत्ति होते. व मस्तकादिकांबरोबरच सुखदुःखाचें ज्ञानहि उत्पन्न होतें.

**गर्भस्य नाभौ मातुश्च हृदि नाडी निबद्ध्यते ।**
**यया स पुष्टिमाप्नोति केदार इव कुल्यया ॥ ५६ ॥**

मातेच्या हृदयापासून गर्भाच्या नाभीपर्यंत एक नळी जोडलेली असते व तिच्या योगानें जसा पाटानें मळा (मळ्यांतील झाडें) तद्वत् गर्भ वाढतो.

**चतुर्थे व्यक्तताङ्गानां चेतनायाश्च पञ्चमे ।**

चवथ्या महिन्यांत अंगप्रत्यंगें स्पष्ट होतात व पांचव्यांत चेतना उत्पन्न होते.

**षष्ठे स्नायुसिरारोमबलवर्णनखत्वचाम् ॥ ५७ ॥**

सहाव्यांत स्नायु, शिरा, केस, बळ, रंग, नखें व त्वचा यांची व्यक्तता होते.

**सर्वैः सर्वाङ्गसम्पूर्णो भावैः पुष्यति सप्तमे ।**

सातव्यांत गर्भाचे सर्व अवयव उत्पन्न होऊन तो पूर्ण होतो व वाढूं लागतो.

**गर्भेणोत्पीडिता दोषास्तस्मिन् हृदयमाश्रिताः ॥ ५८ ॥**
**कण्डूं विदाहं कुर्वन्ति गर्भिण्याः किक्किसानि च ।**

त्याच महिन्यांत गर्भानें पीडित झालेले (वर दाबलेले) वातादि दोष गर्भिणीच्या हृदयाचा आश्रय करून तीस कंडू, हस्तपादादिकांची आग आणि स्तन, ऊर व उदर यांवर वळ्या (किक्किस) उत्पन्न करितात.

**नवनीतं हितं तत्र कोलाम्बुमधुरौषधैः ॥ ५९ ॥**
**सिद्धमल्पपटुस्नेहं लघु स्वादु च भोजनम् ।**
**चन्दनोशीरकल्केन लिम्पेदूरुस्तनोदरम् ॥ ६० ॥**
**श्रेष्ठया चैणहरिणशशशोणितयुक्तया ।**
**अश्वघ्नपत्रसिद्धेन तैलेनाभ्यज्य मर्दयेत् ॥ ६१ ॥**
**पटोलनिम्बमञ्जिष्ठासुरसैः सेचयेत्पुनः ।**
**दार्वीमधुकतोयेन मृजां च परिशीलयेत् ॥ ६२ ॥**

त्यावर बोराचें पाणी व मधुर औषधें (द्राक्षादाडिमादि) यांनीं सिद्ध केलेलें लोणी हितावह होतें; तसेंच ज्यांत मीठ व स्नेह अल्प आहे असें हलकें व मधुर भोजन हितकारक आहे; मांड्या, स्तन व पोट यांवर चंदन व वाळा यांच्या कल्काचा लेप करावा; तसेंच काळवीट, हरिण व ससा यांच्या रक्ताशीं त्रिफळा मिश्र करून त्याचा लेप करावा. कण्हेरीच्या पानांत सिद्ध केलेलें तेल लावून परवर, कडूलिंब, मंजिष्ठा व तुळस यांनीं अंगाचें मर्दन करावें; दारुहळद व ज्येष्ठीमध यांच्या काढ्याचा परिषेक करावा व वारंवार अंग धुवावें.

**ओजोऽष्टमे सञ्चरति मातापुत्रौ मुहुः क्रमात् ।**
**तेन तौ म्लानमुदितौ तत्र जातो न जीवति ॥ ६३ ॥**
**शिशुरोजोऽनवस्थानान्नारी संशयिता भवेत् ।**

आठव्या महिन्यांत आईच्या व मुलाच्या देहांत तेज (ओज) वारंवार पाळीपाळीनें संचार करितें, त्यामुळें तीं क्रमानें म्लान व हर्षित होतात (मुलास ओज आलें तर तें हर्षयुक्त होतें व आई म्लान होते. आईस आलें तर ती हर्षयुक्त होऊन मूल म्लान होतें).

या महिन्यांत मूल झालें असतां तें तर मरतेंच, कारण त्याचे अंगांत अजून ओज चांगलें मुरलें ( स्थिरावलें ) नसतें. माता मरेल किंवा नाहीं याजबद्दल मात्र संशय असतो.

**क्षीरपेया च पेयाऽत्र सघृतान्वासनं हितम् ॥ ६४ ॥**
**मधुरैः साधितं शुद्धयै पुराणशकृतस्तथा ।**
**शुष्कमूलककोलाम्लकषायेण प्रशस्यते ॥ ६५ ॥**
**शताह्वाकल्कितो बस्तिः सतैलघृतसैन्धवः ।**

या महिन्यांत दुधांत केलेली भाताची पेज तूप घालून द्यावी. मधुर पदार्थांत सिद्ध केलेल्या तुपाचा अनुवासन बस्ति द्यावा. पुष्कळ दिवसांच्या मुळाची शुद्धि व्हावी म्हणून वाळलेले मुळे व आंबट बोरें यांच्या काढयाचा बस्ति बडिशोपेचा कल्क, तेल, तूप व सैंधव घालून द्यावा.

**तस्मिंस्त्वेकाहयातेऽपि कालः सूतेरतः परम् ॥ ६६ ॥**

आठ महिने पुरे होऊन वर एकच दिवस जरी गेला तरी पुरे. त्याच्यापुढें प्रसूतीचा योग्य काल समजावा.

**वर्षाद्विकारकारी स्यात्कुक्षौ वातेन धारितः ।**

वायूच्या योगानें एक वर्षावर गर्भ पोटांत राहिला असतो तो विकार उत्पन्न करितो.

**शस्तश्च नवमे मासि स्निग्धो मांसरसौदनः ॥ ६७ ॥**
**बहुस्नेहा यवागूर्वा पूर्वोक्तं चानुवासनम् ।**

नवव्या महिन्यांत गर्भिणीस स्नेह व मांसरस यांनीं मिश्रित भात व पुष्कळ स्नेह घालून केलेली यवागू ( तांदळाच्या ६ पट पाणी घालून केलेला पातळ भात ) व पूर्वी सांगितलेलें अनुवासन हितकारक होय.

**तत एव पिचुं चास्या योनौ नित्यं निधापयेत् ॥ ६८ ॥**
**वातघ्नपत्रभङ्गाम्भः शीतं स्नानेऽन्वहं हितम् ।**

त्यानंतर गर्भिणीच्या योनींत नेहमीं कापसाचा बोळा स्नेहांत भिजवून ठेवीत जावा आणि वातनाशक औषधींच्या पानांचा काढा थंड करून त्यानें दररोज स्नान घालावें.

**निःस्नेहाङ्गीं न नवमान्मासात्प्रभृति वासयेत् ॥ ६९ ॥**

नववा महिना लागल्यापासून गर्भिणीचें अंग नेहमीं स्नेहयुक्त ठेवावें.

**प्राग्दक्षिणस्तनस्तन्या पूर्वं तत्पार्श्वचेष्टिनी ।**
**पुन्नामदौहृदप्रश्नरता पुंस्वप्नदर्शिनी ॥ ७० ॥**
**उन्नते दक्षिणे कुक्षौ गर्भे च परिमण्डले ।**
**पुत्रं सूतेऽन्यथा कन्यां या चेच्छति नृसङ्गतिम् ॥ ७१ ॥**
**नृत्यवादित्रगान्धर्वगन्धमाल्यप्रिया च या ।**

जिच्या उजव्या स्तनांत प्रथम दूध येतें, जी कोणताहि व्यापार करीत असतां उजवा पाय अथवा हात पुढें करिते, जिला पुल्लिंगी पदार्थांचे डोहाळे होतात, जिला पुल्लिंगी पदार्थांचे प्रश्न प्रिय असतात, जी स्वप्नांत पुल्लिंगी पदार्थच पाहते, जिची उजवी कूस डावीपेक्षां उंच दिसते व जिच्या गर्भाचा आकार बाहेरून वाटोळा लागतो तिला पुत्र होतो. जिला याच्या विपरीत लक्षणें होतात, जिला पुरुषाच्या समागमाची इच्छा होते व जिला नाचणें, गाणें, लाजविणें, सुगंध व फुलें धारण करणें ह्या गोष्टी फार आवडतात तिला मुलगी होते.

**क्लीबं तत्सङ्करे तत्र मध्यं कुक्षेः समुन्नतम् ॥ ७२ ॥**

वर सांगितलेलीं दोन्हीं प्रकारचीं लक्षणें जिला एकदम होतात व जिच्या कुशीचा मध्यभाग उंच होतो तिला षंढ होतो.

**यमौ पार्श्वद्वयोन्नामात्कुक्षौ द्रोण्यामिवस्थिते ।**

दोन्ही बाजू उचलल्यामुळें पोटास मध्यें खळगा होऊन तें द्रोणि ( डोणी ) सारखें झालें असतां दोन मुलें होतात.

**प्राक् चैव नवमान्मासात्सूतिकागृहमाश्रयेत् ॥ ७३ ॥**
**देशे प्रशस्ते सम्भारैः सम्पन्नं साधकेऽहनि ।**

नऊ महिन्यांपूर्वीच गर्भिणीनें चांगल्या मुहूर्तावर प्रशस्त जागेंत असून जींत सर्व सामग्री सिद्ध केलेली आहे अशा बाळंतखोलींत रहावें.

**तत्रोदीक्षेत सा सूतिं सूतिकापरिवारिता ॥ ७४ ॥**

तेथें सुइणीसहवर्तमान राहून तिनें बाळंत होण्याची वाट पाहावी.

**अद्यश्वः प्रसवे ग्लानिः कुक्ष्यक्षिश्लथता क्लमः ।**
**अधोगुरुत्वमरुचिः प्रसेको बहुमूत्रता ॥ ७५ ॥**
**वेदनोरूदरकटीपृष्ठहृद्बस्तिवङ्क्षणे ।**
**योनिभेदरुजातोदस्फुरणस्रवणानि च ॥ ७६ ॥**

आज उद्यां प्रसूत होणाऱ्या स्त्रीचीं लक्षणें येणेंप्रमाणें:—ग्लानि, कुशी व डोळे शिथिल होणें ( गळणें ), थकवा, खालच्या भागास जडत्व, अरुचि, लालास्राव, लघवी पुष्कळ होणें, तसेंच मांड्या, पोट, कमर, पाठ, हृदय, बस्ति ( ओटीपोट ) आणि आडसंधि यांत वेदना होणें, योनिभेद ( फुटल्यासारखी पीडा ), योनिशूल, योनितोद ( टोंचल्यासारखी पीडा ), योनिस्फुरण व योनिस्राव होणें.

**आवीनामनुजन्मातस्ततो गर्भोदकस्रुतिः ।**

वर निर्दिष्ट केलेलीं लक्षणें झाल्यावर पोट दुखूं लागून नंतर गर्भोदकाचा स्राव होऊं लागतो.

**अथोपस्थितगर्भां तां कृतकौतुकमङ्गलाम् ॥ ७७ ॥**
**हस्तस्थपुन्नामफलां स्वभ्यक्तोष्णाम्बुसेचिताम् ।**
**पाययेत्सघृतां पेयां**

गर्भ प्रसवाभिमुख झाला असतां गर्भिणीस स्वस्तिवाचन व रक्षाबंधन करून, तिच्या अंगास तेल लावून ऊन पाण्यानें स्नान घालावें व हातांत पुल्लिंगवाच्य फळ द्यावें ( नारळानें ओटी भरावी ), आणि तूप घालून कण्हेरी पाजावी.

**तनौ भूशयने स्थिताम् ॥ ७८ ॥**
**आभुग्नसक्थिमुत्तानामभ्यक्ताङ्गीं पुनः पुनः ।**
**अधोनाभेर्विमृद्नीयात्कारयेज्जृम्भचङ्क्रमम् ॥ ७९ ॥**

गर्भिणीस पातळ बिछान्यावर उताणी निजवून दोन्ही मांड्या वर

दुमडून वारंवार अंगास तेल लावून नाभीपासून खालीं मर्दन करावें. तिजकडून जांभया देववाव्या व जलदीनें तिला चालवावें.

**गर्भः प्रयात्यवागेवं तल्लिङ्गं हृद्विमोक्षतः।**
**आविश्य जठरं गर्भो बस्तेरुपरि तिष्ठति ॥ ८० ॥**

असें केलें असतां गर्भ खालीं येतो. तो हृदयापासून सुटल्यावर पोटांत [ ओटींत ] शिरून बस्तीच्या वर राहतो.

**आव्यो हि त्वरयन्त्येनां खट्वामारोपयेत्ततः।**

ती प्रसववेदनांनीं अतिशय व्याकुळ झाली असतां तीस बाजेवर निजवावें.

**अथ सम्पीडिते गर्भे योनिमस्याः प्रसादयेत्* ॥ ८१॥**

योनिमुखाश्रित वायूनें गर्भ खालीं दाबला गेला असतां तिच्या योनीस स्नेह लावून ती विस्तृत करावी.

**मृदु पूर्वं प्रवाहेत बाढमाप्रसवाच्च सा।**

गर्भिणीनें प्रथम हळू हळू कुंथावें व गर्भ योनिमुखाजवळ आला असतां प्रसव होईपर्यंत जोरानें कुंथावें.

**हर्षयेत्तां मुहुः पुत्रजन्मशब्दजलानिलैः ॥ ८२ ॥**

" तूं बाळंत झालीस, तुला उत्तम मुलगा झाला " असें म्हणून व तिच्या अंगावर थंड पाणी शिंपडून आणि वारा घालून तिला आनंदयुक्त करीत असावें ( उमेद देत असावें ).

**प्रत्यायान्ति तथा प्राणाः सूतिक्लेशावसादिताः।**

याप्रमाणें तिला उमेद दिली असतां प्रसववेदनांनीं व्याकुळ झालेले प्राण परत येतात ( उत्तेजित होतात ).

**धूपयेद्गर्भसङ्गे तु योनिं कृष्णाहिकञ्चुकैः ॥ ८३ ॥**
**हिरण्यपुष्पीमूलं च पाणिपादेन धारयेत्।**
**सुवर्चलां विशल्यां वा जरायवपतनेऽपि च ॥ ८४ ॥**
**कार्यमेतत्तथोत्क्षिप्य बाह्वोरेनां विकम्पयेत्।**
**कटीमाकोटयेत्पाष्ण्या स्फिजौ गाढं निपीडयेत् ८५**
**तालुकण्ठं स्पृशेद्वेण्या मूर्ध्नि दद्यात्स्नुहीपयः।**
**भूर्जलाङ्गलिकीतुम्बीसर्पत्वक्कुष्ठसर्षपैः ॥ ८६ ॥**
**पृथग् द्वाभ्यां समस्तैर्वा योनिलेपनधूपनम्।**
**कुष्ठतालीसकल्कं वा सुरामण्डेन पाययेत् ॥ ८७ ॥**
**यूषेण वा कुलत्थानां बिल्वजेनासवेन वा।**

गर्भ अडकून राहिल्यास कृष्ण सर्पाच्या मेंगेचा धूर योनीस द्यावा. सोनचाफ्याची मुळी, स्थलकमलिनी ( सुवर्चला ) अथवा कळलावीचा कांदा हातांत व पायांत धरावा. वार न पडल्यास ( वरील प्रकार करूनहि ) बाळंतिणीस दोन्ही हातांनीं ( एक हात पोटावर व दुसरा पाठीवर ) धरून हालवावी म्हणजे वार पडेल. कमरेवर खोटेनें मारावें. तसेंच कुल्ले खूप घट्ट दाबावे. ताळू व घसा यांस वेणी लावावी, डोक्यावर त्रिधारी निवडुंगाचा चीक घालावा. भूर्जपत्र, कळलावी, कडू दुधी, सापाची मेंग, कोष्ठ व शिरस यांपैकीं एकाचा, दोहोंचा अथवा सर्वांचा योनीस लेप करावा व धूर द्यावा. कोष्ठ व तालीसपत्र यांचा कल्क सुरामंडा ( सुरेवरील निवळ ) बरोबर अथवा कुळथांच्या काढ्याबरोबर अथवा बेलाच्या आसवाबरोबर पाजावा.

**शताह्वासर्षपाजाजीशिग्रुतीक्ष्णकचित्रकैः ॥ ८८ ॥**
**सहिङ्गुकुष्ठमदनैर्मूत्रे क्षीरे च सार्षपम्।**
**तैलं सिद्धं हितं पायौ योऽन्यां वाप्यनुवासनम् ॥ ८९ ॥**
**शतपुष्पावचाकुष्ठकणासर्षपकल्कितः।**
**निरूहः पातयत्याशु सस्नेहलवणोऽपराम् ॥ ९० ॥**
**तत्सङ्गे ह्यनिलो हेतुः सा निर्यात्याशु तज्जयात्।**

बडिशोप, मोहोऱ्या, जिरें, शेवग्याचें बीं, ओंवा, चित्रकमूळ, हिंग, कोष्ठ व गेळफळ यांनीं गोमूत्रांत व दुधांत सिद्ध केलेल्या शिरसेल तेलाच्या गुदांत व योनींत पिचकाऱ्या ( अनुवासन ) माराव्या. तसेंच बडिशोप, वेखंड, कोष्ठ, पिंपळी, मोहोऱ्या यांचा कल्क, तेल व सैंधव घालून त्याचा निरूह बस्ति दिला असतां वार लागलीच पडते; कारण वार पडण्यास वायूनें प्रतिबंध झालेला असतो व तो निरूहानें कमी झाला कीं सहजच वार पडते.

**कुशला पाणिनाक्तेन हरेत्क्लृप्तनखेन वा ॥ ९१ ॥**

अथवा कुशल सुइणीनें हाताचीं नखें काढून त्यांस तेल लावून त्यानें वार ओढून काढावी.

**मुक्तगर्भापरां योनिं तैलेनाङ्गं च मर्दयेत्।**

गर्भ व वार बाहेर आल्यावर तेलानें योनीचें व अंगाचें मर्दन करावें.

**मकल्लाख्ये शिरोबस्तिकोष्ठशूले तु पाययेत् ॥ ९२ ॥**
**सुचूर्णितं यवक्षारं घृतेनोष्णजलेन वा।**
**धान्याम्बु वा गुडव्योषत्रिजातकरजोऽन्वितम् ॥ ९३ ॥**

डोकें, बस्ति ( ओटीपोट ) व कोठा यांत जो शूळ उत्पन्न होतो त्यास मकल्ल असें म्हणतात. त्यावर यवक्षाराचें बारीक केलेलें चूर्ण, तूप किंवा ऊन पाणी यांबरोबर द्यावें, अथवा गूळ, सुंठ, मिरी, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र व वेलची यांचें चूर्ण घालून धन्याचा काढा, हिम किंवा फांट द्यावा.

**अथ बालोपचारेण बालं योषिदुपाचरेत्।**

त्यानंतर उत्तरस्थानांतील पहिल्या अध्यायांत सांगितल्याप्रमाणें स्त्रीनें मुलांचें संगोपन करावें.

**सूतिका क्षुद्वती तैलाद्घृताद्वा महतीं पिबेत् ॥ ९४ ॥**
**पञ्चकोलकिनीं मात्रामनुचोष्णं गुडोदकम्।**

बाळंतिणीस भूक लागली असतां पंचकोला ( सुंठ, पिंपळी, चवक, चित्रक व पिंपळमूळ ) चें चूर्ण घालून आठ प्रहरांनीं जिरेल इतकें तूप किंवा तेल तिला पाजावें व त्यावर ऊन केलेलें गुळाचें पाणी पिण्यास द्यावें.

* 'प्रसादयेत्' व 'प्रसाधयेत्' असेहि पाठ आहेत; परंतु अरुणदत्ताच्या टीकेंतील अर्थ व संग्रहांतील पाठ पाहिल्यास वर दिलेलाच बरोबर दिसतो.

**वातघ्नौषधतोयं वा तथा वायुर्न कुप्यति ॥ ९५ ॥**
**विशुध्यति च दुष्टास्रं द्वित्रिरात्रमयं क्रमः ।**

अथवा वातघ्न औषधांचा काढा द्यावा. तेणेंकरून वायूचा कोप न होतां दुष्ट झालेलें रक्त शुद्ध होतें. हा क्रम दोन किंवा तीन दिवस चालवावा.

**स्नेहायोग्या तु निःस्नेहममुमेव विधिं भजेत् ॥ ९६ ॥**
**पीतवत्याश्च जठरं यमकाक्तं विवेष्टयेत् ।**

जिला स्नेह देणें अयोग्य वाटेल तिला वरचींच औषधें स्नेह न घालतां द्यावीं व औषध दिल्यावर पोटास तेल व तूप लावून तें फडक्यांनीं बांधावें.

**जीर्णे स्नाता पिबेत्पेयां पूर्वोक्तौषधसाधिताम् ॥ ९७ ॥**
**त्र्यहादूर्ध्वं विदार्यादिवर्गक्काथेन साधिता ।**
**हिता यवागूः स्नेहाढ्या सात्म्यतः पयसाऽथवा ।९८।**
**सप्तरात्रात्परं चास्यै क्रमशो बृंहणं हितम् ।**

वरील औषधाचें पचन झालें असतां तिला स्नान घालून पंचकोलांनीं सिद्ध केलेली कण्हेरी द्यावी. तीन दिवसांनंतर विदार्यादि गणांतील औषधांच्या काढ्यांत सिद्ध केलेली यवागू पुष्कळ तूप घालून द्यावी. किंवा संवय असल्यास दुधांत सिद्ध केलेली यवागू द्यावी. सात रात्रींनंतर बाळंतिणीस हळू हळू बृंहण द्यावें.

**द्वादशाहेऽनतिक्रान्ते पिशितं नोपयोजयेत् ॥ ९९ ॥**

बारा दिवस झाल्यावांचून बाळंतिणीस मांस देऊं नये.

**यत्नेनोपचरेत्सूतां दुःसाध्या हि तदामयाः ।**
**गर्भवृद्धिप्रसवरुक्क्लेदास्रस्रुतिपीडनैः ॥ १०० ॥**

बाळंतिणीचे उपचार फार जपून करावे, कारण गर्भाची वृद्धि, प्रसववेदना, क्लेद व रक्त यांचा स्राव आणि गर्भसंबंधीं दाब ( गर्भ पोटांत असतां कोष्ठस्थ सर्व अवयवांवर त्याचा दाब पडतो. ) यांच्या योगानें तिचे रोग कष्टसाध्य असतात.

**एवं च मासादध्यर्धान्मुक्ताहारादियन्त्रणा ।**
**गतसूताभिधाना स्यात्पुनरार्तवदर्शनात् ॥ १०१ ॥**

याप्रमाणें दीड महिना वागून पुढें आहारविहारांचा नियम सोडावा; परंतु पुनः आर्तवदर्शन होईपर्यंत तिला बाळंतीण असें म्हणावयाचें.

---

# द्वितीयोऽध्यायः

## अध्याय दुसरा

**अथातो गर्भव्यापदं शारीरं व्याख्यास्यामः ।**

आतां गर्भविकाराविषयीं शारीर ( अध्याय ) सांगतों.

**गर्भिण्याः परिहार्याणां सेवया रोगतोऽपि वा ।**
**पुष्पे दृष्टेऽथवा शूले बाह्यान्तः स्निग्धशीतलम् ॥ १ ॥**
**सेव्याम्भोजहिमक्षीरिवल्ककल्काज्यलेपितान् ।**
**धारयेद्योनिबस्तिभ्यामार्द्रार्द्रान् पिचुनक्तकान् ॥ २ ॥**

गर्भिणीस वर्ज्य केलेल्या प्रकारांचें तिनें सेवन केल्यामुळें किंवा रोगामुळें रजोदर्शन झालें किंवा शूळ उत्पन्न झाला असतां अंतर्बाह्य स्निग्ध व शीतल ( थंड ) उपचार करावे. तसेंच वाळा, चंदन, कमळ व क्षीरी वृक्षांच्या साली ( वड, पिंपळ, उंबर, नांदरुक व पायरी ) यांचा कल्क करून तो कल्क व तूप यांत कापसाच्या व फडक्याच्या घड्या व बोळे भिजवून ते योनि व बस्ति यांवर ठेवावे व ते नेहमीं ओले राखावे.

**शतधौतघृताक्तां स्त्रीं तदम्भस्यवगाहयेत् ।**
**ससिताक्षौद्रकुमुदकमलोत्पलकेसरम् ॥ ३ ॥**
**लिह्यात्क्षीरघृतं खादेच्छृङ्गाटककसेरुकम् ।**
**पिबेत्कान्ताब्जशालूकबालोदुम्बरवत्पयः ॥ ४ ॥**
**शृतेन शालीकाकोलीद्विबलामधुकेक्षुभिः ।**
**पयसा रक्तशाल्यन्नमद्यात्समधुशर्करम् ॥ ५ ॥**
**रसैर्वा जाङ्गलैः**

तिच्या अंगास शतघृत लावून वर लिहिलेल्या औषधांच्या काढ्यानें भरलेल्या मोठ्या पात्रांत तीस बसवावें. साखर, मध, चंद्रविकासी, सूर्यविकासी व निळें कमळ यांचें केसर यांनीं युक्त दूध व तूप तिला द्यावें, तसेंच शिंगाडे व कचरा खावयास द्यावा. गव्हला, कमळ, निळ्या कमळांचें मूळ व कोंवळें उंबर यांनीं सिद्ध केलेलें दूध द्यावें. भाताचें मूळ, काकोली, बला, अतिबला, ज्येष्ठीमध व उसाचें मूळ यांत सिद्ध केलेल्या दुधाबरोबर अथवा जांगल मांसरसाबरोबर मध व साखर घालून तांबसाळीचा भात द्यावा.

**शुद्धिवर्जं चास्रोक्तमाचरेत् ।**

वमन, विरेचन व बस्ति [ निरूह ] शिवायकरून रक्तपित्ताच्या चिकित्सेंत सांगितलेले सर्व उपचार करावे.

**असम्पूर्णत्रिमासायाः प्रत्याख्याय प्रसाधयेत् ॥ ६ ॥**
**आमान्वये च**

तीन महिने पूर्ण होण्यापूर्वीं गर्भिणीस रजोदर्शन झालें असतां किंवा आमाचा संबंध असल्यास, गर्भ ठरणें कठिण आहे असें सांगून नंतर मोठ्या काळजीनें व प्रयत्नानें तिला उपचार करावे.

**तत्रेष्टं शीतं रूक्षोपसंहितम् ।**
**उपवासो धनोशीरगुडूच्यरलुधान्यकाः ॥ ७ ॥**
**दुरालभापर्पटकचन्दनातिविषाबलाः ।**
**क्वथिताः सलिले पानं तृणधान्यादि भोजनम् ॥ ८ ॥**
**मुद्गादियूषैरामे तु जिते स्निग्धादि पूर्ववत् ।**

आमाचा संबंध असेल तर रूक्षानें युक्त असे शीत उपचार करावे. उपास करवावे. नागरमोथे, वाळा, गुळवेल, टेंटू, धने, धमासा, पित्तपापडा, चंदन, अतिविष व चिकणा यांचा काढा पिण्यास द्यावा. खाण्यास देवभात, वरी इत्यादि तृणधान्यें द्यावीं. तसेंच मूग,

मधुरा इत्यादिकांचें यूष द्यावें व त्यांनीं आम नाहींसा झाला असतां पूर्ववत् स्निग्धादिक उपचार करावे.

**गर्भे निपतिते तीक्ष्णं मद्यं सामर्थ्यतः पिबेत् ॥ ९ ॥**
**गर्भकोष्ठविशुद्ध्यर्थमार्तिविस्मरणाय च ।**
**लघुना पञ्चमूलेन रूक्षां पेयां ततः पिबेत् ॥ १० ॥**
**पेयाममद्यपा कल्के साधितां पाञ्चकौलिके ।**
**बिल्वादिपञ्चककाथे तिलोद्दालकतण्डुलैः ॥ ११ ॥**
**मासतुल्यादिनान्येवं पेयादिः पतिते क्रमः ।**
**लघुरस्नेहलवणो दीपनीययुतो हितः ॥ १२ ॥**

याप्रमाणें उपचार करूनहि गर्भपात होईल तर गर्भाशयाची शुद्धि होण्याकरितां व वेदनांची विस्मृति होण्यासाठीं सामर्थ्यानुसार तीक्ष्ण मद्य पिण्यास द्यावें. त्यावर लघुपंचमूलानें सिद्ध केलेली कण्हेरी तूप न घालतां द्यावी. जिला मद्य देणें योग्य नाहीं तिला पंचकोलाच्या कल्कांत व मोठ्या पंचमूलांच्या (बिल्वकाश्मर्येत्यादि) काढ्यांत तीळ व उद्दालकाचे (तांदुळाची एक जात आहे,) तांदूळ घालून केलेली कण्हेरी द्यावी. वर जो हा पेयादि क्रम सांगितला तो जितक्या महिन्यांचा गर्भ पतन पावला असेल तितके दिवस करावा व त्यांत स्नेह व मीठ नसावें. त्यांतील पदार्थ दीपनीय व हलके असावे.

**दोषधातुपरिक्लेदशोषार्थं विधिरित्ययम् ।**

गर्भाशयासंबंधीं वातादिक दोष, धातु व क्लेद (स्राव) यांचें शोषण (क्षय) होण्याकरितां हा प्रकार सांगितला आहे.

**स्नेहान्नबस्तयश्चोर्ध्वं बल्यजीवनदीपनाः ॥ १३ ॥**

त्यानंतर बलवर्धक, ओजाची वृद्धि करणारे व अग्नीस प्रदीप्त करणारे असे स्नेह, अन्न व बस्ति द्यावे.

**सञ्जातसारे महति गर्भे योनिपरिस्रवात् ।**
**वृद्धिमप्राप्नुवन् गर्भः कोष्ठे तिष्ठति सस्फुरः ॥ १४ ॥**
**उपविष्टकमाहुस्तं वर्धते तेन नोदरम् ।**

गर्भ बलवान् होऊन वाढला असतां कोणत्याहि कारणानें योनिस्राव उत्पन्न होऊन पुढें गर्भ न वाढतां तो तसाच पोटांत राहतो व स्फुरण पावत असतो; त्यास उपविष्टक (सल) असें म्हणतात, व त्यामुळें पोट वाढत नाहीं.

**शोकोपवासरूक्षाद्यैरथवा योन्यतिस्रवात् ॥ १५ ॥**
**वाते क्रुद्धे कृशः शुष्येद्गर्भो नागोदरं तु तत् ।**
**उदरं वृद्धमप्यत्र हीयते स्फुरणं चिरात् ॥ १६ ॥**

शोक, उपवास, रूक्षादि पदार्थांचें सेवन आणि अतिशय योनिस्राव ह्या कारणांनीं वायु कुपित झाला असतां गर्भ कृश होऊन वाळतो. त्यास नागोदर (सल) म्हणतात. पोट वाढलें असतें तें कमी होतें व फार वेळानें गर्भ स्फुरण पावतो.

**तयोर्बृंहणवातघ्नमधुरद्रव्यसंस्कृतैः ।**
**घृतक्षीररसैस्तृप्तिरामगर्भांश्च खादयेत् ॥ १७ ॥**



**तैरेव च सुतृप्तायाः क्षोभणं यानवाहनैः ।**

उपविष्टक व नागोदर झालेल्या स्त्रीस बृंहण, वातघ्न व गोड अशा पदार्थांनीं सिद्ध केलेलें तूप, दूध व मांसरस हे पदार्थ देऊन पुष्ट करावें व (निरनिराळ्या रूपांनीं) तिला अंडीं खावयास द्यावीं. त्यांनींच ती चांगली पुष्ट झाल्यावर गाडी, घोडे, हत्ती इत्यादिकांवर तिला बसवून वेगानें फिरवावी (म्हणजे क्षोभण करावें).

**लीनाख्ये निःस्फुरे श्येनगोमत्स्योत्क्रोशबर्हिजाः ॥ १८ ॥**
**रसा बहुघृता देया माषमूलकजा अपि ।**
**बालबिल्वं तिलान्माषान् सक्तूंश्च पयसा पिबेत् ॥ १९ ॥**
**समेद्यमांसं मधु वा कट्यभ्यङ्गं च शीलयेत् ।**

जो गर्भ स्फुरण न पावतां तसाच गर्भाशयांत लीन होऊन राहतो त्यास लीन गर्भ असें म्हणतात. त्यावर ससाणा, गाय, मासे, सुतार (पक्षिविशेष) व मोर यांचे मांसरस पुष्कळ तूप घालून द्यावे. तसेंच उडीद व मुळे यांच्या सारांत पुष्कळ तूप घालून तें द्यावें. कोवळें बेलफळ, तीळ, उडीद व भाजलेल्या सातूंचें पीठ दुधाबरोबर द्यावें. मेदुरमांस व द्राक्षासव द्यावें. तसेंच कमरेस नेहमीं तेल जिरवावें.

**हर्षयेत्सततं चैनामेवं गर्भः प्रवर्धते ॥ २० ॥**

व तिला नेहमीं इष्ट उपायांनीं आनंदित राखावें. असें केल्यानें गर्भ वाढतो.

**पुष्टोऽन्यथा वर्षगणैः कृच्छ्राज्जायेत नैव वा ।**

वर सांगितलेल्या प्रकारानें गर्भिणीनें आचरण न केल्यास गर्भ वाढण्यास पुष्कळ वर्षे लागतात, व तो वाढल्यावर ती मोठ्या प्रयासानें प्रसूत होते. अथवा ती मरेपर्यंत तो न वाढतां तसाच राहतो.

**उदावर्तं तु गर्भिण्याः स्नेहैराशुतरां जयेत् ॥ २१ ॥**
**योग्यैश्च बस्तिभिर्हन्यात्सगर्भां स हि गर्भिणीम् ।**

गर्भिणीस उदावर्त व्याधि झाला असतां स्नेहपान व तिला योग्य असे बस्ति देऊन तो व्याधि फार त्वरित दूर करावा. कारण तो गर्भ व गर्भिणी यांस मारितो.

**गर्भेऽतिदोषोपचयादपथ्यैर्दैवतोऽपि वा ॥ २२ ॥**
**मृतेऽन्तरुदरं शीतं स्तब्धं ध्मातं भृशव्यथम् ।**
**गर्भास्पन्दो भ्रमस्तृष्णा कृच्छ्रादुच्छ्वसनं क्लमः ॥ २३ ॥**
**अरतिः स्रस्तनेत्रत्वमावीनामसमुद्भवः ।**

दोषांचा अतिसंचय झाल्यानें, अपथ्य केल्यानें, किंवा दैवगतीनें गर्भ पोटांत मेला असतां जीं लक्षणें होतात तीं:—पोट गार, स्तब्ध व फुगलेलें असें होणें, त्यांत अतिशय वेदना होणें, गर्भाचें स्फुरण न होणें, भ्रम, तहान, श्वास टाकण्यास कष्ट, ग्लानि, अस्वस्थता (चैन न पडणें व त्यामुळें अंथरुणावर एकसारख्या स्थितींत न राहणें), डोळे गळणें व वेणा न येणें.

**तस्याः कोष्णाम्बुसिक्तायाः पिष्ट्वा योनिं प्रलेपयेत् ॥ २४ ॥**

गुडं किण्वं सलवणं तथान्तः पूरयेन्मुहुः।
घृतेन कल्कीकृतया शाल्मल्यतसिपिच्छया ॥ २५ ॥
मन्त्रैर्योगैर्जरायुक्तैर्मूढगर्भो न चेत्पतेत्।
अथापृच्छ्येश्वरं वैद्यो यत्नेनाशु तमाहरेत् ॥ २६ ॥
हस्तमभ्यज्य योनिं च साज्यशाल्मलिपिच्छया।
हस्तेन शक्यं तेनैव

कोंबट पाण्यानें तिचें अंग धुऊन गूळ व किण्व [ सुराबीज किंवा किंवा खमीर ] यांत मीठ घालून वांटून त्याचा योनीस लेप करावा, मोचरस व अळशीचा डींक तुपांत खलून योनींत भरावा. वार पडण्याकरितां जे मंत्र व योग सांगितले आहेत त्यांचा उपयोग करावा. इतक्या उपायांनीं गर्भ न पडेल तर राजास विचारून गर्भ हातानें काडतां येण्यासारखा असल्यास हातास व योनीस मोचरस व तूप एकत्र खलून तें लावावें, आणि हातानें मोठ्या प्रयत्नानें तो बाहेर काडावा.

गात्रं च विषमं स्थितम् ॥ २७ ॥
आंच्छनोत्पीडसंपीडविक्षेपोत्क्षेपणादिभिः।
अनुलोम्य समाकर्षेद्योनिं प्रत्यार्जवागतम् ॥ २८ ॥

जर एखादा अवयव असावा तशा स्थितींत नसेल तर फिरवून लांब किंवा सरळ करणें ( आंच्छन ), वर किंवा सभोंवतीं दाब देणें, लांब करणें ( विक्षेप ), दुमडणें ( उत्क्षेपण ) इत्यादि क्रियांनीं तो सारखा करून द्वाराशीं सरळ रेषेंत आल्यावर ओढून काढावा.

हस्तपादशिरोभिर्यो योनिं भुग्नः प्रपद्यते।
पादेन योनिमेकेन भुग्नोऽन्येन गुदं च यः ॥ २९ ॥
विष्कम्भौ नाम तौ मूढौ शस्त्रदारणमर्हतः।

ज्याचा हात अथवा पाय अथवा डोकें योनीशीं आडवें येतें तो, व ज्याचा एक पाय योनीशीं व दुसरा गुदाशीं आडवा येतो तो या दोहोंस विष्कंभ मूढगर्भ* असें म्हणतात, त्यांवर शस्त्रक्रिया करावी लागते.

मण्डलाङ्गुलिशस्त्राभ्यां तत्र कर्म प्रशस्यते ॥ ३० ॥

यांची शस्त्रक्रिया करण्यास मंडलाग्र व अंगुलिशस्त्र हींच योग्य आहेत.

वृद्धिपत्रं हि तीक्ष्णाग्रं न योनाववचारयेत्।

वृद्धिपत्राचें अग्र फार तीक्ष्ण असतें म्हणून तें योनींत चालवूं नये.

पूर्वं शिरःकपालानि दारयित्वा विशोधयेत् ॥ ३१ ॥
कक्षोरस्तालुचिबुके प्रदेशेऽन्यतमे ततः।
समालम्ब्य दृढं कर्षेत्कुशलो गर्भशङ्कुना ॥ ३२ ॥
अभिन्नशिरसं त्वक्षिकूटयोर्गण्डयोरपि।

कुशल वैद्यानें प्रथमतः डोक्याचीं हाडें फोडून तीं काढून टाकावीं. नंतर कांख, ऊर, टाळू किंवा हनुवटी, यांच्या एखाद्या भागावर बळकट धरून गर्भशंकूनें गर्भ बाहेर ओढावा. मस्तकाचें विदारण केलें नसेल तर गाल अथवा डोळ्यांचे खळगे यांस धरून जोरानें गर्भ ओढून काढावा.

बाहुं छित्वाऽससक्तस्य वाताध्मातोदरस्य तु ॥ ३३ ॥
विदार्य कोष्ठमन्त्राणि बहिर्वासं निरस्य च।

खांद्यानें गर्भ अडकला असेल तर हात तोडून गर्भशंकूनें गर्भ ओढावा. वायूनें गर्भाचें पोट फुगल्यास कोठा फाडून व जरूर दिसल्यास आंतडीं बाहेर काढून गर्भ ओढून काढावा.

कटीसक्तस्य तद्वच्च तत्कपालानि दारयेत् ॥ ३४ ॥

कमरेनें गर्भ अडकला असेल तर वरच्याप्रमाणेंच क्रिया करून कमरेचीं हाडें फोडून गर्भ काढावा.

यद्यद्वायुवशादङ्गं सज्जेद्गर्भस्य खण्डशः।
तत्तच्छित्वा हरेत्सम्यग्रक्षेन्नारीं च यत्नतः ॥ ३५ ॥

तात्पर्य, वायूमुळें गर्भाचें जें जें अंग आडवें येईल त्या त्या भागाचे बारीक बारीक तुकडे करून मोठ्या कुशलतेनें गर्भ बाहेर काढून यत्नानें स्त्रीचें रक्षण करावें. ( जेणेंकरून स्त्रीच्या अवयवास शस्त्राचा धक्का लागणार नाहीं असें काम करावें. )

गर्भस्य हि गतिं चित्रां करोति विगुणोऽनिलः।
तत्रानल्पमतिस्तस्मादवस्थापेक्षमाचरेत् ॥ ३६ ॥

वायु प्रकुपित झाला म्हणजे गर्भास अनेक प्रकारच्या गति देतो ( गर्भ अनेक तऱ्हांनीं योनिमुखाच्या जवळ येतो ), याकरितां सूज्ञ वैद्यानें अशा प्रसंगीं गर्भाच्या अवस्थेचा विचार करून त्याप्रमाणें क्रिया करावी.

छिन्द्याद्गर्भं न जीवन्तं मातरं स हि मारयेत्।
सहात्मना न चोपेक्ष्यः क्षणमप्यस्तजीवितः ॥ ३७ ॥

गर्भ जिवंत असतां शस्त्रक्रिया करूं नये. कारण तो आपण मरतो व आईसहि मारितो. तसेंच मृत गर्भाची क्षणभरहि उपेक्षा करूं नये. ( तो मेल्याबरोबर लागलेंच त्यास बाहेर काढावें. )

योनिसंवरणभ्रंशमक्कल्लश्वासपीडिताम्।
पूत्युद्गारां हिमाङ्गीं च मूढगर्भां परित्यजेत् ॥ ३८ ॥

जिच्या गर्भाशयाचें मुख आकुंचित झालें आहे, व जी योनिभ्रंश, मकल्लशूल व श्वास यांनीं व्याप्त झाली आहे, आणि जिचें अंग गार आहे व जिला दुर्गंधियुक्त ढेंकरा येत आहेत अशा गूढगर्भ स्त्रियेस असाध्य समजून सोडावी.

अथापतन्तीमपरां पातयेत्पूर्ववद्भिषक्।
एवं निर्हृतशल्यां तु सिञ्चेदुष्णेन वारिणा ॥ ३९ ॥
दद्यादभ्यक्तदेहायै योनौ स्नेहपिचुं ततः।
योनिर्मृदुर्भवेत्तेन शूलं चास्याः प्रशाम्यति ॥ ४० ॥

मूढगर्भ बाहेर पडल्यावर वार पडली नाहीं तर ती पडण्यासाठीं पूर्वोक्त ( पहिल्या अध्यायांतील ) विधि करावा. याप्रमाणें गर्भरूप शल्य बाहेर काढिल्यावर तिला ऊन पाण्यानें स्नान घालून अंगास

* गर्भाशयाचे द्वाराशीं अस्वाभाविक रीतीनें येऊन जो अडकून राहतो त्यास मूढगर्भ म्हणतात.

तेल लावावें. नंतर योनींत तेलानें भिजलेले कापसाचे बोळे ठेवावे. त्यामुळें योनि मृदु होऊन वेदना कमी होतात.

**दीप्यकातिविषारास्नाहिङ्ग्वेलापञ्चकोलकान्।**
**चूर्णं स्नेहेन कल्कं वा क्वाथं वा पाययेत्ततः॥ ४१॥**
**कटुकातिविषापाठाशाकत्वग्घिङ्गुतेजिनीः।**
**तद्वच्च दोषस्यन्दार्थं वेदनोपशमाय च॥ ४२॥**
**त्रिरात्रमेवं सप्ताहं स्नेहमेव ततः पिबेत्।**
**सायं पिबेदरिष्टं वा तथा सुकृतमासवम्॥ ४३॥**
**शिरीषककुभक्काथपिचून् योनौ विनिक्षिपेत्।**
**उपद्रवाश्च येऽन्ये स्युस्तान्यथास्वमुपाचरेत्॥ ४४॥**

दोषांचा स्राव व वेदनांची शांति होण्यासाठीं ओंवा, अतिविष, रास्ना, वेलदोडे, हिंग व पंचकोल यांचें, तसेंच कुटकी, अतिविष, पाहाडमूळ, सायाचें बीं, दालचिनी, हिंग व तेजबळ यांचें चूर्ण, कल्क अथवा काढा स्नेहाबरोबर द्यावा. याप्रमाणें मूढगर्भाचें निर्हरण झाल्यादिवसापासून तीन दिवसपर्यंत करावें. पुढें सात दिवस नुसता स्नेहच द्यावा. संध्याकाळीं अरिष्ट किंवा उत्तम प्रकारचें आसव द्यावें. शिरस व अर्जुनसादडा यांच्या काढ्यांत कापसाच्या घड्या भिजवून योनींत ठेवाव्या, व दुसरे जे जे विकार ( उपद्रव ) उत्पन्न होतील त्यांवर त्यांस योग्य अशीं निरनिराळीं औषधें देऊन ते दूर करावे.

**पयो वातहरैः सिद्धं दशाहं भोजने हितम्।**
**रसो दशाहं च परं लघुपथ्याल्पभोजना॥ ४५॥**
**स्वेदाभ्यङ्गपरा स्नेहान् बलातैलादिकान् भजेत्।**
**ऊर्ध्वं चतुर्भ्यो मासेभ्यः सा क्रमेण सुखानि च॥४६॥**

नंतर दहा दिवसपर्यंत तिला वातहारक पदार्थांनीं सिद्ध केलेलें दूध भोजनार्थ देणें हितावह आहे. पुढें दहा दिवस मांसरस हितकारक होतो. त्यावर चार महिने तिनें हलकें व हितकारक आणि थोडें असें भोजन करावें, अभ्यंग व स्वेद करावे; व बलातैलादिक स्नेहांचें सेवन करावें. चार महिन्यांनंतर तिनें यथेच्छ आहारविहार करूं लागावें.

**बलामूलकषायस्य भागाः षट् पयसस्तथा।**
**यवकोलकुलत्थानां दशमूलस्य चैकतः॥४७॥**
**निःक्वाथभागो भागश्च तैलस्य च चतुर्दशः।**
**द्विमेदादारुमञ्जिष्ठाकाकोलीद्वयचन्दनैः॥ ४८॥**
**सारिवाकुष्ठतगरजीवकर्षभसैन्धवैः।**
**कालानुसार्याशैलेयवचागुरुपुनर्नवैः॥ ४९॥**
**अश्वगन्धावरीक्षीरशुक्लायष्टीवरारसैः।**
**शताह्वाशूर्पपर्ण्येलात्वक्पत्रैः श्लक्ष्णकल्कितैः॥ ५०॥**
**पक्वं मृद्वग्निना तैलं सर्ववातविकारजित्।**
**सूतिकाबालमर्मास्थिक्षतक्षीणेषु पूजितम्॥ ५१॥**
**ज्वरगुल्मग्रहोन्मादमूत्राघातान्त्रवृद्धिजित्।**
**धन्वन्तरेरभिमतं योनिरोगक्षयापहम्॥ ५२॥**

चिकण्याच्या मुळाचा काढा ६ भाग, दूध ६ भाग, सातू, बोरें, कुळीथ व दशमुळें या सर्वांचा काढा एक भाग, तेल एक भाग व मेदा, महामेदा, देवदार, मंजिष्ठा, काकोली, क्षीरकाकोली, चंदन, उपळसरी, कोष्ठ, तगर, जीवक, ऋषभक, सैंधव, दारुहळद ( कालानुसार्या ), दगडफूल, वेखंड, अगरु, पुनर्नवा, आस्कंद, शतावरी, क्षीरविदारिका, ज्येष्ठीमध, त्रिफळा, लाल बोळ, बडीशोप, शूर्पपर्णी, दालचिनी, वेलची, व तमालपत्र हीं सर्व कुटून त्या सर्वांचा कल्क तेलाच्या चतुर्थांश ( स्नेहपाकाच्या परिभाषेप्रमाणें ) घेऊन मंदाग्नीवर तेल सिद्ध करावें. तें सर्व प्रकारचे वातविकार दूर करितें. तें बाळंतीण, बालक ( सोळा वर्षांच्या आंतील ) व मर्म आणि हाड यांवर क्षत झाल्यानें क्षीण झालेले यांस फार हितावह आहे. ज्वर, गुल्म, भूतोन्माद, उन्माद, मूत्राघात व अंतरगळ या रोगांस दूर करितें; तसेंच योनीसंबंधीं रोग व क्षय यांचाहि नाश करतें, व हें तेल धन्वंतरीसहि मान्य आहे.

**बस्तिद्वारे विपन्नायाः कुक्षिः प्रस्पन्दते यदि।**
**जन्मकाले ततः शीघ्रं पाटयित्वोद्धरेच्छिशुम्॥ ५३॥**

प्रसूत होते वेळीं स्त्री मेली असून पोट हलत असेल तर बस्तिद्वाराजवळ फाडून मूल बाहेर काढावें.

**मधुकं शाकबीजं च पयस्या सुरदारु च।**
**अश्मन्तकः कृष्णतिलास्ताम्रवल्ली शतावरी॥ ५४॥**
**वृक्षादनी पयस्या च लता चोत्पलसारिवा।**
**अनन्ता सारिवा रास्ना पद्मा च मधुयष्टिका॥ ५५॥**
**बृहतीद्वयकाश्मर्यः क्षीरिशुङ्गत्वचो घृतम्।**
**पृश्निपर्णी बला शिग्रुः श्वदंष्ट्रा मधुपर्णिका॥ ५६॥**
**शृङ्गाटकं बिसं द्राक्षा कसेरु मधुकं सिता।**
**सप्तैतान् पयसा योगानर्धश्लोकसमापनान्॥ ५७॥**
**क्रमात्सप्तसु मासेषु गर्भे स्रवति योजयेत्।**

पहिल्या महिन्यांत गर्भपात झाला असतां ज्येष्ठीमध, सायाचें बीं, क्षीरकाकोली व देवदार यांचा; दुसऱ्यांत अपटा, काळे तीळ, मंजिष्ठा व शतावरी यांचा; तिसऱ्यांत बांडगूळ, क्षीरकाकोली, पांढरी व काळी उपलसरी यांचा; चवथ्यांत धमासा, पांढरी उपलसरी, रास्ना, मंजिष्ठा व ज्येष्ठीमध यांचा; पांचव्यांत रिंगणीं, डोरली, शिवण, क्षीरिवृक्षाचे अंकुर व साल आणि तूप यांचा; सहाव्यांत पिठवण, चिकणा, शेवगा, गोखरू व मधुपर्णिका ( थोर शिवण ? ) यांचा व सातव्यांत शिंगाडे, कमळाचे देंठ, द्राक्षें, कचरा, ज्येष्ठीमध व खडीसाखर यांचा कल्क दुधाबरोबर द्यावा.

**कपित्थबिल्वबृहतीपटोलेक्षुनिदिग्धिजैः॥ ५८॥**
**मूलैः शृतं प्रयुञ्जीत क्षीरं मासे तथाऽष्टमे।**
**नवमे सारिवाऽनन्तापयस्यामधुयष्टिभिः॥ ५९॥**
**योजयेद्दशमे मासि सिद्धं क्षीरं पयस्यया।**
**अथवा यष्टिमधुकनागरामरदारुभिः॥ ६०॥**

कवठ, बेल, रिंगणी, पडवळ, ऊंस व डोरली यांच्या मुळांच्या

कल्कांत सिद्ध केलेलें दूध आठव्या महिन्यांत द्यावें. पांढरी उपलसरी, धमासा, क्षीरकाकोली व ज्येष्ठीमध यांनीं सिद्ध केलेलें दूध नवव्या महिन्यांत द्यावें व दहाव्यांत क्षीरकाकोलींत सिद्ध केलेलें अथवा ज्येष्ठीमध, सुंठ व देवदार यांत सिद्ध केलेलें दूध द्यावें.

अवस्थितं लोहितमङ्गनाया
वातेन गर्भं ब्रुवतेऽनभिज्ञाः।
गर्भाकृतित्वात्कटुकोष्णतीक्ष्णैः
स्रुते पुनः केवल एव रक्ते ॥ ६१ ॥
गर्भं जडा भूतहृतं वदन्ति
मूर्तेर्न दृष्टं हरणं यतस्तैः।
ओजोऽशनत्वादथवाऽव्यवस्थै-
र्भूतैरुपेक्ष्येत न गर्भमाता ॥ ६२ ॥

वायूच्या योगानें स्त्रियेच्या गर्भाशयांत रक्तसंचय झाला असतां कांहीं लक्षणें गर्भासारखीं होतात, त्यावरून त्यास अज्ञानवैद्य गर्भ असें म्हणतात. व तिखट, उष्ण आणि तीक्ष्ण पदार्थांनीं कदाचित् रक्ताचा स्राव होऊन ती मोकळी झाली असतां ते मूर्ख वैद्य गर्भ भुतांनीं नेला असें म्हणतात. हें त्यांचें अज्ञान होय. कारण भुतांचें खाणें ओज असल्यामुळें तीं स्थूल देहाचें हरण करीत नाहींत. (भुतें हीं सूक्ष्म शरीरानें असतात, त्यामुळें त्यांचे आहारहि अर्थात् सूक्ष्मच असले पाहिजेत.) भुतें जर कदाचित् इतकीं अव्यवस्थित होऊन गर्भ नेऊं लागतील, तर त्या गर्भाची माता त्यांनीं कां नेऊं नये?

---

# तृतीयोऽध्यायः

## अध्याय ३ रा

## अथातोऽङ्गविभागं शारीरं व्याख्यास्यामः।

आतां शरीराच्या विभागांविषयींचें शारीर (अध्याय) सांगतों.

शिरोऽन्तराधिर्द्वौ बाहू सक्थिनी च समासतः।
षडङ्गमङ्गं प्रत्यङ्गं तस्याक्षिहृदयादिकम् ॥ १ ॥

मुंडकें, मध्य, दोन बाहू व दोन तंगड्या हीं शरीराचीं सहा अंगें व डोळे, हृदय इत्यादिक त्याचीं प्रत्यंगें होत.

शब्दः स्पर्शश्च रूपं च रसो गन्धः क्रमाद्गुणाः।
खानिलाग्न्यब्भुवां

आकाश, वायु, अग्नि, पाणी व पृथ्वी यांचे अनुक्रमानें शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे गुण होत.

एकगुणवृद्ध्यन्वयः परे ॥ २ ॥

प्रत्येक महाभूताचा एकेक गुण मुख्य असून त्या प्रत्येकांत त्याच्या मागल्या भूतगुणांचीहि अनुवृत्ति होते, (जसें आकाशाचा गुण फक्त शब्दच, कारण त्याच्या मागें कांहीं नाहीं. वायूचे गुण शब्द व स्पर्श, अग्नीचे शब्द, स्पर्श व रूप, उदकाचे शब्द, स्पर्श, रूप व रस, आणि पृथ्वीचे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध.)

तत्र खात् खानि देहेऽस्मिन् श्रोत्रं शब्दो विविक्तता।
वातात्स्पर्शत्वगुच्छ्वासा वह्नेर्दृग्रूपपक्तयः॥ ३ ॥
आप्या जिह्वारसक्लेदा घ्राणगन्धास्थि पार्थिवम्।

शरीरांतील छिद्रें, श्रवणेंद्रिय, शब्द व पोकळी हीं आकाशापासून, तसेंच स्पर्श, त्वचा व उच्छ्वास हीं वायूपासून, दृष्टि, रूप व पचनशक्ति हीं अग्नीपासून; जीभ (रसनेंद्रिय), रस व क्लेद (लाळ, मूत्र इ०), हीं उदकापासून; व नाक (घ्राणेंद्रिय) वास व हाडें हीं पृथ्वीपासून झालेलीं असतात.

मृद्वत्र मातृजं रक्तमांसमज्जागुदादिकम् ॥ ४ ॥
पैतृकं तु स्थिरं शुक्रं धमन्यस्थिकचादिकम्।
चैतनं चित्तमक्षाणि नानायोनिषु जन्म च ॥ ५ ॥

तसेंच रक्त, मांस, मज्जा, गुद इत्यादिक शरीरांतील मृदु पदार्थ मातेच्या अंशापासून, शुक्र, धमन्या, हाडें, केंस इत्यादि घट्ट भाग पित्याच्या अंशापासून व चित्त, इंद्रियें व नानाप्रकारच्या जातींत जन्म होणें हीं जीवात्म्यापासून* प्राप्त होतात.

सात्म्यजं त्वायुरारोग्यमनालस्यं प्रभा बलम्।

आयुष्य, आरोग्य, उद्योग, प्रभा व बल हीं स्त्रीपुरुषांच्या सात्म्यापासून† उत्पन्न होतात.

रसजं वपुषो जन्म वृत्तिर्वृद्धिरलोलता ॥ ६ ॥

शरीराची उत्पत्ति, जीवन, वाढ व समाधान (न घाबरणें, स्थिरता) हीं रसापासून प्राप्त होतात.

सात्त्विकं शौचमास्तिक्यं शुक्लधर्मरुचिर्मतिः।
राजसं बहुभाषित्वं मानक्रुद्दम्भमत्सराः॥ ७ ॥
तामसं भयमज्ञानं निद्राऽऽलस्यं विषादिता।

स्वच्छता (पवित्रता), आस्तिकपणा, खऱ्या धर्माची प्रीति व बुद्धि, हे सात्त्विक गुण होत. फार बडबडणें, अभिमान, राग, ढोंग

---

* याच्या भाषांतरांत इंद्रियें जीवात्म्यापासून उत्पन्न होतात असें लिहिलें आहे व वरील श्लोकांत श्रवणादि इंद्रियें आकाशादि तत्त्वांपासून होतात असें आहे. ह्या दोहोंतील विरोधाचा परिहार असा कीं, इंद्रियांचे घटकावयव दोन आहेत. इंद्रियगोलक व त्यांतील ज्ञानशक्ति. यांपैकीं पहिल्या घटकावयवास कारण आकाशादि तत्त्वें व दुसऱ्याचें कारण चैतन्य किंवा जीवात्मा.

† स्त्रीपुरुषांच्या सात्म्यापासून आयुष्यादिक उत्पन्न होतात, असें जें म्हटलें आहे, याचा अर्थ इतकाच दिसतो कीं, देश, काल, हवा, पाणी, अन्न यांपैकीं कांहीं जरी वाईट असलीं तरी आईबापांना जर त्यांचें सात्म्य (संवय) आहे तर मुलांना तीं फारशीं बाधक होत नाहींत व तेणेंकरून आयुष्य, बल इत्यादि क्षीण होत नाहींत. चरकांत तर सात्म्यसेवन (आईबापांचें) हें एक गर्भोत्पत्तीचें कारणच धरलें आहे, कारण असात्म्यसेवित्व हें शुक्रशोणितांना विकृत करून वन्ध्यत्व आणितें.

(च. शा. अ. ३ पहा.)

व मत्सर हे राजस, आणि भीति, मूर्खपणा, झोंप, आळस व खेद हे तामस गुण होत.

**इति भूतमयो देहः**

याप्रकारें हा देह पांचभौतिक आहे.

**तत्र सप्त त्वचोऽसृजः ॥ ८ ॥**
**पच्यमानात्प्रजायन्ते क्षीरात्सन्तानिका इव ।**

त्यांत रक्ताचा पाक होऊन त्यापासून जसें दूध तापलें असतां त्यांवर साईचे थर येतात तशा सात त्वचा उत्पन्न होतात.

**धात्वाशयान्तरक्लेदो विपक्वः स्वंस्वमूष्मणा ॥ ९ ॥**
**श्लेष्मस्नाय्वपराच्छन्नः कलाख्यः काष्ठसारवत् ।**
**ताः सप्त**

धातूंच्या आशयांतील क्लेदाचा त्यांच्या त्यांच्या उष्णतेनें पाक होऊन कफ, स्नायु व वार यांनीं आच्छादित अशा, लांकडांत जसा नार त्याप्रमाणें, सात कला उत्पन्न होतात*

**सप्त चाधारा रक्तस्याद्यः क्रमात्परे ॥ १० ॥**
**कफामपित्तपक्वानां वायोर्मूत्रस्य च स्मृताः ।**
**गर्भाशयोऽष्टमः स्त्रीणां पित्तपक्वाशयान्तरे ॥ ११ ॥**
**कोष्ठाङ्गानि स्थितान्येषु हृदयं क्लोमफुप्फुसम् ।**
**यकृत्प्लीहोन्दुकं वृक्कौ नाभिडिम्बान्त्रबस्तयः ॥ १२ ॥**

तसेंच रक्ताशय, कफाशय, आमाशय, पित्ताशय, पक्वाशय वाय्वाशय व मूत्राशय असे सात आधार (आशय) क्रमानें उत्पन्न होतात. आणि स्त्रियांस पित्ताशयानंतर व पक्वाशयापूर्वी गर्भाशय म्हणून आठवा आशय उत्पन्न होतो. हृदय, क्लोम, फुप्फुस, यकृत्, प्लीहा, उंदुक, वृक्क (दोन), नाभी, डिंब, अंत्र व बस्ति, हे जे कोष्ठाचे भाग तेहि त्यांनाच लागून आहेत. †

**दश जीवितधामानि शिरोरसनबन्धनम् ।**
**कण्ठोऽस्रं हृदयं नाभिर्बस्तिः शुक्रौजसी गुदम् ॥१३॥**

शिरोबंधन, जिव्हाबंधन, गळा, रक्त, हृदय, नाभि, बस्ति, शुक्र, ओज व गुद, हीं दहा जीवाचीं स्थानें होत.

**जालानि कण्डराश्चान्ये पृथक् षोडश निर्दिशेत् ।**

---

* ह्या ज्या सात कला सांगितल्या आहेत त्या सप्त धातूंपैकीं मांसादि षट्ट पदार्थांमध्यें मात्र उपलब्ध आहेत व इंग्रजींत त्यांना Connective tissue असें म्हणतात (धात्वाशयान्तरमर्यादा इति सुश्रुतः). रसरक्तादि द्रव पदार्थांना धारण करणाऱ्या वाहिन्या निरनिराळ्याच असल्यामुळें त्यांना त्यांजवांचून कलासंज्ञक अन्य आधार कल्पिण्याची जरूर नाहीं व तसे अन्य आधार नाहींतहि. शुक्र धारण करणारी एक कला सर्व शरीर व्यापून राहिली आहे असें सुश्रुतांत व वृद्ध वाग्भटांत सांगितलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, ही सप्तकलांची कल्पना केवळ तर्क आहे. मांसादि घनपदार्थांच्यासंबंधानें (मल खेरीजकरून) मात्र ती खरी आहे.

† आपल्या वैद्यकांतील शारीर फारच स्वल्प व तेंहि घोंटाळ्याचें आहे; सबब ज्यांना शारीराची माहिती पाहिजे असेल त्यांनीं इंग्रजी शारीराचें अवलोकन करावें, म्हणजे शरीरांतील भागांचें यथार्थ ज्ञान होईल. जरी सुश्रुतांत शरीरज्ञानार्थ मढें कापून पाहावें असें सांगितलें आहे, तरी ती क्रिया करण्याची रीति सांगितली आहे, त्यावरून व तिच्या साधनांवरून पाहतां असें दिसतें कीं, शारीरिक माहिती आपल्या वैद्यकांत ज्या तऱ्हेची आढळते त्याहून जास्त व निर्दोष ज्ञान तितक्या अवलोकनानें मिळणें कठीण. व जरी सुश्रुतामध्यें, ढोबळ रीतीनेंच कां होईना, मढें फाडून पाहावें असें सांगितलें आहे, तरी शरीराची माहिती देण्यामध्यें पूर्वाचार्यांनीं अशा प्रत्यक्ष साधनांचा करावा तसा उपयोग केला नाहीं असें दिसतें. असें नसतें तर शुक्र शुक्रधर कलेचा आश्रय करून सर्व शरीर व्यापून राहतें; मज्जा, अंड व स्तन हीं त्यांचीं विशेष स्थानें आहेत; मेंदु हा केवळ इतर हाडांतील मज्जेप्रमाणें कवटींतील मज्जा किंवा मेद होय, व त्याचें मान अर्धी ओंजळ; गर्भाशय, पित्ताशय व पक्वाशय यांच्यामध्यें आहे; फुप्फुस एकच आहे व तें रक्ताच्या फेंसापासून उत्पन्न होतें; आमाशयापासून बस्तीपर्यंत जाणाऱ्या कांहीं वाहिन्या आहेत व त्यापासून मूत्र उत्पन्न होतें. नाभीपासून २४ धमन्या निघतात; नाभि हें विशेषेंकरून प्राणाचें अधिष्ठान आहे व तेथेंच अंतराग्नि राहतो. यकृत् व प्लीहा हीं रक्तवाहक स्रोतसांचीं मुळें; मूत्रपिंड (वृक्क) मेदवाहक स्रोतसांचें मूळ; इत्यादि चुका आपल्या वैद्यकांत आढळल्या नसत्या. शरीर फाडून पाहण्याची चाल अगदीं प्राचीन काळीं (म्हणजे बौद्ध धर्माच्या प्रवृत्तीपूर्वी) थोडीबहुत तरी असेल, परंतु वाग्भटाच्या वेळीं प्रत्यक्ष ज्ञानाचा बहुधा लोपच झाला होता असें वाटतें. ह्या सर्व उपन्यासाचा प्रस्तुत टिपेशीं संबंध इतकाच आहे कीं, ह्या (१० पासून १२ पर्यंत) श्लोकांत रक्ताशय, कफाशय वगैरे जें ७ आशय सांगितले आहेत त्यांचा पुढें लगेच हृदय, फुप्फुस, अंत्र, बस्ति इत्यादि जीं कोष्ठांगें सांगितलीं आहेत त्यांतच वास्तविक अंतर्भाव होत असून त्यांचें निराळेंच कथन केलें आहे. वास्तविकरीत्या पाहिलें असतां हृदयालाच रक्ताशय म्हणतात, बस्तीलाच मूत्राशय म्हणतात, अंत्र (आंतडें) हेंच पक्वाशय व वाय्वाशय इ० प्रकार सांगितला पाहिजे होता. त्याच त्याच अवयवाला भिन्न भिन्न नांवानें निरनिराळ्या सदरांत ऐक्य न दाखवितां इकडून देऊन शारीरिक पदार्थांची संख्या उगीच (अजाणतेपणानें कां होईना) फुगवून दाखवून सर्वच घोंटाळा केला आहे. कला सात, आशय सात, अंतःस्रोतसें १३, हृदयादि कोष्ठांगें बारा इत्यादि ज्या अनेक गणना दाखविल्या आहेत त्यांत तेच तेच अवयव निरनिराळ्या नांवांनीं पुनःपुनः उभे राहतात. अशा तऱ्हेच्या अशास्त्रीय विभागांवरून ग्रंथकर्त्यांना शारीराचें प्रत्यक्ष ज्ञान नसून त्यांनीं अनुमानधक्क्यावर कांहीं तरी लिहून ठेविलें आहे असें म्हणणें भाग पडतें. बिचारें आंतडें कलांच्या गणनेंत आहे. आशयांच्या गणनेंतहि आहे व पुनः पुढें १३६-१३७ व्या पानांत तेरा अंतःस्रोतसांमध्यें तें शकृद्वह स्रोतस या नांवाच्या पांघरुणाखालीं झांकलेलें आहेच व शिवाय अंत्र या नांवानें कोष्ठांगामध्येंहि सांगितलेंच आहे. प्रस्तुत टीपेचा विषय जो १२ वा श्लोक त्यांत क्लोम म्हणून जो अवयव सांगितला आहे तें ज्याला इंग्रजींत Pancreas पँक्रिआस म्हणतात त्याचेंच संस्कृत नांव असावें असें कित्येक म्हणतात. परंतु ती चूक आहे असें पुढील विवेचनावरून लक्षांत येईल. उंदुक म्हणजे मलाशय (किंवा आंतड्याचा शेवटला भाग जो Rectum). डिंब हेंहि त्याचेंच नांव असावें असें अरुणदत्ताच्या टीकेंतील श्लोकावरून दिसतें. वृद्ध वाग्भटांत किंवा सुश्रुतांत त्याचें निराळें कथन केलें नसून व त्याचा अर्थ उंदुकाशीं समान असून येथें त्याचें जें पृथक्त्वेंकरून कथन केलें आहे तें ग्रंथकर्त्याच्या नजरचुकीनें असावें असें दिसतें. गर्भाशय पित्ताशयानंतर व पक्वाशयापूर्वी उत्पन्न होतो असा जो आम्हीं अर्थ केला आहे तो वृद्ध वाग्भटास किंवा अरुणदत्तास अनुसरून नाहीं. त्यास अनुसरून केल्यास 'पित्तपक्वाशयांतरें' या पदाचा अर्थ 'गर्भाशय' पित्ताशय

[ पान १३५ पहा ]

सोळा जालें व सोळा कंडरा आहेत, त्यांसहि कित्येक जीवाचीं स्थानें असें म्हणतात.

**षट् कूर्चाः**

सहा कूर्चा आहेत. ( हाताच्या २, पायाच्या २, गळ्याची १ व शिश्नाची १. )

सप्त सेवन्यो मेढ्रजिह्वाशिरोगताः ॥ १४ ॥

शस्त्रेणैताः परिहरेत्

शिश्न ( १ ), जीभ ( १ ) व मस्तक ( ५ ) यांत गेलेल्या सात शिवणी आहेत, त्यांस शस्त्र लागूं देऊं नये.

**चतस्रो मांसरज्जवः।**

---

[ पृष्ठ १३३ वरून पुढें चालू ]

व पक्वाशय यांच्या मध्यें असतो ' असा अर्थ होतो. परंतु हा गर्भाशयाचा स्थाननिर्देश चुकीचा असल्यामुळें ऋषींच्या पदरी चूक गेऊं नये म्हणून आम्हीं भाषांतरांत नमूद केल्याप्रमाणें अर्थ दिला आहे. परंतु ग्रंथकर्त्यांची विवक्षा तशी नाहीं असें संग्रहावरून स्पष्ट होतें. सबब आम्हांस तो अर्थ परत घेऊन स्थाननिर्देशपरच अर्थ करणें (वर दाखविल्या-प्रमाणें ) भाग आहे. क्लोम हा अवयव त्याच्या स्थानावरून पाहतां उजवें फुप्फुस असावें असें दिसेल. कित्येक पाश्चिमात्य पंडितांच्या कोशांतही त्याला उजवें फुप्फुस असेंच म्हटलें आहे. परंतु येथें अशी एक शंका येते कीं, डाव्या व उजव्या फुप्फुसाला वेगळालीं नांवें असण्याचें प्रयोजन काय? जरी दोहोंच्या मापामध्यें किंचित् फरक आहे तरी तेवढ्यावरून एकाला फुप्फुस व दुसऱ्याला क्लोम अशा अगदीं विसदृश संज्ञा असण्याचें कारण दिसत नाहीं व पृथ्वीवरील कोणत्याहि भाषेंत असा प्रकार आढळत नाहीं. डाव्याहून उजवें फुप्फुस मोठें असल्यामुळें पहिल्यांत दोन व दुसऱ्यांत तीन गड्डे आढळतात. परंतु हा बारकाईनें पाहिल्यावर आढळणारा भेदलेश असून त्यावरून भिन्न संज्ञा प्राप्त होण्यास कारण नाहीं. यासंबंधानें आम्हीं बराच शोध करून पुढील अनुमान काढलें आहे. आमचें असें मत आहे कीं, क्लोम हें फुप्फुसाचें प्राचीन नांव आहे व या अवयवाला त्या कालीं हें एकच नांव होतें, पुढें त्यालाच फुप्फुस असा एक पर्याय शब्द कांहीं ग्रंथकारांनीं लाविला असावा. सुश्रुताच्या पूर्वीं जे शारीरसंबंधीं ग्रंथ होते त्यांपैकीं एखाद्या ग्रंथांत या क्लोमसंज्ञक अवयवाला फुप्फुस अशी एकच संज्ञा दिलेली असावी व पुढें सुश्रुत, वाग्भट इत्यादि निबंधकारांनीं दोहोंचें ऐक्य लक्षांत न आणितां ' क्लोम किंवा फुप्फुस ' असें जेथें सांगितलें पाहिजे होतें तेथें ' क्लोम किंवा फुप्फुस ' असें भेदवाचक विधान केलें. हें सुश्रुताच्या वेळीं झालें असेल असें वाटत नाहीं, कारण त्याच्या वेळीं लोकांत अजून क्रिया बरीच राहिली होती. सुश्रुत ग्रंथाच्या एखाद्या अलीकडच्या चालनेमध्यें ही गडबड झाली असावी असें वाटतें व वाग्भटानें तो घोटाळा कायम ठेविला. या आमच्या अनुमानास प्रमाणें आहेत. तीं अशीं—एक तर असें कीं, उपलब्ध ग्रंथांपैकीं अगदीं पुरातन जो चरक त्यांत शारीरस्थानाच्या ७ व्या अध्यायांत १५ कोष्ठांगें सांगितलीं आहेत. त्यांत नाभि, हृदय, क्लोम, यकृत इत्यादि १५ अवयव असून फुप्फुस मुळींच सांगितलें नाहीं. एकंदर चरकांत फुप्फुस हा शब्द मुळींच उपलब्ध नाहीं म्हटलें तरी चालेल. चरकाचे वेळीं फुप्फुसासारखें अतिमहत्त्वाचें कोष्ठांग माहीत नव्हतें असें मानण्यापेक्षां त्याच्या वेळीं ह्या भागाला क्लोम हीच संज्ञा होती हें मानणें जास्त सयुक्तिक दिसतें. दुसरें असें कीं, ऐतरेय ब्राह्मणांत यज्ञांतील पशूचे विभाग कोणी कसे घ्यावे हें सांगतांना एकंदर ३६ विभाग सांगितले आहेत; त्यांत कोष्ठांगांपैकीं फक्त क्लोम मात्र सांगितलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, क्लोम हा अवयव आंतडीं खेरीजकरून इतर कोष्ठगत भागांपैकीं सर्वांत मोठा असला पाहिजे व तसा फुप्फुसच होय. तसेंच फुप्फुस हा शब्द सुश्रुताच्या पूर्वींच्या कोणत्याहि वैदिक किंवा इतर ग्रंथांत आढळत नसून क्लोम शब्द मात्र अनेक वैदिकादि ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं आढळतो. जसें, अथर्व वेद २-३३-३, ९-८-१२, १०-९-१५; वाजसनेयिसंहिता १९-८५ ०; शतपथब्राह्मण १२-९-१,३,१५, इ०; कात्यायन श्रौतसूत्र ६-७-११; गोभिलसूत्र ४-१-२ व बृहदारण्यक उपनिषद् १-१-१ इ०. यांपैकीं शेवटच्या ठिकाणीं म्हणजे बृहदारण्यकांत आरंभींच ' ॐ उषा वा अश्वस्य मेध्यस्य शिरः ' इ० आरंभ करून यकृच्च क्लोमानश्च पर्वताः इ० वर्णनामध्यें विश्व हेंच कोणी एक यज्ञासंबंधीं अश्व आहे असें रूपक केलें आहे. त्यांत त्या अश्वाचे पर्वत हेच यकृत् व क्लोम असें सांगितलें आहे. या वर्णनांतील पर्वताच्या सादृश्यावरूनहि ( त्याच्या फुगीरपणामुळें व मोठेपणामुळें पर्वताशीं तुलना ) क्लोम म्हणजे फुप्फुस असावें असें वाटतें. वैद्यकग्रंथांपैकीं चरकांत फुप्फुस हें नांव देखील आढळत नाहीं असें पूर्वीं सांगितलेंच आहे, पण क्लोम शब्द सर्व ग्रंथांत अनेक ठिकाणीं आला आहे. अमरांतहि फुप्फुस शब्दाचा उल्लेख नसून क्लोम शब्द आला आहे. वाग्भटांत किंवा सुश्रुतांत फुप्फुस शब्द काय तो ह्या एकाच ( शारीरांतील ) प्रकरणांत आला असून क्लोम शब्द निदानादि स्थानांत दोन तीन ठिकाणीं आला आहे. विद्रधि-प्रकरणांत क्लोमगत विद्रधीचें वर्णन आलें आहे. तसेंच सुश्रुतांत संधींचे जे निरनिराळे ८ प्रकार सांगितले आहेत, त्यांत मंडलाकर संधींमध्यें हृदय व क्लोम यांना ज्या मोठाल्या वाहिन्या जोडल्या आहेत, त्यांचा अंतर्भाव केला आहे. येथेंहि फुप्फुस निराळें सांगितलें नाहीं; क्लोम म्हणजे फक्त उजवें फुप्फुसच जर असतें तर येथें फुप्फुस शब्दाचीहि आवश्यकता होती. ह्या सर्व विवेचनावरून क्लोम हें फुप्फुसाचेंच प्राचीन नांव आहे, हें उघड आहे. ह्या आमच्या म्हणण्यास शब्दशास्त्रांतीलहि एक प्रत्यंतर आहे; तें असें कीं, ग्रीक भाषेंतील Pneumon व लॅटिन भाषेंतील Pulmon असा जो फुप्फुस-वाचक शब्द आहे, तो क्लोमन शब्दाचेंच रूपांतर आहे. ह्या तिन्ही भाषांचें मूल एक असल्यामुळें शारीरांतील अवयवांचे वाचक असे बरेच शब्द जवळ जवळ आहेत, हें शब्दशास्त्रवेत्त्यांना माहीत आहेच. ( उ. कपाल सं., Kephale Gr., Caput L., आस्य सं., os L.; नासा सं., Nosus L.; अस्थि सं., osteon Gr., os L.; जानु सं., Gonu Gr., Genu L.; यकृत् सं., Hapar Gr., Gecur L.; प्लीहन् सं., splen Gr. ). फुप्फुसें दोन असून आपल्या वैद्यकांत फुप्फुस किंवा क्लोम हा शब्द एकवचनींच आढळतो, याचें कारण असें कीं, फुप्फुसें श्वासनलिकेनें एकमेकांशीं बद्ध असल्यामुळें त्यांचें द्वित्व प्राचीनांच्या लक्षांत स्पष्टपणें आलें नसावें. बृहदारण्यकांत मात्र क्लोम शब्द बहुवचनीं आढळतो, तरी पण भाष्यकारांनीं हें बहुवचन एकार्थवाचक धरलें आहे. (शांकरभाष्य पाहा.)

ह्या शब्दावर इतका ऊहापोह करण्याचें प्रयोजन इतकेंच कीं, प्राचीन ग्रंथांतील शब्दाचा किंवा वाक्याचा अर्थ केवळ त्या त्या ठिकाणच्या वाक्यरचनेवर करून उपयोग नाहीं; तर पूर्वापरसंबंध व अन्य ग्रंथांतील आधार यांच्या साहाय्यानें अर्थसिद्धि करावी लागते, या तत्त्वाचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ग्रंथ फार प्राचीन असल्यामुळें अनेक ठिकाणीं क्षेपकें किंवा वाक्यरचनेमध्यें एखादुसरा शब्द कमी जास्त पडण्याचा संभव आहे. इतकेंच नव्हे तर प्रायः बहुतेक ग्रंथांच्या मागाहून चालना झाल्यामुळें त्यांचें मूलस्वरूप बरेंच बदललें असण्याचा संभव आहे. प्रस्तुत प्रसंगीं क्लोम याच्या स्थाननिर्देशावरून उजवें फुप्फुस असा अर्थ करतांना हीहि गोष्ट

[ पृष्ठ १३५ पाहा. ]

तशाच चार मांसाच्या दोऱ्या ( रज्जु ) आहेत.

**चतुर्दशास्थिसङ्घाताः**

हाडांचे संघात ( अस्थिसंधि ) १४ आहेत.*

**सीमन्ता द्विगुणा नव ॥ १५ ॥**

सीमंत ( भाग ) अठरा आहेत.

**अस्थ्नां शतानि षष्टिश्च त्रीणि दन्तनखैः सह।**
**धन्वन्तरिस्तु त्रीण्याह**

दांत व नखें यांसुद्धां एकंदर तीनशें साठ हाडें आहेत. धन्वंतरी तीनशें आहेत असें म्हणतो.

**सन्धीनां च शतद्वयम् ॥ १६ ॥**
**दशोत्तरं सहस्रे द्वे निजगादात्रिनन्दनः।**

धन्वंतरीचें म्हणणें दोनशें दहा संधि आहेत असें आहे, परंतु आत्रेयांनीं दोन हजार सांधे आहेत असें सांगितलें आहे.

**स्नाव्नां नवशती पञ्च पुंसां पेशीशतानि च ॥ १७ ॥**
**अधिका विंशतिः स्त्रीणां योनिस्तनसमाश्रिताः।**

स्नायु एकंदर नऊशें आहेत व पेशी पांचशें पुरुषांच्या शरीरांत आहेत व स्त्रियांच्या शरीरांत ज्या २० जास्त आहेत त्या योनि व स्तन यांमध्यें आहेत.

**दश मूलशिरा हृत्स्थास्ताः सर्वं सर्वतो वपुः ॥ १८ ॥**
**रसात्मकं वहन्त्योजस्तन्निबद्धं हि चेष्टितम्।**

हृदयांत मुख्य दहा शिरा आहेत. त्या रसात्मक ओज सर्व शरीरांत नेतात; व म्हणूनच मनुष्याच्या चलनवलनादि क्रिया त्यांच्या स्वाधीन असतात.

**स्थूलमूलाः सुसूक्ष्माग्राः पत्ररेखाप्रतानवत् ॥ १९ ॥**
**भिद्यन्ते तास्ततः सप्तशतान्यासां भवन्ति तु।**

त्यांचीं मुळें जाड असून त्या पुढें बारीक होत गेल्या असतात, व पानांवरील शिरांच्या जाळ्याप्रमाणें त्यांचे पुढें सातशें विभाग होतात.

**तत्रैकैकं च शाखायां शतं तस्मिन्न वेधयेत् ॥ २० ॥**
**शिरां जालन्धरां नाम तिस्रश्चाभ्यन्तराश्रिताः।**

त्यांपैकीं प्रत्येक शाखेंत ( २ हात व २ पाय ) शंभर शिरा असतात. त्यांपैकीं जालंधरा नांवाची शीर व दुसऱ्या खोल असणाऱ्या तीन शिरा अशा चार शिरा ( प्रत्येक शाखेंत ) तोडूं नयेत.

**षोडशद्विगुणाः श्रोण्यां तासां द्वे द्वे तु वङ्क्षणे ॥ २१ ॥**
**द्वे द्वे कटीकतरुणे शस्त्रेणाष्टौ स्पृशेन्न ताः।**

श्रोणींत ( कमरेंत ) ३२ शिरा आहेत, त्यांपैकीं अंडसंधींतील चार व कुल्ल्यांतील चार अशा आठ शिरांस शस्त्र लावूं नये.

**पार्श्वयोः षोडशैकैकामूर्ध्वगां वर्जयेत्सिराम् ॥ २२ ॥**

दोन्ही कुशींत सोळा शिरा आहेत, त्यांपैकीं प्रत्येक बाजूची वर जाणारी एकेक शीर तोडूं नये.

**द्वादशद्विगुणाः पृष्ठे पृष्ठवंशस्य पार्श्वयोः।**
**द्वे द्वे तत्रोर्ध्वगामिन्यौ न शस्त्रेण परामृशेत् ॥ २३ ॥**

पाठींत २४ शिरा आहेत, त्यांपैकीं कण्याच्या प्रत्येक बाजूच्या वर जाणाऱ्या दोन दोन शिरांस शस्त्र लावूं नये.

**पृष्ठवज्जठरे तासां मेहनस्योपरि स्थिते।**
**रोमराजीमुभयतो द्वे द्वे शस्त्रेण न स्पृशेत् ॥ २४ ॥**

पाठीप्रमाणेंच पोटांतहि २४ शिरा आहेत, त्यांत शिस्नाच्यावर व रोमराजीच्या दोहों बाजूंस असणाऱ्या दोन दोन शिरांस शस्त्र लावूं नये.

**चत्वारिंशदुरस्यासां चतुर्दश न वेधयेत्।**
**स्तनरोहिततन्मूलहृदये तु पृथग्द्वयम् ॥ २५ ॥**
**अपस्तम्भाख्ययोरेकां तथाऽपालापयोरपि।**

उरांत ४० शिरा आहेत. पैकीं प्रत्येक स्तनाच्या तांबड्या भागावरील दोन दोन व मुळाजवळील दोन दोन मिळून आठ व हृदयाच्या दोहों भागांवरील दोन दोन मिळून चार, दोन अपस्तंभ नांवाच्या शिरांपैकीं एक व दोन अपालापांमधील एक मिळून एकंदर १४ शिरांचा वेध करूं नये.

**ग्रीवायां पृष्ठवत्तासां नीले मन्ये कृकाटिके ॥ २६ ॥**
**विधुरे मातृकाश्चाष्टौ षोडशेति परित्यजेत्।**

मानेंत २४ शिरा आहेत, पैकीं नीला नांवाच्या दोन, मन्या नांवाच्या दोन, नरड्याच्या दोन, विधुरा दोन व मातृका आठ अशा सोळा शिरा तोडूं नयेत.

**हन्वोः षोडश तासां द्वे सन्धिबन्धनकर्मणी ॥ २७ ॥**

दोन्ही हनुवटी मिळून १६ शिरांपैकीं दोन्ही सांध्यांचीं बंधनें करणाऱ्या दोन शिरा तोडूं नयेत.

**जिह्वायां हनुवत्तासामधो द्वे रसबोधने।**

---

[ पृष्ठ १३४ वरून समाप्त ]

लक्षांत आणलो पाहिजे कीं, स्थाननिर्देशावरच अवलंबून राहणें आपल्या वैद्यकांत अगदीं धोक्याचें काम आहे. कारण हा त्यांचा स्थाननिर्देश फार ढोबळ रीतीचा आहे ( उ० गर्भाशयाचा स्थाननिर्देश ) कांहीं ठिकाणीं तर तो अलीकडच्या क्रियाहीन शाब्दिकज्ञानाच्या लोकांनीं घातलेला दिसतो. क्लोमाचें स्थान कांहीं ग्रंथांत 'हृदयाचे उजव्या बाजूस' असें न सांगतां फक्त 'हृदयाचे बाजूस' किंवा 'शेजारीं' असें सांगितलें आहे व तेंच जास्त समंजस आहे ( शब्दकल्पद्रुम कोश पाहा ).

* संस्कृत वैद्यकांत सांधे दोन प्रकारचे धरले आहेत. मनगटें, कोंपरें, खांदे, घोटे ( गुल्फ ), गुडघे व खुबे ( वंक्षण ) हे दोन दोन व कमर ( त्रिकसंधि ) व डोकें मिळून जे १४ सांधे त्यांना अस्थिसंघात ( किंवा केव्हां केव्हां अस्थिसंधि ) म्हणतात. याच अध्यायांत जे २१० ( आत्रेयमतें २००० ) सांधे १६ व्या व पुढील श्लोकांत सांगितले आहेत त्यांना शरीरसंधि ( व वृद्ध वाग्भटांत अस्थिसंधि ) अशी संज्ञा आहे. यांत लहान लहान अस्थिसंधि, तरुणास्थींचे, दांतांचें हृदयफुप्फुसादिकांच्या पाहिन्यांचे संधि इत्यादिकांचा अंतर्भाव होतो.

**द्वे च वाचः प्रवर्तिन्यौ**

जिभेंत १६ शिरा आहेत, त्यांपैकीं ज्यांच्या योगानें रसज्ञान होतें अशा दोन, व ज्यांच्या योगानें बोलतां येतें त्या दोन, मिळून चार शिरांचा वेध करूं नये.

**नासायां चतुरुत्तरा ॥ २८ ॥**
**विंशतिर्गन्धवेदिन्यौ तासामेकां च तालुगाम् ।**

नाकांत २४ शिरा आहेत, त्यांपैकीं ज्यापासून गंधज्ञान होतें अशा दोन, व टाळूला जाणारी एक मिळून तीन शिरा तोडूं नयेत.

**षट्पञ्चाशत्नयनयोर्निमेषोन्मेषकर्मणी ॥ २९ ॥**
**द्वे द्वे अपाङ्गयोर्द्वे च तासां षडिति वर्जयेत् ।**

दोन्ही डोळ्यांच्या मिळून ५६ शिरा आहेत, त्यांत डोळा मिटण्याचें काम करणाऱ्या दोन, ( प्रत्येक डोळ्यांत एक प्रमाणें ) व उघडण्याचें काम करणाऱ्या दोन व डोळ्यांच्या बाहेरच्या कोंपऱ्याजवळच्या दोन, मिळून सहा शिरांचा वेध करूं नये.

**नासानेत्राश्रिताः षष्टिर्ललाटे स्थपनीश्रिताम् ॥ ३० ॥**
**तत्रैकां द्वौ तथावर्तौ चतस्रश्च कचान्तगाः**
**सप्तैवं वर्जयेत्तासां**

नाक व डोळे यांजवळून कपाळावर जाणाऱ्या ६० शिरा आहेत, त्यांपैकीं स्थपनीवरील एक, आवर्तांच्या दोन व केंसांच्या जवळच्या भागाच्या चार मिळून सात शिरांचा वेध करूं नये.

**कर्णयोः षोडशात्र तु ॥ ३१ ॥**
**द्वे शब्दबोधने शङ्खौ सिरास्ता एव चाश्रिताः ।**
**द्वे शङ्खसन्धिगे तासां**

दोन्ही कानांच्या १६ शिरा. त्यांपैकीं ज्यांपासून शब्दज्ञान होतें त्या दोन शिरा तोडूं नयेत. त्याच सोळा शिरा पुढें शंखावर पसरलेल्या आहेत, त्यांपैकीं शंखाच्या संधीच्या दोन शिरा तोडूं नयेत

**मूर्ध्नि द्वादश तत्र तु ॥ ३२ ॥**
**एकैकां पृथगुत्क्षेपसीमन्ताधिपतिस्थिताम् ।**

डोक्यांत १२ शिरा आहेत, त्यांपैकीं दोन्ही उत्क्षेपांवरील दोन, पांच सीमंतांवरील पांच व अधिपतीवरची एक मिळून आठ शिरा तोडूं नये.

**इत्यवेध्यविभागार्थं प्रत्यङ्गं वर्णिताः सिराः ॥ ३३ ॥**

याप्रकारें कोणकोणत्या शिरा तोडूं नये हें समजण्याकरितां प्रत्येक अवयवाच्या शिरांचें वर्णन केलें.

**अवेध्यास्तत्र कात्स्न्येन देहेऽष्टानवतिस्तथा ।**
**सङ्कीर्णा ग्रथिताः क्षुद्रा वक्राः सन्धिषु चाश्रिताः ३४**

सर्व शरीरांत एकंदर ९८ शिरा अवेध्य आहेत म्हणून वर सांगितलें, तरी त्याशिवाय गांठाळलेल्या, बारीक, वांकड्या, सांध्यावरल्या व एकत्र जमलेल्या (ज्या ठिकाणीं अनेक शिरा एकमेकांत गुंतल्या आहेत अशा ठिकाणीं असणाऱ्या ) शिरा तोडूं नये.

**तासां शतानां सप्तानां पादोऽस्रं वहते पृथक् ।**
**वातपित्तकफैर्जुष्टं शुद्धं चैवं स्थिता मलाः ॥ ३५ ॥**
**शरीरमनुगृह्णन्ति पीडयन्त्यन्यथा पुनः ।**

सर्व शरीरांतील एकंदर ७०० शिरांपैकीं १७५ शिरांतून वातयुक्त रक्त वाहतें, १७५ शिरांतून पित्तयुक्त, १७५ शिरांतून कफयुक्त व १७५ शिरांतून शुद्ध रक्त वाहतें. अशा व्यवस्थेनें दोष राहिले असतां ते शरीरास पोसतात व असें नसलें म्हणजे शरीरास इजा करितात.

**तत्र श्यावारुणाः सूक्ष्माः पूर्णारिक्ताः क्षणात्सिराः ३६**
**प्रस्यन्दिन्यश्च वातास्रं वहन्ते**

त्यांत काळसर, तांबूस, बारीक, घटकेंत भरलेल्या व घटकेंत रित्या व विशेष स्रवणाऱ्या अशा शिरा वातयुक्त रक्त नेतात.

**पित्तशोणितम् ।**
**स्पर्शोष्णाः शीघ्रवाहिन्यो नीलपीताः**

ज्या निळ्या किंवा पिंवळ्या असून स्पर्श केला असतां उष्ण लागतात, व ज्यांतून रक्त फार जलद वाहतें त्या पित्तयुक्त रक्त नेतात.

**कफं पुनः ॥ ३७ ॥**
**गौर्यः स्निग्धाः स्थिराः शीताः**

पांढऱ्या, चिकट, स्थिर व गार (स्पर्शानें) अशा शिरांतून कफयुक्त रक्त वाहतें.

**संसृष्टं लिङ्गसङ्करे**

ज्या शिरांत वरील लक्षणांचा संकर असतो, त्या शिरा वातपित्तात्मक, पित्तकफात्मक, वातकफात्मक व त्रिदोषात्मक रक्त नेतात ( त्या त्या लक्षणसंकरानुरूप ).

**गूढाः समस्थिताः स्निग्धा रोहिण्यः शुद्धशोणितम् ।**

तसेंच ज्या शिरांतून शुद्ध रक्त वाहतें त्या खोल, सरळ, स्निग्ध व उडणाऱ्या अशा असतात.

**धमन्यो नाभिसम्बद्धा विंशतिश्चतुरुत्तराः ।**
**ताभिः परिवृतो नाभिश्चक्रनाभिरिवारकैः ॥ ३९ ॥**
**ताभिश्चोर्ध्वमधस्तिर्यग्देहोऽयमनुगृह्यते ।**

नाभीजवळ असणाऱ्या २४ धमन्या आहेत. चाकाच्या तुंब्यासभोंवतीं अरे असतात त्याप्रमाणें त्या ( धमन्या ) नाभीसभोंवतीं पसरल्या आहेत. त्या शरीरांत चोहोंकडे पसरून त्याचें पोषण करितात.

**स्रोतांसि नासिके कर्णौ नेत्रे पाय्वास्यमेहनम् । ४० ।**
**स्तनौ रक्तपथश्चेति नारीणामधिकं त्रयम् ।**

दोन नाकपुड्या, दोन कान, दोन डोळे, तोंड, गुद व मूत्रद्वार अशीं मनुष्याच्या शरीरांत नऊ स्रोतें आहेत. हीं पुरुषाप्रमाणें स्त्रियांसहि असून दोन स्तन व योनि अशीं तीन स्रोतें स्त्रियांस अधिक आहेत.

**जीवितायतनान्यन्तःस्रोतांस्याहुस्त्रयोदश ॥ ४१ ॥**
**प्राणधातुमलाम्भोऽन्नवाहीनि**

प्राणवह, रसवह, रक्तवह, मांसवह, मेदोवह, अस्थिवह, मज्जावह, शुक्रवह, शकृद्वह ( आंतडें ), मूत्रवह, स्वेदवह, उदकवह व अन्नवह, अशीं तेरा अंतःस्रोतें आहेत, व तीं जीवाचीं स्थानें आहेत असें म्हणतात.

अहितसेवनात्।
तानि दुष्टानि रोगाय विशुद्धानि सुखाय च ॥ ४२ ॥
अपथ्यसेवनानें तीं दुष्ट झालीं असतां रोग उत्पन्न होतात, व तीं शुद्ध असलीं म्हणजे मनुष्य निरोगी असतो.

स्वधातुसमवर्णानि वृत्तस्थूलान्यणूनि च।
स्रोतांसि दीर्घाण्याकृत्य प्रतानसदृशानि च ॥ ४३ ॥
त्यांचे रंग त्या त्या धातूंप्रमाणें असून तीं वाटोळीं, जाड, बारीक व लांब असतात, व त्यांची आकृति पानावरील शिरांच्या जाळ्याप्रमाणें असते.

आहारश्च विहारश्च यः स्याद्दोषगुणैः समः।
धातुभिर्विगुणो यश्च स्रोतसां स प्रदूषकः ॥ ४४ ॥
दोषांचे जे गुण आहेत त्यांशीं सारखा ( समान ) व धातूंच्या गुणांशीं विपरीत अशा प्रकारच्या आहारविहारांपासून स्रोतें दुष्ट होतात.

अतिप्रवृत्तिः सङ्गो वा शिराणां ग्रन्थयोऽपि वा।
विमार्गतो वा गमनं स्रोतसां दुष्टिलक्षणम् ॥ ४५ ॥
स्रोतें दुष्ट झालीं असतां त्यांच्या त्या त्या पदार्थांची अतिप्रवृत्ति किंवा अवरोध अथवा भलत्याच मार्गानें गमन होतें किंवा शिरा गांठाळतात.

बिसानामिव सूक्ष्माणि दूरं प्रविसृतानि च।
द्वाराणि स्रोतसां देहे रसो यैरुपचीयते ॥ ४६ ॥
बिसाच्या केशाकार सूक्ष्म तंतूंप्रमाणें स्रोतांचीं दूरपर्यंत पसरणारीं द्वारें सर्व देहभर रस पोंचवितात.

व्यधे तु स्रोतसां मोहकम्पाध्मानवमिज्वराः।
प्रलापशूलविण्मूत्ररोधो मरणमेव वा ॥ ४७ ॥
स्रोतोऽविद्धमतो वैद्यः प्रत्याख्याय प्रसाधयेत्।
उद्धृत्य शल्यं यत्नेन सद्यः क्षतविधानतः ॥ ४८ ॥
स्रोतांचा वेध झाला असतां मोह, कंप, आध्मान ( पोटफुगी ), ओकारी, ताप, बडबड, शूल व मळ आणि मूत्रांचा अवरोध हीं लक्षणें होतात अथवा मृत्यूहि येतो. यासाठीं अशा प्रसंगीं रोगी बरा होणें कठिण आहे असें सांगून वैद्यानें मोठ्या प्रयत्नानें शल्य काढून टाकून जखमेवर सांगितलेले उपाय फार त्वरित करावे.

अन्नस्य पक्ता पित्तं तु पाचकाख्यं पुरेरितम्।
दोषधातुमलादीनामूष्मेत्यात्रेयशासनम् ॥ ४९ ॥
पूर्वी जें पाचक नांवाचें पित्त सांगितलें तोच जठराग्नि ( असें धन्वंतरीचें मत आहे ), व आत्रेय मुनि वातादि दोष, रसादि धातु व मल यांच्या उष्म्यास जठराग्नि म्हणतात.



तदधिष्ठानमन्नस्य ग्रहणाद्ग्रहणी मता।
सैव धन्वन्तरिमते कला पित्तधराह्वया ॥ ५० ॥
आयुरारोग्यवीर्यौजोभूतधात्वग्निपुष्टये।
स्थिता पक्वाशयद्वारि भुक्तमार्गार्गलेव सा ॥ ५१ ॥
त्या अग्नीचें अधिष्ठानभूत ( राहण्याची जागा ) असून अन्नाचें ग्रहण करिते म्हणून जिला ग्रहणी असें म्हणतात, तीच धन्वंतरीच्या मतानें पित्तधरा नांवाची कला होय. आयुष्य, आरोग्य, वीर्य, ओज, पंचभूतांचे अग्नि व सप्त धातूंचे सात अग्नि, यांस वाढविण्यासाठीं पक्वाशयाच्या द्वाराजवळ अन्नमार्गाच्या अडसराप्रमाणें ती ( ग्रहणी ) राहिलेली आहे.

भुक्तमामाशये रुद्ध्वा सा विपाच्य नयत्यधः।
बलवत्यबला त्वन्नमाममेव विमुञ्चति ॥ ५२ ॥
ती बलवान् असली म्हणजे आमाशयांत अन्न थांबवून धरून त्याचें पचन करून खालीं सोडिते, व निर्बळ झाली असतां अपक्वच अन्न खालीं सोडिते.

ग्रहण्या बलमग्निर्हि स चापि ग्रहणीबलः।
दूषितेऽग्नावतो दुष्टा ग्रहणी रोगकारिणी ॥ ५३ ॥
ग्रहणीस अग्नीचें बळ व अग्नीसहि ग्रहणीचें बळ असतें, यामुळें अग्नि दुष्ट झाला असतां ग्रहणी दूषित होऊन रोग उत्पन्न करिते.

यदन्नं देहधात्वोजोबलवर्णादिपोषणम्।
तत्राग्निर्हेतुराहारान्न ह्यपक्वाद्रसादयः ॥ ५४ ॥
अन्न हें शरीर, धातु, ओज, बल, वर्ण इत्यादिकांचें जें पोषण करितें त्यास कारण अग्नि आहे; कारण अग्नीमुळें आहाराचा पाक होऊन रसादिक उत्पन्न होतात. अपक्व आहारापासून रसादिक उत्पन्न होत नाहींत.

अन्नं कालेऽभ्यवहृतं कोष्ठं प्राणानिलाहृतम्।
द्रवैर्विभिन्नसङ्घातं नीतं स्नेहेन मार्दवम् ॥ ५५ ॥
सन्धुक्षितः समानेन पचत्यामाशयस्थितम्।
औदर्योऽग्निर्यथा बाह्यः स्थालीस्थं तोयतण्डुलम् ॥५६॥
समान वायूनें प्रदीप्त झालेला जठराग्नि योग्य काळीं खाल्लेल्या, प्राणवायूनें कोष्ठांत नेलेल्या, द्रव पदार्थांनीं ज्यांतील घट्टपणा नाहींसा झाला अशा, व स्नेहानें मृदु झालेल्या आमाशयांतील अन्नास पचवितो; जसा बाहेरचा अग्नि भांड्यांतील पाणी घातलेल्या तांदुळांस शिजवितो तद्वत्.

आदौ षड्रसमप्यन्नं मधुरीभूतमीरयेत्।
फेनीभूतं कफं यातं विदाहादम्लतां ततः ॥ ५७ ॥
पित्तमामाशयात्कुर्याच्च्यवमानं च्युतं पुनः।
अग्निना शोषितं पक्वं पिण्डितं कटु मारुतम् ॥ ५८ ॥
अन्न प्रथम षड्रस जरी असतें तरी तें मधुर व फेंसाळ होऊन लालादिकांस उत्पन्न करितें. नंतर विदाह होऊन तें आंबट झालें असतां आमाशयापासून पक्वाशयांत जातांना पित्तास उत्पन्न करितें.

नंतर पक्वाशयांत गेल्यावर अग्नीनें शुष्क, पक्व, पिंडित ( गोळा ) व तिखट होऊन वायु उत्पन्न करितें.

**भौमाप्याग्नेयवायव्याः पञ्चोष्माणः सनाभसाः ।**
**पञ्चाहारगुणान् स्वान् स्वान् पार्थिवादीन् पचन्त्यनु५९**

नंतर भौम, आप्य, आग्नेय, वायव्य व नाभस हे पांच अग्नि आहारासंबंधीं आपापल्या पार्थिवादिक पांच गुणांचें पचन करितात.

**यथास्वं ते च पुष्णन्ति पक्त्वा भूतगुणान्पृथक् ।**

आहाररससंबंधीं पंचमहाभूतांच्या आपल्या गुणास पचवून ते ( पंचभूतांचे अग्नि ) आपणहि वाढतात. ( बाह्याग्नि जसा इंधनानें पचन-दहन करितो व त्याच्या योगानें आपणहि वाढतो, तद्वत्. )

**पार्थिवाः पार्थिवानेव शेषाः शेषांश्च देहगान् ॥ ६० ॥**

पार्थिव गुण पार्थिवासच व इतर गुण देहसंबंधीं इतर गुणांस पुष्ट करितात.

**किट्टं सारश्च तत्पक्वमन्नं सम्भवति द्विधा ।**

पक्व झालेल्या अन्नाचे किट्ट व सार असे दोन भाग होतात.

**तत्राच्छं किट्टमन्नस्य मूत्रं विद्याद्घनं शकृत् ॥ ६१ ॥**

अन्नाचें पातळ जें किट्ट असतें तें मूत्र व घट्ट असतें तें पुरीष होय.

**सारस्तु सप्तभिर्भूयो यथास्वं पच्यतेऽग्निभिः ।**

सप्तधातूंसंबंधीं सात अग्नि त्या साराचें पुनः पचन करितात व त्याच्या योगानें तो अन्नसार रसरक्तादिरूप परिणाम पावतो.*

**रसाद्रक्तं ततो मांसं मांसान्मेदस्ततोऽस्थि च ॥ ६२ ॥**
**अस्थ्नो मज्जा ततः शुक्रं शुक्राद्गर्भः प्रजायते ।**

आहाररसापासून प्रथम रक्त, नंतर मांस, मांसानंतर मेद, त्यानंतर हाडें, हाडांमागून मज्जा, शेवटीं शुक्र व शुक्रापासून गर्भ उत्पन्न होतो. †

**कफः पित्तं मलाः खेषु प्रस्वेदो नखरोम च ॥ ६३ ॥**
**स्नेहोऽक्षित्वग्विशामोजो धातूनां क्रमशो मलाः ।**

रसधातूंचा मळ कफ; रक्ताचा पित्त; मांसाचा मळ नाक, डोळे, कान इत्यादि ठिकाणचा मळ; मेदाचा घाम; हाडांचा मळ नखें व केंस; डोळे, त्वचा व मळ ( विष्ठा ) यांचा स्नेह हान मज्जेचा मळ व शुक्राचा ओज. *

**प्रसादकिट्टौ धातूनां पाकादेव द्विधर्च्छतः ॥ ६४ ॥**

याप्रमाणें रसादि धातूंचा पाक होऊन त्याचे प्रसाद व किट्ट असे दोन भाग होतात.

**परस्परोपसंस्तम्भाद्धातुस्नेहपरम्परा ।**

शरीरांतील सप्तधातु व तत्पोषक जो रस ( स्नेह ) यांची जी शरीरांत संतत स्थिति आहे ती एकमेकांवर अवलंबून आहे. ( रसाचे योगानें धातूंचें बल राहतें व वाढतें आणि धातु सबल असतील तरच अन्नाचा रस होईल. )

**केचिदाहुरहोरात्रात्षडहादपरे परे ॥ ६५ ॥**
**मासेन याति शुक्रत्वमन्नं पाकक्रमादिभिः ।**

कोणी म्हणतात ८ प्रहरांत पाकक्रमांनीं अन्नाचें शुक्र होतें. दुसरे कोणी ६ दिवसांनीं होतें असें म्हणतात व कित्येक महिन्यानें होतें असें म्हणतात.

**सन्ततं भोज्यधातूनां परिवृत्तिस्तु चक्रवत् ॥ ६६ ॥**

अशा तऱ्हेनें अन्नरस व धातु यांचें भ्रमण रहाटगाडग्याप्रमाणें अखंड चालू असतें.

**वृष्यादीनि प्रभावेण सद्यः शुक्रादि कुर्वते ।**

वृष्यादिक पदार्थांपासून त्यांच्या प्रभावानें तावडतोब शुक्रादिक उत्पन्न होतात.

---

*जाठराग्नीनें पक्व झालेल्या अन्नाचा सार धातूंशीं मिश्र झाला म्हणजे रसधातुस्थ अग्नीच्या योगानें त्याचें पुनः पचन होऊन तो रक्तत्व पावतो. रक्तगत अग्नीच्या योगानें मांसत्व, मांसगत अग्नीनें मेदत्व व याचप्रमाणें पुढें गर्भत्व पावतो. त्या त्या धातुगत अग्नीच्या योगानें त्याला उत्तरोत्तर अवस्था प्राप्त होतात.

† याच्या उत्तरपूर्वार्धाच्या भाषांतरांत आहाररसापासून रक्तादिकांची उत्पत्ति कशी होते हें सांगितलें आहे. ह्या श्लोकाचें भाषांतर दुसऱ्या प्रकारेंहि होऊं शकतें. तें असें:—

"आहाररसापासून रक्त, रक्तापासून मांस, मांसापासून मेद, मेदापासून अस्थि, अस्थीपासून मज्जा, मज्जेपासून शुक्र व शुक्रापासून गर्भ उत्पन्न होतो." अरुणदत्ताला हाच अर्थ संमत असून ग्रंथकर्त्याची विवक्षाहि तशीच असण्याचा संभव आहे; परंतु अन्नापासून शरीरांतील धातु उत्पन्न होण्यामध्यें हा द्राविडप्राणायाम घडत असून अन्नरसच साक्षात् प्रत्येक धातूला युगपत् पोशितो असा हल्लीं शोध लागला आहे; हें मताहि पूर्वी माहीत होतें असें वृद्ध वाग्भटावरून स्पष्ट दिसतें. ह्या श्लोकाचा अर्थ दोन्ही प्रकारांनीं होण्याचा संभव असल्यामुळें असेंहि दिसतें कीं, दोन्ही मतें एकाच श्लोकांत दाखविण्याचा ग्रंथकर्त्याचा हेतुहि कदाचित् असेल. भावमिश्रानें भावप्रकाशांत ह्याच श्लोकांचा अर्थ आम्हीं दिलेल्या भाषांतराप्रमाणेंच केला आहे. ह्या श्लोकांतील 'रसात्' व 'शुक्रात्' खेरीजकरून बाकीच्या सर्व पंचम्यंत पदांपुढें 'अनंतरं' याचा अध्याहार केला म्हणजे भावमिश्रांनीं व आम्हीं दिलेला अर्थ निष्पन्न होतो. आधुनिक मताचें निदर्शक जें वृद्ध वाग्भटांतील वाक्य तें येणेंप्रमाणें:— एवमन्नरस एव साक्षात्सर्वधातून्केनचिदेव कालभेदेन पुष्णाति । न पुनर्धातवो धात्वन्तरतां स्वरूपोपमर्देन प्रतिपद्यन्त इति ( अन्ये वर्णयन्ति ) ( वृ. वा. शा. ६ )

* याच्या भाषांतरांत शुक्राचा मल ओज असें सांगितलें आहे, व मागें ५५ पानांत ( श्लोक ३७ ) ओज हें सप्तधातूंचें उत्तम सत्त्व असें सांगितलें आहे. ह्या सप्तधातूंमध्यें शुक्राचाहि अंतर्भाव झाल्यामुळें तें शुक्राचेंहि सत्त्व असें अर्थात् सिद्ध होतें व येथें तर शुक्राचा मळ म्हटलें आहे. तर या विरोधाचा परिहार कसा असें कोणी विचारल्यास, त्यास उत्तर हेंच कीं, शुक्रधातूपासून जरी नेहमीं ओज उत्पन्न होतें तरी प्रसंगविशेषीं त्या शुक्रधातूचें जेव्हां गर्भामध्यें रूपांतर होतें तेव्हां त्याच्या अवशिष्ट भागाचें ओज होतें. सारांश इतकाच कीं, गर्भ उत्पन्न होवो अगर न होवो, शुक्रामध्यें नेहमीं दोन घटकांश असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं; एक गर्भोत्पादक व दुसरा ओजोत्पादक. जेव्हां शुक्रापासून हे दोन्ही पदार्थ तयार होतात, तेव्हां पहिल्या भागास सार व दुसऱ्या भागास मल अशी संज्ञा प्राप्त होते व जेव्हां फक्त ओजच उत्पन्न होतें, तेव्हां तेंच शुक्रधातूचें उत्तम सत्त्व मानलें जातें.

प्रायः करोत्यहोरात्रात्कर्मान्यदपि भेषजम् ॥ ६७ ॥

दुसरींहि औषधें आठ प्रहरांत बहुतकरून आपलें काम करितात.

व्यानेन रसधातुर्हि विक्षेपोचितकर्मणा।
युगपत्सर्वतोऽजस्रं देहे विक्षिप्यते सदा ॥ ६८ ॥
क्षिप्यमाणः स्ववैगुण्याद्रसः सज्जति यत्र सः।
तस्मिन् विकारं कुरुते खे वर्षमिव तोयदः ॥ ६९ ॥

फेंकण्याची क्रिया करणाऱ्या व्यानवायूनें नेहमीं सर्व देहभर रसधातु एकदम फेंकला जातो. तो फेंकला गेला असतां स्रोतें दुष्ट झाल्यामुळें ज्या ठिकाणीं अडकतो तेथें विकार उत्पन्न करितो. यांस दृष्टान्त, जसा मेघ वायूनें ज्या ठिकाणीं जाऊन अडकतो तेथेंच वृष्टि करितो.

दोषाणामपि चैवं स्यादेकदेशप्रकोपणम्।

दोषांचा एकदेशीय प्रकोप होतो तोहि अशाच तऱ्हेनें होतो.

अन्नभौतिकधात्वग्निकर्मेति परिभाषितम् ॥ ७० ॥

याप्रमाणें जठराग्नि, पंचभौतिक अग्नि ( ५ ) व धात्वग्नि ( ७ ) यांचें कार्य सांगितलें.

अन्नस्य पक्ता सर्वेषां पक्तॄणामधिको मतः।
तन्मूलास्ते हि तद्वृद्धिक्षयवृद्धिक्षयात्मकाः ॥ ७१ ॥
तस्मात्तं विधिवद्युक्तैरन्नपानेन्धनैर्हितैः।
पालयेत्प्रयतस्तस्य स्थितौ ह्यायुर्बलस्थितिः ॥ ७२ ॥

सर्व अग्नींमध्यें जाठराग्नि हा अधिक ( श्रेष्ठ ) आहे. कारण ते त्यावर अवलंबून असतात. त्याची वृद्धि झाली असतां त्यांची वृद्धि होते; व त्याचा क्षय झाला म्हणजे त्यांचा क्षय होतो; यास्तव शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें हितकारक अशा अन्नपानरूप इंधनांनीं ( सर्पणांनीं ) त्याचें मोठ्या यत्नानें पालन करावें; कारण तो चांगल्या स्थितींत असला म्हणजे आयुष्य व बल हींहि चांगल्या स्थितींत असतात.

समः समाने स्थानस्थे विषमोऽग्निर्विमार्गगे।
पित्ताभिमूर्च्छिते तीक्ष्णो मन्दोऽस्मिन्कफपीडिते ७३

समानवायु स्वस्थानीं असला म्हणजे अग्नि सम असतो, समानवायूनें आपला मार्ग सोडिला म्हणजे अग्नि विषम होतो. तोच पित्तानें आच्छादित झाला असतां अग्नि तीक्ष्ण होतो, व कफानें युक्त समान झाला असतां अग्नि मंद होतो.

समोऽग्निर्विषमस्तीक्ष्णो मन्दश्चैवं चतुर्विधः।

याप्रमाणें सम, विषम, तीक्ष्ण व मंद असे अग्नीचे चार प्रकार होतात.

यः पचेत्सम्यगेवान्नं भुक्तं सम्यक् समस्त्वसौ ॥ ७४ ॥
विषमोऽसम्यगप्याशु सम्यक् क्वापि चिरात्पचेत्।
तीक्ष्णो वह्निः पचेच्छीघ्रमसम्यगपि भोजनम् ॥ ७५ ॥
मन्दस्तु सम्यगप्यन्नमुपयुक्तं चिरात्पचेत्।
कृत्वाऽऽस्यशोषाटोपान्त्रकूजनाध्मानगौरवम् ॥ ७६ ॥

योग्य रीतीनें ( शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ) खाल्लेलें अन्न जो चांगल्या रीतीनें पचवितो तो सम अग्नि, अयोग्य रीतीनें खाल्लेलेंहि अन्न जो कधीं कधीं लवकर व योग्य रीतीनें खाल्लेलें कधीं कधीं उशीरानें पचवितो तो विषम अग्नि होय. तीक्ष्ण अग्नि अयोग्य रीतीनें खाल्लेलें अन्नहि त्वरित पचवितो व जो योग्य रीतीनें खाल्लेलें अन्नहि मुखशोष, पोटांत गुडगुडणें व कुरकुरणें, पोट फुगणें व जडत्व हे विकार करून फार वेळानें पचवितो तो मंदाग्नि होय.

सहजं कालजं युक्तिकृतं देहबलं त्रिधा।

शरीराचें बल तीन प्रकारचें; सहज, कालज व युक्तिजन्य.

तत्र सत्त्वशरीरोत्थं प्राकृतं सहजं बलम् ॥ ७७ ॥
वयस्कृतमृतूत्थं च कालजं युक्तिजं पुनः।
विहाराहारजनितं तथोर्जस्करयोगजम् ॥ ७८ ॥

सत्त्व, रज व तम या गुणांपासून* प्राप्त झालेलें जें नैसर्गिक बल तें सहज, वयाच्या व ऋतूच्या संबंधानें झालेलें तें कालज व आहार-विहारांपासून व बलवर्धक उपायांनीं प्राप्त करून घेतलेलें तें युक्तिजन्य होय.

देशोऽल्पवारिद्रुमगो जाङ्गलः स्वल्परोगदः।
आनूपो विपरीतोऽस्मात्समः साधारणः स्मृतः ॥ ७९ ॥

ज्या देशांत पाणी, झाडें व डोंगर कमी असून रोगराई फारशी होत नाहीं तो जांगल देश. याच्या विपरीत म्हणजे ज्यांत पाणी, झाडें व डोंगर विपुल असतात, व रोगहि ज्यांत फार उत्पन्न होतात तो आनूपदेश, आणि ज्यांत या गोष्टी बेतानें असतात तो साधारण देश होय. ( ह्या तीन प्रकारच्या देशांना मराठींत देश, कोंकण व मावळ हीं अनुक्रमें नांवें आहेत. )

मज्जामेदोवसामूत्रपित्तश्लेष्मशकृन्त्यसृक्।
रसो जलं च देहेऽस्मिन्नेकैकाञ्जलिवर्धितम् ॥ ८० ॥

मज्जा, मेद, वसा, मूत्र, पित्त, कफ, शकृत् ( मळ ), रक्त, रस व जल हे पदार्थ शरीरांत उत्तरोत्तर एकएक अंजलीनें ( १६ तोळे ) अधिक आहेत ( म्हणजे–मज्जा १६ तोळे, मेद ३२ तोळे, वसा ४८ तोळे याप्रमाणें जल १६० तोळे, १० अंजलि ).†

---

* या भाषांतरांत, 'सत्त्वशरीरोत्थं' याचा अर्थ टीकाकाराच्या अनुरोधानें लिहिला आहे. सत्त्व शब्देंकरून सत्त्व, रज व तम घ्यावे असें अरुणदत्त म्हणतो; परंतु नुसता सत्त्व गुण असा त्याचा अर्थ केल्यास जास्त सयुक्तिक होईल. कारण गर्भोत्पत्तीमध्यें सत्त्वादि तीन गुणांपासून कोणकोणते भाग उत्पन्न होतात हें सांगतांना वृद्ध वाग्भटांत व्यवसाय, शौर्य इ० गुण शुद्ध सत्त्वापासून उत्पन्न होतात असें सांगितलें आहे. तेथें व्यवसायादिक उपलक्षणें मानल्यास बलहि त्यांत अंतर्भूत होतें; तसेंच सत्त्व व तम हीं परस्परविरुद्ध असल्यामुळें ( वृ. वा. अ० ५ पाहा. ) सहज बलाच्या उत्पत्तीस तीं दोन्हीं कारणीभूत होऊं शकत नाहींत.

† यांत जल म्हणून जो पदार्थ सांगितला आहे तो नित्य धर्मरूपानें व व्रणांतून लसेच्या रूपानें उपलब्ध असणारा व अतिसारांत मळाला पातळ करणारा शरीरांतील द्रवांश असें चरकादिकांत सांगितलें आहे. यालाच

( पान १४० पाहा )

पृथक् स्वप्रसृतं प्रोक्तमोजोमस्तिष्करेतसाम् ।
द्वावञ्जली तु स्तन्यस्य चत्वारो रजसः स्त्रियः ॥ ८१ ॥

ओज, मस्तिष्क ( मेंदु ) व रेत हीं मनुष्याच्या शरीरांत त्याच्या पसानें प्रत्येक एक एक पसा आहेत. स्त्रियांचें दूध त्यांच्याच दोन ओंजळी व आर्तव चार ओंजळी असतें.

समधातोरिदं मानं विद्याद् वृद्धिक्षयावतः ।

हें मान निरोगी मनुष्याविषयीं आहे. यावरून वृद्धि किंवा क्षय झाला आहे किंवा कसें हें समजावें.

शुक्रासृग्गर्भिणीभोज्यचेष्टागर्भाशयर्तुषु ॥ ८२ ॥
यः स्याद्दोषोऽधिकस्तेन प्रकृतिः सप्तधोदिता ।

शुक्र, आर्तव, गर्भिणी व तिचे आहारविहार, गर्भाशय व ऋतु यांत ज्या दोषांचें आधिक्य असतें त्या मानानें (गर्भसंभव होतेवेळीं) ७ प्रकारच्या प्रकृति होतात. [ वातिक, पैत्तिक, श्लेष्मिक, ३ द्वंद्वज, व एक सान्निपातिक. ]

विभुत्वादाशुकारित्वाद्बलित्वादन्यकोपनात् ॥ ८३ ॥
स्वातन्त्र्याद्बहुरोगत्वाद्दोषाणां प्रबलोऽनिलः ।

वायु हा सर्वव्यापक असून बलवान् आहे, तो दुसऱ्यास प्रकुपित करितो, व आपण स्वतंत्र आहे (तो स्वतःच प्रकुपित होतो; इतर दोषांचे योगानें होत नाहीं.) आणि तज्जन्य रोगहि फार आहेत. ( वातरोग ८०, पित्तरोग ४० व कफरोग २०. ) तसेंच तो आपलें कार्यहि फार त्वरित करितो. म्हणून सर्व दोषांमध्यें वायु प्रबल होय.

प्रायोऽत एव पवनाध्युषिता मनुष्या
दोषात्मकाः स्फुटितधूसरकेशगात्राः ।
शीतद्विषश्चलधृतिस्मृतिबुद्धिचेष्टा-
सौहार्द्रदृष्टिगतयोऽतिबहुप्रलापाः ॥ ८५ ॥
अल्पपित्तबलजीवितनिद्राः
सन्नसक्तचलजर्जरवाचः ।
नास्तिका बहुभुजः सविलासा
गीतहासमृगयाकलिलोलाः ॥ ८६ ॥
मधुराम्लपटूष्णसात्म्यकाङ्क्षाः
कृशदीर्घाकृतयः सशब्दयाताः ।
न दृढा न जितेन्द्रिया न चार्या
न च कान्तादयिता बहुप्रजा वा ॥ ८७ ॥
नेत्राणि चैषां खरधूसराणि
वृत्तान्यचारूणि मृतोपमानि ।
उन्मीलितानीव भवन्ति सुप्ते
शैलद्रुमांस्ते गगनं च यान्ति ॥ ८८ ॥
अधन्या मत्सराध्माताः स्तेनाः प्रोद्बद्धपिण्डिकाः ।
श्वशृगालोष्ट्रगृध्राखुकाकानूकाश्च वातिकाः ॥ ८९ ॥

म्हणून वातप्रकृति मनुष्य प्रायः अशा प्रकारचे असतात:- दुर्गुणी, त्यांचे केंस व अवयव फुटलेले व मलिन. शीत पदार्थांचा द्वेष करितात. त्यांचें धैर्य, स्मरणशक्ति, बुद्धि, मैत्री, दृष्टि, गति व कृति अस्थिर असतात. ते फारच वाचाल असतात. त्यांचें पित्त, बळ, आयुष्य व झोंप हीं कमी असतात. शब्द खोल असतो, अथवा बोलतांना अडखळतात, किंवा फार जलद बोलतात, किंवा शब्द घोगरा असतो. ते नास्तिक, खादाड, विलासी असे असून गाणें, हंसणें, शिकार करणें, व तंटे करणें यांत गढून गेलेले असतात. मधुर, आंबट, खारट व उष्ण पदार्थ त्यांस सात्म्य असतात ( प्रकृतीस मानवतात ); व त्यांचीच त्यांस आवड असते. ते कृश असून उंच असतात. तसेंच चालतांना त्यांचे पाय वाजतात. ते बळकट, जितेंद्रिय व सभ्य ( थोर ) नसतात. ते बायकांस आवडत नाहींत व त्यांस फारशीं पोरें होत नाहींत. त्यांचे डोळे रूक्ष, मळकट, वाटोळे, वाईट व मढ्याच्यासारखे असून झोंपेंत उघडेच राहतात. ते स्वप्नांत झाडावर व डोंगरावर चढतात, व आकाशांत संचार करितात. ते हलकट, मोठे मत्सरी व चोरटे असून त्यांच्या पोटऱ्या फार लठ्ठ असतात. कुत्रा, कोल्हा, उंट, गिधाड, उंदीर व कावळा यांच्यासारखे त्यांचे स्वभाव असतात.

पित्तं वह्निर्वह्निजं वा यदस्मात्
पित्तोद्रिक्तस्तीक्ष्णतृष्णाबुभुक्षः ।
गौरोष्णाङ्गस्ताम्रहस्ताङ्घ्रिवक्त्रः

---

( पान १३९ वरून चालू )

अब्धातु असें कित्येक ठिकाणीं म्हटलें आहे. वास्तविक म्हटलें असतां हा द्रवांश रक्तांतीलच होय; तथापि अब्धातु किंवा जल असें एक स्वतंत्र तत्त्व धरण्यास हरकत नाहीं; कारण इंग्रजींत ज्याला लिंफ ( Lymph ) म्हणतात तें रक्तापासून भिन्न व स्वतंत्र वाहिन्यांमधून वाहणारा एक निराळाच धातु आहे; इतकेंच मात्र कीं, स्वेद, मूत्र व इतर शरीरांतील द्रवांश यांना तो कारणीभूत नाहीं. यास्तव आपल्या अब्धातूची इंग्रजींतील लिंफ या पदार्थाशीं एकवाक्यता होऊं शकत नाहीं; निदान इतकें खचित कीं, ह्या अब्धातूची प्राचीनांना अर्धवट कल्पना होती. नुसत्या लिंफ या पदार्थाला जर त्यांनीं अब्धातु हें नांव दिलें असेल असें म्हणावें तर शरीरांतील सर्व द्रवांना तो कारणीभूत मानला आहे व रक्तादिकांपेक्षां त्याचें मान अधिक सांगितलें आहे. बरें, शरीरांत जो एकंदर पाण्याचा अंश आहे त्याला अब्धातु म्हणावें तर १० अंजलि हें मान त्याला फारच कमी आहे व तसें असतें तर निराळी अंबुवहस्रोतसें कल्पिण्याची आवश्यकताहि नाहीं. एकंदरींत शरीरांतील इतर अनेक गोष्टींप्रमाणें ह्या बाबतींतहि बराच घोंटाळा व असंबद्धता आहे; तसेंच ह्या व पुढील श्लोकांत रक्तादि पदार्थांचीं जीं मानें दिलीं आहेत तींहि चुकीचीं आहेत. मूत्रापेक्षां पित्ताचा अंश शरीरांत जास्त आहे; व मेंदू सारा एकमूठ (पसा) भर व शुक्र इतकाच! इत्यादि कल्पना हल्लीं असंबद्ध दिसण्यासारख्या आहेत. ह्या श्लोकाचे भाषांतरांत अंजलि म्हणजे १६ तोळे असें जें कंसांत लिहिलें आहे तें चुकीचें आहे. येथें अंजलि म्हणजे ज्याच्या त्याच्या हातानें एक ओंजळ असाच अर्थ केला पाहिजे असें चरक व वृद्ध वाग्भट यांजवरून स्पष्ट होतें. टीकाकारानें जशी पुढील श्लोकांत ही गोष्ट स्पष्ट केली आहे तशी येथें केली नसल्यामुळें व मुळांतहि पुढील श्लोकाप्रमाणें अंजलि शब्दाला 'स्व' शब्द जोडला नसल्यामुळें ही चूक घडली.

शूरो मानी पिङ्गकेशोऽल्परोमा ॥ ९० ॥
दयितमाल्यविलेपनमण्डनः
सुचरितः शुचिराश्रितवत्सलः ।
विभवसाहसबुद्धिबलान्वितो
भवति भीषु गतिर्द्विषतामपि ॥ ९१ ॥
मेधावी प्रशिथिलसन्धिबन्धमांसो
नारीणामनभिमतोऽल्पशुक्रकामः ।
आवासः पलिततरङ्गनीलिकानाम्
भुङ्क्तेऽन्नं मधुरकषायतिक्तशीतम् ॥ ९२ ॥
घर्मद्वेषी स्वेदनःपूतिगन्धि-
भूर्युच्चारक्रोधपानाशनेर्ष्यः ।
सुप्तः पश्येत्कर्णिकारान् पलाशान्
दिग्दाहोल्काविद्युदर्कानलांश्च ॥ ९३ ॥
तनूनि पिङ्गानि चलानि चैषां
तन्वल्पपक्ष्माणि हिमप्रियाणि ।
क्रोधेन मद्येन रवेश्च भासा
रागं व्रजन्त्याशु विलोचनानि ॥ ९४ ॥
मध्यायुषो मध्यबलाः पण्डिताः क्लेशभीरवः ।
व्याघ्रर्क्षकपिमार्जारयक्षानूकाश्च पैत्तिकाः ॥ ९५ ॥

पित्त हें अग्नि आहे, किंवा अग्नीपासून झालेलें आहे, म्हणून पित्तविशिष्ट जे पुरुष असतात ते असेः—त्यांची भूक व तहान फार तीव्र असते. ते गोरे असून अंग गरम असतें. हात, पाय व तोंड हीं लाल असतात. ते शूर व अभिमानी असतात. केंस पिंगट असून अल्प असतात. त्यांस फुलें, चंदनादिकांचे लेप व नटणें हें आवडतें. त्यांचें आचरण चांगलें असतें. ते पवित्र असून आश्रितांविषयीं दयाळू व ऐश्वर्य, साहस, बुद्धि व बळ यांनीं युक्त असतात. शत्रु भ्याले असतां त्यांच्याहि उपयोगी पडतात. ते बुद्धिवान् असून त्यांचे संधिबंध व मांस शिथिल असतें. ते स्त्रियांस आवडत नाहींत. त्यांचें शुक्र व काम अल्प असतो. केंस पिंकणें, सुरकुत्या ( वळी ) पडणें व नीलिका ( काळे चट्टे ) यांचें ते घरच असतात. ते मधुर, तुरट, कडू व थंड असें अन्न भक्षण करितात. त्यांस उन्हाचा द्वेष असून अंगास घाम व घाण फार येते. मळमूत्र, खाणेंपिणें, राग व ईर्षा हीं त्यांस फार असतात. ते स्वप्नांत पांगार ( कर्णिकार ) पळस, दिग्दाह, ( आकाशाचा लाल रंग ), तारे तुटणें, वीज, सूर्य व अग्नि हीं पाहतात. त्यांचे डोळे बारीक, पिंगे व चंचल असतात. पापण्यांचे केंस विरळ असून आंखूड असतात. डोळ्यांस थंड प्रिय असतें, व रागानें मद्य प्याल्यानें व सूर्याकडे पाहिल्यानें ते फार लवकर लाल होतात. त्यांचें आयुष्य व बल मध्यम असतें. ते विद्वान् असून क्लेश न सोसणारे असतात. वाघ, अस्वल, वानर व यक्ष, यांसारखे त्यांचे स्वभाव असतात.

श्लेष्मा सोमः श्लेष्मलस्तेन सौम्यो
गूढस्निग्धश्लिष्टसन्ध्यस्थिमांसः ।
क्षुत्तृड्दुःखक्लेशघर्मैरतप्तो
बुद्ध्या युक्तः सात्त्विकः सत्यसन्धः ॥ ९६ ॥
प्रियङ्गुदूर्वाशरकाण्डशस्त्र-
गोरोचनापद्मसुवर्णवर्णः ।
प्रलम्बबाहुः पृथुपीनवक्षा
महाललाटो घननीलकेशः ॥ ९७ ॥
मृद्वङ्गः समसुविभक्तचारुवर्ष्मा
बह्वोजोरतिरसशुक्रपुत्रभृत्यः ।
धर्मात्मा वदति न निष्ठुरं च जातु
प्रच्छन्नं वहति दृढं चिरं च वैरम् ॥ ९८ ॥
समदद्विरदेन्द्रतुल्ययातो
जलदाम्भोधिमृदङ्गसिंहघोषः ।
स्मृतिमानभियोगवान् विनीतो
न च बाल्येऽप्यतिरोदनोऽतिलोलः ॥ ९९ ॥
तिक्तं कषायं कटुकोष्णरूक्ष-
मल्पं स भुङ्क्ते बलवांस्तथापि ।
रक्तान्तसुस्निग्धविशालदीर्घ-
सुव्यक्तशुक्लासितपक्ष्मलाक्षः ॥ १०० ॥
अल्पव्याहारक्रोधपानाशनेर्ष्यः
प्राज्यायुर्वित्तो दीर्घदर्शी वदान्यः ।
श्राद्धो गम्भीरः स्थूललक्षः क्षमावान्
आर्यो निद्रालुर्दीर्घसूत्रः कृतज्ञः ॥ १०१ ॥
ऋजुर्विपश्चित्सुभगः सलज्जो
भक्तो गुरूणां स्थिरसौहृदश्च ।
स्वप्ने सपद्मांस्सविहङ्गमालां-
स्तोयाशयान्पश्यति तोयदांश्च ॥ १०२ ॥
ब्रह्मरुद्रेन्द्रवरुणतार्क्ष्यहंसगजाधिपैः ।
श्लेष्मप्रकृतयस्तुल्यास्तथा सिंहाश्वगोवृषैः ॥ १०३ ॥

कफ हा सोमात्मक आहे म्हणून श्लेष्मप्रकृति मनुष्य सौम्य असतो; त्याचे सांधे, हाडें व मांस पुष्ट, स्निग्ध व घट असतात. तो भूक, तहान, दुःख, क्लेश व उष्ण यांनीं तप्त [ घाबरा ] होत नाहीं. तो बुद्धिवान्, सत्त्वगुणी, खरें बोलणारा असून त्याच्या अंगाचा रंग गव्हला, दूर्वा, शराचीं पेरें [ शर गवतविशेष ], शस्त्र, गोरोचन, कमळ किंवा सोनें यांसारखा असतो. हात लांब असतात, छाती विस्तीर्ण असून पुष्ट असते. कपाळ मोठें असतें. केंस दाट असून काळे असतात. अंगें मृदु असतात. शरीर सुंदर असून छाती, दंड वगैरे भाग अगदीं स्पष्ट व योग्य प्रमाणाचे असतात. ओज, विषयेच्छा, शुक्र, मुलें व चाकर हीं पुष्कळ असतात. तो धार्मिक असून निष्ठुर भाषण कधींहि बोलत नाहीं व मनांत फार दिवस बळकट द्वेष ठेवितो ( बाहेर दाखवीत नाहीं ). मदोन्मत्त ऐरावतासारखी गति

असते. मेघ, समुद्र, मृदंग व सिंह यांच्या शब्दासारखा त्याचा शब्द [ गंभीर ] असतो. त्याची स्मरणशक्ति चांगली असते. तो फार उद्योगी [ खटपट्या ] व नम्र असतो. लहानपणीं फार रडत्या व गडबड्या नसतो. कडू, तुरट, तिखट, उष्ण व रूक्ष असे पदार्थ खातो. थोडें अन्न खाऊनहि त्यास शक्ति फार असते. डोळ्यांचें काळें व पांढरें बुबुळ फारच स्निग्ध व लांब, रुंद व स्पष्ट असून त्यांच्या कडा लाल असतात. पापण्यांस केंस फार असतात. त्याचें बोलणें, राग, खाणें, पिणें व ईर्षा हीं कमी [ बेताबातानें ] असतात. आयुष्य व पैसा पुष्कळ असतो. तो दीर्घदर्शी [ दूरवर पाहून विचार करणारा ], गोड बोलणारा, भाविक, गंभीर [ खोल मनाचा, आंतल्या गांठीचा ], उदार, क्षमाशील, संभावित, झोंपाळू, दीर्घसूत्री [ चेंगट ], कृतज्ञ, सरळ, विद्वान्, ऐश्वर्यवान्, भिडस्त व वडील मनुष्यांची सेवा करणारा असून त्याची मैत्री स्थिर असते. तो स्वप्नांत ज्यांत कमळें व पक्षी आहेत अशीं तळीं, सरोवरें वगैरे जलाशय व मेघ पाहतो. ब्रह्मदेव, शंकर, इंद्र, वरुण, गरुड, हंस, ऐरावत, सिंह, घोडा, गाय, व बैल यांच्यासारखा ज्याचा स्वभाव तो कफप्रकृति असें समजावें.

**प्रकृतीर्द्वयसर्वोत्था द्वन्द्वसर्वगुणोदये ।**

वर सांगितलेल्यांपैकीं दोहोंच्या गुणांवरून द्वंद्वज व तिहींच्या गुणांवरून सान्निपातिक प्रकृति ओळखावी.

**शौचास्तिक्यादिभिश्चैवं गुणैर्गुणमयीं वदेत् ॥ १०४ ॥**

पवित्रता, आस्तिक्य इत्यादि गुणांवरून सात्त्विक, राजस व तामस प्रकृति जाणाव्या. [ यांतहि द्वंद्व व सान्निपातिक ( सत्त्व-रजस्तमोमय ) मिळून ७ प्रकार आहेत. ]

**वयस्त्वाषोडशाद्बालं तत्र धात्विन्द्रियौजसाम् ।**
**वृद्धिरासप्ततेर्मध्यं तत्रावृद्धिः परं क्षयः ॥ १०५ ॥**

वयाच्या तीन भागांपैकीं सोळा वर्षांपर्यंत बालपण, त्यांत धातु, इंद्रियें व ओज यांची वृद्धि होते; त्यावर सत्तर वर्षेंपर्यंत मध्यम वय; त्यांत धात्वादिकांची वृद्धि होत नाहीं. सत्तर वर्षांनंतर वृद्धपण, त्यांत धात्वादिकांचा क्षय होतो.

**स्वं स्वं हस्तत्रयं सार्धं वपुः पात्रं सुखायुषोः ।**

स्वतःच्या हातानें ज्याची साडेतीन हात उंची असते त्या मनुष्याचें शरीर सुख [ आरोग्य ] व आयुष्य यांस पात्र होतें.

**न च यद्युक्तमुद्रिक्तैरष्टाभिर्निन्दितैर्निजैः ॥ १०६ ॥**
**अरोमशासितस्थूलदीर्घत्वैः सविपर्ययैः ।**

केंस नसणें, केंस फार असणें, फार काळेपणा, फार गोरेपणा, फार लठ्ठपणा, फार कृशता, फार उंच असणें व फार ठेंगणें असणें हे आठ निंद्यगुण ज्या शरीरांत असतात त्यांस आरोग्य व आयुष्य हीं प्राप्त होत नाहींत.

**सुस्निग्धा मृदवः सूक्ष्मा नैकमूलाः स्थिराः कचाः॥१०७॥**
**ललाटमुन्नतं श्लिष्टशङ्खमर्धेन्दुसन्निभम् ।**
**कर्णौ नीचोन्नतौ पश्चान्महान्तौ श्लिष्टमांसलौ ॥१०८॥**
**नेत्रे व्यक्तासितसिते सुबद्धघनपक्ष्मणी ।**
**उन्नताग्रा महोच्छ्वासा पीनर्जुर्नासिका समा ॥ १०९ ॥**
**ओष्ठौ रक्तावनुद्वृत्तौ महत्यौ नोल्बणे हनू ।**
**महत्यास्यं घना दन्ताः स्निग्धाः श्लक्ष्णाः सिताः समाः ॥**
**जिह्वा रक्तायता तन्वी मांसलं चिबुकं महत् ।**
**ग्रीवा ह्रस्वा घना वृत्ता स्कन्धावुन्नतपीवरौ ॥ १११ ॥**
**उदरं दक्षिणावर्तगूढनाभि समुन्नतम् ।**
**तनुरक्तोन्नतनखं स्निग्धमाताम्रमांसलम् ॥ ११२ ॥**
**दीर्घाच्छिद्राङ्गुलि महत्पाणिपादं प्रतिष्ठितम् ।**

केंस गुळगुळीत, मऊ, बारीक, स्थिर ( सहज न उपटणारे, बळकट ) असून त्यांचीं मुळें अनेक असावीं. कपाळ उंच असून अर्धचंद्राकार असावें, व आंत फुगलेलें असावें. कान लहान असून उभारलेले, मागें पसरट, सुरेख* व मांसल असावे. डोळ्यांचें काळें व पांढरें बुबुळ अगदीं स्वच्छ ( वर्णांतररहित ) असावें. व पापण्यांचे केंस दाट असून बळकट असावे. नाक सरळ, लठ्ठ, सारखें ( नकटें नव्हे व वर उंचवटाहि नव्हे ) असून त्याची बोंडी वर आलेली असावी व श्वास मोठा असावा ( छिद्र विस्तीर्ण असावें ). ओंठ लाल असून पुढें आलेले नसावे. जबडे मोटे असून उंच नसावे. तोंड मोठें असावें. दांत दाट ( विरळ नव्हे ), स्निग्ध, गुळगुळीत, पांढरे व सारखे असावे. जीभ लाल, लांब व पातळ असावी. हनुवटी मांसल व मोठी असावी. मान आंखूड, जाड व गोल असावी. खांदे उंच व पुष्ट असावेत. पोट अंमळ उंच असून बेंबी खोल गेलेली व तिचा भोंवरा उजवीकडे असावा. नखें पातळ, लाल व फुगीर असावीं. हात, पाय मोठे, स्निग्ध, किंचित् तांबडे व मांसल असावे. बोटें लांब असून त्यांत फटी नसाव्या; अशा प्रकारचे अवयव असणें हें प्रशस्त होय.

**गूढवंशं बृहत्पृष्ठं निगूढाः सन्धयो दृढाः ॥ ११३ ॥**
**धीरः स्वरोऽनुनादी च वर्णः स्निग्धः स्थिरप्रभः ।**
**स्वभावजं स्थिरं सत्त्वमविकारि विपत्स्वपि ॥ ११४ ॥**

पाठ मोठी असून कणा बुजलेला ( मांसाच्छादित ) असावा. सांधे लठ्ठ व बळकट असावेत. आवाज गंभीर असून त्यास अनुनाद असावा. वर्ण स्निग्ध व तेजस्वी असावा. स्वाभाविक, कायमचें व रोगादिकांतहि फारसें विकार न पावणारें बल असावें.

**उत्तरोत्तरसुक्षेत्रं वपुर्गर्भादिनीरुजम् ।**
**आयामज्ञानविज्ञानैर्वर्धमानं शनैः शुभम् ॥ ११५ ॥**

वर सांगितलेलीं लक्षणें ज्यांत उत्तरोत्तर ( पुढलीं पुढलीं ) अधिक आहेत असें, गर्भावस्था, बाल्यावस्था इत्यादि अवस्थांत ज्यास कांहीं विकार झाला नाहीं असें व उंची, व्यावहारिक व शास्त्रीय

---

* पाळी चिकटलेली ( श्लिष्ट ).

ज्ञान हीं ज्यांत हळू हळू वाढत चाललीं आहेत असें शरीर चांगलें होय.

इति सर्वगुणोपेते शरीरे शरदां शतम्।
आयुरैश्वर्यमिष्टाश्च सर्वे भावाः प्रतिष्ठिताः ॥ ११६ ॥

वर सांगितलेल्या सर्व गुणांनीं युक्त जें शरीर तें शंभर वर्षें वांचतें व त्यास ऐश्वर्य व सर्व प्रकारच्या इष्ट गोष्टी प्राप्त होतात.

त्वग्रक्तादीनि सत्त्वान्तान्यग्राण्यष्टौ यथोत्तरम्।
बलप्रमाणज्ञानार्थं साराण्युक्तानि देहिनाम् ॥ ११७ ॥
सारैरुपेतः सर्वैः स्यात्परं गौरवसंयुतः।
सर्वारम्भेषु चाशावान्सहिष्णुः सन्मतिः स्थिरः ॥

त्वचा, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र व सत्त्व हीं जीं एकापेक्षां एक अधिक बलवान् अशीं शरीरांतील श्रेष्ठ तत्वें बळाचें प्रमाण समजण्यासाठीं सांगितलीं, त्या सर्वांनीं युक्त ज्याचें शरीर असतें तो पुरुष फार बळकट असून कोणत्याहि प्रकारच्या कामांत तो निराश कधींच होत नाहीं. तसेंच तो सोसक असून, त्याची बुद्धि चांगली व त्याचे सर्व विचार स्थिर असतात.

अनुत्सेकमदैन्यं च सुखं दुःखं च सेवते।
सत्त्ववांस्तप्यमानस्तु राजसो नैव तामसः ॥ ११९ ॥

सात्त्विक पुरुष सुख झाल्यानें फारसा अभिमान दाखवीत नाहीं, व दुःख झाल्यानें फारसें दैन्यहि दाखवीत नाहीं. राजस पुरुषास सुख प्राप्त झालें असतां त्यास फारच हर्ष होतो, व दुःखानें तो फारच दीन होतो. तामस मनुष्यास सुखदुःखाची धड कल्पनाच नसते, कारण तो निवळ दगडच होय.

दानशीलदयासत्यब्रह्मचर्यकृतज्ञताः।
रसायनानि मैत्री च पुण्यायुर्वृद्धिकृद्गणः ॥ १२० ॥

दातृत्व, सुस्वभाव, दया, खरेपणा, ब्रह्मचर्य ( विषयवासना अल्प असणें ), कृतज्ञता, रसायनें ( उत्तरस्थानांत सांगितलेलीं ) व मैत्री इतक्या गोष्टी पुण्य व आयुष्य वाढविणाऱ्या आहेत.

---

# चतुर्थोऽध्यायः

## अध्याय ४ था

अथातो मर्मविभागं शारीरं व्याख्यास्यामः।

आतां मर्मविभागानुरूप शारीर सांगतों.

सप्तोत्तरं मर्मशतं तेषामेकादशादिशेत्।
पृथक् सक्थ्नोस्तथा बाह्वोस्त्रीणि कोष्ठे नवोरसि ॥ १ ॥
पृष्ठे चतुर्दशोर्ध्वं तु जत्रोस्त्रिंशच्च सप्त च।

एकंदर १०७ मर्मै आहेत. त्यांत प्रत्येक तंगडींत व भुजेंत ११ मिळून ४४; कोठ्यांत ३; उरांत ९; पाठींत १४ व जत्रूच्या वरच्या भागीं ३७; एकूण एकंदर १०७ मर्मै आहेत.

मध्ये पादतलस्याहुरभितो मध्यमाङ्गुलिम् ॥ २ ॥
तलहृन्नाम रुजया तत्र विद्धस्य पञ्चता।
अङ्गुष्ठाङ्गुलिमध्यस्थं क्षिप्रमाक्षेपमारणम् ॥ ३ ॥
तस्योर्ध्वं द्व्यङ्गुले कूर्चः पादभ्रमणकम्पकृत्।

तळपायाच्या मध्यभागीं मधल्या बोटाच्या समोर तलहृत् नांवाचें मर्म आहे, त्याचा वेध झाला असतां वेदनांनीं मनुष्य मरतो. अंगठ्याच्या बेचक्यांत क्षिप्रनामक मर्म आहे, त्याचा वेध झाला असतां धनुर्वात होऊन मनुष्य मरतो. क्षिप्राच्यावर दोन दोन बोटांवर कूर्चमर्म, त्याचा वेध झाला असतां पाय कांपतो व नेहमीं हलत असतो.

गुल्फसन्धेरधः कूर्चशिरः शोफरुजाकरम् ॥ ४ ॥
जङ्घाचरणयोः सन्धौ गुल्फो रुक्स्तम्भमान्द्यकृत्।
जङ्घान्तरे त्विन्द्रबस्तिर्मारयत्यसृजः क्षयात् ॥ ५ ॥

गुल्फसंधीच्या खालीं कूर्चशिर ( टांच ) म्हणून मर्म आहे, त्याचा वेध झाला असतां सूज व वेदना होतात. पाय व जंघा ( पोटरी, तंगडीचा गुडघ्याखालील भाग ) यांच्या संधींत गुल्फमर्म ( घोटा ) आहे, त्याचा वेध झाला असतां संधींत वेदना होतात, सांधा ताठतो व त्याची गति कमी होते. पोटरींत ( घोट्यापासून १२ बोटांवर म्हणजे पोटरीचा मागला लठ्ठ गोळा ) इंद्रबस्ति मर्माचा वेध झाला असतां रक्तस्राव होऊन मनुष्य मरतो.

जङ्घोर्वोः सङ्गमे जानु खञ्जता तत्र जीवतः।
जानुनस्त्र्यङ्गुलादूर्ध्वमाण्यूरुस्तम्भशोफकृत् ॥ ६ ॥
ऊर्वीरूरुमध्ये तद्वेधात्सक्थिशोषोऽस्रसङ्क्षयात्।
ऊरुमूले लोहिताख्यं हन्ति पक्षमसृक्क्षयात् ॥ ७ ॥
मुष्कवङ्क्षणयोर्मध्ये विटपं षण्ढताकरम्।

जंघा व मांडी यांच्या सांध्यांत जानु [ गुडघा ] नामक मर्म आहे. त्याचा वेध झाला असतां रोगी मरतो, व जगलाच तर लंगडा होतो. गुडघ्याच्यावर तीन बोटांवर आणी नांवाचें मर्म आहे, त्याचा वेध झाला असतां मांडी ताठते व सुजते. मांडींत उर्वी नामक मर्म, त्याचा वेध झाला असतां रक्तस्राव होऊन मांडी वाळते ( शुष्क होते ). मांडीच्या मुळाशीं लोहित नांवाचें मर्म, त्याचा वेध झाला असतां रक्तक्षय होऊन पक्षघात होतो. अंड व अडसंधी ( दोन ) यांच्या दरम्यान विटपनामक मर्म, त्याचा वेध झाला तर पुरुष षंढ होतो.

इति सक्थ्नोस्तथा बाह्वोर्मणिबन्धोऽत्र गुल्फवत् ॥ ८ ॥
कूर्परं जानुवत्कौण्यं तयोर्विटपवत्पुनः।

**कक्षाक्षमध्ये* कक्षाधृक् कुणित्वं तत्र जायते ॥ ९ ॥**

याप्रमाणें दोन्ही तंगड्यांतील मर्में. तद्वतच दोन्ही हातांत (भुजांत). पायांत जसा गुल्फ तसा हातांत मणिबंध (मनगट, पंजाजवळचा सांधा), पायांत जसा गुडघा त्याप्रमाणें हातांत कोंपर. मनगट व कोंपर यांचा वेध झाला असतां हात आंखडून थोटा होतो. तंगडीच्या संबंधानें जसें विटप मर्म सांगितलें तसें भुजेसंबंधानें खाकेच्या खळग्यांतल्या गोळींत कक्षाधृक् नांवाचें मर्म आहे, त्याचा वेध झाला असतां हात आंखडतो. [ बाकीच्या भुजेंतील ८ मर्मांचीं नांवें व वेध झाल्याचे विकार तंगडींतल्याप्रमाणें समजावे ].

**स्थूलान्त्रबद्धः सद्योघ्नो विड्वातवमनो गुदः।**

स्थूलांत्रास (मोठ्या आंतड्यास) लागून मळ व वायु बाहेर टाकणारें गुद नामक मर्म आहे, त्याचा वेध झाला असतां मनुष्य तत्काळ मरतो.

**मूत्राशयो धनुर्वक्रो बस्तिरल्पास्रमांसगः ॥ १० ॥**
**एकाधोवदनो मध्ये कट्याः सद्यो निहन्त्यसून्।**
**ऋतेऽश्मरीव्रणाद्विद्धस्तत्रात्युभयतश्च सः ॥ ११ ॥**
**मूत्रस्रावयेकतो भिन्नो व्रणो रोहेच्च यत्नतः।**
**देहामपक्वस्थानानां मध्ये सर्वशिराश्रयः ॥ १२ ॥**
**नाभिः सोऽपि हि सद्योघ्नो**

कमरेच्यामध्यें अल्पमांस व अल्परक्त अशा जागेंत मूत्राचा आशय आहे, त्यास खालच्या अंगीं एक तोंड आहे, तो धनुष्यासारखा वांकडा आहे, त्यास बस्तिमर्म असें म्हणतात. मुतखड्याच्या शस्त्रक्रियेवांचून एरव्हीं त्यास व्रण झाला असतां तत्काळ मनुष्य मरतो; व मुतखडा काढतांना त्याच्या दोहों बाजूस (आरपार) व्रण झाला असतांहि मरतो. एकाच बाजूस व्रण झाला असेल तर त्यांतून मूत्र वाहतें व व्रण भरून येण्यास फार प्रयास लागतात. शरीराच्या मधोमध व आमाशय आणि पक्वाशय यांच्या मधोमध सर्व शिरांस आश्रयभूत असें नाभिमर्म आहे, त्याचा वेध झाला असतांहि मनुष्य तत्काळ मरतो.

**द्वारमामाशयस्य च।**
**सत्त्वादिधाम हृदयं स्तनोरःकोष्ठमध्यगम् ॥ १३ ॥**

दोन्ही स्तनांच्या मध्यें व ऊर व कोठा यांच्या मधोमध आमाशयाचें द्वार व चित्तादिकांचें स्थान† असें हृदयमर्म (शिंप) आहे, त्याचा वेध झाला असतां मनुष्य लागलाच मरतो.

**स्तनरोहितमूलाख्ये द्व्यङ्गुले स्तनयोर्वदेत्।**
**ऊर्ध्वाधोऽसृक्कफापूर्णकोष्ठो नश्येत्तयोः क्रमात् १४**

स्तनांच्यावर दोन बोटांवर स्तनरोहित व खालच्या अंगास स्तनमूळ अशीं दोन दोन प्रत्येक स्तनास [ मिळून चार ] मर्में आहेत. त्यांपैकीं स्तनरोहितांचा वेध झाला असतां फुप्फुसांत कफ भरतो व मनुष्य मरतो व स्तनमूलांचा वेध झाला असतां फुप्फुसांत रक्त भरून मनुष्य मरतो.

**अपस्तम्भावुरःपार्श्वे नाड्यावनिलवाहिनी।**
**रक्तेन पूर्णकोष्ठोऽत्र श्वासात्कासाच्च नश्यति ॥१५॥**

उराच्या दोहीं बाजूंसीं वातवाहक दोन नाड्या (नळ्या) आहेत, (फुप्फुसांत गेलेल्या २ श्वासनलिका) त्यांस अपस्तंभ असें म्हणतात. त्यांचा वेध झाला असतां फुप्फुसांत रक्त जाऊन खोकला व दमा होऊन मनुष्य मरतो.

**पृष्ठवंशोरसोर्मध्ये तयोरेव च पार्श्वयोः।**
**अधोंऽसकूटयोर्विद्यादपालापाख्यमर्मणी ॥ १६ ॥**
**तयोः कोष्ठेऽसृजा पूर्णे नश्येद्यातेन पूयताम्।**

पाठीचा कणा व ऊर यांच्या मधोमध दोहों बाजूंस खांद्याच्या खालच्या अंगास कुशींत अपालाप नांवाचीं दोन मर्में आहेत. त्यांचा वेध झाला असतां कोठ्यांत (फुप्फुसांत) रक्तसंचय होऊन त्याचा पू होऊन त्यानें मनुष्य मरतो.

**पार्श्वयोः पृष्ठवंशस्य श्रोणीकर्णप्रतिष्ठिते ॥ १७ ॥**
**वंशाश्रिते स्फिजोरूर्ध्वं कटीकतरुणे स्मृते।**
**तत्र रक्तक्षयात्पाण्डुहीनरूपो विनश्यति ॥ १८ ॥**

पाठीच्या कण्याच्या दोहों बाजूंस कुल्यांच्या वरच्या अंगास श्रोणीकर्णावर (कमरेंतील कण्याच्या दोहों बाजूंचीं कानासारखीं हाडें) कण्याच्या आश्रयानें कटीकतरुण नांवाचीं दोन मर्में आहेत,

---

* यांत 'कक्षाक्षमध्ये' याचें भाषांतर 'खाकेंतल्या खळग्यांतल्या गोळींत' असें जें केलें आहे तें चुकीचें आहे. वास्तविक अर्थ "खाक व गळ्याचें हाड (अक्ष) यांच्यामध्यें" असें पाहिजे. सुश्रुतांत तर त्या ठिकाणीं 'कक्षावक्षयोर्मध्ये' असाच पाठ आहे व त्याचाहि फलितार्थ तसाच होतो. अक्ष हें हाड अष्टांगहृदयांत सांगितलें नसून अरुणदत्तानेंहि त्याच्या अर्थाचा कांहींच खुलासा केला नसल्यामुळें आम्हांस त्याचा अर्थ भाषांतर करतेवेळीं बरोबर कळला नव्हता. पुढें चरक, सुश्रुत व वृद्ध वाग्भट यांत अक्ष (क) नांवाचीं दोन हाडें (Clavicles) आढळून आलीं असें पूर्वी जत्रु या शब्दाच्या टीपेंत सुचविलेंच आहे.

† यांत हृदयाचा स्थाननिर्देश फार ढोबळ रीतीनें केला आहे. त्याचें वास्तविक स्थान दोहों स्तनांच्या मधोमध नसून तें बहुतेक छातीच्या डाव्या भागांत तिर्कस राहिलेलें आहे. हृदय हें चित्तादिकांचें जें स्थान मानलें आहे तेंहि चुकीचें आहे. चित्ताचें स्थान मेंदु; व हृदय हें केवळ रक्ताशय आहे असें हल्लीं सिद्ध झालें आहे. सत्त्वादिधाम याचा अर्थ अरुणदत्तानें सत्त्व, रज व तम यांचें अधिष्ठान असा केला आहे; व वृद्ध वाग्भटांतहि 'सत्त्वरजस्तमोधिष्ठानं' असा पाठ आहे; परंतु अरुणदत्ताचा अर्थ प्रसंगोचित नसावा व हा वृद्ध वाग्भटांतील पाठहि क्षेपक किंवा बदललेला असावा असें वाटतें. कारण सत्त्व शब्द वैद्यकांत मनोवाचक वारंवार आढळतो; वृद्ध वाग्भटांतच शारीरस्थानाच्या ५ व्या अध्यायांत 'तत्र सत्त्वं मनः' असें सांगितलें आहे; व 'चित्तादिकांचें स्थान' असा अर्थ केला म्हणजे त्यांत रजतमाचा अंतर्भाव होतोच; कारण हे दोन चित्ताचे दोष आहेत असें पहिल्याच अध्यायांत सांगितलें आहे (सूत्रस्थान श्लोक २१ पान ४ पाहा), सुश्रुतांतहि 'हृदयं चेतनास्थानं प्राणायतनमुत्तमम्' असें वाक्य आहे.

त्यांचा वेध झाला असतां रक्तस्राव होऊन मनुष्य पांढरा फटफटीत व निस्तेज होऊन मरतो.

**पृष्ठवंशं ह्युभयतो यौ सन्धी कटिपार्श्वयोः।**
**जघनस्य बहिर्भागे मर्मणी तौ कुकुन्दरौ ॥ १९ ॥**
**चेष्टाहानिरधः काये स्पर्शाज्ञानं च तद्व्यधात्।**

कण्याच्या दोहों बाजूंस नितंबाच्या बाहेरच्या भागीं कमर व कुशी यांच्यामधील दोहों सांध्यांस (सांधा म्हणजे खळगा, म्हणजे ज्यांस कनवटी असें म्हणतात त्या दोन बाजूंच्या दोन) कुकुंदर मर्में म्हणतात. त्यांचा वेध झाला असतां शरीराचा कमरेपासून खालचा भाग निश्चेष्ट होतो व त्यास स्पर्शज्ञान होत नाहीं.

**पार्श्वान्तरनिबद्धौ तु यावुपरि श्रोणिकर्णयोः ॥ २० ॥**
**आशयच्छादनौ तौ तु नितम्बौ तरुणास्थिगौ।**
**अधः शरीरे शोफोऽत्र दौर्बल्यं मरणं ततः ॥ २१ ॥**

फांसळ्यांच्या आंत त्यांस लागून श्रोणिकर्णाच्यावर तरुणास्थींत आशयांचें आच्छादन करणारीं नितंब नांवाचीं दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाला असतां शरीराचा खालचा भाग सुजून निःशक्त होतो, व त्यानंतर मनुष्य मरतो.

**पार्श्वान्तरनिबद्धौ च मध्ये जघनपार्श्वयोः।**
**तिर्यगूर्ध्वं च निर्दिष्टौ पार्श्वसन्धी तयोर्व्यधात् ॥ २२ ॥**
**रक्तपूरितकोष्ठस्य शरीरान्तरसम्भवः।**

फांसळ्यांच्या आंत त्यांस लागून, नितंब व बरगड्या यांच्यामध्यें तिर्कस वर (दोहों बाजूंस) पार्श्वसंधिनामक दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाला असतां कोठा रक्तानें भरून जाऊन मनुष्य मरतो.

**स्तनमूलार्जवे भागे पृष्ठवंशाश्रये शिरे ॥ २३ ॥**
**बृहत्यौ तत्र विद्धस्य मरणं रक्तसंक्षयात्।**

स्तनमूळांच्या सरळ रेषेंत कण्याच्या आश्रयानें दोन शिरा आहेत, त्यांस बृहती मर्म असें म्हणतात. त्यांचा वेध झाला असतां रक्तक्षयानें मनुष्य मरतो.

**बाहुमूलाभिसम्बद्धे पृष्ठवंशस्य पार्श्वयोः ॥ २४ ॥**
**अंसयोः फलके बाहुस्वापशोषौ तयोर्व्यधात्।**

कण्याच्या दोहों बाजूंस दंडाच्या मुळास लागून जीं दोन हाडें आहेत त्यांस अंसफलक मर्में असें म्हणतात, त्यांचा वेध झाला असतां दंड बधिर व शुष्क (बारीक) होतो.

**ग्रीवामुभयतः स्नावि ग्रीवाबाहुशिरोऽन्तरे ॥ २५ ॥**
**स्कन्धांसपीठसम्बन्धावंसौ बाहुक्रियाहरौ।**

मानेच्या बाजूंस स्नायूंत मान व बाहूंचें शिर (टोंक, माथा) यांच्या मधोमध खांदा व अंसपीठ यांस लागून अंस नांवाचीं दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाला असतां बाहूंची क्रिया बंद होते.

**कण्ठनाडीमुभयतो शिरा हनुसमाश्रिताः ॥ २६ ॥**
**चतस्रस्तासु नीले द्वे मन्ये द्वे मर्मणी स्मृते।**



**स्वरप्रणाशवैकृत्यं रसाज्ञानं च तद्व्यधे ॥ २७ ॥**

कंठनलिकेच्या दोहों बाजूंस हनुवटीकडे गेलेल्या चार शिरा* आहेत, त्यांपैकीं दोहोंस नीला व दोहोंस मन्या असें म्हणतात, त्यांचा वेध झाला असतां मनुष्य मुका होतो आणि जिभेस रुचि समजेनाशी होते.

**कण्ठनाडीमुभयतो जिह्वानासागताः शिराः।**
**पृथक् चतस्रस्ताः सद्यो घ्नन्त्यसून्मातृकाह्वयाः ॥ २८ ॥**

कंठनलिकेच्या दोहों बाजूंस जीभ व नाक यांत गेलेल्या प्रत्येक बाजूस चार चार मिळून आठ शिरा आहेत. त्यांस मातृका असें म्हणतात. त्यांचा वेध झाला असतां मनुष्य तत्काळ मरतो.

---

*ह्या ज्या नीला व मन्या या नांवाच्या चार शिरा सांगितल्या आहेत, त्या दोहों बाजूंच्या मिळून चार आहेत. गळ्यावर अग्रभागीं एक व बाहेरच्या (कानाच्या) बाजूंत एक अशा ज्या कृश मनुष्यामध्यें प्रत्येक बाजूस दोन दोन शिरा दिसतात व ज्यांना इंग्रजींत Anterior Jugular व External Jugular अशीं अनुक्रमें नांवें आहेत त्याच ह्या असाव्या. आतां इंग्रजी शारीरवेत्ते येथें अशी शंका काढतील कीं जर नीला व मन्या यांना तुम्ही हीं इंग्रजी नांवें देतां, तर त्यांच्या वेधाचे जे परिणाम सांगितले आहेत ते तुमच्या म्हणण्याला जुळत नाहींत. मुका होणें किंवा जिभेस रुचि समजेनाशी होणें हें कांहीं केवळ शिरेच्या वेधापासून होऊं शकत नाहीं; असें होण्याला मज्जातंतूंनाच (Nerves) इजा झाली पाहिजे. यावर उत्तर हेंच आहे कीं, ज्या अर्थी प्राचीनांना मज्जातंतु किंवा त्यांचें कार्य माहीत नव्हतें त्या अर्थी मानेवर (गळ्यावर) एखादी जखम होऊन मूकत्व किंवा रसाज्ञान उत्पन्न झालेलें कांहीं प्रसंगीं त्यांस आढळून आलें असल्यास, त्याचें कारण ज्यांतुन रक्तस्राव झालेला दिसतो अशा ह्या बाह्य शिरांचा वेधच असेल असें त्यांना वाटणें शारीरशास्त्राच्या बाल्यावस्थे-मध्यें साहजिकच आहे. यासंबंधानें येथें थोडीशी जास्त माहिती दिल्या-शिवाय आपल्या शारीरशास्त्राची स्थिति कशी काय होती याची समजूत इंग्रजी शारीर माहीत नसणारांना चांगली व्हावयाची नाहीं, सबब ही टीप थोडीशी वाढविणें आम्हांस भाग आहे. इंग्रजी वैद्यक जाणणारे लोक शारीरस्थानांतील तिसऱ्या व ह्या ४ थ्या अध्यायावरून (व यांतच काय तें सर्व शारीर सूत्रित झालें आहे) व वरील उपन्यासावरून आपल्या शारीराचें स्वरूप सहज ताडतील; परंतु इतरांकरितां पुढील स्पष्टीकरण आवश्यक आहे. हे अध्याय बारकाईनें वाचले असतां व विशेषेंकरून वृद्ध वाग्भट व सुश्रुत यांच्या मदतीनें त्यांचें अवलोकन केलें असतां असें स्पष्ट दिसतें, कीं शारीरशास्त्राची बाल्यावस्था काय होती हें आपल्या वैद्यकांत उत्तम प्रकारें कळून येतें. शरीरांतील सर्व अवयव बारकाईनें पाहून त्यांचें यथार्थ वर्णन करतां येण्याला किती शतकें लागलीं, निरनिराळ्या इंद्रियांचें, पिंडांचें, स्रोतसांचें, स्नायु, पेशी व मज्जातंतु यांचें वास्तविक स्वरूप व कार्य कळण्यापूर्वी किती नानातऱ्हेच्या कल्पना होऊन गेल्या, रुधिराभिसरणाच्या खऱ्या मार्गांचा हार्व्हिससाहेबानें शोध लावण्यापूर्वी कोणी यकृत्, कोणी प्लीहा, कोणी नाभि व कोणी दुसराच एखादा भाग रक्ताचें उगमस्थान कसें मानलें, श्वासोच्छ्वासाचें तत्त्व कळण्यापूर्वी आंत ओढलेली हवा कोणी मेंदूंत जाते व कोणी हृदयांत जाते व कोणी गुदद्वारापर्यंत जाते इ० अनेक तर्क कसे केले; शिरा, धमन्या, स्रोतस्, मज्जातंतु, स्नायु संधिबंधनें व पेशी यांच्या स्वरूपांतील बारीक भेद व त्यांचीं वेगळालीं कर्में लक्षांत न

(पृष्ठ १५६ पाहा.)

**कृकाटिके शिरोग्रीवासन्धी तत्र चलं शिरः।**

गळा व मुंडकें यांच्या सांध्यांत दोहों बाजूंस कृकाटिका नांवाचीं दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाला असतां डोकें कांपतें.

**अधस्तात्कर्णयोर्निम्ने विधुरे श्रुतिहारिणी ॥ २९ ॥**

दोहों कानांच्या खालीं खळग्यांत विधुर नांवाचीं दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाला असतां मनुष्य बहिरा होतो.

**फणावुभयतो घ्राणमार्गे श्रोत्रपथानुगौ।**

**अन्तर्गलस्थितौ वेधाद्गन्धविज्ञानहारिणौ ॥ ३० ॥**

घ्राणमार्गाच्या (नाकाच्या छिद्राच्या) दोहों बाजूंस कानांस जाणाऱ्या मार्गाजवळ, घशांत फण नांवाचीं दोन मर्में आहेत. त्यांचा वेध झाला असतां वास कळेनासा होतो.

---

( पृष्ठ १४५ वरून पुढें चालू. )

आल्यामुळें कोठें धमनी रक्त वाहते, कोठें बोलते, कोठें चालते, कोठें सांधा आंवळते, कोठें शब्दज्ञान उत्पन्न करिते, कोठें गुलाबी अत्तराचा वास घेते, कोठें साखरेची गोडी अनुभवते व कोठें रडते किंवा झोंप घेते इत्यादि अनेक असंबद्ध कल्पना कशा उपस्थित झाल्या वगैरे गोष्टी शारीरशास्त्राच्या ऐतिहासिकांस फार मनोरंजक व ज्ञानवर्धक वाटल्याशिवाय राहणार नाहींत. वर सांगितलेल्या सर्व कल्पना आपल्या वैद्यकांत पाहावयास मिळतात. चरकाचे वेळीं शरीरांत ज्या लहान मोठ्या नळ्या किंवा नळ्यांसारखे भाग आहेत त्या सर्वांचा स्रोतस् ह्या शब्दामध्यें अंतर्भाव होई व जरी धमनी, शिरा वगैरे नामांतरें आढळतात तरी ते सर्व पर्याय आहेत असें खरीस त्यानें स्पष्ट सांगितलें आहे. यासंबंधानें चरकाच्या विमानस्थानांतील स्रोतोविमान हा अध्याय पाहा. यांत एक मात्र मोठी गोष्ट प्रथम सांगितली आहे. ती ही कीं, हें सर्व शरीर पोकळ नळ्यांनीं (स्रोतसांनीं) बनलें आहे. शरीरांत जितके म्हणून घनभाग आहेत ते सर्व स्रोतसांचेच प्रकारविशेष आहेत. शरीराचा कोणताहि भाग स्रोतसांवांचून उत्पन्न होऊं शकत नाहीं किंवा नाशाहि पावत नाहीं. परिणाम पावणाऱ्या सर्व धातूंना स्रोतेंच धारण करून नेतात. ( यावन्तः पुरुषे मूर्तिमन्तो भावविशेषास्तावन्त एवास्मिन्स्रोतसां प्रकारविशेषाः। सर्वभावा हि पुरुषेण नान्तरेण स्रोतांस्यभिनिर्वर्तन्ते क्षयं वा न गच्छन्ति। स्रोतांसि खलु परिणाममापद्यमानानां धातूनामभिवोढृणि भवन्ति )। ह्या व्यापक सिद्धान्तापलीकडे चरकाचे वेळीं स्रोतसांसंबंधानें विशेष माहिती फारशी नव्हती; म्हणून उदक, अन्न, प्राण, रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र, वात, पित्त, कफ, मन, इंद्रियज्ञान, कर्मेंद्रियांची शक्ति इत्यादि जिवंत मनुष्याच्या सर्व घटकावयवांचीं स्रोतें शरीरांत आहेत असें मोघम सांगून टाकलें आहे. ( मग तीं कोठें आहेत, कशीं आहेत, परस्परांपासून तीं कशीं ओळखावीं याचा विचार निराळा. तो त्यांनीं आगामी कालावर सोंपवून दिला. ) पुढें सुश्रुताच्या वेळीं इतकेंच अधिक समजलें होतें कीं, स्रोतेंस सर्व कांहीं सारखीं नाहींत. त्यांत निदान तीन प्रकार आढळून येतात; त्यांना त्या कालच्या शारीरवेत्त्यांनीं धमनी, शिरा व स्रोतस् अशा तीन वेगळाल्या संज्ञा दिल्या; परंतु ह्या तीन प्रकारांचे भेद त्यांनीं स्पष्टपणें लिहून न ठेविल्यामुळें, पुढें जरी सुश्रुतानें हे तीन प्रकार वेगळे असें एका अध्यायाचे आरंभीं स्पष्ट सांगितलें आहे [ सु. शा. ९ पाहा ], तरी त्यांतील भेद मनांत ठसण्याजोगा कोणासहि दाखवितां न आल्यामुळें पुढें शिरा व धमन्या यांचा जो त्यानें विस्तार केला आहे त्यांत परस्परांच्या गुणकर्माचा एकच घोंटाळा करून टाकला आहे. वृद्ध वाग्भटांतहि हाच प्रकार झाला आहे. आम्ही म्हणतों याच्या सिद्धतेकरितां पुढील उतारे पहावे.

धमन्यश्चतुर्विंशतिः। ताभिः कायोऽयमाराम इव जलहारिणीभिः केदार इव कुल्याभिरुपस्निह्यति। ताभिश्च नाभिश्चक्रनाभिरिवारकैरावृता। ** ततस्ताभिर्यथास्वमङ्गावयवा धार्यन्ते आप्यायन्ते च। तासामूर्ध्वगा हृदयमभिप्रपन्नाः प्रत्येकं त्रिधा जायन्ते ततस्त्रिंशतो मध्ये द्वे द्वे वातपित्तकफरक्तरसान्वहतः। अष्टाभिः शब्दरूपरसा गृह्यन्ते। द्वाभ्यां द्वाभ्यां भाषते घोषं करोति स्वपिति प्रतिबुध्यते च द्वे चाश्रु वहतः। द्वे च स्तनाश्रिते नार्याः स्तन्यं नरस्य शुक्रं। इ० ( वृद्ध वा. शा. ६. ) याचा अर्थः-- " धमन्या २४ आहेत. त्यांच्या योगानें हें शरीर जसें पाटांपासून बाग किंवा कालव्यापासून शेत, तसें पोसलें जातें. नाकाच्या तुंबाभोंवतीं जशा आरा तशा त्या नाभीभोंवतीं पसरलेल्या आहेत. *** नंतर त्यांच्या योगानें त्या त्या शरीरावयवाचें धारण व पोषण होतें. त्यांपैकीं वर जाणाऱ्या [ दहा ] हृदयास मिळाल्यावर, प्रत्येकीपासून तीन तीन फांटे निघतात. ह्या तीस फांट्यांपैकीं दोन दोन वात, पित्त, कफ, रक्त व रस यांना नेतात; आठ फांट्यांच्या द्वारां शब्द, रूप, रस व गंध यांचें ज्ञान होतें. अंठांच्या योगानें बोलणें, शब्द करणें ( ओरडणें ), निजणें व जागें होणें या क्रिया होतात; दोन अश्रु नेतात व दोन स्त्रियांचें स्तन्य व पुरुषांचें रेत नेतात [ एकूण ३० ]. " पुढें खालीं जाणाऱ्या धमन्यांचेहि वरच्याप्रमाणेंच तीस फांटे कल्पून त्यांजकडे अन्न, पाणी, मूत्र, शुक्र, आर्तव, मल व स्वेद नेण्याचें काम सोंपविलें आहे. यावरून उघड आहे कीं, आपल्या वैद्यकांतील धमनी म्हटली म्हणजे क्रियेच्या संबंधानें इंग्रजी वैद्यकांतील Artery, Vein, Lymphatic, Audoitry, Optic Gustatary and Olfactory and other nerves, Lachrymal canal, Seminal ducts, Ureters Intestines, Fallopian tubes, Sudoriferous and milk glands and ducts इत्यादि सर्व कांहीं त्यांत अंतर्भूत होतें. हा धमन्यांचा प्रकार झाला. आतां शिरांविषयीं काय म्हटलें आहे तें पाहूं. दश मूलसिरा हृदयप्रतिबद्धाः सर्वाङ्गप्रत्यङ्गान्योजो नयन्ति, तत्प्रतिबद्धा हि शारीरचेष्टाः। तास्तु द्व्यङ्गुलमङ्गुलमर्धाङ्गुलं यवं यवार्धं च गत्वा द्रुमपत्रसेवनीप्रतानवद्विद्यमानाः सप्तशतानि भवन्ति। तासां चतुःशतीशाखासु। तत्र षोडशा व्यधनीयाः। अर्थः— मूळारंभींच्या १० शिरा हृदयास चिकटलेल्या ( तेथून निघणाऱ्या ) शरीराच्या प्रत्येक लहान मोठ्या भागास ओज नेतात. त्यांजवरच सर्व व्यापार अवलंबून आहेत. त्या दोन बोटें, बोटभर, अर्धबोट, यव किंवा अर्धा यव जाऊन झाडाच्या पानांतील मधल्या शिरेपासून निघणाऱ्या जाळ्याप्रमाणें विभाग पावून एकंदर सातशें शाखा उत्पन्न होतात. त्यांपैकीं ४०० फांटे शाखांत आहेत. त्यांतील १६ वेध करण्याला अयोग्य " इ० या व पुढील वर्णनावरून इतकेंच मात्र दिसतें कीं, शिरा शब्दाचा विशेषेंकरून Vein असा अर्थ होतो; परंतु तेवढाच त्याचा अर्थ नव्हे. शरीराच्या निरनिराळ्या भागांस त्या सर्व क्रियांना आधारभूत असें ओज [ रक्त ] नेतात म्हटलें आहे यावरून त्यांचें व धमन्यांचें कर्म एकच आहे असें सिद्ध होतें. सुश्रुतांत तर शिरांचें मूळाहि वृद्ध वाग्भटांतील धमन्यांप्रमाणें नाभीच मानलें आहे व धमन्यांसंबंधानें जो बाग व पाट किंवा कालवे व शेत यांचा दृष्टान्त दिला आहे तोच शिरांच्यासंबंधानें दिला आहे. दोहोंत प्रथमदर्शनीं तरी कांहीं भेद दिसावा म्हणून वाग्भटानें शिरांच्या उगमामध्यें थोडासा फेरफार करून व रक्ताबद्दल ओज शब्द घालून वर्णन सुरू केलें आहे खरें, परंतु हें ओज म्हणजे रक्तच असें त्यास ध्वनित करणें भागच पडलें, कारण ७०० शिरांपैकीं १७५ शुद्ध रक्त वाहतात व तितक्याच वात-पित्त-व कफरक्त वाहतात असें शेवटीं स्पष्ट सांगितलेंच आहे. आरंभीं मात्र त्यानें कांहींसें

( पान १४७ पाहा. )

**नेत्रयोर्बाह्यतोऽपाङ्गौ भ्रुवोः पुच्छान्तयोरधः ।**
**तथोपरि भ्रुवोर्निम्नावावर्तान्वान्ध्यमेपु तु ॥ ३१ ॥**

डोळ्यांच्या बाहेरच्या कोंपऱ्याजवळ भिवयांच्या कमानीच्या टोंकांच्या खालच्या अंगीं अपांग नांवाचीं दोन मर्में आहेत, व भिवयांच्यावर खोलगट आवर्त नांवाचीं दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाला असतां मनुष्य अंधळा होतो.

**अनुकर्णं ललाटान्ते शङ्खौ सद्यो विनाशनौ ।**

कपाळाच्या शेवटीं कानांजवळ शंख नांवाचीं दोन मर्में आहेत, त्यांचा वेध झाल्यानें मनुष्य तावडतोब मरतो.

**केशान्ते शङ्खयोरूर्ध्वमुत्क्षेपौ स्थपनी पुनः ॥ ३२ ॥**
**भ्रुवोर्मध्ये त्रयेऽप्यत्र शल्ये जीवेदनुद्धृते ।**
**स्वयं वा पतिते पाकात्सद्यो नश्यति तूद्धृते ॥ ३३ ॥**

दोहों शंखांच्या वरच्या अंगास केंसांच्या शेवटीं उत्क्षेप नांवाचीं दोन मर्में आहेत व दोन्ही भिवयांच्या मध्यंतरीं स्थपनी मर्म आहे.

---

( पृष्ठ १४६ वरून पुढें चालू. )

आत्मवंचन केलें आहे. कांहीं शिरांकडे शुद्ध रक्त वाहण्याचें काम सोंपविल्यामुळें शिरांचा Vein असा अर्थ करण्यास जो थोडासा आधार होता तोहि नाहींसा झाला. हा घोंटाळा येथेंच संपला नाहीं. पुढें जें अवशिष्ट शिरांचें वर्णन दिलें आहे त्यांत कांहीं संधिबंधन करणाऱ्या, कांहीं रसज्ञान देणाऱ्या, कांहीं वाक्प्रवर्तक, कांहीं गंधज्ञान व शब्दज्ञान देणाऱ्या, कांहीं पापण्यांची उघडझांक करणाऱ्या इ० जें वर्णन आढळतें त्यांत धमन्यांच्या लक्षणांचा पूर्ण संकर झालेला आढळतो व धमन्यांप्रमाणेंच आर्य वैद्यकांतील शिरा म्हणजे इंग्रजी वैद्यकांतील Ligament, Artery, Vein, Nerve, Muscle इ० हवें तें होऊं शकतें. पुढें जें स्रोतसांचें वर्णन आढळतें त्यांतहि पुनः वर सांगितल्याप्रमाणें अन्न, पाणी, प्राण, धातु, मल इत्यादिकांचीं वाहक अंतःस्रोतें व शरीरांतील नवद्वारें यांचा अंतर्भाव केला आहे. जरी सुश्रुतानें शिरा, धमनी व स्रोतसें हीं अभिन्न मानणाराच्या मताला शारीरस्थानांतलि ९ व्या अध्यायांत आरंभींच दूषण दिलें आहे, तरी त्यांच्या भेदाचें निर्वचन किंवा स्पष्टीकरण त्याला करतां आलें नाहीं; एवढेंच नव्हे, तर त्यानें आपल्या ग्रंथांत अनेक ठिकाणीं सिरा व धमनी हे शब्द एकार्थानेंच वापरले आहेत; उ० सातव्या अध्यायांत [ सिरावर्णनाच्या ] मानेवर ज्या नीला व मन्या नांवाच्या ४ शिरा सांगितल्या आहेत त्यांनाच ६ व्या अध्यायांत धमनी शब्द लाविला आहे. तसेंच, ज्या शृंगाटकांना 'सिरासन्निपातः' असें सुश्रुतांत म्हटलें आहे त्यांचेंच वाग्भटानें स्रोतस् शब्दानें कथन केलें आहे. अशीं उदाहरणें अनेक देतां येतील. सुश्रुताच्या शारीरस्थानांतील ९ व्या अध्यायांत अखेरीस स्रोतस् शब्दाची व्याख्या दिली आहे, त्यांतील तात्पर्य हेंच कीं, धमनी व सिरा यांखेरीज ज्या शरीरांत पसरलेल्या वाहिन्या आहेत व ज्या मूलछिद्रापासून निघतांना त्यांना स्रोतसें म्हणतात. ह्या व्याख्येमध्यें नासिकादि ९ किंवा १० छिद्रांचा व त्यांच्या नळ्यांचा विशेषेंकरून समावेश होतो. रक्तावांचून इतर पदार्थांच्या ज्या वाहिन्या [ नळ्या, मार्ग ] त्या सर्वांचा स्रोतस् शब्दामध्यें अंतर्भाव होतो. असा भेद करतां येत असूनहि स्रोतस् शब्द पुनः पुनः धमनी व सिरा यांचा पर्याय म्हणून वापरला आहे. इतकेंच नव्हे तर अंतःस्रोतसें म्हणून जीं सांगितलीं, त्यांत रक्तादिकांच्या वाहिन्यांचाच अंतर्भाव होतो. सारांश हाच कीं, प्रत्यक्ष साधनांचा उपयोग करून निरनिराळ्या वाहिन्यांचे भेद स्पष्टपणें न समजून घेतल्यामुळें ही भेदबुद्धि स्थिर झाली नव्हती असें दिसतें. ती पुनः पुनः धमन्यादिक सर्व एकच मानणाऱ्या जुन्या मताकडे धांव घेई. मानवी ज्ञानाचा इतिहास पाहिल्यास सर्वत्र कायमची स्थिति येण्यापूर्वीं हीच धरसोडीची व घोंटाळ्याची स्थिति कांहीं काल आढळून येते. यावरून उघड दिसतें कीं, शिरा, धमनी व स्रोतस् यांतील भेद जो चरकाचे वेळीं मुळींच लक्षांत आला नव्हता तो जरी सुश्रुताचे वेळीं थोडासा कळूं लागला होता, तरी या तिहींत कांहीं तरी भेद आहे यापलीकडे कांहींच शोध लागला नव्हता. वास्तव ह्या तिहींचें वर्णन करतांना केवळ कल्पनेनें व तर्कानें हव्या तितक्या शिरा, हव्या तितक्या धमन्या व लागतील तितकीं अंतःस्रोतसें कल्पून त्यांतील पाहिजेल त्या शिरेकडे एखादें मनःकल्पित काम सोंपवून व त्याच त्याच गुणकर्मांचा सर्वत्र संकर करून एकच ब्रह्मघोंटाळा करून टाकला आहे. वास्तव संस्कृत वैद्यकांतील शिरा, धमनी, स्रोतस् इत्यादि शब्दांचे इंग्रजीप्रमाणें व्यवस्थित व संकुचित अर्थ करून चालल्यास ग्रंथकर्त्याची विवक्षा चांगली लक्षांत यावयाची नाहीं व अर्वाचीन वैद्यकांतील गोष्टींशीं संस्कृत वैद्यकांतील गोष्टींची एकवाक्यता करण्याचा यत्न केल्यास तो फारच थोड्या ठिकाणीं व अंशतः होऊं शकेल. बऱ्याच ठिकाणीं तो मुळींच होऊं शकत नाहीं. कित्येक लोक संज्ञावाहक स्रोतस्, मनोवह स्रोतस् इ० शब्द आपल्या वैद्यकांत पाहतांच 'कायहो, आपल्या लोकांना Nerves ची माहिती होती!' असा एकदम उद्गार काढतात. ही त्यांची सर्वथैव चूक आहे. वरील चरकांतील उताऱ्याप्रमाणें सर्व शरीर स्रोतोमय आहे, असा एक जंगी सिद्धान्त ठरवून शरीरांत जितक्या क्रिया व पदार्थ आहेत तितक्या सर्वांना कांहीं कांहीं स्रोतें, शिरा व धमन्या ज्यांनीं आपल्या मनःकल्पनेनेंच वांटून दिल्या आहेत, त्यांच्या संज्ञावहस्रोतसांमध्यें अर्थ कितपत असणार हें उघडच आहे. अमुक स्रोतसेंच संज्ञावाहक आहेत, त्यांची उत्पत्ति, गति, आकार, रंग, रूप अमुक असें त्यांनीं थोडेंच सांगितलें आहे. जशी झोंप घेण्याची एक धमनी, जागें होण्याची एक, ओरडण्याची एक, घाम येण्याची एक, बोलण्याची एक, पाणी जाण्याची एक व अन्न जाण्याची एक; तशीच संज्ञा, मन, इंद्रियें इ० वाहण्याचीं स्रोतसें. कल्पनाविजृंभित गोष्टींची प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध झालेल्या गोष्टींशीं सांगड कशी घालतां येईल? चरकानें वर प्रांजलपणें कबूल केलेंच आहे कीं, हृदय, क्लोम, यकृत् इ० जे अवयव सांगितले ते सर्व प्रत्यक्ष आहेत व त्यांच्या पुढील जो शारीराचा भाग ७०० शिरा, २०० धमन्या इत्यादिकांचें वर्णन करणारा तो केवळ तर्क्य आहे. पण त्याची कबुली असो किंवा नसो, जर हल्लीं एखाद्यानें असें सांगितलें कीं, शरीरांतील रक्तवाहिन्यांपैकीं कांहींनीं संधीचें बंधन होतें, कांहींनीं इंद्रियज्ञान होतें, कांहींनीं झोंप घेतां येते, कांहींनीं आपण जागे होतों, कांहींतून पाणी जातें व कांहींतून अन्न जातें; मनुष्याच्या डोक्यांतील मेंदू ज्याच्या त्याच्या एका पसरलेल्या हातांत राहण्याइतका असतो. फुप्फुसाचें काम तृषा लागणें, सांध्यांतील श्लेष्म्याचें काम सांधे एकमेकांस चिकटविणें ( श्लेष्मा परं हि सन्धिबन्धनमिति संग्रहे ). इ० इ० तर अर्वाचीन वैद्यक शिकलेल्यांना तो केवळ मनःकल्पित बोलणारा आहे, असें वाटेल. ह्यासंबंधानें येथें इतका ऊहापोह करण्याचीं कारणें अनेक आहेत. एक तर आपल्या वैद्यकांतील शारीरभागाची वास्तविक योग्यता जुन्या वैद्यांना कळावी; दुसरें असें कीं, कित्येक इंग्रजी वैद्यक अर्धवट शिकलेले वैद्य किंवा संस्कृत वैद्यक वरवर पाहिलेले कांहीं डॉक्टर लोक इंग्रजींत पाहिलेल्या कांहीं नवीन गोष्टी आपल्या वैद्यकांत सांपडतील काय म्हणून व्यर्थ शोध करीत बसतात. एकाची बाल्यावस्था आहे व दुसरें बरेंच वाढलेलें आहे. एकांत कल्पना व आप्त मानलेल्यांच्या वाक्यावर पूर्ण विश्वास यांचेंच विशेष प्राबल्य व दुसऱ्यांत अनुभव व प्रत्यक्ष प्रमाण हीं अधिक प्रमुख, इत्यादि वैषम्याकडे ते लक्ष देत नाहींत. अशा लोकांनीं आर्यवैद्यक वाचतांना किंवा

( पृष्ठ १४८ पाहा. )

६ प्रकार होतात. परंतु सर्वच मर्में प्राणांचीं स्थानें आहेत अशा न्यायानें पाहिलें तर मर्मांचा एकच प्रकार होतो.

**मांसजानि दशेन्द्राख्यतलहृत्स्तनरोहिताः।**

मांसमर्में दहा: इंद्रबस्ति चार, तलहृत् चार व स्तनरोहित दोन.

**शङ्खौ कटीकतरुणे नितम्बावंसयोः फले ॥ ४० ॥**

**अस्थन्यष्टौ**

अस्थिमर्में आठः दोन शंख, दोन कटीकतरुण, दोन नितंब व दोन अंसफलक.

**स्नावमर्माणि त्रयोविंशतिराणयः।**

**कूर्चकूर्चशिरोऽपाङ्गक्षिप्रोत्क्षेपांसबस्तयः॥ ४१ ॥**

स्नायुमर्में तेवीस: चार आणी, चार कूर्च, चार कूर्चशिर, दोन अपांग, चार क्षिप्र, चार उत्क्षेप, दोन अंस व एक बस्ति.

**गुदोपस्तम्भविधुरश्टङ्गाटानि नवादिशेत्।**

**मर्माणि धमनीस्थानि**

धमनीगत मर्में नऊ आहेत: गुद, उपस्तंभ दोन, विधुर दोन व शृंगाटक चार.

**सप्तत्रिंशत्सिराश्रयाः॥ ४२ ॥**

**बृहत्यौ मातृकानीले मन्ये कक्षाधरौ फणौ।**

**विटपे हृदयं नाभिः पार्श्वसन्धी स्तनान्तरे ॥ ४३ ॥**

**अपालापौ स्थपन्यूर्व्यश्चतस्रो लोहितानि च।**

शिरागतमर्में सदतीस आहेत: बृहती दोन, मातृका आठ, नीला दोन, मन्या दोन, कक्षाधृक् दोन, फण दोन, विटप दोन, हृदय, नाभि, पार्श्वसंधि दोन, स्तनमूल दोन, अपालाप दोन, स्थपनी, ऊर्वी चार व लोहित चार.

**सन्धौ विंशतिरावर्तौ मणिबन्धौ कुकुन्दरौ॥ ४४ ॥**

**सीमन्ताः कूर्परौ गुल्फौ कृकाट्यौ जानुनी पतिः।**

संधिमर्में वीस: दोन आवर्त, दोन मणिबंध, दोन कुकुंदर, पांच सीमंत, दोन कोंपरे, दोन घोटे, दोन कृकाटिक, दोन गुडघे व एक अधिपति.

**मांसमर्म गुदोन्येषां स्नाव्नि कक्षाधरौ तथा ॥ ४५ ॥**

**विटपौ विधुराख्ये च श्टङ्गाटानि शिरासु तु।**

**अपस्तम्भावपाङ्गौ च धमनीस्थं न तैः स्मृतम्॥ ४६ ॥**

कित्येकांचें असें मत आहे कीं, गुद हें मांसमर्म आहे, कक्षाधृक्, विटप व विधुर हीं स्नायुमर्में व शृंगाटक, अपस्तंभ व अपांग हीं शिरामर्में आहेत. त्यांच्या मतांत धमनीमर्म मुळींच नाहीं.

**विद्धेऽजस्रमसृक्स्रावो मांसधावनवत्तनुः।**

**पाण्डुत्वमिन्द्रियाज्ञानं मरणं चाशु मांसजे॥ ४७ ॥**

मांसमर्माचा वेध झाला असतां मांस धुतलेल्या पाण्यासारखें पातळ रक्त फार वेळ सतत वाहतें, व मनुष्य पांडुरवर्ण होतो, नेत्रादिक इंद्रियांस त्यांचे विषय कळनासे होतात (डोळ्यानें दिसत नाहीं, कानानें ऐकूं येत नाहीं इ०), व तो मनुष्य लवकरच मरतो.

**मज्जान्वितोऽच्छो विच्छिन्नः स्रावो रुक् चास्थिमर्मणि**

अस्थिगत मर्माचा वेध झाला तर थांबून थांबून (तुटक तुटक) मज्जायुक्त पातळ स्राव होतो व वेदना होते.

**आयामाक्षेपकस्तम्भाः स्नावजेऽभ्यधिकं रुजा ॥ ४८ ॥**

**यानस्थानासनाशक्तिर्वैकल्यमथवाऽन्तकः।**

स्नायुगत मर्माचा वेध झाला असतां धनुर्वात, आचके, तो भाग ताठणें व अतिशय वेदना हे विकार होतात; व जाणेंयेणें, उठणेंबसणें या क्रिया करवत नाहींत. तें गात्र लुलें (विकल) होतें अथवा मनुष्य मरतो.

**रक्तं सशब्दफेनोष्णं धमनीस्थे विचेतसः ॥ ४९ ॥**

धमनीगत मर्माचा वेध झाला असतां मनुष्य बेशुद्ध होतो. फेंसयुक्त व कढत रक्त बाहेर पडतें व रक्त बाहेर येतांना शब्द होतो.

**सिरामर्मव्यधे सान्द्रमजस्रं बह्वसृक् स्रवेत्।**

**तत्क्षयात्तृड्भ्रमश्वासमोहहिध्माभिरन्तकः॥ ५० ॥**

शिरागत मर्माचा वेध झाला असतां एकसारखें दाट रक्त फार स्रवतें, आणि रक्ताचा क्षय झाला असतां तहान, भ्रम, श्वास, मोह व उचकी हे विकार होऊन त्यांनीं मनुष्य मरतो.

**वस्तु शूकैरिवाकीर्णे रूढे च कुणिखञ्जता।**

**वलचेष्टाक्षयः शोषः पर्वशोफश्च सन्धिजे ॥ ५१ ॥**

संधिगत मर्माचा वेध झाला असतां ती जागा भाताच्या तुसानें व्यापिली आहे असें वाटतें, व व्रण भरून आला असतां तो भाग कुबडा किंवा लंगडा होतो; त्याचें बल व चलनवलनशक्ति कमी होते; तो भाग वाळून बारीक होतो व संधि सुजतो.

**नाभिशङ्खाधिपापानहृच्छृङ्गाटकबस्तयः।**

**अष्टौ च मातृकाः सद्यो निघ्नन्त्येकोनविंशतिः॥५२॥**

**सप्ताहः परमस्तेषां कालः कालस्य कर्षणे।**

नाभि, शंख [ २ ], अधिपति, गुद, हृदय, शृंगाटक [ ४ ], बस्ति व आठ मातृका, ह्या एकोणीस मर्मांस वेध झाला असतां मनुष्य तत्काळ मरतो. कदाचित् जगलाच तर सात दिवस जगतो.

**त्रयस्त्रिंशदपस्तम्भतलहृत्पार्श्वसन्धयः ॥ ५३ ॥**

**कटीतरुणसीमन्तस्तनमूलेन्द्रबस्तयः।**

**क्षिप्रापालापबृहतीनितम्बस्तनरोहिताः ॥ ५४ ॥**

**कालान्तरप्राणहरा मासमासार्धजीविताः।**

अपस्तंभ [ २ ], तलहृत् [ ४ ], पार्श्वसंधि [ २ ], कटीकतरुण [ २ ], सीमंत [ ५ ], स्तनमूल [ २ ], इंद्र, बस्ति [ ४ ], क्षिप्र [ ४ ], अपालाप [ २ ], बृहती [ २ ], नितंब [ २ ] व स्तनरोहित [ २ ] ह्या तेहतीस ठिकाणीं वेध झाला असतां कालांतरानें म्हणजे १५ दिवसांनीं किंवा महिन्यानें मनुष्य मरतो.

**उत्क्षेपौ स्थपनी त्रीणि विशल्यघ्नानि तत्र हि ॥ ५५ ॥**

**वायुर्मांसवसामज्जमस्तुलुङ्गानि शोषयन्।**

**शल्यापाये विनिर्गच्छन् श्वासात्कासाच्च हन्त्यसून्॥**

उत्क्षेप [ २ ] व स्थपनी, या तिन्हींचा वेध होऊन आंत गेलेलें शल्य, वेसा, मज्जा व मेंदु यांचें शोषण करणारा वायु बाहेर निघून गेल्यानें व दमा आणि खोकला होऊन मनुष्य मरतो.

**फणावपाङ्गौ विधुरौ नीले मन्ये कृकाटिके।**
**अंसांसफलकावर्तविटपोर्वीकुकुन्दराः ॥ ५७ ॥**
**समानुलोहिताख्याणिकक्षाधृक्कूर्चकूर्पराः।**
**वैकल्यमिति चत्वारि चत्वारिंशच्च कुर्वते ॥ ५८ ॥**
**हरन्ति तान्यपि प्राणान् कदाचिदभिघातत: ।**

फण [ २ ], अपांग [ २ ], विधुर [ २ ], नीला [ २ ], मन्या [ २ ], कृकाटिका [ २ ], अंस [ २ ], अंसफलक [ २ ], आवर्त [ २ ], विटप [ २ ], ऊर्वी [ ४ ], कुकुंदर [ २ ], गुडघे [ २ ], लोहित [ ४ ], आणी [ ४ ], कक्षाधृक् [ २ ], कूर्च [ ४ ], कोंपर [ २ ] या ४४ मर्मांवर अभिघात झाला असतां तो तो भाग विकल (लुला) होतो, व कधीं कधीं मनुष्य मरतो.

**अष्टौ कूर्चशिरोगुल्फमणिबन्धा रुजाकराः ॥ ५९ ॥**

कूर्चशिर [ ४ ], गुल्फ [ २ ] व मणिबंध [ २ ] ह्या आठ मर्मांचा वेध झाला असतां वेदना होते.

**तेषां विटपकक्षाधृगूर्व्यः कूर्चशिरांसि च ।**
**द्वादशाङ्गुलमानानि**

त्यांत विटप, कक्षाधृक्, ऊर्वी व कूर्चशिर हीं मर्में बारा अंगुलें आहेत.

**द्व्यङ्गुले मणिबन्धने ॥ ६० ॥**
**गुल्फौ च स्तनमूले च**

मनगटें, घोटे व स्तनमूल, हीं मर्में दोन बोटें आहेत.

**त्र्यङ्गुलौ जानुकूर्परौ ।**

गुडघे व कोंपर हीं मर्में तीन बोटें आहेत.

**अपानबस्तिहृन्नाभिनीलाः सीमन्तमातृकाः ॥ ६१ ॥**
**कूर्चशृङ्गाटमन्याश्च त्रिंशदेकेन वर्जिताः ।**
**आत्मपाणितलोन्मानाः**

गुद, बस्ति, हृदय, नाभि, नीळा, सीमंत, मातृका, कूर्च, शृंगाटक व मन्या हीं एकोणतीस मर्में ज्याच्या त्याच्या तळहाताइतकीं असतात.

**शेषाण्यर्धाङ्गुलं वदेत् ॥ ६२ ॥**
**पञ्चाशत् षट् च मर्माणि**

बाकीचीं ५६ मर्में अर्धबोट आहेत.

**तिलव्रीहिसमान्यपि।**
**इष्टानि मर्माण्यन्येषां**

दुसऱ्या कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं, तीं मर्में तीळ व भात यांच्या इतकीं आहेत.

**चतुर्थोक्ताः सिरास्तु याः ॥ ६३ ॥**
**तर्पयन्ति वपुः कृत्स्नं ता मर्माण्याश्रितास्ततः।**
**तत्क्षतात्क्षतजात्यर्थप्रवृत्तेर्धातुसङ्क्षये ॥ ६४ ॥**
**वृद्धश्चलो रुजस्तीव्राः प्रतनोति समीरयन् ।**
**तेजस्तदुद्धुतं धत्ते तृष्णाशोपमदभ्रमान् ॥ ६५ ॥**
**स्विन्नस्रस्तश्लथतनुं हरत्येनं ततोऽन्तकः।**

सर्व शरीराचें तर्पण (पोषण) करणाऱ्या मागें ज्या चार प्रकारच्या शिरा सांगितल्या आहेत त्या मर्मांवरून गेलेल्या आहेत, त्यामुळें मर्मांवर क्षत (व्रण) झाला असतां वायूचा कोप होऊन नानाप्रकारच्या तीव्र वेदना होतात, त्यामुळें पित्त वाढतें व तहान, क्षय, मद व भ्रम हे विकार उत्पन्न होतात, व मनुष्याचें शरीर घामानें चिपचिपीत (विगलित) व शिथिल होऊन मनुष्य मरतो.

**वर्धयेत्सन्धितो गात्रं मर्मण्यभिहते द्रुतम् ॥ ६६ ॥**
**छेदनात्सन्धिदेशस्य सङ्कुचन्ति सिरा ह्यतः।**
**जीवितं प्राणिनां तत्र रक्ते तिष्ठति तिष्ठति ॥ ६७ ॥**

मर्मास आघात झाला असतां त्वरेनें तो भाग सांध्यापासून तोडून निराळा काढावा; कारण सांध्याचा छेद केला असतां शिरांचा संकोच होतो व संकोच झाला म्हणजे रक्त बंद होतें व रक्त बंद झालें असतां मनुष्य वांचतो. कारण रक्त हें प्राण्याचें जीवन होय.

**सुविक्षतोऽप्यतो जीवेदमर्माणि न मर्मणि।**
**प्राणघातिनि जीवेत्तु कश्चिद्वैद्यगुणेन चेत् ॥ ६८ ॥**
**असमग्राभिघाताच्च सोऽपि वैकल्यमश्नुते ।**
**तस्मात् क्षारविषाग्न्यादीन् यत्नान्मर्मसु वर्जयेत् ६९**

म्हणून ज्या ठिकाणीं मर्म नाहीं अशा जागीं बराच मोठा जरी व्रण झाला तरी मनुष्य जगतो; परंतु तोच व्रण प्राणघातक मर्मांवर झाला तर तो वांचत नाहीं. प्राणघातक मर्मांस आघात झाला असतां वैद्याच्या कौशल्यानें आणि आघाताच्या अल्पतेमुळें जरी कदाचित् एखादा मनुष्य वांचला तरी तो विकल (लुला) होतो. यासाठीं क्षार, अग्नि, विष इत्यादिकांची मर्मांवर योजना करूं नये.

**मर्माभिघातः स्वल्पोऽपि प्रायशो बाधतेतराम्।**
**रोगा मर्माश्रितास्तद्वत्प्रक्रान्ता यत्नतोऽपि च ॥ ७० ॥**

मर्मांवर थोडा जरी आघात झाला तरी बहुधा फारच पीडा होते आणि त्याचप्रमाणें मर्मांवर झालेल्या रोगांची मोठ्या यत्नानें जरी चिकित्सा केली तरी पीडा फार होते.

---

# पञ्चमोऽध्यायः

## अध्याय ५ वा.

### अथातो विकृतिविज्ञानीयं शारीरं व्याख्यास्यामः।

आतां विकृति [ मृत्युचिन्हें ] समजण्याचें शारीर सांगतों.

**पुष्पं फलस्य धूमोऽग्नेर्वर्षस्य जलदोदयः ।**
**यथा भविष्यतो लिङ्गं रिष्टं मृत्योस्तथा ध्रुवम् ॥ १ ॥**

पुढें होणाऱ्या फळांचें पूर्वचिन्ह जसें फूल, अग्नीचें सूचक धूर व पावसाचें अभ्र, त्याचप्रमाणें रिष्ट हें पुढें होणाऱ्या मृत्यूचें चिन्ह होय.

**अरिष्टं नास्ति मरणं दृष्टरिष्टं च जीवितम् ।**

रिष्ट चिन्ह झाल्यावांचून मृत्यु नाहीं व रिष्ट चिन्ह झाल्यावर जीवित्व नाहीं.

**अरिष्टं रिष्टविज्ञानं न च रिष्टेऽप्यनैपुणात् ॥ १ ॥**

रिष्ट चिन्हाची बरोबर माहिती नसल्यास रिष्ट नसतांनाहि आहे असें वाटतें, व असतांनाहि नाहीं असें वाटतें.

**केचित्तु तद्विधेत्याहुः स्थाय्यस्थायिविभेदतः ।**

कोणी रिष्टाचे स्थायि व अस्थायि असे दोन प्रकार मानितात.

**दोषाणामपि बाहुल्याद्रिष्टाभासः समुद्भवेत् ॥ २ ॥**
**स दोषाणां शमे शाम्येत्स्थाय्यवश्यं तु मृत्यवे ।**

दोषांची अतिशय वृद्धि झाली असतां रिष्टाचा भास होतो, परंतु दोषांचा शम झाला असतां तीं चिन्हें नाहींशीं होतात. त्यांस अस्थायि [ रिष्ट ] म्हणतात; व जीं चिन्हें झालीं असतां रोगी हटकून मरावयाचाच त्यांस स्थायि म्हणतात.

**रूपेन्द्रियस्वरच्छायाप्रतिच्छायाक्रियादिषु ॥ ४ ॥**
**अन्येष्वपि च भावेषु प्राकृतेष्वनिमित्ततः ।**
**विकृतिर्या समासेन रिष्टं तदिति लक्षयेत् ॥ ५ ॥**

रूप, इंद्रिय, स्वर, वर्ण [ छाया ], पडछाया [ सावली ], शारीरमानसादि क्रिया इत्यादि व दुसऱ्याहि शरीरसंबंधीं ज्या स्वाभाविक गोष्टी त्याच्या ठिकाणीं कारणावांचून विकृति होणें हें संक्षेपतः रिष्टाचें लक्षण होय.

**केशरोम निरभ्यङ्गं यस्याऽभ्यक्तमिवेक्ष्यते ।**

स्नेह लाविल्यावांचून ज्याचे केंस व रोम [ आंखूड केंस ] स्नेह लाविल्यासारखे दिसतात—

**यस्यात्यर्थं चले नेत्रे स्तब्धान्तर्गतनिर्गते ॥ ६ ॥**
**जिह्मे विस्तृतसङ्क्षिप्ते सङ्क्षिप्तविनतभ्रुणी ।**
**उद्भ्रान्तदर्शने हीनदर्शने नकुलोपमे ॥ ७ ॥**
**कपोताभे अलाताभे स्रुते लुलितपक्ष्मणी ।**

ज्याचे डोळे फार चंचल, स्तब्ध, खोल गेलेले, वर आलेले, वांकडे विस्तृत व संकुचित होतात; तसेंच भिंवया संकुचित व खालीं पडल्यासारख्या होतात; ज्याला पदार्थ फिरल्यासारखे किंवा मंद दिसतात; डोळे मुंगुसासारखे, खबुतरासारखे, निखाऱ्यासारखे व स्रावयुक्त होतात आणि पापण्या गळल्यासारख्या (लुल्या) होतात—

**नासिकाऽत्यर्थविवृता संवृता पिटिकाचिता ॥ ८ ॥**
**उच्छूना स्फुटिता म्लाना**

ज्याचें नाक फार विस्तृत, संकुचित, पुळ्यांनीं युक्त, सुजलेलें, चिरा पडलेलें किंवा चिंबलेलें होतें—

**यस्यौष्ठो यात्यधोऽधरः ।**
**ऊर्ध्वं द्वितीयः स्यातां वा पक्वजम्बूनिभावुभौ ॥ ९ ॥**

ज्याचा खालचा ओंठ खालीं व वरचा वर जातो अथवा दोन्ही पिकलेल्या जांभळासारखे होतात—

**दन्ताः सशर्कराः श्यावास्ताम्राः पुष्पितपङ्क्तिताः ।**
**सहसैव पतेयुर्वा**

ज्याच्या दांतावर कीट येतें व ते काळे, लाल, फुटल्यासारखे, किंवा चिखल लागल्यासारखे होतात किंवा एकाएकीं कारणावांचून पडतात—

**जिह्वा जिह्मा विसर्पिणी ॥ १० ॥**
**श्वेता शुष्का गुरुः श्यावा लिप्ता सुप्ता सकण्टका ।**

ज्याची जीभ वांकडी, चंचल, पांढरी, कोरडी, जड, काळी, लिप्त ( सारवल्यासारखी ), सुप्ता ( बधिर ), कांटे आलेली अशी होते—

**शिरः शिरोधरा वोढुं पृष्ठं वा भारमात्मनः ॥ ११ ॥**
**हनू वा पिण्डमास्यस्थं शक्नुवन्ति न यस्य च ।**

ज्याच्या मानेवर डोकें सांवरत नाहीं, पाठीस स्वतःचा, मानेचा व डोक्याचा भार सोसत नाहीं किंवा जबड्यास तोंडांतला घांस सावरत नाहीं—

**यस्यानिमित्तमङ्गानि गुरूण्यतिलघूनि वा ॥ १२ ॥**
**विषदोषाद्विना यस्य खेभ्यो रक्तं प्रवर्तते ।**

कारणांवांचून ज्याचीं अंगें अतिशय जड किंवा अतिशय हलकीं होतात; व ज्याच्या नासादि स्रोतसांतून विषदोषावांचून अतिशय रक्तस्राव होतो—

**उत्सिक्तं मेहनं यस्य वृषणावतिनिःसृतौ ॥ १३ ॥**
**अतोऽन्यथा वा यस्य स्यात्**

ज्याचें शिस्न फार वर किंवा खालीं जातें व वृषण फार खालीं किंवा वर जातात—

**सर्वे ते कालचोदिताः ।**

त्या सर्वांस (‘केशरोम निरभ्यङ्गं’ इत्यादीपासून ) यमाचें आमंत्रण आलें असें समजावें. ( तो एका वर्षाचे आंत मरणार असें समजावें ).

**यस्यापूर्वाः सिरालेखा बालेन्द्वाकृतयोऽपि वा ॥ १४ ॥**
**ललाटे वस्तिशीर्षे वा षण्मासान्न स जीवति ।**

ज्याच्या कपाळावर अथवा बस्तीच्या वरच्या अंगीं अकस्मात् शिरांच्या रांगा उठतात अथवा बालचंद्रासारख्या आकृति उठतात, तो सहा महिन्यांवर वांचत नाहीं.

**पद्मिनीपत्रवत्तोयं शरीरं यस्य देहिनः ॥ १५ ॥**
**प्लवेत प्लवमानस्य षण्मासं तस्य जीवितम् ।**

पाण्यांत स्नान करीत असतां ज्याच्या अंगावर कमळाच्या पानाप्रमाणें पाणी ठरत नाहीं तो सहा महिने वांचेल.

**हरिताभाः सिरा यस्य रोमकूपाश्च संवृताः ॥ १६ ॥**

**सोऽम्लाभिलाषी पुरुषः पित्तान्मरणमश्नुते ।**

ज्याच्या अंगावर हिरव्या शिरा दिसतात, व ज्याचीं केशरंध्रें बंद (संवृत) असतात त्यास, आंबट पदार्थांची इच्छा होऊन तो पित्तानें मरतो.

**यस्य गोमयचूर्णाभं चूर्णं मूर्ध्नि मुखेऽपि वा ॥ १७ ॥**
**सस्नेहं मूर्ध्नि धूमो वा मासान्तं तस्य जीवितम् ।**

ज्याच्या डोक्यावर व तोंडांत गाईच्या शेणाच्या चूर्णासारखें स्नेहयुक्त चूर्ण दिसतें, व ज्याच्या डोक्यांतून धुरासारख्या वाफा निघतात तो एक महिना वांचेल.

**मूर्ध्नि भ्रुवोर्वा कुर्वन्ति सीमन्तावर्तका नवाः ॥ १८ ॥**
**मृत्युं स्वस्थस्य षड्रात्रात्त्रिरात्रादातुरस्य तु ।**

ज्याच्या डोक्यावर व भिंवईवर एकाएकीं नवेच भांग व भोंवरे (केंसांचे) होतात तो निरोगी असल्यास सहा दिवसांनीं व रोगी असल्यास तीन दिवसांनीं मरेल.

**जिह्वा श्यावा मुखं पूति सव्यमक्षि निमज्जति ॥ १९ ॥**
**खगा वा मूर्ध्नि लीयन्ते यस्य तं परिवर्जयेत् ।**

ज्याची जीभ काळी, तोंड दुर्गंधि व डावा डोळा खोल गेलेला असें होतें, व ज्याच्या डोक्यावर पक्षी बसतात अशा रोग्यास सोडावा.

**यस्य स्नातानुलिप्तस्य पूर्वं शुष्यत्युरो भृशम् ॥ २० ॥**
**आर्द्रेषु सर्वगात्रेषु सोऽर्धमासं न जीवति ।**

स्नान करून अंगास चंदनादि उटी लाविली असतां पहिल्यानें ऊर मात्र लवकर वाळतें, व बाकीचें सर्व शरीर ओलें असतें, तो पंधरा दिवस वांचावयाचा नाहीं.

**अकस्माद्युगपद्गात्रे वर्णौ प्राकृतवैकृतौ ॥ २१ ॥**
**तथैवोपचयग्लानिरौक्ष्यस्नेहादि मृत्यवे ।**

कारणावांचून व एकदम ज्याच्या अंगावर स्वाभाविक (गौरादि) व विकृत (निळा, तांबडा इ०) वर्ण दिसतात. तसेंच पुष्टि व ग्लानि, रूक्षता व स्निग्धता, हे परस्पर विरुद्ध प्रकार एकदम ज्यास होतात तो मरणार असें समजावें.

**यस्य स्फुटेयुरङ्गुल्यो नाकृष्टा न स जीवति ॥ २२ ॥**

ज्याचीं बोटें मोडलीं असतां वाजत नाहींत तो मरणार असें समजावें.

**क्षयकासादिषु तथा यस्यापूर्वो ध्वनिर्भवेत् ।**
**ह्रस्वो दीर्घोऽति वोच्छ्वासः पूतिः सुरभिरेव वा ॥ २३ ॥**
**आप्लुतानाप्लुते काये यस्य गन्धोऽतिमानुषः ।**

**मलवस्त्रव्रणादौ वा वर्षान्तं तस्य जीवितम् ॥ २४ ॥**

शिंक, खोकला इत्यादिकांत ज्याचा अपूर्व [पूर्वी कधीं झाला नाहीं असा चमत्कारिक] शब्द निघेल, ज्याचा श्वास अतिशय मंद [ऱ्हस्व], अतिशय दीर्घ [लांब], अतित्वरित, दुर्गंधि किंवा सुगंधि असतो, तसेंच स्नान केल्यावर अथवा न करतां ज्याच्या अंगास मनुष्याहून निराळ्या तऱ्हेचा वास येतो तो, व ज्याच्या मळास, वस्त्रांस व व्रणादिकांस अशाच तऱ्हेचा वास येत आहे तो, हे सर्व वर्षपर्यंत वांचावयाचे.

**भजन्तेऽत्यङ्गसौरस्याद्यं यूकामक्षिकादयः ।**
**त्यजन्ति वाऽतिवैरस्यात्सोऽपि वर्षं न जीवति ॥ २५ ॥**
**सततोष्मसु गात्रेषु शैत्यं यस्योपलक्ष्यते ।**
**शीतेषु भृशमौष्ण्यं वा स्वेदः स्तम्भोऽप्यहेतुकः । २६ ।**

अतिशय सुरसपणा (चांगल्या रुची) मुळें उवा, माशा, लिखा इत्यादि ज्याच्या अंगावर अतिशय उत्पन्न होतात, आणि अतिविरस-पणामुळें त्याच ज्याच्या शरीरास अगदीं सोडतात (माशा अंगावर मुळींच बसत नाहींत), तोहि वर्षभर वांचणार नाहीं. नेहमीं ज्याचें शरीर उष्ण असून एकाएकीं अतिशय गार होतें; व नेहमीं गार असून एकाएकीं अतिशय उष्ण होतें तो व ज्यास कारणावांचून अतिशय घाम येतो किंवा घाम येण्याचे उपाय करूनहि मुळींच घाम येत नाहीं तो, हे सर्व वर्षभर वांचावयाचे नाहींत.

**यो जातशीतपिटिकः शीताङ्गो वा विदह्यते ।**
**उष्णद्वेषी च शीतार्तः स प्रेताधिपगोचरः ॥ २७ ॥**

अंगावर थंड पुळ्या उठल्या असून, व अंग गार असून ज्याच्या अंगाचा दाह होतो, व थंडीनें पीडिला असून उष्णाचा द्वेष करितो, तो मृत्यूच्या कबजांत सांपडला असें समजावें.

**उरस्यूष्मा भवेद्यस्य जठरे चातिशीतता ।**
**भिन्नं पुरीषं तृष्णा च यथा प्रेतस्तथैव सः ॥ २८ ॥**

ज्याचें ऊर उष्ण असून पोट अतिशय गार असतें, व ज्यास जुलाब (शौचास पातळ होणें) होत असून तहान असते तो प्रेतासमान जाणावा.

**मूत्रं पुरीषं निष्ठ्यूतं शुक्रं वाऽप्सु निमज्जति ।**
**निष्ठ्यूतं बहुवर्णं वा यस्य मासात्स नश्यति ॥ २९ ॥**

मल, मूत्र, थुंकी व शुक्र हीं ज्याचीं पाण्यांत बुडतात, किंवा थुंकींत अनेक प्रकारचे रंग असतात तो एक महिन्यानें मरेल.

**घनीभूतमिवाकाशमाकाशमिव यो घनम् ।**
**अमूर्तमिव मूर्तं च मूर्तं चामूर्तवत्स्थितम् ॥ ३० ॥**
**तेजस्व्यतेजस्तद्वच्च शुक्लं कृष्णमसच्च सत् ।**
**अनेत्ररोगश्चन्द्रं च बहुरूपमलाञ्छनम् ॥ ३१ ॥**
**जाग्रद्रक्षांसि गन्धर्वान् प्रेतानन्यांश्च तद्विधान् ।**
**रूपं व्याकृति तद्वच्च यः पश्यति स नश्यति ॥ ३१ ॥**

ज्याला आकाश घनपदार्थप्रमाणें व घनपदार्थ आकाशाप्रमाणें (शून्य), निराकार पदार्थ साकार व साकार ते निराकार, तेजस्वी पदार्थ निस्तेज व पांढरे पदार्थ काळे दिसतात; व ज्यास नसणाऱ्या पदार्थांचा प्रत्यक्षाप्रमाणें भास होतो, व नेत्ररोग (तिमिरादि) नसतांहि ज्यास अनेक चंद्र दिसतात व चंद्रावरचा डाग दिसत नाहीं; जो जागा असतांनाच राक्षस, गंधर्व, पिशाच्च, प्रेत इत्यादिकांस

पाहतो, व पाहण्यास भयंकर असें रूप ज्यास दिसतें ते सर्व मरणार असे समजावें. ( एक वर्षाचे आंत. )

**सप्तर्षीणां समीपस्थां यो न पश्यत्यरुन्धतीम् ।**
**ध्रुवमाकाशगङ्गां वा स न पश्यति तां समाम् ॥ ३३॥**

आकाशांतील सप्तर्षींच्या जवळचा अरुंधतीचा तारा, ध्रुवाचा तारा व आकाशगंगा हीं ज्यास दिसत नाहींत तो एक वर्षाच्या आंत मरेल.

**मेघतोयौघनिर्घोषवीणापणववेणुजान् ।**
**शृणोत्यन्यांश्च यः शब्दानसतो न सतोऽपि वा ॥३४॥**
**निपीड्य कर्णौ शृणुयान्न यो धुकधुकस्वनम् ।**
**तद्वद्गन्धरसस्पर्शान् मन्यते यो विपर्ययात् ॥ ३५ ॥**
**सर्वशो वा न यो यश्च दीपगन्धं न जिघ्रति ।**
**विधिना यस्य दोषाय स्वास्थ्यायाविधिना रसाः ३६**
**यः पांसुनेव कीर्णाङ्गो योऽङ्गघातं न वेत्ति वा ।**
**अन्तरेण तपस्तीव्रं योगं वा विधिपूर्वकम् ॥ ३७ ॥**
**जानात्यतीन्द्रियं यश्च तेषां मरणमादिशेत् ।**

ज्यास मेघांचा गडगडाट, पाण्याच्या प्रवाहाचा शब्द, वीणा, पणव व वेणुवाद्य यांचे शब्द नसतांहि ऐकूं येतात, व विद्यमान असतांहि ऐकूं येत नाहीं, कानांत बोटें घातलीं असतां ज्यास धुकधुक शब्द ऐकूं येत नाहीं, गंध, रस व स्पर्श हे ज्यास आहेत त्याच्या विपरीत भासतात, किंवा गंध, रस व स्पर्श यांचें मुळींच ज्ञान होत नाहीं, दिवा मालविला असतां त्याची ज्यास घाण येत नाहीं, यथाशास्त्र (तत्तद्दोषघ्न) रस दिले असतांहि ज्याचे दोष वाढतात व तद्विपरीत रस दिले असतां त्या दोषांचा उपशम होतो, ज्याचें अंग धुळीनें माखल्यासारखें दिसतें, ज्यास अंगावर आघात झाला असतां कळत नाहीं, तीव्र तपावांचून किंवा यथाविधि योगाभ्यासावांचून ज्यास अतींद्रियज्ञान होतें, हे सर्व मरणार असें समजावें.

**हीनो दीनः स्वरोऽव्यक्तो यस्य स्याद्गद्गदोऽपि वा ॥३८॥**
**सहसा यो विमुह्येद्वा विवक्षुर्न स जीवति ।**

ज्याचा स्वर हीन ( कमी ), दीन ( दैन्ययुक्त ), अस्पष्ट अथवा गद्गद ( घर्घर किंवा अडखळत ) असा होतो व जो बोलूं लागला असतां ज्याच्यानें एकदम बोलवेनासें होतें तो लवकरच मरणार असें समजावें.

**स्वरस्य दुर्बलीभावं हानिं वा बलवर्णयोः ॥ ३९ ॥**
**रोगवृद्धिमयुक्त्या च दृष्ट्वा मरणमादिशेत् ।**

कारणावांचून स्वर दुर्बळ होणें, बळ व वर्ण यांचा क्षय होणें आणि रोगाची वृद्धि होणें हीं लक्षणें पाहून रोगी मरणार असें समजावें.

**अपस्वरं भाषमाणं प्राप्तं मरणमात्मनः ॥ ४० ॥**
**श्रोतारं चास्य शब्दस्य दूरतः परिवर्जयेत् ।**

मी मरणार असे दुष्ट शब्द बोलणारा व असेच शब्द ऐकणारा मनुष्य वैद्यानें दुरूनच सोडावा.



**संस्थानेन प्रमाणेन वर्णेन प्रभयाऽपि वा ॥ ४१ ॥**
**छाया विवर्तते यस्य स्वप्नेऽपि प्रेत एव सः ।**

आकृतीनें, प्रमाणानें, रंगानें व तेजानें, ज्याची छाया बदलते, मग तो निजला असो किंवा जागा असो, तो गेलाच असें समजावें.

**आतपादर्शतोयादौ या संस्थानप्रमाणतः ॥ ४२ ॥**
**छायाङ्गात्सम्भवत्युक्ता प्रतिच्छायेति सा पुनः ।**
**वर्णप्रभाश्रया या तु सा च्छायैव शरीरगा ॥ ४३ ॥**

ऊन ( आतप ), आरसा, पाणी इत्यादिकांमध्यें शरीराच्या आकृति व प्रमाणानुरूप जी छाया उत्पन्न होते, तिला प्रतिच्छाया ( पडछाया ) असें म्हणतात; आणि जी शरीरावरच असून वर्ण व तेज यांवर अवलंबून असते, तिला छाया असें म्हणतात.

**भवेद्यस्य प्रतिच्छाया च्छिन्ना भिन्नाधिकाऽकुला ।**
**विशिरा द्विशिरा जिह्मा विकृता यदि वाऽन्यथा ॥४४॥**
**तं समाप्तायुषं विद्यान्न चेल्लक्ष्यनिमित्तजा ।**

ज्याची सावली दृश्य कारणावांचून तुटलेली, मोडलेली, मोठी, हालणारी, डोकें नाहीं अशी, दोन डोकीं आहेत अशी, वांकडी अथवा दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें बिघडलेली अशी दिसते, त्याचें आयुष्य संपलें असें समजावें.

**प्रतिच्छायामयी यस्य न चाक्ष्णीक्ष्येत कन्यका ॥४५॥**

ज्याच्या डोळ्यांत पाहणाराचें प्रतिबिंब ( बाहुली ) दिसत नाहीं, त्याचें आयुष्य सरलें असें समजावें.

**खादीनां पञ्च पञ्चानां छाया विविधलक्षणाः ।**

आकाशादि पंचमहाभूतांच्या ज्या पांच छाया त्यांचीं वेगळालीं लक्षणें येणेंप्रमाणें:—

**नाभसी निर्मला नीला सस्नेहा सप्रभेव च ॥ ४६ ॥**

आकाशाची छाया स्वच्छ, निळी, किंचित् स्नेहयुक्त व तेजस्वी अशी दिसते.

**वाताद्रजोऽरुणा श्यावा भस्मरूक्षा हतप्रभा ।**

मळकट, तांबूस, काळसर, राखेप्रमाणें रूक्ष व निस्तेज अशी जी छाया ती वायूची होय.

**विशुद्धरक्ता त्वाग्नेयी दीप्ताभा दर्शनप्रिया ॥ ४७ ॥**

अग्नीची छाया शुद्धरक्ताप्रमाणें लाल, चकचकीत व डोळ्यांस आवडणारी अशी असते.

**शुद्धवैदूर्यविमला सुस्निग्धा तोयजा सुखा ।**

पाण्याची छाया शुद्ध वैदुर्या ( लसण्या ) प्रमाणें स्वच्छ, चांगली, स्निग्ध व प्रिय ( सुखकारक ) अशी असते.

**स्थिरा स्निग्धा घना शुद्धा श्यामा श्वेता च पार्थिवी**

स्थिर, स्निग्ध, घन ( दाट ), शुद्ध, सांवळी व पांढरी जी छाय ती पृथ्वीची होय.

**वायवी रोगमरणक्लेशायान्याः सुखोदयाः ।**

वायूची छाया रोग, मरण व क्लेश ( दुःख ) हीं देणारी आहे, व बाकीच्या चार छाया सुखकारक होत.

**प्रभोक्ता तैजसी सर्वा सा तु सप्तविधा स्मृता ॥ ४९ ॥**

सर्व प्रभा तैजसी ( अग्निगुणात्मक, तेजोभूयिष्ठ ) कला होत व त्या सात् प्रकारच्या आहेत.

**रक्ता पीता सिता श्यामा हरिता पाण्डुराऽसिता ।**

लाल, पिंवळी, पांढरी, सांवळी, हिरवी, गौर व काळी हे प्रभेचे सात प्रकार होत.

**तासां या स्युर्विकासिन्यः स्निग्धाश्च विमलाश्च याः ५०**
**ताः शुभाः**

त्यांत ज्या स्निग्ध व स्वच्छ असून, ज्यांचें तेज फांकतें त्या शुभ होत.

**मलिना रूक्षाः सङ्क्षिप्ताश्चासुखोदयाः ।**

व ज्या मळकट व रूक्ष असून ज्यांचें तेज फांकत नाहीं त्या अशुभकारक होत.

**वर्णमाक्रामति च्छाया प्रभा वर्णप्रकाशिनी ॥ ५१ ॥**

छाया वर्णास झांकिते ( छायेचा पगडा वर्णावर बसतो ) व प्रभा वर्णास प्रकाशित करते ( प्रभेनें वर्ण जास्त खुलतो ).

**आसन्ने लक्ष्यते च्छाया विकृष्टे भा प्रकाशते ।**

छाया जवळ समजते व प्रभा दुरून चमकते.

**नाच्छायो नाप्रभः कश्चिद्विशेषाश्चिह्नयन्ति तु ॥ ५२ ॥**
**नृणां शुभाशुभोत्पत्तिं काले च्छायासमाश्रयाः ।**

ज्यास छाया नाहीं व प्रभा नाहीं असा पुरुषच नाहीं. छायेचे जे विशेष प्रकार ते विशेषप्रसंगीं मनुष्यांची शुभोत्पत्ति किंवा अशुभोत्पत्ति दर्शित करतात.

**निकषन्निव यः पादौ च्युतांसः परिसर्पति ॥ ५३ ॥**
**हीयते बलतः शश्वद्योऽन्नमश्नन् हितं बहु ।**
**योऽल्पाशी बहुविण्मूत्रो बह्वाशी चाल्पमूत्रविद् ॥५४॥**
**योऽल्पाशी वा कफेनार्तो दीर्घं श्वसिति चेष्टते ।**
**दीर्घमुच्छ्वस्य यो ह्रस्वं निःश्वस्य परिताम्यति ॥५५॥**
**ह्रस्वं च यः प्रश्वसिति व्याविद्धं स्पन्दते भृशम् ।**
**शिरो विक्षिपते कृच्छ्राद्योऽञ्चयित्वा प्रपाणिकौ ॥५६॥**
**यो ललाटात्स्रुतस्वेदः श्लथसन्धानबन्धनः ।**
**उत्थाप्यमानः संमुह्येद्यो बली दुर्बलोऽपि वा ॥ ५७ ॥**
**उत्तान एव स्वपिति यः पादौ विकरोति च ।**
**शयनासनकुड्यादौ योऽसदेव जिघृक्षति ॥ ५८ ॥**
**अहास्यहासी सम्मुह्यन् यो लेढि दशनच्छदौ ।**
**उत्तरोष्ठं परिलिहन् फूत्कारांश्च करोति यः ॥ ५९ ॥**
**यमभिद्रवति च्छाया कृष्णा पीताऽरुणाऽपि वा ।**
**भिषग्भेषजपानान्नगुरुमित्रद्विषश्च ये ॥ ६० ॥**
**वशगाः सर्व एवैते विज्ञेयाः समवर्तिनः ।**

खांदे गळले असून जो पायांनीं फरपटत चालतो, नेहमीं हितकारक व पुष्कळ अन्न खात असतांहि ज्याची शक्ति कमी होते, थोडें खात असतांहि ज्यास मल व मूत्र फार होतें, फार खात असतांहि ज्यास मल व मूत्र थोडें होतें, थोडें खाणारा असून कफानें पीडिल्यामुळें जो दीर्घ श्वास टाकितो व गडबडां लोळतो, जो दीर्घ श्वास बाहेर टाकितो व ऱ्हस्व श्वास आंत घेतो व तळमळतो, जो ऱ्हस्व श्वास टाकितो व वारंवार एकसारखा वेडेंवांकडें कांपतो, जो मोठ्या कष्टानें डोकें वरखालीं करितो व हाताच्या मुठी वळतो, ज्याच्या कपाळावरून घामाच्या धारा वाहतात व ज्याचीं संधिबंधनें शिथिल होतात, बलवान् असो किंवा दुर्बल असो, उठवीत असतां ज्यास मूर्च्छा येते, जो नेहमीं उताणाच निजतो व पाय वेडेवांकडे टाकितो, जो अंथरूण, आसन, भिंत इत्यादिकांवर कांहीं नसतांहि आहे असें समजून तें घेऊं लागतो, जो कारणावांचून हंसतो व मूर्च्छित होतो आणि जिभेनें ओंठ चाटतो, जो वरच्या ओंठास जिभेनें स्पर्श करून फूत्कारयुक्त नानाप्रकारचे शब्द करितो, ज्याची कांति ( छाया ) काळी, पिंवळी किंवा तांबूस वर्णाची होते, व जो वैद्य, औषध, पान [ पिण्याचें जलादि द्रव्य ], अन्न, गुरु [ आई, बाप, शिक्षक इत्यादि वडील मनुष्यें ] व मित्र यांचा द्वेष करितो तो यमाच्या स्वाधीन झाला असें समजावें.

**ग्रीवाललाटहृदयं यस्य स्विद्यति शीतलम् ॥ ६१ ॥**
**उष्णोऽपरः प्रदेशश्च शरणं तस्य देवता ।**

ज्याचा गळा, कपाळ व हृदय हीं थंड असून त्यांस घाम येतो व बाकीचा सर्व देह उष्ण असतो, त्यास देवाज्ञा होणार असें समजावें.

**योऽणुज्योतिरनेकाग्रो दुश्छायो दुर्मनाः सदा ॥ ६२ ॥**
**बलिं बलिभुजो यस्य प्रणीतं नोपभुञ्जते ।**
**निर्निमित्तं च यो मेधां शोभामुपचयं श्रियम् ॥ ६३ ॥**
**प्राप्नोत्यतो वा विभ्रंशं स प्राप्नोति यमक्षयम् ।**

ज्याची दृष्टि ( किंवा तेज ) कमी होते, चित्त व्यग्र असतें व जो नेहमीं शोकग्रस्त असतो, ज्याची छाया अगदीं वाईट होते, ज्याच्या नांवानें घातलेला भात कावळे खात नाहींत, कारणावांचून ज्यास मेधा ( धारणाशक्ति ), शोभा, पुष्टि व ऐश्वर्य हीं प्राप्त होतात, किंवा कारणावांचून तीं नाहींशीं होतात तो यमाच्या घरीं जातो.

**गुणदोषमयी यस्य स्वस्थस्य व्याधितस्य वा ॥ ६४ ॥**
**यात्यन्यथात्वं प्रकृतिः षण्मासान्न स जीवति ।**

ज्याची मानसिक ( सत्त्वरजस्तमात्मक ) किंवा शारीरिक ( वातपित्तकफात्मक ) प्रकृति विपरीत होते, मग तो रोगी असो अथवा निरोगी असो, तो सहा महिन्यांवर वांचावयाचा नाहीं.

**भक्तिः शीलं स्मृतिस्त्यागो बुद्धिर्बलमहेतुकम् ॥ ६५ ॥**
**षडेतानि निवर्तन्ते षड्भिर्मासैर्मरिष्यतः ।**

भक्ति ( गुर्वादिकांच्या ठायीं पूज्यबुद्धि ), शील ( सुस्वभाव )

स्मरणशक्ति, दातृत्व, बुद्धि व बल हीं ज्याचीं कारणांवांचून नाहींशीं होतात तो सहा महिन्यांनीं मरणार असें समजावें.

मत्तवद्गतिवाक्कम्पमोहा मासान्मरिष्यतः ॥ ६६ ॥

दारू प्यालेल्या मनुष्याप्रमाणें ज्याची गति व वाणी असून कंप व मूर्च्छा हींहि तद्वतच होतात तो महिन्यानें मरणार.

नश्यत्यजानन् षडहात्केशलुञ्चनवेदनाम् ।

केंस उपटल्याच्या वेदना ज्यास कळत नाहींत तो सहा दिवसांनीं मरणार.

न याति यस्य चाहारः कण्ठं कण्ठामयादृते ॥ ६७ ॥
प्रेष्याः प्रतीपतां यान्ति प्रेताकृतिरुदीर्यते ।
यस्य निद्रा भवेन्नित्यं नैव वा न स जीवति ॥ ६८ ॥

कंठरोग झाला नसतांहि ज्याचा आहार घशाखालीं उतरत नाहीं; ज्याचे चाकर प्रतिकूल झाले व जो प्रेतासारखा दिसतो; ज्यास नेहमीं झोंप येते किंवा मुळींच येत नाहीं तो जगावयाचा नाहीं.

वक्त्रमापूर्यतेऽश्रूणां स्विद्यतश्चरणौ भृशम् ।
चक्षुश्चाकुलतां याति यमराज्यं गमिष्यतः ॥ ६९ ॥

ज्याच्या तोंडावर अश्रूंच्या धारा वाहतात व ज्याच्या पायांस अतिशय घाम येतो व डोळे गढूळ होतात तो यमराज्यांत जाणार.

यैः पुरा रमते भावैररतिस्तैर्न जीवति ।

पूर्वीं ज्या गोष्टींनीं चित्त रममाण होत होतें, त्याच गोष्टींपासून उलटा त्यास त्रास झाला कीं, तो जगत नाहीं असें समजावें.

सहसा जायते यस्य विकारः सर्वलक्षणः ॥ ७० ॥
निवर्तते वा सहसा सहसा स विनश्यति ।

ज्या मनुष्यास एकाएकीं सर्वलक्षणयुक्त असा विकार उत्पन्न होतो, किंवा तशाच प्रकारचा व्याधि एकाएकीं बरा होतो, तो मनुष्य अकस्मात् मरावयाचा.

ज्वरो निहन्ति बलवान् गम्भीरो दैर्घरात्रिकः ॥ ७१ ॥
सप्रलापभ्रमश्वासः क्षीणं शूनं हतानलम् ।
अक्षामं सक्तवचनं रक्ताक्षं हृदि शूलिनम् ॥ ७२ ॥
संशुष्ककासः पूर्वाह्णे योऽपराह्णेऽपि वा भवेत् ।
बलमांसविहीनस्य श्लेष्मकाससमन्वितः ॥ ७३ ॥

बलवान्, गंभीर ( सर्व धातूंत गेलेला ) आणि फार दिवसांचा ताप आला असतांना बडबड, भ्रम, श्वास, क्षीणता ( रोगी कृश नसून ), सूज, अत्यंत अग्निमांद्य, अडखळत बोलणें, डोळे लाल होणें, हृदयशूल इ० लक्षणें ज्यास होतात तो मरतो. सकाळीं किंवा संध्याकाळीं येणाऱ्या तापांत कोरडा खोकला असला म्हणजे तो रोग्यास मारितो. ज्वर कफकासयुक्त असला तर तो बळहीन व मांसहीन पुरुषास मारितो.

रक्तपित्तं भृशं रक्तं कृष्णमिन्द्रधनुःप्रभम् ।
ताम्रहारिद्रहरितं रूपं रक्तं प्रदर्शयत् ॥ ७४ ॥
रोमकूपं प्रविसृतं कण्ठास्यहृदये सृजत् ।
वाससोऽरञ्जनं पूति वेगवच्चातिभूरि च ॥ ७५ ॥
वृद्धं पाण्डुज्वरच्छर्दिकासशोफातिसारिणम् ।

ज्या रक्तपित्तांत अतिलाल, अतिकाळें, इंद्रधनुष्यासारखें, किंवा तांबडें, पिंवळें, हिरवें असें रक्त पडतें व तसेंच रंग दिसतात ( स्वप्नांत वगैरे ) तें रोग्यास मारितें. ज्याच्या रोमरंध्रांतून रक्तस्राव होतो तो मरणार. तसेंच जें तोंड, गळा, हृदय यांना टांचितच बाहेर पडतें तें रोग्याला मारितें. ज्या रक्तपित्तांतील रक्तस्रावाचा डाग कापडावर राहत नाहीं, ज्यास फार घाण येते किंवा ज्याचा वेग व प्रमाण फार असतें तें मारक जाणावें. पांडुरोग, ताप, ओकारी, खोकला, सूज व हगवण हे विकार झालेल्या मनुष्याचें रक्तपित फार वाढलें असल्यास तो मरतो.

कासश्वासौ ज्वरच्छर्दितृष्णातीसारशोफिनम् ॥ ७६ ॥

खोकला व दमा हे ताप, वांति, तहान, अतिसार व सूज हे विकार झालेल्या मनुष्यास मारितात.

यक्ष्मा पार्श्वरुजानाहरक्तच्छर्द्यंसतापिनम् ।

कुशींत दुखणें, पोट फुगणें, रक्ताची वांति होणें व खांदे अतिशय दुखणें हे विकार झालेला क्षयरोगी मरतो.

छर्दिर्वेगवती मूत्रशकृद्गन्धि सचन्द्रिका ॥ ७७ ॥
सास्रविट्पूयरुक्कासश्वासवत्यनुषङ्गिणी ।

वांतीचा वेग फार असून तीस मल व मूत्र यांसारखी घाण येत असेल व तीवर पाण्यावर टाकलेल्या तेलासारखी झांक असेल व रक्त, मल व पूय यांनीं मिश्र असून शूल, खोकला, दमा यांनीं युक्त व फार दिवसांची असल्यास ती रोग्यास मारिते.

तृष्णाऽन्यरोगक्षपितं बहिर्जिह्वं विचेतनम् ॥ ७८ ॥

दुसऱ्या रोगानें क्षीण झालेल्या व जीभ बाहेर आली असून निश्चेष्ट पडलेल्या रोग्यास तृष्णा मारिते.

मदात्ययोऽतिशीतार्तं क्षीणं तैलप्रभाननम् ।

अतिशय थंडीनें पीडलेला, क्षीण व ज्याच्या तोंडाची कांति तेलासारखी झाली आहे त्यास मदात्यय मारितो.

अर्शांसि पाणिपन्नाभिगुदमुष्कास्यशोफिनम् ॥ ७९ ॥
हृत्पार्श्वाङ्गरुजाच्छर्दिपायुपाकज्वरातुरम् ।

हात, पाय, बेंबी, गुद, वृषण व तोंड यांस सूज, हृदय, कुशी व अंग यांच्या ठिकाणीं पीडा, वांति, गुदपाक व ज्वर यांनीं पीडलेल्या रोग्यास मुळव्याध मारिते.

अतीसारो यकृत्पिण्डमांसधावनमेचकैः ॥ ८० ॥
तुल्यस्तैलघृतक्षीरदधिमज्जवसासवैः ।
मस्तुलुङ्गमपीपूयवेसवाराम्बुमाक्षिकैः ॥ ८१ ॥
अतिरक्तासितस्निग्धपूत्यच्छघनवेदनः ।
कर्बुरा प्रस्त्रवन् धातून् निष्पुरीषोऽथवाऽतिविड् ॥ ८२ ॥
तन्तुमान् मक्षिकाक्रान्तो राजिमांश्चन्द्रकैर्युतः ।

शीर्णपायुवलिं मुक्तनालं पर्वास्थिशूलिनम् ॥ ८३ ॥
स्रस्तपायुं बलक्षीणमन्नमेवोपवेशयन् ।
सतृट्श्वासज्वरच्छर्दिदाहानाहप्रवाहिकः ॥ ८४ ॥

यकृत्, मांस, धुतलेलें पाणी, नीळ, तेल, तूप, दूध, दहीं, मज्जा, वसा, आसव, मेंदु, शाई, पू, मांसाची उसळ ( खेमा ), पाणी, व मध यांसारखा असून अतिशय लाल, काळा, स्निग्ध, अतिशय दुर्गंधियुक्त, अतिशय पातळ किंवा दाट, ज्यांत अतिशय वेदना आहेत असा, चित्रविचित्र रंगाचा, धातूंचा स्राव करणारा, ज्यांत मळ मुळींच नाहीं किंवा ज्यांत मळ अतिशय आहे असा, तंतुयुक्त, ज्यांवर माशा बसतात असा, ज्यावर रेषा व चंद्रिका आहेत असा असून तहान, श्वास, ज्वर, वांति, दाह, आनाह, प्रवाहिका ( कुंथणें ) यांनीं युक्त असा अतिसार—ज्याच्या गुदाच्या वली क्षतयुक्त झाल्या आहेत, ज्याचें गुदद्वार शिथिल झालें आहे, ज्याचे सांधे व अस्थि दुखत आहेत, ज्याचें अंग बाहेर येतें, ज्याची शक्ति क्षीण झाली आहे व ज्यास नुसतें अन्नच पडतें—अशा रोग्यास मारितो.

अश्मरी शूनवृषणं बद्धमूत्रं रुजार्दितम् ।

ज्याचें वृषण सुजलें आहे, मूत्र बंद झालें आहे व जो वेदनांनीं पीडला आहे त्यास मुतखडा मारितो.

मेहस्तृड्दाहपिटिकामांसकोथातिसारिणम् ॥ ८५ ॥

तहान, दाह, पुळ्या, मांसकोथ ( मांस सडणें ) आणि अतिसार हे विकार झालेल्यास मेह मारितो.

पीटिका मर्महृत्पृष्ठस्तनांसगुदमूर्धगाः ।
पर्वपादकरस्था वा मन्दोत्साहं प्रमेहिणम् ॥ ८६ ॥

मर्म, हृदय, पाठ, स्तन, खांदे, गुद, मस्तक, सांधे, पाय व हात यांवर झालेल्या पीटिका ( पुळ्या ) ज्यांचा उत्साह बंद झाला आहे अशा प्रमेह झालेल्या रोग्यांस मारितात.

सर्वं च मांससङ्कोचदाहतृष्णामदज्वरैः ।
विसर्पमर्मसंरोधहिध्माश्वासभ्रमक्लमैः ॥ ८७ ॥

मांसाचा संकोच, दाह, तृष्णा, मद, ज्वर, विसर्प मर्मावर दाब, उचकी, श्वास, भ्रम व क्लम ( ग्लानि ) यांनीं युक्त पुळ्या कोणत्याहि रोग्यास मारितात.

गुल्मः पृथुपरीणाहो घनः कूर्म इवोन्नतः ।
सिरानद्धो ज्वरच्छर्दिहिध्माध्मानरुजान्वितः ॥ ८८ ॥
कासपीनसहृल्लासश्वासातीसारशोफवान् ।

विस्तार मोठा असून जो कासवाच्या पाठीप्रमाणें कठिण व उंच आणि शिरांनीं व्याप्त असतो व ज्यांत ताप, वांति, उचकी, पोटफुगी, शूल; खोकला, पीनस, उम्हासे ( हृल्लास ), दमा, अतिसार व सूज हे उपद्रव असतात असा गुल्मरोग मनुष्यास मारितो.

विण्मूत्रसंग्रहश्वासशोफहिध्माज्वरभ्रमैः ॥ ८९ ॥
मूर्च्छाच्छर्द्यतिसारैश्च जठरं हन्ति दुर्बलम् ।
शूनाक्षं कुटिलोपस्थमुपक्लिन्नतनुत्वचम् ॥ ९० ॥
विरेचनहृतानाहमानह्यन्तं पुनः पुनः ।

मलावरोध, मूत्रावरोध, श्वास, सूज, उचकी, ज्वर, भ्रम, मूर्च्छा, वांति व अतिसार या लक्षणांनीं युक्त जें उदर तें—ज्याचे डोळे सुजले आहेत, ज्याचें उपस्थ ( गुह्येंद्रिय ) वांकडें झालें आहे, त्वचा फार पातळ व ओलसर झाली आहे, व ज्यास विरेचन दिलें असतां पोट कमी होतें पण पुनः पुनः फुगतें—अशा दुर्बल रोग्यास मारितें.

पाण्डुरोगः श्वयथुमान् पीताक्षिनखदर्शनम् ॥ ९१ ॥

ज्याचे डोळे व नखें पिंवळीं झालीं आहेत व ज्यास सर्व पदार्थ पिंवळे दिसतात अशा सुजलेल्या रोग्यास पांडुरोग मारितो.

तन्द्रादाहारुचिच्छर्दिमूर्च्छाध्मानातिसारवान् ।
अनेकोपद्रवयुतः पादाभ्यां प्रसृतो नरम् ॥ ९२ ॥
नारीं शोफो मुखाद्धन्ति कुक्षिगुह्यादुभावपि ।
राजीचितः स्रवंश्छर्दिज्वरश्वासातिसारिणम् ॥ ९३ ॥

झांपड, दाह, अरुचि, वांति, मूर्च्छा, आध्मान, अतिसार व दुसऱ्याहि अनेक अपायांनीं युक्त असून पायांकडून आलेली सूज पुरुषास मारिते. वरच्या उपद्रवांनीं युक्त असून प्रथम तोंडावर उत्पन्न झाली असेल तर ती स्त्रियांस मारिते. कूस व गुह्येंद्रिय यांवर प्रथम उत्पन्न झाली असली म्हणजे ती पुरुष व स्त्रिया या उभयतांसहि मारिते. सुजेवर रेषा असून तींतून स्राव होत असेल तर ती सूज वांति, ज्वर, श्वास व अतिसार हे विकार झालेल्या रोग्यास मारिते.

ज्वरातिसारौ शोफान्ते श्वयथुर्वा तयोः क्षये ।
दुर्बलस्य विशेषेण जायन्तेऽन्ताय देहिनः ॥ ९४ ॥

सर्वांगशोफानंतर ज्वर व अतिसार उत्पन्न होणें आणि ज्वर व अतिसार यांच्या शेवटीं सूज येणें हे दोन्ही प्रकार विशेषतः दुर्बल रोग्यास घातक होतात.

श्वयथुर्यस्य पादस्थः परिस्रस्ते च पिण्डिके ।
सीदतः सक्थिनी चैव तं भिषक् परिवर्जयेत् ॥ ९५ ॥

ज्याचे पाय सुजले असून पोटऱ्या व मांड्या गळल्या आहेत त्यास वैद्यानें सोडावें.

आननं हस्तपादं च विशेषाद्यस्य शुष्यतः ।
शयाते वा विना देहात्स मासाद्याति पञ्चताम् ॥ ९६ ॥

ज्याचें फक्त तोंड, हात व पाय मात्र वाळतात [ शुष्क होतात ] किंवा सुजतात—बाकीचा सर्व देह तसाच असतो—तो एक महिन्यानें मरेल.

विसर्पः कासवैवर्ण्यज्वरमूर्च्छाङ्गभङ्गवान् ।
भ्रमास्यशोषहृल्लासदेहसादातिसारवान् ॥ ९७ ॥

खोकला, विवर्णता [ रंग बदलणें ], ताप, मूर्च्छा, अंग मोडणें, भ्रम, मुखशोष, हृल्लास, अंगग्लानि, वात, अतिसार हे उपद्रव विसर्पांत असले म्हणजे तो रोगी मरतो.

कुष्ठं विशीर्यमाणाङ्गं रक्तनेत्रं हतस्वरम् ।

मन्दाग्निं जन्तुभिर्जुष्टं हन्ति तृष्णातिसारिणम् ॥ ९८ ॥
ज्याचें अंग सडूं लागलें आहे, डोळे लाल झाले आहेत, स्वर बसला आहे, अग्नि मंद झाला आहे, व्रणांत कृमि झाले आहेत, व ज्यास तृष्णा व अतिसार झाले आहेत अशा तऱ्हेचा रक्तपित्तीचा रोगी मरतो.

वायुः सतत्वचं भुग्नं कम्पशोफरुजातुरम् ।
वातास्त्रं मोहमूर्च्छायमदस्वप्नज्वरान्वितम् ॥ ९९ ॥
शिरोग्रहारुचिश्वाससङ्कोचस्फोटकोथवत् ।
त्वचा बहिरी होणें, अंग जखडून वांकडें होणें, कंप, सूज व वेदना हे विकार झालेल्यास वायु मारितो. मोह, मूर्च्छा, मद, झोंप, ज्वर, शिरोग्रह [ डोकें दुखणें ], अरुचि, दमा, संधीचा संकोच, फोड व सडणें हे विकार झालेल्या रोग्यास वातरक्त मारितें.

शिरोरोगारुचिश्वासमोहविड्भेदतृड्भ्रमैः ॥ १०० ॥
घ्नन्ति सर्वामयाः क्षीणस्वरधातुबलानलम् ।
शिरोरोग, अरुचि, श्वास, मोह, अतिसार, तहान व भ्रम हे विकार झाले असतां ज्याचे आवाज, धातु [ रसादि सप्त ], शक्ति व अग्नि हे क्षीण झाले आहेत अशा रोग्यास कोणताहि रोग मारितो. [ कोणत्याहि रोगांत अशी स्थिति झाल्यावर मनुष्य वांचत नाहीं. ]

वातव्याधिरपस्मारी कुष्ठी रक्त्युदरी क्षयी ॥ १०१ ॥
गुल्मी मेही च तान् क्षीणान् विकारेऽल्पेऽपि वर्जयेत्
वातव्याधि, अपस्मार, कुष्ठ, रक्तपित्त, उदर, क्षय, गुल्म व प्रमेह, हे विकार, अल्प असूनहि रोगी क्षीण झाला असेल तर वैद्यानें चिकित्सा करूं नये.

बलमांसक्षयस्तीव्रो रोगवृद्धिररोचकः ॥ १०२ ॥
यस्यातुरस्य लक्ष्यन्ते त्रीन्पक्षान्न स जीवति ।
बल व मांस यांचा अतिशय क्षय, रोगाची वृद्धि व अरुचि हीं लक्षणें ज्या रोग्यांस उत्पन्न झालेलीं दिसतात तो दीड महिन्यावर वांचावयाचा नाहीं.

वाताष्ठीलाऽतिसंवृद्धा तिष्ठन्ती दारुणा हृदि ॥ १०३ ॥
तृष्णया तु परीतस्य सद्यो मुष्णाति जीवितम् ।
वाताष्ठीला हृदयांत अतिशय वाढली व अतिशय वेदना व तहान हीं लक्षणें झालीं तर ती मनुष्यास तत्काळ मारिते.

शैथिल्यं पिण्डिके वायुर्नीत्वा नासां च जिह्मताम् ॥
क्षीणस्यायस्य मन्ये वा सद्यो मुष्णाति जीवितम् ।
क्षीण मनुष्याच्या पोटऱ्या वायूनें शिथिल झाल्या असतां व नाक वांकडें झालें असतां व मान ताणली गेली असतां तो मनुष्य तत्काळ मरतो.

नाभीगुदान्तरं गत्वा वङ्क्षणं वा समाश्रयन् ॥ १०५ ॥
गृहीत्वा पायुहृदये क्षीणदेहस्य वा बली ।
मलान् वस्तिशिरोनाभिं विबध्य जनयन् रुजम् ॥
कुर्वन् वङ्क्षणयोः शूलं तृष्णां भिन्नपुरीषताम् ।
श्वासं वा जनयन् वायुर्गृहीत्वा गुदवङ्क्षणम् ॥१०७॥
वितत्य पर्शुकाग्राणि गृहीत्वोरश्च मारुतः ।
स्तिमितस्यातताक्षस्य सद्यो मुष्णाति जीवितम् १०८
वायु, नाभि व गुद यांच्यामध्यें जाऊन अंडसंधीचा आश्रय करून राहिला असतां; बलवान् वायु क्षीण झालेल्या मनुष्याचें गुद व हृदय यांस जखडून राहिला असतां; वायूनें मळ, बस्तीचें शिर व नाभी यांचा अवरोध करून वेदना उत्पन्न केली असतां; अंडसंधींत वेदना, तहान व हगवण हे विकार केले असतां; गुद व अंडसंधि जखडून टाकून दमा उत्पन्न केला असतां; अंग ओलसर व डोळे विस्तृत असून बरगड्यांचीं टोकें ताणून उरांत वेदना उत्पन्न केली असतां; तो ( वायु ) मनुष्यास तत्काळ मारितो.

सहसा ज्वरसन्तापस्तृष्णा मूर्च्छा बलक्षयः ।
विश्लेषणं च सन्धीनां मुमूर्षोरुपजायते ॥ १०९ ॥
ज्वर, सर्व शरीराचा दाह, तहान, मूर्च्छा, शक्ति क्षीण होणें व सांधे सुटल्यासारखे होणें हे विकार ज्यास अकस्मात् उत्पन्न होतात तो मरणार असें समजावें.

गोसर्गे वदनाद्यस्य स्वेदः प्रच्यवते भृशम् ।
लेपज्वरोपतप्तस्य दुर्लभं तस्य जीवितम् ॥ ११० ॥
प्रलेपक ज्वरानें पीडलेल्या मनुष्याच्या तोंडावर पहाटेस जर अतिशय घाम येईल तर तो वांचणें कठिण असें समजावें.

प्रवालगुलिकाभासा यस्य गात्रे मसूरिकाः ।
उत्पद्याशु विनश्यन्ति न चिरात्स विनश्यति ॥ १११ ॥
पोंवळ्यासारख्या लाल देवी ज्याच्या अंगावर उत्पन्न होऊन लागल्याच मावळतात तो लवकरच मरणार.

मसूरविदलप्रख्यास्तथा विद्रुमसन्निभाः ।
अन्तर्वक्त्राः किणाभाश्च विस्फोटा देहनाशनाः ११२
मसुराच्या डाळीएवढाले, पोंवळ्यासारखे लाल व अंतर्मुख ( ज्यांस वर तोंडें नाहींत ) असून घट्टासारखे जे विस्फोट ( फोड ) होतात ते मारक होत.

कामलाऽक्ष्णोर्मुखं पूर्णं शङ्खयोर्मुक्तमांसता ।
सन्त्रासश्चोष्णताऽङ्गे च यस्य तं परिवर्जयेत् ॥ ११३ ॥
ज्याचे डोळे पिंवळे, तोंड सुजलेलें, आंख खोल गेलेले व अंग उष्ण असून जो अतिशय संत्रस्त झाला आहे अशा रोग्यास वैद्यानें औषध देऊं नये.

अकस्मादनुधावच्च विघृष्टं त्वक्समाश्रयम् ।
त्वचा खरचटून झालेला व्रण अकस्मात् पसरूं लागला असतां तो मनुष्य मरणार असें समजून वैद्यानें सोडावा.

यो वातजो न शूलाय स्यान्न दाहाय पित्तजः ॥११४॥
कफजो न च पूयाय मर्मजश्च रुजे न यः ।
अचूर्णश्चूर्णकीर्णाभो यत्राकस्माच्च दृश्यते ॥ ११५ ॥
रूपं शक्तिध्वजादीनां सर्वास्तान् वर्जयेद्व्रणान् ।

वातजन्य असून ज्या व्रणास शूल नाहीं, पित्तजन्य असून दाह नाहीं, कफजन्य असून पूय नाहीं, मर्मावर झालेला असून वेदना नाहीं, ज्यावर चूर्ण टाकिलें नसतांहि टाकल्यासारखें दिसतें, व ज्यावर एकाएकीं शक्ति (सैती, शस्त्रविशेष), ध्वज इत्यादिकांनें रूप दिसतें ते सर्व व्रण असाध्य समजावे.

**विण्मूत्रमारुतवहं क्रमिणं च भगन्दरम् ॥ ११६ ॥**

ज्या भगंदरांत किडे पडले असून मळ, मूत्र व वायु वाहत आहेत तें असाध्य समजावें.

**घट्टयन् जानुना जानु पादावुद्यम्य पातयन् ।**
**योऽपास्यति मुहुर्वक्त्रमातुरो न स जीवति ॥ ११७ ॥**

जो रोगी गुडघ्यावर गुडघा घांसून दोन्ही पाय वर उचलून खालीं आपटतो व कारणावांचून वरचेवर तोंड इकडे तिकडे हलवितो तो वांचावयाचा नाहीं.

**दन्तैश्छिन्दन्नखाग्राणि तैश्च केशांस्तृणानि च ।**
**भूमिं काष्ठेन विलिखन् लोष्टं लोष्टेन ताडयन्॥ ११८ ॥**
**हृष्टरोमा सान्द्रमूत्रः शुष्ककासी ज्वरी च यः ।**
**मुहुर्हसन्मुहुः क्ष्वेडन् शय्यां पादेन हन्ति यः ॥११९॥**
**मुहुश्छिद्राणि विमृशन्नातुरो न स जीवति ।**

जो रोगी दांतांनीं नखें व नखांनीं केंस व गवताच्या काड्या तोडितो, काडीनें भुईवर लिहितो, ढेंकळावर ढेंकूळ मारीत राहतो तो, ज्यास ताप व कोरडी ढांस असून मूत्र दाट झालें आहे व रोमांच वारंवार उभे राहतात तो व जो वारंवार हंसतो, किंकाळ्या फोडतो, अंथरुणावर पाय आपटतो व नासानेत्रादि छिद्रांस वारंवार स्पर्श करितो तो रोगी जगावयाचा नाहीं.

**मृत्यवे सहसाऽऽर्तस्य तिलकव्यङ्गविप्लवः ॥ १२० ॥**
**मुखे दन्तनखे पुष्पं जठरे विविधाः सिराः ।**

ज्या रोग्याच्या तोंडावर एकाएकीं तीळ व वांग उत्पन्न होतात, दांतांवर व नखांवर कवड्या (पांढरे डाग) उठतात आणि पोटावर अनेक प्रकारच्या शिरा उठतात तो मरणार असें समजावें.

**ऊर्ध्वश्वासं गतोष्माणं शूलोपहतवङ्क्षणम् ॥ १२१ ॥**
**शर्म वाऽनधिगच्छन्तं बुद्धिवान् परिवर्जयेत् ।**

ज्यास ऊर्ध्वश्वास लागला आहे, अंग गार पडलें आहे, वेदनेनें ज्याचा अडसंधि अगदीं व्यापिला आहे, अथवा ज्यास कोणत्याहि तऱ्हेनें आराम पडतच नाहीं, अशा रोग्यास शहाण्या वैद्यानें औषध देऊं नये.

**विकारा यस्य वर्धन्ते प्रकृतिः परिहीयते ॥ १२२ ॥**
**सहसा सहसा तस्य मृत्युर्हरति जीवितम् ।**

अकस्मात् ज्याचे विकार वाढतात व अकस्मात् प्रकृति किंवा स्वभाव पालटतो तो एकाएकींच मरतो.

**यमुद्दिश्यातुरं वैद्यः सम्पादयितुमौषधम् ॥ १२३ ॥**
**यतमानो न शक्नोति दुर्लभं तस्य जीवितम् ।**

ज्या रोग्याकरितां वैद्य औषध मिळविण्याचा प्रयत्न करीत असतांहि तें त्यास मिळत नाहीं [ प्राप्त करून घेतां येत नाहीं ] तो रोगी वांचणें फार कठिण होय.

**विज्ञातं बहुशः सिद्धं विधिवच्चावतारितम् ॥ १२४ ॥**
**न सिद्ध्यत्यौषधं यस्य तस्य नास्ति चिकित्सितम् ।**

चांगलें ठाऊक असलेलें, अनेक वेळां देऊन अनुभवसिद्ध ठरलेलें व यथाशास्त्र तयार करून दिलेलेंहि औषध ज्या रोग्यास लागू पडत नाहीं त्यास औषधच नाहीं असें समजावें.

**भवेद्यस्यौषधेऽन्ने वा कल्प्यमाने विपर्ययः ॥ १२५ ॥**
**अकस्माद्वर्णगन्धादेः स्वस्थोऽपि न स जीवति ।**

ज्या मनुष्याकरितां एखादें औषध किंवा अन्न तयार करीत असतां कारणावांचून त्याचे वर्ण व गंध बदलतात तो निरोगी असला तरी वांचावयाचा नाहीं.

**निवाते सेन्धनं यस्य ज्योतिश्चाप्युपशाम्यति ॥१२६॥**
**आतुरस्य गृहे यस्य भिद्यन्ते वा पतन्ति वा ।**
**अतिमात्रममत्राणि दुर्लभं तस्य जीवितम् ॥ १२७ ॥**

ज्या रोग्याच्या घरीं निर्वातस्थानीं जवळ असलेला जाळ लांकडें वगैरे असतांहि एकाएकीं विझतो, तसेंच त्याच्या घरांत आपोआप भांड्यांच्या उतरंडी कोसळतात किंवा भांडीं अतिशय फुटतात तो वांचणें कठिण असें समजावें.

**यं नरं सहसा रोगो दुर्बलं परिमुञ्चति ।**
**संशयं प्राप्तमात्रेयो जीवितं तस्य मन्यते ॥ १२८ ॥**

मरावयास टेंकलेल्या अशक्त मनुष्याचा रोग एकाएकीं बरा झाला तर तो जगण्याविषयीं संशयच आहे, असें आत्रेयाचें मत आहे.

**कथयेन्नैव पृष्टोऽपि दुःश्रवं मरणं भिषक् ।**
**गतासोर्बन्धुमित्राणां न चेच्छेत्तं चिकित्सितुम् १२९**

ज्या रोग्याचें आयुष्य संपलें आहे असें वैद्यास समजलें असेल त्याचे आप्त व मित्र यांनीं विचारलें असतांहि वैद्यानें त्याचें मरण सांगू नये, कारण त्यास तें ऐकिल्यापासून फार दुःख होतें व तीं घाबरतात. तसेंच ज्याचें आयुष्य सरलें आहे, त्यास औषध देऊन बरा करण्याच्या भरीस पडूं नये.

**यमदूतपिशाचाद्यैर्यत्परासुरुपास्यते ।**
**घ्नद्भिरौषधवीर्याणि तस्मात्तं परिवर्जयेत् ॥ १३० ॥**

ज्याचें आयुष्य सरलें आहे अशा रोग्याजवळ यमाचे दूत, पिशाचें इत्यादिक त्यास नेण्यासाठीं टपून बसतात व त्यास दिलेल्या औषधाच्या वीर्याचा नाश करितात. यासाठीं आयुष्य सरलेल्या रोग्यास वैद्यानें सोडावें.

**आयुर्वेदफलं कृत्स्नं यदायुर्ज्ञे प्रतिष्ठितम् ।**
**रिष्टज्ञानादृतस्तस्मात्सर्वदैव भवेद्भिषक ॥ १३१ ॥**

आयुर्वेदाचें सर्व फळ आयुष्य जाणणाऱ्या वैद्यास मिळतें, यासाठीं वैद्यानें नेहमीं रिष्टज्ञान प्राप्त करून घेण्याविषयीं झटावें.

**मरणं प्राणिनां दृष्टमायुः पुण्योभयक्षयात् ।**
**तयोरप्यक्षयाद्दृष्टं विषमापरिहारिणाम् ॥ १३१ ॥**

आयुष्य व पुण्य यापैकीं एकेकाचा किंवा दोहोंचाहि क्षय झाला असतां प्राणी मरतो. [ फुटक्या नावेंत बसणें, झाडावर चढणें, उंच ठिकाणावरून उडी मारणें, पाण्यांत पोहणें, व्याघ्रादिकांच्या रानांतून बेसावधपणानें फिरणें इ० ] विषम प्रसंग जे चुकवीत नाहींत ते आयुष्य व पुण्य संपण्यापूर्वी मरतात.

---

# षष्ठोऽध्यायः

## अध्याय ६ वा

### अथातो दूतादिविज्ञानीयं शारीरं व्याख्यास्यामः ।

आतां दूतादिकांविषयींच्या शुभाशुभ ज्ञानाविषयीं शारीर सांगतों.

**पाखण्डाश्रमवर्णानां सवर्णः कर्मसिद्धये ।**
**त एव विपरीताः स्युर्दूताः कर्मविपत्तये ॥ १ ॥**

पाखंड ( ज्यांस ब्रह्मचर्यादि आश्रम व ब्राह्मण क्षत्रियादि चार वर्ण नाहींत असे म्हणजे त्यावांचून अन्य जे लोक ते ), आश्रम ( ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास ) व वर्ण ( ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ) यांपैकीं ज्या प्रकारचा रोगी असेल त्याच तऱ्हेचा दूत वैद्यास बोलावण्यास गेला असतां वैद्यास चिकित्सेंत यश येतें व याच्या विपरीत प्रकारचा दूत ( म्हणजे पाखंड्यास ब्राह्मणादि, ब्राह्मणास शूद्रादि व ब्रह्मचाऱ्यास संन्याशादि ) वैद्यास बोलावण्यास गेला तर वैद्यास यश येत नाहीं.

**दीनं भीतं द्रुतं त्रस्तं रूक्षामङ्गलवादिनम् ।**
**शस्त्रिणं दण्डिनं षण्ढं मुण्डश्मश्रुं जटाधरम् ॥ २ ॥**
**अमङ्गलाह्वयं क्रूरकर्माणं मलिनं स्त्रियम् ।**
**अनेकव्याधितं व्यङ्गं रक्तमाल्यानुलेपनम् ॥ ३ ॥**
**तैलपङ्काङ्कितं जीर्णविवर्णार्द्रैकवाससम् ।**
**खरोष्ट्रमहिषारूढं काष्ठलोष्टादिमर्दिनम् ॥ ४ ॥**
**नानुगच्छेद्भिषग्दूतमाह्वयन्तं च दूरतः ।**

दीन ( घाबरलेला ), भ्यालेला, धांवत आलेला, त्रासलेला, कठोर व अभद्र बोलणारा, हातांत शस्त्र किंवा काठी घेऊन आलेला, नपुंसक, दाढी व मिशी काढलेला, जटाधारी, अभद्र नांवाचा क्रूर कृत्यें करणारा, घाणेरडा, बायको, अनेक रोग झाले आहेत असा, व्यंग ( लंगडा, थोटा, पांगळा, मुका, अंधळा इ० ), तांबडीं फुलें धारण करून व तांबडें गंध लावून आलेला, तेलानें व चिखलानें माखलेला, जुनें, विटकें, भिजलेलें किंवा एकच वस्त्र घेऊन आलेला, गाढव, उंट किंवा रेडा यांवर बसून आलेला, लांकूड, मातीचीं ढेकळें किंवा दुसरा कांहीं पदार्थ फोडीत आलेला व दुरूनच वैद्यास मोठमोठ्यानें हांका मारणारा असा मनुष्य वैद्यास बोलावण्यास आला असतां वैद्यानें रोग्याकडे जाऊं नये.

**अशस्तचिन्तावचने नग्ने छिन्दति भिन्दति ॥ ५ ॥**
**जुह्वाने पावकं पिण्डान् पितृभ्यो निर्वपत्यपि ।**
**सुप्ते मुक्तकचेऽभ्यक्ते रुदत्यप्रयते तथा ॥ ६ ॥**
**वैद्ये दूता मनुष्याणामागच्छन्ति मुमूर्षताम् ।**

वैद्य वाईट प्रकारचा विचार किंवा भाषण करीत असतां, नग्न असतां, कांहीं कापीत किंवा फोडीत असतां, अग्नींत आहुति टाकीत असतां, पितरांस पिंड देत असतां, निजला असतां, त्याची शेंडी मोकळी असतां, अभ्यंग केलेला असतां, रडत असतां किंवा त्यास कोणत्याहि प्रकारचा विटाळ असतां रोग्याकडून मनुष्य बोलावण्यास आला तर तो रोगी मरणार आहे असें समजावें.

**विकारसामान्यगुणे देशे कालेऽथवा भिषक् ॥ ७ ॥**
**दूतमभ्यागतं दृष्ट्वा नातुरं समुपाचरेत् ।**

रोग्याच्या गुणाशीं समानगुणक देशीं किंवा तशाच काळीं वैद्यास बोलावण्यास मनुष्य येत आहे असें पाहिल्यावर वैद्यानें त्या रोग्यास औषध देऊं नये [ उ० कफजन्य रोग आहे व रोगी आनूप किंवा अतिथंड जागेंत आहे व मनुष्य सकाळींच बोलावण्यास आला तर वैद्यानें औषध देऊं नये ].

**स्पृशन्तो नाभिनासास्यकेशरोमनखद्विजान् ॥ ८ ॥**
**गुह्यपृष्ठस्तनग्रीवाजठरानामिकाङ्गुलीः ।**
**कार्पासबुससीसास्थिकपालमुशलोपलम् ॥ ९ ॥**
**मार्जनीशूर्पचैलान्तभस्माङ्गारदशातुषान् ।**
**रज्जूपानत्तुलापाशमन्यद्वा भग्नविच्युतम् ॥ १० ॥**
**तत्पूर्वदर्शने दूता व्याहरन्ति मरिष्यताम् ।**

वैद्यास बोलावणारा मनुष्य त्याच्या पहिल्या भेटीस नाभि, नाक, तोंड, केंस, रोम, नखें, दांत, गुह्य, पाठ, स्तन, गळा, पोट, करंगळी-जवळचें बोट, कापूस, भुसकट, शिसें, हाड, खापर, मुसळ, दगड, केरसुणी, सूप व वस्त्राचा पदर, राख, निखारे, वस्त्राच्या आंचळ्या, फोल ( तूस ), दोरी, जोडा, तागडी, सांपळा किंवा आणखी एखादा मोडका किंवा मूळच्या जागेपासून पडलेला पदार्थ यांस स्पर्श करून ( यांपैकीं कोणतीहि वस्तु हातांत असतां ) वैद्याशीं भाषण करील तर तो रोगी मरणार आहे असें वैद्यानें समजावें.

**तथाऽर्धरात्रे मध्याह्ने सन्ध्ययोः पर्ववासरे ॥ ११ ॥**
**षष्ठीचतुर्थीनवमीराहुकेतूदयादिषु ।**
**भरणीकृत्तिकाऽऽश्लेषापूर्वाऽऽर्द्रापित्र्यनैर्ऋते ॥ १२ ॥**

त्याचप्रमाणें मध्यरात्रीं, भरदुपारीं, रात्र व दिवस यांच्या संधींत ( सकाळीं सूर्योदयापूर्वी व सायंकाळीं सूर्यास्तानंतर ), अमावास्या, पौर्णिमा, षष्ठी, चतुर्थी व नवमी या तिथींस, सूर्यचंद्रांच्या ग्रहणाच्या

दिवशीं, भरणी, कृत्तिका, आश्लेषा, पूर्वा, आर्द्रा, मघा व मूळ हीं नक्षत्रें असतील त्या वेळीं वैद्यास बोलावणें आलें असतां जाऊं नये.

यस्मिंश्च दूते ब्रुवति वाक्यमातुरसंश्रयम्।
पश्येन्निमित्तमशुभं तं च नानुव्रजेद्भिषक् ॥ १३ ॥

रोग्यासंबंधीं हकीकत दूत सांगत असतां, वैद्यास अपशकुन झाला असतां वैद्यानें त्या रोग्याकडे जाऊं नये.

तद्यथा विकलः प्रेतः प्रेतालङ्कार एव वा ।
छिन्नं दग्धं विनष्टं वा तद्वादीनि वचांसि वा ॥ १४ ॥
रसो वा कटुकस्तीव्रो गन्धो वा कौणपो महान् ।
स्पर्शो वा विपुलः क्रूरो यद्वान्यदपि तादृशम् ॥ १५ ॥
तत्सर्वमभितो वाक्यं वाक्यकालेऽथवा पुनः ।
दूतमभ्यागतं दृष्ट्वा नातुरं तमुपाचरेत् ॥ १६ ॥

ते अपशकुन असे—विकल ( अंगहीन ) पुरुष, व प्रेत, प्रेताचें सामान दिसणें, कोणताहि पदार्थ तुटणें, जळणें किंवा हरवणें किंवा अमुक पदार्थ तुटला, जळला, हरवला असे शब्द ऐकणें, अतिशय तिखट पदार्थाचा आस्वाद ( किंवा दर्शन ), प्रेतासारखी अतिखराब घाण येणें, शरीरास फार लांब, रुंद व कठीण ( दुःखकारक ) पदार्थांचा स्पर्श होणें किंवा अशा प्रकारच्या दुसऱ्याहि कित्येक गोष्टी-रोग्याची हकीकत दूत वैद्यास सांगण्याच्या आधीं किंवा सांगून झाल्यावर लागलेंच किंवा सांगत असतां किंवा रोग्याकडून दूत येत आहे असें वैद्य पाहात असतां—घडल्यास वैद्यानें त्या रोग्यास औषध देऊं नये.

हाहाक्रन्दितमुत्क्रुष्टरुदितं स्खलनं क्षुतम् ।
वस्त्रातपत्रपादत्रव्यसनं व्यसनीक्षणम् ॥ १७ ॥
चैत्यध्वजानां पात्राणां पूर्णानां च निमज्जनम् ।
हतानिष्टप्रवादाश्च दूषणं भस्मपांसुभिः ॥ १८ ॥

हाहाःकार, मोठ्यानें ओरडणें, रडणें, पडणें ( अडखळणें ), शिंकणें, वस्त्र, छत्री, जोडा यांचें व्यसन ( हरवणें, फाटणें, मोडणें, जळणें वगैरे, ) दुःखी मनुष्यास पाहणें, वड, पिंपळ, निशाण, इ० पडणें किंवा भरलेलीं भांडीं सांडणें, वाईट व अनिष्टकारक शब्द ऐकणें व अंगावर राख किंवा धूळ उडणें या गोष्टी वैद्यास रोग्याच्या घरीं जातेवेळीं अशुभ होत.

पथश्छेदोऽहिमार्जारगोधासरठवानरैः ।

रस्त्यांत सर्प, मांजर, घोरपड, सरडा व वानर हे प्राणी आडवे जाणें अशुभ होय.

दीप्तां प्रति दिशं वाचो क्रूराणां मृगपक्षिणाम् ॥ १९ ॥
कृष्णधान्यगुडोदश्विल्लवणासवचर्मणाम् ।
सर्षपाणां वसातैलतृणपङ्केन्धनस्य च ॥ २० ॥
क्लीबक्रूरश्वपाकानां जालवागुरयोरपि ।
छर्दितस्य पुरीषस्य पूतिदुर्दर्शनस्य च ॥ २१ ॥
निःसारस्य व्यवायस्य कार्पासादेररेरपि ।
शयनासनयानानामुत्तानानां तु दर्शनम् ॥ २२ ॥
न्युब्जानामितरेषां च पात्रादीनामशोभनम् ।

ज्या दिशेस सूर्य आहे तिकडून क्रूर पशुपक्ष्यांचे शब्द ऐकूं येणें, काळें धान्य, गूळ, ताक, मीठ, मद्य, चामडें, मोहऱ्या, वसा, तेल, गवत, चिखल, लांकडें, गोवऱ्या, नपुंसक, क्रूर व चांडाळ ( मांग ), जाळीं, फांस ( पारधी लोकांचे ), ओकारी, विष्ठा, घाणेरे व भयंकर पदार्थ, कोंडा, साळें वगैरे सार काढून घेतलेले पदार्थ, मैथुन, कापूसादिक मागें सांगितलेले पदार्थ, शत्रु, ज्याचे खूर वर केले आहेत अशी बाज, पलंग, चौरंग व पाट, वर पाय केलेले घोडे वगैरे व भांडीं वगैरे उपडीं घातलेलीं, वगैरे प्रकार दिसणें हेंहि वैद्यास रोग्याकडे जातेवेळीं अशुभ होय.

पुंसंज्ञाः पक्षिणो वामाः स्त्रीसंज्ञा दक्षिणाः शुभाः २३

पुल्लिंगी पक्षी डावीकडे असलेले चांगले व स्त्रीलिंगी पक्षी उजवीकडे असलेले शुभकारक होत.

प्रदक्षिणं खगमृगा यान्तो नैवं श्वजम्बुकाः ।
अयुग्माश्च मृगाः शस्ताः

कावळे, खबुतरें वगैरे पक्षी, हरिणादि पशु डावीकडून उजवीकडे गेले असतां शुभ व कुत्रे आणि कोल्हे उजवीकडून डावीकडे गेलेले शुभ होत. पशु विषम असले म्हणजे शुभ होत.

शस्ता नित्यं च दर्शने ॥२४॥
चाषभासभरद्वाजनकुलच्छागबर्हिणः ।

चाष, भास ( गृध्रविशेष ), भारद्वाज ( कोकडकुंभा, कुंभार-कुकडा ), मुंगूस, बोकड, व मोर यांचें दर्शन नेहमींच सुखकारक होय.

अशुभं सर्वथोलूकबिडालसरठेक्षणम् ॥ २५ ॥

घुबड, मांजर व सरडा यांचें दर्शन सर्व प्रकारें अशुभच होय.

प्रशस्ताः कीर्तने कोलगोधाहिशशजाहकाः ।
न दर्शने न विरुते वानरर्क्षावतोऽन्यथा ॥ २६ ॥

डुक्कर, घोरपड, साप व ससा व जाहक ( सरडयाची एक जात ) यासंबंधानें नुसतें बोलणें प्रशस्त होय; परंतु त्यांस पाहणें किंवा त्यांचे शब्द ऐकणें हें अप्रशस्त; वानर व अस्वल यांचें त्यांच्या उलट आहे.

धनुरैन्द्रं च लालाटमशुभं शुभमन्यथा ।

इंद्रधनुष्य समोर दिसलें तर चांगलें नव्हे, व दुसऱ्या कोणत्याहि बाजूस असल्यास शुभ समजावें.

अग्निपूर्णादि पात्राणि भिन्नानि विशिखानि च ॥२७॥

ज्यांत अग्नि आहे अशीं, फुटकीं व रिकामीं भांडीं मार्गांत दिसणें अशुभ होय.

दध्यक्षतादि निर्गच्छद्वक्ष्यमाणं च मङ्गलम् ।
वैद्यो मरिष्यतां वेश्म प्रविशन्नेव पश्यति ॥ २८ ॥

वैद्य रोग्याच्या घरांत शिरत असतां त्याच वेळीं त्याच्या घरांतून

पुढें सांगितलेले दहीं, अक्षता इत्यादि मंगल पदार्थ बाहेर गेले तर तो रोगी मरणार असें समजावें.

दूताद्यसाधु दृष्ट्वैवं त्यजेदार्तमतोऽन्यथा ।
करुणाशुद्धसन्तानो यत्नतः समुपाचरेत् ॥ २९ ॥

दूतादिक अशुभ शकुन झाले असतां वैद्यानें त्या रोग्यास सोडावें व शुभ शकुन झाले तर दयार्द्र अंतःकरणानें मोठ्या यत्नानें त्यास औषध द्यावें.

दध्यक्षतेक्षुनिष्पावप्रियङ्गुमधुसर्पिषाम् ।
यावकाञ्जनभृङ्गारघण्टादीपसरोरुहाम् ॥ ३० ॥
दूर्वार्द्रमत्स्यमांसानां लाजानां फलभक्षयोः ।
रत्नेभपूर्णकुम्भानां कन्यायाः स्यन्दनस्य च ॥ ३१ ॥
नरस्य वर्धमानस्य देवतानां नृपस्य च ।
शुक्लानां सुमनोवालचामराम्बरवाजिनाम् ॥ ३२ ॥
शङ्खसाधुद्विजोष्णीषतोरणस्वस्तिकस्य च ।
भूमेः समुद्धृतायाश्च वह्नेः प्रज्वलितस्य च ॥ ३३ ॥
मनोज्ञस्यान्नपानस्य पूर्णस्य शकटस्य च ।
नृभिर्धेन्वाः सवत्साया वडवायाःस्त्रिया अपि ॥ ३४ ॥
जीवञ्जीवकसारङ्गसारसप्रियवादिनाम् ।
रुचकादर्शसिद्धार्थरोचनानां च दर्शनम् ॥ ३५ ॥
गन्धः सुसुरभिर्वर्णः सुशुक्लो मधुरो रसः ।
गोपतेरनुकूलस्य स्वरस्तद्वद्गवामपि ॥ ३६ ॥
मृगपक्षीनराणां च शोभिनां शोभना गिरः ।
छत्रध्वजपताकानामुत्क्षेपणमभिष्टुतिः ॥ ३७ ॥
भेरीमृदङ्गशङ्खानां शब्दाः पुण्याहनिःस्वनाः ।
वेदाध्ययनशब्दाश्च सुखो वायुः प्रदक्षिणः ॥ ३८ ॥
पथि वेश्मप्रवेशे च विद्यादारोग्यलक्षणम् ।

रोग्याकडे जातेवेळीं वाटेंत व रोग्याचे घरीं शिरतांना वैद्यास पुढें लिहिलेले शकुन व्हावे—दहीं, अक्षता, ऊंस, पावटे, गव्हला, मध, तूप, अळिता, सुरमा, सोन्याची झारी (किंवा सोनें), घंटा, दिवा, कमळ, दूर्वा, ओले मासे, मांस, लाह्या, फळें, खाण्याचे पदार्थ, रत्नें, हत्ती, भरलेल्या घागरी, कुमारिका, रथ, प्रतिष्ठित मनुष्य, देवांच्या मूर्ति, राजा, पांढरीं फुलें, पांढऱ्या चवऱ्या, पांढरीं वस्त्रें, पांढरे घोडे, शंख, सत्पुरुष, ब्राह्मण, पागोटें, तोरणें, स्वस्तिक, खणून व चोपून तयार केलेली जमीन, पेटलेला अग्नि, उत्तम प्रकारचे खाण्याचे व पिण्याचे पदार्थ, मनुष्यांनीं भरलेली गाडी, वांसरासुद्धां गाय, शिंगरासह घोडी, मुलासह स्त्री, बुलबुल पक्षी, सिंह, हंस, पोपट, कोकिळा वगैरे मधुर शब्द करणारे पक्षी, अंगठी, आरसा, शिरस व गोरोचन हे पदार्थ दिसणें, तसेंच अति उत्तम प्रकारचा वास येणें, फार पांढरा असा रंग दिसणें, गोड पदार्थ खाण्यास मिळणें, शांत बैलाच्या डुरकण्या व गाईचें हंबरणें ऐकणें, पशु, पक्षी व मनुष्यें मागें जी शुभ म्हणून सांगितली आहेत, त्यांचीं शुभ भाषणें ऐकणें, छत्री, ध्वज व पताका उभारलेल्या पाहणें, पुढेंच कोणी वैद्याची स्तुति करणें, भेरी, मृदंग व शंख यांचे शब्द ऐकणें, मंगल शब्द व वेदपठण ऐकणें, दक्षिणेकडून सुखकारक वायु येणें इत्यादि प्रकारचे वैद्यास शकुन झाले असतां रोगी बरा होईल असें समजावें.

इत्युक्तं दूतशकुनं स्वप्नानूर्ध्वं प्रचक्षते ॥ ३९ ॥

याप्रमाणें दूतशकुन सांगितले, आतां पुढें स्वप्नें सांगावयाचीं.

स्वप्ने मद्यं सह प्रेतैर्यः पिबन् कृष्यते शुना ।
स मर्त्यो मृत्युना शीघ्रं ज्वररूपेण नीयते ॥ ४० ॥

स्वप्नांत जो प्रेताबरोबर मद्यपान करितो, व स्वप्नांत कुत्रा ज्याच्या अंगावर येतो, तो लवकरच तापानें मरणार असें समजावें.

रक्तमाल्यवपुर्वस्त्रो यो हसन् ह्रियते स्त्रिया ।
सोऽस्रपित्तेन

जो मनुष्य स्वप्नांत तांबड्या फुलांच्या माळा घालून, तांबडा चंदन अंगास लावून व तांबडें वस्त्र नेसून किंवा पांघरून हंसत हंसत स्त्रीकडून ओढला जातो तो रक्तपित्तानें मरेल.

महिषश्ववराहोष्ट्रगर्दभैः ॥ ४१ ॥
यः प्रयाति दिशं याम्यां मरणं तस्य यक्ष्मणा ।

रेडा, कुत्रा, डुक्कर, उंट व गाढव यांवर बसून जो स्वप्नांत दक्षिण दिशेस गमन करितो तो क्षयरोगानें मरणार.

लता कण्टकिनी वंशस्तालो वा हृदि जायते ॥ ४२ ॥
यस्य तस्याशु गुल्मेन

स्वप्नांत ज्याच्या हृदयावर कांटेरी वेल, वांबू किंवा ताड उत्पन्न होतो तो गुल्मानें लवकरच मरतो.

यस्य वह्निमनार्चिषम् ।
जुह्वतो घृतसिक्तस्य नग्नस्योरसि जायते ॥ ४३ ॥
पद्मं स नश्येत्कुष्ठेन

जो स्वप्नांत अंगास तूप लावून नागव्यानें ज्वालारहित अग्नींत आहुति टाकीत असतां ज्याच्या उरावर कमळ उत्पन्न होतें तो कुष्ठानें मरतो.

चण्डालैः सह यः पिबेत् ।
स्नेहं बहुविधं स्वप्ने स प्रमेहेण नश्यति ॥ ४४ ॥

स्वप्नांत चांडाळाबरोबर जो अनेक प्रकारचे स्नेह पितो तो प्रमेहानें मरतो.

उन्मादेन जले मज्जेद्यो नृत्यन् राक्षसैः सह ।

स्वप्नांत राक्षसांबरोबर नाचत नाचत जो पाण्यांत बुडतो तो वेड लागून मरणार.

अपस्मारेण यो मर्त्यो नृत्यन् प्रेतेन नीयते ॥ ४५ ॥

जो स्वप्नांत प्रेताकडून नाचत नाचत नेला जातो तो अपस्मारानें मरतो.

**यानं खरोष्ट्रमार्जारकपिशार्दूलसूकरैः ।**
**यस्य प्रेतैः शृगालैर्वा स मृत्योर्वर्तते मुखे ॥ ४६ ॥**

गाढव, उंट, मांजर, वानर, वाघ, डुक्कर, कोल्हे व प्रेतें यांबरोबर जो स्वप्नांत गमन करितो, तो मृत्यूच्या जबड्यांत सांपडला असें समजावें.

**अपूपशष्कुलीर्जग्ध्वा विबुद्धस्तद्विधं वमन् ।**
**न जीवति**

स्वप्नांत अपूप ( घारगे, अनारसे वगैरे पक्वान्न ) व करंज्या खाऊन जागा झाल्यावर तशाच प्रकारचा पदार्थ जो ओकतो तो वांचावयाचा नाहीं.

**अक्षिरोगाय सूर्येन्दुग्रहणेक्षणम् ॥ ४७ ॥**

स्वप्नांत सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण पाहिलें असतां त्यास नेत्ररोग होतो.

**सूर्याचन्द्रमसोः पातदर्शनं दृग्विनाशनम् ।**

सूर्यचंद्रांचें पतन स्वप्नांत पाहिलें असतां दृष्टीचा नाश होतो.

**मूर्ध्नि वंशलतादीनां सम्भवो वयसां तथा ॥ ४८ ॥**
**निलयो मुण्डता काकगृध्राद्यैः परिवारणम् ।**
**तथा प्रेतपिशाचस्त्रीद्रविडान्ध्रगवाशनैः ॥ ४९ ॥**
**सङ्गो वेत्रलतावंशतृणकण्टकसङ्कटे ।**
**श्वभ्रश्मशानशयनं पतनं पांसुभस्मनोः ॥ ५० ॥**
**मज्जनं जलपङ्कादौ शीघ्रेण स्रोतसा हृतिः ।**
**नृत्यवादित्रगीतानि रक्तस्रग्वस्त्रधारणम् ॥ ५१ ॥**
**वयोऽङ्गवृद्धिरभ्यङ्गो विवाहः श्मश्रुकर्म च ।**
**पक्वान्नस्नेहमद्याशः प्रच्छर्दनविरेचने ॥ ५२ ॥**
**हिरण्यलोहयोर्लाभः कलिर्बन्धपराजयौ ।**
**उपानद्युगनाशश्च प्रपातः पादचर्मणोः ॥ ५३ ॥**
**हर्षो भृशं प्रकुपितैः पितृभिश्चावभर्त्सनम् ।**
**प्रदीपग्रहनक्षत्रदन्तदैवतचक्षुषाम् ॥ ५४ ॥**
**पतनं वा विनाशो वा भेदनं पर्वतस्य च ।**
**कानने रक्तकुसुमे पापकर्मनिवेशने ॥ ५५ ॥**
**चितान्धकारसम्बाधे जनन्यां च प्रवेशनम् ।**
**पातः प्रासादशैलादेर्मत्स्येन ग्रसनं तथा ॥ ५६ ॥**
**काषायिणामसौम्यानां नग्नानां दण्डधारिणाम् ।**
**रक्ताक्षाणां च कृष्णानां दर्शनं जातु नेष्यते ॥ ५७ ॥**

डोक्यावर बांबू, वेली वगैरे उगवणें, पांखरें डोक्यावर बसणें, शेंडीसुद्धां हजामत करणें, कावळे व गिधाडें इत्यादि पक्षी व प्रेतें, भुतें, स्त्रिया, द्रविड लोक, तैलंग व म्लेंच्छ यांनीं सभोंवतीं घेरणें, वेत, वेली, बांबू, गवत, कांटे यांच्या जाळींत सांपडून अडकणें, खळग्यांत किंवा श्मशानांत निजणें, धुरळ्यांत किंवा राखेंत पडणें, पाणी व चिखल इत्यादिकांत बुडणें, वेगानें वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहांतून वाहत जाणें, नाचणें, वाजविणें, गाणें, तांबड्या माळा घालणें, तांबडीं वस्त्रें नेसणें, वय वाढलेलें दिसणें, अंग आहे त्यापेक्षां अधिक वाढणें, अभ्यंग करणें, लग्न, हजामत करणें, पक्वान्नें, स्नेह व मद्य हीं भक्षण करणें, ओकणें, जुलाब होणें, सुवर्ण व लोखंड मिळणें, भांडण, कैदेंत पडणें, पराभव, दोन्ही जोडे हरवणें, पाय व चर्म गळून पडणें, अतिशय आनंद होणें, पितर रागावून त्यांनीं निर्भर्त्सना करणें, दिवा, ग्रह, तारे, दांत, देव ( मूर्ति ) व डोळे यांचें पतन होणें ( गळून पडणें ) अथवा नाश होणें ( मावळणें, मालवणें वगैरे ), पर्वत फुटणें, तांबड्या फुलांच्या रानांत जाणें, पापी लोकांच्या घरीं जाणें, चितेंत, काळोखांत व अडचणीच्या जागेंत फिरणें, आईच्या पोटांत शिरणें, वाडे व पर्वत इत्यादिकांवरून पडणें, माशानें गिळणें, भगवीं वस्त्रें नेसलेले, उग्र, नागवे, हातांत काठ्या घेतलेले व ज्यांचे डोळे लाल आहेत ते व काळे असे पुरुष पाहणें, हीं स्वप्नें कधींहि हितकारक होत नाहींत,

**कृष्णा पापाननाचारा दीर्घकेशनखस्तनी ।**
**विरागमाल्यवसना स्वप्ने कालनिशा मता ॥ ५८ ॥**

काळी, वाईट तोंडाची, जिचें आचरण वाईट आहे अशी, जिचे केंस, नखें व स्तन लांब आहेत व सुकलेलीं फुलें धारण केलेली व विटलेलीं वस्त्रें नेसलेली अशी स्त्री स्वप्नांत पाहिली असतां ती काळरात्रच होय.

**मनोवहानां पूर्णत्वात्स्रोतसां प्रबलैर्मलैः ।**
**दृश्यन्ते दारुणाः स्वप्ना रोगी यैर्याति पञ्चताम् ॥५९॥**
**अरोगः संशयं प्राप्य कश्चिदेव प्रमुच्यते ।**

प्रकुपित झालेल्या दोषांनीं मनोवह स्रोतें* भरलीं असतां मनुष्यास भयंकर स्वप्नें पडतात, तीं पडलीं असतां तो रोगी असल्यास मरतोच, परंतु अरोगी असला तरी संशययुक्त आजारी पडतो व त्यांतून एखादाच वांचतो.

**दृष्टः श्रुतोऽनुभूतश्च प्रार्थितः कल्पितस्तथा ॥ ६० ॥**
**भाविको दोषजश्चेति स्वप्नः सप्तविधो मतः ।**

---

* प्राचीनांच्या मतें हृदय हें मनाचें स्थान व त्याजपासून निघणाऱ्या ज्या नाड्या तीं मनोवह स्रोतसें ( अरुणदत्ताची टीका पाहा. मनश्चेतो वहन्ति यानि विशेषेण हृदाश्रितानि स्रोतांसि तानि मनोवहानि ) हीं स्रोतसें अमुकच प्रकारचीं असतात अशाबद्दल कोठें सांगितलें नाहीं. सर्व शरीर स्रोतोमय व प्रत्येक क्रिया स्रोतसावर अवलंबून आहे. एवढाच काय तो मोठा सिद्धान्त पूर्वीं सामान्यपणें कळला होता. मेंदू व पाठीच्या कण्यांतील रज्जू किंवा त्यांजपासून निघणारे तंतु याची वास्तविक कल्पना त्यांना नव्हती व मानसिक किंवा ऐच्छिक क्रियेचा या भागाशीं कांहीं संबंध असेल ही गोष्ट त्यांच्या स्वप्नींहि नव्हती. हल्लीं ज्या क्रिया मज्जातंतूपासून होतात असें समजलें आहे, त्या सर्व धमन्यांपासून किंवा शिरांपासून होतात असें पूर्वीं मानीत होते, हें वरील टीपेंतील उदाहरणावरून लक्षांत आलेंच असेल. या धमन्यांपैकींच कांहींना मनोवह स्रोतस् असें त्यांनीं नांव दिलें आहे.

दृष्ट (पाहिलेल्या गोष्टी स्वप्नांत दिसणें), श्रुत (ऐकलेल्या दिसणें), अनुभूत (मनास ज्या गोष्टींचा अनुभव आला आहे अशा गोष्टी दिसणें), प्रार्थित (ज्या गोष्टी व्हाव्या अशी आपली इच्छा असते अशा गोष्टी स्वप्नांत दिसणें), कल्पित (ज्या गोष्टींच्या आपण कल्पना करीत असतों त्या दिसणें,), भाविक (पुढें होणाऱ्या गोष्टी सुचविणारीं स्वप्नें) व दोषज (वातज, पित्तज, कफज) असे स्वप्नाचे सात प्रकार आहेत.

**तेष्वाद्या निष्फलाः पञ्च यथास्वप्रकृतिर्दिवा ॥ ६१ ॥**
**विस्मृतो दीर्घह्रस्वोऽति**

त्यांत पहिल्या पांच प्रकारचीं स्वप्नें, ज्याची जशी प्रकृति असेल तदनुरूप पडलेलीं स्वप्नें (शारीराच्या तिसऱ्या अध्यायांत सांगितलेलीं), दिवसां पडलेलीं, विसरलेलीं, फार लांब व ल्हान अशीं स्वप्नें निष्फळ होत.

**पूर्वरात्रे चिरात्फलम् ।**
**दृष्टः करोति तुच्छं च**

पूर्वरात्रीं चांगलें स्वप्न पडलें असतां पुष्कळ दिवसांनीं थोडें फळ येतें.

**गोसर्गे तदहर्महत् ॥ ६२ ॥**
**निद्रया चानुपहतः प्रतीपैर्वचनैस्तथा ।**

पहाटेस स्वप्न पडलें आणि वर झोंप घेतली नाहीं व कोणी त्यावर उलट भाषण केलें नाहीं तर त्याच दिवशीं मोठें फल होईल.

**याति पापोऽल्पफलतां दानहोमजपादिभिः ॥ ६३ ॥**

वाईट स्वप्न पडल्यावर दान, होम, जप इत्यादि उपाय केले असतां त्याचें फल कमी होतें.

**अकल्याणमपि स्वप्नं दृष्ट्वा तत्रैव यः पुनः ।**
**पश्येत्सौम्यं शुभं तस्य शुभमेव फलं भवेत् ॥ ६४ ॥**

दुष्ट स्वप्न पाहिल्यावर त्याच रात्रीं जर सौम्य व शुभकारक स्वप्न पाहील तर त्यास चांगलें फळ प्राप्त होईल.

**देवान् द्विजान् गोवृषभान् जीवतः सुहृदो नृपान् ।**
**साधून् यशस्विनो वह्निमिद्धं स्वच्छान् जलाशयान्॥**
**कन्यां कुमारकान् गौरान् शुक्लवस्त्रान्सुतेजसः ।**
**नराशनं दीप्ततनुं समन्ताद्रुधिरोक्षितः ॥ ६६ ॥**
**यः पश्येल्लभते यो वा छत्रादर्शविषामिषम् ।**
**शुक्लाः सुमनसो वस्त्रममेध्यालेपनं फलम् ॥ ६७ ॥**
**शैलप्रासादसफलवृक्षसिंहनरद्विपान् ।**
**आरोहेद्गोऽश्वयानं च तरेन्नदह्रदोदधीन् ॥ ६८ ॥**
**पूर्वोत्तरेण गमनमगम्यागमनं मृतम् ।**
**सम्बाधान्निसृतिर्देवैः पितृभिश्चाभिनन्दनम् ॥ ६९ ॥**
**रोदनं पतितोत्थानं द्विषतां चावमर्दनम् ।**
**यस्य स्यात्तस्यायुरारोग्यं वित्तं बहु च सोऽश्नुते ॥७०॥**

देव, ब्राह्मण, गाई, बैल, जिवंत मित्र, राजे, साधु, यशस्वी पुरुष, पेटलेला अग्नि, स्वच्छ जलाशय (नदी, तळाव, विहिरी इ.), तेजस्वी व पांढरीं वस्त्रें पांघरलेल्या व गोऱ्या मुली व मुलगे, आपल्या सर्वांगावर सभोंवार रक्त सांडलें असून तेजःपुंज व नरमांस खाणारा (राक्षस?) स्वप्नांत पाहणें, तसेंच छत्री, आरसा, विष व मांस हे पदार्थ पाहणें किंवा मिळणें, तसेंच पांढरीं फुलें, पांढरें वस्त्र, सुगंधी लेप व फळें हीं पाहणें किंवा मिळणें, डोंगर, वाडा, फळें आलेला वृक्ष, सिंह, घोडा, हत्ती यांवर चढणें किंवा बसणें, घोड्याच्या व बैलाच्या गाडींत बसणें, नदी, सरोवर व समुद्र यांतून तरून जाणें, पूर्वेकडे व उत्तरेकडे जाणें, अगम्य स्त्रीशीं गमन करणें, मरणें, संकटांतून मुक्त होणें, देव व पितर यांनीं शाबासकी देणें, रडणें, संकटांतून सुटणें, शत्रूंचा नाश करणें, अशा गोष्टींचीं ज्यास स्वप्नें पडतात त्यास आयुष्य, आरोग्य व पुष्कळ द्रव्य प्राप्त होतें.

**मङ्गलाचारसम्पन्नः परिवारस्तथातुरः ।**
**श्रद्दधानोऽनुकूलश्च प्रभूतद्रव्यसंग्रहः ॥ ७१ ॥**
**सत्त्वलक्षणसंयोगो भक्तिर्वैद्यद्विजातिषु ।**
**चिकित्सायामनिर्वेदस्तदारोग्यस्य लक्षणम् ॥ ७२ ॥**

रोग्याच्या आसपासच्या मंडळीचें आचरण चांगलें असणें, रोग्याची वैद्यावर व औषधावर श्रद्धा असणें, वैद्य सांगेल त्याप्रमाणें रोग्यानें आपली वर्तणूक ठेवणें, रोग्याजवळ पुष्कळ पैसा असणें, रोगी मागें सांगितलेल्या सत्त्व गुणांच्या लक्षणांनीं युक्त असणें, वैद्य व ब्राह्मण यांविषयीं रोग्याची पूज्यबुद्धि असणें व औषधासंबंधानें कंटाळा न करणें, (उत्साह) हेंच आरोग्याचें लक्षण होय.

**इत्यत्र जन्ममरणं यतः सम्यगुदाहृतम् ।**
**शरीरस्य ततः स्थानं शारीरमिदमुच्यते ॥ ७३ ॥**

याप्रमाणें, या स्थानांत शरीराची उत्पत्ति व मरण हीं चांगल्या रीतीनें सांगितलीं आहेत म्हणून यास शारीरस्थान असें म्हटलें जातें.

**॥ इति श्रीवैद्यपतिसिंहगुप्तसुनोर्वाग्भटस्य कृतावष्टाङ्ग-हृदयसंहितायां शारीरस्थानं समाप्तम् ॥**

याप्रमाणें वैद्यपतिसिंहगुप्तपुत्र वाग्भटानें केलेल्या अष्टांगहृदय-संहितेंतील शारीरस्थान व त्याचाच सहावा अध्याय संपूर्ण झाला.

॥ श्री ॥

# निदानस्थान.

## प्रथमोऽध्यायः

### अध्याय १ ला.

**अथातः सर्वरोगनिदानं व्याख्यास्यामः ।**

आतां सर्व रोगांचें ( सामान्य ) निदान सांगतों.

**इति ह स्माहुरात्रेयादयो महर्षयः ।**

आत्रेयादि मोठमोठ्या ऋषींनीं असें सांगितलें आहे.

**रोगः पाप्मा ज्वरो व्याधिर्विकारो दुःखमामयः ।**
**यक्ष्मातङ्कगदाबाधशब्दाः पर्यायवाचिनः ॥ १ ॥**

रोग, पाप्मा, ज्वर, व्याधि, विकार, दुःख, आमय, यक्ष्मा, आतंक, गद, आबाध हे सर्व रोगांचे पर्यायशब्द आहेत.

**निदानं पूर्वरूपाणि रूपाण्युपशयस्तथा ।**
**संप्राप्तिश्चेति विज्ञानं रोगाणां पञ्चधा स्मृतम् ॥ २ ॥**

निदान, पूर्वरूपें, रूपें, उपशय व संप्राप्ति हे पांच रोग जाणण्याचे उपाय आहेत.

**निमित्तहेत्वायतनप्रत्ययोत्थानकारणैः ।**
**निदानमाहुः पर्यायैः**

निमित्त, हेतु, आयतन, प्रत्यय, उत्थान व कारण हे सहा निदान शब्दाचे पर्याय होत.

**प्राग्रूपं येन लक्ष्यते ॥ ३ ॥**

**उत्पित्सुरामयो दोषविशेषेणानधिष्ठितः ।**

ज्यांत वातादि दोषांची व्यक्तता झाली नाहीं, असा पुढें होणारा रोग ज्यानें समजतो तें पूर्वरूप होय.

**लिङ्गमव्यक्तमल्पत्वाद्व्याधीनां तद्यथायथम् ॥ ४ ॥**

तें त्या त्या व्याधीचें बीजावस्थेंतील अस्पष्ट चिन्ह समजावें.

**तदेव व्यक्ततां यातं रूपमित्यभिधीयते ।**

तेंच ( पूर्वरूप ) स्पष्ट झालें म्हणजे त्यास रूप हें नांव प्राप्त होतें.

**संस्थानं व्यञ्जनं लिङ्गं लक्षणं चिह्नमाकृतिः ॥ ५ ।**

संस्थान, व्यंजन, लिंग, लक्षण, चिन्ह व आकृति हे त्याचे पर्यायशब्द होत.

**हेतुव्याधिविपर्यस्तविपर्यस्तार्थकारिणाम् ।**
**औषधान्नविहाराणामुपयोगं सुखावहम् ॥ ६ ॥**

**विद्यादुपशयं व्याधेः स हि सात्म्यमिति स्मृतः ।**
**विपरीतोऽनुपशयो व्याध्यसात्म्याभिसंज्ञितः ॥ ७ ॥**

हेतु व व्याधि यांच्या उलट, व उलट प्रकारची क्रिया करणारीं औषधें, अन्न व विहार यांचा शरीरास जो सुखकारक उपयोग होतो त्यास उपशय असें म्हणतात, व त्यासच व्याधिसात्म्य असें म्हणतात. तसेंच त्यांचाच जो शरीरास दुःखदायक उपयोग होतो त्यास अनुपशय व व्याध्यसात्म्य असें म्हणतात.*

---

* यांत हेतु व व्याधि यांच्या उलट व उलट प्रकारची क्रिया करणारीं अशीं जीं दोन प्रकारचीं औषधें अन्न व विहार सांगितलीं आहेत, त्यांच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं उदाहरणें दिलीं पाहिजेत. अशी कल्पना करा कीं, एका मनुष्याला शैत्यापासून ज्वर आला आहे. त्यास आपल्याला हेतूच्या उलट औषधादिक देणें झाल्यास सर्व उष्ण उपचार केले पाहिजेत; जसें उष्ण आहार, उबदार कपडे, वाफारा व सुंठ, मिरें इत्यादिकांचा काढा; व्याधीच्या उलट औषध देणें म्हणजे ज्वरघ्न पदार्थांचा उपयोग करणें. हा हेतु व व्याधि यांच्या उलट औषधादिकांचा प्रकार झाला. आतां उलट प्रकारची क्रिया करणारीं औषधें म्हणजे अशीं कीं, तीं दिसतांना हेतु व व्याधि यांच्याशीं समानच असून त्यांची क्रिया ( परिणाम ) मात्र उलट प्रकारची होते. जसें ऊन फार लागल्यानें डोळे आले असतां ते ऊन पाण्यानें शेकणें ( हेतूशीं समान पण परिणामी उलट ), किंवा त्यांत मिर्च्याचें शेंवतें टाकलेलें अंजन घालणें ( व्याधीशीं समान पण परिणामीं गुणकारक ). उलटी बंद करण्याकरितां उलटीचेंच औषध देणें; ज्वरांतील बडबड, बेशुद्धि वगैरे घालविण्याकरितां भांगेचीं किंवा धोत्र्याचीं पुटें दिलेली त्रिभुवनकीर्ति, सन्निपातभैरव इत्यादि औषधें देणें हींहि याचींच ( व्याधिविपर्यस्तार्थकारी ) उदाहरणें होत. हल्लीं जी होमिओपाथि नामक पद्धति पुष्कळ प्रचारांत येत चालली आहे, तींतील सर्वच औषधें व्याधीशीं समान असून उलट औषधासारखी क्रिया करणारीं आहेत. आपल्या वैद्यकांतील नेहमींची क्रिया म्हटली म्हणजे रोगाच्या उलट औषध देण्याची असून ह्या नेहमींच्या सांप्रदायाच्या विरुद्धहि केव्हां केव्हां उपक्रम करावा लागतो व तो फायदेशीर होतो ही गोष्ट चरकाचे वेळींहि कळली होती. यासंबंधानें उपोद्घात पाहा. ह्या श्लोकांतील 'हेतुव्याधिविपर्यस्त' इत्यादि सामासिक पदाची ओढाताण करून माधव निदानाच्या टीकाकारानें त्यांतून एकंदर ६ प्रकार काढले आहेत. ते असेः- १ हेतुविपर्यस्त. २ व्याधिविपर्यस्त. ३ हेतुव्याधिविपर्यस्त. ४ हेतुविपर्यस्तार्थकारी. ५ व्याधिविपर्यस्तार्थकारी. ६ हेतुव्याधिविपर्यस्तार्थकारी. यांचा अर्थ उघडच आहे.

**यथा दुष्टेन दोषेण यथाचानुविसर्पता।**
**निर्वृत्तिरामयस्यासौ संप्राप्तिर्जातिरागतिः ॥ ८ ॥**

त्या त्या रीतीनें दुष्ट होऊन त्या त्या मार्गानें संचार करणाऱ्या दोषांपासून रोगाची उत्पत्ति होणें यास संप्राप्ति, जाति किंवा आगति असें म्हणतात.

**सङ्ख्याविकल्पप्राधान्यबलकालविशेषतः।**
**सा भिद्यते**

संख्या, विकल्प, प्राधान्य, बल व काल यांच्या अनुरोधानें तिचे पांच विभाग होतात.

**यथाऽत्रैव लक्ष्यन्तेऽष्टौ ज्वरा इति ॥ ९ ॥**

जसें येथेंच पुढें ज्वर आठ प्रकारचे असें सांगावयाचें आहे, यास संख्यासंप्राप्ति असें म्हणावें.

**दोषाणां समवेतानां विकल्पोंऽशांशकल्पना।**

एकत्र प्रकुपित झालेल्या वातादि दोषांचा जो अंशतः विचार करणें यास विकल्पसंप्राप्ति असें म्हणतात [ जसें त्रिदोषकोप झाला असतां वातवृद्ध, पित्तवृद्धतर, कफवृद्धतम इत्यादि मागें सांगितलेल्या भेदांचा विचार करणें ].

**स्वातन्त्र्यपारतन्त्र्याभ्यां व्याधेःप्राधान्यमादिशेत् १०**

व्याधीची स्वतंत्रता व परतंत्रता यांवरून त्याचें प्राधान्य किंवा अप्राधान्य समजावयाचें.

**हेत्वःदिकात्स्न्यावयवैर्बलाबलविशेषणम्।**

हेतु, पूर्वरूप व रूप, हीं सर्व असणें व कांहीं अंशानें असणें यांवरून संप्राप्तीचें बलाबल जाणावें.

**नक्तंदिनर्तुभुक्तांशैर्व्याधिकालो यथामलम् ॥ ११ ॥**

रात्र, दिवस व अन्नपचनकाल यांच्या ज्या भागामध्यें वातादि दोष प्रबल असतात तेच काल तत्तज्जन्य व्याधींनाहि लागू आहेत.

**इति प्रोक्तो निदानार्थः**

याप्रमाणें निदान या शब्दांत समावेश होणाऱ्या गोष्टींचें कथन केलें.

**तं व्यासेनोपदेक्ष्यते।**

तेंच पुढें विस्तारानें सांगावयाचें आहे.

**सर्वेषामेव रोगाणां निदानं कुपिता मलाः ॥ १२ ॥**
**तत्प्रकोपस्य तु प्रोक्तं विविधाहितसेवनम्।**

सर्वत्र रोगाचें कारण प्रकुपित झालेले दोष आहेत व दोष प्रकोप होण्याचें कारण अनेक प्रकारचें अहितसेवन होय.

**अहितं त्रिविधो योगस्त्रयाणां प्रागुदाहृतः ॥ १३ ॥**

काल, अर्थ व कर्म यांचे मागें सांगितलेले तीन प्रकारचे योग ( हीनयोग, मिथ्यायोग व अतियोग ) हेंच अहित असें समजावें.

**तिक्तोषणकषायाल्परूक्षप्रमितभोजनैः।**
**धारणोदीरणनिशाजागरात्युच्चभाषणैः ॥ १४ ॥**
**क्रियातियोगभीशोकचिन्ताव्यायाममैथुनैः।**
**ग्रीष्माहोरात्रिभुक्तान्ते प्रकुप्यति समीरणः ॥ १५ ॥**

कडू, तिखट, तुरट, अल्प, रूक्ष व प्रमित ( वेळ टळल्यावर खाल्लेलें ) अशा प्रकारचें भोजन, तसेंच मलमूत्रादिकांचे वेग धारण करणें किंवा ते बळानें प्रवृत्त करणें, रात्रीं जागणें, फार मोठ्यानें बोलणें, अतिशय काम करणें, भीति, शोक, काळजी, व्यायाम व मैथुन या कारणांनीं, ग्रीष्मऋतु, दिवस, रात्र व पचनकाल यांचा शेवटला भाग या काळीं वायूचा प्रकोप होतो.

**पित्तं कट्वम्लतीक्ष्णोष्णपटुक्रोधविदाहिभिः।**
**शरन्मध्याह्नरात्र्यर्धविदाहसमयेषु च ॥ १६ ॥**

तिखट, आंबट, तीक्ष्ण, उष्ण, खारट व विदाही पदार्थांचें भक्षण व राग या कारणांनीं शरदृतूंत दुपारीं, मध्यरात्रीस व भोजनाच्या पचनकालीं पित्ताचा कोप होतो.

**स्वाद्वम्ललवणस्निग्धगुर्वभिष्यन्दिशीतलैः।**
**आस्यास्वप्नसुखाजीर्णदिवास्वप्नातिबृंहणैः ॥ १७ ॥**
**प्रच्छर्दनाद्ययोगेन भुक्तमात्रवसन्तयोः।**
**पूर्वाह्णे पूर्वरात्रे च श्लेष्मा**

गोड, आंबट, खारट, स्निग्ध, गुरु, अभिष्यंदि व थंड पदार्थांचें सेवन, फार बसणें, फार निजणें, अजीर्ण, दिवसा निजणें, फार बृंहण पदार्थांचें सेवन व वमनादिकांचा अयोग या कारणांनीं वसंत ऋतूंत, रात्रीच्या व दिवसाच्या पहिल्या भागांत जेवल्याबरोबर लागलाच कफाचा कोप होतो.

**द्वन्द्वं तु सङ्करात् ॥ १८ ॥**

दोहोंचीं कारणें एकत्र झाल्यानें दोन दोषांचा कोप होतो.

**मिश्रीभावात्समस्तानां सन्निपातस्तथा पुनः।**
**सङ्कीर्णाजीर्णविषमविरुद्धाध्यशनादिभिः ॥ १९ ॥**
**व्यापन्नमद्यपानीयशुष्कशाकाममूलकैः।**
**पिण्याकमृद्यवसुरापूतिशुष्ककृशामिषैः ॥ २० ॥**
**दोषत्रयकरैस्तैस्तैस्तथान्नपरिवर्ततः।**
**धात्वोर्दुष्टात्पुरोवाताद्ग्रहवेशाद्विषाद्गरात् ॥ २१ ॥**
**दुष्टान्नात्पर्वताश्लेषाद्ग्रहैर्जन्मर्क्षपीडनात्।**
**मिथ्यायोगाच्च विविधात्पापानां च निषेवणात् ॥२२॥**
**स्त्रीणां प्रसववैषम्यात्तथा मिथ्योपचारतः।**

वर सांगितलेलीं सर्व कारणें एकदम झालीं असतां त्रिदोषांचा कोप होतो. तसेंच संकीर्णाशन* ( समशन ? ), अजीर्णाशन, विषमाशन, अध्यशन इत्यादिकांनीं, तसेंच नासकें मद्य व पाणी,

---

* यांत जो संकीर्णाशन शब्द आला आहे त्याचें लक्षण पूर्वी ग्रंथकर्त्यानें सांगितलें आहे असें अरुणदत्त म्हणतो; परंतु हा शब्दच मुळीं पूर्वी आलेला नाहीं. परंतु संकीर्णाशन हें समशन याचेंच वाचक ( पर्याय ) असेल असें वाटतें; व त्या अर्थानें अरुणदत्ताचें म्हणणें खरें आहे.

वाळलेल्या भाज्या, हिरवे मुळे, पेंड, माती, सातूचें मद्य, घाणेरडें, वाळलेलें व कृश पशूचें मांस हे पदार्थ खाल्यानें, तसेंच आणखी जे त्रिदोषकारक पदार्थ आहेत ते भक्षण केल्यानें, त्याचप्रमाणें ॠतूंत फेरफार केल्यानें, धातु दुष्ट झाल्यानें, पूर्वेकडील वायु घेतल्यानें, पिशाचबाधा, विष व गर यांनीं, दुष्ट अन्नाच्या सेवनानें, पर्वतावर चढल्यानें, जन्मनक्षत्रीं (पाप) ग्रह आल्यानें, अनेक प्रकारच्या मिथ्यायोगानें, पाप केल्यानें आणि स्त्रियांस बाळंत होण्याच्या संबंधानें, कांहीं विपरीत प्रकार घडल्यानें व बाळंतपणांत चुकीचे उपचार झाल्यानें त्रिदोषांचे कोप होतात.

**प्रतिरोगमिति क्रुद्धा रोगाधिष्ठानगामिनीः ॥ २३ ॥**
**रसायनीः प्रपद्याशु दोषा देहे विकुर्वते ।**

या कारणांनीं दोष कुपित होऊन रोगांच्या त्या त्या स्थानांत जाणाऱ्या रसवाहिन्यांत जाऊन शरीरांत सर्व प्रकारचे रोग उत्पन्न करितात.

---

# द्वितीयोऽध्यायः

## अध्याय २ रा

### अथातो ज्वरनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां ज्वरनिदान सांगतों.

**ज्वरो रोगपतिः पाप्मा मृत्युरोजोऽशनोऽन्तकः ।**
**क्रोधो दक्षाध्वरध्वंसी रुद्रोर्ध्वनयनोद्भवः ॥ १ ॥**
**जन्मान्तयोर्मोहमयः सन्तापात्माऽपचारजः ।**
**विविधैर्नामभिः क्रूरो नानायोनिषु वर्तते ॥ २ ॥**

ताप हा सर्व रोगांत श्रेष्ठ असून दुष्ट आहे. इतर रोगांपेक्षां या रोगानें मनुष्यें जास्त मरतात. हा मनुष्याचें ओज भक्षण करितो. मारक असून हा दक्षाच्या यज्ञाचा नाश करणाऱ्या शंकराच्या तिसऱ्या डोळ्यापासून निघालेला राग होय. उत्पन्न झाल्यापासून अखेरपर्यंत मोहमय असून दाहात्मक आहे; व हा भयंकर व्याधि अनेक कारणांपासून त्वरित उत्पन्न होऊन निरनिराळ्या प्राण्यांत निरनिराळीं नांवें पावतो. (जसें-हत्तीच्या तापास पाकल,घोड्याच्यास अभिताप, बैलाच्यास गोकर्णक, पाखराच्यास मकर इ० ).

**स जायतेऽष्टधा दोषैः पृथङ्मिश्रैः समागतैः ।**
**आगन्तुश्च**

वातज्वर, पित्तज्वर, कफज्वर, वातपित्तज्वर, वातकफज्वर, पित्तकफज्वर, सन्निपातज्वर व आगंतुज्वर असे तापाचे आठ भेद आहेत.

**मलास्तत्र स्वैः स्वैर्दुष्टाः प्रदूषणैः ॥ ३ ॥**
**आमाशयं प्रविश्यामममनुगम्य पिधाय च ।**
**स्रोतांसि पक्तिस्थानाच्च निरस्य ज्वलनं बहिः ॥ ४ ॥**
**सह तेनाभिसर्पन्तस्तपन्तः सकलं वपुः ।**
**कुर्वन्तो गात्रमत्युष्णं ज्वरं निर्वर्तयन्ति ते ॥ ५ ॥**
**स्रोतोविबन्धात्प्रायेण ततः स्वेदो न जायते ।**

आपआपल्या कारणांनीं दुष्ट झालेले दोष आमाशयांत शिरून आमाच्या मागून जाऊन स्रोतसें रुद्ध करितात. नंतर पक्वाशयांतून अग्नि (जठराग्नीस) बाहेर काढून त्यासहवर्तमान सर्व शरीरभर पसरून, सर्व शरीरास तप्त करून, अंग उष्ण करून ताप (ज्वर) उत्पन्न करितात. स्रोतांचा अवरोध झाला असल्यामुळें बहुतकरून तापांत घाम येत नाहीं.

**तस्य प्राग्रूपमालस्यमरतिर्गात्रगौरवम् ॥ ६ ॥**
**आस्यवैरस्यमरुचिर्जृम्भा सास्राकुलाक्षता ।**
**अङ्गमर्दोऽविपाकोऽल्पप्राणता बहुनिद्रता ॥ ७ ॥**
**रोमहर्षो विनमनं पिण्डिकोद्वेष्टनं क्लमः ।**
**हितोपदेशेष्वक्षान्तिः प्रीतिरम्लपटूषणे ॥ ८ ॥**
**द्वेषः स्वादुषु भक्ष्येषु तथा बालेषु तृड् भृशम् ।**
**शब्दाग्निशीतवाताम्बुच्छायोष्णेष्वनिमित्ततः ॥ ९ ॥**
**इच्छा द्वेषश्च तदनु ज्वरस्य व्यक्तता भवेत् ।**

त्याचें पूर्वरूप-आळस, चैन न पडणें, अंग जड होणें, तोंड बेचव होणें, अरुचि, जांभया येणें, डोळ्यांतून पाणी येणें व तें गढूळ होणें, हात, पाय मोडल्यासारखे होणें, अन्नाचा पाक न होणें, शक्ति कमी होणें, झोंप फार येणें, रोमांच उभे राहणें, शरीर वांकणें, पोटऱ्या वळणें, क्लांति, चांगला उपदेश केला असतांहि न सोसणें, आंबट, खारट व तिखट पदार्थांवर वासना जाणें, गोड पदार्थ व मुलें यांचा तिटकारा येणें, फार तहान लागणें, तसेंच शब्द, अग्नि, थंडी, वारा, पाणी, सावली व ऊन यांची कारणावांचून इच्छा व तिरस्कार होणें. हीं लक्षणें झाल्यानंतर ज्वराचीं स्पष्ट लक्षणें होतात.

**आगमापगमक्षोभमृदुतावेदनोष्मणाम् ॥ १० ॥**
**वैषम्यं तत्रतत्राङ्गे तास्ताः स्युर्वेदनाश्चलाः ।**
**पादयोः सुप्तता स्तम्भः पिण्डिकोद्वेष्टनं श्रमः ॥ ११ ॥**
**विश्लेष इव सन्धीनां साद ऊर्वोः कटीग्रहः ।**
**पृष्ठं क्षोदमिवाप्नोति निष्पीड्यत इवोदरम् ॥ १२ ॥**
**छिद्यन्त इव चास्थीनि पार्श्वगानि विशेषतः ।**
**हृदयस्य ग्रहस्तोदः प्राजनेनेव वक्षसः ॥ १३ ॥**
**स्कन्धयोर्मथनं बाह्वोर्भेदः पीडनमंसयोः ।**
**अशक्तिर्भक्षणे हन्वोर्जृम्भणं कर्णयोः स्वनः ॥ १४ ॥**
**निस्तोदः शङ्खयोर्मूर्ध्नि वेदना विरसास्यता ।**

कषायास्यत्वमथवा मलानामप्रवर्तनम् ॥ १५ ॥
रूक्षारुणत्वगास्याक्षिनखमूत्रपुरीषता ।
प्रसेकारोचकाश्रद्धाविपाकास्वेदजागराः ॥ १६ ॥
कण्ठौष्ठशोषतृट् शुष्को च्छर्दिकासौ विषादिता ।
हर्षो रोमाङ्गदन्तेषु वेपथुः क्षवथोर्ग्रहः ॥ १७ ॥
भ्रमः प्रलापो घर्मेच्छा विनामश्चानिलज्वरे ।

तापाचें येणें, जाणें, जास्त होणें, कमी होणें, वेदना व उष्णता यांचा अनियमितपणा, शरीराच्या त्या त्या भागीं राहून राहून वेदना होणें, पाय बधिर होणें, ताठणें, पोटऱ्या वळणें, थकणें, सांधे सुटल्यासारखें होणें, मांड्या गळाल्यासारखें होणें, कमर जखडणें, पाठींत ठेंचल्यासारखें वाटणें, पोटांत पिळवटल्यासारखें होणें, विशेषतः बरगड्यांचीं हाडें कापल्यासारखें वाटणें, हृदय जखडल्यासारखें वाटणें, उरांत भाल्यानें टोंचल्यासारखें वाटणें, खांदे घुसळल्यासारखें होणें, दंडांत फोडल्यासारखी वेदना होणें, अंसांत दाबल्यासारखी पीडा होणें, जबड्यास खाण्याची शक्ति नसणें, जांभया येणें, कानांत शब्द होणें, शंखांत अतिशय वेदना होणें, डोकें दुखणें, तोंड बेचव होणें किंवा तुरट होणें, मलमूत्रादिकांची प्रवृत्ति न होणें, त्वचा, तोंड, डोळे, नखें, मूत्र व पुरीष हीं रूक्ष व अरुण होणें, लालास्राव, अरुचि, अन्नावर वासना नसणें, अन्नाचा पाक न होणें, घाम न येणें, झोंप न येणें, घसा व ओंठ कोरडे पडणें, तहान, कोरडी ओकारी व ढांस, मनाची खिन्नता, रोमांच उभे राहणें, अंग व दांत शिवळणें, कंप, शिंक न येणें, चक्कर, बडबड, उष्णाची इच्छा होणें व अंग वांकणें हीं लक्षणें वातज्वरांत होतात.

युगपद्व्याप्तिरङ्गानां प्रलापः कटुवक्त्रता ॥ १८ ॥
नासास्यपाकः शीतेच्छा भ्रमो मूर्च्छा मदोऽरतिः ।
विट्स्रंसः पित्तवमनं रक्तष्ठीवनमम्लकः ॥ १९ ॥
रक्तकोठोद्गमः पीतहरितत्वं त्वगादिषु ।
स्वेदो निश्वासवैगन्ध्यमतितृष्णा च पित्तजे ॥ २० ॥

सर्व अंग एकदम तापणें, बडबड, तोंड कडू होणें, नाक व तोंड येणें, थंड पदार्थांची इच्छा होणें, चक्कर, घेरी (मूर्च्छा), मद, चैन न पडणें, अतिसार, पित्ताची वांति, रक्ताचा थुंका पडणें, आंबट ढेंकरा येणें, तांबड्या गांधी उठणें, त्वचा, तोंड, डोळे, नखें, मळ व मूत्र हीं पिवळीं किंवा हिरवीं होणें, घाम येणें, श्वासास घाण येणें, तहान फार लागणें हीं पित्तज्वराचीं लक्षणें होत.

विशेषादरुचिर्जाड्यं स्रोतोरोधोऽल्पवेगता ।
प्रसेको मुखमाधुर्यं हृल्लेपः श्वासपीनसाः ॥ २१ ॥
हृल्लासश्छर्दनं कासः स्तम्भः श्वैत्यं त्वगादिषु ।
अङ्गेषु शीतपिटिकास्तन्द्रोदर्दः कफोद्भवे ॥ २२ ॥

विशेषतः अरुचि, जडपणा (डोकें वगैरे भागास), स्रोतांचा अवरोध, तापाचा जोर कमी असणें, लालास्राव, तोंड गोड होणें, छातींत कफ दाटल्यासारखें होणें, दमा, पडसें, उम्हासे, वांति, खोकला, ताठणें (अंग), त्वचादिकांस पांढरेपणा येणें, थंड पुळ्या येणें, झांपड व अंगावर चकंदळें उठणें (उदर्द) हीं लक्षणें कफज्वरांत होतात.

काले यथास्वं सर्वेषां प्रवृत्तिर्वृद्धिरेव वा ।

त्यांच्या ज्या वेळा सांगितल्या आहेत त्या त्या वेळीं त्यांची सुरुवात किंवा वृद्धि होते.

निदानोक्तानुपशयो विपरीतोपशायिता ॥ २३ ॥

त्या त्या दोषांचीं प्रकुपित होण्याचीं जीं जीं कारणें सांगितलीं आहेत त्यांनीं ताप वाढतो, व त्यांच्या उलट कारणांनीं कमी होतो.

यथा स्वलिङ्गसंसर्गे ज्वरः संसर्गजो

दोहोंचीं लक्षणें एकत्र असलीं म्हणजे द्वंद्वज ज्वर होतात. जसें वातज्वराचीं व पित्तज्वराचीं लक्षणें एकत्र असलीं म्हणजे वातपित्तज्वर इ०

अपि च ।

शिरोऽर्तिमूर्च्छावमिदाहमोह-
कण्ठास्यशोषारतिपर्वभेदाः ।
उन्निद्रतातृड्भ्रमरोमहर्षा-
जृम्भातिवाक्त्वं च चलात्स पित्तात् ॥ २४ ॥

वातपित्तज्वरांत डोकें दुखणें, मूर्च्छा, ओकारी, दाह, मोह, घशास व तोंडास कोरड, चैन न पडणें, सांधे फुटणें, झोंप न येणें, तहान, भ्रम, रोमांच उभे राहणें, जांभया व बडबड हीं लक्षणें होतात.

तापहान्यरुचिपर्वशिरोरुक्पीनसश्वसनकासविबन्धाः ।
शीतजाड्यतिमिरभ्रमतन्द्राःश्लेष्मवातजनितज्वरलिङ्गम्

तप्तता कमी होणें, अरुचि, सांधे व डोकें दुखणें, पडसें, श्वास, खोकला, मलमूत्रांचा अवरोध, थंडी वाजणें, जडत्व, डोळ्यांपुढें अंधेरी येणें, भ्रम व झांपड हीं लक्षणें कफवातज्वरांत होतात.

शीतस्तम्भस्वेददाहाव्यवस्था-
स्तृष्णा कासः श्लेष्मपित्तप्रवृत्तिः ।
मोहस्तन्द्रालिप्ततिक्तास्यता च
ज्ञेयं रूपं श्लेष्मपित्तज्वरस्य ॥ २६ ॥

थंडी वाजणें, ताप येणें, घाम न येणें व घाम येणें यांविषयीं अनियमितपणा, तहान, खोकला, खाकऱ्यांत कफ व पित्त पडणें, मोह, झांपड व तोंड तिखट व कडू होणें हीं लक्षणें कफपित्तज्वरांत होतात.

सर्वजो लक्षणैः सर्वैर्दाहोऽत्र च मुहुर्मुहुः ।
तद्वच्छीतं महानिद्रा दिवा जागरणं निशि ॥ २७ ॥
सदा वा नैव वा निद्रा महास्वेदोऽति नैव वा ।
गीतनर्तनहास्यादिविकृतेहाप्रवर्तनम् ॥ २८ ॥

साश्रुणी कलुषे रक्ते भुग्ने लुलितपक्ष्मणी।
अक्षिणी पिण्डिकापार्श्वमूर्धपर्वास्थिरुग्भ्रमः ॥ २९ ॥
सस्वनौ सरुजौ कर्णौ कण्ठः शूकैरिवाचितः।
परिदग्धा खरा जिह्वा गुरुः स्रस्ताङ्गसन्धिता ॥ ३० ॥
रक्तपित्तकफष्ठीवो लोलनं शिरसोऽतिरुक्।
कोठानां श्यावरक्तानां मण्डलानां च दर्शनम् ॥ ३१ ॥
हृद्व्यथा मलसंसर्गः प्रवृत्तिर्वाल्पशोऽति वा।
स्निग्धास्यता बलभ्रंशः स्वरसादः प्रलापिता ॥ ३२ ॥
दोषपाकश्चिरात्तन्द्रा प्रततं कण्ठकूजनम्।
सन्निपातमभिन्यासं तं ब्रूयाच्च हृतौजसम् ॥ ३३ ॥

त्रिदोषात्मक ज्वरांत वर सांगितलेलीं तिन्ही दोषांचीं लक्षणें असून त्यांशिवाय वारंवार थंडी लागणें व वारंवार दाह होणें, दिवसा अतिशय झोंप व रात्रीं जागरण, नेहमीं झोंप येणें किंवा मुळींच न येणें, फार घाम येणें किंवा मुळींच न येणें, गाणें, नाचणें, हंसणें इत्यादि वेडयावांकडया चेष्टा करणें, डोळे पाण्यानें भरणें, गढूळ, लाल व वांकडे होणें, व त्यांच्या पापण्यांचे केंस लुले होणें, पोटऱ्या, कुशी, डोकें, सांधे व हाडें यांत वेदना होणें, भ्रम, कानांत शब्द होणें व दुःख होणें, घशांत भाताचीं कुसें अडकल्यासारखें होणें, जीभ करपल्यासारखी, खरखरीत व जड होणें, अंग व सांधे गळल्यासारखें होणें, थुकींत रक्त, पित्त व कफ पडणें, डोकें कांपणें (हलणें), फार वेदना होणें, अंगावर गांधी व काळीं आणि लाल अशीं चकंदळें पडणें, हृदयांत दुखणें, मळाचा अवरोध किंवा अतिसार किंवा थोडथोडा मळ होणें, तोंड चिकट असणें, शक्ति कमी होणें, आवाज बसणें, बडबड, दोषांचा पाक उशीरा होणें, झांपड व घसा अतिशय वाजणें हीं लक्षणें होतात, त्यास सन्निपात, अभिन्यास व हृतौजस असें म्हणतात.

दोषे विबद्धे नष्टेऽग्नौ सर्वसम्पूर्णलक्षणः।
असाध्यः सोऽन्यथा कृच्छ्रो भवेद्वैकल्यदोऽपि वा ३४

दोषांचा अवरोध झाला असतां व अग्नि फार मंद झाला असतां आणि सर्व लक्षणें परिपूर्ण झालीं असतां सन्निपात असाध्य होतो. एरव्हीं कष्टसाध्य असतो, किंवा गात्र किंवा इंद्रियें तरी विकल करितो.

अन्यश्च सन्निपातोऽथो यत्र पित्तं पृथक् स्थितम्।
त्वचि कोष्ठेऽथवा दाहं विदधाति पुरोऽनु वा ॥ ३५ ॥

दुसरा सन्निपाताचाच एक भेद आहे; त्यांत पित्त निराळें होऊन त्वचेंत किंवा कोठ्यांत राहतें, व पूर्वी किंवा शेवटीं दाह उत्पन्न करितें.

तद्वद्वातकफौ शीतं

त्याप्रमाणें वायु व कफ त्वचेंत किंवा कोठ्यांत वेगळे राहून आरंभीं किंवा शेवटीं थंडी उत्पन्न करितात. (त्वचेंत राहिले तर आरंभीं थंडी व कोठ्यांत राहिले तर पश्चात् थंडी.)

दाहादिर्दुस्तरस्तयोः।

त्या दोन्ही प्रकारांत ज्यांत पूर्वी दाह होतो तो कष्टसाध्य आहे.

शीतादौ तत्र पित्तेन कफे स्यन्दितशोषिते ॥ ३६ ॥
शीते शान्तेऽम्लको मूर्च्छा मदस्तृष्णा च जायते।

त्यांपैकीं शीतादि ज्वरांत कफ पित्तानें पातळ होऊन सुकला असतां व थंडी बंद झाली असतां दाह होतो व आंबट घशाशीं येतें, मूर्च्छा, मद व तहान हीं होतात.

दाहादौ पुनरन्तेऽस्य तन्द्राष्ठीववमिक्लमाः ॥ ३७ ॥

दाहादिज्वरांत दाह शांत झाल्यावर झांपड, तोंडास पाणी सुटणें, वांति व ग्लानि हे प्रकार होतात.

आगन्तुरभिघाताभिषङ्गशापाभिचारतः।
चतुर्धा

आगंतुज्वराचे अभिघात, अभिषंग, शाप व अभिचार या चार कारणांपासून चार प्रकार होतात.

अत्र क्षतच्छेददाहाद्यैरभिघाततः ॥ ३८ ॥
श्रमाच्च तस्मिन्पवनः प्रायो रक्तं प्रदूषयन्।
सव्यथाशोफवैवर्ण्यं सरुजं कुरुते ज्वरम् ॥ ३९ ॥

त्यांपैकीं क्षतानें, कापल्यानें, भाजल्यानें, श्रमानें व दुसऱ्या अशाच प्रकारच्या आघातानें, जो ज्वर येतो त्यास अभिघातजन्य आगंतु ज्वर असें म्हणतात. त्यांत बहुधा वायु रक्तास दूषित करून ताप उत्पन्न करितो. त्यांत ठणका, सूज, विवर्णता व शूल हीं लक्षणें असतात.

ग्रहावेशौषधिविषक्रोधभीशोककामजः।
अभिषङ्गात्

पिशाचबाधा, औषधींचा वास, विष, राग, भीति, शोक व काम यांपासून येणाऱ्या ज्वरांस अभिषंगजन्य आगंतु ज्वर असें म्हणतात.

ग्रहेणास्मिन्नकस्माद्धासरोदने ॥ ४० ॥

पिशाचबाधेपासून जो ताप येतो त्यांत मनुष्य कारणावांचून हंसतो व रडतो.

ओषधीगन्धजे मूर्च्छा शिरोरुग्वेपथुः क्षवः।

औषधांच्या वासानें आलेल्या तापांत मूर्च्छा, डोकें दुखणें, कंप व शिंका हीं लक्षणें असतात.

विषान्मूर्च्छातिसारास्यश्यावतादाहहृद्ग्रहः ॥ ४१ ॥

विषापासून आलेल्या तापांत मूर्च्छा, अतिसार, तोंड काळें होणें, आग होणें व हृदयांत दुखणें हीं लक्षणें असतात.

क्रोधात्कम्पः शिरोरुक् च

क्रोधापासून येणाऱ्या तापांत कंप व डोकें दुखणें हीं लक्षणें असतात.

प्रलापो भयशोकजे ।

भय व शोक यांपासून आलेल्या तापांत बडबड असते.

कामाद्भ्रमोऽरुचिर्दाहो ह्रीनिद्राधीधृतिक्षयः ॥ ४२ ॥

कामजन्य आगंतु ज्वरांत भ्रम, अरुचि, दाह आणि लज्जा, झोंप, बुद्धि व धैर्य हीं नाहींशीं होतात.

ग्रहादौ सन्निपातस्य भयादौ मरुतस्त्रये ।
कोपः कोपे तु पित्तस्य

ग्रहावेश, औषधिगंध व विष यांजपासून होणाऱ्या ज्वरांत सन्निपाताचा, भय, शोक व काम यांजपासून होणाऱ्यांत वाताचा व क्रोधजन्य ज्वरांत वातपित्ताचा कोप होतो.

यौ तु शापाभिचारजौ ॥ ४३ ॥
सन्निपातज्वरौ घोरौ तावसह्यतमौ मतौ ।

शाप व अभिचार यांपासून जे सन्निपात ज्वर होतात ते फार भयंकर व अतिशय असह्य असतात.

तत्राभिचारिकैर्मन्त्रैर्हूयमानस्य तप्यते ॥ ४४ ॥
पूर्वं चेतस्ततो देहस्ततो विस्फोटतृड्भ्रमैः ।
सदाहमूर्च्छैर्ग्रस्तस्य प्रत्यहं वर्धते ज्वरः ॥ ४५ ॥

अभिचारिक मंत्र म्हणून ज्या मनुष्याच्या नांवानें हवन वगैरे केलें जातें त्याचें प्रथमतः मन संतप्त होतें, व नंतर ताप भरतो. विस्फोट, तहान, भ्रम, दाह, मूर्च्छा यांनीं तो व्याप्त होतो, व प्रत्येक दिवशीं त्याचा ताप वाढतो.

इति ज्वरोऽष्टधा दृष्टः

या प्रकारें ज्वर आठ प्रकारचा आहे.

समासाद्द्विविधस्तु सः ।
शारीरो मानसः सौम्यस्तीक्ष्णोऽन्तर्बहिराश्रयः ॥ ४६ ॥
प्राकृतो वैकृतः साध्योऽसाध्यः सामो निरामकः ।

परंतु संक्षेपतः ज्वराचे दोन प्रकार. ते असे : शारीर व मानस, सौम्य व तीक्ष्ण, अंतराश्रित व बहिराश्रित, प्राकृत व वैकृत, साध्य व असाध्य, साम व निराम.

पूर्वं शरीरे शारीरे तापो मनसि मानसे ॥ ४७ ॥

शारीरज्वरांत प्रथम शरीरांत ताप भरतो, व मानसज्वरांत प्रथम मन तप्त होतें.

पवने योगवाहित्वाच्छीतं श्लेष्मयुते भवेत् ।

वायु योगवाही आहे याकरितां तो कफयुक्त झाला असतां थंडी वाजते.

दाहः पित्तयुते

तो पित्तयुक्त झाला असतां दाह करितो (कारण योगवाही)

मिश्रं मिश्रे

व तो पित्त व कफ यांनीं युक्त असला म्हणजे केव्हां दाह होतो व केव्हां थंडी वाजते.

अन्तःसंश्रये पुनः ॥ ४८ ॥
ज्वरेऽधिकविकाराः स्युरन्तः क्षोभो मलग्रहः ।

अंतराश्रित ज्वरांत विकार फार असतात, आंत अतिशय दाह असतो व मळाचा अवरोध होतो.

बहिरेव बहिर्वेगे तापोऽपि च सुसाध्यता ॥ ४९ ॥

बहिराश्रित ज्वरांत दाह बाहेरून होतो व तो सुसाध्य असतो.

वर्षाशरद्वसन्तेषु वाताद्यैः प्राकृतः क्रमात् ।
वैकृतोऽन्यः स दुःसाध्यः प्रायश्च प्राकृतोऽनिलात् ॥५०॥

वर्षाऋतूंत वायूपासून, शरदांत पित्तापासून व वसंतांत कफापासून जे ताप येतात त्यांस प्राकृत असें म्हणतात, व यांवांचून इतर जे त्यांस वैकृत ज्वर असें म्हणतात. वैकृत व बहुधा वायूपासून झालेला प्राकृत ज्वर हे कष्टसाध्य असतात.

वर्षासु मारुतो दुष्टः पित्तश्लेष्मान्वितो ज्वरम् ।
कुर्यात्

वर्षाऋतूंत दुष्ट झालेला वायु, पित्त व कफ यांनीं युक्त होऊन ज्वर उत्पन्न करितो.

पित्तं च शरदि तस्य चानुबलं कफः ॥ ५१ ॥
तत्प्रकृत्या विसर्गाच्च तत्र नानशनाद्भयम् ।

शरदृतूंत कुपित झालेल्या पित्तास कफाचें पाठबळ मिळून ताप उत्पन्न होतो. त्यांत कफाच्या स्वभावामुळें व विसर्गकाल असल्यामुळें लंघन (उपास) केल्यापासून भय नाहीं.

कफो वसन्ते तमपि वातपित्तं भवेदनु ॥ ५२ ॥

वसंतांत कफाचा प्रकोप होऊन त्यास मागून हळू हळू वात व पित्त हीं मदत करितात, त्यामुळें ज्वर होतो.

बलवत्स्वल्पदोषेषु ज्वरः साध्योऽनुपद्रवः ।

रोगी बलवान् व दोष अल्प असून उपद्रव नसले म्हणजे ज्वर साध्य असतो.

सर्वथा विकृतिज्ञाने प्रागसाध्य उदाहृतः ॥ ५३ ॥

असाध्य ज्वर कोणता हें पूर्वीं विकृतिविज्ञानीय अध्यायांत सांगितलेंच आहे.

ज्वरोपद्रवतीक्ष्णत्वमग्लानिर्बहुमूत्रता ।
न प्रवृत्तिर्न विड् जीर्णा न क्षुत्सामज्वराकृतिः ॥५४॥

ज्वराचे उपद्रव जबर असणें, ग्लानि असणें, मूत्र फार होणें, शौचास न होणें व झालेंच तर तो मळ अपक्व असणें व भूक न लागणें हीं सामज्वराचीं लक्षणें होत.

ज्वरवेगोऽधिकं तृष्णा प्रलापः श्वसनं भ्रमः ।
मलप्रवृत्तिरुत्क्लेशः पच्यमानस्य लक्षणम् ॥ ५५ ॥

तापाचा वेग फार असणें, तहान, बडबड, श्वास, भ्रम, शौचास होणें व मळमळणें हीं पच्यमान ज्वराचीं लक्षणें होत.

**जीर्णताऽऽमविपर्यासात्सप्तरात्रं च लङ्घनात् ।**

आमज्वराच्या लक्षणांच्या विपरीत लक्षणें झालीं असतां व सात दिवस लंघन केलें असतां ज्वर निराम (पक्क) होतो.

**ज्वरः पञ्चविधः प्रोक्तो मलकालबलाबलात् ॥ ५६ ॥**
**प्रायशः सन्निपातेन भूयसा तूपदिश्यते ।**
**सन्ततः सततोऽन्येद्युस्तृतीयकचतुर्थकौ ॥ ५७ ॥**

वातादिक दोष व काल यांच्या शक्तितारतम्यानें संतत, सतत, अन्येद्यु, तृतीयक व चतुर्थक असे ज्वराचे पांच प्रकार होतात. ते बहुधा सन्निपातापासूनच असतात, परंतु त्यांत जो बलवान् असतो त्यावरून त्यांस नांवें देतात.

**धातुमूत्रशकृद्वाहिस्रोतसां व्यापिनो मलाः ।**
**तापयन्तस्तनुं सर्वां तुल्यदूष्यादिवर्धिताः ॥ ५८ ॥**
**बलिनो गुरवः स्तब्धा विशेषेण रसाश्रिताः ।**
**संततं निष्प्रतिद्वन्द्वा ज्वरं कुर्युः सुदुःसहम् ॥ ५९ ॥**

रसादिक धातु व मूत्र व शकृत् वाहणारीं स्रोतसें यांना व्यापून राहणारे वातादिक दोष, त्यांच्याशीं समान दूष्य, देश, काल इत्यादिकांनीं वाढले असतां, बलवान्, गुरु व स्तब्ध होऊन सर्व शरीर तापवितात, व विशेषेंकरून रसाश्रित होऊन, धातूंच्या साहाय्यावांचून महान् दुःसह असा संततज्वर उत्पन्न करितात.

**मलं ज्वरोष्मा धातून्वा स शीघ्रं क्षपयेत् ततः ।**

मग ती ज्वराची उष्णता मलांस किंवा धातूंस लवकर क्षीण करिते.

**सर्वाकारं रसादीनां शुद्ध्याऽशुद्ध्याऽपि वा क्रमात् ।**
**वातपित्तकफैः सप्तदशद्वादशवासरान् ।**
**प्रायोऽनुयाति मर्यादां मोक्षाय च वधाय च ॥ ६१ ॥**
**इत्यग्निवेशस्य मतं**

रसादिकांची सर्वांशीं शुद्धि झाली असतां वायूनें सात, पित्तानें दहा व कफानें बारा दिवसांत बहुधा ताप निघतो व त्यांचीच सर्वांशीं अशुद्धि (नासाडी) झाली असतां वायूनें सात, पित्तानें दहा व कफानें बारा दिवसांत मनुष्य मरतो असें अग्निवेशाचें मत आहे.

**हारीतस्य पुनः स्मृतिः ।**

**द्विगुणा सप्तमी यावन्नवम्येकादशी तथा ॥ ६२ ॥**

**एषा त्रिदोषमर्यादा मोक्षाय च वधाय च ।**

चौदा, अठरा किंवा बावीस दिवसांची अनुक्रमानें वातादिजन्य संततज्वराची मर्यादा असते असें हारीत ऋषीचें मत आहे. इतक्या दिवसांनीं रोगी मरतो किंवा तरतो.

**शुद्ध्यशुद्ध्योर्ज्वरः कालं दीर्घमप्यनुवर्तते ॥ ६३ ॥**

कांहींची शुद्धि व कांहींची अशुद्धि झाली असतां जास्त दिवसहि ताप राहतो.

**कृशानां व्याधिमुक्तानां मिथ्याहारादिसेविनाम् ।**
**अल्पोऽपि दोषो दूष्यादेर्लब्ध्वाऽन्यतमतो बलम् ॥ ६४ ॥**
**सविपक्षो ज्वरं कुर्याद्विषमं क्षयवृद्धिभाक् ।**

नुकतेच रोगांतून बरे झालेल्या कृशजनांनीं अपथ्य आहारादिकांचें सेवन केलें असतां त्यांचा वातादि दोष अल्प असतांहि दूष्य, देश, ऋतु इत्यादिकांपासून प्रबळ होऊन धात्वादिकांस घेऊन क्षीण व वृद्ध होणारा विषमज्वर उत्पन्न करितो (विषमांत व संततांत भेद हाच कीं, पहिल्यांत दोषाची क्षयवृद्धि धातूंच्या वृद्धिक्षयावर अवलंबून आहे, संततांत तसें नाहीं.)

**दोषः प्रवर्तते तेषां स्वे काले ज्वरयन् बली ॥ ६५ ॥**
**निवर्तते पुनश्चैष प्रत्यनीकबलाबलः ।**

त्यांचे वातादिदोष आपापल्या वेळीं बलवान् होऊन ज्वर उत्पन्न करितात, व दूष्यादिकांच्या बळानें निर्बल झाले असतां पुनः शांत होतात. (अर्थात् ज्वरहि निघतो.)

**क्षीणे दोषे ज्वरः सूक्ष्मो रसादिष्वेव लीयते ॥ ६६ ॥**
**लीनत्वात्कार्श्यवैवर्ण्यजाड्यादीनादधाति सः ।**

दोष क्षीण झाला असतां ज्वर सूक्ष्म होऊन रसादिकांतच दडून राहतो, व दडून राहिल्यामुळें कृशता, विवर्णता, जाड्य इत्यादि उत्पन्न करितो.

**आसन्नविवृतास्यत्वात्स्रोतसां रसवाहिनाम् ॥ ६७ ॥**
**आशु सर्वस्य वपुषो व्याप्तिर्दोषेण जायते ।**
**संततः सततस्तेन**

रसवाही स्रोतें जवळ जवळ व त्यांचीं तोंडें खुलीं असल्यामुळें सर्व शरीरांत दोषाची व्याप्ति फार त्वरित होत जाते, त्यामुळेंच संतत ज्वर सदोदित राहतो.

**विपरीतो विपर्ययात् ॥ ६८ ॥**

वरच्याहून विपरीत कारणामुळें (रक्तादिकांचीं स्रोतसें दूर दूर व संकुचित असल्यामुळें) सततादि विषमज्वर सदोदित रहात नाहींत.

**विषमो विषमारम्भक्रियाकालोऽनुषङ्गवान् ।**

विषमज्वराचा आरंभ (प्रथम अमुक भागांत उत्पन्न होणें), त्याची क्रिया व त्याचा येण्याचा काल हीं अनियमित असून तो फार दिवस राहतो.

**दोषो रक्ताश्रयः प्रायः करोति सततं ज्वरम् ॥ ६९ ॥**
**अहोरात्रस्य स द्विः स्यात्**

बहुधा रक्ताश्रित दोषापासून सतत* ज्वर उत्पन्न होतो व तो अहोरात्रांत दोन वेळां येतो.

* यांत जो सतत या नांवाचा ज्वर सांगितला आहे, तो दिवसांतून (२४ तासांत) २ वेळां येणारा हिंवतापच आहे. कधीं कधीं त्यांत हिंव नसून नुसता तापच दोन वेळां भरत असतो. 'संतत' व 'सतत' या शब्दांचे अर्थ जरी सारखे आहेत तरी वैद्यकांत हे दोन शब्द सांकेतिक धरल्यामुळें ते भिन्न प्रकारच्या दोन ज्वरांचे सूचक आहेत.

सकृदन्येद्युराश्रितः ।
तस्मिन्मांसवहा नाडीः

मांसवह स्रोतांच्या आश्रयानें राहिलेल्या दोषांपासून अन्येद्यु ज्वर होतो. तो अहोरात्रांत एकदां येतो.

मेदोनाडीस्तृतीयके ॥ ७० ॥
ग्राही पित्तानिलान्मूर्ध्नस्त्रिकस्य कफपित्ततः।
सपृष्ठस्यानिलकफात्स चैकाहान्तरः स्मृतः ॥ ७१ ॥

मेदोवह स्रोतांत दोष गेला असतां तृतीयक ज्वर उत्पन्न होतो; तो एक दिवसाआड येतो; तो वातपित्तात्मक असतो तेव्हां डोकें प्रथम दुखूं लागून ताप येतो, कफपित्तात्मक असतो तेव्हां त्रिकसंधींतून ( कमरेच्या मागच्या हाडांतून ) व वातकफात्मक असला म्हणजे पाठ व त्रिकसंधि यांपासून उत्पन्न होतो. ( याला तिजारें हिंव म्हणतात. )

चतुर्थको मले मेदोमज्जास्थ्यन्यतमस्थिते ।
मज्जास्थ एवेत्यपरे प्रभावं स तु दर्शयेत् ॥ ७२ ॥
द्विधा कफेन जङ्घाभ्यां स पूर्वं शिरसोऽनिलात् ।

मेद, मज्जा व अस्थि यांपैकीं कोणत्यांत तरी दोष गेला असतां चातुर्थिक ज्वर उत्पन्न होतो. कोणी म्हणतात कीं, मज्जाश्रित दोषापासूनच चातुर्थिक ज्वर उत्पन्न होतो. त्याचा प्रभाव दोन प्रकारचा आढळतो; कफात्मक असला म्हणजे प्रथम पोटऱ्यांतून ( जंघांतून ), व वातात्मक असतां प्रथम मस्तकांतून त्याचा आरंभ होतो.

अस्थिमज्जोभयगते चतुर्थकविपर्ययः ॥ ७३ ॥
त्रिधा द्व्यहं ज्वरयति दिनमेकं तु मुञ्चति ।

अस्थि व मज्जा या दोहोंत दोष राहिला असतां चतुर्थकाच्या विपरीत असा एक ज्वर होतो. त्याचे तीन प्रकार आहेत. त्यांत दोन दिवस ताप येतो व एक दिवस येत नाहीं. ( तीन प्रकार म्हणजे वातोल्बण, पित्तोल्बण व कफोल्बण. )

दोषदूष्यर्त्वहोरात्रप्रभृतीनां बलाज्ज्वरः ॥ ७४ ॥
मनसो विषयाणां च कालं तं तं प्रपद्यते ।

वातादि दोष, रसादि दृष्यें, ऋतु, दिवस, रात्र, मनाची क्रिया व शब्दादि विषय, यांच्या सामर्थ्यानुरूप त्या त्या वेळीं ज्वराची पाळी येते.

धातून् प्रक्षोभयन्दोषो मोक्षकाले विलीयते ॥ ७५ ॥
ततो नरः श्वसन् स्विद्यन् कूजन् वमति चेष्टते ।
वेपते प्रलपत्युष्णैः शीतैश्चाङ्गैर्हतप्रभः ॥ ७६ ॥
विसंज्ञो ज्वरवेगार्त्तः सक्रोध इव वीक्ष्यते ।
सदोषशब्दं च शकृद्द्रवं सृजति वेगवत् ॥ ७७ ॥

वातादि दोष धातूंस क्षुब्ध करून ताप जातेवेळीं दडून राहतात, त्यामुळें मनुष्य श्वास टाकितो, त्यास घाम येतो, कण्हतो, ओकतो, लोळतो, कांपतो, बडबडतो, त्याचें अंग उष्ण व थंड लागतें, कांति नष्ट होते, बेशुद्ध होतो, तापाच्या वेगानें व्याकुळ होऊन रागावल्यासारखा दिसतो, शौचास वेगानें, पातळ व आमयुक्त मळ होतो व होतेवेळीं शब्द होतो.

देहो लघुर्व्यपगतक्लममोहतापः
पाको मुखे करणसौष्ठवमव्यथत्वम् ।
स्वेदः क्षवः प्रकृतियोगि मनोऽन्नलिप्सा
कण्डूश्च मूर्ध्नि विगतज्वरलक्षणानि ॥ ७८ ॥

ताप गेला असतां शरीर हलकें वाटतें, ग्लानि, मोह व तप्तता हीं नाहींशीं होतात, तोंड येतें, इंद्रियें तरतरीत होतात, व्यथा नाहींशी होते, घाम येतो, शिंका येतात, मन ताळ्यावर येतें, अन्नावर वासना जाते व डोक्यास कंड सुटते.

---

# तृतीयोऽध्यायः

## अध्याय ३ रा.

## अथातो रक्तपित्तकासनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां रक्तपित्त व खोकला यांचें निदान सांगतों.

भृशोष्णतीक्ष्णकट्वम्ललवणादिविदाहिभिः ।
कोद्रवोद्दालकैश्चान्नैस्तद्युक्तैरतिसेवितैः ॥ १ ॥
कुपितं पित्तलैः पित्तं द्रवं रक्तं च मूर्च्छिते ।
ते मिथस्तुल्यरूपत्वमागम्य व्याप्नुतस्तनुम् ॥ २ ॥

अतिशय उष्ण, तीक्ष्ण, तिखट, आंबट, खारट व विदाही पदार्थ, हरीक, उद्दालकाचे तांदूळ आणि हरीक व उद्दालक ज्यांत आहेत अशीं अन्नें अतिशय भक्षण केल्यानें व पित्तकर पदार्थ खाल्यानें पित्त व रक्त अनुक्रमें कुपित व पातळ होऊन एकमेकांत मिसळतात व दोन्ही समानरूप झाल्यावर सर्व शरीर व्यापितात. ( उक्त हेतूंनीं रक्त नेहमींपेक्षां जास्त द्रव झाल्यानें तें स्राव होण्यास जास्त पात्र होतें. )

पित्तं रक्तस्य विकृतेः संसर्गाद्दूषणादपि ।
गन्धवर्णानुवृत्तेश्च रक्तेन व्यपदिश्यते ॥ ३ ॥

पित्त हें रक्ताचा मळ आहे म्हणून व रक्ताशीं त्याचा संसर्ग झाल्यामुळें व अतिशय दुष्ट झाल्यामुळें आणि त्याचा वास व रंग रक्तासारखे होतात म्हणून त्यास रक्तपित्त, अम्लपित्त इत्यादि रक्तशब्दयुक्त नांवें देतात, ( किंवा नुसतया रक्त शब्दानेंच ह्या रोगाचा व्यपदेश करितात. )

प्रभवत्यसृजः स्थानात् प्लीहतो यकृतश्च तत् ।

रक्ताचें स्थान जें प्लीहा व यकृत् त्यापासून तें ( पित्त ) उत्पन्न होतें.

**शिरोगुरुत्वमरुचिः शीतेच्छा धूमकोऽम्लकः ॥ ४ ॥**
**छर्दिश्छर्दितबैभत्स्यं कासः श्वासो भ्रमः क्लमः ।**
**लोहलोहितमत्स्यामगन्धास्यत्वं स्वरक्षयः ॥ ५ ॥**
**रक्तहारिद्रहरितवर्णता नयनादिषु ।**
**नीललोहितपीतानां वर्णानामविवेचनम् ॥ ६ ॥**
**स्वप्ने तद्वर्णदर्शित्वं भवत्यस्मिन् भविष्यति ।**

डोकें जड होणें, अरुचि, थंडाची इच्छा, घशाशीं जळजळणें, आंबट ढेंकरा येणें, वांति होणें, वांति पाहिली असतां फारच किळस येणें, खोकला, दमा, भ्रम, ग्लानि, तोंडास लोखंड, रक्त, मासे यांसारखी किंवा आंबूस घाण येणें, शब्द क्षीण होणें, डोळे, त्वचा, मळ, मूत्र, नखें इत्यादिकांस तांबडा, पिंवळा किंवा हिरवा रंग येणें; निळा, लाल व पिंवळा हे रंग ओळखतां न येणें व स्वप्नांत त्या वर्णाचे पदार्थ दिसणें हीं लक्षणें रक्तपित्त होण्याच्या पूर्वीं होतात.

**ऊर्ध्वं नासाक्षिकर्णास्यैर्मेढ्रयोनिगुदैरधः ॥ ७ ॥**
**कुपितं रोमकूपैश्च समस्तैस्तत्प्रवर्तते ।**

नाक, डोळे, कान व तोंड यांतून जें प्रवृत्त होतें त्यास ऊर्ध्वगामी रक्तपित्त असें म्हणतात, व जें शिश्न, गुद व योनि यांतून प्रवृत्त होतें त्यास अधोगामी व सर्व रोमरंध्रांतून व खालच्या व वरच्या द्वारांतून जें प्रवृत्त होतें त्यास उभयगामी रक्तपित्त असें म्हणतात.

**ऊर्ध्वं साध्यं कफाद्यस्मात्तद्विरेचनसाधनम् ॥ ८ ॥**
**बह्वौषधं च पित्तस्य विरेको हि वरौषधम् ।**
**अनुबन्धी कफो यश्च तत्र तस्यापि शुद्धिकृत् ॥ ९ ॥**
**कषायः स्वादवोऽप्यस्य विशुद्धश्लेष्मणो हिताः ।**
**किमु तिक्ताः कषाया वा ये निसर्गात्कफापहाः ॥ १० ॥**

ऊर्ध्वरक्तपित्त कफापासून असतें व तें साध्य आहे, कारण तें विरेचनानें साध्य होतें व त्यावर औषधेंही पुष्कळच आहेत. आणि विरेचन हा पित्तावर उत्तम उपाय आहे व ह्यांत त्यास कफाचें बळ असून त्या कफाचेंही शोधन विरेचनानें होतें. कफाची शुद्धि झाली आहे ( विरेकानें ) अशा पुरुषास मधुर काढेहि हितकारक होतात; मग जे स्वभावतः कफाचा नाश करितात असे कडू व तुरट काढे हितकारक होतील यांत नवल काय ? *

**अधो याप्यं चलाद्यस्मात्तत्प्रच्छर्दनसाधनम् ।**
**अल्पौषधं च पित्तस्य वमनं न वरौषधम् ॥ ११ ॥**
**अनुबन्धी चलो यश्च शान्तयेऽपि न तस्य तत् ।**
**कषायाश्च हितास्तस्य मधुरा एव केवलम् ॥ १२ ॥**

अधोगत रक्तपित्त याप्य आहे, कारण तें वायूपासून असतें व वमनानें साध्य होतें, आणि यांवर औषधेंहि थोडीं आहेत. तसेंच पित्तावर वमन हेंहि चांगलेंसें हितकारक नाहीं. व त्याचा मदतनीस जो वायु त्याचीहि शांति वमनानें होत नाहीं, व त्यावर केवळ मधुर काढेच हितकर होतात. ( कफावरहि चालतील असे जे तिक्त व कषाय काढे [ वर सांगितलेले ] ते वातप्रकोप असल्यामुळें अधोगतांत त्यांचा उपयोग होत नाहीं. )

**कफमारुतसंसृष्टमसाध्यमुभयायनम् ।**
**अशक्यप्रातिलोम्यत्वादभावादौषधस्य च ॥ १३ ॥**

खालच्या व वरच्या दोन्ही मार्गांनीं प्रवृत्त होणारें रक्तपित्त कफ व वायु यांनीं युक्त असतें. त्याचें प्रतिलोमन करणें अशक्य असल्यामुळें ( ऊर्ध्वगाचें प्रतिलोमन विरेचनानें व अधोगाचें वमनानें करावयाचें असतें व येथें दोन्ही प्रकार एकदम चालू होतात व म्हणून दोहोंचें प्रतिलोमन करणें अशक्य आहे, ) व त्यावर औषध नसल्यामुळें तें ( उभयगामी ) असाध्य होय.

**न हि संशोधनं किञ्चिदस्त्यस्य प्रतिलोमगम् ।**
**शोधनं प्रतिलोमं च रक्तपित्ते भिषग्जितम् ॥ १४ ॥**

रक्तपित्तावर त्याच्या प्रतिलोम ( उलट दिशेनें प्रवृत्ति करणारें ) असें शोधन हेंच औषध आहे; आणि उभयात्मक रक्तपित्तावर प्रतिलोम असें शोधन असण्याचा मुळींच संभव नाहीं.

**एवमेवोपशमनं सर्वशो नास्य विद्यते ।**
**संसृष्टेषु हि दोषेषु सर्वजिच्छमनं हितम् ॥ १५ ॥**

त्याचप्रमाणें सर्व प्रकारें त्याचें शमन करणारेंहि औषध नाहीं. कारण तिन्ही दोष एकत्र प्रकुपित झाले असतां त्या तिन्हींचें शमन करणारें औषध पाहिजे असतें ( तसें मिळणें अशक्य, कारण एकाचा शम करावा तों दुसरा दोष कुपित होतो ).

**तत्र दोषानुगमनं सिरास्र इव लक्षयेत् ।**

त्यांत ( रक्तपित्तांत ) वातादिदोषांचा संबंध शिरंतील रक्ताचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांवरून समजावा.

**उपद्रवांश्च विकृतिज्ञानतः**

व रक्तपित्तांचे उपद्रव विकृतिविज्ञानीयाध्यायांत सांगितले आहेतच.

**तेषु चाधिकम् ॥ १६ ॥**
**आशुकारी यतः कासस्तमेवातः प्रवक्ष्यते ।**

त्यांत खोकला फार वेळां आढळतो व तो आपली क्रिया त्वरित करितो ( आशुकारी ) म्हणून प्रथम त्याचेंच वर्णन करितों.

**पञ्च कासाः स्मृता वातपित्तश्लेष्मक्षतक्षयैः ॥ १७ ॥**

खोकल्याचे प्रकार पांच आहेत. ते असेः—वातकास, पित्तकास, कफकास, क्षतकास व क्षयकास.

---

* ऊर्ध्वगामी रक्तपित्तांत तुरट व कडू पदार्थांचा अधोगामी रक्तपित्तांपेक्षां अधिक उपयोग होतो. याचें कारण इतकेंच दिसतें कीं, अशा पदार्थांनीं जसें रक्त बंद होण्याचा संभव आहे तसाच मलाचा अवष्टंभहि उत्पन्न होण्याचा संभव आहे, व मलाचा अवष्टंभ तर अधोगामी रक्तपित्तास अवश्य वाढवितो. ऊर्ध्वगामी रक्तपित्तास तादृश वाढवीत नाहीं.

क्षयायोपेक्षिताः सर्वे बलिनश्चोत्तरोत्तरम्।

हयगर्यीनें सर्व कास क्षयावर जातात व ते अनुक्रमानें एकापेक्षां एक बलवान् आहेत.

तेषां भविष्यतां रूपं कण्ठे कण्डूररोचकः ॥ १८ ॥
शूकपूर्णाभकण्ठत्वं

घशांत खवखवणें, तोंडाला अरुचि व घशांत भाताचीं कुसळें अडकल्यासारखें वाटणें, हीं खोकल्याचीं पूर्व लक्षणें होत.

तत्राद्यो विहतोऽनिलः।
ऊर्ध्वं प्रवृत्तः प्राप्योरस्तस्मिन् कण्ठे च संसृजन् ॥१९॥
शिरःस्रोतांसि संपूर्य ततोऽङ्गान्युत्क्षिपन्निव।
क्षिपन्निवाक्षिणी पृष्ठमुरः पार्श्वे च पीडयन् ॥ २० ॥
प्रवर्तते स वक्त्रेण भिन्नकांस्योपमध्वनिः।

त्यांत खालून रुद्ध झालेला वायु उलटून उरांत येऊन तेथें व घशांत अडकून मस्तकांतील शिरा व्यापून टाकितो, त्यामुळें शरीर वर टाकिल्यासारखें वाटतें व डोळे बाहेर फेंकल्यासारखे वाटतात. तो वायु पाठींत, उरांत व बरगड्यांत पीडा करीत फुटक्या कांशाच्या भांड्याच्या नादासारख्या शब्दानें तोंडांतून बाहेर पडतो.

हेतुभेदात्प्रतीघातभेदो वायोः सरंहसः ॥ २१ ॥
यद्रुजाशब्दवैषम्यं कासानां जायते ततः।

कारणें जशीं असतील त्याप्रमाणें वेगवान् वायूचे आघातहि निरनिराळे होतात, त्यामुळेंच निरनिराळ्या खोकल्यांत वेदना व शब्द हेहि निरनिराळेच होतात.

कुपितो वातलैर्वातः शुष्कोरःकण्ठवक्त्रताम् ॥ २२ ॥
हृत्पार्श्वोरःशिरःशूलं मोहक्षोभस्वरक्षयान्।
करोति शुष्कं कासं च महावेगरुजास्वनम् ॥ २३ ॥
सोऽङ्गहर्षी कफं शुष्कं कृच्छ्रान्मुक्त्वाल्पतां व्रजेत्।

वातुळ पदार्थांनीं कुपित झालेला वायु उर, कंठ व तोंड यांस कोरड; हृदय, बरगड्या, उर व डोकें यांत शूल; मोह, अंतर्दाह, स्वरक्षीणता व कोरडा खोकला उत्पन्न करितो. त्याचा वेग, वेदना व शब्द हीं फार असतात; अंगावर रोमांच उभे राहतात; व मोठ्या दुःखानें कोरडा कफ पडला म्हणजे खोकला कमी होतो.

पित्तात्पीताक्षिकफता तिक्तास्यत्वं ज्वरो भ्रमः ॥२४॥
पित्तासृग्वमनं तृष्णा वैस्वर्यं धूमकोऽम्लकः।
प्रततं कासवेगेन ज्योतिषामिव दर्शनम् ॥ २५ ॥

पित्तकासांत डोळे व कफ पिंवळे होतात, तोंड कडू होतें, ताप, भ्रम, पित्ताची व रक्ताची वांति, तहान, स्वर बदलणें, घशांत जळल्यासारखें वाटून धूर आल्यासारखा वाटणें, आंबट ढेंकर येणें व खोकल्याची अतिशय मोठी उमळ आली असतां डोळ्यांपुढें काजवे येणें हीं लक्षणें असतात.

कफादुरोऽल्परुग्मूर्धहृदयं स्तिमितं गुरु।
कण्ठोपलेपः सदनं पीनसच्छर्द्यरोचकाः ॥ २६ ॥
रोमहर्षो घनस्निग्धश्वेतश्लेष्मप्रवर्तनम्।

उरांत किंचित् वेदना होणें, डोकें व हृदय ओलसर, थंड व जड होणें, घसा लाखटल्यासारखा होणें, अंगग्लानि, पडसें, वांति, अरुचि व रोमांच उभे राहणें हीं लक्षणें कफकासांत होतात व दाट, चिकट व पांढरा असा कफ पडतो.

युद्धाद्यैः साहसैस्तैस्तैः सेवितैरयथाबलम् ॥ २७ ॥
उरस्यन्तःक्षते वायुः पित्तेनानुगतो बली।
कुपितः कुरुते कासं कफं तेन सशोणितम् ॥ २८ ॥
पीतं श्यामं च शुष्कं च ग्रथितं कुथितं बहु।
ष्ठीवेत्कण्ठेन रुजता विभिन्नेनेव चोरसा ॥ २९ ॥
सूचीभिरिव तीक्ष्णाभिस्तुद्यमानेन शूलिना।
पर्वभेदज्वरश्वासतृष्णावैस्वर्यकम्पवान् ॥ ३० ॥
पारावत इवाकूजन् पार्श्वशूली ततोऽस्य च।
क्रमाद्वीर्यं रुचिः पक्तिर्बलं वर्णश्च हीयते ॥ ३१ ॥
क्षीणस्य सासृङ्मूत्रत्वं स्याच्च पृष्ठकटीग्रहः।

युद्धादिक तीं तीं साहसकृत्यें शक्तीबाहेर केलीं असतां उरांत क्षत होतें, त्यामुळें वायु कुपित व पित्ताच्या साह्यानें बलवान् होऊन खोकला उत्पन्न करितो व त्यांत रक्तमिश्रित, पिंवळा, काळा, कोरडा, गांठाळलेला, कुजलेला असा कफ पुष्कळ पडतो, घसा दुखतो व उर फुटल्यासारखें वाटतें, उरांत दुखतें व तीक्ष्ण सुया टोंचल्यासारखें वाटतें, सांधे फुटल्यासारखे वाटतात, ताप, दमा, तहान, स्वर बदलणें व कंप हीं लक्षणें असून पारव्यासारखा घसा वाजतो, बरगड्या दुखतात व हळूहळू वीर्य, रुचि, पचनशक्ति, बल व वर्ण हीं कमी होतात व तो क्षीण झाला असतां रक्तमिश्रित मूत्र त्यास होतें व पाठ आणि कमर धरते. हीं लक्षणें क्षतकासांत होतात.

वायुप्रधानाः कुपिता धातवो राजयक्ष्मिणः ॥ ३२ ॥
कुर्वन्ति यक्ष्मायतनैः कासं ष्ठीवेत्कफं ततः।
पूतिपूयोपमं पीतं विस्रं हरितलोहितम् ॥ ३३ ॥
लुञ्च्येते इव पार्श्वे च हृदयं पततीव च।
अकस्मादुष्णशीतेच्छा बह्वाशित्वं बलक्षयः ॥ ३४ ॥
स्निग्धप्रसन्नवक्त्रत्वं श्रीमद्दर्शननेत्रता।
ततोऽस्य क्षयरूपाणि सर्वाण्याविर्भवन्ति च ॥ ३५ ॥

क्षयरोग झालेल्या मनुष्याचे वातादि दोष क्षयाच्या कारणांनीं दुष्ट होऊन खोकला उत्पन्न करितात; त्यांत घाणेरड्या पुवासारखा पिंवळा, घाणेरडा, हिरवा व लाल असा कफ पडतो. फांसळ्या उपटल्यासारख्या वाटतात व हृदय पडतें कीं काय असें वाटतें. कारणावांचून उष्णाची किंवा शीताची इच्छा होते, तो मनुष्य पुष्कळ खातो; शक्ति क्षीण होते, तोंड स्निग्ध व टवटवीत दिसतें.

दांत व डोळे सुशोभित दिसतात. त्यानंतर व त्यावर क्षयाचीं सर्व चिन्हें दिसूं लागतात.

इत्येष क्षयजः कासः क्षीणानां देहनाशनः ।
याप्यो वा बलिनां तद्वत् क्षतजोऽभिनवौ तु तौ ॥३६॥
सिध्येतामपि सानाथ्यात्

वर सांगितलेला हा क्षयकास व क्षतकास क्षीण मनुष्यास झाले असतां असाध्य होत व बलवान् मनुष्यास झाले तर याप्य होत; व ते नवीन असून पादचतुष्टय अनुकूल असेल तर साध्य होतात.

साध्या दोषैः पृथक् त्रयः ।
मिश्रा याप्या द्वयात्सर्वे जरसा स्थविरस्य च ॥ ३७ ॥

वातज, पित्तज व कफज हे तीन साध्य होत. द्वंद्वज व वार्धक्यामुळें वृद्धास झालेले सर्व याप्य होत.

कासाच्छ्वासक्षयच्छर्दिस्वरसादादयो गदाः ।
भवन्त्युपेक्षया यस्मात्तस्मात्तं त्वरया जयेत् ॥ ३८ ॥

खोकल्याची हयगय केली असतां त्यापासून श्वास, क्षय, वांति, स्वरभेद इत्यादि रोग होतात; यास्तव खोकला झाला असतां त्यास लागलेंच दूर करावें.

---

# चतुर्थोऽध्यायः

## अध्याय ४ था.

## अथातः श्वासहिध्मानिदानं व्याख्यास्यामः ।

आतां दमा व उचकी यांचें निदान सांगतों.

कासवृद्ध्या भवेच्छ्वासः पूर्वैर्वा दोषकोपनैः ।
आमातिसारवमथुविषपाण्डुज्वरैरपि ॥ १ ॥
रजोधूमानिलैर्मर्मघातादतिहिमाम्बुना ।
क्षुद्रकस्तमकश्छिन्नो महानूर्ध्वश्च पञ्चमः ॥ २ ॥

खोकला अतिशय वाढला असतां त्यामुळें, मागें सांगितलेल्या दोषकोपाच्या कारणांनीं, तसेंच आमातिसार, वांति, विष, पांडुरोग व ताप या रोगांनीं, तसेंच रजःकण, धूर व वारा यांनीं, मर्मांवर आघात झाल्यानें व फार थंड पाण्यानें श्वास उत्पन्न होतो. क्षुद्र, तमक, छिन्न, महान् व ऊर्ध्व असे त्याचे पांच प्रकार आहेत.

कफोपरुद्धगमनः पवनो विष्वगास्थितः ।
प्राणोदकान्नवाहीनि दुष्टः स्रोतांसि दूषयन् ॥ ३ ॥
उरस्थः कुरुते श्वासमामाशयसमुद्भवम् ।

उरांत राहून सर्व शरीर व्यापणाऱ्या व्यान वायूची गति कफानें बंद झाली असतां तो दुष्ट होऊन, प्राणवाही व अन्नोदकवाही स्रोतसांस दुष्ट करून श्वास उत्पन्न करितो. हा आमाशयाच्या विकारापासून उत्पन्न होतो.

प्राग्रूपं तस्य हृत्पार्श्वशूलं प्राणविलोमता ॥ ४ ॥
आनाहः शङ्खभेदश्च

हृदय व बरगड्या यांत दुखणें, श्वासोच्छ्वासक्रिया पूर्वीप्रमाणें न चालणें, पोट फुगणें, व आखांत फूट लागणें हीं दम्याचीं पूर्वरूपें होत.

तत्रायासातिभोजनैः ।
प्रेरितः प्रेरयेत्क्षुद्रं स्वयंसंशमनं मरुत् ॥ ५ ॥

त्यांत श्रम व अतिशय भोजन केल्यानें प्रवृत्त झालेला वायु क्षुद्र श्वास उत्पन्न करितो, तो ( क्षुद्र श्वास ) आपोआप कमी होतो.

प्रतिलोमं सिरा गच्छन्नुदीर्य पवनः कफम् ।
परिगृह्य शिरोग्रीवमुरः पार्श्वे च पीडयन् ॥ ६ ॥
कासं घुर्घुरकं मोहमरुचिं पीनसं तृषम् ।
करोति तीव्रवेगं च श्वासं प्राणोपतापिनम् ॥ ७ ॥
प्रताम्येत्तस्य वेगेन निष्ठ्यूतान्ते क्षणं सुखी ।
कृच्छ्राच्छयानः श्वसिति निषण्णः स्वास्थ्यमृच्छति ॥
उच्छ्रिताक्षो ललाटेन स्विद्यता भृशमार्तिमान् ।
विशुष्कास्यो मुहुः श्वासी काङ्क्षत्युष्णं सवेपथुः ॥९॥
मेघाम्बुशीतप्राग्वातैः श्लेष्मलैश्च विवर्धते ।
स याप्यस्तमकः साध्यो नवो वा बलिनो भवेत् १०

वायु शिरांत उलट संचार करून, कफास चाळवून, डोकें व मान हीं धरून व ऊर व बरगड्यांत पीडा उत्पन्न करून खोकला, घरघर, मोह, अरुचि, पडसें, तहान व अतिशय वेगवान् व जिवास अत्यंत दुःख देणारा श्वास हीं उत्पन्न करितो. या दम्याचा वेग आला असतां मनुष्य फार तडफडतो व कफाचा बेडका पडल्यानें त्यास अंमळ बरें वाटतें. तो निजला असतां श्वास टाकण्यास फार कष्ट होतात; व बसला असतां त्यास बरें वाटतें. त्याची दृष्टि वर जाते, कपाळास घाम येतो, अतिशय वेदना होत असतात, तोंडास कोरड पडते; वारंवार दम लागतो, उष्णाची इच्छा होते व कांपतो, ढग आले असतां, पाऊस पडत असतां, थंडीनें पूर्वेकडल्या वायूनें व कफकारक पदार्थ भक्षण केल्यानें श्वास वाढतो; ह्यास तमक श्वास म्हणतात. हा याप्य आहे. सशक्त मनुष्यास झाला असून नवीनच असेल तर मात्र साध्य होतो.

ज्वरमूर्च्छायुतः शीतैः शाम्येत्प्रतमकस्तु सः ।

तोच तमक श्वास ज्वर व मूर्च्छा यांनीं युक्त असून थंड पदार्थांनीं कमी होत असला म्हणजे त्यास प्रतमक असें म्हणतात.

छिन्नाच्छ्वसिति विच्छिन्नं मर्मच्छेदरुजार्दितः ॥ ११ ॥
सस्वेदमूर्च्छः सानाहो बस्तिदाहनिरोधवान् ।
अधोदृग्विप्लुताक्षश्च मुह्यन् रक्तैकलोचनः ॥ १२ ॥
शुष्कास्यः प्रलपन् दीनो नष्टच्छायो विचेतनः ।

छिन्न श्वासांत मनुष्य तुटक तुटक श्वास टाकितो, व मर्मावर कापल्यासारख्या वेदनांनीं तो पीडित होतो, त्यास घाम येतो, मूर्च्छा येते व पोट फुगतें, बस्तींत दाह होतो, मूत्र बंद होतें; दृष्टि खालीं जाते, डोळे पाण्यानें भरतात, तो बेशुद्ध होतो, डोळे अतिशय लाल होतात, तोंडास कोरड पडते, बडबडतो, दीन होतो, त्याची कांति नष्ट होते व अगदीं निश्चेष्ट पडतो.

**महता महता दीनो नादेन श्वसिति क्रथन् ॥ १३ ॥**
**उद्धूयमानः संरब्धो मत्तर्षभ इवानिशम् ।**
**प्रणष्टज्ञानविज्ञानो विभ्रान्तनयनाननः ॥ १४ ॥**
**वक्षः समाक्षिपन् बद्धमूत्रवर्चा विशीर्णवाक् ।**
**शुष्ककण्ठो मुहुर्मुह्यन् कर्णशङ्खशिरोऽतिरुक् ॥ १५ ॥**

महाश्वासांत मनुष्य दीन होतो, त्याच्या श्वासाचा नाद फार मोठा असतो, कण्हतो, खवळलेल्या उन्मत्त बैलाप्रमाणें अतिशय कांपत असतो. त्याचें ज्ञान ( व्यावहारिक ) व विज्ञान ( शास्त्रीय ) नाहींसें होतें, डोळे व तोंड उन्मत्ताप्रमाणें दिसतात, छाती धडधडते, मळमूत्रांचा अवरोध होतो, बोलतांना अडखळतो, घसा कोरडा पडतो, वारंवार बेशुद्ध होतो व कान, आंख व डोकें यांत अतिशय वेदना होतात.

**दीर्घमूर्ध्वं श्वसित्यूर्ध्वान्न च प्रत्याहरत्यधः ।**
**श्लेष्मावृतमुखस्रोताः क्रुद्धगन्धवहार्दितः ॥ १६ ॥**
**ऊर्ध्वदृग्वीक्षते भ्रान्तमक्षिणी परितः क्षिपन् ।**
**मर्मसु छिद्यमानेषु परिदेवी निरुद्धवाक् ॥ १७ ॥**

ऊर्ध्वश्वासांत दीर्घ श्वास बाहेर टाकतो, परंतु श्वास आंत घेत नाहीं. त्याच्या स्रोतसांचीं मुखें कफानें बंद होतात, तो मनुष्य कुपित झालेल्या वायूनें अतिशय पीडित होतो, त्याची दृष्टि वर जाते, डोळे इकडे तिकडे फिरवून बावरल्यासारखें पाहतो, मर्में कापल्याप्रमाणें त्यास अतिशय वेदना होतात व त्याचा शब्द खोल जातो.

**एते सिध्येयुरव्यक्ता व्यक्ता प्राणहरा ध्रुवम् ।**

हे श्वास जोंपर्यंत सर्व लक्षणांनीं युक्त झालेले नसतात तोंपर्यंत साध्य होतात, सर्व लक्षणें स्पष्ट झाल्यावर ते खचितच मनुष्यास मारितात.

**श्वासैकहेतुप्राग्रूपसङ्ख्याप्रकृतिसंश्रयाः ॥ १८ ॥**
**हिध्मा भक्तोद्भवा क्षुद्रा यमला महतीति च ।**
**गम्भीरा च**

उचकीचीं कारणें, पूर्वरूप, संख्या, स्वभाव व स्थान हीं श्वासाप्रमाणेंच असतात. तिचे पांच प्रकार असेः— भक्तोद्भवा ( अन्नजा ), क्षुद्रा, यमला, महती व गंभीरा.

**मरुत्तत्र त्वरयाऽयुक्तिसेवितैः ॥ १९ ॥**
**रूक्षतीक्ष्णखरासात्म्यैरन्नपानैः प्रपीडितः ।**
**करोति हिध्मामरुजां मन्दशब्दां क्षवानुगाम् ॥ २० ॥**
**शमं सात्म्यान्नपानेन या प्रयाति च साऽन्नजा ।**

रूक्ष, तीक्ष्ण, जाडीभरडी असात्म्य अशीं अन्नें व पानें घाईनें व अतिशय सेवन केल्यानें वायु पीडित होऊन अन्नजा नांवाची उचकी उत्पन्न करितो. हींत वेदना नसते, हिचा शब्द मंद असून शिंकेबरोबर येते व ती सात्म्य अशा अन्नपानानें शांत होते.

**आयासात्पवनः क्षुद्रः क्षुद्रां हिध्मां प्रवर्तयेत् ॥ २१ ॥**
**जत्रुमूलप्रविसृतामल्पवेगां मृदुं च सा ।**
**वृद्धिमायास्यतो याति भुक्तमात्रे च मार्दवं ॥ २२ ॥**

श्रम केल्यानें वायु किंचित् प्रकुपित होऊन क्षुद्रा नांवाची उचकी उत्पन्न करितो. ती जत्रूच्या मुळापासून उत्पन्न होते, तिचा वेग अल्प असतो, व वेदना नसते, श्रम केले म्हणजे वाढते व जेवल्यानें कमी होते.

**चिरेण यमलैर्वेगैराहारे या प्रवर्तते ।**
**परिणामोन्मुखे वृद्धिं परिणामे च गच्छति ॥ २३ ॥**
**कम्पयन्ती शिरो ग्रीवामाध्मातस्यातितृष्यतः ।**
**प्रलापच्छर्द्यतीसारनेत्रविप्लुतिजृम्भिणः ॥ २४ ॥**
**यमला वेगिनी हिध्मा परिणामवती च सा ।**

आहाराचा पाक होऊं लागण्याच्या सुमारास बऱ्याच वेळानें दुहेरी वेगानें जी उचकी उत्पन्न होते व पाक झाल्यावर वाढते तिला यमला, वेगिनी व परिणामवती म्हणतात. हींत मान व डोकें कांपतें, पोट फुगतें, तहान फार लागते, मनुष्य बडबडतो; त्यास वांति व अतिसार होतात, डोळे पाण्यानें भरतात व जांभया येतात.

**स्तब्धभ्रूशङ्खयुग्मस्य सास्रविप्लुतचक्षुषः ॥ २५ ॥**
**स्तम्भयन्ती तनुं वाचं स्मृतिं संज्ञां च मुष्णती ।**
**रुन्धती मार्गमन्नस्य कुर्वती मर्मघट्टनम् ॥ २६ ॥**
**पृष्ठतो नमनं शोषं महाहिध्मा प्रवर्तते ।**
**महामूला महाशब्दा महावेगा महाबला ॥ २७ ॥**

ज्यास महती हिध्मा झाली आहे त्याच्या भिंवया व आंख ताठतात. डोळे पाण्यानें भरतात व चंचल होतात, सर्व शरीर स्तब्ध होतें, वाणी, स्मृति व संज्ञा हीं नाहींशीं होतात. अन्नमार्गाचा अवरोध होतो, मर्मांस आघात झाल्यासारखें होतें, पाठीकडून मनुष्य वांकतो व तोंडास कोरड पडते. हिला महामूला, महाशब्दा ( जिचा शब्द मोठा असतो ) व महावेगा (वेग मोठा असतो) व महाबला अशीं अन्वर्थक नांवें देतात.

**पक्वाशयाद्वा नाभेर्वा पूर्ववद्या प्रवर्तते ।**
**तद्रूपा सा मुहुः कुर्याज्जृम्भाभङ्गप्रसारणम् ॥ २८ ॥**
**गम्भीरेणानुनादेन गम्भीरा**

पक्वाशयापासून किंवा नाभीपासून महतीप्रमाणेंच जी उत्पन्न होते व जिचीं लक्षणेंहि महतीप्रमाणेंच असतात, आणि जींत जांभया येतात व मनुष्य हातापाय ताणून आळस देतो त्या उचकीस—तिच्या मागून गंभीर शब्द ( अनुनाद ) होतो म्हणून—गंभीरा असें म्हणतात.

तासु साधयेत्।
आद्ये द्वे वर्जयेदन्त्ये सर्वलिङ्गां च वेगिनीम् ॥ २९ ॥

त्यांत अन्नजा व क्षुद्रा ह्या साध्य, महती व गंभीरा असाध्य आणि यमला सर्व लक्षणांनीं युक्त असली तर असाध्य असें समजावें.

सर्वाश्च संचितामस्य स्थविरस्य व्यवायिनः।
व्याधिभिः क्षीणदेहस्य भक्तच्छेदक्षतस्य वा ॥ ३० ॥

ज्याचा आम संचित झाला आहे असा, वृद्ध, मैथुनसेवी, व्याधींनीं ज्याचें शरीर क्षीण झालें आहे असा व अन्न तुटल्यामुळें क्षीण झालेला, अशा मनुष्यास कोणतीहि हिक्का ( उचकी ) झाली असतां ती असाध्य समजावी.

सर्वेऽपि रोगा नाशाय नत्वेवं शीघ्रकारिणः।
हिध्माश्वासौ यथा तौ हि मृत्युकाले कृतालयौ ३१

सर्व रोग मारक आहेत खरे तरी उचकी व श्वास जशी आपली क्रिया फारच जलद करितात तसें ते करीत नाहींत. कारण उचकी व श्वास हे मरतेवेळीं जसें काय मनुष्याच्या शरिरांत बिऱ्हाडच करून राहतात.

---

# पञ्चमोऽध्यायः

## अध्याय ५ वा

## अथातो राजयक्ष्मादिनिदानं व्याख्यास्यामः।

आतां राजयक्ष्मादिकांचें निदान सांगतों.

अनेकरोगानुगतो बहुरोगपुरोगमः।
राजयक्ष्मा क्षयः शोषो रोगराडिति च स्मृतः ॥ १ ॥

क्षयरोग हा पुष्कळ रोगांनंतर उत्पन्न होतो व तो झाल्यावर त्यांत पुष्कळ रोग होतात. याला राजयक्ष्मा, क्षय, शोष व रोगराज असें म्हणतात.

नक्षत्राणां द्विजानां च राज्ञोऽभूद्यदयं पुरा।
यच्च राजा च यक्ष्मा च राजयक्ष्मा ततो मतः ॥ २ ॥
देहौषधक्षयकृतेः क्षयस्तत्सम्भवाच्च सः।
रसादिशोषणाच्छोषो रोगराट् तेषु राजनात् ॥ ३ ॥

क्षयरोग हा पूर्वीं नक्षत्रांचा व ब्राह्मणांचा राजा जो चंद्र त्यास झाला होता, म्हणून त्यास राजयक्ष्मा ( राजाचा रोग ) असें म्हणतात. व हा सर्व रोगांचा राजा असून त्यांत अनेक रोग उत्पन्न होतात म्हणूनहि यास राजयक्ष्मा असें म्हणतात. देह व औषध यांचा क्षय करितो आणि यांच्या क्षयापासून उत्पन्न होतो म्हणून क्षय असें म्हणतात. रसादिकांचें शोषण करितो म्हणून त्यास शोष असें म्हणतात व सर्व रोगांत हा श्रेष्ठ म्हणून रोगराज असें म्हणतात.

साहसं वेगसंरोधः शुक्रौजःस्नेहसंक्षयः।
अन्नपानविधित्यागश्चत्वारस्तस्य हेतवः ॥ ४ ॥

साहस कृत्यें करणें, मलमूत्रादि वेगांचा अवरोध करणें, शुक्र, ओज व स्नेह यांचा क्षय होणें व अन्नपानादिकांच्या शास्त्रीय क्रमाप्रमाणें न वागणें हीं चार क्षयाचीं कारणें आहेत.

तैरुदीर्णोऽनिलः पित्तं कफं चोदीर्य सर्वतः।
शरीरसन्धीनाविश्य तान् शिराश्च प्रपीडयन् ॥ ५ ॥
मुखानि स्रोतसां रुद्ध्वा तथैवातिविवृत्य च।
सर्पन्नूर्ध्वमधस्तिर्यग्यथास्वं जनयेद्विकारान् ॥ ६ ॥

वरील कारणांनीं वाढलेला वायु पित्त व कफ यांस सर्व शरीरभर चाळवून शरीराच्या सर्व सांध्यांत शिरून सांधे व शिरा यांस अतिशय पीडा करून, स्रोतसांचीं तोंडें बंद करून किंवा कदाचित् विस्तृत करून व शरीरांत खालीं, वर व चोहोंकडे पसरून त्या त्या मार्गीं ते ते विकार उत्पन्न करितो.

रूपं भविष्यतस्तस्य प्रतिश्यायो भृशं क्षवः।
प्रसेको मुखमाधुर्यं सदनं वह्निदेहयोः ॥ ७ ॥
स्थाल्यमत्रान्नपानादौ शुचावप्यशुचीक्षणम्।
मक्षिकातृणकेशादिपातः प्रायोऽन्नपानयोः ॥ ८ ॥
हृल्लासश्छर्दिररुचिरश्नतोऽपि बलक्षयः।
पाण्योरवेक्षा पादास्यशोफोऽक्ष्णोरतिशुक्लता ॥ ९ ॥
बाह्वोः प्रमाणजिज्ञासा काये बैभत्स्यदर्शनम्।
स्त्रीमद्यमांसप्रियता घृणित्वं मूर्धगुण्ठनम् ॥ १० ॥
नखकेशातिवृद्धिश्च स्वप्ने चाभिभवो भवेत्।
पतङ्गकृकलासाहिकपिश्वापदपक्षिभिः ॥ ११ ॥
केशास्थितुषभस्मादिराशौ समधिरोहणम्।
शून्यानां ग्रामदेशानां दर्शनं शुष्यतोऽम्भसः ॥ १२ ॥
ज्योतिर्गिरीणां पततां ज्वलतां च महीरुहाम्।

क्षयरोग होण्याच्या पूर्वीं पुढील लक्षणें होतातः—पडसें येतें, अतिशय शिंका येतात, लालास्राव होतो, तोंड गोड होतें, अग्नि मंद होतो, शरीर निःशक्त होतें, तपेलें, घागर इत्यादि भांडीं, अन्न व पान हीं स्वच्छ असतांहि घाणेरीं आहेत असें दिसतें, उरांत जळजळतें, वांति होतें, तोंडास अरुचि असते, चांगल्या रीतीनें जेवीत खात असतांहि शक्ति कमी होतें, बहुधा अन्नपानादिकांत माशा, गवत व केंस इत्यादिक पडतात. रोगी नेहमीं आपल्या हाताकडे पाहतो, पाय व तोंड सुजतात, डोळे पांढरे फटफटीत होतात, हात किती लठ्ठ आहेत हें समजण्याची इच्छा होते, आपलें शरीर चांगलें असतांहि त्यास तें वाईट दिसतें, स्त्री, मद्य व मांस हीं त्यास आवडूं लागतात, त्यास फार दया उत्पन्न होते, तो नेहमीं डोक्यावरून कांहीं वस्त्र गुंडाळतो, नखें व केंस अतिशय वाढतात. पतंग, सरडा, साप ( नाग ), वानर, चतुष्पाद जनावरें व पक्षि हे स्वप्नांत त्याच्या अंगावर येतात;

तसेंच तो स्वप्नांत केस, हाडें, भाताचा कोंडा व राख यांच्या राशीवर चढतो, ओसाड गांव व देश, पाणी आटलेलें, ज्योतिर्गणांचें व पर्वतांचें पतन व पेटलेले वृक्ष त्यास स्वप्नांत दिसतात.

**पीनसश्वासकासांसमूर्धस्वररुजोऽरुचिः ॥ १३ ॥**
**ऊर्ध्वं विड्भ्रंशसंशोषावधश्छर्दिश्च कोष्ठगे ।**
**तिर्यक्स्थे पार्श्वरुग्दोषे सन्धिगे भवति ज्वरः ॥ १४ ॥**
**रूपाण्येकादशैतानि जायन्ते राजयक्ष्मिणः ।**

दोष ऊर्ध्वगत झाला असतां पडसें, श्वास, खोकला, खांदे दुखणें, डोकें दुखणें, अरुचि व स्वरभेद हीं लक्षणें होतात, अधोगत झाला असतां अतिसार किंवा मलावरोध होतो. कोष्ठगत (आमाशयगत) झाला असतां वांति होते, तिर्यग्गत झाला असतां बरगड्या दुखतात व संधिगत झाला असतां ताप येतो. क्षय झालेल्या मनुष्यास हीं अकरा लक्षणें होतात.

**तेषामुपद्रवान् विद्यात्कण्ठोद्ध्वंसमुरोरुजम् ॥ १५ ॥**
**जृम्भाङ्गमर्दनिष्ठीववह्निसादास्यपूतिताः ।**

घसा दुखणें, उरांत वेदना, जांभया, अंग मोडल्यासारखें वाटणें, कफाचे बेडके पडणें, अग्निमांद्य व तोंडास घाण येणें हे क्षयरोगाचे उपद्रव आहेत.

**तत्र वाताच्छिरः पार्श्वशूलमंसाङ्गमर्दनम् ॥ १६ ॥**
**कण्ठोद्ध्वंसः स्वरभ्रंशः पित्तात्पादांसपाणिषु ।**
**दाहोऽतिसारोऽसृक्छर्दिर्मुखगन्धो ज्वरो मदः ॥ १७ ॥**
**कफादरोचकश्छर्दिः कासो मूर्च्छाङ्गगौरवम् ।**
**प्रसेकः पीनसः श्वासः स्वरसादोऽल्पवह्निता ॥ १८ ॥**

त्यांत डोक्यांत व बरगड्यांत शूल, खांदे व अंग मोडल्यासारखें होणें, घसा अतिशय दुखणें व स्वरभ्रंश हे वायूपासून होतात; हात, पाय व खांदे यांचा दाह, अतिसार, रक्ताची वांति, तोंडास घाण येणें, ताप व गुंगी हे पित्तापासून; व अरुचि, ओकारी, खोकला, डोकें व अंग जड होणें, लालास्राव, पडसें, दमा, स्वरभंग व अग्निमांद्य हे विकार कफापासून होतात.

**दोषैर्मन्दानलत्वेन सोपलेपैः कफोल्बणैः ।**
**स्रोतोमुखेषु रुद्धेषु धातूष्मस्वल्पकेषु च ॥ १९ ॥**
**विदह्यमानः स्वस्थाने रसस्तांस्तानुपद्रवान् ।**
**कुर्यादगच्छन् मांसादीनसृक् चोर्ध्वं प्रधावति ॥ २० ॥**
**पच्यते कोष्ठ एवान्नमन्नपक्त्रैव चास्य यत् ।**
**प्रायोऽस्मान्मलतां यातं नैवालं धातुपुष्टये ॥ २१ ॥**

कफप्रधान व चिकट दोषांपासून अग्निमांद्यामुळें स्रोतसांचीं तोंडें बंद झालीं असतां व धातूंतील अग्नि मंद झाले असतां आहाररसाचें केवळ स्वस्थानींच पचन होतें. त्यामुळें तो मांसादिकांत न जातां ते ते अनेक प्रकारचे उपद्रव उत्पन्न करितो, आणि रक्त वर जाऊं लागतें; केवळ जाठराग्नीनें कोठ्यांतच अन्नाचा पाक होतो, यासाठीं त्याचा बहुतेक अंशीं मळच होत असल्यामुळें तें धातूंस पुष्ट करण्यास असमर्थ होतें.

**रसोऽप्यस्य न रक्ताय मांसाय कुत एव तु ।**

त्याच्या अन्नरसापासून रक्तहि तयार होत नाहीं, मग मांस कोठून होईल?

**उपस्तब्धः स शकृता केवलं वर्तते क्षयी ॥ २२ ॥**

मळाच्याच केवळ आधारावर तो क्षयी पुरुष जीव धरून राहतो.

**लिङ्गेष्वल्पेष्वपि क्षीणं व्याध्यौषधबलाक्षमम् ।**
**वर्जयेत्**

व्याधि व औषध यांचें बळ ज्यास सहन होत नाहीं व जो क्षीण झाला आहे अशा क्षयी मनुष्याचीं लक्षणें जरी थोडीं असलीं तरी त्यास वैद्यानें सोडावें.

**साधयेदेव सर्वेष्वपि ततोऽन्यथा ॥ २३ ॥**

सर्व लक्षणें जरी झालीं असलीं तरी रोगी क्षीण झाला नसेल व व्याधि आणि औषध यांचें बल त्यास सहन होत असेल तर वैद्यानें उपचार करावे.

**दोषैर्व्यस्तैः समस्तैश्च क्षयात् षष्ठश्च मेदसा ।**
**स्वरभेदो भवेत्**

स्वरभेद सहा प्रकारचा:—वातानें, पित्तानें, कफानें, सन्निपातानें, क्षयानें व मेदानें.

**तत्र क्षामो रूक्षश्चलः स्वरः ॥ २४ ॥**
**शूकपूर्णाभकण्ठत्वं स्निग्धोष्णोपशयोऽनिलात् ।**

त्यांत वायूपासून स्वर क्षीण, रूक्ष व कांपरा होतो व घशांत भाताचीं कुसळें अडकल्याचा भास होतो. स्निग्ध व उष्ण पदार्थांनीं त्याचा उपशम होतो.

**पित्तात्तालुगले दाहः शोष उक्तावसूयनम् ॥ २५ ॥**

पित्तापासून तालु व गळा यांचा दाह व शोष होतो व त्यास बोलवत नाहीं.

**लिम्पन्निव कफात्कण्ठं मन्दः खुरखुरायते ।**
**स्वरो विबद्धः**

कफापासून घशांत लेप करीत हळूहळू अडखळत खुरखुर असा शब्द होतो.

**सर्वैस्तु सर्वलिङ्गः**

त्रिदोषापासून झालेल्या स्वरभेदांत वर सांगितलेलीं सर्व लक्षणें असतात.

**क्षयात्कपेत् ॥ २६ ॥**
**धूमायतीव चात्यर्थं**

क्षयापासून होणाऱ्या स्वरभेदांत बोलतांना कुंथतो व घशांतून अतिशय उष्ण वाफा येतात.

मेदसा श्लेष्मलक्षणः।

कृच्छ्रलक्ष्याक्षरश्च

मेदापासून जो स्वरभेद होतो त्यांत कफस्वरभेदासारखीं लक्षणें असतात व त्याच्या बोलण्यांतील अक्षरें समजण्यास कठिण पडतें.

अत्र सर्वैरन्त्यं च वर्जयेत् ॥ २७ ॥

त्रिदोषात्मक व मेदोजन्य स्वरभेद असाध्य होत.

अरोचको भवेद्दोषैर्जिह्वाहृदयसंश्रयैः।
सन्निपातेन मनसः सन्तापेन च पञ्चमः ॥ २८ ॥

जीभ व हृदय यांमध्यें राहिलेल्या दोषांपासून वायूनें, पित्तानें, कफानें, सन्निपातानें व मनाच्या संतापानें असे पांच प्रकारचे अरोचक होतात.

कषायतिक्तमधुरं वातादिषु मुखं क्रमात्।
सर्वोत्थे चिरसंशोकक्रोधादिषु यथामलम् ॥ २९ ॥

वायूपासून तुरट, पित्तापासून कडू व कफापासून मधुर तोंड होतें, त्रिदोषापासून बेचव व क्रोधापासून दोषांच्या अनुरोधानें तोंड तुरट, कडू किंवा मधुर होतें.

छर्दिर्दोषैः पृथक् सर्वैर्द्विष्टैरर्थैश्च पञ्चमी।

वायूनें, पित्तानें, कफानें, सन्निपातानें व न आवडणाऱ्या इंद्रियांच्या अर्थांनीं असे वांतीचे पांच प्रकार आहेत.

उदानो विकृतो दोषान् सर्वानप्यूर्ध्वमस्यति ॥ ३० ॥

उदानवायु विकृत होऊन सर्व दोषांस वर टाकितो.

तासूत्क्लेशाश्च लावण्यप्रसेकारुचयोऽग्रगाः।

उम्हासे येणें, तोंड खारट होणें, तोंडास पाणी सुटणें व अरुचि हीं लक्षणें वांति येण्याच्या पूर्वीं होतात.

नाभिपृष्ठं रुजन् वायुः पार्श्वे चाहारमुत्क्षिपेत् ॥ ३१ ॥
ततो विच्छिन्नमल्पाल्पं कषायं फेनिलं वमेत्।
शब्दोद्गारयुतं कृष्णमच्छं कृच्छ्रेण वेगवत् ॥ ३२ ॥
कासास्यशोषहृन्मूर्धस्वरपीडाक्लमान्वितः।

वातजन्य छर्दींत वायु नाभि व पाठ यांत वेदना करून आहार बाजूस टाकितो, नंतर तुटक तुटक, थोडें थोडें, तुरट, फेसाळ, शब्द व ढेंकरा यांनीं युक्त, काळें व पातळ असें मोठ्या कष्टानें व वेगानें (रोगी) ओकतो; व खोकला, तोंडास कोरड, हृदय, डोकें व स्वर यांत पीडा व ग्लानि हीं लक्षणें होतात.

पित्तात्क्षारोदकनिभं धूम्रं हरितपीतकम् ॥ ३३ ॥
सासृगम्लं कटूष्णं च तृण्मूर्च्छातापदाहवत्।

पित्तापासून क्षाराच्या पाण्यासारखें, धुरकट वर्णाचें, हिरवें, पिवळें, रक्तमिश्रित, आंबट, कडू व उष्ण असें वमन होतें व त्यांत तहान, मूर्च्छा, ताप (तप्तता स्पर्शानें समजणारी) व दाह (ज्याचा त्यासच समजणारा) हीं लक्षणें होतात.

कफात्स्निग्धं घनं शीतं श्लेष्मतन्तुगवाक्षितम् ॥ ३४ ॥
मधुरं लवणं भूरि प्रसक्तं लोमहर्षणम्।
मुखश्वयथुमाधुर्यतन्द्राहृल्लासकासवत् ॥ ३५ ॥

कफापासून स्निग्ध, दाट, थंड, मधुर, खारट, अतिशय व अडखळत येणारें वमन असून त्यांत कफाच्या तंतूंचीं जाळीं असतात व त्यांत रोमांच उभे राहणें, तोंड सुजणें व गोड होणें, झांपड, उम्हासे व खोकला हीं लक्षणें असतात.

सर्वलिङ्गा मलैः सर्वै रिष्टोक्ता या च तां त्यजेत्।

त्रिदोषात्मक वांतींत सर्व लक्षणें असतात. ती व विकृतिविज्ञानी-याध्यायांत सांगितलेलीं लक्षणें जिच्यांत आहेत ती ह्या दोन वैद्यानें सोडाव्या.

पूत्यमेध्याशुचिद्विष्टदर्शनश्रवणादिभिः ॥ ३६ ॥
तप्ते चित्ते हृदि क्लिष्टे छर्दिर्द्विष्टार्थयोगजा।

दुर्गंधी, अमंगल, अपवित्र व किळस येणाऱ्या गोष्टी पाहणें व ऐकणें इत्यादि कारणांनीं चित्त संतप्त झालें असतां व हृदयांत क्लेश झाले असतां जी वांति होते तिला द्विष्टार्थयोगजा (बीभत्सजा) असें म्हणतात.

वातादीनेव विमृशेत्कृमितृष्णामदौहृदे ॥ ३७ ॥
शूलवेपथुहृल्लासैर्विशेषात्कृमिजां वदेत्।
कृमिहृद्रोगलिङ्गैश्च

कृमिजन्य, तृष्णाजन्य, आमजन्य व दौहृदजन्य वांतींत वर सांगितलेलींच वातादिकांचीं लक्षणें असतात, सूज, कांपणें, उम्हासे हीं व कृमिजन्य हृद्रोगाचीं लक्षणें विशेषतः कृमिजन्य छर्दींत असतात.

स्मृताः पञ्च तु हृद्गदाः ॥ ३८ ॥
तेषां गुल्मनिदानोक्तैः समुत्थानैश्च संभवः।

हृद्रोग पांच प्रकारचे आहेत व ते गुल्मनिदानांत सांगितलेल्या कारणांनीं उत्पन्न होतात.

वातेन शूल्यतेऽत्यर्थं तुद्यते स्फुटतीव च ॥ ३९ ॥
भिद्यते शुष्यति स्तब्धं हृदयं शून्यता द्रवः।
अकस्माद्दीनता शोको भयं शब्दासहिष्णुता ॥ ४० ॥
वेपथुर्वेष्टनं मोहः श्वासरोधोऽल्पनिद्रता।

वायूपासून उरांत अतिशय शूल व टोंचल्यासारख्या वेदना होतात, हृदय फोडल्यासारखें वाटतें, तसेंच तें शुष्क, स्तब्ध आणि रितें (शून्य) होतें. तसेंच त्याचें अंतःकरण फार कोमळ होतें, कारणावांचून दैन्य, शोक व भीति उत्पन्न होतात, शब्द सहन होत नाहीं, अंग कांपतें व पिळवटतें. मोह होतो, श्वासाचा रोध होतो व झोंप कमी येते.

पित्तात्तृष्णा भ्रमो मूर्च्छा दाहः स्वेदोऽम्लकः क्लमः ॥ ४१ ॥
छर्दनं चाम्लपित्तस्य धूमकः पीतता ज्वरः।

तहान, भ्रम, मूर्च्छा, दाह, घाम, आंबट ढेंकरा, ग्लानि, आम्लपित्ताची ओकारी, घशांतून वाफा निघणें (घशांत जळजळणें), त्वचा, डोळे, नखें इत्यादिकांस पिवळेपणा व ताप हीं लक्षणें पैत्तिक हृद्रोगांत होतात.

श्लेष्मणा हृदयं स्तब्धं भारिकं साश्मगर्भवत् ॥ ४२ ॥
कासाग्निसादनिष्ठीवनिद्रालस्यारुचिज्वराः ।

कफजन्य हृद्रोगांत हृदय ताठतें, आंत दगड ठेवल्याप्रमाणें जड होतें व खोकला, अग्निमांद्य, थुंकी, झोंप, आळस, अरुचि व ज्वर हीं लक्षणें असतात.

सर्वलिङ्गस्त्रिभिर्दोषैः

सान्निपातिक हृद्रोगांत वरील सर्वांचीं लक्षणें असतात.

क्रिमिभिः श्यावनेत्रता ॥ ४३ ॥
तमःप्रवेशो हृल्लासः शोषः कण्डूः कफस्रुतिः ।
हृदयं प्रततं चात्र क्रकचेनेव दार्यते ॥ ४४॥
चिकित्सेदामयं घोरं तं शीघ्रं शीघ्रकारिणम् ।

क्रिमिजन्य हृद्रोगांत डोळे सांवळे होतात, काळोखांत शिरल्याप्रमाणें वाटतें, मळमळतें व तोंडास कोरड, कंड व कफस्राव हीं लक्षणें असून सतत हृदय करवतानें कापल्यासारखें वाटतें. अशा या जलद क्रिया करणाऱ्या भयंकर रोगावर लवकर उपाय करावे.

वातात्पित्तात्कफात्तृष्णा सन्निपाताद्रसक्षयात् ॥ ४५॥
षष्ठी स्यादुपसर्गाच्च

वायूपासून, पित्तापासून, कफापासून, त्रिदोषापासून, रसक्षयापासून व उपसर्गापासून ( इतर रोगांवर अवलंबून ) तृष्णा उत्पन्न होते. तिचे हे सहा प्रकार आहेत.

वातपित्ते तु कारणम् ।
सर्वासु

सर्व प्रकारच्या तृष्णांचें कारण वायु व पित्त होय.

तत्प्रकोपो हि सौम्यधातुप्रशोषणात् ॥ ४६ ॥
सर्वदेहभ्रमोत्कम्पतापतृड्दाहमोहकृत् ।

अब्धातूंचें शोषण झालें असतां त्यामुळें वातपित्ताचा प्रकोप होऊन सर्व शरीर फिरूं लागतें, व कंप, ताप, तहान, दाह ( अंतर्दाह ) व मोह हे विकार होतात.

जिह्वामूलगलक्लोमतालुतोयवहाः शिराः ॥ ४७ ॥
संशोष्य तृष्णा जायन्ते

जिभेचें मूळ, गळा, क्लोम व टाळू यांत गेलेल्या उदकवाहक शिरांचें शोषण झालें म्हणजे तृष्णा उत्पन्न होते.

तासां सामान्यलक्षणम् ।
मुखशोषो जलातृप्तिरन्नद्वेषः स्वरक्षयः ॥ ४८ ॥
कण्ठौष्ठजिह्वाकार्कश्यं जिह्वानिष्क्रमणं क्लमः ।
प्रलापश्चित्तविभ्रंशस्तृड्ग्रहोक्तास्तथामयाः ॥ ४९ ॥

तृष्णांचें सामान्य लक्षण असें-तोंडास कोरड, कितीहि पाणी प्यालें तरी तृप्ति न होणें, अन्नाचा द्वेष, शब्द क्षीण होणें, घसा, ओंठ व जीभ खरखरीत होणें, जीभ बाहेर निघणें, ग्लानि, बडबड व चित्तविभ्रंश ( विस्मृति ) व तृष्णेचा निग्रह केला असतां जे विकार होतात म्हणून मागें सांगितलें आहे तेहि होतात.

मारुतात्क्षामता दैन्यं शङ्खतोदः शिरोभ्रमः ।
गन्धाज्ञानास्यवैरस्यश्रुतिनिद्राबलक्षयाः ॥ ५० ॥
शीताम्बुपानाद्वृद्धिश्च

वायूपासून होणाऱ्या तृषेंत कृशता, दैन्य, आखांत टोंचल्यासारखी वेदना, डोकें फिरणें, वास न समजणें, तोंड बेचव होणें, ऐकूं न येणें, झोंप न येणें, शक्ति क्षीण होणें हीं लक्षणें असतात व थंड पाणी प्याल्यापासून तहान वाढते.

पित्तान्मूर्च्छास्यतिक्तता ।
रक्तेक्षणत्वं प्रततं शोषो दाहोऽतिधूमकः ॥ ५१ ॥

पित्तजन्य तृष्णेंत मूर्च्छा, तोंड कडवट, डोळे लाल, अतिशय शोष, दाह व घशांतून अतिशय वाफा निघणें हीं लक्षणें असतात.

कफो रुणद्धि कुपितस्तोयवाहिषु मारुतम् ।
स्रोतःसु स कफस्तेन पङ्कवच्छोष्यते ततः ॥ ५२ ॥
शूकैरिवाचितः कण्ठो निद्रा मधुरवक्त्रता ।
आध्मानं शिरसो जाड्यं स्तैमित्यच्छर्द्यरोचकाः ५३
आलस्यमविपाकश्च

कुपित झालेला कफ उदकवह स्रोतांत वायूस कोंडितो त्यामुळें तो वायु त्या कफास चिखलाप्रमाणें सुकवितो, त्यामुळें घशांत कुसें अडकल्याप्रमाणें वाटतें. झोंप फार येते, तोंड गोड होतें, पोट फुगतें, डोकें जड होतें, अंग ओलसर, थंड भासतें, वांति होते, अरुचि असते, आळस येतो व अन्नपचन होत नाहीं.

सर्वैः स्यात्सर्वलक्षणा ।

सान्निपातिकतृष्णेंत तिन्ही प्रकारचीं लक्षणें असतात.

आमोद्भवा च भक्तस्य संरोधाद्वातपित्तजा ॥ ५४ ॥

आमजन्य तृष्णा वातपित्तात्मक असून ती भूक लागली असतां त्या वेळीं न जेवल्यानें उत्पन्न होते.

उष्णक्लान्तस्य सहसा शीताम्भो भजतस्तृषम् ।
ऊष्मा रुद्धो गतः कोष्ठं यां कुर्यात्पित्तजैव सा ॥ ५५॥
या च पानातिपानोत्था तीक्ष्णाग्नेः स्नेहजा च या ।

उन्हांतून दमून आल्यावर एकाएकीं थंड पाणी प्यालें असतां उष्मा रुद्ध होऊन कोठ्यांत जाऊन जी तहान उत्पन्न करितो ती, अतिमद्यपानानें उत्पन्न झालेली, ज्याचा अग्नि तीक्ष्ण आहे त्यास झालेली व तेलकट पदार्थांपासून झालेली तृष्णा पित्तजन्य होय.

स्निग्धगुर्वम्ललवणभोजनेन कफोद्भवा ॥ ५६ ॥

स्निग्ध, गुरु, आंबट व खारट अशा भोजनापासून जी तृष्णा उत्पन्न होते ती कफजन्य होय.

तृष्णा रसक्षयोक्तेन लक्षणेन क्षयात्मिका ।

क्षयजन्य तृषेमध्यें रसक्षयाचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत ( सू. अ. ११ श्लोक १७ पाहा. ) तीं असतात.

शोषमोहज्वराद्यन्यदीर्घरोगोपसर्गतः ।
या तृष्णा जायते तीव्रा सोपसर्गात्मिका स्मृता ॥५७॥

शोष, मोह, ज्वर इत्यादि इतर फार दिवसांच्या रोगांच्यासंबंधानें जी जबर तृष्णा उत्पन्न होते तिला औपसर्गिक तृष्णा असें म्हणतात.

## षष्ठोऽध्यायः

### अध्याय ६ वा

**अथातो मदात्ययनिदानं व्याख्यास्यामः ।**

आतां मदात्ययाचें निदान सांगतों.

**तीक्ष्णोष्णरूक्षसूक्ष्माम्लं व्यवाय्याशुकरं लघु ।**
**विकाषि विशदं मद्यमोजसोऽस्माद्विपर्ययः ॥ १ ॥**

तीक्ष्ण, ऊष्ण, रूक्ष, सूक्ष्म, अम्ल, व्यवायी (व्याप्तिशील), आशुकर (आपली क्रिया जलद करणारें), लघु, विकाषि (एकदम सर्व शरीर शिथिल करणारें) व विशद हे मद्याचे गुण होत व ओजाचे गुण त्याच्या विपरीत आहेत.

**तीक्ष्णादयो विषेऽप्युक्ताश्चित्तोपप्लाविनो गुणाः ।**
**जीवितान्ताय जायन्ते विषे तूत्कर्षवृत्तितः ॥ २ ॥**

वर सांगितलेले चित्तभ्रमक एक तीक्ष्णादिक गुण विषांतहि आहेत; परंतु त्यांत ते फार उत्कर्षानें असल्यामुळें मारक होतात.

**तीक्ष्णादिभिर्गुणैर्मद्यं मन्दादीनोजसो गुणान् ।**
**दशभिर्दश संक्षोभ्य चेतो नयति विक्रियाम् ॥ ३ ॥**
**आद्ये मदे**

मद्य आपल्या तीक्ष्णादिक दहा गुणांनीं ओजाच्या मंदादिक दहा गुणांस क्षुब्ध करून मदाच्या पहिल्या अवस्थेंत चित्तास विकार उत्पन्न करतें.

**द्वितीये स प्रमादायतने स्थितः ।**
**दुर्विकल्पहतो मूढः सुखमित्यधिमुच्यते ॥ ४ ॥**

प्रमादस्थानभूत अशा मदाच्या दुसऱ्या अवस्थेंत तो प्राप्त झाला असतां वाईट प्रकारच्या कल्पना त्याच्या मनांत येऊन करावें काय व करूं नये काय हें त्यास कळेनासें होऊन तो सुखास मुकतो.

**मध्यमोत्तमयोः सन्धिं प्राप्य राजसतामसः ।**
**निरङ्कुश इव व्यालो न किञ्चिन्नाचरेज्जडः ॥ ५ ॥**

राजस व तामसी मनुष्य दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थांच्या मधल्या स्थितींत असतां मदास सुटलेल्या उन्मत्त हत्तीप्रमाणें क्षुब्ध होऊन काय करणार नाहीं? (पाहिजे तें वाईट कृत्य करील.)

**इयं भूमिरवद्यानां दौःशील्यस्येदमास्पदम् ।**
**एकोऽयं बहुमार्गाया दुर्गतेर्देशिकः परम् ॥ ६ ॥**

ही अवस्था निंद्य गोष्टींचें माहेरघरच होय व हें दुष्ट स्वभावाचें निजस्थानच आहे; तसेंच अनेक मार्गांनीं येणाऱ्या विपत्तीचा हा एक मोठा आदिगुरुच होय.

**निश्चेष्टः शववच्छेते तृतीये तु मदे स्थितः ।**
**मरणादपि पापात्मा गतः पापतरां दशाम् ॥ ७ ॥**

तिसऱ्या अवस्थेंत तर मनुष्य मढ्यासारखा होऊन निश्चेष्ट पडतो. त्या वेळीं तो दुष्ट पापी प्राणी मरणापेक्षांहि नीच अशा स्थितींत जातो.

**धर्माधर्मं सुखं दुःखमर्थानर्थं हिताहितम् ।**
**यदासक्तो न जानाति कथं तच्छीलयेद्बुधः ॥ ८ ॥**

मनुष्य मद्यासक्त झाला असतां धर्म व अधर्म, सुख व दुःख, अर्थ व अनर्थ, हित व अहित हींहि त्यास कळत नाहींत; तर शहाणा मनुष्य त्या मद्याचें जास्त सेवन कसें करील?

**मद्ये मोहो भयं शोकः क्रोधो मृत्युश्च संश्रितः ।**
**सोन्मादमदमूर्च्छायाः सापस्मारापतानकाः ॥ ९ ॥**
**यत्रैकः स्मृतिविभ्रंशस्तत्र सर्वमसाधु यत् ।**

मोह, भीति, शोक, राग, मृत्यु, उन्माद, मद, मूर्च्छा, अपस्मार व अपतानक हे सर्व जसे काय मद्यांत राहिलेच असतात. फार तर काय, जेथें एका स्मृतीचा लोप झाला तेथें जगांतील सर्व अनिष्टें तयार असावयाचीं.

**अयुक्तियुक्तमन्नं हि व्याधये मरणाय वा ॥ १० ॥**
**मद्यं त्रिवर्गधीधैर्यलज्जादेरपि नाशनम् ।**

अन्नाचें अशास्त्र सेवन केलें असतां त्यापासून रोग किंवा फार झालें तर मृत्यु येईल, पण मद्याचें जर अयोग्य रीतीनें सेवन केलें तर धर्म, अर्थ, सुख, बुद्धि, धैर्य, लज्जा इत्यादिकांचाहि नाश होतो (रोग व मरण तर उत्पन्न करितेंच.)

**नाति माद्यन्ति बलिनः कृताहारा महाशनाः ॥ ११ ॥**
**स्निग्धाः सत्त्ववयोयुक्ता मद्यनित्यास्तदन्वयाः ।**
**मेदःकफाधिका मन्दवातपित्ता दृढाग्नयः ॥ १२ ॥**

बलवान्, जेवलेले, ज्यांचा आहार मोठा आहे ते, स्निग्ध, सत्त्वगुणी, तरुण, नेहमीं मद्य सेवन करणारे, मद्य पिणाऱ्यांच्या कुळांत जन्मलेले, ज्यांचा मेद व कफ अधिक आहे, ज्यांचे वातपित्त कमी आहे व ज्यांचा अग्नि प्रखर आहे, अशा मनुष्यास फारसा मद येत नाहीं.

**विपर्ययेऽति माद्यन्ति विश्रब्धाः कुपिताश्च ये ।**
**मद्येन वाम्लरूक्षेण साजीर्णे बहु नाति च ॥ १३ ॥**

वरच्या विपरीत ज्यांची स्थिति ते, अंमल खास येणार असें ज्यांच्या मनानें घेतलें आहे ते व रागावलेले अशा पुरुषांस आणि आंबट व रूक्ष मद्यानें, किंचित् अजीर्ण असतां व मद्य अतिशय सेवन केलें असतां फारच अंमल येतो.

**वातात्पित्तात्कफात्सर्वैश्चत्वारः स्युर्मदात्ययाः ।**
**सर्वेऽपि सर्वैर्जायन्ते व्यपदेशस्तु भूयसा ॥ १४ ॥**

वायूपासून, पित्तापासून, कफापासून व त्रिदोषापासून असे मदात्यय चार प्रकारचे होतात. सर्व मदात्यय त्रिदोषात्मकच आहेत; परंतु त्यांत जो दोष विशेष असेल त्यावरून त्यास निराळें नांव देतात.

सामान्यं लक्षणं तेषां प्रमोहो हृदयव्यथा ।
विड्भेदः प्रततं तृष्णा सौम्याग्नेयो ज्वरोऽरुचिः ।१५।
शिरःपार्श्वास्थिहृत्कम्पो मर्मभेदस्त्रिकग्रहः ।
उरोविबन्धस्तिमिरं कासः श्वासः प्रजागरः ॥ १६ ॥
स्वेदोऽतिमात्रं विष्टम्भः श्वयथुश्चित्तविभ्रमः ।
प्रलापश्छर्दिरुत्क्लेशो भ्रमो दुःस्वप्नदर्शनम् ॥ १७ ॥

त्याचें सामान्य लक्षण असें:-मोह, हृदयांत दुखणें, मळ पातळ होणें, अतिशय तहान, शीत किंवा उष्णज्वर, अरुचि, डोकें, बरगड्या (बरगड्यांचीं) हाडें व हृदय हीं कांपणें; मर्मांत फुटल्यासारखी वेदना होणें, माकडहाड धरणें, छातींत बांध बसल्याप्रमाणें वाटणें, डोळ्यांपुढें अंधेरी येणें, खोकला, दमा, झोंप न येणें, अतिशय घाम येणें, अंग ताठणें, सूज, चित्तभ्रंश, वडबड, वांति, उम्हासे येणें, भ्रम व वाईट स्वप्नें पडणें.

विशेषाज्जागरश्वासकम्पमूर्धरुजोऽनिलात् ।
स्वप्ने भ्रमत्युत्पतति प्रेतैश्च सह भाषते ॥ १८ ॥

वातज मदात्ययांत विशेषेंकरून जागरण, श्वास, कंप व डोकें दुखणें हीं लक्षणें असून तो स्वप्नांत भटकतो, उड्या मारतो व प्रेतांबरोबर बोलतो.

पित्ताद्दाहज्वरस्वेदमोहातीसारतृड्भ्रमाः ।
देहो हरितहारिद्रो रक्तनेत्रकपोलता ॥ १९ ॥

पित्तजन्य मदात्ययांत दाह, ज्वर, स्वेद, मोह, अतिसार, तहान व भ्रम हीं लक्षणें असून शरीर हिरवट, पिंवळें होतें व डोळे आणि गाल लाल होतात.

श्लेष्मणश्छर्दिहृल्लासनिद्रोदर्वाङ्गगौरवम् ।

वांति, उम्हासे, झोंप, अंगावर गांधी उठणें व अंग जड होणें हीं लक्षणें कफजन्य मदात्ययांत होतात.

सर्वजे सर्वलिङ्गत्वं

त्रिदोषात्मक मदात्ययांत सर्व लक्षणें असतात.

मुक्त्वा मद्यं पिबेत्तु यः ॥ २० ॥
सहसानुचितं चान्यत्तस्य ध्वंसकविक्षयौ ।
भवेतां मारुतात्कष्टौ दुर्बलस्य विशेषतः ॥ २१ ॥

जो मनुष्य कांहीं दिवस मद्य पिण्याचें सोडून पुनः एकाएकीं पिऊं लागतो त्यास व ज्या मद्याची संवय नाहीं तें मद्य एकाएकी जो पिऊं लागतो त्यास वायूपासून ध्वंसक व विक्षय हे दोन मोठे कष्टसाध्य रोग होतात. ते विशेषतः अशक्त मनुष्यास होतात.

ध्वंसके श्लेष्मनिष्ठीवः कण्ठशोषोऽतिनिद्रता ।
शब्दासहत्वं तन्द्रा च

ध्वंसकांत कफ पडतो, घसा कोरडा पडतो, झोंप फार येते, शब्द सोसत नाहीं व झांपड असते.

विक्षयेऽङ्गशिरोऽतिरुक् ॥ २२ ॥
हृत्कण्ठरोगः संमोहः कासस्तृष्णावमिज्वराः ।

अंग व डोकें फारच ठणकतें, हृदयांत व घशांत वेदना होतात व मोह, खोकला, तहान, वांति व ज्वर हीं लक्षणें विक्षयांत होतात.

निवृत्तो यस्तु मद्येभ्यो जितात्मा बुद्धिपूर्वकृत् ॥ २३ ॥
विकारैः स्पृश्यते जातु न स शारीरमानसैः ।

इंद्रियनिग्रह करणारा व विचारानें वागणारा जो मनुष्य मद्यापासून दूर राहतो त्यास शारीर व मानस विकार कधीं होत नाहींत.

रजोमोहाहिताहारपरस्य स्युस्त्रयो गदाः ॥ २४ ॥
रसासृक्चेतनावाहिस्रोतोरोधसमुद्भवाः ।
मदमूर्च्छायसंन्यासा यथोत्तरबलोत्तराः ॥ २५ ॥

रजोगुणी, अतिशय मूढ व अपथ्य आहार करणाऱ्या मनुष्यास मद, मूर्च्छा व संन्यास असे तीन विकार रसवाहक, रक्तवाहक व संज्ञावाहक स्रोतांचा रोध झाल्यामुळें उत्पन्न होतात; ते एकापेक्षां एक बलवान् आहेत.

मदोऽत्र दोषैः सर्वैश्च रक्तमद्यविषैरपि ।

त्यांत मद हा वात, पित्त, कफ, सन्निपात, रक्त, मद्य व विष यांनीं सात प्रकारचा होतो.

सक्तानल्पद्रुताभाषश्चलः स्खलितचेष्टितः ॥ २६ ॥
रूक्षश्यावारुणतनुर्मदे वातोद्भवे भवेत् ।

ज्याला वातजन्य मद झालेला असतो तो मनुष्य अडखळत, पुष्कळ व घाईनें बोलतो, कांपतो व वेड्यावांकड्या कृति करितो. त्याचें शरीर रूक्ष, काळसर व तांबूस होतें.

पित्तेन क्रोधनो रक्तपीताभः कलहप्रियः ॥ २७ ॥

पित्तजन्य मदांत मनुष्य रागावलेला, लाल किंवा पिंवळा व भांडखोर होतो.

स्वल्पासंबद्धवाक्पाण्डुः कफाद्ध्यानपरोऽलसः ।

कफजन्य मदांत थोडें व भलभलतें बोलतो, पिकुडल्यासारखा त्याचा वर्ण होतो, चिंता करीत बसतो व आळशी होतो.

सर्वात्मा सन्निपातेन

सन्निपातापासून झालेल्या मदांत सर्व लक्षणें असतात.

रक्तात्स्तब्धाङ्गदृष्टिता ॥ २८ ॥
पित्तलिङ्गं च

रक्तज मदांत अंग व दृष्टि ताठते व पित्तजन्य मदाचीं लक्षणें होतात.

मद्येन विकृतेहास्वराङ्गता ।

मद्यापासून आलेल्या मदांत चेष्टा, स्वर व अंग हीं विकृत होतात.

विषे कम्पोऽतिनिद्रा च सर्वेभ्योऽभ्यधिकस्तु सः २९

विषजन्य मदांत मनुष्य कांपतो व त्यास फार झोंप येते. हा इतर सर्व मदांपेक्षां बलवान् असतो.

लक्षयेल्लक्षणोत्कर्षाद्वातादीञ् शोणितादिषु ।

रक्तजन्य, मद्यजन्य व विषजन्य मदांत वर सांगितलेल्या

वातादिकांच्या लक्षणांपैकीं ज्याचीं लक्षणें अधिक असतील तो दोष तेथें आहे असें समजावें.

अरुणं कृष्णनीलं वा खं पश्यन्प्रविशेत्तमः ॥ ३० ॥
शीघ्रं च प्रतिबुध्येत हृत्पीडावेपथुर्भ्रमः ।
कार्श्यं श्यावारुणा च्छाया मूर्च्छाये मारुतात्मके ३१

वातात्मक मूर्च्छेंत सर्व पोकळी तांबूस, काळी किंवा निळी दिसूं लागून त्याच स्थितींत तो बेशुद्ध होतो व पुनः लवकरच शुद्धीवर येतो. यांत यांशिवाय हृदयांत दुखणें, कंप, भ्रम, कृशपणा व अंगाची छाया, सावळी किंवा तांबूस होणें हीं लक्षणें होतात.

पित्तेन रक्तं पीतं वा नभः पश्यन्विशेत्तमः ।
विबुध्येत च सस्वेदो दाहतृट्तापपीडितः ॥ ३२ ॥
भिन्नविण्नीलपीताभो रक्तपीताकुलेक्षणः ।

पैत्तिक मूर्च्छेंत आकाश लाल किंवा पिंवळें दिसूं लागून मनुष्य बेशुद्ध पडतो व सावध होतेवेळीं त्यास घाम येतो, नंतर दाह (आंतर), तहान व ताप यांनीं तो पीडित होतो. शौचास पातळ होतें, व त्याची कांति निळी पिंवळी होते. डोळे लाल, पिंवळे व गढूळ होतात.

कफेन मेघसंकाशं पश्यन्नाकाशमाविशेत् ॥ ३३ ॥
तमश्चिराच्च बुध्येत सहृल्लासः प्रसेकवान् ।
गुरुभिः स्तिमितैरङ्गैरार्द्रचर्मावनद्धवत् ॥ ३४ ॥

कफजन्यमूर्च्छेंत आकाश (पोकळी) मेघासारखें दिसूं लागून बेशुद्ध होतो व फार वेळानें सावध होतो. मळमळतें, तोंडास पाणी सुटतें, अंगें जड व ओलें चामडें पांघरल्याप्रमाणें ओलसर होतात.

सर्वाकृतिस्त्रिभिर्दोषैरपस्मार इवापरः ।
पातयत्याशु निश्चेष्टं विना बीभत्सचेष्टितैः ॥ ३५ ॥

त्रिदोषात्मक मूर्च्छेंत सर्व लक्षणें असतात. हा एक दुसरा अपस्मारच होय. यानें मनुष्य अगदीं निश्चेष्ट पडतो. मात्र अपस्माराप्रमाणें यांत वेड्यावांकड्या चेष्टा नसतात.

दोषेषु मदमूर्च्छायाः कृतवेगेषु देहिनाम् ।
स्वयमेवोपशाम्यन्ति संन्यासो नौषधैर्विना ॥ ३६ ॥

दोषांचा जोर कमी झाला असतां मद व मूर्च्छा आपोआप (औषधावांचून) नाहींशीं होतात; परंतु संन्यास [मूर्च्छाविशेष] औषधांवाचून बरा होत नाहीं.

वाग्देहमनसां चेष्टामाक्षिप्यातिबला मलाः ।
संन्यासं सन्निपतिताः प्राणायतनसंश्रयाः ॥ ३७ ॥
कुर्वन्ति तेन पुरुषः काष्ठभूतो मृतोपमः ।
म्रियेत शीघ्रं शीघ्रं चेच्चिकित्सा न प्रयुज्यते ॥ ३८ ॥

अतिशय बलवान् झालेले वातादि तीनहि दोष हृदयाश्रित होऊन वाणी, शरीर व मन यांचे व्यापार बंद करून संन्यास उत्पन्न करितात, त्यामुळें मनुष्य मढ्याप्रमाणें निस्तेज होऊन लांकडाप्रमाणें निश्चेष्ट पडतो व त्यावर लवकरच कांहीं चांगलासा उपाय न केल्यास तात्काळच मरतो.

अगाधे ग्राहबहुले सलिलौघ इवाहते ।
संन्यासे विनिमज्जन्तं नरमाशु निवर्तयेत् ॥ ३९ ॥

खोल व ज्यांत पुष्कळ सुसरी आहेत अशा व ज्याला तीर नाहीं अशा मोठ्या जलाशयाप्रमाणें संन्यासांत बुडणाऱ्या मनुष्यास त्यांतून फार त्वरित बाहेर काढावें.

मद्यमानरोषतोषप्रभृतिभिररिभिर्निजैः परिष्वङ्गः ।
युक्तायुक्तं च समं युक्तिवियुक्तेन मद्येन ॥ ४० ॥

मद्याचें अशास्त्र सेवन केल्यानें, मद, गर्व, राग, काम इत्यादि सहज [जन्मतः उत्पन्न होणारे] शत्रु, मनुष्यास तेव्हांच येऊन चिकटतात व योग्य आणि अयोग्य हें सर्व सारखेंच होऊन जातें (युक्तायुक्त विवेक नाहींसा होतो.)

बलकालदेशसात्म्यप्रकृतिसहायामयवयांसि ।
प्रविभज्य तदनुरूपं यदि पिबति ततः पिबत्यमृतम् ॥

बल, काल, देश, संवय, प्रकृति, सहाय [मद्याबरोबर खाण्यास सांगितलेले मांसादि दुसरे पदार्थ], रोग व वय यांचा विचार करून तदनुरूप जर मद्य प्राशन करील तर तो अमृतच प्राशन करितो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

# सप्तमोऽध्यायः ।

## अध्याय ७ वा.

## अथार्शसां निदानं व्याख्यास्यामः ।

आतां मूळव्याधीचें निदान सांगतों.

अरिवत्प्राणिनो मांसकीलका विशसन्ति यत् ।
अर्शांसि तस्मादुच्यते गुदमार्गविरोधतः ॥ १ ॥

गुदाच्या मार्गाचा रोध करून मांसाचे मोड प्राण्यास शत्रूप्रमाणें टोंचितात; म्हणून त्यास अर्श असें म्हणतात. (अरिवत् शसन्तीत्यर्शः)

दोषास्त्वङ्मांसमेदांसि सन्दूष्य विविधाकृतीन् ।
मांसाङ्कुरानपानादौ कुर्वन्त्यर्शांसि तान् जगुः ॥ २ ॥

वातादि दोष त्वचा, मांस व मेद यांस दुष्ट करून नानाप्रकारच्या आकृतींचे गुदनासिकादिकांत जे मांसाचे मोड उत्पन्न करितात त्या मोडांस अर्श असें म्हणतात.

सहजन्मोत्तरोत्थानभेदाद्द्वेधा समासतः ।
शुष्कस्राविविभेदाच्च

संक्षेपतः अर्शाचे प्रकार दोन आहेत—जन्मापासून झालेले व पुढें झालेले; तसेंच शुष्क व स्रावयुक्त [ज्यांत रक्तस्राव असतो].

गुदः स्थूलान्त्रसंश्रयः ॥ ३ ॥
अर्धपञ्चाङ्गुलस्तस्मिंस्तिस्रोऽध्यर्धाङ्गुलाः स्थिताः ।

वलयः प्रवाहिणी तासामन्तर्मध्ये विसर्जिनी ॥ ४ ॥
बाह्या संवरणी तस्या गुदौष्ठो बहिरङ्गुले ।
यवाध्यर्धप्रमाणेन रोमाण्यत्र ततः परम् ॥ ५ ॥

स्थूलांत्राचा जो शेवटला साडेचार अंगुलें लांबीचा भाग त्यास गुद म्हणतात. त्यांत दीड दीड बोट लांबीच्या तीन वली ( वळ्या ) आहेत. त्यांत आंतली म्हणजे पहिली प्रवाहिणी, मधली म्हणजे दुसरी विसर्जिनी व बाहेरली म्हणजे तिसरी संवरणी व संवरणीच्या बाहेर एक बोटावर दीड यव प्रमाणाचा गुदौष्ठ असतो व त्यापुढें केंस येतात.

तत्र हेतुः सहोत्थानां वलीबीजोपतप्तता ।
अर्शसां बीजतप्तिस्तु मातापित्रपचारतः ॥ ६ ॥
दैवाच्च ताभ्यां कोपो हि सन्निपातस्य नान्यतः ।
असाध्यान्येवमाख्यातः सर्वे रोगाः कुलोद्भवाः ॥ ७ ॥

त्यांत सहज अर्शाचें कारण ( गर्भ उत्पन्न होते वेळीं ) वलीसंबंधी बीज दुष्ट होणें हें होय, व आईबापाचें अपथ्यसेवन आणि दैव या दोन कारणांनीं बीज दुष्ट होतें व याच दोन कारणांनीं सन्निपाताचा कोप होतो, दुसरें कोणतेंहि कारण नाहीं. यामुळें सहज अर्श असाध्य होत; व असेच कुलपरंपरा होणारे इतर रोगहि असाध्यच असतात.

सहजानि विशेषेण रूक्षदुर्दर्शनानि च ।
अन्तर्मुखानि पाण्डूनि दारुणोपद्रवाणि च ॥ ८ ॥

सहज अर्श विशेषतः रूक्ष असून दृष्टीं पडण्याला कठिण असतात, व त्यांचीं तोंडें आंत असून ते पांडुर वर्णाचे असतात, व त्यांचे उपद्रवहि भयंकर असतात.

षोढान्यानि पृथग्दोषसंसर्गनिचयास्रतः ।

जन्मानंतर होणाऱ्या अर्शाचे सहा प्रकार आहेत, ते असे:- वातज, पित्तज, कफज, द्वंद्वज, सान्निपातिक व रक्तज.

शुष्काणि वातश्लेष्मभ्यामार्द्राणि त्वस्रपित्ततः ॥ ९ ॥

वायूपासून व कफापासून होणारे अर्श शुष्क असतात [ त्यांतून रक्तस्राव होत नाहीं ], व रक्तापासून आणि पित्तापासून होणारे अर्श स्रावी असतात.

दोषप्रकोपहेतुस्तु प्रागुक्तस्तेन सादिते ।
अग्नौ मलेऽतिनिचिते पुनश्चातिव्यवायतः ॥ १० ॥
यानसङ्क्षोभविषमकठिनोत्कटकासनात् ।
वस्तिनेत्राश्मलोष्टोर्वीतलचैलादिघट्टनात् ॥ ११ ॥
भृशं शीताम्बुसंस्पर्शात्प्रततातिप्रवाहणात् ।
वातमूत्रशकृद्वेगधारणात्तदुदीरणात् ॥ १२ ॥
ज्वरगुल्मातिसारामग्रहणीशोफपाण्डुभिः ।
कर्शनाद्विषमाभ्यश्च चेष्टाभ्यो योषितां पुनः ॥ १३ ॥
आमगर्भप्रपतनाद्गर्भवृद्धिप्रपीडनात् ।
ईदृशैश्चापरैर्वायुरपानः कुपितो मलम् ॥ १४ ॥
पायोर्वलीषु सन्धत्ते तास्वभिष्यण्णमूर्तिषु ।
जायन्तेऽर्शांसि

मागें सांगितलेल्या दोषप्रकोपाच्या कारणांनीं अग्नि मंद झाला असतां व त्यामुळें मळाचा संचय [ किंवा खडा ] झाला असतां आणि अतिमैथुनसेवन केल्यानें, गाडी, घोडा इत्यादिकांवर बसल्यानें गुदास आघात झाला असतां, उंच, सखल व कठिण जागीं बसल्यानें, उकिडवें बसल्यानें, बस्तीची नळी, दगड, ढेंकूळ, जमीन, वस्त्र इत्यादिकांनें गुदास घर्षण झाल्यानें, अत्यंत थंड पाण्याच्या स्पर्शानें, फार वेळ अतिशय कुंथल्यानें, वात, मूत्र व मळ यांचे वेग धारण केल्यानें किंवा बळेंच प्रवृत्त केल्यानें, ताप, गुल्म, अतिसार, आमदोष, ग्रहणी, सूज व पांडुरोग यांनीं मनुष्य क्षीण झाल्यानें व शरीराचे वेडेवांकडे व्यापार केल्यानें व स्त्रियांस गर्भपात झाल्यानें व गर्भ वाढून त्याचा गुदावर दाब बसल्यानें इत्यादि व आणखी दुसऱ्या कांहीं कारणांनीं अपान वायु कुपित होऊन गुदसंबंधीं वलींवर मल जमवितो व त्यामुळें त्या आर्द्र झालेल्या वलींवर मोड उत्पन्न होतात.

तत्पूर्वलक्षणं मन्दवह्निता ॥ १५ ॥
विष्टम्भः सक्थिसदनं पिण्डिकोद्वेष्टनं भ्रमः ।
सादोऽङ्गे नेत्रयोः शोफः शकृद्भेदोऽथवा ग्रहः ॥ १६ ॥
मारुतः प्रचुरो मूढः प्रायो नाभेरधश्चरन् ।
सरुक् सपरिकर्तश्च कृच्छ्रान्निर्गच्छति स्वनन् ॥ १७ ॥
अन्त्रकूजनमाटोपः क्षामतोद्गारभूरिता ।
प्रभूतं मूत्रमल्पा विडश्रद्धा धूमकोऽम्लकः ॥ १८ ॥
शिरःपृष्ठोरसां शूलमालस्यं भिन्नवर्णता ।
तथेन्द्रियाणां दौर्बल्यं क्रोधो दुःखोपचारता ॥ १९ ॥
आशङ्का ग्रहणीदोषपाण्डुगुल्मोदरेषु च ।

मूळव्याधीचें पूर्वरूप—अग्निमांद्य, पोट फुगणें, मांड्या गळल्यासारख्या होणें, पोटऱ्या वळणें, भ्रम, अंगग्लानि, डोळे सुजणें, रेच होणें किंवा मलावरोध; अपान वायु अतिशय कुंठित होऊन बहुधा नाभीच्या खालच्या भागींच संचार करून मोठ्या कष्टानें शब्द करीत गुदांतून बाहेर पडतो, व बाहेर पडतांना टोंचल्यासारखी व कातरल्यासारखी पीडा होते. आंतड्यांत कुरकुर शब्द होतो; पोटांत गुडगुड शब्द होतो. मनुष्य कृश होतो, ढेंकरा फार येतात, मूत्र फार होतें व मळ थोडा होतो, अन्नावर वासना नसते, घशांतून वाफा निघतात, घशाशीं आंबट येतें, डोकें, पाठ व ऊर यांत शूल असतो, आळस येतो, वर्ण बदलतो, इंद्रियें निःशक्त होतात, राग फार येतो, उपचार दुःखकारक होतात, ग्रहणी, पांडुरोग, गुल्म व उदर हे रोग होण्याची त्यास भीति वाटूं लागते.

एतान्येव विवर्धन्ते जातेषु हतनामसु ॥ २० ॥

अर्श उत्पन्न झाले असतां हींच लक्षणें वाढतात.

निवर्तमानोऽपानो हि तैरधोमार्गरोधतः ।
क्षोभयन्ननिलानन्यान् सर्वेन्द्रियशरीरगान् ॥ २१ ॥
तथा मूत्रशकृत्पित्तकफान् धातूंश्च साशयान् ।
मृद्नात्यग्निं ततः सर्वो भवति प्रायशोऽर्शसः ॥ २२ ॥

कृशो भृशं हतोत्साहो दीनः क्षामोऽतिनिष्प्रभः ।
असारो विगतच्छायो जन्तजुष्ट इव द्रुमः ॥ २३ ॥
कृत्स्नैरुपद्रवैर्ग्रस्तो यथोक्तैर्मर्मपीडनैः ।
तथा कासपिपासास्यवैरस्यश्वासपीनसैः ॥ २४ ॥
क्लमाङ्गभङ्गवमथुक्षवथुश्वयथुज्वरैः ।
क्लैब्यबाधिर्यतैमिर्यशर्कराश्मरिपीडितः ॥ २५ ॥
क्षामभिन्नस्वरो ध्यायन् मुहुः ष्ठीवन्नरोचकी ।
सर्वपर्वास्थिहृन्नाभिपायुवङ्क्षणशूलवान् ॥ २६ ॥
गुदेन स्रवता पिच्छां पुलाकोदकसन्निभाम् ।
विबद्धमुक्तं शुष्कार्द्रं पक्कामं चान्तरान्तरा ॥ २७ ॥
पाण्डुपीतं हरिद्रक्तं पिच्छिलं चोपवेश्यते ।

गुदांत मोड होऊन त्यांनीं गुदमार्गाचा रोध केल्यामुळें अपान वायु उलट होऊन सर्व इंद्रियें व शरीर यांस व्यापणारे दुसरे चार वायु, मूत्र, शकृत्, पित्त, कफ, धातु व त्यांचे आशय यांस क्षुब्ध करून अग्नीस अगदीं मंद करितो, त्यामुळें मूळव्याध झालेला मनुष्य अतिशय कृश होतो. त्याचा उत्साह अगदीं नष्ट होतो, दीनवाणी व क्षाम [ मांसहीन ], निस्तेज व निर्बल होतो. त्याची छाया नहींशी होते व तो मनुष्य कीड लागलेल्या झाडाप्रमाणें दिसतो. सर्व उपद्रवांनीं तो व्याप्त होतो, मर्मस्थानीं दाबल्यासारखी वेदना होते; तसेंच खोकला, तहान, तोंडास बेचवपणा, श्वास, पडसें, क्लम, अंग मोडणें, वांति, शिंका, सूज, ताप, षंढता, बहिरेपणा, तिमिररोग, मूत्रशर्करा व मुतखडा या विकारांनीं तो ग्रस्त होतो, आवाज खोल जातो व बदलतो, चिंताग्रस्त होतो, वारंवार थुंक्या टाकितो, अरुचि असते, सर्व सांधे, हाडें, हृदय, नाभि, गुद व अंडसंधि यांत वेदना असते, भाताच्या पेजेसारखा गुदांतून चिकट स्राव होतो, कधीं शौचास साफ होतें, कधीं होत नाहीं; कोरडा किंवा ओला, पक्क किंवा आम, पांढरा किंवा पिंवळा, हिरवा किंवा लाल व चिकट असा वारंवार थांबून थांबून मळ होतो.

गुदाङ्कुरा बह्वनिलाः शुष्काश्चिमिचिमान्विताः ॥२८॥
म्लानाः श्यावारुणाः स्तब्धा विषमाः परुषाः खराः ।
मिथो विसदृशा वक्रास्तीक्ष्णा विस्फुटिताननाः ॥२९॥
बिम्बीकर्कन्धुखर्जूरकार्पासीफलसन्निभाः ।
केचित्कदम्बपुष्पाभाः केचित्सिद्धार्थकोपमाः ॥ ३० ॥
शिरःपार्श्वांसकट्यूरुवङ्क्षणाभ्यधिकव्यथाः ।
क्षवथूद्गारविष्टम्भहृद्ग्रहारोचकप्रदाः ॥ ३१ ॥
कासश्वासाग्निवैषम्यकर्णनादभ्रमावहाः ।
तैरार्तो ग्रथितं स्तोकं सशब्दं सप्रवाहिकम् ॥ ३२ ॥
रुक्फेनपिच्छानुगतं विबद्धमुपवेश्यते ।
कृष्णत्वङ्नखविण्मूत्रनेत्रवक्त्रश्च जायते ॥ ३३ ॥
गुल्मप्लीहोदराष्ठीलासंभवस्तत एव च ।

वाताधिक मूळव्याधीचे मोड कोरडे, चिमचिम व वेदना यांनीं युक्त, म्लान, सांवळ्या व तांबूस रंगाचे, स्तब्ध किंवा ताठ ( दाबले असतां न दाबले जाणारे ), विषम ( त्यांवरील पातळी उच्च नीच असते ), खरखरीत, कठिण, निरनिराळ्या आकारांचे, वांकडे, अणकुचीदार, त्यांचीं तोंडें चिरलेलीं असे, तोंडलीं, बोर (अहमदावादी), खारीक व कापशीचें फळ यांसारखे व कित्येक कदंबाच्या फुलासारखे व कांहीं तर शिरसाइतके बारीक असे असतात, व ते झाले असतां डोकें, बरगड्या, खांदे, कंबर, मांड्या व अंडसंधि हे फारच दुखतात व शिंका, ढेंकरा, मलावरोध, हृदय जखडणें, अरुचि, कास, श्वास, विषमाग्नि, कर्णनाद ( कानांत शब्द होणें ) व भ्रम हे विकार होतात, व या मोडांनीं रोगी अगदीं पीडित होऊन त्यास शौचास खडा होतो, मळ थोडा होतो, कुंथावें लागतें, मळ होतांना शब्द होतो व दुखतें, फेंस व पिच्छा (आंवेसारखा चिकट स्राव) हीं मळांत असतात, व मळ अडकत होतो. त्वचा, नखें, मळ, मूत्र, डोळे व तोंड हीं काळसर होतात व त्यापासूनच पुढें गुल्म, कौल्ह, उदर व अष्ठीला हे रोग उत्पन्न होतात.

पित्तोत्तरा नीलमुखा रक्तपीतासितप्रभाः ॥ ३४ ॥
तन्वस्रस्राविणो विस्रास्तनवो मृदवः श्लथाः ।
शुकजिह्वायकृत्खण्डजलौकावक्त्रसन्निभाः ॥ ३५ ॥
दाहपाकज्वरस्वेदतृण्मूर्च्छारुचिमोहदाः ।
सोष्माणो द्रवनीलोष्णपीतरक्तामवर्चसः ॥ ३६ ॥
यवमध्या हरित्पीतहारिद्रत्वङ्नखादयः ।

पित्तादिक मूळव्याधीचे मोड तांबडे, पिंवळे किंवा काळे असून त्यांचीं तोंडें निळीं असतात; त्यांतून पातळ रक्त स्रवत असतें, त्यांस आंबूस घाण येते; ते बारीक, मऊ व शिथिल [ स्थितिस्थापक ] असतात; पोपटाची जीभ, यकृताचा तुकडा व जळूचें तोंड यांसारखा त्यांचा आकार व वर्ण असतो; दाह, पाक, ताप, घाम, तहान, मूर्च्छा, अरुचि व मोह हे विकार उत्पन्न होतात; त्यांस स्पर्श केला असतां उष्ण लागतात; पातळ, निळा, उष्ण, पिंवळा, लाल व अपक्व असा मळ होतो. ते मोड बुडाशीं बारीक असून मध्यें जाड असतात व त्वचा, नखें इत्यादिकांस हिरवटपिंवळा [ पोपटी ] किंवा पिंवळा रंग येतो.

श्लेष्मोल्बणा महामूला घना मन्दरुजा सिताः ॥ ३७ ॥
उच्छूनोपचिताः स्निग्धाः स्तब्धवृत्तगुरुस्थिराः ।
पिच्छिलाः स्तिमिताः श्लक्ष्णाः कण्ड्वाढ्याः स्पर्शनप्रियाः
करीरपनसास्थ्याभास्तथा गोस्तनसन्निभाः ।
वङ्क्षणानाहिनः पायुबस्तिनाभिविकर्तिनः ॥ ३९ ॥
सकासश्वासहृल्लासप्रसेकारुचिपीनसाः ।
मेहकृच्छ्रशिरोजाड्यशिशिरज्वरकारिणः ॥ ४० ॥
क्लैब्याग्निमार्दवच्छर्दिरामप्रायविकारदाः ।
वसाभाः सकफप्राज्यपुरीषाः सप्रवाहिकाः ॥ ४१ ॥
न स्रवन्ति न भिद्यन्ते पाण्डुस्निग्धत्वगादयः ।

कफाधिक मूळव्याधीचे मोड मुळाशीं जाड, जवळ जवळ, पांढरे, वर आलेले, लहू, स्निग्ध, ताठर, वाटोळे, जड व स्थिर असून त्यांत वेदना अल्प असते. ते चिकट, ओलसर, गुळगुळीत असून त्यांस कंड सुटते व हात लाविला असतां बरें वाटतें; ते आकृतीनें वेळूचा कोंब, फणसाची अठी किंवा गाईचा स्तन यांसारखे असतात. ते झाले असतां अंडसंधींत फुगोशी येते; गुद, बस्ति व नाभि यांत कातरल्यासारखी पीडा होते; त्यांचे योगानें कास, श्वास, हल्लास, लालास्राव, अरुचि, पडसें, मेह, मूत्रकृच्छ्र, डोकें जड होणें, शीतज्वर, षंढता, अग्निमांद्य, वांति व आमयुक्त विकार उत्पन्न होतात. ते वरोल्या रंगाचे असतात व ते झाले असतां मनुष्यास कुंथून आंवेनें युक्त व पुष्कळ मळ होतो, त्यांतून स्राव होत नाहीं व ते फुटतहि नाहींत व मनुष्याची त्वचा, नेत्र, मूत्रादि पांडुरवर्ण व स्निग्ध असतात.

**संसृष्टलिङ्गाः संसर्गात्**

द्वंद्वज अर्शांत दोन दोषांचीं लक्षणें असतात.

**निचयात्सर्वलक्षणाः ॥ ४२ ॥**

सन्निपातजन्य अर्शांत सर्व लक्षणें असतात.

**रक्तोल्बणा गुदे कीलाः पित्ताकृतिसमन्विताः ।**
**वटप्ररोहसदृशा गुञ्जाविद्रुमसन्निभाः ॥ ४३ ॥**
**तेऽत्यर्थं दुष्टमुष्णं च गाढविट्प्रतिपीडिताः ।**
**स्रवन्ति सहसा रक्तं तस्य चातिप्रवृत्तितः ॥ ४४ ॥**
**भेकाभः पीड्यते दुःखैः शोणितक्षयसम्भवैः ।**
**हीनवर्णबलोत्साहो हतौजाः कलुषेन्द्रियः ॥ ४५ ॥**

रक्तजन्य मूळव्याधीचे गुदांतील मोड पित्ताधिक मोडाच्या लक्षणांनीं युक्त असून वडाच्या अंकुरासारखे असतात. व ते गुंज व पोंवळें यांसारखे लाल असतात. मळाचा खडा होऊन त्यानें ते दाबले गेले असतां एकाएकीं दुष्ट व उष्ण असें पुष्कळ रक्त स्रवतें व अतिशय रक्तस्राव झाला असतां मनुष्य बेडकासारखा होऊन रक्तक्षयजन्य दुःखानें पीडित होतो. बल, वर्ण व उत्साह कमी होतात, ओज नष्ट होतें व इंद्रियें विकल होतात.

**मुद्गकोद्रवजूर्णाह्वकरीरचणकादिभिः ।**
**रूक्षैः संग्राहिभिर्वायुः स्वस्थाने कुपितो बली ॥ ४६ ॥**
**अधोवहानि स्रोतांसि संरुध्याधः प्रशोषयन् ।**
**पुरीषं वातविण्मूत्रसङ्गं कुर्वीत दारुणम् ॥ ४७ ॥**
**तेन तीव्रा रुजा कोष्ठपृष्ठहृत्पार्श्वगा भवेत् ।**
**आध्मानमुदरावेष्टो हृल्लासः परिकर्तनम् ॥ ४८ ॥**
**बस्तौ च सुतरां शूलं गण्डश्वयथुसम्भवः ।**
**पवनस्योर्ध्वगामित्वं ततश्छर्द्यरुचिज्वराः ॥ ४९ ॥**
**हृद्रोगग्रहणीदोषमूत्रसङ्गप्रवाहिकाः ।**
**बाधिर्यतिमिरश्वासशिरोरुक्कासपीनसाः ॥ ५० ॥**
**मनोविकारस्तृष्णास्रपित्तगुल्मोदरादयः ।**
**ते ते च वातजा रोगा जायन्ते भृशदारुणाः ॥ ५१ ॥**

**दुर्नाम्नामित्युदावर्तः परमोऽयमुपद्रवः ।**
**वाताभिभूतकोष्ठानां तैर्विनाऽपि स जायते ॥ ५२ ॥**

मूग, हरिक, आंबले, बांबूचे कोंब, चणे इत्यादि रूक्ष व मलावष्टंभक पदार्थ खाल्ल्यानें वायु आमाशयांत कुपित होऊन अधोवह स्रोतसें खालून बंद करून मळाचा खडा करितो; व वायु, मळ व मूत्र यांचा भयंकर अवरोध होतो. त्यामुळें कोठा, हृदय, बरगड्या व पाठ यांत तीव्र वेदना होतात, पोट फुगतें, पोटांत पिळवटल्यासारखें होतें, मळमळतें, कातरल्यासारखी पीडा ( गुदाशीं ) होते, बस्तींत अतिशय शूल उत्पन्न होतो, गाल सुजतात, वायु वर येतो व त्यामुळें वांति, अरुचि, ताप, हृद्रोग, ग्रहणी, मूत्रावरोध, प्रवाहिका, ऐकूं न येणें, तिमिर रोग, श्वास, डोकें दुखणें, खोकला, पडसें, उन्माद, तहान, रक्तपित्त, गुल्म, उदर व दुसरे अतिशय भयंकर वातरोग उत्पन्न होतात. इतक्या लक्षणांनीं युक्त उदावर्तनामक हा मूळव्याधीचा भयंकर उपद्रव आहे. ज्याचा कोठा वातबद्ध असतो त्यास उदावर्त हा रोग मूळव्याध नसतांहि होतो.

**सहजानि त्रिदोषाणि यानि चाभ्यन्तरे वलौ ।**
**स्थितानि तान्यसाध्यानि याप्यन्तेऽग्निबलादिभिः ५३**

सहजार्श, त्रिदोषार्श व आंतल्या वलीवर झालेले अर्श असाध्य होत, परंतु तेहि अग्नि प्रदीप्त असून आयुष्य असेल व पादचतुष्टय अनुकूल असेल तर याप्य होतात.

**द्वन्द्वजानि द्वितीयायां वलौ यान्याश्रितानि च ।**
**कृच्छ्रसाध्यानि तान्याहुः परिसंवत्सराणि च ॥५४॥**

द्विदोषजन्य, मधल्या वलीवर झालेले व एक वर्षापलीकडचे हे कष्टसाध्य आहेत असें म्हणतात.

**बाह्यायां तु वलौ जातान्येकदोषोल्बणानि च ।**
**अर्शांसि सुखसाध्यानि न चिरोत्पतितानि च ॥ ५५ ॥**

बाहेरच्या वलीवर झालेले, एकदोषात्मक व नुकतेच झालेले मोड सुखसाध्य आहेत.

**मेढ्रादिष्वपि वक्ष्यन्ते यथास्वं**

शिश्नादिकांवर होणाऱ्या अर्शांचें त्या त्या ठिकाणीं पुढें वर्णन केलें जाईल.

**नाभिजानि तु ।**
**गण्डूपदास्यरूपाणि पिच्छिलानि मृदूनि च ॥ ५६ ॥**

नाभीवर होणारे मोड गांडुळाच्या तोंडासारखे, बुळबुळीत व मऊ असतात.

**व्यानो गृहीत्वा श्लेष्माणं करोत्यर्शस्त्वचो बहिः ।**
**कीलोपमं स्थिरखरं चर्मकीलं तु तं विदुः ॥ ५७ ॥**

व्यानवायु कफास साह्य होऊन त्वचेच्या बाहेर खिळ्यासारखे लोचट, खरखरीत असे जे मोड उत्पन्न करितो त्यास चामखीळ [ चर्मकील ] असें म्हणतात.

वातेन तोदः पारुष्यं पित्तादसितरक्तता ।
श्लेष्मणा स्निग्धता तस्य ग्रथितत्वं सवर्णता ॥ ५८ ॥

वायूनें त्यांत टोंचणी लागते व तो खरखरीत लागतो, पित्तापासून काळे किंवा लाल असतात. कफापासून जे चामखीळ झालेले असतात ते स्निग्ध, गांठाळलेले व त्वचेच्या वर्णाचे असतात.

अर्शसां प्रशमे यत्नमाशु कुर्वीत बुद्धिमान् ।
तान्याशु हि गुदं बद्ध्वा कुर्युर्बद्धगुदोदरम् ॥ ५९ ॥

मूळव्याध बरी होण्यासाठीं शहाण्या मनुष्यानें ताबडतोब प्रयत्न करावा, कारण ते मोड गुदाचा अवरोध करून त्यापासून बद्धगुदोदर उत्पन्न करितात.

---

# अष्टमोऽध्यायः ।

## अध्याय ८ वा.

### अथातोऽतिसारग्रहणीरोगयोर्निदानं व्याख्यास्यामः।

आतां अतिसार व ग्रहणी या रोगांचें निदान सांगतों.

दोषैर्व्यस्तैःसमस्तैश्च भयाच्छोकाच्च षड्विधः ।
अतीसारः

वात, पित्त, कफ, सन्निपात, भय व शोक या सहांपासून सहा प्रकारचा अतिसार होतो.

स सुतरां जायतेऽत्यम्बुपानतः ॥ १ ॥
कृशशुष्कामिषासात्म्यतिलपिष्टविरूढकैः ।
मद्यरूक्षातिमात्रान्नैरर्शोभिः स्नेहविभ्रमात् ॥ २ ॥
कृमिभ्यो वेगरोधाच्च तद्विधैः कुपितोऽनिलः ।
विस्रंसयत्यधोऽब्धातुं हत्वा तेनैव चानलम् ॥ ३ ॥
व्यापद्यानुशकृत्कोष्ठं पुरीषं द्रवतां नयन् ।
प्रकल्पतेऽतिसाराय

अतिसार बहुधा पुढील कारणांनीं होतो—अतिशय पाणी प्याल्यानें, मेदरहित ( कृश ) व वाळलेलें मांस, असात्म्य पदार्थ, तीळ, पिठाचे पदार्थ, मोडाचे दाणे, मद्य, रूक्ष अन्न व अतिशय अन्न यांचें सेवन केल्यानें, मूळव्याधीपासून, स्नेहपानांत चूक झाल्यानें, कृमीपासून वेगावरोधानें व दुसऱ्या कांहीं अशाच कारणांनीं वायु कुपित होऊन अब्धातूंस खालीं नेऊन व त्यानेंच अग्नीस विझवून, स्थूलांत्रांत विकार उत्पन्न करून व पुरीष पातळ करून अतिसार उत्पन्न करितो.

लक्षणं तस्य भाविनः ॥ ४ ॥
तोदो हृद्गुदकोष्ठेषु गात्रसादो मलग्रहः ।
आध्मानमविपाकश्च

अतिसार होण्याच्यापूर्वीं हृदय, गुद व कोठा यांत टोंचणी लागते, अंगें निःशक्त होतात, मळाचा अवरोध होतो, पोट फुगतें व अन्नाचें पचन होत नाहीं.

तत्र वातेन विज्जलम् ॥ ५ ॥
अल्पाल्पं शब्दशूलाढ्यं विबद्धमुपवेश्यते ।
रूक्षं सफेनमच्छं च ग्रथितं वा मुहुर्मुहुः ॥ ६ ॥
तथा दग्धगुडाभासं सपिच्छापरिकर्तिकम् ।
शुष्कास्यो भ्रष्टपायुश्च हृष्टरोमा विनिष्टनन् ॥ ७ ॥

वातातिसारांत बुळबुळीत, थोडथोडें, शब्दशूलयुक्त, अडखळत, रूक्ष, फेंसाळ, पातळ किंवा घट्ट, करपलेल्या गुळासारखें, आंवेसहित, वारंवार शौचास होतें, गुदांत कातरल्यासारखी पीडा होते, तोंड कोरडें पडतें, गुदभ्रंश होतो, रोमांच उभे राहतात व तो कुंथतो.

पित्तेन पीतमसितं हारितं शाद्वलप्रभम् ।
सरक्तमतिदुर्गन्धं तृण्मूर्च्छास्वेददाहवान् ॥ ८ ॥
सशूलं पायुसन्तापपाकवान्

पित्तातिसारांत पिंवळें, काळें, पोपटी रंगाचें व हिरवें, रक्तमिश्रित, अतिशय घाणेरें शौचास होतें. व तहान, मूर्च्छा, घाम, दाह, शूळ, गुदांत आग होणें व गुदपाक हीं लक्षणें असतात.

श्लेष्मणा घनम् ।
पिच्छिलं तन्तुमच्छ्वेतं स्निग्धमामं कफान्वितम् ॥ ९ ॥
अभीक्ष्णं गुरु दुर्गन्धं विबद्धमनुबद्धरुक् ।
निद्रालुरलसोऽन्नद्विडल्पाल्पं सप्रवाहिकम् ॥ १० ॥
सरोमहर्षः सोत्क्लेशो गुरुबस्तिगुदोदरः ।
कृतेऽप्यकृतसंज्ञश्च

कफातिसारांत घट्ट, चिकट, तंतुयुक्त, पांढरें, स्निग्ध, अपक्व, कफयुक्त, जड, घाणेरें, अडखळत, वारंवार, मुरडा येऊन, थोडथोडें कुंथून शौचास होतें. तो मनुष्य झोंपाळू व आळशी होतो, अन्नद्वेष होतो, रोमांच उभे राहतात, मळमळतें, बस्ति, गुद व पोट हीं जड होतात व शौचास झालें असतांहि न झालेंसें वाटतें.

सर्वात्मा सर्वलक्षणः ॥ ११ ॥

त्रिदोषात्मक अतिसारांत सर्व लक्षणें होतात.

भयेन क्षोभिते चित्ते सपित्तो द्रावयेच्छकृत् ।
वायुस्ततोऽतिसार्येत क्षिप्रमुष्णं द्रवं प्लवम् ॥ १२ ॥
वातपित्तसमं लिङ्गैराहुस्तद्वच्च शोकतः ।

भीतीनें व शोकानें चित्त क्षुब्ध झालें असतां पित्तयुक्त वायु मळास पातळ करितो. नंतर लवकर लवकर, ऊष्ण, पातळ व पाण्यावर तरणारा असा मल होतो व त्यांत वातातिसार व पित्तातिसार यांच्यासारखीं लक्षणें असतात.

अतीसारः समासेन द्विधा सामो निरामकः ॥ १३ ॥
सासृङ्निरस्रः

अतिसार संक्षेपतः दोन प्रकारचे आहेत : साम व निराम, तसेंच रक्तसहित व रक्तरहित.

तत्राद्ये गौरवादप्सु मज्जति ।
शकृद्दुर्गन्धमाटोपविष्टम्भार्तिप्रसेकिनः ॥ १४ ॥

आमातिसारांत मळ दुर्गंधी असतो व जड असल्यामुळें पाण्यांत बुडतो. पोटांत गुडगुड वाजतें, पोट फुगतें, दुखतें व तोंडास लाळ सुटते.

विपरीतो निरामस्तु

निरामातिसारांत वरील लक्षणें नसतात.

कफात्पक्कोऽपि मज्जति ।

कफातिसारांत मल पक्क असला तरी पाण्यांत बुडतो.

अतीसारेषु यो नातियत्नवान् ग्रहणीगदः ॥ १५ ॥
तस्य स्यादग्निविध्वंसकरैरत्यर्थसेवितैः ।

अतिसार झाला असतां तो बरा होण्यासाठीं जो बरोबर यत्न न करतां अग्निमांद्य करणारे पदार्थ अतिशय खातो त्यास ग्रहणी रोग होतो.

सामं शकृन्निरामं वा जीर्णे येनातिसार्यते ॥ १६ ॥
सोऽतिसारोऽतिसरणादाशुकारी स्वभावतः ।

अन्न जिरल्यावर ज्या रोगांत आम (भसरा) किंवा पक्क (ढाळ) मळाचे जुलाब होतात त्यांत मलाचें अतिशय सरण होतें म्हणून अतिसार असें म्हणतात व तो स्वभावतःच थोडा काळ राहतो.

सामं सान्नमजीर्णेऽन्ने जीर्णे पक्कं तु नैव वा ॥ १७ ॥
अकस्माद्वा मुहुर्बद्धमकस्माच्छिथिलं मुहुः ।
चिरकृद्ग्रहणीदोषः संचयाच्चोपवेशयेत् ॥ १८ ॥

अन्न पचन न झाल्यास भसरा किंवा अन्नयुक्त मळ होतो व अन्न जिरल्यास मळ पक्क होतो किंवा मुळीं होतच नाहीं. कारणावांचून वारंवार अडत अडत शौचास होतें, किंवा मलाचा संचय झाला असतां कारणावांचून वारंवार जुलाब होतात, त्या व्याधीस ग्रहणीदोष असें म्हणतात व तो फार दिवस असतो.

स चतुर्धा पृथग्दोषैः सन्निपाताच्च जायते ।

वात, पित्त, कफ व सन्निपात यांपासून चार प्रकारची ग्रहणी होते.

प्राग्रूपं तस्य सदनं चिरात्पचनमम्लकः ॥ १९ ॥
प्रसेको वक्त्रवैरस्यमरुचिस्तृट्क्लमो भ्रमः ।
आनद्धोदरता छर्दिः कर्णक्ष्वेडोऽन्त्रकूजनम् ॥ २० ॥

अग्निमांद्य, अन्नपचन फार वेळानें होणें, आंबट ढेंकरा येणें, तोंडास पाणी सुटणें, तोंड बेचव होणें, अरुचि, तहान, ग्लानि, भ्रम, पोट फुगणें, वांति, कानांत शब्द होणें व आंतडें वाजणें हीं संग्रहणीचीं पूर्वचिन्हें होत.

सामान्यं लक्षणं कार्श्यं धूमकस्तमको ज्वरः ।
मूर्च्छा शिरोरुग्विष्टम्भः श्वयथुः करपादयोः ॥ २१ ॥

कृशपणा, घशांत जळजळणें, डोळ्यांपुढें अंधारी येणें, ताप, मूर्च्छा, डोकें दुखणें, पोट फुगणें व हातपाय सुजणें हें तिचें सामान्य लक्षण आहे.

तत्रानिलात्तालुशोषस्तिमिरं कर्णयोः स्वनः ।
पार्श्वोरुवङ्क्षणग्रीवारुजाऽभीक्ष्णं विसूचिका ॥ २२ ॥
रसेषु गृद्धिः सर्वेषु सुतृष्णा परिकीर्तिका ।
जीर्णे जीर्यति चाध्मानं भुक्तेऽस्वास्थ्यं समश्नुते ॥२३॥
वातहृद्रोगगुल्मार्शःप्लीहपाण्डुत्वशङ्कितः ।
चिराद्दुःखं द्रवं शुष्कं तन्वामं शब्दफेनवत् ॥ २४ ॥
पुनः पुनः सृजेद्वर्चः पायुरुक् श्वासकासवान् ।

वातग्रहणींत टाळूस कोरड, डोळ्यांपुढें काळोखी, कानांत शब्द होणें, बरगड्या, मांड्या, अंडसंधि व मान यांत वेदना, अंगास वारंवार सुया टोंचल्याप्रमाणें वाटणें, अन्न पचन झालें असतां सर्व रसावर फार इच्छा होते, तहान व भूक लागते, व गुदांत कातरल्यासारखी वेदना होते, अन्न जिरत असतां पोट फुगतें व जेवलें म्हणजे चैन पडेनासें होतें. वातरोग, हृद्रोग, गुल्म, अर्श, कोथ व पांडुरोग हे विकार आहेत अशी भीति वाटूं लागते, फार वेळानें, मोठ्या दुःखानें पातळ, कोरडें, थोडें, भसरा, शब्द व फेंसयुक्त वर्च्चेवर शौचास होतें, गुदस्थानीं पीडा, श्वास व खोकला होतो.

पित्तेन नीलं पीताभं पीताभः सृजति द्रवम् ॥ २५ ॥
पूत्यम्लोद्गारहृत्कण्ठदाहारुचितृडर्दितः

पित्तग्रहणींत मनुष्य पिंवळा होतो व त्यास निळें, पिंवळें व पातळ शौचास होतें. घाणेरडे व आंबट ढेंकर येतात, हृदयांत व घशांत आग होते, अरुचि व तहान हे विकार असतात.

श्लेष्मणा पच्यते दुःखमन्नं छर्दिररोचकः ॥ २६ ॥
आस्योपदेहनिष्ठीवकासहृल्लासपीनसाः ।
हृदयं मन्यते स्त्यानमुदरं स्तिमितं गुरु ॥ २७ ॥
उद्गारो दुष्टमधुरः सदनं स्त्रीष्वहर्षणम् ।
भिन्नामश्लेष्मसंसृष्टगुरुवर्चःप्रवर्तनम् ॥ २८ ॥
अकृशस्यापि दौर्बल्यं

कफग्रहणींत अन्नाचें पचन फार कष्टानें होतें. वांति, अरुचि, तोंडास चिकटा, थुंकी फार येणें, खोकला, मळमळणें व पडसें हे विकार असतात. ऊर भरून आल्यासारखा वाटतो, पोट निश्चल व जड होतें, करपट व गुळचट ढेंकरा येतात, हातपाय गळतात, स्त्रीविषयीं इच्छा होत नाहीं. पातळ, भसरा, कफ [शेम] युक्त व जड असा मळ होतो व मनुष्य कृश नसतांहि शक्ति नसते.

सर्वजे सर्वसङ्करः ।

त्रिदोषग्रहणींत सर्व लक्षणें असतात.

विभागेऽङ्गस्य ये चोक्ता विषमाद्यास्त्रयोऽग्नयः ॥ २९ ॥
तेऽपि स्युर्ग्रहणीदोषाः

अंगविभाग शारीरांत विषमादि जे तीन अग्नि सांगितले आहेत तेहि ग्रहणीदोष होत.

समस्तु स्वास्थ्यकारणम् ।

समाग्नि हा स्वास्थ्यास कारण आहे.

वातव्याध्यश्मरीकुष्ठमेहोदरभगन्दराः ॥ ३० ॥
अर्शांसि ग्रहणीत्यष्टौ महारोगाः सुदुस्तराः ।

वातरोग, मुतखडा, कुष्ठ, मेह, उदर, भगंदर, अर्श (मूळव्याधि) व ग्रहणी हे आठ अतिशय दुःसाध्य महारोग आहेत.

---

# नवमोऽध्यायः

## अध्याय ९ वा.

अथातो मूत्राघातनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां मूत्राघाताचें निदान सांगतों.

बस्तिर्बस्तिशिरोमेढ्रकटीवृषणपायवः ।
एकसम्बन्धनाः प्रोक्ता गुदास्थिविवराश्रयाः ॥ १ ॥

बस्ति, बस्तिमुख, शिश्न, कंबर, वृषण व गुद हे अवयव गुदास्थींच्या पोकळींत एकमेकांस लागून आहेत.

अधोमुखोऽपि बस्तिर्हि मूत्रवाहिशिरामुखैः ।
पार्श्वेभ्यः पूर्यते सूक्ष्मैः स्यन्दमानैरनारतम् ॥ २ ॥
यैस्तैरेव प्रविश्यैनं दोषाः कुर्वन्ति विंशतिम् ।
मूत्राघातान् प्रमेहांश्च कृच्छ्रान्मर्मसमाश्रयान् ॥ ३ ॥

बस्तीचें तोंड खालीं आहे व त्यास चोहोंकडून मूत्रवह शिरा येऊन मिळतात व त्या शिरांच्या सूक्ष्म तोंडांतून सतत मूत्राचा स्राव होत असतो त्यानें तो बस्ति भरतो. त्याच शिरांतून दोष बस्तींत शिरून वीस प्रकारचे मूत्राघात व वीस प्रकारचे प्रमेह उत्पन्न करितात. हे विकार कष्टसाध्य व मर्माश्रित आहेत.

बस्तिवङ्क्षणमेढ्रार्तियुक्तोऽल्पाल्पं मुहुर्मुहुः ।
मूत्रयेद्वातजे कृच्छ्रे

वातिक मूत्रकृच्छ्रांत बस्ति, अडसंधि व शिश्न यांत कळा लागतात व वारंवार थोडें थोडें मुतावयास होतें.

पैत्ते पीतं सदाहरुक् ॥ ४ ॥
रक्तं वा

पैत्तिक मूत्रकृच्छ्रांत मनुष्य पिंवळें किंवा लाल मुततो व मुततेवेळीं आग होते व तिडीक असते.

कफजे बस्तिमेढ्रगौरवशोफवान् ।
सपिच्छं सविबन्धं च

कफजन्य मूत्रकृच्छ्रांत बस्ति व शिश्न जड होतें व सुजतें, अडकत अडकत मुततो व मूत्र चिकट असतें.

सर्वैः सर्वात्मकं मलैः ॥ ५ ॥

त्रिदोषात्मक मूत्रकृच्छ्रांत वर सांगितलेलीं तिन्ही दोषांचीं लक्षणें असतात.

यदा वायुर्मुखं बस्तेरावृत्य परिशोषयेत् ।
मूत्रं सपित्तं सकफं सशुक्रं वा तदा क्रमात् ॥ ६ ॥
सञ्जायतेऽश्मरी घोरा पित्ताद्गोरिव रोचना ।
श्लेष्माश्रया च सर्वा स्यात्

वायु ज्या वेळीं बस्तीचें तोंड बंद करून मूत्र शुष्क करितो तेव्हां वाताश्मरी, पित्तयुक्त मूत्र शुष्क करितो तेव्हां पित्ताश्मरी, कफयुक्त मूत्र शुष्क करितो तेव्हां कफाश्मरी व शुक्रयुक्त मूत्र शुष्क करितो तेव्हां शुक्राश्मरी उत्पन्न होते. जसें गाईच्या पित्तापासून गोरोचन होतें, तशी मूत्रापासून अश्मरी होते. या सर्व अश्मरी [ मुतखडा ] कफाश्रित आहेत [ कफ हा अश्मरीचा मूळ पाया होय ].

अथास्याः पूर्वलक्षणम् ॥ ७ ॥
बस्त्याध्मानं तदासन्नदेशेषु परितोऽतिरुक् ।
मूत्रे च बस्तगन्धत्वं मूत्रकृच्छ्रं ज्वरोऽरुचिः ॥ ८ ॥

मुतखडा होण्याच्या पूर्वी बस्ति फुगतो, त्याच्या सभोंवतीं जवळच्या जवळच्या भागीं अतिशय कळा लागतात, मुतास बोकडाच्या मुतासारखी घाण येते व मूत्रकृच्छ्र, ताप व अरुचि हे विकार होतात.

सामान्यलिङ्गं रुङ्नाभिसेवनीबस्तिमूर्धसु ।
विशीर्णधारं मूत्रं स्यात्तया मार्गनिरोधने ॥ ९ ॥
तद्व्यपायात्सुखं मेहेदच्छं गोमेदकोपमम् ।
तत्संक्षोभात् क्षते सास्रमायासाच्चातिरुग्भवेत् ॥ १० ॥

मुतखड्याचीं सामान्य लक्षणें अशीं असतात—नाभि, शिवण व बस्तीचें शिर यांत कळ लागते. मुतत असतां मुतखडा बस्तिमुखाजवळ आला म्हणजे धार दुभंगते व तो एकीकडे गेला म्हणजे सुखानें मुततो. मूत्र पातळ असून गोमेदासारखें (गोमेद म्हणून एक रत्न आहे) असतें. खडा बस्तींत इकडे तिकडे आपटला असतां आंत क्षत पडतें व रक्तमिश्रित मूत्र होतें; व श्रम केले असतां (उक्तस्थानीं) अतिशय वेदना होतात.

तत्र वाताद्भृशार्त्यर्तो दन्तान् खादति वेपते ।
मृद्गाति मेहनं नाभिं पीडयत्यनिशं क्वणन् ॥ ११ ॥
सानिलं मुञ्चति शकृन्मुहुर्मेहति बिन्दुशः ।
श्यावा रूक्षाऽश्मरी चास्य स्याच्चिता कण्टकैरिव ॥१२

वाताश्मरींत अतिशय तिडका लागल्यामुळें रोगी व्याकुळ होतो, दांत खातो, कांपतो, शिश्नाचें मर्दन करितो, बेंबी दाबितो, व दिवसभर कण्हतो, वातयुक्त मळ त्यास होतो, वारंवार थेंब थेंब मुततो, व खडा काळसर, रूक्ष व कांट्यांनीं युक्त असल्याप्रमाणें खरखरीत असतो.

पित्तेन दह्यते बस्तिः पच्यमान इवोष्मवान् ।
भल्लातकास्थिसंस्थाना रक्तपीतासिताऽश्मरी ॥ १३ ॥

पित्ताश्मरींत बस्तींत आग होते व तो शिजल्याप्रमाणें संतप्त असतो. खडा आकारानें बिब्यासारखा असून लाल, पिंवळा किंवा काळा असतो.

बस्तिर्निस्तुद्यत इव श्लेष्मणा शीतलो गुरुः ।
अश्मरी महती श्लक्ष्णा मधुवर्णाऽथवा सिता ॥ १४ ॥

कफाश्मरींत बस्तींत टोंचल्यासारखी वेदना होते व बस्ति जड व गार लागतो. खडा, मोठा गुळगुळीत असून मधाच्या रंगाचा किंवा पांढरा असतो.

एता भवन्ति बालानां तेषामेव च भूयसा ।
आश्रयोपचयाल्पत्वाद्ग्रहणाहरणे सुखाः ॥ १५ ॥

हे मुतखडे बहुधा मुलांस होतात व त्यांचा बस्ति व खडा लहान असल्यामुळें धरण्यास व बाहेर काढण्यास अधिक सुलभ पडतें.

शुक्राश्मरी तु महतां जायते शुक्रधारणात् ।
स्थानाच्च्युतममुक्तं हि मुष्कयोरन्तरेऽनिलः ॥ १६ ॥
शोषयत्युपसंगृह्य शुक्रं तच्छुष्कमश्मरी ।
बस्तिरुक्कृच्छ्रमूत्रत्वमुष्कश्वयथुकारिणी ॥ १७ ॥
तस्यामुत्पन्नमात्रायां शुक्रमेति विलीयते ।
पीडिते त्ववकाशेऽस्मिन्

शुक्राचा वेग धारण केल्यानें थोर पुरुषास शुक्राश्मरी होते. स्थानापासून निघालेलें शुक्र बाहेर न पडलें तर तें दोहों अंडांच्या मध्यभागीं वायु एकत्र जमवून सुकवितो व तें वाळून त्याचा खडा बनतो. त्यांत बस्तींत टोंचणी लागते, मूत्र मोठ्या कष्टानें होतें व अंड सुजतो व तो खडा ज्या जागीं जमतो तेथें शुक्र त्या खड्यास मिळतें व अशा क्रमानें तो खडा वाढतो.

अश्मर्येव च शर्करा ॥१८॥
अणुशो वायुना भिन्ना सात्वस्मिन्ननुलोमगे ।
निरेति सह मूत्रेण प्रतिलोमे विबध्यते ॥ १९ ॥

शर्करा म्हणजे जिचे वायूनें बारीक तुकडे झाले आहेत, अशी अश्मरीच होय. तो अनुलोम असला म्हणजे ती मूत्राबरोबर बाहेर येते व तोच प्रतिलोम असला म्हणजे अडकते.

मूत्रसन्धारिणः कुर्याद्रुद्ध्वा बस्तेर्मुखं मरुत् ।
मूत्रसङ्गं रुजं कण्डूं कदाचिच्च स्वधामतः ॥ २० ॥
प्रच्याव्य बस्तिमुद्वृत्तं गर्भाभं स्थूलविप्लुतम् ।
करोति तत्र रुग्दाहस्पन्दनोद्वेष्टनानि च ॥ २१ ॥
बिन्दुशश्च प्रवर्तेत मूत्रं बस्तौ तु पीडिते ।
धारया द्विविधोऽप्येष वातबस्तिरिति स्मृतः ॥ २२ ॥
दुस्तरो दुस्तरतरो द्वितीयः प्रबलानिलः ।

मूत्राचा अवरोध करणाऱ्या मनुष्याच्या बस्तीचें तोंड वायु बंद करून आंत मूत्र कोंडितो व बस्तीस वेदना व कंडू उत्पन्न करितो. कधीं कधीं तर बस्तीस आपल्या स्थानापासून चाळवून वर उचलतो व तो गर्भाप्रमाणें मोठा झाल्यामुळें पोट गर्भिणीसारखें दिसतें, व तो तरंगल्यासारखा चंचळ होतो व तेथें टोंचणी लागते, [ बस्तींत ] दाह होतो, बस्ति कांपतो व पिळवटल्यासारखा होतो, थेंब थेंब मूत येतें व बस्ति दाबला असतां मात्र धार येते. या दोहींस वातबस्ति असें म्हणतात. पहिला प्रकार दुःसाध्य आहे व दुसरा फारच दुःसाध्य आहे व त्यांत वायु प्रबळ असतो.

शकृन्मार्गस्य बस्तेश्च वायुरन्तरमाश्रितः ॥ २३ ॥
अष्ठीलाभं घनं ग्रन्थिं करोत्यचलमुन्नतम् ।
वाताष्ठीलेति साऽऽध्मानविण्मूत्रानिलसङ्गकृत् २४

गुद व बस्ति यांच्यामध्यें वायु राहून फणसाच्या आंठोळीसारखा कठिण, स्थिर व उचललेला ग्रंथि उत्पन्न करितो त्यास वाताष्ठीला असें म्हणतात, त्यांत पोट फुगतें व मळ, मूत्र व वायु यांचा अवरोध होतो.

विगुणः कुण्डलीभूतो बस्तौ तीव्रव्यथोऽनिलः ।
आविश्य मूत्रं भ्रमति सस्तम्भोद्वेष्टगौरवः ॥ २५ ॥
मूत्रमल्पाल्पमथवा विमुञ्चति शकृत्सृजन् ।
वातकुण्डलिकेत्येषा

वायूची गति उलट होऊन तो बस्तींत अतिशय वेदना करीत मूत्रांत शिरून इकडे तिकडे कुंडलाकार फिरतो व मलमूत्रांचा अवरोध व बस्तींत पिळवटल्यासारखी वेदना होते व बस्ति जड होतो व मूत्र थोडथोडें होतें किंवा मुततांना मल होतो. या विकारास वातकुंडलिका असें म्हणतात.

मूत्रं तु विधृतं चिरम् ॥ २६ ॥
न निरेति विबद्धं वा मूत्रातीतं तदल्परुक् ।

फार वेळ मूत्र कोंडलें असतां बाहेर येत नाहीं व कदाचित् आलें तर अडत अडत येतें व वेदनाहि फार नसते त्यास मूत्रातीत असें म्हणतात.

विधारणात्प्रतिहतं वातोदावर्तितं यदा ॥ २७ ॥
नाभेरधस्तादुदरं मूत्रमापूरयेत्तदा ।
कुर्यात्तीव्ररुगाध्मानमपक्तिमलसङ्ग्रहम् ॥ २८ ॥
तन्मूत्रजठरं

मूत्राचा अवरोध केल्यामुळें तुंबलेलें व वायूनें परत मागें फिरविलेलें मूत्र ज्या वेळीं बेंबीच्याखालीं पोट [ बस्तीस ] फुगवितें व आंत भयंकर वेदना, पोट फुगणें, अन्न पचन न होणें व मळाचा अवरोध हीं लक्षणें होतात तेव्हां त्यास मूत्रोदर असें म्हणतात.

छिद्रवैगुण्येनानिलेन वा ।
आक्षिप्तमल्पं मूत्रं तु बस्तौ नालेऽथवा मणौ ॥ २९ ॥
स्थित्वा स्रवेच्छनैः पश्चात्सरुजं वाऽथवाऽरुजम् ।
मूत्रोत्सङ्गः स विच्छिन्नतच्छेषगुरुशेफसः ॥ ३० ॥

मूत्रवाहक छिद्रांच्या विकृतीमुळें [ त्यांत कोणत्याहि तऱ्हेनें मूत्राच्या गतीस हरकत आल्यामुळें ] किंवा वायूंत, बस्तींत, नळींत किंवा मण्यांत थोडथोडेंच आलेलें मूत्र राहून राहून कांहीं कांहीं वेळानें हळू हळू स्रवतें व त्या वेळीं तिडीक येते किंवा येत नाहीं व मूत्र अडकत अडकत होऊन कांहीं शिस्नांत शिल्लक राहतें, त्यामुळें शिस्न जड होतें; या विकारास मूत्रोत्संग असें म्हणतात.

अन्तर्बस्तिमुखे वृत्तः स्थिरोऽल्पः सहसा भवेत् ।
अश्मरीतुल्यरुग्ग्रन्थिर्मूत्रग्रन्थिः स उच्यते ॥ ३१ ॥

बस्तीच्या तोंडांत लहान, वाटोळा व स्थिर असा एकाएकीं ग्रंथि उत्पन्न होतो. त्यास मूत्रग्रंथि म्हणतात व त्यांत मुतखड्याप्रमाणें वेदना असतात.

मूत्रितस्य स्त्रियं यातो वायुना शुक्रमुद्धतम् ।
स्थानाच्च्युतं मूत्रयतः प्राक् पश्चाद्वा प्रवर्तते ॥ ३२ ॥
भस्मोदकप्रतीकाशं मूत्रशुक्रं तदुच्यते ।

मूत्राचा वेग आला असतां जो पुरुष स्त्रीशीं गमन करितो त्याचें स्थानापासून च्युत होऊन वायूनें फेंकलेलें शुक्र मूत्रांत मिसळून राख कालविलेल्या पाण्याच्या रंगासारखें मुतते वेळीं प्रथम किंवा शेवटीं बाहेर येतें, त्यास मूत्रशुक्र असें म्हणतात.

रूक्षदुर्बलयोर्वातादुदावृत्तं शकृद्यदा ॥ ३३ ॥
मूत्रस्रोतोऽनुपर्येति संसृष्टं शकृता तदा ।
मूत्रं विट्तुल्यगन्धं स्याद्विड्विघातं तमादिशेत् ॥ ३४ ॥

रूक्ष व दुर्बल पुरुषाचें वायूनें कोंडलेलें पुरीष ज्या वेळीं मूत्रस्रोतांत येऊन मूत्राशीं मिसळतें त्या वेळीं मूत्रास मळासारखी घाण येते. या विकारास विड्विघात असें म्हणतात.

पित्तं व्यायामतीक्ष्णोष्णभोजनाध्वातपादिभिः ।
प्रवृद्धं वायुना क्षिप्तं बस्त्युपस्थातिदाहवत् ॥ ३५ ॥
मूत्रं प्रवर्तयेत्पीतं सरक्तं रक्तमेव वा ।
उष्णं पुनः पुनः कृच्छ्रादुष्णवातं वदन्ति तम् ॥ ३६ ॥

व्यायाम, तीक्ष्ण व उष्ण भोजन, मार्ग चालणें, उन्हांत हिंडणें इत्यादि कारणांनीं कुपित झालेल्या पित्तास वायूची प्रेरणा झाली असतां त्यामुळें वस्ति व गुह्येंद्रिय यांत दाह व तिडका लागतात व वारंवार मोठ्या दुःखानें उष्ण, पिंवळें, रक्तयुक्त असें मूत्र होतें, किंवा रक्तच पडतें. या विकारास उष्णवात असें म्हणतात.

रूक्षस्य क्लान्तदेहस्य बस्तिस्थौ पित्तमारुतौ ।
मूत्रक्षयं सरुग्दाहं जनयेतां तदाह्वयम् ॥ ३७ ॥

रूक्ष व थकलेल्या मनुष्याच्या बस्तींतील पित्त व वायु दाह व कळा यांनीं युक्त असा मूत्राचा क्षय करितात, त्या विकारास मूत्रक्षय असें म्हणतात.

पित्तं कफो द्वावपि वा संहन्येतेऽनिलेन च ।
कृच्छ्रान्मूत्रं तदा पीतं रक्तं श्वेतं घनं सृजेत् ॥ ३८ ॥
सदाहं रोचनाशङ्खचूर्णवर्णं भवेच्च तत् ।
शुष्कं समस्तवर्णं वा मूत्रसादं वदन्ति तम् ॥ ३९ ॥

पित्त व कफ किंवा दोन्हीहि वायूशीं मिश्रित झाले असतां मोठ्या दुःखानें मूत्र पिंवळें, लाल, पांढरें, दाट असें पडतें व दाहहि असतो, आणि मूत्र गोरोचन, शंख किंवा चुना यांच्या रंगासारखें होतें किंवा वाळल्यावर सर्व रंगांचें होतें. ह्या विकारास मूत्रसाद म्हणतात.

इति विस्तरतः प्रोक्ता रोगा मूत्राप्रवृत्तिजाः ।
निदानलक्षणैरूर्ध्वं वक्ष्यन्तेऽतिप्रवृत्तिजाः ॥ ४० ॥

याप्रमाणें मूत्राची प्रवृत्ति न झाल्यानें होणारे रोग विस्तारानें सांगितले, व मूत्राच्या जास्त प्रवृत्तीपासून होणाऱ्या विकारांचीं कारणें व लक्षणें हीं पुढें सांगितलीं जातील.

---

# दशमोऽध्यायः

## अध्याय १० वा

### अथातो प्रमेहनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां प्रमेहाचें निदान सांगतों.

प्रमेहा विंशतिस्तत्र श्लेष्मतो दश पित्ततः ।
षट् चत्वारोऽनिलात्

प्रमेह वीस प्रकारचे आहेत; त्यांत कफापासून दहा, पित्तापासून सहा व वातापासून चार.

तेषां मेदोमूत्रकफावहम् ॥ १ ॥
अन्नपानक्रियाजातं यत्प्रायस्तत्प्रवर्तकम् ।
स्वाद्वम्ललवणस्निग्धगुरुपिच्छिलशीतलम् ॥ २ ॥
नवधान्यसुरानूपमांसेक्षुगुडगोरसम् ।
एकस्थानासनरतिः शयनं विधिवर्जितम् ॥ ३ ॥

त्या प्रमेहांचीं कारणें—मेद, मूत्र व कफ यांस करणारें अन्न, पान, क्रिया इत्यादि प्रकार जसें, गोड, आंबट, खारट, स्निग्ध, जड, चिकट व थंड पदार्थ आणि नवें धान्य, सुरा, आनूपमांस, ऊंस, गूळ, दूध, दहीं, तसेंच एकाच जागीं फार वेळ बसणें व शास्त्रांत सांगितलेले नियम सोडून निजणें.

बस्तिमाश्रित्य कुरुते प्रमेहान् दूषितः कफः ।
दूषयित्वा वपुःक्लेदस्वेदमेदोरसामिषम् ॥ ४ ॥

दुष्ट झालेला कफ बस्तीचा आश्रय करून, शरीरसंबंधीं क्लेद, मेद, रस व मांस यांस दुष्ट करून प्रमेह उत्पन्न करितो.

पित्तं रक्तमपि क्षीणे कफादौ मूत्रसंश्रयम् ।

( वरील ) कफादि पदार्थ क्षीण असतां कुपित झालेलें पित्त त्यांना व रक्तासहि दुष्ट करून मूत्रांत राहून मेह उत्पन्न करितें.

धातून् बस्तिमुपानीय तत्क्षयेऽपि च मारुतः ॥ ५ ॥

धातूंचा क्षय झाला असतां [ किंवा झाला नसल्यास करून ] त्यांस बस्तींत नेऊन वायु प्रमेह उत्पन्न करितो.

साध्ययाप्यपरित्याज्या मेहास्तेनैव तद्भवाः ।
समासमक्रियतया महात्ययतयापि च ॥ ६ ॥

यामुळेंच [ वरील संप्राप्तिक्रम एकापेक्षां एक भयंकर असल्यामुळें ] कफजन्य मेह साध्य, पित्तजन्य याप्य व वातजन्य असाध्य, तसेंच

कफमेहावर क्रिया सम* असल्यामुळें, पित्तमेहावर विरुद्ध क्रिया असल्यामुळें [ पित्त उष्ण आहे व कफादि धातु क्षीण होतात, ते शीतवीर्य आहेत म्हणून ] आणि वातमेहांत धातूंचा अतिशय नाश होत असतो म्हणूनहि ते अनुक्रमें साध्य, याप्य व असाध्य आहेत.

**सामान्यं लक्षणं तेषां प्रभूताविलमूत्रता ।**

त्यांचें सामान्य लक्षण म्हटलें म्हणजे मूत्र पुष्कळ व गढूळ होणें

**दोषदूष्याविशेषेऽपि तत्संयोगविशेषतः ॥ ७ ॥**
**मूत्रवर्णादिभेदेन भेदो मेहेषु कल्प्यते ।**

कफजन्य, पित्तजन्य व वातजन्य मेहाचे अनेक भेद आहेत व जरी प्रत्येक जातीच्या सर्व भेदांत दोष व दूष्यें सारखींच असतात, तरी त्यांच्या संयोगविशेषानें मूत्राचे वास व रंग इत्यादिकांचे जे भेद होतात त्यांवरून त्यांचे अनुक्रमें दहा, सहा व चार असे भेद केले जातात.

**अच्छं बहु सितं शीतं निर्गन्धमुदकोपमम् ॥ ८ ॥**
**मेहत्युदकमेहेन किञ्चिच्चाविलपिच्छिलम् ।**

उदकमेहांत मूत्र स्वच्छ, पुष्कळ, पांढरें, थंड, निर्गंध, पाण्यासारखें, किंचित् गढूळ व चिकट असें असतें.

**इक्षो रसमिवात्यर्थं मधुरं चेक्षुमेहतः ॥ ९ ॥**

इक्षुमेहांत उंसाच्या रसासारखें व अतिशय गोड मूत्र असतें.

**सान्द्रीभवेत्पर्युषितं सान्द्रमेही प्रमेहति ।**

सांद्रमेह झालेल्या मनुष्याचें मूत्र दुसऱ्या दिवशीं दाट होतें.

**सुरामेही सुरातुल्यमुपर्यच्छमधोघनम् ॥ १० ॥**

सुरामेहांत मूत्र सुरेसारखें वर पातळ व खालीं दाट असतें.

**सहृष्टरोमा पिष्टेन पिष्टवद्बहलं सितम् ।**

पिष्टमेहांत पीठ कालविलेल्या पाण्यासारखें दाट व पांढरें मुततो व मुततेवेळीं अंगावर कांटा येतो.

**शुक्राभं शुक्रमिश्रं वा शुक्रमेही प्रमेहति ॥ ११ ॥**

शुक्रमेहांत शुक्राच्या वर्णाचें किंवा शुक्रमिश्रित मूत्र होतें.

**मूर्त्तेऽणून् सिकतामेही सिकतारूपिणो मलान् ।**

ज्यास सिकतामेह झाला आहे त्याच्या मूत्रांत बारीक वाळूसारखे मलाचे कण असतात.

**शीतमेही सुबहुशो मधुरं भृशशीतलम् ॥ १२ ॥**

शीतमेहांत फार वेळां, गोड व अतिशय मुततो.

**शनैः शनैः शनैर्मेही मन्दं मन्दं प्रमेहति ।**

शनैर्मेहांत वारंवार थोडथोडें मुततो.

**लालातन्तुयुतं मूत्रं लालमेहेन पिच्छिलम् ॥ १३ ॥**

लालामेहांतील मूत्रांत कफाचे तंतु असून तें बुळबुळीत असतें.

**गन्धवर्णरसस्पर्शैः क्षारेण क्षारतोयवत् ।**

क्षारमेहांतील मूत्राचा वास, रंग, रुचि व स्पर्श हीं क्षाराच्या पाण्या ( ३० अध्यायांतील ) प्रमाणें असतात.

**नीलमेहेन नीलाभं**

नीलमेहांत निळीसारखें मूत्र असतें.

**कालमेही मषीनिभम् ॥ १४ ॥**

कालमेहांत शाईसारखें मुततो.

**हारिद्रमेही कटुकं हरिद्रासन्निभं दहत् ।**

हारिद्रमेहांत तिखट, हळदीप्रमाणें पिंवळें मुततो व मुततांना आग होते.

**विस्रं माञ्जिष्ठमेहेन मञ्जिष्ठासलिलोपमम् ॥ १५ ॥**

मंजिष्ठमेहांत मंजिष्ठाच्या काढ्यासारखें लाल व घाणेरें मूत्र असतें

**विस्रमुष्णं सलवणं रक्ताभं रक्तमेहतः ।**

रक्तमेहांत रक्तासारखें लाल, किंचित् खारट व उष्ण असें मुततो व मूत्रास अंबूस घाण येते.

**वसामेही वसामिश्रं वसां वा मूत्रयेन्मुहुः ॥ १६ ॥**

वसामेह झालेला मनुष्य वारंवार वसायुक्त मुततो किंवा वसाच मुततो.

**मज्जानं मज्जमिश्रं वा मज्जामेही मुहुर्मुहुः ।**

मज्जामेहांत मज्जा किंवा मज्जायुक्त वारंवार मुततो.

**हस्ती मत्त इवाजस्रं मूत्रं वेगविवर्जितम् ॥ १७ ॥**
**सलसीकं विबद्धं च हस्तिमेही प्रमेहति ।**

हस्तिमेह झालेला मनुष्य माजलेल्या हत्तीप्रमाणें एकसारखें, वेग न येतां, लसयुक्त ( कफयुक्त ) व अडत अडत मुततो.

**मधुमेही मधुसमं**

मधुमेहांत मधासारखें मूत्र होतें.

**जायते स किल द्विधा ॥ १८ ॥**

**क्रुद्धे धातुक्षयाद्वायौ दोषावृतपथेऽथवा ।**

मधुमेह दोन प्रकारांनीं होतो; एक धातुक्षय झाल्यानें वायु

---

* 'कफमेहावर क्रिया सम व पित्तमेहावर विरुद्ध असल्यामुळें' असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ असा कीं, कफमेहांत दूष्य ( क्लेद, मेद, रस इ० ) व दोष ( कफ, एकजातीय असल्यामुळें अपतर्पण किंवा रूक्षण क्रिया दोहोंवराहि सारखीच उपयोगी पडते; परंतु पित्तमेहांत पित्त हा जो दोष तो दूष्य जे क्लेदादिक त्यांच्याशीं विरुद्ध गुणांचा असल्यामुळें शीत, मधुर इ० जें पित्तावर चांगलें तें क्लेदमूत्रादिकांना वाढविणारें व जें यांना कमी करणारें तें पित्ताला वाढविणारें असें असल्यामुळें विरुद्ध क्रियेचा प्रसंग येतो, म्हणून कफमेह साध्य व पित्तमेह याप्य. ही जी विरुद्ध क्रिया ती वायूच्या संबंधानेंहि आहे हें भाषांतरांतील शेवटचें वाक्य बारकाईनें वाचणारांच्या लक्षांत येईल; कारण वातजन्य मेहाचे असाध्यत्वास धातूंचा अतिशय नाश हें कारण सांगून पुढें 'म्हणूनहि' असें म्हटलें आहे. त्यावरून धातूंचा नाश हें एकच कारण नव्हे तर संप्राप्तीचा प्रकार व विरुद्ध क्रिया हींहि आणखी कारणें आहेत हें सहज लक्षांत येईल. येथें असाध्य शब्दाचा अर्थ परित्याज्य असाच समजावा. संस्कृतांत याप्य हाहि जरी असाध्याचाच एक प्रकार धरला आहे तरी भाषांतरांत आम्हीं असाध्य शब्द नेहमींच्या मराठी अर्थाप्रमाणें परित्याज्य या अर्थींच वापरला आहे.

कुपित होऊन व दुसरा प्रकार दोषांनीं वायूचा मार्ग बंद केल्यामुळे वायु कुपित होऊन होतो.

**आवृतो दोषलिङ्गानि सोऽनिमित्तं प्रदर्शयेत् ॥ १९ ॥**
**क्षीणः क्षणात्क्षणात्पूर्णो भजते कृच्छ्रसाध्यताम् ।**

वायु आवृत झाला असता तीं तीं दोषचिन्हें एकाएकीं दिसूं लागतात, व तो क्षणांत कमी होतो व क्षणांत वाढतो व यामुळें तो कष्टसाध्य आहे.

**कालेनोपेक्षिताः सर्वे यान्ति मधुमेहताम् ॥ २० ॥**
**मधुरं यच्च सर्वेषु प्रायो मध्विव मेहति ।**
**सर्वेऽपि मधुमेहाख्या माधुर्याच्च तनोरतः ॥ २१ ॥**

हयगय केली असतां सर्वच मेह कांहीं दिवसांनीं मधुमेहाची अवस्था पावतात म्हणून, सर्व मेहांत मूत्र गोड असून बहुधा मधासारखेंच असतें म्हणून, व त्या मनुष्याचें शरीर व्याधि-स्वभावाच्या योगानें मधुर असल्यामुळें सर्व मेहांसहि मधुमेह अशी संज्ञा आहे.

**अविपाकोऽरुचिश्छर्दिर्निद्रा कासः सपीनसः ।**
**उपद्रवाः प्रजायन्ते मेहानां कफजन्मनाम् ॥ २२ ॥**

अन्नाचें पचन न होणें, अरुचि, वांति, झोंप फार येणें, खोकला व पडसें हे कफमेहांचे उपद्रव आहेत.

**बस्तिमेहनयोस्तोदो मुष्कावदरणं ज्वरः ।**
**दाहस्तृष्णाम्लको मूर्च्छा विड्भेदः पित्तजन्मनाम् ॥ २३ ॥**

बस्तींत व शिस्नांत टोंचणी, अंड फाटल्यासारखा वाटणें, ताप, दाह, तहान, आंबट ढेंकरा, मूर्च्छा व जुलाब होणें हे पित्तमेहाचे उपद्रव आहेत.

**वातिकानामुदावर्तकण्ठहृद्ग्रहलोलताः ।**
**शूलमुन्निद्रता शोषः कासः श्वासश्च जायते ॥ २४ ॥**

मळ व वायु कोंडणें, घसा व हृदय धरणें, अस्वस्थता, शूल, झोंप न येणें, शोष, खोकला व दमा हे वातमेहांचे उपद्रव आहेत.

**शराविका कच्छपिका जालिनी विनताऽलजी ।**
**मसूरिका सर्षपिका पुत्रिणी सविदारिका ॥ २५ ॥**
**विद्रधिश्चेति पिटिकाः प्रमेहोपेक्षया दश ।**
**सन्धिमर्मसु जायन्ते मांसलेषु च धामसु ॥ २६ ॥**

प्रमेहाची उपेक्षा केल्यानें, सांध्यावर, मर्मांवर व मांसल भागांवर, शराविका, कच्छपिका, जालिनी, विनता, अलजी, मसूरिका, सर्षपिका, पुत्रिणी, विदारिका, आणि विद्रधि अशा या दहा प्रकारच्या पिटिका होतात.

**अन्तोन्नता मध्यनिम्ना श्यावा क्लेदरुजान्विता ।**
**शरावमानसंस्थाना पिटिका स्याच्छराविका ॥ २७ ॥**

कडा उंच असून मध्यें खोलगट, काळीसांवळी, क्लेदयुक्त व वेदनायुक्त, शरावाच्या ( लहानशी पंती, गुजराथी कोज्या ) प्रमाणाची व आकाराची जी पिटिका तिला शराविका असें म्हणतात.

**अवगाढार्तिनिस्तोदा महावस्तुपरिग्रहा ।**
**श्लक्ष्णा कच्छपपृष्ठाभा पिटिका कच्छपी मता ॥ २८ ॥**

जिच्यांत कळ व ठुसठुस हीं खोल असतात व जिचा विस्तार मोठा असून जी जाड असते व गुळगुळीत असून जी कासवाच्या पाठीसारखी असते तिला कच्छपिका असें म्हणतात.

**स्तब्धा सिराजालवती स्निग्धास्रावा महाशया ।**
**रुजानिस्तोदबहुला सूक्ष्मच्छिद्रा च जालिनी ॥ २९ ॥**

ताठर असून जीवर सिरांचीं जाळीं असतात, जींतून स्निग्ध स्राव होतो, जिचा आशय मोठा असतो, वेदना व ठणका फार असतो व जीवर बारीक बारीक भोंकें असतात तिला जालिनी म्हणतात.

**अवगाढरुजाऽक्लेदा पृष्ठे वा जठरेऽपि वा ।**
**महती पिटिका नीला विनता विनता स्मृता ॥ ३० ॥**

जींत वेदना खोल असतात व क्लेद नसतो, जी पाठीवर किंवा पोटावर होते व जी मोठी, निळी व चपटी असते तिला विनता असें म्हणतात.

**दहति त्वचमुत्थाने भृशं कष्टा विसर्पिणी ।**
**रक्तकृष्णातितृट्स्फोटदाहमोहज्वराऽलजी ॥ ३१ ॥**

उत्पन्न होतांना त्वचेचा अतिशय दाह करिते, फार दुःखदायक असून जी पसरते, लाल व काळी असते व जी झाली असतां अतिशय तहान, फोड, दाह, मोह व ज्वर हे विकार असतात तिला अलजी असें म्हणतात.

**मानसंस्थानयोस्तुल्या मसूरेण मसूरिका ।**

जिचें प्रमाण व आकार मसुरेसारखा असतो तिला मसूरिका म्हणतात.

**सर्षपामानसंस्थाना क्षिप्रपाका महारुजा ॥ ३२ ॥**
**सर्षपा सर्षपातुल्यपिटिकापरिवारिता ।**

जिचें प्रमाण व आकार मोहरीप्रमाणें असतो, जिचा पाक लवकर होतो व जींत वेदना फार होते आणि जिच्या सभोंवतीं मोहरीसारख्या पुष्कळ पुळ्या असतात त्या पिटिकेस सर्षपा म्हणतात.

**पुत्रिणी महती भूरिसुसूक्ष्मपिटिकावृता ॥ ३३ ॥**

जी मोठी असून तीवर बारीक बारीक अतिशय पुळ्या असतात तिला पुत्रिणी असें म्हणतात.

**विदारीकन्दवद्वृत्ता कठिना च विदारिका ।**

जी पिटिका भुइकोहळ्यासारखी वाटोळी व कठिण असते तिला विदारिका म्हणतात.

**विद्रधिर्वक्ष्यतेऽन्यत्र**

विद्रधि नांवाची पिटिका पुढें दुसऱ्या ठिकाणीं सांगितली जाईल.

**तत्राद्यं पिटिकात्रयम् ॥ ३४ ॥**
**पुत्रिणी च विदारी च दुःसहा बहुमेदसः ।**

त्यांत पहिल्या तीन( शराविका, कच्छपिका व जालिनी ), पुत्रिणी व विदारिका या मेदस्वी पुरुषास होतात, व त्या दुःसह असतात.

सद्यः पित्तोल्बणास्त्वन्याः सम्भवन्त्यल्पमेदसः ॥३५॥

बाकीच्या पित्ताधिक असून ज्याच्या अंगांत मेद कमी आहे त्यास त्या होतात व ह्या मनुष्याच्यानें सोसवतात.

तासु मेहवशाच्च स्याद्दोषोद्रेको यथायथम्।

त्या पिटिकांत मेहानुसारानें दोषांचें आधिक्य असतें.

प्रमेहेण विनाप्येता जायन्ते दुष्टमेदसः ॥ ३६ ॥
तावच्च नोपलक्ष्यन्ते यावद्वस्तुपरिग्रहः।

ज्यांचा मेद दुष्ट झाला आहे अशा मनुष्यांस या पिटिका प्रमेहावांचूनहि होतात, व त्या शरीराचा कांहीं एक भाग व्यापीपर्यंत समजण्यांत येत नाहींत.

हारिद्रवर्णं रक्तं वा मेहप्राग्रूपवर्जितम् ॥ ३७ ॥
यो मूत्रयेन्न तं मेहं रक्तपित्तं तु तद्विदुः।

मेहाच्या पूर्वरूपावांचून जर कोणास पिंवळें किंवा लाल मूत्र होईल तर त्यास मेह असें न म्हणतां रक्तपित्त म्हणावें.

स्वेदोऽङ्गगन्धः शिथिलत्वमङ्गे
शय्यासनस्वप्नसुखाभिषङ्गः।
हृन्नेत्रजिह्वाश्रवणोपदेहो
घनाङ्गता केशनखातिवृद्धिः ॥ ३८ ॥
शीतप्रियत्वं गलतालुशोषो
माधुर्यमास्ये करपाददाहः।
भविष्यतो मेहगणस्य रूपं
मूत्रेऽभिधावन्ति पिपीलिकाश्च ॥ ३९ ॥

घाम येणें, अंगास घाण येणें, अंग शिथिल होणें, निजून रहावें, बसून रहावें व झोंप घ्यावी असें वाटणें, हृदय, डोळे, जीभ व कान यांस चिकटा, अंग जड होणें, केंस व नखें अतिशय वाढणें, थंड प्रकार आवडणें, घसा व टाळू यांस कोरड, तोंड गोड होणें, हातापायांची आग होणें व मुतास मुंग्या येणें हीं लक्षणें झालीं असतां प्रमेह होणार असें समजावें.

दृष्ट्वा प्रमेहं मधुरं सपिच्छं
मधूपमं स्याद्विविधो विचारः।
सन्तर्पणाद्वा कफसम्भवः स्यात्
क्षीणेषु दोषेष्वनिलात्मको वा ॥ ४० ॥

मधुर, बुळबुळीत व मधासारखा मेह पाहून हा मेह बृंहणानें कफापासून झालेला आहे किंवा दोष क्षीण झाल्यामुळें वायूपासून झाला आहे असा दोन प्रकारचा विचार मनांत येईल.

सपूर्वरूपाः कफपित्तमेहाः
क्रमेण ये वातकृताश्च मेहाः।
साध्या न ते पित्तकृतास्तु याप्याः
साध्यास्तु मेदो यदि नाति दुष्टम् ॥ ४१ ॥

कफमेहांत व पित्तमेहांत सर्व पूर्वरूपें झालीं असतील तर ते असाध्य होत व क्रमानें वातमेहांत परिणाम पावणारे असतील तरहि ते असाध्यच. पित्तमेह जरी याप्य आहेत तरी मेद जर अतिशय दुष्ट झाला नसेल तर साध्य होतात.

---

# एकादशोऽध्यायः

## अध्याय ११ वा.

अथातो विद्रधिवृद्धिगुल्मनिदानं व्याख्यास्यामः।

आतां विद्रधि, वृद्धि व गुल्म यांचें निदान सांगतों.

भुक्तैः पर्युषितात्युष्णरूक्षशुष्कविदाहिभिः।
जिह्मशय्याविचेष्टाभिस्तैस्तैश्चासृक्प्रदूषणैः॥ १ ॥
दुष्टं त्वङ्मांसमेदोऽस्थिस्नावासृक्कण्डराश्रयः।
यः शोफो बहिरन्तर्वा महामूलो महारुजः॥ २ ॥
वृत्तः स्यादायतो यो वा स्मृतः षोढा स विद्रधिः
दोषैः पृथक् समुदितैः शोणितेन क्षतेन च ॥ ३ ॥

शिळें, अतिऊष्ण, रूक्ष, शुष्क व विदाही पदार्थ खाल्यानें, वेड्यावांकड्या शय्येवर निजल्यानें, वेड्यावांकड्या चेष्टा केल्यानें व त्या त्या रक्तदूषित करणाऱ्या कारणांनीं त्वचा, मांस, मेद, अस्थि, स्नायु, रक्त व कंडरा यांत बाहेरच्या बाजूस किंवा आंतल्या बाजूस जो शोफ येतो त्यास विद्रधि असें म्हणतात. तो फार खोल गेलेला असतो व त्यांत वेदना फारच होतात आणि तो वाटोळा किंवा लांबोडा असतो. हा सहा प्रकारचा आहे—वातविद्रधि, पित्तविद्रधि, कफविद्रधि, सन्निपातविद्रधि, रक्तविद्रधि व क्षतविद्रधि.

बाह्योऽत्र तत्र तत्राङ्गे दारुणो ग्रथितोन्नतः।
आन्तरो दारुणतरो गम्भीरो गुल्मवद्घनः ॥ ४ ॥
वल्मीकवत्समुच्छ्रायी शीघ्रघात्यग्निशस्त्रवत्।

त्या त्या जागीं उत्पन्न होऊन भयंकर, गांठाळलेला व उंच जो असतो तो बाह्यविद्रधि व जो फारच भयंकर, खोल, गुल्माप्रमाणें कठिण, वारुळासारखा वर उचललेला व अग्नि आणि शस्त्र यांप्रमाणें फार लवकर घात करणारा तो अंतर्विद्रधि होय.

नाभिबस्तियकृत्प्लीहक्लोमहृत्कुक्षिवङ्क्षणे ॥ ५ ॥
स्याद्वृक्कयोरपाने च

बेंबी, बस्ति, यकृत्, प्लीहा, क्लोम, हृदय, कुशी, अंडसंधी, वृक्क (मूत्रपिंड) व गुद या जागीं विद्रधि होतात.

वातात्तत्रातितीव्ररुक्।
श्यावारुणश्चिरोत्थानपाको विषमसंस्थितः॥ ६ ॥
व्यधच्छेदभ्रमानाहस्पन्दसर्पणशब्दवान्।

वातविद्रधींत अतिशय तीव्र वेदना असतात; विद्रधि काळसर व तांबडा असतो; तो उत्पन्न होण्यास व पिकण्यास फार दिवस

लागतात व उंचसखल असतो व आंत टोंचल्यासारखी व कापल्यासारखी पीडा होते; भ्रम, पोट फुगणें हे विकार असतात; विद्रधीवर बोट ठेविलें असतां तो उडतो व पसरतो आणि आंत शब्द होतो.

रक्तताम्रासितः पित्तात्तृण्मोहज्वरदाहवान् ॥ ७ ॥
क्षिप्रोत्थानप्रपाकश्च

पित्तविद्रधि लाल, तांबडा व काळा असतो. तहान, मोह, ज्वर व दाह हे विकार असतात; व त्याची उत्पत्ति आणि पाक लवकर होतात.

पाण्डुः कण्डूयुतः कफात् ।
सोत्क्लेशशीतकस्तम्भजृम्भारोचकगौरवः ॥ ८ ॥
चिरोत्थानविदाहश्च

कफविद्रधि पांडुरवर्ण असून त्यास कंड फार असते व त्याची उत्पत्ति व पाक हीं फार वेळानें होतात. उत्क्लेश (उम्हासे), थंडी वाजणें, अंग ताठणें, जांभया, अरुचि व अंग जड होणें हीं लक्षणें होतात.

सङ्कीर्णः सन्निपाततः ।

सन्निपातविद्रधींत सर्व लक्षणें असतात.

सामर्थ्याच्चात्र विभृशेद्बाह्याभ्यन्तरलक्षणम् ॥ ९ ॥

विद्रधींच्या जोरावरून तो बाह्य आहे किंवा आभ्यंतर आहे हें पाहावें.

कृष्णस्फोटावृतः श्यावस्तीव्रदाहरुजाज्वरः ।
पित्तलिङ्गोऽसृजा बाह्यः स्त्रीणामेव तथान्तरः ॥ १० ॥

रक्तविद्रधि काळसर असून त्यावर काळे फोड असतात, त्यांत दाह, रुजा व ज्वर हीं तीव्र असतात, व पित्ताचीं लक्षणें असतात. हा रक्तविद्रधि पुरुषास बाहेर होतो व आंत स्त्रियांसच होतो.

शस्त्राद्येनाभिघातेन क्षते वाऽपथ्यकारिणः ।
क्षतोष्मा वायुविक्षिप्तः सरक्तं पित्तमीरयन् ॥ ११ ॥
पित्तासृग्लक्षणं कुर्याद्विद्रधिं भूर्युपद्रवम् ।

क्षत झालें असतां त्यास शस्त्रादिकांचा आघात लागून किंवा अपथ्य होऊन व्रणसंबंधीं उष्मा वायूनें बाहेर फेंकला जातो व रक्त व पित्त यास कुपित करून जो विद्रधि उत्पन्न करतो त्यास क्षतविद्रधि म्हणतात. याचीं लक्षणें पित्तविद्रधि व रक्तविद्रधि यांच्यासारखीं असतात व त्याचे उपद्रव फार असतात.

तेषूपद्रवभेदश्च स्मृतोऽधिष्ठानभेदतः ॥ १२ ॥
नाभ्यां हिध्मा भवेद्बस्तौ मूत्रं कृच्छ्रेण पूति च ।
श्वासो यकृति रोधस्तु प्लीह्न्युच्छ्वासस्य तृट् पुनः ॥ १३ ॥
गलग्रहश्च क्लोम्नि स्यात् सर्वाङ्गप्रग्रहो हृदि ।
प्रमोहस्तमकः कासो हृदये घट्टनं व्यथा ॥ १४ ॥
कुक्षिपार्श्वान्तरांसार्तिः कुक्षावाटोपजन्म च ।
सक्थ्नोर्ग्रहो वङ्क्षणयोर्वृक्कयोः कटिपृष्ठयोः ॥ १५ ॥
पार्श्वयोश्च व्यथा पायौ पवनस्य निरोधनम् ।

नाभींत विद्रधि झाला असतां उचकी लागते, बस्तींत झाला असतां मूत्र कष्टानें व दुर्गंधि होतें, यकृतांत झाला असतां श्वास, प्लीहेंत झाला असतां उच्छ्वासाचा रोध, क्लोमांत झाला असतां तहान लागते व घसा धरतो, हृदयांत झाला असतां सर्व अंग जखडतें व मोह, तमकश्वास, खोकला व उरांत घांसल्यासारखी पीडा व शूल हे विकार होतात. कुक्षींत झाला असतां कुशी, बरगड्यांमधील अंतर व खांदे यांत पीडा होते व पोटांत गुडगुडतें. अंडसंधींत झाला असतां मांड्या जखडतात. वृक्कांत झाला असतां कमर, पाठ व बरगड्या यांत पीडा होते. गुदांत झाला असतां अपानवायूचा अवरोध होतो.

आमपक्वविदग्धत्वं तेषां शोफवदादिशेत् ॥ १६ ॥

विद्रधीचीं आम, पक्व व अतिपक्व अवस्थांचीं लक्षणें शोफाच्या त्या त्या अवस्थांप्रमाणेंच होतात.

नाभेरूर्ध्वं मुखात्पक्वाः प्रस्रवन्त्यधरे गुदात् ।
उभाभ्यां नाभिजो

नाभीच्या वर झालेले विद्रधि पक्व झाले असतां त्यांचा स्राव तोंडांतून होतो व नाभीच्या खालीं झालेले गुदांतून स्रवतात व नाभींत झाला असतां दोहोंकडून स्रवतो.

विद्याद्दोषं क्लेदाच्च विद्रधौ ॥ १७ ॥
यथास्वं व्रणवत्

व्रणांतील क्लेदांचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांस अनुसरून विद्रधींतील क्लेदावरून दोष जाणावे.

तत्र विवर्ज्यः सन्निपातजः ।
पक्वो हृन्नाभिबस्तिस्थो भिन्नोऽन्तर्बहिरेव वा ॥ १८ ॥
पक्वश्चान्तःस्रवन् वक्त्रात् क्षीणस्योपद्रवान्वितः ।

सान्निपातिक विद्रधि, हृदय, नाभि व बस्ती यांत झालेला व आंत किंवा बाहेर फुटलेला, व क्षीण मनुष्यास झालेला, पक्व होऊन तोंडांतून वाहणारा व उपद्रवांनीं युक्त असा अंतर्विद्रधि हे तीन प्रकारचे विद्रधि वैद्यांनीं सोडावे.

एवमेव स्तनसिरा विवृताः प्राप्य योषिताम् ॥ १९ ॥
सूतानां गर्भिणीनां वा सम्भवेच्छ्वयथुर्घनः ।
स्तने सदुग्धेऽदुग्धे वा बाह्यविद्रधिलक्षणः ॥ २० ॥
नाडीनां सूक्ष्मवक्त्रत्वात्कन्यानां तु न जायते ।

याचप्रमाणें बाळंतीण व गरोदर स्त्रियांच्या विस्तृत झालेल्या स्तनशिरांत जाऊन दोष तेथें कठिण सूज उत्पन्न करितात (मग तो स्तन सदुग्ध असो किंवा दुग्धरहित असो); त्याचीं चिन्हें बाह्य विद्रधीसारखींच असतात. लहान मुलींच्या स्तनांतील शिरा फार बारीक असल्यामुळें हा विकार त्यांस होत नाहीं.

क्रुद्धो रुद्धगतिर्वायुः शोफशूलकरश्चरन् ॥ २१ ॥
मुष्कौ वङ्क्षणतः प्राप्य फलकोशाभिवाहिनीः ।
प्रपीड्य धमनीर्वृद्धिं करोति फलकोशयोः ॥ २२ ॥

गति बंद झाल्यामुळें कुपित झालेला वायु सूज व शूल उत्पन्न करून संचार करीत अंडसंधींतून अंडांत उतरून अंडांतील धमन्यांस पीडा करून अंडकोशांची वृद्धि करितो.

दोषास्रमेदोमूत्रान्त्रैः स वृद्धिः सप्तधा गदः ।
मूत्रान्त्रजावप्यनिलाद्धेतुभेदस्तु केवलम् ॥ २३ ॥

वातवृद्धि, पित्तवृद्धि, कफवृद्धि, रक्तवृद्धि, मेदोवृद्धि, मूत्रवृद्धि व अंत्रवृद्धि ( अंतर्गळ ) असे वृद्धीचे सात प्रकार आहेत. त्यांत मूत्रवृद्धि व अंतर्गळ हे दोन्ही वायूपासूनच होतात; परंतु ( सन्निकृष्ट ) कारणावरून निराळे भेद केले आहेत.

वातपूर्णदृतिस्पर्शो रूक्षो वातादहेतुरुक् ।

वातजन्य अंडवृद्धि वाऱ्यानें भरलेल्या भात्यासारखा हातास लागतो व रूक्ष असतो आणि त्यांत कारणावांचून ठणका लागतो.

पक्वोदुम्बरसङ्काशः पित्ताद्दाहोष्मपाकवान् ॥ २४ ॥

पित्तविद्रधि पिकलेल्या उंबरासारखा असून त्यांत दाह व पाक असतो व तो हातास कढत लागतो.

कफाच्छीतो गुरुः स्निग्धः कण्डूमान् कठिनोऽल्परुक् ।

कफवृद्धि हातास गार लागतो, त्यास कंड सुटते, वेदना कमी असते व तो स्निग्ध, कठिण व जड असतो.

कृष्णस्फोटावृतः पित्तवृद्धिलिङ्गश्च रक्ततः ॥ २५ ॥

रक्तवृद्धीवर काळे फोड असून बाकी लक्षणें पित्तवृद्धीसारखीं असतात.

कफवन्मेदसा वृद्धिर्मृदुस्तालफलोपमः ।

कफवृद्धीचीं लक्षणेंच मेदोवृद्धींत होतात व तो ताडगोळ्यासारखा व मृदु असतो.

मूत्रधारणशीलस्य मूत्रजः स तु गच्छतः ॥ २६ ॥
अम्भोभिः पूर्णदृतिवत्क्षोभं याति सरुङ् मृदुः ।
मूत्रकृच्छ्रमधः स्याच्च वलयं फलकोशयोः ॥ २७ ॥

ज्यास नेहमीं मूत्र कोंडण्याची खोड असते अशा मनुष्यास मूत्रज वृद्धि होते, व त्याचा अंड पाण्यानें भरलेल्या पखालीसारखा होऊन तो चालूं लागला असतां क्षोभ पावतो व वेदना होते आणि तो मृदु असतो; अंड फार मोठा झाल्यामुळें शिश्नाभोंवतीं त्याचें कडें झाल्यासारखें होऊन शिश्न आंत गडदतें व त्यामुळें मूत्रकृच्छ्र होतें.

वातकोपिभिराहारैः शीततोयावगाहनैः ।
धारणेरणभाराध्वविषमाङ्गप्रवर्तनैः ॥ २८ ॥
क्षोभणैः क्षुभितोऽन्यैश्च क्षुद्रान्त्रावयवं यदा ।
पवनो विगुणीकृत्य स्वनिवेशादधो नयेत् ॥ २९ ॥
कुर्याद्वङ्क्षणसन्धिस्थं ग्रन्थ्याभं श्वयथुं तदा ।
उपेक्ष्यमाणस्य च मुष्कवृद्धि-
माध्मानरुक्स्तम्भवतीं स वायुः ।
प्रपीडितोऽन्तः स्वनवान्प्रयाति
प्रध्मापयन्नेति पुनश्च मुक्तः ॥ ३० ॥
अन्त्रवृद्धिरसाध्योऽयं वातवृद्धिसमाकृतिः ॥ ३१ ॥

वायु वाढविणारे आहार केल्यानें, थंड पाण्यांत डुबल्यानें, वेगांचा अवरोध केल्यानें, बळानें वेग प्रवृत्त केल्यानें, ओझें वाहिल्यानें, चालल्यानें, वेडेंवांकडें अंग नाचविल्यानें व दुसऱ्या कांहीं क्षोभ करणाऱ्या कारणांनीं वायु क्षुभित होऊन ज्या वेळीं लहान आंतड्याचा थोडासा भाग दुमडून त्यास त्याच्या स्थानापासून खालीं नेऊन अंडसंधींत गांठीसारखी सूज उत्पन्न करितो; मग त्या सुजेची उपेक्षा केली असतां तें आंतडें अंडांत जाऊन अंडाची वृद्धि होते; त्यांत पोटफुगी, वेदना व मलाचा अवरोध हीं लक्षणें असतात, त्यावर दाबिलें असतां गुरगुर शब्द करीत वायु आंत जातो व सोडल्यावर पुनः फुगवीत वायु बाहेर (.अंडांत ) येतो; ह्या विकारास अंत्रवृद्धी· ( अंतरगळ ) म्हणतात. त्याचीं लक्षणें वातवृद्धीसारखींच असून तो असाध्य आहे.

रूक्षकृष्णारुणसिरातन्तुजालगवाक्षितः ।
गुल्मोऽष्टधा पृथग्दोषैः संसृष्टैर्निचयं गतैः ॥ ३२ ॥
आर्तवस्य च दोषेण नारीणां जायतेऽष्टमः ।

रूक्ष, काळ्या व तांबूस अशा शिरांचीं व तंतूंचीं ज्यावर जाळीं असतात असा जो गुल्मरोग त्याचे आठ प्रकार आहेतः—वातगुल्म, पित्तगुल्म, कफगुल्म, वातपित्तजन्य, पित्तकफजन्य, वातकफजन्य, सान्निपातिक व स्त्रियांस आर्तव दुष्ट झाल्यानें होतो तो आठवा रक्तगुल्म.

ज्वरच्छर्द्यतिसाराद्यैर्वमनाद्यैश्च कर्मभिः ॥ ३३ ॥
कर्शितो वातलान्यत्ति शीतं वाम्बु बुभुक्षितः ।
यः पिबत्यनु चान्नानि लङ्घनं प्लवनादिकम् ॥ ३४ ॥
सेवते देहसंक्षोभि च्छर्दिं वा समुदीरयेत् ।
अनुदीर्णामुदीर्णान्वा वातादीन् विमुञ्चति ॥ ३५ ॥
स्नेहस्वेदावनभ्यस्य शोधनं वा निषेवते ।
शुद्धो वायु विदाहीनि भजते स्यन्दनानि वा ॥ ३६ ॥
वातोल्बणास्तस्य मलाः पृथक् क्रुद्धा द्विशोऽथवा ।
सर्वे वा रक्तयुक्ता वा महास्रोतोऽनुशायिनः ॥ ३७ ॥
ऊर्ध्वाधोमार्गमावृत्य कुर्वते शूलपूर्वकम् ।
स्पर्शोपलभ्यगुल्मास्यमुत्प्लुतं ग्रन्थिरूपिणम् ॥ ३८ ॥

ज्वर, वांति व अतिसार इत्यादि रोगांनीं व वमनादि कर्मांनीं कृश झाला असतां जो मनुष्य वातुळ पदार्थ खातो, जो भूक लागली असतां थंड पाणी पितो, जो जेवल्यावर पाण्यांत पोहणें वगैरे लंघन ( कर्षण ) करणारीं व देहास क्षुब्ध करणारीं कर्में करितो, जो बळानें ओकाऱ्या काढितो, वातादिकांचे आलेले वेग जो धारण करितो, स्नेह व स्वेद केल्यावांचून शोधन करितो, वमनादिकांनीं शुद्ध झाला

असतां लागलेच विदाही व अभिष्यंदि पदार्थ सेवन करितो, त्याचे वाताधिक महास्रोतांतील दोष वेगळाले, दोन दोन किंवा सर्वच कुपित होऊन किंवा रक्तयुक्त होऊन वरचा व खालचा मार्ग बंद करून ग्रंथीसारखा, वर उचललेला, हातास लागणारा, गुल्म नांवाचा रोग उत्पन्न करितात. त्यांत प्रथमतः शूल असतो ( तो उत्पन्न होण्यापूर्वीच शूल सुरू होतो. )

**कर्शनात्कफविट्पित्तैर्मार्गस्यावरणेन वा ।**
**वायुः कृताशयः कोष्ठे रौक्ष्यात्काठिण्यमागतः ॥ ३९ ॥**
**स्वतन्त्रः स्वाश्रये दुष्टः परतन्त्रः पराश्रये ।**
**पिण्डतत्त्वादमूर्तोऽपि मूर्तत्वमिव संश्रितः ॥ ४० ॥**
**गुल्म इत्युच्यते बस्तिनाभिहृत्पार्श्वसंश्रयः ।**

कर्षण झाल्यानें किंवा कफ, मळ व पित्त यांनीं मार्गाचा अवरोध केल्यानें वायु कोठ्यांत आशय करून रूक्षपणामुळें कठिण होतो. तो स्वस्थानीं असला म्हणजे स्वतंत्र दुष्ट होतो व पित्तस्थानीं किंवा कफस्थानीं असतां त्यांच्या तंत्रानें दुष्ट होतो. तो एकत्र जमल्यामुळें घन नसूनहि तसा भासतो म्हणून त्यास गुल्म असें म्हणतात. हा रोग बस्ति, नाभि, हृदय व कुशी यांत असतो.

**वातान्मन्याशिरःशूलं ज्वरप्लीहान्त्रकूजनम् ॥ ४१ ॥**
**व्यधः सूच्येव विट्सङ्गः कृच्छ्रादुच्छ्वसनं मुहुः ।**
**स्तम्भो गात्रे मुखे शोषः कार्श्यं विषमवाह्निता ॥ ४२ ॥**
**रूक्षकृष्णत्वगादित्वं चलत्वादनिलस्य च ।**
**अनिरूपितसंस्थानस्थानवृद्धिक्षयव्यथः ॥ ४३ ॥**
**पिपीलिकाव्याप्त इव गुल्मः स्फुरति तुद्यते ।**

वातगुल्मांत मानेंत व डोक्यांत शूल असतो; ताप व कौळ उत्पन्न होतात, आंतड्यांत कुरकुर वाजतें, सुईनें टोंचल्यासारखें होतें, मलाचा अवरोध होतो, वारंवार दम लागतो, अंग ताठतें, तोंडास कोरड पडते, मनुष्य रोड होतो, अग्नि विषम होतो, त्वचादिक रूक्ष व कृष्ण होतात व वायु चंचल असल्यामुळें गुल्माचा आकार, जागा, वृद्धि, क्षय व वेदना यांचा एक नियम नसतो. मुंग्या आल्यासारखें होतें, गुल्म स्फुरण पावतो व आंत टोंचणी असते.

**पित्ताद्दाहोऽम्लकोऽमूर्च्छाविड्भेदस्वेदतृड्ज्वराः ॥४४॥**
**हारिद्रत्वं त्वगाद्येषु गुल्मश्च स्पर्शनासहः ।**
**दूयते दीप्यते सोष्मा स्वस्थानं दहतीव च ॥ ४५ ॥**

पित्तगुल्मांत दाह असतो, आंबट ढेंकरा येतात, मूर्च्छा, अतिसार, घाम, तहान, ज्वर हे विकार होतात. त्वचादिक पिंवळीं होतात, गुल्मास स्पर्श सोसत नाहीं, गुल्मांत दुखतें, गुल्म पेटल्यासारखा होतो, कढत लागतो व त्या स्थानांत जळल्यासारखें होतें.

**कफात्स्तैमित्यमरुचिः सदनं शिशिरज्वरः ।**
**पीनसालस्यहृल्लासकासशुक्लत्वगादिताः ॥ ४६ ॥**
**गुल्मोऽवगाढः कठिनो गुरुः सुप्तः स्थिरोऽल्परुक् ।**

कफगुल्मांत अंग ओल्या वस्त्रानें गुंडाळल्यासारखें भासतें; अरुचि, अग्निमांद्य, शीतज्वर, पडसें, आळस, मळमळणें, खोकला हे विकार होतात; त्वचादिक पांढरीं होतात, गुल्म खोल, कठिण, जड व स्थिर असून त्यावर स्पर्श केला असतां समजत नाहीं आणि वेदना कमी असते.

**स्वदोषस्थानधामानः स्वे स्वे काले च रुक्कराः ॥ ४७ ॥**
**प्रायः**

गुल्म बहुधा ज्या दोषापासून होतात त्या दोषांच्या स्थानीं ते असतात व त्या दोषांचे जे काळ सांगितले आहेत त्या काळीं दुखूं लागतात.

**त्रयस्तु द्वन्द्वोत्था गुल्माः संसृष्टलक्षणाः ।**

द्वंद्वज गुल्म तीन आहेत; त्यांत दोनदोन दोषांचीं लक्षणें असतात.

**सर्वजस्तीव्ररुग्दाहः शीघ्रपाकी घनोन्नतः ॥ ४८ ॥**
**सोऽसाध्यो**

सान्निपातिक गुल्मांत तीव्र वेदना व दाह असतो. पाक लवकर होतो, गुल्म कठिण व उंच असतो व हा असाध्य आहे.

**रक्तगुल्मस्तु स्त्रिया एव प्रजायते ।**

रक्तगुल्म फक्त स्त्रियांसच होतो.

**ऋतौ वा नवसूता वा यदि वा योनिरोगिणी ॥ ४९ ॥**
**सेवते वातलानि स्त्री क्रुद्धस्तस्याः समीरणः ।**
**निरुणध्यार्तवं योन्यां प्रतिमासमवस्थितम् ॥ ५० ॥**
**कुक्षिं करोति तद्गर्भलिङ्गमाविष्करोति च ।**
**हृल्लासदौहृदस्तन्यदर्शनक्षामतादिकम् ॥ ५१ ॥**

ऋतुकाळीं किंवा बाळंतपणांत किंवा योनिरोग झाला असतां जी स्त्री वातुळ पदार्थ खाते तिचा वायु कुपित होऊन प्रत्येक महिन्यास संचित झालेलें आर्तव योनींत कोंडितो, त्यामुळें पोट मोठें होतें आणि हृल्लास, डोहाळे, स्तनांत दूध येणें व कृशपणा इत्यादिक गर्भाचीं लक्षणें होतात.

**क्रमेण वायुसंसर्गात्पित्तयोनितया च तत् ।**
**शोणितं कुरुते तस्या वातपित्तोत्थगुल्मजान् ॥ ५२ ॥**
**रुक्स्तम्भदाहातीसारतृड्ज्वरादीनुपद्रवान् ।**
**गर्भाशये च सुतरां शूलं दुष्टासृगाश्रये ॥ ५३ ॥**
**योन्याश्च स्रावदौर्गन्ध्यतोदस्पन्दनवेदनाः ।**

रक्तास वायूंना संसर्ग झाल्यामुळें वातगुल्माचीं लक्षणें व पित्त हें रक्तापासून होतें म्हणून पित्तगुल्माचीं लक्षणें तिला त्या संचित रक्तापासून होतात. जसें वेदना, स्तंभ, दाह, अतिसार, तहान व ज्वर इत्यादि. गर्भाशयांत दुष्ट रक्त जमून तेथें तीव्र शूल उत्पन्न होतो व योनींतून स्राव होतो, योनीस घाण येऊं लागते, टोचणी लागते, ती स्फुरण पावते व वेदना होतात.

**न चाङ्गैर्गर्भवद्गुल्मः स्फुरत्यपि तु शूलवान् ॥ ५४ ॥**

पिण्डीभूतः स एवास्याः कदाचित्स्पन्दते चिरात् ।
न चास्या वर्धते कुक्षिर्गुल्म एव तु वर्धते ॥ ५५ ॥

गर्भ जसा अंगांनीं इकडे तिकडे वळवळतो तसा गुल्म हालत तर नाहींच, परंतु त्यांत शूल असतो. तो एकत्र गोळ्यासारखा होऊन कधीं कधीं फार वेळानें स्फुरण पावतो. तिचें पोट ( गर्भाशय ) न वाढतां गुल्म मात्र वाढतो.

स्वदोषसंश्रयो गुल्मः सर्वो भवति तेन सः ।
पाकं चिरेण भजते नैव वा विद्रधिः पुनः ॥ ५६ ॥
पच्यते शीघ्रमत्यर्थं दुष्टरक्ताश्रयत्वतः ।
अतः शीघ्रविदाहित्वाद्विद्रधिः सोऽभिधीयते ॥ ५७ ॥

कोणताहि गुल्म असो, तो ज्या दोषापासून झाला असतो त्याच्याच अधिष्ठानानें तो असल्यानें त्याचा पाक फार दिवसांनीं होतो ( म्ह० त्यांत पू होतो ) किंवा मुळींच होत नाहीं. परंतु विद्रधि अतिशय दुष्ट झालेल्या रक्ताच्या आश्रयानें उत्पन्न होतो म्हणून त्याचा पाक लवकर होतो. त्यांत दाह लवकर होतो म्हणून त्यास विद्रधि असें म्हणतात.

गुल्मेऽन्तराश्रये बस्तिकुक्षिहृत्प्लीहवेदनाः ।
अग्निवर्णबलभ्रंशो वेगानां चाप्रवर्तनम् ॥ ५८ ॥

अंतर्गुल्म झाला असतां बस्ति, कुक्षि ( कूस ), हृदय व प्लीहा यांत वेदना होतात. अग्नि मंद होतो, शरीराचा वर्ण नाहींसा होतो, शक्ति कमी होते व मलमूत्रादिकांच्या वेगांचा अवरोध होतो.

अतो विपर्ययो बाह्ये कोष्ठाङ्गेषु तु नातिरुक् ।
वैवर्ण्यमवकाशस्य बहिरुन्नतताधिकम् ॥ ५९ ॥

बाह्यगुल्म झाला असतां वरील लक्षणें नसतात, परंतु बस्त्यादिक कोष्ठांगावर झाल्यास मात्र थोडीशी वेदना असते; गुल्मावरील त्वचेचा वर्ण बदलतो व गुल्म बाहेरून अधिक उंच दिसतो.

साटोपमत्युग्ररुजमाध्मानमुदरे भृशम् ।
ऊर्ध्वाधो वातरोधेन तमानाहं प्रचक्षते ॥ ६० ॥

खालून व वरून वायूचा अवरोध झाला असतां पोट अतिशय फुगतें, आंत गुडगुड वाजतें व अति तीव्र वेदना होतात. या प्रकारास आनाह असें म्हणतात.

घनोष्ठीलोपमो ग्रन्थिरष्ठीलोर्ध्वं समुन्नतः ।
आनाहलिङ्गस्तिर्यक् तु प्रत्यष्ठीला तदाकृतिः ॥ ६१ ॥

फणसाच्या अठळीसारखा जो वर उचललेला ग्रंथि होतो त्यास अष्ठीला म्हणतात. त्यांत आनाहाचीं लक्षणें असतात. जो तिर्कस असतो त्यास प्रत्यष्ठीला असें म्हणतात. त्याचीं लक्षणें अष्ठीलेसारखींच असतात.

पक्वाशयाद्गुदोपस्थं वायुस्तीव्ररुजः प्रयान् ।
तूनी प्रतूनी तु भवेत् स एवातो विपर्यये ॥ ६२ ॥

पक्वाशयांतून गुदाकडे व शिश्नाकडे अतिशय वेदना करीत वायु जातो त्या विकारास तूनी व याच्याच उलट प्रकारास प्रतूनी असें म्हणतात.

उद्गारबाहुल्यपुरीषबन्धतृप्त्यक्षमत्वान्त्रविकूजनानि ।
आटोपमाध्मानमपक्तिशक्तिमासन्नगुल्मस्य वदन्ति चिह्नम् ॥ ६३ ॥

पुष्कळ ढेंकरा येणें, मळाचा अवरोध, थोडें जेवलें असतांहि पोट भरल्यासारखें वाटणें व अधिक जेवण झालें असतां न सोसणें, आंतड्यांत कुरकुर वाजणें, पोटांत गुरगुर होणें, पोट फुगणें व अग्निमांद्य हीं गुल्माचीं पूर्वरूपें आहेत.

---

# द्वादशोऽध्यायः

## अध्याय १२ वा.

## अथात उदरनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां उदररोगाचें निदान सांगतों.

रोगाः सर्वेऽपि मन्देऽग्नौ सुतरामुदराणि तु ।
अजीर्णान्मलिनैश्चान्नैर्जायन्ते मलसञ्चयात् ॥ १ ॥

अग्नि मंद असतां सर्वच रोग होतात. परंतु विशेषतः उदर होतें. तसेंच अजीर्णापासून, दुष्ट अन्नांनीं व वातादि मलांचा संचय झाल्यापासून उदरें होतात.

ऊर्ध्वाधो धातवो रुद्ध्वा वाहिनीरम्बुवाहिनीः ।
प्राणाग्न्यपानान् सन्दूष्य कुर्युस्त्वङ्मांससन्धिगाः ॥ २ ॥
आध्माप्य कुक्षिमुदरं

वातादि दोष खालून व वरून उदकवह स्रोतांचा अवरोध करून प्राण, अग्नि व अपान यांस दुष्ट करून त्वचा व मांस यांच्यामध्यें जाऊन कूस फुगवून उदर उत्पन्न करितात.

अष्टधा तच्च भिद्यते ।
पृथग्दोषैः समस्तैश्च प्लीहबद्धक्षतोदकैः ॥ ३ ॥

वातोदर, पित्तोदर, कफोदर, सन्निपातोदर, प्लीहोदर, बद्धोदर, क्षतोदर व जलोदर असे त्याचे आठ भेद होतात.

तेनार्ताः शुष्कताल्वोष्ठाः शूनपादकरोदराः ।
नष्टचेष्टाबलाहाराः कृशाः प्रध्मातकुक्षयः ॥ ४ ॥
स्युः प्रेतरूपाः पुरुषाः

उदरानें पीडिलेल्या मनुष्याची टाळू व ओंठ कोरडे पडतात; पाय, हात व पोट सुजतात; अवयवांचे व्यापार ( चेष्टा ), शक्ति व आहार हीं कमी होतात व कृश होतात, त्यांचीं पोटें फुगतात व ते प्रेतासारखे दिसूं लागतात.

भाविनस्तस्य लक्षणम् ।
क्षुन्नाशोऽन्नं चिरात्सर्वं सविदाहं च पच्यते ॥ ५ ॥
जीर्णाजीर्णं न जानाति सौहित्यं सहते न च ।
क्षीयते बलतः शश्वच्छ्वसित्यल्पेऽपि चेष्टिते ॥ ६ ॥
वृद्धिर्विशोऽप्रवृत्तिश्च किंचिच्छोफश्च पादयोः ।

रुग्बस्तिसन्धौ ततता लघ्वल्पाभोजनैरपि ॥ ७ ॥
राजीजन्म वलीनाशो जठरे

भूक न लागणें, कोणत्याहि प्रकारचें अन्न खाल्लें असतां जळजळ उत्पन्न होऊन फार उशीरा पचणें, अन्न जिरलें किंवा नाहीं हें न समजणें, पोटभर जेवलें असतां तें न सोसणें, हळूहळू शक्ति कमी होणें, थोडासा व्यायाम केला तरी दम लागणें, मळ वाढणें व त्याची बाहेर प्रवृत्ति न होणें, पाय किंचित् सुजणें, बस्तिसंधींत वेदना होणें, लघु अन्न खाल्ल्यानें, थोडें खाल्ल्यानें किंवा मुळींच न खाल्लें तरी पोटास तडस लागणें, पोटावर शिरा उत्पन्न होणें व वली दिसेनाशा होणें, हीं लक्षणें उदर होण्याच्या पूर्वी होतात.

जठरेषु तु ।
सर्वेषु तन्द्रा सदनं मलसङ्गोऽल्पवह्निता ॥ ८ ॥
दाहः श्वयथुराध्मानमन्ते सलिलसम्भवः ।

सर्व उदरांत झांपड, अंगग्लानि, मलावरोध, अग्निमांद्य, दाह, सूज व पोट फुगणें हीं लक्षणें असून सर्वांत शेवटीं पाणी उत्पन्न होतें.

सर्वं त्वतोयमरुणमशोफं नातिभारिकम् ॥ ९ ॥
गवाक्षितं सिराजालैः सदा गुडगुडायते ।
नाभिमन्त्रं च विष्टभ्य वेगं कृत्वा प्रणश्यति ॥ १० ॥
मारुतो हृत्कटीनाभिपायुवङ्क्षणवेदनः ।
सशब्दो निश्चरेद्वायुर्विड्बन्धो मूत्रमल्पकम् ॥ ११ ॥
नातिमन्दोऽनलो लौल्यं न च स्याद्विरसं मुखम् ।

कोणतेंहि उदर पाणी सांचण्यापूर्वी आरक्त व शोफरहित असून फारसें जड लागत नाहीं, त्यावर शिरांचीं जाळीं पसरलेलीं असतात, पोटांत नेहमीं गुडगुड वाजतें, वायु, हृदय, कमर, नाभि, गुद व अंडसंधि यांत वेदना करून नाभि व आंतडें यांस ताठवून जोर करून नाहींसा होतो व शब्द करीत गुदांतून बाहेर येतो. मलाचा अवरोध असतो, मूत्र थोडें होतें, अग्नि फारसा मंद नसतो अन्नाविषयीं खाखाई असते व तोंड बेचव नसतें.

तत्र वातोदरे शोफः पाणिपान्मुष्ककुक्षिषु ॥ १२ ॥
कुक्षिपार्श्वोदरकटीपृष्ठरुक् पर्वभेदनम् ।
शुष्ककासाङ्गमर्दोऽधो गुरुता मलसङ्ग्रहः ॥ १३ ॥
श्यावारुणत्वगादित्वमकस्माद्वृद्धिह्रासवत् ।
सतोदभेदमुदरं तनु कृष्णसिराततम् ॥ १४ ॥
आध्मातदृतिवच्छब्दमाहतं प्रकरोति च ।
वायुश्चात्र सरुक्शब्दो विचरेत्सर्वतोगतिः ॥ १५ ॥

त्यांत वातोदर झालें असतां हात, पाय, अंड व कुशी सुजतात. कुशी, बरगड्या, पोट, कमर व पाठ यांत वेदना होतात. सांधे फुटतात, कोरडी ढांस लागते, हातपाय मोडल्यासारखे होतात. पोटाचा खालचा भाग जड होतो. मलाचा अवरोध होतो, त्वचादिक काळ्या व अरुण वर्णाच्या होतात, कारणावांचून पोट वाढतें व कमी होतें. पोटांत टोंचल्यासारखी व फुटल्यासारखी वेदना होते. तसेंच पोट बारीक व काळ्या शिरांनीं आच्छादित होतें. पोटावर टिचक्या मारल्या असतां फुगलेल्या भात्यासारखा आवाज होतो व वायु पोटांत चहूंकडून वेदना व शब्द करीत फिरतो.

पित्तोदरे ज्वरो मूर्च्छा दाहस्तृट् कटुकास्यता ।
भ्रमोऽतिसारः पीतत्वं त्वगादावुदरं हरित् ॥ १६ ॥
पीतताम्रसिरानद्धं सस्वेदं सोष्म दह्यते ।
धूमायति मृदुस्पर्शं क्षिप्रपाकं प्रदूयते ॥ १७ ॥

पित्तोदर झालें असतां, ताप, मूर्च्छा, दाह, तहान, तोंड कडू होणें, भ्रम, अतिसार, त्वचादिकांवर पिंवळेपणा, पोट हिरवें होणें, पिंवळ्या व तांबड्या शिरा उठणें, पोटास घाम येणें, पोट कढत लागणें, पोटांत दाह होणें, धूर निघाल्यासारखें होणें, पोटास हात लावला असतां तें मऊ लागणें व दुखणें हीं लक्षणें होतात व पाणी लवकर होतें.

श्लेष्मोदरेऽङ्गसदनं स्वापश्वयथुगौरवम् ।
निद्रोत्क्लेशोऽरुचिः श्वासः कासः शुक्लत्वगादिता १८
उदरं स्तिमितं श्लक्ष्णं शुक्लराजीततं महत् ।
चिराभिवृद्धि कठिनं शीतस्पर्शं गुरु स्थिरम् ॥ १९ ॥

कफोदरांत अंगग्लानि होते, स्पर्श समजत नाहीं, सूज येते, अंग जड होतें, झोंप, उम्हासे, अरुचि, श्वास, खोकला, हे विकार होतात. त्वचादिकांवर पांढरेपणा येतो. पोट ओलसर व गुळगुळीत होतें व तें पांढऱ्या शिरांनीं व्याप्त होतें. मोठें, कठिण, थंड, जड व स्थिर होतें व फार वेळानें वाढतें. [ पाणी होण्यास पुष्कळ काळ लागतो ].

त्रिदोषकोपनैस्तैस्तैः स्त्रीदत्तैश्च रजोमलैः ।
गरदूषीविषाद्यैश्च सरक्ताः सञ्चिता मलाः ॥ २० ॥
कोष्ठं प्राप्य विकुर्वाणाः शोषमूर्च्छाभ्रमान्वितम् ।
कुर्युस्त्रिलिङ्गमुदरं शीघ्रपाकं सुदारुणम् ॥ २१ ॥
बाधते तच्च सुतरां शीतवाताभ्रदर्शने ।

मागें सांगितलेल्या त्रिदोषकोपाच्या कारणांनीं, स्त्रियांनीं [ नवऱ्यानें आपणावर प्रीति करावी म्ह० ] रज व नासादिकांतील मळ दिले असतां त्यांमुळें, सर्पादिकांच्या विषानें व शरीरांत भिनलेल्या विषानें वात, पित्त, कफ व रक्त संचित होऊन उदर करितात, त्यांत त्रिदोष लक्षणें असून शिवाय, शोष, मूर्च्छा व भ्रम होतात. हें उदर भयंकर असून त्यांत पाणी फार लवकर होतें व फार थंडी पडली असतां, वारा सुटला असतां व ढग आले असतां तें फारच विकोपास जातें.

अत्याशितस्य संक्षोभाद्यानयानादिचेष्टितैः ॥ २२ ॥
अतिव्यवायकर्माध्ववमनव्याधिकर्शनैः ।
वामपार्श्वाश्रितः प्लीहा च्युतः स्थानाद्विवर्धते ॥ २३ ॥
शोणितं वा रसादिभ्यो विवृद्धं तं विवर्धयेत् ।
सोऽष्ठीलेवातिकठिनः प्रोन्नतः कूर्मपृष्ठवत् ॥ २४ ॥

क्रमेण वर्धमानश्च कुक्षावुदरमावहेत् ।
श्वासकासपिपासास्यवैरस्याध्मानरुग्ज्वरैः ॥ २५ ॥
पाण्डुत्वच्छर्दिमूर्च्छार्तिदाहमोहैश्च संयुतम् ।
अरुणाभं विवर्णं वा नीलहारिद्रराजिमत् ॥ २६ ॥

फार जेवलें असून अश्वादिकांवर बसून जाणें व दुसऱ्या कांहीं क्रियांनीं क्षोभ झाल्यामुळें, तसेंच अतिमैथुन, अतिशय काम करणें, अतिशय चालणें, वमन व रोग यांनीं कृश झाला असतां डाव्या कुशींतील कौळ स्थानापासून* सुटून वाढते किंवा रसादिकांपासून वाढलेलें रक्त तिला वाढवितें; ती प्रथम अटळीसारखी फार कठिण असून नंतर कासवाच्या पाठीप्रमाणें कुशींत हळूहळू वाढून उदर उत्पन्न करिते. पोट अरुण वर्णाचें होतें किंवा त्याचा रंग दुसऱ्या तऱ्हेनें बदलतो व त्यावर निळ्या, पिंवळ्या रेघा उठतात. तसेंच श्वास, कास, तहान, तोंड बेचव, पोट फुगणें, शूल, ज्वर, पांडुरोग, वांति, मूर्च्छा, वेदना, दाह व मोह हे विकार असतात.

उदावर्तरुगानाहैर्मोहतृड्दहनज्वरैः ।
गौरवारुचिकाठिन्यैर्विद्यात्तत्र मलान् क्रमात् ॥ २७ ॥

त्यांत वातादि वेगांची गति उलटणें (उदावर्त), शूल व पोट फुगणें, हीं लक्षणें असलीं म्हणजे वायु; मोह. तहान, आग होणें व ज्वर हीं असलीं म्हणजे पित्त; जडपणा, अरुचि व कठिणपणा हीं असलीं म्हणजे कफ आहे असें समजावें..

प्लीहवद्दक्षिणात्पार्श्वात्कुर्याद्यकृदपि च्युतम् ।

प्लीहेप्रमाणेंच उजव्या कुशींतून यकृत् च्युत झालें असतां उदर करितें.†

पक्ष्मबालैः सहान्नेन भुक्तैर्बद्धायने गुदे ॥ २८ ॥
दुर्नामभिरुदावर्तैरन्यैर्वान्त्रोपलेपिभिः ।
वर्चःपित्तकफान् रुद्ध्वा करोति कुपितोऽनिलः ॥ २९ ॥
अपानो जठरं तेन स्युर्दाहतृड्ज्वरक्षवाः ।
कासश्वासोरुसदनं शिरोहृन्नाभिपायुरुक् ॥ ३० ॥
मलसङ्गोऽरुचिच्छर्दिरुदरं मूढमारुतम् ।
स्थिरं नीलारुणसिराराजिनद्धमराजि वा ॥ ३१ ॥
नाभेरुपरि च प्रायो गोपुच्छाकृति जायते ।

पक्ष्म (पापण्याचे केंस) व केंस अन्नाबरोबर खाल्ले असतां त्यामुळें किंवा मूळव्याधीच्या मोडांनीं किंवा वातादिकांचे वेग फिरविल्यामुळें, अथवा दुसऱ्या आंतड्यांस चिकटून राहणाऱ्या पदार्थांनीं गुद बंद झालें असतां अपानवायु कुपित होऊन मळ, पित्त व कफ यांस कोंडून उदर उत्पन्न करितो. त्यामुळें दाह, तहान, ज्वर, शिंका, खोकला, श्वास, मांड्या गळणें, डोकें, हृदय, नाभि व गुद यांत वेदना होणें, मलावरोध, अरुचि व वांति हे विकार होतात. पोटांत वायु निश्चेष्ट होऊन राहतो. पोट स्थिर होतें; पोटावर निळ्या व तांबूस शिरा व रेघा उठतात किंवा त्या मुळींच नसतात; बेंबीच्या वर पोट गाईच्या शेपटासारखें होतें (यास बद्धोदर म्हणतात).

अस्थ्यादिशल्यैः सान्नैश्चेद्भुक्तैरत्यशनेन वा ॥ ३२ ॥
भिद्यते पच्यते वान्त्रं तच्छिद्रैश्च स्रवन् बहिः ।
आम एव गुदादेति ततोऽल्पाल्पं सविड्रसः ॥ ३३ ॥
तुल्यः कुणपगन्धेन पिच्छिलः पीतलोहितः ।
शेषश्चापूर्य जठरं जठरं घोरमावहेत् ॥ ३४ ॥
वर्धते तदधो नाभेराशु चैति जलात्मताम् ।
उद्रिक्तदोषरूपं च व्याप्तं च श्वासतृड्भ्रमैः ॥ ३५ ॥
छिद्रोदरमिदं प्राहुः परिस्रावीति चापरे ।

अन्नाबरोबर अस्थ्यादि शल्यें खाल्लीं असतां त्यांमुळें किंवा अतिशय जेवल्यामुळें आंतडें फाटतें किंवा त्याचा पाक होतो, त्या भोंकांतून अपक्व अन्नरस मलासह बराच बाहेर पडतो व त्याहून थोडा गुदांतून बाहेर येतो. त्यास प्रेतासारखी घाण असून तो बुळबुळीत, पिंवळा व लाल असतो. जो पोटांत स्रवतो तो सर्व पोटभर पसरून भयंकर उदर होतें. पोट बेंबीच्या खालीं वाढतें. त्यांत पाणी फार जलद होतें. कुपित झालेल्या त्रिदोषांचीं चिन्हें असतात. श्वास, तहान व भ्रम हे विकार होतात. यास छिद्रोदर (क्षितोदर) व कित्येक परिस्रावि उदर असें म्हणतात.

प्रवृत्तस्नेहपानादेः सहसाऽऽमाम्बुपायिनः ॥ ३६ ॥
अत्यम्बुपानान्मन्दाग्नेः क्षीणस्यातिकृशस्य वा ।
रुद्ध्वाम्बुमार्गाननिलः कफश्च जलमूर्च्छितः ॥ ३७ ॥
वर्धयेतां तदेवाम्बु तत्स्थानादुदराश्रितौ ।
ततः स्यादुदरं तृष्णागुदस्रुतिरुजायुतम् ॥ ३८ ॥
कासश्वासारुचियुतं नानावर्णसिराततम् ।
तोयपूर्णदृतिस्पर्शशब्दप्रक्षोभवेपथु ॥ ३९ ॥
दकोदरं महत्स्निग्धं स्थिरमावृत्तनाभि तत् ।

---

*यांत कौळ किंवा पांथरी म्हणून जो रोग होतो त्याचीं कारणें सांगतांना मुख्य कारणांकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. पांथरी जी वाढते ती प्रायः हिंवतापापासून, कधीं कधीं संतत (Remittent fever) ज्वरापासून व क्वचित् प्रसंगीं यकृत् वाढल्यापासून, या प्रमुख कारणांचा मुळींच उल्लेख केला नाहीं. शिवाय पांथरीची वृद्धि व स्वस्थानापासून भ्रंश या दोन गोष्टी अगदीं पृथक् असून त्यांचा एकाच व्याधींत समावेश केला आहे. भ्रंश (स्थानापासून सुटणें) हा विकार फार क्वचित् आढळतो, सबब त्याला इतकें प्रमुखत्व देण्याचें कारण नव्हतें. तसेंच रसादिकांपासून वाढलेलें रक्त तिला वाढवितें ही समजूतहि चुकीची आहे. पांथरी वाढली असतां अंगांतील रक्त कमी झालें असतें ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे; इतकेंच मात्र कीं, जरी अंगांतील रक्त कमी झालें असतें तरी पांथरी या अवयवांत रक्ताचा सचय झालेला असतो.

†उपोद्घातांत सुचविल्याप्रमाणें यकृताविषयीं आपल्या निदानांत फारच थोडी माहिती दिली आहे व त्याच्या वृद्धीचीं कारणें बिलकूल समजलीं नव्हतीं म्हणण्यास हरकत नाहीं; कारण ह्या श्लोकार्धांत यकृत् वाढतें तेव्हां तें नेहमीं जागेपासून सुटून खालीं आलें असतें, असें ध्वनित केलें आहे.

जो स्नेहपानादि क्रिया केल्या असतां एकाएकीं थंड पाणी पितो; तसेंच अग्नि मंद असून, क्षीण असून व अतिशय कृश असून जो अतिशय पाणी पितो त्याचा पाण्यानें युक्त झालेला कफ व वायु उदकवह स्रोतें बंद करून पोटांत राहून उदकाच्या स्थानांतून तेंच पाणी वाढवून उदर करितात. त्यांत गुदास स्राव व वेदना होतात, खोकला, दमा व अरुचि हे विकार असतात. पोट अनेक रंगांच्या शिरांनीं युक्त असतें, व तें पाण्यानें भरलेल्या पखालीसारखें हालूं लागतें व त्यावर बोटानें मारलें असतां पखालीवर मारल्यासारखाच आवाज होतो, व दाबलें असतां आंत पाण्याचा संचार झालासा दिसतो व पखालीप्रमाणेंच तें हालतें. हें फार मोठें, स्निग्ध व स्थिर होतें व बेंबी उरफाटते. यास जलोदर असें म्हणतात.

**उपेक्षया च सर्वेषु दोषाः स्वस्थानतश्च्युताः ॥ ४० ॥**
**पाकाद्द्रवाद्द्रवीकुर्युः सन्धिस्रोतोमुखान्यपि ।**
**स्वेदश्च बाह्यस्रोतःसु विहितस्तिर्यगास्थितः ॥ ४१ ॥**
**तदेवोदकमाध्माप्य पिच्छां कुर्यात्तदा भवेत् ।**
**गुरूदरं स्थिरं वृत्तमाहतं च न शब्दवत् ॥ ४२ ॥**
**मृदु व्यपेतराजीकं नाभ्यां स्पृष्टं च सर्पति ।**
**तदनूदकजन्मास्मिन् कुक्षिवृद्धिस्ततोऽधिकम् ॥ ४३ ॥**
**सिरान्तर्धानमुदकजठरोक्तं च लक्षणम् ।**

कोणत्याहि उदराची उपेक्षा केली असतां स्वस्थानापासून च्युत झालेल्या दोषांचा पाक झाल्यामुळें तें पातळ होऊन संधि व स्रोतांचीं तोंडें यांसहि पातळ करितात; व बाह्य स्रोतें बंद झाल्यामुळें कुंठित झालेला स्वेद परत फिरून पोटांत जमून तेंच पाणी वाढवून त्याची पिच्छा उत्पन्न करितो. त्या वेळीं पोट जड, स्थिर व वाटोळें होतें; वर बोटानें ठोकलें असतां वाजत नाहीं, मऊ होतें, रेषा नाहींशा होतात, बेंबीवर दाबलें असतां सर्व पोट एकदम हालल्यासारखें दिसतें, नंतर त्यांत पाणी होतें व पूर्वीपेक्षां पोट मोठें होतें. सिरा मावळतात व जलोदराचीं लक्षणें होतात.

**वातपित्तकफप्लीहसन्निपातोदकोदरम् ॥ ४४ ॥**
**कृच्छ्रं यथोत्तरं**

वातोदर, पित्तोदर, कफोदर, प्लीहोदर, सन्निपातोदर व जलोदर हीं पहिल्यापासून पुढें एकापेक्षां एक अधिक कष्टसाध्य आहेत.

**पक्षात्परं प्रायोऽपरे हतः ।**

बद्धोदर व क्षतोदर झालें असतां बहुधां १५ दिवसांत मनुष्य मरतो.

**सर्वं च जातसलिलं रिष्टोक्तोपद्रवान्वितम् ॥ ४५ ॥**

पाणी झालें असतां व रिष्टांत ( विकृतिविज्ञानीय अध्यायांत ) सांगितलेले विकार झाले असतां कोणतेंहि उदर असाध्य होतें.

**जन्मनैवोदरं सर्वं प्रायः कृच्छ्रतमं मतम् ।**
**बलिनस्तदजाताम्बु यत्नसाध्यं नवोत्थितम् ॥ ४६ ॥**

स्वभावतः सर्व उदरें बहुधा फार कष्टसाध्य आहेत; परंतु मनुष्य बलवान् असून आंत पाणी झालें नसेल व नवीनच असेल तर तें श्रमानें साध्य होतें.

---

# त्रयोदशोऽध्यायः

## अध्याय १३ वा

## अथातः पाण्डुरोगशोफविसर्पनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां पांडुरोग, सूज, विसर्प यांचें निदान सांगतों.

**पित्तप्रधानाः कुपिता यथोक्तैः कोपनैर्मलाः ।**
**तत्रानिलेन बलिना क्षिप्तं पित्तं हृदि स्थितम् ॥ १ ॥**
**धमनीर्दश सम्प्राप्य व्याप्नुवत्सकलां तनुम् ।**
**श्लेष्मत्वग्रक्तमांसानि प्रदूष्यान्तरमाश्रितम् ॥ २ ॥**
**त्वङ्मांसयोस्तत्कुरुते त्वचि वर्णान् पृथग्विधान् ।**
**पाण्डुहारिद्रहरितान् पाण्डुत्वं तेषु चाधिकम् ॥ ३ ॥**
**यतोऽतः पाण्डुरित्युक्तः स रोगः**

पूर्वी सांगितलेल्या कारणांनीं दोष कुपित होतात; त्यांत पित्त मुख्य असतें; त्यांत वायु हा प्रेरक व बलवान् असल्यामुळें तो पित्तास फेंकतो, त्यामुळें तें हृदयांत येऊन, तेथून दहा धमन्यांत शिरून, सर्व शरीरास व्यापून कफ, त्वचा, रक्त व मांस यांस दुष्ट करून त्वचा व मांस यांच्यामध्यें राहून त्वचेवर पांडुर, पिंवळा व हिरवा असे निरनिराळे रंग उत्पन्न करितें; त्यांत पांडुरवर्ण अधिक असतो म्हणून या रोगास पांडुरोग असें म्हणतात.

**तेन गौरवम् ।**
**धातूनां स्याच्च शैथिल्यमोजसश्च गुणक्षयः ॥ ४ ॥**
**ततोऽल्परक्तमेदस्को निःसारः स्याच्छ्लथेन्द्रियः ।**
**मृद्यमानैरिवाङ्गैर्ना द्रवता हृदयेन च ॥ ५ ॥**
**शूनाक्षिकूटः सदनः कोपनः ष्ठीवनोऽल्पवाक् ।**
**अन्नद्विट् शिशिरद्वेषी शीर्णरोमा हतानलः ॥ ६ ॥**
**सन्नसक्थिर्ज्वरी श्वासी कर्णक्ष्वेडी भ्रमी श्रमी ।**

त्यामुळें धातु जड व शिथिल होतात, ओजाचे गुण कमी होतात, त्यानंतर त्याचें रक्त व मेद कमी होतात, शक्ति नाहींशी होते, इंद्रियें शिथिल होतात, अंग ठेंचल्यासारखें होतें, त्या मनुष्याचें मन फार कोमल होतें, डोळ्याचे कोनाडे सुजतात. अंगें म्लान होतात, तो फार रागीट होतो, वारंवार थुंकतो, थोडें बोलतो, अन्नाचा व थंड पदार्थांचा तिटकारा करितो, केंस गळतात, अग्नि मंद होतो, मांड्या गळतात, आणि त्यास ताप, श्वास, कर्णनाद, भ्रम व आयास केल्यावांचून थकवा वाटणें हे विकार होतात.

स पञ्चधा पृथग्दोषैः समस्तैर्मृत्तिकादनात् ॥ ७ ॥

वायूपासून, पित्तापासून, कफापासून, त्रिदोषापासून व माती खाल्ल्यापासून अशा पांच कारणांनीं तो पांच प्रकारचा होतो.

प्राग्रूपमस्य हृदयस्पन्दनं रूक्षता त्वचि ।
अरुचिः पीतमूत्रत्वं स्वेदस्त्रावोऽल्पवह्निता ॥ ८ ॥
सादः श्रमो

हृदय कांपणें ( धडधडणें ), त्वचा रूक्ष होणें, अरुचि, मूत्र पिंवळें होणें, घाम न येणें, अग्नि मंद होणें, अंगें निःशक्त होणें व आयासावांचून थकवा येणें, हीं पांडुरोगाचीं पूर्वचिन्हें होत.

अनिलात्तत्र गात्ररुक्तोदकम्पनम् ।
कृष्णरूक्षारुणसिरानखविण्मूत्रनेत्रता ॥ ९ ॥
शोफानाहास्यवैरस्यविट्शोषाः पार्श्वमूर्धरुक् ।

वायूपासून जो पांडुरोग होतो त्यांत गात्रांत टोंचणी व वेदना असते व तीं कांपतात; शिरा, नखें, मळ, मूत्र व डोळे हे काळे, रूक्ष व अरुण होतात, अंग सुजतें, पोट फुगतें, तोंड बेचव होतें, मळ वाळतो, बरगड्या व डोकें हीं दुखतात.

पित्ताद्धरितपीताभसिरादित्वं ज्वरस्तमः ॥ १० ॥
तृट्स्वेदमूर्च्छाशीतेच्छा दौर्गन्ध्यं कटुवक्त्रता ।
वर्चोभेदोऽम्लको दाहः

पित्तजन्य पांडुरोगांत शिरादिक हिरव्या किंवा पिंवळ्या होतात. ताप, डोळ्यांस अंधारी येणें, तहान, घाम येणें, मूर्च्छा, थंडाची इच्छा, अंगास वाईट घाण, तोंड कडू असणें, जुलाब होणें, आंबट ढेंकरा येणें व दाह हीं लक्षणें असतात.

कफाच्छुक्लसिरादिता ॥ ११ ॥
तन्द्रालवणवक्त्रत्वं रोमहर्षः स्वरक्षयः ।
कासश्छर्दिश्च

कफजन्य पांडुरोगांत शिरादिक पांढरे असतात, शिवाय झांपड असते, तोंड खारट असतें, अंगावर कांटा उभा राहतो, स्वर क्षीण होतो आणि खोकला व वांति असतात.

निचयान्मिश्रलिङ्गोऽतिदुःसहः ॥ १२ ॥

सन्निपातजन्य पांडुरोगांत सर्व लक्षणें असतात व हा दुःसह असतो

मृत्कषायाऽनिलं पित्तमूषरा मधुरा कफम् ।
दूषयित्वा रसादींश्च रौक्ष्याद्भुक्तं विरूक्ष्य च ॥ १३ ॥
स्त्रोतांस्यपक्वैवापूर्य कुर्याद्रुद्ध्वा च पूर्ववत् ।
पाण्डुरोगं ततः शूननाभिपादास्यमेहनः ॥ १४ ॥
पुरीषं कृमिमन्मुञ्चेद्भिन्नं सासृक्कफं नरः ।

तुरट माती वायूस, क्षारयुक्त पित्तास, मधुर माती कफास आणि सर्व प्रकारची माती रसादिकांसहि शुष्क करून स्वतःच्या रूक्षतेनें खाल्लेल्या पदार्थांसहि रूक्ष करिते. तिचा पाक न होतां ती स्त्रोतांत शिरून त्यांस बंद करून मागें सांगितल्याप्रमाणें पांडुरोग उत्पन्न करिते. त्यामुळें मनुष्याची बेंबी, पाय, तोंड व शिश्न हीं सुजतात व त्यास रेच होतात. मळांत कृमि, रक्त व कफ असतो.

यः पाण्डुरोगी सेवेत पित्तलं तस्य कामलाम् ॥ १५ ॥
कोष्ठशाखाश्रयं पित्तं दग्ध्वासृङ्मांसमावहेत् ।
हारिद्रनेत्रमूत्रत्वङ्नखवक्त्रशकृत्तया ॥ १६ ॥
दाहाविपाकस्तृष्णावान् भेकाभो दुर्बलेन्द्रियः ।

पांडुरोग झाला असतां जो मनुष्य पित्तकर पदार्थ खातो त्याचें कोठा व शाखा यांतील पित्त, रक्त व मांस यांस जाळून कामला ( कावीळ ) उत्पन्न करितें. त्यामुळें डोळे, मूत्र, त्वचा, नखें, तोंड व मळ हीं पिंवळीं होतात. दाह होतो, अन्नाचें पचन होत नाहीं, तहान लागते, मनुष्य बेडकासारखा होतो व त्याचीं इंद्रियें निःशक्त होतात.

भवेत्पित्तोल्बणस्यासौ पाण्डुरोगादृतेऽपि च ॥ १७ ॥

ज्याचें पित्त अधिक आहे त्यास पांडुरोगावांचूनहि कावीळ होते.

उपेक्षया च शोफाढ्या सा कृच्छ्रा कुम्भकामला ।

कामलेची उपेक्षा केली असतां कुंभकामला होते; तीस सूज अधिक असते व ती कष्टसाध्य आहे.

हरितश्यावपीतत्वं पाण्डुरोगे यदा भवेत् ॥ १८ ॥
वातपित्ताद्भ्रमस्तृष्णा स्त्रीष्वहर्षो मृदुर्ज्वरः ।
तन्द्रा बलानलभ्रंशो लोढरं तं हलीमकम् ॥ १९ ॥
अलसं चेति शंसन्ति

पांडुरोगांत जेव्हां शिरादिक हिरव्या, काळसर व पिंवळ्या होतात, तसेंच वायु व पित्त यांच्या योगानें भ्रम, तहान, स्त्रियांविषयीं अप्रीति, बारीक ताप, झांपड, बळ कमी होणें व अग्निमांद्य हीं लक्षणें होतात तेव्हां त्यास लोढर, हलीमक किंवा अलस असें म्हणतात.

तेषां पूर्वमुपद्रवाः ।
शोफप्रधानाः कथिताः स एवातो निगद्यते ॥ २० ॥

पांडुरोगाच्या उपद्रवांत शोफ ( सूज ) हा प्रधान असतो असें पूर्वीं सांगितलें आहे म्हणून त्याबद्दलच आतां सांगितलें जाईल.

पित्तरक्तकफान्वायुर्दुष्टो दुष्टान् बहिःशिराः ।
नीत्वा रुद्धगतिस्तैर्हि कुर्यात्त्वङ्मांससंश्रयम् ॥ २१ ॥
उत्सेधं संहतं शोफं तमाहुर्निचयादतः ।
सर्वं

दुष्ट झालेला वायु पित्त, रक्त व कफ यांस बाहेरच्या शिरांत नेतो, नंतर पित्तादिकांनीं त्याची गति बंद झाल्यामुळें त्वचा व मांस यांच्यामध्यें जो स्थिर उंचवटा उत्पन्न करितो त्यास शोफ (सूज) असें म्हणतात. म्हणूनच सर्व शोफ त्रिदोषात्मक मानितात.

हेतुविशेषैस्तु रूपभेदान्नवात्मकम् ॥ २२ ॥
दोषैः पृथग् द्वयैः सर्वैरभिघाताद्विषादपि ।
द्विधा वा निजमागन्तुं सर्वाङ्गैकाङ्गजं च तम् ॥ २३ ॥
पृथून्नतग्रथिततताविशेषैश्च त्रिधा विदुः ।

निरनिराळ्या कारणांवरून व निरनिराळ्या लक्षणांवरून शोफाचे नऊ भेद करितात. प्रत्येक दोषापासून एकेक असे तीन, द्वंद्वज तीन, सान्निपातिक एक, अभिघातजन्य व विषजन्य असे नऊ प्रकार होतात. किंवा निज व आगंतुक, तसेंच सर्वांगजन्य व एकांगजन्य, अशा तऱ्हेनें त्याचे दोन प्रकार होतात. व विस्तृत, उंच व गांठाळलेला, अशा तऱ्हेनें तीन प्रकार होतात.

**सामान्यहेतुः शोफानां दोषजानां विशेषतः ॥ २४ ॥**

शोफांचीं पुढील कारणें सर्व शोफांस सामान्यतः व दोषजन्य शोफांस विशेषतः लागू आहेत.

**व्याधिकर्मोपवासादिक्षीणस्य भजतो द्रुतम् ।**
**अतिमात्रमथान्यस्य गुर्वम्लस्निग्धशीतलम् ॥ २५ ॥**
**लवणक्षारतीक्ष्णोष्णं शाकाम्बु स्वप्नजागरम् ।**
**मृद्ग्राम्यमांसवल्लूरमजीर्णश्रममैथुनम् ॥ २६ ॥**
**पदातेर्मार्गगमनं यानेन क्षोभिणाऽपि वा ।**
**श्वासकासातिसारार्शोजठरप्रदरज्वराः ॥ २७ ॥**
**विषूच्यलसकच्छर्दिगर्भवीसर्पपाण्डुताः ।**
**अन्ये च मिथ्योपक्रान्तास्तैर्दोषा वक्षसि स्थिताः २८**
**ऊर्ध्वं शोफमधोवस्तौ मध्ये कुर्वन्ति मध्यगाः ।**
**सर्वाङ्गगाः सर्वगतं प्रत्यङ्गेषु तदाश्रयाः ॥ २९ ॥**

रोग, वमनादि कर्में व उपवास इत्यादिकांनीं क्षीण होऊन वाईंनें जेवील तर त्यामुळें; तसेंच कोणीहि मनुष्य अति जड, आंबट, स्निग्ध, थंड, खारट, क्षारयुक्त, तीक्ष्ण, उष्ण, भाज्या, पाणी, झोंप, जागरण माती, ग्राम्यपशूंचें मांस, वाळलेलें मांस, अजीर्ण भोजन, श्रम व मैथुन, अतिशय सेवन करील तर त्यामुळें; पायांनीं चालल्यामुळें; शरीराचा क्षोभ करणाऱ्या अश्वादिक वाहनांवर बसून गेल्यानें; तसेंच श्वास, कास, अतिसार, मूळव्याध, उदर, प्रदर, ज्वर, विषूचिका ( मोडशी ), अलसक ( धडा ), वांति, गर्भ ( गर्भारपण ), विसर्प, पांडुरोग व दुसरेहि कांहीं रोग यांवर अयोग्य रीतीनें चिकित्सा केली असतां त्यांमुळें उदरांतील दोष कुपित झाले असतां वर, बस्तींत कुपित झाले असतां खालीं, व मध्यभागीं कुपित झाले असतां मध्यें, सर्व शरीरांतील दोष कुपित झाले असतां सर्व शरीरांत व एखाद्या अवयवांत कुपित झाले असतां त्या अवयवांत शोफ उत्पन्न करितात.

**तत्पूर्वरूपं दवथुः शिरायामोऽङ्गगौरवम् ।**

डोळे वगैरे ठिकाणांतून वाफा निघाल्यासारखें वाटणें, शिरा ताणणें, व अंग जड होणें हीं शोफाचीं पूर्वरूपें होत.

**वाताच्छोफश्चलो रूक्षः खररोमारुणासितः ॥ ३० ॥**
**सङ्कोचस्पन्दहर्षार्तितोदभेदप्रसुप्तिमान् ।**
**क्षिप्रोत्थानशमः शीघ्रमुन्नमेत्पीडितस्तनुः ॥ ३१ ॥**
**स्निग्धोष्णमर्दनैः शाम्येद्रात्रमल्पो दिवा महान् ।**
**त्वक् च सर्षपलिप्तेव तस्मिंश्चिमिचिमायते ॥ ३२ ॥**

त्यांत वायूपासून झालेला शोफ चंचळ ( एकाच जागीं न राहणारा ), रूक्ष, तांबूस व काळा असून त्यावरील केंस भरड ( रूक्ष ) होतात. तसेंच आकुंचन, कंप, कांटा येणें ( रोमांच ), वेदना, टणका, फूट व बधिरता ( मेहरी, सुप्तता ), हे प्रकार असतात. तो लवकरच उत्पन्न होतो व बराहि लवकरच होतो. दाबला असतां त्याची खळी लवकर बुजते, पातळ असतो, स्निग्ध व उष्ण पदार्थ मर्दन केल्यानें बरा होतो, रात्रीं कमी व दिवसा जास्त होतो. व त्वचेवर मोहोरी वांटून तिचा लेप केल्याप्रमाणें त्वचा चुरचुरते.

**पीतरक्तासिताभासः पित्तादाताम्ररोमकृत् ।**
**शीघ्रानुसारप्रशमो मध्ये प्राग्जायते तनुः ॥ ३३ ॥**
**सतृड्दाहज्वरस्वेददवक्लेदमदभ्रमः ।**
**शीताभिलाषी विड्भेदी गन्धी स्पर्शासहो मृदुः ॥३४॥**

पित्तजन्य शोफ लाल व काळसर असून त्यावरील केंसहि तांबूस रंगाचे होतात. हा लवकरच पसरतो व बरा होतो. हा प्रथम मध्यभागीं होतो. पातळ व मऊ असून त्यावर हात लाववत नाहीं. त्यास घाण येते व थंड पदार्थ लाविले असतां बरें वाटतें; आणि तहान, दाह, ज्वर, घाम, दवथु ( नेत्रादिकांतून कडक वाफा निघणें ), क्लेद, मद व भोंवळ हे प्रकार असतात.

**कण्डूमान् पाण्डुरोमत्वक्कठिनः शीतलो गुरुः ।**
**स्निग्धः श्लक्ष्णः स्थिरः स्त्यानो निद्राच्छर्द्यग्निसादकृत्**
**आक्रान्तो नोन्नमेत्कृच्छ्रशमजन्मा निशाबलः ।**
**स्रवेन्नासृक्चिरात्पिच्छां कुशशस्त्रादिविक्षतः ॥ ३६ ॥**
**स्पर्शोष्णकाङ्क्षी च कफात्**

कफापासून आलेल्या शोफांत खंड असते, त्वचा व केंस पांडुरवर्णाचे असतात, शोफ ( सूज ) कठिण, थंड, जड, स्निग्ध, गुळगुळीत, स्थिर व वट्ट असतो; त्यापासून झोंप, वांति व अग्निमांद्य हे विकार होतात तो दाबला तर खळी पडते, तो उत्पन्न होतांना व बरा होण्यास फार त्रास पडतो, रात्रीं बळावतो, त्यावर दर्भ व शस्त्र इत्यादिकांनीं कापलें असतां फार वेळानें पिच्छा स्रवते, रक्त येत नाहीं व त्यास स्पर्श केल्यानें किंवा उष्ण उपचारानें बरें वाटतें.

**यथास्वं द्वन्द्वजास्त्रयः ।**

**सङ्कराद्धेतुलिङ्गानां**

दोन दोषांचीं कारणें व लक्षणें झाल्यावरून जे तीन प्रकारचे द्वंद्वज शोफ ते ओळखावे.

**निचयान्निचयात्मकः ॥ ३७ ॥**

तिन्ही दोषांच्या कारणांपासून तिहींच्या लक्षणांनीं युक्त जो शोफ होतो तो त्रिदोषात्मक होय.

**अभिघातेन शस्त्रादिच्छेदभेदक्षतादिभिः ।**
**हिमानिलोदध्यनिलैर्भल्लातकपिकच्छुजैः ॥ ३८ ॥**
**रसैः शूकैश्च संस्पर्शाच्छ्वयथुः स्याद्विसर्पवान् ।**
**भृशोष्मा लोहिताभासः प्रायशः पित्तलक्षणः ॥ ३९ ॥**

शस्त्रादिकांनीं कापलें असतां, फुटलें असतां व क्षत झालें असतां त्यामुळें, थंड वारा लागल्यामुळें, समुद्राचा वारा लागल्यामुळें, बिब्याचें तेल अंगास लावल्यानें, कुयलीचीं कुसें अंगास लागल्यामुळें वगैरे जो पसरणारा शोफ उत्पन्न होतो त्यास अभिघातज शोफ म्हणतात. तो कढत असून लाल असतो व बहुधा पित्ताचीं लक्षणें यांत असतात.

विषजः सविषप्राणिपरिसर्पणमूत्रणात् ।
दंष्ट्रादन्तनखापातादविषप्राणिनामपि ॥ ४० ॥
विण्मूत्रशुक्रोपहतमलवद्वस्त्रसङ्करात् ।
विषवृक्षानिलस्पर्शाद्गरयोगावचूर्णनात् ॥ ४१ ॥
मृदुश्चलोऽवलम्बी च शीघ्रो दाहरुजाकरः ।

विषारी प्राणी अंगावरून गेल्यानें किंवा अंगावर मुतल्यानें, व निर्विष प्राण्यांचेहि दाढा, दांत व नखें अंगास लागल्यानें, मळ, मूत्र व शुक्र यांनीं माखलेलें व मळकट वस्त्र पांघरल्यानें, विषारी झाडावरचा वारा लागल्यानें व कृत्रिम विष अंगास लागल्यानें जो मऊ, चंचल (एकाच जागीं न राहणारा) व मांसास लागलेला शोफ उत्पन्न होतो तो विषजन्य होय. तो लवकर उत्पन्न होतो आणि त्यांत दाह व वेदना असतात.

नवोऽनुपद्रवः शोफः साध्योऽसाध्यः पुरेरितः ॥ ४२ ॥

शोफ नवीन असून उपद्रव झाले नसले म्हणजे साध्य होतो व असाध्य मागें सांगितलाच आहे. (शा० अ० ५, श्लोक ९२.)

स्याद्विसर्पोऽभिघातान्तैर्दोषदूष्यैश्च शोफवत् ।

अभिघातजन्यशोफापर्यंत जे सुजेचे दोष व दूष्यें सांगितलीं आहेत त्यांनींच सुजेप्रमाणें विसर्प होतो. (म्ह० विसर्पांतील दोष व दूष्यें तींच असतात.)

त्र्यधिष्ठानं च तं प्राहुर्बाह्यान्तरुभयाश्रयात् ॥ ४३ ॥
यथोत्तरं च दुःसाध्याः

स्थानपरत्वें विसर्पाचे तीन प्रकार करितात. बाह्य, आंतर व अंतर्बाह्य, हे एकापेक्षां एक अनुक्रमें दुःसाध्य आहेत.

तत्र दोषा यथायथम् ।
प्रकोपणैः प्रकुपिता विशेषेण विदाहिभिः ॥ ४४ ॥
देहे शीघ्रं विसर्पन्ति तेऽन्तरन्तः स्थिता बहिः ।
बहिस्था द्वितये द्विस्थाः

त्यांत आपआपल्या कारणांनीं व विशेषतः विदाही पदार्थांनीं कुपित झालेले दोष आंत (कोठ्यांत) असले म्हणजे आंत, बाहेर (त्वचेंत) असले म्हणजे बाहेर व आंत आणि बाहेर असले म्हणजे दोहोंकडे शरीरांत त्वरित पसरतात.

विद्यात्तत्रान्तराश्रयम् ॥ ४५ ॥
मर्मोपघातात्संमोहादयनानां विघट्टनात् ।
तृष्णातियोगाद्वेगानां विषमं च प्रवर्तनात् ॥ ४६ ॥
आशु चाग्निबलभ्रंशात्

मर्मांत अतिशय वेदना, मोह, नासादि द्वारांचें स्फुरण, अतिशय तहान, मलमूत्रादिकांचे वेग अनियमितपणानें प्रवृत्त होणें, अग्नि व शक्ति त्वरित क्षीण होणें हीं लक्षणें अंतर्विसर्पांत होतात.

अतो बाह्यं विपर्ययात् ।

बाह्य विसर्पांत वरील लक्षणें नसतात.

तत्र वातात्परीसर्पो वातज्वरसमव्यथः ॥ ४७ ॥
शोफस्फुरणनिस्तोदभेदायामार्तिहर्षवान् ।

वातविसर्पांत वातज्वरासारख्या पीडा होतात, तसेंच सूज, स्फुरण, टोंचणी, फूट, ताण, वेदना व अंगावर कांटा येणें हीं लक्षणें असतात.

पित्ताद्द्रुतगतिः पित्तज्वरलिङ्गोऽतिलोहितः ॥ ४८ ॥

पित्तविसर्प फार लवकर पसरतो, तो फार लाल असतो व पित्तज्वराचीं लक्षणें असतात.

कफात्कण्डूयुतः स्निग्धः कफज्वरसमानरुक् ।

कफविसर्प स्निग्ध असून त्यास कंड असते आणि त्याच्या वेदना कफज्वरासारख्या असतात.

स्वदोषलिङ्गैश्चीयन्ते सर्वे स्फोटैरुपेक्षिताः ॥ ४९ ॥
ते पक्वाभिन्नाः स्वं स्वं च बिभ्रति व्रणलक्षणम् ।

कोणत्याहि विसर्पाची उपेक्षा केली असतां त्यावर त्या त्या दोषांच्या लक्षणांनीं युक्त असे पुष्कळ फोड येतात, ते फोड पिकून फुटले असतां व्रण होतात व त्या व्रणांचीं लक्षणें त्या त्या दोषाला अनुरूप असतात.

वातपित्ताज्ज्वरच्छर्दिमूर्च्छातीसारतृड्भ्रमैः ॥ ५० ॥
अस्थिभेदाग्निसदनतमकारोचकैर्युतः ।
करोति सर्वमङ्गं च दीप्ताङ्गारावकीर्णवत् ॥ ५१ ॥
यं यं देशं विसर्पश्च विसर्पति भवेत्स सः ।
शान्ताङ्गारासितो नीलो रक्तो वाशु च चीयते ॥५२॥
अग्निदग्ध इव स्फोटैः शीघ्रगत्वाद्द्रुतं च सः ।
मर्मानुसारी वीसर्पः स्याद्वातोऽतिबलस्ततः ॥ ५३ ॥
व्यथेताङ्गं हरेत्संज्ञां निद्रां च श्वासमीरयेत् ।
हिध्मां च स गतोऽवस्थामीदृशीं लभते न ना ॥५४॥
क्वचिच्छर्मारतिग्रस्तो भूमिशय्यासनादिषु ।
चेष्टमानस्ततः क्लिष्टो मनोदेहश्रमोद्भवाम् ॥ ५५ ॥
दुष्प्रबोधोऽश्नुते निद्रां सोऽग्निवीसर्प उच्यते ।

वातपित्तापासून जो विसर्प होतो त्यांत ज्वर, वांति, मूर्च्छा, अतिसार, तहान, भ्रम, हाडांत फूट, अग्निमांद्य, तमकश्वास, अरुचि हे विकार असतात; सर्व अंगावर निखारे ओतल्याप्रमाणें अतिशय आग होते; तसेंच जिकडे जिकडे विसर्प पसरतो तो तो भाग कोळशासारखा काळा, निळा किंवा लाल होतो; विस्तवानें भाजल्याप्रमाणें त्यावर फार लवकर फोड येतात; तो फार जलद पसरत असल्यामुळें मर्मापर्यंत जातो; त्यामुळें वायु बलवान् होऊन सर्व अंगांत व्यथा उत्पन्न

करितो; शुद्धि व झोंप हीं नाहींशीं होतात; उचकी व दमा लागतो; रोग्याची अशी अवस्था झाली म्हणजे त्यास कोठेंहि बरें वाटेनासें होतें. चैन पडत नाहीं; जमीन, अंथरूण व आसन यांवर लोळतो व त्यामुळें त्यास अतिशय क्लेश होऊन मनाच्या व शरीराच्या श्रमापासून झोंप येते व तो तींतून जागा होण्यास फार प्रयास पडतात. या विसर्पास अग्निविसर्प असें म्हणतात.

कफेन रुद्धः पवनो भित्त्वा तं बहुधा कफम् ॥ ५६ ॥
रक्तं वा वृद्धरक्तस्य त्वक्सिरास्नावमांसगम् ।
दूषयित्वा च दीर्घाणुवृत्तस्थूलखरात्मनाम् ॥ ५७ ॥
ग्रन्थीनां कुरुते मालां रक्तानां तीव्ररुग्ज्वराम् ।
श्वासकासातिसारास्यशोषहिध्मावमिभ्रमैः ॥ ५८ ॥
मोहवैवर्ण्यमूर्च्छाङ्गभङ्गाग्निसदनैर्युताम् ।
इत्ययं ग्रन्थिर्वीसर्पः कफमारुतकोपजः ॥ ५९ ॥

कफानें वायु कोंडला असतां तो वायु त्या कफाचे अनेक विभाग करून व त्यास दुष्ट करून किंवा ज्याचें रक्त वाढलें आहे अशा मनुष्याच्या त्वचा, शिरा, स्नायु व मांस यांतील रक्ताचे अनेक विभाग करून व त्यास दूषित करून लांब, आंखूड, वाटोळे, विस्तीर्ण व खरखरीत अशा लाल ग्रंथींची माळ उत्पन्न करितो; त्यांत वेदना व ताप जबर असतात; श्वास, खोकला, अतिसार, तोंडास कोरड, उचकी, वांति, भ्रम, मोह, विवर्णता, मूर्च्छा, अंग मोडणें व अग्निमांद्य हे विकार असतात; कफ व वायु यांच्या कोपापासून होणाऱ्या विसर्पास ग्रंथिविसर्प म्हणतात.

कफपित्ताज्ज्वरः स्तम्भो निद्रातन्द्राशिरोरुजः ।
अङ्गावसादविक्षेपप्रलापारोचकभ्रमाः ॥ ६० ॥
मूर्च्छाग्निहानिर्भेदोऽस्थ्नां पिपासेन्द्रियगौरवम् ।
आमोपवेशनं लेपः स्रोतसां स च सर्पति ॥ ६१ ॥
प्रायेणामाशये गृह्णन्नेकदेशं न चातिरुक् ।
पिटकैरवकीर्णोऽति पीतलोहितपाण्डुरैः ॥ ६२ ॥
मेचकाभोऽसितः स्निग्धो मलिनः शोफवान् गुरुः ।
गम्भीरपाकः प्राज्योष्मा स्पृष्टः क्लिन्नोऽवदीर्यते ॥ ६३ ॥
पङ्कवच्छीर्णमांसश्च स्पष्टस्नायुसिरागणः ।
शवगन्धिश्च वीसर्पं कर्दमाख्यमुशन्ति तम् ॥ ६४ ॥

कफपित्तजन्य विसर्पांत ज्वर, अंग ताठणें, झोंप, झांपड, डोकें दुखणें, अंगग्लानि, हातपाय टाकणें, बडबड, अरुचि, भ्रम, मूर्च्छा, अग्निमांद्य, हाडांत फूट, तहान, इंद्रियें जड होणें, अपक्व मळ होणें, व स्रोतांत चिकटा येणें हीं लक्षणें असतात. हा विसर्प प्रायः आमाशयावरील एक भाग धरून पसरतो, फारशी वेदना नसते, त्यावर पिंवळ्या, लाल व पांढुर वर्णाच्या पुष्कळ पुळ्या येतात; निळा, काळा, स्निग्ध, मळकट, सुजलेला व जड असतो; त्यांत खोल पाक होतो, तो फार कढत असतो, क्लेदमय असतो, व त्यास स्पर्श केला असतां फुटतो; मांस कुजून चिखलासारखा होतो; अनेक शिरा व स्नायु त्याच्या तळाक्यांत सांपडतात, त्यांस मढ्यासारखी घाण येते. या विसर्पास कर्दमविसर्प म्हणतात.

सर्वजो लक्षणैः सर्वैः सर्वधात्वतिसर्पणः ।

त्रिदोषात्मक विसर्पांत तिन्ही दोषांचीं लक्षणें असून तो सर्व धातूंत अतिशय पसरतो.

बाह्यहेतोः क्षतात्क्रुद्धः सरक्तं पित्तमीरयन् ॥ ६५ ॥
विसर्पं मारुतः कुर्यात्कुलत्थसदृशैश्चितम् ।
स्फोटैः शोफज्वररुजादाहाढ्यं श्यावलोहितम् ॥ ६६ ॥

क्षत झालें असतां बाह्य कारणानें वायु कुपित होऊन रक्त व पित्त यांस प्रेरित करून जो विसर्प उत्पन्न करितो त्यास क्षतविसर्प म्हणतात. त्यावर कुळथासारखें पुष्कळ फोड येतात. तो काळसर व लाल असून सूज, ताप, वेदना व दाह हीं लक्षणें अधिक असतात.

पृथग्दोषैस्त्रयः साध्याः द्वन्द्वजाश्चानुपद्रवाः ।
असाध्यौ क्षतसर्वोत्थौ सर्वे चाक्रान्तमर्मकाः ॥ ६७ ॥
शीर्णस्नायुसिरामांसाः प्रक्लिन्नाः शवगन्धयः ।

वात, पित्त व कफ यांपासून झालेले तीन विसर्प व उपद्रवरहित द्वंद्वज विसर्प हे साध्य होत. क्षतविसर्प व त्रिदोषविसर्प हे असाध्य आहेत. मर्मावर गेले असतां सर्वच असाध्य होतात. स्नायु, शिरा व मांस कुजून गळलीं असतां, क्लेदमय झालें असतां व मढ्यासारखी घाण येत असल्यासहि ते असाध्य होत.

---

# चतुर्दशोऽध्यायः

## अध्याय १४ वा.

## अथातः कुष्ठश्वित्रक्रिमिनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां कुष्ठ, श्वित्र व कृमि यांचें निदान सांगतों.

मिथ्याहारविहारेण विशेषेण विरोधिना ।
साधुनिन्दावधान्यस्वहरणाद्यैश्च सेवितैः ॥ १ ॥
पाप्मभिः कर्मभिः सद्यः प्राक्तनैः प्रेरिता मलाः ।
सिराः प्रपद्य तिर्यग्गास्त्वग्लसीकासृगामिषम् ॥ २ ॥
दूषयन्ति श्लथीकृत्य निश्चरन्तस्ततो बहिः ।
त्वचः कुर्वन्ति वैवर्ण्यं दुष्टाः कुष्ठमुशन्ति तत् ॥ ३ ॥

अयोग्य आहार व विहार केल्यानें व विशेषतः विरुद्ध पदार्थ सेवन केल्यानें; तसेंच सत्पुरुषांची निंदा व वध, दुसऱ्याचें द्रव्य हिरावून घेणें, इत्यादिक पूर्वजन्मीं किंवा या जन्मीं केलेल्या पापकर्मांनीं प्रेरित झालेले दोष दुष्ट होऊन तिर्यक् जाणाऱ्या शिरांत (४ धमन्यांत) जाऊन त्वचा, लस, रक्त व मांस यांस दुष्ट व शिथिल करून नंतर बाहेर येऊन त्वचेचा वर्ण फिरवितात. या विकारास कुष्ठ असें म्हणतात.

कालेनोपेक्षितं यस्मात्सर्वं कुष्णाति तद्वपुः ।
प्रपद्य धातून्व्याप्यान्तः सर्वान् संक्लेद्य चावहेत् ॥ ४ ॥

सस्वेदक्लेदसंकोथान् कृमीन्सूक्ष्मान्सुदारुणान्।
रोमत्वक्स्नायुधमनीतरुणास्थीनि यैः क्रमात् ॥ ५ ॥
भक्षयेच्छ्वित्रमस्माच्च कुष्ठवाहासुदाहृतम्।

कोणत्याहि कुष्ठाची उपेक्षा केली असतां कांहीं काळानें तें सर्व शरीर कुरतडून खाऊन टाकितें व सर्व धातूंत जाऊन त्यांस व्यापून त्यांस क्लेदमय करितें; तसेंच स्वेद, क्लेद व कोथ ( सडणें ) यांनीं युक्त असे बारीक पण भयंकर कृमि उत्पन्न करितें व त्या कृमींकडून रोम, त्वचा, स्नायु, धमन्या व तरुणास्थि यांस क्रमानें खाववितें म्हणून त्यास कुष्ठ असें म्हणतात व श्वित्रांत असा प्रकार होत नाहीं म्हणून त्यास कुष्ठापासून निराळें काढितात.

कुष्ठानि सप्तधा दोषैः पृथङ्मिश्रैः समागतैः ॥ ६ ॥

कुष्ठें सात प्रकारांनीं होतात. वातानें, पित्तानें व कफानें तीन; संसर्गानीं तीन व सातवें सन्निपातानें होतें.

सर्वेष्वपि त्रिदोषेषु व्यपदेशोऽधिकत्वतः।

वास्तविक पाहतां सर्व कुष्ठें, जरी त्रिदोषात्मक आहेत तरी जो दोष अधिक असेल तदनुरूप त्यांस नांवें प्राप्त होतात.

वातेन कुष्ठं कापालं पित्तादौदुम्बरं कफात् ॥ ७ ॥
मण्डलाख्यं विचर्चीं च ऋक्षाख्यं वातपित्तजम्।
चर्मैककुष्ठकिटिभसिध्मालसविपादिकाः ॥ ८ ॥
वातश्लेष्मोद्भवाः श्लेष्मपित्ताद्दद्रुशतारुषी।
पुण्डरीकं सविस्फोटं पामा चर्मदलं तथा ॥ ९ ॥
सर्वैः स्यात्काकणं पूर्वं त्रिकं दद्रुसकाकणम्।
पुण्डरीकर्क्षजिह्वे च महाकुष्ठानि तत्र तु ॥ १० ॥

वायूपासून कापाल, पित्तापासून औदुंबर, कफापासून मंडल व विचर्ची, वातपित्तापासून ऋक्षजिव्ह, वातकफापासून चर्म, एककुष्ठ, किटिभ, सिध्म, अलस व विपादिका, कफपित्तापासून दद्रु, शतारु, पुंडरीक, विस्फोट, पामा व चर्मदल आणि त्रिदोषापासून काकण कुष्ठ होतें. त्यांत कापाल, औदुंबर, मंडल, दद्रु, काकण, पुंडरीक, व ऋक्षजिव्ह हीं सात *महाकुष्ठें होत.

अतिश्लक्ष्णखरस्पर्शस्वेदास्वेदविवर्णताः।
दाहः कण्डूस्त्वचि स्वापस्तोदः कोठोन्नतिः श्रमः ॥ ११ ॥
व्रणानामधिकं शूलं शीघ्रोत्पत्तिश्चिरस्थितिः।
रूढानामपि रूक्षत्वं निमित्तेऽल्पेऽपि कोपनम् ॥ १२ ॥
रोमहर्षोऽसृजः कार्ष्ण्यं कुष्ठलक्षणमग्रजम्।

कुष्ठ होण्याच्या पूर्वी अंग अतिशय गुळगुळीत किंवा खरखरीत लागतें, घाम जास्त येतो किंवा मुळींच येत नाहीं, त्वचेचा रंग बदलतो, दाह होतो, कंड येते, त्वचा बहिरी होते व टोंचणी लागते, त्वचेवर गांधी येतात, आयासावांचूनच श्रम होतात, व्रण झालेले

---

* यांत ७ महाकुष्ठें सांगितलीं आहेत. यासंबंधानें आम्हांस तीन गोष्टी सांगावयाच्या आहेत. एक अशी कीं, कुष्ठ या सदराखालीं खरजेसारख्या क्षुद्र रोगापासून तों रक्तपितीसारख्या महारोगापर्यंत सर्व त्वग्रोगांचा अंतर्भाव जो आपल्या वैद्यकांत केलेला आढळतो तो हल्लींच्या विद्वानांना अगदीं अशास्त्रीय वाटण्यासारखा आहे. तसेंच जरी या रोगाचे क्षुद्र व महाकुष्ठ असे दोन पोटभेद केले आहेत तरी निदान व चिकित्सा यांत नुसता कुष्ठ हाच शब्द वारंवार असल्यामुळें तो या दोहोंपैकीं कोणत्यास ( किंवा दोहोंसहि ) उद्देशून आहे याविषयीं संदेह उत्पन्न होतो. या अध्यायाचे आरंभींच कुष्ठ शब्दाची जी निरुक्ति केली आहे व जें त्याचें निदान सांगितलें आहे तें सर्व कुष्ठांस सामान्य नाहीं. कालेनोपेक्षितं यस्मात् सर्वं पुष्णाति तद्वपुः। इ० वर्णन महाकुष्ठासंबंधानेंच घेतलें पाहिजे ( तेषां तु महत्त्वं. क्रियागुरुत्वमुत्तरोत्तरं धात्वनुप्रवेशाच्चासाध्यत्वं चेति सुश्रुतः ) जर ग्रंथकर्त्याला कुष्ठ याचे पुढें दोन पोटभेद करावयाचे होते तर प्रथम त्या शब्दाची व्यापक अशी निरुक्ति केली पाहिजे होती. दुसरी गोष्ट अशी कीं, महाकुष्ठामध्यें जे रोग अंतर्भूत करावयाचे त्यासंबंधानें चरक व सुश्रुत यांची एकवाक्यता नाहीं. चरकानें कापाल, उदुंबर, मंडल, सिध्म, ऋष्यजिव्ह, पुंडरीक व काकण हीं सात महाकुष्ठें आहेत असें सांगितलें आहे. सुश्रुतानें अरुण, उदुंबर, ऋष्यजिव्ह, कापाल, काकण, पुंडरीक व दद्रु हीं सात महाकुष्ठें मानिलीं आहेत. वाग्भटानें चरकाचेंच अनुकरण केलें आहे. परंतु त्यानें सिध्म हें महाकुष्ठांत घातलेलें त्याला पसंत न पडल्यामुळें तें काढून टाकून सुश्रुताचें दद्रुकुष्ठ त्याचेऐवजीं घेतलें आहे. हा घोंटाळा कशामुळें ? सुश्रुतोक्त अरुणकुष्ठाचें वाग्भट व चरक यांनीं काय केलें ? व सिध्म हें केवळ त्वचेवरचा कोरडा विकार असून ( हल्लींच्या अनुभवानें व सुश्रुत व वाग्भट यांच्या मतानें ) चरकानें अल्पकण्डूदाहपूयलसिकानि अल्पभेदकृमीणि इत्यादि वर्णन करून त्याला महाकुष्ठ कां मानलें ? इत्यादि गोष्टी विचारार्ह आहेत व त्यासंबंधानें आम्हांस बरेच विचार सुचलेहि आहेत. परंतु विस्तारभयास्तव तूर्त येथें जास्त सांगतां येत नाहीं. दुसऱ्या एखादे प्रसंगीं ते विचार आम्ही प्रगट करूं. तिसरी गोष्ट अशी कीं, हल्लीं ज्याला रक्तपिती म्हणतात त्याचें संस्कृत नांव महाकुष्ठ हें असून या प्रांतांतील बहुतेक वैद्य 'वातरक्त' म्हणजे रक्तपिती असें समजतात व शार्ङ्गधर वगैरेंच्या भाषांतरकारांनीं 'वातरक्त' याचें भाषांतर 'रक्तपिती' असेंच केलेलें आहे. वातरक्त हें नांव पूर्वी गौट नांवाच्या एका संधिविकारास लावीत असत असें आम्हीं उपोद्घातांत सुचविलेंच आहे. ( उपोद्घात पाहा. ) वातरक्त म्हणजे रक्तपिती नव्हे असें जें आम्ही म्हणतों याचीं कारणें येणेंप्रमाणें:—( १ ) रक्तपिती हा संसर्गजन्य व महारोग मानला जातो. परंतु कुष्ठरोगाप्रमाणें वातरक्ताची गणना अष्ट महाव्याधींमध्यें किंवा संसर्गजन्य रोगांत केलेली आढळत नाहीं. ( २ ) कुष्ठाला पापरोग ही संज्ञा सुश्रुतादिकांनीं दिलेली आढळते तशी वातरक्तास दिलेली आढळत नाहीं ( सु. चि. ९ ). ( ३ ) सुश्रुतानें वातरक्त हें एके ठिकाणीं ( सु. सू. २१ ) श्लीपदादि पादाश्रित रोगांमध्यें व अन्यत्र ( नि. व चि. स्थानांत ) वातव्याधी-मध्यें अंतर्भूत केलें आहे. ( ४ ) उदुंबरादि सप्त महाकुष्ठांचीं लक्षणें व चिकित्सा हल्लींच्या रक्तपितीशीं पूर्णपणें जुळतात. वातरक्ताचीं पूर्वरूपें मात्र रक्तपितीशीं ग्रंथकर्त्याच्या मतें जुळतात. पण इतर गोष्टींत मुळींच साम्य नाहीं. इत्यादि अनेक कारणांवरून वातरक्त म्हणजे रक्तपिती नव्हे व महाकुष्ठ हेंच तिचें खरें नांव आहे हें उघड आहे. ग्रीक भाषेंतील Podagra ( पादाग्ररोग ) हे नांवहि सुश्रुतोक्त वातरक्ताच्या स्थानाशीं जुळतें. एवढेंच नव्हे तर वातरक्त याचा पर्याय 'खुड' हा शब्द तर इंग्रजी भाषेंतील गौट Gout शब्दाचें मूळरूपच असावें असें दिसतें. वातरक्त हा विकार आपल्या लोकांत प्राचीन काळीं फार असावा असें दिसतें. व हल्लीं तो फारच क्वचित् व कांहीं लोकांत व प्रांतांत मुळींच नसल्यामुळें तो अलिकडील वैद्यांच्या पाहण्यांत आला नाहीं व म्हणून त्यांनीं तो रक्तपिती या अर्थानें गैरसमजुतीनें घेतला असावा.

असल्यास ते फारच दुखूं लागतात. ते लवकर उत्पन्न होतात. व फार दिवस राहतात. भरून आले तरी रूक्ष होतात व थोडेंसें जरी कारण झालें तरी पुनः जोर करितात. अंगावर कांटा येतो व रक्त काळें होतें.

कृष्णारुणकपालाभं रूक्षं सुप्तं खरं तनु ॥ १३ ॥
विस्तृतासमपर्यन्तं दूषितैर्लोमभिश्चितम् ।
तोदाढ्यमल्पकण्डूकं कापालं शीघ्रसर्पि च ॥ १४ ॥

काळ्या व तांबूस खापरासारखें रूक्ष, बधिर, खरखरीत, पातळ असून ज्याच्या कडा फार पसरलेल्या व वेड्यावांकड्या असतात, ज्याच्यावरील केंस दूषित होतात, ज्यांत टोंचणी फार असते व कंड कमी असते आणि जें लवकर पसरतें त्यास कापाल कुष्ठ असें म्हणतात.

पक्वोदुम्बरताम्रत्वग्रोमगौरसिराचितम् ।
बहलं बहलक्लेदरक्तं दाहरुजाधिकम् ॥ १५ ॥
आशूत्थानावदरणक्रिमि विद्यादुदुम्बरम् ।

ज्यावरील त्वचा व केंस पिकलेल्या उंबराप्रमाणें लाल असतात व पांढऱ्या शिरांनीं जें व्याप्त असतें, जाड असून ज्यांत क्लेद व रक्त दाट असतात, ज्यांत दाह व वेदना फार असतात, ज्यांत उत्पत्ति विदारण ( फुटणें ) व कृमि होणें ह्या गोष्टी लवकर होतात त्यास औदुंबर कुष्ठ म्हणतात.

स्थिरं स्त्यानं गुरु स्निग्धं श्वेतरक्तमनाशुगम् ॥ १६ ॥
अन्योन्यसक्तमुत्सन्नं बहुकण्डूस्रुतिक्रिमि ।
श्लक्ष्णपीताभपर्यन्तं मण्डलं परिमण्डलम् ॥ १७ ॥

घट्ट, दाट, जड, स्निग्ध, पांढरें किंवा लाल, लवकर न पसरणारें, एकमेकांस लागलेलें, वर उचललेलें, वाटोळें असें असून ज्यांत कंडु, स्राव व किडे फार असतात व ज्याच्या कडा गुळगुळीत पिंवळट असतात त्यास मंडलकुष्ठ असें म्हणतात.

सकण्डूपिटिका श्यावा लसीकाढ्या विचर्चिका ।

विचर्चिका कुष्ठाचा रंग सांवळा असून त्यास लस फार येते व कंड आणि पुळ्या असतात.

परुषं तनु रक्तान्तमन्तः श्यावं समुन्नतम् ॥ १८ ॥
सतोददाहरुक्क्लेदं कर्कशैः पिटकैश्चितम् ।
ऋक्षजिह्वाकृति प्रोक्तमृक्षजिह्वं बहुक्रिमि ॥ १९ ॥

खरखरीत, पातळ व वर उचललेलें असून ज्याच्या कडा लाल व मध्यभागीं काळसर असतात, ज्यांत टोंचणी, दाह, वेदना व क्लेद असतो, ज्यावर पुष्कळ खरखरीत पिटक ( पुळ्या ) असतात, ज्यांत फार किडे असतात व जें ऋष्या* ( ऋक्षा ) च्या जिभेसारखें ( खरखरीत ) असतें त्यास ऋक्षजिव्ह म्हणतात.

हस्तिचर्मखरस्पर्शं चर्म

चर्मकुष्ठ हत्तीच्या चामड्याप्रमाणें खरखरीत असतें.

एकाख्यं महाश्रयम् ।
अस्वेदं मत्स्यशकलसन्निभम्

एककुष्ठ फार पसरलेलें असतें, त्या ठिकाणीं घाम येत नाहीं व तें माशांच्या खवल्यासारखें असतें.

किटिभं पुनः ॥ २० ॥
रूक्षं किणखरस्पर्शं कण्डूमत्परुषासितम् ।

रूक्ष, घट्ट्याप्रमाणें खरखरीत लागणारें, कंडूयुक्त, कठिण व काळें जें कुष्ठ त्यास किटिभ म्हणतात.

सिध्मं रूक्षं बहिः स्निग्धमन्तर्घृष्टे रजः किरेत् ॥ २१ ॥
श्लक्ष्णस्पर्शं तनु श्वेतताम्रं दौग्धिकपुष्पवत् ।
प्रायेण चोर्ध्वकाये स्यात्

सिध्मकुष्ठ ( शिबें ) बाहेरून रूक्ष व आंतून स्निग्ध असून घांसलें असतां भूस पडतें, हातास गुळगुळीत लागतें, पातळ असून दुध्या भोपळीच्या फुलासारखा त्याचा तांबुसपांढरा रंग असतो व हें बहुधा शरीराच्या वरल्या भागीं ( कमरेच्यावर ) होतें.

गण्डैः कण्डुयुतैश्चितम् ॥ २२ ॥
रक्तैरलसकं

ज्यांत लाल गांठी असतात त्यास अलसक म्हणतात; त्या गांठीस कंड असते.

पाणिपाददार्यो विपादिकाः ।
तीव्रार्त्यो मन्दकण्ड्वश्च सरागपिटिकाचिताः ॥ २३ ॥

ज्यांत हात व पाय यांवर भेगा पडतात, तीव्र वेदना व किंचित् कंड असते, व पुष्कळ लाल पुळ्या असतात त्यास विपादिका म्हणतात.

दीर्घप्रताना दूर्वावदतसीकुसुमच्छविः ।
उत्सन्नमण्डला दद्रूः कण्डूमत्यनुषङ्गिणी ॥ २४ ॥

दूर्वेप्रमाणें ज्याचे ताणे लांब पसरलेले असून ज्याचा रंग अळशीच्या फुलासारखा ( निळा ) असतो, ज्याचीं मंडलें उचललेलीं व एकमेकांस लागलेलीं व कंडूयुक्त असतात, त्यास दद्रू म्हणतात.

स्थूलमूलं सदाहार्ति रक्तश्यावं बहुव्रणम् ।
शतारुः क्लेदजन्त्वाढ्यं प्रायशः पर्वजन्म च ॥ २५ ॥

ज्याचीं मुळें मोठीं असतात, ज्यांत दाह व वेदना असते, जें लाल व काळसर असतें, ज्यावर पुष्कळ व्रण असतात ( चिघळतें ), ज्यांत क्लेद व किडे फार असतात व जें बहुधा सांध्यावर होतें त्यास शतारु म्हणतात.

रक्तान्तमन्तरा पाण्डु कण्डूदाहरुजान्वितम् ।
सोत्सेधमाचितं रक्तैः पद्मपत्रमिवांशुभिः ॥ २६ ॥
घनभूरिलसीकासृक्प्रायमाशु विभेदि च ।
पुण्डरीकं

ज्याच्या कडा लाल असून मध्यभाग पांढुर असतो, ज्यांत कंड, दाह व वेदना असतात, जें उचललेलें असतें, ज्यावर कमळाच्या

*एक प्रकारचा हरिण.

पानांप्रमाणें लाल शिरा असतात, ज्यांतून दाट व पुष्कळ अशी लस व रक्त वाहतें व जें लवकर फुटतें त्यास पुंडरीक म्हणतात.

तनुत्वगभिश्रितं स्फोटैः सितारुणैः ॥ २७॥

विस्फोटं

पातळ त्वचेचे, फिकट, तांबूस व इकडे तिकडे पसरलेले. जे फोड त्यांस विस्फोटक म्हणतात.

पिटिकाः पामा कण्डूक्लेदरुजाऽधिकाः ।
सूक्ष्माः श्यावारुणा बह्व्यः प्रायः स्फिक्पाणिकूर्परे

बारीक व काळसर, तांबूस अशा, बहुधा कुले, हात व कोपर यांवर ज्या पुष्कळ पुळ्या होतात, त्यांस पामा म्हणतात. यास कंड, क्लेद व वेदना फार असतात.

सस्फोटमस्पर्शसहं कण्डूषालोदाहवत् ।
रक्तं दलच्चर्मदलं

ज्यावर फोड असतात, ज्यास हात लाववत नाहीं, ज्यास कंडू, चुरचुर, टोंचणी व दाह हीं असतात व जें लाल असून फुटत असतें त्यास चर्मदल म्हणतात.

काकणं तीव्रदाहरुक् ॥ २९॥
पूर्वं रक्तं च कृष्णं च काकणन्तीफलोपमम् ।
कुष्ठलिङ्गैर्युतं सर्वैर्नैकवर्णं ततो भवेत् ॥ ३०॥

काकण कुष्ठांत दाह व वेदना फार उग्र असतात, तें प्रथम गुंजेप्रमाणें लाल व काळें असतें आणि कुष्ठाचीं सर्व लक्षणें झालीं म्हणजे अनेक वर्णांचें होतें.

दोषभेदीयविहितैरादिशेल्लिङ्गकर्मभिः ।
कुष्ठेषु दोषोल्बणतां

दोषभेदीय अध्यायांत जीं दोषांचीं लक्षणें व कर्में सांगितलीं आहेत त्यांवरून कुष्ठांत कोणता दोष अधिक आहे-तें पाहावें.

सर्वदोषोल्वणं त्यजेत् ॥ ३१॥
रिष्टोक्तं यच्च यच्चास्थिमज्जशुक्रसमाश्रयम् ।

त्रिदोषात्मक, रिष्टाध्यायांत (शा. अ. ५) सांगितलेलें व हाडें, मज्जा व शुक्र यांचा आश्रय करून राहिलेलें कुष्ठ असाध्य होय.

याप्यं मेदोगतं

मेदोगत कुष्ठ याप्य असतें.

कच्छ्रं पित्तद्वन्द्वास्रमांसगम् ॥ ३२॥

वातपित्तजन्य, कफपित्तजन्य, रक्तगत व मांसगत कुष्ठें हीं कृच्छ्रसाध्य आहेत.

अकृच्छ्रं कफवाताढ्यं त्वक्स्थमेकमलं च यत् ।

कफवातात्मक, एकदोषात्मक व त्वग्गत कुष्ठ सुखसाध्य होय.

तत्र त्वचि स्थिते कुष्ठे तोदवैवर्ण्यरूक्षताः ॥ ३३॥
स्वेदस्वापश्वयथवः शोणिते पिशिते पुनः ।
पाणिपादाश्रिताः स्फोटाः क्लेदः सन्धिषु चाधिकम् ३४
कौण्यं गतिक्षयोऽङ्गानां दलनं स्याच्च मेदसि ।
नासाभङ्गोऽस्थिमज्जस्थे नेत्ररागः स्वरक्षयः ॥ ३५॥
क्षते च कृमयः शुक्रे स्वदारापत्यबाधनम् ।

कुष्ठ त्वचेंत असतां टोंचणी, विवर्णता व रूक्षता उत्पन्न होते, रक्तांत गेलें असतां घाम येतो, मेहरी व सूज येते, मांसांत गेलें असतां हातांपायांवर फोड येतात, आणि सांध्यावर झालें असल्यास फोडांतून क्लेद फार येतो, मेदांत गेलें असतां कुबडेपणा येतो व त्या त्या अवयवांची गति बंद होते व भेगा पडतात, हाडांत व मज्जेंत गेलें असतां नाक सडतें, डोळे लाल होतात, स्वर क्षीण होतो व क्षतांत कृमि होतात; व शुक्रांत गेलें असतां त्याच्या बायकोस व मुलास त्याचा उपद्रव होतो.

यथापूर्वं च सर्वाणि स्युर्लिङ्गान्यसृगादिषु ॥ ३६॥

रक्तादिकांत कुष्ठ गेलें असतां त्याच्या पूर्वींचीं लक्षणेंहि होतात. [ रक्तांत गेलें असतां त्वचेंतील व रक्तांतील, मांसांत गेलें असतां त्वचा, रक्त व मांसांतील इ. ]

कुष्ठैकसम्भवं श्वित्रं किलासं दारुणं च तत् ।
निर्दिष्टमपरिस्रावि त्रिधातूद्भवसंश्रयम् ॥ ३७॥

ज्या कारणांनीं कुष्ठ होतें तींच श्वित्राचीं कारणें असतात. किलास व दारुण हीं नांवें श्वित्राचींच आहेत. श्वित्रांत स्राव नसतो. श्वित्र हें वात, पित्त व कफ या तीन दोषांपासून उत्पन्न होऊन क्रमानें रक्त, मांस व मेद या तीन धातूंत राहतें.

वाताद्रूक्षारुणं पित्तात्ताम्रं कमलपत्रवत् ।
सदाहं रोमविध्वंसि कफाच्छ्वेतं घनं गुरु ॥ ३८॥
सकण्डु च क्रमाद्रक्तमांसमेदःसु चादिशेत् ।

वातिक श्वित्र रूक्ष व अरुणवर्णाचें असतें. पैत्तिक तांबडें असून कमळाच्या पानासारखें आणि दाहयुक्त असतें व त्यावरचे केंस झडतात. कफापासून होणारें पांढरें, घट्ट, जड व कंडुयुक्त असतें. हीं श्वित्रें अनुक्रमें रक्त, मांस व मेद यांच्या आश्रयानें होतात.

वर्णेनैवेदृगुभयं कृच्छ्रं तच्चोत्तरोत्तरम् ॥ ३९॥

दोष व धातु यांच्या योगानेंच त्याचे अशा प्रकारचे वर्ण होतात.* [ वात व रक्त मिळून अरुण, पित्त व मांस मिळून लाल व कफ आणि मेद मिळून पांढरा ] व ते एकापेक्षां एक कष्टसाध्य आहेत. सर्वांत पांढरें श्वित्र फारच कष्टसाध्य होय.

अशुक्लरोमाबहलमसंसृष्टं मिथो नवम् ।
अनग्निदग्धजं साध्यं श्वित्रं वर्ज्यमतोऽन्यथा ॥ ४०॥
गुह्यपाणितलौष्ठेषु जातमप्यचिरन्तनम् ।

ज्यावरचे केंस पांढरे झाले नाहींत, जें जाड नाहीं, जें एकमेकांत मिसळलें नाहीं, जें भाजल्यापासून झालेलें नाहीं व जें जुनें नाहीं तें

---

* या श्लोकाच्या उत्तरार्धांत 'उभयम्' असें जें पद आहे त्याचा अर्थ अरुणदत्तप्रमाणें 'दोषोद्भवं' 'रक्ताद्याश्रयं च' असें उभयविध श्वित्र; तें वर्णानें तीनच प्रकारचें असतें व तीं एकाहून एक कृच्छ्रसाध्य असतात.

श्वित्र साध्य होय. यावांचून इतर प्रकारचें असाध्य होय. गुह्येंद्रिय, तळहात व ओंठ यांवर झालेलें नवें असलें तरी असाध्यच होय.

स्पर्शैकाहारशय्यादिसेवनात्प्रायशो गदाः ॥ ४१ ॥
सर्वे संचारिणो नेत्रत्वग्विकारा विशेषतः ।

स्पर्श, एका ताटांत जेवणें व एका अंथरुणावर निजणें इत्यादि प्रकारच्या संसर्गानें सर्वच रोग एकापासून दुसऱ्यास जडतात. तरी त्यांत नेत्ररोग व त्वग्रोग हे तर फारच संचारी ( स्पर्शजन्य ) आहेत.

क्रिमयस्तु द्विधा प्रोक्ता बाह्याभ्यन्तरभेदतः ॥ ४२ ॥

बाह्य व अभ्यंतर असे कृमींचे दोन भेद आहेत.

बहिर्मलकफासृग्विड्जन्मभेदाच्चतुर्विधाः ।
नामतो विंशतिविधाः

उत्पत्तीच्या संबंधानें कृमींचे चार भेद आहेत; बाहेरच्या मळापासून होणारे, कफापासून, रक्तापासून, व मळा ( पुरीषा ) पासून. आकारावरून त्यांचीं वीस प्रकारचीं नांवें आहेत.

बाह्यास्तत्रासृगुद्भवाः ॥ ४३ ॥
तिलप्रमाणसंस्थानवर्णाः केशाम्बराश्रयाः ।
बहुपादाश्च सूक्ष्माश्च यूकालिक्षाश्च नामतः ॥ ४४ ॥
द्विधा ते कोठपिटिकाकण्डूगण्डान् प्रकुर्वते ।

त्यांत बाह्य कृमि रक्तजन्य आहेत. त्यांचें मान, आकार व रंग तिळाप्रमाणें असून ते केंस व वस्त्र यांच्या आश्रयानें असतात. त्यांस पुष्कळ पाय असून ते बारीक असतात. उवा व लिखा अशीं त्यांचीं दोन नांवें आहेत. त्यांपासून गांधी, पुळ्या, कंड व लहान लहान गांठी उत्पन्न होतात.

कुष्ठैकहेतवोऽन्तर्जाः श्लेष्मजास्तेषु चाधिकम् ॥ ४५ ॥
मधुरान्नगुडक्षीरदधिसक्तुनवोदनैः ।

कुष्ठाचीं जीं कारणें त्या कारणांनीं अंतःकृमि होतात. त्यांत कफजन्य कृमि विशेषेंकरून मधुर अन्न, गूळ, दूध, दहीं, सातू व नवे तांदूळ हे पदार्थ खाल्ल्यानें होतात.

शकृज्जा बहुविड्धान्यपर्णशाकोलुकादिभिः ॥ ४६ ॥

पुरीषजन्य कृमि पुष्कळ मळ उत्पन्न करणारीं धान्यें [ चवळ्या वगैरे ], पालेभाज्या व सोले इत्यादि पदार्थ खाल्ल्यानें होतात.

कफादामाशये जाता वृद्धाः सर्पन्ति सर्वतः ।
पृथुव्रध्ननिभाः केचित् केचिद्गण्डूपदोपमाः ॥ ४७ ॥
रूढधान्याङ्कुराकारास्तनुदीर्घास्तथाणवः ।
श्वेतास्ताम्रावभासाश्च नामतः सप्तधा तु ते ॥ ४८ ॥
अन्त्रादा उदरावेष्टा हृदयादा महाकुहाः ।
कुरवो दर्भकुसुमाः सुगन्धास्ते च कुर्वते ॥ ४९ ॥
हृल्लासमास्यस्रवणमविपाकमरोचकम् ।
मूर्च्छाच्छर्दिज्वरानाहकार्श्यक्षवथुपीनसान् ॥ ५० ॥

कफजन्य कृमि आमाशयांत होतात. त्यांत कित्येक वादीसारखे चपटे, कित्येक गांडुळासारखे, कांहीं मोड आलेल्या धान्याच्या मोडासारखे, बारीक, लांब किंवा आंखूड असतात. ते रंगानें पांढरे किंवा तांबडे असतात. नांवांनीं त्यांचे सात भेद आहेत ते असे— अंत्राद, उदरावेष्ट, हृदयाद, महाकुह, कुरु, दर्भकुसुम व सुगंध; व त्यांपासून उमळारे, तोंडास स्राव, अन्नाचें अपचन, अरुचि, मूर्च्छा, वांति, ताप, पोट फुगणें व दुखणें, कृशपणा, शिंका व पडसें हे विकार होतात.

रक्तवाहिशिरोत्थाना रक्तजा जन्तवोऽणवः ।
अपादा वृत्तताम्राश्च सौक्ष्म्यात्केचिददर्शनाः ॥ ५१ ॥
केशादा लोमविध्वंसा लोमद्वीपा उदुम्बराः ।
षट् ते कुष्ठैककर्माणः सहसौरसमातराः ॥ ५२ ॥

रक्तजन्य कृमि रक्तवाहक शिरांत होतात. ते बारीक, बिनपायांचे, वाटोळे व तांबडे असून कित्येक तर इतके बारीक असतात कीं ते दिसतसुद्धां नाहींत. केशाद, लोमविध्वंस, लोमद्वीप, उदुंबर, सौरस व मातृक अशीं त्यांचीं सहा प्रकारचीं नांवें आहेत; व ते कुष्ठासारखे परिणाम करितात.

पक्वाशये पुरीषोत्था जायन्तेऽधोविसर्पिणः ।
वृद्धास्ते स्युर्भवेयुश्च ते यदामाशयोन्मुखाः ॥ ५३ ॥
तदास्योद्गारनिःश्वासा विड्गन्धानुविधायिनः ।
पृथुवृत्ततनुस्थूलाः श्यावपीतसितासिताः ॥ ५४ ॥
ते पञ्च नाम्ना क्रिमयः ककेरुकमकेरुकाः ।
सौसुरादाः सलूनाख्याः लेलिहा जनयन्ति च ॥ ५५ ॥
विड्भेदशूलविष्टम्भकार्श्यपारुष्यपाण्डुताः ।
रोमहर्षाग्निसदनं गुदकण्डूर्विनिर्गमात् ॥ ५६ ॥

पुरीषजन्य कृमि पक्वाशयांत असतात व ते वाढले असतां खालीं गुदाकडे धांवतात व जेव्हां ते आमाशयाकडे जाऊं लागतात त्या वेळीं ढेंकरा व श्वास यांस मळासारखी घाण येऊं लागते. ते चपटे, वाटोळे, बारीक व लठ्ठ असून त्यांचा रंग सांवळा, पिंवळा, पांढरा व काळा असतो. ककेरुक, मकेरुक, सौसुराद, सलून व लेलिह अशीं त्यांचीं नांवें पांच प्रकारचीं आहेत. जुलाब, शूल, पोट फुगणें, कृशता, त्वचेस खरखरीतपणा, पांडुरपणा, कांटा येणें व अग्निमांद्य हे त्यांपासून उपद्रव होतात व ते गुदाकडे येऊं लागले असतां गुदास कंड सुटते.

---

# पञ्चदशोऽध्यायः

## अध्याय १५ वा.

### अथातो वातव्याधिनिदानं व्याख्यास्यामः ।

आतां वातव्याधीचें निदान सांगतों.

सर्वार्थानर्थकरणे विश्वस्यास्यैककारणम् ।
अदुष्टदुष्टः पवनः शरीरस्य विशेषतः ॥ १ ॥

या जगाच्या व विशेषतः शरीराच्या सर्व प्रकारच्या शुभ गोष्टींस मुख्य कारण दुष्ट न झालेला वायु व अशुभ गोष्टींचें कारण दुष्ट वायु आहे.

**स विश्वकर्मा विश्वात्मा विश्वरूपः प्रजापतिः ।**
**स्रष्टा धाता विभुर्विष्णुः संहर्ता मृत्युरन्तकः ॥ २ ॥**
**तद्दुष्टौ प्रयत्नेन यतितव्यमतः सदा ।**

तो वायु विश्वकर्मा (शरीराचीं उत्पत्ति, स्थिति, लय इत्यादि कर्में करणारा), विश्वात्मा (सर्व चांगल्या गोष्टींचें कारण), विश्वरूप (नाना रूपें धारण करणारा), स्रष्टा (उत्पन्न करणारा), धाता (जगताचें धारण करणारा), विभु (सामर्थ्यवान्), विष्णु (व्यापक), संहर्ता (संहार करणारा), मृत्यु (यमासारखा), अंतक (मारणारा म्हणून प्रत्यक्ष यमच) असा आहे; म्हणून मनुष्यानें नेहमीं त्याची विकृति न होण्याविषयीं प्रयत्न करावा.

**तस्योक्तं दोषविज्ञाने कर्म प्राकृतवैकृतम् ॥ ३ ॥**
**समासाद्व्यासतो दोषभेदीये नाम धाम च ।**
**प्रत्येकं पञ्चधा चारो व्यापारश्च**

त्याचें स्वाभाविक व विकृतावस्थेंतील कर्म दोषविज्ञानीय अध्यायांत संक्षेपानें सांगितलें व दोषभेदीयांत विस्तारानें सांगितलें. तसेंच त्याचीं पांच प्रकारचीं नांवें, पांच प्रकारचीं स्थानें, पांच प्रकारची गति व पांच प्रकारच्या क्रिया हीं दोषभेदीयांत सांगितलीं आहेत.

**इह वैकृतम् ॥ ४ ॥**

**तस्योच्यते विभागेन सनिदानं सलक्षणम् ।**

या अध्यायांत त्याच्या विकृतावस्थेंतील क्रियेचे विभाग, कारण व लक्षण, यांसह सांगावयाचे आहेत.

**धातुक्षयकरैर्वायुः कुप्यत्यतिनिषेवितैः ॥ ५ ॥**
**चरन् स्रोतःसु रिक्तेषु भृशं तान्येव पूरयन् ।**
**तेभ्योऽन्यदोषपूर्णेभ्यः प्राप्य वाऽऽवरणं बली ॥ ६ ॥**

धातूंचा क्षय करणाऱ्या पदार्थांचें नेहमीं अतिशय सेवन केल्यामुळें रिकाम्या पडलेल्या स्रोतांत संचार करून त्यांस अतिशय व्यापून टाकून वायु कुपित होतो; किंवा दुसऱ्या दोषांनीं स्रोतें भरलीं असल्यास त्यापासून आच्छादन मिळवून बलवान् होऊन कुपित होतो.

**तत्र पक्वाशये क्रुद्धः शूलानाहान्त्रकूजनम् ।**
**मलरोधाश्मवर्ध्मार्शस्त्रिकपृष्ठकटीग्रहम् ॥ ७ ॥**
**करोत्यधरकायेषु तांस्तान्कृच्छ्रानुपद्रवान् ।**

पक्वाशयांत वायु कुपित झाला असतां शूळ, पोट फुगणें, आंतडें कुरकुरणें, मलावरोध, अश्मरी, अंतर्गळ, मूळव्याध, माकडहाड, पाठ व कंबर जखडणें, हे विकार व तसेंच कमरेच्या खालच्या भागीं अनेक प्रकारचे कष्टसाध्य उपद्रव उत्पन्न करितो.

**आमाशये तृड्वमथुश्वासकासविषूचिकाः ॥ ८ ॥**
**कण्ठोपरोधमुद्गारान् व्याधीनूर्ध्वं च नाभितः ।**



आमाशयांत वायु कुपित झाला असतां तहान, वांति, श्वास खोकला, विषूचिका, घसा दाटणें व ढेंकरा हे विकार व तसेंच बेंबीच्या वरच्या भागीं आणखीहि कांहीं उपद्रव उत्पन्न करितो.

**श्रोत्रादिष्विन्द्रियवधं**

कर्णादिक इंद्रियांत वायु कुपित झाला असतां त्या त्या इंद्रियांचीं कार्यें बंद करितो.

**त्वचि स्फुटनरूक्षणे ॥ ९ ॥**

त्वचेंत वायु कुपित झाला असतां त्वचा फुटते व रूक्ष होते.

**रक्ते तीव्रा रुजः स्वापं तापं रागं विवर्णताम् ।**
**अरूंष्यन्नस्य विष्टम्भमरुचिं कृशतां भ्रमम् ॥ १० ॥**

रक्तांत वायु कुपित झाला असतां अतिशय वेदना, त्वचेस बधिरता, तप्तता, लालपणा, त्वचेचा रंग बदलणें, फोड, अन्नाचें पचन न होतां पोट फुगणें, अरुचि, कृशपणा व भ्रम हे विकार होतात.

**मांसमेदोगतो ग्रन्थींस्तोदाढ्यान् कर्कशान् भ्रमम् ।**
**गुर्वङ्गं चातिरुक्स्तब्धं मुष्टिदण्डहतोपमम् ॥ ११ ॥**

मांस व मेद यांत वायु गेला असतां कठिण व फार टोंचणीनें युक्त अशा ग्रंथि उत्पन्न करितो; भ्रम होतो, अंग जड होतें, ठणकतें, जखडतें, व बुक्या व काठी यांनीं मारल्यासारखें होतें.

**अस्थिस्थः सक्थिसन्ध्यस्थिशूलं तीव्रं बलक्षयम् ।**

वायु अस्थींत कुपित झाला असतां मांडी, सांधे व हाडें यांत शूल उत्पन्न करितो व शक्ति फारच क्षीण होते.

**मज्जस्थोऽस्थिषु सौषिर्यमस्वप्नं स्तब्धतां रुजम् ॥ १२ ॥**

मज्जेंत वायु कुपित झाला असतां हाडें पोकळ होतात, झोंप येत नाहीं, अंग ताठतें व वेदना होतात.

**शुक्रस्य शीघ्रमुत्सर्गं सङ्गं विकृतिमेव च ।**
**तद्वद्गर्भस्य शुक्रस्थः**

शुक्रांत वायु कुपित झाला असतां शुक्र व गर्भ हीं लवकर बाहेर येतात, त्यांचा अवरोध होतो किंवा त्यांस विकार होतो.

**सिरास्वाध्मानरिक्तते ॥ १३ ॥**

**तत्स्थः**

शिरांत वायु कुपित झाला असतां शिरा फुगतात व रिकाम्या पडतात.

**स्नावस्थितः कुर्याद्गृध्रस्यायामकुब्जताः ।**

स्नायूंत वायु कुपित झाला असतां गृध्रसी, आंतरायाम, बहिरायाम व कुबडेपणा हे विकार होतात.

**वातपूर्णदृतिस्पर्शं शोफं सन्धिगतोऽनिलः ॥ १४ ॥**
**प्रसारणाकुञ्चनयोः प्रवृत्तिं च सवेदनाम् ।**

सांध्यांत वायु कुपित झाला असतां वायूनें भरलेल्या भात्यासारखी सूज येते व प्रसारण व आकुंचन करितांना कळ लागते.

**सर्वाङ्गसंश्रयस्तोदभेदस्फुरणभञ्जनम् ॥ १५ ॥**
**स्तम्भमाक्षेपणं स्वापं सन्ध्याकुञ्चनकम्पनम् ।**

सर्व शरीरांत वायु कुपित झाला असतां टोंचल्यासारखी, फोडल्यासारखी व मोडल्यासारखी पीडा, स्फुरण, ताठणें, आंचके, बधिरता, सांधे आकुंचित होणें व कंप हे विकार होतात.

**यदा तु धमनीः सर्वाः क्रुद्धोऽभ्येति मुहुर्मुहुः ॥ १६ ॥**
**तदाङ्गमाक्षिपत्येष व्याधिराक्षेपकः स्मृतः ।**

ज्या वेळीं वायु कुपित होऊन सर्व धमन्यांत संचार करितो तेव्हां त्या मनुष्यास वरचेवर आंचके येतात. या रोगास आक्षेपक म्हणतात.

**अधः प्रतिहतो वायुर्व्रजत्यूर्ध्वं हृदाश्रयः ॥ १७ ॥**
**नाडीः प्रविश्य हृदयं शिरः शङ्खौ च पीडयन् ।**
**आक्षिपेत्परितो गात्रं धनुर्वच्चास्य नामयेत् ॥ १८ ॥**
**कृच्छ्रादुच्छ्वसिति स्तब्धस्रस्तमीलितदृक् ततः ।**
**कपोत इव कूजेच्च निःसंज्ञः सोपतन्त्रकः ॥ १९ ॥**
**स एव चापतानाख्यो मुक्ते तु मारुता हृदि ।**
**अश्नुवीत मुहुः स्वास्थ्यं मुहुरस्वास्थ्यमावृते ॥ २० ॥**

खालून वायूची गति कुंठित झाली असतां तो वर जातो व हृदयांतील धमन्यांत शिरून हृदय, शंख व डोकें, यांत पीडा करीत शरीराला चोहोंकडून आंचके उत्पन्न करितो व धनुष्याप्रमाणें शरीर वांकवितो; मनुष्य मोठ्या प्रयासानें श्वासोच्छ्वास करितो, डोळे ताठ व गळल्यासारखे होतात व मिटतात. नंतर तो खबुतरासारखा घुमतो आणि मूर्च्छित होतो. या विकारास अपतंत्रक म्हणतात व यासच अपतानक* म्हणतात. हृदयांतून वायु गेला असतां वारंवार त्यास बरें वाटतें व वायूनें हृदय आग्रन झालें असतां पुनः पुनः तो अस्वस्थ (दुःखी) होतो.

**गर्भपातसमुत्पन्नः शोणितातिस्रवोत्थितः ।**
**अभिघातसमुत्थश्च दुश्चिकित्स्यतमो हि सः ॥ २१ ॥**

गर्भपातानें, अतिशय रक्तस्राव झाल्यानें व अभिघातानें जो अपतंत्रक होतो तो अतिशयच कष्टसाध्य आहे. (अर्थात् अन्यहेतुजन्य अपतंत्रक कष्ट आहे हें उघड आहे)

**मन्ये संस्तभ्य वातोन्तरायच्छन् धमनीर्यदा ।**
**व्याप्नोति सकलं देहं जत्रुरायम्यते तदा ॥ २२ ॥**
**अन्तर्धनुरिवाङ्गं च वेगैः स्तम्भं च नेत्रयोः ।**
**करोति जृम्भां दशनं दशनानां कफोद्गमम् ॥ २३ ॥**
**पार्श्वयोर्वेदनां वाक्यहनुपृष्ठशिरोग्रहम् ।**
**अन्तरायाम इत्येष**

वायु मन्या नांवाच्या दोन शिरांस ताठवून धमन्यांस आंत वांकवून ज्या वेळीं सर्व शरीर व्यापितो तेव्हां जत्रु [सरी] ताणते आणि वारंवार झटके येऊन धनुष्याप्रमाणें शरीर पाठीकडून आंत

---

*अपतानक व अपतंत्रक हे दोन रोग प्राचीन ऋषींच्या मतें परस्परांपासून अगदीं भिन्न आहेत असें दिसतें. सुश्रुताच्या निदान व चिकित्सास्थानाचें प्रस्तुत रोगांच्यासंबंधानें अवलोकन केलें असतां असें दिसून येतें कीं, त्यानें त्यांचें भिन्नत्व स्पष्टपणें व्यक्त केलें आहे. निदानप्रकरणीं अपतानक व अपतंत्रक या दोहोंच्या निदानांच्या मध्यंतरीं पक्षाघाताचें निदान आढळतें. चिकित्सेमध्येंहि तसाच प्रकार असून अपतंत्रकाची चिकित्सा इतर वातव्याधींहून अगदीं भिन्न आहे असें स्पष्टपणें सांगितलें आहे. (अपतन्त्रकातुरं नातर्पयेत् । वमनानुवासनास्थापनानि न निषेवेत । वातश्लेष्मोपरुद्धोच्छ्वासं तीक्ष्णैः प्रध्मापनैर्मोक्षयेत् । अर्थः-अपतंत्रक रोग झालेल्या मनुष्याला अपतर्पण करूं नये; वमन, निरूह व स्नेहबस्ति देऊं नये; वातकफामुळें जो त्याचा श्वास बंद झाला असतो तो तीक्ष्ण नस्याच्या योगानें खुला करावा). चरकानेंहि अपतंत्रक हा विकार अपतानकापासून भिन्न मानिला असावा असें दिसतें; कारण त्यानें त्याचें वर्णन वातव्याधींमध्यें न करितां हृदयाच्या रोगांमध्यें केलें आहे (च० सिद्धिस्थान अ० ९ पाहा). इतकेंच मात्र कीं, त्याच्या ग्रंथांत अपतानक हा शब्द कोठेंच आढळत नाहीं; व यामुळेंच कदाचित् वाग्भटाची अशी समजूत झाली असेल कीं, अपतंत्रक व अपतानक हीं दोन्हीं एकाच रोगाचीं नांवें होत. जरी चरकानें अपतानक या नांवाचा वातव्याधीच्या प्रकरणीं उल्लेख केला नाहीं, तरी त्याचे जे अन्तरायाम, बहिरायाम, इत्यादि पोटभेद ते त्यानें वर्णिले आहेतच. हे अपतानकाचेच पोटभेद आहेत याविषयीं सुश्रुत व वृद्ध वाग्भट यांच्या चिकित्सास्थानांतील एका वाक्यावरून सिद्ध होतें (अपतानक चिकित्सेचें पहिलेंच वाक्य). अपतानक या रोगास इंग्रजींत टेटेनस (Tetanus) म्हणतात; व बेशुद्ध होणें हें या रोगांत क्वचितच आढळतें; व सुश्रुतानेंहि अपतंत्रकाप्रमाणें नष्टचेतनत्व हें या रोगाचें लक्षण सांगितलें नाहीं. सुश्रुतोक्त अपतानकाचीं व त्याच्या निरनिराळ्या पोटभेदांचीं लक्षणें इंग्रजी वैद्यकाशीं पूर्णपणें जुळतात; व त्यानें सांगितलेल्या अपतंत्रकाचीं लक्षणें हल्लीं ज्याला हिस्टीरिया (Hysteria) किंवा हिस्टिरिकल् फिट्स् म्हणतात त्या विकारांशीं हुबेहुब मिळतात. हीं अपतंत्रकाचीं लक्षणें वाग्भटानेंहि वरील (१७-२०) श्लोकांत सांगितलीं आहेत; परंतु त्यासच अपतानक म्हणतात असें जें त्यानें म्हटलें आहे, तें ऋषिमताच्या विरुद्ध आहे. माधवानेंहि आपल्या निदानांत हे दोन रोग ऋषिमतास अनुसरून भिन्न दर्शविले आहेत. वाग्भटानें जरी या ठिकाणीं हे दोन रोग एकच असें सांगितलें आहे तरी यासंबंधानें त्याचें मत डळमळीत होतें असें वृद्धवाग्भटांतील ह्या रोगाच्या चिकित्साप्रकरणावरून सिद्ध होतें. सुश्रुत व चरक यांतील अपतंत्रकचिकित्सेवरूनहि ह्या रोगाचें हिस्टीरिआशीं ऐक्य सिद्ध होतें. हिस्टीरिआच्या झटक्यामध्यें जसा हल्लीं अमोनिआ (Ammonia) नाकास लावितात, तसें त्यांनीं अपतंत्रकांत प्रथम तीक्ष्ण चूर्ण नाकांत फुंकावें असें सांगितलें आहे. त्यानें रोगी शुद्धीवर येऊन श्वासोच्छ्वास खुला झाला म्हणजे जीं औषधें पोटांत द्यावयास सांगितलीं आहेत तीं सौम्य असून (कारण हिस्टीरिआचे रोगी नाजूक असतात) त्यांत हिंग, वेखंड इत्यादि प्रकारचीं द्रव्यें आढळतात; आणि हिंग हा हल्लींहि हिस्टीरिआवरील प्रधान औषधांपैकीं एक आहे. एकंदरीनें असें सिद्ध होतें कीं, अपतंत्रक हा रोग अपतानकापासून भिन्न मानावा हें बरें. असें करण्यामध्यें वाग्भटापेक्षां सुश्रुतादिकांस मान जास्त दिल्यासारखा होतो; येवढेंच नव्हे, तर हिस्टीरिआ या रोगास जी आपल्या वैद्यकांत [वाग्भटांत] जागा नव्हती ती मिळाल्यासारखी होते. कित्येक भूतोन्माद म्हणजे हिस्टीरिआ समजतात, परंतु त्यांत नेहमींच्या हिस्टीरिआच्या झटक्याचीं लक्षणें (आंचके, बेशुद्धपणा, डोळे ताठणें किंवा मिटणें, श्वासावरोधन, वशाशीं आवाज व राहून राहून झटके येणें, वायु ओटींतून निघून उरांत जाऊन अडकणें (Globus hystericus इत्यादि) मुळींच सांगितलीं नाहींत. अपतंत्रकांत तीं सर्व सांगितलीं आहेत. फार झाल्यास येवढें म्हणतां येईल कीं, भूतोन्मादांतील एखादा प्रकार हिस्टीरिआपासून (Hysterical Insanity) असूं शकेल.

वांकतें ( डोकें व पाय वर येतात आणि पोट खालीं जातें ); त्यामुळें त्याचे डोळे ताठतात, जांभया येतात, तो मनुष्य दांत चावतो, कफाची वांति होते, बरगड्यांत वेदना होतात, वाचा बसते, जबडा, पाठ व डोकें हीं जखडतात; या रोगास अंतरायाम असें म्हणतात.

बाह्यायामश्च तद्विधः ॥ २४ ॥

देहस्य बहिरायामात्पृष्ठतो नीयते शिरः ।
उरश्चोत्क्षिप्यते तत्र कन्धरा चावमृद्यते ॥ २५ ॥
दन्तेष्वास्ये च वैवर्ण्यं प्रस्वेदः स्रस्तगात्रता ।
बाह्यायामं धनुष्कम्भं ब्रुवते वेगिनं च तम् ॥ २६ ॥

याचप्रमाणें शरीर जेव्हां पाठीकडे वांकतें व डोकें मागें पाठीकडे जातें, ऊर वर येतो आणि मान मुरली जाते त्यास बाह्यायाम म्हणतात. दांतांचा व तोंडाचा वर्ण बदलतो, घाम फार येतो. गात्रें गळल्यासारखीं होतात, या बाह्यायामास धनुष्कंभ व वेगी असें म्हणतात. [ लोकांत याच रोगास धनुर्वात असें म्हणतात. ]

व्रणं मर्माश्रितं प्राप्य समीरणसमीरणात् ।
व्याश्रच्छन्ति तनुं दोषाः सर्वामापादमस्तकम् ॥ २७ ॥
तृष्यतः पाण्डुगात्रस्य व्रणायामः स वर्जितः ।

मर्मावर व्रण झाला असतां दोष वायूनें प्रेरित होऊन व्रणांत जाऊन पायापासून डोक्यापर्यंत सर्व शरीर ताणतात; त्यामुळें त्यास फार तहान लागते व त्याचें अंग पांडुर वर्णाचें होतें; या विकारास व्रणायाम म्हणतात. हा असाध्य आहे.

गते वेगे भवेत्स्वास्थ्यं सर्वेष्वाक्षेपकेषु च ॥ २८ ॥

सर्व आक्षेपक रोगांत वेग गेला असतां मनुष्यास बरें वाटतें.

जिह्वातिलेखनाच्छुष्कभक्षणादभिघाततः ।
कुपितो हनुमूलस्थः स्रंसयित्वाऽनिलो हनू ॥ २९ ॥
करोति विवृतास्यत्वमथवा संवृतास्यताम् ।
हनुस्तम्भः स तेन स्यात्कृच्छ्राच्चर्वणभाषणम् ॥ ३० ॥

अतिशय जीभ घांसल्यामुळें, कोरडे पदार्थ खाल्ल्यानें, व जिभेस आघात झाल्यामुळें हनुसंधीच्या मुळाजवळ वायु कुपित होऊन हनूचा सांधा निखळवितो, त्यामुळें तोंड उघडें राहतें किंवा मिटलेलेंच राहतें. या विकारास हनुस्तंभ असें म्हणतात. यामुळें चावण्यास व बोलण्यास फार श्रम पडतात.

वाग्वाहिनीसिरासंस्थो जिह्वां स्तम्भयतेऽनिलः ।
जिह्वास्तम्भः स तेनान्नपानवाक्येष्वनीशता ॥ ३१ ॥

वाणीची प्रवृत्ति करणाऱ्या ज्या शिरा आहेत त्यांत राहणारा वायु जीभ स्तब्ध करितो; त्यामुळें खाणें, पिणें व बोलणें या क्रिया मनुष्याच्यानें करवत नाहींत. या विकारास जिव्हास्तंभ म्हणतात.

शिरसा भारहरणादतिहास्यप्रभाषणात् ।
उत्त्रासवक्रक्षवथुखरकार्मुककर्षणात् ॥ ३२ ॥
विषमादुपधानाच्च कठिनानां च चर्वणात् ।
वायुर्विवृद्धस्तैस्तैश्च वातलैरूर्ध्वमास्थितः ॥ ३३ ॥
वक्रीकरोति वक्त्रार्धमुक्तं हसितमीक्षितम् ।
ततोऽस्य कम्पते मूर्धा वाक्सङ्गः स्तब्धनेत्रता ॥ ३४ ॥
दन्तचालः स्वरभ्रंशः श्रुतिहानिः क्षवग्रहः ।
गन्धाज्ञानं स्मृतेर्मोहः स्वापः सुप्तस्य जायते ॥ ३५ ॥
निष्ठीवः पार्श्वतो यायादेकस्याक्ष्णो निमीलनम् ।
जत्रोरूर्ध्वं रुजा तीव्रा शरीरार्धेऽधरेऽपि वा ॥ ३६ ॥
तमाहुरर्दितं केचिदेकायाममथापरे ।

डोक्यावर ओझें वाहिल्यानें, अतिशय हंसल्यानें, फार बोलल्यानें, भीतीमुळें, तोंडांतून शिंक आल्यानें, कठिण धनुष्य वांकविल्यानें, उंचसखल उशी घेतल्यानें, कठिण पदार्थ चावल्यानें व दुसऱ्याहि वायु वाढविणाऱ्या कारणांनीं वायु कुपित होऊन अर्धें तोंड, बोलणें, हंसणें व पाहणें यांस वांकडेपणा आणितो. त्यामुळें डोकें कांपतें, मनुष्य बोलतांना अडतो, डोळे ताठतात, दांत हालतात, स्वर कमी होतो, ऐकूं येत नाहींसें होतें, शिंका येत नाहींत, वास येत नाहीं, स्मरणशक्ति कमी होते, त्वचा बधिर होते, तो निजला असतां तोंडांतून एका बाजूनें लाळ गळते, एकच डोळा मिटतां येतो व दुसरा नेहमीं उघडा असतो; जत्रूच्यावर अर्ध्या भागांत किंवा खालीं शरीराच्या अर्ध्या भागांत फार तीव्र वेदना होतात. या रोगास कोणी अर्दित व कोणी एकायाम असें म्हणतात.

TIA

रक्तमाश्रित्य पवनः कुर्यान्मूर्धधराः सिराः ॥ ३७ ॥
रूक्षाः सवेदनाः कृष्णाः सोऽसाध्यः स्यात्सिराग्रहः ।

वायु रक्ताच्या आश्रयानें मस्तकास धारण करणाऱ्या शिरा रूक्ष, वेदनायुक्त व काळ्या करितो. त्यास सिराग्रह म्हणतात. तो असाध्य आहे.

गृहीत्वार्धं तनोर्वायुः सिराः स्नायूर्विशोष्य च ॥ ३८ ॥
पक्षमन्यतरं हन्ति सन्धिबन्धान् विमोक्षयन् ।
कृत्स्नोऽर्धकायस्तस्य स्यादकर्मण्यो विचेतनः ॥ ३९ ॥
एकाङ्गरोगं तं केचिदन्ये पक्षवधं विदुः ।

वायु शरीराचा अर्धा भाग जखडून त्यांतील शिरा व स्नायु शुष्क करून, संधींचीं बंधनें मोकळीं करून, शरीराच्या कोणत्या तरी बाजूचा नाश करितो त्यामुळें तो सर्व अर्धा भाग बधिर व निकामी होऊन जातो. त्यास कोणी एकांगरोग व कित्येक पक्षवध असें म्हणतात.

सर्वाङ्गरोगं तद्वच्च सर्वकायाश्रितेऽनिले ॥ ४० ॥

सर्व शरीरांतील वायु दुष्ट होऊन वरच्याप्रमाणें सर्व शरीरांत जो विकार करितो त्यास सर्वांगरोग असें म्हणतात.

शुद्धवातहतः पक्षः कृच्छ्रसाध्यतमो मतः ।
कृच्छ्रस्त्वन्येन संसृष्टो विवर्ज्यः क्षयहेतुकः ॥ ४१ ॥

केवळ वायूपासून झालेला पक्षवध फारच कृच्छ्रसाध्य, दुसऱ्या दोषांनीं युक्त असला म्हणजे कष्टसाध्य व क्षयापासून झालेला असतो तो असाध्य होय.

आमवद्धायनः कुर्यात्संस्तभ्याङ्गं कफान्वितः।
असाध्यं हतसर्वेहं दण्डवद्दण्डकं मरुत् ॥ ४२ ॥

आमानें रस्ता बंद झाला असतां वायु कफानें युक्त होऊन अंग ताठवून काठीप्रमाणें निश्चेष्ट करितो त्यास दंडक म्हणतात व हा असाध्य आहे.

अंसमूलस्थितो वायुः सिराः सङ्कोच्य तत्रगाः।
बाहुप्रस्पन्दितहरं जनयत्यवबाहुकम् ॥ ४३ ॥

खांद्याच्या मुळांतला वायु तेथल्याच शिरांचा संकोच करून बाहूंची हालचाल बंद करितो त्यास अवबाहुक म्हणतात.

तलं प्रत्यङ्गुलीनां या कण्डरा बाहुपृष्ठतः।
बाहुचेष्टापहरणी विश्वाची नाम सा स्मृता ॥ ४४ ॥

दंडाच्या मागल्या बाजूपासून तळहातापर्यंत जी बोटाची कंडरा ( लठ्ठ स्नायुसमूह ) ती धरून हाताची किया बंद करितो, त्यास विश्वाची असें म्हणतात.

वायुः कट्यां स्थितः सक्थ्नः कण्डरामाक्षिपेद्यदा।
तदा खञ्जो भवेज्जन्तुः पङ्गुः सक्थ्नोर्द्वयोरपि ॥ ४५ ॥

कमरेंत राहणारा वायु जेव्हां एका मांडींतल्या कंडरेचें आकर्षण करितो त्या वेळीं मनुष्य लंगडा होतो व जेव्हां दोन्ही मांड्यांतील शिरा वायु आंखडतो तेव्हां मनुष्य पांगळा होतो.

कम्पते गमनारम्भे खञ्जन्निव च याति यः।
कलायखञ्जं तं विद्यान्मुक्तसन्धिप्रबन्धनम् ॥ ४६ ॥

जो चालूं लागतांना कांपतो व लंगडल्यासारखा चालतो त्यास कलायखंज असें म्हणतात. यांत सांध्यांचीं बंधनें मोकळीं होतात.

शीतोष्णद्रवसंशुष्कगुरुस्निग्धैर्निषेवितैः।
जीर्णाजीर्णे तथाऽऽयाससङ्क्षोभस्वप्नजागरैः ॥ ४७ ॥
सश्लेष्ममेदःपवनमाममत्यर्थसञ्चितम्।
अभिभूयेतरं दोषमूरू चेत्प्रतिपद्यते ॥ ४८ ॥
सक्थ्यस्थीनि प्रपूर्यान्तःश्लेष्मणा स्तिमितेन तत्।
तदा स्कभ्नाति तेनोरू स्तब्धौ शीतावचेतनौ ॥ ४९ ॥
परकीयाविव गुरू स्यातामतिभृशव्यथौ।
ध्यानाङ्गमर्दस्तैमित्यतन्द्राच्छर्द्यरुचिज्वरैः ॥ ५० ॥
संयुतौ पादसदनकृच्छ्रोद्धरणसुप्तिभिः।
तमूरुस्तम्भमित्याहुराढ्यवातमथापरे ॥ ५१ ॥

कांहीं अन्न जिरलें व कांहीं न जिरलें अशी स्थिति असतां, थंड, उष्ण, पातळ, कोरडें, जड व स्निग्ध पदार्थ फार सेवन केल्यानें, तसेंच श्रमानें, शरीराचा क्षोभ करणाऱ्या क्रियेनें, फार निजल्यामुळें व जागल्यामुळें, कफ, मेद व वायु यांसह संचित झालेला आम पित्ताचा पराभव करून मांड्यांत आला असतां मांडींतील हाडें आंतून ओलसर व घट्ट कफानें भरून टाकितो; त्यामुळें मांड्या ताठतात, स्थिर होतात, गार होतात व त्यांची क्रिया बंद होते, त्यांत कळा फार लागतात व जड झाल्यामुळें आपल्या नव्हेतशा वाटतात. तसेंच चिंता, अंग मोडणें, अंगास ओलसरपणाचा भास, वांति, झांपड, अरुचि व ज्वर, हे विकार होतात. तसेंच पाय गळतात, उचलण्यास कष्ट पडतात व मुंग्या येते. या रोगास कोणी ऊरुस्तंभ, कोणी आढ्यवात असें म्हणतात.

वातशोणितजः शोफो जानुमध्ये महारुजः।
ज्ञेयः क्रोष्टुकशीर्षश्च स्थूलः क्रोष्टुकशीर्षवत् ॥ ५२ ॥

वात व रक्त यांपासून गुडघा सुजून कोल्ह्याच्या डोक्यासारखा होतो व वेदना फारच असतात या विकारास क्रोष्टुशीर्ष म्हणतात.

रुक् पादे विषमन्यस्ते श्रमाद्वा जायते यदा।
वातेन गुल्फमाश्रित्य तमाहुर्वातकण्टकम् ॥ ५३ ॥

वांकडा तिकडा पाय पडल्यामुळें किंवा श्रमानें वायु घोट्यांचा आश्रय करून तेथें शूल उत्पन्न करितो. या विकारास वातकंटक म्हणतात.

पार्ष्णिं प्रत्यङ्गुलीनां या कण्डरा मारुतार्दिता।
सक्थ्युत्क्षेपं निगृह्णाति गृध्रसीं तां प्रचक्षते ॥ ५४ ॥

खोटेकडे जाणारी बोटांची कंडरा वायूनें पीडित झाल्यामुळें मांडीची हालचाल बंद होते. या विकारास गृध्रसी म्हणतात.

विश्वाची गृध्रसी चोक्ता खल्ली तीव्ररुजान्विता।

विश्वाची व गृध्रसी यांतच तीव्र वेदना असली म्हणजे तिला खल्ली म्हणतात.

हृष्येते चरणौ यस्य भवेतां च प्रसुप्तवत् ॥ ५५ ॥
पादहर्षः स विज्ञेयः कफमारुतकोपजः।

कफ व वायु यांचा कोप होऊन ज्याचे पाय शिवशिवतात व त्यांस मेहेरी येते त्या विकारास पादहर्ष म्हणतात.

पादयोः कुरुते दाहं पित्तासृक्सहितोऽनिलः ॥ ५६ ॥
विशेषतश्चङ्क्रमिते पाददाहं तमादिशेत्।

पित्त व रक्त यांसह वायु पायांत दाह उत्पन्न करितो व विशेषतः फार चालल्यानें होतो त्यास पाददाह म्हणतात.

## षोडशोऽध्यायः

अध्याय १६ वा.

अथातो वातशोणितनिदानं व्याख्यास्यामः।

आतां वातरक्ताचें निदान सांगतों.

विदाह्यन्नं विरुद्धं च तत्तच्चासृक्प्रदूषणम्।
भजतां विधिहीनं च स्वप्नजागरमैथुनम् ॥ १ ॥
प्रायेण सुकुमाराणामचङ्क्रमणशीलिनाम्।
अभिघातादशुद्ध्या च नृणामसृजि दूषिते ॥ २ ॥
वातलैः शीतलैर्वायुर्वृद्धः क्रुद्धो विमार्गगः।
तादृशेनासृजा रुद्धः प्राक् तदेव प्रदूषयेत् ॥ ३ ॥
आढ्यं रोगं खुडं वातबलासं वातशोणितम्।
तदाहुर्नामभिस्तच्च पूर्वं पादौ प्रधावति ॥ ४ ॥

विशेषाद्यानयानाद्यैः प्रलम्बौ

विदाही व विरुद्ध अन्न व रक्त दुष्ट करणारे दुसरे पदार्थ भक्षण केल्यामुळें; व झोंप, जागरण व मैथुन हीं शास्त्रांत सांगितल्या नियमांहून विपरीत रीतीनें सेवन केल्यामुळें तरोंच आघात झाल्यामुळें व मळाचा साफ झाडा होत नसल्यामुळें, बहुधा नाजुक व ज्यांस पायीं चालण्याचा फारसा अभ्यास नाहीं अशा लोकांचें रक्त दुष्ट झालें असतां, व वातुळ व थंड पदार्थांनीं वायु वाहून कुपित होऊन भलभलत्या मार्गानें जाऊं लागला असतां वाढलेल्या व कुपित झालेल्या रक्तानें त्याचा रोध झाल्यामुळें तो प्रथम त्या रक्तासच दुष्ट करितो. या रोगास आढ्यरोग, खुड, वातबलास व वातरक्त अशी नांवें आहेत. गाडी, घोडा वगैरेंवर बसून जाण्यानें पाय विशेषेंकरून लोंबत राहतात म्हणून तें प्रथम पायांवर उत्पन्न होतें.

तस्य लक्षणम्

भविष्यतः कुष्ठसमं तथा सादः श्लथाङ्गता ॥ ५ ॥
जानुजङ्घोरुकट्यंसहस्तपादाङ्गसन्धिषु ।
कण्डूस्फुरणनिस्तोदभेदगौरवसुप्तताः ॥ ६ ॥
भूत्वा भूत्वा प्रणश्यन्ति पुनराविर्भवन्ति च ।

त्याचीं पूर्वरूपें कुष्ठासारखींच असतात. शिवाय ग्लानि येते व अंगें शिथिल होतात. गुडघा, पोटरी, कमर, खांदा, हात व पाय यांत व शरीराच्या सांध्यांत कंड, स्फुरण, अतिशय ठणका, टोंचणी, जडत्व, व मेहेरी हे विकार पुनः पुनः उत्पन्न होतात व कमी होतात.

पादयोर्मूलमास्थाय कदाचिद्धस्तयोरपि ॥ ७ ॥
आखोरिव विषं क्रुद्धं कृत्स्नं देहं विधावति ।

पायांत व कदाचित् हातांतहि प्रथम उत्पन्न होऊन उंदरांच्या कुपित झालेल्या विषाप्रमाणें तें सर्व शरीरांत पसरतें.

त्वङ्मांसाश्रयमुत्तानं तत्पूर्वं जायते ततः ॥ ८ ॥
कालान्तरेण गम्भीरं सर्वान् धातूनभिद्रवत् ।

जें त्वचा व मांस यांच्या आश्रयानें प्रथम उत्पन्न होतें त्यास उत्तान म्हणतात व तेंच कांहीं काळानें सर्व धातूंत पसरलें म्हणजे त्यास गंभीर म्हणतात.

कण्ड्वादिसंयुतोत्ताने त्वक्ताम्रश्यावलोहिता ॥ ९ ॥
सायामा भृशदाहोषा

उत्तानांत त्वचेंत कंडुस्फुरणादि प्रकार असून ती तांबडी, काळसर व लाल असते. ती ताणते व तींत अतिशय दाह व चुरचुर असते.

गम्भीरेऽधिकपूर्वरुक् ।
श्वयथुर्ग्रथितः पाकी वायुः सन्ध्यस्थिमज्जसु ॥ १० ॥
छिन्दन्निव चरत्यन्तर्वक्रीकुर्वंश्च वेगवान् ।
करोति खञ्जं पङ्गुं वा शरीरे सर्वतश्चरन् ॥ ११ ॥

गंभीरांत जी सूज येते तींत आरंभीं फारच वेदना असतात, व ती गांठाळलेली असून तिचा पाक होतो. वायु सांधे, अस्थि व मज्जा यांत मोठ्या वेगानें त्यांस वांकवून कापीतच संचार करितो व शरीरांत चोहोंकडे संचार करून मनुष्यास लंगडा किंवा पांगळा करितो.

वातेऽधिकेऽधिकं तत्र शूलस्फुरणतोदनम् ।
शोफस्य रौक्ष्यकृष्णत्वश्यावतावृद्धिहानयः ॥ १२ ॥
धमन्यङ्गुलिसन्धीनां सङ्कोचोऽङ्गग्रहोऽतिरुक् ।
शीतद्वेषानुपशयौ स्तम्भवेपथुसुप्तयः ॥ १३ ॥

वाताधिक वातरक्तांत शूल, स्फुरण व टोंचणी हीं अधिक असतात, सूज रूक्ष, काळी व काळसर असून ती वाढते व कमी होते. धमन्या व बोटांचे सांधे आकुंचित होतात. अंग जखडतें, अतिशय वेदना होतात, थंड पदार्थांचा द्वेष होतो व थंड पदार्थांपासून गुण पडत नाहीं. तसेंच स्तंभ ( अंग ताठणें ), कंप व मेहेरी हे प्रकार असतात.

रक्ते शोफोऽतिरुक्तोदस्ताम्रश्चिमिचिमायते ।
स्निग्धरूक्षैः शमं नैति कण्डूक्लेदसमन्वितः ॥ १४ ॥

रक्ताधिक वातरक्तांत जी सूज असते ती तांबडी असून तींत अतिशय वेदना, टोंचणी, चुणचुण, कंड व क्लेद हे प्रकार असतात. स्निग्ध व रूक्ष पदार्थांनीं गुण येत नाहीं.

पित्ते विदाहः सम्मोहः स्वेदो मूर्च्छा मदः सतृट् ।
स्पर्शाक्षमत्वं रुग्रागः शोफपाकौ भृशोष्णता ॥ १५ ॥

पित्ताधिक वातरक्तांत दाह, मोह, घाम, मूर्च्छा, गुंगी, तहान, वेदना, लाली, सूज, पाक व अतिशय कढतपणा हीं लक्षणें असून स्पर्श सहन होत नाहीं.

कफे स्तैमित्यगुरुतासुप्तिस्निग्धत्वशीतताः ।
कण्डूर्मंदा च रुक्

कफाधिक वातरक्तांत ओलसरपणाचा भास, जडत्व, मेहेरी, स्निग्धपणा, थंडपणा, कंड व थोडी वेदना हीं लक्षणें असतात.

द्वन्द्वसर्वलिङ्गं च सङ्करे ॥ १६ ॥

दोन दोषांचीं लक्षणें असलीं म्हणजे द्वंद्वज व तिहींच्या लक्षणांवरून त्रिदोषजन्य वातरक्त जाणावें.

एकदोषानुगं साध्यं नवं याप्यं द्विदोषजम् ।
त्रिदोषजं त्यजेत्स्रावि स्तब्धमर्बुदकारि च ॥ १७ ॥

एकदोषात्मक व नवीन असतां साध्य व द्विदोषज याप्य आणि त्रिदोषात्मक त्याज्य होय. तसेंच स्तब्ध, ज्यांतून स्राव होतो व ज्यावर गांठी आल्या आहेत तेंहि त्याज्य होय.

रक्तमार्गं निहन्त्याशु शाखासन्धिषु मारुतः ।
निविश्यान्योन्यमावार्य वेदनाभिर्हरत्यसून् ॥ १८ ॥

वायु हातापायांच्या सांध्यांत रक्ताचा मार्ग लवकर बंद करितो. नंतर परस्परांत शिरून व परस्परांचें आवरण करून वेदनांनीं मनुष्यास मारितो.

वायौ पञ्चात्मके प्राणो रौक्ष्यव्यायामलङ्घनैः ।
अत्याहाराभिघाताध्ववेगोदीरणधारणैः ॥ १९ ॥

कुपितश्चक्षुरादीनामुपघातं प्रवर्तयेत् ।
पीनसार्दिततृट्कासश्वासादींश्चामयान् बहून् ॥ २० ॥

पांच प्रकारच्या वायूंत प्राणवायु रूक्षता, व्यायाम व लंघन, अतिशय आहार, आघात, मार्ग चालणें, मळादिक वेगांचा अवरोध व बळानें प्रेरणा करणें या कारणांनीं कुपित होऊन नेत्रादि इंद्रियांस पीडा करितो; व पडसें, अर्दित, तहान, कास व दमा इत्यादिक पुष्कळ विकार उत्पन्न करितो.

उदानः क्षवथूद्गारच्छर्दिनिद्राविधारणैः ।
गुरुभारातिरुदितहास्याद्यैर्विकृतो गदान् ॥ २१ ॥
कण्ठरोधमनोभ्रंशच्छर्द्यरोचकपीनसान् ।
कुर्याच्च गलगण्डादींस्तांस्ताञ् जत्रूर्ध्वसंश्रयान् ॥ २२

शिंक, ढेंकर, वांति व झोंप यांचे वेग धारण केल्यामुळें, तसेंच जड ओझें वाहणें, अतिशय रडणें व हंसणें इत्यादि कारणांनीं उदान वायु कुपित होऊन घसा कोंडणें, उन्माद, वांति, अरुचि, पीनस व गालगुंड इत्यादि जत्रूच्या वरल्या भागीं होणारे अनेक विकार उत्पन्न करितो.

व्यानोऽतिगमनध्यानक्रीडाविषमचेष्टितैः ।
विरोधिरूक्षभीहर्षविषादाद्यैश्च दूषितः ॥ २३ ॥
पुंस्त्वोत्साहबलभ्रंशशोफचित्तोत्प्लवज्वरान् ।
सर्वाङ्गरोगनिस्तोदरोमहर्षाङ्गसुप्तताः ॥ २४ ॥
कुष्ठं विसर्पमन्यांश्च कुर्यात्सर्वाङ्गगान् गदान् ।

अतिशय चालणें, चिंता, क्रीडा, हातापायांची वेडीवांकडी क्रिया, विरुद्ध व रूक्ष आहार, भीति, आनंद व खेद इत्यादि कारणांनीं व्यानवायु दुष्ट होऊन पुरुषत्व, उत्साह व बल यांचा नाश, सूज, चित्तभ्रंश, ताप, सर्वांगरोग, अतिशय टोंचणी, रोमांच, अंगास मेहेरी, कुष्ठ, विसर्प व दुसरे सार्वदेहिक रोग उत्पन्न करितो.

समानो विषमाजीर्णशीतसङ्कीर्णभोजनैः ॥ २५ ॥
करोत्यकालशयनजागराद्यैश्च दूषितः ।
शूलगुल्मग्रहण्यादीन् पक्वामाशयजान् गदान् ॥ २६ ॥

विषमाशन, अजीर्णाशन, थंड पदार्थ (चांगले व वाईट पदार्थ मिसळून खाणें) यांचें सेवन, भलत्याच वेळीं निजणें व जागणें इत्यादि कारणांनीं समान वायु दूषित होऊन शूल, गुल्म, ग्रहणी इत्यादि पक्वाशय व आमाशय यांत होणारे रोग उत्पन्न करितो.

अपानो रूक्षगुर्वन्नवेगघातातिवाहनैः ।
यानयानासनस्थानचङ्क्रमैश्चातिसेवितैः ॥ २७ ॥
कुपितः कुरुते रोगान् कृच्छ्रान् पक्वाशयाश्रयान् ।
मूत्रशुक्रप्रदोषार्शोगुदभ्रंशादिकान् बहून् ॥ २८ ॥

रूक्ष व गुरु अन्न, वेगांचा अवरोध, अतिशय कुंथणें, गाडीघोड्यावरून जाणें, बसणें, उभें राहणें व चालणें या गोष्टी अतिशय सेवन केल्यामुळें अपानवायु कुपित होऊन पक्वाशयाच्या आश्रयानें होणारे मूत्राघात, प्रमेह, शुक्रदोष, मूळव्याध, गुदभ्रंश इत्यादि अनेक कष्टसाध्य रोग उत्पन्न करितो.

सर्वं च मारुतं सामं तन्द्रास्तैमित्यगौरवैः ।
स्निग्धत्वारोचकालस्यशैत्यशोफाग्निहानिभिः ॥ २९ ॥
कटुरूक्षाभिलाषेण तद्विधोपशयेन च ।
युक्तं विद्यान्निरामं तु तन्द्रादीनां विपर्ययात् ॥ ३० ॥

झांपड, अंगांत ओलसरपणाचा भास, जडत्व, स्निग्धपणा, अरुचि, आळस, थंडी, सूज, अग्निमांद्य, तिखट व रूक्ष पदार्थांवर वासना व तशाच पदार्थांनीं सुख होणें हीं लक्षणें कोणताहि वायु आमयुक्त असतां होतात व तो निराम असतां याच्या विपरीत लक्षणें होतात.

वायोरावरणं चातो बहुभेदं प्रवक्ष्यते ।

आतां वायूचीं अनेक प्रकारचीं आवरणें सांगतों.

लिङ्गं पित्तावृते दाहस्तृष्णा शूलं भ्रमस्तमः ॥ ३१ ॥
कट्वोष्णाम्ललवणैर्विदाहः शीतकामता ।

पित्तानें वायूचें आवरण केलें असतां दाह, तहान, शूल, भ्रम, डोळ्यापुढें काळोखी, थंडीची इच्छा व तिखट, उष्ण, आंबट व खारट पदार्थांनीं पोटांत जळजळ हीं लक्षणें होतात.

शैत्यगौरवशूलानि कट्वाद्युपशयोऽधिकम् ॥ ३२ ॥
लङ्घनायासरूक्षोष्णकामता च कफावृते ।

थंडी, जडत्व, शूल, तिखट, उष्ण, आंबट व खारट पदार्थांपासून आराम होणें, लंघन, श्रम, रूक्ष व उष्ण पदार्थ यांची इच्छा होणें हीं लक्षणें वायु कफानें आवृत झाला असतां होतात.

रक्तावृते सदाहार्तिस्त्वङ्मांसान्तरजा भृशम् ॥ ३३ ॥
भवेच्च रागी श्वयथुर्जायन्ते मण्डलानि च ।

रक्तानें वायूचें आवरण झालें असतां त्वचा व मांस यांच्यामध्यें दाह व पीडा होते, सूज लाल असते व मंडलें उठतात.

मांसेन कठिनः शोफो विवर्णः पिटिकास्तथा ॥ ३४ ॥
हर्षः पिपीलिकानां च संचार इव जायते ।

वायु मांसानें आवृत झाला असतां त्वचेपासून निराळ्या रंगाची व कठिण सूज, पुळ्या, रोमांच व अंगावर मुंग्या चालल्याप्रमाणें भास हीं लक्षणें होतात.

चलः स्निग्धो मृदुः शीतः शोफो गात्रेष्वरोचकः ॥३५॥
आढ्यवात इति ज्ञेयः स कृच्छ्रो मेदसाऽऽवृते ।

मेदानें वायूस आवरण झालें असतां अंगास जी सूज येते ती चंचल, स्निग्ध, मृदु व थंड असते, व तोंडास अरुचि असते. या विकारास आढ्यवात म्हणतात. हा कष्टसाध्य आहे.

स्पर्शमस्थ्यावृतेऽत्युष्णं पीडनं चाभिनन्दति ॥ ३६ ॥
सूच्येव तुद्यतेऽत्यर्थमङ्गं सीदति शूल्यते ।

वायु अस्थींनीं आवृत झाला असतां अंगास अतिशय उष्ण स्पर्श आवडतो व तें मर्दन करावेंसें वाटतें, सुईनें टोंचल्यासारखें वाटतें, अंग गळल्यासारखें होतें व दुखतें.

मज्जावृते विनमनं जृम्भणं परिवेष्टनम् ॥ ३७॥
शूलं च पीड्यमानेन पाणिभ्यां लभते सुखम् ।

मज्जावृत वायु झाला असतां अंग वांकतें, जांभया येतात, अंग पिळवटल्यासारखें होतें व दुखतें आणि हातांनीं मर्दन केलें असतां सुख होतें.

शुक्रावृतेऽतिवेगो वा न वा निष्फलताऽपि वा ॥ ३८॥

शुक्रावृत वायु झाला असतां शुक्राचा अतिशय वेग येतो किंवा मुळींच येत नाहीं किंवा तें गर्भोत्पादक होत नाहीं.

भुक्ते कुक्षौ रुजा जीर्णे शाम्यत्यन्नावृतेऽनिले ।

अन्नावृत वायु झाला असतां जेवलें म्हणजे पोट दुःखूं लागतें व जिरल्यावर बरें होतें.

मूत्राप्रवृत्तिराध्मानं बस्तौ मूत्रावृते भवेत् ॥ ३९ ॥

वायु मूत्रावृत झाला असतां मूत्र होत नाहीं व बस्ति फुगतो.

विडावृते विबन्धोऽधः स्वस्थाने परिकृन्तति ।
व्रजत्याशु जरां स्नेहो भुक्ते चानह्यते नरः ॥ ४० ॥
शकृत्पीडितमन्नेन दुःखं शुष्कं चिरात्सृजेत् ।

मलावृत वायु झाला असतां मळ व वायु यांचा अवरोध होतो व गुदांत कातरल्यासारखी वेदना होते व स्नेह लवकर पचतो आणि भोजन केल्यावर पोट फुगतें. अन्नाचा मळावर दाब बसला असतां मोठ्या प्रयासानें फार वेळानें कोरडा मळ होतो.

सर्वधात्वावृते वायौ श्रोणीवङ्क्षणपृष्ठरुक् ॥ ४१ ॥
विलोमो मारुतोऽस्वस्थं हृदयं पीड्यतेऽति च ।

वायु सर्व धातूंनीं आवृत झाला असतां कंबर, अंडसंधि व पाठ यांत वेदना होते, वायूची गति उलटी होते, मन अस्वस्थ होतें व हृदयांत अतिशय पीडा होते.

भ्रमो मूर्च्छा रुजा दाहः पित्तेन प्राण आवृते ॥ ४२ ॥
विदग्धेऽन्ने च वमनम्

पित्तानें प्राणवायूचें आवरण झालें असेल तर भ्रम, मूर्च्छा, वेदना, दाह, हे विकार होतात व अन्नाचा विदाह होऊन* वांति होते.

उदानेपि भ्रमादयः ।
दाहोऽन्तरूर्जाभ्रंशश्च

उदानवायूचें पित्तानें आवरण झालें असेल तर वरचेच भ्रमादिक विकार होतात; तसेंच अंतर्दाह व शक्तीचा नाश हे होतात.

दाहो व्याने च सर्वगः ॥ ४३ ॥
क्लमोऽङ्गचेष्टासङ्गश्च ससन्तापः सवेदनः ।

पित्तानें व्यानवायूचें आवरण केलें असतां सर्व शरीरांत अंतर्बाह्य दाह होतो, ग्लानि येते, हातापायांचे व्यापार बंद होतात, त्यांस तप्तता येते व वेदना होतात.

समान ऊष्मोपहतिरतिस्वेदोऽरतिः सतृट् ॥ ४४ ॥
दाहश्च स्यात्

पित्तानें समानवायु आवृत झाला असतां अग्निमांद्य होतें, घाम फार येतो, चैन पडत नाहीं व तहान लागते आणि दाह होतो.

अपाने तु मले हारिद्रवर्णता ।
रुजोऽतिवृद्धिस्तापश्च योनिमेहनपायुषु ॥ ४५ ॥

अपानवायु पित्तावृत झाला असतां मळ पिंवळ्या रंगाचा होतो, योनि, शिश्न व गुद यांत वेदना फार होतात व तप्तता असते.

श्लेष्मणा त्वावृते प्राणे सादस्तन्द्राऽरुचिर्वमिः ।
ष्ठीवनक्षवथूद्गारनिःश्वासोच्छ्वाससंग्रहः ॥ ४६ ॥

कफानें प्राणवायु आवृत झाला असतां ग्लानि, झांपड, अरुचि, वांति व तोंडांत फार थुंकी येणें, शिंका, ढेंकरा व श्वासोच्छ्वास यांचा अवरोध हीं लक्षणें होतात.

उदाने गुरुगात्रत्वमरुचिर्वाक्स्वरग्रहः ।
बलवर्णप्रणाशश्च

कफानें उदानवायु आवृत झाला असतां अंग जड होतें, अरुचि असते, बोलतांना अडतो, घसा बसतो, शक्ति क्षीण होते व वर्णक्षय होतो.

व्याने पर्वास्थिवाग्ग्रहः ॥ ४७ ॥
गुरुताऽङ्गेषु सर्वेषु स्खलनं च गतौ भृशम् ।

व्यानवायु कफावृत झाला असतां सांधे, हाडें व भाषण हीं धरतात. सर्व अंगें जड होतात व तो चालतांना वारंवार अडखळतो.

समानेऽतिहिमाङ्गत्वमस्वेदो मन्दवह्निता ॥ ४८ ॥

समानवायु कफावृत झाला असतां अंग अतिशय गार होतें, घाम येत नाहीं व अग्नि मंद होतो.

अपाने सकफं मूत्रशकृतः स्यात्प्रवर्तनम् ।

अपानवायु कफावृत झाला असतां मळाबरोबर व मूत्राबरोबर कफ येतो.

इति द्वाविंशतिविधं वायोरावरणं विदुः ॥ ४९ ॥

याप्रमाणें हीं वायूचीं आवरणें बावीस प्रकारचीं आहेत.

प्राणादयस्तथाऽन्योन्यमावृण्वन्ति यथाक्रमम् ।
सर्वेऽपि विंशतिविधं विद्याद्वावरणं च तत् ॥ ५० ॥

तसेंच प्राणादिक पंचवायु क्रमाक्रमानें एकमेकांस जें आवरण करितात त्याचे वीस प्रकार होतात.

निःश्वासोच्छ्वाससंरोधः प्रतिश्यायः शिरोग्रहः ।
त्वग्रोगो मुखशोषश्च प्राणेनोदान आवृते ॥ ५१ ॥

प्राणवायूनें उदान आवृत झाला असतां श्वासोच्छ्वासाचा अवरोध, पडसें, डोकें धरणें, त्वग्रोग व तोंडास कोरड हीं लक्षणें होतात.

उदानेनावृते प्राणे वर्णौजोबलसंक्षयः ।

उदानवायूनें प्राण आवृत झाला असतां वर्ण, ओज व बळ यांचा क्षय होतो.

---

* म्हणजे विदग्धाजीर्णाचीं लक्षणें ( सू. अ. ८ श्लो. २६ पाहा ) उत्पन्न होतात.

दिशाऽनया च विभजेत्सर्वमावरणं भिषक् ॥ ५२ ॥
स्थानान्यवेक्ष्य वातानां वृद्धिं हानिं च कर्मणाम् ।

हें वर जें दिग्दर्शन केलें आहे त्याप्रमाणें वायूंचीं स्थानें व त्यांच्या क्रियेची वृद्धि व क्षय यांचा चांगला विचार करून त्यांवरून सर्व प्रकारचीं आवरणें वैद्यानें जाणावीं.

प्राणादीनां च पञ्चानां मिश्रमावरणं मिथः ॥ ५३ ॥
पित्तादिभिर्द्वादशभिर्मिश्राणां मिश्रितैश्च तैः ।
मिश्रैः पित्तादिभिस्तद्वत्प्राणादिभिरनेकधा ॥ ५४ ॥
तारतम्यविकल्पाच्च यात्यावृतिरसंख्यताम् ।

तसेंच प्राणादिक वेगळाल्या पांच वायूंस त्यांचेंच जें मिश्र आवरण, ( उदानसमानात्मक, समानव्यानात्मक, व्यानोदानात्मक इ० ) वर सांगितलेल्या पित्तादि द्वादश धातूंचें मिश्र आवरण, ( पित्तकफात्मक, कफरक्तात्मक मांसरक्तात्मक, अस्थिमांसात्मक इ० ) व परस्पर-मिश्रित प्राणादि पंचवायूंस मिश्रित अपानादिक व पित्तादिक यांचें जें आवरण, तसेंच प्राणादिमिश्रित पित्तादिकांचें जें आवरण पित्तापानात्मक, रक्तोदानात्मक, कफमांसव्यानात्मक इ० ) व त्या मिश्रणांतील तारतम्यभेद हीं लक्षांत आणिलीं असतां आवरणाचे असंख्य प्रकार उत्पन्न होतात*

तां लक्षयेदवहितो यथास्वं लक्षणोदयात् ॥ ५५ ॥
शनैः शनैश्चोपशयाद्गूढामपि मुहुर्मुहुः ।

जरी ते प्रकार फार गूढ आहेत तरी त्या त्या लक्षणांच्या उत्पत्तीवरून व उपशयज्ञानार्थ हळूहळू उपचार करून वारंवार लक्ष देऊन पाहावें.

विशेषाज्जीवितं प्राण उदानो बलमुच्यते ॥ ५६ ॥
स्यात्तयोः पीडनाद्धानिरायुषश्च बलक्षयः ।

प्राणादिक सर्व वायु जीवितरूप आहेत तरी विशेषतः प्राणवायुच, जीवित आहे व तसेंच उदानवायु बल आहे म्हणून प्राणास पीडा झाली असतां आयुष्याचा व उदानास झाली असतां बलाचा क्षय होतो.

आवृता वायवोऽज्ञाता ज्ञाता वा वत्सरं स्थिताः ॥५७॥
प्रयत्नेनापि दुःसाध्या भवेयुर्वाऽनुपक्रमाः ।

वायूंचीं आवरणें न समजून किंवा समजून त्यांस एक वर्ष लोटलें असतां मोठ्या प्रयत्नानेंहि ते कष्टसाध्य किंवा असाध्य होतात.

विद्रधिप्लीहहृद्रोगगुल्माग्निसदनादयः ॥ ५८ ॥
भवन्त्युपद्रवास्तेषामावृतानामुपेक्षणात् ।

त्या आवृत वायूची उपेक्षा केली असतां विद्रधि, प्लीहा, हृद्रोग, गुल्म, व अग्निमांद्य इत्यादिक रोग उत्पन्न होतात.

॥ इति श्रीसिंहगुप्तसूनुवाग्भटविरचितायामष्टाङ्ग-
हृदयसंहितायां तृतीयं निदानस्थानं समाप्तम् ॥

याप्रमाणें श्रीसिंहगुप्तपुत्रवाग्भटकृत अष्टांगहृदयसंहितेंतील तिसरें जें निदानस्थान तें समाप्त झालें.

---

* यांत ' आवृति ' असा जो शब्द आहे त्याचा अर्थ आवरण. डॉ. कुंटे यांच्या पुस्तकांतील मूळांत व टीकेंत ' आवृति ' बद्दल ' आवृत्ति ' असें जें लिहिलें आहे तें चुकीचें आहे; कारण आवरणाचे असंख्य प्रकार होतात हें ह्या श्लोकांत दाखविलें आहे म्हणून आवृत्ति शब्द अप्रयोजक होईल. टीकेच्या अवतरणामध्यें मात्र आरंभीं ' आवृति ' हाच शब्द त्यांच्याहि पुस्तकांत आहे. भाषांतराच्या शेवटच्या वाक्यांत ' मिश्रणांतील तारतम्य भेद ' असें जें म्हटलें आहे त्याचा अर्थ हाच; ज्या दोन किंवा अनेक पदार्थांचें मिश्रण झालें असतें त्यांच्या परस्पर प्रमाणामधील कमीजास्तपणा.